महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६,
नियम, सांविधिक अधिसूचना व आदेश

यांचा

अंतर्भाव असलेली

महाराष्ट्र

# जमीन महसूल नियमपुस्तिका

(खंड एक)

शासकीय मुद्रणालय, नागपूर

१९७५

## प्राक्कथन

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ हा अधिनियमित केल्यामुळे आणि तदन्वये नियम केल्यामुळे राज्यातील जमीन महसूलविषयक कायद्यांमध्ये एकरूपता प्रस्थापित झाली आहे. तथापि, महसूल लेखांकन पद्धती, कार्यालयीन कार्यपद्धती आणि नियमांखाली न येणाऱ्या शासकीय व कार्यकारी बाबींच्या संबंधात एकरूपता नाही. या बाबतीत एकरूपता आणण्यासाठी शासनाने राज्यातील तीन निरनिराळया प्रदेशांच्या संबंधातील विशेष माहिती असलेल्या पुढील तीन वरिष्ठ जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या समितीची नेमणूक केली होती :—

(१) श्री. एच. एस. मानवीकर, आय. ए. एस. .. .. .. अध्यक्ष

त्यावेळचे औरंगाबादचे जिल्हाधिकारी व आताचे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाचे सहसचिव, सचिवालय, मुंबई-३२.

(२) कॅप्टन के. व्ही. देसाई, आय. ए. एस. .. .. .. सदस्य

त्यावेळचे सांगलीचे जिल्हाधिकारी व आता मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

(३) श्री. बी. जी. देशमुख, आय. ए. एस. .. .. .. सदस्य

त्यावेळचे यवतमाळचे जिल्हाधिकारी, आता अकोल्याचे जिल्हाधिकारी.

२. इतर गोष्टींसमवेत, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, नियम व सांविधिक आदेश आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या निरनिराळया उपबंधांन्वये काढलेल्या अधिसूचना यांचा समावेश असलेली जमीन महसूल नियमपुस्तिका करण्यास समितीला सांगण्यात आले. त्यानुसार, उपरोक्त बाबींचा समावेश असलेला हा पहिला खंड समितीने सादर केला आहे.

३. या खंडामध्ये समितीने, अधिनियमाच्या ज्या कलमान्वये नियम करण्यात आले असतील, सांविधिक आदेश व अधिसूचना काढण्यात आल्या असतील, त्या संबंधित कलमांच्या खालीच ते नियम, आदेश व त्या अधिसूचना उद्धृत करून संकलित केलेल्या आहेत. यामुळे एका दृष्टिक्षेपात उपबंधांविषयी माहिती मिळू शकते आणि त्यामुळे स्वतंत्र पुस्तकामधून त्यांचा संदर्भ मिळवण्याची आवश्यकता भासत नाही. तसेच, या अधिनियमान्वये शासनाने काढलेल्या काही आदेशांमध्ये ज्या इतर अधिनियमांचा निर्देश केला असेल त्या अधिनियमान्वये केलेले संबंधित नियम, या खंडाच्या परिशिष्टामध्ये सांविधिक अधिसूचना व आदेश आणि सुधारणा अधिनियम या समवेत समितीने पुनरुद्धृत केले आहेत.

४. हा अद्यावत खंड, महसूल अधिकारी तसेच सरकारी अधिकारी आणि वकीलवर्ग व जनता यांच्याकरिता उपयुक्त ठरेल अशी आशा आहे.

५. समितीचे सर्व सदस्य, त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कामाकरिता आणि विशेषेकरून समितीचे अध्यक्ष, श्री. एच. एस. मानवीकर व समितीचे सचिव, श्री. जे. टी. चिटणीस आणि श्री. जी. जी. पंदीरकर हे शासनाच्या प्रशंसेस पात्र आहेत.

एम. पी. पांडे,

सचिव, महाराष्ट्र शासन,

महसूल व वन विभाग.

सचिवालय, मुंबई :

दिनांक ७ डिसेंबर १९७२.

# खंड एकवरील अहवाल

शासनाने, शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक इएसटी-१०६८/६८५/ई, दिनांक ९ मे १९६८ अन्वये, "महसूल लेखे कार्यपद्धती व नियमपुस्तिका एकीकरण समिती" या नावाच्या एका समितीची नेमणूक केली. महसुली लेखांकनपद्धती व राज्याच्या तीन प्रदेशांमध्ये गाव, तालुका व जिल्हा पातळीवरील महसूल कार्यालयांमध्ये प्रचलित असलेली कार्यपद्धती या संबंधात एकीकरण करण्याच्या प्रश्नासंबंधी समितीने विचार करावयाचा आहे व त्याचप्रमाणे सबंध राज्यामध्ये याबाबतीत एकरूप पद्धतीचा अवलंब करण्याच्या दृष्टीने शासनाकडे शिफारशी करावयाच्या आहेत.

२. समितीपुढील विचारार्थ विषयानुसार नियमपुस्तिकांच्या स्वरूपात तीन खंडांमध्ये आम्हाला आमचे प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. प्रत्येक खंडामध्ये खाली नमूद केलेल्या गोष्टींचा समावेश असेल :—

**खंड एक** :—(एक) सांविधिक विधि म्हणजेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, (दोन) अधिनियमाखाली केलेले नियम, (तीन) अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांन्वये काढलेल्या सांविधिक अधिसूचना व आदेश.

**खंड दोन** :—(एक) तालुका व जिल्हा कार्यालयातील कार्यालयीन कार्यपद्धती, (दोन) तालुक्यातील महसूल अधिकारी जमीन महसूलविषयक ज्या बाबींशी संबंधित असतात अशा बाबींसंबंधीचे प्रशासनिक आदेश, सूचना, शासन निर्णय व परिपत्रके, (तीन) तालुका व जिल्हा महसूल लेख्यांच्या संबंधातील सूचनांसह नमुने.

**खंड तीन** :—(एक) मंडळ निरीक्षक व तलाठी यांची कार्यपद्धती व कर्तव्ये व कामे, (दोन) ग्राम महसूल लेख्यांच्या संबंधातील सूचनांसह नमुने.

सामान्यपणे, विचारार्थ विषयावरील सर्व बाबींसंबंधीच्या शिफारशींचा समावेश असलेला एकच अहवाल तीनही खंडांच्या मसुद्यासह आम्ही शासनास सादर करावयाला पाहिजे होता. तथापि, या खंडाचे संकलन करण्याच्या प्रयोजनार्थ, संपूर्ण राज्यामध्ये जमीन महसूलविषयक एकच कायदा असणे आवश्यक आहे. संपूर्ण राज्यामध्ये एकच जमीन महसूल अधिनियम लागू असला तरीही अधिनियमान्वये केलेले जमीन महसूल नियम लागू करण्याच्या संबंधात संपूर्ण एकरूपता प्रस्थापित झालेली नाही. तथापि, या संबंधातील कामात बरीच प्रगती झाली असून एकूण ३२ बाबींपैकी २६ बाबींवरील नियम तयार करण्यात आले व त्यांना अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. इतर बाबींच्या संबंधात नियमांचे मसुदे प्रसिद्ध करण्यात आले आहेत आणि लवकरच या सर्व नियमांना अंतिम स्वरूप देण्यात येईल असे आम्हाला वाटते. म्हणून, विचारार्थ विषयाच्या अनुसार या खंडाचे संकलन करण्याचा व सर्व बाबींवरील नियमांना अंतिम स्वरूप देण्यात येईपर्यंत संकलनाचे काम चालू ठेवून संकलित खंड शासनास सादर करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यानुसार १३ नोव्हेंबर १९६९ रोजी खंड तीनमध्ये आम्ही आमचे प्रस्ताव शासनास यापूर्वीच सादर केले आहेत. सध्या आम्ही, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, तदन्वये केलेले नियम, काढलेले सांविधिक आदेश, अधिसूचना यांचा समावेश असलेला नियमपुस्तिकेचा पहिला खंड शासनास सादर करीत आहोत.

३. हा खंड तयार करताना, आम्ही श्री. अँडर्सन यांनी मुंबई जमीन महसूल नियम, १९२१ यामध्ये अवलंबिलेली सांविधिक उपबंधांच्या खाली टीपा देण्याची पद्धती स्वीकारली आहे. प्रथमत: आम्ही, शासनाने जमीन महसूल अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांन्वये केलेले सर्व नियम, काढलेल्या अधिसूचना व आदेश एकत्र केले. हे नियम, अधिसूचना किंवा आदेश, ते अधिनियमाच्या ज्या कलमान्वये तयार करण्यात किंवा काढण्यात आले असतील त्या कलमाच्या खालीच वऱ्हाड महसूल नियमपुस्तिका, खंड एकमध्ये ज्याप्रमाणे मुद्रित करण्यात आले आहेत त्याचप्रमाणे मुद्रित करण्यात आले आहेत. उक्त कलमामधील सूचक शब्दांची निवड करण्यात आली असून त्यास त्याच्यासाठी असलेल्या टीपांचा क्रमांक सूचित करणारा क्रमांक त्याला देण्यात आला आहे. या टीपेमध्ये अधिसूचना किंवा काढलेला आदेश यांचा आशय दिलेला आहे. या टीपांना लागोपाठचे क्रमांक देण्यात आले असून आवश्यक असेल त्या ठिकाणी इतर टीपांमध्ये ते उद्धृत करण्यात आले आहेत. ज्या कलमान्वये नियम करण्यात आले आहेत त्या कलमाखालीच ते नियम मुद्रित केले आहेत. नियम एक किंवा अधिक कलमान्वये किंवा संपूर्ण प्रकरणावर करण्यात आले असतील

त्याबाबतीत, उक्त नियम अखेरच्या कलमाखाली किंवा प्रकरणाच्या अखेरीस मुद्रित करण्यात आले आहेत. तथापि, पूर्वीच्या कलमांचा प्रतिसंदर्भ, त्या विशिष्ट कलमासंबंधीचे नियम अचूकपणे कोठे सापडतील हे दर्शविण्याकरिता देण्यात आले आहेत.

४. एखाद्या विशिष्ट कलमाखाली, या अधिनियमान्वये काढलेल्या आदेशांचा व अधिसूचनांचा केवळ आशय दिलेला असला तरीही शासनाने काढलेली अधिसूचना व आदेश तात्काळ संदर्भ मिळावा याकरिता या खंडास परिशिष्ट म्हणून जोडण्यात आले आहेत. या आदेशात केलेली कोणतीही सुधारणा किंवा त्यानंतर काढलेले कोणतेही आदेश या परिशिष्टास जोडण्यात येतील आणि कलमाखालील टीपात योग्यप्रकारे सुधारणा करण्यात येतील किंवा नवीन टीप जोडण्यात येईल.

५. अधिनियमाच्या काही उपबंधांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणा पानाच्या खालच्या बाजूस, कलमाच्या आणि ज्या सुधारणा अधिनियमान्वये उपबंधांमध्ये सुधारणा करण्यात आली असेल त्या सुधारणा अधिनियमाचा निर्देश करून तळटीपा समाविष्ट करून दर्शविण्यात आल्या आहेत. आतापर्यंत सुधारणा केलेले अधिनियमित अधिनियम खंडाच्या शेवटी परिशिष्ट म्हणून जोडण्यात आले आहेत.

६. अधिनियमान्वये शासनाने काढलेल्या काही आदेशांमध्ये इतर अधिनियमान्वये केलेल्या नियमांचा संदर्भ दिला आहे, उदाहरणार्थ, अधिनियमाच्या कलम २३१ अन्वये काढलेले, परिपत्रक क्रमांक यूएनएफ-२४६७-आर, दिनांक २७ एप्रिल १९६८ अन्वये शासनाने असा निदेश दिला आहे की, चौकशी करतेवेळी महसूल कार्यालयाकडून आकारण्यात यावयाची आदेशिका फी आणि त्यांच्यासमोर उपस्थित राहणारे साक्षीदार यांना द्यावयाचे भत्ते हे मुंबई उच्च न्यायालयाच्या दिवाणी नियमपुस्तिकेच्या खंड १ मधील नियमांमध्ये विहित केलेल्या प्रमाणानुसार असतील. महसूल अधिकाऱ्यांना हे प्रमाण/दर माहीत व्हावेत याकरिता दिवाणी नियमपुस्तिकेमधील संबंधित नियम परिशिष्टामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत.

७. शासनाने या अधिनियमान्वये, निरनिराळे महसूल व भूमापन अधिकारी यांची नेमणूक करणाऱ्या अधिसूचना काढल्या आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नेमणुका करणाऱ्या अधिसूचना शासनाने काढल्या आहेत. या अधिसूचना सांविधिक अधिसूचना असल्या तरीही त्या कायम स्वरूपाच्या नसल्याने व त्यांच्यामध्ये वारंवार फेरफार होण्याची शक्यता असल्याने त्या या खंडामध्ये समाविष्ट केलेल्या नाहीत.

८. आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, खालील नियमांसमोर निर्दिष्ट केलेल्या कलमाखालील पुढील नियम आम्ही समाविष्ट केले आहेत. हे केवळ नियमांचे मसुदे असून त्यावर लोकांकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी ते प्रसिद्ध करण्यात आले आहेत. नजिकच्या भविष्यकाळात या नियमांना अंतिम स्वरूप देण्यात येईल अशी आशा आहे. म्हणून हा खंड मुद्रणाकरिता पाठविण्यात येण्यापूर्वी जसजसे अंतिम नियम अंतिमरीत्या प्रसिद्ध होतील तसतसे ते नियम या नियमांऐवजी दाखल करण्यात येतील असे आम्ही सूचित करीत आहोत :—

| अनुक्रमांक (१) | नियमांच्या मसुद्याचे नाव (२) | ज्याखाली समाविष्ट केले ते कलम (३) |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट) नियम, १९६९ .. | ५१ |
| २ | महाराष्ट्र जमीन महसूल (शेतजमिनीवरील जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी) नियम, १९७०. | १०२ |
| ३ | महाराष्ट्र जमीन महसूल (खाते-पुस्तिका) (तयार करणे, देणे व ठेवणे) नियम, १९७०. | १५१ |
| ४ | महाराष्ट्र जमीन महसूल अधिकाराभिलेख व नोंदवह्या (तयार करणे व ठेवणे) नियम, १९६९. | १५६ |
| ५ | महाराष्ट्र जमीन महसूल (निस्तारपत्रक व मत्स्यव्यवसाय नियमन) नियम, १९६९. | १६६ |

९. आतापर्यंत शासनाने तयार केलेले सर्व अंतिम नियम आम्ही वाचलेले आहेत व ते या खंडात समाविष्ट केले आहेत. हे करीत असताना आम्हाला असे दिसून आले की, महसूल अधिकाऱ्यांना नियमांची अंमलबजावणी योग्यप्रकारे करावी यासाठी काही नियमांमध्ये फेरफार करण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार, विवक्षित नियमांमध्ये स्वतंत्रपणे सुधारणा करण्याची सूचना आम्ही शासनास केली आहे. शासन आमच्या सूचनांवर विचार करील आणि या संबंधित नियमांमध्ये सुधारणा करून त्या या खंडामध्ये समाविष्ट करील अशी आम्हाला आशा वाटते.

१०. आम्ही शासनास आणखी अशी सूचना करू इच्छितो की, या खंडाचे मुद्रण चालू असताना अधिनियमाचे उपबंध, नियम, आदेश व अधिसूचना इत्यादींचे मुद्रण करताना मोठया, मध्यम व लहान मुद्राक्षरांचा वापर करण्याबाबत त्यांनी मुद्रणालयाच्या प्राधिकाऱ्यांना सूचना करावी म्हणजे या खंडाचे वाचन करतेवेळी उपबंध, नियम, आदेश, अधिसूचना इत्यादी एकमेकांपासून ओळखता येतील.

११. या खंडामध्ये समितीने स्वतःची अशी कोणतीही नवीन बाब समाविष्ट केलेली नसली तरीही, शासनाने वेळोवेळी काढलेले सर्व सांविधिक आदेश व अधिसूचना या खंडामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत आणि सर्व संबंधित उपबंध एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकतील अशा प्रकारे त्यांचा क्रम लावण्यात आला आहे हे पाहण्याची विशेष खबरदारी आम्ही घेतली आहे. या खंडामध्ये अधिनियमाखालील अद्यावत नियम, अधिसूचना व आदेश समाविष्ट केलेले असून ते सर्व महसूल व भूमापन अधिकारी तसेच महसूल विभाग व सचिवालयातील इतर विभाग यातील अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या दैनंदिन कामामध्ये हा खंड अत्यंत उपयुक्त ठरेल असे आम्हास वाटते.

१२. या खंडाचे संकलन करण्याच्या कामी बहुमोल सहाय्य केल्याबद्दल आम्ही श्री. एम. पी. पांडे, उपसचिव, महसूल व वन विभाग, श्री. व्ही. एच. आनंद, अधीक्षक, भूमि अभिलेख व श्री. जे. टी. चिटणीस, सेवानिवृत्त अवर सचिव, महसूल व वन विभाग व समितीचे माजी सचिव यांचे आभारी आहोत.

१३. हा खंड तयार करण्याचे काम अवाढव्य स्वरूपाचे होते. तसेच त्याकरिता बराच मोठा कालावधी व्यतीत करावा लागला. सर्वश्री एम. एन. पोंगुर्लेकर व एस. एस. नखाते व समितीच्या कामाच्या संबंधातील इतर प्रभारी कर्मचारीवर्ग या सर्वांनी दिलेल्या सहकार्याचा विशेष आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. या सर्वांनी आपापली कामे अत्यंत समाधानकारकरीत्या पार पाडली आहेत.

एच. एस. मानवीकर, .. .. .. .. .. अध्यक्ष
उप-आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

के. व्ही. देसाई, .. .. .. .. .. .. सदस्य
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

बी. जी. देशमुख, .. .. .. .. .. .. सदस्य
जिल्हाधिकारी, अकोला.

जी. जी. पंदीरकर, .. .. .. .. .. .. सचिव
विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, सचिवालय, मुंबई-३२.

दिनांक २ डिसेंबर १९७०.

# महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६

## अनुक्रमणिका

उद्देशिका

### प्रकरण १

### प्रारंभिक


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. | १ |
| २. | व्याख्या .. | १ |
| | **महसुली क्षेत्रे** | |
| ३. | राज्याची महसुली क्षेत्रांमध्ये विभागणी .. | ६ |
| ४. | महसुली क्षेत्रांची रचना .. | ६ |


### प्रकरण २

### महसूल अधिकारी : त्यांचे अधिकार व कर्तव्ये


| | | |
|---|---|---|
| ५. | महसुलाच्या बाबतीत मुख्य नियंत्रक प्राधिकार .. | ९ |
| ६. | विभागातील महसूल अधिकारी .. | ९ |
| ७. | जिल्ह्यातील महसूल अधिकारी .. | ९ |
| ८. | भू-मापन अधिकारी .. | ९ |
| ९. | पदांचे एकीकरण .. | १० |
| ९-अ. | शक्तीचे प्रत्यायोजन .. | १० |
| १०. | तात्पुरत्या रिकाम्या जागा .. | ११ |
| ११. | अधिकारी हाताखाली असणे .. | ११ |
| १२. | नेमणुका अधिसूचित करणे .. | १२ |
| १३. | महसूल अधिकाऱ्यांच्या शक्ती व कर्तव्ये .. | १३ |
| १४. | भू-मापन अधिकारी, मंडल अधिकारी वगैरे यांच्या शक्ती व कर्तव्ये .. | १८ |
| १५. | राज्य सरकारने महसूल अधिकाऱ्यांच्या शक्ती इतर इसमांना प्रदान करणे .. | २५ |
| १६. | शिक्के .. | २७ |
| | **पैसा, कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता परत मिळविण्यासंबंधी तरतुदी** | |
| १७. | पैसा, कागदपत्रे वगैरेबाबतची मागणी संबंधित इसमांना लेखी कळविणे .. | २८ |
| १८. | सरकारी पैसासुद्धा महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल ; आणि कागदपत्रे किंवा मालमत्ता परत मिळविण्यासाठी झडतीचे अधिपत्र काढता येईल. | २९ |
| १९. | तुरुंगात असलेल्या अधिकाऱ्यास किंवा इसमास, तारण देऊन आपली सुटका करून घेता येईल. | २९ |

प्रकरण ३

जमिनींबाबत


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| २०. | इतरांची मालमत्ता नसलेल्या सर्व जमिनी, सार्वजनिक रस्ते, इत्यादींमधील राज्याचा मालकी हक्क. | ३१ |
| २१. | सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यक नसलेला कोणताही सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग यातील किंवा यावरील लोकांचे हक्क नाहीसे होणे. | ३४ |
| २२. | विशेष कारणांसाठी जमिनीचे अभिहस्तांकन करता येईल आणि अभिहस्तांकन करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीवाचून तिचा अन्यथा उपयोग करता कामा नये. | ३५ |
| २३. | कुरणाच्या वापराचे नियमन .. | ३५ |
| २४. | विवक्षित जमिनीतून अनधिकृतपणे काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाची किंमत वसूल करणे. | ३५ |
| २५. | धारण जमिनीतील झाडांवरील हक्क .. | ३५ |
| २६. | सरकारकडे निहित असलेली झाडे व जंगले .. | ३९ |
| २७. | अनधिकृतपणे विनियोग केलेली झाडे वगैरे यांची किंमत वसूल करणे .. | ४० |
| २८. | लाकडे वगैरे तोडण्याचे व त्यांच्या पुरवठ्याचे नियमन .. | ४० |


जमीन देण्याबाबत


| | | |
|---|---|---|
| २९. | जमीन धारण करणाऱ्या इसमांचे वर्ग .. | ४१ |
| ३०. | अधिनियमाच्या उपबंधान्वये मंजूर करण्यात आलेल्या बिनदुमाला जमिनीचा भोगवटा | ४५ |
| ३१. | भोगवट्यात नसलेली जमीन शर्तीवर देता येईल .. | ४५ |
| ३२. | सरकारकडे निहित असलेली मळईची जमीन देणे .. | ४५ |
| ३३. | लहान मळई जमिनीबाबत तात्पुरते हक्क .. | ४६ |
| ३४. | मृत्युपत्ररहित भोगाधिकारांची विल्हेवाट लावणे .. | ४७ |
| ३५. | सोडून दिलेल्या किंवा जप्त केलेल्या पोटविभागाची विल्हेवाट .. | ४७ |
| ३६. | विवक्षित निर्बंधास अधीन राहून भोगाधिकार हस्तांतरणीय व वंशपरंपरागत असणे .. | ४८ |
| ३७. | भोगवटादाराचे हक्क शर्तीस अधीन असतील .. | ६६ |
| ३८. | पट्टे देण्याची शक्ती .. | ६६ |
| ३९. | भोगवटादाराने ठरविण्यात आलेला जमीन महसूल देणे आणि सरकारी पट्टेदाराने ठरविण्यात आलेला खंड देणे. | ६६ |
| ४०. | सरकारचा अधिकार राखून ठेवणे .. | ६६ |


जमिनीच्या उपयोगाबाबत


| | | |
|---|---|---|
| ४१. | शेतीच्या प्रयोजनांसाठी जमीन धारण करणाऱ्या इसमास कोणत्या कारणासाठी आपल्या जमिनीचा उपयोग करता येईल. | ६६ |
| ४२. | अकृषिक उपयोगासाठी परवानगी .. | ६७ |
| ४३. | उपयोगावर निर्बंध .. | ६७ |
| ४४. | जमिनीच्या उपयोगाचे एका प्रयोजनातून दुसऱ्या प्रयोजनात रूपांतर करण्याकरिता कार्यपद्धती. | ६९ |

प्रकरण ३—चालू

जमिनीच्या उपयोगाबाबत—चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ४५. | परवानगीशिवाय अशा रीतीने जमिनीचा उपयोग करण्याबद्दल शास्ती .. | ७० |
| ४६. | दुरुपयोग केल्याबद्दल कुळाची किंवा इतर इसमांची जबाबदारी .. | ७१ |
| ४७. | कलमे ४२, ४४, ४५ किंवा ४६ यांच्या उपबंधांच्या कक्षेतून जमिनी वगळण्याचा राज्य सरकारचा अधिकार. | ७१ |
| ४८. | खाणी व खनिजे यांवरील सरकारचा हक्क .. | ७१ |
| ४९. | इतर इसमांच्या स्वाधीन असलेल्या जमिनीतून पाण्याचे पाट बांधणे .. | ७५ |


जमिनीवरील अतिक्रमणासंबंधी


| | | |
|---|---|---|
| ५०. | सरकारमध्ये निहित असलेल्या जमिनीवरील अतिक्रमण दूर करणे; शास्ती व इतर आनुषंगिक बाबी यासाठी उपबंध. | ७९ |
| ५१. | अतिक्रमणांचे नियमानुकूलन .. | ८० |
| ५२. | किंमत व जमीन महसूल करा मोजावा .. | १४६ |
| ५३. | सरकारमध्ये निहित असलेल्या जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या इसमास संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून लावणे. | १४६ |
| ५४. | संक्षिप्तरीत्या काम चालवून दोषी ठरविण्यात आल्यानंतर मालमत्ता सरकारजमा करणे आणि ती काढून टाकणे. | १४७ |
| ५४-अ. | अनुज्ञप्ति समाप्त करण्यासाठी आणि कोणत्याही जमिनीवरील किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशातील जी कोणतीही इमारत किंवा बांधकाम जप्त केले असेल ती इमारत किंवा बांधकाम पाडून टाकण्यासाठी आणि बेदखलीनंतर जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर पुन्हा प्रवेश करणाऱ्या किंवा राहणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्यासाठी तात्पुरत्या अतिरिक्त शक्ती. | १४७ |


जमिनी सोडून देण्यासंबंधी


| | | |
|---|---|---|
| ५५. | जमीन सोडून देणे .. | १४८ |
| ५६. | दुमाला जमीन सोडून देणे .. | १४८ |
| ५७. | सोडून दिलेल्या जमिनीत जाण्याचा हक्क .. | १४८ |
| ५८. | विवक्षित प्रकरणात कलम ५५ च्या अंमलाचा बचाव .. | १४८ |
| ५९. | अनधिकृतपणे जमिनीचा भोगवटा करणाऱ्या इसमास संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकणे. | १४८ |
| ६०. | कलम ५५ ची अंमलबजावणी तहकूब करण्याचा राज्य सरकारचा अधिकार .. | १४८ |


विवक्षित भोगाधिकारांचे न्यायालयीन कार्यवाहीपासून संरक्षण


| | | |
|---|---|---|
| ६१. | भोगाधिकार हा दिवाणी न्यायालयाच्या आदेशिकेस केव्हा पात्र नसेल; न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अंमलात आणणे. | १४९ |
| ६२. | जप्ती किंवा विक्री यास मनाई .. | १४९ |
| ६३. | भूमिधारीचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट करण्यास, तो जप्त करण्यास किंवा त्याची विक्री करण्यास मनाई. | १४९ |

## प्रकरण ४

### जमीन महसुलासंबंधी


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ६४. | विशेषरीत्या माफी दिली असेल त्याव्यतिरिक्त सर्व जमिनी जमीन महसूल देण्यास पात्र असणे. | १५० |
| ६५. | मळईच्या जमिनी जमीन महसुलास पात्र असणे .. | १५० |
| ६६. | पाण्याने जमीन वाहून गेली असेल तर जमीन महसुलाची आकारणी .. | १५० |
| ६७. | आकारणीची रीत आणि आकारणीतील फेरफार .. | १५० |
| ६८. | आकारणी कोणी ठरवावी .. | १५१ |
| ६९. | धारकाबरोबर करावयाची आकारणीसंबंधीची तडजोड प्रत्यक्ष राज्य सरकारतर्फे करणे | १५१ |
| ७०. | पाण्याच्या वापरासंबंधी दर .. | १५२ |
| ७१. | या अधिनियमान्वये आकारणी ठरविणे हे साधारण जमीन महसुलापुरतेच मर्यादित असणे. | १५३ |
| ७२. | जमीन महसूल हा जमिनीवरील मुख्य भार असेल .. | १५३ |
| ७३. | जप्त केलेल्या जमिनींचा कब्जा घेता येईल आणि अन्यथा त्यांची विल्हेवाट लावता येईल | १५४ |
| ७४. | भोगाधिकार जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून जमीन महसूल देण्याचा अधिकार खातेदाराखेरीज इतर विवक्षित इसमास आहे. | १५४ |
| ७५. | दुमाला जमिनीचे नोंदणी-पुस्तक .. | १५४ |
| ७६. | पावत्या .. | १५७ |
| ७७. | पावत्या देण्यास कसूर केल्याबद्दल शास्ती .. | १५७ |
| ७८. | जमीन महसूल कमी करणे, तो तहकूब करणे किंवा त्याची सूट देणे .. | १५७ |


## प्रकरण ५

### महसुली मोजणी


| | | |
|---|---|---|
| ७९. | राज्य सरकारास, राज्यातील कोणत्याही भागात महसुली मोजणी सुरू करता येईल .. | १६२ |
| ८०. | सामान्य नोटीस किंवा आज्ञापत्रे याद्वारे जमीन वगैरे धारण करणारास योग्य ती सेवा करण्याबाबत फर्माविता येईल. | १६२ |
| ८१. | जमिनीची मोजणी किंवा वर्गीकरण करण्याच्या कामात जमीन धारण करणारांनी व इतरांनी सहाय्य करणे. | १६२ |
| ८२. | भूमापन क्रमांक हे विशिष्ट व्याप्तीपेक्षा कमी असता कामा नये .. | १६२ |
| ८३. | नव्याने मोजणी करण्याविषयी आणि आकारणीची फेरतपासणी करण्याविषयी निदेश देण्याची शासनाची शक्ती. | १६३ |
| ८४. | भू-मापन क्रमांक व उपविभाग यांची अभिलेखात नोंद .. | १६३ |
| ८५. | विभागणी .. | १६३ |
| ८६. | भूमापन क्रमांकांची नवीन भूमापन क्रमांकांमध्ये विभागणी .. | १६७ |
| ८७. | भूमापन क्रमांकांची उपविभागात विभागणी .. | १६७ |
| ८८. | स्वामित्वपत्रांविषयीचा विशेषाधिकार .. | १८० |
| ८९. | ह्या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेले भू-मापन हे ह्या प्रकरणान्वये केले असल्याचे समजणे. | १८० |

## प्रकरण ६

### शेतजमिनीच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ९०. | अर्थविवरण .. .. .. .. .. .. | १८१ |
| ९१. | जमाबंदीसंबंधी अंदाज .. .. .. .. .. .. | १८१ |
| ९२. | कोणत्याही जमिनीच्या जमीन महसुलाची प्राथमिक जमाबंदी करण्याबद्दल किंवा जमाबंदीत फेरफार करण्याबद्दल निदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार. | १८२ |
| ९३. | जमाबंदीची मुदत .. .. .. .. .. .. | १८२ |
| ९४. | आकारणी निश्चित करणे .. .. .. .. .. .. | १८२ |
| ९५. | धारकांच्या खर्चाने केलेल्या सुधारणांमुळे सरासरी उत्पन्नात झालेली वाढ, ही वाढ विचारात घेता कामा नये. | १८३ |
| ९६. | जमाबंदी अधिकाऱ्याने जमाबंदीचे काम कसे सुरू करावे .. .. .. | १८३ |
| ९७. | जमाबंदी प्रतिवृत्त छापणे व प्रसिद्ध करणे .. .. .. .. | १८४ |
| ९८. | हरकती वगैरेच्या निवेदनासहित व त्यावरील जिल्हाधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह जमाबंदी प्रतिवृत्त सरकारला सादर करणे. | १८४ |
| ९९. | महसूल न्यायाधिकरणाकडे निर्णयासाठी बाब पाठविणे .. .. .. | १८४ |
| १००. | जमाबंदीच्या प्रतिवृत्तावरील आदेश .. .. .. .. .. | १८४ |
| १०१. | पाण्याच्या फायद्याबद्दलच्या आकारणीची माफी देण्याचा राज्य सरकारचा अधिकार | १८५ |
| १०२. | जमाबंदीची सुरुवात .. .. .. .. .. .. | १८५ |
| १०३. | महसूल मुक्त जमीन धारण करण्यासंबंधीचा दावा .. | २१३ |
| १०४. | जमीन महसूल देण्याबाबत संपूर्णतः माफी दिलेल्या जमिनीवरील आकारणी .. | २१३ |
| १०५. | पाण्याच्या फायद्याबद्दल आकारणी बसविण्याबाबत निदेश देण्याची राज्य शासनाची शक्ती. | २१४ |
| १०६. | चुका दुरुस्त करण्याची जिल्हाधिकाऱ्यांची शक्ती .. | २१४ |
| १०७. | ह्या अधिनियमापूर्वी केलेली जमाबंदी ही ह्या प्रकरणान्वये केली असल्याचे समजणे | २१४ |


## प्रकरण ७

### अकृषिक कारणांकरिता वापरलेल्या जमिनींच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी


| | | |
|---|---|---|
| १०८. | अर्थविवरण .. | २१५ |
| १०९. | जमिनींचा अकृषिक उपयोग व नागरी व बिगर-नागरी क्षेत्र विचारात घेऊन जमिनीवरील अकृषिक आकारणी ठरविणे. | २१५ |
| ११०. | बिगर-नागरी क्षेत्रातील कृषितर जमिनींची अकृषिक आकारणी ठरविताना अनुसरावयाची कार्यपद्धती. | २१५ |
| १११. | नागरी क्षेत्रातील अकृषिक आकारणी ठरविताना अनुसरावयाची कार्यरीती .. | २१५ |
| ११२. | अकृषिक आकारणी ही संपूर्ण बाजारमूल्याच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक होता कामा नये | २१५ |
| ११३. | अकृषिक आकारणीचा प्रमाण दर ठरविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार .. | २१६ |
| ११४. | अकृषिक कारणासाठी उपयोगात आणलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर .. | २१६ |
| ११५. | अकृषिक आकारणीच्या प्रारंभाची तारीख .. | २१६ |

## प्रकरण ७—चालू

### अकृषिक कारणाकरिता वापरलेल्या जमिनींच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी—चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ११६. | कलमे ११० व ११४ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या आकारणीची मुदत .. | २१७ |
| ११७. | अकृषिक आकारणी देण्याची माफी असलेल्या जमिनी .. | २१७ |
| ११८. | माफी रद्द करणे .. | २४४ |
| ११९. | जमीन महसूल देण्याची संपूर्ण माफी असलेल्या जमिनींची अकृषिक आकारणी .. | २४४ |
| १२०. | अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निश्चित केलेली अकृषिक आकारणी, तिच्यात फेरबदल करण्यात येईतोपर्यंत अंमलात राहील. | २४४ |


## प्रकरण ८

### गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागातील जमिनी


| | | |
|---|---|---|
| १२१. | प्रकरण लागू असणे .. | २४५ |
| १२२. | गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांच्या हद्दी कशा ठरवावयाच्या ते .. | २४५ |
| १२३. | विवक्षित बाबतीत गावांच्या, नगरांच्या किंवा शहरांच्या जागेतील जमिनीवर कोणताही जमीन महसूल न आकारणे. | २४५ |
| १२४. | जिल्हाधिकाऱ्याने माफीविषयीचा हक्क ठरविणे .. | २४५ |
| १२५. | पार्डी व वाडा जमिनीस जमीन महसूल देण्याची माफी असणे .. | २४५ |
| १२६. | गावाच्या जागांतील जमिनीचे भूमापन कसे करावे ते .. | २४५ |
| १२७. | विवक्षित बाबतीत भू-मापन फी आकारणे .. | २४५ |
| १२८. | गावातील जागांचे नकाशे .. | २४६ |
| १२९. | कोणत्याही अधिक आकाराशिवाय सनद मंजूर करणे .. | २४६ |
| १३०. | धारण जमिनीतील फेरबदलानंतर सनद मंजूर करणे .. | २४७ |
| १३१. | दुसरी सनद मंजूर करता येईल .. | २४७ |


## प्रकरण ९

### हद्दी व हद्दींच्या निशाण्या


| | | |
|---|---|---|
| १३२. | हद्दी ठरविणे व आखणे .. | २५३ |
| १३३. | गावांच्या हद्दी ठरविणे .. | २५३ |
| १३४. | शेतांच्या हद्दी ठरविणे .. | २५३ |
| १३५. | गावे, भूमापन क्रमांक आणि पोट-विभाग यामधील हद्दीबाबत वाद .. | २५३ |
| १३६. | भू-मापन क्रमांकांच्या किंवा पोट-विभागांच्या हद्दीची आखणी .. | २५३ |
| १३७. | वेडयावाकडया हद्दी सरळ करणे .. | २५३ |
| १३८. | हद्द ठरविल्याचा परिणाम .. | २५४ |
| १३९. | भू-मापन क्रमांकांच्या आणि गावांच्या हद्दींच्या निशाण्या लावणे व त्या दुरुस्त करणे | २५५ |
| १४०. | हद्दींच्या निशाण्या व भू-मापन निशाण्या ठेवण्याची जबाबदारी .. | २५५ |
| १४१. | भू-मापन जमाबंदी चालू केल्यानंतर हद्दींच्या निशाण्या व भू-मापन निशाण्या जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन असणे. | २५६ |

प्रकरण ९—चालू

हद्दी व हद्दींच्या निशाण्या—चालू

| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १४२. | धारण केलेली जमीन व ग्रामरस्ता यांच्यामधील हद्दीच्या निशाण्यांची आखणी व त्या सुस्थितीत ठेवणे. | २५६ |
| १४३. | हद्दीवरून रस्त्याचा हक्क .. | २६७ |
| १४४. | नगररचना योजनेखालील किंवा सुधारणा योजनेखालील किंवा एकत्रीकरण योजनेखालील क्षेत्रात हद्दींची आखणी करणे. | २६७ |
| १४५. | हद्दीच्या निशाण्याचे नुकसान केल्याबद्दल शास्ती .. | २६७ |
| १४६. | या प्रकरणाच्या अंमलबजावणीतून माफी देण्याचा अधिकार .. | २६७ |

प्रकरण १०

भूमि अभिलेख

अ—हक्क-नोंदणी पत्रके

| | | |
|---|---|---|
| १४७. | या प्रकरणांच्या उपबंधातून माफी .. | २६८ |
| १४८. | हक्क-नोंदणी पत्रक .. | २६८ |
| १४९. | हक्क संपादन केल्याचे प्रतिवृत्त देणे .. | २६८ |
| १५०. | नामांतरणाचे नोंदणी-पुस्तक व वादात्मक प्रकरणांचे नोंदणी पुस्तक .. | २६९ |
| १५१. | माहिती पुरविण्याचे बंधन, जमीन धारकास किंवा कुळास हक्क-नोंदणी पत्रकांतील नोंदी इत्यादी पुस्तिकेच्या रूपाने पुरविण्याचे बंधन आणि पुस्तिका वगैरे ठेवणे. | २७० |
| १५२. | माहिती देण्यात हयगय केल्याबद्दल शास्ती .. | २७९ |
| १५३. | नकाशे तयार करण्याच्या कामी सहाय्याची मागणी .. | २७९ |
| १५४. | नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हस्तांतरणाबाबत माहिती कळविणे .. | २७९ |
| १५५. | हस्तलेखन प्रमादांची दुरुस्ती .. | २७९ |
| १५६. | भूमि अभिलेख .. | २७९ |
| १५७. | हक्क-नोंदणी पत्रकातील व नामांतरणाच्या नोंदणी-पुस्तिकातील नोंदी बरोबर असल्याचे गृहीत धरणे. | ३०० |
| १५८. | दाव्यास प्रतिबंध .. | ३०० |
| १५९. | अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळची हक्क-नोंदणी पत्रके .. | ३०० |

ब—भोगवट्यात नसलेल्या जमिनीबाबतचे हक्क

| | | |
|---|---|---|
| १६०. | कलमे १६१ ते १६७ यांचे उपबंध लागू करणे .. | ३०० |
| १६१. | निस्तारपत्रक .. | ३०० |
| १६२. | निस्तारपत्रकात तरतूद करावयाच्या बाबी .. | ३०० |
| १६३. | काही बाबींची निस्तारपत्रकात तरतूद करणे .. | ३०१ |
| १६४. | दुसऱ्या गावातील पडीत जमिनीवरील हक्क .. | ३०१ |
| १६५. | वाजिब-उल-अर्ज .. | ३०२ |
| १६६. | मच्छिमारी इत्यादींचे नियमन .. | ३०२ |
| १६७. | उपबंधांच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा .. | ३१५ |

## प्रकरण ११

### जमीन महसुलाची आणि इतर महसुलविषयक मागण्यांची वसुली


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| १६८. | जमीन महसुलाची जबाबदारी .. | ३१६ |
| १६९. | राज्य सरकारला येणे असलेल्या रकमांना इतर सर्व मागण्यांवर प्राधान्य देणे .. | ३१६ |
| १७०. | ज्या तारखांस जमीन महसूल देणे होतो आणि द्यावयास पाहिजे त्या तारखा .. | ३१६ |
| १७१. | तात्पुरती जप्ती आणि गाव किंवा गावाचा भाग यांची व्यवस्था .. | ३१७ |
| १७२. | तारण देण्यात आल्यानंतर गावाची किंवा गावाच्या भागाची तात्पुरती जमिनी जप्ती किंवा व्यवस्था सोडून देणे (काढून घेणे). | ३१७ |
| १७३. | "थकबाकी", "कसूर करणारी व्यक्ती" .. | ३१७ |
| १७४. | जमीन महसूल भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती .. | ३१७ |
| १७५. | प्रमाणित केलेले हिशेब हे थकबाकी विषयाचा पुरावा असतील .. | ३१७ |
| १७६. | थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती .. | ३१७ |
| १७७. | मागील वर्षाच्या महसुली मागण्या कशा वसूल करावयाच्या .. | ३१८ |
| १७८. | मागणीची नोटीस केव्हा दिली जाईल .. | ३१८ |
| १७९. | ज्या भोगाधिकाराबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीबाबत थकबाकी येणे असेल ते भोगाधिकार किंवा धारण केलेली दुमाला जमीन जप्त करता येईल. | ३१९ |
| १८०. | कसूर करणाऱ्या व्यक्तीची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री .. | ३१९ |
| १८१. | कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री .. | ३१९ |
| १८२. | कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि ती व्यवस्थेखाली घेण्याचा अधिकार. | ३२० |
| १८३. | कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करणे आणि स्थानबद्ध करणे .. | ३२० |
| १८४. | अटक करण्याच्या शक्तींचा वापर कोणी करावयाचा .. | ३२१ |
| १८५. | कसूर करणाऱ्या इसमाचे गाव जप्त करण्याची आणि व्यवस्थेखाली आणण्याची शक्ती. | ३२१ |
| १८६. | अशा गावांच्या जमिनी भारांपासून मुक्त अवस्थेत घेणे .. | ३२१ |
| १८७. | सरकारच्या मालकीची नसलेली परंतु राज्य सरकारच्या तात्पुरत्या व्यवस्थेखाली असलेली गावे किंवा भू-संपत्ती यांची महसूल व्यवस्था. | ३२२ |
| १८८. | शिल्लक राहिलेल्या नफ्यांचा विनियोग .. | ३२२ |
| १८९. | अशा रीतीने जप्त केलेले गाव परत देणे .. | ३२२ |
| १९०. | गाव वगैरे बारा वर्षात विमोचित करण्यात आले नाही तर ते राज्य सरकाराकडे निहित होणे. | ३२२ |
| १९१. | परंतु तारण दिल्यानंतर सर्व कार्यवाही थोपविणे .. | ३२२ |
| १९२. | विक्री करण्याच्या वेळची कार्यपद्धती .. | ३२३ |
| १९३. | विक्रीची अधिसूचना .. | ३२३ |
| १९४. | विक्री कोणी करावयाची, विक्रीची वेळ, इत्यादी .. | ३३६ |
| १९५. | विक्री तहकूब करणे .. | ३३६ |
| १९६. | नाश होणाऱ्या वस्तूंची विक्री .. | ३३६ |
| १९७. | विक्री केव्हा थांबविता येईल .. | ३३६ |

(३४) "उप-विभागीय" म्हणजे जिल्ह्याच्या एका किंवा अनेक उप-विभागांचा कार्यभार ज्याच्याकडे सोपविण्यात आला आहे असा सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी ;

(३५) "भू-मापन क्रमांकाचा पोट-विभाग" म्हणजे, भू-मापन क्रमांकाच्या ज्या विभागाचे क्षेत्रफळ आणि आकारणी, भूमि अभिलेखात ज्या भू-मापन क्रमांकाचा तो भाग असेल त्या क्रमांकानंतर, दर्शक क्रमांक देऊन स्वतंत्रपणे नोंदला असेल तो भाग ;

(३६) "भू-मापन निशाणी" म्हणजे, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी भू-करासंबंधी (कॅडस्ट्रल) भू-मापनाच्या प्रयोजनासाठी उभारण्यात आलेली निशाणी ;

(३७) "भूमापन क्रमांक" म्हणजे भूमि अभिलेखात दर्शक क्रमांक देऊन त्याखाली जमिनीच्या ज्या विभागाचे क्षेत्रफळ आणि आकारणी स्वतंत्रपणे नोंदण्यात आली असेल तो जमिनीचा भाग आणि त्यामध्ये—

(एक) कोणत्याही विधी अन्वये कोणत्याही क्षेत्रात अमलात आलेली अंतिम नगररचना योजना, सुधारणा योजना किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाची योजना यांन्वये पुनर्प्रस्थापित भूमि-खंडाचा (प्लॉटस) ; आणि

(दोन) नागपूर, वर्धा, चांदा व भंडारा या जिल्ह्यातील, खसरा क्रमांक म्हणून ओळखण्यात येणाऱ्या कोणत्याही दर्शक क्रमांकाखाली भूमि-अभिलेखात नमूद केलेल्या जमिनीच्या कोणत्याही भागाचा समावेश होतो ;

(३८) प्रकरण १४ खेरीज, "वरिष्ठ धारक" म्हणजे इतर भूमिधारकांकडून (ज्यांना "कनिष्ठ धारक" असे म्हटले आहे) खंड किंवा जमीन महसूल घेण्याचा हक्क ज्या भूमिधारकास आहे तो भूमिधारक; मग तो अशा खंडाबद्दल किंवा जमीन महसुलाबद्दल, किंवा त्याच्या कोणत्याही भागाबद्दल राज्य सरकारला जबाबदार असो किंवा नसो ; परंतु, दुमाला जमिनीचा धारक म्हणून भूमि-अभिलेखात अधिकृतरीत्या नोंदण्यात आलेल्या धारकाने, विवक्षित अशा विशिष्ट परिस्थितीत, जमीन पुन्हा परत घेतली जाण्याच्या हक्कास अधीन राहून, खंडाच्या किंवा जमीन महसुलाच्या माफीसह जमीन दिलेली असेल तेव्हा, असा धारक, ज्याला ती जमीन दिली असेल त्याच्या बाबतीत, त्याने अशा रीतीने दिलेल्या जमिनीचा वरिष्ठ धारक आहे असे मानण्यात येईल, आणि ज्याला जमीन देण्यात आली असेल तो, ज्याने जमीन दिली त्याच्या बाबतीत, अशा जमिनीचा कनिष्ठ धारक आहे असे मानण्यात येईल, आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) याची कलमे १४७, १५१ आणि १५२ च्या प्रयोजनासाठी यापुढे "कूळ" या संज्ञेच्या व्याख्येत यापुढे काहीही अंतर्भूत केलेले असेल तरीही, तो अशा जमीन देणाऱ्या इसमांचे कूळ आहे असे मानण्यात येईल ;

(३९) "भूमापन अधिकारी" म्हणजे कलम ८ अन्वये, किंवा त्यामध्ये तरतूद केलेल्या रीतीने नेमलेला अधिकारी ;

(४०) "कूळ" म्हणजे पट्टेदार मग तो लेखान्वये जमीन धारण करणारा असो, किंवा तोंडी करारान्वये जमीन धारण करणारा असो, आणि त्यामध्ये, कबजासहित कुळाचे हक्क गहाण घेणाऱ्या इसमाचा समावेश होतो ; परंतु त्यामध्ये प्रत्यक्षपणे राज्य सरकारकडून जमीन धारण करणाऱ्या पट्टेदाराचा समावेश होत नाही ;

(४१) "भोगवटयात नसलेली जमीन" म्हणजे खातेदार, कूळ किंवा सरकारी पट्टेदार यानी धारण केलेल्या जमिनीखेरीज गावातील जमीन ;

(४२) "नागरी क्षेत्र" म्हणजे त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्या ही विधीअन्वये रचना करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या हद्दीत किंवा कोणत्याही गावाच्या किंवा गावांच्या गटाच्या हद्दीत त्या त्या वेळी समाविष्ट केलेले जे क्षेत्र, त्या क्षेत्रातील लोकसंख्येची व इमारतीची घनता विचारात घेऊन राज्य सरकार नागरी क्षेत्र म्हणून अधिसूचित करील असे क्षेत्र, आणि "नगरेतर क्षेत्र" या शब्दप्रयोगाचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल ;

(४३) "गाव" या संज्ञेत, नगराचा किंवा शहराचा आणि गावांच्या, नगराच्या किंवा शहराच्या सर्व जमिनींचा समावेश होतो ;

(४४) "वाडा जमीन" म्हणजे गुरे-ढोरे बांधण्यासाठी किंवा पीक किंवा वैरण खत किंवा तत्सम इतर वस्तू साठविण्यासाठी वापरलेली गावठाणातील खुली जागा.

## महसुली क्षेत्रे

राज्याची महसुली क्षेत्रामध्ये विभागणी.

३. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, राज्याची विभागामध्ये विभागणी करण्यात येईल आणि त्यामध्ये [1][मुंबई शहर वगळून] एका किंवा अनेक जिल्ह्यांचा समावेश असेल, आणि प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका किंवा अनेक उप-विभागाचा समावेश होऊ शकेल, आणि प्रत्येक उप-विभागामध्ये एका किंवा अनेक तालुक्यांचा समावेश होऊ शकेल, आणि प्रत्येक तालुक्यामध्ये विवक्षित गावांचा समावेश होऊ शकेल.

महसुली क्षेत्राची रचना.

४. (१) राज्य सरकारला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे,

(एक) ज्या जिल्ह्यांचा मिळून एक विभाग होईल ते जिल्हे [1][मुंबई शहर वगळून] ;

(दोन) ज्या उप-विभागांचा मिळून एक जिल्हा होईल ते उप-विभाग ;

(तीन) ज्या तालुक्यांचा मिळून एक उप-विभाग होईल ते तालुके ;

**टीप ४.**—मराठवाड्यातील जिल्ह्याचा विद्यमान विभाग किंवा उप-विभाग किंवा महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशाच्या प्रांताचा १५ ऑगस्ट १९६७ पासून अनुक्रमे जिल्ह्याचा विभाग, उप-विभाग किंवा त्यात याचे नाव धारण करणारा संबंधित उप-विभाग म्हणून प्रस्थापित करण्यात आला आहे आणि उपरिनिर्दिष्ट जिल्ह्याचा किंवा प्रांताच्या उप-विभागाकडे याबाबतीत केलेल्या कोणत्याही विधीतील किंवा लेखातील किंवा दस्तऐवजातील कोणत्याही दस्तऐवजातील कोणत्याही संदर्भाचा अर्थ उप-विभागाच्या बाबतीतील संदर्भ असा लावण्यात आला आहे.

**पहा**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-१४६७-(सी)-आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ (परिशिष्ट चार पहा) ;

(चार) ज्या गावांचा मिळून एक तालुका होईल ती गावें ;

**टीप ५.**—(१) राज्याच्या विदर्भ प्रदेशातील तहसीलींना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी जी नांवे होती त्या नांवाचेच तालुके म्हणून घोषित करण्यात आले. आणि कोणत्याही विधीतील किंवा कोणत्याही लेखातील किंवा इतर दस्तऐवजातील तहसीली विषयीच्या संदर्भाचा अर्थ तालुका असाच लावण्यात आला आहे. **पहा**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक-यूएनएफ-१४६७-(ए)-आर, दिनांक ९ ऑगस्ट १९६७ (परिशिष्ट ५ पहा).

(२) राज्याच्या मुंबई प्रदेशातील महाल, हे तालुके म्हणून घोषित करण्यात आले आणि कोणत्याही विधीतील, लेखातील किंवा इतर दस्तऐवजातील महालाच्या संदर्भाचा अर्थ तालुका असाच लावण्यात आला आहे. **पहा**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक टीएलसी-१०६७-११४८४-सी, दिनांक १० ऑगस्ट १९६७ (परिशिष्ट ६ पहा).

(पाच) ज्या स्थानिक क्षेत्रांचे मिळून एक गाव होईल ते स्थानिक क्षेत्र ;

या गोष्टी निर्दिष्ट करता येतील ; आणि

---

[1] महाराष्ट्र जमीन महसूल (दुरुस्ती) अधिनियम, १९६९ (१९७० चा महाराष्ट्र चार) कलम २ याद्वारे "धरून" या शब्दाऐवजी "वगळून" हा शब्द समाविष्ट करण्यात आला (पहा परिशिष्ट ३९).

(सहा) अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या अशा कोणत्याही महसुली क्षेत्राच्या हद्दीमध्ये एकीकरण करून, विभागणी करून किंवा इतर कोणत्याही रीतीने फेरबदल करता येईल, किंवा असे कोणतेही महसुली क्षेत्र रद्द करता येईल आणि अशा कोणत्याही महसुली क्षेत्रास नांव देता येईल व त्याचा नावामध्ये फेरबदल करता येईल ; आणि जेव्हा कोणत्याही क्षेत्रास पुन्हा नांव दिले असेल अशा कोणत्याही बाबतीत, कोणत्याही विधीमध्ये, लेखामध्ये किंवा इतर दस्तऐवजामध्ये त्या क्षेत्रासंबंधी त्याच्या मूळच्या नावाने असलेले सर्व उल्लेख हे, अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर, त्या क्षेत्रास पुन्हा जे नाव दिलेले असेल त्या नावासंबंधीचे उल्लेख असल्याचे समजण्यात आले पाहिजे ;

परंतु, ह्या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य शासनाने तत्सम अधिसूचनेद्वारे प्रत्येक[१अ] वाडी आणि वेगळे निवासस्थान असलेल्या एखाद्या गावाच्या गावठाणाच्या हद्दीबाहेरील कोणतेही क्षेत्र गाव म्हणून प्रस्थापित केले पाहिजे [अशा वाडीची किंवा क्षेत्राची लोकसंख्या *(जी, तहसीलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाची नसेल असा महसूल अधिकारी निश्चित करील) तीनपेक्षा कमी नसेल] आणि अशा रीतीने प्रस्थापित केलेल्या गावाच्या हद्दी त्या अधिसूचनेत निर्दिष्ट केल्या पाहिजे.

**टीप ५-अ.**—अधिनियमाच्या कलम ३३०-अ द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाने असा निदेश दिला आहे की, सोबतच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमाच्या उपबंधाअन्वये राज्य शासनाच्या शक्तींचा प्रत्येक विभागीय आयुक्ताला ही, त्याच्या अधिकारितेच्या सीमांमध्ये वापर करता येईल.

## अनुसूची

१. गावाच्या हद्दीमध्ये बदल करणे किंवा कोणत्याही वन प्रदेशाला गाव म्हणून वसवणे याच्याशी संबंध असेल तेथवर कलम ४ च्या पोट-कलम (१) चे खंड (पांच) व (सहा) या अन्वयेच्या शक्ती.

२. कोणत्याही वाडीला गाव म्हणून प्रस्थापित करणे व अशाप्रकारे प्रस्थापित केलेल्या गावाच्या हद्दी विनिर्दिष्ट करणे याच्याशी संबंधीत असेल तेथवर कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या परंतुकान्वयेच्या शक्ती.

३. उपरोक्त शक्तींचा वापर करून प्रस्थापित केलेल्या कोणत्याही नवीन गावाचा तालुक्यात अंतर्भाव करण्याच्या प्रयोजनासाठीच फक्त कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (४) अन्वयेच्या शक्ती.

(**पहा**—शासकीय अधिसूचना क्रमांक एफएलडी-४२६८/७३२५१-डब्ल्यू, दिनांक २४ मे १९७१ अन्वय दुरुस्ती केल्याप्रमाणे शासकीय अधिसूचना क्रमांक टीएलसी-१०६९/३२८१०-सी (विशेष) दिनांक ९ नोव्हेंबर १९७० (परिशिष्टे ६-अ व ६-ब पहा).

(२) जिल्हाधिकाऱ्यास, विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशाद्वारे, तालुक्यातील ज्या गावांत मिळून एक साझा होईल अशा गावांची, आणि तालुक्यातील ज्या साझ्यांचे मिळून एक मंडळ होईल अशा साझ्यांची रचना करता येईल, आणि अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या कोणत्याही साझ्याच्या किंवा मंडळाच्या हद्दीमध्ये फेरबदल करता येईल, किंवा कोणताही साझा किंवा मंडळ रद्द करता येईल.

---

*महाराष्ट्र जमीन महसूल (द्वितीय दुरुस्ती) अधिनियम, १९६८ (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक आठ) या कलम २ अन्वये "तीनशे" शब्दाच्या ऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले (परिशिष्ट ३८ पहा).

(३) हा अधिनियम, अंमलात येण्याच्या वेळी अस्तित्वात असलेले विभाग, जिल्हे, उप-विभाग, तालुके, मंडले, साझे आणि गावे ही, या कलमान्वये अन्यथा त्यात फेरबदल केले नसतील तर, असे विभाग, जिल्हे, उप-विभाग, तालुके, मंडले, साझे आणि गावे म्हणून त्यांची अनुक्रमे जी नावे असतील त्याच नावाने चालू राहतील.

(४) या कलमान्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना किंवा आदेश पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असेल ; आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक) याच्या कलम २४ चे उपबंध ज्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीनंतर करावयाच्या नियमांच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणे ते शक्य असेल तेथवर, अशा अधिसूचनेच्या किंवा आदेशाच्या संबंधात लागू होतील.

# प्रकरण २

## महसूल अधिकारी : त्यांचे अधिकार व कर्तव्ये

५. त्याच्या विभागातील जमीन महसूलाशी संबंध असलेल्या सर्व बाबतीतील मुख्य नियंत्रक प्राधिकार हा, राज्य शासनाच्या अधीक्षणास, निदेशास व नियंत्रणास अधीन राहून आयुक्ताकडे निहित असेल. *महसुलाच्या बाबतीत मुख्य नियंत्रक प्राधिकार.*

६. राज्य सरकारने प्रत्येक विभागाकरिता एक आयुक्त नियुक्त केला पाहिजे ; आणि त्यास एखाद्या विभागात आयुक्तास सहाय्य करण्यासाठी एक अपर आयुक्त आणि इष्ट वाटतील तितके सहायक आयुक्त नियुक्त करता येतील : *विभागातील महसूल अधिकारी.*

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, दोन किंवा अधिक विभागांसाठी आयुक्त म्हणून एकाच अधिकाऱ्याची नेमणूक करण्यास प्रतिबंध होणार नाही.

७. (१) राज्य सरकारने, मुंबई शहराकरिता आणि प्रत्येक जिल्ह्याकरिता एक जिल्हाधिकारी नियुक्त केला पाहिजे व त्याच्याकडे त्या जिल्ह्याच्या महसुली कारभाराचे काम असेल ; आणि प्रत्येक तालुक्याकरिता एक तहसीलदार ' नियुक्त केला पाहिजे, आणि तो तालुक्याच्या स्थानिक महसुली कारभाराचे काम सोपवण्यात आलेला मुख्य अधिकारी असेल. *जिल्ह्यातील महसूल अधिकारी.*

(२) राज्य सरकारला, मुंबई शहरात आणि प्रत्येक जिल्ह्यात एक किंवा अधिक अपर जिल्हाधिकारी आणि त्यास इष्ट वाटतील इतके सहायक जिल्हाधिकारी आणि उप-जिल्हाधिकारी (सहाय्यकांच्या नेमणुकी-संबंधीच्या आदेशात स्पष्ट केले असेल त्याप्रमाणे "प्रथम", "द्वितीय", "अधिसंख्य" सहायक इत्यादी यासारख्या पदनामांनी संबोधण्यात येईल), तालुक्यात एक किंवा अधिक नायब-तहसीलदार आणि त्यामध्ये एक किंवा अधिक अपर तहसीलदार किंवा नायब तहसीलदार आणि महसूल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी त्यास इष्ट वाटतील (अशी पदनामे असलेले) असे इतर इसम नियुक्त करता येतील.

**टीप ६ (१)**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक यूएनएफ्-१४६७ (डी) आर, दिनांक ११ ऑगस्ट १९६७ अन्वये, सर्व मामलेदार, सर्व अतिरिक्त मामलेदार व सर्व महालकरी (महालाचे प्रभारी नसलेले) यांना अनुक्रमे तहसिलदार, अतिरिक्त तहसिलदार व नायब तहसिलदार म्हणून नियुक्त केले आहे (परिशिष्ट ७ पहा) :

**टीप ६ (२)**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक-यूएनएफ्-१४६७/१११३८१, आर, दिनांक २५ ऑक्टोबर १९६७ अन्वये, माथेरानच्या अधिक्षकांना कुलाबा जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील अतिरिक्त तहसिलदार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे (परिशिष्ट ८ पहा.)

(३) राज्य सरकारच्या सामान्य आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास जिल्ह्याच्या एक किंवा अधिक उप-विभागांचा कारभार सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविता येईल, किंवा त्याचा कारभार स्वतःकडे ठेवता येईल. अशा सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यास, उपविभागीय अधिकारी या नावानेदेखील संबोधता येईल.

(४) जिल्हाधिकाऱ्यास प्रत्येक जिल्ह्यामध्ये मंडळाचे काम पाहण्यासाठी मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक म्हणून, त्यास योग्य वाटतील इतके इसम नियुक्त करता येतील; आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे साझ्याकरिता एक किंवा अधिक तलाठी आणि प्रत्येक गावाकरिता किंवा गावांच्या गटाकरिता एक किंवा अधिक कोतवाल किंवा इतर ग्रामसेवक नियुक्त करता येतील.

८. प्रकरणे ५, ६, ८, ९ आणि १० यांच्या प्रयोजनांसाठी राज्य सरकारला, वेळोवेळी आवश्यक वाटतील असे अधिकारी नियुक्त करता येतील. अशा अधिकाऱ्यांना "जमाबंदी आयुक्त", "संचालक, भूमि-अभिलेख", "उप-संचालक, भूमि-अभिलेख", ",अधीक्षक, भूमि-,अभिलेख", "जमाबंदी अधिकारी", "जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख" आणि "भू-मापन तहसीलदार", किंवा आवश्यक वाटेल अशा इतर नावाने नामोदिष्ट करता येईल. *भू-मापन अधिकारी.*

**टीप ७**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक यूएनएफ-१४६७ (डी) आर, दिनांक ११ ऑगष्ट १९६७ अन्वये, सर्व (जिल्हा) अधीक्षक, भूमी अभिलेख (विदर्भातील) आणि सर्व भूमापन मामलेदार (पश्चिम महाराष्ट्रातील) यांची अनुक्रमे जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख, सहाय्यक जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख व भू-मापन तहसिलदार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे आणि जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सहाय्यक (जिल्हा) अधीक्षक, भूमी अभिलेख व भू-मापन मामलेदार याच्या बाबतीत केलेल्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ अनुक्रमे, जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, सहाय्यक जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख व भूमापन तहसिलदार म्हणून नियुक्त करण्यात आली आहे आणि जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, सहाय्यक (जिल्हा) अधीक्षक, भूमि अभिलेख व भू-मापन मामलेदार यांच्या बाबतीत केलेल्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ अनुक्रमे, जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख सहाय्यक जिल्हानिरिक्षक, भूमि अभिलेख व भू-मापन तहसिलदार यांच्या बाबतीत केलेला संदर्भ असा लावण्यात यावयाचा आहे (परिशिष्ट ७ पहा.)

पदांचे एकीकरण. ९. जो इसम विधी अनुसार अन्यथा सक्षम असेल असा एकाच इसमास, राज्य सरकारने, ह्या प्रकरणात तरतूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही दोन किंवा अधिक पदांवर नेमणें किंवा एकाच अभिधानाच्या अधिकाऱ्यास, विवक्षित स्थानिक हद्दीत किंवा अन्यथा, इष्ट वाटेल त्याप्रमाणे, कोणत्याही इतर अधिकाऱ्याच्या किंवा अधिकाऱ्यांच्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती किंवा कर्तव्ये [७अ] प्रदान करणे हे विधिसंमत असेल.

**टीप-७ अ**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक पीडब्ल्यूआर-४२६३-४१३२६-सी, दिनांक २६ जून १९७० अन्वये, महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यांतील विक्री-कराच्या थकबाकीच्या वसुलीकरिता असलेल्या तहसिलदारांना संबंधीत जिल्ह्याच्या क्षेत्रांतील जमीन महसुलाची थकबाकी म्हणून विक्री-कर थकबाकीची वसुली करण्याच्या प्रयोजनासाठी येथे जोडलेल्या तक्त्याच्या स्तंभ (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती व कर्तव्ये प्रदान केली आहेत :—

**तक्ता**

| अधिकाऱ्याचे कलम | शक्तीची मर्यादा |
|---|---|
| (१) | (२) |
| १७६ | कोणती मालमत्ता अटकावून ठेवणे आणि विक्री यापासून सूट मिळाली आहे, ते निश्चित करणे. |
| १७८ | नोटिसा देणे. |
| १८० | जंगम मालमत्ता अटकावून ठेवणे व विक्री. |
| १९२ | स्थावर मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा काढणे. |
| १९३ | विक्रीच्या नोटिसांना प्रसिद्धी देण्याच्या इतर पद्धती निश्चित करणे. |
| २१२ | खरेदीदाराला मालमत्तेचा ताबा देणे व खरेदीचे प्रमाणपत्र देणे. |
| २१८ | सर्व हक्कांचा निर्णय. |

(परिशिष्ट ९ पहा.)

शक्तीचे प्रत्यायोजन. *[९-अ. राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य शासनास असा निदेश देता येईल की, उक्त निदेशात निर्दिष्ट करण्यात येतील अशा महसुली किंवा भू-मापन अधिकाऱ्याच्या संबंधात, निर्दिष्ट करण्यात आलेल्या असतील तर अशा कोणत्याही शर्तीस अधीन राहून, कलम ७, कलम ८ किंवा कलम ९ अन्वये नेमणुका करण्याच्या राज्य शासनाच्या शक्तीचा वापर, निदेशात निर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे यथास्थिति जिल्हाधिकारी किंवा भूमि अभिलेख अधीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यास सुद्धा करता येईल.]

*महाराष्ट्र जमीन महसूल (दुरुस्ती) अधिनियम, १९६८ (१९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक तीस च्या कलम २ द्वारे कलम ९-अ हे [illegible] विष्ट करण्यात [illegible]ले (परिशिष्ट ३७ पहा).

**टीप ८ (१)**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक पीडब्ल्यु आर-१०६८-८०२२७-डी, दिनांक १२ फेब्रुवारी १९६९ अन्वये राज्य शासनाच्या (अ) तहसीलदारापेक्षा कमी दर्जाच्या महसूल अधिकाऱ्यांच्या (बदल्यासह) नियुक्त्या करणे व तहसिलदारांच्या बदल्या करणे व अशा बदल्या अधिसूचित करणे, या संबंधीच्या शक्ती आयुक्तांनाही त्यांच्या संबंधित विभागांत वापरता येतील आणि (ब) महसूल अधिकाऱ्यांच्या आणि अव्वल कारकुनांच्या खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या (बदल्यासह) करण्याच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांनाही त्यांच्या संबंधीत जिल्ह्यात वापरता येतील (परिशिष्ट १० पहा).

**टीप ८ (२)**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक एपीटी-१५६९-११९९५५-(ए)-व्हि, दिनांक १९ जून १९७० अन्वये असा निदेश देण्यात येत आहे की राज्य शासनाच्या,—

(अ) जिल्हानिरिक्षक, भूमी अभिलेख यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या भू-मापन अधिकाऱ्याच्या नियुक्त्या (बदल्यांसह) करणे व जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख यांच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे व अशा बदल्या अधिसूचित करणे या संबंधीच्या शक्तींचा, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख यानांही वापर करता येईल ; आणि

(ब) भूमापन अधिकारी व वरिष्ठ लिपिक, प्रमुख लिपिक, प्रमुख भू-मापक आणि शिरस्तेदार यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या नियुक्त्या (बदल्यासह) करणे यासंबंधीच्या शक्तीचा उप-संचालक, भूमी अभिलेख (त्यांच्या संबंधित अधिकारितेत) यांनाही वापरतां येईल (परिशिष्ट ११ पहा).

१०. जर जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार आपली कर्तव्ये बजावण्यास असमर्थ झाला असेल किंवा कोणत्याही कारणामुळे त्याने आपले पद रिकामे केले असेल किंवा तो आपले अधिकार क्षेत्र सोडून गेला असेल किंवा तो मरण पावला असेल तर— तात्पुरत्या रिकाम्या जागा.

(अ) अपर जिल्हाधिकारी, आणि अपर जिल्हाधिकारी नसल्यास जिल्ह्यातील सर्वात उच्च दर्जाचा सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी,

(ब) अपर तहसीलदार, आणि अपर तहसीलदार नसल्यास नायब तहसीलदार किंवा त्याच्या हाताखाली काम करणारा तालुक्यातील ज्येष्ठतम महसूल अधिकारी,

राज्य सरकारने इतर तरतूद केली नसेल तर तात्पुरत्या कालावधीकरिता जिल्हाधिकाऱ्याच्या, किंवा यथास्थिति, तहसीलदाराच्या पदावर येतील आणि जिल्हाधिकारी, किंवा तहसीलदार आपल्या जिल्ह्याचा किंवा तालुक्याचा कार्यभार हाती घेईपर्यंत, किंवा उत्तराधिकारी योग्यरीत्या नेमण्यात येऊन आपल्या नेमणुकीच्या पदाचा कार्यभार घेईपर्यंत, ते या अधिनियमान्वये, जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार असल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण**—ज्या अधिकाऱ्याचे प्रमुख पद हे सहाय्यक जिल्हाधिकाऱ्याच्या पदापेक्षा वेगळे असेल, आणि जो केवळ विशिष्ट प्रयोजनासाठीच सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून काम करीत असेल, असा अधिकारी, या कलमाच्या प्रयोजनासाठी सहाय्यक आहे असे समजता कामा नये.

११. (१) सर्व महसूल अधिकारी, हे राज्य सरकारच्या हाताखालील अधिकारी असतील. अधिकारी हाताखाली असणे.

(२) राज्य सरकारने अन्यथा निदेश दिला नसेल तर, विभागातील सर्व महसूल अधिकारी हे आयुक्ताच्या हाताखालील अधिकारी असतील, आणि मुंबई शहरातील किंवा जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी हे जिल्हाधिकाऱ्याच्या हाताखालील अधिकारी असतील.

**टीप ९.—शासकीय आदेश महसूल व वन विभाग, क्रमांक युएनएफ-१४६७-(जी)-आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ या अन्वये, शासनाने असा निदेश दिला आहे की, मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे व पुणे या जिल्ह्यांतील अतिरिक्त जिल्हाधिकारी हे राज्य शासनाने, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये विनिर्दिष्ट केले असेल अशा बाबी व्यतिरिक्त संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या हाताखाली असणार नाहीत (परिशिष्ट १२ पहा).**

(३) राज्य सरकारने अन्यथा निदेश दिला नसेल" तर, भू-मापन अधिकारी धरुन इतर सर्व महसूल अधिकारी हे राज्य सरकार निदेश देईल त्या क्रमाने एकमेकांच्या हाताखालील अधिकारी असतील.

टीप १०.—शासकीय आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक युएनएफ-१४६७ (एल) आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये शासनाने असा निदेश दिला आहे की, सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकारी त्याच्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांना दुय्यम असतील (परिशिष्ट १३ पहा).

**अनुसूची**

| अनुक्रमांक | स्तंभ (३) मधील अधिकाऱ्यांना दुय्यम असलेले अधिकारी | अधिकारी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **(एक) महसूल अधिकारी** | |
| १ | मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे व पुणे या जिल्ह्यांतील सर्व महसूल अधिकारी. | संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक जिल्हाधिकारी. |
| २ | उप-विभागातील सहाय्यक/उप-जिल्हाधिकाऱ्यापैकी कमी दर्जाचे सर्व महसूल अधिकारी. | उप-विभागाचे उप-विभागीय अधिकारी. |
| ३ | तालुक्यातील तहसीलदारापेक्षा कमी दर्जाचे सर्व महसूल अधिकारी. | तालुक्याचे तहसिलदार व अपर तहसिलदार. |
| ४ | तालुक्यातील मंडल अधिकारी किंवा मंडल निरीक्षक यांच्या दर्जाचे व त्यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व महसूल अधिकारी. | नायब तहसिलदार. |
| ५ | तलाठी .. .. .. .. .. | मंडल निरीक्षक किंवा मंडल अधिकारी. |
| | **(दोन) भू-मापन अधिकारी** | |
| ६ | सर्व भू-मापन अधिकारी .. .. .. .. | जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी-अभिलेख. |
| ७ | उप-संचालक, भूमी-अभिलेख यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व भू-मापन अधिकारी. | उप-संचालक, भूमी-अभिलेख. |
| ८ | अधीक्षक, भूमी-अभिलेख यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व भू-मापन अधिकारी. | अधिक्षक, भूमी-अभिलेख. |
| ९ | उप-निरीक्षक, भूमी-अभिलेख यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व भू-मापन अधिकारी. | जिल्हा निरीक्षक, भूमी-अभिलेख व भू-मापन तहसिलदार. |

नेमणुका अधिसूचित करणे.

१२. *[तहसिलदाराच्या किंवा यथास्थिती जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख याच्या दर्जाच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाच्या सर्व अधिकाऱ्यांची, कलमे ६, ७, ८ व ९ अन्वये करण्यात आलेली नेमणूक योग्यरित्या अधिसूचित करण्यात येईल.] परंतु, अशी नेमणूक अधिकारी ज्या तारखेस आपल्या पदाचा कार्यभार हाती घेईल त्या तारखेपासून अंमलात येईल.

*महाराष्ट्र जमीन महसूल (दुरुस्ती अधिनियम), १९६८ (१९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक तीस) च्या कलम ३ अन्वये "कलमे ६, ७, ८ व ९ यामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या या शब्दांनी सुरू होणाऱ्या व योग्यरित्या अधिसूचित केली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला आहे (परिशिष्ट ३७ पहा).

१३. (१) (अपर आयुक्त, सहाय्यक आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा अपर तहसीलदार नसेल महसूल अधि- असा) तहसीलदाराच्या दर्जाच्या आणि त्याच्यापेक्षा उच्च दर्जाच्या महसूल अधिकाऱ्यांनी या अधिनिय- काऱ्यांच्या मान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या विधी अन्वये अनुक्रमे त्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा शक्ती व वापर केला पाहिजे व लादण्यात आलेली कर्तव्ये आणि कामे पार पाडली पाहिजेत, आणि त्याच्याशी कर्तव्ये सुसंगत असेल तेथवर राज्य सरकार वेळोवेळी विहित करील असे, आपापल्या क्षेत्राधिकारातील अपिलांचे व त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासंबंधीच्या इतर सर्व शक्तीचा वापर केला पाहिजे आणि कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत :

परंतु, जिल्हाधिकाऱ्यास त्याच्या सबंध जिल्ह्यामध्ये, या अधिनियमान्वये, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यास प्रदान केलेल्या सर्व शक्ती वापर करता येतील किंवा त्याच्यावर लादलेली सर्व कर्तव्ये आणि कामे पार पाडता येतील आणि तहसीलदाराने देखील, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे " जिल्हाधिकारी त्याच्याकडे सोपविल अशा शक्तीचा वापर केला पाहिजे.

**टीप ११.**—वेळोवेळी दुरुस्त केलेला शासकीय आदेश, महसूल व वन विभाग, क्रमांक युएनएफ-१४६७ (६)-आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये, शासनाने असा निदेश दिला आहे की, सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यास तहसिलदाराला प्रदान करता येतील (परिशिष्ट १४ पहा).

**अनुसूची**

| अनुक्रमांक | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती | तहसिलदारांना प्रदान करावयाच्या शक्तींची मर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | कलम ७ चे पोट-कलम (४) .. | कोतवाल किंवा इतर ग्रामसेवक यांची नियुक्ती करणे. |
| २ | कलम १७ चे पोट कलम (१) .. | सर्व शक्ती. |
| ३ | कलम १८ .. .. | अटक करण्याच्या शक्ती खेरिज सर्व शक्ती. |
| ३-अ | कलम २० व ३१ .. .. | शासकीय जमिनीची कृषिविषयक प्रयोजनांकरिता विल्हेवाट लावण्याची शक्ती. |
| ४ | कलम २५ (२) .. .. | सर्व शक्ती. |
| ५ | कलम ३५ (२) .. .. | एकाच भू-मापन क्रमांकाच्या इतर उपविभागांतील भोगवटदारांना दिलेल्या उपविभागाची विल्हेवाट लावण्याची शक्ती. |
| ६ | कलम ३५ (३) .. .. | सर्व शक्ती. |
| ७ | कलम ३५ (४) .. .. | जप्त झालेला उपविभाग पूर्वीच्या भोगवटदाराला परत देण्याची शक्ती. |
| ७-अ | कलम ४४ .. .. | नागरी व नगरेतर प्रदेशात तात्पुरती अकृषिक प्रयोजनांसाठी परवानगी देण्याची व नगरेतर प्रदेशात अकृषिक प्रयोजनांसाठी परवानगी देण्याची शक्ती. |
| ८ | कलम ४८ (८) .. .. | सर्व शक्ती. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | महाराष्ट्र जमीन महसूलअधिनियम, १९६६ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती | तहसिलदारांना प्रदान करावयाच्या शक्तींची मर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| ९ | कलम ५० .. .. | सर्व शक्ती, परंतु उक्त अधिनियमाच्या कलम २० च्या पोट-कलम (२) अन्वये त्या पोट-कलमाखालील कोणत्याही हक्काच्या निर्णयासाठी कोणतीही चौकशी करणे आवश्यक नाही. |
| १० | कलम ५२ .. .. | ,, ,, |
| १०.अ | कलम ५३ .. .. | ,, ,, |
| १०.ब | कलम ५४ .. .. | ,, ,, |
| ११ | कलम ५९ .. .. | सर्व शक्ती, फक्त शेतीच्या प्रयोजनाकरिता जमिनीच्या अनधिकृत भोगवटयाच्या संबंधातील परंतु, कलम २०(२) अन्वये कोणतीही चौकशी आवश्यक नाही. |
| १२ | कलम ६१ (बी) .. .. | सर्व शक्ती. |
| १३ | कलम ७४ .. .. | सर्व शक्ती. |
| १४ | कलम ७७ .. .. | सर्व शक्ती. |
| १५ | कलम ८५ .. .. | सर्व शक्ती. |
| १६ | कलम १३६ .. .. | सर्व शक्ती. |
| १७ | कलम १३९ व कलम १४१ .. | सर्व शक्ती. |
| १७ अ | कलम १५० (१) .. .. | संपादन किंवा हक्कांचे हस्तांतरण या संबंधीची माहिती कळवण्याची शक्ती. |
| १८ | कलम १५२ .. .. | सर्व शक्ती. |
| १९ | कलम १५५ .. .. | सर्व शक्ती. |
| २० | कलम १७४ .. .. | सर्व शक्ती. |
| २१ | कलम १७६ च्या परंतुकाचा खंड (२) | सर्व शक्ती. |
| २२ | रद्द करण्यात आले .. .. | |
| २३ | कलम १७९ .. .. | कलम १७९ च्या परंतुकाच्या खंड (अ) अन्वये उद्‌घोषणा आणि लेखी नोटीस काढणे. |
| २४ | कलम १८० .. .. | सर्व शक्ती. |
| २५ | कलम १८१ .. .. | जप्तीच्या अधिपत्रावर सही करणे व त्याची अंमलबजावणी करणे व विक्री करणे. |
| २६ | कलम १८२ .. .. | जप्तीच्या अधिपत्रावर सही करणे व त्याची अंमलबजावणी करणे. |
| २७ | कलम १९२ व १९३ .. .. | सर्व शक्ती. |
| २८ | कलम २१२ .. .. | सर्व शक्ती. |
| २९ | कलम २१८ (१) .. .. | फक्त जंगम मालमत्तेच्या संदर्भात. |
| ३० | कलम २४२ .. .. | फक्त कलम २४२ च्या खंड (अ) व (ब) अन्वयेची शक्ती. |

(२) तसेच उपरोक्त महसूल अधिकाऱ्यांनी, राज्य सरकारच्या नियंत्रणास व सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीचे उपबंध अंमलात आणण्याच्याच केवळ कारणासाठी व त्याच्याशी सुसंगत असेल तेथवर, राज्य सरकार लेखी आदेशाद्वारे त्यास प्रदान करील अशा शक्तींचासुद्धा वापर केला पाहिजे व त्यांच्यावर लादील अशी कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

(३) अपर आयुक्त व सहाय्यक आयुक्त, आणि अपर जिल्हाधिकारी व अपर तहसीलदार या प्रत्येकाने आपापल्या अधिकारक्षेत्रात किंवा त्याच्या भागात, राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत निदेश[12] देईल असे या अधिनियमाच्या उपबंधान्वयेच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वयेच्या आयुक्ताच्या, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा यथास्थिति तहसीलदाराच्या शक्तींचा वापर केला पाहिजे आणि त्याची कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत :

परंतु, मुंबई शहरामध्ये, जिल्हाधिकाऱ्यास, राज्य सरकार, त्याबाबतीत देईल अशा आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याच्या कामाची आपल्यामध्ये व अपर जिल्हाधिकाऱ्यामध्ये, किंवा यथास्थिति अपर जिल्हाधिकाऱ्यांमध्ये, विभागणी करण्यासाठीसुद्धा व्यवस्था करता येईल.

**टीप १२ (१).**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ्-१४६७ (एच)-आर दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये शासनाने असा निदेश दिला आहे की, मुंबई उपनगर जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारितेत, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा अधिनियमाच्या उपबंधाअन्वये असलेल्या शक्तींचा वापर करतील व त्याची कर्तव्ये व कामे पार पाडतील (परिशिष्ट १५ पहा).

**टीप १२ (२).**—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-१४६७ (एल)-आर दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये शासनाने असा निदेश दिला आहे की, ठाण्याचे अपर जिल्हाधिकारी, पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये किंवा अधिनियमाच्या उपबंधाअन्वये असलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करतील व त्याची कर्तव्ये व कामे पार पाडतील.

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस) प्रकरण तीन, चार, दहा, अकरा, बारा व तेरा.

(२) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक सदुसष्ट).

(३) मुंबई परगणा व कुळकर्णी वतने (निरास) अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक साठ).

(४) साष्टी संपत्ती (जमीन महसूल सूट निरास) अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक सत्तेचाळीस).

(५) मुंबई सरंजाम, जहागिरी व इतर राजकीय स्वरुपाची इनामे पुनर्ग्रहण नियम, १९५२.

(६) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५३ (१९७३ चा मुंबई अधिनियम क्रमांक अठ्ठावीस).

(७) मुंबई वैयक्तिक इनामे निरास अधिनियम, १९५२ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक बेचाळीस).

(८) मुंबई भूधारणा निरास (अभिलेखांची वसुली) अधिनियम, १९५३.

(९) मुंबई विलीन क्षेत्रे व प्रदेश (जहागिर निरास) अधिनियम, १९५३ (१९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक एकोणचाळीस).

(१०) मुंबई सेवा समाजोयुक्त इनामे पुनर्ग्रहण (गुजरात व कोकण) नियम १९५४.

(११) मुंबई विलीन प्रदेश संकीर्ण अन्यसंक्रमणे निरास अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक बावीस).

(१२) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक्कावन).

(१३) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक चाळीस).

(१४) मुंबई दुय्यम ग्राम वतने निरास अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक).

(१५) मुंबई बंधीजमा, उधाड व उगाडीया भूधारणा निरास अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक पस्तीस).

(१६) महाराष्ट्र महसूल पटेल (पद निरास) अधिनियम, १९६२ (१९६२ चा अधिनियम क्रमांक पस्तीस).

(१७) मुंबई पाल्याधिकरण अधिनियम, १९०५ (१९०५ चा अधिनियम क्रमांक एक).

(१८) पालक व पाल्य अधिनियम, १८९० (१८९० चा अधिनियम क्रमांक आठ).

(१९) भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा अधिनियम क्रमांक सोळा).

(२०) दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (१९०८ चा अधिनियम क्रमांक पाच).

(२१) भारतीय पाटबंधारे अधिनियम, १८७९.

(२२) भूमी संपादन अधिनियम, १८९४ (परिशिष्ट १६ पहा).

टीप १२ (३).—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-१४६७ (जे) आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये महाराष्ट्र शासनाने असा निदेश दिला आहे की, पुण्याचे अपर जिल्हाधिकारी खाली विर्निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा अधिनियमाच्या उपबंधान्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचा वापर करतील व त्यांची कर्तव्ये व कामे पार पाडतील :—

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस)—

(अ) प्रकरण तीन—शहर भूमापन केलेल्या प्रदेशात व पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या जमिनीखेरीज इतर जमिनींच्या संदर्भात.

(ब) प्रकरणे चार, दहा, अकरा, बारा व तेरा.

(२) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक सदुसष्ट).

(३) मुंबई परगणा व कुळकर्णी वतने (निरास) अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक साठ).

(४) मुंबई सरंजाम, जहागिरी व राजकीय स्वरूपाची इनामे पुनर्ग्रहण नियम, १९५२.

(५) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५३ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक अठ्ठावीस).

(६) मुंबई वैयक्तिक इनामे निरास अधिनियम, १९५२ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक बेचाळीस).

(७) मुंबई भूधारणा निरास (अभिलेखांची वसुली) अधिनियम, १९५३.

(८) मुंबई सेवा इनामे (समाजोपयुक्त) निरास अधिनियम, १९५३ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक सत्तर).

(९) मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रे (जागीर निरास) अधिनियम, १९५३ (१९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक एकोणचाळीस).

(१०) मुंबई विलीन प्रदेश संकीर्ण अन्यसंक्रमणेनिरास अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक बावीस).

(११) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक एकावन्न).

(१२) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक चाळीस).

(१३) मुंबई दुय्यम ग्राम वतने निरास अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक).

(१४) महाराष्ट्र महसूल पटेल (पद निरास) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पस्तीस).

(१५) महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमालमर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक सत्तावीस).

(१६) भूमीसंपादन अधिनियम, १८९४ (पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनी व उद्योगाकरिता संपादित करावयाच्या जमिनीखेरीज इतर जमिनीच्या संदर्भात).

(१७) भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा अधिनियम क्रमांक सोळा).

(१८) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ (१८८३ चा अधिनियम क्रमांक एकोणीस) व शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ (१८८४ चा अधिनियम क्रमांक बारा) (परिशिष्ट १७ पहा).

टीप १२ (४)—शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-१४६७ (एल) आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये शासनाने असा निदेश दिला आहे की, राज्यातील सर्व अपर तहसिलदार त्यांच्या संबंधित अधिकारितेत, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा अधिनियमांच्या उपबंधान्वये तहसिलदारांच्या सर्व शक्तींचा वापर करतील व सर्व कर्तव्ये व कामे पार पाडतील (परिशिष्ट १८ पहा).

टीप १२ (५)—शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-१४६७-११४९६१-आर, दिनांक ५ डिसेंबर १९६७ अन्वये शासनाने, मुंबई, मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नासिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर, वर्धा, भंडारा, चांदा, बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांतील निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्याचे प्रत्येकी अपर जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त केले आहे व असा निदेश दिला आहे की, अशा रीतीने नियुक्त केलेले अपर जिल्हाधिकारी अधिनियमाच्या कलम २४७ अन्वये अपिलांच्या सुनावणीच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती व त्यासोबत आनुषंगिक असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या इतर सर्व शक्ती वापरतील (परिशिष्ट १९ पहा).

टीप १२ (६)—औरंगाबाद विभागाच्या जिल्ह्यांतील निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी म्हणून पूर्वीच नियुक्त करण्यात आले आहे. व त्यांच्याकडे अपिलांची सुनावणी करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती निहित करण्यात आल्या आहेत.

पहा : शासकीय अधिसूचना, महसूल विभाग, क्रमांक पीडब्ल्यूआर-१०६२/१४०८८-सी, दिनांक * २६ एप्रिल १९६२ व शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक पीडब्ल्यूआर-१०६३/७४४६१-सी, दिनांक १६*[१] नोव्हेंबर १९६३ व दिनांक १४*[२] मे १९६४ या अधिसूचना व्यावृत करण्यात आल्या आहेत व अधिनियमांच्या कलम ३३६ च्या तिसऱ्या परंतुकाच्या अंमलबजावणीद्वारे चालू ठेवण्यात आल्या आहेत. म्हणून या संदर्भात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमान्वये कोणतेही नवीन आदेश देण्यात आले नाहीत.

---

* (परिशिष्ट २० पहा).
*[१] (परिशिष्ट २१ पहा).
*[२] (परिशिष्ट २२ पहा).

(४) उप-विभागीय अधिकाऱ्याने प्रकरण १३ च्या उपबंधास अधीन राहून, त्याच्या ताब्यातील उप-विभागाच्या संबंधात, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये जिल्हाधिकाऱ्यांस प्रदान केलेली सर्व कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजे आणि सर्व शक्तींचा वापर केला पाहिजे :

परंतु, जिल्हाधिकाऱ्यांस, त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, अशा कोणत्याही उप-विभागीय अधिकाऱ्यास विवक्षित कर्तव्ये पार न पाडण्याबद्दल किंवा विवक्षित शक्तींचा वापर करण्याबद्दल निदेश देता येईल आणि ती कर्तव्ये पार पाडणे किंवा त्या शक्तींचा वापर करणे या गोष्टी स्वतःकडे राखून ठेवता येतील किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या हाताखालील कोणत्याही सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे सोपविता येतील :

तसेच, जिल्हाधिकाऱ्याने, ज्याच्याकडे उप-विभागाचा कारभार सोपविण्यात आला नसेल अशा सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे, राज्य सरकारच्या सर्वसाधारण आदेशान्वये त्यास वेळोवेळी योग्य वाटतील अशी विशिष्ट कर्तव्ये आणि शक्ती सोपविल्या पाहिजेत.

(५) राज्य सरकारच्या आणि आयुक्ताच्या आदेशांस" अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास, त्यास वेळोवेळी योग्य वाटतील अशी तहसीलदाराची कर्तव्ये, कामे व शक्ती त्याच्या स्थानिक हद्दीमध्ये नायब-तहसीलदाराकडे सोपविता येतील.

**टीप १३.**—शासकीय ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-१४६७ (एम)-आर, दिनांक १४ ऑगस्ट १९६७ अन्वये विभागाच्या आयुक्तांनी असा निदेश दिला आहे की, ज्यांनी सेवेची दोन वर्षे पूर्ण केली आहेत व जे विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशा नायब तहसिलदारांकडे त्यांना प्रदान केलेल्या शक्तींसह तहसिलदारांच्या सर्व शक्ती प्रत्यायोजित करता येतील. इतर नायब तहसिलदारांबाबत, जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार, अधिकाऱ्याचा अनुभव व तालुक्यातील कामाचे प्रमाण लक्षांत घेऊन त्यांना योग्य वाटेल अशा शक्तींचे प्रत्यायोजन करण्यास प्राधिकृत केले आहे. पदोन्नतांच्या बाबतीत प्रत्यायोजित शक्तींसह तहसिलदारांच्या सर्व शक्ती त्यांना प्रत्यायोजित करता येईल. (परिशिष्ट २३ पहा.)

(६) आयुक्त किंवा जिल्हाधिकारी वेळोवेळी देईल अशा सर्वसाधारण आदेशांस अधीन राहून, तहसीलदारास किंवा नायब-तहसीलदारास त्याच्या हाताखालील इसमांपैकी कोणत्याही इसमास त्याच्या लीपीकवर्गीय कर्तव्यांचा कोणताही भाग पार पाडण्यासाठी कामावर लावता येईल :

परंतु, अशारीतीने कामावर लावलेल्या त्याच्या हाताखालील इसमाने केलेली सर्व कृत्ये व दिलेले आदेश हे अशा तहसीलदाराकडून किंवा नायब-तहसीलदाराकडून फेरतपासणी होण्यास किंवा ते त्यांच्याकडून कायम केले जाण्यास पात्र असतील.

(७) ज्या बाबींसंबंधी विधिअन्वये विशेष तरतूद केलेली नसेल अशा बाबतीत महसूल अधिकाऱ्यांनी राज्य सरकारच्या आदेशांनुसार वागले पाहिजे.

**भू-मापन अधिकारी, मंडल अधिकारी वगैरे यांच्या शक्ती व कर्तव्ये.**

१४. (१) राज्य सरकारच्या आदेशांस अधीन राहून, भू-मापन, जमाबंदी किंवा अधिकार अभिलेख यासंबंधीच्या सर्व बाबींची दखल घेणे हे भू-मापन अधिकाऱ्यांच्या अधिकारात असेल आणि त्यांनी, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये तरतूद करण्यात येतील अशा सर्व शक्तींचा वापर केला पाहिजे व अशी सर्व कर्तव्ये पार पाडली पाहिजेत :

परंतु, भूमि-अभिलेख उपसंचालकाने, राज्य सरकार किंवा भूमि-अभिलेख संचालक निदेश देईल अशा बाबतीत किंवा बाबींच्या वर्गामध्ये, या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये भूमि-अभिलेख संचालकांकडून ज्या शक्तींचा वापर करण्यात येत असेल किंवा जी कर्तव्ये व कामे पार पाडण्यात येत असतील अशा शक्तींचा वापर केला पाहिजे आणि ती कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

(२) मंडलाचा प्रभारी असलेल्या मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने त्याच्या मंडलामधील तलाठ्यावर, वेळोवेळी विहित" करण्यात येतील अशा शक्तींचा वापर केला पाहिजे व अशी कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

**टीप १४.**—मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांची कर्तव्ये व कामे यासंबंधीचे नियम.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक (कर्तव्ये व कामे) नियम, १९७० असे म्हणता येईल.

शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ. १२६७-र (विशेष) दि. १६-१२-१९७१ या अन्वये दुरुस्त केलेली. शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ. १२६७-आर, दि. १०-२-१९७०.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "रास्त भावाचे दुकान" म्हणजे, राज्य शासनास रास्त भावाचे दुकान म्हणून घोषित करता येईल असे दुकान ;

(क) "पिकांची नोंदवही", "पिकांबाबतचे विवरण", "रोजनिशी", "शेतासंबंधीचे पुस्तक", "खातेवही" किंवा "गावची खातेवही", पशुधन विवरण", "नकाशा", "पावती पुस्तक", "नोंदवही", "गावचे नकाशा पुस्तक", "सांख्यिकी विवरण" आणि "पंचवार्षिक नोंदवही" म्हणजे, अधिनियमाच्या उपबंधानुसार केलेल्या नियमान्वये किंवा राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये, गावासाठी विहित केलेली पिकांची नोंदवही, पिकांबाबतचे विवरण, रोजनिशी, शेतासंबंधीचे पुस्तक, खातेवही, किंवा गावांची खातेवही, पशुधन विवरण, नकाशा, पावती पुस्तक, नोंदवही, गावचे नकाशा पुस्तक, सांख्यिकी विवरण किंवा यथास्थिती पंचवार्षिक नोंदवही.

३. **मंडल अधिकारी व मंडल निरीक्षकाची सर्वसाधारण कर्तव्ये.**—(१) तहसिलदार किंवा यथास्थिती नायब तहसिलदार यांच्या आदेशास अधीन राहून, प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक हा, आपापल्या अधिकारितेतील महसुली कारभारावर व आपापल्या मंडलातील प्रत्येक गावाचे भूमि अभिलेखांवर देखरेख ठेवण्यास जबाबदार असेल. ते, आपापल्या अधिकारितेतील प्रत्येक गावाची वेळोवेळी तपासणी करतील. गावाच्या अधिकाऱ्यांची अर्हता आणि वर्तणूक आणि अशा गावातील पिकांची व लोकांची परिस्थिती याविषयी स्वतः माहिती करून घेतील आणि वरिष्ठ अधिकाऱ्याचे आदेश आवश्यक असतील, अशा कोणत्याही बाबींसंबंधी तहसिलदार किंवा नायब तहसिलदार यांना तत्परतेने कळवतील, आणि अशा अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश, योग्यरीत्या व शीघ्रतेने कार्यान्वित होतात याकडे लक्ष देतील.

(२) विशेषतः मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक,—

(अ) (एक) तगाईच्या आगाऊ रकमांची अधिकाराभिलेखात यथोचितरीत्या नोंद झाली आहे ;

(दोन) त्या ज्या प्रयोजनार्थ देण्यात आल्या त्या प्रयोजनासाठीच त्या खर्च करण्यात आल्या आहेत ; आणि

(तीन) अशा आगाऊ रकमा देताना त्यासोबत ज्या अटी घातलेल्या होत्या त्या अटींचे योग्य पालन संबंधित व्यक्तींकडून झाले आहे ;

हे सुनिश्चित करण्यासाठी, शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८३ किंवा जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८४ किंवा यथास्थिती मुंबईचा बिगर शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८ यांच्या उपबंधान्वये गावकऱ्यांना ज्या कामासाठी कर्जे देण्यात आली असतील त्या कामांची तपासणी करील.

(ब) सरकारी महसूलाच्या वसुलीविषयी चौकशी करील, अशा महसुलाची थकबाकी का राहिली याविषयीच्या कारणांची खात्री करून घेईल. तलाठ्यांच्या शिलकेची तपासणी करील, आणि रकमा कोषागारात यथोचितरीत्या भरण्यात येत आहेत याविषयी खात्री करून घेईल ;

(क) दिलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या पावत्या व इतर देय रकमा यांबाबत संबंधित व्यक्तींना त्याबाबत विचारून आणि खातेवहीतील नोंदीशी तुलना करून तपासणी करील आणि जर पावती पुस्तकात त्याने काही सुधारणा केलेल्या असतील तर अशा सुधारणांपुढे आद्याक्षरी करील आणि जे लेखे पडताळण्यास आले असतील त्यांची संख्या देऊन गावच्या खातेवहीत नोंद करील ;

(ड) त्यांच्या भेटीच्या व तपासणीच्या तारखांची तलाठ्यांच्या रोजनिशीत व भेटनोंद पुस्तकात तसेच आपल्या स्वतःच्या रोजनिशीत नोंद करील ;

(इ) तलाठ्याच्या रोजनिशीची तपासणी करील, त्या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या स्तंभात शेरा नमूद करील आणि त्याच्या स्वतःच्या रोजनिशीत त्याची थोडक्यात नोंद करील ;

(फ) त्यांच्या मंडलातील प्रत्येक गावात किती आणे पीक आले याविषयी माहिती काढताना सहाय्य करील आणि जमीन महसुलाची तहकुबी किंवा सूट यासंबंधीच्या आदेशांना, यथोचितरीत्या प्रसिद्धी देण्यात आलेली आहे याविषयी खात्री करून घेईल ;

(ग) १ जुलै पासून सुरू होणाऱ्या आणि ३० सप्टेंबरला संपणाऱ्या मुदतीत, तालुक्याच्या सांख्यिकी विवरणाचे संकलन करील आणि तहसिलदार किंवा यथास्थिती नायब तहसिलदार निदेश देईल त्याप्रमाणे, कार्यालयीन काम करील ;

(ह) सर्व जमिनीच्या तुकड्यांची अधिकार अभिलेखात यथोचितरीत्या नोंद झालेली आहे आणि मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९४७ याचे कलम ६, पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, नामांतरण नोंदवहीतील नोंदीबाबतच्या नोटिसा, विहित केलेल्या नमुन्यात संबंधित पक्षकारांना दिलेल्या आहेत किंवा कसे हे पडताळून पाहील ;

(आय) संबंधित कुळवहिवाट विधी व मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या उपबंधाचे उल्लंघन करून, कोणताही व्यवहार झाला किंवा कसे आणि तसा व्यवहार, कार्यवाहीसाठी तहसिलदारांकडे कळविण्यात आला किंवा कसे आणि अशा व्यवहारांच्या संबंधात, अधिकार अभिलेखात नोंदी करताना शासनाने त्या बाबतीत घालून दिलेल्या कार्यरीतीची पद्धत, कोणतीही असल्यास, यथोचित पालन झाले आहे किंवा कसे याची तपासणी करील ;

(जे) अधिकाराभिलेखात नोंद केलेला भोगवटादारच प्रत्यक्ष जमिनीची लागवड करीत आहे किंवा कसे आणि कोणतीही असल्यास, विसंगतीची सर्व प्रकरणे तहसिलदाराकडे यथोचितरीत्या कळविण्यात आली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी करील ;

(के) प्रस्तुत कुळवहिवाट विधीतील तरतूदीनुसार आवश्यक असल्याप्रमाणे जमीन मालकाने पावत्या दिलेल्या आहेत किंवा कसे हे तपासून पाहील आणि एखादा जमीन मालक अशा विधीच्या तरतुदींचे उल्लंघन करून, जादा खंड, श्रमाच्या किंवा सेवेच्या रूपाने, खंड वसूल करीत आहे किंवा कसे आणि अशी सर्वप्रकरणे कार्यवाहीसाठी तहसिलदारास कळविण्यात आली आहेत किंवा कसे, याची पडताळणी करील ;

(ल) कोणत्याही कुळाने जमिनीची पोटविभागणी केली आहे किंवा ती पोटभाड्याने दिली आहे किंवा कसे हे तपासील आणि जर कोणत्याही बाबतीत कुळाने जमिनीची अशा प्रकारे पोटविभागणी केली असेल किंवा ती पोटभाड्याने दिली असेल तर कार्यवाहीसाठी अशा प्रकरणांसंबंधी तहसिलदाराकडे प्रतिवेदन करील ;

(म) ओळीच्या बांधणीस प्रतिबंध करण्यासंबंधीच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन होत आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी बांधकामविषयक कार्याची तपासणी करील आणि तसे असल्यास त्यानंतर कोणती उपाययोजना करण्यात आली ते पाहील ;

(न) ठराविक काळाने कृषितर खंड गावठाणातील भाडे पट्टयाने दिलेले किंवा देऊन टाकलेले व विशेष अटींवर दिलेल्या जमिनी आणि ग्रामपंचायतीकडे निहीत असलेल्या जमिनी यांच्यावर अतिक्रमण झाले आहे काय आणि अशा अटींचा भंग झाला आहे काय हे पाहण्यासाठी पडताळणी करील ;

(ओ) सर्व इनाम जमिनींची तपासणी करील आणि ज्या अटींवर जमिनी देण्यात आल्या असतील त्या अटींचे किंवा अधिनियमाच्या उपबंधांचे किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधीचे उल्लंघन करून जमिनींची विक्री करणे, त्या पट्टयाने देणे आणि त्यांचे हस्तांतरण करणे यासारख्या प्रकरणासंबंधी प्रतिवेदन करणे ;

(प) अविभाज्य किंवा अन्यसंक्राम्य भू-सत्ता प्रकाराने जमिनी देण्याशी संलग्न असलेल्या अटींचे त्या ज्यांना देण्यात आल्या त्या व्यक्तींकडून योग्यरीत्या पालन होते किंवा कसे याची पडताळणी करील ;

(क्यू) पिकांची आणेवारी निश्चित करण्याच्या आणि संबंधित कुळवहिवाट विधीअन्वये खंड आकारण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील असे पिकांच्या कापणीचे प्रयोग करील ;

(र) धारण जमिनीच्या प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी तुलना करता, नकाशे, गाव नकाशा पुस्तक व अधिकारअभिलेख यांमधील ज्या विसंगती नियमामधील करणे आवश्यक असेल अशा विसंगतीची प्रकरणे दर्शविणारी नोंदवही अद्यावत ठेवली आहे किंवा कसे याची तपासणी करील ;

(स) जेव्हा या प्रयोजनासाठी विशेष कर्मचारीवर्ग नेमण्यात आला नसेल त्या वेळेला आपल्या मंडलातील सरकारी गोदामातील धान्याच्या साठ्याची, प्रत्येक प्रकारच्या धान्याच्या गोण्यांपैकी शेकडा काही गोण्यांची तपासणी करून पडताळणी करील आणि रास्त भावाच्या दुकानाची तपासणी करील ;

(ट) नदी किंवा नाल्याच्या काठावर असलेल्या जलोद परिवर्तनीय भू-मापन क्रमांकाची यादी तपासील ;

(यू) ज्या आकारणीच्या हमीची मुदत संपण्याच्या बेतात असेल त्या आकारणीची फेरतपासणी करण्यासाठी आणि त्या त्या भाडेपट्टयांच्या मुदती संपण्यापूर्वी त्यांचे नवीकरण करण्यासाठी वेळीच कारवाई केली जाईल हे सुनिश्चित करील ;

(व्ही) खरबूजाचे वाफे आणि एकसाली भाडेपट्टधासारख्या लिलावयोग्य बाबींचे तहसिलदाराकडे किंवा यथास्थिती नायब तहसिलदाराकडे प्रतिवेदन करील ; आणि

(डब्ल्यू) तहसिलदार, उप-विभागीय अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे पूर, आग, तुटिन, गारपीट, टोळधाड, मानव किंवा प्राण्यांशी संबंधित साथीचे रोग आणि त्यांच्या मंडलातील विफल पिकांची गावे यांसारख्या नैसर्गिक आणि इतर आपत्तीच्या प्रसंगाचे प्रतिवेदन करील आणि अशा आपत्ती-मुळे झालेल्या नुकसानींचा कच्चा अंदाज पाठवील.

४. **टंचाईच्या काळातील मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांची कर्तव्ये.**—प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने, भविष्यात येऊ घातलेल्या टंचाईच्या परिस्थितीच्या लक्षणाचा शोध घेण्यासाठी प्रत्येक हंगामातील परिस्थितीवर लक्ष ठेवले पाहिजे ; आणि जेव्हा जेव्हा फर्माविण्यात येईल तेव्हा आपल्या मंडलातील पिकांच्या स्थितीसंबंधी माहिती देण्यास तत्पर असले पाहिजे. कोणत्याही गावातील पिकांवर हंगामातील प्रतिकूल स्थितीमुळे किंवा अत्याधिक किंवा अपुऱ्या पावसामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, प्रतिकूल परिणाम झालेला आहे अशी माहिती मिळाल्यावर, त्यानी ताबडतोब त्या गावाला भेट दिली पाहिजे. आणि आवश्यक ती चौकशी व परिनिरीक्षण केले पाहिजे आणि परि-निरीक्षणाचे निष्कर्ष तहसिलदार किंवा यथास्थिती नायब तहसिलदार यास कळविले पाहिजे. जेव्हा कोणतीही टंचाईची परिस्थिती किंवा टंचाई सारखीच परिस्थिती असल्याचे कळविण्यात येईल तेव्हा, **मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक, राज्य शासनाकडून किंवा त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्याकडून त्यांच्याकडे सोपविण्यात येतील अशी दुर्भिक्ष्य कामे पार पाडतील.**

५. **मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांनी आपल्या दौऱ्याचा कार्यक्रम कळविणे.**—१ जुलै पासून सुरू होणाऱ्या व १५ सप्टेंबरला संपणाऱ्या कालावधीव्यतिरिक्त, प्रत्येक मंडल अधिकारी किंवा यथास्थिती मंडल निरीक्षकही प्रत्येक शनिवारी, जिल्हा निरीक्षक, भूमिअभिलेख आणि तहसीलदार किंवा यथास्थिती नायब तहसीलदार यांजकडे पुढील पंधरवड्यातील प्रत्येक दिवशी तो कोणत्या गावात काम करणार आहे हे दर्शविणारे पोस्टकार्ड पाठवील.

६. **दौरा.**—प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक उघाडीच्या हंगामात (म्हणजे १ ऑक्टोबर-पासून सुरू होणाऱ्या व ३० जूनला संपणाऱ्या मुदतीत) महिन्यात साधारणपणे २० दिवस आणि १ जुल-पासून सुरू होणाऱ्या व ३० सप्टेंबरला संपणाऱ्या मुदतीत, ३० दिवसापेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत सामान्यतः दौरा करील आणि उघाडीच्या हंगामातील प्रत्येक महिन्यात त्यांच्या मंडल मुख्यालयाच्या बाहेर त्यांना कमीत कमी १५ रात्री आणि इतर हंगामात सहा रात्री मुक्काम करतील. जर, कोणत्याही कारणामुळे, कोणत्याही महिन्यात हे प्रमाण पूर्ण करण्यास त्यांना प्रतिबंध होईल तर ते पुढील महिन्यात ती तूट भरून काढतील.

७. **मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांची रोजनिशी**—प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक, राज्य शासन त्या बाबतीत ठरवील अशा नमुन्यात, तहसीलदार व नायब तहसिलदार यांच्या-कडे दर महिन्याला रोजनिशी सादर करील. तहसिलदार किंवा यथास्थिती नायब तहसिलदार आपल्या शेऱ्यासह ती, जिल्हा निरीक्षक, भूमिअभिलेख यांच्यामार्फत, उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अग्रेषित करील, आणि तो तहसिलदारामार्फत ती परत पाठवील. मंडल अधिकारी किंवा यथास्थिती, मंडल निरीक्षक, रोजनिशीतील कोणत्याही मुद्यावर आदेशाची मागणी करणार नाही. परंतु असे प्रतिवृत्त ज्या परिस्थितीत तयार करण्यात आले असेल त्याबाबत रोजनिशीत नोंद केल्यानंतर त्यासंबंधी वेगळे प्रतिवृत्त सादर करील. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेले सर्व शेरे यांच्या प्रती असलेल्या रोजनिशीची एक कार्यालयीन प्रत, मंडल अधिकारी किंवा यथास्थिती, मंडल निरीक्षक आपल्या कार्यालयात ठेवील. शेऱ्यांची ही नोंद, तहसिलदारा-कडे नोंदण्यासाठी अंतिमतः पाठविण्यापूर्वी, न चुकता करण्यात येईल. रोजनिशीची कार्यालयीन प्रत, कोणताही अधिकारी तपासणीच्या वेळी भेट देईल तेव्हा, त्यांच्या अवलोकनार्थ सादर करण्यात येईल.

८. **आवक व जावक नोंदवही.**—प्रत्येक मंडल निरीक्षक व मंडल अधिकारी, शासनाने त्या प्रयोजना-साठी विहित केलेल्या नमुन्यात आवक व जावक पत्रव्यवहारासाठी एकच नोंदवही ठेवील. नोंदवहीची पाने, ऑगस्टच्या पहिल्या दिवशी तालुका कार्यालयात मुद्रांकित करून त्यावर क्रमांक देण्यात येतील.

९. **मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांनी अनुक्रमे आपआपल्या मंडलात वास्तव्य करणे.**—प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने किंवा मंडल निरीक्षकाने, जिल्हाधिकाऱ्याने निश्चित केलेल्या गावातील आपापल्या मंडलात वास्तव्य केले पाहिजे.

१०. **भूमीचा अनधिकृत वापर केल्याबद्दल प्रतिवृत्त देणे.**—ज्या प्रयोजनासाठी जमिनीवर आकारणी करण्यात आली असेल त्याखेरीज इतर प्रयोजनासाठी जमिनीच्या वापरात बदल केला असेल अशा प्रत्येक प्रकरणांचा शोध लावण्यास व त्याबद्दल तहसिलदाराकडे किंवा यथास्थिती नायब तहसिलदाराकडे प्रतिवृत्त देण्यास, प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक जबाबदार असेल. प्रतिवृत्तासोबत जमिनीची व्याप्ति, अशा रीतीने बदल करण्यात आलेला तिचा वापर, तिची आकारणी व विहित दरानुसारच्या तिच्या पुनराआकारणीसंबंधीचे प्रस्ताव व पुनराआकारणीचे नियमन करणाऱ्या इतर गोष्टी दर्शविणारा नकाशा देण्यात येईल.

११. **उप-विभागाची तपासणी.**—प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने नवीन रचना केलेले व एकत्रीकृत केलेले उपविभाग दर्शविणारे नोंदणी पुस्तक तपासले पाहिजे आणि तहसिलदारा-मार्फत जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, यांचेकडे प्रत्येक वर्षाला मोजणी करावयाची उपविभागांची संख्या याबाबत माहिती कळविली पाहिजे.

१२. **तपासणीच्या कामावर असताना, मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक यांची कर्तव्ये.**—ज्या वेळेला मंडल अधिकारी किंवा मंडल निरीक्षक तपासणीसाठी गावास भेट देतील त्यावेळेला, त्याने तपासणीसाठी गावातील लागवडीखालील व पडित जमिनीचे भू-मापन क्रमांक अशा रीतीने निवडले पाहिजेत की, एका वर्षात त्या गावात पिकणाऱ्या पिकांचे सर्व प्रकार त्यात अंतर्भूत होतील. प्रत्येक पाच वर्षात किंवा मंडलाचा आकार विचारात घेऊन जिल्हाधिकारी ठरवील अशा दहा वर्षांपेक्षा अधिक नसणाऱ्या मुदतीत, प्रत्येक भू-मापन क्रमांकाची निदान एकदा तपासणी होईल ; हेतू हा की, चुकांची पुनरावृत्ती व तलाठ्याचा गैरसमज होऊ नये आणि तलाठी खरोखरीच भू-मापन क्रमांकाची तपासणी करीत आहे याबद्दल खात्री होईल. मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने, हिस्सा आणि कुळवहिवाट याबाबतची नोंदणी, फळझाडाविषयक व इतर मौल्यवान वृक्षविषयक नोंद, अधिकार अभिलेखातील व पीक विवरणातील जलसिंचनाच्या बांधकामाचा तपशील व पिकांच्या विवरणातील पिकांखालील क्षेत्रांच्या नोंदी आणि गावाच्या नकाशाचे परिरक्षण याची चाचणी करण्यासाठी धारण जमिनीची पाहणी केली पाहिजे.

१३. **तलाठ्याने पिकांचे विवरणपत्र भरण्यात कसूर केल्यास तपासणी.**—गावाला भेट देण्याचेवेळी, मंडल अधिकारी किंवा मंडल निरीक्षक यास, गावाच्या तलाठ्याने पिकाचे विवरणपत्र यथोचितरीत्या भरले नाही असे आढळून आल्यास, तो, त्याच्या रोजनिशीत, त्या वस्तुस्थितीची आणि तलाठ्याच्या स्पष्टीकरणाच्या महत्त्वाच्या भागाची नोंद करील आणि तलाठ्यासह कोणत्याही निवडलेल्या भू-मापन क्रमांकाची तपासणी करील आणि तपासणीच्या निकालाची पिकांच्या विवरणपत्रात नोंद करील.

१४. **चावडीमध्ये पिकांचे विवरणपत्र इत्यादी ठेवणे.**—प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक विवरणपत्रे व भूमि अभिलेखाचे इतर सर्व नमुने आणि अधिनियमाचे कलम १५६ अन्वये गावासाठी विहित केलेले नकाशे चावडीत ठेवण्यात येतील याची खात्री करून घेईल.

१५. **दुहेरी पिकांची आणि पिकांच्या मिश्रणांची नोंदणी.**—प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने निरीक्षण करताना दुहेरी व मिश्र पिकांची बिनचूक नोंदणी करण्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिले पाहिजे. जर, त्याच वर्षात त्याच क्षेत्रात एकानंतर दुसरे पीक पेरण्यात आले असेल आणि त्याची कापणी करण्यात आली असेल तर असे प्रत्येक पीक अशा संपूर्ण क्षेत्राच्या खाती दाखविण्यात येईल. पहिल्यांदा पेरलेले पीक नष्ट झाल्यामुळे, जर दुसरे पीक पेरण्यात आले असेल तर, अशा दुसऱ्या पिकाचीच नोंद करण्यात येईल. सर्व प्रकारच्या मिश्र पिकांच्या बाबतीत शक्यतितक्या अचूकपणे पिकाच्या प्रत्येक प्रकारामध्ये क्षेत्राचे संविभाजन केले पाहिजे.

१६. **पडीत आणि इतर जमिनींची नोंदणी.**—प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने,—

(एक) जमीन मालक किंवा कूळ यांच्या कसुरीमुळे, कोणतीही जमीन लागोपाठच्या दोन किंवा अधिक वर्षात लागवडीविना राहिलेली आहे किंवा काय हे पडताळले पाहिजे आणि अशा प्रकरणांसंबंधी तहसिलदार किंवा यथास्थिती नायब तहसिलदार यांस कळविले पाहिजे.

(दोन) पिकांच्या नोंदवहीत, ज्यावर प्रत्यक्ष पेरणी झाली असेल त्या सर्व जमिनींची मग त्यात पीक असलेले असो वा नसो व सर्व पडित जमिनींची व त्यांच्या क्षेत्राची नोंदणी पुस्तकात नोंद करण्याची व्यवस्था केली पाहिजे:

परंतु—

(अ) कोरडवाहू पिकांच्या जमिनीच्याबाबतीत जर जमिनीचे क्षेत्र ०·१०१२ हेक्टरपेक्षा अधिक नसेल;

(ब) बागाईत जमिनीच्या बाबतीत, जर ते क्षेत्र ०·०२५३ हेक्टरपेक्षा अधिक नसेल, तर आणि

(क) पोटखराब जमिनीत पीक घेतले असेल तर,

अशी नोंदणी करण्याची आवश्यकता असणार नाही.

आणखी असे की, कोणत्याही जमिनीत पेरलेले कोणत्याही प्रकारचे पीक नष्ट झाल्यामुळे, त्याच जमिनीत दुसऱ्या प्रकारचे पीक पेरण्यात आले असेल तर, जे पीक नव्याने पेरण्यात आले असेल त्याची पिकांच्या नोंदणी पुस्तकात नोंद करण्यात येईल.

१७. **जमिनीची तपासणी.**—मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने, जी सरकारची मालमत्ता आहे अशी कोणत्याही जमिनीवरील अतिक्रमणे आणि अनधिकृत भोगवटा यांचा तपास लावला पाहिजे. त्यानी, पडीत जमिनी लागवडीखाली आणल्या आहेत किंवा कसे आणि ज्या शर्तीस अधिन ठेवून त्या मंजूर करण्यात आल्या असतील त्या शर्ती, अनुदानग्राहीने पुऱ्या केल्या आहेत किंवा कसे याची पडताळणी करण्याच्या दृष्टीने, सर्व पडित जमिनीच्या विल्हेवाटीचे नियमन करणाऱ्या नियमानुसार सर्व उपरोक्त जमिनींची तपासणी केली पाहिजे. जर, कोणत्याही बाबतीत, मंडल अधिकाऱ्यास किंवा मंडल निरीक्षकास, सरकारची मालमत्ता असलेल्या कोणत्याही जमिनीवर अतिक्रमण झाल्याचे किंवा अनधिकृतरीत्या ती लागवडीखाली आणल्याचे दिसून येईल तर, त्याने अशी प्रकरणे आवश्यक कार्यवाहीसाठी तहसिलदारास कळविली पाहिजेत.

१८. **सीमा आणि भू-मापनविषयक चिन्हांची तपासणी.**—(वन विभागाच्या नियंत्रणाखाली ज्या जमिनी नसतील अशा) जमिनींच्या सीमांची आणि भू-मापनविषयक चिन्हांची तपासणी करणे हे मंडल अधिकाऱ्याचे व मंडल निरीक्षकांचे कर्तव्य असेल.

१९. **सीमा आणि भू-मापनविषयक चिन्हांच्या दुरुस्त्या.**—राज्य सरकार जबाबदार असेल अशा सीमा आणि भू-मापनविषयक चिन्हांच्या दुरुस्त्या मंडल अधिकाऱ्याकडून व मंडल निरीक्षकाकडून सरकारच्या खर्चाने करण्यात येतील.

२०. **विवक्षित प्रकरणो जिल्हानिरीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे प्रतिवृत्त देणे.**—मंडल अधिकारी किंवा यथास्थिती मंडल निरीक्षक, शेतीसंबंधीच्या पुस्तकाशिवाय सीमा किंवा भू-मापनविषयक चिन्हे निश्चित करू शकत नसेल किंवा कोणत्याही कार्यवाहीबाबत त्याला शंका निर्माण होईल तर, तो, जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, यांच्याकडे आदेशासाठी ते प्रकरण पाठवील.

२१. **पशुधन विवरणाची तपासणी.**—(१) मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे तलाठयाने तयार केलेल्या पशुधन विवरण पत्रातील नोंदी पडताळल्या पाहिजेत :—

| | |
|---|---|
| (एक) पाचशेपेक्षा कमी लोकसंख्या असलेले गाव .. .. | सर्व नोंदी. |
| (दोन) पाचशेपेक्षा जास्त पण हजारपेक्षा कमी लोकसंख्या असलेले गाव. | एकूण नोंदीपैकी निम्म्या नोंदी. |
| (तीन) एक हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेले गाव .. | एकूण नोंदीपैकी एक-चतुर्थांश नोंदी. |

प्रत्येक घराला भेट देऊन व संबंधित गावातील रहिवाश्यांकडे चौकशी करून आणि मागील विवरणपत्र वारंवार विचारात घेऊन पडताळणी करण्यात येईल. सर्व नोंदीची पडताळणी झाली नसेल त्याबाबतीत गावाला भेट दिल्याचे वेळी पडताळण्यात आल्या नसतील अशा नोंदी उक्त गावास ज्या नंतर भेटी देण्यात येतील त्यावेळी, निवडण्यात येतील. मंडल अधिकारी किंवा यथास्थिती मंडल निरीक्षक पडताळलेल्या पहिल्या आणि शेवटच्या नोंदीचा अनुक्रमांक आपल्या रोजनिशीत टिपून घेईल.

(२) प्रत्येक मंडल अधिकारी किंवा यथास्थिती मंडल निरीक्षक पडताळलेल्या नोंदीची संख्या, चुकीची असल्याचे आढळून आलेल्या नोंदीची संख्या आणि सापडलेल्या चुकांची संख्या व त्यांचा प्रकार आपल्या रोजनिशीत दर्शवील. ज्या वेळेला एखादी चूक दुरुस्त करावयाची असेल तेव्हा लाल शाईने चूक कंसात घालून आणि दोन ओळींमध्ये अचूक नोंदी समाविष्ट करून दुरुस्त करील, आणि अशा ओळींमधील मजकूर, बाजूच्या टीपा किंवा यथास्थिती, नव्या नोंदी, स्वतःच्या सहीने अधिप्रमाणित करील. ज्या बाबतीत अक्षम्य निष्काळजीपणा दिसून येईल त्या बाबतीत तो तलाठयाचे स्पष्टीकरण घेईल आणि आदेशासाठी तहसिलदाराकडे अग्रेषित करील.

(३) प्रत्येक मंडल अधिकारी आणि मंडल निरीक्षक वेगवेगळ्या प्रकारच्या पशुधनाच्या शिरगणतीत झालेली वाढ किंवा घट याची दखल घेईल आणि त्यांच्या कारणांची चौकशी करील व त्याबाबत तलाठ्याने दिलेल्या स्पष्टीकरणाची नोंद घेईल.

२२. **पाणीपुरवठ्याच्या साधनांची नोंद करणे.**—प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक अधिनियमाचे कलम १५६ अन्वये तयार केलेल्या गावाच्या नकाशात गावातील सर्वसाधारण जमिनीतील सर्व विहिरी, बंधारे आणि तलाव यावर समुचित चिन्हे नमूद करण्याची व्यवस्था करील आणि ती बाब जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख, यांना कळवील.

२३. **पाणीपुरवठा करणाऱ्या साधनांची तपासणी.**—प्रत्येक मंडल अधिकाऱ्याने व मंडल निरीक्षकाने, तलाठ्याने ठेवलेल्या, पाणीपुरवठ्याच्या पंचवार्षिक नोंद पुस्तकाची पडताळणी केली पाहिजे आणि गावठाणातील विहिरी आणि पाणीपुरवठ्याच्या इतर साधनांना आणि उक्त नोंदपुस्तकाची चाचणी घेण्यासाठी गावातील सर्वसाधारण जमिनीतील विहिरी, तलाव व बंधारे यांना भेट दिली पाहिजे. नोंदपुस्तकातील नोंद बरोबर असल्याचे आढळल्यास, मंडल अधिकारी किंवा यथास्थिती मंडल निरीक्षक ती पुढे आद्याक्षरी करील आणि नोंद बरोबर नसेल तर, तो लाल शाईने ती सुधारील.

२४. **जिल्हाधिकाऱ्याने सोपवलेली कामे मंडल अधिकारी व मंडल निरीक्षकाने पार पाडणे.**—पूर्ववर्ती उपबंधांस हानी न पोचवता, प्रत्येक मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक, राज्य सरकारच्या आदेशांस अधीन राहून, ज्या कामाबाबत जिल्हाधिकारी जबाबदार असेल अशी जिल्हाधिकाऱ्याने सोपविलेली, जिल्ह्याची महसूली व प्रशासनविषयक कामे पार पाडील आणि त्याबाबतीत जिल्हाधिकारी जे विशेष व सामान्य निदेश देईल ते निदेश पार पाडील.

(३) तलाठी जमीन महसूल व जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यायोग्य सर्व रकमा गोळा करण्यासाठी व अधिकार अभिलेख ठेवण्यासाठी जबाबदार असेल व त्याने या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये किंवा राज्य शासनाच्या आदेशान्वये यापुढे तरतूद केलेली सर्व कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजे.

(४) राज्य सरकारच्या व आयुक्ताच्या सामान्य आदेशास अधीन राहून, तलाठ्याने कोणती नोंदणीपुस्तके, हिशेब आणि कोणते इतर अभिलेख ठेवले पाहिजेत हे जिल्हाधिकाऱ्याने वेळोवेळी ठरविले पाहिजे.

(५) तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या कोणत्याही वरिष्ठ महसूल किंवा पोलिस अधिकाऱ्याने जेव्हा जेव्हा तसे करण्यास सांगितले असेल तेव्हा तेव्हा, नोटिशी, मरणोत्तर चौकशीचे प्रतिवृत्त व फौजदारी प्रकरणातील जबानी व तपासणी यासारखी गावाच्या कामासंबंधीची जी कागदपत्रे केंद्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या किंवा लोकांच्या उपयोगासाठी आवश्यक असतील अशी सर्व कागदपत्रे तयार करणे हे देखील तलाठ्याचे कर्तव्य असेल.

(६) इतर सर्व महसूल अधिकाऱ्यांनी राज्य सरकार निदेश देईल अशी कर्तव्ये व कामे पार पाडली पाहिजेत.

**१५.** राज्य सरकारला, या अधिनियमान्वये सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यास किंवा तहसीलदारास प्रदान केलेल्या शक्ती विहित अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही इसमास प्रदान करता येतील. **राज्य सरकारने महसूल अधिकाऱ्यांच्या शक्ती इतर इसमांना प्रदान करणे.**

टीप १५ (१).—सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांच्या शक्ती प्रदान करण्याकरिता अर्हता नियम.

[अधिसूचना क्रमांक यूएनएफ-१४६७ (एन) आर, दिनांक ६-१-१९६९ याअन्वये दुरुस्त केल्याप्रमाणे शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-१४६७ (एन) आर, दिनांक ८-३-१९६८.]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांच्या शक्ती प्रदान करण्यासाठी अर्हता) नियम, १९६८ असे म्हणता येईल.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमात,—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "स्थानिक प्राधिकरण" म्हणजे, महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद किंवा त्या त्यावेळी अमलात असलेल्या विधीअन्वये यथोचितरीत्या रचना करण्यात आलेले आणि या नियमांच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने मान्यता दिलेले कोणतेही प्राधिकरण ;

(क) "मान्यताप्राप्त विद्यापीठ" म्हणजे, या नियमांच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाने मान्यता दिलेले विद्यापीठ ;

(ड) "कलम" म्हणजे, अधिनियमाचे कलम.

३. **सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती प्रदान करण्यासाठी अर्हता.**—अधिनियमान्वये सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याला प्रदान करण्यात आलेल्या ज्या शक्ती, ज्या इसमास प्रदान करता येतील तो इसम पुढीलप्रमाणे असेल :—

(एक) राज्यातील सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याचे पद ज्याने धारण केले असेल ; किंवा

(दोन) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा जो स्नातक असेल आणि, राज्य सरकारच्या मते जे पद सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याच्या पदापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे, शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागाखालील पद धारण केले असेल ; किंवा

(तीन) जो माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा उक्त परीक्षेबरोबरीची म्हणून राज्य सरकारने मान्यता दिलेली परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि राज्य सरकारच्या मते जे पद सहाय्यक किंवा उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे, शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागाखालील पद, तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत, सतत धारण करीत असेल.

४. **तहसिलदाराच्या शक्ती प्रदान करण्याकरिता अर्हता.**—अधिनियमान्वये तहसिलदाराला प्रदान करण्यात आलेल्या शक्ती ज्या इसमास प्रदान करता येतील तो इसम पुढीलप्रमाणे असेल :—

(एक) राज्यातील नायब तहसिलदाराचे किंवा तहसिलदाराचे पद ज्याने धारण केले असेल ; किंवा

(दोन) अवल कारकुनाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे महसूल अधिकाऱ्याचे पद, तीन वर्षा-पेक्षा कमी असेल इतक्या मुदतीपर्यंत सतत धारण केले असेल व जो महसूलविषयक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल ; किंवा

(तीन) जो मान्यताप्राप्त विद्यापीठाचा स्नातक असेल व राज्य सरकारच्या मते जे पद तहसिल-दाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे, शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागाखालील पद धारण करीत असेल ;

(चार) जो माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा उक्त परीक्षेबरोबरीची म्हणून राज्य सरकारने मान्यता दिलेली परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि राज्य सरकारच्या मते जे पद तहसिल-दाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल असे, शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही विभागाखालील पद, जो तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत सतत धारण करीत असेल ; किंवा

(पाच) सहकारी संस्था अधिनियम, १९१२ याच्या कलम ४२ अन्वये किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम १०३ अन्वये नमण्यात आलेल्या परिसमापकाचे पद धारण करीत असेल.

**टीप १५ (२).**—या अधिनियमाचे कलम ३२०-अ अन्वय प्रदान करण्यात आलेल्या शक्तींवर वाचन करून महाराष्ट्र शासनाने असा निदेश दिला आहे की, कलम १५ अन्वयेच्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर, महाराष्ट्र जमीन महसूल (सहाय्यक किंवा उपजिल्हाधिकारी किंवा तहसिलदार यांच्या शक्तीत प्रदान करण्याकरिता अर्हता) नियम, १९६८ मधील तरतुदींना अधीन राहून, विभागीय आयुक्तांना देखील करता येईल. (शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-१९६७(अ) आर-दिनांक २५ मे १९७० (परिशिष्ट २४ पहा).

१६. राज्य सरकारने, कोणत्या महसूल अधिकाऱ्यानी शिक्का वापरावा ; आणि अशा अधिकाऱ्या- **शिक्के.**
पैकी प्रत्येक अधिकाऱ्याने कोणत्या आकाराचा आणि कोणत्या वर्णनाचा शिक्का वापरावा हे राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी" विहित केले पाहिजे.

**टीप १६.**—दिनांक १० ऑगस्ट १९६७ च्या समक्रमांकाच्या *शुद्धीपत्राअन्वये सुधारण्यात आलेल्या †शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक युएनएफ्-१४६७ (बी), आर, दिनांक ५ ऑगस्ट १९६७ अन्वये शासनाने अनुसूचीच्या स्तंभ दोन मधील अधिकाऱ्यांनी त्यांच्यासमोर अनुक्रमे स्तंभ (३) व (४) मध्ये दर्शवलेल्या आकाराचे आणि वर्णनाचे शिक्के वापरण्याबाबत आदेश दिले आहेत :—

**अनुसूचि**

| अनुक्रमांक (१) | अधिकारी (२) | शिक्क्याचा आकार (३) | शिक्क्याचे वर्णन (४) |
|---|---|---|---|
| १ | आयुक्त, अपर आयुक्त, जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि-अभिलेख, जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी आणि उप संचालक, भूमि-अभिलेख. | १¾ इंच व्यास असलेले गोल आकाराचे रबरी शिक्के. | अधिकाऱ्याचे पदनाम आणि मुख्यालय आणि राष्ट्रीय चिन्ह. |
| २ | उपविभागीय अधिकारी, सहायक/उप जिल्हाधिकारी आणि अधीक्षक, भूमि-अभिलेख. | १½ इंच व्यास असलेले गोल आकाराचे रबरी शिक्के. | अधिकाऱ्याचे पदनाम आणि मुख्यालय आणि राष्ट्रीय चिन्ह. |
| ३ | तहसिलदार, अपर तहसिलदार, जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख सर्वेक्षण तहसिलदार, आणि नायब तहसिलदार. | १ इंच व्यासाचे गोल आकाराचे रबरी शिक्के. | अधिकाऱ्याचे पदनाम आणि मुख्यालय आणि राष्ट्रीय चिन्ह. |

* परिशिष्ट २६ पहा. † परिशिष्ट २५ पहा.

**पैसा, कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता परत मिळविण्यासंबंधी तरतुदी**

पैसा, कागदपत्रे वगैरे-बाबतची मागणी संबंधित इसमांना लेखी कळविणे.

१७. (१) जिल्हाधिकाऱ्याने किंवा भूमि-अभिलेख अधीक्षकाने किंवा या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याने किंवा अधीक्षकाने प्रतिनियुक्ति केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याने, त्याच्या विभागात किंवा जिल्ह्यात, पूर्वी नोकरीस असलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा इसमाकडे, सरकारी पैशासंबंधी किंवा कागद पत्रांसंबंधी किंवा राज्य सरकारच्या इतर मालमत्तेसंबंधी त्यास मागणी करावयाची असेल तेव्हा अशा सर्व बाबतीत, आपल्या सहीने व जर तो शिक्का वापरीत असेल तर त्या शिक्क्यानिशी लेखी मागणी करून असा पैसा, किंवा अटकावून ठेवलेली कागदपत्रे किंवा मालमत्ता उक्त लिखाण घेऊन येणाऱ्या इसमास तावडतोब देण्यास किंवा उक्त लिखाणात निर्दिष्ट करण्यात येईल अशा इसमास, अशा तारखेस आणि अशा ठिकाणी देण्यास फर्माविले पाहिजे.

(२) जर उपरोक्त अधिकाऱ्याने किंवा इतर इसमाने, निदेश दिल्याप्रमाणे पैसे दिले नाहीत किंवा कागदपत्रे किंवा मालमत्ता स्वाधीन केली नाही तर, जिल्हाधिकारी, अधीक्षक किंवा असा इतर अधिकारी यांना त्यास अटक करविता येईल आणि त्याच्याकडून मागणी केलेल्या रकमा तो देईपर्यंत किंवा कागदपत्रे किंवा मालमत्ता स्वाधीन करीपर्यंत, त्यास अनुसूची 'अ' मधील नमुन्याप्रमाणे अधिपत्र पाठवून दिवाणी तुरुंगात अटकावून ठेवता येईल :

परंतु, अशा कोणत्याही अधिपत्रान्वये एका कॅलेंडर महिन्याच्या मुदतीपेक्षा अधिक मुदतीपर्यंत कोणत्याही इसमास अटकावून ठेवता कामा नये.

## अनुसूची 'अ'

(कलमे १७ व १८३ पहा)

**जिल्हाधिकाऱ्याने कलम १७ किंवा १८३ अन्वये काढावयाच्या अधिपत्राचा नमुना**

मुद्रा

प्रति,

..............येथील दिवाणी तुरुंगाचा प्रभारी अधिकारी

ज्याअर्थी, अ. ब. राहणार..........यांस सन १९ च्या .......महिन्याच्या ..... तारखेस ............ ने (येथे मागणीचा गोषवारा लिहावा) ............ चा आदेश दिला होता ; आणि ज्याअर्थी, उक्त अ. ब. याने उक्त आदेशाचे पालन करण्यात हयगय केली आहे, आणि म्हणून, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम १७/१८३ च्या उपबंधान्वये असा निदेश देण्यात येतो की, तो उक्त आदेशाचे पालन करीतोपर्यंत किंवा यथास्थिती उक्त अधिनियमाचे कलम १७ किंवा १८३ किंवा १९१ च्या उपबंधान्वये तो आपली मुक्तता करवून घेईतोपर्यंत, त्यास दिवाणी तुरुंगात ठेवावे ; त्याअर्थी, तुम्हास याअन्वये असे फर्माविण्यात येते की, तुम्ही उक्त अ. ब. यास आपल्या ताब्यातील तुरुंगात घ्यावे आणि उपरिनिर्दिष्ट आदेश विधिनुसार अंमलात आणावा.

मुद्रा

तारीख............माहे............१९ (जिल्हाधिकाऱ्याची सही)

१८. (१) जर असा अधिकारी किंवा इतर इसम जिल्हाधिकाऱ्याच्या विभागात व जिल्ह्यात सरकारी नोकरीस असेल किंवा होता, तर जिल्हाधिकाऱ्याने स्वतः होऊन, आणि जर असा अधिकारी किंवा इसम त्याच्या जिल्ह्यातील भू-मापन खात्यात नोकरीस असेल किंवा होता तर, भूमि-अभिलेख अधीक्षकाने अर्ज केल्यावर, त्याच्यांकडून येणे असलेला कोणताही सरकारी पैसा वसूल करण्यासंबंधी कसूर करणाऱ्यांकडून जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्याकरिता या अधिनियमात जी रीत नमूद केली असेल त्याचरीतीने व जे नियम घालून दिलेले असतील त्याच नियमास अधीन राहून, कारवाई करता येईल, आणि सरकारी कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता परत मिळविण्याच्या प्रयोजनांकरिता झडतीचे अधिपत्र काढता येईल आणि दंड-प्रक्रिया संहिता, १८९८ प्रकरण ७ च्या उपबंधान्वये दंडाधिकाऱ्यास वैधरीत्या जे अधिकार चालविता येतात ते सर्व अधिकार त्यासंबंधी चालविता येतील.

सरकारी पैसा महसुलाच्या थकबाकी-प्रमाणे वसूल करता येईल ; आणि कागदपत्रे किंवा मालमत्ता परत मिळविण्यासाठी झडतीचे अधिपत्र काढता येईल.

(२) असा सरकारी पैसा, कागदपत्रे किंवा इतर सरकारी मालमत्ता ज्या इसमांच्या ताब्यात असेल अशा सर्व इसमांनी ती ताबडतोब जिल्हाधिकाऱ्याच्या हवाली करणे हे त्यांचे कर्तव्य असेल, आणि अशी कोणतीही मालमत्ता कोठे लपविली आहे हे ज्या इसमास माहीत असेल अशा प्रत्येक इसमाने त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यास माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक असेल.

१९. ज्याच्याकडून मागणी केली आहे अशा, कलम १७ मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्याने किंवा इसमाने अनुसूची 'ब' मधील नमुन्याप्रमाणे पुरेसे तारण दिले तर, असा अधिकारी किंवा इसम अभिरक्षेत असल्यास जिल्हाधिकाऱ्याने त्याची सुटका करविली पाहिजे आणि जप्त केलेल्या कोणत्याही मालमत्तेची विक्री बंद करून ती मालकास परत दिली पाहिजे.

तुरुंगात असलेल्या अधिकाऱ्यास किंवा इसमास तारण देऊन आपली सुटका करून घेता येईल.

## अनुसूची 'ब'

### कलम १९ किंवा १९१ अन्वये आवश्यक असलेल्या बंधपत्राचा नमुना

ज्याअर्थी, मी, .................................... मला (येथे मागणीचे स्वरूप लिहावे) ..................चा .................. ने आदेश दिला आहे आणि उक्त आदेश देण्याचा उक्त .................... यास अधिकार नाही अशी माझी हरकत आहे ; त्याअर्थी, जे करण्यास सांगितले आहे ते बजावी नाही अशा वादाबद्दल .................... च्या जिल्हा न्यायालयात या बंधपत्राच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत दावा करीन असे मी या बंधपत्रान्वये स्वतःस बांधून घेतो, आणि असे कबूल करतो की, माझ्यावर हुकूमनामा झाला तर तो मी पुरा करीन आणि खर्चासुद्धा व व्याजासुद्धा ज्या रकमा माझ्याकडून येणे होतील त्या सर्व रकमा मी देईन किंवा मी उपरिनिर्दिष्ट प्रमाणे दावा करण्यास चुकेन तर, .................... रुपयांची रक्कम जेव्हा देण्यास सांगतील तेव्हा, मी ती रक्कम देईन (किंवा यथास्थिती वर उल्लेख केलेले कागदपत्र किंवा मालमत्ता देऊन टाकीन) आणि तसे करण्यात मी कसूर केली तर, सरकारात .................................... रुपयांची रक्कम जमा करीन असे याअन्वये मी बांधून घतो.

तारीख............माहे............ १९ . (सही).

**मुख्याने करून दिलेल्या बंधपत्रास जोडावयाच्या तारणपत्राचा नमुना**

आम्ही .............. या अन्वये उपरोक्त............यास जामीन राहून असे लिहून देतो की, त्याने जे करण्याचे व पार पाडण्याचे काम वर पत्करले आहे ते, तो सर्व करील व पार पाडील आणि तो त्याप्रमाणे करण्यात कसूर करील त्याबाबतीत, आम्ही, राज्य सरकारकडे ......... .................... रुपयांची रक्कम जप्त करण्यास बांधलेलो आहोत असे याअन्वये लिहून देतो.

तारीख (सही)

# प्रकरण ३

## जमिनींबाबत

**इतरांची मालमत्ता नसलेल्या जमिनी, सार्वजनिक रस्ते इत्यादी मधील राज्याचा मालकी हक्क.**

२०. (१) सर्व सार्वजनिक रस्ते, गल्या आणि मार्ग, पूल, खंदक, धरणे आणि त्यांच्यावरील किंवा त्यांच्या बाजूची कुंपणे, आणि भरतीच्या पाण्याच्या खुणेच्या खालील समुद्राचा, बंदराचा व खाड्यांचा आणि नद्या, ओहोळ, नाले, सरोवरे व तळी यांचे तळ आणि सर्व कालवे व पाण्याचे पाट, आणि साचलेले सर्व पाणी व वहाते पाणी, आणि कोठेही असलेल्या ज्या जमिनी, सर्व मालमत्ता वैधरीत्या धारण करू शकणाऱ्या सर्व इसमांची मालमत्ता नसेल, आणि त्यात किंवा त्यावर अशा इसमांचे कोणतेही हक्क जेथवर प्रस्थापित करण्यात येतील त्याव्यतिरिक्त आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये अन्यथा जी कोणतीही तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करून, अशा सर्व जमिनी, त्यावरील किंवा त्यातील किंवा त्याच्याशी संबंध असलेल्या सव हक्कांसह, राज्य सरकारची मालमत्ता आहे व असल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे ; आणि आयुक्ताच्या आदेशांस अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने राज्य शासन याबाबतीत विहित[१७] करील अशा रीतीने त्यांची विल्हेवाट लावणे हे विधिसंमत असेल, परंतु, तसे करताना जिल्हाधिकाऱ्याने, जाण्यायेण्याचे हक्क, आणि लोकांच्या किंवा व्यक्तीच्या वैधरीत्या अस्तित्वात असलेल्या सर्व हक्कांना अधीन राहिले पाहिजे.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमातील, "पूर्ण भरतीची खूण" या संज्ञेचा अर्थ, वर्षाच्या कोणत्याही हंगामात, नेहमीच्या उधाणाच्या भरतीचे पाणी ज्या बिंदूपर्यंत चढते तो उच्चतम बिंदु असा समजावा.

**टीप. १७.**—कृपया कलम ५१ खालील टीप ३७ पहा.

(२) जेव्हा कोणत्याही मालमत्तेबाबत किंवा कोणत्याही मालमत्तेतील किंवा त्यावरील कोणत्याही हक्काबाबत सरकारने किंवा त्याच्या वतीने किंवा सरकारविरुद्ध कोणत्याही इसमाने दावा सांगितला असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने त्यासंबंधी योग्य नोटीस देऊन रीतसर चौकशी केल्यानंतर, अशा दाव्याचा निर्णय करणारा आदेश देणे हे विधिसंमत असेल.

(३) जिल्हाधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशावर, या अधिनियमाच्या उपबंधानुसार एक अपील किंवा फेरतपासणी होऊ शकेल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही दिवाणी न्यायालयात दाखल केलेला कोणताही दावा किंवा अशा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील मर्यादा कालात करण्यात आले असेल तर, असे अपील प्राधिकरणाने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या तारखेपासून, असा आदेश काढून टाकण्यासाठी दावा करण्यात आला असेल किंवा मागितलेला अनुतोष अशा आदेशाशी विसंगत असेल तर (मर्यादा कालासंबंधात बचाव करण्यात आला असला तरीही), काढून टाकता येईल. मात्र, पोट कलम (२) अन्वयेच्या आदेशाच्या बाबतीत, वादीस अशा आदेशाची वाजवी नोटीस देण्यात आली असली पाहिजे.

(५) कोणत्याही चौकशीबद्दल किंवा आदेशाबद्दल, राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमानुसार[१८] नोटीस देण्यात आली असेल तर, कोणत्याही इसमास या कलमान्वयेच्या अशा चौकशीची किंवा आदेशाची वाजवी नोटीस देण्यात आल्याचे मानण्यात येईल.

टीप १८.—जमिनीच्या मालकी हक्कासंबंधी चौकशी नियम.

शासकीय अधिसूचना क्र.यू.एन.एफ. १५६७(इ)-आर, दि. १४-५-१९६८ अन्वये दुरुस्त केलेली शासकीय अधिसूचना क्र. युएनएफ--१५६७(इ), आर, दि. २१ ८-१९६७.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या मालकी हक्कासंबंधी चौकशी) नियम, १९६७ असे म्हणावे.

२. **कलम २० (२) अन्वये चौकशीची नोटीस व आदेश.**—(१) कलम २०, पोट-कलम (२) अन्वये चौकशी सुरू करण्यापूर्वी नियोजित चौकशीची आणि तिच्या ठिकाणाची व वेळेची व तिच्या विषयाची, या नियमास जोडलेल्या नमुना 'अ' मधील लेखी नोटीसही चौकशी ज्या मालमत्तेशीसंबंधी असेल तो मालमत्ता ज्या गावात असेल त्या गावातील चावडीत किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी आणि अशा मालमत्तेमधील ठळक ठिकाणी चौकशीच्या पूर्वी १० दिवसाहून कमी नसेल इतक्या अगोदर लावली पाहिजे.

(२) चौकशीच्या विषयवस्तू असलेल्या कोणत्याही गोष्टीवर ज्यांनी दावा सांगितल्याचे किंवा ज्यांचा त्यात हितसंबंध असल्याचे ज्ञात असेल किंवा समजण्यात येत असेल अशा सर्व इसमांवर, चौकशीपूर्वी दहा दिवसांहून कमी नसेल इतक्या अगोदर अशा नोटीशीची प्रतसुद्धा बजावण्यात आली पाहिजे. आणि अशी प्रत्येक नोटीस, समन्स बजावण्यासाठी कलम २२८ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने बजावण्यात आली पाहिजे.

(३) कलम २०, पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाची ह्या नियमास जोडलेल्या नमुना 'ब' मधील दिलेल्या आदेशाचा विषय, आशय व तारीख निर्दिष्ट करणारी नोटीस पोट-नियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने त्या पोट-नियमात उल्लेखिलेल्या इसमांवर बजावण्यात येईल.

(४) अशी नोटीससुद्धा पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी लावण्यात आली पाहिजे.

नमुना 'अ'

[नियम २ (१) पहा]

**कलम २० (२) खालील नोटीशीचा नमुना**

अ. ब.

यांस,

ज्याअर्थी, येथे मालमत्तेचे किंवा कोणत्याही मालमत्तेतील किंवा त्यावरील अधिकारी या संबंधात शासनाने (किंवा शासनविरुद्ध क, ड ने) मागणी केली आहे. त्याअर्थी याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, त्या मागणीचा निर्णय करण्यासाठी माझ्याकडून चौकशी करण्यात येईल.

तुम्हाला याद्वारे फर्मावण्यात येते की, तुम्ही जातीने किंवा योग्य रित्या प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्या-मार्फत दिनांक १९ रोजी .....वाजता (विवाद्य जागेच्या ठिकाणी किंवा) माझ्या कार्यालयात (........................................ तालुक्यातील .......... या शिबिरात) माझ्यासमोर उपस्थित राहावे. वरील वेळी व ठिकाणी त्या मागणीबाबत चौकशी करण्यात येईल.

आणि याद्वारे तुम्हास फर्मावण्यात येत आहे की, जे कोणतेही दस्तऐवज किंवा पुरावा सादर करण्याची तुमची इच्छा असेल ते दस्तऐवज किंवा पुरावा वर उल्लेख केलेल्या वेळी व ठिकाणी माझ्यापुढे सादर करावेत.

या नोटिशीनुसार तुम्ही जातीने किंवा योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर रहाण्यात कसूर केल्यास वर उल्लेख केलेल्या मागणीचा तुमच्या अनुपस्थितीत निर्णय करण्यात येईल.

या कार्यालयाच्या सही व शिक्यानिशी दिले.

(सही)

दिनांक ..............१९ . जिल्हाधिकारी किंवा सर्वेक्षण अधिकारी.

## नमुना 'ब'

[नियम २ (३)]

ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या मालकीहक्काबाबत चौकशी) नियम, १९६७ यातील नियम २ (२) अन्वये योग्य रित्या बजावण्यात आलेल्या नोटिशीनुसार मी, दिनांक ............ रोजी चौकशी केली होती व दिनांक ............रोजी आदेश दिला होता.

त्याअर्थी, सर्व संबंधित इसमांना व (ही नोटिस ज्या इसमास उद्देशून असेल त्या इसमाचे नाव येथे निर्दिष्ट करावे) यास अशी नोटीस देण्यात येत आहे की, माझा निर्णय व आदेश पुढीलप्रमाणे आहे. (येथे आदेश संक्षेपाने लिहावा व मालमत्तेचे व त्या मालमत्तेसंबंधीचे हक्काचे वर्णन लिहावे.)

या कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

(सही)

दिनांक ............१९ . जिल्हाधिकारी किंवा सर्वेक्षण अधिकारी.

कार्यालयाची मुद्रा.

सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यक नसलेला कोणताही, सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग यांतील किंवा यांवरील लोकांचे हक्क नाहीसे होणे.

२१. (१) राज्य सरकारची मालमत्ता किंवा त्याचा भाग असलेला कोणताही सार्वजनिक रस्ता, गल्ली किंवा मार्ग (ज्याचा यापुढे या कलमात सरकारी रस्ता असा उल्लेख केलेला आहे) जनतेच्या वापराकरिता आवश्यक नाही असे जिल्हाधिकाऱ्यास जेव्हा जेव्हा वाटेल तेव्हा तेव्हा त्यास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, तशा आशयाची घोषणा करता येईल आणि अशा घोषित, अशा सरकारी रस्त्यामधील व रस्त्यावरील (शक्य तेथवर त्याचे स्थान व हद्दी निर्दिष्ट करण्यात आल्या आहेत) लोकांचे हक्क, विद्यमान खाजगी हक्क, कोणतेही असल्यास त्यास अधीन राहून, नष्ट करण्याचे योजिले आहे असे नमूद करता येईल.

(२) अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर, जिल्हाधिकाऱ्याने, शक्यतितक्या लवकर, अशा सरकारी रस्त्यावरील किंवा त्याच्या जवळपासच्या सोयीस्कर ठिकाणी अशा घोषणेची जाहीर नोटीस देण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि उपरोक्त प्रस्तावासंबंधीच्या हरकती मागविल्या पाहिजेत.

(३) अशा सरकारी रस्त्यात किंवा रस्त्यावर, सार्वजनिक महामार्गाच्या हक्काशिवाय आणखी कोणताही हितसंबंध किंवा हक्क असणाऱ्या, किंवा अशा प्रस्तावामुळे प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असणारा कोणताही हितसंबंध किंवा हक्क असणाऱ्या लोकांपैकी कोणत्याही इसमास किंवा इसमांस, पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतर नव्वद दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्यांकडे, अशा प्रस्तावाबाबतच्या आपल्या हरकती, अशा हितसंबंधाचे किंवा हक्काचे स्वरूप आणि ज्या रीतीने त्याच्यावर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असेल ती रीत, आणि अशा हितसंबंधाबद्दल किंवा हक्काबद्दल नुकसानभरपाईच्या मागणीची रक्कम आणि तपशील लेखी सादर करता येईल :

परंतु, कोणताही इसम पुरेशा कारणामुळे उपरोक्त नव्वद दिवसांच्या कालावधीत असे निवेदन सादर करू शकला नाही अशी जिल्हाधिकाऱ्याची खात्री झाल्यास, त्यास, अशा इसमास त्या कालावधीनंतर असे निवेदन सादर करण्याची परवानगी देता येईल.

(४) जिल्हाधिकाऱ्याने, त्याच्याकडे निवेदन सादर केलेल्या प्रत्येक इसमास, व्यक्तिशः किंवा विधि व्यवसायीमार्फत त्याचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिली पाहिजे आणि, अशारीतीने सर्व इसमाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, व त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी केल्यानंतर, सरकारी रस्ता जनतेच्या वापराकरिता आवश्यक नाही अशी जर त्याची खात्री होईल तर ,लोकांचे ,अशा सरकारी रस्त्यातील किंवा त्यावरील सर्व हक्क नष्ट करण्यात येत आहेत अशी घोषणा करून ती राजपत्रात प्रसिद्ध केली पाहिजे, आणि त्यानंतर असे सर्व हक्क नष्ट होतील आणि असा सरकारी रस्ता, कोणत्याही विद्यमान खाजगी हक्कास अधीन राहून, अशा घोषणेच्या तारखेपासून सरकारच्या ताब्यात जाईल. जिल्हाधिकाऱ्याने, त्याने उपरोक्त प्रमाणे लोकांचे हक्क नष्ट करण्याच्या प्रस्तावामुळे होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही भरीव स्वरुपाच्या हानीच्या किंवा नुकसानीच्या संबंधात त्याच्या मते जी नुकसानभरपाईची रक्कम, कोणतीही असल्यास, दिली पाहिजे, ती रक्कम ठरविली पाहिजे. भूमिसंपादन अधिनियम, १८९४ याची कलमे ९, १०, ११, १२, १३, १४ व १५ यांचे उपबंध शक्य असेल तेथवर, या पोट-कलमान्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने चालविलेल्या कार्यवाहीस लागू होतील :

परंतु, अशा सरकारी रस्त्यावरील सार्वजनिक महामार्गाचा हक्क नष्ट किंवा कमी केल्याबद्दल कोणतीही नुकसानभरपाई देता कामा नये.

(५) लोकांचे सरकारी रस्त्यावरील किंवा त्यावरील हक्क नष्ट करण्याच्या बाबतींत आणि नुकसानभरपाईच्या रकमेसंबंधी आणि ज्यास अशी नुकसानभरपाई ,कोणतीही असल्यास, द्यावयाची असेल त्या इसमाच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांने पोट-कलम (४) अन्वये दिलेला निर्णय हा, आयुक्ताने अपिलामध्ये दिलेल्या निर्णयास अधीन राहून, अंतिम असेल, आणि जिल्हाधिकाऱ्यांने अशा इसमांना त्याप्रमाणे नुकसानभरपाईच्या रकमा दिल्या पाहिजेत :

परंतु, अंतिम आदेश दिल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत जर रकमा देण्यात आल्या नाहीत तर, जिल्हाधिकाऱ्याने, द्यावयाच्या रकमा, अंतिम आदेश दिल्याच्या तारखेपासून दरसाल दरशेकडा सहा टक्के या दराने व्याजासह दिल्या पाहिजेत.

२२. राज्य सरकारच्या सामान्य आदेशांस अधीन राहून, या अधिनियमान्वये भूमापन चालू असेल तेव्हा भूमापन अधिकाऱ्याने, आणि इतर कोणत्याही वेळी, जिल्हाधिकाऱ्याने (कोणत्याही इसमाच्या वैधरीत्या भोगवटयामध्ये नसलेल्या), गावातील भोगवटयात नसलेल्या जमिनी किंवा त्यांचे भाग, धनासाठी किंवा राखीव जळणासाठी, गावातील गुराढोरांकरिता मोफत कुरणासाठी किंवा गवतासाठी किंवा राखीव वैरणीसाठी, (प्रेते) पुरण्या किंवा जाळण्यासाठी, गावठणासाठी, छावणीसाठी, मळणीसाठी, बाजारासाठी, कातडी कमाविण्यासाठी, रस्ते, बोळ, उद्याने, गटारे यासारख्या सार्वजनिक कारणासाठी किंवा इतर कोणत्याही सार्वजनिक कारणासाठी वेगळे ठेवणे हे विधिसंमत असेल ; आणि अभिहस्तांकित केलेल्या जमिनीचा जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीशिवाय अन्यथा उपयोग करता कामा नये आणि कलम २० अन्वये जमिनीची विल्हेवाट लावताना अशा सर्व विशेष अभिहस्तांकनाकडे योग्य लक्ष पुरवले पाहिजे.

विशेष कारणासाठी जमिनीचे अभिहस्तांकन करता येईल आणि अभिहस्तांकन करण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजुरीवाचून तिचा अन्यथा उपयोग करता कामा नये.

२३. मोफत कुरणात गुरे चारण्याचा हक्क हा, ज्या गावाच्या किंवा गावांच्या त्या जमिनी असतील किंवा ज्या गावाकडे किंवा गावांकडे त्या जमिनी अभिहस्तांकित केल्या असतील त्या गावाच्या किंवा गावांच्या गुरांपुरतांच मर्यादित असेल, अणि राज्य सरकारकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमाद्वारे हक्कांचे नियमन होईल. गुरे चारण्याच्या उपरोक्त हक्काच्या कोणत्याही बाबतीतील विवादासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांने दिलेला निर्णय या अधिनियमाच्या उपबंधानुसार केवळ एकच अपील करता येईल या गोष्टीस अधीन राहून, निर्णायक असेल.

कुरणाच्या वापराचे उक्त नियमन.

२४. जो कोणताही इसम एखाद्या विशेष कारणासाठी वेगळ्या ठेवलेल्या कोणत्याही जमिनीतून किंवा सरकारची मालमत्ता असलेल्या कोणत्याही जमिनीतून कोणतेही नैसर्गिक उत्पन्न (झाडे सोडून) अनाधिकृत-पणे काढून नेईल तो इसम सरकारला त्याची किंमत देण्यास आणि त्याशिवाय अशा रीतीने काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पान्नाच्या किंमतींच्या पांचपटीपेक्षा अधिक नसेल इतका दंड देण्यास पात्र असेल . अशी किंमत व दंड, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याच्याकडून वसूल करण्यात येईल.

विवक्षित जमिनीतून अनधिकृतपणे काढून नेलेल्या नैसर्गिक उत्पन्नाची किमत वसूल करणे.

२५. (१) हा अधिनियम, अंमलात आल्यापासून, भोगवटयात असलेल्या कोणत्याही जमिनीवर धारण असलेल्या किंवा वाढणाऱ्या सर्व झाडांवरील हक्क ती जमीन धारण करणाऱ्याकडे निहित होईल. परंतु जमिनीच्या धुपणीस प्रतिबंध करण्यासाठी विवक्षित झाडे कापण्यास प्रतिबंध करणे किंवा त्याचे नियमन करणे आवश्यक आहे असे राज्य सरकारचे मत होईल तर त्यास नियमाद्वारे " अशी झाडे कापण्यास प्रतिबंध करता येईल किंवा त्यांचे नियमन करता येईल.

जमिनीतील झाडांवरील हक्क.

टीप १९.—झाडे तोडणे, इत्यादीच्या बाबतीतील अधिकारांचे नियमन करण्याबाबत नियम.

शासकीय अधिसूचना क्र. यू एनएफ-१५६७ (सी) आर, दि. ४ जुलै १९६८ द्वारे सुधारणा केलेली शासकीय अधिसूचना क्र. यू. एन.-एफ-१५६७-(बी) आर-दि. १ नव्हेंबर १९६७.

१. **संक्षिप्त नाव.**—ह्या नियमास महाराष्ट्र जमीन महसूल (झाडे इत्यादींच्या बाबतीतील अधिकारांचे नियमन करण्याबाबत) नियम, १९६७ असे म्हणावे.

**अ. जमीन धुपण्यास प्रतिबंध करण्यासाठी झाडे तोडण्याचे नियमन**

२. **विवक्षित बाबतीत झाडे तोडण्यास मनाई.**—(१) कोणताही जलप्रवाह, झरा किंवा तलाव यांच्या किनाऱ्याच्या अंतिम कडेपासून तीस मीटर्सच्या आत असलेले कोणतेही झाड, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय तोडता कामा नये.

(२) पोट-नियम (१) खाली येणार नाही अशा कोणत्याही प्रकरणी मशागतीस अयोग्य असेल अशी किंवा ज्या जमिनीमध्ये शेतीच्या पिकांची लागवड करणे किफायतशीर नसेल अशी जमीन, समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही धारण जमिनीतील किंवा तिच्या भागातील कोणतेही झाड, उक्त धारण जमिनीतील किंवा तिच्या भागातील वाढणाऱ्या झाडांचे प्रमाण, दर एकरी वीस झाडे या प्रमाणापेक्षा कमी असेल तर जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय तोडता येणार नाही.

(३) या नियमाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, अशा उल्लंघनामुळे जे कोणतेही इतर परिणाम होतील त्या व्यतिरिक्त, आपले म्हणणे मांडण्याची तिला संधि दिल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यास, योग्य वाटेल अशा एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण १.**—ह्या नियमांच्या प्रयोजनासाठी 'जल प्रवाह' यांमध्ये, ज्यात पावसाळ्यात किंवा अन्यथा पाणी साठते व प्रायः ज्यात डिसेंबर अखेरपर्यंत पाणी राहते असे सर्व ओढे, नद्या, ओहोळ व नाले यांचा समावेश होतो. परंतु, त्यात पावसाळ्यात पाणी वाहण्यामुळे तयार झालेल्या लहान तात्पुरत्या जलमार्गांचा समावेश होत नाही.

**स्पष्टीकरण २.**—कोणतेही झाड, कोणताही जल प्रवाह झरा किंवा तलाव यांच्या किनाऱ्याच्या अंतिम कडेपासून तीस मीटर्सच्या आत आहे किंवा कसे किंवा कोणतीही धारण जमीन किंवा तिचा भाग यामध्ये, मशागतीस अयोग्य असलेल्या जमिनीचा किंवा शेतीच्या पिकांची किफायतशीर लागवड करणे शक्य नसेल अशा जमिनीचा अंतर्भाव आहे किंवा कसे, याबद्दल कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, तो प्रश्न, जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येईल.

३. **अशी झाडे तोडण्यास केव्हा परवानगी देता येईल.**—जमीनधारकाने त्या बाबतीत अर्ज केल्यावर, नियम २ मध्ये निर्दिष्ट केलेली झाडे किंवा त्याचे भाग :—

(एक) त्यामुळे जीवितास किंवा मालमत्तेस कोणतीही इजा किंवा नुकसान पोहोचण्याची शक्यता असेल किंवा पिण्याचे पाणी दूषित होण्याची शक्यता असेल, किंवा

COLLE

(दोन) झाडे वठलेली असतील किंवा वठत असतील, किंवा

(तीन) त्यांची सावली पडल्यामुळे अन्नधान्याच्या ज्या उत्पादनात घट येत असेल त्या बाबतीत झाडे काढून टाकणे हे जमीनधारकाच्या हिताचे ठरत असेल तर, अशी झाडे तोडण्यास जिल्हाधिकाऱ्यास परवानगी देता येईल.

### ब. भोगवटयात असलेल्या जमिनीतील झाडांच्या खरेदीसाठी कार्यपद्धती

४. **झाडांबाबतचे अधिकार खरेदी करण्यासाठी अर्ज.**—भोगवटदाराने धारण केलेल्या जमिनीतील झाडांबाबतचा अधिकार खरेदी करण्याची आणि कलम २५, पोट-कलम (२) अन्वये अशा अधिकाराचे मूल्य ठरविण्याची ज्याची इच्छा असेल त्याबाबतीत ती, झाडांची संख्या व जाती आणि झाडांबाबतचे अधिकार ज्याच्याकडे निहित झाले असतील त्या व्यक्तींचे नाव यांचा उल्लेख करून, जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करील. त्यासोबत, धारण केलेल्या जमिनीसंबंधीच्या क्षेत्र पुस्तकाची (खसरा) एक प्रत किंवा झाडांबाबतचे विद्यमान अधिकार दाखविण्याचा आशय असलेल्या इतर कोणत्या दस्तऐवजाच्या उताऱ्याची एक प्रत जोडण्यात येईल.

५. **अर्ज मिळाल्यानंतरची कार्यपद्धती.**—(१) अर्ज मिळाल्यानंतर, जिल्हाधिकारी, झाडांबाबतचे अधिकार निहित असलेल्या सर्व व्यक्तींवर नोटीस बजावण्याची आणि ह्या नियमांना जोडलेल्या नमुना 'अ' मध्ये उद्घोषणा काढण्याची व्यवस्था करील व त्याद्वारे, अशा अधिकाऱ्याच्या खरेदीविरुद्ध हित-संबंधित व्यक्तींच्या ज्या कोणत्याही हरकती असतील त्या दाखल करण्यासाठी, त्यांना फर्मावील.

(२) अशी नोटीस, कलम २३० च्या उपबंधानुसार बजावण्यात येईल आणि अशी उद्घोषणा, कलम १९२, पोट-कलम (२) च्या उपबंधानुसार काढण्यात येईल.

६. **अर्जासंबंधी चौकशी.**—(१) सुनावणीसाठी ठरविलेल्या तारखेस किंवा सुनावणी ज्या तारखे-पर्यंत तहकूब करण्यात आली असेल अशा इतर कोणत्याही तारखेस, जिल्हाधिकारी, पक्षकारांची तपासणी केल्यानंतर आणि सादर करण्यात येईल अशा कोणत्याही पुराव्याच्या सुनावणीनंतर, आदेश देईल व त्यात पुढील गोष्टी नमूद करील :—

(१) झाडांची संख्या आणि वर्णन,

(२) अधिकारांचे मूल्य, आणि

(३) अशा रीतीने ठरविलेले मूल्य ज्या कालावधीत देण्यात येईल असा, तीस दिवसाहून कमी नसणारा कालावधी व भोगवटदाराने ती रक्कम ज्या व्यक्तीला द्यावयाची ती व्यक्ती.

(२) ठरविलेल्या तारखेस भोगवटदाराने रक्कम भरण्यात किंवा असा भरणा केल्याबद्दल पावती सादर करण्यात कसूर केल्यास, असे अधिकार खरेदी करण्याचा त्याचा इरादा नाही असे गृहीत धरण्यात येईल. त्यानंतर जिल्हाधिकारी, नियम ५ अन्वये नोटीस व उद्घोषणा काढण्यासाठी आणि चौकशी करण्यासाठी केलेला खर्च निर्धारित करील आणि अशा रीतीने निर्धारित केलेला खर्च भोगवटदाराला द्यावा लागेल.

७. **आदेशाची प्रत तलाठ्यासाठी पाठविणे.**—भोगवटादाराने झाडांच्या किंमतीची रक्कम भरल्याची पावती सादर केल्यावर, जिल्हाधिकारी, नियम ६ अन्वये दिलेल्या आदेशाची प्रत, अभिलेखात आवश्यक त्या नोंदी करण्यासाठी तलाठ्याकडे पाठवील.

## नमुना 'अ'

(नियम ५ पहा)

### उद्घोषणा

ज्याअर्थी, ········वडिलांचे नाव, ··············· राहणार ·········· तालुका ········यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पंचेचाळीस) याचे कलम २५, पोट-कलम (२) अन्वये, खालील अनुसूचीत वर्णन केल्याप्रमाणे, त्याने धारण केलेल्या जमिनीतील झाडांबाबतचे अधिकार खरेदी करण्यासाठी अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी, सर्व हितसंबंधित इसमांना याद्वारे कळविण्यात येते की, खाली सही करणारे, आपल्या कार्यालयात ················ या दिवशी ············ वाजता त्या अर्जाची तपासणी करतील.

ज्या कोणत्याही व्यक्तीस दावा करावयाचा असेल किंवा हरकत घ्यावयाची असेल तिने त्यावेळी तसे करावे.

### अनुसूची

| अनुक्रमांक | गावाचे नाव व तालुका | भू-मापन क्रमांक (प्लॉट) भूखंड क्रमांक | क्षेत्रफळ | झाडांची संख्या व जाती | झाडांबाबत अधिकार ज्या व्यक्तीकडे निहित असतील त्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

माझ्या सही-शिक्यानिशी देण्यात आली.

दिनांक १९ . जिल्हाधिकारी.

जिल्हाधिकाऱ्याचा शिक्का.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही क्षेत्रात दिनांक १ ऑक्टोबर १९५५ रोजी खातेदाराच्या धारण जमिनीतील झाडासंबंधी कोणत्याही इसमाच्या नावाने अस्तित्वात असलेल्या कोणत्याही हक्कास बाध येणार नाही, परंतु खातेदारास अशा हक्काची किंमत ठरविण्यासाठी विहित करण्यात येईल अशा रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि जिल्हाधिकाऱ्यामार्फत तो हक्क खरेदी करता येईल.

टीप २०.—कृपया कलम २५ खालील टीप १९ (नियम ६ ते ७) पहा.

(३) या कलमाच्या उपबंधाच्या आधारे अशी झाडे आपल्याकडे निहित होतील या अपेक्षेने या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही इसमाने केलेली झाडाची विक्री किंवा अशा विक्रीसाठी केलेला करार हा निरर्थक ठरेल आणि अशा विक्री किंवा करार यासाठी देण्यात आलेला मोबदला परत करण्यात येईल.

२६. कलम २२ अन्वये जंगलासाठी वेगळ्या राखून ठेवलेल्या जमिनीवर वाढणाऱ्या सर्व झाडां- सरकारकडे वरील, झुडुपांवरील, जंगलावरील किंवा इतर नैसर्गिक उत्पन्नावरील हक्क, आणि ती मालमत्ता वैधरीत्या निहित धारण करू शकणाऱ्या व्यक्तीची मालमत्ता नसेल तेथवर, अशा सर्व झाडावरील, झुडुपांवरील, जंगलावरील असलेली किंवा इतर नैसर्गिक उत्पन्नावरील हक्क, मग ती कोठेही वाढत असोत, राज्य सरकारकडे निहित होईल ; झाडे व जंगले. आणि अशी झाडे, झुडपे, जंगले किंवा इतर नैसर्गिक उत्पन्न यांचे राज्य सरकार वेळोवेळी या बाबतीत केलेल्या नियमाद्वारे विहित करील त्या रीतीने जतन केले पाहिजे किंवा त्याची विल्हेवाट लावली पाहिजे.

टीप. २१—सरकारी झाडे, झाडांचे उत्पन्न, चराई व नैसर्गिक उत्पादन यांची व्यवस्था यासंबंधीचे नियम.

क्रमांक यू एनएफ-१५६७ (एफ) आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा शासकीय महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) याच्या कलम ३२८, पोट-कलम (२) च्या खंड (सात) द्वारा प्रधान अधिसूचना करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संबंधात केलेल्या व उक्त अधिनियमाच्या कलम ३३६ च्या तिसऱ्या परंतुकाच्या आधारे अमलात असण्याचे चालू ठेवलेल्या पूर्वीच्या सर्व नियमांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ३२९, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते :—

क्र. यूएनएफ.-१५६७ (एफ) आर. दि. ३ एप्रिल १९६९.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी झाडे, झाडांचे उत्पन्न, चराई व इतर नैसर्गिक उत्पादने यांची व्यवस्था) नियम, १९६९ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—या नियमात—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "कलम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम.

३. **शासनाच्या मालकीच्या झाडांची वासलात लावणे इत्यादी.**—राज्य शासनाच्या मालकीची कोणतीही झाडे कलम २६ अन्वये विकण्यात येतील त्या बाबतीत अशी विक्री जाहीर लिलावाद्वारे किंवा जिल्हाधिकारी वनसंरक्षकांशी विचारविनिमय करून अन्यथा निदेश देईल त्यानुसार करण्यात येईल.

(२) राज्य शासनाच्या मालकीच्या जमिनीवर वाढणारी खुरटी झाडे, लाख, मध, गोंद, राळ, कात, व जंगलातील किंवा इतर तत्सम नैसर्गिक उत्पादन, यांची विक्री जिल्हाधिकाऱ्याने कलम २६ अन्वये जाहीर लिलावाने एकतर एक वर्षाच्या मुदतीकरिता किंवा पाच वर्षांहून अधिक नसेल अशा कोणत्याही मुदतीकरिता करता येईल.

४. **चराईची व्यवस्था लावणे.**—राज्य शासनामध्ये निहित असलेल्या व भोगवट्यात नसलेल्या जमिनीच्या (मग अशा जमिनीला भू-मापन जमाबंदी लागू असो वा नसो आणि तिच्या आकारणी करण्यात येत असो वा नसो) व केवळ गवताकरिता किंवा चराईकरिता विशेषरीत्या राखून ठेवलेल्या (कलम २२ अन्वये अभिहस्तांकित केलेली किंवा कलम १६१ अन्वये तयार केलेल्या निस्तार पत्रकात समाविष्ट केलेली जमिन वगळून) जमिनीतील चराईची वर्षावर्षास याप्रमाणे किंवा ५ वर्षांहून अधिक नसेल अशा कोणत्याही मुदतीकरिता जाहीर लिलावाने पट्टा देऊन किंवा अन्यथा, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस एकतर शेतामागून शेत याप्रमाणे किंवा लाग (गवतांचे पट्टे) देऊन व जिल्हाधिकारी ठरवील अशा वेळी पुढील अटींवर देता येईल :—

(एक) जमीन लागवडीखाली आणली जाता कामा नये ;

(दोन) अशा व्यक्तीस जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीने तो ठरवील अशी चराई फी आकारण्याचा हक्क असेल ;

(तीन) गावाच्या प्रत्येक रहिवाशास किंवा शेतकऱ्यास, खंड (दोन) अन्वये निश्चित केलेली फी दिल्यानंतर अशा जमिनीवर गुरे चारण्याची परवानगी देण्यात येईल ;

(चार) अशा व्यक्तीला अशा जमिनीवर उभ्या असलेल्या झाडांवर व वन उत्पादनावर कोणता अधिकार असणार नाही.

५. **अधिकार रद्द करणे.**—(१) नियम (४) अन्वये कोणत्याही व्यक्तीस प्रदान करण्यात आलेला अधिकार—

(एक) जर नियम (४) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही शर्तीचा त्यान्वये, त्या व्यक्तीने भंग केला, किंवा नियत तारखेस पट्टयाची रक्कम देण्यात कसूर केली ; किंवा

(दोन) त्या जमिनीवर गुरे चारविण्याऱ्या व्यक्तींपैकी बहुसंख्य व्यक्तींची तशी इच्छा असेल तर रद्द करण्यात येईल.

(२) (अधिकार) रद्द करण्यासंबंधीचा आदेश अशा आदेशाच्या तारखेनंतर येणाऱ्या १ जून पासून अमलात येईल.

६. **चराईच्या भाडेपट्ट्याबद्दल कोणतीही मागणी करण्यात आली नसेल त्यावेळी अनुसरावयाची कार्यपद्धती :—**

जर नियम ४ अन्वये जमीन घेण्याची मागणी कोणीही केली नसेल किंवा संबंधित गावातील बहुसंख्य लोकांनी जमिनीची चराईकरिता जरूरी नाही असे जाहीर केले असेल तर, तहसिलदारास ती जमीन मशागतीसाठी उपलब्ध असलेली जमीन असल्याची नोंद करण्याचा निदेश देता येईल.

७. **प्रत्यायोजन.**—जिल्हाधिकाऱ्यास, या नियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यास व तहसिलदारास प्रत्यायोजन करता येईल.

अनधिकृतपणे विनियोग केलेली झाडे वगैरे यांची किंमत वसूल करणे.

२७. जो कोणताही इसम, सरकारची मालमत्ता असलेले कोणतेही झाड किंवा त्याचा कोणताही भाग अनधिकृतपणे पाडील आणि त्याचा विनियोग करील, तो इसम त्याची किंमत देण्यास सरकारला जवाबदार राहील आणि ती किंमत त्यांच्याकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल आणि त्याशिवाय, त्याने जमिनीचा भोगवटा केल्याबद्दल किंवा अन्यथा, या अधिनियमाच्या उपबंधान्वये तो ज्या शास्तीस पात्र असेल अशा शास्तीस पात्र होईल ; आणि तरीही सरकारी मालमत्तेचा उक्त विनियोग केल्याबद्दल त्याच्याविरुद्ध कोणतीही फौजदारी कारवाई दाखल करता येईल.

लाकडे वगैरे तोडण्याचे व त्यांच्या पुरवठ्याचे नियमन.

२८. (१) जेव्हा कोणत्याही राखीव जंगलाच्या बाहेर असलेल्या कोणत्याही पडीत जमिनीवर कोणतीही झाडे असतील तेव्हा, कोणताही कर न भरता परंतु राज्य सरकारने केलेल्या नियमास[२२] अधीन राहून सामान्यपणे गावकऱ्यांना सरपण घेता येईल, आणि शेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांसाठी आवश्यक असतील अशी लाकडे घेता येतील.

टीप २२.—लाकूडतोड व लाकडाच्या पुरवठा इत्यादीचे नियमन यासंबंधीचे नियम.

शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ १५६७ (एफ) आर. दि. २८ मार्च १९७०.

१. **संक्षिप्त नांव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (लाकूड तोड व लाकडाचा पुरवठा इत्यादिचे नियमन) नियम, १९७० असे म्हणता येईल.

२. **पडीत जमिनीवर लाकडाच्या तोडीचे नियमन.**--(१) पोट-नियम (२) च्या उपबंधांना अधीन राहून कोणत्याही राखीव जंगलाबाहेरील कोणत्याही पडीत जमिनीत उभ्या असलेल्या झाडांपासून सर्व-साधारणपणे गावातील रहिवाश्यांना जळणासाठी आणि शेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांसाठी आवश्यक असेल असे लाकूड कोणताही कर न देता घेता येईल.

(२) उप-विभागीय अधिकाऱ्याच्या परवानगीखेरीज पोट-नियम (१) च्या प्रयोजनासाठी पुढील झाडे तोडता येणार नाहीत किंवा त्यांच्या फांद्या छाटता येणार नाहीत :---

(अ) सावलीसाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली झाडे ;

(ब) रस्त्याच्या बाजूची झाडे, राईतील झाडे आणि छावणीच्या जागेभोवतालची म्हणून जिल्हाधिकाऱ्याने घोषित केली असतील अशी झाडे ;

(क) साग, शिसवीचे लाकूड, चंदनाचे लाकूड, तिवस, खैर, हिरडा आणि आंबा ;

(ड) कोणताही जलप्रवाह, झरा किंवा तलाव यांच्या काठापासून तीस मीटर अंतराच्या आतील झाडे ;

(इ) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये जी झाडे तोडण्यास मनाई करण्यात आली आहेत ती झाडे ;

(फ) जिल्हाधिकारी, संबंधित वनसंरक्षकांशी विचारविनिमय करून वेळोवेळी अधिसूचित करील अशी इतर झाडे ;

(३) या नियमाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती तोडलेल्या किंवा छाटलेल्या लाकडाच्या मुल्याच्या दोन पटीपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या दंडास पात्र होईल.

३. **राखीव जंगलातील लाकडाच्या तोडीचे नियमन.**---(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ अन्वये राखीव जंगलासाठी वेगळ्या राखून ठेवलेल्या जमिनीत उभ्या असलेल्या झाडांच्या बाबतीत आवश्यक ती चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकारी घरघुती किंवा इतर प्रयोजनासाठी जळणाचे किंवा इमारती लाकूड तोडण्याच्या गावकऱ्यांच्या किंवा व्यक्तींच्या विवक्षित वर्गाच्या विद्यमान विशेषाधिकाराबद्दल खात्री करून घेईल व त्याची नोंद करील.

(२) जिल्हाधिकाऱ्यास पोट-नियम (१) अन्वये नोंद केलेल्या विशेषाधिकारांचा गावकऱ्यांना ज्यावेळी व ज्या रीतीने वापर करता येईल ती वेळ व ती रीत यासंबंधी वेळोवेळी ग्राम अधिकाऱ्यांना सूचना देता येतील, अशा सूचनांना गावात योग्य प्रसिद्धी देण्यात येईल.

(३) घरगुती किंवा इतर प्रयोजनासाठी सरपण किंवा लाकूड तोडण्यासंबंधीच्या गावकऱ्यांच्या किंवा इसमांच्या विवक्षित वर्गांच्या विशेषाधिकरास अधीन राहून, राखीव जंगलासाठी कलम २२ अन्वये जी जमीन वेगळी ठेवण्यात आली असेल त्या जमिनीत, आणि ज्या बाबतीत कोणत्याही दुमाला जमिनीच्या संबंधात असे विशेषाधिकार अस्तित्वात असतील अशा इतर सर्व बाबतीत, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमाद्वारे उक्त विशेषाधिकाऱ्यांच्या वापराचे नियमन करण्यात येईल. अशा कोणत्याही विशेषाधिकारांचा वापर करण्याची पद्धती किती वेळ यासंबंधीच्या विवादाच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निर्णय या अधिनियमाच्या उपबंधानुसार केवळ एकच अपील करता येईल या गोष्टीस अधीन राहून, अंतिम असेल.

**जमीन देण्याबाबत**

**२९.** (१) या अधिनियमान्वये, राज्याकडून जमीन धारण करणाऱ्या इसमांचे पुढील वर्ग असतील, म्हणजे--- **जमीन धारण करणाऱ्या इसमांचे वर्ग.**

**(अ) भोगवटादार---वर्ग १,**

**(ब) भोगवटादार---वर्ग २,**

**(क) सरकारी पट्टेदार.**

(२) भोगवटादार—वर्ग १ मध्ये पुढील इसमांचा समावेश होईल—

(अ) जे इसम, बिनदुमाला जमीन कायमची व हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील कोणत्याही निर्बंधावाचून धारण करीत असतील, असे इसम,

(ब) जे इसम, हा अधिनियम अंमलात येण्याच्या वेळी, तो अशा प्रकारे अंमलात येण्याच्या निकट-पूर्वी राज्याच्या कोणत्याही भागात जमीन महसुलाच्या संबंधात अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधानुसार हस्तांतरण करण्याच्या हक्कांवरील कोणत्याही निर्बंधावाचून, संपूर्ण भोगाधिकारान्वये किंवा भूमिस्वामी हक्कान्वये जमीन धारण करीत असतील असे इसम, आणि

(क) विदर्भातील जे स्थानिक क्षेत्र मध्यप्रदेश जमीन महसूल अधिनियम, १९५४ (१९५५ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक दोन याच्या कलम १५० अन्वये वगळण्यात आले नसेल अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्रात जे इसम भूमिधारी हक्कान्वये जमीन धारण करीत असतील आणि ज्यांना राज्य सरकारने या बाबतीत केलेल्या नियमांस अधीन राहून, यापुढे (अशा जमिनीच्या संबंधात द्यावयाच्या आकारणीच्या तीन पटीहून अधिक नसेल असा) नजराणा (प्रीमियम) दिल्यानंतर भोगवटादार वर्ग १ मध्ये समाविष्ट करून घेण्यास परवानगी देण्यात आली आहे असे इसम.

**टीप २३.**—विवक्षित भूमिधारकांचा भोगवटादार वर्ग १ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी नियम.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारकांचा भोगवटादार वर्ग १ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी) परवानगी देण्याबाबत नियम, १९६८ असे म्हणता येईल.

शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१५६७(एल) आर, दि. ३१ डिसेंबर १९६८ अन्वये दुरुस्त केलेली शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ १५६७(एल) आर, दि. १९ जानेवारी १९६८.

२. **विवक्षित भूमिधारकांचा भोगवटादार वर्ग १ मध्ये अंतर्भूत करण्यासाठी अर्ज.**—(१) राज्याच्या विदर्भ क्षेत्रात, भूमिधारी अधिकाराखाली जमीन धारण करणाऱ्या ज्या इसमाचे, कलम २९ याचे पोट-कलम (३) अन्वये भोगवटादार वर्ग २ मध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे (व वेळोवेळी सुधारण्यात आल्या-प्रमाणेची भूतपूर्व मध्य प्रदेश शासनाच्या, भूमि सुधार विभागाची दिनांक २२ मे १९५६ ची अधिसूचना क्रमांक ११११८/१८३२-५५-अठरा मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या नियमांच्या नियम ३ ते ९ अनुसार ज्यांना जमिनी वाटून देण्यात आल्या आहेत असे भूमिधारी नसणाऱ्या) आणि ज्याची उक्त कलमाच्या पोट-कलम (२), खंड (क) अन्वये भोगवटादार वर्ग १ मध्ये अंतर्भूत केला जाण्याची इच्छा आहे तो इसम, त्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याच्या नावे अर्ज करील. अर्जात पुढील तपशील निर्दिष्ट केलेला असेल :—

(अ) अर्जदाराचे नाव, वर्णन आणि राहण्याचे ठिकाण ;

(ब) ज्या गावात जमीन असेल ते गाव ;

(क) अलीकडील जमाबंदी किंवा गावाचे अधिकार अभिलेख यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ज्या जमिनीतील शेतांची संख्या, प्रत्येक शेताचे क्षेत्रफळ, जमिनीचा खंड व ती ज्या अधिकाराखाली धारण करण्यात आली तो अधिकार.

(२) अर्जासोबत, अलीकडील जमाबंदीतील किंवा जेथे जमीन असेल त्या गावाच्या अधिकार अभिलेखातील जमिनीसंबंधीच्या नोंदींची एक प्रत असेल.

३. **उद्घोषणा काढणे.**—जिल्हाधिकारी, अर्ज मिळाल्यावर, नमुना 'अ' मध्ये एक उद्घोषणा काढील व तीद्वारे, जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व इसमांस, ज्या बाबीसाठी अर्ज करण्यात आला असेल त्या बाबीविरुद्ध त्यांचे कोणतेही आक्षेप असल्यास, ते, लेखी सादर करण्याबद्दल फर्माविण्यात येईल. अशा उद्घोषणेची एक प्रत, तालुक्यांच्या मुख्य कार्यालयातील प्रमुख ठिकाणी तसेच जमीन ज्या गावात असेल त्या गावात लावण्यात येईल.

४. **अर्जाची सुनावणी.**—(१) सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेला किंवा ज्या तारखेपर्यंत सुनावणी तहकूब करण्यात येईल अशा इतर कोणत्याही तारखेला, जिल्हाधिकारी, अर्जदाराची आणि इतर हितसंबंधित पक्षकाराची (कोणताही असल्यास) आणि उपस्थित करण्यात आलेल्या पुराव्याची (कोणताही असल्यास) सुनावणी केल्यानंतर, त्यावरील आपले निष्कर्ष नमूद करील आणि अर्जदारास भोगवटादार वर्ग १ म्हणून घोषित केला जाण्याचा हक्क आहे असा जिल्हाधिकारी निर्णय घेईल तर, तो, त्याबाबतीत, प्रारंभिक आदेश नमूद करील आणि उक्त आदेशात, जमिनीसंबंधीच्या जमीन महसूलाची थकबाकी (कोणतीही असल्यास) नमूद करील व जमीन महसूलाची थकबाकी (कोणतीही असल्यास) आणि त्या त्या वेळी जमिनीवर आकारणी करण्यात आलेल्या जमीन महसुलाच्या तीन पटींइतकी, रक्कम, ठेव म्हणून ठेवण्याबद्दल अर्जदारास आदेश देईल, आणि जर जमीन सरकारी वनास लागून असेल तर, जिल्हाधिकारी, अधिनियमान्वये जमिनीचे सीमांकन करून घेण्याबद्दलसुद्धा अर्जदारास आदेश देईल.

(२) आदेशाची एक प्रत अर्जदाराला पाठविण्यात येईल.

५. **अर्जदारास भोगवटादार वर्ग १ म्हणून घोषित करणे.**—(१) आदेश कळविण्यात आल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, जर अर्जदार—

(अ) जमिनीसंबंधात देय असलेल्या आकारणीच्या तीन पटींइतकी रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी कोणतीही असल्यास, कोषागारात जमा करील आणि ती जमा करण्यात आल्याच्या पुष्टयर्थ कोषागार चलान सादर करील ; आणि

(ब) जमीन सरकारी वनास लागून असेल तर, तिचे सीमांकन करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करील ;

तर, जिल्हाधिकारी, येथे असलेल्या नमुना 'ब' मध्ये, अशा जमिनीच्या संबंधात भोगवटादार वर्ग १ मध्ये त्याचा अंतर्भाव करण्यास परवानगी देण्याबाबत अंतिम आदेश तयार करील.

(२) अर्जदार, पोट-नियम (१) च्या उपबंधांचे पालन करण्यात कसूर करील तर, त्याचा अर्ज, नाकारण्यात येईल ; आणि अर्जदारास त्याप्रमाणे कळविण्यात येईल.

६. **तहसिलदार आणि तलाठी यांना आदेशाची प्रत पाठविणे.**—नियम ५ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाची एक प्रत, संबंधित तहसिलदार आणि ज्या गावात जमीन असेल त्या गावचा तलाठी, याजकडे पाठविण्यात येईल आणि त्यानंतर, तलाठी, वाजवी मुदतीत, अधिनियमाच्या उपबंधानुसार, अधिकार, अभिलेखातील संबंधित नोंदीत, अशा काढण्यात आलेल्या आदेशानुरुप, बदल करील. आणि असे बदल करण्यात आल्याबद्दल तहसिलदारास कळवील.

---

७. **शक्ती प्रदान करणे.**—जिल्हाधिकाऱ्यास या नियमानुसार आपणास प्रदान करण्यात आलेल्या शक्ती उपविभागीय अधिकाऱ्यास प्रदान करता येतील.

## नमुना 'अ'

### उद्घोषणा

(नियम ३ पहा)

.................... समक्ष, .............. ठिकाणी श्री. .............. वडिलांचे नाव .................., .................... जिल्हा, ............ तालुका, ............... जमाबंदी क्रमांक, ............ गावाचा भोगवट दार वर्ग २ यांनी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळिसावा) याचे कलम २९, पोट-कलम (२), खंड (क) अन्वये ............ जिल्हा ........ तालुका .......... गावामधील ............. (क्षेत्रफळ नमूद करावे) भूमापन क्रमांक/खसारा क्रमांक ........ मध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीचा भोगवटादार वर्ग १ मध्ये आपला अंतर्भाव करण्यासाठीच्या परवानगीबद्दल अर्ज केला आहे. आणि अर्जाची सुनावणी दिनांक ............ १९ ..... रोजी ......... वाजता .................... ठिकाणी करण्याचे निश्चित केले आहे.

याद्वारे जाहीर करण्यात येते की, उक्त जमिनीत ज्यांचे हितसंबंध असतील किंवा ज्यांना, अशी परवानगी मंजूर करण्याविरुद्ध कोणतेही आक्षेप सादर करावयाचे असतील अशा सर्व इसमांस याद्वारे कळविण्यात येते की, एक तर त्यांनी स्वतः जातीने किंवा विधि व्यवसायी किंवा अभिकर्ता यांचेमार्फत उक्त तारखेस माझ्यासमोर उपस्थित रहावे आणि कोणतेही आक्षेप असल्यास, ते, त्यांनी, माझ्या विचारासाठी निवेदन करावेत.

माझ्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली.

दिनांक ................ १९ .

जिल्हाधिकाऱ्याची मुद्रा

जिल्हाधिकारी.

## नमुना 'ब'

### भोगवटादार वर्ग १ म्हणून घोषित करणे

(नियम ५ पहा)

मी, ...................... श्री. ................., वडिलांचे नाव ................., जिल्हा ............, तालुका ..................., साजा क्रमांक ................, जमाबंदी क्रमांक ............ गावचे भोगवटादार वर्ग २ यांचा, यासोबतच्या अनुसूचीत तपशीलवार दिलेल्या जमिनीच्या संबंधात, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळिसावा) याचे कलम २९, पोट-कलम (२), खंड (क) अन्वये, भोगवटादार वर्ग १ मध्ये समावेश करण्यास परवानगी देत आहे.

### अनुसूची

| जमिनीचा भूमापन क्रमांक खसरा क्रमांक (१) | ज्या अधिकाराखाली धारण केली असेल ते अधिकार (२) | क्षेत्रफळ (३) | विद्यमान महसूल (४) |
|---|---|---|---|
| | | | |

माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

दिनांक ............ १९ .

जिल्हाधिकारी.

मुद्रा

............. येथील तहसिलदार/तलाठी यांस प्रत अग्रेषित.

दिनांक ............. १९ .

जिल्हाधिकारी.

(३) भोगवटादार—वर्ग २ मध्ये पुढील इसमांचा समावेश होईल—

(अ) जे इसम, हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधास अधीन राहून, बिनदुमाला जमीन कायमची धारण करीत असतील असे इसम ;

(ब) हा अधिनियम अमलात येण्याच्या निकटपूर्वी—

(एक) जे इसम , विदर्भात , मध्यप्रदेश जमीन महसूल अधिनियम, १९५४ अन्वये हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधासह भूमिस्वामी हक्कान्वये, किंवा भूमिधारी हक्कान्वये जमीन धारण करीत असतील असे इसम ; आणि

(दोन) जे इसम, जमीन महसुलाच्या संबंधीच्या कोणत्याही इतर विधीअन्वये, हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधासह भोगवटयाच्या हक्कान्वये इतरत्र जमीन धारण करीत असतील असे इसम ; आणि

(क) जमीन महसुलासंबंधीच्या व या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये ज्या पट्टयान्वये कायम स्वरूपात किंवा ठराविक खंड देऊन नवीकरण करण्याच्या विकल्पासह पन्नास वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीसाठी, जमीन धारण करण्याचा हक्क प्राप्त झाला असेल अशा पट्टयान्वये ज्यांना या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी बिनदुमाला जमिनीतील हक्क देण्यात आले असतील, असे इसम ; आणि भोगवटादार वर्ग २ यांचे हक्क, दायित्वे व जबाबदाऱ्या या संबंधीचे या अधिनियमातील सर्व उपबंध, जणू ते या अधिनियमान्वये भोगवटादार वर्ग २ आहेत असे समजून, त्यांना लागू होतील.

**अधिनियमाच्या उपबंधान्वये मंजूर करण्यात आलेल्या बिनदुमाला जमिनीचा भोगवटा.**

३०. भोगवटयात नसलेली जी कोणतीही जमीन अन्य संक्रमित करण्यात आली नसेल अशी जमीन या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये कोणत्याही इसमास मंजूर करण्यात येईल त्याबाबतीत, अशा इसमास, मंजूरीच्या अटींनुसार, अशा जमिनीची भोगवटा करण्यास विना विलंब फर्मावणे हे तहसिलदाराचे कर्तव्य असेल.

**भोगवटयात नसलेली जमीन शर्तीवर देता येईल.**

३१. जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकार ह्याबाबत वेळोवेळी जे नियम करील अशा नियमांस[२४] अधीन राहून, कलम ३० अन्वये जमिनीवर प्रवेश करण्यात येण्यापूर्वी बिनदुमाला जमिनीची किंमत देण्यास फर्मावणे, किंवा ती लिलावाने विकणे आणि ती देण्याबाबतत अशा नियमाद्वारे विहित करण्यात येतील, अशा शर्ती जोडणे हे विधिसंमत असेल. अशा जमिनीबद्दल दिलेली किंमत (कोणतीही असल्यास) त्या जमिनीमधील सर्व झाडांवरील सरकारच्या हक्काच्या किंमतीचा समावेश होईल आणि ती किंमत जमीन महसुलीची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

टीप. २४—कृपया कलम ५१ खालील टीप ३७ पहा.

**सरकारकडे निहित असलेली मळईची जमीन देणे.**

३२. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये राज्य सरकारकडे निहित असलेली कोणतीही मळईची जमीन सार्वजनिक महसुलाच्या हितसंबंधाकडे योग्य लक्ष पुरवून निकालात काढण्यात यांवी असे जिल्हाधिकाऱ्यास वाटेल तेव्हा, त्यास, राज्य सरकार याबाबतीत करील अशा नियमास[२५] अधिन राहून अशी मळईची जमीन काठावर किंवा किनाऱ्यादर तयार झाली असेल त्या काठाच्या किंवा किनाऱ्याच्या भोगवटादारास (कोणताही असल्यास) देता येईल. अशा रीतीने देऊ केलेल्या जमिनीची किंमत, तिच्यावरील वार्षिक आकारणीच्या तीनपटींहून अधिक असता कामा नये.

(२) भोगवटदाराने जमिनीचा स्वीकार करण्याचे नाकारले तर जिल्हाधिकाऱ्यास त्या जमिनीच्या किंमतीबाबत कोणतेही निर्बंध न घालता तिची विल्हेवाट लावता येईल.

**स्पष्टीकरण**—कलम २, खंड (२४) मध्ये काहीही असले तरी, या कलमाच्या प्रयोजनाकरिता, काठ किंवा किनारा हा जर कबजासह गहाण ठेवण्यात आला असेल तर, गहाण ठेवणारा हा त्याचा भोगवटादार आहे असे समजले पाहिजे.

**टीप २५.**—मळईची जमीन व धौत जमीन या संबंधीचे नियम (कृपया धौत जमिनीकरिता कलम ६५ पहा).

शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१०६७-(सी)-आर, दिनांक २१ ऑगस्ट १९६७.

१. **संक्षिप्त नाव :** ह्या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (मळईची जमीन व धौत जमीन) नियम १९६७ असे म्हणावे.

२. **गाळामुळे व धुपीमुळे होणारी वाढ किंवा घट सुनिश्चित करून त्याची नोंद करणे व त्या प्रमाणे तहसिलदारास कळविणे यासंबंधी तलाठ्याची कर्तव्ये**--(१) गाळामुळे होणारी व धुपीमुळे होणारी घट यासारख्या बदलांस अधीन असलेल्या प्रत्येक धारण जमिनीत गाळामुळे होणारी वाढ व धुपीमुळे होणारी घट सुनिश्चित करून त्याविषयी तहसिलदारास कळविणे व त्यांची नोंद करणे हे प्रत्येक तलाठ्याचे कर्तव्य असेल.

(२) कोणत्याही मळईच्या जमिनीचे किंवा नव्याने तयार झालेल्या बेटाचे किंवा सोडून दिलेल्या कोणत्याही नदीच्या पात्राचे किंवा धुपीमुळे घट झालेल्या कोणत्याही जमिनीचे क्षेत्र, कलमे ३३, ६५ व ६६ यांमध्ये विहित केलेल्या मर्यादेहून अधिक असेल त्या बाबतीत, तलाठ्याने धारण जमिनीच्या क्षेत्रातील अशी वाढ किंवा घट यासंबंधीसुद्धा तहसिलदारास कळविले पाहिजे व त्या संबंधात तहसिलदाराने दिलेल्या आदेशानुसार वागले पाहिजे.

३. **स्थानांतरणीय हद्दीच्या जमिनीच्या धारकास अशा हद्दीपर्यंत जमीन धारण करता येईल.**—धारण जमीन कोणत्याही बाजूला नदी, खाडी, किंवा नाला यांच्या तीरामुळे किंवा समुद्राच्या किनाऱ्यामुळे सीमाबद्ध असेल तेव्हा जमीनधारकास कलमे ३२, ३३, ६५ व ६६ यांमध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधास अधीन राहून अशा जमिनीची स्थिती वेळोवेळी बदलत असली तरीही, अशा तीरापर्यंत किंवा किनाऱ्यापर्यंत अशी जमीन धारण करता येईल व तिचा वापर करता येईल.

४. **मळईच्या जमिनीची विल्हेवाट.**—(१)कोणत्याही तीरावर किंवा किनाऱ्यावर तयार झालेली गाळाची जमीन एक एकराहून अधिक असेल तेव्हा जिल्हाधिकारी कलम ३२ पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेल्या रितीने तिची विल्हेवाट लावील.

(२) अशा तीराचा किंवा किनाऱ्याचा भोगवटादार, जिल्हाधिकाऱ्याने देऊ केलेली जमीन स्वीकारीत नसेल व मळईची जमीन कोणत्याही सार्वजनिक किंवा सरकारी प्रयोजनार्थ आवश्यक नसेल तर, ती सार्वजनिक लिलावाद्वारे सर्वात अधिक बोली करणाऱ्यास विकण्यास येईल.

५. **धुपीमुळे गेलेल्या जमिनीवरील आकारणीत कपात.**—(१) एखाद्या भू-मापन क्रमांकातील जमिनीचा अर्ध्या एकराहून कमी नसेल असा कोणताही भाग धुपीमुळे गेला असेल तर, तिच्या धारकास आकारणीत प्रमाणशीर कपात करून घेण्याचा हक्क असेल. भू-मापन क्रमांकाचे एकूण क्षेत्रफळ, त्याची आकारणी व धूपीमुळे गेलेले क्षेत्र या गोष्टी विचारात घेऊन अशा रितीने कपात करावयाच्या आकारणीची रक्कम ठरविणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) धुपीमुळे गेलेल्या ज्या जमिनीच्या संबंधात पोट-नियम (१) अन्वये आकारणीत कपात करण्यात आली असेल ती जमीन पुन्हा प्रकट झाल्यावर, तिचे क्षेत्रफळ अर्ध्या एकराहून अधिक होत असेल तर, जमीन धारक जिल्हाधिकाऱ्याकडून त्याचप्रमाणे ठरविण्यात येईल अशी प्रमाणशीर आकारणी देण्यास पात्र होईल.

लहान मळई जमिनीबाबत तात्पुरते हक्क.

**३३.** कोणत्याही काठावर किंवा किनाऱ्यावर मळईची जमीन तयार होईल तेव्हा, अशा **काठाचा** किंवा किनाऱ्याचा कोणताही भोगवटादार असल्यास त्यास, अशा जमिनीचे क्षेत्रफळ एक एकराहून अधिक नसेल तर व तोपर्यंत तिचा तात्पुरता उपयोग करण्याचा हक्क असेल. **मळईच्या जमिनीचे क्षेत्रफळ एका एकरापेक्षा अधिक होईल तेव्हा ती, कलम ३२ च्या उपबंधांस अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन राहील.**

३४. (१) जर एखादा भोगवटादार मृत्युपत्र न करता मरण पावला असेल आणि त्याचे वारसदार माहीत नसतील तर, जिल्हाधिकाऱ्याने त्याच्या भोगाधिकाराचा कबजा घेतला पाहिजे आणि त्यास तो एका वेळी एका वर्षाच्या मुदतीकरिता पट्टयाने देता येईल. मृत्युपत्ररहित भोगाधिकारांची विल्हेवाट लावणे.

(२) जिल्हाधिकाऱ्याने ज्या तारखेस भोगाधिकाराचा कबजा घेतला असेल त्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत, भोगाधिकार आपणास परत देण्यात यावा म्हणून कोणत्याही हक्कदाराने अर्ज केल्यास, जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, भोगाधिकाराचा कबजा हक्कदारास देता येईल किंवा त्याचा हक्क नाकारता येईल.

(३) जिल्हाधिकाऱ्याने पोट-कलम (२) अन्वये दिलेला आदेश हा अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असणार नाही परंतु पोट-कलम (२) अन्वये ज्याचा हक्क नाकारण्यात आला असेल अशा कोणत्याही इसमास, जिल्हाधिकाऱ्याचा आदेश त्यास ज्या तारखेस कळविण्यात आला असेल त्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, आपला हक्क शाबीत करण्यासाठी दावा दाखल करता येईल, आणि जर असा दावा दाखल करण्यात आला तर, अशा दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत, जिल्हाधिकाऱ्याने पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ती जमीन पट्टयाने देणे चालू ठेवले पाहिजे.

(४) जिल्हाधिकाऱ्याने ज्या तारखेस भोगाधिकाराचा कबजा घेतला असेल त्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत कोणताही हक्कदार उपस्थित झाला नाही तर, किंवा पोट-कलम (२) अन्वये ज्याचा हक्क नाकारण्यात आला आहे अशा हक्कदाराने, जर पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे एक वर्षाच्या आत दावा दाखल केला नाही तर, जिल्हाधिकाऱ्यास, मरण पावलेल्या भोगवटादाराचा भोगाधिकारामधील हक्क लिलावाने विकता येईल.

(५) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी या कलमाच्या उपबंधांनुसार ज्या भोगाधिकाराची व्यवस्था लावण्यात आली असेल त्या भोगाधिकारासंबंधी ज्या हक्कदाराने आपला हक्क प्रस्थापित केला असेल अशा हक्कदारास पोट-कलम (१) अन्वये द्यावयाचा खंड आणि पोट-कलम (४) अन्वये वसूल झालेली विक्रीची रक्कम यातून जमीन महसूल आणि व्यवस्थेचा व विक्रीचा खर्च म्हणून अशा भोगाधिकारावरील येणे असलेल्या सर्व रकमा वजा करून फक्त शिल्लक राहणारी बाकी मिळण्याचा हक्क असेल.

३५. (१) जर भूमापन क्रमांकाचा कोणताही पोट-विभाग कलम ५५ अन्वये सोडून देण्यात आला असेल तर भू-मापन क्रमांकाचा असा पोट-विभाग हा, सरकारी पडित जमीन आहे असे समजण्यात येईल, आणि जिल्हाधिकाऱ्याने, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने त्याची विल्हेवाट लावली पाहिजे. सोडून दिलेल्या किंवा जप्त केलेल्या पोट-विभागांची विल्हेवाट.

(२) मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व ते एकत्रित करण्याबाबत अधिनियम, १९४७ (१९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७) याच्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने असा पोट-विभाग, त्याच भू-मापन क्रमांकाच्या इतर पोट-विभागाच्या भोगवटादाराना, त्यास स्वविवेकानुसार योग्य वाटेल त्या क्रमांनुसार, त्यास योग्य वाटेल त्या किमतीस परंतु त्याच्या आकारणीच्या चोवीस पटीपेक्षा अधिक नसेल अशा किंमतीस दिला पाहिजे ; तथापि, ज्यास जमीन दिलेली असेल त्या इसमाने धारण केलेली एकूण जमीन ही राज्यामध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये त्याबाबतीत निश्चित केलेल्या जमीनधारणेच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये. अशा सर्व भोगवटादारानी असा पोट-विभाग घेण्याचे नाकारण्याच्या प्रसंगी राज्य सरकारने त्याबाबतीत केलेल्या नियमांस[२६] अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने, त्या पोट-विभागाची कलम ३१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने विल्हेवाट लावली पाहिजे.

टीप-२६.—कलम ५१ खालील टीप ३७ पहावी. (नियम १८ व १७ पहा.)

(३) जमीन महसूल देण्यात कसुरी केल्याबद्दल जर भू-मापन क्रमांकाचा कोणताही पोट-विभाग जप्त करण्यात येईल तर जिल्हाधिकारी पोट-विभागाचा कब्जा घेईल आणि त्यास, उक्त पोट-विभागाच्या पूर्वीच्या भोगवटादारास किंवा त्याच भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागांच्या इतर भोगवटादारास किंवा इतर कोणत्याही इसमास, एकावेळी एक वर्षासाठी, असा पोट-विभाग पट्टयाने देता येईल ; तथापि, अशा धारकाने धारण केलेली एकूण जमीन पोट-कलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या जमीनधारणेच्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक होता कामा नये.

(४) पोट-कलम (३) अन्वये जिल्हाधिकारी ज्या तारखेस पोट-विभागाचा कब्जा घेईल त्या तारखे-पासून ३ वर्षांचे आत, उक्त पोट-विभागाचा पूर्वीचा खातेदार त्या पोट-विभागाच्या भोगवटयाचे अधिकार परत मिळण्यासाठी अर्ज करील तर, जिल्हाधिकाऱ्यास, भोगवटादाराने जमीन महसुलाची थकबाकी आणि आकारणीच्या तीन पटीच्या बरोबरीची रक्कम शास्ती म्हणून दिल्यानंतर, उक्त पोट-विभाग भोगवटादारास परत देता येईल. जर भोगवटादाराने उपरोक्त मुदतीत, उक्त पोट-विभागाचा भोगवटयाचा अधिकार स्वतःकडे परत मिळविला नसेल तर जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त पोट-विभागाची पोट-कलम (२) अन्वये तरतूद केलेल्या रीतीने, विल्हेवाट लावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—कलम २, खंड (२३) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या कलमाच्या प्रयोजनां-करिता, कोणतेही इतर पोट-विभाग हे जर कब्जासह गहाण ठेवण्यात आले असतील तर, गहाण ठेवणारे हे त्यांचे भोगवटादार आहेत असे समजले पाहिजे.

**विवक्षित निर्बंधास अधीन राहून भोगाधिकार हस्तांतरणीय व वंशपरंपरागत असणे.**

३६. (१) भोगाधिकार हा, कलम ७२ मधील उपबंधांस, आणि सत्ताप्रकारास वैधरीत्या लागू असलेल्या कोणत्याही शर्तीस अधीन राहून, आणि विधीअन्वये अन्यथा जी कोणतीही तरतूद करण्यात आली असेल ती खेरीजकरून, वंशपरंपरागत आणि हस्तांतरणीय मालमत्ता आहे असे मानण्यात येईल.

(२) पूर्ववर्ती पोट-कलमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य सरकार, भोगवटादारांची जातीने जमीन कसण्याची योग्यता किंवा कोणत्याही इतर संबंधीत गोष्टी विचारात घेऊन, राजपत्रातील अधि-सूचनेद्वारे, या कलमाच्या प्रयोजनाकरिता, सबंध राज्याकरिता किंवा त्याच्या कोणत्याही भागाकरिता ज्या अनुसूचित जमाती म्हणून जाहीर करील[२७] अशा अनुसूचित जमातींच्या इसमांचे भोगाधिकार जिल्हाधिकाऱ्याची आगाऊ मंजुरी घेतल्याखेरीज, हस्तांतरित करता येणार नाहीत.

**टीप २७.**—शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-१५६७-आर, दिनांक ५ जून १९६८ अन्वये शासनाने, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ३६, पोट-कलम (२) याच्या प्रयोजनासाठी यासोबतच्या परिशिष्टाच्या स्तंभ ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, अनुसूचित जमाती (जमाती किंवा जनजातीसमूह, जमातींचा भाग किंवा अशा जमाती, जनजाति समूह यामधील गट म्हणून) अनुसूचीचे स्तंभ ३ व २ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेले तालुके व जिल्हे यांमधील, त्याचा स्तंभ ४ यामध्यें त्यांच्या समोर विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांसाठी घोषित केल्या आहेत (परिशिष्ट २७ पहा.)

## अनुसूची

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | एक. मुंबई विभाग | |
| १ | ठाणे | ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके. | ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके | वर्ली, वावचा, भिल्ल, धोडिआ, दुबळा, गामिड, गोंड, काठोडी, कोकणा, कोळी, ढोर, कोळी-महादेव, कोळीमल्हार नाईकडा, पारधी, पटेलीया, राठवा, वारली. |
| २ | ठाणे | डहाणू व तळासरी हे तालुके सोडून ठाणे जिल्ह्यातील इतर सर्व तालुके. | डहाणू व तळासरी हे तालुके सोडून ठाणे जिल्ह्यातील इतर सर्व तालुके. | ठाकूर. |
| ३ | कुलाबा | अलिबाग | अवेटी, कोलघर, तळशेट, शिरगांव, उमाटे व महण ही गांवे | कातकरी. |
| ४ | कुलाबा | रोहे | पळस, वसगांव, चिकणी, रेवोली मांडवशेड, सुकेळी, वावेपोटगे, शेणवई, महाळुंगे, खारगाव, उसर, कोरवण, बिरवाडी, खाम्हेरे, वोहडघर, खंधार, धातव किल्ले, निवी, ताम्हणशेत, घोसाळे, मुकटे, मुचाने, खांब, तळवली तर्फ, अष्टमी, माधली बुद्रुक, पुगाव, आंबिवली, कोलाड, दुर्तोळी, पाले खुर्द, चिचवली तर्फ, दिवली, पाथरशेत, नंदाप, पहूर आणि सुडकोली ही गावे. | कातकरी. |
| ५ | कुलाबा | पनवेल | मालडुंगी, वेहेगाव, आंबे तर्फ वाजे, देहेरंग, गधे, शिवणसई, तामसाई, वाजापूर, चेखली, कोंडप, करंबेळी तर्फ तलोजे, वांगणी तर्फ तलोजे धामणी व करंबेळी तर्फ वाजे ही गावे. | ठाकूर. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **एक. मुंबई विभाग—चालू** | |
| ६ | कुलाबा | उरण | रानसई गाव | कातकरी. |
| ७ | कुलाबा | सुधागड | अडुळसे, आंबिवली, आंबोले, आपटवणे, आतोणे, [illegible], वलाप, भारजे, भेलीव, चंदरगांव, चिखलगांव, चिवे, दहीगा[illegible], दापोडे, धोकशेत, धोंडीवली, धोंडसे, घेरासरसघर, घेरासुधागड गोटवडे, गोमाशी, कन्हिवली, कळंब, करंजघर, हेडवली, कारचुंडे, कवले, खडसांबळे, खांडपोली, खांडसई, खवली, कुंभारघर, कुंभारशेत, मधाळी, महागाव, माणगांव बुद्रुक, माणगांव खुर्द, मुळशी, नाडसूर, नागाव, नाकशेत, नांदगांव, नानोसे, नवघर, नेणवली, नेरे, पाच्छापूर, पडघवली, पडसरे, परळी, पेडळी, पोटलज बुद्रुक, पुई, रावगाव, रासळ, शिलोशी, सिद्धेश्वर बुद्रुक, सिद्धेश्वर खुर्द, ताडगाव, तिवरे, उद्धर, उन्हेरे बुद्रुक, उसर, वऱ्हाड जांभूळ पाडा, वाफेवर, वाघोशी, वांद्रोशी, वावे तर्फ आसरे, वाविळोली आणि झाप ही गावे. | कातकरी. |
| ८ | कुलावा | खालापूर | सोंदेवाडी, तळेगांव, पनशील किरे, मजगांव तळवली, धरणी, निगडोली, नवथे, डोलवली, मडप, खरसुंडी, कुंभिवली, पर खंड, धामणी, वावोशी, होराळे, तांबटी, नि[illegible]न, वडखळ, नारंगी, नंदनपाडा, गोहे, गोध्रवली, खानाव, खरवली, शेडवली, टाकई, कतरंग, मंदाड, सोंडावाडी, विचारेवाडी, होनाड, आडीशी, चावणी, तुकसई व दारशेत ही गावे. | कातकरी, ठाकूर, डोंगरकोळी. |
| ९ | कुलाबा | कर्जत | ओलमण, चाई, वलिवरें, चावणे हाले, सलोख तर्फ वरेडी, कुरुंग नोंदगांव, खांडस, पाथरज, सुगावे, बोरीवली, किकवी, कशेळे, पिंगळस, राजाशे, आंबिवली तर्फ खलाटी, जांबरुंग, मोगरज व धामणी ही गावे. | कातकरी, कोळीमहादेव, ठाकूर. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | कुलाबा .. | पेण .. .. | अधरणे, आपई, बाकेघर, वेलवडे बुद्रुक, वेलवडे खुर्द, चिंचघर, दवनसर, धोटे, जिर्णे कोलाड, करोवी, कार्ली, कोंडी, कोंढवी, कोंधिवली, कुहिरे, कुर्नाड, लाडिवली, मोहिली इनाम, निधवली, निफाड; निगडे, पावळ, पाडळे, पानेड, पिंपळगांव, रामराज, रोडे, सालिडे, सापोली, शेणे, शिहू, तळवली, उसर, वडगाव, विराणी, वकरुळ, वरप, वरवणे व शेडशी ही गावे. | कातकरी, ठाकूर, का. ठाकूर मा. ठाकूर सोन, कायोडी, ढोर कातकरी. |
| ११ | रत्नागिरी .. | मंडणगड, दापोली, खेड व चिपळूण. | मंडणगड-दापोली, खेड व चिपळूण यांच्या नगरपालिका मर्यादा सोडून खेड व चिपळूण तालुके | काठोडी. |
| १२ | जळगांव .. | रावेर, यावल व चोपडा .. | रावेर तालुक्यातील अंधारमाळी, गरबारडी, महामंडळी, लालमाती, जुनी महामंडळी, निमड्या सहस्त्रलिंग, तिडया व पिंपरकुंड ही गावे यावल तालुक्यातील, गंडऱ्या, हरीपुरा, जामन्या, उरमाली मोहमंडली (डी) व वाघेरा ही गावे, चोपडा तालुक्यातील, सत्रसेन, मराठा, मोरचिडा, कृष्णपुरी, उनारती वैजापूर, कारजणे, मुळ्यांतर, खर्म-पदाव, बोरजांती, चोपडा तालुक्यांतील, मेळापूर, मेलन, बुरमाळी देवझरी, देओवरी, विणूपूर व कुड्यापणी ही गावे. | पावरा तडवी. |
| १३ | धुळे .. | अक्कलकुवा, अक्राणी, साक्री, नंदुरबार, नवापूर, शहादा शिरपूर व तळोदा. | संपूर्ण अक्कलकुवा तालुका, संपूर्ण अक्राणी तालुका. साक्री तालुक्यातील उमरपाटी गाव नंदुरबार तालुक्यातील भोणे, धानोरा (कसबे) धिरस-गांव, जळखे, खैराळे, कोठली खुर्द, नागसर, नांदरखे, ओझरदे, पिंपळोद, रनाळे, ठाणेपाडा, उमरदे बुद्रुक, वेळावद, विरचक, वाघाळे, वासदरे, शिरवाडे, अडींतारा, भांगडे, खैरवे खुर्द, तर्फ धानोरे, कोठडे, मंगरूळ, पावले, शेगवे, उमज, वडजाखन, व वसलाई गावे. नवापूर तालुक्यातील आमलण, बारी, बिलमांजरे, बोकळझर, बोरझर, चौकी, दापूर; धायटे, धनराट, गडत, घोडजामणे, कामाद, करंजी बुद्रुक, करंजी खुर्द, खकडे, खोकरवाडे, खोकसे, कोरेघाट, कोटखांब, कुकराण, मोर-करंजवे, नागझिरी, नांदवण, पांगराण, पाटीबेडकी, पाथर विहिर, रायपूर, सावरट, शेतगाव, मुळी, वडकळंबी, आमनझर, भादवड बुद्रुक, विजगांव, बोरचक, चितवी, चोरविहिर, देवळीपाडा, ढोंग, कडवाण, केळी, खडकी, खांडबारे, खोलघर, खोलविहिर, महालकडू, मळवान, मोग्राणी, नावली, निंबोणी खुर्द तर्फ भादवड, निमदर्डे, पळशी, पिंपळे, साळवण, श्रावणी, सिरवडे व बंधारपाडा ही गावे. | भिल्ल, पावरा, धनका, गामिड, कोकणा, कोकणी, नाईकडा पारधी, बरडा, चोधरी, धोडिआ, दुबळा, गोंड काठोडी, कोळीढोर पटेलिया पोमला राठवा, वारली विटेलिया, पडवी, तडवी, वसावा. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **एक. मुंबई विभाग—चालू** | |
| | | | शहादा तालुक्यातील काटघर, आकसपूर, भुते, टवलाई, गणोर, तिळवी, चिरडे, विरपूर, दरा, श्रीखेड व विलाडी ही गावे. शिरपूर तालुक्यातील पळासनेर, सांगवी, फत्तेपूर, हाडाखेड, बोराडी, आंबे, खंबाळे, रोहिणी, वडळे, भोईटी, हातेड, बुडकी व खामखेडे गावे. तळोदे तालुक्यातील अमदपाडा, बन, बंधारा, चौगाव बुद्रुक, धनपूर, ढेकाटी एकधड, गाढवली, ईच्छागव्हाण, जुवानी, खर्डी खुर्द, खुशगव्हाण कुंडवे, लाखापूर, पाडडी, राणीपूर, रापापूर, रतनपाडा, रेटपाडा, सावर, सोजबारा, सोमवळ खुर्द, उमरकुवा, वाल्हेरी, खर्डी बुद्रुक, माळखुर्द, सिंगमपूर व लक्कुडकोट ही गावे. | |
| १४ | नाशिक .. | पेठ .. .. | संपूर्ण पेठ तालुका .. .. .. .. | भिल्ल कोकणी, वारली कायोडी, कातकरी, कोळी महादेव, किंवा डोंगरकोळी. |
| १५ | नाशिक .. | सुरगाणा .. . | संपूर्ण सुरगाणा तालुका .. .. .. .. | भिल्ल, कोकणी, वारली काठोडी, कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगर कोळी. |
| १६ | नाशिक .. | इगतपुरी .. .. | इगतपुरी तालुक्यातील तळेगाव, त्रिंगलवाडी अवळखेड, चिंचोळे, खैरे, पारदेवी, खंबाळे, वाकी, पिंपरी सद्रोद्दीन, तलोघ, तळोशी, मानवेडे बावळी, भावली खुर्द, काळुस्ते, निरपूर, कांचनगांव, शेनवड बुद्रुक, | भिल्ल, कोकणी, वारली ठाकूर, काथोड, कातकरी कोळी किंवा डोंगरकोळी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | भरवज, आंबेवाडी, कुरुंगवाडी, खडकदे, इन्दोरे, मांजरगांव, गवांडे, जामुंडे, बालविहिर, अडवण, कुर्णोली, धारोनोली, पिंपळगांव भटाटा, कोरपगांव, बिटुर्ली, भावली बुद्रुक, टाके हर्षे, [illegible]वली हर्षे, धंडोशे, मेटचंद्राची, मेट-हुंब्राची, मेटघेल्याची, पहिणे भिलमाळ, खरोली, कुशेगाव, सामुंडी, झारवड, अव्हाटे, देवेगांव, अ[illegible]वड, दापुरे, नागोसली, म्हसुर्ली, अहुर्ली, अवळी, सातुर्ली, ओंडली, झा[illegible]वड बद्रुक, वावी-हर्षे, धारगांव व टाके देवगांव. | |
| १७ | नाशिक | नाशिक | .. .. | नाशिक तालुक्यातील अंबई आंबोली, अंजनेरी, बेझे, ब्राम्हणवाडे, चाकोरे, दाभडगांव, दरी, देवरगांव, घुमोडी, धोंडेगांव, दुडगाव, दहेगाव, गंगाम्हाळुंगी, गणेशगाव-त्रिंबक, गोवर्धन, गणेशगांव नाशिक, गिरनारे, हपवाडी, हिर्डी, जातेगांव, काचुर्ली, काळुसने, खरवळ, कोणे, लाडची, मानोली, माळेगांव, मेटघर किल्ला, मेटकावरा, मुळेगांव, नागलवाडी, नाईकवाडी, नसलगांव, नांदगांव, ओझरखेडे, पिंपळद त्रिंबक, पिंपळद नासिक, पिंपरी त्रिंबक, पेगलवाडी (नाशिक), गणेशगांव (वाघरा) पिंपळगांव (जो), रोहिले, राजेवाडी, राजुरबहुला, सावरगांव, साडगाव, शिवणगांव, सापगाव, साप्ते, शिरसगांव, सारूळे, तळेगाव, तोरंगण तळवाडे, वेळे, वाघेरा, वरसविहिर, वेळुंजे व वाढोली ही गावे. | भिल्ल, कोकणी वारली, कायोडी कातकरी, कोळी महादेव, किंवा डोंगरकोळी. |
| १८ | नाशिक .. | दिंडोरी | .. .. | दिंडोरी तालुक्यातील अहिवतवाडी, अंबाड, अंबानेर, अवेगाव, भनवड, भातोडे, चांचडगांव, चामदरी, चंडीकापूर, चारोसे, चौसाळे, दहिवी, डेहेरे, डेहेरेवाडी, देवघर, देवसाने, देवठाण, धागुर, धाऊर, एकलहरे, गांडोळे, गोलदरी, गोळशी, हास्ते, आलखेड, जिरवाडे, जोरण, करंजाळी करंजखेड, कोडासर, कोचरगांव, कोकणगांव बुद्रुक, कोकणगांव खुर्द, कोशिंबे, कोल्हेरे महाजे, माळेदुमाला, मालेगांव [illegible]ंडाणे, मोखनळ, मुळाणे, नाळेगाव, नळवाडी, ननाशी, निगडोल, [illegible]शे, पळसविहिर, पाणदरे, फोफशी, पिंपळगाव धूम, पिंप्रज, पिंपर[illegible]ड, पिंप्री अंचला, पिंगळवाडी, पोफळवाडी, पुणेगांव, [illegible]सेगांव, राव[illegible]गांव, सादराळे, संगमनेर सारसाळे, टिटोली, टिटवे, उंबराळे बुद्रुक, उंबराळे खुर्द, वनारे, वाघाड वाघळुद, वणी बुद्रुक, वांजोळे, वारे व निळवंडी ही गावे. | भिल्ल, कोकणी, वारली, कायोडी कातकरी, कोळी महादेव, किंवा डोंगरकोळी. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | एक. मुंबई विभाग—चालू | |
| १९ | नाशिक .. | कळवण .. .. | कळवण तालुक्यातील अभोणे, कुंडाणेकनाशी, वंजारी, मोहदरी, नांदुरी, दरेगाव वणी, सप्तशृंगगड, प्रिंपोपाळे, पिंपरी मारकंडा, साकोरे, आठांबे, गोबापूर, सददविहिर, कातळगांव, ओझर, अंबुर्डी खुर्द, अबुर्डी बुद्रुक, जामशेत, चिचोरे, मोहमुख, बोरदेवत, चणकापूर भागुर्डी, तिऱ्हळ खुर्द, तिरहळ बुद्रुक, सारळे दिगर, भिलवाडी, इमाळेवणी देवळी वणी, कळमथे, असोली, दह्याने पाळे, विठेवाडी पाळे, सावकी पाळे, देसगांव, पळसदरे, खिरड, सुकापूर, देवळी कराड, लिगामे, अमदर, वडाळे हतगड, कनाशी, जयपूर, गोलाखाल, करमळ, खडकवण, उंबरपाडा करंभेळ, कनाशी, वरखेडे, दळवट, शिंगासी, वेरूळे, कोसुर्डे भाकुर्डे, करभेळ हतगड, जमिळे हतगड, विरशेत, कुसमाडी जिरवाडे हतगड, टटानी, शृंगारखाडी, बाबखेडे, दरेगाव हतगड, घानोली, भांडाणे हतगड, जयदर, खडकी, लाखाणी, सुळे, भुताणे दिगर, सुपळे दिगर, उंबरदे, काथरे दिगर, कोसवण, खरडे दिगर, मोकभांगी, काकाणे, खेडगांव, रावळजी, देसराणे, नाळोद, इंशी, धानेर, दरेभणगी, पिंपळे खुर्द, पिंपळे बुद्रुक, माळेगाव खुर्द, माळेगाव बुद्रुक, मोहबारी, टाकवारी, घर्डे दिगर, भांडने पिंपळे, दह्याने दिगर, गणोरे, शेरी दिगर, नारुळ, मेहदर, मुळाणे वणी, कान्हेरवाडी, हिंगवे, गोसारीणे, बर्डे, बेलबारे, जामळे-वाळे, ढेकाळे, बाळापूर व वडाळे वणी ही गावे. | भिल्ल, कोकणी, वारली, काथोडी कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगरकोळी. |
| २० | नाशिक .. | बागलाण .. .. | बागलाण तालुक्यांतील शेवरे, जाखोड नवकोल, देवठाण, बाभुळणे बोरदैवत, भीमशेत, गोळवाड, जाड, मानूर, अजंदे, साल्हेर, वाघंबे, अलियाबाद, अंबापूर, हातनुर, जयतापूर, माळीवाडे, मोहलांगी, बोराटे, विसापूर, खरड, वर्डेदिगर, जामोटी, रावेर, भिलवाड, वडखाल | भिल्ल, कोकणी, वारली, काथोडी कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगरकोळी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तुंगण दिगर, कातरवेल, टटाणी, साळवण, साकोडे, केळझर, दहिंदुले, भुंघाटे, करंजखेड, खेड, वाडे पिसोरे, पायवे, मोरकुटे, मळगांव खुर्द, काटगव्हाण, भिलदर, वाडि चौल्हेर, किकवारी बुद्रुक, किकवारी खुर्द भावडे, तळवाडे दिगर, जोरण, विचुरे, डांगसोदाणे, केरसाणे, मुल्हेर, दसाने व सरबर ही गावे. | |
| | | | | **दोन. पुणे विभाग** | |
| २१ | अहमदनगर .. | अकोला, राहुरी, संगमनेर | संपूर्ण अकोला, राहुरी व संगमनेर तालुके .. .. .. | कोळी-महादेव, डोंगरकोळी, ठाकर किंवा ठाकूर तसेंच का-ठाकूर, का-ठाकर, मा-ठाकर, व मा-ठाकर. |
| २२ | पुणे .. | आंबेगांव, जुन्नर, खेड मावळ, मुळशी व वेल्हे. | संपूर्ण आंबेगांव, जुन्नर खेड, मावळ, मुळशी व वेल्हे तालुके .. | कोळी-महादेव, डोंगर-कोळी. |
| २३ | पुणे .. | आंबेगाव, जुन्नर खेड व मावळ. | संपूर्ण आंबेगाव, जुन्नर, खड व मावळ तालुके .. .. | ठाकूर किंवा ठाकर, तसेंच का-ठाकूर, का-ठाकर, मा. ठाकूर मा. ठाकर. |
| | | | **तीन. नागपूर विभाग** | |
| २४ | चांदा .. | गडचिरोली आणि सिरोंचा | चांदा जिल्ह्यातील गडचिरोली व सिरोंचा तालुक्याच्या खालील भूतपूर्व जमीनदारीचा अंतर्भाव असलेले क्षेत्र : चांद्राळा, धानोरा, दुधमाळा, गेवर्धा, गिरगाव, झाडापापडा, खुटगाव कोटगुल, मुरूमगाव, पायमुरांडा, पळसगड, पोटेगाव, रांगी, सुरसुंडी सोनसरी अहेरी | गोंड, राजगोंड व मरिआ. |
| २५ | चांदा .. | गडचिरोली .. .. | नगरपालिका क्षेत्र वगळून संपूर्ण गडचिरोली तालुका .. .. | गोंड व राजगोंड |
| २६ | अमरावती .. | मेलघाट .. .. | नगरपालिका क्षेत्र वगळून संपूर्ण मेळघाट तालुका .. .. | कोरकू, गोंड, भिल्ल, परधान, मोघ्या, गोंड-गोवरी. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | **चार. औरंगाबाद विभाग** | |
| २७ | औरंगाबाद | गंगापूर | आसेगाव, जंभाळा तुर्काबाद, वाहेगांव, व गंगापूर ही गावे | भिल्ल. |
| | | कन्नड | विठ्ठलपूर, फालसी बुजुर्ग, सावांगा, बाकोड, करंजखेडा, वडोद, निभोरा, गणेशपूर, औराळा, शेऊर, अंबा, साईगांव ही खेडी. | भिल्ल. |
| | | अंबड | मम्साई, धनगर पिंपरी, पाथरवाला बुद्रुक, पांगरखेडा, ढाळसखेडा, आलमगाव, साडसावगी, बदनापूर, जामखेड, राहिलागड राणीउंचेगांव, अबड, बोरी, शीराढोण, शिदेवडगांव, गुरुपिंप्री, शहापूर, साडेगांव, रमणा, अंतरवाली टेंभी, सरपगव्हाण, जाळुरा, खडका, सोनकपिंपळगांव, महारजावळा, रोजगाव, भद्रेगाव, शेवगा, मार्नेपुरी, परांडा, मालगाव, वालखेडा, रामगव्हाण खुर्द, अंबखाली दाई, खालापुरी, दहेगांव खुर्द, भोईगव्हाण, सावरगळ, येवला, चिचखेडा, बोंदलापुरी, लोणारभायगाव, देशगव्हाण, चिकनगांव, कीतीपुरी, भोगगाव, सारंगपूर, पानेवाडी, घोरडी, गोंदी, अव्वलगांव बुद्रुक, बोडका बोरी, राहेरा व मारडी ही गावे. | भिल्ल. |
| | | वैजापूर | वैजापूर, भागगाव, बेलगांव, खंवाला, दावला, खिरापूर, चांदगांव, नांदगांव, पानवी खुर्द, रोटेगांव, अगरसायगांव, धारगाव, खंडाळा, पानगव्हाण, भिडी, लोणी बुजुर्ग, जारूळ, पानवी खंडाळा, लाख खंडाळा, जांबरगांव, भाईगाव वैजापूर, विलोनी, नारेला, जानेफळ, हिलालपूर, कोरडगांव, वडजी, परेला, खारज, तितरखेडा, चिकटगांव, भादली, तलवाडा, वाकला, लोणी खुर्द, नायगव्हाण, बाभूलतेल, वळण, कांदीलखेडा, बेरोला, आचेगांव टुनकी, दासखुल, सावखेड, खंडाळा, निमगाव, गोदगांव, पेंढेफळ, शिवर, कोन्ही, बोरसर, भिवगाव, | भिल्ल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मालेगाव, परसोडा, धोंदलगाव गोलवाडी, निराखनगर, शिवराई, तिडी, आघूर सावंदगांव, पालखेड, शिरडी, जळगांव, शाहजतपूर, करंजगांव, हाऊपिपळगांव, राहेगव्हाण, लासूर, राहेगांव, शिवगाव, बाभूलगाव बुजुर्ग, बाभूलगाव खुर्द, यराई, झोलेगाव, वाघाला, पोखरी, भोकरगाव, मालेगाव कन्नड, बायगाव, साकेगाव, भराणा, मानेगांव, मनोली, जिरी, बाभूलखेडा, खिरडी कन्नड हिंगणा, कन्नड, महाकाळगाव, सराला, बंजरगांव, सावखेडगंगा, कपूरवडगांव, लाडगांव, फकिराबादवाडी, भागगाव, गोवर्धनपूर, हणमंतगांव, म्हस्की, सिद्धपूर, पिपळगांव, नगिना, हिंगोणी, गोईगांव, पुरणगांव, [illegible]नगोनी, नारायणपूर, वाबतारा, होगगांव, लाखगंगा, नांदूरघूक, बामुळगांव गंगा, चिंचडगाव, चोरवाघलगाव, सिरसगांव, वीरगाव, जातेगांव, [illegible]भी, डाकपिंपळगांव, व नादी ही गावे. | |
| | बीड .. | .. नागरी क्षेत्र वगळता, बीड जिल्ह्यांतील सर्व गावे .. .. | भिल्ल. |
| नांदेड .. | किनवट .. | .. किनवट तालुक्यांतील सर्व गावे .. .. .. .. | अंध, भिल्ल, गोंड, कोलम, परधान. |

(३) एखाद्या अनुसूचित जमातीच्या भोगवटादाराने, पोट-कलम (२) च्या उपबंधाचे उल्लंघन करून, त्याच्या भोगाधिकाराचा कबजा हस्तांतरित केला असेल तेव्हा, हस्तांतर करणाऱ्या इसमास किंवा जवळचा वारस नसताना भोगवटादार मरण पावला तर, त्या जमिनीचा वारसा मिळणाऱ्या कोणत्याही इसमास आपणास कबजा मिळावा म्हणून, कबजाच्या अशा हस्तांतरणापासून दोन वर्षांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल ; मात्र तो जमीन महसुलाच्या थकबाकीची दायित्वे किंवा अशा धारण जमिनीवरील ऋणभार असणाऱ्या कोणत्याही येणे असलेल्या इतर रकमा जिल्हाधिकारी, राज्य सरकारने या बाबतीत केलेल्या नियमानुसार[१] ठरवील व त्यास मान्य होतील तेथवर, त्यास पात्र असेल. जिल्हाधिकाऱ्याने विहित[१] करण्यात येईल अशा कार्यपद्धतीनुसार असा अर्ज निकालात काढला पाहिजे.

(४) पोट-कलम (१) मध्ये किंवा या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, भोगवटादार—वर्ग २ याने, भूमि सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३, (१८८३ चा १९ वा,) शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ (१८८४ चा १२ वा,) किंवा मुंबईचा बिगर शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १९२८ (१९२८ चा मुंबई अधिनियम, ३) या अन्वये राज्य सरकारने त्यास दिलेल्या कर्जाबद्दल राज्य सरकारच्या नावाने किंवा सहकारी संस्थेने [१][किंवा १ भारताच्या स्टेट बँकेबाबत अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या भारताच्या स्टेट बँकेने किंवा बँकाचा व्यवहार करणाऱ्या कंपन्याबाबत (उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम, १९७० याचे कलम २ खंड (ड) च्या अर्थानुसार, तत्सम नवीन बँकेने किंवा संबंधित विधी अन्वये प्रस्थापित केलेल्या महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने] त्यास दिलेल्या कर्जाबद्दल उक्त सहकारी संस्थेच्या नावाने, [२][भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा यथास्थिती महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या नावाने] आपली मालमत्ता गहाण ठेवणे हे विधिसंमत असेल आणि असे कर्ज ज्या अटीवर देण्यात आले असेल त्या अटीनुसार अशा कर्जाची परतफेड करण्यात अशा भोगवटादाराने कसूर केल्यास, राज्य सरकारास किंवा [३][सहकारी संस्थेस भारताच्या स्टेट बँकेस, तत्सम नवीन बँकेस किंवा यथास्थिति, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास] जी इतर कोणतीही उपाययोजना करता येईल त्यास बाध न आणता, राज्य सरकारने किंवा [४][यथास्थिति सहकारी संस्थेने, भारताच्या स्टेट बँकेने, तत्सम नवीन बँकेने किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने] भोगाधिकार जप्त करवून त्याची विक्री करविणे आणि त्यापासून मिळणारे उत्पन्न अशा कर्जाच्या फेडीसाठी वापरणे हे विधिसंमत असेल.

जिल्हाधिकाऱ्यास, [५][सहकारी संस्था, भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या अर्जावरून] आणि राज्य सरकारने याबाबतीत विहित केलेले क्षेत्रमूल्य (प्रिमियम) देण्यात आल्यावर, लेखी आदेशाद्वारे खातेदाराचे, खातेदार—वर्ग १ म्हणून पुन्हा वर्गीकरण करता येईल ; आणि अशा रीतीने पुन्हा वर्गीकरण करण्यात आल्यावर खातेदार, या अधिनियमाखालील हस्तांतरणावर, कोणत्याही निर्बंधाशिवाय, अशा जमिनीचा भोगाधिकार धारण करील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांकरिता, "अनुसूचित जमाती" म्हणजे भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३४२ या अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येतात अशा जमाती किंवा वन्य जमाती किंवा अशा जमातींचे किंवा वन्य जमातींचे भाग, किंवा त्यांमधील गट (परिशिष्ट ४४ पहा).

---

[१] हा मजकूर सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, ३६ याचे कलम २ (अ) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[२] हा मजकूर वरील अधिनियमाचे कलम २ (ब) अन्वये, समाविष्ट करण्यात आला.

[३] हा मजकूर "किंवा यथास्थिति सहकारी संस्थेस" या मजकुराऐवजी वरील अधिनियमाचे कलम २ (क) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[४] हा मजकूर "किंवा यथास्थिति सहकारी संस्थेने" या मजकुराऐवजी वरील अधिनियमाचे कलम २ (क) अन्वये, समाविष्ट करण्यात आला.

[५] हा मजकूर "संस्थेच्या अर्जावरून ......" शब्दांऐवजी वरील अधिनियमाचे कलम २ (ड) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

**टीप २८.—अनुसूचित जमातीच्या भोगवटदारांनी अनधिकृतरित्या हस्तांतरीत केलेल्या भोगवटयाच्या पुनःस्थापना संबंधीचे व भोगवटयाच्या पुनर्वर्गीकरणासाठी अधिमुल्याचे प्रदान करण्यासंबंधीचे नियम.**

१. **संक्षिप्त नाव**: या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (अनुसूचित जमातीच्या भोगवटादारांनी अनधिकृतरित्या हस्तांतरीत केलेल्या) भोगवटयाच्या पुनः स्थापनाबाबत नियम, १९६९ असे म्हणता येईल. शासकीय अधिसूचना क्र. युएनएफ-१५६७(एच्) आर, दिनांक १० एप्रिल १९६९.

२ **कलम ३६ (३) अन्वये प्रयुक्ती व त्याअन्वये विल्हेवाट लावण्याची कार्यपद्धती**: पोट-कलम (३) अन्वये करण्यात यावयाच्या प्रत्येक अर्जासोबत अधिकाराभिलेखातील संबंधित नोंदीचा उतारा व भोगवटयाच्या बाबतीतील फेरफारांची नोंदवही व भोगवटयाचा कब्जा ज्या विलेखा अन्वये हस्तांतरीत करण्यात आला असे अभिकथन करण्यात आले असेल त्याची एक प्रत असेल.

३. **नोटीस बजावणे**: अर्ज मिळाल्यावर व जिल्हाधिकाऱ्याला आपल्या अभिलेखांची पडताळणी केल्यावर हस्तांतरणासाठी आपली मंजुरी देण्यात आली नव्हती असे मानण्यास संयुक्तिक कारण आहे असे वाटत असेल (ही कारणे तो लेखी नमूद करील) तर, जिल्हाधिकारी, हस्तांतरकावर (तो अर्जदार नसल्यास) व हस्तांतरीतीवर ते हस्तांतरण का रद्द करण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्यास फर्मावणारी नमुना 'अ' मधील नोटीस बजावण्याची व्यवस्था करील व अर्जाची सुनावणीची तारीख विनिर्दिष्ट करील.

४. **पक्षकारांची तपासणी**: सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेला किंवा सुनावणी ज्या तारखेपर्यंत तहकूब केली असेल अशा कोणत्याही तारखेस जिल्हाधिकाऱ्याला पक्षकारांची तपासणी करता येईल, आणि ते जे साक्षीदार दाखल करतील अशा कोणत्याही साक्षीदारांची निवेदने नोंदवून घेतल्यावर व त्याला जी चौकशी करणे आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर तो कलम ३६ चे पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने हस्तांतरण करण्यात आले आहे किंवा नाही याचा निष्कर्ष नमूद करील. जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीने हस्तांतरण करण्यात आले आहे असा निष्कर्ष असेल तर अर्ज फेटाळण्यात येईल.

५. **हस्तांतरणाच्या अर्जाबाबत चौकशी करण्याची जिल्हाधिकाऱ्यांची शक्ती**: (१) जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण करण्यात आले असेल असा निष्कर्ष जिल्हाधिकाऱ्याने लिहून ठेवला तर तो सहा आठवडयांपेक्षा कमी नाही एवढया कालावधीसाठी कामकाज स्थगित करील ; व

(अ) भोगवटयामध्ये अर्जदाराच्या अधिकाराएवढाच अधिकार आहे अशा व्यक्तींवर किंवा ज्यांचा त्यापूर्वीचा अधिकार आहे असे प्रथमदर्शनी वाटणाऱ्या त्यापूर्वीचे सर्व व्यक्तींवर ; आणि

(ब) ज्यांना हस्तांतरक, भोगवटयावरील भार म्हणून असलेल्या अशा कोणत्याही येणे रकमांसाठी ऋणी असलेला, आढळलेल्या अशा व्यक्तींवर

'ब' नमुन्यातील नोटीशी बजावण्याची व्यवस्था करील.

(२) त्याचवेळी जिल्हाधिकारी नमुना (क) मध्ये उद्घोषणा काढण्याची व्यवस्था करील व ज्यामध्ये भोगवटा चालू असेल त्या गावामध्ये ती प्रकाशित करण्याची व्यवस्था करील.

(३) जिल्हाधिकारी त्याचवेळी सुद्धा भोगवटयावरील भार ठरणाऱ्या जमीन महसूल, तगाई यांच्या थकबाकीच्या रकमा व इतर येणे रकमा या संबंधातील शासनाच्या मागणीचे विवरणपत्र सादर करण्यास संबंधित तहसिलदाराला निदेश देईल.

(४) कब्जात असल्याबद्दलची किंवा भोगवटयावरील भार ठरणारी कोणत्याही येणे रकमेची मागणी ती नोटिशीमध्ये व नियम ५ खाली काढलेल्या उद्घोषणेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी पाठवल्याखेरीज विचारात घेतली जाणार नाही.

**६. निष्कर्ष नमूद करण्याची जिल्हाधिकाऱ्यांची शक्ती व त्यानंतर अनुसरावयाचे कामकाज :** (१) नोटिशीमध्ये व नियम ५ अन्वये काढलेल्या उद्‌घोषणेमध्ये निश्चित केलेल्या तारखेला किंवा कामकाज ज्या तारखेपर्यंत तहकूब करण्यात येईल अशा कोणत्याही इतर तारखेस भोगवटा कब्जात ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या अर्जदाराच्या मागणीवरील आक्षेप जिल्हाधिकारी विचारात घेईल व त्यावरील आपले निष्कर्ष नमूद करील.

(२) अर्जदार किंवा इतर कोणतीही व्यक्ती भोगवटा कब्जात ठेवण्यास पात्र आहे असा निष्कर्ष असेल तर जिल्हाधिकारी, जमीन महसूलाच्या थकबाकीच्या रकमांचा किंवा भोगवटयावरील भार ठरणाऱ्या इतर कोणत्याही येणे रकमांचा अंतर्भाव असलेले नमुना 'ड' मधील विवरणपत्र तयार करील. व ते अशा अर्जदाराच्या किंवा व्यक्तीच्या स्वाधीन करील व तो अर्जदार किंवा व्यक्ती त्याबद्दलच्या दायित्वाचा आपण स्वीकार केल्याबद्दल नमुना 'ई' मध्ये निवेदन करील.

(३) अर्जदाराने किंवा अशा व्यक्तीने नमुना 'ड' मध्ये नमूद केलेल्या येणे रकमांची थकबाकी देण्यास संमती दिल्यास जिल्हाधिकारी त्या अर्जदाराला किंवा त्या व्यक्तीला भोगवटयाचा कब्जा देण्याचा आदेश काढील. अर्जदाराने किंवा अशा व्यक्तींनी अशा थकबाकीच्या रकमा भरण्यास संमती न दिल्यास खटला दप्तरदाखल करण्यात येईल.

७. **नियम ६ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाची प्रत तहसिलदाराला पाठवणे :** नियम ६ अन्वये काढण्यात आलेल्या आदेशाची एक प्रत संबंधित तहसिलदाराला पाठवण्यात येईल व तहसिलदार संबंधित गावाच्या तलाठयाला अशा आदेशानुसार गावाच्या अधिकार अभिलेखातील नोंदी दुरुस्त करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचा निदेश देईल.

८. **भोगवटयाचे पुनर्वर्गीकरण करण्याचे अधिमूल्य :** कलम २९ चे पोट-कलम (२) च्या खंड (क) च्या उपबंधास अधीन राहून भोगवटादाराचे भोगवटादार वर्ग एक म्हणून पुनर्वर्गीकरण करण्यासाठी कलम ३६ च्या पोट-कलम (४) अन्वये द्यावयाचे अधिमूल्य हे भोगवटयाचे चालू बाजार मूल्य व मुळात दिलेली भोगवटयाची किंमत अधिक असल्यास सुधारण्याचे मूल्य या दोन्ही मधील फरकाच्या ५० टक्के एवढे असेल.

## नमुना ' अ '

(नियम ' ३ ' पहा)

### हस्तांतरीती व हस्तांतरक यांना नोटीस

.................च्या समोर

.................येथे प्रकरणाचे नांव

प्रकरण क्रमांक ....................

प्रति :

नाव ............................वडीलाचे नाव ..................
राहणार ...................................... तालुका ..............
जिल्हा ..........................................यास,

ज्याअर्थी, नाव ..........................वडीलाचे नाव ..............
राहणार .........................................तालुका ...........
जिल्हा ...........याने, गाव ...........तालुका ........जिल्हा .....येथे असलेल्या यासोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या भोगवटयाच्या संबंधात नांव ................. वडीलांचे नाव .................. व्यवसाय ............ राहणार ............ तालुका ...........................जिल्हा ............ याने केलेले हस्तांतरण रद्द करण्यासाठी व त्याचा कब्जा स्वत:ला देण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम ३६ चे पोट-कलम (३) अन्वये अर्ज केला आहे, त्याअर्थी, ..................... येथे, दिनांक ........................... रोजी व्यक्तिश: हजर राहून किंवा आपल्या वतीने विधी व्यवसायी किंवा अभिकर्ता पाठवून उक्त हस्तांतरण का रद्द करण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्यास याद्वारे आपणास फर्मावण्यात येत आहे.

| जिल्हाधिकाऱ्यांची मुद्रा |
|---|

दिनांक .....................१९ . जिल्हाधिकारी.

### अनुसूची

| भोगवटा क्रमांक | भू-मापन क्रमांक | भूखंड क्रमांक | क्षेत्र | हक्क | महसूल |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

रु. पै.

## नमुना 'व'

[ नियम ५ (१) पहा ]

### भोगवटयाचा प्रथमदर्शनी अधिकार असणाऱ्या व्यक्तींना व धनकोंना नोटीस

.............................................. च्या समोर

प्रकरणाचे नाव ..........................................

प्रकरण क्रमांक ...................................

प्रति :

नाव ........................................ वडीलाचे नाव ..................

राहणार ...................................... तालुका ............ जिल्हा ............

यांस ...................................................

ज्याअर्थी, नाव .................................. वडीलाचे नाव ..................

राहणार ............................ तालुका .................. जिल्हा ..........

याने, गाव ............................ तालुका ................ जिल्हा ............

येथे असलेल्या यासोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या भोगवटयाच्या .................. संबंधात

नाव ............ वडीलाचे नाव ....................... व्यवसाय ............

राहणार ............................ तालुका ................ जिल्हा ............

याने केलेले हस्तांतरण रद्द करण्यासाठी व त्याचा कब्जा स्वतःला देण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६९ याचे कलम ३६ चे पोट-कलम (३) अन्वये अर्ज केला आहे, त्याअर्थी, .......... .................... येथे, दिनांक ...................... रोजी व्यक्तिशः हजर रहाण्यास किंवा आपला विधीव्यवसायी किंवा अभिकर्ता पाठवण्यास व वर उल्लेखलेल्या प्रकरणात ..........

(जर नोटीस भोगवटयाचा प्रथमदर्शनी अधिकार असणाऱ्या व्यक्तीला असेल तर ) प्रस्तुत भोगवटयाचा कब्जा देण्यासाठी आपल्या काही मागण्या असल्यास त्या (जर नोटीस धनकोंना असेल तर) भोगवटयावरील भार ठरणाऱ्या कोणत्याही येणे रकमासंबंधी आपल्या काही मागण्या असल्यास त्या सादर करण्यास आपणास याद्वारे कळवण्यात येत आहे.

आपण हजर राहण्यास व आपली मागणी सादर करण्यात कसूर केल्यास, उक्त भोगवटयासंबंधी आपली कोणतीही मागणी नाही असे समजण्यात येईल.

जिल्हाधिकाऱ्यांची मुद्रा

दिनांक .................... १९ . जिल्हाधिकारी.

अनुसूची

| भोगवटा क्रमांक | भू-मापन क्रमांक/आणि भूखंड क्रमांक | क्षेत्र | हक्क | महसूल |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

## नमुना 'क'

[ नियम '५' (२) पहा ]

### उद्घोषणा

.................................................. च्या समोर

प्रकरणाचे नाव ..............................

प्रकरण क्रमांक ......................................

ज्याअर्थी, नाव .............................वडीलाचे नाव .....................
राहणार ..................., तालुका ..............जिल्हा
याने, गाव ........................तालुका ..............जिल्हा ................
येथे, असलेल्या या सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या भोगवटयाच्याच्या संबंधात
नाव ....................... वडीलाचे नाव ..................रहाणार ...........
तालुका ..........................जिल्हा ........ याने केलेले हस्तांतरण रद्द करण्यासाठी
व त्याचा कब्जा स्वतःला देण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम ३६ चे पोट-कलम (३) अन्वये अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, असे आढळून आले आहे की, उक्त हस्तांतरण, उक्त अधिनियमाचे कलम ३६ चे पोट-कलम (२) चे उल्लंघन करून करण्यात आले आहे.

त्याअर्थी, आता हस्तांतरकांचे वारस म्हणून दावा सांगणाऱ्या अशा सर्व व्यक्तींना/उक्त भोगवटयावरील भार ठरणाऱ्या अशा देण्यात आलेल्या आगाऊ रकमेसाठी उक्त हस्तांतरक ज्याचा ऋणी असेल अशा सर्व धनकोंना आणि आपली बाजू ऐकून घ्यावी अशी ज्यांची इच्छा असेल अशा सर्व व्यक्तींना याद्वारे कळवण्यात येत आहे की, आपल्या भोगवटयाच्या संबंधातील आपल्या मागण्या पुढे मांडण्यासाठी व्यक्तिशः हजर राहावे किंवा आपल्या वतीने विधि व्यवसायीला किंवा अभिकर्त्याला हजर राहण्यास पाठवावे व ........................................... येथील भोगवटयाच्या संबंधातील आपल्या मागण्या दिनांक ........................... रोजी मध्यान्हपूर्व/मध्यान्होत्तर ............................ वाजता ................... येथे पुढे मांडाव्यात.

अशा तऱ्हेने हजर राहण्यात व वर नमूद केलेल्या दिनांकाला व ठिकाणी मागणी पुढे मांडण्यात कसूर झाल्यास कोणतीही मागणी किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाही.

जिल्हाधिकाऱ्यांची मुद्रा

दिनांक ........................ १९ .  जिल्हाधिकारी.

### अनुसूची

| भोगवटा क्रमांक | भूमापन क्रमांक | खंड क्रमांक | क्षेत्र | हक्क | महसूल |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

## नमुना 'ड'

[नियम ६ (२) पहा]

### भोगवटयावरील भार ठरणाऱ्या जमीन महसुलाच्या किंवा इतर देय रकमांच्या थकबाकीचे विवरणपत्र

.............................च्या समोर .............................येथे

प्रकरणाचे नांव .............................................

प्रकरण क्रमांक ....................

| गावाचे नांव व जमाबंदी क्रमांक | भूमापन क्रमांक व भूखंड क्रमांक | क्षेत्र | जमीन महसूल |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | रु. पै. |

| जमीन महसुलाच्या थकबाकीची रक्कम | उचित शीर्षाखालील तगाईची रक्कम | भोगवटयावर आकारलेल्या इतर ऋणांचा तपशील | एकूण |
|---|---|---|---|
| (५) | (६) | (७) | (८) |
| रु. पैसे | रु. पैसे | | |

जिल्हाधिकाऱ्यांची मुद्रा :

दिनांक .................... १९ .

जिल्हाधिकारी.

## नमुना 'ई'

[नियम ६ (२) पहा]

**धारण जमिनीवरील भार ठरणाऱ्या जमीन महसुलाच्या किंवा इतर येणे रकमांच्या थकबाकीसंबंधीचे अर्जदाराचे विवरणपत्र**

.................................च्या समोर.................................

..........................येथे..........................................

.......................................प्रकरण क्रमांक.........................

ज्याअर्थी, वर उल्लेखलेल्या प्रकरणात असा निर्णय देण्यात आला आहे की, या सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ २ ते ४ यांमध्ये वर्णन केलेल्या भोगवटयाचा कब्जा मला देण्यात येणार आहे.

त्याअर्थी, मी, ..............................वडीलांचे नाव...............
राहाणार.........................तालुका.....................,जिल्हा...........
याद्वारे उक्त अनुसूचीचे स्तंभ ५ ते ८ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या देय रकमा देण्यास संमती देत आहे.

### अनुसूची

| जमाबंदी क्रमांकासह गावाचे नांव | भूमापन क्रमांक किंवा भोगवटयातील भूखंड क्रमांक | क्षेत्र | भोगवटयाच्या जमीनीच्या संबंधात देय असलेला जमीन महसूल |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | रु. पैसे |

| जमीन महसूलाच्या थकबाकीची रक्कम | योग्य शीर्षाखालील तगाईची रक्कम | भोगवटयावर भारित असलेल्या इतर ऋणांचा तपशील | एकूण |
|---|---|---|---|
| (५) | (६) | (७) | (८) |
| रु. पैसे | रु. पैसे | | |

मी, असेही मान्य करतो की, जमीन महसूलाची थकबाकी म्हणून किंवा महसुलाची मागणी म्हणून वसूल करण्याजोग्या असलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या थकित रकमा माझ्याकडून जमीन महसूल अधिनियमांच्या प्रकरण ११ अन्वये वसूल करण्यात याव्यात.

दिनांक ...................१९ . सही .................

खातेदाराचे हक्क शर्तीस अधीन असतील.

३७. भोगवटादारास त्याच्या जमिनीचा उपयोग आणि भोगवटा करण्याचा हक्क कायमाच्या मुदती-करिता असेल, परंतु या अधिनियमाच्या उपबंधानुसार, किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमानुसार किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिनुसार जमीन महसुलाची देणे असलेली रक्कम देण्यात आल्यानंतरच आणि त्याच्या सत्ताप्रकारास वैधरीत्या लागू असलेल्या कोणत्याही इतर अटी किंवा शर्ती पूर्ण करण्यात आल्यानंतरच अशा जमिनीचा उपयोग व भोगवटा कायमच्या मुदतीकरिता करता येईल.

पट्टे देण्याची शक्ती.

३८. जिल्हाधिकाऱ्याने कोणत्याही वेळी कोणत्याही इसमास अनुदानपत्रान्वये किंवा संविदे अन्वये, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमास " अधीन राहून तो ठरवील अशा मुदतीसाठी व अशा प्रयोजनांकरिता आणि अशा शर्तीवर, भोगवटयात नसलेली कोणतीही बिनदुमाला जमीन पट्टयाने देणे हे विधिसंमत असेल, आणि अशा कोणत्याही बाबतीत अशी जमीन, मग तिला भू-मापन व्यवस्था लागू केलेली असो किंवा नसो, अशा रीतीने ठरवण्यात आलेल्या मुदतीकरिताच व प्रयोजनाकरिताच आणि शर्तीस अधीन राहूनच धारण करता येईल. अशा रीतीने देण्यात आलेल्या जमिनीच्या बाबतीत, ज्यास जमीन देण्यात आली असेल त्यास सरकारी पट्टेदार असे संबोधण्यात येईल.

टीप २९.—कलम ५१ खालील टीप ३७ पहा (नियम ७, २१, २२, २३, ३४, ३५, ३६ व ४३ पहा).

भोगवटादाराने ठरविण्यात आलेला जमीन महसूल देणे आणि सरकारी पट्टेदाराने ठरविण्यात आलेला खंड देणे.

३९. प्रत्येक भोगवटादाराने या अधिनियमाच्या उपबंधान्वये आणि तदन्वये केलेल्या नियमान्वये निश्चित केलेली आकारणी जमीन महसूल म्हणून दिली पाहिजे ; आणि प्रत्येक सरकारी पट्टेदाराने पट्टयाच्या शर्तीअन्वये निश्चित केलेली पट्टयाची रक्कम जमीन महसूल म्हणून दिली पाहिजे.

सरकारचा अधिकार राखून ठेवणे.

४०. या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधातील कोणत्याही मजकुरामुळे, सरकारची मालमत्ता म्हणून कोणत्याही जमिनीची राज्य सरकारला योग्य वाटेल अशा अटींवर व शर्तींवर विल्हेवाट लावण्याच्या राज्य सरकारच्या अधिकाराचे अल्पीकरण होणार नाही.

टीप-३०.—कलम ५१ खालील टीप ३७ पहा (नियम २७, ३१ व ३२ पहा).

## जमिनीच्या उपयोगाबाबत

शेतीच्या प्रयोजनासाठी जमीन धारण करणाऱ्या इसमास कोणत्या कारणासाठी आपल्या जमिनीचा उपयोग करता येईल.

४१. आकारणी केलेल्या किंवा शेतीच्या प्रयोजनांसाठी धारण केलेल्या जमिनींच्या कोणत्याही धारकास, स्वत: किंवा त्यांचे नोकर, कुळे, अभिकर्ते, किंवा इतर वैधप्रतिनिधी यांच्याकडून शेतावरील इमारती उभारण्याचा, विहिरी किंवा तळी बांधण्याचा किंवा जमिनीची अधिक चांगली मशागत करण्यासाठी, किंवा उपरोक्त प्रयोजनासाठी अधिक सोयीस्कर रीतीने तिचा उपयोग करण्यासाठी तिच्यावर कोणत्याही इतर सुधारणा करण्याचा हक्क असेल.

४२. शेतीसाठी उपयोग करण्यात येणाऱ्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी अकृषिक उपयोग करता कामा नये, आणि एका अकृषिक प्रयोजनासाठी आकारणी केलेल्या कोणत्याही जमिनीचा उपयोगासाठी कोणत्याही इतर अकृषिक प्रयोजनासाठी किंवा त्याच अकृषिक प्रयोजनांसाठी परंतु अकृषिक प्रयोजनांसाठी परवानगी. जमीन किंवा परवानगी देते वेळी लादलेल्या शर्तीपैकी कोणतीही शर्त शिथिल करून उपयोग करता कामा नये.

४३. जमीन महसूल देण्यास पात्र असलेल्या जमिनीचा, सार्वजनिक प्रयोजनासाठी नेमून दिलेल्या उपयोगावर. भू-मापन क्रमांकातील पडीत जमिनीची लागवड, शेतीसाठीच्या जमिनीतून मीठ काढणे, फक्त कृषि प्रयोजना- निर्बंध. साठी आकारणी केलेल्या जमिनीमधून माती, दगड, कंकर, मुरूम किंवा इतर कोणताही असा माल काढून नेणे की ज्यायोगे ती जमीन लागवडीसाठी उपयुक्त ठरणार नाही किंवा बरीच निकामी ठरेल, इमारतीचा जागा म्हणून आकारणी केलेल्या जमिनीतून माती, दगड (पृष्ठभागावरील सुटे दगड सोडून), कंकर, मुरूम किंवा इतर कोणताही माल काढून नेणे, गावठाणातील जमिनीचे उत्खनन करणे ; आणि विहित करण्यात येतील अशा इतर प्रयोजनांसाठी करावयाच्या वापराचे, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमांस " अधीन राहून जिल्हाधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास नियमन करता येईल किंवा त्यास प्रतिबंध करता येईल ; आणि त्यास अशा प्रतिबंध विहीत " करण्यात येतील अशा इतर प्रयोजना- साठी जो इसम त्या जमिनीचा वापर करील किंवा वापर करण्याचा प्रयत्न करील अशा कोणत्याही इसमास संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून लावता येईल.

टीप ३१.—जमिनीच्या वापरावरील निर्बंधासंबंधीचे नियम.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरावर निर्बंध) नियम, १९६८ असे म्हणता येईल. शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ १५६७-(आय) दि. ८ मार्च १९६८.

२. **लागवडीसाठी अयोग्य असलेल्या जमिनीचे वर्ग, अशा जमिनीच्या लागवडीचे विनियमन आणि प्रतिबंधन.**—(१) फक्त कृषि प्रयोजनासाठीच केवळ (पोट-खराब) म्हणून भू-मापन क्रमांकात समाविष्ट केलेली जमीन दोन प्रकारची आहे :—

(अ) जिच्या भू-मापनाचे वेळी कृषिसाठी अयोग्य म्हणून वर्गवारी करण्यात आली असेल अशी जमीन, यामध्ये धारकाची कृषिक्षेत्रावरील इमारत किंवा खळयाचा समावेश होईल.

(ब) जी, सार्वजनिक प्रयोजनासाठी राखून ठेवण्यात किंवा अभिहस्तांकित करण्यात आल्यामुळे किंवा जी जमीन रस्ता किंवा मान्य पदपथ किंवा धारकाशिवाय इतर इसमांकडून किंवा पिण्याचे पाणी किंवा घरगुती प्रयोजनासाठी वापरण्यात येणारा तलाव किंवा ओढा याने व्यापल्यामुळे किंवा कोणत्याही जमातीकडून किंवा जनतेकडून दहनभूमी किंवा दफनभूमी म्हणून ती वापरण्यात येत असल्यामुळे किंवा गावातील कुंभारकामासाठी ती जमीन अभिहस्तांकित करण्यात आल्यामुळे तिच्यावर आकारणी करण्यात आली नसेल अशी जमीन.

(२) वर्ग (अ) खाली येणारी जमीन, धारकास कोणत्याही लागवडीखाली आणता येईल, आणि त्याकरिता कोणतीही आणखी आकारणी करण्यात येणार नाही.

(३) वर्ग (ब) खाली येणाऱ्या जमिनीच्या लागवडीस याद्वारे कलम ४३ अन्वये प्रतिबंध करण्यात येत आहे :

परंतु, तलाव किंवा ओढा याने व्यापलेल्या जमिनीच्या बाबतीत जेव्हा अशा तलावाचा किंवा ओढ्याचा जलसिंचनासाठीच केवळ उपयोग करण्यात येत असेल, आणि धारकाच्या एकमेव भोगवटयात असलेल्या जमिनीसच केवळ त्यामुळे पाणीपुरवठा होत असेल, किंवा तलावाच्या किंवा ओढ्याच्या कोरड्या पात्रात लागवड करण्याच्या धारकाच्या विशेषाधिकारास विशेषकरून मान्यता देण्यात आली असेल तेव्हा उपरोक्त नियम त्या जमिनीस लागू होणार नाही.

**३. मीठ उत्पादनाकरिता जमिनीचा वापर करण्यावर निर्बंध.**—(१) बिनदुमाला जमिनीचा कोणताही खातेदार, मग अशा जमिनीवर कोणत्याही कारणासाठी आकारणी करण्यात आलेली असो वा नसो उक्त जमीन किंवा तिचा भाग याचा जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगी-शिवाय मीठ उत्पादनासाठी म्हणून वापर करणार नाही.

(२) मिठाचे उत्पादन करणे किंवा ते गोळा करणे किंवा ते काढणे या संबंधात त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधींच्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास, मीठ आयुक्त, मुंबई, यांचेशी विचारविनिमय करून, अशा जमिनीवर बसविता येईल अशी बिगर शेती आकारणी देण्यात येईल या शर्तीस व राज्य सरकारच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून जिल्हाधिकाऱ्याकडून लादण्यात येतील अशा आणखी शर्तीस अधीन राहून अशा जमिनीच्या वापरास परवानगी देता येईल.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनासाठी, "मीठ आयुक्त" म्हणजे, केंद्रीय उत्पादन शुल्क व मीठ अधिनियम, १९४४ अन्वये केलेल्या केंद्रीय उत्पादन शुल्क नियम, १९४४ अन्वये, मिठाच्या संबंधात, जिल्हाधिकाऱ्याला शक्तीचा वापर करण्याची शक्ती ज्यास प्रदान करण्यात आली आहे, असा मीठ आयुक्त.

**४. शेतजमिनीचे उत्पादन करण्यास प्रतिबंध.**—कलमे ४१ आणि ४२ आणि नियम ३ यात तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय आकारणी करण्यात आलेल्या किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी केवळ धारण केलेल्या जमिनीचा कोणताही खातेदार आणि कोणत्याही खातेदाराच्या अधिकाराखाली किंवा प्राधिकारान्वये हक्क सांगणारा कोणताही इसम जमिनीत उत्खनन करणार नाही किंवा (भूपृष्ठावरील मोकळे दगड काढण्याखेरीज) माती, दगड, कंकर, मुरूम किंवा उक्त जमिनीच्या मातीमधील इतर कोणतीही वस्तू काढून नेणार नाही किंवा (अ) जिल्हाधिकाऱ्याच्या मते ज्यामुळे जमिनीचा लागवडीच्या दृष्टीने नाश होईल किंवा लागवडीसाठी जमीन अयोग्य होईल अशा प्रकारे तिच्या कसावर परिणाम होईल अशा इतर कोणत्याही रीतीने जमिनीचा वापर करणार नाही किंवा (ब) स्वतःच्या घरगुती किंवा शेताच्या कारणाशिवाय इतर कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा व्यापाराच्या किंवा नफ्याच्या प्रयोजनासाठी उक्त जमिनीचा वापर करणार नाही.

**५. अनुज्ञेशिवाय इमारतीच्या जागेत उत्खनन करण्यास परवानगी नसणे.**—आकारणी करण्यात आलेल्या किंवा इमारती जागा म्हणून धारण केलेल्या जमिनीचा कोणताही धारक किंवा गिरिस्थानातील इमारती जागेचा कोणताही पट्टाधारक आणि अशा कोणत्याही धारकातर्फे किंवा पट्टाधारकातर्फे हक्क सांगणारा कोणताही इसम, कलम ३१ किंवा ४७ अन्वये किंवा अन्यथा त्याच्या धारण जमिनीशी अनुबद्ध असलेल्या किंवा त्याच्या पट्ट्यान्वये विहित करण्यात आलेल्या कोणत्याही विशेष उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीने राज्याच्या कोणत्याही भागात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या, खाणी व खनिज द्रव्ये (नियमन व विकास) अधिनियम, १९५७ अन्वये करण्यात आलेल्या नियमांचे उपबंध विचारात घेऊन, जिल्हाधिकाऱ्यास प्रत्येक बाबतीत विहित करणे योग्य वाटतील अशा (अशा कोणत्याही उत्खननसाठी किंवा वस्तू काढून नेण्यासाठी फी देणे ही गोष्ट धरून) अटीनुसार असेल ते खेरीजकरून उक्त जमिनीच्या मातीमधून, कोणत्याही कारणासाठी, माती, (पृष्ठभागावरील मोकळे दगड खेरीजकरून) दगड, कंकर, मुरूम किंवा उक्त जमिनीच्या मातीमधील इतर कोणतीही वस्तू यासाठी उत्खनन करणार नाही किंवा त्या काढून नेणार नाही.

**६. गावठाणातील उत्खननास परवानगी आवश्यक असणे :**—(१) कोणताही गाव, नगर किंवा शहरातील कोणत्याही बिनदुमाला जमिनीचे उत्खनन, इमारतीच्या पायाभरणीसाठी, विहीर खणण्यासाठी आणि धान्याचे पेव करण्यासाठी, त्याव्यतिरिक्त, इतर कोणत्याही उद्देशासाठी जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय करता येणार नाही.

(२) वर उल्लेख करण्यात आलेल्या प्रयोजनाखेरीजकरून इतर कोणत्याही प्रयोजनासाठी अशा कोणत्याही उपरोक्त जमिनीचे उत्खनन करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने परवानगी दिली असेल त्या बाबतीत, राज्याच्या कोणत्याही भागात त्या त्यावेळी अंमलात असलेल्या, खाणी व खनिज द्रव्ये (नियमन व विकास) अधिनियम, १९५७ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांचे उपबंध विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यास अशा प्रत्येक ठिकाणी विहित करणे योग्य वाटेल अशा (अशा कोणत्याही उत्खननासाठी फी देणे ही गोष्ट धरून) अटीनुसार असेल त्याशिवाय उत्खनन करता येणार नाही.

७. नियमभंगाबद्दल शास्ती.—या नियमांच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करणारा कोणताही इसम, असे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या इतर कोणत्याही परिणामाशिवाय अशा इसमास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास त्याच्यावर जो दंड लादणे योग्य वाटेल असा एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसणाऱ्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

८. निरसन.—मुंबई जमीन महसूल नियम, (१९२१) याचे नियम ७५, ७६, ७७, ७८ आणि ७९ आणि जमीन महसुलाच्या संबंधातील कोणत्याही विधीअन्वये करण्यात आलेले आणि राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेले कोणतेही तत्सम नियम, त्याअन्वये केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीखेरीज करून, रद्द होतील.

जमिनीच्या उपयोगाचे एका प्रयोजनातून दुसऱ्या प्रयोजनात रूपांतर करण्याकरिता कार्यपद्धती.

४४. (१) (अ) ज्या जमिनीची आकारणी करण्यात आली आहे किंवा जी जमीन शेतीच्या प्रयोजनासाठी धारण केलेली असेल अशा बिनदुमाला जमिनीच्या खातेदाराची किंवा दुमाला जमिनीच्या वरिष्ठ धारकाची, किंवा अशा जमिनीच्या कुळाची तिचा उपयोग अकृषिक प्रयोजनासाठी करण्याची इच्छा असेल तर, किंवा

(ब) जर, जमिनीची आकारणी करण्यात आली असेल किंवा ती विशिष्ट अकृषिक प्रयोजनासाठी धारण केलेली असेल आणि इतर अकृषिक प्रयोजनासाठी तिचा उपयोग करण्याची त्याची इच्छा असेल तर, किंवा

(क) ज्या अकृषिक प्रयोजनाकरिता तिची आकारणी करण्यात आली असेल त्यात्र अकृषिक प्रयोजनासाठी, परंतु, जमीन देतेवेळी किंवा अकृषिक प्रयोजनाकरिता परवानगी देतेवेळी लादलेल्या शर्तींपैकी कोणतीही शर्त शिथिल करून, तिचा उपयोग करण्याची जर त्याची इच्छा असेल तर, अशा खातेदाराने किंवा वरिष्ठ धारकाने किंवा कुळाने, कुळाची किंवा यथास्थिती खातेदाराची किंवा वरिष्ठ धारकांची संमती घेऊन '' विहित केलेल्या नमुन्यानुसार परवानगीसाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे.

(२) जिल्हाधिकाऱ्यास अर्ज मिळाल्यानंतर :—

(अ) त्याने अशा अर्जाची सात दिवसांच्या आत पोच दिली पाहिजे ;

(ब) जिल्हाधिकाऱ्याने अन्यथा निदेश दिला नसेल तर त्यास जर असा अर्ज खातेदाराने, किंवा वरिष्ठ धारकाने किंवा यथास्थिती कुळाने केला नसेल किंवा कुळाची किंवा यथास्थिती खातेदाराची किंवा वरिष्ठ धारकांची संमती मिळविली नसेल, तर किंवा तो विहित केलेल्या नमुन्यानुसार केलेला नसेल तर, तो परत पाठवून देता येईल ;

(क) त्यास योग्य चौकशी केल्यानंतर, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या '' कोणत्याही नियमास अधीन राहून, तो निर्दिष्ट करील अशा शर्तींवर व अटींवर परवानगी देता येईल ; किंवा सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता आणि सुखसोयी यांच्यादृष्टीने किंवा असा उपयोग त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये एखाद्या गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या योजनाबद्ध विकासासाठी अंमलात असलेल्या कोणत्याही योजनेविरुद्ध असल्यास आणि इमारतीच्या जागा म्हणून उपयोगात आणावयाच्या जमिनीच्या बाबतीत, त्याशिवाय अशा जागांची लांबी-रुंदी, व्यवस्था व येण्याजाण्याची सोय, त्यांचा भोगवटा करणाऱ्या इसमांच्या आरोग्याच्या व सुखसोयीच्या दृष्टीने त्या पुरेशा आहेत किंवा लोकवस्तीस सुयोग्य आहेत अशी खात्री करून घेण्याच्या दृष्टीने, अशी परवानगी नाकारता येईल ; परवानगी नाकारण्यात आली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने त्याबाबतची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत.

(३) अर्जाची पोच दिल्याच्या तारखेपासून किंवा अर्जाची पोच दिलेली नसेल तर—अर्ज मिळाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत किंवा जमिनीच्या वापरात तात्पुरता बदल करण्याबाबत केलेला अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत किंवा पोट-कलम (२) च्या खंड (ब) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी एखादा अर्ज परत करण्यात आला असेल त्याबाबतीत तो त्यांचे योग्यरीत्या अनुपालन करून परत सादर केला असेल त्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत* (किंवा यथास्थिती पंधरा दिवसांच्या आत*) जिल्हाधिकाऱ्याने आपला निर्णय अर्जदारास कळविण्यात कसूर केली तर ज्या परवानगीसाठी

---

* हा मजकूर महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ (१९७० चा महाराष्ट्र अधिनियम, (४) यांच्या कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (परिशिष्ट ३९ पहा).

अर्ज करण्यात आला असेल ती परवानगी, राज्य सरकारने अशा वापरासंबंधी केलेल्या नियमांमध्ये विहित केलेल्या कोणत्याही शर्तीस[11] अधीन राहून, देण्यात आल्याचे मानण्यात आले पाहिजे.

(४) या कलमान्वये ज्या इसमास परवानगी देण्यात आली असेल किंवा देण्यात आली आहे असे समजण्यात आले असेल अशा इसमाने, ज्या तारखेस जमिनीचा उपयोग करणाऱ्या इसमामध्ये बदल झाला असेल अशा तारखेपासून तीस दिवसांच्या आत, ती तारीख ग्राम अधिकाऱ्यामार्फत तहसीलदारास लेखी कळविली पाहिजे.

(५) जर असा इसम, पोट-कलम (४) अन्वये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत तहसीलदारास तसे कळविण्यात कसूर करील तर, तो अकृषिक आकारणी देऊन त्याशिवाय, जिल्हाधिकारी यासंबंधी करण्यात आलेल्या नियमास[12] अधीन राहून निदेश देईल त्याप्रमाणे पाचशे रुपयांहून अधिक नसेल असा दंड देण्यास पात्र होईल.

(६) अकृषिक प्रयोजनासाठी जमीन वापरण्यास परवानगी देण्यात येईल तेव्हा नियमान्वये विहित केलेल्या नमुन्यात धारकास त्याबाबतची सनद देण्यात आली पाहिजे.

जिल्हाधिकाऱ्याने स्वत: होऊन किंवा दोष/चूक यामुळे नुकसान पोचलेल्या इसमाने अर्ज केल्यानंतर सनदेमध्ये कोणत्याही आकस्मिक नजरचुकीमुळे किंवा वर्जनामुळे उद्‌भविलेला लेखनदोष किंवा हिशेबातील चूक दुरुस्त करण्याचा निदेश देणे विधिसंमत असेल.

**टीप ३२.**—कलम ११७ खालील टीप क्रमांक ५६ पहा (नियम ३, ४, ५, ६ व ७ पहा.)

परवानगी-शिवाय अशा रीतीने जमिनीचा उपयोग करण्याबद्दल शास्ती.

४५. (१) एका प्रयोजनाकरिता धारण केलेल्या किंवा आकारणी केलेल्या जमिनीचा—

(अ) कलम ४४ अन्वये जिल्हाधिकाऱ्याची परवानगी न मिळविता किंवा त्या कलमान्वये ज्या मुदतीनंतर उपयोग करणाऱ्या इसमामध्ये बदल करण्यास परवानगी देण्यात आल्याचे समजण्यात येईल ती मुदत संपण्यापूर्वी, किंवा ज्या अटीस व शर्तीस अधीन राहून अशी परवानगी देण्यात आली असेल अशा कोणत्याही अटींचे व शर्तींचे उल्लंघन करून, किंवा

(ब) ज्या शर्तीस अधीन राहून अशा जमिनीच्या संबंधात जमीन महसूल देण्याबाबत कोणतीही माफी किंवा सुट दिलेली असेल अशा शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून, दुसऱ्या प्रयोजना-करिता उपयोग करण्यात आला असेल तर, अशा जमिनीचा धारक, किंवा यथास्थिती, त्याच्यामार्फत, किंवा त्याच्या वतीने हक्क सांगणारा कोणताही इसम पुढील शास्तींपैकी एका किंवा अधिक शास्तींना पात्र होईल, म्हणजे—

(एक) बदल केलेल्या वापराच्या संबंधात जमिनीवरील अकृषिक आकारणी देणे ;

(दोन) या अधिनियमाच्या उपबंधान्वये आकारता येईल अशी अकृषिक आकारणी देऊन त्याशिवाय, जिल्हाधिकारी, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमास[11] अधीन राहून निदेश देईल असा दंड देणे ;

(तीन) जिल्हाधिकारी नोटिशीद्वारे निदेश देईल अशा वाजवी कालावधीत अशी जमीन तिच्या मूळ उपयोगात आणणे किंवा ज्या शर्तीवर परवानगी देण्यात आली असेल त्या शर्ती पाळणे ; आणि अशा नोटिशीद्वारे, अशा इसमास कोणतेही बांधकाम काढून टाकण्यास, कोणतीही खोदलेली जमीन भरून काढण्यास, किंवा तिच्या मूळ प्रयोजनासाठी तिचा उपयोग व्हावा यासाठी किंवा शर्ती पुऱ्या व्हाव्या यासाठी आवश्यक असतील अशा इतर उपाययोजना करण्यास भाग पाडता येईल.

**टीप ३३.**—कलम ११७ खालील टीप ५६ पहा (नियम ८ पहा.)

(२) जर कोणताही इसम उपरोक्त नोटिशीमध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीत, जिल्हाधिकाऱ्याने ज्या उपाययोजना करण्यास फर्माविले असेल त्या उपाययोजना करण्यात कसूर करील तर जिल्हाधिकाऱ्यास, अशा इसमावर अशा उल्लंघनाबद्दल तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल असा दंडसुद्धा लादता येईल, आणि ज्या मुदतीत असे उल्लंघन करणे चालू राहिले असेल, अशा मुदतीतील प्रत्येक दिवसास तीस रुपयांपेक्षा

अधिक नसेल असा आणखी दंड करता येईल.—जिल्हाधिकाऱ्यास त्या उपाययोजना स्वत: करता येतील किंवा करवून घेता येतील ; आणि असे करण्याच्या बाबतीत झालेला कोणताही खर्च हा, जणू काही तो जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अशा इसमाकडून वसूल करता येईल.

**स्पष्टीकरण.**—इतर कोणत्याही प्रयोजनाच्या अनुरोधाने जमिनीवर आकारणी करण्यात आली असेल, व अशा जमिनीचा उपयोग शेतीच्या प्रयोजनासाठी करण्यात आला तर, तिच्या उपयोगात बदल करण्यात आला असल्याचे समजण्यात येणार नाही.

दुरुपयोग केल्याबद्दल कुळाची किंवा इतर इसमांची जबाबदारी.

**४६.** जर कोणत्याही धारकाचे कूळ किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्या वतीने हक्क सांगणारा कोणताही इसम, धारकाच्या संमतीवाचून कलमे ४२, ४३ किंवा ४४ च्या उपबंधाचे उल्लंघन करून एखाद्या प्रयोजनासाठी जमिनीचा उपयोग करील व त्यामुळे धारक हा कलमे ४३, ४४ किंवा ४५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल तर यथास्थिती असे कूळ किंवा असा इसम नुकसानीबद्दल धारकास जबाबदार राहील.

कलमे ४२, ४४, ४५ किंवा ४६ यांच्या उपबंधांच्या कक्षेतून जमिनी वगळण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

**४७.** कलमे ४२, ४४, ४५ किंवा ४६ मधील कोणत्याही मजकुरामुळे—

(अ) राज्य सरकारच्या मते या अधिनियमाचे कोणतेही उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी लोकहिताच्या दृष्टीने कोणतीही जमीन किंवा जमिनीचा वर्ग त्या कलमाच्या कोणत्याही उपबंधाच्या कक्षेतून वगळणे आवश्यक असेल तर अशी कोणतीही जमीन किंवा जमिनीचा वर्ग त्या कलमांच्या कोणत्याही उपबंधाच्या कक्षेतून वगळण्यास राज्य सरकारला प्रतिबंध होणार नाही ;

(ब) राज्य सरकारने यासंबंधी केलेल्या नियमास[34] अधीन राहून जिल्हाधिकारी विहित[34] करील अशा अटींवर व शर्तींवर कोणत्याही जमिनीच्या अकृषिक वापराचे नियमानुकूलन करण्यास जिल्हाधिकाऱ्यास प्रतिबंध होणार नाही.

**टीप ३४.**—कलम ११७ खालील टीप क्रमांक ५६ पहा (नियम ९, १० व ११ पहा.)

खाणी व खनिजे यांवरील सरकारचा हक्क.

**४८.** (१) राज्य सरकारने दिलेल्या अनुदानाच्या शर्तीत अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर, सोडून दिलेल्या किंवा चालू असलेल्या सर्व खाणी आणि दगडाच्या खाणी, जुने उकिरडे, खड्डे, शेते, दांध, नाले, खाड्या, नदींची पात्रे आणि अशा इतर जागा धरून, जमिनीवर किंवा जमिनीखाली असलेल्या, कोणत्याही ठिकाणी सापडणाऱ्या खनिजांवरील सरकारचा हक्क स्पष्टपणे राखून ठेवण्यात आला आहे आणि तो स्पष्टपणे राखून ठेवण्यात आला असल्याचे याद्वारे जाहीर करण्यात येत आहे आणि तो सरकार-कडे निहित होईल व अशा हक्कांचा योग्य तो उपभोग घेण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार सर-कारला असतील :

परंतु, ह्या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे अशा खाणीसंबंधी किंवा खनिज पदार्थासंबंधी कोणत्याही इसमांच्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही हक्कास बाध येतो असे समजता कामा नये.

(२) खाणी व दगडाच्या खाणी यावरील हक्कात खाणी आणि इतर दगडाच्या खाणी चालू करण्या-साठी त्या जमिनीवर जाण्याच्या हक्काचा आणि तदनुषंगिक कारणाकरिता जी अन्य जमीन आवश्यक असेल ती कबजात घेण्याच्या हक्काचा समावेश होतो, तसेच ह्या आनुषंगिक कारणात—कार्यालय व मजुरांची घरे उभारणे आणि यंत्रे बसविणे, खनिजांची गंजी लावणे आणि निरुपयोगी वस्तूंचा ढीग करून ठेवणे, रस्ते, रेल्वे व ट्राम-वे बांधणे आणि खाणी व खनिजे यांना आनुषंगिक म्हणून राज्य सरकार घोषित करील अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक अशी जमीन कबजात घेण्याच्या हक्काचाही समावेश होतो.

(३) कोणतीही खनिजे, खाणी किंवा दगडाच्या खाणी यावरील आपल्या हक्काचे राज्य सरकारने जर कोणत्याही इसमाकडे अभिहस्तांकन केले असेल आणि सदरहू हक्काचा योग्य उपयोग घेण्यासाठी पोट-कलम (१) व (२) यात निर्दिष्ट केलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार चालविणे आवश्यक असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे, तो निर्दिष्ट करील अशा शर्तींना व निर्बंधाना अधीन राहून ज्यास असा हक्क अभिहस्तांकित करून दिला असेल त्या इसमाकडे त्या शर्ती सुपूर्द करता येतील :

परंतु, परिणाम होणाऱ्या जमिनीवर ज्यांचे हक्क असतील अशा सर्व इसमांवर रीतसर नोटीस बजावून त्यांच्या हरकती ऐकून घेऊन त्यावर विचार करण्यात येईपर्यंत असे कोणतेही अधिकार सोपविता कामा नये.

(४) वर उल्लेखिलेले हक्क कोणत्याही जमिनीवर अंमलात आणीत असताना त्या जमिनीच्या पृष्ठभागावर कब्जा केल्यामुळे किंवा बिघडल्यामुळे जर कोणत्याही इसमांच्या हक्कांचे उल्लंघन होत असेल तर सरकारने किंवा त्याच्या अभिहस्तांकितीने अशा उल्लंघनाबद्दल त्या इसमांना नुकसानभरपाई दिली पाहिजे आणि कबुलायती न झाल्यास अशा नुकसानभरपाईची रक्कम जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याचा निवाडा मान्य न झाल्यास दिवाणी न्यायालयाने, भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा अधिनियम क्रमांक एक) याच्या उपबंधास अनुसरून ठरविली पाहिजे.

(५) ज्यांच्या हक्काचे उल्लंघन होते त्या इसमांना द्यावयाची नुकसानभरपाई ठरवून ती त्यांना देण्यात येत नाही तोपर्यंत राज्य सरकारच्या कोणत्याही अभिहस्तांकितीने जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय कोणत्याही जमिनीच्या पृष्ठभागावर प्रवेश करता कामा नये किंवा त्याचा भोगवटा करता कामा नये :

परंतु, ज्या प्रकरणात पोट-कलम (४) अन्वये नुकसानभरपाईची रक्कम ठरविण्याचा प्रश्न दिवाणी न्यायालयाकडे निर्णयार्थ पाठविण्यात आला असेल अशा प्रकरणात अशा न्यायालयाकडून निवाडा देण्यात येईपर्यंत जिल्हाधिकाऱ्याने मध्यंतरीय परवानगी देणे हे विधिसंमत असेल.

(६) राज्य सरकारचा अभिहस्तांकिती कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्यात कसूर करील तर जिल्हाधिकाऱ्यास, नुकसानभरपाई मिळविण्याचा हक्क असलेल्या इसमांच्यावतीने अशी नुकसानभरपाई जणू जमीन महसुलाची थकबाकी आहे असे समजून ती त्याच्याकडून वसूल करता येईल.

(७) जर कोणताही इसम वैध प्राधिकारावाचून ज्यावरील हक्क राज्य सरकारमध्ये निहित झाला आहे व राज्य सरकारने त्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा चालू असलेल्या किंवा सोडून दिलेल्या खाणी, दगडाच्या खाणी, जुने उकिरडे, शेते, बांध (शेताच्या बंधाऱ्याची दुरूस्ती किंवा बांधकाम करण्याच्या सबबीवरून किंवा इतर कोणत्याही सबबीवरून), नाले, खाड्या, नदींची पात्रे, किंवा इतर कोणत्याही जागा यामधून कोणतेही खनिज काढील, हलवील, गोळा करील, दुसऱ्या जागी नेईल, उचलून घेईल किंवा त्याची विल्हेवाट लावील तर, त्याच्याविरुद्ध अन्य पद्धतीने जी कोणतीही कारवाई करण्यात येईल त्यास बाध न येता, तो, अशा प्रकारे यथास्थिती, काढलेल्या, हलविलेल्या, गोळा केलेल्या, दुसऱ्या जागी नेलेल्या, उचलून घेतलेल्या किंवा विल्हेवाट लावलेल्या खनिजाच्या बाजार मूल्याच्या तिपटीहून जास्त नसेल अशी ठरविण्यात येईल इतकी रक्कम जिल्हाधिकाऱ्याने लेखी आदेश दिल्यावर देण्यास पात्र असेल :

परंतु, अशारीतीने ठरविलेली रक्कम एक हजार रुपयांहून कमी असेल तर, एक हजार रुपयांहून अधिक नसेल अशी तीपेक्षा कोणतीही मोठी रक्कम दंड म्हणून लादण्याचा जिल्हाधिकाऱ्यास अधिकार आहे.

(८) पोट-कलम (७) च्या उपबंधास बाध येऊ न देता, ज्यावरील हक्क राज्य सरकारकडे निहित आहे व राज्य सरकारने ज्याचे अभिहस्तांकन केलेले नाही अशा, कोणत्याही खाणीतून, दगडाच्या खाणीतून किंवा पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही जागेतून काढलेले, हलविलेले, गोळा केलेले, दुसऱ्या जागी नेलेले, उचलून घेतलेले किंवा विल्हेवाट लावलेले कोणतेही खनिज ताब्यात घेण्याचा व सरकारजमा करण्याचा जिल्हाधिकाऱ्यास अधिकार आहे.

(९) गाव, नगर किंवा शहर यातील रहिवाश्यांना त्यांच्या घरगुती शेतीसाठी किंवा धंद्यासाठी आवश्यक असलेली गौण खनिजे, नियमात निर्दिष्ट करण्यात येईल अशी फी देऊन किंवा विनामूल्य काढून नेणे किंवा हलविणे याचे नियमन करण्यासाठी नियम करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी "गौण खनिजे" म्हणजे खाणी व खनिजे (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ याच्या कलम १५ अन्वये राज्य सरकारला ज्या गौण खनिजासंबंधी नियम करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली आहे ती गौण खनिजे.

**टीप ३५.**——गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे यासंबंधीचे नियम.

[शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ्.-१५६७ (जे), आर, दिनांक १९ नोव्हेंबर १९६९ शासकीय अधिसूचना क्रमांक यू.एन.एफ्.-१५६७ (जे). आर, दिनांक १४-१-१९७१ आणि शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ.-१५६७ (जे) आर, दिनांक २६-५-१९७१, शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ.-१५६७ (जे) आर, दिनांक ९-२-१९७२ याअन्वये सुधारण्यात आलेली शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ.-१५६७ (जे) आर, दिनांक २९ ऑक्टोबर १९६८.]

१. **संक्षिप्त नाव.**——या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ असे म्हणता येईल.

२. **गावकऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या उपयोगाकरिता गौण खनिजे काढणे.**——या नियमाच्या उपबंधास अधीन राहून, तलाठ्याच्या लेखी पूर्वपरवानगीने परंतु कोणतीही फी न देता, कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या कोणत्याही रहिवाशास, त्याच्या घरगुती किंवा शेतीविषयक प्रयोजनासाठी समुद्राच्या तळातून किंवा कलम २२ अन्वये अभिहस्तांकित न केलेल्या व आकारणी न केलेल्या कोणत्याही सरकारी पडीत जमिनीतून किंवा ज्यासंबंधीचा अधिकार राज्य शासनाकडे निहित असेल अशा कोणत्याही तळ्यातून कोणतीही माती, दगड, कंकर, बारीक खडी, वाळू किंवा मुरूम किंवा इतर कोणताही माल त्यापैकी प्रत्येक गोष्ट गौण खनिज असेल, तो ज्यात राहत असेल किंवा ज्या जमिनीच्या फायद्यासाठी माल आवश्यक असेल ती जमीन ज्यात असेल अशा गावाच्या, शहराच्या किंवा नगराच्या हद्दीत, काढता येईल :

परंतु, काढण्यात येणाऱ्या जांभा दगडाचे मूल्य पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल आणि इतर बाबतीत ते पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नसेल :

आणखी असे की, कोणत्याही तलावाच्या तटाचे जे कोणतेही दगड त्यात पडले असतील ते काढता येणार नाहीत. आणि अशा कोणत्याही तलावाच्या बंधाऱ्याच्या पायथ्यापासून ४·५ मीटरच्या आत कोणतेही उत्खनन करता येणार नाही :

तसेच, अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या मुदतीत पूर्वपरवानगी देण्यात तलाठी कसूर करील त्याबाबतीत ज्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल ती परवानगी नियम ६ च्या उपबंधास अधीन राहून दिल्याचे समजण्यात येईल.

३. **विहीर वगैरे बांधण्याकरिता दगड वगैरे काढणे.**—(१) या नियमांच्या उपबंधाच्या अधीन राहून, असे दगड, कंकर, वाळू, मुरूम किंवा इतर कोणताही माल (यापैकी प्रत्येक गोष्ट गौण खनिज असेल) ज्या तहसिलदाराच्या किंवा नायब-तहसिलदाराच्या अधिकारक्षेत्रात असेल त्याच्या आगाऊ लेखी परवानगीने व कोणतीही फी न देता, एखाद्या खेड्याच्या, नगराच्या किंवा शहराच्या कोणत्याही रहिवाश्यास विहीर बांधण्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्याच्या घरगुती किंवा शेतीविषयक प्रयोजनार्थ (पण विक्रीसाठी किंवा वैयक्तिक फायद्यासाठी नव्हे) नियम २ मध्ये निर्दिष्ट केलेल्या (तलाव नसलेल्या) साधनांपैकी कोणत्याही साधनापासून असा माल काढता येईल :

परंतु, काढावयाच्या मालाचे मूल्य घरगुती किंवा शेतीविषयक प्रयोजनासाठी आवश्यक असल्यास पन्नास रुपयांपेक्षा अधिक असणार नाही व विहीर बांधण्याच्या प्रयोजनाकरिता असल्यास शंभर रुपयांपेक्षा अधिक असणार नाही :

आणखी असे की, कोणतेही जांभा दगड विहीर बांधण्याच्या प्रयोजनार्थ किंवा घरगुती किंवा शेतीविषयक प्रयोजनार्थ काढावयाचे असतील त्याबाबतीत त्यांचे मूल्य पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल :

तसेच, तहसिलदार किंवा यथास्थिती, नायब-तहसिलदार, अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अर्जदारास त्याचा निर्णय कळविण्यात कसूर करील तर ज्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल ती परवानगी नियम ६ च्या उपबंधास अधीन राहून दिल्याचे समजण्यात येईल.

(२) असा कोणताही माल, ती व्यक्ती ज्या तालुक्यात रहात असेल त्याव्यतिरिक्त इतर तालुक्यात असेल किंवा ज्या जमिनीच्या फायद्याकरिता तो माल, आवश्यक असेल, ती जमीन ज्या तालुक्यात असेल त्या तालक्याव्यतिरिक्त इतर तालुक्यात असेल तर पोट-नियम (१) खालील परवानगी, ज्या तहसिलदाराच्या अधिकार क्षेत्रात अशी व्यक्ती रहात असेल किंवा अशी जमीन असेल त्या तहसिलदाराच्या सहमतीनेच देण्यात येईल.

४. **विटा तयार करणे, इत्यादिकरिता उत्खनन.**—नियम ५ च्या उपबंधास अधीन राहून, तहसिलदाराच्या किंवा नायब-तहसिलदाराच्या आगाऊ लेखी परवानगीने व कोणतीही फी न देता, कोणत्याही कुंभारास किंवा विटा, किंवा कौले तयार करणारास, त्याच्या व्यवसायाच्या प्रयोजनासाठी, समुद्राच्या तळातून किंवा कोणतीही खाडी, नदी, नाला यांच्या पात्रातून किंवा तो ज्या गावात रहात असेल त्या गावाच्या हद्दीतील कलम २२ अन्वये अभिहस्तांकित न केलेल्या व आकारणी न केलेल्या कोणत्याही सरकारी पडीत जमिनीतून माती, दगड, कंकर, वाळू, मुरूम किंवा इतर कोणताही माल (यापैकी प्रत्येक गोष्ट गौण खनिज असेल) काढता येईल :

परंतु, कोणत्याही कुंभाराकडून किंवा विटा किंवा कौले तयार करणाऱ्या व्यक्तीकडून चालविण्यात येणारा व्यवसाय पुरेसा व्यापक आहे किंवा (अशा व्यवसायापासून मिळालेले उत्पन्न विचारात घेता) लाभप्रद आहे आणि अशा कुंभाराला किंवा विटा तयार करणाऱ्याला असा माल विनामूल्य काढण्यास परवानगी देऊ नये असे तहसिलदाराचे किंवा नायब-तहसिलदाराचे मत असेल तर, तो असा माल काढण्यास परवानगी नाकारील आणि राज्याच्या कोणत्याही भागात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या खाणी व खनिजे (नियमन व विकास) अधिनियम १९५७ अन्वये तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यास ते प्रकरण निकालाकरिता पाठविता येईल.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनार्थ कोणताही कुंभार किंवा विटा अथवा लाद्या तयार करणारी व्यक्ती करीत असलेला व्यवसाय अशा व्यवसायामध्ये तयार करण्यात आलेल्या मालाचे वार्षिक मूल्य वीस हजारापेक्षा कमी नसेल तर, तो व्यवसाय व्यापक स्वरूपाचा व लाभप्रद असल्याचे समजण्यात येईल.

५. **बंदराच्या सीमांमधील उत्खनने.**—नियम ७ च्या उपबंधास अधीन राहून, कोणत्याही तलाठ्यास, तहसिलदारास किंवा नायब-तहसिलदारास, बंदराच्या हद्दीमधील किंवा कोणत्याही बंदराच्या काठावरील किंवा किनाऱ्यावरील जमिनीतून, नियम २, ३ किंवा ४ अन्वये मीठ आयुक्तांच्या लेखी सहमतीखेरीज आणि त्यांच्याकडून लादण्यात येतील अशा शर्तीअन्वये, असेल ते खेरीजकरून कोणताही माल काढण्यास परवानगी देता येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनाकरिता "मीठ आयुक्त" या संज्ञेचा अर्थ, केंद्रीय उत्पादन-शुल्क आणि मीठ अधिनियम, १९४४ अन्वये तयार करण्यात आलेले केंद्रीय उत्पादनशुल्क नियम, १९४४ याअन्वये मीठाच्या संबंधात जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी ज्याला शक्ती प्रदान करण्यात आल्या आहेत असा मीठ आयुक्त असा समजावा.

६. **विवक्षित प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी आवश्यक असणे.**—नियम २, ३, ४ किंवा ५ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जिल्हाधिकारी त्याला योग्य वाटतील अशा प्रकरणामध्ये किंवा अशा प्रकरणांमध्ये त्याची पूर्वमंजुरी मिळविल्याशिवाय, तलाठ्यास, तहसिलदारास किंवा यथास्थिती, नायब-तहसिलदारास परवानगी देण्यास मनाई करू शकेल आणि अशा कोणत्याही बाबतीत, परवानगीसाठी केलेले सर्व अर्ज आदेशांकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविले जातील.

७. **विवक्षित बाबतीत उत्खननास प्रतिबंध करणे.**—ह्या नियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अधिनियमाच्या किंवा या नियमांच्या उपबंधान्वये परवानगी दिलेल्या जमिनीच्या उत्खननामुळे कोणत्याही इमारतीस किंवा जमिनीस (अशी जमीन उत्खननास परवानगी दिलेली जमीन नसेल) किंवा

कोणत्याही सीमाचिन्हास नुकसान पोहोचण्याचा किंवा ती नष्ट होण्याचा संभव आहे असे मिळालेल्या माहितीवरून किंवा केलेल्या कोणत्याही चौकशीवरून तहसिलदाराचे मत असेल तर, अशा उत्खननाच्या कोणत्याही बाबतीत तो, परवानाधारकास तसे कळवील आणि त्या इमारतीस किंवा जमिनीस किंवा यथास्थिती सीमाचिन्हास नुकसान पोहोचणार नाही अशारीतीने जमिनीचे उत्खनन पार पाडण्यास त्यास फर्मावील आणि बाबीसंबंधी जिल्हाधिकाऱ्यास कळवील.

८. **नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती.**—या नियमांच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधाचा भंग करणारी कोणतीही व्यक्ति, अशा भंगामुळे होणाऱ्या कोणत्याही इतर परिणामांखेरीज आणखी, अशा व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, जो दंड लादणे जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल असा, एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल :

परंतु, नियम २ अन्वये आवश्यक असलेली तलाठ्याची परवानगी न मिळविता जी व्यक्ती, पन्नास रुपयापेक्षा अधिक नसेल एवढ्या किंमतीचे जांभा दगड आणि इतर बाबतीत पंचवीस रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढ्या किंमतीची गौण खनिजे काढील ती व्यक्ती खाणी व खनिजे (नियमन व विकास) अधिनियम, १९५७ अन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधान्वये, अशा प्रकारे काढलेल्या खनिजावर आकारणी योग्य असलेल्या स्वामित्वधनाच्या रकमेएवढ्या रकमेच्या दंडास पात्र असेल.

४९. (१) एखाद्या पाण्याच्या साधनातून (ज्या मधून पाणी घेण्यास परवानगी देण्यात आली आहे असे सरकारच्या स्वाधीन असलेले कोणतेही पाण्याचे साधन धरून) पाणी घेण्याचा ज्यास हक्क आहे अशा कोणत्याही इसमाची (ज्यास यापुढे अर्जदार असे म्हटले आहे) उक्त साधनातून शेतीच्या कारणाकरिता, आपल्या जमिनीस पाणीपुरवठा करण्यासाठी, पाण्याचा पाट बांधण्याची इच्छा असेल परंतु असा पाण्याचा पाट दुसऱ्या इसमाच्या (ज्यास यापुढे शेजारचा जमीनधारक असे म्हटले आहे) मालकीच्या किंवा कबज्यात असलेल्या जमिनीमधून बांधावयाचा असेल आणि अशा बांधकामाबद्दल अर्जदार व शेजारचा जमीनधारक यामध्ये कोणतीही कबुलायत झाली नसेल तर पाण्याचा पाट बांधण्याची इच्छा असणाऱ्या इसमास" विहित केलेल्या नमुन्यात तहसिलदाराकडे अर्ज करता येईल.

इतर इसमाच्या स्वाधीन असलेल्या जमिनीतून पाण्याचे पाट बांधणे.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनासाठी शेजारची जमीन धारण करणारा इसम या संज्ञेत ज्याच्या मालकीची जमीन असेल त्या इसमाच्या व त्याच्यामार्फत किंवा त्याच्यावतीने ती धारण करणाऱ्या सर्व इसमांचा समावेश होतो.

**टीप ३६.**—पाण्याचे पाट बांधण्यासंबंधीचे नियम.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना "महाराष्ट्र जमीन महसूल (पाण्याचे पाट बांधणे) नियम, १९६७" असे म्हणता येईल.

शासकीय अधिसूचना क्र.यु.एन.एफ.-१५६७ (के)-आर,दि.२१-८-१९६७.

२. **पाण्याचा पाट बांधण्यासाठी अर्ज.**—शेजारच्या जमीन धारकाच्या मालकीच्या जमिनीतून पाण्याचा पाट बांधण्यासाठी कलम ४९, पोट-कलम (१) अन्वये करावयाचा अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात करण्यात येईल :—

**नमुना**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम ४९, पोट-कलम (१) अन्वये पाण्याचा पाट बांधण्यासाठी तहसिलदाराकडे करावयाचा अर्ज.

तहसिलदार, .................................................. यांस,

अर्जदाराचे नाव ..............................................................................

वय ........ व्यवसाय .............................. राहण्याचे ठिकाण ..............................

..........................................................................................

शेजारच्या जमीन धारकाचे नाव ..........................................

वय ........ व्यवसाय ........................ राहण्याचे ठिकाण ..........................

..........................................................................

मी खालील जमिनीचा धारक आहे :—

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक | पोट-हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | आकारणी | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | रु. पैसे | |

वर उल्लेखिलेल्या माझ्या जमिनीच्या जलसिंचनासाठी पाण्याच्या पुढील साधनातून पाणी घेण्याचा मला हक्क आहे :—

..........................

(येथे पाण्याच्या साधनाचा तपशील द्यावा.)

..........................

हे पाणी घेण्यासाठी, शेजारचे जमीनधारक असणारे ..................................
यांच्या साध्यातील किंवा .................................... यांच्या मालकीच्या पुढील जमिनीमधून पाण्याचा पाट बांधणे आवश्यक आहे:—

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक | पोट-हिस्सा | क्षेत्रफळ | आकारणी | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | रु. पैसे | |

माझ्या जमिनीचा शेतीसाठी पूर्णपणे आणि कार्यक्षमरीतीने उपयोग करण्यासाठी पाण्याचा पाट बांधणे आवश्यक आहे.

जमिनीसंबंधीचे अधिकार अभिलेखातील उतारे जोडले आहेत. म्हणून, मी विनंती करतो की, उक्त जमिनीमधून पाण्याचा पाट बांधण्यासाठी मला परवानगी देण्याबद्दल शेजारच्या जमीनधारकास निदेश देण्यात यावा.

आपला,

दिनांक .................. १९ . अर्जदाराची सही.

टीप.—(१) नदीच्या पात्राचा भाग असणाऱ्या जमिनीच्या बाबतीत अधिकार अभिलेखातील उतारे जोडण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर आणि अर्जदाराच्या मालकीच्या जमिनीचा शेतीसाठी पूर्णत: व कार्यक्षम रीतीने उपयोग होण्यासाठी पाण्याचे पाट बांधणे आवश्यक आहे अशी तहसिलदाराची, चौकशी केल्यानंतर व शेजारची जमीन धारण करणाऱ्या इसमास व जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व इसमांस अर्जासंबंधी कोणतीही हरकत असेल ती नमूद करण्याची संधि दिल्यानंतर, खात्री झाली तर, त्यास, लेखी आदेशाद्वारे,पुढील शर्तीवर, पाण्याचे पाट बांधण्याची अर्जदारास परवानगी देण्याविषयी, शेजारचा जमीन धारण करणाऱ्या इसमास निदेश देता येईल ; त्याअर्थी, अशा :—

(एक) पक्षकारामध्ये कबूलायत होईल अशा दिशेस व अशा रीतीने किंवा कबूलायत झाली नसल्यास, ज्या जमिनीतून उक्त पाट बांधण्यात येतील त्या जमिनीची ज्यामुळे कमीतकमी नुकसान होईल अशा रीतीने, तहसीलदाराकडून निर्देशित करण्यात आल्याप्रमाणे अशा जमिनीतून पाण्याचे पाट बांधण्यात यतील.

(दोन) असे पाण्याचे पाट जमिनीखालील किंवा जमिनीवरील नळाचे स्वरूपातील असतील त्या बाबतीत शेजारची जमीन धारण करणाऱ्या इसमाच्या जमिनीची सर्व परिस्थिती विचारात घेऊन, असा नळ अशा जमिनीमधून शक्यतोवर कमीत कमी अंतरावर टाकण्यात आला पाहिजे. असे पाण्याचे पाट जमिनीखालील नळाच्या स्वरूपातील असतील त्याबाबत, असे नळ जमिनीच्या पृष्ठ-भागापासून अर्ध्या मीटरहून कमी नसेल इतक्या खोलीवर टाकण्यात आले पाहिजेत ;

(तीन) असा पाण्याचा प्रवाह पाण्याच्या पाटाच्या स्वरूपात असेल त्याबाबत, अशा पाटाची रुंदी, पाणी वाहून नेण्यासाठी पूर्णत: आवश्यक असेल अशा रुंदीपेक्षा जास्त असता कामा नये आणि कोणत्याही बाबतीत ती दीड मीटरापेक्षा अधिक असता कामा नये ;

(चार) अर्जदाराने, शेजारच्या जमीनधारकास--

(अ) अशा जमिनीवर प्रतिकूल परिणाम करणारे पाण्याचे पाट बांधल्यामुळे अशा जमिनीचे जे कोणतेही नुकसान झाले असेल त्याबद्दल नुकसानभरपाई ; आणि

(ब) पाण्याचे प्रवाह हे पाण्याच्या पाटाच्या व जमिनीवर घालण्यात आलेल्या नळाच्या स्वरूपातील असतील त्याबाबतीत तहसीलदार या प्रकरणात वाजवी म्हणून ठरवील असे वार्षिक भाडे ; आणि असा प्रवाह जमिनीखालील नळाचे स्वरूपातील असेल त्या बाबतीत, ज्या जमिनीखालून नळ घालण्यात आला असेल त्या जमिनीच्या एकूण लांबीबद्दल प्रत्येक दहा मीटर्सला किंवा त्याच्या भागासाठी २५ पैसे या दराने भाडे दिले पाहिजे ;

(पाच) अर्जदाराने, पाण्याचे पाट योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवले पाहिजेत ;

(सहा) पाण्याचा पाट हा जमिनीखालून टाकलेल्या नळाच्या स्वरूपाचा असेल त्याबाबतीत अर्जदाराने—

(अ) शक्यतो कमी विलंब लावून जमिनीखालून असा नळ टाकण्याची व्यवस्था केली पाहिजे ;

(ब) जमिनीखालून नळ टाकण्याच्या प्रयोजनासाठी वाजवीरीत्या आवश्यक तेवढ्या जमिनीहून अधिक नसेल इतकी जमीन खोदली पाहिजे आणि अशा रीतीने खोदलेली कोणतीही जमीन शेजारची जमीन धारण करणाऱ्या इसमाच्या उपयोगासाठी अर्जदाराने स्वखर्चाने भरून काढली पाहिजे ; पूर्ववत केली पाहिजे आणि व्यवस्थित करून दिली पाहिजे ;

(सात) जेव्हा नळ टाकण्याची, तो दुरुस्त करण्याची किंवा त्याचे नवीकरण करण्याची अर्जदाराची इच्छा असेल तेव्हा त्याने आपला तसे करण्याचा इरादा आहे यासंबंधी शेजारची जमीन धारण करणाऱ्या इसमास वाजवी नोटीस दिल्यानंतर तसे केले पाहिजे आणि तसे करताना त्या जमिनीस किंवा त्यावरील कोणत्याही उभ्या पिकांना शक्यतो कमी नुकसान पोहोचविले पाहिजे ;

(आठ) तहसिलदारास ज्या शर्ती घालणे योग्य वाटेल अशा इतर शर्ती.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशात शेजारची जमीन धारण करणारा व अशा जमिनीत हितसंबंध असलेले सर्व इसम यांच्यामध्ये नुकसानभरपाईची रक्कम कशी विभागून द्यावयाची हे निर्दिष्ट केलेले असले पाहिजे.

(४) पोट-कलम (२) अन्वये दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल आणि अशा आदेशावरून त्याला किंवा त्याच्या कोणत्याही अभिकर्त्याला किंवा त्या कारणाकरिता त्याने कामावर लावलेल्या इतर इसमाला मदतनीस किंवा कामगार घेऊन आदेशात निर्दिष्ट केलेल्या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी आणि पाण्याचा पाट बांधण्याकरिता व त्याचे नवीकरण करण्याकरिता किंवा तो दुरुस्त करण्याकरिता आवश्यक असे सर्व काम करण्यासाठी संपूर्ण अधिकार मिळेल.

(५) पोट-कलम (२) अन्वये ज्याच्या बाजूने आदेश देण्यात आला असेल असा अर्जदार जर—

(अ) नुकसानभरपाईची रक्कम देण्यात किंवा खंडाची रक्कम देण्यात कसूर करील तर, अशी रक्कम मिळण्याचा ज्यास हक्क असेल अशा इसमाने तहसीलदाराकडे अर्ज केल्यावर, ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल ;

(ब) पाण्याचा पाट योग्य व दुरुस्त स्थितीत ठेवण्यात कसूर करील तर, तो इसम, अशा कसुरीमुळे जे कोणतेही नुकसान होईल त्याबद्दल तहसीलदाराकडून ठरविण्यात येईल अशी नुकसानभरपाई देण्यास पात्र होईल.

(६) एखाद्या इसमास या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार बांधलेला पाण्याचा पाट काढून टाकण्याचा किंवा फरण्याचा त्याचा इरादा असेल तर , त्यास, तहसीलदारास व शेजारची जमीन धारण करणाऱ्या इसमास नोटीस दिल्यानंतर, तसे करता येईल.

असा पाण्याचा पाट काढून टाकल्यास किंवा बंद केल्यास, त्यातून पाणी घेणाऱ्या इसमाने शक्यतो कमी विलंब लावून, स्वखर्चाने जमीन भरून काढली पाहिजे व पूर्ववत केली पाहिजे. तो तसे करण्यात कसूर करील, तर, शेजारची जमीन धारण करणाऱ्या इसमास तहसीलदाराकडे अर्ज करता येईल व तहसीलदार अशा इसमास जमीन भरून ती पूर्ववत करण्यास भाग पाडील.

(७) शेजाराची जमीन धारण करणाऱ्या इसमास किंवा त्याच्यावतीने कोणत्याही इसमास, उभय पक्षकारांमध्ये कबुलायत करून ठरविण्यात येतील असे दर देऊन व अशी कबुलायत झाली नाही तर, तहसीलदार ठरवील असे दर देऊन, पाण्याच्या पाटातील जादा पाण्याचा उपयोग करण्याचा हक्क असेल. पाण्याच्या पाटात जादा पाणी आहे किंवा नाही याविषयी विवाद उद्भवल्यास त्याचा निर्णय तहसीलदाराने केला पाहिजे व तहसीलदाराचा निर्णय अंतिम असेल.

(८) तहसीलदाराने ह्या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध अपील करता येणार नाही परंतु, जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही प्रकरणासंबंधीचे कागदपत्रे मागविता येतील व त्यांची तपासणी करता येईल आणि तहसीलदाराने दिलेला आदेश हा अवैध किंवा अयोग्य आहे असे त्यास वाटत असेल तर, त्यास, उभय पक्षांना नोटीस दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(९) तहसीलदाराने किंवा जिल्हाधिकाऱ्याने या कलमान्वये दिलेल्या आदेशास कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही.

(१०) जिल्हाधिकारी किंवा भू-मापन अधिकारी, तहसीलदार किंवा नायब-तहसीलदार यांच्या पुढील संक्षिप्त चौकशीनंतर ज्या कोणत्याही इसमाने, ह्या कलमान्वये योग्यरीत्या बांधलेल्या किंवा टाकलेल्या कोणत्याही पाण्याच्या पाटास हेतु:पुरस्सर इजा किंवा नुकसान पोहोचविल्याचे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, तो, अशा रीतीने इजा किंवा नुकसान पोहोचविल्याबद्दल प्रत्येक वेळी शंभर रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडास पात्र होईल.

### जमिनीवरील अतिक्रमणासंबंधी

५०. (१) राज्य सरकारमध्ये निहित असलेल्या कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या सरकारमध्ये
प्रदेशावर (मग तो कोणत्याही स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या प्रभाराखाली असो किंवा नसो) अतिक्रमण निहित अत-
करण्यात आले असेल त्याबाबतीत किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय, अशा जमिनीवर वस्तू फेरीने सेल्या जमि-
विकण्याच्या किंवा विक्री करण्याच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणल्या जाणाऱ्या कोणत्याही जमिनीवर नीवर अति-
करण्यात आलेल्या अतिक्रमणाच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने संक्षिप्तरीत्या चौकशी करून असे कोणतेही क्रमण दूर
अतिक्रमण बंद करणे किंवा दूर करणे किंवा फेरीने विकण्यात येणारी किंवा विक्रीसाठी ठेवलेली वस्तू टाका- करणे ;
वयास लावणे हे विधिसंमत असेल ; आणि त्यासाठी आलेला खर्च, ज्या जमिनीवर उपरोक्तप्रमाणे अति- शास्ती व
क्रमण करण्यात आले असेल ती जमीन भोगवट्यात असलेल्या किंवा वापरणाऱ्या इसमाकडून वसूल करण्यात इतर आनु-
येईल. षंगिक बाबी
यासाठी
उपबंध.

(२) ज्या इसमाने असे अतिक्रमण केले असेल किंवा अशा अतिक्रमण केलेल्या जमिनीचा अनधिकृत भोगवटा करीत असेल त्या इसमाने, जर अतिक्रमण केलेली जमीन ही आकारणी केलेल्या भू-मापन क्रमांकाचा भाग असेल तर, अतिक्रमणाच्या कालावधीसाठी त्या संपूर्ण भू-मापन क्रमांकाची आकारणी दिली पाहिजे आणि अशा जमिनीवर आकारणी करण्यात आली नसेल तर, त्याच गावातील तशाच प्रकारच्या तितक्याच आणि त्याच कारणासाठी उपयोग करण्यात येत असलेल्या जमिनीवर उक्त कालावधीसाठी आकारणीची जी रक्कम आकारता आली असती अशी रक्कम दिली पाहिजे. त्याशिवाय आणखी अशा इसमाने, जर ती जमीन शेतीच्या कारणासाठी वापरली जात असेल तर, पाच रुपयांहून कमी नसेल, परंतु एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतका दंड व शेतीव्यतिरिक्त अन्य कारणासाठी उपयोगात आणली जात असेल तर, दोन हजार रुपयांहून अधिक नसेल असा दंड दिला पाहिजे. वस्तू फेरीने विकत असताना किंवा विक्री करीत असताना पकडला गेलेला इसम हा, जिल्हाधिकारी ठरवील अशी पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतकी दंडाची रक्कम देण्यास पात्र असेल.

(३) जिल्हाधिकाऱ्यास, ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये योग्य रीतीने नोटीस बजावून, अशा कोणत्याही जमिनीवरील अतिक्रमणास प्रतिबंध करता येईल किंवा ते बंद करण्यास किंवा दूर करण्यास सांगता येईल ; आणि त्याने अशा नोटिशीत, ती देण्यात आल्यानंतर वाजवी मुदत देऊन, ती नोटीस ज्या तारखेस अंमलात येईल ती तारीख ठरविली पाहिजे.

(४) जो कोणताही इसम पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या नोटिशीत उल्लेखिलेल्या कोणत्याही जमिनीवर कोणतेही अतिक्रमण करील, करवील, करण्यास परवानगी देईल किंवा करणे चालू ठेवील असा प्रत्येक इसम, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दंडाशिवाय, नोटीस अंमलात येण्यासाठी ठरविलेल्या तारखेनंतर ज्या ज्या दिवशी असे अतिक्रमण चालू ठेवण्यात आले असेल त्या प्रत्येक दिवसासाठी, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वविवेकानुसार, शेतीच्या प्रयोजनासाठी अतिक्रमण करण्यात आले असेल त्याबाबतीत पंचवीस रुपयांहून अधिक नसेल इतका आणि इतर बाबतीत पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतका दंड देण्यास पात्र होईल.

(५) जिल्हाधिकाऱ्याने ह्या कलमान्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध ह्या अधिनियमाच्या उपबंधानुसार अपील आणि फेरतपासणी होऊ शकेल.

(६) पोट-कलम (१) ते (४) मधील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही इसमास या अधिनियमानुसार अंतिम आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत दिवाणी न्यायालयात त्याचा हक्क प्रस्थापित करण्यास प्रतिबंध होणार नाही.

अतिक्रमणांचे नियमानुकूलन.

५१. कलम ५० मधील कोणत्याही गोष्टीमुळे, जिल्हाधिकाऱ्यास, जर अतिक्रमण करणाऱ्या इसमाची तशी इच्छा असेल तर, असे अतिक्रमण करण्यात आलेल्या जमिनीच्या किंमतीच्या पाच पटीहून अधिक नसेल अशी रक्कम उक्त इसमावर आकारण्यास आणि त्या जमिनीवरील सर्वसाधारण वार्षिक जमीन महसुलाच्या पाच पटीहून अधिक नसेल इतकी आकारणी निश्चित करण्यास आणि याबाबतीत केलेल्या नियमांस अधीन राहून जिल्हाधिकारी लादील अशा अटींवर व शर्तींवर, अतिक्रमण करणाऱ्या इसमास जमीन देण्यास आणि त्यानंतर उक्त जमिनीची नोंद भूमि अभिलेखामध्ये उक्त इसमाच्या नावे करण्याची व्यवस्था करण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, जिल्हाधिकाऱ्याने , त्यास योग्य वाटेल अशा रीतीने जमीन देण्याबद्दलचा आपला उद्देश असल्याची जाहीर नोटीस दिल्याखेरीज आणि उपरोक्तप्रमाणे जमीन देण्यापूर्वी त्याच्याकडे येतील अशा हरकतींवर व सूचनांवर विचार केल्याखेरीज वर उल्लेखिल्याप्रमाणे कोणतीही जमीन देण्यात येणार नाही. अशी जाहीर नोटीस देण्यासाठी आलेला खर्च अतिक्रमण करणाऱ्या इसमाकडून देण्यात येईल आणि मागणी करण्यात आल्यानंतर वाजवी मुदतीत खर्च देण्यात तो कसूर करील तर, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे तो त्याचेकडून वसूल करण्यात येईल.

टीप ३७.—सरकारी जमिनींची विल्हेवाट करण्यासंबंधीचे नियम (याचप्रमाणे टीपा १, २९, ३० व ४२ पहा.) (नियम ४३, ४४ व ४५ पहा. मुंबई शहराकरिता पहा.)

## सरकारी जमिनींची विल्हेवाट लावण्यासंबंधीचे नियम

[शासकीय अधिसूचना क्रमांक युएनएफ-१५६७-आर, दिनांक १० एप्रिल १९७२ आणि शासकीय सूचना क्रमांक युएनएफ-१५६७-२३३५९४-आर-(स्पेशल), दिनांक २७ डिसेंबर १९७२ याद्वारे सुधारलेली शासकीय अधिसूचना क्रमांक युएनएफ-१५६७-आर, दिनांक १५ मे १९७१.]

### भाग १

### सर्वसाधारण

१. संक्षिप्त नाव.—या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ असे म्हणता येईल.

२. व्याख्या.—या नियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर—

(अ) "मागास वर्ग" म्हणजे, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौद्ध, परिशिष्ट एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विमुक्त जाती, परिशिष्ट दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भटक्या जमाती व परिशिष्ट तीनमध्ये विनिर्दिष्ट केलेले इतर मागास वर्ग ;

(ब) "मागास वर्ग सहकारी संस्था" म्हणजे, जिचे ६० टक्क्याहून कमी नसतील इतके सदस्य मागासवर्गातील असून जी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदवण्यात आलेली असेल किंवा नोंदली असल्याचे समजण्यात येत असेल अशी संस्था ;

(क) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ड) "जातीने जमीन कसणे" या संज्ञेचा अर्थ, (एक) स्वतःच्या अंगमेहनतीने किंवा (दोन) स्वतःच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या अंगमेहनतीने आणि मजुरीने कामावर लावलेल्या मजुरांकरवी किंवा रोख रकमत किंवा मालाच्या रूपात, परंतु पिकाच्या हिश्श्याच्या रूपात नव्हे—देय असलेल्या नोकराच्या प्रसंगोपात मदतीने कोणतीही असल्यास, जमीन कसणे—असा समजावा ;

(इ) "निर्वाहक क्षेत्र" म्हणजे—

(एक) कोरडवाहू पिकांच्या जमिनींच्या किंवा जिराईत जमिनींच्या बाबतीत ६.४७ हेक्टर्स किंवा

(दोन) हंगामी ओलिताच्या जमिनींच्या किंवा साळीच्या किंवा भाताच्या जमिनींच्या बाबतीत ३.२४ हेक्टर्स किंवा

(तीन) बागायती किंवा बारमाही ओलिताच्या जमिनींच्या बाबतीत १.६२ हेक्टर्स.

स्पष्टीकरण एक.—एखाद्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन ही, उपरोल्लिखित जमिनींच्या दोन किंवा अधिक वर्गातील जमिनींची मिळून झाली असेल त्याबाबतीत. ४०४७ हेक्टर बागायती किंवा बारमाही ओलिताच्या जमिनीबरोबर .८०९४ हेक्टर्स हंगामी ओलिताची जमीन किंवा साळीची किंवा भाताची जमीन किंवा १.६२ हेक्टर्स कोरडवाहू किंवा जिराईत जमीन या प्रमाणाच्या आधारावर निर्वाहक क्षेत्र ठरविण्यात येईल.

...रण दोन.—"ओलीताखी" म्हणजे, कोणतीही पाटबंधाऱ्याच्या बांधकामाद्वारे—मग ते राज्य बांधलेले किंवा त्याजकडून सुस्थिति ठेवण्यात आलेले असो वा नसो—जलसिंचित जमीन ;

) "माजी सैनिक" म्हणजे संघराज्याच्या सशस्त्र बलातील (सैनिकी न्यायनिर्णयानुसार किंवा वर्तणुकीमुळे किंवा सैन्यातून पळून गेल्यामुळे ज्याला यथोचितरीत्या बडतर्फ किंवा मुक्त करण्यात आले (त्यामुळे ज्याचे सशस्त्र बलाचा सदस्य असण्याचे बंद झाले असेल अशी व्यक्ती नसणारा किंवा ज्याला .माणित करण्यात आले नसेल अशी व्यक्ती नसणारा) माजी सैनिक ;

(ग) जमीन देण्याच्या प्रयोजनार्थ, एखाद्या व्यक्तीच्या संबंधात, अविभक्त हिंदु कुटुंबाव्यतिरिक्त कुटुंब" या संज्ञेत, ज्याचा संपत्तीत वेगळा वाटा असेल किंवा नसेल असा पती, पत्नी, अप्राप्तवय मुलगे, अविवाहित मुली, अवलंबून असलेले भाऊ, बहीण, वडील आणि आई यांचा अंतर्भाव होईल, परंतु संपत्तीत वेगळा वाटा असलेले सज्ञान भाऊ आणि अशा व्यक्तीवर अवलंबून नसलेले वडील किंवा आई याचा अंतर्भाव होणार नाही ;

(ग-एक) "नमुना" म्हणजे नियमास जोडलेला नमुना.

(ह) "तुकडा" आणि "प्रमाण क्षेत्र" यांचा अर्थ, मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ यास अनुक्रमे त्यांना नेमून दिल्याप्रमाणे असेल ;

(आय) "स्वातंत्र्य सैनिक" म्हणजे भारताच्या मुक्तीसाठीच्या राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्यामुळे (शासनाकडून आजीव निवृत्तिवेतन किंवा जमीन सुधारणा कर्ज देण्याबाबत अधिनियम, १८८३ किंवा शेतकऱ्यांना कर्ज देण्याबाबत अधिनियम, १८८४ अन्वये किंवा कृषिविषयक उत्पादनाच्या प्रयोजनासाठी इतर कोणतेही कर्ज मिळाले नसेल अशी) जिला एक महिन्याहून कमी नसेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा स्थानबद्धतेची शिक्षा भोगावी लागली असेल किंवा जिला १०० रुपये किंवा त्याहून अधिक रुपये दंड झाला असेल किंवा जी चळवळ करताना किंवा स्थानबद्धतेत असताना मरण पावली असेल किंवा मारली गेली असेल किंवा जिला देहांत शिक्षा देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती गोळीबारामुळे किंवा लाठीमारामुळे कायमची असमर्थ झाली असेल किंवा जी मालमतेला किंवा जीवननिर्वाहाच्या साधनाला मुकली असेल अशी व्यक्ती ;

[*रद्द केले आहे.]

(के) "सोनार" म्हणजे, सुवर्ण नियंत्रणाशी संबंधित भारत संरक्षण अधिनियमाचे कोणतेही उपबंध आणि त्यान्वये केलेले कोणतेही आदेश आणि उक्त नियम अंमलात असण्याचे बंद झाल्यावर सुवर्णनियंत्रण अधिनियम, १९६५ व त्यान्वये केलेले कोणतेही नियम अंमलात असल्यामुळे ज्याच्यावर परिणाम झाला असेल असा सोनार ;

(के-एक) "भोगाधिकार मूल्य" म्हणजे जमिनीचा भोगवटा आणि वापर करण्याचा अधिकार दिल्याबद्दलचा मोबदला म्हणून देय असलेले मूल्य ;

(ल) जमिनीसंबंधात "निवासी" म्हणजे जमीन जेथे असेल त्या गावात किंवा त्या जमिनीपासून आठ किलोमीटर त्रिज्येमधील लगतच्या गावात राहणारी एखादी व्यक्ती ;

(ल-एक) "महसूल मुक्त मूल्य" म्हणजे कोणत्याही जमिनीचा भोगाधिकार मूल्याची रक्कम अधिक त्या जमिनीच्या संबंधात त्या त्या वेळच्या महसूलाचे भांडवली कृत मूल्य ;

---

*खंड (ज) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) (दुसरी दुरुस्ती) नियम, १९७२, नियम २ (२) अन्वये रद्द केला आहे.

(म) "अनुसूचित जाती" म्हणजे, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३४१ अन्वये, अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येत असतील अशा जाती, वंश किंवा जमाती किंवा अशा जातीचे, वंशाचे किंवा जमातीचे भाग किंवा त्यातील गट ;

**स्पष्टीकरण**.—कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रातील अनुसूचित जाती म्हणून वर्णन केलेल्या समूहास, या नियमांच्या प्रयोजनांकरिता अशा विनिर्दिष्ट क्षेत्राबाहेर सुद्धा अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येईल ;

(न) "अनुसूचित जमाती" म्हणजे भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३४२ अन्वये अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येत असतील अशा जमाती किंवा जनजाती समूह किंवा अशा जमातीचे किंवा जनजाती समूहाचे भाग किंवा त्यातील गट ;

**स्पष्टीकरण**.—कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्राच्या आत अनुसूचित जमाती म्हणून वर्णन केलेले समाज या नियमांच्या प्रयोजनांसाठी, अशा विनिर्दिष्ट क्षेत्राच्या बाहेरसुद्धा अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येतील ;

(ओ) "सशस्त्र दलात नोकरी करणारी व्यक्ती" म्हणजे, संघराज्याच्या सशस्त्र दलात नोकरी करणारी व्यक्ती, आणि यात, कारवाईत ठार झाली असेल किंवा बेपत्ता असेल अशा व्यक्तीचा समावेश होईल ;

एखादी व्यक्ती, संघराज्याच्या सशस्त्र दलात नोकरी करणारी आहे किंवा माजी सैनिक आहे किंवा कसे याबद्दल वाद उद्‌भवल्यास राज्य शासन अशा वादाबाबत निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल ;

(पी) "लागवडीखाली न आलेली जमीन" म्हणजे, या नियमांन्वये ती देण्याच्या लगतपूर्वीच्या सतत तीन वर्षाच्या कालावधीत लागवडीखाली नसेल अशी जमीन.

३. **भोगवटयात नसलेल्या जमिनीतील स्वामित्वाधिकार न देणे**.—जमीन देण्याच्या व तिची विल्हेवाट लावण्याविषयीच्या सर्व प्रकरणांमध्ये, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधांत अधीन राहून, तिचा भोगवटा व वापर करण्याचा अधिकारच केवळ मंजूर करण्यात येईल व त्या जमिनीतील शासनाचा स्वामित्वाधिकार देण्यात येणार नाही.

४. **बंदर हद्दीमधील जमीन देणे**.—भारतीय पत्तन अधिनियम, १९०८ ज्यास लागू असेल अशा कोणत्याही बंदराच्या हद्दीतील कोणतीही जमीन, त्या अधिनियमान्वये नेमलेल्या मुख्य बंदर अधिकाऱ्याच्या लेखी सहमतिशिवाय, देता कामा नये.

## भाग २

### शैक्षणिक, धर्मादाय किंवा सार्वजनिक प्रयोजनाच्या अभिवृद्धीसाठी जमीन देणे

५. **महसूल-मुक्त जमीन देण्याची राज्य शासनाची शक्ती**.—(१) नियम ६, ७ आणि ८ मध्ये उपबंधित केलेले असेल त्याखेरीज, राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय भोगाधिकार मूल्यरहित किंवा जमीन महसूल मुक्त किंवा दोन्हीपासून मुक्त अशी कोणतीही जमीन देता येणार नाही.

(२) राज्य शासनाच्या मंजुरीसह पोट-नियम (१) अन्वये कोणतीही जमीन देण्यात आली असेल त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने द्यावयाच्या सनदेचा नमुना, ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली असेल ते प्रयोजन किंवा त्याचे स्वरूप लक्षात घेऊन, याबाबतीत, राज्य शासनाकडून विशेषरीत्या ठरविण्यात येईल असा असेल.

६. **महसूल-मुक्त जमीन देण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती**.—(१) या नियमांच्या उपबंधास अधीन राहून, खालील तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनापैकी, कोणताही लाभ होण्याची अपेक्षा नसेल अशा कोणत्याही प्रयोजनांसाठी, उक्त तक्त्याच्या स्तंभ (२) मधील मर्यादापर्यंत, जिल्हाधिकाऱ्यास,

भोगाधिकार मूल्यरहित व जमीन महसूल मुक्त, मग ती शाश्वत काळाकरिता किंवा एखाद्या मुदतीकरिता असो, जमीन देता येईल :—

तक्ता

| प्रयोजन | अंदाजित महसूल | मुक्त मूल्याची मर्यादा |
|---|---|---|
| | आयुक्ताच्या मान्यतेसह जिल्हाधिकाऱ्याकडून | जिल्हाधिकाऱ्याकडून |
| (१) | (२) | |
| | रुपये | रुपये |
| (एक) शाळा किंवा महाविद्यालये | | |
| (दोन) रुग्णालये | | |
| (तीन) दवाखाने आणि | | |
| (चार) इतर सार्वजनिक बांधकामे यांच्या बांधकामासाठी जागा — | | |
| (अ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीन्वये यथोचितरीत्या रचना करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या, जिल्हा परिषदेच्या किंवा ग्रामपंचायतीच्या निधीच्या खर्चातून. | २५,००० | १०,००० |
| (ब) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निधिव्यतिरिक्त असलेल्या निधीतून. | ५,००० | २,००० |
| (क) सामूहिक विकास व राष्ट्रीय विस्तार सेवा, स्थानिक विकासविषयक बांधकामाचा कार्यक्रम किंवा तशाच प्रकारची इतर कोणतीही विकासविषयक बांधकामे याखालील कोणत्याही योजनेसंबंधात वापर करण्यात येईल तेव्हा. | १०,००० | ५,००० |

परंतु जिल्हाधिकाऱ्याच्या मते रेल्वे स्थानकाशेजारची असेल अशी जमीन, धर्मशाळा उभारण्यात येतील तेव्हा, त्या अशा महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या, जिल्हा परिषदेच्या किंवा ग्रामपंचायतीच्या प्रभाराधीन नसतील तर, तक्त्याच्या खंड (ब) अन्वये धर्मशाळेसाठी देण्यात येणार नाही ;

आणखी असे की, नियम ७ मध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी, या नियमान्वये जमीन देण्यात येणार नाही.

(२) सामान्यत: नमुना एक मधील सनदेअन्वये अशा रीतीने अनुदाने देण्यात येतील.

७. **क्रीडांगणे, व्यायामशाळा इत्यादींसाठी जमीन देणे.**—(१) जमिनीचे महसूल मुक्त मूल्य २,५०० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याला आणि असे मूल्य २,५०० रुपयांपेक्षा अधिक होत असेल, परंतु, १०,००० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल त्याबाबतीत, आयुक्ताच्या मान्यतेने, शैक्षणिक संस्था किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा शासनाने मान्यता दिलेल्या व्यायामशाळा यांना क्रीडांगणे किंवा इतर मनोरंजनाच्या प्रयोजनांसाठी, जमीन वर्षाला एक रुपया (१ रु.) या नाममात्र भाड्यावर पंधरा वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीपर्यंत, पट्टयाने देता येईल.

(२) असे पट्टे सर्वसाधारणत: नमुना दोनमध्ये करण्यात येतील.

८. **महसूल मुक्त (जमीन) देण्याबाबतच्या शर्ती.**—विशिष्ट प्रकरणात विहित करण्यात येतील अशा शर्तींशिवाय, प्रत्येक जमीन नियम ६ अन्वये पुढील शर्तींवर देण्यात येईल :—

(अ) राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय, जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध हस्तांतरित करण्यात येणार नाही ;

(ब) शर्त (अ) चा भंग केल्याबद्दल जिल्हाधिकारी याबाबतीत निश्चित करील अशा तारखेपर्यंत, ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी जमीन देण्यात आली असेल त्या प्रयोजनासाठी उक्त जमीन वापरण्यात आली नाही तर किंवा ज्या प्रयोजनासाठी ती देण्यात आली ते विशिष्ट प्रयोजन किंवा प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल किंवा राज्य शासनास स्वत:च्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी ती आवश्यक वाटेल तर, उक्त जमीन, तिच्यावर बसविण्यात आलेल्या वस्तू व बांधकाम यांसह, राज्य शासनास परत घेता येईल आणि उक्त जमीन अशा प्रकारे आवश्यक असल्याबद्दलचे जिल्हाधिकाऱ्याच्या सहीचे प्रतिज्ञापन हे, प्रतिग्रहिता व राज्य शासन यांच्यात निर्णायक असेल.

(क) शर्त (ब) अन्वये राज्य शासन ती जमीन कोणत्याही वेळी परत घेईल तर, त्यासाठी द्यावयाची भरपाई (त्या जमिनीच्या प्रतिग्रहणार्थ), राज्य शासनाला देण्यात आलेली रक्कम कोणतीही असल्यास व प्रतिगृहित्याने त्या जमिनीवर अधिकृतरीत्या उभारलेली किंवा पार पाडलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकामे यांवर (ती जमीन) परत घेण्याच्या वेळी झालेला खर्च किंवा त्याची किंमत यांपैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम यापेक्षा अधिक असणार नाही. या शर्तीअन्वये द्यावयाच्या भरपाईच्या रकमेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास, तो वाद, राज्य शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात येईल.

९. **सनदांची नोंदणी.**—नियम ५ किंवा नियम ६ अन्वये काढलेली प्रत्येक सनद, कलम ७५ अन्वये विहित केलेल्या नोंदवहीत नोंदण्यात येईल.

## भाग तीन

### कृषिविषयक प्रयोजनांसाठी जमिनीची विल्हेवाट लावणे

#### अ. नेमून देण्यायोग्य जमिनीची विल्हेवाट

१०. **नेमून देण्यायोग्य जमिनीतील भोगवटयाचे अधिकार.**—(कोणत्याही शासकीय किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक नसलेली किंवा नियम २० अन्वये राखून ठेवण्यात आली नसेल अशी) भोगवटयात नसलेली जमीन आणि (एकसाली पट्टयाने, तात्पुरती, लागवडीसाठी यापूर्वीच देण्यात आलेली) जमीन (जिचा यात यापुढे "नेमून देण्यायोग्य जमीन" असा निर्देश करण्यात आला आहे) यातील भोगवटयाचे अधिकार, कलम २० आणि कलम ३१ अन्वये या भागातील नियमांस अनुसरून कृषिविषयक प्रयोजनांसाठी, नियम ११ मधील प्राथम्यक्रमाने, कोणत्याही व्यक्तीस देता येतील.

११. **जमीन देण्याच्या प्रयोजनासाठी प्राथम्य.**—(१) या नियमाचे पोट-नियम (२), (३), (४) आणि (५) व नियम १२ आणि १३ यांच्या उपबंधांस अधीन राहून, कोणतीही नेमून देण्यायोग्य जमीन कोणत्याही व्यक्तीस पुढील प्राथम्यक्रमाने देता येईल. म्हणजेच,—

(एक) दिनांक ३१ मार्च १९६९ रोजी, शासनाकडून पट्टयाने वैधरीत्या जमीन धारण करीत असलेला एकसाली पट्टेदार ;

(दोन) जी कृषि प्रयोजनासाठी धारण केली असेल किंवा निर्धारित केली असेल, अशी कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी शासनाने संपादन केलेली जमीन ज्याने स्वतः कसण्याचे कबूल केले आहे असा शेतकरी ;

(तीन) जातीने जमीन कसण्याचे जिने कबूल केले असेल अशी सशस्त्र दलात नोकरी करणारी व्यक्ती, स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, अनुसूचित जातीची, अनुसूचित जमातीची, विमुक्त जातीची, भटक्या जातीची व्यक्ती, आणि नव-बौद्ध ;

(चार) जातीने जमीन कसण्याचे जिने कबूल केले असेल अशी, खंड (तीन) मध्ये निर्देश केलेल्या मागासवर्गांव्यतिरिक्त इतर मागासवर्गातील व्यक्ती ;

(पाच) जातीने जमीन कसण्याचे कबूल केले असेल अशी कोणतीही इतर व्यक्ती.

(२) जिल्हाधिकाऱ्यास पोट-नियम (१) अन्वये एकच प्राधान्यक्रम असलेल्या व्यक्तींमधून एक किंवा अधिक प्रतिगृहित्यांची निवड करावयाची असेल त्याबाबतीत, तो ती निवड चिठ्ठ्या टाकून करील.

(३) महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम तेवीस) याच्या कलम ४, पोट-कलम (१) अन्वये प्रस्थापित ग्रामदान गावातील कोणतीही नेमून देण्यायोग्य जमीन,---

(अ) अशा ग्रामदान गावातील ग्राम मंडलास,

किंवा

(ब) उक्त अधिनियम अंमलात येण्यापूर्वी अशा गावात काम करणाऱ्या आणि पुढील अटी पूर्ण करणाऱ्या कोणत्याही ग्राम स्वराज्य सहकारी संस्थेस देता येईल :---

(एक) ग्रामदानात दान म्हणून दिलेल्या गावातील जमिनीचा विस्तार, गावात राहणाऱ्या व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीच्या एकूण विस्ताराच्या ६० टक्क्यांहून कमी असणार नाही ;

(दोन) आपली जमीन दान म्हणून दिलेल्या व्यक्ती, त्या गावात राहणाऱ्या आणि मालकीची जमीन असलेल्या व्यक्तींच्या एकूण संख्येच्या ७५ टक्क्यांहून कमी असणार नाहीत ; आणि

(तीन) त्या गावात राहणाऱ्या ७५ टक्के व्यक्तींनी (अज्ञानवय व्यक्ती सोडून) ग्रामदान चळवळीत भाग घेतलेला असेल.

(४) राज्य शासनाची पूर्वपरवानगी असेल त्याखेरीज दिनांक १५ ऑगस्ट १९६८ रोजी,---

(अ) तीन किंवा तीनपेक्षा कमी मुले असणाऱ्या ज्या व्यक्तीस उक्त तारखेनंतर तीनपेक्षा अधिक मुले झाली असतील, किंवा

(ब) तीनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या ज्या व्यक्तीच्या मुलांच्या संख्येत, त्या तारखेनंतर वाढ झाली असेल ;

अशा कोणत्याही व्यक्तीस कोणतीही जमीन देण्यात येणार नाही.

(५) या नियमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, ज्या व्यक्तीचे, सर्व साधने मिळून स्थूल वार्षिक उत्पन्न ३,६०० रुपयांपेक्षा अधिक असेल अशा कोणत्याही व्यक्तीस [या नियमाच्या खंड (एक) मध्ये निर्देश केलेला एकसाली पट्टेदार नव्हे] या भागान्वये जमीन देण्यात येणार नाही.

१२. **देण्यात यावयाच्या जमिनीची मर्यादा.**---(१) या नियमाच्या पोट-नियम (२) व (३) च्या उपबंधांस अधीन राहून, कोणत्याही एका व्यक्तीस देता येईल अशा नेमून देण्यायोग्य जमिनीची मर्यादा पुढीलपेक्षा अधिक असणार नाही :---

(अ) २ हेक्टर---कोरडवाहू किंवा जिराईत जमीन, किंवा

(ब) १ हेक्टर---हंगामी ओलिताची जमीन किंवा साळीची किंवा भाताची जमीन, किंवा

(क) ०·५० हेक्टर---बागायती किंवा बारमाही ओलिताची जमीन :

परंतु,---

(एक) नियम ११, पोट-नियम (१), खंड (एक) मध्ये निर्देश केलेल्या एकसाली पट्टेदारास, एका निर्वाहक क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत जमीन देता येईल ;

(दोन) तुकडा निर्माण होण्यास प्रतिबंध करण्यासाठी म्हणून निर्वाहक क्षेत्रापेक्षा अधिक किंवा खंड (अ), (ब) किंवा (क) मध्ये विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा अधिक जमीन देता येईल ;

(तीन) राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा मर्यादेपर्यंत, नियम ११, पोट-नियम (१), खंड (दोन) मध्ये निर्देश केलेल्या शेतकन्यास जमीन देता येईल ; आणि

(चार) कोणत्याही व्यक्तीस देता येईल अशा, ह्या पोट-नियमाच्या खंड (अ), (ब) किंवा (क) खाली येणाऱ्या जमिनीचे किमान क्षेत्र, जमिनीच्या वाटपाची आर्थिकदृष्ट्या फायदेशीर बाजू विचारात घेऊन, साधारणतः प्रमाण क्षेत्राहून कमी असणार नाही.

(२) कोणतीही नेमून देण्यायोग्य जमीन,—

(एक) जी व्यक्ती (भटक्या जातीची नसणारी), नेमून देण्याजोग्या जमिनीच्या आठ किलोमीटर त्रिज्येच्या आत निवास करीत नसेल, किंवा

(दोन) जी व्यक्ती एक हेक्टर कोरडवाहू किंवा जिराईत जमिनीच्या किंवा ०·५० हेक्टर हंगामी ओलिताच्या किंवा माळीच्या किंवा भाताच्या जमिनीच्या, किंवा ०·२५ हेक्टर बागायती किंवा बारमाही ओलिताच्या जमिनीच्या बरोबरीची किंवा त्याहून अधिक जमीन पहिल्यापासून धारण करीत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस [नियम ११, पोट-नियम (१) च्या अनुक्रमे खंड (एक) आणि (दोन) मध्ये निर्देश केलेला एकसाली पट्टेदार किंवा शेतकरी यांच्याव्यतिरिक्त ] देता येणार नाही ;

(३) या भागान्वये जमीन देताना, जिल्हाधिकारी, ती दिल्यानंतरची एखाद्या व्यक्तीची किंवा आणि तिच्या कुटुंबातील व्यक्तीची धारणजमीन, शक्य असेल तेथवर,—

(अ) एकसाली पट्टेदारास द्यावयाची असेल त्याबाबतीत, एक निर्वाहक क्षेत्रापेक्षा ;

(ब) नियम ११, पोट-नियम (१), खंड (दोन) मध्ये निर्देश केलेल्या शेतकन्यास द्यावयाची असेल त्याबाबतीत, राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा मर्यादेपेक्षा ;

(क) इतर प्रकरणांच्या बाबतीत, या नियमाच्या पोट-नियम (१) मधील विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा, अधिक होणार नाही याची खात्री करून घेईल.

**स्पष्टीकरण.**—निर्वाहक क्षेत्राची किंवा पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ, जमीन दिल्याच्या तारखेच्या लगतपूर्वी तीन वर्षांच्या कालावधीमध्ये त्याने अन्यसंक्रामित केलेल्या कोणत्याही जमिनीची मर्यादा हिशेबात धरण्यात येईल.

१३. **जमिनीच्या लहान तुकड्यांची विल्हेवाट लावणे.**—जमिनीचा एखादा तुकडा लहान आकारमाना-मुळे किंवा विचित्र आकारामुळे किंवा तो जेथे असेल त्या जागेच्या परिस्थितीमुळे किंवा प्रमाण क्षेत्रापेक्षा त्याचा विस्तार कमी असल्यामुळे पडीत असेल त्याबाबतीत, तो अशा जमिनीच्या तुकड्यालगतच्या जमीनधारकाला देण्यात येईल :

परंतु असे दोन किंवा अधिक जमीनधारक असतील त्या बाबतीत, नियम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमानुसार उक्त जमिनीचा तुकडा देण्याबाबत निवड करण्यात येईल :

आणखी असे की, दोन किंवा अधिक धारक एकाच प्रकाराखाली येत असतील त्या बाबतीत, ज्या धारकाची धारणजमीन सर्वांत लहान आकाराची असेल त्याला अधिमान्यता देण्यात येईल आणि (त्यांच्या) धारण-जमिनी समान क्षेत्राच्या असतील त्याबाबतीत, चिठ्ठ्या टाकून जमीन नेमून देण्यात येईल.

१४. **भोगाधिकार मूल्य देणे.**—(१) या भागान्वये देण्यात आलेल्या जमिनीच्या संबंधात द्यावयाचे भोगाधिकार मूल्य पुढीलप्रमाणे असेल :—

(अ) अशी शेतजमीन भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या उपबंधांखालील कोणत्याही प्रयोजना-साठी संपादन करण्यात आली असेल, परंतु त्या प्रयोजनासाठी वापरण्यात आली नसेल तर उक्त जमीन संपादण्याकरिता दिलेल्या भरपाईच्या रकमेबरोबरीची रक्कम किंवा चालू बाजारमूल्य, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम ;

(ब) ती लागवडीखाली न आलेली जमीन असेल तर,—

(एक) मागास वर्गातील एखाद्या व्यक्तीस ती देण्यात आली असेल तर, काही नाही ;

(दोन) नियम ११, पोट-नियम (१), खंड (दोन) मध्ये निर्देश केलेल्या शेतकऱ्यास, किंवा नियम २० अन्वये, सार्वजनिक प्रयोजनासाठी भरपाई देऊन जिची जमीन संपादन करण्यात आली असेल अशा व्यक्तीस, जमीन देण्यात आली असेल तर, विद्यमान बाजारमूल्याइतकी रक्कम ;

(तीन) इतर सर्व प्रकरणांमध्ये, आकारणीच्या बारा पटीइतकी रक्कम ;

(क) इतर कोणत्याही जमिनीच्या बाबतीत,—

(एक) मागास वर्गातील एखाद्या व्यक्तीस जमीन देण्यात आली असेल तर, जमिनीच्या आकारणीच्या सहापटीइतकी रक्कम ;

(दोन) नियम ११, पोट-नियम (१), खंड (२) मध्ये निर्देश केलेल्या शेतकऱ्यास, किंवा नियम २० अन्वये, सार्वजनिक प्रयोजनासाठी भरपाई देऊन जिची जमीन संपादन करण्यात आली असेल अशा व्यक्तीस, जमीन देण्यात आली असेल तर, विद्यमान बाजारमूल्याइतकी रक्कम ; किंवा

(तीन) इतर सर्व प्रकरणांमध्ये आकारणीच्या चोवीस पटीइतकी रक्कम :

परंतु, नियम १३ अन्वये, एक निर्वाहक क्षेत्राबरोबरीची किंवा त्यापेक्षा अधिक किंवा नियम १२, पोट-नियम (१) मधील विनिर्दिष्ट मर्यादेपर्यंत जमीन धारण करणाऱ्या जमीनधारकाला जमीन देण्याच्या बाबतीत, अशा जमिनीबाबत देय भोगाधिकार मूल्य, अशा जमिनीच्या विद्यमान बाजारमूल्याइतके असेल.

**स्पष्टीकरण.**—आकारणी न केलेल्या जमिनीच्या बाबतीत, समान दर्जाच्या आणि तशाच जागी असलेल्या लगतच्या जमिनींवर लादता येईल अशी आकारणी लक्षात घेऊन, भोगाधिकार मूल्य आकारण्यात येईल.

(२) प्रतिग्रहिता, भोगाधिकार मूल्याशिवाय, उक्त जमिनीवर कोणतीही झाडे असल्यास, त्यांचे मूल्य म्हणून, या बाबतीत राज्य शासन प्राधिकृत करील अशा वन अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून, जिल्हाधिकाऱ्याकडून ठरविण्यात येईल अशी रक्कम देण्यास पात्र ठरेल.

१५. **जमीन देण्याबाबत अटी व शर्ती.**—(१) या भागान्वये दिलेली प्रत्येक जमीन, जमीन महसूल अधिनियम आणि हे नियम यांच्या उपबंधांस आणि विशेषतः पुढील शर्तीस अधीन असेल, म्हणजेच—

(अ) प्रतिग्रहिता, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय, जमीन किंवा तिचा कोणताही भाग, गहाण ठेवणार नाही, विकणार नाही, अभिहस्तांकित किंवा अन्यथा हस्तांतरित करणार नाही ;

(ब) प्रतिग्रहिता, जमीन देण्यात आल्याच्या तारखेपासून दोन वर्षे समाप्त होण्यापूर्वी, जमीन लागवडीखाली आणील ;

(क) प्रतिग्रहिता जमिनीची संपूर्ण आकारणी देण्यास पात्र असेल :

परंतु, जमीन दिल्याच्या तारखेपासून पहिल्या तीन वर्षाच्या मुदतीसाठी लागवडीखाली न आलेल्या जमिनीच्या बाबतीत, कोणतीही आकारणी करण्यात येणार नाही.

(ड) नियम १४ अन्वये प्रतिग्रहित्याकडून देय असलेले भोगाधिकार मूल्य, कोणतेही असल्यास, ते जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे—

(एक) प्रतिग्रहिता मागास वर्गातील व्यक्ती असल्यास, बारा, आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत सहा,

यापेक्षा जास्त नसतील इतक्या वार्षिक हप्त्यांमध्ये देण्यात येईल.

(२) प्रतिग्रहिता पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग करील तर, जिल्हाधिकाऱ्यास त्याला देण्यात आलेली जमीन परत ताब्यात घेता येईल आणि प्रतिग्रहिता त्या जमिनीवरून काढून लावण्यास पात्र ठरेल.

(३) पोट-नियम (२)-अन्वये एखाद्या प्रतिग्रहित्यास जमिनीवरून काढून लावण्यात आले असेल त्याबाबतीत, त्याने दिलेली किंवा त्याच्याकडून वसूल करण्यात आलेली कोणतीही असल्यास, भोगाधिकार मूल्याची रक्कम त्याला परत करण्यात येईल.

१६. **परत ताब्यात घेतलेल्या जमिनींची विल्हेवाट लावणे.**—नियम १५, पोट-नियम (२) अन्वये परत ताब्यात घेतलेल्या कोणत्याही जमिनींची विल्हेवाट, या भागातील नियमांच्या उपबंधानुसार लावता येईल.

१७. **जमिनींची विल्हेवाट लावण्याची पद्धती.** —या भागान्वये जमिनीची विल्हेवाट लावताना, पुढील कार्यपद्धती अनुसरण्यात येईल,—

म्हणजेच,—

(१) जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेला तहसीलदार, नेमून देण्यायोग्य जमिनीची विल्हेवाट लावण्याच्या प्रयोजनासाठी, त्याच्या मते मध्यवर्ती असतील अशा शक्यतितक्या जास्त गावांची निवड करील आणि जमीन मिळवण्यासाठी करावयाचे अर्ज ज्या तारखेपासून स्वीकारण्यात येतील व अर्ज ज्या तारखेस विचारात घेतले जातील, त्या तारखा निश्चित करणारा आणि तशाच इतर गोष्टींचा तपशीलवार कार्यक्रम आखील. अशा कार्यक्रमास संबंधित गावांमध्ये दवंडी पिटवून विस्तृत प्रमाणावर प्रसिद्धी देण्यात येईल व गावकऱ्यांना असा कार्यक्रम प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक महिन्यापेक्षा कमी नसेल अशा विनिर्दिष्ट मुदतीच्या आत त्यांचे अर्ज तहसिलदाराकडे पाठवण्याबद्दल सांगण्यात येईल. अशा कार्यक्रमाची एक प्रत गावातील चावडीत, ग्रामपंचायतीच्या कार्यालयात, कोणतेही असल्यास, आणि तहसिलदाराच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल. शक्य असेल तेथवर, विल्हेवाटीखालील जमीन मिळण्यासाठी ज्यानी पूर्वीच अर्ज केले असतील, अशा व्यक्तींना आणि सचिव, जिल्हा नाविक, सैनिक व वैज्ञानिक मंडळ असल्यास त्याना आणि तसेच, आयुक्ताकडून निर्धारित करण्यात येईल अशा हुद्याच्या, जिल्ह्यांतील समाजकल्याण आणि सहकार विभागाच्या अधिकाऱ्यांनासुद्धा त्या कार्यक्रमाची सूचना देण्यात येईल.

(२) पोट-नियम (३) मध्ये उपबंधित केले असेल त्यांव्यतिरिक्त, जमीन मिळण्यासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज, तहसिदाराकडे करण्यात येईल आणि इतर तपशिलाबरोबर त्यात पुढील तपशील असेल ; म्हणजेच,—

(अ) अर्जदाराचे नाव ;

(ब) (एक) दिनांक १५ ऑगस्ट १९६८ रोजी आणि (दोन) अर्जाच्या तारखेस असलेली कुटुंबातील व्यक्तींची संख्या ;

(क) अर्जदार सशस्त्र दलात नोकरी करणारा आहे, स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक किंवा दारुबंदी धोरणामुळे परिणाम झालेली व्यक्ती किंवा मागास वर्गातील व्यक्ती किंवा नवबौद्ध आहे किंवा कसे ;

(ड) अर्जदार, कोणतीही जमीन एकसाली पट्टयाने धारण करीत आहे किंवा कसे, असल्यास, अशी जमीन ज्या तारखेपासून धारण करीत असेल, ती तारीख आणि अशा रीतीने धारण केलेल्या जमिनीचे क्षेत्र ;

(इ) एकसाली पट्ट्याखेरीज अर्जदाराने आधीच धारण केलेल्या जमिनीचे क्षेत्र ;

(फ) सर्व साधनांद्वारा अर्जदाराचे स्थूल वार्षिक उत्पन्न ;

(३) सशस्त्र दलात नोकरी करणारा किंवा माजी सैनिक (तो दिवंगत असल्यास किंवा कोणत्याही कारणामुळे त्यास लिहिणे शक्य नसेल तर, त्याची पत्नी, सज्ञान मुलगा, वडील, आई किंवा अविभक्त कुटुंबातील भाऊ) यांस लागवडीसाठी जमीन मिळण्याकरिता, जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करता येईल. असा अर्ज जिल्हा नाविक, सैनिक आणि वैमानिक मंडळाच्या अध्यक्षामार्फत करण्यात येईल.

(४) पोट-नियम (१) अन्वये प्रसिद्ध केलेल्या तारखेस, जिल्हाधिकाऱ्यास किंवा तहसिलदारास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, संबंधित ग्रामपंचायतीच्या प्रतिनिधींशी आणि जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून, जमिनीची विल्हेवाट लावता येईल.

(५) पोट-नियम (३) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे एखादा अर्ज, सशस्त्र दलात नोकरी करणाऱ्या किंवा माजी सैनिकांच्या वतीने करण्यात येईल तेव्हा, अशा नोकरीत असलेल्या व्यक्तींच्या किंवा यथास्थिती माजी सैनिकाच्या नावाने, तो दिवंगत नसेल तर, जमीन देण्यात येईल.

(६) जिल्हाधिकारी किंवा तहसिलदार, प्रत्येक प्रतिग्रहीत्याकडून नमुना तीनमध्ये करारनामा करून घेईल आणि प्रतिग्रहीत्यास देण्यात आलेल्या जमिनीचा कब्जा मिळवून देईल.

१८. **सोडून दिलेल्या उप-विभागांची विल्हेवाट लावणे.**—कलम ३५, पोट-कलम (२) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने, एकाच सर्वेक्षण क्रमांकाच्या इतर उप-विभागातील भोगवटदारांना देता येणार नाही अशा कलम ३५ अन्वये सोडून दिलेल्या सर्वेक्षण क्रमांकाच्या उप-विभागांची विल्हेवाट या भागातील नियमांस अनुसरून लावता येईल.

१९. **विवक्षित प्रकरणांमध्ये नियम शिथिल करणे.**—या भागातील नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, स्वतः पुरस्कृत केलेली किंवा भूमिहीन शेतमजुरांच्या पुनर्वसाहतीसाठी केंद्र सरकारच्या सांगण्यावरून किंवा त्यांच्या वतीने हाती घेतलेली कोणतीही विशेष योजना किंवा कोणत्याही विशेष प्रकरणांमध्ये ,किंवा शासनास योग्य वाटतील अशा अटींस व शर्तींस अधीन ठेवून, त्यांच्या मते कोणत्याही क्षेत्रात किंवा भू-भागात नियम शिथिल करणे आवश्यक असेल असे कोणतेही विशेष प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग यास लागू करताना या भागातील नियमांच्या उपबंधांपैकी कोणतेही उपबंध शिथिल करता येतील.

**ब. सार्वजनिक प्रयोजनासाठी ज्यांच्या जमिनी संपादन करण्यात आल्या असतील अशा व्यक्तींना जमीन देणे**

२०. **सार्वजनिक प्रयोजनांसाठी ज्यांच्या जमिनी संपादन करण्यात आल्या असतील अशा व्यक्तींना जमीन देणे.**—(१) राज्य शासनाच्या आदेशांस अधीन राहून, जिल्हाधिकारी त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये, पाटबंधारे व वीज प्रकल्प धरून, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनी संपादन करण्यात आल्यामुळे ज्यांना आपल्या जमिनींना मुकावे लागले असेल व परिणामतः त्यांच्याकडे कोणतीही जमिन राहिली नसेल किंवा निर्वाहिक क्षेत्रापेक्षा कमी जमीन राहिली असेल अशा (शेतकरी असणाऱ्या) व्यक्तींना देण्यासाठी म्हणून भोगवटयात नसलेली लागवड योग्य जमीन राखून ठेवील.

(२) पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, लागवडीसाठी जमीन मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. असा अर्ज मिळाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून खात्री पटल्यानंतर, नियम १२, १४ व १५ च्या उपबंधास अनुसरून, परंतु जमीन जेथे असेल त्या गावाच्या आठ किलोमिटर त्रिज्येच्या आत निवास करीत असेल या शर्तीच्या शिथिलीकरणास अधीन ठेवून, पोट-नियम (१) अन्वये राखून ठेवलेल्या जमिनीतील भोगवटयाचे अधिकार, कलम ३० आणि कलम ३१ अन्वये अर्जदारास देता येतील.

(३) जिल्हाधिकारी, अशा प्रत्येक प्रतिग्रहीत्याकडून नमुना तीनमध्ये करारनामा करून घेईल आणि त्याला देण्यात आलेल्या जमिनीचा कब्जा देववील.

(४) पोट-नियम (१) अन्वये राखून ठेवलेल्या जमिनी, पोट-नियम (२) अन्वये देण्यात येईपर्यंत, जिल्हाधिकारी, राज्य शासन, आदेशाद्वारे वेळोवेळी निदेश देईल अशा अटींवर आणि शर्तींवर, अशी जमीन, नियम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमानुसार, भूमिहीन शेतकऱ्यांना एकसाली पट्टयावर देईल.

**क. नदीच्या पात्रातील जमिनींची आणि दलदलीच्या खार जमिनींची विल्हेवाट लावणे**

२१. **नदीच्या पात्रातील जमिनींची विल्हेवाट लावणे.**— (१) नदीच्या पात्रात असलेली आणि सर्वेक्षण क्रमांकात अंतर्भूत नसलेली जमीन, कलमे ३३ व ६५ यात अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, सर्वसाधारणपणे दरवर्षी लिलाव करून सर्वात जास्त बोली बोलणाऱ्यास, एक वर्ष मुदतीसाठी, किंवा जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा दीर्घ मुदतीसाठी, पट्टयाने देण्यात येईल. स्वीकृत बोली म्हणजेच पट्टयाची रक्कम, ही, अशा जमिनीवर आकारणी करता येईल असा जमीन महसूल असल्याचे समजण्यात येईल.

(२) शासनाच्या मान्यतेखेरीज जिल्हाधिकारी अशा जमिनीतील भोगवटयाचे अधिकार निकालात काढणार नाही.

२२. **लागवडयोग्य करण्यासाठी दलदलीची खार जमीन देणे.**—(१) मिठाच्या उत्पादनासाठी किंवा कोणत्याही शासकीय किंवा सार्वजनिक किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या मते विशेष स्वरूपाचे असेल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी जिची आवश्यकता नसेल किंवा जिची आवश्यकता भासण्याचा संभव नसेल अशी खार जमीन किंवा अधूनमधून समुद्राच्या पाण्याखाली जाणारी जमीन, राज्य शासनाच्या आदेशास अधीन पुढील शर्तीवर आणि विवक्षित बाबतीत योग्य वाटतील अशा योग्य फेरफारासह, लागवडयोग्य करण्यासाठी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडून पट्टयाने देता येईल.

उक्त शर्ती अशा की,—

(अ) पहिल्या दहा वर्षांसाठी कोणताही खंड आकारण्यात येणार नाही ;

(ब) पट्ट्याने दिलेल्या संपूर्ण क्षेत्रावर, मग ते लागवड योग्य केलेले असो वा नसो, त्यानंतरच्या वीस वर्षांकरिता, प्रत्येक हेक्टरला ६० पैसे दराने खंड आकारण्यात येईल ;

(क) तीस वर्षानंतर लागवडयोग्य केलेल्या जमिनीच्या बाबतीत, जर त्या जमाबंदीखाली आणण्यात आल्या तर, वेळोवेळी त्यावर ज्या दराने जमीन महसूल आकारण्यात येईल त्या दराने, आणि लागवडयोग्य न केलेल्या जमिनीच्या बाबतीत, कोणत्याही असल्यास लागवडयोग्य केलेल्या जमिनीवरील सरासरी दराने, खंड आकारण्यात येईल.

(ड) सार्वजनिक रस्त्यांसाठी उपयोगात आणलेल्या जमिनीचा कोणताही भाग, खंड देण्यातून वगळण्यात येईल ;

(इ) पट्टयाच्या तारखेपासून दोन वर्षांच्या आत, वाजवी काळजी घेऊन, जमिनी लागवडयोग्य करण्यात आल्या नाहीत किंवा अशा तारखेपासून दहा वर्षांच्या अखेरपर्यंत, कृषिविषयक प्रयोजनांसाठी त्यांचा वापर करण्यासाठी म्हणून, उक्त क्षेत्रांपैकी निम्मे क्षेत्र, योग्य स्थितीत आणले नाही आणि अशा तारखेपासून वीस वर्षांच्या अखेरपर्यंत संपूर्ण क्षेत्र कृषिविषयक प्रयोजनासाठी योग्य स्थितीत आणले नाही किंवा उपरोक्तप्रमाणे एकदा लागवडयोग्य केलेली कोणतीही जमीन, कृषिविषयक प्रयोनजनार्थ वापर करण्यासाठी योग्य स्थितीत ठेवली नाही तर, जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वेच्छा निर्णयाधीन, तिचा पट्टा रद्द केला जाण्यास ती पात्र ठरेल :

परंतु, पट्टेदारास, पहिल्या दहा वर्षांच्या मुदतीत, त्याला लागवडयोग्य करता येणे शक्य नसेल असे कोणतेही क्षेत्र सोडून देता येईल.

(२) या नियमाखालील पट्टे सर्वसाधारणतः नमुना चार मध्ये देता येतील.

२३. **व्याप्ति.**—या भागातील नियमांत अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, खार जमिनी आणि तलावाच्या पात्रातील जमिनी आणि महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमालमर्यादा) अधिनियम, १९६१ याच्या कलम २१ अन्वये, राज्य शासनाकडे निहित असलेल्या अतिरिक्त जमिनी यांना लागू होणार नाही.

## भाग चार

## कृषितर प्रयोजनांसाठी जमीन देणे

### अ. सर्वसाधारण

२४. **इमारतीसाठी राखीव भूमिखंड आणि त्यांचा विल्हेवाट.**—(१) जिल्हाधिकारी, त्याच्या मते जे भूमिखंड रेल्वे स्थानक, बाजार, यांच्याजवळ असल्यामुळे किंवा तशाच प्रकारच्या कोणत्याही कारणामुळे मौल्यवान ठरण्याचा संभव असेल किंवा जे कोणत्याही योजनेत विशेष मौल्यवान म्हणून राखून ठेवण्यात आले असतील किंवा जे प्रयोजन कोणत्याही शासकीय किंवा सार्वजनिक किंवा राज्य शासनाच्या मते विशेष असेल अशा कोणत्याही प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा आपल्या जिल्ह्यातील भोगवटयात नसलेल्या जमिनीतील इमारतीसाठी भूमिखंडाची आयुक्ताच्या मान्यतेने एक सूची तयार करील. अशा सूचीस इमारतीसाठी राखीव भूमिखंड सूची असे संबोधण्यात येईल.

जिल्हाधिकाऱ्यास आवश्यकतेच्या अनुसार अधिकारातील बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक होईल त्याप्रमाणे, अशा सूचीत बदल करता येईल.

(३) अशा सूचीतील इमारतींसाठी असलेल्या भूमिखंडांची विल्हेवाट लावणे हे, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, राज्य शासन, प्रत्येक प्रकरणात निर्धारित करील अशा अटींच्या आणि शर्तींच्या अधीन असेल.

२५. **रेखांकन तयार करणे.**—(१) नियम २४ अन्वये जी राखून ठेवण्यात आली नसेल व इमारतीसाठी किंवा इतर अकृषिक प्रयोजनासाठी योग्य असेल अशी भोगवट्यात नसलेली जमीन, अधिकारिता असणाऱ्या नगररचना व मूल्य निर्धारण विभागाचा प्रभारी अधिकारी व संबंधित स्थानिक प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून, अशी जमीन ज्या प्रयोजनासाठी असेल ते प्रयोजन आणि जेथे ती असेल ते स्थान लक्षात घेऊन, योग्य आकाराच्या यथोचित भूमिखंडात, जिल्हाधिकाऱ्याकडून रेखांकित करण्यात येईल, आणि पोट-नियम (२) च्या उपबंधास अधीन राहून कोणत्याही भूमिखंडाची, अशा रीतीने तयार केलेल्या रेखांकनास अनुसरून असल्याखेरीज, विल्हेवाट लावण्यात येणार नाही. प्रभारी अधिकारी, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग आणि संबंधित स्थानिक प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून, अशा रेखांकनात, जिल्हाधिकाऱ्याकडून वेळो वेळी फेरबदल करण्यात येईल.

(२) लेखी नमूद करावयाच्या कोणत्याही विशेष कारणांवरून, जिल्हाधिकारी तसे करण्याचे ठरवील तर, त्यास, प्रभारी अधिकारी, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग यांच्याशी विचारविनिमय करून, आणि आयुक्ताच्या पूर्व मंजुरीने, ज्या भूमिखंडाचे रेखांकन करण्यात आले असेल अशा कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही भूमिखंडाची विल्हेवाट लावता येईल.

## ब. निवासाकरिता वापरण्यासाठी जमीन देणे

२६. **इमारती जागांची विल्हेवाट लावणे.**—(१) या नियमांमध्ये अन्यथा उपबंधित केलेल्या गोष्टींव्यतिरिक्त कोणत्याही विशिष्ट बाबतीत, लिलावाशिवाय जमीन देण्यासाठी सबळ कारण आहे असे लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून, जिल्हाधिकाऱ्यास, वाटेल त्याखेरीज, कलम २० आणि कलम ३० अन्वये इमारती जागांमधील भोगवटाच्या अधिकाराची विल्हेवाट, जिल्हाधिकाऱ्याकडून सार्वजनिक लिलावाद्वारे, सर्वात अधिक बोली बोलणाऱ्यास, देऊन लावण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये लिलावाशिवाय एखाद्या इमारती जागेची विल्हेवाट लावावयाची असेल त्याबाबतीत, पोट-नियम (३) अन्वये निर्धारित केलेले भोगाधिकारमूल्य १०,००० रुपयांपेक्षा अधिक होत नसेल तर आयुक्ताच्या आणि इतर प्रकरणामध्ये राज्य शासनाच्या मान्यतेने, जिल्हाधिकारी, कलम २० व कलम ३१ अन्वये जागेतील भोगवटाच्या अधिकाराची अन्यसंक्राम्य धारणाधिकाराच्या तत्त्वावर विल्हेवाट लावील.

(३) पुढील घटक विचारात घेऊन, जिल्हाधिकारी, जागेचे भोगाधिकारमूल्य निर्धारित करील, म्हणजे :—

(अ) त्या वस्तीतील तशाच जमिनींची विक्री मूल्ये;

(ब) इमारती जागेचे ठिकाण;

(क) तशाच जमिनींची उपलब्धता आणि तिच्यासाठी असलेली मागणी; आणि

(ड) भूमिसंपादन अधिनियम, १८९४ अन्वये जमिनीची किंमत निर्धारित करताना जे घटक विचारात घेण्यात येतील ते घटक.

२७. **गृहनिर्माण योजनांसाठी जमीन देणे.**—त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये रचना करण्यात आलेले कोणतेही गृहनिर्माण मंडळ, स्थानिक प्राधिकरण किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था यांनी हाती घेतलेल्या विविध गृहनिर्माण योजनांसाठी, राज्य शासनास स्वरुप लक्षात घेऊन, आणि सहकारी गृहनिर्माण संस्थेच्याबाबतीत, राज्य शासनास याबाबतीत जी चौकशी करणे योग्य वाटेल ती चौकशी केल्यानंतर, निश्चित करण्यात येईल अशी उक्त संस्थेच्या सदस्यांची प्राप्ती विचारात घेऊन, राज्य शासनाकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल असे सवलतीचे भोगाधिकार मूल्य दिल्यावर, इमारती भूमीखंडातील भोगवटयाचे अधिकार, कलम ४० अन्वये, अन्यसंक्राम्य व अविभाज्य धारणाधिकाराच्या तत्त्वावर देता येतील.

परंतु, मुंबई [illegible] जिल्ह्याच्या सीमेबाहेर असलेली नागपूर, औरंगाबाद व पुणे नगरांतील आणि [illegible] लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या नगरांतील कोणत्याही जमीन जिल्हाधिकाऱ्यास, जर नियम २६, पोट-नियम (३) अन्वये अशा जमिनीचे निर्धारित केलेले भोगाधिकार मूल्य २५,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, कलम २० व कलम ३१ अन्वये, कोणत्याही सहकारी गृहनिर्माण संस्थेस देता येईल; आणि अशा रीतीने निर्धारित केलेले भोगाधिकार मूल्य २५,००० रुपयांपेक्षा अधिक परंतु ५०,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, आयुक्ताच्या मंजुरीने देता येईल.

२८. **स्वातंत्र्य सैनिक, सशस्त्र दलातील नोकर, सुवर्णकार आणि सरकारी नोकर यांना जमीन देणे.**—(१) जिल्हाधिकाऱ्यास, स्वातंत्र्य सैनिक, सशस्त्र दलातील नोकर आणि जे सर्वसाधारणपणे पंधरा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीसाठी राज्यातील रहिवासी असतील असे माजी सैनिक, भारत संरक्षण अधिनियम, १९६२, अन्वये काढलेल्या सुवर्ण नियंत्रण आदेशाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, पंधरा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीकरिता सामान्यपणे राज्यातील रहिवासी असतील असे सुवर्णकार आणि राज्य शासनाचे सरकारी नोकर यांना, त्याबाबतीत अर्ज मिळाल्यावर, राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेऊन, समुचित आकाराच्या इमारती जागा कलम २० व कलम ३१ अन्वये त्यामधील भोगवटयाच्या अधिकारांचा लिलाव केल्याशिवाय, निवासासाठी म्हणून देता येतील.

(२) आवश्यक ती चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याची अशी खात्री होईल की, अशा [illegible] राज्यात किंवा राज्याबाहेर कोठेही स्वतःचा कोणताही इमारती भूमिखंड किंवा इमारत नाही किंवा असा इमारती भूमिखंड किंवा इमारत त्याच्या स्वतःच्या नावे किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या किंवा त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीच्या नावे, नाही तर, नियम २६, पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेले घटक विचारात घेऊन, निर्धारित करण्यात येईल. असे भोगाधिकारमूल्य दिल्यावर, अशी जमीन, अन्यसंक्राम्य धारणाधिकारावर देता येईल.

(३) सशस्त्र दलातील नोकर किंवा माजी सैनिक (किंवा जर तो मेला असेल किंवा कोणत्याही कारणामुळे लिहिण्यास असमर्थ झाला असेल तर, त्याची पत्नी, वयस्क मुलगा, वडील, आई किंवा अविभक्त कुटुंबातील भाऊ) यांना निवासासाठी जमीन मिळावी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. असा अर्ज नाविक, सैनिक आणि वैमानिक मंडळाच्या अध्यक्षांमार्फत करण्यात येईल.

(४) राज्य शासनाची पूर्व परवानगी असेल त्याखेरीज, दिनांक १५ ऑगस्ट १९६८ रोजी—

(अ) तीन किंवा तीनपेक्षा कमी मुले असणाऱ्या ज्या व्यक्तीस त्या तारखेनंतर तीनपेक्षा अधिक मुले झाली असतील, किंवा

(ब) तीनपेक्षा अधिक मुले असणाऱ्या ज्या व्यक्तीच्या मुलांच्या संख्येत, त्या तारखेनंतर वाढ झाली असेल;

अशा कोणत्याही व्यक्तीस कोणतीही जमीन देण्यात येणार नाही.

२९. **मागासवर्गातील व्यक्तींना आणि भूमिहीन रोजमजुरांना जमीन देणे.**—(१) ज्या भटक्या जमातींच्या, विमुक्त जातींच्या आणि मागासवर्गाच्या व्यक्तींच्या व भूमिहीन शेतमजुरांच्या पुनर्वसनासाठी शासनाने विशेष योजना हाती घेतल्या असतील अशा व्यक्तींना, त्याबाबतीत करण्यात आलेले अर्ज मिळाल्यावर, जिल्हाधिकाऱ्याकडून, कलम २० व कलम ३१ अन्वये (राज्य शासन वेळोवेळी ठरवील अशा आकाराच्या) इमारती जागांबाबतचे भोगवटयाचे अधिकार देता येतील.

(२) जर इमारती जागेचे भोगाधिकारमूल्य २०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर असे भोगवटयाचे अधिकार, भोगाधिकारमूल्याशिवाय अन्यसंक्राम्य आणि अविभाज्य धारणाधिकाराच्या तत्त्वावर देता येतील आणि इतर बाबतीत आयुक्ताच्या मंजुरीने देता येतील.

३०. **नवीन गावातील भूमिभाग देणे.**—(१) कोणत्याही कारणावरून संपूर्ण गावाची जागा किंवा तिचा भाग यांचा त्याग करण्याचे ठरविण्यात येईल (यामध्ये जिला जुनी जागा असे संबोधण्यात आले आहे) तेव्हा, जिल्हाधिकारी, ग्रामपंचायतीशी विचारविनिमय करून, गावासाठी नवीन जागा म्हणून (यामध्ये जिला नवीन जागा असे संबोधण्यात आले आहे) योग्य अशा सरकारी जमिनीची निवड करील. योग्य अशी सरकारी जमीन नसेल त्याबाबतीत, त्या प्रयोजनाकरिता योग्य अशी खाजगी जमीन जिल्हाधिकाऱ्यास संपादन करता येईल.

(२) रस्ते, विहिरी, शाळा आणि इतर सार्वजनिक प्रयोजनांसाठी पुरेशा प्रमाणात तरतूद करून, नियम २५ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने, योग्य अशा भूमिभागात नवीन जागेची आखणी करण्यात येईल.

(३) जुन्या जागेतील प्रत्येक भोगवटादारास, पुढील शर्तीनुसार, नवीन जागेत भूमिखंड वाटून देण्यात येतील :—

(अ) भोगवटादार जुन्या जागेतील त्याचा भूमिखंड राज्य शासनाच्या स्वाधीन करील.

(ब) भोगवटादार, जेवढा भूमिखंड राज्य शासनाच्या स्वाधीन करील तितक्याच क्षेत्रफळाचा भूमिखंड त्यास नवीन जागेत देण्यात येईल; परंतु स्वाधीन केलेला भूमिखंड हा, पोट-नियम (२) अन्वये निश्चित केलेल्या किमान प्रमाण क्षेत्रापेक्षा कमी असेल तर, त्याला किमान क्षेत्राचा भूमिखंड देण्यात येईल.

(क) नवीन जागेत देण्यात आलेला भूमिखंड स्वाधीन केलेल्या भूमिखंडाच्या क्षेत्राएवढा असेल तेव्हा, कोणत्याही भोगाधिकार मूल्याची आकारणी करण्यात येणार नाही. नवीन जागेत देण्यात आलेल्या भूमिखंडाचे क्षेत्र स्वाधीन केलेल्या भूमिखंडाच्या क्षेत्रापेक्षा अधिक असेल तेव्हा, भूमिखंड मिळालेली व्यक्ती, जिल्हाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात येईल अशा बाजारभावाने जादा क्षेत्रासाठी भोगाधिकार मूल्य देईल.

(ड) भोगवटदाराने, ज्या अटींवर व ज्या अधिकारासह व ज्या दायित्वास अधीन राहून, जुन्या जागेत भूमिखंड धारण केला असेल त्याच अटींवर व अधिकारासह व दायित्वास अधीन राहून, तो भूमिखंड धारण करील.

(४) योग्य अशी कोणतीही सरकारी जमीन उपलब्ध नसल्यामुळे, भूमिसंपादन अधिनियम, १८९४ यान्वये शासनाकडून, त्या प्रयोजनार्थ, जी जमीन संपादन करण्यात येईल अशा कोणत्याही जमिनीच्या संबंधातसुद्धा पोट-नियम (२) आणि पोट-नियम (३) यांचे उपबंध लागू होतील.

नवीन जागेतील भूमिखंडाचा कब्जा भोगवटदारांना देण्यापूर्वी, प्रत्येक भोगवटादाराकडून नमुना पाचमध्ये करार करून घेण्यात येईल.

## क. औद्योगिक आणि वाणिज्यक प्रयोजनांसाठी जमीन देणे

३१. **औद्योगिक आणि वाणिज्यिक प्रयोजनांसाठी जमीन देणे.**—राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल असे भोगाधिकार मूल्य देण्यात आल्यावर, राज्य शासनास कलम ४० अन्वये अन्यसंक्राम्य व अविभाज्य भूधारणाधिकाराच्या तत्त्वावर इमारती जागा, औद्योगिक आणि वाणिज्यिक प्रयोजनासाठी देता येतील. अशा रीतीने जागा देणे हे, नियम ४१ खालील शर्तींस आणि पुढील शर्तीस अधीन असेल :—

(अ) राज्य शासनाची पूर्व परवानगी असल्याशिवाय, जमिनीची पोट-विभागणी करण्यात येणार नाही किंवा कोणताही असा पोट-विभाग निकालात काढण्यात येणार नाही ;

(ब) जमिनीवरील बांधकाम आणि संयंत्र व कोणतीही असल्यास, इतर संचमांडणी यासह, असेल त्याशिवाय, जमिनीची विल्हेवाट लावण्यात येणार नाही, आणि अशा रीतीने विल्हेवाट लावण्यात आलेली जमीन, राज्य शासनाची मान्यता असेल त्याशिवाय तो सुरुवातीस ज्या प्रयोजनाकरिता देण्यात आली असेल त्या प्रयोजनाखेरीज इतर प्रयोजनासाठी वापरता येणार नाही ;

(क) कारखाना, संयंत्र, बांधकाम आणि इतर संचमांडणी यांसह विक्री करून विल्हेवाट लावण्यात आल्यावर राज्य शासनाचा अर्ध्या अनर्जित उत्पन्नावर हक्क असेल आणि अशी जमीन, उपरोक्त कोणत्याही बांधकामाशिवाय, विकण्यात आली असेल त्याबाबतीत, राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे, ९० टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या अनर्जित उत्पन्नावर राज्य शासनाचा हक्क असेल ;

(ड) विक्री किंमती संबंधात, कोणताही विपर्यास किंवा लपवाछपवी झाली आहे असे राज्य शासनास सकारण वाटेल तर, राज्य शासनाच्या स्वेच्छानिर्णयानुसार विक्री अग्राह्य करण्यायोग्य ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या नियमांच्या प्रयोजनाकरिता, अनर्जित वाढ म्हणजे, विक्रीच्या रूपाने मिळालेली किंमत आणि (जमीन) देण्याच्या वेळी शासनास देण्यात आलेले भोगाधिकार मूल्य किंवा यथास्थिती अशा विक्रीच्या लगतपूर्वी जमीन ज्या किंमतीवर खरेदी करण्यात आली असेल ती किंमत, यांमधील फरकाइतकी रक्कम.

३२. **सहकारी संस्थांना सवलतीच्या दराने जमीन देणे.**—(१) उप-निबंधक, सहकारी संस्था यांच्या शिफारशीवरून, राज्य शासनास, कार्यालयीन इमारती बांधण्यासाठी, गोदामांसाठी, कृषि उत्पन्नाच्या संस्करणासाठी कारखाने सुरू करण्यास आणि तत्सम उद्देशांसाठी (सहकारी गृहनिर्माण संस्था आणि सहकारी मध्यवर्ती बँका वगळून) सहकारी संस्थांना, कलम ४० अन्वये इमारती जागेमधील भोगवटयाचे अधिकार देता येतील.

(२) नियम २६ च्या पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गोष्टी विचारात घेऊन ठरविण्यात येईल असे, जमीन देण्यात आल्याच्या तारखेस विद्यमान असलेल्या तिच्या बाजारमूल्याच्या ५० टक्क्यांएवढे भोगाधिकार मूल्य देण्यात आल्यावर, अशी जमीन, अन्यसंक्राम्य आणि अविभाज्य धारणाधिकार तत्त्वावर देण्यात येईल.

३३. **मीठ उत्पादनाकरिता जमीन देणे.**—(१) महसूल अधिनियमाच्या प्रकरण सात अन्वये आणि तदन्वये केलेल्या नियमान्वये निर्धारित केलेल्या जमिनीच्या पूर्ण बाजारमूल्याच्या पाच टक्के इतकी रक्कम किंवा दर हेक्टरला ६५ रुपये यांपैकी जी अधिक असेल तेवढी रक्कम खंड म्हणून देण्यात आल्यावर, २५ वर्षाच्या कालावधीकरिता, कलम ३८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीस अधीन राहून, बिन-दुमाला व भोगवटचात नसलेली जमीन पट्टयावर देता येईल ; राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल असा सुधारित खंड देण्याच्या आणि अशा नवीकरणाच्या तारखेस असलेली परिस्थिती विचारात घेतल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेऊन, ज्या शर्ती लादणे योग्य वाटतील त्या शर्तीस अधीन राहून पट्टेदाराच्या सूचनेवरून, तितक्याच मुदतीसाठी पट्टे-दाराच्या नावे पट्टयाचे एकदा नवीकरण करण्याचा विकल्प असेल.

(२) या नियमाखालील पट्टाधिकार खऱ्याखुऱ्या मीठ उत्पादकाला देता येतील, परंतु इतर गोष्टी समान असतील तर असे अधिकार व्यक्तीऐवजी सहकारी संस्थेला देण्यात येतील. परंतु संस्थेने जिल्हा-धिकाऱ्याची अशी खात्री करून दिली पाहिजे की, मीठ तयार करण्यास संस्था तांत्रिकदृष्टया समर्थ आहे आणि वाजवी कालावधीत मिठाच्या जमिनीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याकरिता त्या संस्थे-जवळ आर्थिक क्षमता आहे.

(३) पट्टयावर (जमीन) देणे हे, महसूल अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमाच्या उपबंधास आणि पुढील आणखी शर्तीस अधीन असेल :—

(अ) मीठ तयार करण्याकरिता जमिनीचा वापर करण्यात येत नसेल किंवा मीठ तयार करण्याच्या प्रयोजनाखेरीज इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता तिचा वापर करण्यात येत असेल त्याबाबतीत, जमीन परत घेतली जाण्यास पात्र ठरेल ;

(ब) सरकारी प्रयोजनांकरिता जमिनीची आवश्यकता असेल त्याबाबतीत, पट्टेदाराने केलेल्या, कोणत्याही असल्यास, सुधारणांच्या मूळ किमती बरोबरीची भरपाई वजा घसारा एवढी रक्कम भरल्यानंतर, जमीन परत घेतली जाण्यास पात्र ठरेल.

(४) जमीन कब्जात घेण्यापूर्वी, पट्टेदार नमुना सहा मध्ये करार करून देईल.

### ड. कोणत्याही अकृषिक प्रयोजनाकरिता जमीन पट्टयावर धारण करण्याचे अधिकार देणे

३४. **तात्पुरते पट्टे.**—नियम ३६ च्या उपबंधास आणि राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास जमिनीच्या अनुदानाशी तो अनुबद्ध करील अशा अटींवर व शर्तींवर, पाच वर्षापेक्षा जास्त नसेल अशा कालावधिकरिता, कोणत्याही अकृषिक प्रयोजनाकरिता म्हणून भोगवटचात नसलेली जमीन, सार्वजनिक लिलावाद्वारे, कलम ३८ अन्वये पट्टाधिकारावर देऊन तिची विल्हेवाट लावता येईल.

३५. **अकृषिक प्रयोजनासाठी दीर्घ मुदतीचे पट्टे आणि त्यांचे नवीकरण.**—(१) पूर्वगामी नियमां-मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनाची मंजुरी घेऊन, जिल्हाधिकाऱ्यास ९९ वर्षापेक्षा जास्त नसेल अशा कालावधीकरिता, कोणत्याही अकृषिक प्रयोजनार्थ, कलम ३८ अन्वये भोगवटचात नसलेल्या जमिनीतील धारणाधिकार देऊन तिची विल्हेवाट लावता येईल. जमीन अशा रीतीने देताना पट्टयास जोडण्यात येईल अशी नवीकरणासंबंधीची शर्त धरून, इतर अटींवर व शर्तींवर ती देता येईल.

(२) राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, पोटनियम (१) अन्वये अथवा प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या जमीन महसूलविषयक कोणत्याही विधीच्या उपबंधान्वये देण्यात आलेल्या पट्टयाचे जिल्हाधिकाऱ्याकडून (अ) जेथे पट्टयाने दिलेल्या जमिनीचे बाजार मूल्य रुपये पंचवीस हजारापेक्षा कमी नसेल त्याबाबतीत, आयुक्ताच्या मंजुरीने, आणि

(ब) मुंबई उपनगर जिल्ह्यातील जमिनीच्याबाबतीत व इतरत्र जेथे पट्टयाने दिलेल्या जमिनीचे बाजार मूल्य पंचवीस हजार रुपयांपेक्षा अधिक आहे अशा जमिनीच्या बाबतीत राज्य शासनाच्या मंजुरीने नवीकरण करण्यात येईल.

(३) पट्टयाचे नवीकरण करण्याच्या वेळी, सुधारित खंड निश्चित करण्यासाठी जमिनीचे बाजार मूल्य निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ, जिल्हाधिकारी, नियम २६, पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गोष्टी विचारात घेईल आणि बाजार मूल्य दहा हजार रुपयांपेक्षा अधिक होईल त्याबाबतीत, संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांचा किंवा याबाबतीत त्याने नेमलेल्या अधिकाऱ्याचा सल्ला घेईल.

३६. **कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी थंड हवेच्या ठिकाणी असलेल्या जमिनी देणे.**—थंड हवेच्या ठिकाणी किंवा राज्य शासनाकडून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर ठिकाणी, राज्य शासनाची मंजुरी घेऊन, जिल्हाधिकाऱ्यास, इमारतीची रचना, बांधणीचा कालावधी आणि नगरपालिका व स्वच्छताविषयक विनियम यांचे अनुपालन याबाबत इष्ट वाटतील त्या शर्तीवर, आणि राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने जिल्हाधिकारी निर्धारित करील अशा इतर शर्तीवर, इमारतींसाठी म्हणून, कलम ३८ अन्वये पट्टेदारी अधिकारावर जमीन देता येईल.

## इ. इतर बाबी

३७. **जमिनीच्या लहान पट्टयांची विल्हेवाट लावणे.**—भोगवटयात असलेल्या बिन-दुमाला इमारती जागेशेजारी राज्य सरकारकडे विहित असलेल्या जमिनीच्या कोणत्याही लहान पट्टयांची स्वतंत्र जागा म्हणून वाजवीरीत्या विल्हेवाट लावणे शक्य नसेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास, यापैकी कोणत्याही नियमात, एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, अशा जागेच्या धारकास, ज्या धारणाधिकारावर उक्त जागा तो धारण करीत असेल त्याच धारणाधिकारावर जर तो पुढील रक्कम देण्याचे मान्य करील तर, अशी जमिनीची पट्टी देता येईल :—

(अ) ज्या दराने तो अशा जागेसाठी आकारणी किंवा खंड, कोणताही असल्यास, देत असेल त्याच दराने जमिनीच्या अशा पट्टीची आकारणी किंवा खंड ;

(ब) अशा पट्टीची जागा आणि सक्त जागा दिल्यामुळे धारकास जे कोणतेही फायदे मिळण्याचा संभव असेल असे कोणतेही फायदे विचारात घेऊन, जिल्हाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशी किमत किंवा असे अधिमूल्य.

३८. **सरकारी जमिनीवर येणारे हवाई बांधकाम वगैरे उभारणे.**—(१) पायऱ्या, सबुतरे, तख्त, पोचमार्गाकरिता गटारावर पूल, सज्जा बांधणे किंवा सरकारी जमिनीवर येणारे इतर कोणतेही हवाई बांधकाम करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यास, अशा बांधकामाबद्दल किंवा सज्जाखाली किंवा यथास्थिती इतर जमिनीवर येणाऱ्या हवाई बांधकामाप्रीत्यर्थ वापरण्यात येईल अशा जमिनीच्या मूल्याच्या पाच टक्या-पेक्षा अधिक नसेल व किमान एक रुपया असेल अशी वार्षिक रक्कम दिल्यावर परवानगी देता येईल.

(२) १५ वर्षापेक्षा कमी नसेल अशा कालांतराने वार्षिक प्रदानाची फेरतपासणी करण्यात येईल.

(३) सर्व साधारणपणे, प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा अतिरिक्त शर्तीस अधीन राहून, अशा प्रयोजनाकरिता नमुना सातमधील अनुज्ञप्ती देण्यात येईल.

३९. **सरकारी जमिनीत, तीवरून पाण्याचे प्रमुख नळ इत्यादि घालण्यास परवानगी देण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.**—(१) जिल्हाधिकाऱ्यास, संबंधित कार्यकारी अभियंत्याशी विचारविनिमय केल्यावर, त्यास लादणे योग्य वाटेल अशा शर्तीवर, सरकारी जमिनीमधून, तीवरून किंवा ती खालून पाण्याचे प्रमुख

नळ, नळ आणि भूमिगत वीजतारा घालण्यास व मलकुंडी घालण्यास त्या प्रयोजनाकरिता भोगवट्यात घेतलेल्या जमिनीच्या बाजार मूल्याच्या ५ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल व किमान एक रुपया असेल इतकी वार्षिक रक्कम दिल्यावर परवानगी देता येईल.

(२) प्रत्येक खांबाकरिता २५ पैसे व प्रत्येक मनोरा रॉडस् किंवा स्टेरेल याकरिता ५० पैसे या दराने, वार्षिक भाडे दिल्यावर, सरकारी जमिनीवरील उपरि वीजतारांकरिता (ओव्हरहेड केबल्स) खांब, मनोरे, स्टे रॉडस् किंवा स्टे रेल्स यांच्या उभारणीस जिल्हाधिकाऱ्यास परवानगी देता येईल.

(३) १५ वर्षांपेक्षा कमी नसेल अशा मुदतीने वार्षिक प्रदानांची फेरतपासणी करण्यात येईल.

(४) पाण्याचे प्रमुख नळ आणि नळ घालण्यासाठी जमिनीचा वापर करण्यास परवानगी देण्यात आली असेल तर, नमुना आठमध्ये, भूमिगत वीजतारा घालण्यासाठी नमुना नऊमध्ये, मलकुंडीच्या बांधणी-साठी नमुना दहामध्ये आणि खांब, मनोरे, उपरि वीजतारांसाठी स्टे रॉड्स, स्टे रेल्स यांच्या उभारणीसाठी नमुना अकरामध्ये, करारनामा करून घेण्यात येईल.

४०. **धार्मिक प्रयोजनांकरिता जमीन देणे.**—राज्य शासनाची पूर्वमंजुरी असेल त्याशिवाय कोणतीही भोगवट्यात नसलेली जमीन, देवळे, चर्च, ज्यू उपासना स्थाने, मशीद किंवा इतर कोणत्याही धार्मिक प्रयो-जनाकरिता देण्यात येणार नाही किंवा भोगवट्यातील जमिनीत अशा इमारतीच्या बांधणीकरिता म्हणून जमिनीच्या वापरात बदल करण्याकरिता कलम ४४ अन्वये परवानगी देण्यात येणार नाही.

४१. **अकृषिक प्रयोजनाकरिता जमीन देण्याच्या शर्ती.**—(१) कलम २० व कलम ३१ अन्वये, कोणत्याही अकृषिक प्रयोजनाकरिता, भोगवट्यात नसलेल्या जमिनीची विल्हेवाट लावण्यात येईल त्याबाबतीत ती ज्या प्रयोजनाकरिता देण्यात आली असेल त्याच प्रयोजनाकरिता तिचा वापर करण्यात येईल आणि या नियमांच्या उपबंधानुसार जमीन देण्यास जिल्हाधिकारी अनुबद्ध करील अशा अटी व शर्तीस आणि जमीन महसूल अधिनियमाच्या प्रकरण सात आणि तदन्वये केलेले नियम यांच्या उपबंधान्वये जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल अशा अकृषिक आकारणीच्या प्रदानास ती जमीन अधीन असेल.

(२) इमारत जागेसाठी जमीन देण्यात आली असेल त्याबाबतीत. जिल्हाधिकाऱ्यास पुढील आणखी शर्ती जोडता येतील ; त्या अशा,—

(१) ज्या अकृषिक प्रयोजनाकरिता जमीन देण्यात आली असेल त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजना-करिता जमीन वाजवीरीत्या योग्य ठरेल अशा रीतीने प्रतिग्रहीता ती जमीन समतोल व स्वच्छ करील.

(२) जमीन महसूल अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधान्वये जिल्हाधि-काऱ्याची परवानगी मिळाल्याशिवाय, ज्या प्रयोजनाकरिता जमीन देण्यात आली असेल त्या प्रयो-जनाखेरीज कोणत्याही प्रयोजनासाठी प्रतिग्रहीता जमिनीचा व तोवर उभारलेल्या व उभारण्यात येणाऱ्या इमारतीचा वापर करणार नाही ;

(३) जमीन मिळाल्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत (अथवा जिल्हाधिकारी परवानगी देईल अशी आणखी मुदत) प्रतिगृहिता जमिनीवर भरीव व कायम स्वरुपाची इमारत उभारील ; या कसूर झाली तर, प्रतिगृहीताकडून देण्यात आलेल्या भोगवटा किमतीपेक्षा अधिक नसेल इतकी नुकसानभरपाई दिल्यानंतर ती जमीन परत घेतली जाण्यास पात्र असेल ;

(४) मान्य केलेल्या आराखड्यानुसार, आणि आराखडा मान्य करण्यास आणि अशा शर्ती विहित करण्यास सक्षम असलेल्या स्थानिक प्राधिकाऱ्याकडून विहित करण्यात येतील अशा शर्तीनुसार प्रति-ग्रहीता बांधकामे करील ;

(५) भूमिखंडांचे दोन-तृतीयांश क्षेत्र, सर्वसाधारणपणे मोकळे ठेवण्यात येईल आणि जिल्हाधि-काऱ्याच्या मते जर जमीन मौल्यवान असेल किंवा इमारतीमध्ये अत्यंत गरीब वर्गाच्या व्यक्ती राहणार असतील आणि पूर्वीच दाट लोकवस्ती असलेल्या बाजारात किंवा नगराच्या मध्यवर्ती भागात उक्त जमीन येत असेल तर, केवळ एक द्वितीयांश क्षेत्र मोकळे ठेवण्यात येईल. कोणतीही जमीन मौल्यवान

आहे किंवा कसे, कोणत्याही इमारतीत गरीब वर्गाच्या व्यक्ती रहात आहेत किंवा कसे किंवा त्या व्यक्ती गरीब वर्गातील आहेत किंवा कसे किंवा कोणतेही क्षेत्र पूर्वीच दाट लोकवस्तीचे आहे किंवा कसे या प्रश्नासंबंधीचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-नियमाच्या प्रयोजनार्थ, "गरीब वर्गातील व्यक्ती" म्हणजे, रु. ४,२०० पेक्षा ज्या वर्गातील व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न अधिक नसेल अशा व्यक्ती.

(६) जमीन मंजूर करणे, जमीन महसूल अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या उपबंधास अधीन असेल ;

(७) प्रतिग्रहीता, नगरेतर क्षेत्रात जिल्हाधिकारी, नगरेतर क्षेत्रात जमीन जेथे असेल ती वस्ती आणि तिची जागा विचारात घेऊन, वेळोवेळी विहित करील असे रस्त्यांपासून अंतर सोडून बांधकाम करील ;

(८) राज्य शासनाच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी लादील अशा इतर शर्ती.

४२. **नमुने.**—(१) या नियमात अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, या भागाच्या उपबंधान्वये जेव्हा भोगवटयात नसलेली जमीन, भोगवटयाच्या अधिकारासह कोणत्याही अकृषिक प्रयोजनाकरिता, देण्यात येईल तेव्हा—

(अ) जर जमीन, नगरेतर क्षेत्रात असेल तर, नमुना बारामध्ये करारनामा करून घेण्यात येईल; आणि

(ब) जमीन नागरी क्षेत्रात असेल तर, नमुना तेरामध्ये करारनामा करून घेण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये विहित केलेल्या नमुन्यात करारनामा स्वीकारताना, जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांना, कोणतेही असल्यास, अधीन राहून, नमुना बारा किंवा नमुना तेरामध्ये विहित केलेल्या करारनाम्यातील शर्तीसोबत जमीन मंजुरीचे स्वरूप आणि प्रकरणाची परिस्थिती विचारात घेऊन आवश्यक असतील अशा अतिरिक्त शर्ती जोडता येतील ; त्यातील शर्ती वगळता येतील किंवा त्यात बदल करता येईल.

(३) या नियमांच्या उपबंधान्वये, भोगवटयात नसलेली जमीन ती पट्टयाने धारण करण्याच्या अधिकारासह, कोणत्याही अकृषिक प्रयोजनाकरिता देण्यात येईल तेव्हा, जमिनीची जागा आणि ज्या प्रयोजनाकरिता जमीन वापरण्यात येत असेल ते प्रयोजन विचारात घेऊन, राज्य शासन आदेशाद्वारे निदेश देईल अशा नमुन्यात पट्टा करवून घेण्यात येईल.

## भाग पाच

## कृषिविषयक आणि अकृषिक अशा दोन्ही प्रयोजनांसाठी जमीन देणे

### अ. अतिक्रमणे

63

~~४३~~. **आक्रमण झालेल्या जमिनी देणे.**—(१) कलम ५१ च्या परंतुकाला आणि या नियमाच्या पोट-नियम (२) ला अधीन राहून मुंबई शहराव्यतिरिक्त इतर क्षेत्रामध्ये, अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीची तशी इच्छा असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास राज्य शासनाच्या सर्वसाधारण अथवा विशेष आदेशास अधीन राहून, कलम २० व कलम ३१ अन्वये भोगाधिकाराने किंवा कलम ३८ अन्वये पट्टेदारी अधिकाराने पुढील अतिक्रमण करणारास अतिक्रमण केलेली जमीन पुढील इतर शर्तीवर देता येईल ; त्या शर्ती अशा :—

(अ) अतिक्रमण झालेल्या जमिनी भोगवटयाच्या अधिकाराने देण्यासाठी शर्ती—

(एक) अतिक्रमण करणारा अतिक्रमणाचा संपूर्ण कालावधीची आकारणी आणि कलम ५०, पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे दंड देईल ;

(दोन) जर अतिक्रमण करणारा मागासवर्गाचा नसेल तर, तो सर्वसाधारण भोगाधिकार मूल्याच्या किमान अडीच पटीस अधीन राहून जिल्हाधिकारी, स्वेच्छानिर्णयानुसार निश्चित करील असे जमिनीच्या मूल्याच्या पाच पटीपेक्षा अधिक नसलेले भोगाधिकार मूल्य दंड म्हणून देईल ; आणि जर तो मागास वर्गाचा असेल तर, नियम ४५ ला अधीन राहून, सर्वसाधारण भोगाधिकार मूल्याएवढी रक्कम देईल ;

(तीन) जर अतिक्रमण करणारा मागासवर्गाचा नसेल तर तो अशा आकारणीच्या किमान अडीच पटीस अधीन राहून, जिल्हाधिकारी स्वेच्छानिर्णयानुसार निश्चित करील अशी, जमिनीच्या वापराच्या संदर्भात लादता येण्याजोग्या सर्वसाधारण वार्षिक जमीनमहसुलाच्या पाच पटीपेक्षा अधिक नसेल अशी आकारणी दंड म्हणून देईल आणि जर अतिक्रमण करणारा मागासवर्गाचा असेल तर, नियम ४५ ला अधीन राहून, अशा आकारणीएवढी रक्कम देईल :

परंतु जिल्हाधिकाऱ्यास राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, त्या प्रकरणाची परिस्थिती आणि पुढील गोष्टी विचारात घेऊन, अनुक्रमे शर्त (दोन) आणि (तीन) अन्वये विहित केलेल्या किमान दरापेक्षा कमी दराने, दंडादाखलचे भोगाधिकार मूल्य आणि दंडादाखलची आकारणी यांची रक्कम निश्चित करता येईल ; त्या शर्ती अशा :—

(१) जिल्हाधिकाऱ्याच्या मते, सरकारी जमिनीवर अतिक्रमण करतांना अतिक्रमण करणाऱ्याचा बुद्धिपुरस्सर किंवा असद्भावपूर्वक तसे करण्याचा उद्देश नव्हता ;

(२) जिल्हाधिकाऱ्याच्या मते, भोगाधिकार मूल्य आणि दंडादाखलची आकारणी यांची रक्कम विहित किमान मर्यादेपर्यंत निश्चित करण्यात आली तरी, धारकाचे आर्थिक नुकसान होण्याचा संभव आहे ; आणि

(३) त्या प्रकरणाच्या वस्तुस्थितीशी संबंधित असेल अशी इतर कोणतीही गोष्ट ;

(चार) जर जमीन अकृषिक प्रयोजनाकरिता वापरण्यात येत असेल तर, शर्त (तीन) अन्वये निश्चित केलेल्या आकारणीबाबत, १५ वर्षे मुदतीपर्यंत हमी देण्यात येईल ; आणि कृषिविषयक प्रयोजनाकरिता वापरण्यात येत असेल तर, जमाबंदीच्या मुदतीपर्यंत हमी देण्यात येईल ; आणि त्यानंतर, ती फेरतपासणीस पात्र ठरेल :

परंतु, आकारणीची फेरतपासणी करण्यात येईल तेव्हा, अतिक्रमण करणारा, सुधारित आकारणी देण्यास शर्त (तीन) अन्वये निश्चित केलेली दंडनीय आकारणी यापैकी जी अधिक असेल ती आकारणी देण्यास पात्र ठरेल ;

(पाच) जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय ज्या प्रयोजनाकरिता जमीन देण्यात आली असेल त्या प्रयोजनाखेरीज इतर कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करता कामा नये.

(सहा) अतिक्रमण करणारा नमुना चौदामध्ये करारनामा करून देईल.

(ब) अतिक्रमण केलेली जमीन पट्टेदारी अधिकारावर देण्यासाठी शर्ती :—

(एक) अतिक्रमणाच्या तारखेपासून पूर्वलक्षी प्रभावासह, तीस वर्षांच्या कालावधीसाठी पट्टा करण्यात येईल ;

(दोन) अतिक्रमण झालेल्या जमिनीच्या भोगाधिकार मूल्याच्या १५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल आणि २५ टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतका खंड देण्याबाबत पट्टेदाराने लेखी कबूली दिली पाहिजे ;

(तीन) अतिक्रमण झालेल्या जमिनीच्या अनधिकृत भोगवट्याकरिता, जिल्हाधिकारी, कलम ५० च्या पोट-कलम (२) अन्वये निर्धारित करील असा दंड देण्याचे पट्टेदार कबूल करील ;

(चार) जिल्हाधिकाऱ्याच्या मते पट्ट्याच्या मुदतीत अनधिकृत बांधकामात महत्त्वाचे फेरफार करण्यात आले असतील तर, पट्टेदार अतिक्रमण केलेली जमीन भरपाईशिवाय सोडून देण्याचे कबूल करील ;

(पाच) ज्या प्रयोजनाकरिता जमीन देण्यात आली असेल त्या प्रयोजनाखेरीज इतर कोणत्याही प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय तिचा वापर करता कामा नये ;

(सहा) पट्टेदार नमुना पंधरामध्ये करारनामा करून देईल.

(२) या नियमान्वये अतिक्रमण करणाऱ्याला जमीन देण्यापूर्वी, जिल्हाधिकाऱ्याने, नियम २६ च्या पोट-नियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गोष्टींनुसार निर्धारित केल्याप्रमाणे अतिक्रमण केलेल्या जमिनीचे बाजारमूल्य, पाच हजार रुपयांपेक्षा अधिक परंतु दहा हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल त्याबाबतीत, आयुक्ताची मंजुरी घेईल ; आणि असे मूल्य दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत, राज्य शासनाची मंजुरी घेईल.

४४. **ना-दावा तत्त्वावर विवक्षित अतिक्रमणे चालू ठेवण्यास परवानगी.**—मलकुंडी आणि चबुतरा, तख्त, पायऱ्या आणि लहान आकाराचे तत्सम बांधकाम धरून (ज्यामुळे लोकांची गैरसोय होणार नसेल अशा प्रकारच्या मलकुंडचा आणि बांधकाम) किंवा पुढे आलेले सज्जे, छप्पर आणि जमिनीवर आलेले इतर हवाई बांधकाम (ज्यामध्ये जागेच्या प्रत्यक्ष वापराचा अंतर्भाव होत नसल्याने जनतेची गैरसोय होणार नसेल, जागेच्या भविष्यातील विकासात अडथळा निर्माण होणार नसेल आणि अन्यथा आक्षेपार्ह नसतील अशी बांधकामे) या रूपाने झालेले सरकारी जमिनीचे अतिक्रमण चालू ठेवण्यास, अतिक्रमणाच्या तारखेपासून त्या स्थानातील विद्यमान असलेल्या जमिनीच्या वार्षिक भाडेमूल्याच्या दुप्पटीएवढी अनुज्ञप्ति फी तसेच व अतिक्रमण करणाराने नमुना सोळा किंवा यथास्थिती नमुना सतरामधील, ना-दावा करारनामा करून दिल्यावर जिल्हाधिकाऱ्याकडून परवानगी देण्यात येईल.

४५. **घरांसाठी म्हणून मागास वर्गांनी अतिक्रमण केलेली जमीन देणे.**—मागास वर्गाच्या व्यक्तींनी निवासव्यवस्थेच्या प्रयोजनाकरिता एकतर व्यक्तिशः किंवा गटाने अनधिकृतपणे भोगवटयात ठेवलेली नगरेतर क्षेत्रातील भोगवटयात नसलेली जमीन, प्रत्येक अतिक्रमण करणाऱ्याला आणि त्याच्या कुटुंबाला एकापेक्षा अधिक भूमिखंड देण्यात येणार नाहीत अशा रीतीने, राज्य शासन वेळोवेळी, आदेशाद्वारे विहित करील अशा आकाराचे उक्त जमिनीचे समुचित भूमिभाग पाडण्यात आल्यानंतर, अशा रीतीने भोगवटा करणाऱ्या व्यक्तींना जिल्हाधिकाऱ्याकडून विनामूल्य आणि आकारणीशिवाय देण्यात येईल. या नियमांना जोडलेल्या नमुना बारामधील करारनामा, प्रत्येक प्रतिग्रहीत्याकडून घेण्यात येईल.

४६. **मुंबई शहरातील अतिक्रमणे नियमात बसविणे.**—कलम ५१ च्या परंतुकास अधीन राहून, आणि राज्य शासनाच्या मंजुरीने जिल्हाधिकाऱ्यास, अतिक्रमण करणाऱ्याची तशी इच्छा असेल तर, अतिक्रमण केलेली जमीन अतिक्रमण करणाऱ्यास देता येईल आणि पुढील इतर शर्तींबरोबर जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ३०५ अन्वये ठेवलेल्या अभिलेखात उक्त जमिनीची नोंद उक्त व्यक्तीचे नावे करविता येईल :—

(एक) अतिक्रमण करणारा, कलम ५०, पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अतिक्रमणाच्या संपूर्ण कालावधीची आकारणी आणि दंड देईल ;

(दोन) अतिक्रमण करणारा, जमिनीच्या मूल्याच्या किमान अडीच पटीस अधीन राहून, अतिक्रमण केलेल्या जमिनीच्या बाजारमूल्याच्या पाच पटींपेक्षा अधिक नसेल एवढी शिक्षार्थ किमत देईल ;

(तीन) अतिक्रमण करणारा, जिल्हाधिकारी आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार निश्चित करील अशा सर्वसाधारण वार्षिक जमीनमहसुलाच्या पाच पटींपेक्षा अधिक असणार नाही, अशा जमीन महसुलाच्या किमान अडीच पटीस अधीन शिक्षार्थ आकारणी देईल.

## ब. जप्त केलेल्या जमिनीची विल्हेवाट

४७. **जप्त केलेली जमिनीची किंवा अन्यसंक्रामित धारण जमिनीचीविल्हेवाट करणे.**—कलम ३५ च्या पोट-कलम (४) अन्वये किंवा यथास्थिती कलम ७२ च्या पोट-कलम (३) अन्वये, भोगवटादाराच्या किंवा वरिष्ठ धारकाच्या कबजात परत करण्यात आली नसेल अशा, धारण जमिनीचा जमीनमहसूल देण्यात कसूर केल्यामुळे जप्त करण्यात आलेला भू-मापन क्रमांकाचा कोणताही उपविभाग किंवा भोगवटा किंवा अन्य संक्रामित धारण जमीन अशा रीतीने जप्त केलेली जमीन, कलम २२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी तत्काळ किंवा वाजवी मुदतीनंतर आवश्यक भासण्याचा संभव आहे असे जिल्हाधिकाऱ्यास आढळून येईल त्याशिवाय सार्वजनिक लिलावाद्वारे सर्वोच्च बोली बोलणारास देऊन तिची विल्हेवाट करण्यात येईल.

## क. सर्वसाधारण

४८. **लिलाव कसा करावा.**—सार्वजनिक लिलावाद्वारे जमिनीची विल्हेवाट करण्यासंबंधी या नियमात तरतूद करण्यात आली असेल त्याबाबतीत, जमीन महसूल अधिनियमाच्या प्रकरण अकराच्या आणि तदन्वये केलेल्या नियमाच्या उपबंधांचा धारण जमीन आणि विक्री करणे या गोष्टींशी जेथवर संबंध येत असतील तेथवर ते लागू होतील.

४९. **जमीन देण्यासाठी प्रमाणपत्र.**—या नियमांच्या उपबंधान्वये कोणतीही जमीन, एकतर भोगवटयाच्या अधिकारासह किंवा पट्टेदारी अधिकारासह देण्यात येईल त्याबाबतीत, तहसिलदार, या नियमांस जोडलेल्या नमुना अठरामधील प्रमाणपत्र देईल.

५०. **महानगर क्षेत्रांतील जमिनी.**—या नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६० चे कलम ३, पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महानगर प्रदेशातील कोणतीही जमीन राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीशिवाय, कोणत्याही कृषिक अथवा अकृषिक योजनासाठी देण्यात येणार नाही.

## नमुना एक

(नियम ६ पहा)

**शैक्षणिक, धर्मादाय किंवा सार्वजनिक प्रयोजनांच्या अभिवृद्धीसाठी महसुलमुक्त जमीन देण्याच्या सनदेचा नमुना.**

अ. ब..

यांस,

ज्याअर्थी, राज्य शासनाने ············ प्रयोजनाकरिता ············ जिल्ह्याच्या ····· तालुक्याच्या ············ गावातील खाली नमूद केलेल्या जमिनीच्या तुकड्याचा ताबा, तुम्ही—अ. ब. यांस महसूलमुक्त दिला आहे ; म्हणजेच—

उत्तरेस ··········, दक्षिणेस ··········, पूर्वेस ·········· आणि पश्चिमेस ···· ······ ने सीमित झालेला आणि उत्तरेकडून दक्षिणेपर्यंत ·········· व पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत ········· मोजणीच्या कमी अधिक प्रमाणात अंदाजे ·········· क्षेत्र समाविष्ट असलेला, आणि भूमि अभिलेखात ·········· क्रमांक धारण असलेला जमिनीचा संपूर्ण तुकडा ;

याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, उक्त जमीन, ············ १९ या तारखेपूर्वी, ज्या प्रयोजनाकरिता किंवा प्रयोजनांकरिता देण्यात आली होती त्या प्रयोजनाकरिता ती सर्व बाबतीत तयार करण्यात येऊन पूर्णपणे उपयोगात आणली जाईल या शर्तीवर, उक्त ·········· चा वेळोवेळी जो विधिसंमत धारक किंवा व्यवस्थापक असेल त्याच्याकडे, राज्य शासनाकडून करण्यात येणाऱ्या खंडाच्या किंवा जमीन महसुलाच्या सर्व मागणीपासून मुक्त, नेहमीकरिता ······ वर्षे मुदतीकरिता, उक्त जमीन नेहमीकरिता असण्याचे चालू राहील ; आणि राज्य शासनाच्या स्पष्ट संमतीशिवाय, कोणत्याही वेळी, उक्त जमीन किंवा तिच्यावर उभारलेली कोणतीही इमारत, पूर्वोक्त प्रयोजन किंवा प्रयोजने याखेरीज कोणत्याही इतर प्रयोजनाकरिता, तात्पुरती किंवा कायम स्वरूपात, परिवर्तित करण्यात येणार नाही ; आणि अशा प्रयोजनामध्ये किंवा प्रयोजनांमध्ये कोणताही बदल किंवा फेरबदल करण्यात येणार नाही आणि उक्त जमीन किंवा तिच्यावर उभारलेली इमारत यापासून प्रतिग्रहीत्यास फायदा मिळेल अशा रीतीने तिचा वापर करण्यात येणार नाही आणि कोणत्याही अशा अनधिकृत परिवर्तनाच्या, बदलाच्या किंवा फेरबदलाच्या प्रसंगी किंवा उक्त जमिनीपासून किंवा तिच्यावर उभारलेल्या इमारतीपासून प्रतिग्रहीत्यास फायदा मिळेल त्या प्रसंगी, उक्त जमिनीची शेतीच्या प्रयोजनाकरिता आकारणी करण्यात आली असून जणू शेतीशी संबंध नसलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी अनधिकृतरीत्या तिचा वापर करण्यात आला आहे असे समजून, महाराष्ट्र

जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ६७ अन्वये ती पात्र होईल अशा आकारणीशिवाय, उक्त अधिनियमाच्या कलम ४५ च्या किंवा जमीन महसुलाच्या वसुलीसंबंधात त्यावेळी अंमलात असलेल्या इतर तत्सम विधीच्या उपबंधान्वये, जिल्हाधिकाऱ्याकडून याबाबतीत निश्चित करण्यात येईल अशा दंडास पात्र ठरेल. आणि पूर्वोक्त अशा कोणत्याही प्रसंगी किंवा .......... १९ या पूर्वोक्त तारखेपूर्वी ज्या प्रयोजनाकरिता किंवा प्रयोजनांकरिता उक्त जमीन देण्यात आली असेल त्या प्रयोजनाकरिता किंवा प्रयोजनांकरिता ती तयार करण्यात येऊन तिचा पूर्णपणे वापर करण्यात कसूर झाल्याच्या प्रसंगी, किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनाकरिता राज्य शासनास उक्त जमीन आवश्यक वाटल्याच्या प्रसंगी, उक्त जमीन आवश्यक असल्याबद्दलची जिल्हाधिकाऱ्याच्या सहीची घोषणाही, उक्त धारक किंवा व्यवस्थापक आणि राज्य शासन यांच्या बाबतीत निर्णायक असेल किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ (सन १८९४ चा एक) अन्वये संपादनाप्रीत्यर्थ राज्य शासनाकडून जमीन अधिसूचित करण्यात आली असेल त्या प्रसंगी, किंवा राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय उक्त जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध हस्तांतरित करण्यात आल्याच्या प्रसंगी उक्त धारकास किंवा व्यवस्थापकास, पुढील दोन पैकी एका मार्गाचा अवलंब करण्याबद्दल राज्य शासनाने सहा महिने मुदतीची आगाऊ नोटीस देणे हे विधिसंमत असेल :—

(१) उक्त जमीन रिकामी करून कोणत्याही व्यक्तीच्या सर्व दाव्यांपासून किंवा भारांपासून मुक्त राज्य शासनाच्या स्वाधीन करण्यास भाग पाडणे, किंवा

(२) पुढील रकमेपेक्षा अधिक नसेल इतकी भरपाई दिल्यावर कोणत्याही व्यक्तीच्या सर्व दाव्यांपासून आणि भारांपासून मुक्त, उक्त जमीन आणि तिच्यावर उभारलेल्या कोणत्याही इमारती किंवा त्यावर केलेली बांधकामे परत घेणे आणि त्यांचा ताबा घेणे :—

(अ) (जमीन) मिळण्यासंबंधी राज्य शासनास दिलेली (कोणतीही असल्यास) रक्कम, आणि

(ब) उक्त जमिनीवर उक्त प्रतिग्रहीत्याकडून अधिकृतरीत्या उभारलेल्या कोणत्याही इमारतीची किंवा इतर बांधकामाची, ती परत ताब्यात घेतल्यावेळचा खर्च किंवा मूल्य यांपैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम.

सर्व खाणी व खनिज द्रव्ये आणि दगडखाणी यांवरील अधिकार आणि खाणकाम करण्याच्या व उक्त द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ या अधिनियमाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे सर्व वाजवी सोयींसह प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य राखून ठेवून ही जमीन देण्यात येत आहे.

ही सनद महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने .......... १९ रोजी .......... जिल्हाधिकाऱ्याकडून करून देण्यात आली आहे.

(स्वाक्षरित) ..........

शिक्का.

जिल्हाधिकारी.

---

## नमुना दोन

[नियम ७ (२) पहा]

**शैक्षणिक संस्थांना किंवा स्थानिक प्राधिकरणांना आणि क्रीडांगण/व्यायामशाळा म्हणून वापरण्यात यावयाच्या व्यायामशाळांकरिता किंवा इतर मनोरंजनाच्या प्रयोजनांकरिता दिलेल्या जमिनीच्या पट्ट्याचा नमुना.**

महाराष्ट्र शासन

.................... यास

प्रमाणित करण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) आणि तदन्वये केलेले नियम यांच्या उपबंधास अधीन राहून आणि यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीस अधीन राहून, श्री. .................... राहणार ..........

(यानंतर ज्यांना "पट्टेदार" असे संबोधण्यात आले आहे) यांना, महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने (यापुढे ज्यांचा "शासन" असा निर्देश करण्यात आला आहे) ·············च्या जिल्हाधिकाऱ्याकडून (यापुढे ज्यांना "जिल्हाधिकारी" असे संबोधण्यात आले आहे) क्रीडांगण/व्यायामशाळा या प्रयोजनासाठी आणि/किंवा* प्रयोजनाकरिता, ··········· दिवसापासून सुरू होणाऱ्या ··········· वर्षाच्या कालावधीकरिता (यापुढे ज्यास "उक्त कालावधी" असे संबोधण्यात आले आहे), ··········· जिल्हा ··········· तालुका/गाव/नगर/शहर यात असलेला व उत्तरेस ···········, दक्षिणेस ··········, पश्चिमेस ··········· आणि पूर्वेस ··········· यांनी सीमित व सी. टी. एस./ सर्वेक्षण क्रमांक ··········· धारण करणारा आणि सुमारे ··········· चौ. मीटर/हेक्टर मोजणीचा आणि पुढील आकाराचा व सोबत जोडलेल्या नकाशात दाखविल्याप्रमाणे पुढील लांबी रुंदी असलेल्या जमिनीच्या तुकड्यांचा भोगवटा करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या पट्ट्याच्या शर्ती पुढील-प्रमाणे आहेत :—

१. पट्टेदार, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र पाच) याच्या प्रकरण दहाच्या उपबंधान्वये जमिनीच्या उक्त तुकड्यावर, वेळोवेळी, बसविण्यात येईल अशा उपकरासह, दरवर्षी ऑगस्टच्या पहिल्या तारखेस एक रुपया वार्षिक खंड राज्य शासनाकडे आगाऊ देईल ;

२. पट्टेदार, जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, जमिनीच्या उक्त तुकड्यावर कोणतेही बांधकाम करणार नाही.

३. पट्टेदार, क्रीडांगणे/व्यायामशाळा आणि/किंवा ········ च्या प्रयोजनाव्यतिरिक्त, इतर कामांसाठी जमिनीच्या उक्त तुकड्याचा वापर करणार नाही.

४. जमिनीचा उक्त तुकडा आणि त्यावरील सर्व बांधकामे, नगरपालिका कर आकारणीस आणि स्थानिक प्रयोजनाकरिता बसविण्यात आली असेल किंवा नंतर बसविण्यात येईल अशा कोणत्याही, आकारणीस अधीन असतील आणि उक्त जमिनीच्या किंवा तीवरील कोणत्याही बांधकामाच्या संबंधात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ६४ च्या दुसऱ्या परिच्छेदात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत योजलेल्या स्वरूपाची कोणतीही आकारणी, कर, उपकर, यास सुद्धा अधीन असेल.

†५. शासनाच्या शैक्षणिक विभागाकडून/शासनाकडून देण्यात आलेली पट्टेदाराचा ‡ ········ मान्यता बंद झाल्याच्या प्रसंगी, पट्टा बंद झाल्याचे समजण्यात येईल.

६. पट्टेदार, जिल्हाधिकाऱ्याकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यात येईल अशा सरकारी अधिकाऱ्यांना, सर्व वाजवी वेळात जमिनीच्या उक्त तुकड्याच्या कोणत्याही भागात प्रवेश करून त्याचे निरीक्षण करण्यास परवानगी देईल.

७. पट्टेदार, जमिनीचा उक्त तुकडा किंवा त्याचा कोणताही भाग पोट-भाड्याने देणार नाही किंवा यावर कोणताही भार निर्माण करणार नाही.

८. जिल्हाधिकाऱ्याच्या मते जर सरकारच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजनाकरिता जमीन आवश्यक असेल तर, जिल्हाधिकारी, त्याबाबतीत पट्टेदाराला एका कॅलेंडर महिन्याची लेखी नोटीस देऊन हा पट्टा कोणत्याही वेळी रद्द करू शकेल.

९. या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीन्वये पट्टा समाप्त करण्यात आल्याच्या प्रसंगी, पट्टा समाप्त झाल्याबद्दल पट्टेदाराला कोणत्याही भरपाईदाखल दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही. पट्टेदार, शर्त ८ अन्वये पट्टा समाप्त करण्यात आला असेल तर, उक्त खंडाअन्वये दिलेल्या नोटिशीची मुदत संपण्यापूर्वी, आणि इतर बाबतीत, जिल्हाधिकारी निश्चित करील अशा मुदतीत, स्वखर्चाने, जमिनीच्या

---

*येथे इतर मनोरंजनाचे प्रयोजन विनिर्दिष्ट करावे.

†शैक्षणिक संस्था किंवा व्यायामशाळा यांच्या बाबतीत समाविष्ट करावयाचे.

‡यथास्थिती, शैक्षणिक संस्थेचे किंवा व्यायामशाळेचे नांव समाविष्ट करावे.

उक्त तुकडयावर उभे असलेले कोणतेही बांधकाम किंवा बांधकामे काढून टाकील. आणि उक्त कालावधी संपल्यानंतर, कुळवहिवाट सुरू होण्याच्या वेळी जमिनीचा उक्त तुकडा ज्या स्थितीत होता त्याच स्थितीत त्याचा कब्जा जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन करील.

१०. जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटतील अशा शर्तीवर पट्टयाचे आणखी मुदतीपर्यंत नवीकरण करण्यात आले नसेल तर, पट्टेदार, कोणताही अडथळा न आणता व शांततापूर्वक उक्त मुदत संपल्यावर जमिनीच्या उक्त तुकडयाचा कब्जा त्याने तो तुकडा ज्या स्थितीत घेतला असेल त्याच स्थितीत देईल.

११. पट्टयाच्या उक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे किंवा जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या कोणत्याही उपबंधांचे पालन करण्यात कसूर झाल्यास जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त पट्टा रद्द होण्यास पात्र ठरेल आणि त्यानंतर तो, जमिनीच्या उक्त तुकडयाचा कब्जा तावडतोब परत घेईल आणि नोटीस किंवा कोणतीही भरपाई दिल्याशिवाय, पट्टेदाराला संक्षिप्त चौकशी करून काढून लावील किंवा अशा रीतीने जमिनीचा कब्जा परत घेण्याऐवजी, या पट्टयाचा शर्त २ च्या विरोधी असेल असे उक्त जमिनीवर उभारलेले कोणतेही बांधकाम जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल अशा कालावधीत पाडून टाकण्याबद्दल आदेश देईल आणि उक्त कालावधीत उक्त बांधकाम पाडून टाकण्यात आले नाही तर पट्टेदाराच्या खर्चाने, ते पाडून टाकण्याची व्यवस्था करील ; आणि राज्य शासनाच्या आदेशांना अधीन राहून, परिस्थितीनुसार त्याला इष्ट वाटेल अशा वरीलपैकी एका किंवा दुसऱ्या उपायाचा अंगीकार करणे हे जिल्हाधिकाऱ्याच्या एकमेव स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असेल. जिल्हाधिकाऱ्याने शर्त ३ चे उल्लंघन झाल्याच्या बाबतीत, संपूर्ण खंड व जमिनीच्या संबंधातील अकृषिक आकारणीच्या चाळीस पटीपर्यंत वाढविता येईल. असा दंड वसविणे हे विधिसंमत असेल.

१२. या पट्टयातील "पट्टेदार" या संज्ञेमध्ये, पट्टेदार, त्याचे वारस, उत्तराधिकारी, कायदेशीर प्रतिनिधी आणि अनुज्ञात अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल आणि "जिल्हाधिकारी" या संज्ञेमध्ये, त्या वेळेचा जिल्हयाचा जिल्हाधिकारी आणि या पट्टयान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी राज्य शासन ज्याची नेमणूक करील असा कोणताही इतर अधिकारी यांचा समावेश होईल. हा पट्टा महाराष्ट्राच्या राज्यपालांच्यावतीने, ........ जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याकडून, त्याच्या सही शिक्क्यानिशी दिनांक .......... एकोणीसशे .......... या दिवशी करून देण्यात आला.

(सही) ...............

(शिक्का)

जिल्हाधिकारी.

(१)
(२)

यांच्या उपस्थितीमध्ये :—
मी स्वीकारला.
जोडपत्र : नकाशा.

---

## नमुना तीन

(नियम १७ व २०)

**महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ याच्या नियम १७ किंवा नियम २० अन्वये ज्या व्यक्तींना भोगवटयाच्या अधिकारासह जमीन मंजूर करण्यात आली त्या व्यक्तींनी करून द्यावयाच्या कराराचा नमुना.**

तहसिलदार.........................यांस,

मी, अ ब,* राहणार..........., गाव........जिल्हा, याद्वारे गाव.....तालुका......जिल्हा.......येथील......भूमापन क्रमांकाखाली येणाऱ्या जमिनीच्या भोगवटयाच्या अधिकाराचा स्वीकार करीत आहे, आणि उक्त जमिनीचा भोगवटदार म्हणून, माझे नाव, सरकारी अभिलेखात नमूद करण्यात यावे अशी विनंती करीत आहे.

---

*येथे नियम २० च्या अर्थानुसारचे प्रतिग्रहीत्याचे वर्णन लिहावे.

उक्त जमीन, यात खालील नमूद करण्यात आलेल्या शर्ती व महाराष्ट्र जमीन महसूल व अधिनियम, १९६६ व त्याअन्वये अंमलात असलेले नियम यांच्या उपबंधास अधीन ठेवून, १९.......... च्या .......... दिवसापासून, शाश्वत कालपर्यंत मला देण्यात आली आहे ;

आणि मी, उक्त जमिनीबाबत, वेळोवेळी, कायदेशीररीत्या देय होईल असा जमीन महसूल देण्याची हमी देत आहे (किंवा, राज्य शासनाने उक्त जमिनीबाबतची जमीन महसुलाची माफी, बंद केल्यास, राज्य शासनाच्या आदेशाअन्वये किंवा यथास्थिति अन्यथा, तीवर कायदेशीररीत्या लादण्यात येईल असा, उक्त जमिनीवरील जमीन महसूल देण्याची मी हमी देत आहे.).

उक्त जमीन पुढील आणखी शर्तीस अधीन मला देण्यात आली आहे व मी याद्वारे त्या शर्ती कबूल करीत आहेत :—

(१) मी, माझे वारस, अभिहस्तांकिती व कायदेशीर प्रतिनिधी—

(अ) जिल्हाधिकाऱ्याची पूर्व-मंजुरी असेल ते खेरीज करून, उक्त जमीन किंवा तिचा कोणताही भाग गहाण ठेवणार नाहीत, विकणार नाहीत, अभिहस्तांकित करणार नाहीत किंवा अन्यथा तिचे/त्याचे हस्तांतरण करणार नाहीत ;

(ब) (जमीन) देण्यात आल्याच्या तारखेपासून दोन वर्षाची मुदत संपण्यापूर्वी, उक्त जमीन लागवडी-खाली आणतील ;

(क) भोगाधिकार मूल्य म्हणून रु. .......... हप्त्यामध्ये देऊ.
प्रत्येक हप्त्याची रक्कम .......... रोजी किंवा त्यापूर्वी देय असेल ;

(२) पूर्वोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा मी भंग करीन तर, जिल्हाधिकाऱ्यास, मला देण्यात आलेली जमीन परत घेऊन तिचा कब्जा घेता येईल आणि मी उक्त जमिनीतून काढून टाकला जाण्यास पात्र ठरेन ;

(३) शर्त (२) अन्वये मला उक्त जमिनीतून काढून टाकण्यात आल्यास, मी दिलेले किंवा माझ्याकडून वसूल करण्यात आलेले भोगाधिकार मूल्य, कोणतेही असल्यास, मला परत करण्यात येईल.

दिनांक .............. १९        रोजी .................. येथे ..............
यांनी लिहिले.

(सही) अ. ब.

आम्ही जाहीर करतो की, या करारावर सही करणारी अ ब ही व्यक्ती, आमच्या वैयक्तिक माहितीनुसार जी व्यक्ती असल्याचे ती स्वतः सांगत आहे तीच व्यक्ती असून तिने आमच्या समक्ष यावर सही केलेली आहे.

(सही) ..................

(सही) ..................

मी जाहीर करतो की, माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि काळजीपूर्वक चौकशी केल्यानंतर मला ज्ञात झालेल्या संपूर्ण माहितीनुसार, ज्या व्यक्तीने हा करार करून दिला आहे ती व्यक्ती, वरील जमिनीबाबत वेळोवेळी देय होईल असा जमीन महसूल वक्तशीरपणे देण्यास जबाबदार व्यक्ती म्हणून राज्य शासनाकडून मान्यता मिळण्यास पात्र अशी व्यक्ती आहे.

(सही) ..................

तलाठी.

## नमूना चार

(नियम २२ पहा)

### पुन:प्रापण पट्टा

हा करारनामा एकापक्षी महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांना यात यापुढे "पट्टाकार" असे संबोधण्यात आले आहे) आणि दुसऱ्या पक्षी ········ येथील रहिवासी ······ यांच्यामध्ये दिनांक ·········· रोजी करण्यात आला आहे. हा करारनामा पुढील गोष्टीच्या साक्षीदाखल करण्यात येत आहे ;

ज्या जमिनीचे भूमापन क्रमांक, क्षेत्र व सीमा यांत याखाली नमूद केलेल्या अनुसूची अ मध्ये देण्यात आल्या असून व ज्या जमिनी यापूर्वी ·········· ज्या भोगवटयात होत्या व आता ज्या ············· च्या भोगवटयात आहेत आणि ········· च्या जिल्हाधिकाऱ्याने (यात यानंतर ज्याचा 'जिल्हाधिकारी' म्हणून निर्देश करण्यात आला आहे) सही केलेल्या व यासोबत जोडण्यात आलेल्या नकाशात दाखविण्यात आल्या आहेत अशा, ······· जिल्हा ······ तालुका ······ गावातील सर्व दलदल, खार जमिनी, पट्टाकार, याद्वारे, पट्टेदारास पट्टयावर देत असून पट्टेदार, त्या ·········· १९ दिवसापासून सुरू होणाऱ्या ············· वर्ष मुदतीपर्यंत धारण करील व उक्त मुदतीत, जमिनीच्या ज्या भागास खंडाची रक्कम देण्याची माफी देण्यात येईल असा, उक्त जमिनीबद्दल (सार्वजनिक रस्त्यासाठी वापरण्यात येईल असा भाग खेरीजकरून) पट्टाकारास पुढीलप्रमाणे वार्षिक खंड देईल ; म्हणजेच, उक्त मुदतीच्या पहिल्या दहा वर्षासाठी, कोणताही खंड नाही व पुढील २० वर्षासाठी म्हणजेच ······ १९ ········ तारखेस सुरू होऊन ·········· १९ ·· रोजी संपणाऱ्या मुदतीसाठी, जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी विहित व नियुक्त करण्यात येईल अशा हप्त्यात, अशा दराने व अशा व्यक्तीस, दर हेक्टरला साठ पैसे इतकी वार्षिक रक्कम आणि ····· तारीख आणि, यानंतर तरतूद केलेली आकारणी प्रथम निश्चित करण्यात, आल्याची तारीख, यामधील कोणत्याही मुदतीसाठी, यात यापूर्वी अंतिम राखून ठेवलेली वार्षिक रक्कम, यात यापूर्वी उल्लेखिलेल्या रीतीने देईल आणि यात यानंतर तरतूद केलेली आकारणी प्रथमत: निश्चित करण्यात आल्यापासून व त्यानंतर, सर्वसाधारण भोगवटादार शासनाधीन ज्या जमिनी धारण करील त्यांच्या संबंधात, विधीअन्वये किंवा त्यावेळी विधीप्रमाणे अंमलात असलेले नियम याअन्वये, वेळोवेळी जमीन महसूल म्हणून जी रक्कम तो देय असल्याचे आढळून येईल ती रक्कम, देईल आणि पट्टेदार पट्टाकाराबरोबर याद्वारे करार करून पुढील गोष्टी कबूल करीत आहे ; त्या गोष्टी अशा : प्रथमत:, पट्टेदार स्वखर्चाने आणि दाजवी दक्षता घेऊन, याद्वारे पट्टयावर दिलेल्या जमिनीचे पुन:प्रापण करील, हेतू हा की, शेतीच्या प्रयोजनार्थ त्यांचा वापर करण्यासाठी त्या योग्य होतील आणि ...... तारखेपासून सुरू होणाऱ्या पहिल्या दहा वर्षामध्ये, उक्त जमिनीपैकी निम्म्या जमिनीचे व वीस वर्षामध्ये संपूर्ण जमिनीचे, पुन:प्रापण करील ; आणि याद्वारे मंजूर करण्यात आलेल्या उर्वरित मुदतीत, अशा पुन:प्रापित जमिनीची व्यवस्था ठेवील आणि उक्त संपूर्ण जमिनीचे संपूर्ण पुन:प्रापण करण्यात येऊन त्या लागवडीयोग्य होईतोपर्यंत, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व लेखी सहमतीशिवाय, उक्त जमिनी किंवा त्यांचा भाग अभिहस्तांकित किंवा पोट भाडयाने देणार नाही किंवा उक्त जमिनीच्या कोणत्याही भागावर गुरे चारण्यासाठी कोणताही कर वा फी आकारणार नाही किंवा ती स्वीकारणार नाही आणि पट्टेदार, उक्त जमिनीचे कोणत्याही वेळी, विभाजन करणार नाही, ती मृत्यूपत्रान्वये देणार नाही, तिचे अन्यसंक्रमण करणार नाही, तिचे अभिस्तांकन करणार नाही, ती गहाण ठेवणार नाही किंवा तिच्यावर अन्य प्रकारे आकार किंवा भार निर्माण करणार नाही किंवा उक्त जमिनीच्या संबंधात निर्वाहक क्षेत्र म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडून याद्वारे निश्चित करण्यात येईल अशा क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असलेला उक्त जमिनीचा कोणताही भाग, इतर कोणत्याही व्यक्तीस, लागवडीखाली आणण्यास, तिचा वापर करण्यास किंवा भोगवटा करण्यास, परवानगी देणार नाही ; तसेच उक्त जमिनीचा असा कोणताही भाग अभिग्रहणास, जप्तीस, ताब्यात घेण्यास, विक्रीस किंवा न्यायालयीन कारवाईद्वारे अभिग्रहण केला जाण्यास, जप्त केला जाण्यास, ताब्यात घेतला जाण्यास, विक्री किंवा विभाजन केला जाण्यास पात्र ठरणार नाही ; परंतु महाराष्ट्र शासनाने यथोचित रीत्या प्राधिकृत केलेला कोणताही सरकारी अधिकारी, उक्त जमिनीचा कोणताही भाग हा पुन:स्थापित करण्याजोगा नाही असे लेखी प्रमाणित करील तर, अशा भागास, यात यापूर्वी असलेल्या कराराच्या बजावणीतून वगळण्यात येईल. आणखी असे की, पट्टेदारास उक्त जमिनीचा जो कोणताही भाग पुन:स्थापित करणे त्यास शक्य नसेल असा भाग, पहिल्या दहा वर्षात त्यास

सोडून देता येईल आणि त्यानंतर असा भाग, यात समाविष्ट असलेल्या करराच्या बजावणीतून वगळण्यात येईल ; दुसरे असे की, पट्टेदार स्वखर्चाने, (अ) यात खाली नमूद केलेल्या अनुसूची ब मध्ये उल्लेखिलेले व वर्णन केलेले व यासोबत जोडलेल्या नकाशात रेखाटलेले विविध रस्ते खुले ठेवील, (ब) जिल्हाधिकारी वेळोवेळी फर्मावील अशा याद्वारे पट्ट्यावर दिलेल्या जमिनीमध्ये व त्यानजीक, जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने, जलमार्गाची तरतूद करील व ते सुस्थितीत ठेवील, (क) जिल्हाधिकारी वेळोवेळी फर्मावील त्याप्रमाणे उक्त जमिनीवर नवीन सीमाचिन्हे उभारील व अशी सर्व नवीन तसेच जमिनीवर विद्यमान असलेल्या सर्व सीमाचिन्हांचे परिरक्षण करील व ती सुव्यवस्थित ठेवील ; तिसरे असे की, उक्त पट्टेदार, यात यापूर्वी अनुक्रमे निश्चित केलेल्या खंडाच्या रकमा, त्या अनुक्रमे देण्यासाठी यात यापूर्वी तरतूद केलेल्या वेळी व रीतीने देईल आणि उक्त खंडाच्या रकमेचा कोणताही हप्ता जेव्हा देण्यात येणार नाही तेव्हा, ती रक्कम, त्या बाबतीत त्यावेळी. . . .अमलात असलेल्या विधीच्या उपबंधान्वये, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसूल करण्यात येईल ; तसेच पट्टेदार, पट्ट्याच्या मुदतीत कोणत्याही वेळी, उक्त जमीन किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संबंधात देय होतील अशा सर्व पट्ट्या, कर व इतर निर्गामी रकमा (कोणत्याही असल्यास), देईल ; चौथे म्हणजे, दिनांक . . . . . . . . . . . . रोजी व त्यानंतर, याद्वारे पट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनी, भूमापनास व सर्वसाधारण भोगवटदारांनी शासनाधीन धारण केलेल्या जमिनींच्या संबंधात, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या विधीअन्वये किंवा विधीप्रमाणे अमलात असलेल्या नियमान्वये जमीन महसुलाच्या आकारणीस पात्र ठरतील आणि त्यानंतर, याद्वारे मंजूर करण्यात आलेल्या मुदतीच्या उर्वरित मुदतीत, पट्टेदार, असे विधि व नियम यांच्या सर्व उपबंधास तसेच अंमलात राहतील अशा त्याच्या पट्ट्याच्या अशा करारास व तरतुदीस सुद्धा अधीन राहतील ; परंतु याद्वारे असे नेहमीच कबूल करण्यात येते की, कोणताही करार, शर्त किंवा त्यातील तरतुदी यांचा पट्टेदाराकडून भंग करण्यात येईल तर व तेव्हा, पट्टाकारास उक्त जमिनीवर किंवा संपूर्ण जमिनीसाठी म्हणून तिच्या एखाद्या भागावर, पुन्हा प्रवेश करता येईल आणि त्यानंतर, पट्टा रद्द होईल आणि त्या बाबतीत, यात यापूर्वी विहित केलेल्या मुदतीत, अनुक्रमे संपूर्ण किंवा निम्म्या जमिनीचे पुनःप्रापण करण्यात कसुरी झाल्याचे बाबतीत, पट्टाकारास उक्त जमिनीवर पुनः प्रवेश करता येईल आणि यात पूर्वी असलेल्या त्या बाबतीतील शक्ती अन्वये, हा पट्टा रद्द करता येईल आणि जिल्हाधिकाऱ्याच्या मते (ज्याचा निर्णय अंतिम असेल) दिनांक . . . . . . . . रोजी संपणाऱ्या दोन वर्षाच्या मुदतीत, वाजवी दक्षतेने, पुनःप्रापणाचे काम करण्यात आले नसेल तर, पट्टाकारास उक्त तारखेस किंवा त्यानंतर, उक्त जमिनीवर प्रवेश करता येईल आणि यात यापूर्वी असलेल्या त्या बाबतीतील शक्तीअन्वये, हा पट्टा रद्द करता येईल आणि सर्व खाणी व खनिज पदार्थ यावरील उक्त पट्टाकाराचा हक्क व त्यासाठी काम सुरू करण्याचे व त्यांचा शोध घेण्याच्या, प्रयोजनासाठी, तेथे प्रवेश करण्याचे, संपूर्ण स्वातंत्र्य राखून ठेवण्यात येत आहे ;

आणि शेवटी असे कबूल करण्यात येत आहे की, या पट्ट्यातील "पट्टाकार" म्हणजे पट्टाकार व त्याचे वारस व अभिहस्तांकिती व "पट्टेदार" म्हणजे पट्टेदार व त्याचे वैध प्रतिनिधी.

वरील गोष्टींच्या साक्षीदाखल . . . . . . . . . . च्या जिल्हाधिकाऱ्याने, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली स्वाक्षरी करून आपला कार्यालयीन शिक्का वटविला आहे आणि पट्टेदाराने, या पट्ट्यावर, वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी, आपली स्वाक्षरी केली आहे.

वर निर्दिष्ट केलेली अनुसूची 'अ'

---

उपरिनामित व्यक्तींनी वर निर्दिष्ट केलेली अनुसूची 'ब'

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . च्या उपस्थितीत सही केली.

उपरिनामित व्यक्तींनी

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . च्या उपस्थितीत सही केली.

जिल्हाधिकाऱ्याचा शिक्का.

पट्ट्याच्या शर्तीनुसार नकाशे जोडण्यात येतील.

## नमुना पाच

(नियम ३० पहा)

**नवीन गावाच्या जागी हलविण्यात आलेल्या गावकऱ्यांनी करून द्यावयाच्या बदली जागांसंबंधीच्या करारनाम्याचा नमुना.**

श्री. अ. ब., ....................., राहणार ................, तालुका ........

यांनी दिनांक ..............१९....... रोजी करून दिलेला करारनामा.

ज्याअर्थी, ............... जिल्ह्याच्या ......... तालुक्यातील या गावाच्या जागेच्या स्थानात बदल करण्यास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे आणि अशा मंजुरीस अनुसरून, जुन्या जागेत मी धारणा केलेल्या भूमिभागाच्या बदल्यात मला पुढील भूमिभाग म्हणजेच, ज्याच्या उत्तरेस ........, दक्षिणेस ..............., पूर्वेस ....... व पश्चिमेस ............. आहे व ज्याची उत्तर ते दक्षिण लांबी ......मीटर असून पूर्व ते पश्चिम लांबी ........... मीटर आहे व ज्याचे क्षेत्रफळ अंदाजे ............चौरस मीटर आहे व ज्याचा भू-अभिलेखात क्रमांक ............आहे, देण्यात आलेला आहे.

त्याअर्थी, उपरोक्त नवीन भूमि भाग मला देण्यात आल्याबद्दल, मी, याद्वारे पुढील गोष्टी कबूल करीत आहे :—

(१) उक्त गावाच्या जुन्या जागेत असलेले माझे कोणत्याही स्वरुपाचे अधिकार, हक्क आणि हितसंबंध, तसेच त्यात उभी असलेली झाडे आणि उक्त जमिनीसंबंधातील सर्व अधिकार किंवा तीतून मिळणारे किंवा मी उपभोगित असलेले इतर फायदे यांसह, राज्य शासनाच्या स्वाधीन करण्यात आल्याचे समजण्यात येईल आणि ते, तसे याद्वारे, स्वाधीन करण्यात येत आहेत.

(२) नवीन जागेत मला दिलेल्या भूमिभागाचे क्षेत्र, मी स्वाधीन केलेल्या भूमिभागापेक्षा अधिक असेल, तर, मी जादा क्षेत्रासाठी, प्रत्येक चौरस मीटरला रु. ........... दराने भोगाधिकार मूल्य देईन.

(३) या करारनाम्याच्या तारखेपासून, जुन्या जागेत मी धारण केलेला भूमिभाग मी धारण केल्याचे चालू ठवले असते तर उक्त भूमिभागासंबंधातील माझ्या भू-सुधारणा पद्धतीस ज्या अटी लागू असत्या व ज्या अधिकारासह व दायित्वासह मी तो धारण केला असता त्या अटी व ते अधिकार व दायित्वे यांस अधीन राहून, नवीन जागेतील उपरोक्त जमिनीचा भूमिभाग मी धारण करीन ; या गोष्टीच्या साक्षीदाखल मी, वर निर्दिष्ट करण्यात आलेल्या दिवशी व वर्षी माझी स्वाक्षरी केली आहे.

.................ने लिहिले.

(सही) अ. ब.

आमच्या समक्ष .......... ने सही करून स्वाधीन केले.

नमुना सहा

[नियम ११ (४) पहा]

हा करारनामा, एकापक्षी महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांना यापुढे 'पट्टाकार' असे संबोधण्यात आले आहे आणि संदर्भानुसार अनुज्ञेय असेल तर, उक्त शब्दप्रयोगात त्यांचे पदीय उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि दुसऱ्यापक्षी, श्री. .................... (व्यक्तीचे नाव) राहणार ............................ [१](पत्ता व व्यवसाय) (यात यानंतर ज्यांचा 'पट्टेदार' असा निर्देश करण्यात आला असून उक्त शब्दप्रयोगात, संदर्भानुसार अनुज्ञेय असेल तर त्यांचे अनुक्रमे वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, प्रशासक प्रतिनिधी व अनुज्ञेय अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल)[१] आणि[२] श्री. ........................ (व्यक्तीचे नाव राहणार ............. (पत्ता व व्यवसाय) आणि श्री. ........................ (व्यक्तीचे नाव) राहणार .................. (पत्ता व व्यवसाय) (यात यानंतर ज्यांचा 'पट्टेदार' असा निर्देश करण्यात आला असून, संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्यांचे अनुक्रमे वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, प्रशासक प्रतिनिधी व अनुज्ञेय अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल)[२] आणि (ज्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आली तो अधिनियम .................. (अन्वये नोंदलेली ......... नावाने (पेढी किंवा व्यवसायसंघ यांचे नाव) ............... येथे (पेढी किंवा व्यवसायसंघाचा पत्ता) भागिदारीत व्यवसाय करणारे, श्री. ................. (व्यक्तीचे नाव)[३] राहणार ..... ................ (पत्ता) आणि श्री. ........................ (व्यक्तीचे नाव), राहणार .................. (पत्ता) (ज्यांचा यात यापुढे 'पट्टेदार' असा निर्देश करण्यात आला असून उक्त प्रयोगात संदर्भानुसार अनुज्ञेय असेल तर, उक्त पेढीचे सर्व भागीदार किंवा उक्त व्यवसायसंघाचे सर्व सदस्य, त्यांचे प्रतिनिधी, वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, व्यवस्थापक आणि अनुज्ञेय अभिहस्तांकिती यांचा समावेश असल्याचे मानण्यात येईल)[३] आणि ............. (ज्या अधिनियमान्वये संस्थापित झाली असेल तो अधिनियम) अन्वये नोंदणी झालेली आणि ............... (पत्ता) ठिकाणी आपले नोंदलेले कार्यालय असलेली[४] ............... (कंपनीचे नाव) (जिचा यात यापुढे 'पट्टेदार' असा निर्देश करण्यात आला असून संदर्भानुसार अनुज्ञेय असेल तर, उक्त शब्दप्रयोगात तिचे वारस आणि अनुज्ञेय अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि[५] महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम चोवीसावा) अन्वये नोंदणी झालेली किंवा नोंदणी झाल्याचे मानण्यात आलेली ......... येथील ............... (संस्थेचे नाव) सहकारी संस्था (जिचा यात यापुढे 'पट्टेदार' असा निर्देश करण्यात आला असून संदर्भानुसार अनुज्ञेय असेल तर, उक्त शब्दप्रयोगात तिचे व्यवस्थापक व वैध प्रतिनिधी व अनुज्ञेय अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये, भारतीय प्रजासत्ताकाच्या ............ वर्षातील ............. वर्षी ............ महिन्याच्या ............ दिवशी करण्यात आला आहे.

साक्षीदाखल.—या अभिलेखामधील आणि तदन्वये आरक्षित आणि त्यात असलेले आणि पट्टेदाराने/नी ज्याची रक्कम द्यावयाची आहे व ज्याचे पालन करावयाचे आहे असा खंड, स्वामित्वधन, करार व कबुलायत यांच्या मोबदल्यात, पट्टाकार, याद्वारे, सोबत जोडलेल्या नकाशात वर्णन केल्याप्रमाणे व रेखांकित केल्याप्रमाणे व त्यात, सीमादर्शक लाल रेषांनी परिवेष्टित ......... जिल्हा ...... तालुका ......... गावात .................. ठिकाणी असलेली अदमासे ............... क्षेत्रफळ

---

१. पट्टेदार एकजण असेल तर.

२. पट्टेदार एकापेक्षा अधिक व्यक्ती असतील तर.

३. पट्टेदार नोंदणी केलेली भागिदारी संस्था किंवा व्यवसाय संघ असेल तर.

४. पट्टेदार नोंदणी केलेली कंपनी असेल तर.

५. पट्टेदार सहकारी संस्था असेल तर.

असलेली जमीन (यात यानंतर "उक्त जमीन" म्हणून संबोधण्यात आलेली), दिनांक ............ पासून सुरू होणाऱ्या व दिनांक ............ रोजी संपणाऱ्या पंचवीस वर्षे मुदतीसाठी, पुढील प्रयोजनासाठी म्हणून व पुढे दिलेल्या अटी व शर्ती यांस अधीन ठेवून, देत आहे :—

१. (अ) पट्टेदार, उक्त जमिनीचा केवळ मीठ आणि त्याचे उप-पदार्थ यांचे उत्पादन, साठा आणि विक्री करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या इतर कामासाठी, वापर करील आणि इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तिचा वापर करणार नाही.

**स्पष्टीकरण.**—पट्टेदाराच्या/पट्टेदारांच्या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची उभारणी करणे हे उपरोक्त बांधकामाशी संबंधित असलेल्या प्रयोजनाखेरीज इतर प्रयोजन आहे असे मानण्यात येणार नाही.

(ब) ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली असेल त्यासाठी उक्त जमिनीचा लागोपाठ ३ वर्षे, वापर करण्यात आला नाही तर कोणतीही भरपाई न देता, पट्टाकारास, उक्त जमीन परत घेता येईल.

(क) पट्टेदार, कोणत्याही मीठाचे उत्पादन सुरू करण्यापूर्वी, केंद्रीय उत्पादन शुल्क नियम, १९४४ अन्वये मीठाच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेली अनुज्ञप्ति, मीठ आयुक्त, भारत सरकार, नवी दिल्ली, यांजकडून मिळवील/मिळवतील आणि अशा अनुज्ञप्तिशिवाय मीठाचे उत्पादन करणार नाही/नाहीत. जर पट्टेदार अशा अनुज्ञप्तिशिवाय मीठाचे उत्पादन करील/करतील तर, पट्टा रद्द केला जाण्यास पात्र ठरेल आणि कोणत्याही भरपाईशिवाय, राज्य सरकार जमीन परत घेईल.

२. पट्टाकारास, या पट्टयाची ............ वर्षांची मुदत समाप्त झाल्यावर, पक्षकारांमध्ये मान्य होईल अशा आणखी मुदतीसाठी आणि अशा अटींवर व शर्तींवर उक्त मुदत वाढविता येईल.

३. पट्टाकार किंवा पट्टेदार यांस, नोटीस देऊन, पट्टा रद्द करण्याचे स्वातंत्र्य असेल; अशी नोटीस, मीठाच्या उत्पादनाचा हंगाम संपण्याच्यावेळी देण्यात येईल आणि ती ताबडतोब अंमलात येईल. परंतु, पट्टेदाराच्या मालकीचे मीठ हलविण्यासाठी नोटीशीच्या तारखेपासून सहा महिन्यांची मुदत देण्यात येईल. उक्त मुदतीत सर्व मीठ हलविण्यात आले नाही तर, ते पट्टेकाराकडे जमा होईल; परंतु, पट्टाकारास, शासनाने राष्ट्रीयीकरणाच्या आपल्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे ठरविल्यामुळे किंवा या पट्टयाच्या खंड १ ते १९ मध्ये वर्णन केलेल्या कारणामुळे पट्टा रद्द करणे आवश्यक ठरेल त्याशिवाय कोणत्याही कारणावरून वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे पट्टा रद्द करता येणार नाही.

४. पट्टा समाप्त झाल्यावर किंवा या पट्टयाच्या अटींनुसार त्याच्या समाप्तीपूर्वीच तो रद्द करण्यात आला असेल अशा बाबतीत, पट्टेदार, पट्टयाच्या यथोचित पालनाशी सुसंगत असेल अशा रीतीने, उक्त जमिनीवर उभारण्यात आलेले किंवा केलेले बांधकाम, ते ज्या स्थितीत असेल त्याच स्थितीत ठेवून, उक्त जमीन सोडून देईल; परंतु त्याने/त्यांनी उभारलेली कोणतीही यंत्रसामग्री काढता येईल. राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविल्यामुळे, मुदत संपण्यापूर्वी पट्टा रद्द केल्याच्या बाबतीत, भारताच्या मीठ आयुक्ताकडून ठरविण्यात येईल त्याप्रमाणे पट्टेदाराने/पट्टेदारांनी जमिनीवर केलेल्या बांधकामाच्या संबंधात केला असेल असा खर्च किंवा या पट्टयाच्या समाप्तीच्या तारखेस असलेली त्याची रास्त किंमत, यापैकी जी कमी असेल तेवढी रक्कम भरपाई म्हणून पट्टेदारास/पट्टेदारांस मिळण्याचा अधिकार असेल. परंतु, या पट्टयाच्या खंड १ ते १९ मध्ये वर्णन केलेल्या कारणासाठी पट्टा रद्द करण्यात येईल तर, पट्टेदारास/पट्टेदारांना कोणत्याही प्रकारची भरपाई देय होणार नाही. इतर बाबतीत केंद्रीय उत्पादन शुल्क नियम, १९४४ याचे नियम ११२ व ११४ हे, अनुज्ञप्तिधारकांस भरपाई देण्यासंबंधात लागू होतील.

५. उक्त जमिनीतील किंवा तीवरील कोणत्याही दगड-खाणी, खाणी, दगडातील भेगा आणि कोळसा, शिसे, दगड, फरशी किंवा इतर खनिज पदार्थ यांवरील हक्क पट्टाकार राखून ठेवीत असून त्यास, स्वतः किंवा त्याच्या कर्मचाऱ्यास अशा खनिजपदार्थांचा शोध घेण्यासाठी उक्त जमिनीत प्रवेश करून खणण्याचे व उक्त पदार्थ नेण्याचे स्वातंत्र्य असेल ; मात्र असे करताना पट्टेदाराच्या कामाचे कमीत कमी नुकसान होईल व त्याच्या कामात कमीतकमी अडथळा निर्माण होईल ; तसेच पट्टाकार जर महाराष्ट्र शासन तसा निर्देश देईल तर आणि शासन ठरवील अशा दराने, तयार उपपदार्थांच्या परिणामावर उक्त पदार्थ उक्त जमिनीतून काढून नेण्याच्या वेळी स्वामित्व आकारण्याचा अधिकार स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

६. पट्टेदार, पट्टा अस्तित्वात असल्याच्या मुदतीत, उक्त पट्ट्याचा वार्षिक खंड रु. ········· (रु. ···············) या दराने ·············पासून देईल/देतील. मीठ विभागाने, फर्माविल्यास तो/ती त्या विभागास, त्याशिवाय आणखी रक्कम देईल/देतील.

७. पट्टेदार, वरील खंड १ (क) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अनुज्ञप्तीच्या अटींचे व शर्तींचे किंवा भारत सरकार, त्यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार त्यामध्ये जे कोणतेही सांविधिक फेरफार करील, त्यांचे पालन करील/करतील. कोणत्याही कारणावरून अशी अनुज्ञप्ति काढून घेतल्यास किंवा ती रद्द केल्यास, अशा अनुज्ञप्तीचे नवीकरण करीतोपर्यंत किंवा ती पट्टेदारास पूर्ववत देण्यात येईतोपर्यंत, हा पट्टा आपोआपच अप्रवर्ती होईल.

८. पट्टेदार, आपल्या स्वतःच्या खर्चाने, मीठ आयुक्ताने त्याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे समाधान होईल आणि उक्त अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा, शासकीय अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी निवासगृहे बांधून त्यांचे नेहमी परिरक्षण करील/करतील.

९. प्राधिकृत अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रितीने, पट्टेदार, स्वखर्चाने, मीठ निर्मितीच्या संबंधात आवश्यक असलेले सर्व बांधकामविषयक बदल व दुरुस्त्या करील/करतील.

१०. पट्टाकाराची आगाऊ लेखी परवानगी घेतली असेल त्याशिवाय, पट्टेदार, उक्त जमिनीच्या किंवा जमिनीच्या कोणत्याही भागाचा कब्जा अभिहस्तांकित करणार नाही, पोट-भाड्याने देणार नाही; किंवा देऊन टाकणार नाही किंवा त्याला/त्यांना याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्ती किंवा त्याजकडे निहित केलेले हितसंबंध, विक्री करून, देणगी म्हणून देऊन किंवा अन्य रीतीने हस्तांतरित करणार नाही; परंतु, यामधील कोणत्याही गोष्टीमुळे पट्टेदारास/पट्टेदारांना, प्राधिकृत अधिकाऱ्यांची पूर्व मान्यता घेतल्यानंतर, कोणत्याही वेळी विद्यमान पट्ट्याअन्वये तो/ती करीत असतील अशा व्यवसायात भागीदार घेण्यास प्रतिबंध होणार नाही.

११. पट्टेदार, मीठ आणि त्याचे उपपदार्थ तयार करण्याच्या संबंधात प्राधिकृत अधिकाऱ्या किंवा भारत सरकारच्या मीठ आयुक्तानी दिलेल्या सल्ल्यांचे वाजवी दक्षतेने पालन करील.

१२. पट्टेदार, मीठाचा साठा करणे आणि त्याची विक्री या संबंधात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये जे नियम अंमलात असतील त्याचे पालन करील/करतील.

१३. (मीठ आयुक्ताने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने) वेळोवेळी कारखान्यासाठी मीठाचा जो दर्जा ठरवून दिला असेल त्या दर्जापेक्षा जे कमी दर्जाचे असेल असे मीठ किंवा उपपदार्थ याची साठवण करता कामा नये आणि प्राधिकृत अधिकाऱ्यास, तो नेमील अशा व्यक्तीकडन, असे मीठ किंवा त्याचे उपपदार्थ यांचे रासायनिक विश्लेषण करून घेण्याच्या प्रयोजनासाठी, आदेश देण्याची शक्ती असेल. उक्त अधिकाऱ्यास, विश्लेषण करण्यात आल्यानंतर, जे मीठ व त्याचे उपपदार्थ वर ठरविलेल्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे असल्याचे आढळून येईल, असे सर्व मीठ व त्यांचे उपपदार्थ, पट्टेदाराच्या खर्चाने नष्ट करण्याबद्दल किंवा ठरविलेल्या दर्जाचे मीठ किंवा त्याचे उपपदार्थ यांपासून ते वेगळे ठेवण्याबद्दल किंवा अन्यथा त्याची विल्हेवाट लावण्याबद्दल निदेश देता येईल आणि या मुद्यांसंबंधीचा प्राधिकृत अधिकाऱ्याचा किंवा मीठ आयुक्त, भारत सरकार यांचा निर्णय अंतिम असेल.

१४. या पट्ट्याच्या खंड ३ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पट्टा रद्द करण्याबद्दलची नोटीस, पट्टेदाराकडून किंवा पट्टाकाराकडून देण्यात आली असेल तर, ज्या वर्षात अशी नोटीस देण्यात आली असेल त्या अधिकृत वर्षाच्या अखेरीपर्यंत पट्टाकारास देय असतील किंवा देय होतील अशा सर्व रकमा पट्टेदार देईल/देतील.

१५. या पट्ट्याअन्वये पट्टेदाराकडून पट्टाकारास देय होईल अशा कोणत्याही रकमा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे, वसूल करता येतील.

१६. या पट्ट्यांच्या खंड १९ मध्ये नमूद केलेल्या प्रसंगापैकी कोणत्याही प्रसंगी पट्टाकाराने पट्टा रद्द न करण्याचे ठरविले तर, पट्टेदार, कसुरीच्या प्रत्यक प्रसंगी, उक्त अधिकाऱ्याकडून ठरविण्यात येईल अशी ५०० रुपयांपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम पट्टाकारास देईल. याबाबत उक्त अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल व तो पट्टेदारांस बंधनकारक असेल.

१७. (अ) पट्टाकारास किंवा भारत शासनास, उक्त जमिनीवर पट्टेदाराने/पट्टेदारांनी उत्पादन केलेल्या मीठाच्या २५ टक्के मीठ, दरवर्षी खरेदी किंवा संपादन करण्याचा अधिकार असेल किंवा अशा रीतीने खरेदी किंवा संपादन करण्यासंबंधात पहिली निवड करण्याचा अधिकार असेल आणि पट्टेदार, ज्या कोणत्याही हंगामात, १५ जानेवारी पूर्वी त्याला नोटीस देण्यात आली असेल अशा हंगामात, पट्टयाने दिलेल्या जमिनीवर उक्त हंगामात उत्पादन केलेल्या मीठाच्या २५ टक्के मीठ, स्वतःच्या खर्चाने साठवून ठेवील ; अशा मीठास "सरकारी राखीव साठा" म्हणून समजण्यात येईल. पट्टाकारास उक्त मीठ, पट्टाकाराकडून वेळोवेळी ठरविण्यात येईल अशा दराने, खरेदी करण्याबाबतचा विकल्प असेल. परंतु, एका हंगामातील सरकारी राखीव मीठाच्या साठ्याची नंतरच्या हंगामातील तितक्याच प्रमाणातील नव्या मीठाच्या साठ्याने भरपाई झाल्यावर, उक्त सरकारी राखीव साठा, पट्टेदाराकडून, विल्हेवाटी-साठी मुक्त करण्यात येईल.

(ब) दिलेल्या जमिनीस जोडलेला चबुतरा किंवा चबुतऱ्यांच्या साठवणीच्या सर्वसाधारण क्षमतेपेक्षा अधिक मीठ जमा होईल त्याबाबतीत आवश्यक असेल त्याप्रमाणे, अशा जादा मीठाची व्यवस्था करण्या-साठी पट्टाकार खर्च देईल त्याशिवाय, अशा रीतीने राखीव मीठ जेथे साठविण्यात येईल त्या जागेसंबंधात पट्टेदाराकडून कोणतीही आकारणी करण्यात येणार नाही.

१८. या पट्टयाच्या अटींच्या किंवा दायित्वांच्या अर्थविवरणासंबंधात, पट्टाकार आणि पट्टेदार यांच्यात कोणताही विवाद निर्माण होईल किंवा कोणतेही मतभेद होतील त्याबाबतीत, ही बाब, भारताचे मीठ आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात येईल व त्यांचा त्यावरील निर्णय अंतिम व दोन्ही पक्षांवर बंधनकारक असेल.

१९. पूर्ववर्ती शर्तीस अधीन राहून, पट्टेदार, उक्त जमिनींचा निर्वेधपणे उक्त ............ मुदतीपर्यंत उपभोग घेण्याचे चालू ठेवील/ठेवतील. तथापि, वरील कोणत्याही शर्तीचे उल्लंघन झाल्यास किंवा पट्टाकारास देय असलेली कोणतीही रक्कम, ती देय झाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांपेक्षा जास्त काळपर्यंत देण्यात पट्टेदाराने किंवा पट्टेदारांनी कसूर केल्यास किंवा खंड ७ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली अनुज्ञप्ती रद्द किंवा जप्त करण्यात येईल तर, पट्टाकारास पट्टा ताबडतोब रद्द करता येईल. तथापि पट्टा अशा रीतीने रद्द करण्यात आल्यानंतर, परस्परात मान्य होईल अशा आणखी मुदतीसाठी आणि अशा अटींवर व शर्तींवर, पट्टयाचे नवीकरण करण्यात येईल.

२०. भारत सरकार व महाराष्ट्र शासन यांच्यामधील वाटाघाटींच्या परिणामी मीठविषयक धोरणात जो कोणताही बदल होईल त्या फेरफारास वरील पट्टा अधीन असेल.

२१. जमिनीचा, मिठाचे उत्पादन करण्यासाठी वापर करण्यात आला नाही किंवा मिठाच्या उत्पादनाखेरीज इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तिचा वापर करण्यात येईल तर, ती पुनर्ग्रहणास पात्र ठरेल.

२२. शासनाच्या प्रयोजनासाठी आवश्यक भासेल तर संपूर्ण जमीन किंवा तिचा भाग, पट्टेदाराने कोणत्याही सुधारणा केल्या असतील तर, मूळ किंमत वजा घसारा एवढी रक्कम भरपाईदाखल देण्यात आल्यानंतर, पुनर्ग्रहणास पात्र ठरेल.

हा करारनामा यथोचितरीत्या करून दिल्याच्या साक्षीदाखल पक्षकारांनी वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी आपल्या सह्या करून शिक्का वठविला आहे.

श्री. .................... .................... चे जिल्हाधिकारी यांनी सही करून स्वाधीन केला.

(१) ..............................

(२) .............................. जिल्हाधिकाऱ्याचा शिक्का.

यांच्या उपस्थितीत, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशावरून व नावाने,

(१) ......................................

(२) ......................................

(३) ......................................

यांनी सही करून स्वाधीन केला.

.............................. साठी आणि त्यांच्या वतीने,

(१) ......................................

(२) ......................................

च्या उपस्थितीत.

---

## नमुना सात

(नियम ३८ पहा)

**जमिनीवर आलेले हवाई बांधकाम इ. साठीच्या अनुज्ञप्तीचा नमुना (सरकारी जमिनीवर येणारे सज्जे)**

हा करारनामा, एक पक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांचा यात यापुढे "शासन" असा निर्देश करण्यात आला आहे) आणि दुसऱ्या पक्षी ...................... (ज्यांचा यात यापुढे "अनुज्ञप्तिधारक" असा निर्देश करण्यात आला असून उक्त शब्द प्रयोगात, संदर्भाद्वारे वर्णिले असेल किंवा संदर्भाशी प्रतिकूल असेल त्याशिवाय, त्याचे वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रशासक आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये दिनांक ............... १९ ............... रोजी करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, ............ जिल्ह्यातील, ............. तालुक्यातील, ........... गावातील व ............ भूमापन क्रमांक धारण करणारा अदमासे .......... चौरस मीटर मापाचा व पुढील चतुःसीमा म्हणजेच :—

उत्तरेस ..............................

दक्षिणेस ..............................

पूर्वेस ..............................

पश्चिमेस ..............................

असलेला व येथे जोडलेल्या रेखाचित्रात* दर्शविल्याप्रमाणे अदमासे लांबी रुंदीचा (ज्याचा यात यापुढे "उक्त जमीन" असा निदेश करण्यात आलेला आहे) जमिनीचा तुकडा राज्य शासनाच्या कब्जांत असून सर्व भारांपासून मुक्त शासनाचा त्यावर कायम संपूर्ण अधिकार आहे ; आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीवर अनुज्ञप्तिधारकाची† बांधकाम (ज्याचा यात यापुढे "उक्त बांधकाम" असा निर्देश करण्यात आला आहे) करण्याची इच्छा आहे ;

---

*नमुना सात च्या अर्थानुसारचे बांधकाम येथे नमूद करावे.

**टीप.**—रेखाचित्रात, रस्त्याची हद्द, रस्त्याची मध्यरेषा आणि नजिकचा मैलाचा किंवा फर्लांगचा दगड यास अनुलक्षून भूमिभागाची स्थिती स्पष्टपणे दर्शविण्यात यावी.

†करावयाच्या बांधकामाचे स्वरूप येथे नमूद करावे.

आणि ज्याअर्थी, अनुज्ञप्तिधारकाने उक्त जमिनीवर ............. उक्त बांधकाम करण्याच्या परवानगीसाठी अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, ..................... येथील जिल्हाधिकाऱ्याने, यात यापुढे दिलेल्या अटींवर व शर्तींवर अशी परवानगी देण्याचे मान्य केले आहे ;

त्याअर्थी, हा करारनामा या गोष्टीच्या साक्षीदाखल आहे की, ज्याअर्थी, याद्वारे निश्चित केलेली रक्कम अनुज्ञप्तिधारकाने दिली आहे व यात यानंतर असलेल्या शर्ती अनुज्ञप्तिधारकाने पालन करावयाच्या व पार पाडावयाच्या आहेत त्याअर्थी जिल्हाधिकारी, अनुज्ञप्तिधारकास याद्वारे, पुढील शर्तींस अधीन ठेवून, उक्त जमिनीवर उक्त बांधकाम करण्याची परवानगी देत आहे :—

(१) अनुज्ञप्तिधारकास, शासनास ही अनुज्ञप्ती चालू असताना, जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात, प्रत्येक वर्षी, दिनांक .............. रोजी रु. .................... रोख रक्कम देईल. अशी पहिली रक्कम दिनांक ................. रोजी देण्यात येईल.

(२) अनुज्ञप्तिधारक, जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय, उक्त बांधकामाचा विस्तार करणार नाही किंवा त्यात भर टाकणार नाही.

(३) उक्त बांधकामासाठी उक्त जमिनीवर याद्वारे देण्यात आलेल्या परवानगीमुळे, अनुज्ञप्तिधारकास उक्त जमिनीसंबंधातील किंवा तीवरील कोणताही अधिकार किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध किंवा तिच्या संबंधातील कोणताही वहिवाटीचा अधिकार किंवा उक्त हवाई बांधकामासाठी उक्त जमिनीवर खांब किंवा आधार उभारण्याचा कोणताही अधिकार मिळत असल्याचे समजण्यात येणार नाही.

(४) असे जमिनीवर आलेले बांधकाम अनुज्ञप्तिधारकाच्या ज्या इमारतीस लागून असेल ती इमारत कोसळेल किंवा आग, भूकंप, वादळ यामुळे किंवा जनतेतील दंगलीमुळे किंवा कोणत्याही प्रकारच्या इतर कारणामुळे नष्ट होईल किंवा ती पुन्हा बांधण्यात येईल अशा बाबतीत, अनुज्ञप्ती तात्काळ रद्द होईल आणि अनुज्ञप्तिधारकास, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोसळलेल्या किंवा नष्ट झालेल्या इमारतीऐवजी जी कोणतीही इमारत बांधण्यात येईल त्या कोणत्याही इमारतीच्या बाबतीत तत्सम जमिनीवर येणारे कोणतेही बांधकाम करण्यासंबंधीच्या कोणत्याही अधिकाराची मागणी करण्याचा अधिकार असणार नाही.

(५) जिल्हाधिकाऱ्यास, आपल्या हेतूसंबंधी एक महिन्याची लेखी नोटीस अनुज्ञप्तिधारकास देऊन, ही अनुज्ञप्ती कोणत्याही वेळी रद्द करता येईल, आणि अशा मुदतीच्या समाप्तीनंतर, ही अनुज्ञप्ती रद्द होऊन अग्राह्य ठरेल.

(६) ही अनुज्ञप्ती अस्तित्वात असताना उक्त जमिनीवरील बांधकाम हे जिल्हाधिकाऱ्याच्या सहमतीने व लेखी परवानगीने करण्यात आल्याचे व चालू असल्याचे समजण्यात येईल. हेतू हा की, उक्त जमिनीवरील अनुज्ञप्तिधारकाचा सुविधाधिकार कालांतराने, पूर्ण किंवा अलोप्य होऊ नये.

या गोष्टीच्या साक्षीदाखल ......................... जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी, महाराष्ट्र शासनाच्यावतीने वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी सही करून, आपल्या कार्यालयाचा शिक्का वठविला आहे.

जिल्हाधिकाऱ्याची सही

खालील व्यक्तींच्या समक्ष :—

१.

२.

वरील शर्ती मला मान्य आहेत.

खालील व्यक्तींच्या समक्ष :—

१.

२.

अनुज्ञप्तिधारकाची सही.

(टीप.—या अनुज्ञप्तीस एक रुपयांचा मुद्रांक आवश्यक आहे व नोंदणीची आवश्यकता नाही).

---

## नमुना आठ

(नियम ३९ पहा)

### करारनाम्याचा नमुना

**(जमिनीखालून पाण्याचे प्रमुख नळ व नळ टाकण्यास परवानगी)**

हा करारनामा, एक पक्षी महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्याचा यात यापुढे "शासन" असा निर्देश करण्यात आला आहे) आणि दुसऱ्या पक्षी,

.............. जिल्ह्यातील .......................... रहिवाशी

---

कंपन्याबाबत अधिनियम, १९५६ अन्वये कायद्याने संस्थापित झालेली आणि ......... येथे नोंदलेली, कार्यालय असलेली कंपनी (ज्यास यात यापुढे "अनुज्ञप्तिधारक" असे संबोधण्यात आले असून उक्त शब्दप्रयोगात त्याच्या अर्थास किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर
त्याचे वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रशासक आणि अनुज्ञात अभिहस्तांकिती
त्याचे उत्तराधिकारी

---

यांच्यामध्ये दिनांक ......... सन एकोणीसशे ......... रोजी करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, यासोबत जोडलेला नकाशा क्रमांक ...... मध्ये रंगाने दाखविण्यात आल्याप्रमाणे ...... विभागाच्या प्रभाराखालील सरकारी रस्ता/रस्त्यालगतची जमीन/जमीन याखाली/त्यालगत भूमिगत प्रमुख नळ/नळ घालण्याच्या परवानगीसाठी व अनुज्ञप्तीसाठी अनुज्ञप्तिधारकाने शासनाकडे अर्ज केला आहे (यात यापुढे ज्यांचा "उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ" असा निर्देश करण्यात आला आहे);

आणि, शासन याद्वारे पुढील अटींवर व शर्तींवर अनुज्ञप्तिधारकास अशी परवानगी व अनुज्ञप्ती मंजूर करीत आहे :—

(१) उक्त प्रमुख नळ/पाण्याचे नळ हे, सरकारी रस्ता/रस्त्यालगतची जमीन/जमीन याच्या पातळीच्या, मोठ्या नळासाठी ०·९१ मीटर/नळासाठी ०·४६ मीटरपेक्षा कमी नसेल इतक्या खोलीवर घालण्यात येतील ; उक्त काम सुरू करण्यापूर्वी ......च्या जिल्हाधिकाऱ्याशी (ज्याचा यात यापुढे "जिल्हाधिकारी ; असा निर्देश करण्यात आला आहे) विचारविनिमय केल्यानंतर निश्चित रचना ठरविण्यात येईल.

(२) जर उक्त मोठे पाण्याचे नळ/नळ रस्ता पार करीत असतील तर, नळ टाकण्याचे / दुरुस्त करण्याचे / अंतिमरीत्या काढण्याचे काम, वाहतुकीची सोय व सुरक्षितता याबाबत योग्य ती दक्षता घेऊन, रस्त्याच्या रुंदीच्या अर्ध्या भागात करण्यात येईल. रस्त्याचा अर्धा भाग वाहतुकीसाठी खुला होईतोपर्यंत त्याच्या दुसऱ्या भागाची दुरुस्ती करण्यात येणार नाही. अपघात टाळण्याच्या दृष्टीने दिवसा योग्य असे कुंपण व रात्रीच्या वेळी कुंपण व दिव्यांची व्यवस्था करून सर्व आवश्यक ती दक्षता घेण्यात येईल.

(३) सरकारी $\frac{\text{रस्ता}}{\text{रस्त्यालगतची जमीन}}$ / जमीन याचा जो भाग उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ टाकण्यासाठी किंवा ते काढण्यासाठी किंवा त्याची दुरुस्ती करण्यासाठी खोदण्यात आला असेल तो भाग अनुज्ञप्ति-धारकाच्या खर्चाने, पूर्ववत करण्यात येईल ;

(४) सरकारी $\frac{\text{रस्ता}}{\text{रस्त्यालगतची जमीन}}$ याचा पृष्ठभाग उच्च प्रकारचा म्हणजेच, अस्फाल्ट डांबर, सिमेंट, कॉंक्रिट किंवा तशाच प्रकारचा असेल तर तो खोदण्याचे आणि पूर्ववत करण्याचे काम, पूर्णतः अनुज्ञप्तिधारकाच्या खर्चाने सरकारकडून करण्यात येईल. आणि मागणी करण्यात आल्यावर अनुज्ञप्तीधारक उक्त खर्च तात्काळ भरील आणि जर भरण्यात आला नाही तर, तो, जमीन महसूलांची थकबाकी असल्याप्रमाणे अनुज्ञप्तीधारकाकडून वसूल करण्यात येईल. केलेल्या खर्चाच्या रकमेबाबतचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल. जर जमिनीचा पृष्ठभाग उपरोक्तप्रमाणे उच्च प्रतीपेक्षा वेगळा असेल तर, जिल्हाधिकाऱ्याची किंवा याबाबत त्याने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने, अनुज्ञप्तिधारकाकडून ते काम स्वखर्चाने पार पाडण्यात येईल.

(५) हा करारनामा चालू असताना, उक्त पाण्याचे $\frac{\text{प्रमुख नळ}}{\text{नळ}}$ याबाबतची आवश्यकता ती कामे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी उक्त सरकारी $\frac{\text{रस्ता}}{\text{रस्त्यालगतची जमीन}}$ / जमीन यावर केवळ प्रवेश करण्याची अनुज्ञप्ती असेल त्याशिवाय, अनुज्ञप्तिधारकास उक्त $\frac{\text{रस्ता}}{\text{रस्त्यालगतची जमीन}}$ / जमीन यात किंवा तीवर कोणताही अधिकार किंवा हितसंबंध असणार नाही.

(६) अनुज्ञप्तिधारकाच्या मालमत्तेचे नुकसानीपासून परिरक्षण करण्याची शासन कोणतीही हमी देणार नाही.

(७) उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ यामधील कोणत्याही दोषामुळे किंवा त्यांची दुरुस्ती न केल्यामुळे किंवा उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ घालताना, त्यांची दुरुस्ती करतांना किंवा ते अंतिमरीत्या काढताना त्याच्या/त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे किंवा हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे ज्या कोणत्याही व्यक्तीची जी कोणतीही हानी होईल किंवा तिला जो कोणताही अपाय होईल त्याबद्दल, अनुज्ञप्तिधारक हा, एकमेव जबाबदार राहील आणि अनुज्ञप्तिधारक हा याबाबतीत शासनाविरुद्ध करण्यात येतील असे सर्व दावे, मागण्या, शासनावर पडतील अशी दायित्वे व अशा दाव्यामुळे जो कोणताही शासनास खर्च करावा लागेल त्याबद्दल शासनाची क्षतिपूर्ती करील व नेहमीच शासनाची अशी क्षतिपूर्ती करण्यात येईल.

(८) अनुज्ञप्तिधारक, स्वतःच्या खर्चाने, उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ योग्य अशा दुरुस्त स्थितीत ठेवील. आणि सरकारी $\frac{\text{रस्ता}}{\text{रस्त्यालगतची जमीन}}$ / जमीन याच्या पृष्ठभागाची किंवा इतर सरकारी मालमत्तेची, गळतीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे जी कोणतीही हानी होईल तिची, जिल्हाधिकाऱ्यांची किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीची संपूर्ण खात्री होईल अशा रीतीने तात्काळ भरपाई करील.

(९) ज्यामुळे उक्त प्रमुख नळ/नळ हलविणे आणि परत टाकणे आवश्यक होईल असे रस्त्यात किंवा इतर जमिनीत कोणतेही फेरबदल करणे आवश्यक असल्याचे आढळून येईल त्याबाबतीत, अशारीतीने नळ हलविण्याचा व ते परत टाकण्याचा खर्च अनुज्ञप्तिधारकाकडून करण्यात येईल.

(१०) या करारनाम्याच्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात अनुज्ञप्तिधारकाने कसुरी केल्यास, जिल्हाधिकाऱ्यास हा करारनामा रद्द करण्याचे आणि आवश्यक असेल तर, तीन महिन्यांच्या नोटिशीची मुदत संपल्यानंतर उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ काढून टाकण्याचे स्वातंत्र्य असेल आणि जिल्हाधिकाऱ्याने अशा रीतीने केलेल्या अशा खर्चाबद्दल अनुज्ञप्तिधारकास जबाबदार धरले जाईल.

(११) शासनास, सर्व वेळी तशा अर्थाची तीन महिने मुदतीची नोटीस देऊन हा करारनामा समाप्त करण्याचे स्वातंत्र्य असेल व अशा बाबतीत अनुज्ञप्तिधारकास, हा करारनामा रद्द केल्याबद्दल कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

(१२) अनुज्ञप्तिधारक, जिल्हाधिकाऱ्याची लेखी पूर्व परवानगी घेतल्याखेरीज उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ टाकण्यास त्याच्याशी संबंधित अशी इतर कोणतीही कामे करण्यास प्रारंभ करणार नाही.

(१३) अनुज्ञप्तिधारक, जेव्हा जेव्हा पाण्याचे रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन याखालून प्रमुख नळ / नळ प्रथम टाकण्यात येतील तेव्हा सरकारी रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन उघडण्यासाठी १० रु. फी शासनास देईल आणि रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन याच्या वापरासाठी प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिलला किंवा त्या सुमारास * ............रु. प्रतिवर्षी आगाऊ भाडेही देईल.

(१४) अनुज्ञप्तिधारक, उक्त पाण्याचे प्रमुख नळ/नळ घालण्याचा कामास प्रारंभ करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्याकडे (......)रुपये ठेव म्हणून ठेवील व उक्त रक्कम, जिल्हाधिकाऱ्याच्या मते वरीलपैकी कोणत्याही शर्तीचे, त्याची किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे त्याच्या प्रतिनिधीची खात्री होईल अशा रीतीने, पालन करण्यात आले नसेल तर, संपूर्णत: किंवा अंशत: सरकारजमा होईल.

(१५) या करारनाम्यान्वये अनुज्ञप्तिधारकाने द्यावयाच्या रकमेचा कोणताही भाग द्यावयाचा राहिला असेल तर आणि तेव्हा, शासनास याबाबत करता येतील अशा इतर कोणत्याही उपाययोजनास बाध न आणता, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधानुसार उक्त रक्कम किंवा तिचा भाग, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अनुज्ञप्तिधारकाकडून वसूल करता येईल.

(१६) अनुज्ञप्तिधारक, हा करारनामा तयार करण्याचा, तो मुद्रांकित करून देण्याचा व त्याच्या निष्पादनाचा सर्व खर्च सोशील.

(१७) या करारनाम्यासंबंधी अनुज्ञप्तिधारक व जिल्हाधिकारी यांच्यामध्ये कोणताही मतभेद आल्यास ती बाब, आयुक्त, यांचेकडे पाठविण्यात येईल व त्यांचा निर्णय अंतिम आणि अनुज्ञप्तिधारकास बंधनकारक असेल.

(१८) अनुज्ञप्तिधारकास द्यावयाची किंवा त्यावर बजावावयाची कोणतीही नोटीस किंवा इतर लेख, शासनाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्याकडून देता किंवा बजाविता येईल व अशी कोणतीही नोटीस किंवा कोणताही लेख हा, जर तो अनुज्ञप्तिधारकाच्या शेवटी माहीत असलेल्या पत्त्यावर/कंपनीच्या नोंदणी

---

* जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल.

केलेल्या कार्यालयात देण्यात आला तर किंवा नोंदणीकृत डाकेने त्याच्या पत्त्यावर/कंपनीच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आला तर, रीतसर अनुज्ञप्तिधारकास देण्यात आल्याचे किंवा त्याच्यावर बजाविण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(१९) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली केलेल्या नियमांस अधीन ठेवून ही अनुज्ञप्ती देण्यात येत आहे.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकरिता व त्यांच्यावतीने, जिल्हाधिकाऱ्याने सही करून आपल्या कार्यालयाचा शिक्का वठविला आहे व ............*अनुज्ञप्तिधारकाने आपली सही केली आहे. (१) ..............व (२) ..............यांनी, †वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी दिनांक ..................च्या मंडळाच्या ठरावानुसार कंपनीकरिता व कंपनीच्या वतीने, अनुक्रमे आपल्या सह्या करून कंपनीचा शिक्का लाविला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्यावतीने .........च्या जिल्हाधिकाऱ्याने, खालील व्यक्तींच्या समक्ष सही व शिक्का करून स्वाधीन केला.

१.

२.

.............................. यांनी कंपनीच्यावतीने सही शिक्क्यानिशी स्वाधीन केले आणि खालील व्यक्तींच्या समक्ष कंपनीचा सामाईक शिक्का वठविण्यात आला आहे.

१.

२.

यांच्या समक्ष वर नमूद केलेल्या व्यक्तीने सही करून स्वाधीन केला.

---

## नमुना नऊ

(नियम ३९ पहा)

### करारनाम्याचा नमुना

(भूमिगत वीजतारा टाकण्यासाठी परवानगी)

हा करारनामा, एक पक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांचा यात यापुढे "शासन" असा निर्देश करण्यात आला आहे) आणि दुसऱ्या पक्षी, कंपन्यांबाबत अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा अधिनियम एक) याच्या उपबंधान्वये कायद्याने संस्थापित केलेली व ...........येथे नोंदलेले कार्यालय असलेली .......... कंपनी (जिचा यात यापुढे "कंपनी" असा निर्देश करण्यात आला असून, संदर्भावरून वगळण्यात आले नसेल किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर, या शब्दप्रयोगात तिचे उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये दिनांक........१९ रोजी करण्यात आला आहे ;

---

*अनुज्ञप्तिधारक व्यक्ती असेल तर उपयोग करावयाचा.

†अनुज्ञप्तिधारक कंपनी असेल तरच उपयोग करावयाचा.

ज्याअर्थी, कंपनीने शासनाकडे ········ विभागाच्या प्रभाराखाली असलेल्या भू-मापन क्रमांक ····· यातील व यासोबत जोडलेला नकाशा क्रमांक ···· यात रंगाने दर्शविण्यात आल्याप्रमाणेचा कंपनीच्या अनुज्ञापित क्षेत्रातील सरकारी रस्त्याच्या बाजूने/रस्त्याच्या लगत, भूमिगत वीजतारा (ज्याचा यात यापुढे "भूमिगत वीजतारा" असा निर्देश करण्यात आला आहे) टाकण्याच्या परवानगीसाठी व अनुज्ञप्तिसाठी अर्ज केला आहे ; आणि शासनाने, खालील अटींवर व शर्तींवर कंपनीस याद्वारे अशी परवानगी व अनुज्ञप्ती दिली आहे :—

(१) कंपनीकडून भूमिगत वीजतार सरकारी रस्त्याच्या / रस्त्यालगतच्या जमिनीच्या / भू-मापन क्रमांकाच्या सीमेच्या अगदी कडेला, रस्त्याच्या कडेत भू-पातळीच्या खाली कमीत कमी ······ मीटर खोलीवर घालण्यात येतील. शक्य असेल तेथे उक्त बांधकाम सुरू करण्यापूर्वी ··········· च्या जिल्हाधिकाऱ्याशी (यात यापुढे ज्याचा "जिल्हाधिकारी" असा निर्देश करण्यात आला आहे) विचारविनिमय करून, निश्चित सीमा रचना आखण्यात येईल.

(२) भूमिगत वीजतारांच्या प्रयोजनासाठी खणलेला रस्त्याचा भाग, जिल्हाधिकाऱ्याची किंवा त्याने याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीची खात्री होईल अशा रीतीने, कंपनीच्या खर्चाने पूर्ववत करण्यात येईल.

(३) भूमिगत वीजतारा रस्त्यातून जात असतील त्याबाबतीत, त्या टाकण्याचे / दुरूस्त करण्याचे / अंतिमत: काढण्याचे काम, रस्त्याच्या अर्ध्या रुंदीत, रहदारीची सोय व सुरक्षितता यासंबंधी योग्य ती खबरदारी घेऊन करण्यात येईल. रस्त्याचा दुसरा अर्धा भाग रहदारीस सोयीस्कर होईतोपर्यंत, रस्त्याचा अर्धा भाग उघडण्यात येणार नाही. अपघातास प्रतिबंध करण्यासाठी, दिवसा योग्य असे कुंपण घालून व रात्री कुंपणाची व दिव्याची तरतूद करून, आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात येईल.

(४) रस्त्याचा प्रत्येक चौक, अस्फॉल्ट मॅकाडमने पूर्ववत करण्यासाठी किंवा डांबर, सीमेंट, कॉंक्रीट किंवा तशाच उच्च प्रतीचा करण्यासाठी म्हणून कंपनी शासनास रु. ········· ची आगाऊ रक्कम देईल आणि शासन कंपनीच्या संपूर्ण खर्चाने उक्त काम करील व अशा रीतीने कंपनीने दिलेल्या आगाऊ रकमेपैकी कोणतीही शिल्लक रक्कम राहिल्यास, ती, काम पूर्ण झाल्यानंतर, परत करण्यात येईल. केलेल्या खर्चाच्या रकमेसंबंधीचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल. वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे उच्च प्रतीपेक्षा वेगळा पृष्ठभाग असेल तर, जिल्हाधिकाऱ्याची किंवा त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने, कंपनीच्या खर्चाने, कंपनीकडून उक्त काम पार पाडण्यात येईल.

(५) कंपनी, सरकारी रस्त्याच्या / रस्त्यालगतच्या जमिनीच्या वापराबद्दल शासनास दरवर्षी एक एप्रिलला ···· रु. ची रक्कम आगाऊ देईल.

(६) हा करारनामा चालू असताना, कंपनीच्या संयंत्रासंबंधीची आवश्यक कामे पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, उक्त रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन यात प्रवेश करण्याची अनुज्ञप्ति असेल त्याशिवाय, कंपनीस उक्त रस्ता / रस्त्यालगतची जमीन / जमीन यांत किंवा त्यावर कोणत्याही प्रकारचा अधिकार किंवा हितसंबंध असणार नाही.

(७) शासन, उक्त जमिनीखालील किंवा जमिनीवरील कंपनीच्या मालमत्तेचे क्षतिपासून रक्षण करण्याची हमी देत नाही.

(८) कंपनीच्या कोणत्याही संयंत्रातील कोणत्याही दोषामुळे किंवा त्यातील कोणत्याही दुरुस्तीच्या अभावी किंवा भूमिगत वीजतारा टाकताना, काढताना किंवा बसविताना किंवा दुरूस्त करताना कंपनीच्या नोकरांनी केलेल्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे किंवा हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही हानी होईल किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीस अपाय होईल त्याबद्दल कंपनीच एकमात्र जबाबदार राहील व याबाबत शासनाविरूद्ध करण्यात येतील असे सर्व दावे, मागण्या व शासनावर पडतील अशी दायित्वे व अशा दाव्यामुळे जो कोणताही शासनास खर्च करावा लागेल त्याबद्दल कंपनी शासनाची क्षतिपूर्ति करील व नेहमीच शासनाची अशी क्षतिपूर्ती करण्यात येईल.

(९) कंपनी, तिच्या स्वतःच्या खर्चाने, भूमिगत वीजतारा योग्य अशा दुरूस्त स्थितीत ठेवील आणि

रस्त्याच्या
रस्त्यालगतच्या जमिनीच्या पृष्ठभागाचे किंवा इतर सरकारी मालमत्तेचे जे कोणतेही नुकसान त्यामुळे
जमिनीच्या

होईल त्याची जिल्हाधिकाऱ्याची किंवा त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने, तावडतोब भरपाई करून देईल.

(१०) जिल्हाधिकारी तीन महिन्यांची नोटीस देऊन तसे फर्मावील तर आणि तेव्हा, कंपनी, भरपाई-साठी कोणतीही मागणी केल्याशिवाय स्वखर्चाने भूमिगत वीजतारा काढून टाकील.

(११) भूमिगत वीजतारा काढण्याची व त्या पुन्हा टाकण्याची आवश्यकता भासेल अशा रीतीने रस्त्यात किंवा कोणत्याही इतर जमिनीत फेरफार करणे कोणत्याही वेळी आवश्यक असल्याचे आढळून येईल त्या बाबतीत, वीजतारा काढण्याचा व त्या पुन्हा टाकण्याचा खर्च कंपनीकडून करण्यात येईल.

(१२) तशा अर्थाची तीन महिने मुदतीची नोटीस देऊन हा करारनामा रद्द करण्याचे शासनास सर्व वेळी स्वातंत्र्य असेल व त्या बाबतीत करारनामा रद्द केल्याबद्दल कोणतीही भरपाई मागण्याचा कंपनीस कोणताही हक्क असणार नाही.

(१३) या करारनाम्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कंपनीने कसूर केली तर, शासनास, हा करारनामा रद्द करण्याचे व आवश्यकता भासल्यास तीन महिने मुदतीच्या नोटिशीचा अवधि समाप्त झाल्यानंतर, भूमिगत वीजतारा काढण्याचे स्वातंत्र्य असेल व शासनाने अशा रीतीने केलेल्या खर्चाबद्दल कंपनी जबाबदार असेल.

(१४) या करारनाम्यान्वये कंपनीकडून देणे असलेल्या रकमेचा कोणताही भाग द्यावयाचा राहून जाईल तर आणि तेव्हा, तो, शासनास करता येईल अशा इतर कोणत्याही उपाययोजनांस बाध न आणता, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे कंपनीकडून वसूल करता येईल.

(१५) हा करारनामा तयार करण्याचा, तो मुद्रांकित करण्याचा व तो करून देण्याचा खर्च कंपनी करील.

(१६) या करारनाम्यासंबंधीचा कंपनी व शासन यांच्यामधील कोणताही मतभेद झाल्यास ती बाब, ...... विभागाच्या आयुक्ताकडे पाठविण्यात येईल व त्याचा निर्णय अंतिम व कंपनीस बंधनकारक असेल.

(१७) कंपनीस द्यावयाची किंवा तीवर बजावावयाची कोणतीही नोटीस किंवा इतर लेख, शासनाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्याकडून देता किंवा बजाविता येईल ; व अशी कोणतीही नोटीस किंवा लेख, जर तो कंपनीच्या नोंदलेल्या कार्यालयात देण्यात आला असेल किंवा नोंदणीकृत डाकेने कंपनीच्या त्यावेळच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आला असेल तर तो कंपनीस रीतसर देण्यात आल्याचे किंवा कंपनीवर रीतसर बजाविण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(१८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधांस अधीन ठेवून, ही अनुज्ञप्ति देण्यात येत आहे. या गोष्टीच्या साक्षीदाखल, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने··········चे जिल्हाधिकारी यांनी, प्रारंभी वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी, आपली सही करून आपल्या कार्यालयाचा, तसेच कंपनीचा सामाईक शिक्का वठविला आहे.

···········चे जिल्हाधिकारी यांनी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने खालील व्यक्तींच्या समक्ष सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केले.

कार्यालयीन मुद्रा

१.

२.

संचालक मंडळाच्या दिनांक·······१९ च्या ठरावानुसार, खालील व्यक्तींच्या समक्ष, कंपनीचा सामाईक शिक्का वठविण्यात आला आहे—

कंपनीची मुद्रा

१.

२.

संचालक.

या गोष्टीच्या साक्षीदाखल, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने,··········चे जिल्हाधिकारी यांनी, यावर आपली सही करून आपल्या कार्यालयाचा शिक्का वठविला आहे व श्री. ·····························यांनी प्रारंभी वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी, यावर आपली सही केली आहे.

············चे जिल्हाधिकारी यांनी खालील व्यक्तींच्या समक्ष, सही शिक्क्यानिशी स्वाधीन केले.

कार्यालयीन मुद्रा

१.

२.

उपरिनामित श्री.············यांनी खालील व्यक्तींच्या समक्ष, सही करून स्वाधीन केले—

१.

२.

**टीप.**—जोडावयाचा नकाशा.

## नमुना दहा

[नियम ३९ (४) पहा.]

**करारनाम्याचा नमुना**

(सरकारी जमिनीत मलकुंडी बांधण्याच्या परवानगीसाठी वापरावयाचा नमुना.)

हा करारनामा, एकापक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांचा यात यापुढे "शासन" असा निर्देश करण्यात आला असून संदर्भाद्वारे अपवर्जिले नसेल किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर, या संज्ञेत त्यांचे पदावरील उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि दुसऱ्यापक्षी श्री. ..................., ............ जिल्ह्यातील ......... तालुक्याचे रहिवाशी (ज्याचा यात यापुढे "अर्जदार" असा निर्देश करण्यात आला असून संदर्भाद्वारे अपवर्जिले नसेल किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर, या संज्ञेत त्याचे वारस, मृत्युपत्र व्यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल), यांच्यामध्ये दिनांक ............ १९ ...... रोजी करण्यात आला आहे ;

ज्याअर्थी, अर्जदाराने, .......... च्या ........ दिवशी किंवा त्यासुमारास, शासनाकडे, ....... जिल्ह्याच्या ....... तालुक्यातील ................. गावाच्या हद्दीतील ............. ................. शहर भूमापन क्रमांकात असलेल्या व जो यासोबत जोडण्यात आला आहे व यातील पक्षकारांनी तिची ओळख पटवल्याबद्दल ज्यावर सही केली आहे अशा जागेच्या नकाशात तपशिलासहित रेखाटण्यात आलेल्या अदमासे ........ चौरस मीटर मोजणीच्या सरकारी रस्त्या*/जमिनीखाली (जिचा यात यापुढे "उक्त जमीन" असा निर्देश केला आहे) साचलेल्या पाण्यासाठी ...... ........ चौरस मिटरातील भूमिगत मलकुंडी बांधण्याच्या परवानगीसाठी व अनुज्ञप्तीसाठी अर्ज केला आहे ;

आणि शासन अर्जदारास पुढील अटींवर व शर्तींवर अशी परवानगी व अनुज्ञप्ती याद्वारे देत आहे, त्या अटी अशा :—

(१) अर्जदारास याद्वारे उपरोक्त प्रयोजनासाठी जमिनीच्या पातळीच्या ...... मीटर खोलीवर भूमिगत मलकुंडी बांधण्यास किंवा बांधून घेवविण्यास (यात यापुढे जिचा "उक्त मलकुंडी" असा निर्देश केला आहे) व ती दिनांक ....... पासून सुरू होणाऱ्या ....... वर्षाच्या मुदतीकरिताच केवळ ठेवण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि त्याचा मोबदला म्हणून, अर्जदार, ............... वर्षाच्या उपरोक्त मुदतीत, दरवर्षी दिनांक ...... रोजी ........... रुपयांची आगाऊ रक्कम शासनास देईल.

(२) अर्जदार, उक्त मलकुंडीची रचना किंवा पुनर्रचना किंवा नंतरच्या कोणत्याही दुरूस्त्या यासंबंधात उक्त जमिनीवर त्याच्याकडून जे खणण्याचे काम करण्यात येईल त्यामुळे होणाऱ्या अपघातास प्रतिबंध करण्याकरिता म्हणून दिवसा सोईस्कर असे कुंपण व रात्री कुंपण व दिवाबत्तीची तरतूद करून, आवश्यक ती सावधगिरी घेईल.

(३) अर्जदार, स्वतःच्या खर्चाने, उक्त मलकुंडी योग्य अशा स्थितीत ठेवील व उक्त जमिनीखाली उक्त मलकुंडी असल्यामुळे पाणी ओसंडून किंवा यथास्थिती कोणत्याही वेळी उक्त जमिनीचे (किंवा उक्त रस्त्याच्या पृष्ठभागाचे किंवा बाजूकडील उताराचे किंवा कडेच्या उंचवट्याचे)* कोणतेही नुकसान होईल तर, त्याची तावडतोब भरपाई करील.

(४) उक्त मलकुंडीच्या दुरूस्तीच्या किंवा पुनर्रचनेच्या प्रयोजनार्थ, खणण्यात येईल अशी, उक्त जमीन किंवा इतर कोणतीही सरकारी जमीन अर्जदाराकडून, ........ च्या जिल्हाधिकाऱ्याची (यात यापुढे ज्यास "जिल्हाधिकारी" असे संबोधण्यात आले आहे) किंवा त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने, स्वखर्चाने पूर्वस्थितीत आणण्यात येईल ; व त्याने ती पूर्ववत करण्यात कसूर केल्यास, जिल्हाधिकाऱ्याकडून ती पूर्ववत करण्यात येईल व अशा रीतीने ती पूर्ववत करण्याचा खर्च, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या उपबंधांन्वये जमीन महसुलीची थकबाकी असल्याप्रमाणे अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल.

---

*आवश्यक असेल तर वगळावे.

(५) या करारनाम्याद्वारे दिलेली अनुज्ञप्ती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली वेळोवेळी करण्यात येतील अशा नियमांस आणि आदेशास अधीन असेल.

(६) उक्त मलकुंडीमध्ये किंवा तीवर कोणतेही काम किंवा इतर गोष्ट करणे आवश्यक असल्याचे आढळून येईल त्याबाबतीत, उक्त मलकुंडी काढण्याचा किंवा ती परत बांधण्याचा खर्च अर्जदार स्वतः करील.

(७) या करारनाम्याद्वारे स्पष्टरीत्या तरतूद केली असेल त्याशिवाय, उक्त जमिनीसंबंधी किंवा त्याच्या कोणत्याही भागासंबंधी याद्वारे देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीमुळे अर्जदाराच्या वतीने कुळवहिवाट निर्माण होते किंवा अर्जदारास उक्त जमिनीच्या कोणत्याही भागात किंवा त्यावर वैध अधिकार किंवा हितसंबंध प्राप्त होतो असा अर्थ लावता कामा नये. आणि उक्त जमिनीच्या पृष्ठभागाच्या जमिनीचा वापर करण्याचा किंवा तीची विल्हेवाट लावण्याचा हक्क शासन याद्वारे राखून ठेवणार आहे.

(८) कोणत्याही व्यक्तीकडून शासनाविरूद्ध करण्यात आलेल्या सर्व मागण्या, कार्यवाही, दावे किंवा कामकाज या संबंधात व याद्वारे दिलेल्या परवानगीतून उद्भवणाऱ्या कोणत्याही विशेषाधिकाराचा अर्जदाराने वापर केल्यामुळे किंवा तसा वापर केल्याच्या कारणामुळे किंवा उक्त जमिनीखाली उक्त मलकुंडी राहिल्यामुळे शासनास जो दावा खर्च, आकारणी व व्यय करावा लागेल त्या संबंधात अर्जदार शासनाची क्षतिपूर्ति करील.

(९) उक्त मलकुंडी बंदिस्त केल्यामुळे किंवा बंद केल्यामुळे किंवा तिला अडथळा निर्माण केल्यामुळे किंवा उक्त मलकुंडीतील अर्जदाराच्या अधिकारात किंवा हितसंबंधात जनतेतील कोणत्याही व्यक्तीने किंवा अशा कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कारवाईतून उद्भवलेल्या हस्तक्षेपामुळे अर्जदाराची जी कोणतीही हानी किंवा नुकसान होईल त्याबद्दल शासन जबाबदार राहणार नाही.

(१०) ...... वर्षांची उक्त मुदत संपल्यानंतर, कोणतीही रक्कम देण्याबाबत, आणि भोगवटयाच्या मुदतीबाबत, त्यावेळी कबूल करण्यात येईल अशा अटीवर, उक्त जमिनीखालील उक्त मलकुंडी ठेवण्यास नव्याने परवानगी देणे हे सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असेल.

(११) ........ वर्षांची उक्त मुदत संपल्यानंतर, हा करारनामा समाप्त होऊन रद्द होईल आणि अर्जदार .... वर्षाची उक्त मुदत संपल्यानंतर किंवा ती संपण्यापूर्वी उक्त मलकुंडी ठेवण्यासाठी नवी अनुज्ञप्ती त्यास मिळाली असेल तर, स्वखर्चाने उक्त मलकुंडी काढून टाकील आणि .... वर्षांची उक्त मुदत संपल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीत, उक्त जमिनीचा ताबा स्वाधीन करील व उक्त मलकुंडी काढून टाकण्याकरिता जर उक्त जमीन खणणे आवश्यक असेल तर, तो स्वखर्चाने कोणत्याही नुकसानीची भरपाई करून मूळ स्थितीनुसार उक्त जमीन पूर्ववत करील. अर्जदार उक्त मलकुंडी काढून टाकून उक्त जमिनीचा ताबा देण्यात किंवा कोणत्याही नुकसानीची भरपाई करण्यात किंवा उक्त जमीन तिचा मूळ स्थितीनुसार पूर्ववत करण्यात कसुरी करील तर, शासनास, उक्त जमिनीवर पुन्हा प्रवेश करण्याचे, तिचा ताबा घेण्याचे, अर्जदाराच्या खर्चाने, उक्त मलकुंडी काढून टाकण्याचे किंवा यथास्थिती उक्त जमीन तिच्या मूळ स्थितीनुसार पूर्ववत करण्याचे स्वातंत्र्य असेल. अशा रीतीने मलकुंडी काढून टाकण्याचा किंवा यथास्थिती ती पूर्ववत करण्याचा खर्च, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अर्जदाराकडून वसूल करता येईल.

(१२) हा करारनामा तयार करून, तो करून देण्याचा व तो मुद्रांकित करण्याचा खर्च अर्जदार करील.

(१३) जर अर्जदार किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, या करारनाम्यातील यापूर्वी नमूद केलेल्या शर्तीपैकी, कोणत्याही शर्तीचा भंग केला तर, याद्वारे दिलेली अनुज्ञप्ती रद्द करण्याचे व हा करारनामा समाप्त करण्याचे शासनास स्वातंत्र्य राहील व त्यानंतर .... वर्षांची उक्त मुदत संपली असल्याप्रमाणे, वरील खंड (११) मध्ये नमूद केलेले परिणाम अंमलात येतील.

(१४) या करारनाम्यान्वये, अर्जदाराने द्यावयाच्या रकमेचा कोणताही भाग देण्याचे बाकी राहील तर आणि तेव्हा उक्त रक्कम, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्यान्वये करण्यात आलेले नियम यांच्या उपबंधानुसार, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अर्जदाराकडून वसूल करता येईल.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने . . . . . . . . . . . . . चे जिल्हाधिकारी, यांनी यावर प्रारंभी वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी आपली सही करून आपल्या कार्यालयाचा शिक्का वठविला आहे व श्री. . . . . . . . . . . . . . . . . . यांनी आपली सही केली आहे.

चे जिल्हाधिकारी यांनी, खालील व्यक्तींच्या समक्ष, सही शिक्क्यानिशी स्वाधीन केला.

| कार्यालयीन शिक्का |
|---|

१. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

उपरिनामित श्री. . . . . . . . . . . . . . . . . . यांनी, खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून स्वाधीन केला.

१. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

२. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

टीप.—जोडावयाचा नकाशा.

---

## नमुना अकरा

(नियम ३९ पहा)

### करारनाम्याचा नमुना

(उपरि वीजतारा इत्यादींसाठी खांब, मनोरे, स्टे-रॉडस् किंवा स्टे-रेल्स उभारण्यासाठी परवानगी)

हा करारनामा एकपक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांचा यात यापुढे "शासन" असा निर्देश करण्यात आला आहे) आणि दुसऱ्या पक्षी, भारताचा कंपन्यावावत अधिनियम, १९५६ (१९५६ चा अधिनियम एक) याच्या उपबंधान्वये कायद्याने संस्थापित केलेली व येथे नोंदलेले कार्यालय असलेली कंपनी (जिचा यात यापुढे "कंपनी" असा निर्देश करण्यात आला असून संदर्भाद्वारे अपवर्जिले नसेल किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर, या संज्ञेत तिचे उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये, दिनांक १९ रोजी करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, कंपनीने, *विभागाच्या प्रभाराधीन सरकारी रस्त्यांच्या व जमिनीच्या वाजूने, व यासोबत जोडलेल्या नकाशा क्रमांक यात रंगाने दाखविल्याप्रमाणेच्या व जिल्ह्यातील कंपनीच्या अनुज्ञापित क्षेत्रात, उपरि वीजतारांसाठी खांब, मनोरे, स्टे-रॉडस् व स्टे-रेल्स उभारण्याच्या परवानगीसाठी व अनुज्ञप्तीसाठी, शासनाकडे अर्ज केला आहे ;

आणि शासन याद्वारे, पुढील अटींवर व शर्तींवर कंपनीस तशी परवानगी व अनुज्ञप्ती देत आहे ; त्या अटी व शर्ती अशा :—

(१) . . . . . . . . . . . . . च्या जिल्हाधिकाऱ्याकडून (ज्यांचा यात यापुढे "जिल्हाधिकारी" असा निर्देश करण्यात आला आहे) मान्य करण्यात येतील अशा जागी, कंपनीकडून खांब उभारण्यात येतील. उक्त खांब व हवाई तारा, $\frac{\text{भारतीय विद्युतशक्ति अधिनियम, १९१०}}{\text{त्या वेळेस लागू असलेला विधी}}$ व त्याखालील नियम यांच्या उपबंधानुसार आणि जिल्हाधिकाऱ्याची सर्व बाबतीत खात्री होईल अशा रीतीने सुस्थितीत ठेवण्यात येतील.

---

*येथे विभागाचे नाव नमूद करावे.

(२) सर्व खांब, भूपातळीपासून कमीतकमी १·०५ मीटर उंचीपर्यंत, सफेद किंवा अॅल्युमिनियम रंगाने रंगविण्यात येतील. वाहनांच्या चालकांना सर्व वेळी ते स्पष्टपणे दृष्टीस पडावेत म्हणून, असे रंगकाम सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक वाटेल त्याप्रमाणे नव्याने रंगविण्यात येतील.

(३) खांबांसाठी करण्यात आलेल्या छिद्रांकरिता खणलेल्या रस्त्याचा पृष्ठभाग, अस्फाल्ट, डांबर, टार, सिमेंट, कॉंक्रीट व तशाच प्रकारचा उच्च दर्जाचा असेल त्याबाबतीत, छिद्रे योग्य रीतीने भरण्याचे काम, कंपनीच्या संपूर्ण खर्चाने शासनाकडून पार पाडण्यात येईल आणि रस्त्याच्या कडेच्या उंचवटयाचे, कोणतेही असल्यास, वळण किंवा त्याचा कोणताही इतर भाग, खांब उभारताना किंवा त्यांच्या दुरुस्त्या पार पाडताना किंवा तो काढून टाकताना, खणण्यात येईल किंवा त्याची हानी होईल तर, तो कंपनीच्या संपूर्ण खर्चाने त्यांच्या मूळ स्थितीत जिल्हाधिकाऱ्याद्वारे पूर्ववत करण्यात येईल ; व कंपनी उक्त (खर्च), मागणी करण्यात आल्यानंतर तात्काळ देईल आणि तो देण्यात आला नाही तर, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल ; अशा रीतीने केलेल्या खर्चाच्या रकमेबाबतचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय अंतिम असेल ; पृष्ठभाग उपरोक्तप्रमाणे उच्च दर्जा व्यतिरिक्त वेगळ्या प्रकारचा असेल त्याबाबतीत, उक्त काम, कंपनीच्या खर्चाने, जिल्हाधिकाऱ्याची किंवा त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री होईल अशा रीतीने पार पाडण्यात येईल.

(४) कंपनी, शासनास, शासकीय जमिनीच्या किंवा रस्त्याच्या वापराबद्दल एक एप्रिल रोजी, प्रत्येक खांबास २५ पैसे/प्रत्येक मनोऱ्यास, स्टे-रॉडला किंवा स्टे-रेलला ५० पैसे भाडे, दरवर्षी आगाऊ देईल.

(५) हा करारनामा चालू असताना, संयंत्रासंबंधीची आवश्यक ती कामे पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ त्यावर प्रवेश करण्याच्या अनुज्ञप्तीशिवाय, उक्त (रस्त्याच्या किंवा रस्त्यावर / जमिनीत किंवा जमिनीवर) कंपनीस कोणत्याही स्वरूपाचा अधिकार किंवा हितसंबंध असणार नाही.

(६) शासन, उक्त कंपनीच्या मालमत्तेच्या नुकसानीपासून रक्षण करण्याची हमी देत नाही.

(७) कंपनीच्या कोणत्याही संयंत्रातील कोणत्याही दोषामुळे किंवा कोणत्याही दुरुस्तीच्या अभावामुळे किंवा संयंत्र उभारताना, बसविताना किंवा त्याचा वापर करताना, कंपनीच्या नोकरांच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे किंवा हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे ज्या कोणत्याही व्यक्तीची जी कोणतीही हानी होईल किंवा तिला अपाय होईल त्याबद्दल कंपनीच एकमात्र जबाबदार राहील व याबाबतीत शासनाविरुद्ध करण्यात येतील असे सर्व दावे, मागण्या व शासनावर पडतील अशी दायित्वे व अशा दाव्यामुळे शासनास जो कोणताही खर्च करावा लागेल त्याबद्दल कंपनी शासनाची क्षतिपूर्ती करील वा नेहमीच शासनाची अशी क्षतिपूर्ती करण्यात येईल.

(८) कंपनी, स्वखर्चाने, उपरि वीजतारांसाठी खांब, मनोरे, स्टे-रॉडस् व स्टे-रेल्स सुस्थितीत ठेवील आणि (रस्त्याच्या / रस्त्यालगतच्या जमिनीच्या / जमिनीच्या) पृष्ठभागाचे किंवा इतर सरकारी मालमत्तेचे जे कोणतेही नुकसान होईल त्याची जिल्हाधिकाऱ्याची किंवा त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री होईल अशारीतीने तावडतोब भरपाई करील.

(९) भारतीय विद्युतशक्ति अधिनियम, १९१० याच्या कलम १८, पोट-कलमे (३) व (४) च्या उपबंधांस अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी मिळविल्याशिवाय व तसे करण्याबद्दल जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल अशी भरपाई शासनास दिल्याशिवाय, रस्त्यालगतचे कोणतेही झाड, तोडता कामा नये किंवा त्याची कोणत्याही प्रकारे काटछाट करता कामा नये, तोडलेले लाकूड किंवा फांद्या, सर्व बाबतीत कंपनीकडून जिल्हाधिकाऱ्यास देण्यात येतील. कंपनीकडून तोडलेल्या फांद्यांची टोके व्यवस्थितपणे करवतीने चिरून त्यावर डांबराचा थर देण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याच्या उपरोक्त प्रतिनिधीने मान्य केलेल्या पद्धतीनुसार, उक्त काम कंपनीकडून करण्यात येईल.

(१०) ज्या उपरि तारा व ताणाच्या तारा उभारल्या जातील, त्या ७·९२ मीटरहून कमी नसेल इतक्या उंचीवरच विना अडथळा मार्ग होईल अशा रीतीने उभारण्यात येतील आणि तारा रस्ता पार करत असतील त्याबाबतीत, रस्त्याच्या किंवा इतर शासकीय जमिनीच्या पातळीपासून ७·९२ मीटरहून कमी नसेल इतक्या उंचीवर असतील.

(११) जिल्हाधिकाऱ्याकडून, तीन महिने मुदतीच्या नोटीशीद्वारे फर्माविण्यात येईल तर व तेव्हा, कंपनी स्वखर्चाने व भरपाईची कोणतीही मागणी न करता, खांब, मनोरे, स्टे-रॉडस् किंवा स्टे-रेलस् काढून टाकतील.

(१२) ज्यामुळे खांब, मनोरे, स्टे-रॉडस् किंवा स्टे-रेलस् काढून टाकणे व पुन्हा उभारणे जरुरीचे होईल असे, रस्त्यावरील किंवा इतर कोणत्याही जमिनीवरील कोणतेही फेरबदल करणे कोणत्याही वेळी आवश्यक असल्याचे आढळून येईल त्याबाबतीत ते काढून टाकण्याचा किंवा ते पुन्हा उभारण्याचा खर्च, कंपनीकडून करण्यात येईल.

(१३) यान्वये दिलेली अनुज्ञप्ती, दिनांक १९ पासून सुरू होणाऱ्या वर्ष मुदतीकरिता अंमलात राहील.

(१४) या करारनाम्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात कंपनीने कसूर केली तर, शासनास हा करारनामा समाप्त करण्याची व आवश्यकता असल्यास तीन महिने मुदतीच्या नोटीशीचा कालावधी संपल्यानंतर, खांब, मनोरे, स्टे-रॉडस् किंवा स्टे-रेलस् काढून टाकण्याचे स्वातंत्र्य राहील व शासनाने अशा रीतीने केलेल्या खर्चास कंपनी जबाबदार राहील.

(१५) या करारनाम्यान्वये कंपनीने द्यावयाच्या रकमेचा कोणताही भाग देण्याचा बाकी राहिला असेल तर आणि तेव्हा, तो महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली केलेले नियम यांच्या उपबंधानुसार, शासनास ज्या कोणत्याही इतर उपाययोजना करता येतील, त्यास बाध न आणता, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, कंपनीकडून वसूल केला जाण्यास पात्र ठरेल.

(१६) हा करारनामा तयार करून घेण्याचा व तो मुद्रांकित करण्याचा व तो करून देण्याचा खर्च कंपनीकडून करण्यात येईल.

(१७) या करारनाम्यासंबंधी कंपनी व शासन यांच्यामधील कोणताही मतभेद असल्यास ती बाब .......... चे आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात येईल व त्याचा त्यावरील निर्णय अंतिम व कंपनीस बंधनकारक असेल.

(१८) कंपनीस द्यावयाची कोणतीही नोटीस किंवा कंपनीवर बजावावयाचा इतर लेख हा शासनाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यास देता किंवा बजाविता येईल व अशी कोणतीही नोटीस किंवा लेख, जर तो, कंपनीच्या नोंदणी करण्यात आलेल्या कार्यालयात देण्यात आला असेल किंवा नोंदणीकृत डाकेने कंपनीच्या त्यावेळच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आला असेल तर तो, कंपनीस रीतसर देण्यात आल्याचे किंवा कंपनीवर रीतसर बजावण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(१९) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व तदन्वये केलेले नियम यांच्या उपबंधांस अधीन राहून, ही अनुज्ञप्ती देण्यात येत आहे.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने, .......... चे जिल्हाधिकारी यांनी आपली सही करून आपल्या कार्यालयाचा शिक्का वठविला आहे, व प्रारंभी वर लिहिलेल्या दिवशी व वर्षी, त्यावर कंपनीचा सामाईक शिक्का वठविण्यात आला आहे.

.......... चे जिल्हाधिकारी यांनी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने खालील व्यक्तींच्या समक्ष, सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केला.

| कार्यालयीन शिक्का |
|---|

१. ....................

२. ....................

संचालक मंडळाच्या दिनांक १९ च्या ठरावानुसार खालील व्यक्तींच्या समक्ष कंपनीचा सामाईक शिक्का वठविण्यात आला आहे.

| कंपनीचा शिक्का |
|---|

संचालक.

## नमुना बारा

[नियम ४२ (१) (अ) आणि नियम ४५ पहा]

**नगरेतरक्षेत्रांमध्ये असलेल्या जमिनींचे भोगवटदार होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींनी संमत करावयाच्या करारनाम्याचा नमुना.**

### करारनामा

तहसीलदार,

तालुका, जिल्हा,

यांस,

मी, अ. ब. राहणार ········· माझ्या व माझे वारस, मृत्युपत्र-यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकिती यांच्या वतीने, खाली नमूद केलेल्या शर्तीवर, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा (यात यापुढे "उक्त जमीन" असा निर्देश करण्यात आला आहे) भोगवटा करण्यासाठी करार करीत आहे व उक्त जमिनीचा भोगवटदार म्हणून भू-अभिलेखात माझ्या नावाची नोंद करण्यात यावी, अशी विनंती करीत आहे :—

### शर्ती

१. मी, उक्त जमिनीच्या संबंधात वेळोवेळी देय असलेला जमीन महसूल विशेष म्हणजे ( ···· दराने किंवा ····· अशा जमिनीस लागू असलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या नियमान्वये बसविता येईल अशा कमी दराने) असलेली ······ पासून सुरू होणाऱ्या ···· वर्षे या मुदतीसाठी ······ रुपये रक्कम आकारणी म्हणून देईन ; आणि त्यानंतर, वैध प्राधिकरणाकडून वेळोवेळी निश्चित केली जाईल अशी पुढील मुदतीसाठीची आकारणी देईन.

२. वापर.—जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज मी उक्त जमिनीचा व त्यावर उभारलेल्या किंवा उभारल्या जावयाच्या इमारतीचा *खेरीज कोणत्याही इतर प्रयोजनासाठी वापर करणार नाही किंवा वापर करण्यास परवानगी देणार नाही.

३. इमारत.—मी करारनाम्याच्या तारखेपासून ··· वर्षांच्या मुदतीत किंवा वैध प्राधिकरणाद्वारे निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत, उक्त जमिनीवर †भरीव व कायम बांधकाम उभारून ते पूर्ण करीन. त्याबाबत मी यासोबत जोडलेल्या दुसऱ्या अनुसूचीच्या खंड ···· यामध्ये अंतर्भूत असलेल्या इमारतविषयक विनियमांचे प्रत्येक बाबतीत यथोचितरीत्या पालन करीन.

‡४. जमिनीच्या कडेवर पट्टा राखून ठेवणे.—रस्त्याच्या प्रयोजनासाठी, उक्त जमिनीच्या कडेच्या पट्ट्यातून मीटरपेक्षा अधिक खोल नसेल एवढ्या जमिनीच्या पट्ट्याची शासनास आवश्यकता आहे अशा अर्थाची लेखी नोटीस, भविष्यकाळात, कोणत्याही दिवशी, जिल्हाधिकाऱ्याने मला दिल्यास, मी, अशा नोटीस मिळाल्यापासून एक महिना संपल्यानंतर, अशा जमिनीच्या पट्ट्याचा कब्जा निमूटपणे जिल्हाधिकाऱ्यास देईन, व त्याबद्दल पूर्ण भरपाई म्हणून, शासनाकडून, अशा स्वाधीन केलेल्या जमिनीच्या पट्ट्यावर, प्रमाणानुसार देय असेल अशा आकारणीच्या ( ) पटीइतकी रक्कम मोबदल्यादाखल घेईन :

---

* ज्या प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली असेल, ते विशिष्ट प्रयोजन येथे नमूद करावे.

† येथे इमारतीचे वर्णन म्हणजेच "निवासीचा बंगला व उपगृहे" नमूद करावे.

‡ आवश्यक नसेल ते खोडून टाका.

परंतु, कोणत्याही, दाराचे, भितीचे, फरसबंदीचे किंवा अशा जमिनीच्या इतर प्राधिकृत उभारणीचे किंवा बांधकामाचे सामान, जिल्हाधिकाऱ्याच्या मते, मोठया प्रमाणावरील खर्चाशिवाय, हलविणे शक्य नसेल त्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी आणखी भरपाई, त्याबद्दल मला देण्यात येईल.

५. पट्टी देण्यासंबंधीचे दायित्व.—मी, उक्त जमिनीच्या संबंधात लादण्यात येईल असे सर्व कर, पट्टया व उपकर देईन.

६. धारणाधिकार.—* (अ) मी, माझे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक व मान्य अभिहस्तांकिती, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेखेरीज, कोणतीही जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध हस्तांतरित करणार नाही.

† (ब) मी, माझे वारस, अभिहस्तांकिती व कायदेशीर प्रतिनिधी, कोणत्याही वेळी, विभाजन करून, वारसा हक्काने, पट्टा करून, गहाण ठेवून किंवा इतर कोणत्याही प्रकारे, उक्त जमीन, संपूर्णपणे असल्याखेरीज हस्तांतरित करणार नाही किंवा तिचा कोणताही भाग, ज्यामुळे तिची विभागणी होईल अशा रीतीने, इतर कोणत्याही व्यक्तीस, लागवडीसाठी, वापरासाठी, किंवा भोगवटा करण्यासाठी देणार नाही.

७. ‡ हस्तांतरण.—(अ) मी, जमिनीवरील बांधकाम व कारखाना संयंत्र व इतर संच मांडणी यासह असेल त्याशिवाय जमिनीची विल्हेवाट लावणार नाही आणि अशा रीतीने विल्हेवाट लावलेली जमीन राज्य शासनाच्या परवानगीखेरीज, ती ज्या प्रयोजनासाठी प्रथम देण्यात आली होती, त्या प्रयोजनाखेरीज इतर प्रयोजनासाठी वापरली जाणार नाही.

(ब) राज्य शासनाच्या परवानगीखेरीज मी जमिनीचे विभाजन करणार नाही किंवा अशा कोणत्याही पोटविभागाची विल्हेवाट लावणार नाही.

(क) कारखाना व इतर संच मांडणी यासह संयंत्र जमिनीची मी विक्रीद्वारे विल्हेवाट लावीन त्याबाबतीत, राज्य शासनास, अनर्जित उत्पन्नवाढीच्या निम्मी रक्कम मिळण्याचा हक्क असेल आणि अशी जमीन उपरोक्त कोणत्याही बांधकामाशिवाय हस्तांतरित करण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासनास, अनर्जित उत्पन्न-वाढीपैकी ९० टक्क्यांपर्यंत रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

८. अधिनियमाचे उपबंध लागू असणे.—उक्त अधिनियमाचे उपबंध व त्यावेळी अंमलात असलेले सर्व नियम व आदेश यांचे उपबंध, जेथवर ते लागू असतील तेथवर, उक्त जमिनीच्या माझ्या भोगवटयास लागू असतील.

९. शास्तिविषयक खंड.—(१) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ च्या नियम ४१ अन्वये जमिनीचे पुनर्ग्रहण करण्यात आले नसल्यास पूर्ववर्ती शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे किंवा अधिनियमान्वये केलेल्या व उपरोक्त माझ्या जमिनीच्या संबंधात लागू असलेल्या कोणत्याही नियमांचे, मी, उल्लंघन करीन तर, जिल्हाधिकाऱ्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये ज्या इतर कोणत्याही शास्तीस मी पात्र असेन, या शास्तीस बाध न आणता तो निदेश देईल असा दंड आणि/किंवा अशी आकारणी दिल्यानंतर, उक्त जमीन माझ्या भोगवटयात असण्याचे चालू ठेवता येईल.

(२) उप-खंड (१) मध्ये काहीही असले तरी, ही जमीन देण्याच्या उपबंधाविरूद्ध उभारण्यात आलेली किंवा वापरण्यात आलेली कोणतीही इमारत किंवा संरचना, जिल्हाधिकाऱ्याने याबाबत विहित केलेल्या कालावधीत, काढून टाकण्याबाबत किंवा तीत बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने निदेश देणे हे वैध असेल व विहित कालावधी अशी (इमारत) काढून टाकण्यात किंवा तीत बदल करण्यात न आल्यास, तो, ते काम पार पाडण्याची व्यवस्था करील आणि उक्त काम करण्याचा खर्च जमीन महसुलाची थकबाकी असल्या-प्रमाणे माझ्याकडून वसूल करता येईल.

---

* भोगवटयात नसलेल्या बिनदुमाला जमिनी, भोगाधिकार मूल्याच्या व आकारणीच्या किंवा खंडाच्या सवलतीच्या दराने किंवा लिलावाशिवाय देण्यात येतील अशा सर्व बाबतीत हा मजकूर ठेवावा इतर बाबतीत खोडून टाकावा व पुढील शर्तीला नवीन क्रमांक द्यावा.

† आवश्यक नसेल ते खोडून टाकावे.

‡ जमीन औद्योगिक किंवा व्यापारी प्रयोजनासाठी देण्यात आली असेल, त्याबाबतीत, केवळ हा मजकूर कायम ठेवावा.

## नकाशा

### अनुसूची एक

| लांबी व रुंदी | | एकूण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ | सीमा | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर ते दक्षिण | पूर्व ते पश्चिम | | उत्तर | दक्षिण | पूर्व | पश्चिम | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |

### अनुसूची दोन

(लागू असणाऱ्या शर्तींची संख्या अनुदानाच्या शर्त ३ मध्ये नमूद करण्यात येईल व विशेष शर्ती अनुषंगाने समाविष्ट करण्यात येतील.)

१. जोडलेल्या नकाशात खूण केलेल्या क्षेत्रातच केवळ इमारत उभारता येईल व उक्त जमिनीचे उर्वरित क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवण्यात येईल.

२. उक्त जमिनीपैकी "दोन-तृतीयांश" जमीन सामान्यपणे खुली ठेवण्यात येईल आणि जिल्हाधिकाऱ्याच्या मते, जमीन किमती असेल किंवा इमारतीमध्ये गरीब वर्गातील व्यक्ती राहण्याचा संभव असेल किंवा जमिनीच्या किमती उंचावल्या असतील असा बाजार किंवा शहरातील मध्यवर्ती भाग यासारख्या अगोदरच दाटीने इमारती असलेल्या क्षेत्रात, उक्त जमीन असेल तर, अशा क्षेत्रात फक्त "एक-द्वितीयांश" जमीन खुली ठेवण्यात येईल.

३. जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडून मान्यता देण्यात आली नसेल तर, उक्त जमिनीवर कोणत्याही जागी कोणताही शौचकूप, मलकुंडी किंवा तबेला बांधण्यात येणार नाही.

४. तळमजला व एक वरचा मजला याहून अधिक मजले असलेली व त्यात योग्य अशा पोचमार्गाची तरतूद करण्यात आली असेल त्याशिवाय, कोणतीही अशी इमारत उक्त जमिनीवर उभारता कामा नये.

५. उक्त जमिनीवर उभारण्यात आलेली इमारत केवळ . . . . प्रयोजनासाठीच वापरण्यात येईल.

६. उक्त जमिनीवर उभारलेली कोणतीही इमारत, उपद्रवकारक व्यवसायासाठी वापरता कामा नये.

७. निवासी इमारतीच्या बाबतीत, जोते जमिनीच्या सर्वसाधारण पातळीपासून ०·६१ मीटर असेल.

८. जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, इमारतीत कोणतीही भर घालता कामा नये किंवा तीत बदल करता कामा नये.

९. अनुदान पुढील विशेष शर्तींच्या अधीन असेल :—

(अ)

(ब) , इत्यादी , इत्यादी.

दिनांक

ठिकाण :

(सही) अ. ब.

## नमुना तेरा

[नियम ४२ (१) (ब) पहा]

**विकास योजनेत किंवा इतर विशेष प्रकरणात अंतर्भाव केलेल्या नागरी क्षेत्रातील जमिनीचे भोगवटादार होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींकडून संमत करून घ्यावयाच्या करारनाम्याचा नमुना.**

**करारनामा**

.................... जिल्ह्याचा जिल्हाधिकारी,

यास,

मी, अ. ब. राहणार ............, मी व माझे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकिती यांच्या वतीने, खाली नमूद केलेल्या शर्तीवर, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा (ज्याचा यात यापुढे "उक्त जमीन" असा निर्देश केला आहे) भोगवटा करण्याचे मान्य करीत आहे व उक्त जमिनीचा भोगवटादार म्हणून भू-अभिलेखात माझ्या नावाची नोंद करण्यात यावी, अशी मी विनंती करीत आहे :—

**शर्ती**

१. उक्त जमिनीच्या संबंधात वेळोवेळी देय असलेला जमीन महसूल म्हणजे.—(........दराने किंवा त्या त्या वेळी अमलात असतील अशा नियमाद्वारे बसविता येईल अशा जमिनीस लागू असेल, अशा कमी दराने) .........वर्षाच्या मुदतीकरिता रु.......ची रक्कम आकारणी म्हणून देईन आणि त्यानंतर वैध प्राधिकारणाकडून वेळोवेळी निश्चित केली जाईल अशी पुढील मुदतीसाठी आकारणी मी देईन.

२. वापर.—जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीखेरीज मी उक्त जमिनीचा व त्यावर उभारलेल्या किंवा उभारल्या जाणाऱ्या इमारतीचा ...... खेरीज इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापर करणार नाही किंवा वापर करण्यास परवानगी देणार नाही. मी यासोबत जोडलेल्या दुसऱ्या अनुसूचित अंतर्भाव केलेल्या शर्तीचे यथोचित पालन करीन.

३. जमिनीच्या कडेवर पट्टा राखून ठेवणे.—रस्त्याच्या प्रयोजनासाठी, उक्त जमिनीच्या कडेच्या पट्ट्यातून .......मीटरपेक्षा अधिक खोल नसेल एवढ्या पट्टीची शासनास आवश्यकता आहे अशा अर्थाची लेखी नोटीस, भविष्यकाळात कोणत्याही दिवशी जिल्हाधिकाऱ्याने मला दिल्यास, मी, अशी नोटीस मिळाल्यापासून एक महिना संपल्यावर, अशा जमिनीच्या पट्ट्याचा कब्जा निमूटपणे जिल्हाधिकाऱ्यास देईन व त्याबद्दल पूर्ण भरपाई म्हणून, शासनाकडून अशा स्वाधीन केलेल्या जमिनीच्या पट्ट्यावर प्रमाणानुसार देय असेल अशा आकारणीच्या (          ) पट्टीइतकी रक्कम मोबदल्यादाखल घेईन. परंतु कोणत्याही द्वाराचे, भिंतीचे, फरसबंदीचे किंवा अशा जमिनीच्या पट्टीवरील इतर प्राधिकृत उभारणीचे किंवा बांधकामाचे सामान, जिल्हाधिकाऱ्याच्या मते मोठ्या प्रमाणावरील खर्चाशिवाय हलविणे शक्य नसेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी आणखी भरपाई त्याबद्दल मला देण्यात येईल.

४. पट्टी देण्यासंबंधात दायित्व.—मी, उक्त जमिनीच्या संबंधात लादण्यात येतील असे सर्व कर, पट्ट्या व उपकर देईन.

५. धारणाधिकार.—*(अ) मी, माझे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, व्यवस्थापक व मान्य अभिहस्तांकिती, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमान्यतेशिवाय कोणतीही जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतीही हितसंबंध हस्तांतरित करणार नाही.

---

* भोगवटा न केलेल्या बिनदुमाला जमिनी, भोगाधिकार मूल्य व आकारणी किंवा खंड यात सवलत देऊन किंवा लिलावाशिवाय, ज्याबाबतीत (विक्री किंवा पट्ट्याने) देण्यात येतील, अशा सर्व बाबतीत, मजकूर कायम ठेवावा. इतर बाबतीत खोडून टाकावा व पुढील शर्तीला पुन्हा क्रमांक द्यावा.

*(ब) मी, माझे वारस, अभिहस्तांकिती व कायदेशीर प्रतिनिधी, कोणत्याही वेळी वाटणी करून, वारसा हक्काने भाडेपट्ट्याने गहाण ठेवून किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे उक्त जमीन, संपूर्ण जमीन असेल त्याशिवाय हस्तांतरित करणार नाही किंवा ज्यामुळे जमिनीची विभागणी होईल अशा रीतीने तिचा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीस लागवड करण्यास, वापरण्यास किंवा भोगवटा करण्यास परवानगी देणार नाही.

†६. हस्तांतरण.—(अ) मी, जमिनीवरील बांधकाम, कारखाना, संयंत्र व इतर संचमांडणी यांसह असेल त्याशिवाय जमिनीची विल्हेवाट लावणार नाही आणि अशा रीतीने विल्हेवाट लावलेली जमीन राज्य शासनाच्या परवानगीखेरीज, ती ज्या प्रयोजनासाठी प्रथमतः देण्यात आली होती या प्रयोजनाखेरीज इतर प्रयोजनासाठी वापरली जाणार नाही.

(ब) राज्य शासनाच्या परवानगीखेरीज मी जमिनीचे विभाजन करणार नाही किंवा अशा कोणत्याही पोट-विभागाची विल्हेवाट लावणार नाही.

(क) विक्रीच्या मार्गाने कारखाना, संयंत्र व इतर संचमांडणी यांसह जमिनीची मी विक्रीद्वारे विल्हेवाट लावीन. त्याबाबतीत राज्य शासनास, अनर्जित उत्पन्नवाढीच्या निम्मी रक्कम मिळण्याचा हक्क असेल आणि अशी जमीन उपरोक्त कोणत्याही बांधकामाशिवाय हस्तांतरित करण्यात येईल त्याबाबतीत, राज्य शासनास, अनर्जित उत्पन्नवाढीपैकी ९० टक्क्यांपर्यंतची रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

७. अधिनियमाचे उपबंध लागू असणे.—उक्त अधिनियमाचे उपबंध व त्यावेळी अमलात असलेले सर्व नियम व आदेश त्याचे उपबंध जेथवर लागू असतील तेथवर ते, उक्त जमिनीच्या माझ्या भोगवटयास लागू असतील.

८. शास्तिविषयक खंड.—(अ) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ च्या नियम ४१ अन्वये जमिनीचे पुनर्ग्रहण करण्यात आलेले नसल्यास पूर्ववर्ती शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे किंवा अधिनियमान्वये केलेल्या व उपरोक्त माझ्या जमिनीच्यासंबंधात लागू असलेल्या, कोणत्याही नियमांचे, मी उल्लंघन करीन, तर, जिल्हाधिकाऱ्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये ज्या इतर कोणत्याही शास्तीस मी पात्र असेन त्या शास्तीस बाध न आणता, तो निदेश देईल असा दंड आणि/किंवा अशी आकारणी दिल्यानंतर, उक्त जमीन माझ्या भोगवटयात असण्याचे चालू ठेवता येईल.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशा अनुदानाच्या संबंधाविरुद्ध उभारण्यात आलेली किंवा वापरण्यात आलेला कोणतीही इमारत किंवा संरचना, जिल्हाधिकाऱ्याने अशा अनुदानाच्या याबाबत विहित केलेल्या कालावधीत काढून टाकण्याबाबत किंवा तीत बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने निदेश देणे हे वैध असेल व विहित कालावधीत अशी (इमारत) काढून टाकण्यात किंवा तीत बदल करण्यात न आल्यास तो ते काम पार पाडण्याची व्यवस्था करील आणि उक्त काम करण्याचा खर्च, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे माझ्याकडून वसूल करता येईल :—

नकाशा

अनुसूची एक

| लांबी व रुंदी | | एकूण | सीमा | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर ते दक्षिण | पूर्व ते पश्चिम | पृष्ठभागाचे क्षेत्रफळ | उत्तर | दक्षिण | पूर्व | पश्चिम | |

*आवश्यक नसेल त्याबाबतीत खोडून टाकावे.

† भोगवटा न केलेल्या बिनदुमाला जमिनी (विक्री किंवा पट्टा) भोगवटयाची किंमत व आकारणीच्या सवलतीच्या दराने वा खंडाने किंवा लिलावाशिवाय ज्याबाबतीत देण्यात येतात, अशा सर्व बाबतीत कायम ठेवावे. इतर बाबतीत खोडून टाकावा व पुढील शर्तीला पुन्हा क्रमांक द्यावा.

**अनुसूची दोन**

१. अर्जदार, नगरपालिका/महानगरपालिका यांजकडून तयार करण्यात येतील अशा इमारतविषयक उपविधीस अनुसरून भूमिभागावर बांधकाम करील.

२. हे अनुदान पुढील विशेष शर्तीस अधीन असेल :—

(अ) उक्त जमिनीवर, या करारनाम्याच्या तारखेपासून ............. वर्षे मुदतीत किंवा वैध प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात येईल अशा आणखी मुदतीत, भरीव व कायम स्वरूपाच्या इमारती बांधण्यात येतील ;

(ब)

(क)

दिनांक : स्थान :

सही अ. ब.

आम्ही जाहीर करतो की, या करारनाम्यावर सही करणारा हा, आमच्या वैयक्तिक माहितीनुसार, तो जी व्यक्ती म्हणून प्रतिनिधित्व करीत आहे तीच व्यक्ती असून त्याने आमच्या समक्ष स्वत:ची सही केली आहे.

(सही) इ. एफ.

(सही) जी. एच.

---

## नमुना चौदा

[नियम ४३ (अ) (सहा) पहा]

**करारनामा**

हा करारनामा, एकपक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांना यात यापुढे "अनुदानकर्ता" असे संबोधण्यात आले आहे),(या शब्दप्रयोगात संदर्भावरून अनुज्ञेय असेल तर उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि दुसऱ्यापक्षी, ....................... (ज्यांना यात यापुढे "अनुदानग्राही" असे संबोधण्यात आले आहे) (या संज्ञेत अनुज्ञेय असेल तर, त्यांचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, प्रतिनिधी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये, दिनांक .......... रोजी करण्यात आला आहे ;

ज्याअर्थी, अनुदानग्राहीने, लागवडीच्या/बांधकामाच्या प्रयोजनासाठी (ज्याचा यात यापुढे "उक्त बांधकाम" असा निर्देश करण्यात आला आहे) सरकारी जमिनीच्या तुकड्यावर—ज्याचा यासोबतच्या अनुसूचीमध्ये संपूर्ण तपशील देण्यात आला आहे—(ज्यास यात यापुढे "उक्त जमीन" असे संबोधण्यात आले आहे) अतिक्रमण केले आहे ; आणि ज्याअर्थी, अनुदानग्राहीने उक्त जमिनीवरील अनुदानकर्त्याचा मालकीहक्क निश्चित कबूल केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुदानग्राहीने, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३१ अन्वये, उक्त अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणेचे भोगाधिकार मूल्य व आकारणी दिल्यावर उक्त जमीन, भोगवटयाच्या अधिकारासह देण्याविषयी विनंती केली आहे ;

त्याअर्थी, आता हा करारनामा पुढील गोष्टींच्या साक्षीदाखल आहे की, अनुदानकर्ता भोगवटयाच्या अधिकारासह उक्त जमीन, पुढील अटींवर अनुदानग्राहीस देण्याचे मान्य करीत आहे :—

(एक) अनुदानग्राही, उक्त जमिनीच्या भोगवटयाचे मूल्य म्हणून ............ रुपये अनुदानकर्त्यास देईल.

(दोन) अनुदानग्राही उक्त जमिनीच्या आकारणीची रक्कम म्हणून, प्रत्येक वर्षी .......... रुपये अनुदानकर्त्यास देईल.

(तीन) अनुदानग्राही, उक्त अधिनियमाच्या व त्यान्वये केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार हाती घेण्यात आलेल्या फेर जमाबंदीत आकारणीमध्ये वाढ करण्यात येईपर्यंत ............... पासून उक्त आकारणीची रक्कम देईल.

(चार) जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, ............ खेरीज कोणत्याही प्रयोजनासाठी अनुदानग्राही, उक्त जमिनीचा वापर करणार नाही.

(पाच) अनुदानग्राही, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीन्वयेचे उक्त जमिनीच्या संबंधात लादता येतील असे सर्व कर, दर व उपकर व आयातकर देईल.

(सहा) अनुदानग्राही, उक्त जमिनीचा त्याच्या कब्जास , लागू असेल तेथवर, उक्त अधिनियम व त्याअन्वये त्यावेळी अंमलात असलेले सर्व नियम व आदेश यांच्या उपबंधांचे पालन करील.

(सात) ह्या अनुदानाच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याच्या बाबतीत, अनुदानग्राही, अधिनियम व त्याअन्वये केलेले नियम यात तरतूद केलेल्या शास्तीस पात्र ठरेल.

या गोष्टींच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी, स्वतःच्या वतीने, ........... जिल्हाधिकाऱ्यास यावर सही करून त्यांचा कार्यालयीन शिक्का, कोणताही असल्यास, वठविण्याबद्दल सांगितले आहे. आणि अनुदानग्राहीने वर नमूद केलेल्या तारखेस व वर्षी, त्याच्या वतीने आपली सही करून शिक्का वठविला आहे.

**अनुसूची**

................... जिल्हाधिकारी यांनी
खालील व्यक्तींच्या समक्ष, सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केला:—

(१) ...............................

(२) ...............................

जिल्हाधिकाऱ्यांचा
शिक्का

उपरिनामित अनुदानग्राहीने ........ च्या समक्ष
आपल्या सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केला.

## नमुना पंधरा

[नियम ४३ (ब) (सहा) पहा.]

### करारनामा

हा करारनामा, एकापक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांना यात यापुढे "पट्टाकार" असे संबोधण्यात आले आहे) (या शब्दप्रयोगात संदर्भानुसार तसे अनुज्ञेय असेल तर उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि दुसऱ्यापक्षी, ................ (ज्यांना यात यापुढे "पट्टेदार" असे संबोधण्यात आले आहे) (या शब्दप्रयोगात संदर्भानुसार तसे अनुज्ञेय असेल तर त्यांचे वारस, मृत्युपत्र-व्यवस्थापक, प्रशासक, प्रतिनिधी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये, दिनांक ..... रोजी करण्यात आला आहे ;

ज्याअर्थी, पट्टेदाराने सरकारी जमिनीच्या तुकड्यावर, ज्याचा यासोबतच्या अनुसूचीमध्ये संपूर्ण तपशील देण्यात आला आहे—(ज्याला यात यापुढे "उक्त जमीन" असे संबोधण्यात आले आहे)—लागवडीच्या/बांधकामाच्या प्रयोजनासाठी (ज्याचा यात यापुढे "उक्त बांधकाम" असा निर्देश करण्यात आला आहे) अतिक्रमण केले आहे ;

आणि ज्याअर्थी, पट्टेदाराने उक्त जमिनीवरील पट्टाकाराचा मालकीहक्क निश्चितपणे मान्य केला आहे;

आणि ज्याअर्थी, पट्टेदाराने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम ३८ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणेचे भोगाधिकार मूल्य व आकारणी दिल्यावर, पट्टयावर जमीन धारण करण्याच्या अधिकारासह उक्त जमीन देण्याविषयी पट्टाकाराला विनंती केली आहे ;

त्याअर्थी, आता हा करारनामा पुढील गोष्टींच्या साक्षीदाखल आहे की, पट्टाकार पट्टयावर धारण करण्याच्या अधिकारासह पुढील शर्तींवर उक्त जमीन पट्टेदारास पट्टयावर देण्याचे मान्य करीत आहे :—

(एक) हा पट्टा ............ पासून तीस वर्षे मुदतीसाठी असेल (येथे अतिक्रमणाची तारीख नमूद करावी) ;

(दोन) पट्टेदार .................. रुपये वार्षिक खंड देईल ;

(तीन) पट्टेदार उक्त जमिनीच्या अनधिकृत भोगवटयादाखल दंड म्हणून ........ रुपयांची रक्कम देईल.

(चार) पट्टा चालू असताना जर उक्त बांधकामामध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले तर, पट्टेदार, भरपाईशिवाय उक्त जमीन सोडून देईल ;

(पाच) जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय, पट्टेदार ...... खेरीज इतर कोणत्याही प्रयोजनासाठी उक्त जमिनीचा वापर करणार नाही.

(सहा) पट्टेदार, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीन्वये उक्त जमिनीच्या संबंधात लादता येतील असे सर्व कर, दर व उपकर व इतर आयात कर देईल.

(सात) पट्टेदार, उक्त जमिनीच्या त्याच्या कब्जास लागू असेल त्या मर्यादेपर्यंत, अधिनियमाच्या व अंमलात असलेल्या सर्व नियमांच्या व आदेशांच्या सर्व उपबंधांचे पालन करील ;

(आठ) ह्या पट्टयाच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तींचा भंग झाल्याच्या बाबतीत, पट्टेदार, अधिनियमात व त्याअन्वये केलेल्या नियमात तरतूद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र ठरेल.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी स्वतःच्या वतीने .............. च्या जिल्हाधिकाऱ्यास यावर सही करून त्याचा कार्यालयीन शिक्का (कोणताही असल्यास) वठविण्याबद्दल सांगितले आहे आणि पट्टेदाराने वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी, त्याच्या वतीने आपली सही करून, शिक्का वठविला आहे.

अनुसूची

..............जिल्हाधिकाऱ्याने खालील व्यक्तींच्या समक्ष, आपल्या सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केला.

(१) ........................

(२) ........................

जिल्हाधिकाऱ्यांचा शिक्का

उपरिनामित पट्टेदाराने खालील व्यक्तींच्या समक्ष, आपल्या सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केला.

(१) ........................

(२) ........................

---

## नमुना सोळा

(नियम ४४ पहा)

### करारनामा

हा करारनामा, एकापक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांना यात यापुढे "शासन" असे संबोधण्यात आले आहे) (उक्त शब्दप्रयोग संदर्भान्वये तसे अनुज्ञेय असेल तर त्यांचे उत्तराधिकारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि दुसऱ्या पक्षी, ................(यात यापुढे ज्यांना "अनुज्ञप्तिधारक" असे संबोधण्यात आले आहे) (या शब्दप्रयोगात संदर्भान्वये तसे अनुज्ञेय असेल तर, त्याचे वारस, मृत्युपत्र-व्यवस्थापक, व्यवस्थापक, प्रतिनिधी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये, दिनांक ..............१९ रोजी करण्यात आला आहे ;

ज्याअर्थी, अनुज्ञप्तिधारकाने, सरकारी जमिनीच्या तुकड्यावर....ज्याचा याखाली नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये संपूर्ण तपशील दिला आहे आणि ज्याचे यासोबत जोडलेल्या नकाशावर सीमांकन करण्यात आले आहे आणि तो......रंगाने दर्शविण्यात आला आहे (ज्याला यात यापुढे "उक्त जमीन" असे संबोधण्यात आले आहे)........वर्षे अस्तित्वात आहे असा सज्जा/व्हरांडा/बहिर्वर्ती उपांग/छप्पर/चबुतरा/पायऱ्या आणि वाहनमार्ग यांचे बांधकाम करून (ज्याचा यात यापुढे "उक्त बांधकाम" असा निर्देश करण्यात आला आहे) अतिक्रमण केले आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुज्ञप्तिधारकाने उक्त जमिनीवरील शासनाचा मालकी हक्क निश्चितपणे मान्य केला आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुज्ञप्तिधारकाने, त्यास उक्त जमिनीसंबंधी कोणताही अधिकार प्रदान केल्याशिवाय, उक्त बांधकाम ठेवण्यास परवानगी देण्याबद्दल शासनास विनंती केली असून, अशी परवानगी ही, उक्त बांधकाम ठेवण्यासंबंधात, अशा रीतीने दिलेल्या परवानगीमुळे, उक्त जमिनीत कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हितसंबंध मिळणार नाही या शर्तीस अधीन आहे ;

आणि ज्याअर्थी, जमिनीचा अंशत: भोगवटा केल्याबद्दल शिक्षार्थ फीची रक्कम म्हणून रु. .......... (                ) इतकी रक्कम अनुज्ञप्तिधारकाकडून शासनास मिळाल्यामुळे, अनुज्ञापकाने, उक्त बांधकाम काढून टाकण्यासाठी अनुज्ञप्तिधारकाविरुद्ध कायद्यान्वयेची कोणतीही कारवाई न करण्याचे मान्य केले आहे ;

त्याअर्थी, आता हा करारनामा पुढील गोष्टींच्या साक्षीदाखल आहे की, अनुज्ञप्तिधारकाने शासनाला रुपये............(                ) इतकी रक्कम दिल्यानंतर,—जी मिळाल्याबद्दल

शासन याद्वारे पोच देत आहे—आणि हा करारनामा चालू असतानाच्या काळात, प्रत्येक वर्षी* दिवशी किंवा त्यापूर्वी, रुपये ..................(............) ची रक्कम शिक्षार्थ अनुज्ञप्ती फी म्हणून देण्याचे अनुज्ञप्तिधारकाने कबूल केल्यानंतर, पुढील शर्तीच्या अधीन ठेवून, शासन उक्त बांधकाम ठेवण्यास अनुज्ञप्तिधारकास परवानगी देण्याचे मान्य करीत आहे :—

१. सरकारी किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन जोपर्यंत शासनाला आवश्यक असणार नाही तोपर्यंत उक्त बांधकाम ठेवण्यास परवानगी देण्यात येईल.

२. सरकारी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची शासनाला आवश्यकता भासेल त्याबाबतीत (उक्त बाबतीत अनुज्ञप्तिधारक शासनाचा निर्णय हा अंतिम निर्णय म्हणून मान्य करील) शासनाने अनुज्ञप्तिधारकास तसे करण्याबद्दल लेखी नोटिशीद्वारे भाग पाडल्यानंतर, अनुज्ञप्तिधारक, उक्त नोटीस मिळाल्यापासून ............ मुदतीत, उक्त बांधकाम काढील व त्यानंतर, हा करारनामा संपुष्टात येईल. नोटिशीमध्ये दिलेल्या मुदतीत जर अनुप्तिधारक उक्त बांधकाम काढून टाकण्यात कसूर करील तर, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ४५ मध्ये घालन दिलेल्या कार्यपद्धतीनुसार, शासनाला अनुज्ञप्तिधारकाच्या खर्चाने, उक्त बांधकाम काढून टाकण्याचा हक्क असेल व अनुज्ञप्तिधारकास उक्त बांधकाम काढून टाकण्याबद्दल कोणतीही भरपाई मागण्याचा हक्क असणार नाही.

३. ज्या इमारतीस उक्त बांधकाम लागू असेल ती इमारत कोसळेल किंवा आगीने, भूकंपाने, वादळाने किंवा नागरी दंगलीच्या परिणामी किंवा कोणत्याही इतर कारणामुळे नष्ट होईल किंवा तिची पुनर्बांधणी करण्यात येईल तर, हा करारनामा तात्काळ समाप्त होईल ; आणि अनुज्ञप्तिधारकास वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोसळलेल्या किंवा नष्ट झालेल्या इमारतीऐवजी जी कोणतीही इमारत बांधण्यात येईल त्या संबंधात, तसेच बांधकाम उभारण्यासंबंधात कोणत्याही अधिकाराची मागणी करण्याचा हक्क असणार नाही. अनुज्ञप्तिधारकाकडून शासनाला ज्याबाबत नोटीस देण्यात येईल असे बांधकाम पूर्णपणे काढून टाकण्यात आल्यानंतर, हा करारनामा समाप्त होईल आणि (बांधकाम) काढून टाकण्यात आल्याचा दिनांक किंवा नोटिशीचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून वार्षिक अनुज्ञप्ती फी भरण्यासंबंधातील अनुज्ञप्तिधारकाचे दायित्व समाप्त होईल.

४. अनुज्ञप्तिधारक याद्वारे असे कबूल करीत आहे की, यान्वये केलेली अनुज्ञप्ती फी ती देय झाल्याच्या तारखेस देण्यात कसुरी करील तर, ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे त्याच्याकडून वसूल करण्यात येईल.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी स्वतःचे वतीने ...... च्या जिल्हाधिकाऱ्यास, आपली सही व कार्यालयीन शिक्का वठविण्याबद्दल सांगितले असून, अनुज्ञप्तिधारकाने, वर नमूद केलेल्या दिवशी व वर्षी स्वतःच्या वतीने आपली सही करून शिक्का, कोणताही असल्यास, वठविला आहे.

वर निर्दिष्ट केलेली अनुसूची ...... चे जिल्हाधिकारी यांनी, खालील व्यक्तींच्या समक्ष आपल्या सही शिक्क्यानिशी स्वाधीन केला.

(१)

(२)

उपरिनामित अनुदानग्राहीने, खालील व्यक्तींच्या समक्ष, आपल्या सहीशिक्क्यानिशी स्वाधीन केला:—

जिल्हाधिकाऱ्यांचा शिक्का

(१)

(२)

*येथे तारखेचा उल्लेख करावा.

## नमुना सतरा

(नियम ४४ पहा)

(आगाऊ परवानगीशिवाय सरकारी जमिनीत मलकुंडी बांधण्यात येईल तेव्हा वापरावयाचा नमुना)

ह्या करारनामा एकापक्षी, महाराष्ट्राचे राज्यपाल (ज्यांचा यात यापुढे 'शासन' असा निर्देश करण्यात आला आहे) उक्त शब्दप्रयोगात, संदर्भावरून वगळण्यात आले नसेल किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर, त्यांचे त्या पदावरील उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) आणि दुसऱ्या पक्षी, श्री. ........ ..............., .........जिल्ह्यातील ............ तालुक्याचे रहिवाशी (यात यानंतर ज्यांचा "अर्जदार" असा निर्देश करण्यात आला असून, संदर्भावरून वगळण्यात आले नसेल किंवा संदर्भास प्रतिकूल नसेल तर, उक्त शब्दप्रयोगात, त्याचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, व्यवस्थापक व अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) यांच्यामध्ये दिनांक ..........रोजी करण्यात आला आहे ;

ज्याअर्थी, अर्जदाराने शासकीय परवानगीशिवाय ..................च्या दिवशी किंवा त्यासुमारास,................ जिल्ह्याच्या ..............तालुक्यातील ......... गावाच्या हद्दीतील .........शहर भूमापन क्रमांकाच्या व जो यासोबत जोडण्यात आला असून यातील पक्षकारांनी जागेची ओळख पटल्याबद्दल ज्यावर सही केली आहे अशा जागेच्या नकाशात तपशीलवार रेखाटण्यात आलेल्या अदमासे ......चौरस मीटर मोजणीच्या सरकारी *(रस्त्याखालील) जमिनीखालील (जिचा यात यापुढे "उक्त जमीन" असा निर्देश केला आहे) .........चौरस मीटर जागेत साचलेल्या पाण्यासाठी भूमिगत मलकुंडी (जिचा यात यापुढे 'उक्त मलकुंडी' असा निर्देश करण्यात आला आहे) बांधली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने, अर्जदारास पुढील अटीवर, उक्त मलकुंडी ठेवण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी व अनुज्ञप्ती देण्याचे आता कबूल केले आहे ;

आणि ज्याअर्थी, अर्जदाराने, दर वर्षाचा खंड रु. ...............च्या ..........पट अंशराशीकरण म्हणून शासनास ठोक रकमेच्या स्वरूपात .........रुपये रक्कम दिली आहे ;

त्याअर्थी आता, ह्या करार या गोष्टीच्या साक्षीदाखल आहे की, शासन, याद्वारे, पुढील अटीवर व शर्तीवर, अर्जदारास अशी परवानगी व अनुज्ञप्ती देत आहे.

(१) अर्जदारास .........पासून सुरू होणाऱ्या ..............†वर्ष मुदतीपर्यंत उक्त जमिनीचा भोगवटा करण्यास व उपरिनिर्दिष्ट प्रयोजनासाठी उक्त मलकुंडी ठेवण्यास याद्वारे परवानगी देण्यात येत आहे आणि त्याबद्दल अर्जदार, उपरनिर्दिष्ट मुदतीत प्रत्येक वर्षी ......दिवशी शासनाला आगाऊ रक्कम म्हणून रु. ......दरवर्षी देईल.

(२) अर्जदार, उक्त मलकुंडीची रचना किंवा पुनर्रचना किंवा नंतर करण्यात येतील अशा कोणत्याही दुरूस्त्या यासंबंधात उक्त जमिनीवर किंवा इतर सरकारी जमिनीवर त्याच्याकडून जे कोणतेही खणण्याचे काम करण्यात येईल त्यामुळे होणाऱ्या अपघातास प्रतिबंध करण्यासाठी म्हणून, दिवसा सोयीस्कर असे कुंपण व रात्री कुंपण व दिवाबत्तीची तरतूद करून आवश्यक ती दक्षता घेईल.

(३) अर्जदार स्वतःच्या खर्चाने, उक्त मलकुंडी योग्य अशा स्थितीत ठेवील व उक्त जमिनीखाली उक्त मलकुंडी असल्यामुळे पाणी ओसंडून किंवा यथास्थिति कोणत्याही वेळी उक्त जमिनीचे* (किंवा उक्त रस्त्याच्या पृष्ठभागाचे किंवा बाजूकडील उताराचे किंवा कडेच्या उंचवटाचे) कोणतेही नुकसान होईल तर त्याची ताबडतोब भरपाई करील.

(४) उक्त मलकुंडीच्या दुरूस्तीच्या किंवा पुनर्रचनेच्या प्रयोजनार्थ, खणण्यात येईल अशी, उक्त जमीन किंवा इतर कोणतीही सरकारी जमीन, अर्जदाराकडून, अशा रीतीने, स्वखर्चाने .....च्या जिल्हाधिकाऱ्याची (यात यापुढे ज्यास "जिल्हाधिकारी" असे संबोधण्यात आले आहे) किंवा त्याच्या प्रतिनिधीची पूर्ण खात्री

---

* जेव्हा अशी जमीन रस्त्याचा भाग नसेल त्यावेळी हे वगळण्यात यावे.

† निश्चित करण्यात यावयाची आहेत.

होईल अशा प्रकारे पूर्व स्थितीत आणण्यात येईल व त्याने ती पूर्ववत् करण्यात कसूर केल्यास, जिल्हाधिकाऱ्या-कडून ती पूर्ववत् करण्यात येईल व अशा रीतीने ती पूर्ववत् करण्याचा खर्च, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या उपबंधान्वये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल.

(५) या करारनाम्याद्वारे दिलेली अनुज्ञप्ती, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखाली वेळोवेळी करण्यात येतील अशा नियमांस आणि आदेशांस अधीन असेल.

(६) उक्त ज़मिनीत किंवा इतर जमिनीत किंवा तीवर कोणतेही काम किंवा इतर गोष्ट करणे व त्यामुळे उक्त मलकुंडी काढून टाकणे व तिची पुनर्रचना करणे आवश्यक असल्याचे कोणत्याही वेळी आढळून येईल त्याबाबतीत, उक्त मलकुंडी काढण्याचा किंवा ती परत बांधण्याचा खर्च, अर्जदार स्वत: करील.

(७) या करारनाम्याद्वारे स्पष्टरीत्या तरतूद केली असेल त्याशिवाय उक्त जमिनीसंबंधात किंवा त्याच्या कोणत्याही भागासंबंधात याद्वारे देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीमुळे अर्जदाराच्या वतीने कुळवहिवाट निर्माण होते किंवा अर्जदारास उक्त जमिनीच्या कोणत्याही भागात किंवा त्यावर वैध अधिकार किंवा हितसंबंध प्राप्त होतो किंवा उक्त जमिनीखाली उक्त मलकुंडी ठेवण्याचा कोणताही हक्क त्यास प्राप्त होतो असा अर्थ लावता कामा नये आणि उक्त जमिनीच्या पृष्ठभागाचा वापर करण्याचा किंवा तिची विल्हेवाट लावण्याचा शासनाचा अधिकार याद्वारे राखून ठेवण्यात येत आहे.

(८) कोणत्याही व्यक्तीकडून शासनाविरुद्ध करण्यात आलेले सर्व दावे, मागण्या, कार्यवाही, दावे किंवा कामकाज यासंबंधात व याद्वारे दिलेल्या परवानगीतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही विशेषाधिकाराचा अर्जदाराने वापर केल्यामळे किंवा तसा वापर केल्याच्या कारणामुळे किंवा उक्त जमिनीखाली उक्त मलकुंडी राहिल्यामुळे शासनास जो दावा खर्च, आकारणी व व्यय करावा लागेल त्यासंबंधात अर्जदार शासनाची क्षतिपूर्ती करील.

(९) उक्त मलकुंडी बंदिस्त केल्यामुळे किंवा बंद केल्यामुळे किंवा तिला अडथळा निर्माण केल्यामुळे किंवा उक्त मलकुंडीसंबंधीच्या अर्जदारांच्या अधिकारात किंवा हितसंबंधात जनतेतील कोणत्याही व्यक्तीने किंवा अशा कोणत्याही व्यक्तीने केलेल्या कारवाईतून उद्‌भवलेल्या हस्तक्षेपामुळे, अर्जदाराची जी कोणतीही हानी किंवा नुकसानी होईल त्याबद्दल शासन जबाबदार राहणार नाही.

(१०) ...... *वर्षांची उक्त मुदत संपल्यानंतर, कोणतीही रक्कम देण्याबाबत आणि भोगवटयाच्या मुदतीबाबत किंवा त्याच्या उपयोगकर्त्याबाबत, त्यावेळी कबूल करण्यात येईल अशा अटीवर उक्त जमिनी-खालील उक्त मलकुंडी ठेवण्यास नव्याने परवानगी देणे हे सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयावर अवलंबून असेल.

(११) ...... *वर्षांची मुदत संपल्यानंतर हा करारनामा समाप्त होऊन रद्द होईल आणि अर्जदार ...... वर्षांची उक्त मुदत संपल्यावर किंवा ती संपण्यापूर्वी उक्त मलकुंडी ठेवण्यासाठी नवीन अनुज्ञप्ती त्यास मिळाली नसेल तर, स्वखर्चाने उक्त मलकुंडी काढून टाकील आणि ......... वर्षांची उक्त मुदत संपल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या मुदतीत उक्त जमिनीचा ताबा स्वाधीन करील व उक्त मलकुंडी काढून टाकण्याकरिता जर उक्त जमीन खणणे आवश्यक असेल तर तो स्वखर्चाने कोणत्याही नुकसानीची भरपाईही करून मूळ स्थितीनुसार उक्त जमीन पूर्ववत करील. अर्जदार उक्त मलकुंडी काढून टाकून उक्त जमिनीचा ताबा देण्यात किंवा कोणत्याही नुकसानीची भरपाई करण्यात किंवा उक्त जमीन तिच्या मूळ स्थितीनुसार पूर्ववत करण्यात कसुरी करील तर शासनास उक्त जमिनीवर पुन्हा प्रवेश करण्याचे, तिचा ताबा घेण्याचे अर्जदाराच्या खर्चाने उक्त मलकुंडी काढून टाकण्याचे किंवा यथास्थिती उक्त जमीन तिच्या मूळ स्थितीनुसार पूर्ववत करण्याचे स्वातंत्र्य असेल. अशा रीतीने मलकुंडी काढून टाकण्याचा किंवा यथास्थिती ती पूर्ववत करण्याचा खर्च, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अर्जदाराकडून वसूल करता येईल.

(१२) हा करारनामा तयार करून तो करून देण्याचा व तो मुद्रांकित करण्याचा खर्च अर्जदार करील.

(१३) जर अर्जदाराने किंवा त्याच्या वतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, या करारनाम्यातील यापूर्वी नमूद केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केला तर, याद्वारे दिलेली अनुज्ञप्ती रद्द करण्याचे व हा

---

*निश्चित करण्यात यावयाची आहे.

करारनामा समाप्त करण्याचे शासनास स्वातंत्र्य राहील व त्यानंतर ………… *वर्षांची उक्त मुदत संपली असल्याप्रमाणे, वरील खंड (११) मध्ये नमूद केलेले परिणाम अंमलात येतील.

(१४) या करारनाम्यान्वये अर्जदाराने द्यावयाच्या रकमेचा कोणताही भाग, देण्याचा बाकी राहिला तर आणि तेव्हा, उक्त रक्कम, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याअन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधानुसार, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे अर्जदाराकडून वसूल करता येईल.

या गोष्टीच्या साक्षीदाखल महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने ……… चे जिल्हाधिकारी यांनी, यावर प्रारंभी वर नमूद केल्या दिवशी व वर्षी आपली सही करून आपल्या कार्यालयाचा शिक्का वठविला आहे व श्री. ………………… यांनी ………………… चे जिल्हाधिकारी यांनी, खालील व्यक्तींच्या समक्ष, सही-शिक्क्यानिशी स्वाधीन केला:—

१. …………………………

२. …………………………

उपरिनामित श्री. ………………………… 

कार्यालयीन शिक्का

यांनी, खालील व्यक्तींच्या समक्ष सही करून स्वाधीन केला.

१. …………………………

२. …………………………

टीप.—जागेचा नकाशा जोडावयाचा आहे.

---

## नमुना अठरा

(नियम ४९ पहा)

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, श्री. ………………… राहणार जिल्हा ……, …………… तालुका ……………, गाव …………… यास, …… पासून, प्रयोजनासाठी खालील अनुसूचीत वर्णन केलेली आणि …………… च्या हद्दीत असलेली जमीन, $\frac{\text{भोगाधिकार मूल्य}}{\text{हप्ता}}$ रु. ………… व ……………… पासूनचा वार्षिक $\frac{\text{जमीन महसूल}}{\text{खंड}}$ रु. ……………………………… दिल्यावर,

$\frac{\text{शाश्वत भोगवटयाच्या अधिकारासह}}{\text{……… वर्ष मुदतीपर्यंत पट्टयावर धारण करण्याच्या अधिकारासह}}$ देण्यात आली आहे.

हे अनुदान, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्याखालील नियम यांच्या उपबंधांस व उक्त $\frac{\text{भोगवटादार}}{\text{पट्टेदार}}$ याने याबाबतीत करून दिलेल्या करारात कबूल केलेल्या शर्तीस अधीन असेल.

---

*निश्चित करण्यात यावयाची आहे.

अनुसूची

| गाव | तालुका | जिल्हा | भूमापन क्र. व उप-विभाग क्र. किंवा खासरा क्र., सी. टी. एस. क्र. किंवा भूमिभाग क्रमांक | क्षेत्र | आकारणी किंवा खंड |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

दिनांक : सहसिलदार.

सहसिलदाराचा शिक्का

टीप.—हे प्रमाणपत्र दोन प्रतींत तयार करण्यात येईल. एक प्रत भोगवटादार/पट्टेदार यास देण्यात येईल व दुसरी प्रत प्रकरणाच्या अभिलेखाबरोबर फाईल करण्यात येईल.

## परिशिष्ट एक

[नियम २ (अ) पहा]

### विमुक्त जाती

| जात (१) | समानार्थक शब्द (२) |
| --- | --- |
| १. बेरड .. .. | (अ) बेदर,<br>(ब) नाईकवाडी,<br>(क) तलवार,<br>(ड) वाल्मिकी. |
| २. बेस्तर .. .. | संचलुवड्डार. |
| ३. भामटा .. .. | (अ) भामटी,<br>(ब) गिरणी वड्डार,<br>(क) कामटी,<br>(ड) पाथरूत,<br>(इ) टकारी,<br>(फ) उचले. |
| ४. कैकाडी .. .. | (अ) धोंटल,<br>(ब) कोर्वा,<br>(क) मुकावले किंवा कोंचिकोवा. |
| ५. कांजर भाट .. .. | (अ) छरा,<br>(ब) कांजर,<br>(क) नाट. |
| ६. बंजारा .. .. | (अ) गोअरबंजारा,<br>(ब) लांबाडा/लांबारा,<br>(क) लम्भाणी,<br>(ड) चरन बंजारा,<br>(इ) लभाण,<br>(फ) मथुरा लभाण,<br>(ग) कांचिकीवाले बंजारा,<br>(ह) लमाण बंजारा,<br>(आय) लमाण/लमाणी,<br>(ज) लबान,<br>(क) कोर्या किंवा जांगड,<br>(ल) ढाली/डालिआ,<br>(म) धाड/दारी, |

परिशिष्ट एक—चालू

| जात (१) | समानार्थक शब्द (२) |
|---|---|
| ६.—चालू. | (न) सिंगारी,<br>(ओ) नावी बंजारा,<br>(प) जोगी बंजारा,<br>(क्यू) शिमगावाले बंजारी,<br>(र) सिंगवाले बंजारी. |
| ७. फासे पारधी .. .. | पाल पारधी. |
| ८. राज पारधी .. .. | (अ) चिता पारधी,<br>(ब) गाव पारधी,<br>(क) हरण शिकारी,<br>(ड) टाकणकार. |
| ९. राजपुर भामटा .. .. | (अ) परदेशी भामटा,<br>(ब) परदेशी भामटी. |
| १०. रामोशी | |
| ११. वडार .. .. | (अ) गाडी वडार,<br>(ब) जाती वडार,<br>(क) माती वडार,<br>(ड) पाथरवट. |
| १२. वाघरी. | |

## परिशिष्ट दोन

[नियम २ (अ) पहा]

**भटक्या जमाती**

| जात (१) | समानार्थक शब्द (२) |
|---|---|
| १. बावा .. .. | बैरागी. |
| २. बेलदार .. .. | जुनी |

परिशिष्ट दोन—चालू

| जात (१) | समानार्थक शब्द (२) |
|---|---|
| ३. भराडी | (अ) बाल संतोषी,<br>(ब) किंग्रीवाले,<br>(क) नाथ बावा,<br>(ड) नाथ जोगी,<br>(इ) नाथ पंथी डावरी गोसावी. |
| ४. भूत | भोपे. |
| ५. चालवाडी | .......... |
| ६. चित्रकाथी | .......... |
| ७. गारुडी | .......... |
| ८. घिसाडी | (अ) घसाडी लोहार किंवा गडी लोहार किंवा चितोडी लोहार. |
| ९. गोल्ला. | |
| १०. गोंधळी. | |
| ११. गोपाल | (अ) गोपाल भोरपी. |
| १२. हेलवे. | |
| १३. जोशी | (अ) बुधुडकी,<br>(ब) डमरूवाले,<br>(क) कुडमुडे,<br>(ड) मेघांगी,<br>(इ) सरोदे. |
| १४. काशीकापडी. | |
| १५. कोल्हाटी | डोंबारी. |
| १६. मैराल | (अ) दान्गट,<br>(ब) वीर. |
| १७. मसणजोगी | सुदगडसिद्ध. |
| १८. नांदीवाले | तिरमल. |
| १९. पांगुळ. | |
| २०. रावल | (अ) रावल किंवा रावलयोगी. |
| २१. सिक्कलगार | कातारी. |
| २२. ठक्कर (फक्त रत्नागिरी जिल्ह्यात). | |
| २३. वैदू | झिंगा भोइ. |
| २४. वासुदेव. | |

## परिशिष्ट तीन

[नियम २ (अ) पहा]

### महाराष्ट्रातील इतर अनुसूचित जातींची यादी

१. आगरी, आगळे किंवा काळण.
२. अलीतकार.
३. बागडी.
४. बहुरूपी.
५. बजानीया.
६. बंडी.
७. बारी किंवा बारई.
८. बेरीया.
९. बासीगर.
१०. बेदर.
११. बडीआ.
१२. बेसदेवा.
१३. भडभुंजा.
१४. भवंया किंवा तारगल.
१५. भांड.
१६. भांटा.
१७. भाट, भट्ट.
१८. भाविण.
१९. भावसार.
२०. भीलाला.
२१. भिस्ती किंवा पखाली.
२२. भोई (परदेशी आणि राजभोई यासह).
२३. बुरूड.
२४. बुट्टाल.
२५. चांदलगडा.
२६. चमथा.
२७. चरण किंवा गढवी.
२८. चारोडी.
२९. चिप्पा.
३०. दाबगर.
३१. दास किंवा दांगडीदास.
३२. दवरी, डवरी.
३३. देपला.
३४. देवळी.
३५. देवांग.
३६. देवदिग.
३७. धनगर.
३८. धीमर.
३९. ढीवर किंवा ढेबरा.
४०. ढोली.
४१. डोंबारी.
४२. फुटगुडी.
४३. गदारिया.
४४. गढवी.
४५. गद्दी.
४६. गंधारप.
४७. गारपगारी.
४८. गवंडी.
४९. गवळी.
५०. घोसी.
५१. गोचाकी.
५२. गुजरात बोरी.
५३. गुरव.
५४. हलेपैकी.
५५. हटकर.
५६. हिलव.
५७. जाडी.
५८. जगीयासी.
५९. जजाक.
६०. जंगम.
६१. जनिया.
६२. जातिगर.
६३. जव्हेरी.
६४. जिनगर.
६५. जोगी.
६६. जोगिण.
६७. जोहारी.
६८. जुलाहा.
६९. कवेरा.
७०. कादेरा.
७१. कहार.
७२. कामाटी.
७३. कम्मी.
७४. कापडी.
७५. कासार.
७६. कची.
७७. काठी.
७८. कट्टी.
७९. केवट.
८०. खंगार.
८१. खारवा किंवा खारवे.
८२. खाटी.

परिशिष्ट तीन—चालू

८३. खाटीक.
८४. खेलकरी.
८५. कोळी.
८६. कोळीमल्हार.
८७. कोळी सूर्यवंशी.
८८. कोंगाडी.
८९. कोरबार.
९०. कोरी.
९१. कोष्टी.
९२. कोसकाती देवांग.
९३. कुचुबंध.
९४. कुछारिया.
९५. कुणबी.
९६. कुंभार, कुमार.
९७. कुरह्वीन शेटटी.
९८. कुरमार
९९. लाभा.
१००. लडाफ, लड्डाफ.
१०१. लडीया, लढीया.
१०२. लखेरिया.
१०३. लोहार.
१०४. लोणारी.
१०५. माच्ची
१०६. महली.
१०७. माळी.
१०८. मानभाव.
१०९. मांगेला.
११०. मपन जोगी.
१११. मारवार बोरी.
११२. मथुरा.
११३. मे.
११४. मदेर.
११५. म्हाली.
११६. मिना.
११७. मिठा.
११८. नामधारी.
११९. नामधारी पैक.
१२०. नावी, न्हावी.
१२१. नवकाशी.
१२२. नकार जाडा.
१२३. नेथुरा.
१२४. निलगार, निली, निराळी.
१२५. नीली.
१२६. नीलकांती.
१२७. निरशिकारी.
१२८. नोनीया.
१२९. पडीयार.
१३०. पधारिया.
१३१. पांचाळ.
१३२. पांका.
१३३. परीट किंवा धोबी.
१३४. परवाली.
१३५. पात्रदावरू.
१३६. पाटकर.
१३७. पेर्की.
१३८. फांसेचरी.
१३९. फुंडगी.
१४०. फुलारी.
१४१. पिंजारा.
१४२. पुतलीगर.
१४३. राचेवर.
१४४. रचबंधिया.
१४५. राइकरी.
१४६. रंगारी.
१४७. रंग्रेझ.
१४८. रंग्रेझ (भावसार रंगारी),
१४९. राओत, रावत, राऊतीआ.
१५०. सहदेव जोशी.
१५१. साहिस, साईस, शिस.
१५२. सलात.
१५३. सलातवाघरी.
१५४. साळी, पद्मशाली.
१५५. सणगर.
१५६. संजोगी.
१५७. सपेरा, नाथ.
१५८. सरनिया.
१५९. सरोडा.
१६०. सरवदे.
१६१. शिकारी.
१६२. शिलावट.
१६३. शिंपी.
१६४. शिंगीवाला.
१६५. सोनार.
१६६. सुप्पालिग.
१६७. सुतार.
१६८. सुथारिया (सिंघकडचे).
१६९. स्वकुल साळी.
१७०. तलवार कानडे.
१७१. तांबट.
१७२. तांडेल.

परिशिष्ट तीन—समाप्त.

१७३. तारगला.
१७४. तेली.
१७५. ठाकर.
१७६. थेटवार.
१७७. थोगटी.
१७८. थोरीया.
१७९. वेती.
१८०. वंजार, वंजारा, वंजारी.
१८१. वढाई सुतार.
१८२. वडी.
१८३. वंसफोड.
१८४. वर्ठी.
१८५. येरकुला.
१८६. रघवी.
१८७. भंडारी.

किंमत व जमीन महसूल कसा मोजावा.

५२ (१) कलमे ५० व ५१ च्या प्रयोजनासाठी ज्या जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले असेल त्या जमिनीची किंमत जिल्हाधिकाऱ्याने अशा मूल्यांकनाच्या वेळी शेजारच्या तशाच प्रकारच्या जमिनीची जी बाजार किंमत असेल त्या किंमतीनुसार ठरविली पाहिजे ; आणि अशा जमिनीचा वार्षिक महसूल, आसपासच्या तशाच प्रकारच्या जमिनीचा महसूल ज्या दराने आकारण्यात येतो त्याच दराने आकारण्यात येईल.

(२) अतिक्रमण केलेल्या जमिनीच्या बाबतीत द्यावयाची जमिनीची किंमत आणि जमीन महसुलाची किंवा आकारणीची रक्कम याबाबतीतील जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय निर्णायक असेल आणि जमीन महसुलाची रक्कम ठरविताना, वर्षाच्या कोणत्याही भागासाठी जमिनीचा भोगवटा केला असेल तर अशी मुदत संपूर्ण वर्ष असल्याप्रमाणे मोजण्यात येईल.

सरकारमध्ये निहित असलेल्या जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करणाऱ्या इसमास संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून लावणे.

५३. (१) जिल्हाधिकाऱ्याच्या मते, एखादा इसम सरकारमध्ये निहित असलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा किनाऱ्यावरील प्रदेशाचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असेल किंवा ती जमीन किंवा तो प्रदेश हा अवैधरीत्या त्याच्या ताब्यात असेल किंवा पट्ट्याची किंवा कुळवहिवाटीची मुदत संपल्याच्या किंवा पट्टा किंवा कुळवहिवाट समाप्त केल्याच्या किंवा सत्ता प्रकारासंबंधी घालण्यात आलेल्या शर्तीचे उल्लंघन केल्याच्या कारणांवरून अशा जमिनीचा किंवा किनाऱ्यावरील प्रदेशाचा उपयोग, भोगवटा किंवा कबजा करण्याचे चालू ठेवण्याचा ज्यास हक्क नसेल किंवा चालू ठेवण्याचा हक्क असण्याचे बंद झाले असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने अशा इसमाविरुद्ध [1][पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने] [2][संक्षिप्त-रीत्या] चौकशी करून त्यास काढून लावणे हे विधिसंमत असेल.

[3][ (१) (अ) अशा व्यक्तीला काढून लावण्यापूर्वी जिल्हाधिकारी उक्त व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि आवश्यक वाटल्यास, तो संक्षिप्त चौकशी करील. पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जिल्हाधिकारी त्याने काढलेल्या निष्कर्षासंबंधीची आपली कारणे संक्षिप्त-रीत्या नमूद करील.

(२) [4][जिल्हाधिकाऱ्याने, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे आपल्या निष्कर्षाच्या आधारे,] अशा इसमावर, त्यास नोटीस मिळाल्यानंतर वाजवी मुदतीत, यथास्थिति जमीन किंवा किनाऱ्यालगतचा प्रदेश रिकामा करण्यास फर्माविणारी नोटीस बजाविली पाहिजे आणि अशा नोटीशीचे पालन करण्यात न आल्यास, जिल्हाधिकाऱ्यास, अशा जमिनीवरून किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावरून अशा इसमास काढून लावता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणांच्या आधारे एखाद्या इसमाचा, (उपरोक्तप्रमाणे) उपयोग, भोगवटा किंवा कबजा चालू ठेवण्याचा हक्क असण्याचे बंद झाल्यानंतर जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असलेल्या किंवा ती जमीन अवैधरीत्या ताब्यात असलेल्या इसमाला,

१. "पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने" हा मजकूर सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ३६ याचे कलम ३ (अ) अन्वये वगळण्यात आला.

२. "संक्षिप्तरीत्या" हा शब्द सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, ३६ याचे कलम ३ (अ) अन्वये वगळण्यात आला.

३. हे पोट-कलम वरील अधिनियमाचे कलम ३ (ब) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

४. हा मजकूर "जिल्हाधिकाऱ्याने" या शब्दाऐवजी सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ याचे कलम ३ (क) अन्वये समाविष्ट करण्यात आला. (परिशिष्ट ४४ पहा).

(जमिनीच्या) अशा अनधिकृत उपयोगाच्या किंवा भोगवटयाच्या कालावधीकरिता, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वविवेकानुसार, अशा जमिनीच्या कर आकारणीच्या किंवा भाडयाच्या दुप्पटीपेक्षा अधिक न होईल इतकी रक्कम भरावी लागेल.

५४. (१) कलम ५३ अन्वये संक्षिप्त रीतीने काम चालवून कोणत्याही इसमास काढून टाकल्यानंतर, अशा जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर उभारलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम किंवा उक्त जमिनीत काढलेले कोणतेही पीक, जिल्हाधिकाऱ्यास वाजवी वाटेल अशा लेखी नोटिशीनंतर, अशा इसमाने काढून नेले नसेल तर, ते सरकारजमा केले जाण्यास किंवा संक्षिप्त रीतीने काम चालवून काढून नेले जाण्यास पात्र होईल. संक्षिप्तरीत्या काम चालवून दोषी ठरविण्यात आल्यानंतर मालमत्ता सरकारजमा करणे आणि ती काढून टाकणे.

(२) हया कलमान्वये सरकारजमा करण्याबाबतचा न्यायनिर्णय जिल्हाधिकाऱ्याने दिला पाहिजे आणि अशा प्रकारे सरकारजमा केलेल्या कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट जिल्हाधिकारी निदेश देईल त्या रीतीने लावली पाहिजे, आणि हया कलमान्वये कोणतीही मालमत्ता काढून नेण्यासाठी आलेला खर्च, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

[१][५४-अ. (अ) कलम ५३ अन्वये कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही जमिनीवरून किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशातून बेदखल करण्यात आले असेल ; अनुज्ञप्ती समाप्त करण्यासाठी आणि कोणत्याही जमिनीवरील किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशातील जो कोणतीही इमारत किंवा बांधकाम जप्त केले असेल ती इमारत किंवा बांधकाम पाडून टाकण्यासाठी आणि बेदखलीनंतर जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर पुन्हा प्रवेश करणाऱ्या किंवा राहणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्यासाठी तात्पुरत्या अतिरिक्त शक्ती.

(ब) कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशात उभारलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम कलम ५४ अन्वये जप्त करण्यात आले असेल ;

(क) जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर अनधिकृतपणे प्रवेश केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जमिनीसाठी किंवा तिच्यावरील बांधकामासाठी किंवा दोन्हीसाठी अनुज्ञप्ती फी दिल्यावर नंतर राहण्यास परवानगी देण्यात आली असेल,--

त्याबाबतीत, अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध किंवा उपरोक्तप्रमाणे अनुज्ञप्ती दिलेल्या बांधकामाच्या संबंधात करता येईल अशा कोणत्याही इतर कार्यवाहीस हानी न पोचवता--

(१) जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून प्राधिकृत करण्यात येईल असा शासनाचा कोणताही अधिकारी, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत किंवा कोणत्याही करारात किंवा करारनाम्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही वेळी आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, अशा कोणत्याही व्यक्तीस देण्यात आलेली अनुज्ञप्ती किंवा परवानगी (कोणतीही असल्यास) ताबडतोब समाप्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल ;

(२) जिल्हाधिकारी, २४ तासांपेक्षा कमी कालावधीची नसेल अशा लेखी नोटिशीद्वारे, जप्त केलेल्या बांधकामाचा त्यावेळी ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जप्त केलेली इमारत किंवा इतर बांधकाम का पाडण्यात येऊ नये किंवा काढून टाकण्यात येऊ नये याबद्दल, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी व वेळी किंवा तत्पूर्वी, पुरेसे कारण दाखविण्यास फर्मावू शकेल ; आणि जर अशी व्यक्ती, विनिर्दिष्ट दिवशी व वेळी किंवा तत्पूर्वी, जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल असे कारण दाखविण्यास कसूर करील तर, जिल्हाधिकाऱ्यास यथास्थिति अशी इमारत किंवा असे बांधकाम पाडून टाकता येईल किंवा काढून टाकता येईल ; आणि

(३) कोणत्याही व्यक्तीने (बेदखल केलेली व्यक्ती धरून) जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व-परवानगीशिवाय, अशा कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर प्रवेश करता कामा नये, त्यावर किंवा त्यात असता कामा नये किंवा त्यावरून जाता कामा नये ; आणि जर कोणतीही व्यक्ती या कलमाचे उल्लंघन करून जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर प्रवेश करील किंवा त्यावर किंवा त्यात राहील किंवा तिच्यावरून जाईल तर, त्या व्यक्तीस जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून तेथून काढून टाकता येईल आणि जिल्हाधिकाऱ्यास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास त्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल असे सर्व सहाय्य घेता येईल.]

---

१. हे कलम महाराष्ट्र जमीन महसूल (तात्पुरती सुधारणा) अधिनियम, १९७० (सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम वीस) याचे कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आले. हा अधिनियम २७ फेब्रुवारी १९७० रोजी अंमलात आला व तो तीन वर्षाच्या कालावधीसाठी अंमलात राहील व नंतर त्याची मुदत संपेल. (परिशिष्ट ४१ पहा).

## जमीनी सोडून देण्यासंबंधी

जमीन सोडून देणे.

५५. खातेदारास, सरकार किंवा खातेदार यांच्याखेरीज कोणत्याही इसमाच्या नावे वैधरीत्या जे कोणतेही हक्क, सत्ता प्रकार, भार किंवा न्याय अधिकार अस्तित्वात असतील त्यांना अधीन राहून कृषी वर्षाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी, तीस दिवसांहून कमी नसेल इतक्या मुदतीत, तहसीलदारास लेखी नोटीस देऊन त्याची जमीन सोडून देण्याचा, म्हणजे ती राज्य सरकारच्या नावे करून देण्याचा अधिकार आहे व त्यानंतर अशा तारखेनंतर येणाऱ्या कृषी वर्षापासून तो खातेदार म्हणून असण्याचे बंद होईल :

परंतु, ज्या जमिनीच्या भागाचे क्षेत्र संपूर्ण भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागापेक्षा कमी आहे, तो भाग सोडून देता येणार नाही.

दुमाला जमीन सोडून देणे.

५६. कलम ३५ आणि कलम ५५ चे उपबंध हे शक्य असेल तेथवर दुमाला जमिनीच्या धारकांना लागू असतील.

सोडून दिलेल्या जमिनीत जाण्याचा हक्क.

५७. कोणताही इसम जी जमीन सोडून देईल त्या जमिनीत जाण्याचा मार्ग, त्याच्या ताब्यात असलेल्या इतर जमिनीतून जात असेल तर, अशा ताब्यात असलेल्या जमिनीतून जाण्याचा हक्क सोडून दिलेल्या जमिनीच्या भावी धारकाकडे, चालू राहील.

विवक्षित प्रकरणात कलम ५५ च्या अंमलाचा बचाव.

५८. कलम ५५ मधील कोणत्याही मजकुरामुळे, ज्या कोणत्याही पट्टयाने किंवा इतर स्पष्ट लेखा-अन्वये राज्य सरकारकडून जमीन धारण केली असेल किंवा यापुढे धारण करण्यात येईल त्या पट्टयाच्या किंवा इतर लेखांच्या अटींच्या किंवा शर्तीच्या वैधतेस बाध येणार नाही.

अनधिकृतपणे जमिनीचा भोगवटा करणाऱ्या इसमास संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकणे.

५९. जो कोणताही इसम—

(अ) कोणत्याही जमिनीचा उपयोग किंवा भोगवटा करण्याचा, त्यास ह्या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये हक्क नसतानाही किंवा असा हक्क असण्याचे बंद झाले असतानाही, किंवा

(ब) कलम ३६, पोट-कलम (२) अन्वये आगाऊ परवानगी घेतल्यावाचून किंवा कलम ३१, ३७ किंवा ४४ च्या उपबंधांन्वये जी कोणतीही शर्त, सत्ताप्रकारास वैधरीत्या लागू असेल तर तिच्या आधारे जमिनीचे हस्तांतरण करणे योग्य नसतानाही ;

अशा कोणत्याही जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असेल किंवा ती अवैधरीत्या कब्जात ठेवीत असेल तर त्यास, संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकण्याचा जिल्हाधिकाऱ्यास अधिकार आहे.

कलम ५५ ची अंमलबजावणी तहकूब करण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

६०. (१) राज्य सरकारने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी,—

(अ) कलम ५५ ची अंमलबजावणी, कोणत्याही विहित केलेल्या स्थानिक हद्दीत, सामान्यपणे किंवा जमीन कसणाऱ्याच्या किंवा विशिष्ट वर्गाच्या किंवा वर्गाच्या खातेदारांच्या बाबतीत, तहकूब ठेवणे, आणि

(ब) अशी कोणतीही अधिसूचना रद्द करणे,

हे विधिसंमत असेल.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये जी कोणतीही अधिसूचना, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात अंमलात असेल त्या मुदतीत, ज्या उपबंधांची अंमलबजावणी तहकूब केली असेल त्या उपबंधांऐवजी, आयुक्त वेळोवेळी निदेश देईल असे आदेश अंमलात असतील.

## विवक्षित भोगाधिकाराचे न्यायालयीन कार्यवाहीपासून संरक्षण

भोगाधिकार हा दिवाणी न्यायालयाच्या आदेशिकेस केव्हा पात्र नसेल.

६१. जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीवाचून भोगाधिकार हा हस्तांतरणयोग्य नसेल आणि दिवाणी न्यायालयाने केलेल्या किंवा करण्याबद्दल आदेश दिलेल्या किंवा न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश ज्यावर आधारित असेल अशा हस्तांतरणास अशी मंजुरी देण्यात आली नसेल अशा कोणत्याही बाबतीत :—

(अ) असा भोगाधिकार कोणत्याही न्यायालयाच्या कार्यवाहीस पात्र असता कामा नये आणि असे हस्तांतरण रद्द आणि निरर्थक होईल, आणि

न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अंमलात आणणे.

(ब) असा कोणताही भोगाधिकार जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीवाचून हस्तांतरणयोग्य असणार नाही आणि अशी मंजुरी देण्यात आलेली नाही अशा अर्थाचे प्रमाणपत्र जिल्हाधिकाऱ्याच्या सही शिक्क्यानिशी मिळाल्यानंतर, अशा भोगाधिकारावरील कोणतीही जप्ती किंवा इतर कार्यवाही काढून टाकली पाहिजे किंवा त्यासंबंधीची कोणतीही विक्री रद्द केली पाहिजे.

जप्ती किंवा विक्री यास मनाई.

६२. मध्यप्रदेश (दौलती, महाल, दुमाला जमिनी) स्वामित्वाधिकार नष्ट करण्याबाबत अधिनियम, १९५० या अन्वये निहित होण्याच्या तारखेपूर्वी शीर म्हणून नोंदली गेली होती अशी कोणतीही शीर जमीन, त्या निहित होण्याच्या तारखेपूर्वी काढलेल्या कोणत्याही कर्जाच्या वसुलीसाठी, जर अशा या कर्जासाठी या शीर जमिनीतील लागवडीचे हक्क वैधपणे गहाण ठेवून किंवा त्यावर भार निर्माण करून ते तारण दिलेले नसतील तर न्यायालयाच्या हुकुमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीत जप्त होण्यास किंवा विकली जाण्यास पात्र राहणार नाही.

भूमिधारीचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट करण्यास, तो जप्त करण्यास, किंवा त्याची विक्री करण्यास मनाई.

६३. भूमिधाऱ्याच्या जमिनीतील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी त्याने धारण केलेल्या कोणत्याही हक्काच्या विक्रीसाठी किंवा त्याचा गहाण सोडविण्याचा हक्क नष्ट करण्यासाठी मध्यप्रदेश जमीन महसूल अधिनियम, १९५४ च्या उपबंधांनुसार भूमिधारी सत्ताप्रकारातील कोणताही हुकुमनामा किंवा आदेश देता येणार नाही, किंवा असा हक्क कोणत्याही हुकुमनाम्याच्या किंवा आदेशाच्या बजावणीत जप्त करता येणार नाही किंवा विकता येणार नाही किंवा दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ च्या कलम ५१ अन्वये अशा धारण केलेल्या जमिनीची व्यवस्था करण्याकरिता प्रापक नेमता येणार नाही किंवा असा हक्क प्रांतिक नादारी अधिनियम, १९२० अन्वये न्यायालयात किंवा प्रापकाकडे निहित होणार नाही.

## प्रकरण ४

## जमीन महसुलासंबंधी

विशेषरीत्या माफी दिली असेल त्या-व्यतिरिक्त सर्व जमिनी जमीन महसूल देण्यास पात्र असणे.

**६४.** सर्व जमीन, मग ती शेतीच्या कामासाठी वापरलेली असो किंवा इतर कारणांसाठी वापरलेली असो, आणि कोठेही असो, या अधिनियमान्वये किंवा तदनुसार तरतूद केल्याप्रमाणे राज्य सरकारास जमीन महसूल देण्यास पात्र असेल, परंतु राज्य सरकारशी केलेल्या कोणत्याही विशेष कराराच्या उपबंधान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा राज्य सरकारच्या खास अनुदानानुसार संपूर्ण माफी मिळालेल्या जमिनी जमीन महसूल देण्यास पात्र असणार नाहीत :

परंतु, जमिनी कोणत्याही हक्काने धारण केलेल्या असल्या तरी त्या सर्व जमिनींवर जेव्हा जेव्हा आणि जोपर्यंत राज्याच्या निकडीनुसार जमीन महसुलाची आकारणी करणे आवश्यक असेल तेव्हा तेव्हा आणि तोपर्यंत महसूल आकारण्यात यावा असा निदेश देण्याच्या राज्य विधानमंडळाच्या अधिकारास ह्या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे बाध येतो असे समजता कामा नये.

मळईच्या जमिनी जमीन महसुलास पात्र असणे.

**६५.** त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये, दुमाला जमिनीच्या कोणत्याही धारकाकडे निहित असलेल्या मळईच्या सर्व जमिनी, नवीन बनलेली बेटे किंवा नद्यांचे सुटून राहिलेले तळ हे दुमाला जमिनीच्या कोणत्याही धारकाकडे निहित असतील तर, जमीन महसूल देण्याच्या योग्यतेसंबंधांत, त्या सर्व मळईच्या जमिनी, बेटे किंवा नद्यांचे तळ हे ज्या मूळ जमिनीअन्वये तिच्या धारकास प्राप्त होतील, त्या मूळच्या धारण केलेल्या जमिनीस जे विशेष हक्क किंवा शर्ती किंवा अटी लागू असतील ते अधिकार किंवा शर्ती किंवा अटी यांस त्या मळईच्या जमिनी, नवीन झालेली बेटे किंवा नद्यांचे सुटून राहिलेले तळ पात्र असतील परंतु उक्त प्रकारच्या कोणत्याही मळईच्या जमिनीचे, बेटांचे किंवा नद्यांच्या तळांचे क्षेत्रफळ एक एकराहून अधिक होईपर्यंत किंवा अधिक नसेल तर, आणि तसेच उक्त मूळच्या धारण केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळाच्या एक-दशांशाहून अधिक होईपर्यंत किंवा अधिक नसेल तर, अशा कोणत्याही जमिनी, बेटे किंवा नद्यांचे तळ याबाबत कोणताही जमीन महसूल आकारता कामा नये.

पाण्याने जमीन वाहून गेली असेल तर जमीन महसुलाची आकारणी.

**६६.** जो इसम त्याने धारण केलेल्या जमिनीबाबत महसूल देत असेल अशा प्रत्येक धारण करणारास, अर्ध्या एकराहून कमी नाही असा त्या जमिनीचा कोणताही भाग पाण्याने धुवून गेला असेल तर, राज्य सरकार-कडून ह्या बाबतीत करण्यात येतील अशा नियमांस[38] अधीन राहून, अशा जमिनीच्या बाबतीत आकारणी कमी करण्याचा हक्क असेल आणि जमीनधारक हा, त्याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांस अधीन राहून, पाण्याने धुऊन गेलेली, अर्ध्या एकराहून कमी नसेल अशी जमीन पूर्ववत आल्यानंतर जमीन महसूल देण्यास पात्र ठरेल.

टी.प ३८.—कृपया कलम ३२ खालील टीप २५ पहा. (नियम ५ पहा).

आकारणीची रीत आणि आकारणीतील फेरफार.

**६७.** (१) ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये कोणत्याही जमिनीवर आकारण्याजोगा महसूल, त्या जमिनीचा उपयोग—

(अ) शेतीच्या कारणासाठी ;

(ब) राहण्याच्या कारणासाठी ;

(क) उद्योगधंद्याच्या कारणासाठी ;

(ड) व्यापाराच्या कारणासाठी ;

(इ) कोणत्याही इतर कारणासाठी ;

करण्यात येईल त्याप्रमाणे यथास्थिति, आकारण्यात येईल किंवा आकारण्यात आला आहे असे समजले पाहिजे.

(२) जेव्हा शेतीच्या कारणासाठी आकारणी केलेल्या जमिनीचा अकृषिक कारणासाठी किंवा त्याच्या उलट उपयोग करण्यात येत असेल किंवा एखाद्या अकृषिक कारणासाठी उपयोग करण्यासाठी तिच्यावर आकारणी केली असताना तिचा इतर अकृषिक कारणासाठी उपयोग करण्यात येत असेल तेव्हा अशा जमिनी-

धर ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये ठरविलेली आकारणी ही अशी आकारणी ज्या मुदतीकरिता ठरविण्यात आली असेल अशी मुदत संपलेली नसली तरीही, फेरफार केला जाण्यास पात्र असेल आणि ज्या कारणासाठी त्या जमिनीचा उपयोग करण्यात आला असेल किंवा उपयोग करण्यास परवानगी देण्यात आली असेल त्यानुसार या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या दराने आकारणी केली जाण्यास पात्र असेल.

(३) जेव्हा जमीन कोणत्याही एका कारणासाठी उपयोग करण्याच्या शर्तीवर महसूल माफीने धारण केलेली असेल तेव्हा त्या जमिनीचा कोणत्याही वेळी इतर कोणत्याही कारणासाठी उपयोग करण्यात येईल तेव्हा, ती जमीन आकारणीस पात्र असेल.

(४) पोट-कलम (२) आणि (३) खालील आकारणी ही, ह्याबाबत केलेल्या नियमानुसार करण्यात आली पाहिजे.

टीप ३९.—कृपया कलम ११७ खालील टीप ५६ पहा. (नियम १२ पहा).

६८. (१) जमीन महसूल देण्याची पूर्ण माफी न मिळालेल्या आणि या अधिनियमाच्या उपबंधान्वये आकारणी ज्या जमिनीवर ठरविण्यात आलेली नसेल किंवा ठरविण्यात आल्याचे समजण्यात आले नसेल अशा सर्व जमिनीबद्दल जमीन महसूल म्हणून द्यावयाच्या आकारणीची रक्कम, ह्याबाबत केलेल्या नियमास[४०] अधीन राहून, जी मुदत विहित करण्याचा जिल्हाधिकाऱ्यास राज्य शासनाने त्याबाबतीत केलेल्या आपल्या सामान्य किंवा विशेष आदेशान्वये प्राधिकार दिलेला असेल तितक्या परंतु नव्याण्णव वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या मुदतीकरिता, जिल्हाधिकाऱ्याने ठरविला पाहिजे, आणि अशा आकारणीनुसार येणे असलेल्या रकमा अशा सर्व जमिनींवर आकारल्या पाहिजेत:

आकारणी कोणी ठरवावी.

परंतु, जमीन महसुलाची अंशतः माफी असणाऱ्या, किंवा ज्यांची जमीन महसूल देण्याची पात्रता विशेष शर्तीस किंवा निर्बंधास अधीन असेल त्या जमिनीच्या बाबतीत, आकारणी ठरविताना आणि महसूल वसूल करताना वैधरीत्या विद्यमान असणाऱ्या सर्व हक्कांकडे, उक्त हक्काच्या स्वरूपानुसार, लक्ष दिले पाहिजे:

तसेच, जमीन महसूल देण्याची संपूर्णतः किंवा अंशतः माफी असलेली कोणतीही जमीन ही जमीन महसुलाच्या माफीची जमीन म्हणून असण्याचे बंद होईल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने, अशी जमीन माफीची म्हणून असण्याचे बंद होईल त्या तारखेपासून किंवा त्यास योग्य वाटेल अशा त्यानंतरच्या कोणत्याही तारखेपासून अशा जमिनीवर, जमीन महसूल म्हणून द्यावयाच्या रकमेची आकारणी ठरविणे हे विधिसंमत असेल.

(२) कोणत्याही जमिनीची पोट-कलम (१) अन्वये ठरविलेली आकारणीची मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, राज्य सरकारने ह्याबाबत केलेल्या नियमांनुसार तिची वेळोवेळी फेरतपासणी करण्याचा अधिकार आहे. अशा रीतीने फेरतपासणी केलेली आकारणी ही प्रत्येक वेळी, राज्य सरकार सामान्य किंवा विशेष आदेशान्वये निर्दिष्ट करील अशा नव्याण्णव वर्षांपेक्षा जास्त नसलेल्या मुदतीकरिता ठरविण्यात आली पाहिजे.

(३) जमीन महसूल देण्याची पूर्ण माफी असलेल्या जमिनीवर, अशी पूर्ण आकारणी निश्चित करण्यास आणि तिची नोंदणी करण्यास, जिल्हाधिकाऱ्यास, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे प्रतिबंध होतो असे समजता कामा नये. अशा रीतीने ठरविलेली आणि नोंदलेली आकारणी ही माफी काढून घेण्यात आल्यानंतर लगेच बसविण्यात येईल आणि या प्रयोजनासाठी ह्या कलमाअन्वये ती निश्चित करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

टीप ४०.—कृपया कलम १०२ खालील टीप ५३ पहा. (नियम १४ पहा). तसेच कलम ११७ खालील टीप ५६ पहा. (नियम २१ पहा).

६९. जमिनीच्या प्रत्येक भागाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या जमीन महसुलाच्या आकारणी-बाबतची तडजोड, जो इसम राज्य सरकारास महसूल देण्यास प्रथमतः जबाबदार असेल त्या इसमाशी केली पाहिजे.

धारकाबरोबर करावयाची आकारणी संबंधीची तडजोड प्रत्यक्ष राज्य सरकारतर्फे करण.

पाण्याच्या वापरा-संबंधी दर.

७०. राज्य सरकारास, ज्या पाण्यावरील हक्क सरकारकडे निहित असेल त्या पाण्याचा आणि ज्याबाबत राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या पाटबंधाऱ्यासंबंधीच्या कोणत्याही विधी अन्वये दर आकारता येत नसेल अशा पाण्याचा उपयोग भूमिधारकांनी आणि इतर इसमांनी करण्याबद्दल जे दर त्यास वेळोवेळी संमत करणे योग्य वाटतील असे दर ठरविण्यास जिल्हाधिकाऱ्यास, किंवा भू-मापन प्रभारी अधिकाऱ्यास किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर अधिकाऱ्यास प्राधिकृत" करता येईल. अशा दरात, राज्य सरकार वेळोवेळी ठरवील अशा मुदती-मुदतींनी फरफार करता येतील आणि ते जमीन महसूल म्हणून वसूल करता येतील :

परंतु, कृषिक प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या पाण्याचा दर प्रत्येक धारकामागे दर वर्षास फक्त एक रुपया असेल.

टीप ४१.—पाणी वापरण्यासाठी घ्यावयाच्या परवानगीसंबंधीचे नियम.

[शासकीय अधिसूचना क्र. यू.एन.एफ.-१६६७(बी)आर., दि. १५ मार्च १९६९.]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमास महाराष्ट्र जमीन महसूल (पाणी वापरण्यासाठी परवानगी) नियम, १९६९ असे म्हणता येईल.

### अ. जलसिंचनाच्या प्रयोजनासाठी पाण्याचा वापर

२. **पाणी वापरण्याच्या परवानगीकरिता अर्ज**—(एक) महसूल अधिनियमाच्या उपबंधान्वये अशा पाण्यापासून उपार्जित होणाऱ्या फायद्यासाठी जमिनीवर आकारणी करण्यात आली असेल त्याखेरीज,

(दोन) बुडकी किंवा पम्पींग संयंत्र किंवा इतर कोणत्याही यंत्राच्या सहाय्याने जलसिंचन होत असल्यामुळे जमीन विद्यमान "नाला चाड" च्या अधिन असेल त्याखेरीज,

(तीन) राज्यात अमलात असणाऱ्या जलसिंचनाशी संबंधित कोणत्याही विधिअन्वये, जमिनीला पाणीपुरवठा करण्याकरिता पाणीपट्टी आकारण्यात येत असेल,

त्याखेरीज नियम ३ च्या उपबंधांना अधीन राहून कोणतीही व्यक्ती नायब-तहसिलदारापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा महसूल अधिकाऱ्याची पूर्व-परवानगी घेतल्याशिवाय (अशी परवानगी त्याबाबतीत अर्ज केल्यानंतर मिळेल) जलसिंचनाच्या प्रयोजनासाठी, ज्याचे अधिकार शासनाकडे निहित केलेले आहेत अशा कोणत्याही पाण्याचा वापर करणार नाही.

३. **परवानगी देण्याची पद्धती.**—नियम २ अन्वये अर्ज मिळाल्यावर महसूल अधिकारी—

(अ) तो मिळाल्याची लेखी पोच अर्जदाराला पाठवील, आणि

(ब) योग्य ती चौकशी केल्यानंतर आणि असे पाणी वापरण्यास पूर्वीच परवानगी दिलेल्या सर्व व्यक्तींचे हितसंबंध विचारात घेतल्यानंतर मागितलेली परवानगी मंजूर करील किंवा कारणे नमूद करून परवानगी नाकारील :

परंतु, महसूल अधिकारी, अर्ज मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या मुदतीत अर्जदाराला त्याच्या निर्णयाबाबत कळविण्यास कसूर करील तर मागितलेली परवानगी मंजूर करण्यात आल्याचे मानण्यात येईल :

आणखी असे की, अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज परवानगी नाकारण्यात येणार नाही.

४. **पाण्याच्या वापराकरिता पाणीपट्टी.**—पाण्याच्या वापराकरिता परवानगी देण्यात येईल किंवा नियम ३ अन्वये देण्यात आल्याचे मानण्यात येईल तेव्हा अशी परवानगी महसूल अधिनियमाच्या कलम ७० च्या परंतुकात तरतूद केल्याप्रमाणे पाणीपट्टी देण्याच्या अधीन असेल.

### ब. कृषीतर प्रयोजनासाठी पाण्याचा वापर

५. **कृषीतर प्रयोजनासाठी पाण्याचा वापर करण्याकरिता अर्ज.**—ज्या पाण्याचे अधिकार शासनाकडे निहित आहेत अशा पाण्याच्या कोणत्याही कृषीतर प्रयोजनासाठी करावयाच्या वापराकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात येईल. अशा अर्जात ज्या विवक्षित कृषीतर प्रयोजनासाठी पाणी वापरण्यात येणार असेल ते प्रयोजन पाण्याचे परिमाण आणि ज्या कालावधीत पाणी आवश्यक असेल तो कालावधी ज्या शासकीय पाण्याच्या उगमस्थानापासून पाणी घेण्यात येणार असेल ते स्थान आणि जिल्हाधिकाऱ्याला अर्जाचा विचार करण्यासाठी आवश्यक असेल असा इतर तपशील स्पष्टपणे दिलेला असेल.

६. **जिल्हाधिकाऱ्याने अर्जावर निर्णय देणे.**—अर्ज मिळाल्यावर जिल्हाधिकारी योग्य ती चौकशी करून आणि तशा तऱ्हेने कृषीतर प्रयोजनासाठी पाणी वापरण्यास पूर्वीच परवानगी दिलेल्या सर्व व्यक्तीचे हित-संबंध विचारात घेतल्यानंतर, अधिनियमाच्या कलम ७० अन्वये वेळोवेळी शासनाने मंजूर केलेल्या दराने पाणीपट्टी देण्यास अधीन, परवानगी देईल किंवा स्वतःची कारणे नोंदून परवानगी नाकारील :

परंतु, अर्जदाराला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज परवानगी नाकारण्यात येणार नाही.

७. **शास्ती.**—ह्या नियमांपैकी कोणत्याही नियमाच्या उपबंधांचा भंग करणारी कोणतीही व्यक्ती, अशा भंगामुळे उद्‌भवतील अशा कोणत्याही इतर परिणामाबरोबरच जिल्हाधिकाऱ्यास, अशा व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, लादणे योग्य वाटेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. असा दंड पाणी जलसिंचनाच्या प्रयोजनार्थ वापरले असेल तर रुपये २०० पेक्षा अधिक असणार नाही व पाणी इतर कोणत्याही प्रयोजनार्थ वापरले असेल तर रुपये १०० पेक्षा अधिक असणार नाही.

७१. ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये आकारणी ठरविणे हे साधारण जमीन महसुलाच्या आकारणी-पुरतेच केवळ मर्यादित असेल आणि शाळा, गाव, आणि जिल्ह्यातील रस्ते, पूल, तलाव, विहिरी, प्रवाशांसाठी राहण्याची जागा आणि तशीच दुसरी कामे यांसारख्या स्थानिक सुधारणेच्या कारणांसाठी, जो कोणताही उपकर त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधांन्वये राज्य सरकारने बसविणे हे वैध असेल असा कोणताही उपकर बसविण्यास, किंवा पाण्याच्या उपयोगाबद्दल कलम ७० च्या किंवा, राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या पाटबंधाऱ्यासंबंधीच्या कोणत्याही विधीच्या उपबंधांन्वये लादण्यात येत असेल अशी कोणतीही पट्टी बसविण्यात उक्त आकारणीमळे कोणताही प्रतिबंध होणार नाही.

या अधि-नियमान्वये आकारणी ठरविणे हे साधारण जमीन महसुला-पुरतच मर्यादित असणे.

७२. (१) कोणत्याही भूमिधारकाकडून जमीन महसूल म्हणून येणे असलेली थकबाकी ही त्या धारण केलेल्या जमिनीवरील आणि तीच्या प्रत्येक भागावरील मुख्य भार असेल आणि ती देण्यात कसूर केल्यास, भोगवटयाने किंवा दुमाला म्हणून धारण केलेली जमीन, आणि खातेदाराच्या किंवा धारकाच्या त्या जमिनी-वरील झाडे, पिके, इमारती आणि जमिनीस जोडलेल्या सर्व वस्तू किंवा जमिनीस जोडलेल्या कोणत्याही गोष्टीस कायम बांधलेली वस्तू यांवरील सर्व हक्कांसह जप्त होण्यास पात्र असतील ; आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, पोट-कलम (२) आणि (३) च्या उपबंधास अधीन राहून, भोगवटयाची किंवा दुमाला जमिनीची विक्री करून, थकबाकी म्हणून असलेल्या सर्व रकमा वसूल करता येतील, किंवा ह्याबाबत केलेल्या नियमांन्वये[४२] अशा भोगवटयाच्या किंवा दुमाला जमिनीची विल्हेवाट लावता येईल आणि अशी भोगवटयाची किंवा दुमाला जमिनीची विल्हेवाट मग ती उपरोक्त प्रमाणे विक्री करून करण्यात आलेली असो, किंवा पोट-कलम (२) आणि (३) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर रीतीने, लावण्यात येईल तेव्हा ती जमीन जिल्हाधिकारी अन्यथा निदेश देईल ते खेरीज करून, अशा भोगवटयाच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या संबंधांत सरकारखेरीज इतर कोणत्याही इसमांच्या नांवे केलेले सर्व भू-सत्ता प्रकार, हक्क, भार आणि न्याय अधिकार यांपासून मुक्त झाली आहे असे समजले पाहिजे.

जमीन महसूल हा जमिनीवरील मुख्य भार असेल.

**टीप ४२.**—कलम ५१ खालील टीप ३७ पहा. (नियम ४७ पहा).

(२) जेव्हा भोगवटयाने किंवा दुमाला म्हणून धारण केलेली जमीन पोट-कलम (१) च्या उपबंधा-नुसार जप्त करण्यात आली असेल तेव्हा जिल्हाधिकारी एका वेळी एका वर्षाकरता अशी जमीन आपल्या ताब्यात घेईल आणि ती तिच्या पूर्वीच्या खातेदारास किंवा तिच्या वरिष्ठ जमीनधारकाकडे किंवा इतर कोणत्याही इसमाला भाडेपट्टयाने देईल. अशा जमीनधारकाकडे किंवा यथास्थिति अशा इसमाकडे एकूण जमीन, यासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीनुसार जमीन धारणेसाठी निश्चित केलेल्या कमालमर्यादेपेक्षा अधिक असू नये, ह्या या मागील हेतू आहे.

(३) पोट-कलम (२) अनुसार जिल्हाधिकाऱ्याने, भोगाधिकार किंवा दुमाला म्हणून धारण केलेली जमीन ताब्यात घेण्याच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत, त्याचा पूर्वीचा खातेदार किंवा वरिष्ठधारक याने भोगाधिकार किंवा दुमाला जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर जिल्हाधिकाऱ्यास, उक्त

वरिष्ठधारक किंवा खातेदार याने जमीन महसूल म्हणून त्याच्याकडून येणे असलेली रक्कम आणि आकारणीच्या तिप्पटीबरोबरीची रक्कम शास्ती म्हणून दिल्यानंतर, यथास्थिति, खातेदार किंवा वरिष्ठधारक यास भोगाधिकार किंवा दुमाला जमीन परत ताब्यात देता येईल. जर खातेदार किंवा वरिष्ठधारक भोगाधिकार किंवा दुमाला जमीन उपरिनिर्दिष्ट मुदतीत स्वतःच्या ताब्यात परत घेण्यात कसूर करील तर, उक्त भोगाधिकार किंवा दुमाला जमीन किंवा तिचा भाग याची, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडून विल्हेवाट लावण्यात येईल.

जप्त केलेल्या जमिनीचा कवजा घेता येईल आणि अन्यथा त्यांची विल्हेवाट लावता येईल.

७३. महसूल देण्यात कोणतीही कसूर केल्यामुळे किंवा कलम ७२ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये केलेल्या अशा जप्तीच्या वेळी इतर कसूर केल्यामुळे एखादी धारण केलेली जमीन जप्त केली असेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्याने अशा जमिनीचा तावडतोब कबजा घेणे, आणि ती खरेदीदाराच्या किंवा ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर विधिन्वये ती धारण करण्याचा हक्क असणाऱ्या इतर इसमांच्या कब्जात देऊन तिची विल्हेवाट लावणे, हे विधिसंमत असेल.

भोगाधिकार जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून जमीन महसूल देण्याचा अधिकार खातेदार-खेरीज इतर विवक्षित इसमास आहे.

७४. भोगाधिकाराबद्दल देणे असलेला जमीन महसूल देण्यास जो प्रथमतः जबाबदार असेल अशा खातेदाराने तो न दिल्यामुळे कलम ७२ च्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधीच्या उपबंधान्वये भोगवटा जप्त होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून, जमीन महसुलाबाबत देणे असलेल्या सर्व रकमा कोणत्याही हितसंबंधित इसमाने अशा खातेदाराच्या वतीने देणे हे, विधिसंमत असेल आणि अशा रकमा योग्य रीतीने दिल्यावर जिल्हाधिकाऱ्याने त्या स्वीकारल्या पाहिजेत :

परंतु, ह्या कलमाच्या उपबंधान्वये प्राधिकार दिलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे, सक्षम क्षेत्राधिकार असलेल्या न्यायालयातील अशा पक्षकारांमधील कोणत्याही दाव्यात सिद्ध झाले असतील अशा, हितसंबंधात पक्षकारांच्या हक्कास बाध येता कामा नये.

दुमाला जमिनीचे नोंदणी पुस्तक.

७५. त्या त्या वेळी अंमलात आणलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधान्वये ज्या जमिनीचे अन्य संक्रमण प्रस्थापित करण्यात आले असेल किंवा त्यास मान्यता देण्यात आली असेल अशा सर्व जमिनींचे, राज्य सरकारने विहित केलेल्या[४३] नमुन्यात जिल्हाधिकाऱ्याने एक नोंदणी पुस्तक ठेवले पाहिजे ; आणि अशा कोणत्याही दुमाला करून दिलेल्या जमिनींच्या संबंधात दिलेली कोणतीही सनद कायमची हरवलेली आहे किंवा नष्ट झालेली आहे असे जिल्हाधिकाऱ्यांचे समाधान होईल अशा प्रकारे दाखवून दिले गेले असल्यास त्यास, अशी सनद मिळण्याचा त्याच्या मते ज्यास हक्क असेल अशा कोणत्याही इसमास, राज्य सरकारने विहित केलेल्या नियमास अधीन राहून आणि विहित केलेली[४३] फी दिल्यानंतर उक्त नोंदणी पुस्तकातील प्रमाणित उतारा देता येईल आणि जी सनद हरविल्याचे किंवा नष्ट झाल्याचे सांगण्यात आले असेल अशा सनदे ऐवजी तो उतारा देण्यात आला आहे अशा अर्थाचा शेरा जिल्हाधिकाऱ्याने त्यावर लिहिला पाहिजे, आणि असा उतारा उक्त सनदेइतकाच हक्कासंबंधीचा वैध पुरावा असल्याचे समजण्यात आले पाहिजे.

टीप ४३.—दुमाला जमिनीच्या नोंदणी पुस्तकासंबंधीचे नियम.

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र **जमीन** महसूल (दुमाला जमिनीचे नोंदणी पुस्तक) नियम, १९६७, असे म्हणता येईल. **शासकीय अधिसूचना क्र.यु.एन.एफ.-१९६७(अ)-आर, दि. २१-८-६७.**

२. **दुमाला जमिनीच्या नोंदणी पुस्तकाचा नमुना.**—ज्या जमिनीचे अन्यसंक्रमण त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये प्रस्तापित करण्यात आले असेल किंवा मान्य करण्यात आले असेल त्या सर्व जमिनीचे नोंदणी पुस्तक या सोबत जोडलेल्या नमुन्यात ठेवण्यात येईल.

## नमुना

(नियम २ पहा)

### दुमाला जमिनीचे नोंदणी पुस्तक

| अनुक्रमांक | गावाचे नाव | विद्यमान अन्य संक्रामितीचे नाव | (१) अन्य संक्रमणाचा वर्ग | (२) सनदीचा क्रमांक | दिनांक, महिना व वर्ष | सही करणाऱ्या अधिकाऱ्याचे व त्यांच्या कार्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

| तपशील: धारकाचे नाव | ज्या तालुक्यात मुळात नोंदविली गेलेली आहे त्या तालुक्याचे नाव. | (३) नोंदणी पुस्तकाशी जोडलेल्या सनदीच्या नमुन्याचा क्रमांक. | धारणेचा कालावधी म्हणजे, कायम स्वरूपात किंवा एकापेक्षा अधिक पिढ्यांसाठी वंशपरंपरेने किंवा फक्त हयातीपुरता चालू राहणार आहे किंवा कोणत्या कालावधीकरिता ते | दुमाला गावांचा किंवा: संपूर्ण गाव | जर गावाचा फक्त एखादा भाग असेल तर भू-मापन क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| | | | | | |

| जमिनीचा तपशील: क्षेत्रफळ | भू-मापन मूल्य निर्धारण | (४) पूर्वीच्या जुडी किंवा सलामीची रक्कम | शासनाला देय असलेला जमीन महसूल: सनदीअन्वये देय असलेला अतिरिक्त उक्त धारा, कोणताही असल्यास: दर | रक्कम | एकूण | दुमाला जमीन महसूल |
|---|---|---|---|---|---|---|
| (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| | | | | | | |

टीप.—(१) ह्या स्तंभात दुमाला जमिनीचा वर्ग, कोणताही असल्यास, तो दर्शविण्यात येईल किंवा त्याचे योग्य वर्णन देण्यात येईल.

(२) ज्या बाबतीमध्ये सनद देण्यात आलेली नसेल अशा बाबीमध्ये अन्य संक्रमण कायम करणाऱ्या किंवा पुढे चालू ठेवणाऱ्या निर्णयाचा क्रमांक व तारीख स्तंभ ५—१० मध्ये नमूद करण्यात येईल.

(३) प्रत्येक नोंदीमध्ये एखाद्या सनदीची विस्ताराने नक्कल करण्याचे टाळता यावे म्हणून, सनदेच्या प्रत्येक प्रकारचा आदेशवजा नमुना, जिल्हाधिकाऱ्याच्या सहीने नोंदणी पुस्तकासोबत जोडण्यात येईल व त्यांना क्रमांक देण्यात येतील आणि नमुन्याचा क्रमांक स्तंभ १० मध्ये नमूद करण्यात येईल.

**टीप ४३.**—कृपया कलम ३२७ खालील टीप १०२ पहा.

(नियम ७ खालील अनुसूची व नियम १२ खालील अनुसूची "अ" पहा.)

७६. (१) जमीन महसुलाची रक्कम स्वीकारणाऱ्या प्रत्येक महसूल अधिकाऱ्याने आणि प्रत्येक तलाठ्याने अशी रक्कम स्वीकारते वेळी त्याबद्दल लेखी पावती दिली पाहिजे. पावत्या.

(२) ज्या वरिष्ठ धारकास, खंडाची किंवा जमीन महसूलाची यणे असलेली कोणतीही रक्कम प्रत्यक्षपणे कनिष्ठ धारकाकडून वसूल करण्याचा हक्क असेल त्या प्रत्येक वरिष्ठ धारकाने अशी रक्कम ती स्वीकारील त्यावेळी, अशा कनिष्ठ धारकास त्याबद्दल लेखी पावती दिली पाहिजे.

७७. कोणत्याही इसमाने कलम ७६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे पावती देण्यात कसूर केली तर तो, रक्कम देणाऱ्या इसमानेअर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे, भरलेल्या रकमेच्या दोन पटीहून अधिक नसेल इतका दंड देण्यास पात्र होईल. पावत्या देण्यात कसूर केल्या-बद्दल शास्ती.

७८. या अधिनियमात काहीही, असले तरी, राज्य सरकारास, पिके न आल्यामुळे, पुरामुळे किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा कोणत्याही अन्य कारणामुळे, कोणत्याही भागात कोणत्याही वर्षी, ह्या बाबतीत केलेल्या नियमानुसार "अ किंवा विशेष आदेशानुसार जमीन महसूल संपूर्णत: किंवा अंशत: कमी करता येईल, तो तहकूब करता येईल किंवा त्याची सूट देता येईल. जमीन महसूल कमी करणे, तो तहकूब करणे किंवा त्याची सूट देणे.

**टीप ४४.**—अधिनियमाचे कलम ३३०-अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाने असा निदेश दिलेला आहे की, जमीन महसूल कमी करण्याच्या कलम ७८ खालील राज्य शासनाच्या शक्ती जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख यांनीही वापरण्याजोग्या असतील व जमीन महसूलाची तहकुबी करण्याच्या किंवा सूट देण्याच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांनीही वापरण्याजोग्या असतील. जमाबंदी आयुक्त व जिल्हाधिकारी, शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-१६६७-(अ) आर, दिनांक २५ मे १९७० अन्वये (महाराष्ट्र जमीन महसूल कमी करणे, तहकूब करणे व सूट देणे) नियम, १९७० च्या उपबंधाच्या अधीन राहून पूर्वोक्त शक्ती वापरतील (परिशिष्ट २४ पहा).

**टीप ४४ अ.**—जमीन महसूल कमी करणे व तहकुबी व सूट यासंबंधीचे नियम.

[शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ् १६६७ आर, दिनांक १५ जानेवारी १९७१ द्वारे सुधारण्यात आलेली शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ १६६७ आर, दिनांक ३० मे १९७०.]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (कमी करणे, तहकूब करणे व सूट देणे) नियम, १९७० असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात,—

(अ) "जमीन महसूल अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एक्केचाळीस) ;

(ब) "चालू जमीन महसूल" म्हणजे जमीन महसूल अधिनियमाच्या कलम १७० अन्वये कोणत्याही जमिनीच्या संबंधात देय असलेला जमीन महसूल ;

(क) "सार्वत्रिक आपत्ति" म्हणजे अवर्षण, पूर, पाऊस न पडणे किंवा जास्त पाऊस पडणे किंवा अवेळी पाऊस पडणे यामुळे किंवा कोणत्याही इतर नैसर्गिक आपत्तिमुळे कोणत्याही महसूल वर्षात पिकांची मोठ्या प्रमाणावर किंवा सार्वत्रिक हानी आणि यामध्ये अलीकडच्या कोणत्याही आपत्तीमुळे किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने कोणत्याही विधी अन्वये दिलेल्या आदेशामुळे कोणत्याही भू-भागातील जमिनीत पेरणी न झाल्याने झालेल्या पिकांच्या पूर्ण हानीचा समावेश होतो ;

(ड) "स्थानिक आपत्ति" म्हणजे कोणत्याही महसूल वर्षात कोणत्याही वसतीतील पिके किंवा इतर मालमत्ता यांचे गारपीट किंवा आग यामुळे उद्भवलेले किंवा टोळांमुळे किंवा अज्ञात व्यक्तींनी केलेल्या चोरीमुळे किंवा खोडीमुळे झालेले नुकसान किंवा हानी आणि त्यामध्ये पुरांमुळे किंवा खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही इतर कारणांमुळे झालेल्या पिकांमुळे हानीचा समावेश होतो ;

(इ) "जमाबंदी" या संज्ञेचा अर्थ जमीन महसूल अधिनियमाच्या प्रकरण सहामध्ये तिला जो अर्थ दिलेला आहे तोच असेल ;

(फ) "भू-भाग" म्हणजे जिल्हयाचा कोणताही भाग.

३. **जमीन महसूल कमी करणे.**—(१) कोणतीही जमाबंदी चालू असताना, कोणत्याही धारण जमिनीतील मातीच्या ज्या भौतिक ऱ्हासामुळे आकारणी कमी करणे भाग पडेल असा ऱ्हास झाला असेल तर, तिच्या धारकास, आकारणी कमी करण्यासाठी जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा, जिल्हयातील सर्वेक्षण अधिकाऱ्याकडे आकारणी कमी करण्यासाठी अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, सर्वेक्षण अधिकारी त्याची पोच देईल आणि आवश्यक चौकशी केल्यानंतर, तो आपले प्रस्ताव, त्याचा निकट वरिष्ठ, कोणीही असल्यास, त्याच्यामार्फत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांच्याकडे पाठवील.

(३) धारण जमिनीच्या आकारणीत जो कोणतीही कपात करण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल ती कपात करणे अशी कळविण्यात आलेल्या परिस्थितीत आवश्यक आहे अशी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांची खात्री झाली असेल तर, त्यास ती रक्कम वीस रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा रीतीने, आदेशाद्वारे वार्षिक आकारणीत कपात मंजूर करता येईल व आदेशानुसार अर्जदारास कळविता येईल. वार्षिक आकारणीतील प्रस्तावित कपात वीस रुपयांपेक्षा अधिक असेल अशी सर्व प्रकरणे आदेशार्थ राज्य शासनास सादर करण्यात येतील, अशा कोणत्याही प्रकरणातील कागदपत्र मिळाल्यावर, राज्य शासन, त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी करील आणि अर्जावर त्याला योग्य वाटतील असे आदेश देईल आणि अर्जदाराला तदनुसार ताबडतोब कळविण्या बद्दल जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख यांस फर्मावील.

(४) या नियमान्वये मंजूर करण्यात आलेली कोणतीही कपात ती मंजूर करणाऱ्या आदेशाच्या तारखेनंतर येणाऱ्या महसूल वर्षापासून अमलात येईल; आणि नवीन जमाबंदीच्या मुदतीस सुरूवात होईपर्यंत अमलात राहील.

४. **कोणत्याही भू-भागातील पिकांच्या हानीचा अंदाज.**—कोणतेही वृत्त समजल्यावर जिल्हाधिकाऱ्यास असे मानण्यात संयुक्तिक कारण असेल की, सार्वत्रिक आपत्तीमुळे कोणत्याही भू-भागातील पिकांची एवढी हानी झाली आहे की, त्यासाठी मदतीची आवश्यकता भासणे संभवनीय आहे तर तो अशा भू-भागाची स्थिती, त्यातील प्रत्येक गावाची किंवा त्या भू-भागातील एकाच प्रकारच्या गावांच्या गटातील पिकांच्या हानीचे प्रमाण या बाबतीत त्वरित चौकशी करविण्याची व्यवस्था करील आणि या बाबतीत वेळोवेळी देण्यात आलेल्या राज्य शासनाच्या निदेशानुसार पिकांच्या अंदाजित उत्पादनाची आणेवारी काढील.

५. **तहकुबी मंजूर करण्याचे प्रमाण**—स्थानिक चौकशी केल्यानंतर आणि पूर्वोक्त प्रमाणे कोणत्याही भू-भागातील पिकांच्या हानीचे प्रमाण निश्चित केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास नियम ६ च्या उपबंधांना अधीन राहून,—

(अ) जर अशा भू-भागातील पिकांची अंदाजित आणेवारी चार आणे किंवा त्याहून कमी असेल तर अशा भू-भागातील आपल्या जमिनीच्या संबंधात कलम १६८ अन्वये जबाबदार असलेल्या व्यक्तीने देणे असलेला संपूर्ण जमीन महसूल तहकूब करता येईल ;

(ब) जर पिकांची अंदाजित आणेवारी चार आण्यांपेक्षा जास्त परंतु सहा आण्यांपेक्षा कमी असेल तर, अशा रीतीने देय असलेल्या जमीन महसूलापैकी अर्धा जमीन महसूल तहकूब करता येईल.

६. **तहकूबी सशर्त असणे.**—या नियमान्वये मंजूर करण्यात आलेली तहकुबी, जमीन महसूलाची जी रक्कम तहकूब करण्यात आली नसेल ती रक्कम भरण्याच्या शर्तीच्या अधीन असेल.

७. **तहकूब करण्यात आलेला जमीन महसूल केव्हा वसूलीयोग्य असेल.**—कोणत्याही जमिनीच्या संबंधात देय असलेला जो जमीन महसूल तहकूब करण्यात आलेला असेल असा जमीन महसूल, बाधा पोहोचलेल्या भू-भागात (ज्या वर्षी पीक आले नसेल त्या वर्षाशी जुळत्या असलेल्या) नंतरच्या वर्षात अशा जमिनीतील पिकांची सुगी होईपर्यंत, नियम ८ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने सर्वसाधारणपणे वसूल करण्यात येणार नाही.

८. **तहकूब केलेल्या जमीन महसूलाची वसूली.**—कोणत्याही वर्षातील कोणत्याही जमिनीच्या संबंधातील तहकूब करण्यात आलेल्या कोणत्याही जमीन महसूलाची नियम ९ अन्वये सूट देण्यात आली नसेल त्या बाबतीत पूर्ववर्ती नियमात उल्लेखिलेली नंतरच्या कोणत्याही वर्षातील पिकांची सुगी सोबतच्या तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आणेवारी इतकी असेल तर, अशा जमिनीच्यासंबंधात देय असलेला चालू जमीन महसूल आणि तिच्या संबंधातील देय असलेला तहकूब केलेला जमीन महसूल, त्या तक्त्याचे स्तंभ (२) व (३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे संपूर्ण किंवा अर्धा भरण्यात येईल किंवा मुळीच भरण्यात येणार नाही.—

**तक्ता**

| पिकांची आणेवारी | वसुलीयोग्य जमीन महसूलाचे प्रमाण | |
|---|---|---|
| | चालू | तहकूब केलेला जमीन महसूल |
| (१) | (२) | (३) |
| ११ आणे व त्याहून अधिक .. .. .. | संपूर्ण .. | संपूर्ण. |
| ८ आणे आणि ११ आण्यांहून कमी .. .. | संपूर्ण .. | अर्धा. |
| ६ आणे आणि ८ आण्यांहून कमी .. .. .. | संपूर्ण .. | काही नाही. |
| ४ आण्यांहून जास्त आणि ६ आण्याहून कमी .. .. | अर्धा .. | काही नाही. |
| ४ आणे व त्याहून कमी .. .. .. | काही नाही .. | काही नाही. |

९. **जमीन महसुलाची माफी.**—जमीन महसुलाची जी थकबाकी दोन वर्षाच्या जमीन महसुलापेक्षा अधिक आहे किंवा तीन वर्षांपेक्षा अधिक जुनी आहे अशा जमीन महसुलाची तहकूब केलेली सर्व थकबाकी कोणत्याही धारकाची आर्थिक स्थिती लक्षात न घेता जिल्हाधिकाऱ्यांकडून सर्वसाधारणपणे माफ करण्यात येईल. सर्वात जुन्या थकबाकीला प्रथम माफी देण्यात येईल.

१०. **मनाई आदेशांचा परिणाम म्हणून माफी देणे.**—त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेल्या आदेशाचा परिणाम म्हणून कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही वर्षी पीक काढणे शक्य झाले नसेल तर, जिल्हाधिकाऱ्यांस, लेखी आदेशाद्वारे,—

(अ) अशा वर्षात पडीत राहू दिलेल्या अशा क्षेत्रांपैकी अर्ध्याहून अधिक क्षेत्रात आधीच्या वर्षी लागवड करण्यात आली असेल तर, अशा क्षेत्रांच्यासंबंधात देय जमीन महसूलाची संपूर्ण माफी देण्यात येईल.

(ब) पडीत राहू दिलेल्या क्षेत्रांपैकी अर्ध्याहून कमी क्षेत्रात आधीच्या वर्षी लागवड करण्यात आली असेल तर, अशा क्षेत्राच्यासंबंधात देय असलेल्या जमीन महसुलाच्या निम्या इतक्या रकमेची अंशतः माफी देता येईल.

११. **स्थानिक आपत्तीमध्ये सहाय्य.**—(१) स्थानिक आपत्ती आलेली आहे अशा कोणत्याही भू-भागात कोणत्याही वर्षी करण्यात आलेल्या चौकशीवरून जिल्हाधिकाऱ्यांची खात्री होईल तेव्हा त्यास अशा स्थानिक आपत्तीमुळे बाधा पोहोचलेल्या पिकांच्या मालकाची साधनसंपत्ती विचारात घेतल्यावर, लेखी आदेशाद्वारे,—

(अ) जर पिकांची संपूर्ण हानी झाली असेल किंवा इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असेल तर, प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती विचारात घेतल्यानंतर त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या वर्षी जमीन महसूलाची पूर्णतः किंवा अंशतः माफी देण्यात येईल ;

परंतु, कोणत्याही वर्षात कोणत्याही जिल्ह्यात माफीच्या स्वरूपातील सहाय्य, एक हजार रुपयांपेक्षा अधिक होता कामा नये ;

आणखी असे की, जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने, एक हजार रुपयांपेक्षा अधिक असेल अशा रकमेची माफी कोणत्याही वर्षी कोणत्याही जिल्ह्यात देता येईल.

(ब) खंड (अ) खाली न येणाऱ्या प्रकरणात, अशा आपत्तीमुळे झालेल्या हानीची व्याप्ती विचारात घेतल्यावर, जमीन महसुलाची पूर्णतः किंवा अंशतः तहकुबी मान्य करता येईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-नियमाच्या प्रयोजनांकरिता कोणत्याही वर्षात कोणत्याही भू-भागात स्थानिक आपत्तीमुळे झालेले नुकसान किंवा हानी यांच्या व्याप्तीच्या प्रश्नाचा, जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधांना अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यांकडून निर्णय देण्यात येईल.

(२) नियम ८ चे उपबंध, पोट-नियम (१), खंड (ब) अन्वये तहकूब करण्यात आलेल्या जमीन महसुलाच्या वसुलीत लागू होतील.

१२. **तहकुबी आणि माफी याविषयी जिल्हाधिकाऱ्याने राज्य शासनाला माहिती पुरविणे.**—जिल्हाधिकारी या नियमान्वये त्याने दरवर्षी मान्य केलेल्या तहकुबी आणि दिलेली माफी याविषयी सोबत जोडलेल्या नमुन्यात राज्य शासनाला माहिती पुरवील.

---

टीप.—जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ७८ अन्वये महसूल कमी करण्याची परवानगी देण्यासंबंधीच्या राज्य शासनाच्या शक्ती जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांच्याकडे व जमीन महसुलाची तहकुबी व माफी देण्याच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांकडे जमीन महसूल अधिनियम याचे कलम ३३०-अ खाली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक यूएनएफ-१६६७ (अ) आर, दिनांक २५ मे १९७० अन्वये प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत.

नमुना

जिल्हा ........................

........ वर्षी तहकूब केलेल्या आणि सूट दिलेल्या जमीन महसुलाची रक्कम दाखविणारे विवरणपत्र.

| अनुक्रमांक | तालुक्याचे नांव | गावांची एकूण संख्या | पुढीलप्रमाणे आणेवारी असलेल्या गावांची संख्या | | तहकूब करण्यात आलेल्या जमीन महसुलाची रक्कम | सूट देण्यात आलेल्या जमीन महसुलाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ४ आणे व त्याहून कमी | ४ आण्यांहून जास्त आणि ६ आण्यांहून कमी | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | (रुपयांमध्ये) | (रुपयांमध्ये) |

## प्रकरण : ५

# महसुली मोजणी

राज्य सरकारास राज्यातील कोणत्याही भागात महसुली मोजणी सुरू करता येईल.

७९. (१) राज्य सरकारने, जमीन महसुलाची आकारणी किंवा जमाबंदी करण्यासाठी, आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या हक्कांच्या नोंदणीसाठी व ते कायम ठेवण्यासाठी, किंवा तशाच कोणत्याही इतर प्रयोजनासाठी हा अधिनियम राज्याच्या ज्या भागास लागू असेल अशा कोणत्याही भागातील कोणत्याही जमिनीची मोजणी करण्यासाठी, जेव्हा जेव्हा त्यास इष्ट वाटेल तेव्हा निदेश देणे हे विधिसंमत असेल, आणि अशा मोजणीस महसुली मोजणी असे म्हटले पाहिजे. अशी मोजणी सामान्यत: कोणत्याही गावाच्या, शहराच्या किंवा नगराच्या जमिनींस किंवा राज्य सरकार निदेश देईल केवळ, अशाच जमिनीस लागू होईल ; आणि राज्य सरकारच्या आदेशास अधीन राहून, अशी कोणतीही मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्याने, ज्या कोणत्याही जमिनीस असे भू-मापन लागू करणे इष्ट वाटत नसेल त्या जमिनीस अशा भू-मापनातून वगळणे हे विधिसंमत असेल.

(२) अशा प्रत्येक महसुली मोजणीवरील नियंत्रण हे राज्य सरकारकडे निहित असेल आणि राज्य सरकारने अंमलात आणले पाहिजे.

सामान्य नोटीस किंवा आज्ञापत्रे याद्वारे जमीन वगैरे धारण करणारास योग्य ती सेवा करण्याबाबत फर्मविता येईल.

८०. अशी कोणतीही मोजणी किंवा कलम ८६ किंवा ८७ अन्वयेची मोजणी करण्यासाठी किंवा तीत भाग घेण्यासाठी प्रतिनियुक्त केलेल्या भू-मापन अधिकाऱ्याने, सामान्य नोटिशीद्वारे किंवा आज्ञापत्राद्वारे,जमीन धारण करणारास व त्यात हितसंबंध असलेल्या सर्व इसमास जातीने, किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना देण्यात आल्या आहेत व महत्त्वाच्या सर्व प्रश्नांची उत्तरे ज्यास देता येतील अशा वैधरीत्या दिलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास आणि तालुक्याच्या व गावच्या ज्या अधिकाऱ्यास, आपापल्या पदाच्या नात्याने, आपापल्या ठाण्यात व पदावर वैधरीत्या किंवा रिवाज.वरून सेवा करणे आवश्यक आहे अशा तालुका व ग्रामअधिकाऱ्यास हजर राहण्यास भाग पाडणे आणि अशा तऱ्हेने बोलावलेल्या व्यक्तींच्या दर्जास बाध येणार नाही अशा तऱ्हेने त्याना मोजणीच्या कामात सहाय्य करण्यास आणि त्या कामाशी संबंधित अशा सेवा करण्यास भाग पाडणे हे विधिसंमत असेल.

जमिनीची मोजणी किंवा वर्गीकरण करण्याच्या कामात जमीन धारण करणारांनी व इतरांनी सहाय्य करणे.

८१. भू-मापन अधिकाऱ्याने, मागील कलमात उल्लेखिलेली भूमापने करते वेळी भू-मापन ज्या जमिनीस लागू आहे अशा जमिनीच्या मोजणीच्या किंवा वर्गीकरणाच्या कामात, निशाण धारण करणारे इसम देऊन साहाय्य देण्यासाठी जमीन धारण करणाऱ्या सर्व इसमांना व तीत हितसंबंध असणाऱ्या सर्व इसमांना बोलाविणे हे विधिसंमत असेल ; आणि ह्या किंवा भू-मापन कार्याशी आनुषंगिक अशा इतर कारणांसाठी पैसे देऊन मजूर कामावर लावणे आवश्यक असेल तेव्हा त्याबाबतचा सर्व खर्च आणि जमिनीची मोजणी करण्यावर झालेला सर्व आकस्मिक खर्च हा, महसूल मागणी म्हणून गोळा करण्यासाठी त्याची आकारणी करणे हे विधिसंमत असेल.

भू-मापन क्रमांक हे विशिष्ट व्याप्तीपेक्षा कमी असता कामा नयेत.

८२. (१) यात यानंतर जी तरतूद करण्यात आली आहे ती खेरीजकरून, केवळ शेतीच्या कारणासाठी उपयोगात आणलेली जमीन समाविष्ट असलेला कोणताही भू मापन क्रमांक हा, राज्य सरकारची मंजूरी घेऊन भूमि अभिलेख संचालकाने वेळोवेळी, प्रत्येक जिल्ह्यामधील जमिनीच्या निरनिराळ्या वर्गासाठी जी कमीत कमी व्याप्ती ठरविली असेल त्यापेक्षा कमी व्याप्तीचा करता कामा नये. अशा रीतीने ठरविलेल्या कमीत कमी व्याप्तीसंबंधीची कागदपत्रे हे प्रत्येक तालुक्यातील तहसिलदाराच्या कार्यालयात ठेविले पाहिजेत आणि ते सर्व वाजवी वेळी, जनतेच्या पाहणीसाठी खुले ठेवण्यात आले पाहिजेत.

(२) पोट-कलम (१) चे उपबंध हे, अशा रीतीने ठरविलेल्या कमीत कमी व्याप्तीपेक्षा यापूर्वीच व्याप्ती कमी करण्यात आलेल्या किंवा याबाबतीत सामान्यत: किंवा कोणत्याही विशिष्ट प्रसंगी भूमि अभिलेख

संचालकांच्या, प्राधिकारान्वये तसे करण्यात क्षेत्रातील अशा भू-मापन क्रमांकाना लागू असणार नाहीत ; आणि भूमि अभिलेखांमध्ये ज्या भू-मापन क्रमांकाना स्वतंत्रपणे मान्यता दिलेली आहे असा कोणताही भू-मापन क्रमांक हा, त्याची व्याप्ती काहीही असली तरी, प्राधिकृतपणे ठरविण्यात आली आहे, असे समजले पाहिजे.

८३. राज्य सरकारने, नव्याने मोजणी करण्याविषयी किंवा त्या संबंधातील दुय्यम असे कोणतेही काम करण्याविषयी कोणत्याही वेळी निदेश देणे हे विधिसंमत असेल : नव्याने मोजणी करण्याविषयी आणि आकारणीची फेर-तपासणी करण्याविषयी निदेश देण्याची शासनाची शक्ती.

परंतु, जेव्हा कोणत्याही क्षेत्राच्या जमिनीचे, सामान्य वर्गीकरण दुसऱ्यांदा करण्यात आले असेल किंवा कोणत्याही क्षेत्राच्या जमिनीचे कोणतेही मूळचे वर्गीकरण राज्य सरकारने अखेरचे म्हणून मान्य केले असेल तेव्हा, अशा क्षेत्राच्या जमिनींच्या स्थितीत बदल झाल्यामुळे किंवा वर्गीकरणातील कोणत्याही चुकांमुळे असे पुन:वर्गीकरण आवश्यक आहे असे राज्य सरकारास वाटेल ते खेरीज करून, अशा क्षेत्रांच्या आकारणीची फेरतपासणी करण्याच्या उद्देशाने असे कोणतेही वर्गीकरण पुन्हा करता कामा नये.

८४. भू-मापन क्रमांक व भू-मापन क्रमांकाचे उप-विभाग यांच्या क्षेत्रफळाची आणि आकारणीची नोंद, राज्य सरकारकडून या बाबतीत केलेल्या नियमान्वये ठेवण्यात येईल अशा अभिलेखात करण्यात येईल. भू-मापन क्रमांक व उप-विभाग यांची अभिलेखात नोंद.

**टीप ४५.**—कृपया कलम ८७ खालील टीप ४७ पहा (नियम ४, १४, २२ पहा).

८५. (१) दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्यावरून किंवा सहधारकांनी अर्ज केल्यानंतर जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व त्यांचे एकत्रीकरण करणे याबाबत अधिनियम, १९४७ याच्या उपबंधास अधीन राहून, धारण जमिनीची, यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने, विभागणी करण्यात येईल. विभागणी.

(२) कोणत्याही धारण जमिनीत एकाहून अधिक जमीन सहधारक असतील तर अशा कोणत्याही जमीन सहधारकास, धारण जमिनीतील आपल्या हिश्श्याच्या विभागणीकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल :

परंतु, स्वामित्व हक्काबाबत प्रश्न उद्‌भवल्यास, अशा प्रश्नाचा निर्णय दिवाणी न्यायालयाकडून येईतोपर्यंत, अशी विभागणी करण्यात येणार नाही.

(३) जिल्हाधिकाऱ्यास, सहधारकांची बाजू ऐकून घेतल्यानंतर, धारण जमिनीची विभागणी करता येईल व ह्या अधिनियमान्वये राज्य सरकारने केलेल्या नियमानुसार, धारण जमिनीवरील आकारणीची वाटणी करता येईल.

*(४) वगळण्यात आले.

(५) राज्य सरकारस महसूल देणाऱ्या धारण जमिनीची वाटणी करताना योग्यरीतीने झालेला खर्च, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा प्रमाणात, ज्याच्या विनंतीवरून वाटणी करण्यात आली अशा सहधारकांकडून किंवा वाटणीत ज्यांचा हितसंबंध असेल अशा इसमांच्या हिश्श्यामधून महसुलाची मागणी असल्याप्रमाणे, वसूल करण्यात येईल.

**टीप ४६.**—धारण जमिनीच्या विभागणीसंबंधीचे नियम:

[शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१७६७-आर, दि. १०-१-१९६९ अन्वये सुधारणा केलेली शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१७६७-आर, दि.८-९-१९६७.]

१. संक्षिप्त नाव.—या नियमांस महाराष्ट्र जमीन महसूल (धारण जमिनीचे विभाजन) नियम, १९६७, असे म्हणता येईल.

---

*पोट-कलम (४) च्या उपबंधांस अधीन राहून हा मजकूर व पोट-कलम (४) हे महाराष्ट्र जमीन महसूल (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६८ (सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम आठ) अन्वये वगळण्यात आले (परिशिष्ट ३८ पहा).

२. **विभाजन करण्यासाठी अर्ज.**—(१) कलम ८५, पोट-कलम (१) अन्वये सहधारकाने, धारण जमिनीतील त्याच्या हिश्श्याचे विभाजन करण्यासाठी करावयाच्या अर्जात खालील तपशील असेल :—

(अ) धारण जमिनीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक क्षेत्राचे क्षेत्रफळ आणि त्याचा अधिकार अभिलेखात नोंद करण्यात आलेला भू-मापन क्रमांक व हिस्सा क्रमांक ;

(ब) धारण जमिनीचा सत्ता प्रकार, ती दुमाला जमीन आहे की, बिनदुमाला आहे, आणि बिनदुमाला धारण जमिनीच्या बाबतीत, तो भोगवटादार वर्ग १, वर्ग २ किंवा सरकारी पट्टेदार म्हणून ती धारण करीत आहे ;

(क) धारण जमिनीचा जमीन महसूल ;

(ड) सहधारकांची नावे व पत्ते आणि त्यांच्या हिश्श्यांची व्याप्ती.

(२) अर्जासोबत अधिकार अभिलेखातील नोंदीची एक प्रत असेल.

३. **नोटीस काढणे व उद्घोषणा करणे.**—(१) अर्ज मिळाल्याबर, जिल्हाधिकारी, अर्जदारास याजवी नोटीस देण्यात येईल अशा कोणत्याही दिवशी किंवा सुनावणी ज्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात येईल त्या कोणत्याही दिवशी अर्जदाराची जातीने सुनावणी करील आणि अर्जदाराची सुनावणी केल्यानंतरा उक्त प्रकरण, नियम १० खाली येत नाही असे त्यास आढळून येईल तर, तो कलम २३० च्या उपबंधानुसार, या नियमास जोडण्यात आलेल्या नमुना 'अ' मधील नोटीस इतर सर्व सहधारकांवर बजावण्याची व्यवस्था करील आणि अशा नोटीशीद्वारे अशा प्रत्येक सहधारकावर नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांहून कमी नसेल किंवा साठ दिवसांहून अधिक नसेल अशा, नोटीशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिवशी, त्याच्यापुढे हजर रहाण्यास व त्यांच्या हरकती, कोणत्याही असल्यास, त्या निवेदन करण्यात त्यांना फर्मावील.

(२) जिल्हाधिकारी, या नियमास जोडलेल्या नमुना 'ब' मधील उद्घोषणा प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील. अशा उद्घोषणेची एक प्रत, तालुक्याच्या व ज्या खेड्यात ती धारण जमीन असेल त्या खेड्याच्या मुख्यालयात लावण्यात येईल. आणि आवश्यक असेल तर, ज्या क्षेत्रामध्ये ती धारण जमीन असेल त्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सहकारी बँकेस किंवा भू-विकास बँकेस, किंवा दोन्ही बँकांस पाठविण्यात येईल.

४. **विभाजनासाठी केलेला अर्ज नाकारण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.**—अर्जदार, सहधारक आणि हजर होतील अशा इतर कोणत्याही व्यक्ती यांची सुनावणी केल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याचे असे मत होईल की, जिच्यासाठी अर्ज केला आहे त्या धारण जमिनीमध्ये अर्जदाराचा हितसंबंध नाही किंवा अर्जदाराचा धारण जमिनीसंबंधीचा हक्क विवादग्रस्त आहे तर तो अर्ज नाकारील, आणि अर्जदाराचा धारण जमिनीसंबंधीचा हक्क विवादग्रस्त असेल त्याबाबतीत, त्याच्या हक्कासंबंधीचा प्रश्न दिवाणी न्यायालयामार्फत सोडविण्याचा अर्जदारास निदेश देईल.

५ **विभाजन करण्याची रीत.**—जिल्हाधिकाऱ्याने तो अर्ज फेटाळला नसेल तर, तो जातीने किंवा तो नियुक्त करील अशा अभिकरणामार्फत विभाजन करण्याच्या कामास लागेल. व्यवहार्य असेल तेथवर, संपूर्ण भू-मापन क्रमांक किंवा भू-मापन क्रमांकाचे उप-विभाग नेमून देण्यात येतील व फारच क्वचित प्रसंगी उप-विभागाचे आणखी विभाजन करण्याचा अवलंब करण्यात यावा. प्रत्येक पक्षकाराला शक्यतो जमिनीचे सलग क्षेत्र नेमून देण्यात यावे व प्रत्येक पक्षकाराला नेमून देण्यात आलेल्या क्षेत्राची उत्पादनक्षमता, धारण जमिनीतील त्याच्या भागाच्या प्रमाणात आहे हे सुनिश्चित करण्यासाठी दक्षता घेण्यात यावी.

६. **आकारणीचे संविभाजन.**—धारण जमिनीच्या आकारणीचे सहधारकांनी धारण जमिनीत धारण केलेल्या भागांच्या प्रमाणात विभाजन करण्यात येईल. तथापि, अशा धारण जमिनीतील कोणत्याही भू-मापन क्रमांकाच्या सर्व उप-विभागांवरील एकूण आकारणी त्या भू-मापन क्रमांकाच्या संपूर्ण आकारणीपेक्षा कमी होत असेल अथवा अधिक होत असेल तर, तसा फरक आकारणीत भर घालून किंवा तीमधून कपात करून उप-विभागावर अशा रीतीने सम प्रमाणात विभागण्यात येईल की त्यांची बेरीज मूळ भू-मापन क्रमांकाच्या आकारणीइतकी होईल.

७. **विभाजन कायम करण्यापूर्वीची कार्यरीती.**—विभाजन पूर्ण करण्यात आल्यानंतर, जिल्हाधिकारी, पक्षकार ज्या कोणत्याही हरकती घेतील त्या ऐकून घेईल आणि विभाजनात सुधारणा करील किंवा ते कायम करील. विभाजनात अशी सुधारणा करण्यात आल्याच्या किंवा ते कायम करण्यात आल्याच्या तारखेनंतर येणाऱ्या कृषि वर्षाच्या प्रारंभापासून हे विभाजन अंमलात येईल.

८. **विभाजनाच्या खर्चाची वसुली.**—विभाजनाचा खर्च, कलम ८५, पोट-कलम (५) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडून वसूल करण्यात येईल.

९. **दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याअन्वये विभाजन.**—दिवाणी न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा अथवा आदेश या अन्वये कोणत्याही धारण जमिनीचे विभाजन करण्याचा आदेश देण्यात आला असेल तेव्हा, नियम ५, ६, व ७ यांचे उपबंध हे सहधारकाने अर्ज केल्यावर धारण जमिनीच्या विभाजनासंबंधात ज्या रीतीने लागू होतात, त्या रीतीने ते लागू होतील.

१०. **व्यावृत्ती.**—विभाजनाची परिणती, मुंबईच्या जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या उपबंधान्वये राज्य शासनाने निश्चित केलेल्या प्रमाण क्षेत्रापेक्षा कमी विस्तार असलेली धारण जमीन निर्माण करण्यात होत असेल तर, या नियमांच्या उपबंधानुसार कोणत्याही धारण जमिनीचे विभाजन करता कामा नये.

नमुना 'अ'

(नियम ३ पहा)

**नोटीस**

श्री. / श्रीमती .............. (वडिलांचे नाव) .........., राहणार ......, तालुका ... ............, जिल्हा ..................... यांस,

ज्याअर्थी, गाव ..........., तालुका ..........., जिल्हा ........ मधील खाली विनिर्दिष्ट केलेल्या धारण जमिनीचे सहधारक श्री. ......... (वडिलांचे नाव) ........., याने उक्त धारण जमिनीतील त्याच्या हिश्श्याच्या विभाजनाकरिता अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त धारण जमिनीचे विभाजन करण्याचे योजिले आहे, व ...... १९ ही तारीख सुनविण्यासाठी निश्चित करण्यात आली असून सुनावणी ...... येथे ...... वाजता करण्यात येणार आहे.

त्याअर्थी, तुम्हास याद्वारे, कळविण्यात येते की, निश्चित केलेल्या तारखेला तुम्ही जातीने अथवा विधि व्यवसायी मार्फत किंवा मान्यताप्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून, तुमच्या हरकती, कोणत्याही असल्यास, त्या निवेदन कराव्यात ;

तुम्ही अशा रीतीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यात कसूर केली तर, उक्त विभाजनास तुमची कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल.

**धारण जमिनीचा तपशील**

| भू-मापन क्रमांक/हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | जमीन महसूल |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |

मुद्रा

दिनांक १९. जिल्हाधिकारी.

## नमुना 'ब'

(नियम ३ पहा)

### उद्‌घोषणा

ज्याअर्थी, गाव ......................., तालुका ..............., जिल्हा ........, मधील खाली विनिर्दिष्ट केलेल्या धारण जमिनीचा सहधारक श्री ............ (वडिलांचे नाव) ......................................... याने उक्त धारण जमिनीतील त्याच्या हिश्श्याच्या विभाजनाकरिता अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त धारण जमिनीचे विभाजन करण्याचे योजिले आहे व .......................... १९ ही तारीख सुनावणीसाठी निश्चित करण्यात आली असून सुनावणी येथे ........................... वाजता करण्यात येणार आहे ;

त्याअर्थी, उक्त धारण जमिनीत ज्यांचे हितसंबंध आहेत त्या सर्व व्यक्तींना याद्वारे, कळविण्यात येते की, निश्चित केलेल्या तारखेस त्यांनी जातीने अथवा विधी व्यवसायीमार्फत अथवा मान्यताप्राप्त अभिकर्त्यामार्फत हजर राहून त्यांच्या हरकती, कोणत्याही असल्यास, त्या निवेदन कराव्यात.

वर उल्लेख केलेल्या तारखेस व ठिकाणी अशा रीतीने हजर राहण्यास व हरकती निवेदन करण्यात कसूर केल्यास, कोणत्याही हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

**धारण जमिनीचा तपशील**

| भूमापन क्रमांक /हिस्सा क्रमांक | क्षेत्रफळ | जमीन महसूल |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |

मुद्रा

दिनांक .................... १९ जिल्हाधिकारी.

A-567—13-B.

८६. जेव्हा लागवडीखाली आणता येण्याजोग्या जमिनीचा कोणताही भाग, ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये कोणत्याही बिगरशेतकीच्या कामासाठी उपयोगात आणण्यास परवानगी देण्यात आली असेल तेव्हा किंवा जमिनीचा कोणताही भाग, कलम २२ अन्वये विशेषरीत्या नेमून दिला असेल तेव्हा, किंवा कलम ६७, पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये जमिनीच्या कोणत्याही भागावरील कोणत्याही आकारणीत फेरफार केला असेल किंवा आकारणी वगविली असेल तेव्हा अशा भागाचा, कलम ८२ मध्ये कोणतीही तरतूद केलेली असली तरीही, जिल्हाधिकाऱ्याची मंजुरी घेऊन, कोणत्याही वेळी, स्वतंत्र भूमापन क्रमांक करण्याचा अधिकार आहे. भूमापन क्रमांकाची नवीन भूमापन क्रमांकांमध्ये विभागणी.

८७. (१) मुंबई जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्या-बाबत अधिनियम, १९५४ च्या उपबंधास अधीन राहून,— भूमापन क्रमांकाची उप-विभागात विभागणी.

(अ) भूमापन क्रमांक हे, वेळोवेळी व कोणत्याही वेळी, जमिनीतील हक्क संपादन करण्याच्या दृष्टीने किंवा इतर कोणत्याही कारणासाठी आवश्यक असतील इतक्या उपविभागांमध्ये विभागता येतील ;

(ब) भूमापन क्रमांकाची पोट-विभागणी करण्याचे आणि भूमापन क्रमांकाची आकारणी निश्चित करण्याचे व वेळोवेळी तिच्यात सुधारणा करण्याचे काम याबाबतीत राज्य सरकारकडून करण्यात येतील अशा नियमांनुसार पार पाडण्यात येईल :

परंतु, कोणत्याही भूमापन क्रमांकाच्या किंवा उपविभागाच्या आकारणीच्या एकूण रकमेत, कलम ६७ अन्वये अशी आकारणी फेरबदल केला जाण्यास पात्र नसेल तर, ज्या कालावधीसाठी ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये आकारणी निश्चित करण्यात आली असेल त्या कालावधीत, वाढ करता कामा नये.

(क) अशा पोट-विभागांचे क्षेत्र व आकारणी ही, ह्याबाबतीत राज्य सरकार विहित करील अशा जमिनीविषयीच्या अभिलेखात दाखल करण्यात येईल.

(२) राज्यातील कोणत्याही क्षेत्रातील धारणजमीन ही अनेक खासरा क्रमांक मिळून झाली असेल अशा बाबतीत, जमाबंदी अधिकाऱ्याने, प्रत्येक खासरा क्रमांकासाठी देय असलेला जमीन महसूल, आकारला पाहिजे आणि त्यांची स्वतंत्र भू-मापन क्रमांक म्हणून नोंद केली पाहिजे.

**टीप ४७.**—महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग यासंबंधीचे नियम.

(तसेच कलम ८४ खालील टीप ४५ पहा.)

(नियम १५, १८ व १९ पहा.)

## महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग यासंबंधीचे नियम

[शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१६६७ (ए)-आर. दि. २५ नोव्हेंबर १९७० व शासकीय अधि-सूचना क्र. यूएनएफ-१७६१/५१९२०-आर-(स्पेशल) दि. ३ जुलै १९७२ अन्वये सुधारण्यात आलेली शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१७६७(ए)-आर, दि. १ जुलै १९६९.]

**१. संक्षिप्त नाव.**—या नियमास महाराष्ट्र जमीन महसूल (महसुली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग) नियम, १९६९ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमात.—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "संचालक" म्हणजे संचालक, भूमि अभिलेख ;

(क) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम ;

(ड) "अधीक्षक" म्हणजे अधीक्षक, भूमि अभिलेख.

३. **भूमापन क्रमांक व उपविभाग.**—(१) कलम ८२ अन्वये निश्चित केलेल्या किमान क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र नसलेल्या प्रत्येक धारण जमिनीचे भूमि अभिलेखातील भूमापन क्रमांक म्हणून स्वतंत्रपणे मोजमाप घेण्यात येईल, वर्गीकरण करण्यात येईल व सीमा चिन्हांद्वारे ती निश्चित करण्यात येईल.

(२) अशा किमान क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या प्रत्येक धारण जमिनीचे, तो ज्या भूमापन क्रमांकामध्ये समाविष्ट करण्यासंबंधी निदेश देण्यात आला असेल, त्या भूमापन क्रमांकाचा उपविभाग म्हणून भूमि अभिलेखामध्ये स्वतंत्रपणे मोजमाप घेण्यात येईल, वर्गीकरण करण्यात येईल आणि निर्धारण करण्यात येईल व नोंद घेण्यात येईल. तसेच संचालकाने तशा प्रकारे निदेश दिल्यास ती धारण जमीन स्वतंत्रपणे सीमांकित करता येईल, परंतु संचालकास, अशा धारण जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींना धारण जमीन अशा प्रकारे सीमांकित करण्याचा त्यास (संचालक) योग्य वाटेल असा खर्च किंवा खर्चाचा भाग अगोदर देण्यास भाग पाडता येईल.

४. **मोजणी अभिलेख.**—सर्व मापांची नोंद, संचालक कोणत्याही भूमापनाकरिता निश्चित करील अशा पुस्तकात करण्यात येईल किंवा टेबलावरील साध्या नकाशामध्ये समाविष्ट करण्यात येईल. उक्त पुस्तके किंवा नकाशे भूमापनाचे अभिलेख म्हणून कायमचे जतन करण्यात येतील.

५. **मोजण्यांची चांचणी.**—या प्रयोजनार्थ नेमलेल्या दुय्यम सर्वेक्षण अधिकाऱ्यांनी केलेल्या मोजण्यांची चांचणी, मोजणी आस्थापनाच्या प्रभारी अधिकाऱ्यांकडून संचालकास पुरेशी वाटेल अशा पद्धतीने व अशा मर्यादेपर्यंत करण्यात येईल.

६. **गावाचे नकाशे.**—संचालकाच्या आदेशानुसार, प्रत्येक भूमापन क्रमांक व त्याची सीमा चिन्हे आणि प्रत्येक भूमापनाच्या वेळी राज्य शासनाने दिलेल्या सामान्य किंवा विशेष आदेश अधीन राहून संचालकास विनिर्दिष्ट करता येईल असा इतर तपशील दर्शवून गावांचे नकाशे तयार करण्यात येतील.

७. **जमिनीचे वर्गीकरण.**—आकारणीच्या प्रयोजनार्थ, सर्व जमिनीची उत्पादनक्षमता लक्षात घेऊन त्यांचे वर्गीकरण करण्यात येईल. वर्गांची संख्या व रुपयांमध्ये वर्गीकरण करण्यात येत असेल त्याबाबतीत, आणेवारीतील आणि फॅक्टर प्रमाणात वर्गीकरण करण्यात येत असेल त्याबाबतीत मृद युनिटांच्या रूपातील त्यांचे संबंधित मूल्य हे भूमापन लागू असेल तेथील निरनिराळ्या प्रदेशांमधील परिस्थिती आणि शेतीचे स्वरूप लक्षात घेऊन संचालकाच्या आदेशानुसार निश्चित करण्यात येईल.

८. **क्षेत्रकार्य पुस्तके.**—वर्गीकरण करणारा प्रत्येक अधिकारी क्षेत्रकार्य पुस्तक ठेवील आणि प्रत्येक भूमापन क्रमांकाच्या वर्गीकरणाची व उपविभागाची आणि तो भूमापन क्रमांक व उपविभाग हा त्याच्या मते ज्या वर्गात समाविष्ट करावा त्या वर्गात तो समाविष्ट करण्यास जो कारणे असतील ती कारणे नमूद करील अशी क्षेत्रकार्य पुस्तके भूमापनाचे कायम अभिलेख म्हणून ठेवण्यात येतील :—

परंतु :—

(अ) ज्या ठिकाणी फॅक्टर प्रमाण प्रचलित असेल त्या ठिकाणी वर्गीकरण फर्द जमिनीमध्ये किंवा संचालक निदेश देईल अशा इतर नमुन्यामध्ये व अशा पद्धतीने करण्यात येईल ; आणि

(ब) आकारणी निश्चित करताना किंवा तिच्यामध्ये वाढ करताना खते मिळण्याकरिता असलेली अनुकूल परिस्थिती किंवा ते क्षेत्र गावापासून किती दूर आहे किंवा जंगलापासून किती जवळ आहे अथवा तेथे पूर येण्याची कितपत शक्यता आहे या गोष्टी त्या फॅक्टर प्रमाणामध्ये समाविष्ट नसल्या तर विचारात घेण्यात येतील.

९. **जमीनधारकांना नोटिसा पाठविणे.**—वर्गीकरणाचे कोणतेही काम हाती घेण्यात येईल तेव्हा जमीनधारकांना त्यांनी जमिनीतील दोष दाखवून देणे आणि त्यांच्या स्वतःच्या सुधारणा निदर्शनास आणून देणे शक्य व्हावे म्हणून, त्यांना नोटीस देण्यात येईल.

**१०. वर्गीकरणाची चाचणी.**—या प्रयोजनार्थ नेमलेल्या दुय्यम अधिकाऱ्यांनी केलेल्या मूळ वर्गीकरणाची चाचणी, वर्गीकरण आस्थापनेच्या प्रभारी अधिकाऱ्यांकडून संचालक निदेश देईल अशा पद्धतीने आणि अशा मर्यादेपर्यंत घेण्यात येईल.

**११. भूमापन क्रमांक व उपविभाग यांचे एकत्रीकरण.**—(१) कोणताही भूमापन क्रमांक किंवा भूमापन क्रमांकाचा उपविभाग यांचे जमीनधारकाच्या अर्जावरून अधीक्षकाच्या परवानगीने इतर कोणत्याही समान सीमा असलेल्या भूमापन क्रमांकाबरोबर एकत्रीकरण करता येईल परंतु त्यावेळी पुढील शर्तींचे पालन करण्यात आले पाहिजे :—

(एक) एकत्रीकरणाचे एकूण क्षेत्र १२·१४०६ हेक्टरपेक्षा अधिक नसेल किंवा एकत्रीकरण करावयाचा भूमापन क्रमांकापैकी किंवा यथास्थिती भूमापन क्रमांकाच्या उपविभागापैकी एकाचे एकूण क्षेत्र २·०२३४ हेक्टरपेक्षा कमी असल्यास, १६·१८७४ हेक्टर ;

(दोन) एकत्रीकरणासाठी निवडलेल्या प्रस्तावित जमिनीचे सर्व खंड त्याच धारणाधिकाराने त्याच जमिनीधारकाने धारण केले आहेत ;

(तीन) एकत्रीकरणामुळे प्रत्यक्ष लागवड होईल अशा प्रकारची सामाईक सीमा आहे ;

परंतु, शर्त (एक) अन्वये किंवा तदनुसार लादलेली सीमा, संचालक सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे मंजूर करील अशा मर्यादेपर्यंत वाढवता येईल.

(२) अधीक्षकाच्या पूर्वपरवानगीशिवाय, त्याच जमीनधारकाने त्याच धारणाधिकाराने धारण केलेल्या त्याच भूमापन क्रमांकाच्या समान सीमा असलेल्या उपविभागाची कोणत्याही उपविभागाचे एकत्रीकरण करता येईल.

(३) जेव्हा असे, एकत्रीकरण करण्यात येते तेव्हा, दोन किंवा अधिक भूखंडांची भूमि अभिलेखात एकच नोंद होईल व विभिन्न क्रमांक म्हणून त्यांना एकत्रीकरणाच्या क्रमांकाच्या मालिकेतील पहिला क्रमांक देण्यात येईल असे एकत्रीकरण करण्यापूर्वी असलेली सीमाचिन्हें काढून टाकण्यात येतील आणि गावाच्या नकाशामध्ये त्यानुसार बदल करण्यात येईल.

**१२. नियम ३ ते ११ लागू करणे.**—(१) शासनाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, शेतीच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येत असलेल्या किंवा वापरावयाच्या जमिनीचे महसुली भूमापन करताना नियम ३ ते ११ (दोन्ही नियम धरून) यांचे पालन करण्यात येईल.

(२) अनुवर्ती नियमामध्ये उपबन्धित न केलेल्या तपशीलाच्या बाबी, राज्य शासनाच्या सामान्य नियंत्रणाखाली काम करणारा संचालक वेळोवेळी देईल अशा सामान्य किंवा विशेष आदेशांच्या अनुसार निश्चित करण्यात येतील.

**१३. अकृषिक जमिनीचे अनुवर्ती नियमांच्या अनुसार वर्गीकरण न करणे.**—(१) पोट-नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही प्रकारची जमीन नियम ३ ते ६ (दोन्ही धरून) यांच्या अनुसार मोजण्यात येईल व तिचा नकाशा तयार करण्यात येईल परंतु नियम ७ ते १० अनुसार तिचे वर्गीकरण करण्यात येणार नाही.

(२) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनी पुढीलप्रमाणे आहेत :—

(अ) नियम ३ ते ६ व ११ अन्वये ज्या क्षेत्रामध्ये भूमापनाचे काम चालू असेल अशा क्षेत्रामधील आणि अकृषिक प्रयोजनार्थ वापरण्यात येतात अशा भोगवटयात असलेल्या जमिनी ;

(ब) अशा कोणत्याही क्षेत्रात असलेल्या शेतीपेक्षा इमारतीसाठी किंवा औद्योगिक प्रयोजनार्थ अधिक मागणी असण्याची शक्यता असण्याचे मानण्यात येते अशा भोगवटयात नसलेल्या जमिनी ; आणि

(क) कलम १२६ अन्वये ज्या जमिनीमध्ये भूमापनाचे काम हाती घेण्यात आले असेल अशा सर्व जमिनी.

**१४. अभिलेख ठेवणे.**—(१) ज्या जमिनीचे भूमापन करण्यात आले असेल किंवा निर्धारण पूर्वीच करण्यात आले असेल किंवा अधिनियमांच्या आणि नियमांच्या उपबंधान्वये ज्यांचे यानंतर भूमापन किंवा जमाबंदी करण्यात येईल त्या जमिनोच्या बाबतीत, पुढील गोष्टी करणे हे संचालकाचे कर्तव्य असेल :—

(अ) कोणतीही गणितीय चूक किंवा लेखनदोष केव्हाही आढळल्यास ते सुधारण्याची व्यवस्था करणे;

(ब) अधिनियमान्वये किंवा या नियमान्वये अथवा इतर कोणत्याही विधीअन्वये कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशानुसार काढलेल्या भूमापन क्रमांकाच्या किंवा त्यांच्या उपविभागाच्या सीमांमध्ये, क्षेत्रामध्ये व धारणाधिकारामध्ये किंवा आकारणीमध्ये कोणताही बदल झाल्यास तो भूमि अभिलेखात वेळीच नमूद करण्याची व्यवस्था करणे :

परंतु कलम १०२ अन्वये जमाबंदी केल्याचे मानण्यात आल्यानंतर अशा जमाबंदीनुसार जमीन महसूल आकारण्यात आला असेल तर, असा जमीन महसूल वर्गीकरणात कोणत्याही प्रकारची चूक आढळल्यास, अशा जमाबंदीची मुदत संपेपर्यंत, वाढविण्यात येणार नाही.

(२) या नियमाचे योग्य प्रकारे पालन व्हावे यासाठी राज्य शासन वेळोवेळी काढील असे आदेश व त्याची मान्यता यास अधीन राहून संचालकाकडून तपशीलवार निदेश देण्यात येतील व नमुने तयार करण्यात येतील व ते ठेवण्यात येतील.

**१५. भूमापन क्रमांकाचे उपविभाग.**—(१) भूमापन क्रमांकाचे उपविभाग पाडण्याकरिता विभाजनाच्या क्षेत्रकार्यास प्रारंभ करण्यापूर्वी, भूमापनाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून सर्वसाधारण नोटीस देण्यात येईल आणि गावाच्या चावडीमध्ये लावण्यात येईल आणि दवंडी पिटवून घोषित करण्यात येईल. अशा नोटीशीमध्ये असे नमूद करण्यात येईल की, जमीनधारकांनी विभागणी केली असेल त्याप्रमाणे गावातील भूमापन क्रमांकाच्या उपविभागाची मोजणी व्हावयाची आहे.

(२) तलाठ्याकडून जमीनधारकांवर व्यक्तीगत नोटीसा बजावण्यात येतील. या नोटीसामध्ये ज्या भूमापन क्रमांकाचा किंवा त्याच्या भागाची मोजणी करावयाची असेल ते क्रमांक किंवा भाग आणि ज्या तारखेस मोजणीच्या कामास प्रारंभ होईल ती तारीख विनिर्दिष्ट करण्यात येईल आणि अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या तारखेस मोजणीच्या जागी उपस्थित राहण्याबद्दलची ताकीद देण्यात येईल.

**१६. सीमा निश्चित करणे.**—(१) कोणताही विवाद नसेल त्याबाबतीत, भूमापन अधिकाऱ्याने तशा अर्थाची नोंद केल्यानंतर तो, जमीनधारकाने निवेदन केले असेल त्यानुसार प्रत्येक उपविभागाची सीमा निश्चित करील.

(२) कोणताही विवाद असेल त्याबाबतीत, तो ज्या उपविभागाच्या संबंधात असेल त्याची मोजणी करण्यात येईल व दोन्ही विवादकांच्या मागण्यांच्या अनुसार त्याचा नकाशा काढण्यात येईल व विवाद्य प्रकरणांच्या नोंद-वहीमध्ये त्या विवादाची नोंद करण्यात येईल. अधिनियमाचे उपबंध किंवा तद्न्वये केलेले नियम या अन्वये विवाद मिटवल्यानंतर नकाशामध्ये त्यानुसार बदल करण्यात येईल व क्षेत्रांची भूमि अभिलेखांमध्ये अंतिमरीत्या नोंद करण्यात येईल.

**१७. फी.**—कलम १५३ चा खंड (ब) ज्या प्रकरणात लागू होतो त्या प्रकरणामध्ये उपविभाग करण्याकरिता वसूल करावयाची फी कोणत्याही बाबतीत शासन अन्यथा निदेश देईल त्याखेरीज उपविभागाच्या मोजणीचा, आकारणीचा व नकाशा काढण्याचा खर्च समाविष्ट होईल एवढी असेल आणि अशी फी अधीक्षकाकडून आकारण्यात येईल.

**१८. आकारणी.**—भूमापन क्रमांकावर निश्चित केलेल्या जमीन महसुलाच्या प्रमाणातील उपविभागांवरील आकारणी, क्षेत्रफळ व निरनिराळ्या उपविभागातील संबंधित मृदविषयक वर्गीकरण यानुसार कलम ८७, पोट-कलम (१), खंड (ब) च्या परंतुकास अधीन राहून काढण्यात येईल. राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून संचालकांकडून तपशीलवार निदेश विहित करण्यात येतील आणि त्यास, दहा पैशांच्या अपूर्णांकाचे पूर्णांकात रूपांतर करता येईल :

परंतु फॅक्टर प्रमाणावर जमिनीचे वर्गीकरण करण्यात येत असलेल्या नागपूर, चांदा, वर्धा व भंडारा आणि अमरावती जिल्ह्यांतील मेलघाट तालुका येथे भूमापन क्रमांकावर निश्चित केलेल्या उपविभागाची प्रमाणशीर आकारणीचे प्रमाण, नियम ३ अन्वये उपविभागाच्या क्षेत्राच्या प्रमाणात करण्यात येईल.

१९. **मळईच्या जमिनीचे उपविभाग पाडणे.**—संलग्न जमिनीच्या धारकाखेरीज इतर व्यक्तीच्या कायदेशीर भोगवटयात असलेल्या मळईच्या जमिनीचे उपविभाग पाडण्यात यतील आणि त्यांचा समावेश संलग्न भूमापन क्रमांकात करण्यात येईल.

२०. **एकत्रीकरण केलेल्या गावातील भूमापन क्रमांक.**—कलम ४ च्या उपबंधान्वये गावाचे एकत्रिकरण केल्यानंतर अधिक लोकवस्ती असलेल्या गावातील भूमापन क्रमांक पूर्ववत ठेवण्यात येतील, आणि इतर गावामधील भूमापन क्रमांकांना अधिक लोकवस्तीच्या गावातील अखेरच्या भूमापन क्रमांकापासून सुरुवात करून पुनः क्रमांक देण्यात येतील. रद्द केलेले क्रमांक नवीन क्रमांकाच्या खाली कंसामध्ये दर्शविण्यात येतील.

२१. **नवीन गावातील भूमापन क्रमांक.**—कलम ४ च्या उपबंधान्वये एका गावाची दोन किंवा अधिक गावामध्ये विभागणी केल्यावर नवीन गावातील भूमापन क्रमांकास, प्रत्येक बाबतीत क्रमांक १ पासून सुरुवात करून नवीन क्रमांक देण्यात येतील. रद्द केलेले क्रमांक नवीन क्रमांकाच्या खालच्या बाजूस कंसामध्ये दर्शविण्यात येतील.

२२. **भूमापन क्रमांक आणि उपविभाग यांची अभिलेखामध्ये नोंद करणे.**—अधिनियमाचे कलम ६८ व प्रकरणे ५, ६ व ७ अन्वये भूमापन केलेल्या जमिनीचे क्षेत्र आणि अशा क्षेत्रामधील जमीन महसुलाची आकारणी यांची नोंद करण्यात येईल :—

(अ) जमिनीचा वापर शेतीच्या प्रयोजनार्थ करण्यात येत असल्यास भूमापन क्रमांकाच्या बाबतीत नमुना 'अ' मध्ये आणि शेतीखेरीज इतर प्रयोजनार्थ जमिनीचा वापर करण्यात येत असल्यास नमुना 'ब' मध्ये ; आणि

(ब) जमीन ठाणे, कुलाबा व रत्नागिरी जिल्हयांच्या सीमामध्ये असल्यास भूमापन क्रमांकाच्या उपविभागाच्या बाबतीत नमुना 'क' मध्ये व जमीन राज्याच्या इतर कोणत्याही जिल्हयाच्या सीमामध्ये असल्यास नमुना 'ड' मध्ये अशी नोंद ठेवण्यात येईल.

## नमुना 'अ'

(नियम २२ पहा)

गाव ................, तालुका ................ १९.........

| भूमि नोंदवही दर एकरी प्रमाण दर | कोरडवाहू | बागायती | भात, वरकस व इतर | गाव | जमाबंदी भूमापन सुरू केल्याचे व समाप्तीचे वर्ष, गट २ हप्त्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| भूमापन क्रमांक | धारणाधिकार | एकूण क्षेत्र | वजा — लागवडीस अयोग्य, आकारणी न केलेले व शेतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | कृषिविषयक आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रकार | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | हेक्टर आर | रु. पै. |

## नमुना 'अ' — चालू

### लागवडयोग्य जमिनीचा तपशील व आकारणी

| कोरडवाहू | | | बागायती | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रकार | क्षेत्र | आकारणी | प्रकार | क्षेत्र | आकारणी |
| (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| | हेक्टर आर | रु. पै. | | हेक्टर आर | रु. पैसे |
| | | | | | |

| भात | | | वरकस व इतर | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रकार | क्षेत्र | आकारणी | प्रकार | क्षेत्र | आकारणी |
| (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) |
| | हेक्टर आर | रु. पैसे | | हेक्टर आर | रु. पैसे |
| | | | | | |

नमुना 'अ'—चालू

| (१२), (१५) व (१८) मध्ये समाविष्ट असलेला पाण्याचा तपशील | | जाण्यायेण्याचे सार्वजनिक अधिकार व सुविधाधिकार | फेरफाराचा तपशील | बदल मंजूर करणारे आदेश | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| प्रकार | रक्कम | | | | |
| (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) |
| | | | | | |

गोषवारा

| | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|
| | हेक्टर आर | रु. पैसे |
| ए.—लागवडीकरिता जमीन.— | | |
| एक–आकारणी केलेली— | | |
| (अ) भोगवट्यातील खालसा जमीन— | | |
| (एक) सर्वसाधारण धारणाधिकार | | |
| (दोन) निर्बंधित धारणाधिकार | | |
| (ब) भोगवट्यात नसलेली खालसा जमीन | | |
| (क) विनामूल्य जमीन किंवा विशेष करारनाम्याद्वारे आकारणीतून मुक्त केलेली किंवा कमी आकारणी केलेली जमीन. | | |
| (ड) इनाम (कृषीतर प्रयोजनार्थ वापरात असलेली— ——हेक्टर आर). | | |
| एकूण आकारणी | | |

गोषवारा—चालू

| | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|
| | हेक्टर आर | रु. पैसे |
| दोन (अ) आकारणी न केलेली.— | | |
| (ब) आकारणी न केलेली व विशेष वापराकरिता राखून ठेवलेली (उदा. कृषिक्षेत्र, भात पैदास केंद्र इत्यादी). | | |
| एकूण—ए .. | | |

बी.—लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन.—

एक—लागवडीस अयोग्य.—

| | | |
|---|---|---|
| (अ) पोट-खराब .. .. .. | | |
| (ब) नद्या व नाले .. .. .. | | |
| एकूण .. .. | | |

दोन.—सार्वजनिक व विशेष वापराकरिता राखून ठेवलेली जमीन.—

| | | |
|---|---|---|
| (अ) वन (जंगल व भूखंड—हेक्टर आर) .. .. | | |
| (ब) कुरण .. .. .. .. | | |
| (क) गायरान, गुरांचे गोठे .. .. .. | | |
| (ड) गावठाण .. .. .. .. | | |
| (इ) तलाव .. .. .. .. | | |
| (एफ) दफनभूमि .. .. .. .. | | |
| (ग) रेल्वे .. .. .. .. | | |
| (ह) पोट-खराब, रस्ते, जलमार्ग इत्यादींकरिता राखून ठेवलेली .. | | |
| (आय) रस्ते व मार्ग .. .. .. | | |
| (ज) कटक जमिनी (सैनिकांची छावणी, गोळीबाराच्या टप्प्यातील क्षेत्र). | | |
| (के) शाळा .. .. .. .. | | |
| (एल) धर्मशाळा .. .. .. .. | | |
| एकूण .. .. | | |

मोखबारा—चालू

तीन.—(उपयोगाचे रूपांतर केल्यानंतर) कृषीतर प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेले किंवा दिलेले भूमापन क्रमांक—

(अ) बंगले किंवा इतर निवासी इमारती .. ..

(ब) कारखाने, गिरण्या किंवा औद्योगिक इमारती ..

(क) विटांच्या भट्ट्या, लाकडाच्या वखारी इत्यादी (न बांधलेल्या)

(ड) खेळांची मैदाने .. .. ..

(इ) मिठागरे .. .. .. ..

(फ) शाळा .. .. .. ..

(ग) धर्मशाळा .. .. .. ..

एकूण .. ..

एकूण—बी ..

गावांची एकूण बेरीज ..

तपासले (तारीख) ...............

(सही) ..............
तलाठी.

सही ..............
जमाबंदी कारकून.

दिनांक :

(सही) ..............
तहसीलदार.

## नमुना 'ब'

(नियम २२ पहा)

### कृषीतर भोगवटयातील जमिनींची नोंदवही

गावाचे नाव ...................... तालुका ...........

| अनुक्रमांक | जमिनीचे वर्णन | क्षेत्र | जमिनीच्या प्रदानाचे स्वरूप व अटी | भोगाधिकार मूल्याची रक्कम, कोणतीही असल्यास |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | हेक्टर आर | | रु. पैसे |

| वार्षिक महसूल | ज्या मुदतीकरिता महसूल निश्चित करण्यात आली ती मुदत | | प्राधिकरण | पहिल्या पट्टेदाराचे किंवा हमीदाराचे नाव | शेरा (प्रत्येक नोंदीच्या बाबतीत तहसील-दाराने सही करावी) |
|---|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | | |
| (६) | (७) | | (८) | (९) | (१०) |
| रुपये पैसे | | | | | |

## नमुना 'क'

(नियम २२ पहा)

**ठाणे, कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यामधील वापराकरिता असलेले क्षेत्र व आकारणी यांची नोंदवही**

गाव................, तालुका................, जिल्हा..............

**उपविभाग क्रमांक व फाळणी क्रमांक**

| अनुक्रमांक | भू-मापन क्रमांक | उप-विभाग क्रमांक, फाळणी क्रमांक | एकूण क्षेत्र | पोट-खराब किंवा शेतीस अयोग्य | कृषियोग्य | आकारणी | उप-विभाग क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | रु. पै. | |

**नवीन उपविभागाचा क्रमांक**

| उपविभागाचा व उप-विभाग बनला आहे तो फाळणी क्रमांक | एकूण क्षेत्र | पोट-खराब किंवा शेतीस अयोग्य | कृषि योग्य | तात्पुरती आकारणी | उपविभागाची एकूण आकारणी | भोगवटादाराचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| | | | | रु. पै. | रु. पै. | | |

## नमुना 'ड'

(नियम २२ पहा)

**ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यातील वापराकरिता असलेल्या जमिनीच्या उपविभागाचे क्षेत्र व आकारणी यांची नोंदवही.**

गाव ................., तालुका ................, जिल्हा .............

| भूमापन क्रमांक उपविभाग क्रमांक | क्षेत्र | शेतीस अयोग्य | लागवड योग्य क्षेत्र | आकारणी | जमिनीचा वर्ग | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | हेक्टर आर | | हेक्टर आर | रु. पै. | | हेक्टर आर |

| उपविभाग क्रमांक | क्षेत्र | शेतीस अयोग्य | कृषियोग | धारणाधिकार | क्षेत्र | शेतीस अयोग्य |
|---|---|---|---|---|---|---|
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | हेक्टर आर | | | | हेक्टर आर | |

नमुना 'ड'—चालू

| कृषि योग्य | जमिनीची आणेवारी | पाण्याची आणेवारी | लांबी कि. मी. मैल | दर एकरी आकारणी | तात्पुरती आकारणी | अंतिम आकारणी |
|---|---|---|---|---|---|---|
| (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) |
| | | | | रु. पै. | रु. पै. | |

| दुसऱ्या फेर-तपासणीतील वाढ किंवा घट | तिसऱ्या फेर तपासणीतील वाढ किंवा घट | उपविभागाची एकूण, अंतिम आकारणी | अधिक (+) किंवा उणे (—) | उपविभागाची अंतिम कायमची आकारणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) |
| | | रु. पै. | | रु. पै. | |

स्वामिपत्रा-विषयीचा विशेषाधिकार.

८८. राज्य सरकारच्या प्राधिकारान्वये कोणत्याही जमिनीचे प्राथमिक भूमापन एकदा पूर्ण, मान्य व कायम करण्यात आल्यानंतर , कोणत्याही इसमास, ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये उक्त जमिनीचे त्यानंतर पुन्हा भू-मापन करण्याच्या प्रयोजनासाठी अशा जमिनीसंबंधातील त्याची स्वामित्वपत्रे दाखल करण्यास किंवा त्यातील मजकूर जाहीर करण्यास, भाग पाडता कामा नये.

ह्या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेले भू-मापन हे ह्या प्रकरणान्वये केले असण्याचे समजणे.

८९. यापूर्वी, केलेले आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा अन्यथा, सुरू करण्यात आलेले, आणि ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस चालू असलेले कोणतेही भू-मापन हे , ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल.

# प्रकरण ६

## शेतजमिनीच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी

९०. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, ह्या प्रकरणात— अर्थ-विवरण.

(अ) "वर्गवारीची किमत" या संज्ञेचा अर्थ, जमिनीचा प्रकार, तिचे स्थान, पाणी व इतर फायदे लक्षात घेऊन भू-मापन अभिलेखात नोंद केल्याप्रमाणेची जमिनीची सापेक्ष किमत असा समजावा आणि तीत नागपूर, चांदा, वर्धा, भंडारा या जिल्ह्यातील आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालुक्यातील घटक साधनाचे प्रमाण (फॅक्टर स्केल) यांच्या आधारावर जमिनीच्या प्रकारच्या स्वरूपात तिचे जे मूल्य दर्शविण्यात आले असेल त्या मुल्याचा समावेश होतो.

(ब) "जमिनीचा वर्ग" म्हणजे जमिनीचा पुढीलपैकी कोणताही वर्ग उदाहरण वरकस, कोरडवाहू, भाताची जमीन किंवा बागायत जमीन ;

(क) "घटक साधन प्रमाण" म्हणजे, जमिनीच्या वर्गावारीच्या मंजूर योजनेत समाविष्ट केलेल्या जमिनीच्या प्रकाराचे सापेक्ष मूल्य ;

(ड) "गट" या संज्ञेचा अर्थ, जमीन महसुलाच्या आकारणीच्या कारणासाठी तेच प्रमाण दर लागू करण्यासाठी कलम ९४, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टींच्या संबंधाने ज्या जमिनी राज्य सरकारच्या मते किंवा याबाबतीत त्याने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या मते पुरेशा एकजिनसी असतील अशा, एखाद्या प्रदेशातील सर्व जमिनी असा समजावा ;

(इ) "जमाबंदी" या संज्ञेचा अर्थ, जमीन महसुलाची आकारणी ठरविण्यासाठी एखाद्या प्रदेशात चालविलेल्या कामकाजातून निष्पन्न झालेली कार्यवाही असा समजावा ;

(फ) गटातील एखाद्या विशिष्ट जमिनीच्या बाबतीत "प्रमाण दर" म्हणजे त्या वर्गाच्या सोळा आणे किमतीच्या वर्गवारीच्या जमिनीवरील दर एकरी पिकांच्या सरासरी उत्पन्नाच्या एक पंचविसांशापेक्षा अधिक नाही अशी किमत ;

**स्पष्टीकरण.**—ज्या क्षेत्रासाठी घटक श्रेणी (फॅक्टर स्केल) अस्तित्वात असेल अशा खंड (अ) मध्ये उल्लेखिलेल्या क्षेत्रामध्ये, "सोळा आणे वर्गीकरणाची जमीन" म्हणजे राज्य शासनान विहित केल्याप्रमाणेच्या सोळा आणे वर्गीकरणानुरुप असतील असे घटक श्रेणीतील मृद एकमान (Soil Units) असणारी जमीन.

**टीप ४८.**—कृपया कलम १०२ खालील टीप क्रमांक ५३ पहा.

(ग) "जमाबंदीची मुदत" या संज्ञेचा अर्थ, राज्य सरकारने, ज्या मुदतीसाठी जमाबंदी अंमलात राहील असे जाहीर केले असेल ती मुदत, असा समजावा ;

(ह) "प्रदेश" या संज्ञेचा अर्थ, एक किंवा त्याहून अधिक जिल्ह्यातील तालुक्यांचा किंवा तालुक्यांचा गट किंवा त्याचे भाग यांच्या बनलेला जो स्थानिक प्रदेश राज्य सरकारच्या किंवा याबाबतीत प्राधिकार दिलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या मते—

(१) जमिनीचा बाह्य आकार,

(२) हवामान व पर्जन्यमान,

(३) सदरहू स्थानिक क्षेत्रात उत्पन्न करण्यात येणारी मुख्य पिके ; आणि

(४) जमिनीची वैशिष्ट्ये,

यांच्या संबंधात संलग्न आणि एकजिनसी असेल तो प्रदेश, असा समजावा.

९१. (१) कलम ९२ अन्वये कोणत्याही जमिनीच्या जमाबंदीसंबंधी किंवा नवीन जमाबंदीसंबंधी निदेश देण्यापूर्वी, राज्य सरकारने, जमाबंदीचे संभवनीय निष्कर्ष काय होतील याचा अंदाज तयार करण्याची व्यवस्था, या कारणासाठी देण्यात येतील त्या अनुदेशानुसार करविली पाहिजे. जमाबंदी-संबंधी अंदाज.

(२) जमीन महसुलाची निश्चिती किंवा पुनरीक्षण आणि ज्या कालावधीसाठी जमाबंदी करावयाची असेल तो कालावधी यासंबंधीच्या अंदाजावर, आधारलेल्या योजनेसह जमाबंदी करण्याचा राज्य सरकारचा इरादा असल्याची नोटीस, हरकती मागविण्यासाठी, राज्य सरकार ठरवील अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात आली पाहिजे.

(३) असा अंदाज व योजना राज्य विधानमंडळाचे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी एकवीस दिवसाहून कमी नाही इतक्या मुदतीत त्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या प्रत्येक सदस्याकडे पाठविल्या पाहिजेत.

(४) योजनांमध्ये फेरफार करू इच्छिणाऱ्या राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सदस्याने याबाबतच्या प्रस्तावाची सुचना अधिवेशन सुरू होण्याच्या दिवसापर्यंत दिली पाहिजे आणि अशा प्रस्तावावर प्रत्येक सभागृहाची चर्चा करण्यासंबंधीची व्यवस्था राज्य सरकारने केली पाहिजे.

(५) जमाबंदीसंबंधीचे निदेश देण्यापूर्वी, राज्य सरकारने, उक्त अंदाजाशी आणि दोन्ही सभागृहाचे ज्यावर एकमत झाले असेल अशा योजनांशी संबंधित असा कोणत्याही ठराव स्वीकारला पाहिजे आणि संबंधित इसमांकडून येतील अशा कोणत्याही हरकती विचारात घेतल्या पाहिजेत.

**कोणत्याही जमिनीच्या जमीन महसुलाची प्राथमिक जमाबंदी करण्याबद्दल किंवा जमाबंदीत फेरफार करण्याबद्दल आदेश देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.**

९२. कलम ९१ च्या उपबंधास अधीन राहून, राज्य सरकारास, कोणत्याही जमिनीच्या जमीन महसुलाची जमाबंदी (जिचा यात यापुढे "प्राथमिक जमाबंदी" म्हणून उल्लेख केला आहे), किंवा अशा जमिनीच्या नव्याने जमाबंदी (जिचा यात यापुढे "फेरतपासणी केलेली जमाबंदी" म्हणून उल्लेख केला आहे) करण्याबद्दल कोणत्याही वेळी निदेश देण्याचा अधिकार आहे मग त्या जमिनीचे कलम ७० अन्वये महसूली भू-मापन करण्यात आलेले असो वा नसो :

परंतु त्या त्या वेळी अंमलात असलेल्या जमाबंदीची मुदत संपण्यापूर्वी, आकारणीत केलेली कोणतीही वाढ अंमलात येणार नाही.

**जमाबंदीची मुदत.**

९३. जमाबंदी ही तीस वर्ष अंमलात राहील आणि अशी मुदत संपल्यानंतर, ही जमाबंदी नव्या जमाबंदीची मुदत सुरू होईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

**आकारणी निश्चित करणे.**

९४. (१) ज्या जमिनीच्या संबंधात कलम ९२ अन्वये जमाबंदी करण्याबद्दल निदेश देण्यात आला आहे आणि ज्या जमिनीचा महसूल देण्याबाबत संपूर्णतः माफी देण्यात आलेली नाही अशा सर्व जमिनीवरील जमीन महसुलाची आकारणी ही, कलम ६८, पोट-कलम (१) च्या पहिल्या परंतुकामध्ये अंतर्भूत असलेल्या मर्यादास अधीन राहून , ज्या जमिनीची जमाबंदी करावयाची आहे त्या जमिनीचे राज्य शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमानुसार गट पाडून आणि प्रत्येक गटासाठी प्रमाण दर ठरवून, ठरविण्यात आली पाहिजे.

(२) गट बनविताना ह्या पोट-कलमाच्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टी सामान्यतः विचारात घेण्यात आल्या पाहिजेत, परंतु आवश्यक असेल तेव्हा खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेल्या गोष्टीही त्या कारणासाठी विचारात घेण्यात आल्या पाहिजेत :—

(अ) (१) जमिनीचा बाह्य आकार ;

(२) हवामान व पर्जन्यमान ;

(३) किमती ; आणि

(४) मुख्य पिकांचे उत्पन्न.

(ब) (१) बाजार ;

(२) दळणवळण ;

(३) मशागतीचा दर्जा ;

(४) लोकसंख्या व मजुरांचा पुरवठा ;

(५) शेतीविषयक उत्पन्नाची साधने ;

(६) भोगवटयात असलेल्या व लागवड केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळातील गेल्या तीस वर्षातील फेरफार ;

(७) मजुरी ;

(८) जमिनीची लागवड करण्याकरिता वेतनाच्या स्वरूपात आलेला मजुरीचा खर्च धरून मुख्य पिकांच्या लागवडीसाठी येणारा साधारण खर्च.

(३) प्रत्येक भू-मापन क्रमांक व पोट-विभाग यावरील जमीन महसुलाची आकारणी ही जमाबंदी अधिकाऱ्याने त्यांच्या प्रतबंदीच्या किंमतीवर विहित [४९] केलेल्या रीतीने ठरविली पाहिजे.

टीप ४९.—कृपया कलम १०२ खालील टीप ५३ पहा (नियम १३ पहा).

**धारकांच्या खर्चाने केलेल्या सुधारणामुळे सरासरी उत्पन्नात झालेली वाढ, ही वाढ विचारात घेता कामा नये.**

९५. कोणत्याही, जमिनीत ती धारण करणाराने किंवा त्याच्या खर्चाने कोणत्याही सुधारणा केलेल्या असतील तर उक्त सुधारणांमुळे अशा जमिनीच्या पिकांच्या सरासरी उत्पन्नातील वाढ ही त्या जमिनींची फेरआकारणी ठरविताना विचारांत घेता कामा नये.

**जमाबंदी अधिकाऱ्याने जमाबंदीचे काम कसे सुरू करावे.**

९६. जमाबंदी करतांना जमाबंदी अधिकाऱ्याने पुढीलप्रमाणे काम चालविले पाहिजे :—

(१) त्याने जमाबंदी करावयाच्या जमिनीची, कलम [५०] मध्ये तरतूद केल्याप्रमाणे गटामध्ये विभागणी केली पाहिजे ;

(२) त्याने, जमाबंदीच्या कारणांसाठी जमिनीच्या पिकांचे सरकारी उत्पन्न विहित केलेल्या रीतीने निश्चित केले पाहिजे ;

(३) त्यानंतर त्याने, कलम ९४ , पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे संबंधित गोष्टींचा विचार करून, प्रत्येक गटांतील जमिनीच्या प्रत्येक वर्गासाठी प्रमाण दर ठरविले पाहिजेत ;

(४) ह्या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेल्या रीतीने, त्याने, या कलमाच्या प्रयोजनाकरिता चौकशी केली पाहिजे ;

(५) त्याने, जमाबंदीबाबतच्या त्याच्या योजना असलेले प्रतिवृत्त (ज्यास यात यापुढे "जमाबंदीचे प्रतिवृत्त" असे म्हटले आहे) विहित केलेल्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजे.

**टीप ५०.—कृपया कलम १०२ खालील टीप क्रमांक ५३ पहा (नियम ५, ६, ७ व ८ पहा).**

**जमाबंदी प्रतिवृत्त छापणे व प्रसिद्ध करणे.**

९७. (१) जमाबंदी प्रतिवृत्त सादर करण्यात आल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याने असे प्रतिवृत्त विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) प्रत्येक गावात एक नोटीसही मराठी भाषेत प्रसिद्ध केली पाहिजे व अशा नोटीशीत उक्त गावातील जमिनीच्या प्रत्येक वर्गासाठी चालू असलेला प्रमाण दर आणि जमाबंदी अधिकाऱ्याने त्यात सुचविलेली वाढ किंवा घट नमूद केली पाहिजे. तसेच उक्त नोटिशीत, कोणत्याही इसमास, अशा नोटिशीच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत, जमाबंदीच्या प्रतिवृत्तात दिलेल्या योजनेसंबंधी असलेल्या त्याच्या हरकती त्या जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी सादर करता येतील असे नमूद केले पाहिजे.

टीप ५१.—कृपया कलम १०२ खालील टीप क्रमांक ५३ पहा (नियम ९ व १० पहा).

**हरकती वगैरेच्या निवेदना-सहित व त्यावरील जिल्हाधिकाऱ्याच्या अभिप्रायासह जमाबंदी प्रतिवृत्त सरकारला सादर करणे.**

९८. जिल्हाधिकाऱ्याने, त्याच्याकडे ज्या हरकती आल्या असतील त्या विचारास घेतल्यानंतर, राज्य सरकार निदेश देईल अशा अधिकाऱ्यामार्फत, उक्त जमाबंदीचे प्रतिवृत्त, त्यावरील त्याच्या शेऱ्यासह राज्य सरकारकडे पाठविले पाहिजे.

**महसूल न्यायाधिकरणाकडे निर्णयासाठी बाब पाठविणे.**

९९. जिल्हाधिकाऱ्याने कलम ९७ अन्वये प्रसिद्ध केलेल्या प्रतिवृत्तामुळे [illegible]वर अन्याय झाला आहे असे वाटत असणाऱ्या इसमास, कलम ९७, पोट-कलम (२) अन्वयेच्या नोटिशीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे बाब निर्णयासाठी पाठवावी म्हणून राज्य शासनाकडे अर्ज करता येईल. अशा इसमाने विहित[52] करण्यात येईल अशी खर्चाची रक्कम अनामत ठेवल्यानंतर, राज्य शासनाने, महसूल न्यायाधिकरणाकडे चौकशीसाठी प्रतिवृत्त पाठविण्यासंबंधी निदेश दिला पाहिजे. महसूल न्यायाधिकरणाने, विहित[52] केलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर, उपस्थित केलेल्या हरकतीवर आणि राज्य शासन विचारार्थ पाठवील अशा इतर बाबींवर आपले स्वतःचे मत सादर केले पाहिजे. राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा प्रकरणामध्ये, सर्व खर्च किंवा त्याचा कोणताही भाग परत करण्यासाठी नियम करता येतील.

टीप ५२.—कृपया कलम १०२ खालील टीप क्र. ५३ पहा (नियम ११ पहा).

**जमाबंदीच्या प्रतिवृत्तावरील आदेश.**

१००. (१) जमाबंदीच्या प्रतिवृत्तावर कोणत्याही हरकती आल्या असल्यास, त्या हरकतीसह अशा प्रतिवृत्तावर आणि कलम ९९ अन्वये महसूल न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ पाठविलेल्या बाबींवर न्यायाधिकरणाचे कोणतेही मत असल्यास, त्यावर, राज्य शासनाकडून विचार करण्यात येईल. राज्य शासनास अशा प्रतिवृत्तीवर त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु, अशा दरांचा परिणाम ज्या गावावर झाला असेल अशा प्रत्येक गावात, कलम ९७ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे नवीन नोटीस लावल्याशिवाय आणि कोणत्याही हरकती आल्या असल्यास त्यावर राज्य शासनाकडून विचार करण्यात आल्याशिवाय, राज्य शासनाने, जमाबंदीच्या प्रतिवृत्तात सुचविलेल्या प्रमाण दरात कोणतीही वाढ करता कामा नये. ह्या कलमाचे उपबंध, शक्य होईल तेथवर, अशा वाढीच्या संबंधात देण्यात येतील अशा आदेशास लागू होतील.

(२) जमावंदीच्या प्रतिवृत्तावर कोणत्याही हरकती आल्या असल्यास, त्या हरकतीसह असे प्रतिवृत्त आणि कलम ९९ अन्वये महसूल न्यायाधिकरणाकडे निर्णयार्थ पाठविलेल्या बाबीवर न्यायाधिकरणाचे कोणतेही मत असल्यास, ते मत आणि राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये दिलेले आदेश राज्य विधान-मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील.

(३) राज्य शासनाने दिलेले आदेश अंतिम असतील आणि कोणत्याही न्यायालयाकडून त्यावर हरकत घेण्यात येणार नाही.

१०१. (१) राज्य सरकारास, कलम १०० अन्वये आदेश देतेवेळी, पाण्यापासून होणाऱ्या कोणत्याही फायद्याबद्दल किंवा निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या फायद्याबद्दल, ह्या प्रकरणान्वयेच्या आकारणीपासून कोणत्याही जमिनीस सूट देण्याचा अधिकार आहे.

पाण्याच्या फायद्याबद्दल-च्या आकारणीची माफी देण्याचा राज्य सरकारचा अधिकार.

(२) राज्य सरकारास, संबंधित गावामध्ये मराठी भाषेत नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर आणि अशी नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून सहा महिन्याची मुदत संपल्यानंतर, जमावंदीच्या मुदतीत कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) अन्वये त्याने मंजूर केलेली कोणतीही सूट काढून घेता येईल आणि अशा जमिनीवर अशा फायद्याबद्दल आकारणी बसविली पाहिजे असा निदेश देता येईल.

१०२. राज्य सरकारने, कलम १०० अन्वये आदेश दिल्यानंतर आणि त्याबद्दलची नोटीस विहित केलेल्या रीतीने दिल्यानंतर, जमाबंदीचे काम सुरू करण्यात आल्याचे समजण्यात आले पाहिजे. आणि अशा जमावंदीनुसार असलेला जमीन महसूल राज्य सरकार निदेश देईल त्या तारखेपासून बसविण्यात आला पाहिजे:

जमावंदीची सुरुवात.

परंतु, ह्या कलमान्वये ज्या वर्षी प्राथमिक जमाबंदी किंवा फेरतपासणी केलेली जमाबंदी सुरू करण्यात येईल त्यावेळी त्या जमिनीवरील नवीन आकारणी ही पूर्वीच्या आकारणीपेक्षा अधिक असल्यास अशा सर्व जुन्या व नवीन आकारणीत जो फरक असेल त्याची सूट देण्यात आली पाहिजे आणि फेरतपासणी केलेली आकारणी ही लगतपुढील वर्षापासून बसविण्यात आली पाहिजे :

तसेच, ज्या वर्षी कोणतीही प्राथमिक किंवा फेरतपासणी झालेली जमाबंदी सुरू केली असेल अशा वर्षाच्या लगतपुढील वर्षी ज्या भोगवटादारास त्याने धारण केलेल्या भू-मापन क्रमांकापैकी कोणत्याही भू-मापन क्रमांकावर किंवा त्याच्या पोट-विभागावर अशा नवीन आकारणीमुळे दरात झालेली वाढ नापसंत असेल अशा इसमास त्याने कलम ५५ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने असा क्रमांक किंवा पोट-विभाग सोडून दिल्यावर अशा रीतीने बसविलेल्या दरातील वाढीची सूट मिळेल.

**टीप ५३.**—कृपया ४८, ४९, ५०, ५१ व ५२ या टीपाही पहा (नियम १२ पहा.).

**शेतजमिनीवरील जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी याविषयी नियम**

[शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-१८६७—आर दिनांक २० सप्टेंबर १९७१ अन्वये सुधारलेली शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१८६७—आर. दि. २५ नोव्हेंबर १९७०.]

**१. संक्षिप्त नाव.**—या नियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (शेतजमिनीवरील जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी) नियम, १९७० असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात,—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६

(ब) "नमुना" म्हणजे, या नियमांना जोडलेला नमुना ;

(क) "कलम" म्हणजे अधिनियमाचे कलम.

३. **परिमंडळाची रचना करणे.**—राज्याच्या कोणत्याही भागातील शेतजमिनीवरील जमीन महसुलाच्या जमाबंदीच्या प्रयोजनार्थ, जमाबंदी आयुक्त, ज्या जमिनीच्या बाबतीत कलम ९२ अन्वये जमाबंदी करण्याचा निदेश देण्यात आला असेल अशा जमिनीची विभागणी कलम ९० च्या खंड (ह) च्या उपबंधाच्या अनुसार करील.

४. **गटांची रचना करणे.**—नियम ३ अन्वये परिमंडलाची रचना करण्यात आल्यानंतर, परिमंडलाच्या संबंधात नेमलेला जमाबंदी अधिकारी, कलम ९४, पोट-कलम (२) चे उपबन्ध विचारात घेऊन, परिमंडलातील जमिनीची गटामध्ये विभागणी करील आणि नियम ५ मध्ये विहित केलेल्या रीतीने चौकशी करील.

५. **जमाबंदी अधिकाऱ्याने चौकशी करणे.**—शेतजमिनीवरील जमीन महसुलाची जमाबंदी करताना जमाबंदी अधिकारी, परिमंडलाची महसूलविषयक मागील माहिती, राज्य शासनाने हाती घेतलेल्या विकासविषयक कार्याचा परिणाम याची संपूर्ण तपासणी करील आणि आकारणी केल्यामुळे परिमंडलातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर, झालेल्या सर्वसाधारण परिणामाचे स्वरूप निश्चित करील. तो, पुढील बाबीच्या संबंधात आणि पुढे दिलेल्या रीतीने, परिमंडलाशी संबंधीत असलेली माहिती गोळा करील :—

(एक) **जमिनीचा बाह्य आकार.**—परिमंडलातील जमिनीच्या बाह्य आकारासंबंधीची माहिती परिमंडलामध्ये जमाबंदी अधिकाऱ्याने जातीने केलेल्या चौकशीवर व पाहणीवर आधारलेली असेल ;

(दोन) **हवामान व पर्जन्यमान.**—हवामानासंबंधीची माहिती, जमाबंदी अधिकाऱ्याने परिमंडलामध्ये जातीने पाहणी करून आणि स्थानिक चौकशी करून केलेल्या अधिक्षणावर आधारलेली असेल. जमाबंदी अधिकारी, ज्या वर्षामध्ये जमाबंदीची चौकशी करण्यात येईल त्या वर्षाच्या पूर्ववर्ती तीस वर्षातील पर्जन्यमानासंबंधीची आकडेवारी कृषि संचालकाकडून गोळा करील आणि ती, नमुना १ मध्ये, संकलित करील. तसेच, तो, परिमंडलातील हंगामासंबंधीची माहिती, कृषि संचालकाकडून गोळा करील आणि तिची राज्य शासनाने परिमंडलाच्या संबंधात काढलेल्या वार्षिक जमीन महसूलाविषयक प्रशासकीय अहवालाच्या किंवा इतर अहवालाच्या संदर्भात पडताळणी करील.

(तीन) **किंमती.**—जमाबंदी अधिकारी, परिमंडलातील प्रत्येकजण पणन केंद्रामध्ये गत दहा वर्षात असलेल्या मुख्य पिकांच्या प्रत्येक क्विंटलची घाऊक किंमत आणि प्रत्येक किलोची किरकोळ किंमत यासंबंधीची माहिती, कृषि संचालकाकडून घेईल आणि ती नमुना २ मध्ये संकलित करील. पिकांपैकी कोणत्याही पिकाचे एकापेक्षा अधिक जातीचे पीक काढण्यात येत असेल तर, जमाबंदी अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा जातीच्या किंमती जमा करण्यात येतील :

परंतु ज्या ठिकाणी कृषि संचालकास अशी माहिती पुरविणे शक्य नसेल त्या बाबतीत अशा पिकांच्या विक्रीसाठी उत्पादकांकडून परिमंडलातील ज्या पणन केंद्राचा वापर करण्यात येत असेल त्या केंद्रातील कृषि उत्पन्नाच्या अशा किंमती, स्थानिक चौकशीद्वारे जमा करण्यात येतील :

आणखी असे की, जर उपरोक्त मुदतीमध्ये, राज्य शासनाकडून कोणत्याही मुदतीसाठी कोणत्याही पिकाच्या किंमती नियंत्रित करण्यात आल्या असतील तर, अशा पिकांच्या बाबतीत, ज्या कालावधीत किंमती अशा प्रकारे नियंत्रित करण्यात येत नव्हत्या, त्या काळातील किंमती जमा करण्यात येतील.

त्यानंतर जमाबंदी अधिकारी प्रत्येक पणन केंद्रासंबंधी अशा रीतीने जमा केलेल्या घाऊक किंमतीची सरासरी काढून त्या नमुना ३ मध्ये संकलित करील.

त्यानंतर, जमाबंदी अधिकारी, नमुना ३ मध्ये गोळा केलेल्या माहितीच्या आधारे, खंड (चार) अन्वये, निवडलेल्या, गटामधील गावासंबंधातील पिकांच्या सरासरी घाऊक किंमती काढील आणि त्या नमुना ४ मध्ये संकलित करील ; अशा प्रकारे निश्चित केलेल्या सरासरी किंमतीस, गटासाठी असलेली जमाबंदी किंमत असे म्हणता येईल ;

(चार) **मुख्य पिकांचे उत्पन्न.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, जमाबंदी अधिकारी, जमाबंदी आयुक्ताच्या पूर्वमंजुरीने, गटातील गावांच्या एकूण संख्येच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतकी गटातील गावे निवडील. अशा प्रकारे निवडलेल्या गावांच्या संबंधात, जमाबंदी अधिकारी पूर्वीच्या दहा वर्षामधील किंवा उपलब्ध असेल त्याप्रमाणे त्यापेक्षा कमी कालावधीतील जिल्हाधिकारी व कृषि संचालक यांनी, पिकांवरील प्रयोगांच्या निष्कर्षाबाबत ठेवलेली माहिती त्याजकडून घेईल. तसेच, तो, पिकाबाबत प्रयोग करून किंवा विहिरी, गाळाची जमीन, बुडकी आणि पाटबंधारे यांसारखा जादा लाभ उपलब्ध नसलेल्या जमिनीच्या प्रत्येक वर्गामध्ये काढण्यात आलेल्या मुख्य पिकांचे प्रत्येक हेक्टरमधील सर्वसाधारण उत्पन्न व्यक्तिगत शेतकऱ्याचे लेखे तपासून निश्चित करील. निवडलेल्या गावांपैकी प्रत्येक गावाच्या बाबतीत, प्रत्येक हेक्टरचे सरासरी उत्पन्न दर्शविणारी, अशा प्रकारे गोळा केलेली माहिती, तो, नमुना

५ व ६ मध्ये कोष्टकवार तयार करील. आणि त्यावरून निवडलेल्या सर्व गावांमधील प्रत्येक हेक्टर-मधील उत्पन्नाची सरासरी काढील. असे उत्पन्न, गटाचे सरासरी उत्पन्न असेल. त्यानंतर, तो खंड (तीन) अन्वये निश्चित केलेल्या जमाबंदी किमतीनुसार अशा सरासरी उत्पन्नाचे नगदी मूल्य काढील.

(पाच) बाजारपेठा.—परिमंडलामधील बाजारपेठासंबंधीची माहिती, जमाबंदी अधिकाऱ्याने जातीने केलेल्या पाहणीवर व स्थानिक चौकशीवर, आधारलेली असेल ;

(सहा) दळणवळण.—परिमंडलामधील दळणवळणासंबंधीची माहिती, जमाबंदी अधिकाऱ्याने जातीने केलेल्या पाहणीवर व स्थानिक चौकशीवर आधारलेली असेल.

(सात) शेतीकामाचा दर्जा.—शेती कामाच्या दर्जासंबंधीची माहिती, जमाबंदी अधिकाऱ्याने जातीने केलेल्या पाहणीवर व त्या स्थानिक चौकशीवर, आधारलेली असेल ;

(आठ) लोकसंख्या व मजुरांची उपलब्धता.—जमाबंदी अधिकारी मागील जनगणनेच्या अहवाला-वरून व्यवसायानुसार परिमंडलातील लोकसंख्येसंबंधी माहिती गोळा करील आणि लोकसंख्येसंबंधीची माहिती, नमुना ७ मध्ये संकलित करील. तसेच तो, त्याने खंड (चार) अन्वये निवडलेल्या गावांपैकी प्रत्येक गावात मिळू शकतील अशा मजुरांच्या संख्येसंबंधी खात्री करून घेईल ;

(नऊ) शेतीविषयक उत्पन्नाची साधने.—जमाबंदी अधिकारी, पशुधन, शेतीची अवजारे आणि शेतीच्या उत्पन्नाची इतर साधने यांविषयीची आकडेवारी तहसीलदाराकडून मिळवील आणि ती नमुना ८ मध्ये संकलित करील ;

(दहा) भोगवटयात असलेल्या व लागवड केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळातील मागील तीस वर्षातील फेरफार.—जमाबंदी अधिकारी, भोगवटयात असलेल्या व लागवड केलेल्या जमिनीच्या क्षेत्रफळातील मागील तीस वर्षातील फेरफारासंबंधीची माहिती तहसीलदाराकडून मिळवील व ती, नमुना ९ व १० मध्ये संकलित करील ;

(अकरा) मजुरी.—जमाबंदी अधिकारी, मजुरीसंबंधीची माहिती, तहसीलदाराकडून मिळवील आणि स्वतः जातीने केलेल्या पहाणीवरून चौकशीच्या वर्षामधील विद्यमान मजुरीसंबंधीच्या माहितीची पडताळणी करील. तो, ती माहिती नमुना ११ मध्ये संकलित करील ;

(बारा) जमिनीची लागवड करण्याकरिता, वेतनाच्या स्वरूपात आलेला मजुरीचा खर्च धरून मुख्य पिकांच्या लागवडीसाठी येणारा सर्वसाधारण खर्च.—जमिनीची लागवड करण्याकरिता, वेतनाच्या स्वरूपात आलेला मजुरीचा खर्च धरून, मुख्य पिकांच्या लागवडीसाठी येणाऱ्या साधारण खर्चासंबंधीची माहिती, खंड (चार) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पिकांच्या प्रयोगांच्या आधारे किंवा व्यक्तिगत शेतकऱ्यांचे हिशोब तपासून गोळा करण्यात येईल.

६. **सरासरी उत्पन्न निश्चित करणे आणि प्रमाण दर.**—नियम ५ अन्वये चौकशी केल्यानंतर गोळा केलेल्या माहितीच्या आधारे जमाबंदी अधिकारी, राज्य शासनाच्या संमतीने, जमाबंदी आयुक्ताने दिलेल्या अनुदेशा-नुसार प्रथमतः प्रत्येक गटातील प्रत्येक हेक्टर जमिनीमधील पिकाचे सरासरी उत्पन्न निश्चित करील. नंतर जमाबंदी अधिकारी, सर्वेक्षण अभिलेखावरून जमिनीच्या प्रत्येक वर्गाचे सरासरी वर्गवारी मूल्य स्वतंत्रपणे काढील. त्याने अशा प्रकारे निश्चित केलेले सरासरी उत्पन्न हे अशा रीतीने काढलेल्या सरासरी वर्गवारीच्या बरोबरीचे जिचे वर्गीकरण मूल्य असेल अशा जमिनीचे उत्पन्न म्हणून समजण्यात येईल. नंतर तो त्रैराशिक नियमानुसार जमिनीच्या प्रत्येक वर्गाच्या सोळा आणे वर्गवारी असलेल्या जमिनीच्या उत्पन्नाचा अदाज काढील. नंतर तो, नियम ५, खंड (तीन) अन्वये निश्चित केलेल्या जमाबंदी किंमतीच्या दराने, प्रत्येक वर्गातील जमिनीच्या प्रत्येक हेक्टरमधील उत्पन्नाच्या मूल्याची गणना करील आणि कलम ९१ अन्वये तयार केलेल्या पूर्वानुमान प्रतिवेदन लक्षात घेऊन, कलम ९०, खंड (फ) च्या उपबंधानुसार, प्रत्येक गटातील जमिनीच्या प्रत्येक वर्गासाठी आकारणीचा प्रमाण दर निश्चित करील.

७. **सोळा आणे वर्गवारीशी अनुरूप मृद घटक.**—घटक साधन प्रमाण अस्तित्वात असेल अशा सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये, सोळा आणे वर्गवारीची जमीन म्हणजे, उक्त अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्या प्रमाणात मृद घटकांचा समावेश असलेली जमीन :—

अनुसूची

| अनुक्रमांक | क्षेत्र | सोळा आणे वर्गवारीशी अनुरूप असलेल्या मृद घटकांची संख्या. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | नागपूर जिल्हा .. .. .. | ५०. |
| २ | चांदा जिल्हा .. .. .. | जमाबंदी अधिकाऱ्याकडून जमाबंदी आयुक्तांच्या मंजुरीने अमलात असलेली पूर्वीची वर्गवारी लक्षात घेऊन, निश्चित करण्यात येतील असे ३६ ते ४८. |
| ३ | वर्धा जिल्हा .. .. .. | ४०. |
| ४ | भंडारा जिल्हा .. .. .. | ४०. |
| ५ | अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तालुका | ३२. |

८. **जमाबंदी प्रतिवृत्त.**—(१) जमाबंदी अधिकारी नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधित त्याने गोळा केलेली माहिती, त्याच्या जमाबंदी प्रतिवृत्तामध्ये समाविष्ट करील. प्रतिवृत्तामध्ये, त्याने केलेल्या प्रस्तावाची कारणे आणि त्यावेळी अंमलात असलेल्या जमाबंदीशी तुलना करता त्याच्या प्रस्तावामुळे होणारे परिणाम दर्शविणारे नमुना १२ मधील विवरण असेल.

(२) जमाबंदी अधिकारी, त्याने कलम ९६, पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकाऱ्यास सादर केलेल्या प्रतिवृत्ताच्या तीन प्रती, जमाबंदी आयुक्तास पाठवील व जमाबंदी आयुक्त, प्रतिवृत्ताच्या मराठी अनुवादाची व त्याच्या मुद्रणाची व्यवस्था करील.

९. **प्रत्येक गावामध्ये प्रतिवृत्त प्रसिद्ध करणे.**—जमाबंदी प्रतिवृत्त जिल्हाधिकाऱ्याकडून कलम ९७, पोट-कलम (२) अन्वये प्रसिद्ध केलेल्या नोटिशीसह प्रत्येक संबंधित गावामध्ये मराठीत प्रसिद्ध करण्यात येईल. ते नमुना १३ मध्ये असेल व चावडीमध्ये किंवा/आणि जेथे चावडी नसेल तेथे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात आणि जेथे ग्रामपंचायत नसेल तेथे अशा गावातील प्रमुख सार्वजनिक ठिकाणी आणि तसेच तालुका कार्यालयाच्या सूचना फलकावर तीन महिने मुदतीपर्यंत लावून प्रसिद्ध करण्यात येईल.

१०. **प्रतिवृत्त राज्य शासनाकडे पाठविणे.**—कलम ९७, पोट-कलम (२) अन्वये नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून तीन महिने झाल्यानंतर, जिल्हाधिकारी त्याच्याकडे आलेल्या हरकतीवरील, कोणत्याही असल्यास शेऱ्यासह शक्य तितक्या लवकर जमाबंदी प्रतिवृत्त जमाबंदी आयुक्ताकडे पाठवील ; जमाबंदी आयुक्त स्वतःच्या शेऱ्यासह, ते, विभागीय आयुक्ताकडे पाठवील. त्यानंतर, आयुक्त स्वतःच्या शेऱ्यासह व शिफारशीसह, ते, राज्य शासनाकडे सादर करील.

११. **महसूल न्यायाधिकरणाकडे निर्देश.**—(१) अधिनियमाच्या कलम ९९ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे जमाबंदी प्रतिवृत्ताचा निदश करण्यासाठी राज्य शासनास विनंती करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, शासकीय कोषागारात २०० रुपयांची रक्कम अनामत ठेवील. ती, राज्य शासनाकडे केलेल्या अर्जात प्रतिवृत्तावरील तिच्या हरकती व त्याबद्दलची कारणे नमूद करील.

(२) असा अर्ज मिळाल्यानंतर आणि पोट-नियम (१) मध्ये विहित केलेली रक्कम अर्जदाराने अनामत ठेवल्यानंतर, राज्य शासन, अर्जासह जमाबंदी प्रतिवृत्त चौकशीसाठी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे पाठविण्यात यावे असा निदेश देईल.

(३) अर्जासह जमाबंदी प्रतिवृत्त मिळाल्यानंतर महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणास, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, राज्य शासनाकडून किंवा अर्जदाराकडून किंवा इतर व्यक्तीकडून आणखी माहिती मागविता येईल. नंतर, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, चौकशीची तारीख, ठिकाण व वेळ निश्चित करील आणि राज्य शासनास व अर्जदारास त्यासंबंधी नोटीस देईल.

(४) राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात येईल असा अधिकारी राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करील. अर्जदारास चौकशीच्या वेळी लेखी विवरण सादर करण्याचा हक्क असेल ;

(५) चौकशी करण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस किंवा वेळोवेळी ज्या तारखेपर्यंत चौकशी स्थगित करण्यात येईल त्या तारखस, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, अर्जदाराची व राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करील.

(६) त्यानंतर, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, हरकतींवरील आणि राज्य शासनाने त्याच्याकडे निर्देशित केल्या असतील अशा इतर बाबींवरील आपले मत राज्य शासनास सादर करील. राज्य शासनाने न्यायाधिकरणात निदेश केल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, असे मत सादर करण्यात येईल.

(७) एकाच परिमंडलाच्या गटाच्या किंवा गावाच्या संबंधातील जमाबंदी प्रतिवृत्ताच्या संबंधात एकापेक्षा अधिक अर्ज आलेले असतील त्या बाबतीत महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणास, स्वेच्छानिर्णयानुसार, त्या बाबतीत संयुक्त चौकशी करता येईल.

(८) महसूल न्यायाधिकरणांचे निष्कर्ष संपूर्णत: अर्जदारास अनुकूल असतील तर, अनामत ठेवलेली संपूर्ण रक्कम त्यास परत देण्यात येईल. हरकती काही प्रमाणात स्विकारण्यात आल्या असतील तर, महसूल न्यायाधिकरण शिफारस करील असा, त्या रकमेचा भाग, त्यास परत देण्यात येईल. जर त्याच्या हरकती संपूर्णपणे फेटाळण्यात येतील, किंवा महसूल न्यायाधिकरणास त्या क्षुल्लक स्वरूपाच्या असल्याचे आढळून येईल तर, पोट-नियम (१) अन्वये त्याने अनामत ठेवलेली कोणतीही रक्कम त्यास परत मिळण्याचा हक्क असणार नाही.

१२. **जमाबंदी सुरू केल्याबद्दलची नोटीस.—**(१) कलम १०२ खालील नोटीस, नमुना १४ मध्ये असेल आणि ती, जिल्हाधिकाऱ्यांकडून, प्रत्येक संबंधित गावांमध्ये गावांतील चावडीमध्ये आणि जेथे चावडी नसेल तेथे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात आणि जेथे ग्रामपंचायत नसेल तेथे अशा गावातील प्रमुख सार्वजनिक ठिकाणी लावून, आणि तसेच दवंडी पिटून प्रसिद्ध करण्यात येईल ;

(२) अशी नोटीस राज्य शासनाकडूनसुद्धा शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल.

१३. **एकेका भू-मापन क्रमांकाची व उप-विभागाची आकारणी.—**(१) आकारणीचे प्रमाण दर राज्य शासनाकडून मंजूर करण्यात येतील तेव्हा, प्रत्येक भू-मापन क्रमांकावर किंवा उप-विभागावर लादण्यात येणारी आकारणी त्यात समाविष्ट असलेल्या जमिनीच्या सापेक्ष वर्गवारी मूल्याप्रमाणे, जमाबंदी आयुक्ताने तयार केलेल्या गणना तक्त्यानुसार निश्चित करण्यात येईल ;

(२) सुधारित जमाबंदीनंतर, प्रत्येक भू-मापन क्रमांकावर किंवा उप-विभागावर लादण्यात यावयाची आकारणी, अशा जमिनींच्या संबंधातील विद्यमान कमाल किंवा प्रमाण दरापेक्षा नवीन प्रमाण दरामध्ये जी वाढ किंवा घट झाली असेल त्याप्रमाणे, जुन्या आकारणीत वाढ किंवा घट करून, काढण्यात येईल

परंतु, अशा भू-मापन क्रमांकात किंवा उप-विभागात समाविष्ट असलेल्या जमिनीचे वर्गवारी मूल्य बदलले असेल किंवा इतर वाजवी किंवा पुरेशी कारणे असतील तर, पोट-नियम (१) च्या उपबंधानुसार आकारणीची गणना करण्यात येईल.

१४. **कलम ६८ अन्वये शेतजमिनीवर आकारणी करणे.**—(१) ज्या शेतजमिनींना जमीन महसूल देण्यात संपूर्ण माफी मिळालेली नसेल आणि ज्या जमिनीवर अधिनियमाच्या प्रकरण ६ च्या उपबंधानुसार आकारणी निश्चित करण्यात आलेली नसेल अशा सर्व शेतजमिनींवर जमीन महसूल म्हणून कलम ६८ अन्वये द्यावयाची आकारणीची रक्कम, पोट-नियम (२) ते (५) च्या उपबंधास अनुसरून रोख रकमेत निश्चित करण्यात येईल ;

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या व या नियमाच्या पोट-नियम (३) च्या उपबंधास अधीन, जिल्हाधिकारी,—

(अ) अधिनियमाच्या प्रकरण ६ अन्वये जमाबंदी केलेल्या गावातील, आकारणी न झालेल्या जमिनींच्या बाबतीत अशा गावातील जमिनीस लागू असलेल्या प्रमाण दराबरोबरीच्या दराने, प्रत्येक हेक्टरच्या आकारणीचा प्रमाणदर निश्चित करील ; त्यानंतर प्रत्येक स्वतंत्र धारणा जमिनीवरील त्याच्या धारकाने द्यावयाची आकारणी खंड (इ) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निश्चित करण्यात येईल ;

(ब) जमाबंदी न केलेल्या गावाच्या बाबतीत,—

(एक) जमिनीचा बाह्य आकार,

(दोन) हवामान व पर्जन्यमान,

(तीन) किंमती,

(चार) मुख्य पिकांचे उत्पन्न.

याबाबतीत एकसारख्या असणाऱ्या गावांचे गट करण्याची व्यवस्था करील.

(क) जमिनींचे पुढीलप्रमाणे चार वर्गांत वर्गीकरण करील :—
कोरडवाहू जमीन, भाताची जमीन, बागाईत व वरकस जमीन.

(ड) अशा प्रत्येक गटातील जमिनीच्या प्रत्येक वर्गाच्या प्रत्येक हेक्टरचा आकारणीचा प्रमाण दर, अशा जमाबंदी न केलेल्या गावाशी किंवा गावांशी सर्व भौतिक तपशीलाच्या बाबतीत साधर्म्य असलेल्या शेजारच्या, जमाबंदी केलेल्या गावामध्ये किंवा गावांमध्ये, अंमलात असलेल्या प्रमाण दर लक्षात घेऊन निश्चित करील.

**स्पष्टीकरण.**—खंड (अ) आणि (ड) च्या प्रयोजनार्थ, नागपूर, चांदा, वर्धा, भंडारा जिल्ह्यांतील आणि अमरावती जिल्ह्याच्या मेलघाट तालुक्यातील, जमाबंदी केलेल्या गावांच्या बाबतीत अंमलात असलेला प्रमाण दर हा, नियम ७ मधील अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये उल्लेखिलेले मृद घटक असलेल्या जमिनींकरिता, प्रत्येक हेक्टरसाठी अंमलात असलेल्या आकारणी दराच्या आधारे काढलेला दर असेल.

(इ) (एक) अधिनियमाच्या प्रकरण ५ अन्वये, प्रत्येक स्वतंत्र धारण जमिनीचे भू-मापन व वर्गीकरण अगोदरच केलेले असेल त्या बाबतीत, प्रत्येक स्वतंत्र धारण जमिनीकरिता तिच्या धारकाने द्यावयाची आकारणी खंड (अ) किंवा (ड) अन्वये निश्चित केलेल्या प्रमाणदराने अशा प्रकारे केलेल्या भू-मापनाच्या व वर्गीकरणाच्या आधारे, निश्चित करील ;

(दोन) अधिनियमाच्या प्रकरण ५ अन्वये प्रत्येक स्वतंत्र धारण जमिनीचे भू-मापन व वर्गीकरण करण्यात आलेले नसेल त्या बाबतीत पुढील प्रत्येक प्रकाराच्या म्हणजेच :—

(१) कोरडवाहू,

(२) भाताची,

(३) बागाईत, आणि

(४) वरकस.

जमिनीचे, मुख्य पिकांचे उत्पन्न लक्षात घेऊन पुढील उपवर्गामध्ये वर्गीकरण करील :—

(१) उत्तम,

(२) मध्यम,

(३) हलकी.

आणि नंतर, प्रत्येक स्वतंत्र धारण जमिनीकरिता, तिच्या धारकाने द्यावयाची आकारणी खंड (अ) किंवा यथा-स्थिती (ड) अन्वये निश्चित केलेल्या, जमिनीच्या गटास किंवा वर्गास, जमीन महसूल अभिलेखामध्ये, नोंद, केल्याप्रमाणे व जेथे ती इतर प्रकारे मोजण्यात आली असेल त्या बाबतीत असे क्षेत्र हेक्टरमध्ये रूपांतरित करून अशा धारण जमिनीच्या क्षेत्राच्या आधारे, चांगल्या जमिनीस समुचित प्रमाणदर, मध्यम जमिनीसाठी उक्त दराच्या २/३ दर व कनिष्ठ प्रतीच्या जमिनीसाठी उक्त दराच्या १/३ दर लागू करून निश्चित करील.

(३) पोट-नियम (२) चा खंड (ड) आणि (इ) अन्वये आकारणीचा दर किंवा रक्कम निश्चित करताना, जिल्हाधिकारी, ज्यावेळी तो जमिनीच्या किंवा यथास्थिती धारण जमिनीच्या बाबतीत आकारणी निश्चित करील, त्यावेळी, तिच्या संबंधात देय असलेला आकारणीचा दर किंवा आकारणीची रक्कम विचारात घेईल.

(४) पोट-नियम (२) च्या खंड (इ) अन्वये निश्चित केलेली आकारणी, चालू महसुली वर्षात अंमलात राहील आणि त्यानंतर ती, पोट-नियम (५) अनुसार जिल्हाधिकाऱ्यांकडून सुधारण्यात येईपर्यंत किंवा हा नियम ज्या जमिनींना लागू असेल त्या जमिनीची, अधिनियमाच्या प्रकरण ५ अन्वये जमाबंदी करण्यात येई-पर्यंत यापैकी जी अगोदरची मुदत असेल तोपर्यंत, अंमलात असल्याचे चालू राहील.

(५) पूर्ववर्ती पोट-नियमान्वये आकारणीचा दर किंवा रक्कम सुधारताना जिल्हाधिकारी, पुढील गोष्टी विचारात घेईल :—

(एक) जमिनीचा एकजिनसीपणा व पीक पद्धती यांच्या आधारे, त्या गटाची ज्या क्षेत्राशी तुलना करता येईल त्या क्षेत्रात विद्यमान असलेला आकारणीचा दर ;

(दोन) प्रत्येक स्वतंत्र धारण जमिनीचे अधिनियमाच्या प्रकरण ५ अन्वये, भू-मापन व वर्गीकरण करण्यात आले ही वस्तुस्थिती.

## नमुना १

[नियम ५ (२) ]

................ जिल्ह्यातील ................ येथील ................ वर्षात नोंदलेले पर्जन्यमान.

| वर्ष | प्रारंभीचा पाऊस (१ जानेवारी ते १० एप्रिल) | | पावसाळया पूर्वीचा (११ एप्रिल ते ४ जून) | | खरीप हंगामातील पाऊस (५ जून ते १४ ऑगस्ट) | | रब्बी हंगामातील पाऊस (१५ ऑगस्ट ते २१ ऑक्टोबर) | | उशिरा पडलेला पाऊस (२२ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर) | | एकूण | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पडलेला पाऊस मि. मी. | पावसाच्या दिवसांची संख्या | पडलेला पाऊस मि. मी. | पावसाच्या दिवसांची संख्या | पडलेला पाऊस मि. मी. | पावसाच्या दिवसांची संख्या | पडलेला पाऊस मि. मी. | पावसाच्या दिवसांची संख्या | पडलेला पाऊस मि. मी. | पावसाच्या दिवसांची संख्या | पडलेला पाऊस मि. मी. | पावसाच्या दिवसांची संख्या | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | | | | | | | | | | | | | |
| सरासरी .. | | | | | | | | | | | | | |

टीप.—गेल्या तीस वर्षांतील आकडेवारी गोळा केली पाहिजे.

## नमुना २

[नियम ५ (तीन)]

................ तालुक्यातील ............................. जिल्ह्यातील

................. पासून ................. पर्यंत विद्यमान असलेल्या किमती

परिमंडलाचे नाव :

गटाचे नाव : तालुका : जिल्हा :

| वर्ष | बाजार केंद्राचे नाव | किरकोळ किमती दर किलोला रुपये | | | | | | | | घाऊक किमती दर क्विंटलला रुपये | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तालुक्यात काढण्यात येणाऱ्या मुख्य पिकांसाठी | | | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |

**टीप.**—मागील ३–१० वर्षांचे आकडे देण्यात येतील.

---

## नमुना ३

[नियम ५ (तीन)]

**बाजार केंद्रामधील मुख्य पिकांच्या किमतीची सरासरी.**

परिमंडलाचे नाव :

| बाजार केंद्राचे नाव (१) | वर्ष (२) | प्रत्येक मुख्य पिकाची दर क्विंटलची सरासरी किमत | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ज्वारी (३) | बाजरी (४) | कापूस (५) | तांदूळ (६) | तूर (७) |
| | | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. |

**टीप.**—(१) परिमंडलातील सर्व बाजार केंद्रांसाठी आवश्यक पिकांकरिता हा नमुना तयार करण्यात आला पाहिजे.

(२) दर वर्षाची किमत ही जमाबंदी आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेल्या महिन्यांमधील किमतीची सरासरी असली पाहिजे.

(३) दर वर्षाची किमतीची सरासरी कशा रीतीने काढण्यात आली हे दर्शविणारे विवरण जमाबंदी अधिकाऱ्याने जतन करून ठेवले पाहिजे.

**नमुना ४**

[नियम ५ (तीन) ]

निवडलेल्या गावातील प्रमुख पिकांच्या किंमतीची सरासरी

परिमंडल :

गट :

| निवडलेल्या गावाचे नाव | बाजार केंद्राचे नाव | बाजार केंद्रातील घाऊक किंमत | | | वजाती | | | गावातील किंमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | बाजरी | ज्वारी | कापूस | गाडीभाडे | जकात | इतर वजात | बाजरी | ज्वारी | कापूस |
| (१) | (२) | ३ (अ) | ३ (ब) | ३ (क) | ४ (अ) | ४ (ब) | ४ (क) | ५ (अ) | ५ (ब) | ५ (क) |
| | | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. |
| | सरासरी किंमत .. | | | | | | | | | |

**टीप.**—(१) जमाबंदी अधिकाऱ्याने प्रत्येक निवडलेल्या गावासाठी असलेल्या बाजार केंद्राची खातरजमा केली पाहिजे आणि केंद्रासाठी नमुना ३ मध्ये काढण्यात आल्याप्रमाणे स्तंभ ३ भरला पाहिजे.

(२) जमाबंदी अधिकारी, काळजीपूर्वक चौकशी करून, स्तंभ ४ (अ), ४ (ब) आणि ४ (क) खालील वजातींची खातरजमा करून घेईल.

(३) स्तंभ ५ (अ), ५ (ब) आणि ५ (क) मधील आकड्यांची बेरीज करण्यात येऊन साधी सरासरी काढण्यात येईल.

(४) हा नमुना, प्रत्येक गटासाठी, वेगवेगळा तयार करण्यात येईल.

## नमुना ५

[नियम ५ (चार)]

### प्रत्येक मुख्य पिकाचे प्रत्यक्ष उत्पन्न दर्शविणारे विवरण.

परिमंडल .................... गट ........... जिल्हा ...........

पीक : मिश्र बाजरी (बाजरी, तूर, कुळीथ)

| निवड केलेल्या गावाचे नाव (१) | प्रयोगाचे वर्ष (२) | हंगामाचे स्वरूप (३) | अभिकरण (४) | भू-मापन क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| जमिनीचा वर्ग | | | | |
|---|---|---|---|---|
| वरकस ६ (अ) | कोरडवाहू ६ (ब) | भाताची ६ (क) | बागायती ६ (ड) | वर्गीकरणाचे मूल्य ७ |
| | | | | |

| ज्या क्षेत्राशी उत्पन्न संबंधित असेल ते क्षेत्र | | | (किलोग्रॅममध्ये) प्रत्यक्ष उत्पन्न | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | उत्तम क्षेत्र | | |
| उत्तम ८ (अ) | मध्यम ८ (ब) | कनिष्ठ ८ (क) | बाजरी ९ (अ) | तूर ९ (ब) | कुळीथ ९ (क) |
| | | | | | |

| (किलोग्रॅममध्ये) प्रत्यक्ष उत्पन्न | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मध्यम क्षेत्र | | | कनिष्ठ क्षेत्र | | |
| बाजरी | तूर | कुळीथ | बाजरी | तूर | कुळीथ |
| १० (अ) | १० (ब) | १० (क) | ११ (अ) | ११ (ब) | ११ (क) |
| | | | | | |

(१) वर्णानुक्रमे लावलेल्या गटातील सर्व निवडलेल्या गावांसाठी वरील माहिती कोष्टकवार तयार करावयाची आहे.

(२) ही माहिती जिल्हाधिकारी, कृषि विभाग आणि जमाबंदी अधिकाऱ्याने स्वत: केलेले प्रयोग धरून केलेली स्थानिक चौकशी याद्वारे गोळा करावयाची आहे. स्थानिक चौकशीतील आकडे हे, विनिर्दिष्ट शेतातून मिळालेल्या विनिर्दिष्ट उत्पन्नाचे असतील आणि जमाबंदी अधिकाऱ्याकडून ते विश्वसनीय मानण्यात येतील.

(३) प्रत्येक गावासाठी दर वर्षअखेरीस स्तंभ ८-अ ते ११-क पर्यंतच्या स्तंभांची बेरीज करण्यात येईल.

(४) स्तंभ ७ मधील माहिती, भूमि अभिलेखांमधून घेण्यात येईल आणि वर्गीकृत न केलेल्या जमिनींसाठी तो कोरा ठेवण्यात येईल.

(५) स्तंभ ८, ९, १० आणि ११ च्या प्रयोजनांसाठी, ११ आणे व अधिक वर्गीकरण मूल्य असलेली जमीन उत्तम म्हणून समजण्यात येईल, सहा आण्यांपासून सुरू होऊन आणि अकरा आण्यांपेक्षा कमी मूल्य असलेली मध्यम म्हणून आणि सहा आण्यांहून कमी हलकी जमीन समजण्यात यईल. जमिनीचे वर्गीकरण करण्यात आले नसेल तेव्हा स्थानिक चौकशीद्वारे पोट वर्ग निश्चित करण्यात येतील.

(६) पिकांच्या कापणीच्या प्रयोगांमधून प्रत्यक्ष उत्पन्नाचे आकडे मिळतील तेव्हा ते, पिके वाळविल्या-नंतरचे किंवा त्यातील आर्द्रता किती प्रमाणात कमी करावी या बाबतचा कृषि विभागाकडून आलेला निष्कर्ष लावल्यानंतरच्या उत्पन्नाचे असतील.

(७) प्रत्येक गटातील, जमिनीच्या प्रत्येक वर्गातील मुख्य पिकांपैकी प्रत्येक मुख्य पिकासाठी तत्सम नमुने तयार करण्यात येतील.

(८) मिश्र पिकांच्या बाबतीत, अशा प्रकारच्या मिश्र पिकास एकेरी पीक समजण्यात येईल आणि प्रत्येक क्षेत्रासाठी, शेतातील प्रत्येक पिकाच्या स्तंभ ८(अ), ८(ब), ८(क) मधील उत्पन्नासंबंधी निश्चित माहिती मिळविण्यात येईल आणि ती, यथोचित अशा स्तंभ ९(अ) ते ११(क) मध्ये नमूद करण्यात येईल. पीक, एकेरी पीक असल्यास, स्तंभ ९(क), १०(क), ११(क) कोरे ठेवण्यात येतील.

(९) मिश्र पिकांच्या बाबतीत, मुख्य धान्यासंबंधीचे पिकांच्या प्रयोगाचे निष्कर्ष उपलब्ध असतील तेव्हा, इतर अंगभूत पिकासाठीचे संबंधित उत्पन्न, स्थानिक चौकशी करून, नमूद करण्यात येईल.

नमुना ६

[नियम ५ (चार)]

गटांमधील दर हेक्टरचे सरासरी उत्पन्न दर्शविणारे विवरणपत्र

परिमंडल : गट :

| निवड केलेल्या गावाचे नाव | पुढील कालावधी मिळून बनणारे वर्ष | स्तंभ २ मधील मुदतीतील उत्पन्न ज्या क्षेत्राशी संबंधित असेल ते सरासरी क्षेत्र | | |
|---|---|---|---|---|
| | | उत्तम | मध्यम | हलकी |
| (१) | (२) | (३अ) | (३ब) | (३क) |
| | १९ —१९ | | | |
| | १९ —१९ | | | |
| | १९ —१९ | | | |

**स्तंभ ३ मधील क्षेत्रासंबंधातील स्तंभ २ मधील मुदतीसाठी सरासरी उत्पन्न**

| मिश्र बाजरी | | | मिश्र ज्वारी | | | मिश्र कापूस इत्यादी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तम | मध्यम | हलकी | उत्तम | मध्यम | हलकी | उत्तम | मध्यम | हलका |
| (४अ) | (४ब) | (४क) | (५अ) | (५ब) | (५क) | (६अ) | (६ब) | (६क) |
| | | | | | | | | |

नमुना ६—चालू.

| स्तंभ १ मधील गावातील प्रत्येक गावाचे दर हेक्टरचे सरासरी उत्पन्न | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मिश्र बाजरी | | | मिश्र ज्वारी | | | मिश्र कापूस इत्यादी | | |
| उत्तम (७अ) | मध्यम (७ब) | हलकी (७क) | उत्तम (८अ) | मध्यम (८ब) | हलकी (९क) | उत्तम (९अ) | मध्यम (९ब) | हलका (९क) |
| | | | | | | | | |

| गटातील दर हेक्टरचे सरासरी उत्पन्न | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मिश्र बाजरी | | | मिश्र ज्वारी | | | मिश्र कापूस | | |
| उत्तम १०(अ) | मध्यम १०(ब) | हलकी १०(क) | उत्तम ११(अ) | मध्यम ११(ब) | हलकी ११(क) | उत्तम १२(अ) | मध्यम १२(ब) | हलका १२(क) |
| | | | | | | | | |

**टीप.**—(१) (४अ) ÷ (३अ) = (७ अ) स्तंभामधील उत्पन्न, त्याचप्रमाणे (४ब) ÷ (३ब) = (७

(ब) स्तंभ ; (४क) ÷ (३क) = (७क) आणि त्याप्रमाणे पुढे · · · · · · · · · · ·

(२) स्तंभ (१०अ) मधील उत्पन्न = $\frac{\text{निवड केलेल्या सर्व गावांच्या संबंधातील (७ अ) ची बेरीज.}}{\text{निवड केलेल्या गावांची संख्या.}}$

स्तंभ (१०ब) $\frac{\text{निवड केलेल्या सर्व गावांच्या संबंधातील (७ब)ची बेरीज}}{\text{निवड केलेल्या गावांची संख्या.}}$ आणि त्याचप्रमाणे पुढे.....

नमुना ७

[नियम ५ (आठ)]

धंद्यानुसार लोकसंख्येचा तपशील

परिमंडळ :

| शेतीचा व्यवसाय करणारांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|
| जमिनीत हितसंबंध असलेले | | शेतमजूर | एकूण | (शेती व्यतिरिक्त) कृषितर व्यवसाय करणारांची संख्या |
| कुळे आणि पोट-हिस्सेदार | इतर जमीनधारक | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

टीप.—मागील जमाबंदीच्या वेळचे आकडे प्रथम देण्यात यावेत. त्याखाली उपलब्ध असलेले नवीनतम आकडे नमूद करण्यात यावेत.

## नमुना ८

[नियम ५ (नऊ)]

१९ या वर्षातील..............गावे, ..............तालुका, ...............जिल्हा येथील शेतीतील पशुधन व कृषि विषयक साधने.

| गावांची संख्या | गुरेढोरे | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नांगरण्यासाठी | | पैदास करण्यासाठी | | इतर प्रयोजनांसाठी | | दुभती गुरे | | वत्सधन | |
| | बैल | रेडे | वळू | रेडे | बैल | रेडे | गायी | म्हशी | वासरे | रेडकू |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | |

| एकूण | घोडे आणि तट्टू | मेंढ्या | बकरे | नांगर | | गाड्या | | इतर उपकरणे | बैल जोडीच्या नांगराच्या पिकाखालील जमीन हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | लहान | मोठे (म्हणजेच एक जोडीहून अधिक गुरांचा) | प्रवाश्यांसाठी | उत्पन्न व माल यांसाठी | | |
| (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) |
| | | | | | | | | | |

**टीप.**—मागील जमाबंदीच्या वेळचे आकडे प्रथम देण्यात यावेत. त्याखाली उपलब्ध नवीनतम आकड्यांचा उल्लेख करण्यात यावा.

## नमुना ९

[नियम ५ (दहा)]

**परिमंडल :**

................वर्षाचा..................जिल्ह्यातील..................तालुक्याच्या लागवडीचा आणि पिकांचा तपशील

| प्रत्येक गटातील गावांचा गट आणि गावांची संख्या | लागवडीखालील आणि लागवडीखाली न आणलेले क्षेत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पेरलेले एकूण क्षेत्र | पिकाखालील क्षेत्राच्या दुप्पट क्षेत्र वजा करणे | आकारणी न केलेली, पेरणी झालेली जमीन वजा करणे | आकारणी केलेले पिकाखालील निव्वळ क्षेत्र | पडीक जमीन जमा करणे | लागवडीकरिता भोगवटयात असलेले एकूण क्षेत्र | भोगवटयात नसलेली लागवडी योग्य पडित जमीन | |
| | | | | | | | आकारणी केलेली | आकारणी न केलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| जमाबंदी वर्ष— | | | | | | | | |
| १९४७-४८ .. .. | | | | | | | | |
| १९५७-५८ .. .. | | | | | | | | |
| १९६७-६८ .. .. | | | | | | | | |

नमुना ९—चालू

| लागवडीखालील आणि लागवडीखाली नसलेले क्षेत्र | | एकूण क्षेत्र | स्तंभ २ चा तपशील धान्ये आणि कडधान्ये | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लागवडीसाठी उपलब्ध नसलेले | | | तांदूळ | गहू | बार्ली | ज्वारी | बाजरी | रागी (नाचणी) | मका |
| वन | लागवडी योग्य नसलेले धरून इतर | | | | | | | | |
| (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) |
| | | | | | | | | | |

स्तंभ २ मधील तपशील धान्ये व कडधान्ये

| हरभरा | मूग | उडीद | मठ | वाल | चवळी | कुळीथ | वाटाणा | मसूर | इतर धान्ये व कडधान्ये | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) | (३०) |
| | | | | | | | | | | |

मसाले आणि मसाल्याचे पदार्थ

| वेलदोडा | मिरची | आले | हळद | बडीशेप | धणे | जिरे | लसूण | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) | (३९) |
| | | | | | | | | |

नमुना ९—चालू

| पिठूळ पदार्थ आरारूट | साखर | | तेलबिया | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊसाची | ताडाच्या झाडाची | अळशी | तीळ | राईस व सरसू | भुईमूग | सरकी | नारळ | करडई |
| (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) | (४८) | (४९) |
| | | | | | | | | | |

| तेलबिया—चालू | | | तंतू | | | | रंग | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कारळे | इतर | एकूण | कापूस | बॉम्बे हेम्प (ताग) | ताग | इतर | नीळ | इतर |
| (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) | (५७) | (५८) |
| | | | | | | | | |

| | औषधीद्रव्ये व गुंगीकारक द्रव्ये | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कॉफी | चहा | तंबाखू | गांजा | विड्याची पाने | सुपारी | ओवा | एकूण | वैरण |
| (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) | (६६) | (६७) |
| | | | | | | | | |

| [illegible]गुळारहित फळे आणि भाजीपाला | | संकीर्ण | | गवत आणि बाभळी | पडीक जमिनीचा (आवश्यक असल्याप्रमाणे) तपशील | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गवार | इतर | खाद्य | अखाद्य | | अल्प पाऊस | काटेरी निवडुंग आणि तण | खारेपणामुळे पडीत | ठराविक काळानंतर पडीत ठेवलेली जमीन | एकूण | |
| (६८) | (६९) | (७०) | (७१) | (७२) | (७३) | (७४) | (७५) | (७६) | (७७) | (७८) |
| | | | | | | | | | | |

## नमुना १०

[नियम ५ (दहा)]

परिमंडल :

.................. गावे, .................. तालुका, .................. जिल्हा यामधील [illegible]

पडित इत्यादी जमिनींचा .................. वर्षापासून .................. वर्षापर्यंतचा वर्गवार तपशील.

| वर्ष | एकूण | भोगवटयातील क्षेत्र | | सरकारी पडीत जमीन | वन | इतर | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडीखालील | पडीत | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |

टीप.—मागील ३० वर्षांचे आकडे देण्यात यावेत.

## नमुना ११

[नियम ५ (अकरा)]

..................पासून..................पर्यंतचे..................

गाव..........तालुका..........जिल्हा..............यांमध्ये अस्तित्वात असलेली शेतमजुरी दर्शविणारे विवरण.

| वर्ष | शेतमजुरी |
|---|---|
| (१) | (२) |
| | |

टीप.—मागील ३० वर्षांचे आकडे देण्यात यावेत.

नमुना १२

(नियम ८)

.......................... तालुका .......... जिल्हा यांमधील शासनाच्या भोगवट्यातील जमिनीवर सुधारित जमाबंदी [illegible] होणारा परिणाम.

| अनुक्रमांक | गावाचे नाव | गट क्रमांक | पूर्वीच्या जमाबंदीद्वारे | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रमाण दर | | | |
| | | | कोरडवाहू पीक | तांदूळ | बागायती | रक्कम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

| पूर्वीच्या जमाबंदीद्वारे—चालू | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोरडवाहू पिके | | | तांदूळ | | | बागायती | | |
| क्षेत्र | आकारणी | सरासरी | क्षेत्र | आकारणी | सरासरी | क्षेत्र | आकारणी | सरासरी |
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| | | | | | | | | |

| पूर्वीच्या जमाबंदी द्वारे—चालू | | | | | | सुधारित जमाबंदीद्वारे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | वरकस | | एकूण | | | प्रमाण दर | | | |
| क्षेत्र | आकारणी | सरासरी | क्षेत्र | आकारणी | सरासरी | कोरडवाहू पीक | तांदूळ | बागायती | वरकस |
| (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) |
| | | | | | | | | | |

सुधारित जमाबंदीद्वारे—चालू

| | कोरडवाहू पीक | | तांदूळ | | | बागायती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्र | आकारणी | सरासरी | क्षेत्र | आकारणी | सरासरी | क्षेत्र | आकारणी | सरासरी |
| ( ) | (२८) | (२९) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) |
| | | | | | | | | |

## नमुना १२—चालू

| सुधारित जमाबंदी—चालू | | | | | | वाढ किंवा घट यांची टक्केवारी | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वरकस | | | एकूण | | | | |
| क्षेत्र (३६) | आकारणी (३७) | सरासरी (३८) | क्षेत्र (३९) | आकारणी (४०) | सरासरी (४१) | (४२) | (४३) |
| | | | | | | | |

## नमुना १३

(नियम ९)

### महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ९७(२) खालील नोटीस

जमाबंदी अधिकाऱ्याने प्रस्तावित केलेल्या प्रमाण दरासंबंधीची नोटीस

खाली उल्लेखिलेली ············ *गावे, ············ तालुका, ········· जिल्हा यातील लोकांना याद्वारे माहिती करून देण्यात येत आहे की, शेतीसाठी वापरण्यात येत असलेल्या उक्त गावामधील जमिनीची सुधारित आकारणी लौकरच अंमलात येणार असून उक्त गावांची पुढील गटामध्ये विभागणी करण्याचे योजिले आहे, प्रत्येक गटातील विद्यमान व प्रस्तावित प्रमाण दर पुढील सूचीत त्याच्या समोर दर्शविण्यात आले आहेत:—

| गटातील गावांची नावे | विद्यमान जमाबंदीनुसार प्रत्येक हेक्टरचे प्रमाण दर | | | सुधारित जमाबंदीनुसार ठरविलेले प्रत्येक हेक्टरचे प्रमाण दर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोरडवाहू पीक | तांदूळ | बागायती | कोरडवाहू पीक | तांदूळ | बागायती | वरकस |
| | रु. पै. | रु. पै. | रु. पै. | रु. प. | रु. पै. | रु. पै. | रु. पै. |
| गट एक .. | | | | | | | |
| गट दोन .. | | | | | | | |
| गट तीन .. | | | | | | | |

***सुधारित जमाबंदीखाली येत नसली तरीही ज्यामध्ये सुधारित जमाबंदीमध्ये समाविष्ट केलेल्या सरकारी बिनदुमाला जमिनी आहेत अशी इनाम गावे यात समाविष्ट आहेत.**

**जेथवर ········· गावाचासंबंध असेल तेथवर, गावाची आकारणी रुपयात/पैशानी वाढली**

————————आहे.

कमी झाली

या नोटिशीबरोबरच, जमाबंदी अधिकाऱ्याच्या प्रतिवृत्ताची प्रत त्याच्या परिशिष्टासह गावातील चावडीत/ग्रामपंचायतीच्या कार्यालयात/ इतर सार्वजनिक ठिकाणी आणि तालुक्याच्या कार्यालयात चिकटविण्यात आली असून ती हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस पाहण्यासाठी खुली आहे.

कोणत्याही व्यक्तीस जमाबंदी प्रतिवृत्तामध्ये अंतर्भूत असलेल्या प्रस्तावावरील आक्षेप जिल्हाधिकाऱ्याकडे या नोटीशीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत [illegible] सादर करता येतील.

प्रतिवृत्तामुळे नुकसान झाले आहे असे वाटणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस या नोटिशीच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत, शासकीय कोषागारात खर्चादाखल २०० रुपये जमा करून महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे प्रतिवृत्त विचारार्थ पाठविण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज करता येईल.

माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक शिक्का जिल्हाधिकारी

नमुना १४

(नियम १२)

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम १०२ खालील नोटीस

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम १००, पोट कलम (१) अन्वये तालुक्यातील गावातील / खालील उल्लेख केलेली गावे यामधील ज्या जमिनी आता प्रत्यक्षात केवळ शेतीच्या प्रयोजनासाठीच वापरण्यात येत असतील अशा जमिनीच्या आणि भोगवट्यात नसलेल्या लागवडीयोग्य (परंतु पोट खराब म्हणून वर्गवारी लावलेल्या जमिनीव्यतिरिक्त जमिनीच्या आकारणी संबंधातील सुधारित / ——— जमाबंदीस मान्यता देत असून, उक्त अधिनियमाच्या कलम १०२ अन्वये याद्वारे नोटीस देत आहे की, खाली* मूळ ...... सोबतच्या आकारबंदात नमूद केल्याप्रमाणे प्रमाण दरानुसार अनुकूल परिगणना केलेली उक्त आकारणी .......... तारखेपासून बसविण्यात येईल आणि ती, तीस वर्षे मुदतीपर्यंत अमलात राहील आणि नवीन जमाबंदीच्या मुदतीचा प्रारंभ होईपर्यंत ती अमलात असण्याचे चालू राहील.

| जमिनीचा प्रकार<br>(१) | प्रमाण दर<br>(२) | †विद्यमान आकारणीच्या रुपयातील अदमासे वाढ किंवा घट<br>(३) |
|---|---|---|
| | रु. पै. | रु. पै. |
| कोरडवाहू पिकांची .. .. | .. | |
| भातशेतीची .. .. | .. | |
| बागायतीची .. .. | .. | |
| वरकस .. .. | .. | |

*सुधारित जमाबंदीच्या वेळी वर्गीकरणाच्या मूळ तत्त्वात फेरबदल करण्यात आल्यास मूळ जमाबंदीतील "खालील" या शब्दाऐवजी दाखल करण्यात येईल.

†मूळ जमाबंदीच्या बाबतीत किंवा सुधारित जमाबंदीच्या वेळी वर्गीकरणाच्या मूळ तत्त्वात फेरबदल करण्यात येईल तेव्हा वगळण्यात येईल.

२. कलम ९२ अन्वये राज्य शासनाने जमाबंदीचा निदेश दिल्यानंतर जी बांधकामे करण्यात आली असतील परंतु जमीन धारकाने किंवा जमीन धारकाच्या खर्चाने जी करण्यात आली नसतील आणि ज्यासाठी मुंबई पाटबंधारे अधिनियम, १८७९ अन्वये कोणतीही पाणीपट्टी आकारण्यात आली नसेल अशी पाटबंधाऱ्याची नवीन बांधकामे केल्यामुळे किंवा पाटबंधाऱ्याच्या विद्यमान बांधकामात सुधारणा केल्यामुळे मिळणाऱ्या पाण्यापासून ज्या जमिनीचा जो आणखी फायदा झाला असेल त्याबद्दल, ही जमाबंदी चालू राहील त्या मुदतीत कोणत्याही अशा जमिनीवर कलम १०५ अन्वयेची नोटीस दिल्यापासून सहा महिने झाल्यानंतर, अतिरिक्त जमीन महसूल आकारण्याची शक्ती शासन, स्वतःकडे राखून ठेवीत आहे.

३. कलम १०१ (१) अन्वये —— सर्व जमिनींना / खाली नमूद केलेल्या जमिनींना —— पाण्यापासून त्यांना मिळणाऱ्या कोणत्याही लाभाची / खाली विनिर्दिष्ट केलेल्या लाभाची —— याद्वारे माफी देण्यात येत आहे :—

| गावाचे नाव | जमिनीचा प्रकार | कामाचा प्रकार आणि पाण्याचे साधन |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |

ही माफी कलम १०१ (२) अन्वये, आवश्यक असल्याप्रमाणे ६ महिन्यांची नोटीस काढून घेता येईल.

४. स्थानिक सार्वजनिक उपयुक्तता आणि सुधारणा यासंबंधीच्या बाबीवर खर्चासाठी निधीची तरतूद करण्याच्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ किंवा त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीअन्वये/विधीद्वारे अनुज्ञेय असतील अशा दराहून अधिक नसेल असा उपकर आकारणीव्यतिरिक्त, बसविण्यात येईल.

**शिक्का** **सही**

**दिनांक :** पदनाम

**महसूल मुक्त जमीन धारण करण्या-संबंधीचा दावा.**

**१०३.** (१) जो कोणताही इसम, सर्वस्वी किंवा अंशत: जमीन महसूल माफ असलेली जमीन धारण करण्यासंबंधात सरकारविरुद्ध हक्क सांगत असेल त्याने आपला हक्क जमाबंदी अधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने शाबित केला पाहिजे.

(२) तो इसम तशा प्रकारे आपला हक्क सिद्ध करील तर राज्य सरकारच्या आदेशाकरिता ते प्रकरण पाठविण्यात आले पाहिजे.

**जमीन महसूल देण्याबाबत संपूर्णत: माफी दिलेल्या जमिनीवरील आकारणी.**

**१०४.** (१) ह्या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे जमाबंदी अधिकाऱ्यास, जमीन महसुलाची संपूर्णत: माफी असलेल्या जमिनीवर योग्य पूर्ण आकारणी ठरविण्यास आणि त्याची नोंद करण्यास प्रतिबंध होतो असे समजता कामा नये.

(२) अशा रीतीने ठरविलेली व नोंद केलेली आकारणी ही सूट काढून घेण्यात आल्यानंतर लगेच, आकारणीयोग्य होईल आणि ह्या प्रयोजनाकरिता ह्या प्रकरणाच्या उपबंधानुसार ती निश्चित करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

पाण्याच्या फायद्याबद्दल आकारणी बसविण्याबाबत निदेश देण्याची राज्य शासनाची शक्ती.

१०५. ह्या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य सरकारास कलम १०० अन्वये आदेश देते वेळी ज्या जमिनीच्या बाबतीत ह्या प्रकरणान्वये जमाबंदी करण्यात आली आहे अशी कोणतीही जमीन, राज्य सरकारने कलम ९२ अन्वये जमाबंदी करण्याचा निदेश दिल्यानंतर पाटबंधाऱ्याच्या कामामुळे किंवा विद्यमान पाटबंधाऱ्याच्या कामातील सुधारणेमुळे व असे काम जमीन धारणा करणाऱ्याने किंवा त्याच्या खर्चाने झाले नसेल तेव्हा, मिळणाऱ्या पाण्यापासून होणाऱ्या अधिक फायद्याबद्दल जमाबंदीच्या मुदतीत जादा जमीन महसुलाची आकारणी बसविली जाण्यास पात्र असेल असा निदेश देण्याचा अधिकार आहे. असा जमीन महसूल, जेव्हा अशा जादा फायद्याबद्दल राज्याच्या कोणत्याही भागात पाटबंधाऱ्यासंबंधात अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये कोणताही दर बसविण्यात आला नसेल तेव्हाच बसविण्यात आला पाहिजे :

परंतु, राज्य सरकारने, असा निदेश देण्यापूर्वी संबंधित गावामध्ये याबाबतची एक नोटीस मराठी भाषेत प्रसिद्ध केली पाहिजे आणि तीमधील योजनेवर मिळालेल्या हरकतींचा, कोणत्याही असल्यास, विचार केला पाहिजे आणि अशी नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांची मुदत संपल्याशिवाय असा कोणताही निदेश देता येणार नाही.

चुका दुरुस्त करण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.

१०६. जिल्हाधिकाऱ्यास, जमाबंदीच्या मुदतीत [५४] कोणत्याही वेळी, जमीनधारकास नोटीस देऊन त्याच्या धारण जमिनीचे क्षेत्रफळ किंवा तीवरील आकारणी यात भूमापनाच्या चुकीमुळे किंवा गणनेमध्ये झालेली कोणतीही चूक, दुरुस्त करता येईल :

परंतु, अशी दुरुस्ती करण्यात आल्यामुळे जमीन महसुलाची कोणतीही थकबाकी देण्याजोगी होणार नाही ; परंतु जमीन महसूल म्हणून दिली गेलेली जादा रक्कम कोणतीही असल्यास, ती पुढे देय होईल अशा जमीन महसुलाच्या रकमेशी समायोजित करण्यात येईल.

**टीप ५४.**—जिल्हाधिकाऱ्यांना या कलमाखालील आपल्या शक्ती भूमापनातील चुकीमुळे किंवा अंकगणितीय परिगणनेतील चुकीमुळे झालेल्या धारण जमिनीच्या क्षेत्रातील किंवा आकारणीतील कोणतीही चूक दुरुस्त करण्यासाठी अधीक्षक, भूमि अभिलेख यांच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या भूमापन अधिकाऱ्यांना या कलमाखालील आपल्या शक्ती प्रदान करण्याबाबत शासकीय ज्ञापन क्रमांक यूएनएफ्-१६६७/आर, दिनांक २५ मे १९७० अन्वये निदेश देण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ३३०-अ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून अधिसूचना काढल्या आहेत. या अधिसूचनेनुसार, कलम १०६ खालील जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती त्या जिल्हावार अधिकारिता असलेल्या अधीक्षक, भूमि अभिलेख, यांच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या भूमापन अधिकाऱ्यांनाही वापरण्याजोग्या असतील. (परिशिष्ट २८ पहा).

ह्या अधिनियमापूर्वी केलेली जमाबंदी ही ह्या प्रकरणान्वये केली असल्याचे समजणे.

१०७. यापूर्वी करण्यात आलेल्या व ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून अंमलात असलेल्या जमीन महसुलासंबंधीच्या सर्व जमाबंदी ह्या, प्रकरणाच्या उपबंधास अनुसरून करण्यात आल्या आहेत व सुरू करण्यात आल्या आहेत असे समजण्यात येईल ; आणि फेरपहाणी केलेली जमाबंदी सुरू करण्यात येईतोपर्यंत, त्या अंमलात असण्याचे चालू राहील.

## प्रकरण ७

# अकृषिक कारणांकरिता वापरलेल्या जमिनींच्या जमीन महसुलाची आकारणी व जमाबंदी

१०८. संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, या प्रकरणात, कोणत्याही जमिनींच्या संबंधात "संपूर्ण बाजार मूल्य" या शब्द प्रयोगाचा अर्थ, उक्त जमिनीचे बाजार मूल्य अधिक त्या त्या वेळी अंमलात असलेल्या आकारणीच्या भांडवली मूल्याची रक्कम याइतकी रक्कम, असा समजावा. अर्थविवरण.

१०९. कलम ६८ च्या पहिल्या परंतुकान्वये असलेल्या कोणत्याही माफीस आणि कोणत्याही मर्यादेस अधीन राहून, जमिनींची अकृषिक आकारणी ही, अकृषिक कारणासाठी होत असलेला जमिनीचा उपयोग आणि ज्या क्षेत्रात जमिनी असतील ती नागरी आणि बिगर-नागरी क्षेत्र विचारात घेऊन, निश्चित करण्यात येईल ; आणि ती, या प्रकरणाच्या उपबंधानुसार ठरविण्यात व बसविण्यात येईल. जमिनींचा अकृषिक उपयोग व नागरी व बिगर-नागरी क्षेत्र विचारात घेऊन जमिनीवरील अकृषिक आकारणी ठरविणे.

११०. (१) जिल्हाधिकाऱ्याने, आयुक्ताच्या मान्यतेस अधीन राहून, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, बिगर-नागरी क्षेत्रातील गावांची वर्ग १ आणि वर्ग २ अशा दोन वर्गांत विभागणी केली पाहिजे, व जमिनी जेथे असतील ती जागा, ज्या अकृषिक कारणासाठी तिचा उपयोग करण्यात येत असेल ती कारणे, त्यामुळे मिळणारे फायदे व तोटे या गोष्टी विचारात घेऊन या बाबतीत विहित करण्यात आलेल्या रीतीने मोजणी करण्यात आलेल्या जमिनींच्या बाजार मूल्यावर उक्त विभागणी आधारित असेल. बिगर-नागरी क्षेत्रातील कृषीतर जमिनींची अकृषिक आकारणी ठरविताना अनुसरावयाची कार्यपद्धती.

(२) जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, अकृषिक कारणांसाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनींचे बाजार मूल्य लक्षात घेऊन, वर्ग १ खाली येणाऱ्या जमिनीवर, ज्या अकृषिक कारणासाठी त्यांचा उपयोग करण्यात येत असेल त्यानुसार, दरवर्षी दर चौरस मीटरला दोन पैशांहून अधिक नसेल इतक्या दराने, व वर्ग २ खाली येणाऱ्या जमिनीवर, दरवर्षी दर चौरस मीटरला एक पैशाहून अधिक नसेल इतक्या दराने आकारणी केली पाहिजे, तथापि, अशा रीतीने निश्चित केलेली आकारणी ही, अशा जमिनीवर लादता येण्याजोग्या कृषिक आकारणीपेक्षा कमी असता कामा नये.

**१११.** जमिनी जेथे असतील त्या जागा, ज्या अकृषिक कारणांसाठी जमिनींचा वापर करण्यात येत असेल तो वापर, आणि त्यामुळे होणारे फायदे व तोटे योग्य प्रकारे विचारात घेऊन, जिल्हाधिकाऱ्याने जमिनींच्या बाजार मूल्याच्या आधारावर, नागरी क्षेत्रांची गटांमध्ये विभागणी केली पाहिजे. नागरी क्षेत्रातील अकृषिक आकारणी ठरविताना अनुसरावयाची कार्यरीती.

११२. नागरी क्षेत्रातील प्रत्येक गटातील जमीन जेव्हा इमारतीची जागा म्हणून वापरण्यात येईल, तेव्हा तीवर अकृषिक आकारणी ही तिच्या संपूर्ण बाजारमूल्याच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक होता कामा नये. अकृषिक आकारणी ही संपूर्ण बाजार-मूल्याच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक होता कामा नये.

अकृषिक आकारणीचा प्रमाण दर ठरविण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

**११३.** (१) कलम ११२ च्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने राज्य सरकारची मान्यता घेऊन नागरी क्षेत्रातील प्रत्येक गटातील जमिनीच्या दर चौरस मीटर जमिनीवर, अशा जमिनीच्या संपूर्ण बाजार-मूल्याच्या विहित करण्यात येईल अशा शेकडा प्रमाणात अकृषिक आकारणीचा दर (ज्यास "अकृषिक आकारणीचा प्रमाण दर" म्हणून संबोधण्यात येईल) निश्चित केला पाहिजे.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी ज्या वर्षामध्ये अकृषिक आकारणीचा प्रमाण दर निश्चित करावयाचा असेल त्या वर्षाच्या निकटपूर्वीच्या *[पंधरा वर्षाच्या मुदतीमधील, भूमिसंपादन अधिनियम, १८९४ याखालील जमिनींच्या विक्री, पट्टे व निवाडे यांच्या आधारावर] विहित करण्यात आलेल्या रीतीने, संपूर्ण बाजार-मूल्याचा अंदाज करण्यात येईल.

**टीप ५५.**—कृपया कलम ११७ खालील टीप क्रमांक ५६ पहा (नियम १३, १४, १५, १६ व १७ पहा.)

(२) अकृषिक आकारणीचा प्रमाण दर दहा वर्ष मुदतीपर्यंत अंमलात राहील; आणि त्यानंतर या प्रकरणाच्या उपबंधास अनुसरून अशा दरात फेरबदल करण्यात येईतोपर्यंत ती अंमलात असल्याचे समजण्यात येईल.

(३) वर निर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे, निश्चित करण्यात किंवा फेरतपासणी करण्यात आलेले अकृषिक आकारणीचे प्रमाण दर हे, ते अंमलात आणण्यापूर्वी, विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने आणि राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

अकृषिक कारणासाठी उपयोगात आणलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर.

**११४.** (१) या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, नागरी क्षेत्रातील जमिनीच्याबाबतीतील आकारणीचा दर पुढीलप्रमाणे असेल :—

(अ) निवास योग्य इमारतीच्या कारणासाठी वापरण्यात आलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर हा, अकृषिक आकारणींच्या प्रमाण दराइतका असेल ;

(ब) औद्योगिक कारणांसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर हा अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराच्या दीडपटीइतका असेल ;

(क) वाणिज्यिक कारणासाठी वापरण्यात येत असलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर हा, अकृषिक आकारणीच्या प्रमाण दराच्या दुप्पट असेल ;

(ड) इतर कोणत्याही अकृषिक कारणासाठी वापरण्यात येत असलेल्या जमिनीवरील आकारणीचा दर जिल्हाधिकारी ठरवील व तो अकृषिक आकारणीच्या प्रमाण दरापेक्षा कमी नसेल आणि उक्त प्रमाण दराच्या दीडपटीपेक्षा अधिक नसेल ; मात्र असा दर ठरविताना, जमीन जेथे असेल ती जागा व अशा जमिनीशी संलग्न असलेले विशेष स्वरूपाचे फायदे व गैरफायदे विचारात घेण्यात येतील.

(२) कोणतीही जमीन कोणत्याही अकृषिक कारणासाठी म्हणून सहा महिने किंवा त्याहून कमी असलेल्या मुदतीसाठी वापरण्यात येत असेल त्याबाबतीत, अकृषिक आकारणी ही उक्त अकृषिक कारणासाठी वापरण्यात आलेल्या जमिनीसाठी जी आकारणी निश्चित करण्यात आली असेल त्या आकारणीच्या निम्मी असेल.

(३) या कलमात काहीही असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास, गटातील कोणत्याही जमिनीच्या संबंधात, पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या दराच्या पंचाहत्तर टक्क्यापेक्षा कमी असेल परंतु अशा रीतीने ठरविलेल्या दराच्या पंचवीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा दराने, उक्त जमिनीसाठीची अकृषिक आकारणी ठरविण्याचा अधिकार आहे ; मात्र अशा रीतीने आकारणी ठरवितांना जमीन जेथे असेल ती जागा व अशा जमिनीशी संलग्न असलेले फायदे व गैरफायदे विचारात घेण्यात येतील.

अकृषिक आकारणीच्या प्रारंभाची तारीख.

**११५.** †[सहकारी गृहनिर्माण संस्था व या राज्यात त्या वेळी अंमलात असलेल्या विधीअन्वये स्थापन केलेली गृहनिर्माण मंडळे यांच्या बाबतीत राज्य शासनाकडून अन्यथा निदेश देण्यात येईल त्याव्यतिरिक्त कोणत्याही जमिनीचा ज्या तारखेपासून अकृषिक कारणासाठी] म्हणून प्रत्यक्ष वापर करण्यात येईल त्या तारखेपासून अकृषिक आकारणी लादण्यात येईल.

---

*हा मजकूर महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ (सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम चार याच्या कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आला (परिशिष्ट ३९ पहा).

†हा मजकूर महाराष्ट्र जमीन (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६८ (सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम आठ याच्या कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आला. (परिशिष्ट ३८ पहा).

११६. कलमे ११० व ११४ च्या उपबंधानुसार निश्चित करण्यात आलेली अकृषिक आकारणी ही ज्या तारखेस जमीन ही प्रत्यक्षपणे अकृषिक कारणासाठी म्हणून वापरण्यात आली असेल त्या तारखेपासून किंवा यथास्थिति, जमिनीच्या वापरण्यास इमम बदलण्याच्या तारखेपासून पंधरा वर्षे मुदतीपर्यंत अंमलात राहील; आणि अशा मुदतीच्या समाप्तीनंतर ती फेरतपासणीस पात्र ठरेल; परंतु आकारणीची फेरतपासणी होईतोपर्यंत, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे ठरविण्यात आलेली आकारणी अंमलात असण्याचे चालू राहील : कलमे ११० व ११४ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या आकारणीची मुदत.

परंतु, ज्या कोणत्याही अकृषिक आकारणीचे संबंधात कोणतीही हमीची मुदत निश्चित करण्यात आली नसेल किंवा कोणत्याही अकृषिक आकारणीची हमीची मुदत ही शेतजमिनींच्या जमाबंदीच्या मुदतीबरोबर संपत असेल त्याबाबतीत, अशा प्रकरणांमधील अकृषिक आकारणीची फेरतपासणी, अशी अकृषिक आकारणी प्रथमतः ज्या तारखेस निश्चित करण्यात आली असेल त्या तारखेपासून तीस वर्षांचे मुदतीनंतर करता येईल ;

तसेच, अकृषिक आकारणीची फेरतपासणी करण्यात येईल तेव्हा, अशी फेरतपासणी केलेली आकारणी ही, जर जमीन निवास योग्य इमारतीसाठी म्हणून वापरण्यात आली असेल तर, फेरतपासणीच्या निकटपूर्वी देणे असलेल्या जमीन महसूलाच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाही. आणि जर जमीन इतर कोणत्याही अकृषिक कारणासाठी वापरण्यात आली असेल तर फेरतपासणीच्या निकटपूर्वी देणे असलेल्या जमीन महसूलाच्या सहा पटीपेक्षा अधिक असणार नाही.

२००२ दुरुस्ती अधिनियम क्र. ५१ नुसार रद्द करण्यात आले

११७. पुढील कारणांसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीस अकृषिक आकारणी देण्याची माफी देण्यात येईल. ती कारणे अशी :— अकृषिक आकारणी देण्याची माफी असलेल्या जमिनी.

(१) हातमागासाठी छपऱ्या उभारणे, कुक्कुटपालन व्यवसाय किंवा बागबगीचा तयार करणे यासारख्या शेतीस दुय्यम किंवा सहाय्यक असलेल्या व्यवसायासाठी शेतकरी वापरत असलेल्या किंवा राज्य सरकार त्यासंबंधात केलेल्या नियमात निर्दिष्ट करील अशा इतर व्यवसायासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

(२) मृताची व्यवस्था लावण्याशी संबंधित असलेल्या कारणासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

(३) सार्वजनिक पूजेअर्चेसाठीच केवळ भोगवटयात असलेल्या आणि वापरण्यात येत असलेल्या आणि ह्या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी रुढी, अनुदान यास अनुसरून किंवा इतर कारणांमुळे जमीन महसूल देण्याची माफी असलेल्या जमिनी ;

(४) ज्या शैक्षणिक किंवा धर्मादाय प्रयोजनाचा लाभ, धर्म, वंश, जात, जन्मस्थान किंवा यापैकी कोणत्याही गोष्टींचा आधार न घेता सर्व नागरिकास मिळत असेल अशा, शैक्षणिक किंवा धर्मादाय कारणासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ;

(५) राज्य सरकार, या अधिनियमान्वये केलेल्या नियमान्वये [५६] त्यात निर्दिष्ट करण्यात आले असेल अशा मुदतीसाठी व अशा शर्तीस अधीन राहून, ज्या कोणत्याही सार्वजनिक कारणासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनीना जमीन महसूलाची माफी देईल अशा कोणत्याही इतर सार्वजनिक कारणासाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी.

(६) राज्य सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करील अशा निवास योग्य इमारतीच्या कारणासाठी म्हणून नगरेतर क्षेत्रातील ज्या शेतजमिनीच्या (गावठाणाबाहेरील, कोणत्याही असल्यास) अकृषिक वापरात परिवर्तन करण्यात आले असेल, अशा शेतजमिनी.

**टीप ५६.**—जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी या संबंधीचे नियम (कृपया टीपा क्र. ३२; ३३, ३४, ३९, ४०, ५५ या टीपाही पहा (नियम २२ पहा).

## जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी यासंबंधीचे नियम

[शासकीय अधिसूचना क्र. यूएन्एफ्-१९६७-आर (स्पेशल), दिनांक ३ आक्टोबर १९७२ द्वारे दुरुस्त केलेली शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ-१९६७-आर, दिनांक २५ जुलै १९६९.]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमामध्ये—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "कलम" म्हणजे महसूल अधिनियमाचे कलम ;

(क) "नियोजन प्राधिकरण" म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले नियोजन प्राधिकरण.

३. **जमिनीच्या वापरात बदल करण्याच्या परवानगीकरिता अर्जाचा नमुना.**—कलम ४४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जमिनीच्या वापरात एका प्रयोजनाऐवजी दुसऱ्या प्रयोजनाकरिता बदल करावयाच्या परवानगीसाठी करावयाचा प्रत्येक अर्ज अनुसूची एक मधील नमुन्यात जिल्हाधिकाऱ्याकडे केला पाहिजे. एकाच भूमापन क्रमांकातील जमिनीच्या निरनिराळ्या भागांच्या वापरात निरनिराळ्या अकृषिक प्रयोजनासाठी बदल करण्यात येणार असेल त्या बाबतीत नमुन्यामध्ये तसे स्पष्टपणे व स्वतंत्ररीत्या नमूद करण्यात आले पाहिजे.

४. **परवानगी ज्या शर्तीवर देता येईल त्या शर्ती.**—(१) कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी शेतजमिनीच्या वापरात बदल करण्याची किंवा एका अकृषिक प्रयोजनाऐवजी दुसऱ्या अकृषिक प्रयोजनासाठी जमिनीच्या वापरात बदल करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यास, नियोजन प्राधिकरण आणि राज्य सरकार वेळोवेळी निदेश देईल असे इतर प्राधिकरण यांच्याशी विचारविनिमय करून त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधांना व इतर शर्तींबरोबरच पुढील शर्तींना अधीन राहून देता येईल :—

(अ) ही परवानगी अधिनियम व तदन्वये केलेले नियम यांच्या उपबंधाच्या अधीन देण्यात येईल ;

(ब) परवानगी ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यात येणार नाही ;

(क) ज्या अकृषिक वापरासाठी अर्ज केला असेल तो वापर, जिल्हाधिकाऱ्याने त्यासंबंधीचा आदेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत अर्जदाराने सुरू केला पाहिजे ; असे न केल्यास, उक्त मुदतीत जिल्हाधिकाऱ्यानी वेळोवेळी वाढ केली नसेल तर, दिलेली परवानगी व्यपगत झाल्याचे मानण्यात येईल ;

(ड) कलम ११० किंवा यथास्थिती कलम, ११४ अन्वये बदल केलेल्या वापरास अनुलक्षून ठरविण्यात येईल अशी बदललेली आकारणी देण्यास अर्जदार जबाबदार असेल.

(इ) कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापरण्याकरिता कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी देण्यात आली असेल त्याबाबतीत असे बांधकाम नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारितेमध्ये येत असेल तर ते नियोजन प्राधिकरणाने त्या संबंधात मान्य केलेल्या आराखड्याशी सुसंगत असेल अशा प्रकारे करण्यात आले पाहिजे आणि मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ याच्या प्रकरण तीनचे उपबंध ज्या क्षेत्रात अंमलात आले नसतील त्या क्षेत्रात असे बांधकाम अनुसूची दोनच्या उपबंधाच्या अधीन असेल ; आणि जर ते अशा अधिकारितेबाहेरील क्षेत्रात असेल तर ते ग्रामपंचायतीने मान्य केलेल्या आराखड्यानुसार करण्यात आले पाहिजे व ते, जमिनीचा मंजूर केलेला वापर लक्षात घेऊन जिल्हाधिकारी प्रत्येक प्रकरणी ठरवील अशा, अनुसूची दोन व तीनच्या उपबंधाच्या अधीन असेल,

(फ) जमिनीचा मंजूर केलेला वापर लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यास ज्या इतर वाजवी शर्ती लादणे योग्य वाटेल अशा कोणत्याही इतर वाजवी शर्ती :

परंतु गिरिस्थाने व राज्य शासन या संबंधात विनिर्दिष्ट करील अशी इतर वसती स्थाने यापैकी जेथे प्रादेशिक योजना, विकास योजना किंवा नगररचना योजना नसेल त्याबाबतीत, अशी परवानगी, इमारतीच्या पद्धतीसंबंधी किंवा उभारणीच्या मुदतीसंबंधी व नगरपालिका व स्वच्छताविषयक विनियमाचे पालन करण्यासंबंधी इष्ट वाटतील अशा शर्तींबरोबरच पूर्वोक्त शर्तीचे ज्या जेथवर लागू होतील तेथवर पालन केल्यावर देता येईल.

(२) सनदेमध्ये अशा शर्तींचा अंतर्भाव केलेला असेल.

५. **परवानगी देण्यात आल्याचे मानण्यात येत असेल त्या बाबतीत शर्ती.**—कलम ४४, पोट-कलम (३) अन्वये जमिनीच्या वापरातील बदलासंबंधीची परवानगी देण्यात आल्याचे मानण्यात येत असेल अशा प्रकरणी अशी परवानगी नियम ४ मध्ये तरतूद केलेल्या शर्तींच्या अधीन असेल.

६. **अकृषिक वापर सुरू केल्याचे कळविण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.**—कलम ४४ च्या पोटकलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जमिनीच्या वापरात बदल करण्यास सुरुवात केल्याची तारीख कळविण्यात कसूर केल्याबद्दल द्यावयाची शास्ती ही, त्या कलमाच्या पोट-कलम (५) मध्ये विहित केलेल्या ५०० रुपयांच्या शास्तीच्या कमाल रकमेच्या अधीन, जर ती जमीन निवासाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल तर कसुरीच्या मुदतीतील त्या जमिनीच्या अकृषिक आकारणीच्या दुपटीइतक्या रकमेहून कमी नसेल एवढ्या रकमेइतकी असेल ; व जर ती जमीन इतर कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल तर उपरोक्त मुदतीसाठी असलेल्या अकृषिक आकारणीच्या तिपटीहून कमी नसेल इतकी, जिल्हाधिकाऱ्यास प्रत्येक प्रकरणी लादणे योग्य वाटेल अशी रक्कम असेल.

७. **सनद देणे.**—अकृषिक प्रयोजनासाठी जमीन वापरावयास परवानगी दिली असेल त्याबाबतीत, तिच्या धारकास, जमीन जर नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारितेबाहेर असेल तर अनुसूची चारमधील नमुन्यात व जर जमीन नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारितेत असेल तर अनुसूची पाचमधील नमुन्यात, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधाच्या अधीन, एक सनद देण्यात येईल.

८. **अनधिकृत अकृषिक वापरासाठी शास्ती.**—जर कोणत्याही जमिनीचा कलम ४४ च्या उपबंधाचे उल्लंघन करून अनधिकृतपणे वापर केला तर, जिल्हाधिकाऱ्याने तिच्या धारकास किंवा त्याच्यामार्फत किंवा त्याच्या अधीन दावा सांगणाऱ्या व्यक्तीस जिल्हाधिकाऱ्याने असा अनधिकृत वापर थांबविण्यास व अशा अनधिकृत वापराच्या पूर्ण मुदतीसाठी बदल केलेल्या वापरास अनुलक्षून त्या जमिनीवरील अकृषिक आकारणी देण्यास व अधिनियमाच्या उपबंधान्वये बदल केलेल्या अनधिकृत वापरास अनुलक्षून त्या जमिनीवर बसविण्याजोग्या अकृषिक आकारणीच्या चाळीस पटीहून अधिक नसेल असा त्याने ठरविलेला दंड देण्यास फर्माविणे हे विधिसंमत असेल.

९. **अनधिकृत वापराचे विनियमन.**—कलम ४४ च्या उपबंधाचे उल्लंघन करून कोणत्याही जमिनीचा अधिकृतपणे वापर केला असेल व जिल्हाधिकाऱ्याची अशी खात्री झाली असेल की, धारकाने त्या कलमान्वये आवश्यक त्या परवानगीसाठी अर्ज केला असता तर कलम ४४ च्या पोट-कलम (२) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणावरून सामान्यत: त्याचा अर्ज नामंजूर झाला नसता तर जिल्हाधिकाऱ्यास धारकाची तशी इच्छा असेल तर आणि नियोजन प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेखाली येणाऱ्या क्षेत्रात, अशा नियोजन प्राधिकाऱ्याचा सल्ला घेतल्यानंतर नियम ८ अन्वये कारवाई करण्याऐवजी पुढील अटी व शर्ती यांच्या अधीन असा अनधिकृत अकृषिक वापर नियमात बसवता येईल :—

(एक) धारकाने, बदल केलेल्या वापरास अनुलक्षून, त्या वापरास प्रारंभ केल्याच्या तारखेपासून त्या जमिनीवरील अकृषिक आकारणी, ती नियम ८ अन्वये यापूर्वीच देण्यात आली नसल्यास, दिली पाहिजे ;

(दोन) धारकाने, बदल केलेल्या वापरास अनुलक्षून, त्या जमिनीवर होणाऱ्या अकृषिक आकारणीच्या चाळीस पटीहून अधिक नसेल असा जिल्हाधिकाऱ्याने ठरविलेला दंड, तो नियम ८ अन्वये यापूर्वीच देण्यात आला नसल्यास, दिला पाहिजे ;

(तीन) धारकाने, नियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींचे जेथवर त्या लागू होत असतील तेथवर, व जिल्हाधिकाऱ्यास ज्या इतर शर्ती लादणे योग्य वाटेल अशा इतर शर्तींचेही पालन केले पाहिजे.

१०. **अनधिकृत नियमबाह्य बांधकामे राहू देणे.**—अनधिकृत अकृषिक वापर नियम ९ अन्वये नियमात बसविणे शक्य नसेल आणि जिल्हाधिकाऱ्याची अशी खात्री झाली असेल की, ते अनधिकृत नियमबाह्य बांधकाम पाडून टाकल्यास फार नुकसान होईल व ते अत्यंत गैरसोयीचे व त्रासाचे होईल तर, जिल्हाधिकाऱ्यास धारकाची तशी इच्छा असल्यास आणि नियोजन प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेखाली येणाऱ्या क्षेत्रात, अशा नियोजन प्राधिकाऱ्यांचा सल्ला घेतल्यानंतर पूर्ववर्ती नियमातील शर्ती (एक) व (तीन) आणि पुढील अतिरिक्त शर्ती यांच्या अधीन व राज्य शासनाची मंजुरी घेऊन असे बांधकाम उभे राहू देण्यास परवानगी देता येईल—

(अ) धारकाने, त्या नियमबाह्य अनधिकृत बांधकामावर केलेल्या खर्चाच्या पन्नास टक्क्यांपेक्षा कमी नसेल किंवा बदल केलेल्या वापरास अनुलक्षून त्या जमिनीवर देण्याजोग्या अकृषिक आकारणीच्या चाळीस पट यांपैकी जी मोठी रक्कम असेल तितकी तडजोड फी दिली पाहिजे ;

(ब) धारकाने, त्यानंतर वाजवी कालावधी उलटल्यानंतर ते नियमबाह्य अनधिकृत बांधकाम लोकहिताच्या दृष्टीने पाडण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने सांगितल्यास नुकसानभरपाई न मागता तसे करण्याची लेखी कबुलायत दिली पाहिजे ; न दिल्यास जिल्हाधिकारी धारकाच्या जोखमीवर व खर्चाने ते पाडून टाकील.

११. **नियमात बसल्यानंतर सनद देणे.**—कोणताही अनधिकृत अकृषिक वापर चालू ठेवण्यास नियम ९ किंवा १० अन्वये परवानगी देण्यात आली असेल तेव्हां अनुसूची सहामधील नमुन्यात धारकास एक सनद देण्यात येईल.

१२. **अकृषिक आकारणी.**—कृषीसाठी आकारणी करण्यात आलेली जमीन अकृषिक प्रयोजनासाठी किंवा त्याचप्रमाणे उलट वापरण्यात आली असेल त्याबाबतीत किंवा एका अकृषिक प्रयोजनासाठी आकारणी करण्यात येऊन दुसऱ्या अकृषिक प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल त्याबाबतीत अशा प्रकारे वापर केलेल्या जमिनीवर निश्चित केलेल्या आकारणीमध्ये महसूल अधिनियमाच्या कलम ६७, पोट-कलम (२) अन्वये बदल करण्यात येईल व असा बदल, अधिनियम व हे नियम यांच्या उपबंधांच्या अनुसार जिल्हाधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

१३. **भांडवलीकृत आकारणी.**—महसूल अधिनियमातील प्रकरण सातच्या प्रयोजनासाठी "भांडवलीकृत आकारणी" या शब्दप्रयोगाचा अर्थ जमिनीवर त्या त्या वेळी अंमलात असलेल्या आकारणीच्या सोळा पटीइतकी रक्कम असा समजावा.

१४. **विक्रीची आकडेवारी वगैरे ठेवणे.**—नागरी क्षेत्रातील निरनिराळ्या गटांतील अकृषिक जमिनींच्या नोंदणी केलेल्या सर्व विक्र्या व पट्टे व भूमि संपादन अधिनियम, १८९४, या खालील त्यांच्या संबंधातील निवाडे यांची नोंद जिल्हाधिकारी अनुक्रमे अनुसूची सात, आठ व नऊ यांतील नमुन्यांमध्ये ठेवील.

१५. **पूर्ण बाजारमूल्य कसे ठरविण्यात यावे.**—(१) एखाद्या नागरी क्षेत्रातील गटामध्ये जमिनींच्या अकृषिक आकारणीचा प्रमाण दर ज्या वर्षी ठरविण्यात यावयाचा असेल त्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या पंधरा वर्षांच्या मुदतीत त्या गटात, यथास्थिती, ज्या विक्र्या किंवा पट्टे घडून आले असतील आणि भूमि संपादन अधिनियम, १८९४ या अन्वये जे निवाडे जाहीर झाले असतील त्या विक्र्या, पट्टे व निवाडे यांच्या आधारावर पुढील तत्वानुसार, त्या गटातील कृषीतर जमिनींचे पूर्ण बाजार मूल्य ठरविण्यात येईल :—

(अ) जमीन महसूलासाठी आकारणी न केलेल्या मोकळ्या भूखंडाच्या विक्रीच्या बाबतीत त्याच्या विक्रीची किंमत हे त्याचे पूर्ण बाजार मूल्य असेल ;

(ब) जमीन महसूलासाठी आकारणी केलेल्या मोकळ्या भूखंडाच्या विक्रीच्या बाबतीत विक्रीच्या किंमतीइतकी रक्कम आणि आकारणीच्या सोळा पटीइतकी रक्कम हे पूर्ण बाजारमूल्य असेल ;

(क) बांधकाम असलेल्या भूखंडाच्या विक्रीच्या बाबतीत, अशा भूखंडाची जमीन महसुलासाठी किंवा भाड्यासाठी आकारणी केलेली नसेल तेव्हा, त्याच्या विक्रीची किंमत आणि विक्रीच्या तारखेस, फक्त त्या बांधकामाच्या बाजारमूल्याची रक्कम यातील तफावतीइतकी रक्कम हेच पूर्ण बाजारमूल्य असेल ;

(ड) बांधकाम असलेल्या भूखंडाच्या विक्रीच्या बाबतीत, अशा भूखंडाची जमीन महसुलासाठी आकारणी झालेली असेल तेव्हां एका बाजूस त्याच्या विक्रीची किंमत आणि आकारणीच्या सोळा पटीइतकी रक्कम आणि दुसऱ्या बाजूस विक्रीच्या तारखेस बांधकामाच्या बाजार मूल्याची रक्कम यामधील तफावत हे पूर्ण बाजारमूल्य असेल ;

(इ) एखादा मोकळा भूखंड जमीन भाडे राखून पट्टामूल्यासाठी दीर्घ मुदतीच्या पट्टयाने देण्यात आला असेल किंवा त्याचे दीर्घ मुदतीच्या पट्टयाचे अभिहस्तांकन करण्यात आले असेल त्याबाबतीत पट्टामूल्याइतकी रक्कम आणि राखीव जमीन भाडयाच्या सोळापट इतकी रक्कम हे पूर्ण बाजारमूल्य असेल ;

(फ) एखादा मोकळा भूखंड, पट्टामूल्य न देता दीर्घ मुदतीच्या पट्टयाने देण्यात आला असेल किंवा दीर्घ मुदतीच्या पट्टयांचे अभिहस्तांकन करण्यात आले असेल त्याबाबतीत राखीव भाडयाच्या सोळा पटीइतकी रक्कम पूर्ण बाजारमूल्य असेल ;

(ग) बांधकाम केलेला भूखंड, पट्टामूल्य न देता दीर्घ मुदतीच्या पट्टयाने देण्यात आला असेल किंवा त्याचे दीर्घ मुदतीच्या पट्टयांचे अभिहस्तांकन करण्यात आले असेल त्याबाबतीत भाडे राखून ठेवले असेल तेव्हां राखीव वार्षिक भाडयांची रक्कम आणि पट्टयाच्या तारखेस असलेले बांधकामाचे वार्षिक भाडेमूल्य यातील तफावतीच्या सोळा पटीइतकी रक्कम हे पूर्ण बाजारमूल्य असेल ;

(ह) बांधकाम असलेल्या पट्टेदारी भूखंडाच्या हस्तांतरणाच्या बाबतीत, विक्रीची किंमत आणि हस्तांतरणाच्या तारखेस बांधकामाचे असलेले बाजार मूल्य अधिक जमीन भाडयाच्या सोळापट इतकी रक्कम यातील तफावतीइतकी रक्कम हे बाजारमूल्य असेल ;

(आय्) भूमिसंपादन अधिनियम, १८९४ या अन्वये संपादन केलेला परंतु जमीन महसुलासाठी आकारणी न केलेला भूखंड असेल—मग तो बांधकामासह किंवा बांधकामाविना असो—त्याबाबतीत निवाडयामध्ये जाहीर केलेली जमिनीच्या मूल्याची रक्कम (कोणतेही बांधकाम असल्यास, त्याचे मूल्य वगळून) हे पूर्ण बाजारमूल्य असेल ; आणि

(जे) भूमिसंपादन अधिनियम, १८९४ या अन्वये संपादन केलेला व जमीन महसुलासाठी आकारणी केलेला भूखंड असेल—मग तो बांधकामासह किंवा बांधकामाविना असो—त्याबाबतीत निवाडयामध्ये जाहीर केलेल्या जमिनीच्या मूल्याची रक्कम (कोणतेही बांधकाम असल्यास त्याची किंमत वगळून) अधिक आकारणीच्या सोळा पटीइतकी रक्कम हे पूर्ण बाजार मूल्य असेल ;

(२) पोट-नियम (१) चे खंड (अ), (ब), (इ), (फ), (आय्) आणि (जे) खाली येणाऱ्या व्यवहारांची संख्या एकतर अगदीच कमी आहे किंवा पूर्ण बाजार मूल्याच्या अंदाज करण्याच्या प्रयोजनासाठी ती पुरेशी प्रातिनिधिक नाही असे जिल्हाधिकाऱ्याचे मत झाले तरच केवळ, त्या पोट-नियमाच्या खंड (क), (ड), (ग) व (ह) या मध्ये निर्दिष्ट केलेले व्यवहार उक्त प्रयोजनासाठी आधारभूत असतील.

(३) या नियमान्वये प्रतिपादन केलेल्या तत्वांनुसार कोणत्याही गटातील अकृषिक जमिनीच्या पूर्ण बाजार मूल्याचा अंदाज करणे शक्य नसेल तर, अशा गटातील जमिनीच्या पूर्ण बाजार मूल्याचा अंदाज अशा गटास लागून असलेल्या गटांमधील तत्सम भू-खंडाच्या यथास्थिति विक्रीच्या, पट्टयांच्या व निवाडयांच्या आधारे करण्यात येईल.

१६. **अकृषिक आकारणीचा प्रमाण दर.**—(१) अकृषिक आकारणीचा प्रमाण दर ठरविण्याच्या प्रयोजनासाठी जिल्हाधिकारी, पूर्ववर्ती नियमात प्रतिपादन केलेल्या तत्त्वांनुसार निश्चित केलेल्या भू-खंडाच्या पूर्ण बाजार मूल्याच्या आधारे, ज्या वर्षात अकृषिक आकारणीचा प्रमाण दर निश्चित करावयाचा असेल त्या वर्षाच्या निकटपूर्ववर्ती पंधरा वर्षांपैकी प्रत्येक वर्षासाठी प्रत्येक गटातील अकृषिक जमिनीचे पूर्ण बाजारमूल्य वेगवेगळे प्रथम निश्चित करील.

(२) पोट-नियम (१) अन्वये पूर्ववर्ती पंधरा वर्षांसाठी निश्चित केलेल्या पूर्ण बाजारमूल्याच्या आधारे जिल्हाधिकारी, प्रत्येक गटातील दर चौरस मीटर जमिनीच्या पूर्ण बाजारमूल्याचा अंदाज करील.

(३) प्रत्येक गटातील दर चौरस मीटर जमिनीच्या अकृषिक आकारणीचा प्रमाण दर पोट-नियम (२) अन्वये अंदाजलेल्या पूर्ण बाजारमूल्याच्या १.२५ टक्क्याइतका असेल.

(४) जिल्हाधिकारी पोट-नियम (३) अन्वये निश्चित केलेला प्रमाण दर मान्यतेसाठी विभागाच्या आयुक्तामार्फत राज्य शासनाला सादर करील.

(५) राज्य शासनास योग्य वाटेल त्या मर्यादेपर्यंत त्यास प्रमाण दरासंबंधातील जिल्हाधिकाऱ्याच्या प्रस्तावात फेरबदल करता येईल.

(६) राज्य शासनाने मान्यता दिलेला प्रमाण दर **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल ; आणि तो दर शासकीय राजपत्रातील अशा अधिसूचनेच्या तारखेपासून तीन महिने समाप्त झाल्यावर अंमलात येईल. प्रमाण दर अंमलात आणला जाण्यापूर्वी तो तहसिलदाराच्या कार्यालयातील सूचनाफलकावरसुद्धा चिकटविण्यात येईल.

(७) पोट-नियम (३) अन्वये निश्चित केलेला प्रमाण दर दहा वर्षांच्या मुदतीकरिता अंमलात राहील. आणि तदनंतर तो सुधारण्यात येईपर्यंत अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

१७. **प्रमाण दर सुधारणे.**—अकृषिक आकारणीचा प्रमाण दर दहा वर्षांच्या अंतराने सुधारला जाण्यास पात्र असेल आणि नियम १५ व १६ यांचे उपबंध प्रमाण दर निश्चित करण्यास ज्या प्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते प्रमाण दर आता अशा रीतीने सुधारण्यास लागू होतील.

१८. **एकेकटया भू-खंडावर अकृषिक आकारणी निश्चित करणे.**—प्रत्येक गटातील एकेकटया भू-खंडावरील प्रत्यक्ष आकारणी, जिल्हाधिकाऱ्याकडून, कलम ११४, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ज्या प्रयोजनार्थ जमीन वापरण्यात येत असेल ते विशिष्ट अकृषिक प्रयोजन लक्षात घेऊन, त्याच्या पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे २५ टक्के कपात किंवा वाढ करण्यास अधीन राहून, त्या गटात, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या प्रमाण दराच्या आधारे निश्चित करण्यात येईल. अशा प्रत्यक्ष आकारणी निश्चित करताना आकारणीची रक्कम दहाच्या पटीत जवळच्या पूर्णांकात मोजण्यात येईल, ती पाच पैशांहून कमी असल्यास मोजण्यात येणार नाही आणि पाच पैसे आणि त्याहून अधिक असल्यास ती दहा पैसे असल्याप्रमाणे मोजण्यात येईल.

१९. **कुंपणाच्या आतील जमिनीवर बसविण्यायोग्य आकारणी.**—निवासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येत असेल अशा जमिनीसंबंधातील अकृषिक आकारणी ही, ज्याच्यावर बांधकाम केले असेल अशा एखाद्या कुंपणाच्या आतील जमिनीच्या क्षेत्रावर व त्याचप्रमाणे अशा रीतीने बांधकाम करण्यात आलेल्या क्षेत्राच्या संबंधात, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीनुसार जे क्षेत्र मोकळे सोडणे आवश्यक असेल त्या क्षेत्रावर बसविण्यात येईल.

२०. **कृषिक आकारणी पुन्हा बसविणे.**—(१) संबंधित कूळ कायद्याच्या तरतुदींअन्वये अकृषिक वापराच्या प्रयोजनासाठी कृषिक जमिनी हस्तांतरित केलेल्या असतील अशा बाबींव्यतिरिक्त जिची आकारणी करण्यात आली असेल किंवा कोणत्याही अकृषिक वापरासाठी जिच्या आकारणीत फेरफार करण्यात आला असेल अशी कोणतीही धारण जमीन केवळ शेतीसाठी वापरण्यात येत असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास, धारकाच्या अर्जावरून, अकृषिक आकारणी काढून टाकता येईल आणि आकारणीची मुदत समाप्त झाली नसेल तर, एकतर जुनी अकृषिक आकारणी, कोणतीही असल्यास, ती बसविता येईल किंवा इतर बाबतीत, अशा धारण जमिनीच्या आसपास तशाच इतर कृषिक जमिनींवर जी बसविण्यात आली असेल त्या कृषिक आकारणीच्या समतुल्य आकारणी बसविता येईल.

(२) अशी कृषिक आकारणी आगामी कृषि वर्षाच्या पहिल्या दिवसापासून सुरू होईल आणि ती आकारणी जमीन ज्या गावात असेल त्या गावाच्या सामान्य महसुली जमाबंदीच्या वेळी लादण्यात आलेल्या नियतकालिक पुनरीक्षणाविषयीच्या शर्ती असल्याप्रमाणे त्याच शर्तींच्या आणि त्याच नियमांच्या व विधींच्या उपबंधांच्या अधीन असेल.

२१. **कलम ६८ अन्वये आकारणी.**—कोणत्याही अकृषिक प्रयोजनार्थ धारण केलेल्या किंवा वापरलेल्या जमिनीची आकारणी कलम ६८ च्या उपबंधान्वये करण्यात आली असेल त्या बाबतीत, अशी आकारणी अधिनियमाचे प्रकरण सात याचे उपबंध व हे नियम यानुसार जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल व सुधारण्यात येईल.

२२. **माफी.**—(१) कलम ११७, खंड (१) च्या प्रयोजनांसाठी, एखाद्या शेतकऱ्याकडून त्याच्या स्वतःच्या शेतातील उत्पादनापासून फळांचा रस काढणे किंवा तो डबाबंद करणे, गूळ बनविणे, तेल काढणे, कापसाची सरकी काढणे, भाताची तूस काढणे किंवा इतर तत्सम प्रयोजने यांसाठी वापरण्यात येणाऱ्या जमिनी ह्या शेतीस दुय्यम किंवा सहाय्यक असलेले व्यवसाय असल्याचे मानण्यात येईल.

(२) धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान किंवा त्यापैकी कोणत्याही गोष्टीवरून भेदभाव न करता ज्यांचा लाभ सर्व नागरिकांसाठी खुला असेल अशी रुग्णालये, वसतिगृहे, क्रीडांगणे, उद्याने व बागा, स्थानिक प्राधिकरणांच्या कार्यालयाच्या जागा व व्यायाम शाळा यांसाठी किंवा आराखड्यात वेगळे दर्शविण्यात आलेले रस्ते, मार्ग व गल्ल्या यांसाठी वापरलेल्या जमिनींना, जोपर्यंत त्या उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येतील व अन्य कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात येत नसतील आणि त्यापासून खाजगी व्यक्तींना किंवा कोणत्याही व्यक्तीला कोणताही फायदा मिळत नसेल तोपर्यंत, अकृषिक आकारणी भरण्याची माफी असेल.

(३) सहकारी गृहनिमाण संस्थांनी किंवा गृहनिर्माण मंडळाने धारण केलेल्या ज्या इमारतीच्या जागांवर बांधकाम करण्यात आलेले नसेल अशा इमारतीच्या जागांच्या बाबतीत, ज्या तारखेस जमिनीचा कब्जा घेण्यात आला होता त्या तारखे नंतर तीन वर्षे किंवा ज्या तारखेस अशा जमिनीचा अकृषिक वापर सुरू होईल ती तारीख यापैकी जो नंतरचा असेल अशा कालावधीसाठी कोणतीही अकृषिक आकारणी बसविण्यात येणार नाही.

२३. **अकृषिक क्षेत्रे दर्शविणारा नकाशा.**—(१) प्रत्येक जिल्हाधिकारी आपल्या जिल्ह्याचा नकाशा आपल्या कार्यालयात ठेवील व आवश्यक असेल त्याप्रमाणे वेळोवेळी त्याचे नवीकरण करील किंवा तो अद्यावत ठेवील. अशा नकाशावर सोईस्कर असेल त्याप्रमाणे वेगवेगळ्या रंगांनी अथवा अन्यरीतीने, महसूल अधिनियमाच्या कलम २, खंड (४२) अनुसार जिल्ह्यातील नागरी व नगरेतर क्षेत्रे, कलम ११० अन्वये नगरेतर क्षेत्रातील वर्ग-१ व वर्ग-२ गावे म्हणून वर्गीकरण करण्यात आलेले क्षेत्र आणि कलम १११ अन्वये रचना करण्यात आलेल्या नागरी क्षेत्रातील वेगवेगळ्या अकृषिक वापरासाठीचे गट स्पष्टपणे दर्शविण्यात येतील.

(२) एखादे क्षेत्र अत्यंत लहान असेल तेव्हा किंवा त्यांच्या हद्दी गावाच्या हद्दींना गुंतागुंतीच्या मार्गाने छेदत असतील तेव्हा मोठ्या प्रमाणावरील अतर्न्यासाची किंवा गावाच्या नकाशाच्या पुरवणी फाईलीची तरतूद करण्यात येईल.

(३) एखाद्या नवीन आदेशाद्वारे कोणतेही क्षेत्र वेगळ्या वर्गाखाली किंवा दराखाली आणण्यात आले असेल तेव्हा नकाशा सुधारण्यात येईल व नकाशावर जिल्हाधिकाऱ्याच्या सहीने अशा बदलासंबंधीचा प्राधिकार नमूद करण्यात येईल.

(४) प्रत्येक तहसिलदार तशाच पुरवण्यासह त्याच्या तालुक्याचा नकाशा तशाच रीतीने ठेवील आणि असा नकाशा तशाच प्रकारे सुधारण्यात येईल व प्रत्येक बदलाच्या वेळी जिल्हाधिकाऱ्याकडून त्यावर पृष्ठांकन करण्यात येईल.

(५) हे नकाशे कामाच्या सर्व वेळात विनामूल्य पहाण्यासाठी लोकांना खुले असतील.

२४. **शक्तींचे प्रत्यायोजन.**—या नियमान्वये जिल्हाधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर उप-विभागीय अधिकाऱ्यासही करता येईल.

## अनुसूची एक

(नियम ३ पहा)

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ४४, पोट-कलम (१) खालील अर्जाचा नमुना**

जिल्हाधिकारी..........................

उप-विभागीय अधिकारी..........
तहसिलदार

यांस

महोदय,

मी,.............................., राहणार.................................................,
तालुका.................................., जिल्हा................................, याद्वारे खाली वर्णन केलेल्या ज्या जमिनीची—

*(अ) शेतीच्या प्रयोजनार्थ/........................ अकृषिक प्रयोजनासाठी/प्रयोजनांसाठी आकारणी करण्यात आली आहे किंवा त्यासाठी ती धारण केलेली आहे.

*(ब) .................... अकृषिक प्रयोजनासाठी/प्रयोजनासाठी आकारणी करण्यात आली आहे किंवा त्यासाठी ती धारण केलेली आहे.

*(क) ..........अकृषिक प्रयोजनासाठी आकारणी करण्यात आली आहे किंवा त्यासाठी ती धारण केलेली आहे, ती जमीन त्याच प्रयोजनार्थ पण जमीन देण्याच्या वेळी किंवा अशा अकृषिक वापरासाठी म्हणजेच..........साठी परवानगी देतेवेळी लादलेली.......... † शर्त शिथिल करून, वापरण्यासाठी परवानगी देण्याकरिता अर्ज करीत आहे.

२. मी या अर्जास पुढील गोष्टी जोडत आहे :—

(अ) अर्ज करण्याच्या वेळी अस्तित्वात असल्याप्रमाणे जमिनीच्या संबंधातील अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत.

(ब) ज्याकरिता परवानगी मागितलेली आहे त्या नियोजित इमारतीचे किंवा इतर बांधकामाचे आणि सर्वात जवळचे रस्ते किंवा दळणवळणाची साधने यांचे स्थान दर्शविणारे प्रस्तुत जागेचे रेखाचित्र किंवा रेखांकन (याच्या तीन प्रती).

(क) कूळ/वरिष्ठ धारक/भोगवटादार याची लेखी संमती.

---

*लागू नसलेला मजकूर खोडून टाकावा.

†शर्तीचा मथितार्थ थोडक्यात नमूद करावा.

३. तसेच मी पुढील माहिती पुरवीत आहे :—

(१) अर्जदाराचे पूर्ण नाव ..........................................

(२) डाकेचा पूर्ण पत्ता ..........................................

(३) व्यवसाय ..........................................

(४) जेथे जमीन असेल ते गाव, तालुका व जिल्हा ..........................

(५) जमिनीचा भूमापन क्रमांक, हिस्सा क्रमांक, क्षेत्रफळ व आकारणी/भाडे. — **प्रयोजन** — **चौरस मीटरमध्ये क्षेत्रफळ**

(६) ......साठी वापरण्याचे योजलेल्या वरील (५) च्या जागेचे क्षेत्रफळ.

निवासी .............

औद्योगिक .............

वाणिज्यिक .............

कोणतेही इतर अकृषिक प्रयोजन. .........

(७) अर्जदार दुमाला जमिनीचा वरिष्ठ/धारक किंवा खातेदार वर्ग १ किंवा वर्ग २ किंवा कूळ किंवा सरकारी पट्टेदार आहे किंवा कसे.

(८) जमिनीचा सध्याचा उपयोग व तिच्यावर कोणतीही इमारत आहे किंवा काय आणि तसे असल्यास, तिचा वापर.

(९) ती जमीन ................

(अ) नगरपालिका क्षेत्रात ;

(ब) शहर सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रात ;

(क) अधिसूचित विभागीय योजनेत ; किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ खालील विकास योजनेत किंवा नगररचना योजनेत आहे किंवा अंतर्भूत केलेली आहे किंवा कसे ;

(ड) छावणी क्षेत्रात किंवा त्याच्याजवळ आहे किंवा कसे.

(इ) हवाई बंदर किंवा रेल्वे स्थानक किंवा रेल्वेमार्ग किंवा तुरुंग किंवा कारागृह किंवा स्थानिक, सार्वजनिक कार्यालय किंवा स्मशान किंवा दफनभूमी यांच्याजवळ आहे किंवा कसे. तसे असल्यास त्याच्यापासून तिचे अदमासे अंतर.

(१०) विजेच्या उच्च पारेषण तारा (हाय ट्रान्समिशन लाईन्स) त्या जमिनीवरून जातात किंवा काय आणि तसे असल्यास नियोजित इमारत किंवा इतर बांधकामे यांच्यापासून त्यांचे अंतर किती आहे.

(११) जमीन संपादनाखाली आहे काय, तसे असल्यास, तपशील नमूद करावा.

(१२) जेथून जमिनीवर सहजगत्या ये-जा करता येईल असा रस्ता तेथे आहे काय ? रस्त्याचे नाव व तो महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग किंवा गावचा रस्ता आहे किंवा कसे हे नमूद करा. रस्त्याच्या मध्यापासून नियोजित इमारतीपर्यंतचे किंवा इतर बांधकामापर्यंतचे अंतर किती आहे ?

(१३) जमिनीला लागून रस्ता नसेल तर त्या जागेत जाण्यायेण्यासाठी कशाप्रकारची तरतूद करण्याचे ठरविले आहे ?

(१४) या जमिनीच्या अकृषिक वापरासाठी यापूर्वी असाच अर्ज केलेला होता काय व तो फेटाळण्यात आला होता काय ? फेटाळला असल्यास, का ?

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे सत्य आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची सही.

---

(महसूल अधिकाऱ्याने भरावयाचा.)

अर्ज मिळाल्याची तारीख :

कार्यालयाची मुद्रा :

स्वीकारणाऱ्याची सही व पदनाम.

## अनुसूची दोन

[नियम ४(१) (इ) पहा]

**मुंबई महामार्ग अधिनियम, १९५५ यांचे प्रकरण तीन ज्यांच्या बाबतीत अंमलात नाही अशा क्षेत्रांतील रस्त्याची सीमा व इमारतीची रांग यामधील व इमारतीची रांग व नियंत्रण रेषा यामधील इमारतींच्या बांधकामासाठी तरतूद.**

१. या अनुसूचीच्या उपबंधांना अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीने, जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्व-परवानगीशिवाय——

(अ) एखाद्या रस्त्याची सीमा व खण्ड २ अन्वये विनिर्दिष्ट केलेली इमारत या रेषा यांमधील कोणत्याही जमिनीवर कोणतेही बांधकाम उभारता कामा नये किंवा कोणत्याही विद्यमान बांधकामात महत्त्वाचे फरफार करता कामा नयेत अथवा जमिनीच्या वापरात बदल करता कामा नये ;

(ब) खण्ड २ अन्वये विनिर्दिष्ट केलेली इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांच्यामधील कोणत्याही जमिनीवर सिनेमागृहे धरून ज्यामुळे मोठ्या संख्येने वाहने आकर्षित होतील अशा कोणत्याही औद्योगिक किंवा वाणिज्यिक प्रयोजनार्थ कोणतेही बांधकाम उभारता कामा नये.

२. यासोबतच्या तक्त्याच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रस्त्यांच्या वर्गाच्या बाबतीत, अशा कोणत्याही रस्त्याच्या मध्यापासून मोजण्यात आलेली इमारत रेषा व नियंत्रण रेषा कोणत्याही नागरी किंवा औद्योगिक क्षेत्रांत स्तंभ ३, ४, ५ व ६ यांमध्ये रस्त्याच्या अशा प्रत्येक वर्गासमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आणि औद्योगिक क्षेत्र वगळून कोणत्याही नगरेतर क्षेत्रात रस्त्याच्या अशा प्रत्येक वर्गासमोर तक्त्याचे स्तंभ ७ व ८ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील :

परंतु अशा प्रत्येक रस्त्यावरील वळणांच्या ठिकाणी इमारत रेषा, पूर्वोक्तप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या इमारत रेषेच्या २० टक्क्यांइतक्या वाढविलेल्या अंतरावर निश्चित करण्यात येईल.

**तक्ता**

| अनुक्रमांक | रस्त्याचा वर्ग | नागरी किंवा औद्योगिक क्षेत्र | | | | औद्योगिक क्षेत्र नगरेतर क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रत्यक्ष सीमेच्या कक्षेतील | | नागरी किंवा औद्योगिक क्षेत्राच्या प्रवेशमार्गावरील | | इमारत रेषा | नियंत्रण रेषा |
| | | इमारत रेषा | नियंत्रण रेषा | इमारत रेषा | नियंत्रण रेषा | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | मीटर | मीटर | मीटर | मीटर | मीटर | मीटर |
| १ | राष्ट्रीय महामार्ग व राज्य | २४.३८ | ३६.५८ | ३०.४८ | ४५.७२ | ३०.४८ | ६७.०६ |
| २ | प्रमुख जिल्हा मार्ग .. | २४.३८ | ३६.५८ | २४.३[illegible] | ३६.५८ | ३०.४८ | ५४.८६ |
| ३ | इतर जिल्हा मार्ग .. | १२.१९ | १८.२९ | १५.२४ | २२.८६ | १५.२४ | ३०.४८ |
| ४ | प्रमुख मार्ग .. .. | ९.१४ | १३.७२ | १२.१९ | १८.२९ | १२.१९ | २४.३८ |

टीप.—रस्त्याच्या मध्यरेषेपासून असलेले मीटर्समधील अंतराचे आकडे.

" प्रत्यक्ष सीमा " म्हणजे नगरपालिका शहरे किंवा औद्योगिक क्षेत्रांच्या अधिसूचित सीमा.

" नागरी किंवा औद्योगिक क्षेत्राजवळील प्रवेशमार्ग " यात अशा क्षेत्रांच्या प्रत्यक्ष सीमांपासून तीन मैलांच्या अंतराचा समावेश होतो.

" औद्योगिक क्षेत्र " म्हणजे शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे औद्योगिक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आलेली क्षेत्रे.

या अनुसूचीतील कोणतीही गोष्ट—

(अ) या नियमाच्या प्रारंभापूर्वी जो जमीन दफनभूमी, स्मशानभूमी किंवा मृतांची विल्हेवाट लावण्याची कोणतीही जागा यासाठी वापरण्यात येत असेल त्या, दफनभूमी, स्मशानभूमी किंवा मृतांची विल्हेवाट लावण्याची कोणतीही जागा याचा भाग असणाऱ्या कोणत्याही जमिनीस लागू होणार नाही ;

(ब) ह्या नियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या संमतीने, अशा प्रारंभाच्या वेळी किंवा नन्तर अशा रेषेत किंवा रेषेवर कोणताही मलप्रणाल, जलनि:सारण, विद्युत् मार्ग, नळ, वाहिनी किंवा उपकरण याची दुरुस्ती, नवीकरण, परिवर्धन किंवा परिरक्षण यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही उत्खननास किंवा कामास लागू होणार नाही.

## अनुसूची तीन

(नियम ४ (१) (इ) पहा)

### इमारतीविषयक विनियम

### भाग एक

### सामान्य

१. **किमान मोकळी जागा.**—मोकळी जागा साधारणपणे भूखंडाच्या दोन तृतीयांशाइतकी असेल ; परंतु जेव्हा जमीन फार जास्त किमतीची असेल किंवा इमारतीत गरीब व्यक्ती राहण्याची शक्यता असेल किंवा ती जमीन, जिथे खूप दाटीने इमारती बांधलेल्या आहेत अशा शहरांतील बाजारांच्या भागात किंवा मध्यवर्ति भागात असेल तेव्हा ती मोकळी जागा भूखंडाच्या निम्म्या क्षेत्रापर्यंत कमी करता येईल.

भूखंडाच्या बांधलेल्या जागेचे संगणन करताना द्वारमंडपाने (पोर्च) व्यापलेली जागा वगळण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या विनियमाच्या प्रयोजनासाठी गरीब व्यक्ती " म्हणजे ज्यांचे वार्षिक उत्पन्न ४,२०० रुपयांपेक्षा अधिक नाही अशी व्यक्ती ".

२. **मजल्यांची संख्या.**—जेथे भूखंडाच्या किमान एक द्वितीयांशाइतकी मोकळी जागा आहे तेथे सामान्यत: दोन मजले (तळमजला व एक वरचा मजला) बांधण्याची व जेथे भूखंडाच्या किमान दोन तृतीयाशाइतकी मोकळी जागा आहे तेथे सामान्यत: तीन मजले ( तळमजला व वरचे दोन मजले) बांधण्याची परवानगी देण्यात येईल.

३. **रस्त्यावर जाण्यासाठी प्रवेशमार्ग**—अर्जदार, सध्याच्या रस्त्याद्वारे किंवा संकल्पित रस्त्याद्वारे रस्त्यावर प्रवेश करण्यासाठी मार्गाची तरतूद करील या अटीवर इमारत उभारण्यास परवानगी देण्यात येईल.

४. **इमारतीचा आकार आणि इमारतीचे ठिकाण.**—सामान्यत: बांधावयाची, प्रत्येक इमारत मुख्य रस्त्याच्या बाजूकडे तोंड करून असली पाहिजे, चाळीच्या बाबतीत, कोणत्याही दिशेला तिचे मोजमाप ३०·४८ मीटरपेक्षा अधिक असता कामा नये.

५. **भूखंडाच्या हद्दीपासून अंतर.**—भूखंडाच्या परिमितीच्या ३·०५ मीटरच्या आत आणि भूखंडाच्या मागील हद्दीच्या ६·१० मीटरच्या आत कोणतीही इमारत उभारता येणार नाही.

६. **मोकळ्या जागेतील द्वारमंडप (पोर्च).**—वाहने उभी करण्यासाठी एका बाजूला लहान भिंत असलेला व तीन बाजूंनी उघडा असलेला द्वारमंडप (पोर्च) मागील मोकळी जागा सोडून भूखंडाच्या मोकळ्या जागांपैकी एका मोकळ्या जागेत मुख्य इमारतीला जोडून बांधण्यास पुढील शर्तींना अधीन राहून परवानगी देता येईल—

(अ) द्वारमंडप (पोर्च) मुख्य इमारतीला समांतर असला पाहिजे आणि तो एक मजल्यापेक्षा अधिक उंच, ३·३६ मीटरपेक्षा अधिक लांब व ३·०५ मीटरपेक्षा अधिक रुंद असता कामा नये ;

(व) द्वारमंडप (पोर्च) आणि त्या बाजूची भूखंडाची हद्द यांमध्ये किमान १·५२ मीटर इतकी मोकळी जागा ठेवली पाहिजे ;

७. **अधिक इमारतीसाठी मोकळी जागा.**—जेव्हा एकाच भूखंडात एकापेक्षा अधिक इमारती असतील तेव्हां जणू काही प्रत्येक मुख्य इमारत वेगळया भूखंडात आहे असे समजून प्रत्येक इमारतीच्या सभोवती तेवढीच मोकळी जागा असणे आवश्यक आहे ;

परंतु तळमजल्यावरील संडास किंवा मुख्य इमारतीला अनुलग्न असलेले आणि त्यापासून अलग असलेले मोटरघर, नोकरांची निवासस्थाने, स्वयंपाकघर व साठवण खोली यांसारख्या अंगभूत सोयींची तरतूद असणारे तळमजल्यावरील उपगृह भूखंडाच्या मागच्या भागात मुख्य इमारतीपासून ३·०५ मीटरपेक्षा कमी नसेल, इतक्या अंतरावर भूखंडाच्या मागील हद्दीपासून ३·०५ मीटर मोकळी जागा सोडण्याच्या शर्तीस अधीन राहून उभारण्याची परवानगी देता येईल.

८. **जोते.**—निवासी इमारतीच्या बाबतीत, जोते, जमिनीच्या सर्वसाधारण पातळीच्या वर कमीत कमी ०·६१ मीटर असले पाहिजे.

९. **निवासी खोलीचा आकार.**—राहण्याच्या प्रयोजनासाठी वापरावयाच्या खोलीची कोणतीही बाजू ३·०५ मीटरपेक्षा कमी लांब असता कामा नये ; अशा प्रत्येक खोलीची एक संपूर्ण बाजू भोवतालच्या खुल्या जागेला लागून असेल.

१०. **संडासाचे बांधकाम.**—संडास मुख्य इमारतीच्या बाजूला किंवा मागच्या बाजूला व मुख्य इमारतीपासून ३·०५ मीटरपेक्षा कमी अंतरावर असता कामा नयेत. त्याचा शेजाऱ्यांना उपद्रव होता कामा नये. ते विहिरीपासून ९·१४ मीटरच्या आत असता कामा नये आणि ते लोकांना दिसता कामा नये.

११. **मलकुंडी इत्यादींचे बांधकाम.**—मलकुंड्या नियमितपणे आणि योग्य रीतीने स्वच्छ करण्याची व्यवस्था अस्तित्वात असल्याखेरीज कोणालाही मलकुंड्या बांधण्यास परवानगी देता कामा नये.

कोणत्याही विहिरीपासून ३०·४८ मीटरच्या आत मलकुंडीचा उपयोग करता येणार नाही किंवा मलकुंडीचे बांधकाम करता येणार नाही.

मलमूत्र विसर्जनासाठी कोणताही खालकुआ किंवा खोलकोटी यांचा उपयोग करता कामा नये.

१२. **तबेले.**—कोणत्याही निवासी इमारतीत गुरेढोरे ठेवता कामा नये. निवासी इमारतीपासून ३·०५ मीटरच्या आंत कोणताही तबेला किंवा गुरांचा गोठा बांधता कामा नये.

१३. **बांधकामाचे सामान.**—सर्व इमारती पक्क्या बांधणीच्या असल्या पाहिजेत आणि त्यांच्या बांधणीत शीघ्र ज्वालाग्राही पदार्थाचा वापर करता कामा नये.

१४. **दुकानाचे बांधकाम.**—दुकाने बांधावयाची असतील तेव्हा दुकान आणि रस्त्याच्या हद्दीमधील जागा मुरुमाच्या खडी सारखा कठीण पदार्थ टाकून तयार केली पाहिजे व ती समान पातळीत आणली पाहिजे आणि रूळ फिरवून तिचा पृष्ठभाग कठीण केला पाहिजे.

१५. **भर घालणे व फेरफार.**—जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय इमारतीत कोणतीही भर घालता कामा नये किंवा तीत कोणताही फेरफार करता कामा नये.

## भाग दोन

### ०·४०४७ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र असलेल्या भूखंडासाठी विशेष तरतूदी.

१३. **रेखांकन तयार करणे.**—अकृषिक उपयोगासाठी परिवर्तित करावयाच्या जमिनीचे क्षेत्र ०·४०४७ हेक्टरपेक्षा अधिक असल्यास अर्जदाराने पुढील पद्धतीने योग्य रेखांकन तयार केले पाहिजे :—

(१) खाली स्तंभ (१) मध्ये निर्दिष्ट केलेली लांबी असलेल्या रेखांकनातील अंतर्गत रस्त्यांची रुंदी त्यांच्यासमोर स्तंभ (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रुंदीपेक्षा कमी असणार नाही :—

| रस्त्याची लांबी (१) | रुंदी (२) |
|---|---|
| | मीटर |
| ३०४·८ मीटर पेक्षा अधिक .. .. .. .. .. .. | १३·७२ |
| १५२·४ ते ३०४·८ मीटर .. .. .. .. .. .. | ९·१४ |
| ७६·२ ते १५२·४ मीटर .. .. .. .. .. .. | ७·६२ |
| ७६·२ मीटर पेक्षा कमी .. .. .. .. .. .. | ६·१० |
| ७६·२ मीटर पेक्षा कमी आणि एका बाजूला दर्शनी भाग असलेला भूखंड .. .. | ४·५७ |

(२) रस्त्यांची आखणी शक्य असेल तेथवर वाहतुकीची जलद गती, पावसाच्या पाण्याचा लवकर निचरा होणे व सांडपाणी आणि इतर पाणी वाहून नेणे सुकर होईल अशा प्रकारची असली पाहिजे, रस्ते मिळतात त्या ठिकाणचे भूखंडाचे कोपऱ्याचे भाग गोल करण्यात यावेत.

(३) रस्त्यांची आखणी जमिनीच्या प्रादेशिक परिसराशी जुळती आणि वाहतुकीच्या दिशेनुसार असली पाहिजे. शक्य असेल तेथवर एक बाजू बंद असलेले रस्ते टाळावेत.

(४) शक्य असेल तेथवर, मागील गल्ल्यांची तरतूद करण्याचे टाळावे. जर मागील गल्लीची तरतूद केलेली असेल तर ती ३·६६ मीटरपेक्षा जास्त रूंद करू नये म्हणजे नियमित वाहतुकीचा रस्ता म्हणून तिचा उपयोग करण्यास प्रतिबंध करता येईल.

(५) (अ) रेखांकनातील प्रत्येक भूखंड २७८·७१ चौरस मीटर क्षेत्रापेक्षा सामान्यतः कमी मापाचा नसावा ;

परंतु, यासोबतच्या तक्त्यात स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या भूखंडाचे मोजमाप त्याच्या स्तंभ (३) मध्ये त्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रफळापेक्षा कमी असता कामा नये :—

**तक्ता**

| अनुक्रमांक (१) | भूखंडाचे वर्णन (२) | चौरस मीटर-मधील क्षेत्रफळ (३) |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग किंवा १८·२९ मीटर किंवा त्याहून अधिक रुंदी असलेले इतर मुख्य रस्ते यांच्या समोरील भूखंड. | ४६४·५१ |
| २ | अनुक्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या संस्थेखेरीज इतर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या रेखाकनातील भूखंड. | १८५·८० |
| ३ | औद्योगिक कामगार किंवा आर्थिकदृष्ट्या मागास वर्गाच्या किंवा मागास वर्गाच्या व्यक्ती किंवा ज्या औद्योगिक कामगार असतील अशा व्यक्ती किंवा अशा वर्गाच्या व्यक्ती यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या रेखांकनातील भूखंड. | १३९·३५ |

(ब) कोणत्याही भूखंडाच्या पोट-विभागणीमुळे येथे विहित केलेल्या किमान क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा भूखंड निर्माण होत असेल तर अशी पोट-विभागणी करता कामा नये.

(६) रेखांकनातील प्रत्येक भूखंड नियत आकाराचा असावा म्हणजे इमारतीत पुरेसा दर्शनी भाग, बाजूला कडेची मोकळी जागा व मागील मोकळी जागा यांची सोय करता येईल.

(७) रेखांकनातील प्रत्येक भूखंडाला, लोकांना खुल्या असलेल्या रस्त्यावरून प्रवेशमार्ग असेल.

(८) प्रत्येक रेखांकनात, एकूण क्षेत्राच्या कमीत कमी १० टक्के इतके क्षेत्र खुल्या जागांसाठी ठेवण्याची तरतूद केली पाहिजे.

(९) रेखांकनात, पिण्याच्या पाण्याच्या विहिरीसाठी प्रत्येकी दोनशे माणसांच्या उपयोगासाठी एक विहीर या प्रमाणात भूखंडाची तरतूद करण्यात यावी.

(१०) सावली असलेली झाडे यासारख्या विद्यमान सोयी, शक्य असेल तेथवर कायम ठेवाव्यात.

## इमारतीविषयक विनियम

**११. घरांच्या बांधणीसाठी नकाशे तयार करतांना पुढील शर्तीचे पालन केले पाहिजे :—**

(१) विनियम १६ च्या खंड (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भूखंडाच्या बाबतीत, भूखंडाच्या बाजूनी मागे हटविलेली जागा, बांधकाम केलेले कमाल क्षेत्र व तळमजला धरून, मजल्यांची कमाल संख्या हे पुढील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे असले पाहिजेत :

**कोष्टक**

| अनुक्रमांक | भूखंडाचे वर्णन | भूखंडाचे क्षेत्र | मागे हटविलेले चौ. मीटर-मधील क्षेत्र: दर्शनी भाग | बाजूचे | मागील | बांधकाम केलेले क्षेत्र | मजल्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | सर्वसाधारण .. .. | २७८·७१ ते ४६४·५१ चौ. मीटर. | ४·५७ | २·२९ | ३·०५ | १/३ | ३ |
| २ | राष्ट्रीय महामार्ग राज्य महामार्ग, जिल्ह्यातील मुख्य रस्ते १८·२९ मीटर किंवा त्याहून अधिक रुंदी असलेले इतर मुख्य रस्ते यांच्या समोरील भूखंड. | ४६४·५१चौ. मीटर किंवा अधिक | ४·५७ | ३·०५ | ४·५७ | १/३ | ३ |
| ३ | अनुक्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या संस्थाखेरीज, सहकारी गृह-निर्माण संस्थाच्या रेखांकनातील भूखंड. | १८५·८० ते २७८·७१ चौ. मीटर. | ३·०५ | १·५२ | ३·०५ | ४/१० | २ |
| ४ | औद्योगिक कामगार किंवा आर्थिक दृष्ट्या मागास वर्गाच्या व्यक्ती किंवा जे औद्योगिक कामगार आहेत अशा व्यक्ती किंवा अशा वर्गाच्या व्यक्ती यांच्या सहकारी गृह-निर्माण संस्थांच्या रेखांकनातील भूखंड. | १३९·३५ ते १८५·८० चौ. मीटर | २·२९ | १·५२ | १·५२ | १/२ | १ |

(२) खंड (२) मध्ये उल्लेखिलेल्या वर्गीकृत रस्त्यांकडे दर्शनी भाग असणाऱ्या भूखंडाच्या बाबतीत अनुसूची दोनमध्ये विहित करण्यात आलेल्या प्रमाणांचे पालन करण्यात आले पाहिजे.

(३) गोठा, शौचकूप, इतर तत्सम बांधकामे भूखंडाच्या पाठीमागच्या सीमेलगत बांधण्यास परवानगी देता येईल आणि १८५.८० चौरस मीटर क्षेत्रफळ असणाऱ्या भूखंडाच्या बाबतीत दुय्यम इमारत आणि मुख्य इमारत यांतील सरळ अंतर ३.०५ मीटरपेक्षा कमी असणार नाही.

(४) राहण्याच्या खोलीचे फरसबंद क्षेत्रफळ ९.२९ चौरस मीटरपेक्षा कमी असणार नाही आणि इमारतीतील रहाण्याची जागा व स्वयंपाकघर आणि व्हरांडा यांचे क्षेत्रफळ २३.२३ चौरस मीटरपेक्षा कमी असणार नाही.

(५) स्वयंपाकासाठी वेगळे स्वयंपाकघर किंवा स्वयंपाकघर-नि-व्हरांडा यांची तरतूद केली पाहिजे.

(६) प्रत्येक घराला शक्यतोवर सर्व बाजूंनी बंद असलेला व १.८६ चौरस मीटरपेक्षा कमी क्षेत्रफळ नसेल असा, आंघोळीसाठी पक्का चौथरा असला पाहिजे.

(७) घरात सॅनिटरी शौचकूपाची तरतूद असेल तर त्यावर योग्य असे छप्पर घातले पाहिजे आणि त्याचे क्षेत्रफळ १.११ चौरस मीटरपेक्षा कमी नसेल इतके असले पाहिजे.

(८) स्वयंपाकघर व न्हाणीघर यांतील सांडपाणी योग्य त्या निस्सारणाच्या मार्गाने भूखंडाच्या मागच्या भागात बांधलेल्या सांडपाण्याच्या कुंडीत सोडले पाहिजे आणि रस्त्यावर निस्सारणाची पक्की व्यवस्था असल्याशिवाय आणि सांडपाण्याच्या विल्हेवाटीसाठी पुरेशी व्यवस्था असल्याशिवाय ते सांडपाणी कोणत्याही सार्वजनिक रस्त्यावर सोडता कामा नये.

(९) मुख्य घराच्या जोत्याची उंची जमिनीच्या सर्वसाधारण पातळीच्या वर ०.३० मीटरपेक्षा कमी असता कामा नये आणि गोठा व इतर तत्सम बांधकामाच्या जोत्याची उंची जमिनीच्या सर्वसाधारण पातळीच्या वर ०.१५ मीटरपेक्षा कमी असता कामा नये.

(१०) राहण्याच्या खोलीची उंची सपाट छपराच्या बाबतीत २.७४ मीटरपेक्षा कमी असता कामा नये आणि उतरत्या छपराच्या बाबतीत सरासरी उंची २.७४ मीटरपेक्षा कमी असता कामा नये व अगदी खालच्या बाजूची उंची कमीत कमी २.१३ मीटर असली पाहिजे.

(११) राहण्याच्या सर्व खोल्यांमधून वाजवी हवा व उजेड खेळण्याची व्यवस्था असली पाहिजे, खिडक्या वातक, जाळ्या आणि थेट हवेत प्रत्यक्ष खुली असणारी इतर तत्सम खुली द्वारे यांचे एकूण खुले क्षेत्रफळ, खोलीच्या जमिनीच्या ८ टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये (जिल्हाधिकाऱ्यांच्या मते दमट असणाऱ्या, क्षेत्रात हे क्षेत्र १० टक्क्यांपर्यंत वाढविले पाहिजे).

(१२) स्नानगृह व शौचकूपासाठी वातकांची सोय असल्यास त्या वायुवीजनाचे क्षेत्रफळ ०.२८ चौरस मीटरपेक्षा कमी असता कामा नये.

(१३) घरातील सर्व दरवाजांची पूर्ण उंची १.८३ मीटरपेक्षा कमी असता कामा नये.

(१४) राहण्याच्या खोल्या व स्वयंपाकघर यांची जमीन कठीण व अशोषक पदार्थांची बनवलेली असली पाहिजे.

(१५) कुंपणाच्या भिंतीतील सर्व द्वारे भूखंडात उघडतील अशी असली पाहिजेत. रस्त्यावर उघडणारी असता कामा नये.

### विवक्षित निकडीच्या परिस्थितीत विनियमांचे उपबंध शिथिल करण्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती

१८. जिल्हाधिकाऱ्यास, ज्या ज्या वेळी निकडीच्या परिस्थितीत त्यास तसे करणे आवश्यक वाटेल त्या त्या वेळी नगररचना संचालक यांच्याशी विचारविनिमय करून या अनुसूचीतील विनियमांच्या उपबंधांपैकी कोणताही उपबंध शिथिल करता येईल.

## अनुसूची चार

(नियम ७ पहा)

### नियोजन प्राधिकाऱ्यांच्या अधिकारितेबाहेर असलेल्या जमिनीच्या धारकाला द्यावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी, . . . . . . . . . . . . तालुक्यातील, . . . . . . . . गावातील, भूमापन क्रमांक . . . . . . . . चे वरिष्ठ धारक/भोगवटादार/कूळ (ज्याचा यापुढे "अर्जदार" असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भानुसार तसे अनुज्ञेय असल्यास त्या संज्ञेत त्याचे वारस, मृत्यूपत्र व्यवस्थापक, कारभारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) असलेले, . . . . . . . . येथील रहिवाशी श्री. . . . . . . . . . . . . . . यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (ज्याचा यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे व त्या संज्ञेत संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास, त्याअन्वयेचे नियम व आदेश यांचा समावेश होईल) याच्या कलम ४४ अन्वये यासोबतच्या परिशिष्ट एकमध्ये वर्णन केलेला, आणि जागेच्या नकाशावर . . . . . . अक्षरांनी दर्शविलेल्या भूमापन क्रमांक . . . . . . चा भाग असलेला . . . . . . . . क्षेत्रफळ असलेला किंवा त्यापेक्षा थोडया कमीअधिक मापाच्या असलेल्या भूखंडाच्या (ज्याचा यापुढे "उक्त भूखंड" म्हणून उल्लेख करण्यात आला आहे) . . . . . . . . . प्रयोजनासाठी वापर करण्याच्या परवानगीकरिता . . . . . . . .च्या जिल्हाधिकाऱ्याकडे (ज्याचा यापुढे "जिल्हाधिकारी" असा उल्लेख केला असून त्या संज्ञेत, या अधिकारपत्रान्वये त्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी ज्यास नियुक्त करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो) अर्ज केला आहे :

त्याअर्थी, आता याद्वारे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त महसूल अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधांस अधीन राहून आणि पुढील शर्तीवर उक्त भूखंड वापरण्याची परवानगी देण्यात येत आहे :—

१. **जमीन समतल करणे व साफ करणे.**—ज्यासाठी परवानगी देण्यात आली आहे त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविघातक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

२. **आकारणी.**—उक्त भूखंडाच्या बाबतीत यापूर्वी बसविण्यात येणाऱ्या आकारणीऐवजी अर्जदार शासनाला दिनांक . . . . . . . . १९ . . . रोजी सुरू होणाऱ्या पंधरा वर्षांच्या मुदतीमध्ये दरवर्षी . . . . . . . रुपये ( . . . . . . . . . रुपये) वार्षिक आकारणी देईल आणि १५ वर्षांची उक्त मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त महसूल अधिनियमान्वये वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित आकारणी देईल :

परंतु, अर्जदार, सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ असेल तर त्यास बदललेल्या आकारणीस द्यावयाची नियम २२ च्या पोट-नियम (३) अन्वये अनुज्ञेय असलेली सूट मिळण्याचा हक्क असेल.

३. **वापर.**—अर्जदाराने . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन लिहावे) याव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी, उक्त जमिनीचा आणि तिच्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय वापर करता कामा नये.

४. **बांधकामाबाबतची कालमर्यादा.**—अर्जदाराने, या अधिकारपत्राच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत उक्त भूखंडावर भरीव व कायम स्वरूपाचे . . . . . . . . . . सुरू केले पाहिजे. तसे त्याने न केल्यास, जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल, तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल. आणि जर कोणत्याही इतर विधीद्वारे किंवा तदनुसार बांधकामाविषयीचे विनियम विहित करण्यात आले नसतील तर, त्या इमारतीचा निवासविषयक वापर करण्याच्या बाबतीत, अर्जदाराने या अनुसूचीच्या परिशिष्ट दोनच्या खंड . . . . . . . मध्ये समाविष्ट असलेल्या बांधकामाविषयीच्या विनियमांचे प्रत्येक बाबतीत पालन केले पाहिजे.

५. **पट्टी देण्याबाबतचे दायित्व.**—अर्जदाराने उक्त जमिनीवर आकारण्यायोग्य सर्व कर, पट्टया व उपकर दिले पाहिजेत.

६. **शास्तीविषयीचा खंड.**—(अ) अर्जदाराने [illegible] कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त महसूल अधिनियमाच्या उपबंधान्वये [illegible] अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाध न आणता जिल्हाधिकाऱ्या[illegible] रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम ३२[illegible] पोट-कलम (२) [illegible] निदेशित करील असा दंड भरल्यावर, उक्त भूखंड अर्जदाराचे ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुद्ध उभारण्यात आलेली किंवा वापरण्यात आलेली कोणतीही इमारत किंवा कोणतेही बांधकाम त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने निदेश देणे वैध असेल, आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे (इमारत किंवा बांधकाम) काढून टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करण्यात आला नाही तर त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल, आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

७. **अधिनियमाचे उपबंध लागू करणे.**—यात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त महसूल अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधाच्या अधीन असेल :—

नकाशा

[illegible] एक

| लांबी व रुंदी | | [illegible] भागाचे मापक [illegible] | | सीमा | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तर-दक्षिण | पूर्व-पश्चिम | एकूण क्षेत्रफळ | [illegible] | [illegible] | दक्षिण | पूर्व | पश्चिम | |

[नियम ४ (१) [illegible]]

(लागू असलेल्या शर्ती [illegible] करण्यात येतील आणि विशेष शर्ती त्यानंतर लगेच समाविष्ट करण्यात येतील).

[illegible] अर्जदार [illegible] सोबत जोडलेल्या नकाशा-[illegible] .......... [illegible] इमारत [illegible] उर्वरित क्षेत्र मोकळी जागा [illegible].

[illegible] ...... [illegible]

[illegible] आले [illegible]

[illegible] ........ [illegible] नाही.

५. उक्त भूखंडावर उभारलेली कोणतीही इमारत केवळ* ............ प्रयोजनाकरिताच वापरण्यात येईल.

६. उक्त भूखंडावर उभारलेली कोणतीही इमारत, दुकान† म्हणून किंवा कारखाना † म्हणून किंवा कोणताही अपराधिक व्यापार चालू ठेवण्याचे ठिकाण म्हणून वापरण्यात येणार नाही.

७. हे अधिकारपत्र खालील शर्तींना अधीन असेल :--

(अ) [येथे नियम ४ (१) (इ) अन्वये लादलेल्या इतर शर्ती आणि नियम ४ (१) (फ) अन्वयेच्या विशेष शर्ती, कोणत्याही असल्यास, नमूद कराव्यात.]

(ब) ..........इत्यादी, इत्यादी.

या गोष्टीची साक्ष म्हणून ..... च्या जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि ..... नेसुद्धा येथे तारीख ......... १९ रोजी आपली सही केली आहे.

............

(अर्जदाराची सही)

............

(साक्षीदारांच्या सह्या व पदनामे)

............

(जिल्हाधिकाऱ्याची सही)

जिल्हाधिकाऱ्याची मोहोर.

............

(साक्षीदारांच्या सह्या व पदनामे)

आम्ही असे जाहीर करतो की, जिने या सनदेवर सही केली आहे ती अ, ब ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक, माहितीप्रमाणे, ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

(सही) बी. एफ.

(सही) जी. एच.

---

टीप.—१. हे कागदपत्र नोंदविण्याची आवश्यकता नाही.

२. या कागदपत्राला मुद्रांक शुल्काची सूट देण्यात आली आहे.

*येथे प्रयोजनाचा उल्लेख करावा.

†लागू नसलेला मजकूर खोडावा.

# अनुसूची पाच

(नियम ७ पहा)

## नियोजन प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेत असलेल्या जमिनीच्या धारकाला द्यावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी, ............ जिल्ह्याच्या ............ तालुक्यातील ............ गावातील भू-मापन क्रमांक ............ चे वरिष्ठ धारक/भोगवटादार/कूळ (ज्याचा यापुढे "अर्जदार" असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या संज्ञेत त्याचे वारस, मृत्युपत्र-व्यवस्थापक, कारभारी आणि अभिहस्तांकिती यांचा समावेश होईल) असलेले ............ येथील रहिवासी श्री. ............ यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (ज्याचा यात यापुढे 'उक्त महसूल अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे व त्या संज्ञेत संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या अन्वयेचे नियम व आदेश यांचा समावेश होतो) याच्या कलम ४४ अन्वये, यासोबतच्या परिशिष्ट एक मध्ये वर्णन केलेला आणि जागेच्या नकाशावर ............ अक्षरांनी दर्शविलेला भू-मापन क्रमांक ............ चा भाग असलेल्या व ............ क्षेत्रफळ असलेला किंवा ह्यापेक्षा थोडचा कमीअधिक मापाच्या असलेल्या भू-खंडाचा (ज्याचा यापुढे "उक्त भू-खंड" असा उल्लेख करण्यात आला आहे) ............ प्रयोजनासाठी वापर करण्याच्या परवानगीकरिता ............ च्या जिल्हाधिकाऱ्यांकडे (ज्यांचा यापुढे "जिल्हाधिकारी" असा उल्लेख केला असून त्या संज्ञेत या अधिकारपत्रान्वये त्याच्या शक्तीचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी ज्यास नियुक्त करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो) अर्ज केला आहे.

आणि ज्याअर्थी, ............ च्या ............ नगरपालिकेने/महानगरपालिकेने इमारतीच्या बांधकामास परवानगी दिलेली आहे.

त्याअर्थी, आता, असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून आणि पुढील शर्तींवर उक्त भू-खंड ............ प्रयोजनासाठी वापरण्याची परवानगी देण्यात येत आहे :—

(१) **जमीन समतल करणे व ती साफ करणे.**—ज्यासाठी परवानगी देण्यात आली आहे त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनास योग्य होण्यासाठी आणि आरोग्यविघातक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतल करण्यास व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

(२) **आकारणी.**—अर्जदार उक्त भू-खंडाच्या संबंधात यापूर्वी बसविण्यात येणाऱ्या आकारणीऐवजी राज्य शासनाला दिनांक ............१९ रोजी सुरू होणाऱ्या पंधरा वर्षांच्या मुदतीमध्ये दरवर्षी ............ रुपयांची ( रुपये) वार्षिक आकारणी देईल आणि उक्त पंधरा वर्षांची मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त अधिनियमान्वये वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित आकारणी देईल.

(३) **वापर.**—अर्जदाराने ............ (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन येथे लिहावे). याव्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि त्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय वापर करता कामा नये.

अर्जदाराने, या सोबतच्या परिशिष्ट दोन मध्ये असलेल्या शर्तींचे यथोचितरीत्या पालन केले पाहिजे.

(४) **बांधकामाबाबतची कालमर्यादा.**—अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत उक्त भू-खंडावर भरीव व कायम स्वरूपाचे ............ सुरू केले पाहिजे ; त्याने तसे न केल्यास जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेली परवानगी व्यपगत झाल्याचे समजण्यात येईल.

(५) पट्टी देण्याबाबतचे दायित्व.—अर्जदाराने, उक्त जमिनीवर आकारण्याजोगे सर्व कर, पट्टया आणि उपकर दिले पाहिजेत.

(६) शास्तीविषयी वा खंड.—(अ) अर्जदाराने पूर्वगामी शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाध न आणता, जिल्हाधिकाऱ्यास, तो निदेशित करील अशी आकारणीची रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम ३२९ चे पोट-कलम (२) ला अधीन राहून तो निदेशित करील असा दंड भरल्यावर उक्त भू-खंड, अर्जदाराच्या ताब्यात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिकारपत्राच्या उपबंधांविरुद्ध कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास जिल्हाधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत, जिल्हाधिकाऱ्याने निदेश देणे वैध असेल आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे (इमारत किंवा बांधकाम) काढून टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करण्यात आला नाही तर, त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

(७) अधिनियमाचे उपबंध लागू असणे.—यात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधांस अधीन असेल.

नकाशा

### परिशिष्ट एक

| लांबी व रुंदी | | पृष्ठभागाचे एकूण क्षेत्रफळ | सीमा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| उत्तर-दक्षिण | पूर्व-पश्चिम | | उत्तर-दक्षिण | पूर्व-पश्चिम | |
| | | | | | |

### परिशिष्ट दोन

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये नियोजन प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आराखड्यास अनुसरून अर्जदाराने भू-खंडावर बांधकाम केले पाहिजे.

२. अर्जदाराने इमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषांचे पालन केले पाहिजे आणि सोबतच्या नकाशातील ............ ने चिन्हांकित केलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवले पाहिजे.

३. हे अधिकारपत्र पुढील विशेष शर्तींस अधीन राहील :—

(अ) ..................

(ब) ..................इत्यादी, इत्यादी.

---

टीपा.—(१) हे कागदपत्र नोंदविण्याची आवश्यकता नाही.

(२) ह्या कागदपत्रास मुद्रांक शुल्काची सूट देण्यात आली आहे.

या गोष्टींची साक्ष म्हणून .............. च्या जिल्हाधिकाऱ्याने महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदारानेसुद्धा यावर ........................१९ रोजी आपली सही केली आहे.

............

(अर्जदाराची सही)

............

............

(जिल्हाधिकाऱ्याची सही) (साक्षीदारांच्या सह्या व पदनामे)

............

जिल्हाधिकाऱ्याची मोहोर. (साक्षीदारांच्या सह्या व पदनामे)

आम्ही असे जाहीर करतो की, जिने या सनदेवर सही केली आहे ती अ. ब ही व्यक्ती आमच्या वैयक्तिक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली सही केली आहे.

(सही) ............

............

............

## अनुसूची सहा

(नियम ११ पहा)

### अविकृत अकृषिक वापराचे विनियमन केल्यावर जमीन धारकाला द्यावयाच्या सनदेचा नमुना

ज्याअर्थी, .............. तालुक्यातील .............. गावातील भू-मापन क्रमांक ..................चा वरिष्ठ धारक/भोगवटादार/कूळ असणाऱ्या अर्जदाराने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (ज्याचा यात यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या कलम ४४ अन्वये, आवश्यक असल्याप्रमाणे प्रथमत: मिळालेल्या उक्त ............ भू-मापन क्रमांकाचा भाग असणाऱ्या आणि .............. या एकाच मापाच्या, त्याहून किंचित कमी किंवा जास्त मापाच्या यासोबत जोडलेल्या जागेच्या आराखड्यामध्ये .............. अक्षरांनी दर्शविलेल्या जमिनीच्या भू-खंडाचा ......... च्या जिल्हाधिकारी (ज्याचा यात यापुढे "जिल्हाधिकारी" असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या परवानगीशिवाय ............ प्रयोजनासाठी वापर केला आहे आणि यानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ४५ अन्वये विहित केलेल्या शिक्षांस तो पात्र ठरलेला आहे.

आणि ज्याअर्थी, अर्जदाराने ......... प्रयोजनांसाठी उपरोक्त जमिनीचा भू-खंड ताब्यात राहण्याबाबतच्या आणि त्याचा वापर चालू ठेवण्याबाबतच्या परवानगीसाठी अर्ज केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे उपबंध आणि त्याअन्वयेचे नियम व आदेश आणि यात यापुढे समाविष्ट असलेल्या अटी व शर्ती यांस अधीन राहून, ज्यासाठी अर्ज केला असेल अशी परवानगी देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास, उक्त अधिनियमाच्या कलम ४७, खंड (ब) अन्वये प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, आता याद्वारे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, उक्त महसूल अधिनियमाचे उपबंध आणि त्याअन्वयेचे नियम व आदेश यांस अधीन राहून आणि पुढील शर्तीवर ......... प्रयोजनांसाठी उक्त भू-खंडाचा वापर करण्याची याद्वारे परवानगी देण्यात येत आहे:—

(१) **दंड.**—अर्जदाराने, महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम, १९६९ अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल अशी दंड तडजोड फी दिली पाहिजे.

(२) **आकारणी.**—अर्जदाराने यापूर्वी उक्त भू-खंडाच्या संबंधात बसविण्याजोग्या आकारणीऐवजी, शासनास दरवर्षी तारीख .........१९ रोजी .........रुपयांची ( रुपये) वार्षिक आकारणी तारीख .........१९ रोजी सुरू होणाऱ्या पंधरा वर्षांच्या मुदतीत दिली पाहिजे आणि उक्त पंधरा वर्षांची मुदत संपल्यानंतर उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याकडून वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित महसुली आकारणी दिली पाहिजे.

(३) **वापर.**—अर्जदाराने (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन येथे समाविष्ट करावे).........या व्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्व मंजुरीशिवाय उक्त जमिनीचा आणि त्यावर उभारलेल्या किंवा उभारावयाच्या इमारतीचा वापर करता कामा नये.

(४) **इमारत परिशिष्टामध्ये निर्दिष्ट केलेल्या विनियमानुसार असणे.**—अर्जदाराने, यासोबतच्या परिशिष्टाच्या ......... खंडामध्ये असलेल्या इमारतीबाबतच्या विनियमांचे प्रत्येक बाबतीत यथोचितरीत्या पालन केले पाहिजे.

(५) **पट्टया देण्याबाबतचे दायित्व.**—अर्जदाराने, उक्त जमिनीवर बसविण्याजोगे सर्व कर, पट्टया आणि उपकर दिले पाहिजेत.

*(६) **हमी.**—अर्जदाराने, वाजवी कालावधी संपल्यानंतर ज्यावेळी जिल्हाधिकाऱ्याकडून अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्यास सांगण्यात येईल त्यावेळी नुकसानभरपाईची मागणी न करता कायदेशीररीत्या बांधून घेऊन तसे करण्यास त्याने संमती दिली पाहिजे, तसे त्याने न केल्यास जिल्हाधिकाऱ्याने अर्जदाराच्या जोखमीवर आणि अर्जदाराच्या खर्चाने तसे केले पाहिजे.

(७) **शास्तीविषयीचा खंड.**—(अ) अर्जदाराने, पूर्वगामी शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास, अर्जदार उक्त महसूल अधिनियमाच्या आणि त्याखालील नियमांच्या उपबंधान्वये ज्या शिक्षेला पात्र ठरत असेल अशा इतर कोणत्याही शिक्षेस बाध न आणता जिल्हाधिकाऱ्याला तो निदेशित करील अशी आकारणीची रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम ३२९ चे पोट-कलम (२) ला अधीन राहून तो निदेशित करील असा दंड भरल्यावर उक्त भू-खंड अर्जदाराच्या कब्जात ठेवण्याचे चालू ठेवता येईल.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिकारपत्राच्या उपबंधांविरुद्ध कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास जिल्हाधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने निदेश देणे वैध असेल आणि विनिर्दिष्ट मुदतीत अशा प्रकारे इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्यात आले नाही किंवा त्यात बदल करण्यात आला नाही तर त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

(८) अधिनियमाचे उपबंध लागू असणे.—यात उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त महसूल अधिनियमाच्या उपबंधास आणि त्याअन्वयेच्या नियमास अधीन राहील.

([illegible])

---

* लागू नसलेला मजकूर खोडावा.

## परिशिष्ट

(लागू असलेल्या शर्तीचे क्रमांक अधिकारपत्राच्या शर्त ४ मध्ये दाखल करण्यात यावेत; आणि विशेष शर्ती त्यापुढेच क्रमाने समाविष्ट करण्यात याव्यात).

१. अर्जदारास सोबतच्या नकाशावर..........ने चिन्हांकित केलेल्या क्षेत्रावर बांधकाम करता येईल आणि त्याने उक्त भू-खंडाचे राहिलेले क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवली पाहिजे.

२. उक्त भू-खंडापैकी..........भाग वरच्या बाजूने उघडा ठेवण्यात येईल.

३. उक्त भू-खंडावर बांधण्यात आलेला कोणताही शौचकूप, मलकुंडी किंवा तबेले हे, सोबतच्या नकाशात अशा प्रयोजनांकरिता कोणतीही जागा अलग ठेवण्यात आली असेल तर, अशा जागेवरच बांधण्यात आले पाहिजेत आणि इतरत्र बांधण्यात येता कामा नयेत.

४. उक्त भू-खंडावर कोणतीही इमारत.....मीटरपेक्षा अधिक उंच उभारण्यात येणार नाही.

५. उक्त भू-खंडावर उभारलेली इमारत केवळ........प्रयोजनांकरिताच वापरण्यात येईल.

६. उक्त भू-खंडावर उभारलेली कोणतीही इमारत, दुकान* म्हणून किंवा कारखाना* म्हणून किंवा अपराधिक व्यापार चालू ठेवण्याचे ठिकाण म्हणून वापरण्यात येणार नाही.

७. अधिकारपत्र खालील विशेष शर्तींना अधीन असेल :—

(अ)

(ब)

या गोष्टीची साक्ष म्हणून.........च्या जिल्हाधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदारानेसुद्धा यावर...... १९ रोजी आपली सही केली आहे.

(अर्जदाराची सही) (साक्षीदारांच्या सह्या व पदनाम

(जिल्हाधिकाऱ्याची सही)

(साक्षीदारांची सही व पदनामे)

आम्ही असे जाहीर करतो की, जिने ही सनद स्वाक्षरित केली आहे ती अ. ब ही व्यक्ती आमच्या माहिती-प्रमाणे ती जी असल्याचे सांगत आहे तीच व्यक्ती आहे आणि तिने आमच्या समक्ष आपली स्वाक्षरी केली आहे.

सही.................

---

**टीपा.**—१. हे कागदपत्र नोंदविण्याची आवश्यकता नाही.

२. या कागदपत्राला मुद्रांक शुल्काची सूट दिलेली आहे.

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

## अनुसूची सात

(नियम १४ पहा)

### अकृषिक जमिनीच्या विक्रीच्या व्यवहारांची नोंदवही

गट क्रमांक ............ नगर ..................

तालुका .............. जिल्हा ..................

| वर्ष | व्यवहाराची तारीख | विक्रेत्याचे आणि त्याच्या वडिलांचे नाव | खरेदीदाराचे आणि त्याच्या वडिलांचे नाव | विक्रीच्या व्यवहारांचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भूखंड क्रमांक, भूमापन क्रमांक | आकारलेला महसूल किंवा भरलेले जमीन भाडे | विकलेले क्षेत्र | विक्रीची किंमत |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | रुपये | हेक्टर | रुपये |

| बांधकाम असलेल्या जमिनीच्या बाबतीत किंमतीची विभागणी | | ज्या प्रयोजनाकरिता जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|
| जमिनीची किंमत | विक्रीच्या तारखेस बांधकाची किंमत | विक्रीच्यावेळी वापरात होती ते प्रयोजन | विकण्यात आली ते | |
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| रुपये | रुपये | | | |

**टीपा.**—(१) अकृषिक प्रयोजनाकरिता कृषिक जमिनींच्या केलेल्या विक्रीचे व्यवहारसुद्धा नोंदवहीत नोंदण्यात यावेत.

(२) नोंदवही ठेवणाऱ्या अधिकाऱ्याने व्यवहार खरा-खुरा होता किंवा नव्हता, आणि विक्री किंमत किंवा चढभाव फार मोठ्या प्रमाणात जास्त किंवा कमी असण्याची काही कारणे आहेत किंवा कसे यासंबंधी या आपल्या चौकशीचा निकाल "शेरा" या स्तंभात नमूद केला पाहिजे.

## अनुसूची आठ

(नियम १४ पहा)

### अकृषिक जमिनींच्या भाडेपट्टा व्यवहारांची नोंदवही

गट क्रमांक ........................ नगर .............

तालुका ........................ जिल्हा .............

| वर्ष | भाडेपट्ट्याने दिल्याची तारीख | पट्ट्याने देणाऱ्याचे आणि त्याच्या वडिलांचे नाव | पट्टेदाराचे आणि त्याच्या वडिलांचे नाव | भाडेपट्टा व्यवहारांचा तपशील: भू-खंड क्रमांक / भूमापन क्रमांक | आकारलेला महसूल किंवा भरलेले जमीन भाडे | भाडेपट्ट्याने दिलेले क्षेत्र | भाडे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | रुपये | हेक्टर | रुपये |

| बांधकाम असलेल्या जमिनींच्या बाबतीत भाड्याची विभागणी: जमिनीचे भाडे | बांधकामाचे भाडे | ज्या प्रयोजनाकरिता जमीन: भाडेपट्ट्याने देण्याच्या वेळी वापरण्यात आली होती ते प्रयोजन | भाडेपट्ट्याने देण्यात आली ते प्रयोजन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| रुपये | रुपये | | | |

**टीप.**—नोंदवही ठेवणारा अधिकारी व्यवहार खरा होता किंवा नव्हता आणि भाडेपट्ट्याची रक्कम फार मोठ्या प्रमाणात जास्त किंवा कमी असण्याची काही कारणे आहेत किंवा कसे या संबंधीच्या आपल्या चौकशीचा निकाल "शेरा" स्तंभात नमूद करील.

## अनुसूची नऊ

(नियम १४ पहा)

### भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये अकृषिक जमिनींच्या संबंधात जाहीर करण्यात आलेल्या निवाड्यांची नोंदवही

गट क्रमांक ............... नगर ............... तालुका ............ जिल्हा .........

| वर्ष | भूमि संपादन अधिनियमाच्या कलम ४ अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेची तारीख | संपादन केलेल्या जमिनीचा तपशील | | | | संपादनाच्या-वेळी जमिनींचा वापर कोणत्या प्रकारे चालू होता ते | ज्या प्रयोजनाकरिता जमीन संपादन करण्यात आली होती ते प्रयोजन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भू-खंड क्रमांक किंवा भूमापन क्रमांक | महसूल आकारणी किंवा भरलेले जमीन भाडे | संपादन केलेले क्षेत्र | निवाड्याअन्वये जाहीर करण्यात आलेल्या जमिनीचे मूल्य | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | रुपये | हेक्टर | रुपये | | | |

**टीप.**—स्तंभ १ मधील वर्ष हे ज्या वर्षी निवाडा जाहीर करण्यात आला ते वर्ष नसून भूमिसंपादन अधिनियमाच्या कलम ४ अन्वये ज्या वर्षी अधिसूचना काढण्यात आली ते वर्ष असेल.

माफी रद्द करणे.

११८. कलम ११७ च्या उपबंधान्वये ज्या जमिनीस अकृषिक आकारणी देण्याची माफी देण्यात आली असेल, त्या जमिनीस अशा रीतीने देण्यात आलेली माफी ही, ज्या कारणासाठी तिला माफी देण्यात आली असेल त्या कारणाखेरीजकरून इतर कोणत्याही कारणासाठी तिचा वापर करण्यात येत असेल तर, चालू असण्याचे बंद होईल असा राज्य सरकारने निदेश देणे विधिसंगत असेल ; आणि त्यानंतर, उक्त जमीन ही या प्रकरणाच्या उपबंधानुसार आकारणी देण्यास, व त्याखेरीज, राज्य सरकारच्या सामान्य आदेशांस अधीन राहून, जिल्हाधिकारी निदेश देईल असा दंड दिला जाण्यास पात्र ठरेल.

जमीन महसूल देण्याची संपूर्ण माफी असलेल्या जमिनींची अकृषिक आकारणी.

११९. ह्या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे, जिल्हाधिकाऱ्यास, अशी आकारणी देण्याची संपूर्ण माफी असलेल्या जमिनीवर योग्यरीतीने पूर्ण अकृषिक आकारणी निश्चित करण्यास व तिची नोंदणी करण्यास प्रतिबंध होतो, असे समजता कामा नये.

अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निश्चित केलेली अकृषिक आकारणी, तिच्यात फेरबदल करण्यात येईतोपर्यंत अंमलात राहील.

१२०. ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी राज्याच्या कोणत्याही भागातील जमिनीवर निश्चित करण्यात आलेली आणि अंमलात असलेली अकृषिक आकारणी ही, या प्रकरणाच्या उपबंधान्वये निश्चित करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल, आणि या प्रकरणात काहीही असले तरी, ज्या मुदतीसाठी उक्त आकारणी निश्चित करण्यात आली असेल त्या संपूर्ण मुदतीसाठी, आणि त्यानंतर, या प्रकरणाच्या उपबंधान्वये अशा आकारणींची फेरतपासणी होईपर्यंत, ती अंमलात असण्याचे चालू राहील, असे समजण्यात येईल.

## प्रकरण ८

## गावांच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांतील जमिनी

१२१. या प्रकरणाचे उपबंध, गावाच्या, नगराच्या आणि शहराच्या जागेत असलेल्या सर्व जमिनीस लागू होतील. प्रकरण लागू असणे.

१२२. राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष आदेशान्वये काम करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने, जमीनधारकांचे सर्व विद्यमान हक्क विचारात घेऊन, कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेत कोणत्या जमिनी समाविष्ट करावयाच्या याबद्दल खात्री करून घेणे व त्या निश्चित करणे आणि वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या जागेच्या हद्दी ठरविणे व वेळोवेळी त्यात फेरफार करणे हे विधिसंमत असेल. गावाच्या, नगरांच्या आणि शहरांच्या जागांच्या हद्दी कशा ठरवावयाच्या ते.

१२३. गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेत असलेल्या आणि शेतीच्या कारणासाठी वापरण्यांत न येणाऱ्या, जमिनीवर पुढील बाबतीत जमीन महसूल आकारण्यात येणार नाही :— विवक्षित बाबतीत गावाच्या, नगरांच्या किंवा शहराच्या जागेतील जमिनीवर कोणताही जमीन महसूल न आकारणे.

(अ) ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी ज्या जमिनींना अशा प्रारंभापूर्वी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधान्वये आकारणी देण्याची माफी देण्यात आली असेल, किंवा ज्यांना कोणतीही रुढी, प्रथा, अनुदान, सनद, आदेश किंवा कबुलायत यामुळे, माफी देण्यात आली असेल, अशा जमिनी ;

(ब) नगरेतर क्षेत्र असतील अशा गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागांत असलेल्या निवास-योग्य इमारतीच्या जागा.

१२४. (१) निकटपूर्वीच्या कलमान्वये माफी मिळण्याबाबत मामण्या संक्षिप्तरीत्या चौकशी केल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याकडून ठरविण्यात येतील आणि त्याचा निर्णय, पोट-कलम (२) ला अधीन राहून, अखेरचा असेल. जिल्हाधिकाऱ्याने माफी विषयीचा हक्क ठरविणे.

(२) पोट-कलम (१) अन्वयेच्या कोणत्याही आदेशान्वये आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास, अशा आदेशाच्या तारखेपासून दोन वर्षांच्या मुदतीत उक्त आदेशाच्या वैधते-संबंधातील हरकतीसाठी दिवाणी दावा दाखल करता येईल.

१२५. एक-चतुर्थांश एकरापेक्षा अधिक नसेल अशी पार्डी जमीन, आणि शेतीच्या कारणासाठी किंवा शेतीस दुय्यम किंवा सहाय्यक असलेल्या कारणासाठीच केवळ वापरण्यात येणारी वाडी जमीन यास जमीन महसूल देण्याची माफी असेल : पार्डी व वाडा जमिनीस जमीन महसूल देण्याची माफी असणे.

परंतु, पारडी जमिनीच्या बाबतीत, ती धारण करणारा, शेतीच्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी म्हणून जमिनीच्या वापरात बदल केल्याबद्दल यथास्थिती, कलमे ४४, ४५ व ६७ अन्वये, अकृषिक आकारणी आणि यथास्थिती दंड देण्यास, पात्र ठरेल.

१२६. कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेतील ज्या जमिनीचा केवळ शेतीच्या कारणासाठी सामान्यत: वापर करण्यात येत असेल अशी जमिनीखेरीज इतर जमिनीचे कलम ७९ च्या उपबंधान्वये भू-मापन करण्याविषयी किंवा कलम ८३ च्या उपबंधान्वये त्यांचे नव्याने भू-मापन करण्याविषयी निदेश देणे इष्ट आहे असे राज्य सरकारास कोणत्याही वेळी वाटल्यास असे भू-मापनाचे काम करण्यात येईल आणि त्या सर्व कामकाजाचे नियमन या अधिनियमाची प्रकरणे ५ आणि ९ यांच्या उपबंधानुसार होईल: गावाच्या जागांतील जमिनीचे भू-मापन कसे करावे, ते.

परंतु, उक्त प्रकरणांची कलमे ८०, ८१ किंवा १३३ मधील कोणताही मजकूर, दोन हजाराहून अधिक लोकसंख्या असेल अशा कोणत्याही नगरातील किंवा शहरातील अशा कोणत्याही भू-मापनास लागू असणार नाही.

१२७. (१) दोन हजारांहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या कोणत्याही गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेस, कलम १२६ च्या उपबंधान्वये भू-मापन लागू करण्यात येईल त्याबाबतीत, इमारतीची जागा धारण करणारा प्रत्येक इसम, उक्त जागेवर आकारणी करण्यात आलेली भू-मापन फी आणि अशा जागेचे कर योग्य मूल्य देण्यास पात्र ठरेल. विवक्षित बाबतीत भू-मापन फी आकारणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या भू-मापनाच्या फीच्या रकमेचे याबाबतीत राज्य सरकार करील अशा नियमानुसार, जिल्हाधिकाऱ्याकडून नियमन करण्यात येईल.

(३) उक्त भू-मापन फी ही, गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या जागेच्या भू-मापनाचे किंवा नोटिशीत निर्दिष्ट करण्यात आले असेल अशा त्याच्या भागाच्या भू-मापनाचे काम पूर्ण झाल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याकडून याबाबतीत देण्यात येईल अशा जाहीर नोटिशीच्या तारखेपासून सहा महिन्यात दिली पाहिजे.

**टीप ५७.**—कृपया कलम १३१ खालील टीप ५९ पहा. (नियम ८ पहा).

गावातील जागांचे नकाशे.

**१२८.** (१) कलम १२६ अन्वये चालविलेल्या कामांचे निष्कर्ष, राज्य सरकार विहित करील अशा नकाशात व नोंदणी पुस्तकात राज्य सरकार विहित करील अशा रीतीने नमूद करण्यात आले पाहिजेत.

(२) जर कोणतीही ग्रामपंचायत, धारकांच्या भोगवटयात असलेले तुकडे दर्शविणारा गावातील एखाद्या जागेचा नकाशा तयार करण्यात यावा आणि विहित करण्यात येईल अशा प्रमाणात असे नकाशे तयार करण्यासाठी लागणारा खर्च देण्याचो तिची तयारी आहे असा ठराव संमत करील तर, राज्य सरकारास असे नकाशे तयार करण्याचे काम हाती घेता येईल.

**टीप ५८.**—कृपया कलम १३१ खालील टीप ५९ पहा. (नियम ५ व ९ पहा.)

कोणत्याही अधिक आकाराशिवाय सनद मंजूर करणे.

**१२९.** वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या इमारतीची जागा धारण करणाऱ्या प्रत्येक इसमास आणि नव्याने तयार करण्यात आलेली किंवा प्रथमतः अशा प्रकारे उपयोगात आणली जाणारी इमारतीची जागा धारण करणाऱ्या प्रत्येक इसमास, कलम १२६ अन्वये करण्यात येणारे भू-मापन पूर्ण झाल्यावर, त्यासाठी तरतूद करण्यात आलेली भू-मापन फी, धारण करणाऱ्या इसमास देणे आवश्यक असेल त्याबाबतीत कोणत्याही अधिक आकाराशिवाय अनुसूची 'क' मधील नमुन्यातील किंवा तशाच अर्थाच्या, त्याने धारण केलेल्या जमिनीची मर्यादा व स्थिती ही, नकाशाने व वर्णनाने निर्दिष्ट करणाऱ्या एक किंवा अधिक सनदा जिल्हाधिकाऱ्याकडून मिळण्याचा हक्क असेल आणि धारण करणाऱ्या इसमास कोणतीही भू-मापन फी देणे आवश्यक नसेल त्याबाबतीत, त्यास प्रत्येक सनदीदाखल एक रुपया फी दिल्यानंतर अशी सनद किंवा सनदा मिळण्याचा हक्क असेल. अशी प्रत्येक सनद ही, राज्यपालांचे वतीने, ते निर्दिष्ट किंवा अधिकृत करतील अशा इसमाकडून करून देण्यात येईल :

परंतु, जर असा धारण करणारा इसम भू-मापन फी देण्याचे वेळी किंवा त्यानंतर, कलम १३७ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने काढलेल्या सार्वजनिक नोटिशीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, अशी सनद किंवा सनदा मिळण्यासाठी अर्ज न करील तर, जिल्हाधिकाऱ्यास, प्रत्येक सनदेसाठी एक रुपयापेक्षा अधिक नसेल एवढी जादा फी देण्याबद्दल भाग पाडण्याचा अधिकार आहे.

अनुसूची 'क'

(कलमे १२९ आणि १३० पहा)

**इमारतीच्या जागेबाबतच्या सनदेचा नमुना**

**महाराष्ट्र शासन**

प्रति ...........................

ज्याअर्थी, जमीन महसुलाची व्यवस्था व्हावी म्हणून, आणि जमिनीशी संबंधित असलेले मालकी हक्क आणि इतर हक्क यांची नोंद होऊन ते कायम करण्यात यावेत म्हणून ............चे ........ यातील जमिनीचे सर्वेक्षण करण्याबद्दल, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, याच्या उपबंधान्वये राज्य सरकारने निदेश दिला आहे आणि त्याबाबतीत जरूर असणारी चौकशी करण्याचा आदेश दिला आहे; त्याअर्थी ही सनद उक्त अधिनियमाच्या कलम १२९ किंवा १३० अन्वये दिली आहे, म्हणजे ........चे ............चे भागातील जमिनीचा विवक्षित तुकडा तुमच्या भोगवटयात आहे व ....... क्रमांकाचा ताव म्हणून जो नकाशा आहे त्यात जमिनीच्या त्या तुकडयाच्या नोंदीचा क्रमांक ........ आहे आणि ............ पासून ............ जाणाऱ्या रस्त्यावर ......... याचे तोंड आहे व त्याचे क्षेत्रफळ सुमारे ..........चौरस मीटर आहे व त्याची आकृती व लांबी-रुंदी पुढीलप्रमाणे आहे :—

उक्त भोगाधिकार तुमच्याकडे ........ अन्वये कायम केला आहे. त्यास सर्व जमीन महसुलाची माफी आहे (किंवा त्यांना जमीन महसुलाची............... रुपये रक्कम द्यावी लागेल.)

तुमच्या सत्ता प्रकारच्या शर्ती अशा आहेत की, भोगाधिकार हस्तांतरणयोग्य आणि वंशपरंपरागत चालणारा आहे आणि उक्त भोगाधिकार, त्याचा वेळोवेळी जो कोणी वैध धारक असेल अशा इसमाच्या मालकी हक्काबाबत कोणतीही हरकत किंवा तक्रार न घेता, राज्य सरकारकडून चालू ठेवण्यात येईल. (फक्त महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर विधींच्या उपबंधानुसार वरीलप्रमाणे/दरवर्षी जमीन महसूल देण्यास उक्त भोगाधिकाराच्या अधीन असेल आणि ................पासून ............वर्षांची मुदत संपल्यानंतर आकारणीच्या उक्त दरात फेरतपासणी करण्यात येऊ शकेल आणि त्यानंतर नेहमी............ वर्षाच्या लागोपाठच्या मुदतीने आकारणीची पुन्हा फेरतपासणी करता येईल आणि उक्त आकारणी देण्याच्या वेळाबाबत आणि पद्धतीबाबत त्या त्या वेळी जो विधी अंमलात असेल त्या विधीच्या उपबंधानसार पालन करणे आवश्यक असेल आणि विधीअन्वये देणे आवश्यक असलेली उक्त आकारणी देण्यात तुम्ही कसूर कराल तर, उक्त भोगाधिकार आणि त्याच्याशी संबंधित असलेले सर्व हक्क आणि हितसंबंध, सरकारजमा होण्यास पात्र असतील.)

(सही)

**धारण जमिनीतील फेरबदलानंतर सनद मंजूर करणे.**

१३०. कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आल्यावर, व कलम १२९ अन्वये सनदा मंजूर करण्यात आल्यावर, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे इमारतीच्या जागा धारण करणाऱ्या ज्या इसमाने धारण केलेल्या जमिनीत वाढ करून, ती कमी करून, तिचे पोट-विभाग पाडून, तिच्या भू-सत्ताप्रकारात फेरबदल करून किंवा अन्यथा फेरबदल करण्यात आला असेल त्या इसमास, आयुक्ताच्या मंजुरीने जिल्हाधिकाऱ्याने प्रत्येक गाव, शहर, किंवा नगर यांसाठी केलेल्या विनियमानुसार ठरवून दिलेली दुरुस्ती फी दिल्यानंतर, 'अनुसूची'* 'क' मधील नमुन्यातील किंवा तशाच अर्थाच्या, त्याने धारण केलेल्या व फेरबदल करण्यात आलेल्या जमिनीची मर्यादा व स्थिती ही, नकाशाने व वर्णनाने निर्दिष्ट करणारी एक नवीन सनद जिल्हाधिकाऱ्याकडून मिळण्याचा किंवा, यथास्थिती त्यास कलम १२९ अन्वये आधीच देण्यात आलेली, वा जिल्हाधिकाऱ्याकडून दुरुस्त करण्यात आलेली सनद मिळण्याचा हक्क असेल.

*अनुसूची 'क' कलम १२९ या नंतर मुद्रित केली आहे.

**दुसरी सनद मंजूर करता येईल.**

१३१. जर एखादा धारक त्याला देण्यात आलेली सनद चुकून हरवली आहे किंवा नष्ट झाली आहे असे जिल्हाधिकाऱ्यास कळवील तर कलम १२९ किंवा कलम १३० अन्वये त्यास मंजूर करण्यात आलेल्या सनदेची एक प्रत, विहीत करण्यात येईल असा आकार किंवा फी, कोणतीही असल्यास, दिल्यानंतर त्यास देण्यात येईल.

**टीप ५९.**—ग्राम, नगर व शहर सर्वेक्षण नियम [कृपया टीपा ५७ व ५८ ही पहाव्या (नियम १० पहा)].

[शासकीय अधिसुचना क्र. यु एन एफ २०६७ आर, दिनांक २८ डिसेंबर १९७० व शासकीय अधिसुचना क्र. यु एन एफ-२०६७-आर, दिनांक ५ नोव्हेंबर १९७१ अन्वये दुरुस्ती केल्याप्रमाणे शासकीय अधिसुचना क्रमांक यु एन एफ २०६७-आर, दिनांक १६ जुलै १९६९]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस, महाराष्ट्र जमीन महसूल (नगर भूमापन) नियम, १९६९ असे म्हणता येईल

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत :—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.
(ब) "जिल्हा निरीक्षक" म्हणजे, जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख.
(क) "नमुना" म्हणजे, या नियमांना जोडलेला नमुना.
(ड) "कलम" म्हणजे, अधिनियमाचे कलम.
(इ) "अधीक्षक" म्हणजे, अधीक्षक, भूमि-अभिलेख.

३. **जिल्हाधिकाऱ्याने भूमापनाची नोटीस काढणे.**—राज्य शासनाने कलम १२६ अन्वये कोणत्याही गावातील, नगरातील किंवा शहरातील जमिनीचे भूमापन करण्याचा निदेश दिलेला असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकारी, त्या गावाच्या, नगराच्या किंवा शहराच्या रहिवाशांना भूमापन सुरू केले असल्याची माहिती देण्याची आणि घरमालक, गहाणकार व गहाणदार, अन्यत्रवासी मालक आणि ज्या जमिनीची मोजणी करावयाची आहे त्या जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, या प्रयोजनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या भूमापन अधिकाऱ्यास माहिती देण्याची आणि त्यांच्या जमिनीची मोजणी व अधिकार अभिलेखात बिनचुक नमूद होत आहेत याची खात्री करून घेण्याची विनंती करणारी, नमुना 'अ' मधील सर्वसामान्य नोटीस काढण्याची व्यवस्था करील.

**४. भूमापन अधिकारी व त्यांचे कर्मचारी वर्ग.**—अधीक्षक किंवा राज्य शासनाने या बाबतीत पद-निर्देशित केलेला असा इतर अधिकारी यांच्या नियंत्रणास अधीन राहून, जिल्हा निरीक्षकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला भूमापन अधिकारी, भूमापनविषयक कामांचा प्रभारी असेल. भूमापनाचे काम करताना, अधीक्षक किंवा यथास्थिति असा इतर अधिकारी नियुक्त करील असा भूमि-अभिलेख विभागाचा कर्मचारी-वर्ग, भूमापन अधिकाऱ्यांस मदत करील.

**५. भूमापन विषयक कामे.**—नियम ४ मध्ये निर्दिष्ट केलेले कर्मचारी, संचालक, भूमि अभिलेख, वेळो-वेळी निदेश देतील त्या रीतीने, उक्त नियमांत तरतूद केल्याप्रमाणे, कोणत्याही भूमापनासंबंधीची कामे पार पाडतील. अशा रीतीने पार पाडलेल्या कामांची नोंद, संचालक, भूमि अभिलेख, वेळोवेळी निर्धारित करील त्या प्रमाणानुसार काढलेल्या नकाशामध्ये करण्यात येईल. तसेच कर्मचारी वर्ग, मालमत्तेच्या तपशीलासंबंधीची माहिती आणि तिच्या धारकांची नावे यांची नोद करील आणि ती चौकशी नोंदवहीच्या नमुना 'ब' मधील स्तंभ १ ते ४ मध्ये दाखल करील. अशा रीतीने तयार केलेले नकाशे आणि नोंदवहृया, नंतर नियम ६ च्या प्रयोजनासाठी चौकशी अधिकाऱ्याकडे पाठविण्यास येतील . हा अधिकारी, भूमि-अभिलेख जिल्हा निरीक्षक, किंवा राज्य शासनाने किंवा यथास्थिति संचालक, भूमि अभिलेख यांनी नियुक्त केलेला तहसिलदार यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला भूमापन अधिकारी असेल.

**६. चौकशीची कार्यपद्धती.**—(१) भूमापनाखालील क्षेत्राच्या हद्दीत असलेल्या जमिनीच्या प्रत्येक खंडाच्या बाबतीत, अशा प्रत्येक खंडावर कायम कब्जा असण्याची कोणास हक्क आहे, कोणत्या कब्जामुळे अतिक्रमण होते, सुविधाधिकार किंवा अनुज्ञप्ती मिळते आणि कोणती जमीन स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा शासनाकडे निहित आहे आणि व्यक्तिगत किंवा संस्थेच्या कायदेशीर कब्जात असल्याचे न्यायनिर्णीत केलेल्या जमिनींच्या बाबतीत, तिचे धारणाधिकार आणि जमीन महसूल देण्यासंबंधीचे दायित्व या गोष्टी निश्चित करणे हे चौकशी अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) पोट-नियम (१) अन्वये भूमापनाखाली, असलेल्या जमिनीच्या बाबतीतील व्यक्ती आणि संस्था यांचे अधिकार, हक्क व हितसंबंध ठरविण्याच्या प्रयोजनासाठी, चौकशी अधिकारी, अधिनियमाचे कलम २० किंवा यथास्थिती, मुंबई महानगरपालिका अधिनियम याचे कलम ९१ इ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याचे कलम ६९, मुंबई प्रांतीक नगरपालिका अधिनियम,१९४९ याचे कलम ८०, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याचे कलम ५९ किंवा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याचे कलम ८९ यान्वये चौकशी करील. नियम ५ मध्ये निर्दिष्ट केलेले नकाशे आणि नोंदवहृया या चौकशी अधि-काऱ्याच्या निर्णयानुसार किंवा जर अपील दाखल करण्यात आले असेल किंवा दिवाणी दावा दाखल करण्यात आला असेल तर, अपिलात किंवा दिवाणी दाव्यात दिलेल्या आदेशानुसार दुरुस्त करण्यात येतील.

(३) ज्या जमिनीवर कोणत्याही व्यक्तीने हक्क सांगितलेला नाही अशा भोगवटयात नसलेल्या पडीत भू-खंडाची यादी, चौकशी अधिकारी जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील. अशी यादी मिळाल्यावर जिल्हा-धिकारी, अशा भू-खंडात हितसंबंध आहेत असे सांगण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, हक्का-संबंधीच्या लेखी पुराव्यासह चौकशी अधिकाऱ्यासमोर नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, उपस्थित राहण्यास सांगणारी नमुना 'क' मधील एक जाहीर नोटीस लावण्याची व्यवस्था करील.

जर अशा भू-खंडाबाबत कोणताही हक्क सांगण्यात आलेला असेल तर, चौकशी अधिकारी तो निश्चित करण्यासंबंधी पोट-नियम (२) अनुसार कार्यवाही करील. जर उपरोक्त मुदतीत, हक्क सांगण्यात आला नाही तर, तो भू-खंड राज्य शासनाकडील निहित जमीन म्हणून समजण्यात येईल.

**७. मालमत्ता पत्रक.**—चौकशीचे अंतिम निकाल, जमिनीच्या प्रत्येक खंडाबाबत "मालमत्ता पत्रक" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या नमुना 'ड' मधील पत्रकात वेगवेगळे नोंदण्यात येतील.

**८. [illegible].**—(१) कलम १२७ अन्वये देय असलेली भूमापन फी, जिल्हा[illegible] अशा प्रकारे निश्चित करण्यात येईल की भू-मापनाखालील जागेच्या संबंधातील एकूण देय असलेल्या रकमेमध्ये, भूमापनाच्या व त्याच्या मालमत्ता पत्रकाचा त्यात समावेश होईल.

(२) प्रत्येक बांधकामाच्या जागेची किंवा तिच्या कोणत्याही भागाची फी ठरविताना, जिल्हाधिकारी पोट-नियम (१) च्या तरतुदी आणि बांधकामाच्या अशा प्रत्येक जागेची किंवा तिच्या भागाचे स्थान, किंमत आणि क्षेत्र या गोष्टी विचारात घेईल.

परंतु ग्राम पंचायतीला आवश्यक असलेला नकाशा, कलम १२६ अन्वये भूमापन करण्याच्या वेळी आधीच तयार करण्यात आला असेल तर अशा नकाशाची प्रत पंचायतीला कलम ३२७ अन्वये विहित केलेल्या नक्कल करण्याबाबतच्या फीचे प्रदान केल्यानंतर देण्यात यावी.

९. **नकाशे तयार करण्यासाठी ग्रामपंचायतीनी अंशदान देणे.**—धारकांच्या भोगवटघात असलेले भू-खंड दर्शविणाऱ्या गावामधील जागांचा नकाशा तयार करण्याचा खर्च म्हणून, कलम १२८ पोट-कलम (२) अन्वये ग्रामपंचायतीवर आकारावयाचे अंशदान असे नकाशे तयार करण्याच्या एकूण खर्चाच्या ६० टक्क्यांपेक्षा कमी नसेल.

१०. **सनदेची दुसरी प्रत देण्यासाठी फी.**—कलम १३१ अन्वये कोणत्याही धारकाने सनदेच्या प्रतीसाठी अर्ज केलेला असेल तर लाल शाईने "दुसरी प्रत" म्हणून चिन्हित केलेली तिची एक प्रत, एक रुपया फी दिल्यानंतर, त्यास देता येईल.

नमुना "अ"

(नियम ३ पहा)

**जाहीर नोटीस**

........गावातील/नगरातील/शहरातील सर्व रहिवाशांना याद्वारे कळविण्यात येते की, राज्य शासनाने आपला आदेश क्रमांक , दिनांक द्वारे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम १२६ अन्वये, उक्त गावातील/नगरातील शहरातील जागांमधील जमिनीचे (ज्या सामान्यतः केवळ कृषिविषयक प्रयोजनार्थ वापरण्यात येत असतील अशा जमिनीखेरीज) भूमापन करण्याचा निदेश दिला आहे. त्यानुसार* पासून भूमापन अधिकारी काम सुरू करतील.

उक्त गावातील/नगरातील/शहरातील घर मालकांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, त्यांनी, भूमापन अधिकारी यथून पुढे निश्चित करतील त्या तारखस, घराच्या व इतर मालमत्तेच्या मोजणीसाठी उपस्थित राहीले पाहिजे आणि त्यांच्या मालमत्तेची बिनचूक मोजणी करणे भूमापन अधिकाऱ्यास शक्य व्हावे यासाठी सर्व आवश्यक माहिती दिली पाहिजे.

भूमापन करावयाच्या जमिनीत हितसंबंध असलेल्या गहाणदार, गहाणकार, अन्यत्रवासी मालक आणि इतर व्यक्ती यांना याद्वारे कळविण्यात येते की, भूमापन अधिकाऱ्याकडून यानंतर निश्चित करण्यात येईल अशा तारखेला त्यांनी हजर रहावे आणि आपले अधिकार अचूक रित्या अभिलिखित करण्यात आले आहेत याबद्दल खात्री करून घ्यावी. भूमापनानंतर, जमिनीतील मालमत्तेवरील त्यांचे अधिकार, सनदा काढून कायम निश्चित करण्यात येतील. अंतर्गत मोजणीच्या प्रयोजनासाठी कोणत्याही जागांमध्ये प्रवेश करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, उक्त जागांच्या भोगवटदारांना चोवीस तासांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची पूर्वसूचना दिल्याखेरीज, कोणताही भूमापक तीत प्रवेश करणार नाही.

†जेवढ्या जमिनीचे भूमापन करावयाचे त्या जमिनीच्या मोजणीसाठी किंवा वर्गीकरणासाठी कामगारांना मजुरीवर लावण्यासाठी किंवा भूमापनासंबंधीच्या आनुषंगिक हेतुसाठी कोणताही खर्च झाल्यास, तो जमीनधारकाकडून महसूल मागणी म्हणून वसुलीयोग्य असेल. धारकांनी अधिक सहाय्य दिल्यास, भूमापनाचे काम तातडीने होईल आणि भूमापनाचा खर्च कमी होईल.

माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.
कार्यालयाचा शिक्का.

दिनांक जिल्हाधिकारी

---

*येथे तारीख नमुद करावी.

†भूमापन करावयाच्या गावाची लोकसंख्या २,००० पेक्षा कमी असल्यास, वगळावे.

## नमुना "ब"

(नियम ५ पहा)

### चौकशी नोंदवही

शहर भूमापन ..................

पेठ किंवा प्रभाग ................ टिक्का किंवा पान क्रमांक .........

| अनुक्रमांक किंवा चलता क्रमांक | जुना शहर भूमापन, नगरपालिका किंवा ग्रामपंचायत किंवा भूमापन आणि उपविभाग किंवा भूखंड क्रमांक | क्षेत्रफळ | धारकांचे मानीव नाव (अ) नगरपालिका अभिलेखात किंवा इतरत्र असेल तसे आणि इतर हितसंबंधित किंवा हक्क सांगणारे पक्ष (ब), (क), (ड) इत्यादी | (अ) भोगवटदार इत्यादींवर (ब) महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या मालकी हक्कासंबंधी चौकशी) नियम, १९६७ याच्या नियम २ (१) अन्वये मालमत्तेवर नोटीस बजावल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

| स्तंभ ४ मधील (अ), (ब), (क) इत्यादी-पैकी कोण हजर होते | सर्वेक्षकाने तयार केलेला नकाशा व केलेली मोजणी पक्षकारांनी स्वीकारली, पक्की केली किंवा चौकशी अधिकाऱ्याने दुरुस्ती केली किंवा कसे | अंतिम शहर भूमापन क्रमांक | भूमापन फीसाठी नियम ८ (२) अन्वये केलेले वर्गीकरण | (कलम १२९ च्या परंतुकान्वये सनदे-साठी काही जादा फी असल्यास त्या-बाबतच्या टीपे-सह) जिल्हा-धिकाऱ्याने निश्चित केलेली भूमापन फीची रक्कम | दिलेल्या फीचा पावती क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |

| धारणाधिकार आणि भाडे किंवा आकारणी व त्यांच्या फेरतपा-सणीची नियत तारीख | धारकाचे, ज्याच्या कब्जात जमीन आहे असा गहाण-दार, पट्टेदार किंवा भारधारक यांच्या नावा-संबंधीचे निर्णय आणि संलग्न सुविधाधिकार | ज्यावेळी हरकत घेण्यात आली असेल तेव्हा कार्यवाही-च्या फायली-चा संदर्भ | महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनी-च्या मालकी हक्कासंबंधी चौकशी) नियम, १९६७ याच्या नियम २ (३) अन्वये काढलेल्या निर्[illegible]डीचा आदेश बजावल्याची तारीख | अपील आदेश कोणताही असल्यास | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |

नमुना "क"

[नियम ६(३) पहा]

**जाहिर नोटीस**

(खुल्या जमिनीवर लावावी)

खाली वर्णन केलेल्या पडीत भू-खंडावर राज्य शासनाने हक्क सांगितला आहे. कोणत्याही व्यक्तीचा त्यावर मालकी अधिकार किंवा इतर कोणताही अधिकार असेल तर तिने उक्त जमिनीच्या अधिकारासंबंधीचा कोणताही दस्तऐवज किंवा इतर पुरावा यांसह, येथे असलेल्या, भूमापन अधिकाऱ्यांच्या कार्यालयात, भूमापन अधिकाऱ्यांसमोर, नोटीशीच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत; उपस्थित रहावे. उक्त मुदतीच्या आत, जमिनीवर मालकी अधिकार किंवा इतर अधिकार असलेली कोणतीही व्यक्ती, भूमापन अधिकाऱ्यापुढे उपस्थित राहिली नाही तर उक्त जमीन शासनाची मालमत्ता म्हणून समजली जाईल.

माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

कार्यालयाचा शिक्का

दिनांक जिल्हाधिकारी

जमिनीचे वर्णन

रस्ता घर क्रमांक

(नगरपालिका नोंदवहीत) किंवा अन्यथा माहिती असल्याप्रमाणे

सीमा पुढील प्रमाणे आहेत :—

उत्तरेला पूर्वेला

दक्षिणेला पश्चिमेला

## नमुना "ड"

(नियम ७ पहा)

**मालमत्ता पत्रक**

| भूमापन क्रमांक | क्षेत्र | धारणाधिकार | शासनाला दिलेल्या आकारणीचा किंवा भाडयाचा तपशील आणि त्याच्या फेरतपासणीची नियत वेळ |
|---|---|---|---|
| | | | |

सुविधाधिकार—

हक्काचा मूळ धारक (शोधून काढला जाईल जेथवर)

पट्टेदार—

इतर भार—

इतर शेरे—

| दिनांक | व्यवहार | खंड क्रमांक | नवीन धारक (एच्), पट्टेदार (एल्) किंवा भार (इ) | साक्षांकन |
|---|---|---|---|---|
| | | | | |

# प्रकरण ९

## हद्दी व हद्दींच्या निशाण्या

१३२. राज्यातील सर्व गावांच्या व गावातील सर्व भू-मापन क्रमांकाच्या हद्दी, हद्दींच्या निशाण्यांनी ठरविल्या पाहिजेत व आखल्या पाहिजेत : हद्दी ठरविणे व आखणे.

परंतु, नागपूर, चांदा, वर्धा आणि भंडारा या जिल्ह्यातील आणि अमरावती जिल्ह्यातील मेळघाट या तालुक्यातील गावांमध्ये राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निदेश देईल अशा तारखेपासून, हद्दींच्या निशाण्यांनी भू-मापन क्रमांकाच्या हद्दी ठरविल्या पाहिजेत व आखल्या पाहिजेत.

१३३. भू-मापन अधिकारी किंवा राज्य सरकारकडून त्या प्रयोजनासाठी नेमणूक करण्यात येईल असे इतर अधिकारी यांनी, गावांच्या हद्दी ठरविल्या पाहिजेत व रीतसर चौकशी करून त्यासंबंधातील सर्व वादांचा निर्णय केला पाहिजे. अशा चौकशीच्या वेळी ग्राम अधिकारी व सर्व हितसंबंधित इसमांना हजर रहाण्याची व पुरावा सादर करण्याची संधी देण्यात आली पाहिजे. गावांच्या हद्दी ठरविणे.

१३४. जर भू-मापनाचे वेळी, शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या हद्दींबाबत कोणताही वाद नसेल आणि त्यावेळी हजर असलेल्या ग्राम अधिकाऱ्यांनी त्यामध्ये दोष नसल्याचे मान्य केले असेल तर, जमीन धारण करणाऱ्याने किंवा भोगवटा करणाऱ्या इसमाने दाखविल्याप्रमाणे हद्द ठरविता येईल आणि त्याबाबत वाद असेल किंवा उक्त जमीन धारण करणारा किंवा भोगवटा करणारा इसम हजर नसेल तर, भू-मापन अधिकाऱ्याने, जमिनीबाबतच्या कागदपत्राप्रमाणे आणि ग्राम अधिकारी आणि शेजारची जमीन धारण करणारा इसम याजकडून भोगवटयाबद्दल खात्रीपूर्वक माहिती मिळेल त्याप्रमाणे किंवा भू-मापन अधिकारी जो इतर पुरावा किंवा माहिती मिळवू शकेल त्या पुराव्याप्रमाणे किंवा माहितीप्रमाणे ती (हद्द) ठरविण्यात आली पाहिजे. शेताच्या हद्दी ठरविणे.

१३५. ज्याचे भू-मापन करण्यात आले नाही अशा एखाद्या गावच्या किंवा शेतीच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या हद्दींबाबत कोणताही वाद उत्पन्न झाला असेल किंवा भू-मापन पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही वेळी कोणत्याही गावाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या किंवा एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या हद्दींबाबत वाद उत्पन्न झाला असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने रीतसर चौकशी करून तो वाद निकालात काढला पाहिजे आणि अशा चौकशीच्या वेळी ग्राम अधिकारी व सर्व हितसंबंधित इसमांना हजर राहण्याची व पुरावा सादर करण्याची संधी मिळाली पाहिजे. गावे, भू-मापन क्रमांक आणि पोट-विभाग यामधील हद्दी-बाबत वाद.

१३६. (१) जिल्हाधिकाऱ्यास, हितसंबंध असलेल्या एखाद्या पक्षकाराने अर्ज केल्यावर एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागांच्या हद्दीची आखणी करता येईल व त्यावर हद्दींच्या निशाण्या उभारता येतील. भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या हद्दीची आखणी.

(२) भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या हद्दीची आखणी करताना जिल्हाधिकाऱ्याने अनुसरावयाच्या कार्यरीतीचे नियमन करण्यासाठी, उपयोगात आणावयाच्या हद्दींच्या निशाण्या कोणत्या प्रकारच्या असाव्यात हे विहित करण्यासाठी आणि आखणी करण्यात आलेल्या एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागाच्या जमिन धारकाकडून फी वसूल करण्याकरिता प्राधिकार देण्यासाठी नियम[६०] करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे.

(३) या कलमाच्या उपबंधान्वये आखणी करण्यात आलेले भू-मापन क्रमांक आणि पोट-विभाग हे, कलमे १३२, १३५, १३९ आणि १४० यांच्या प्रयोजनाकरिता भू-मापन क्रमांक आहेत, असे समजले पाहिजे.

टीप ६०.—कृपया कलम १४२ खालील टीप ६३ पहावी. (नियम १३ पहा).

१३७. (१) जेव्हा कोणत्याही इसमाच्या (या कलमात ज्याचा अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे) गावातील शेतांपैकी कोणत्याही शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या हद्दीचे नियमन करण्याची किंवा त्या सरळ करण्याची इच्छा असेल तेव्हा त्यास याबाबतीत भू-मापन अधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल. वेडयावाकडया हद्दी सरळ करणे.

अर्जासोबत, त्याच्या शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनीच्या हद्दी दर्शविणारा नकाशा व शेजारच्या जमीनधारकांची नावे देण्यात येतील.

(२) अर्ज मिळाल्यानंतर, अर्जदाराच्या इच्छेनुसार जमिनीच्या अधिक चांगल्या लागवडीच्या आणि हद्दीच्या निशाण्या सुस्थितीत ठेवण्याच्या दृष्टीने कोणत्याही शेतांच्या किंवा धारण जमिनींच्या हद्दीचे नियमन करणे व त्या सरळ करणे इष्ट आहे असे भू-मापन अधिकाऱ्यास वाटेल तर त्यास, मुंबई जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या उपबंधास अधीन राहून, अशा शेताच्या किंवा धारण केलेल्या जमिनींच्या हद्दीच्या फेरतपासणीसाठी एक योजना तयार करता येईल व अशा फेरतपासणीमुळे ज्यांचा जमिनीच्या बाबतीत तोटा झाला असेल त्यांना अर्जदाराने नुकसानभरपाई देण्यासाठी तिच्यात तरतूद असेल, आणि अशी योजना, नियमाद्वारे'' विहित करण्यात येईल अशा रीतीने गावात प्रसिद्ध करता येईल. भू-मापन अधिकाऱ्याने हद्दींची फेर-तपासणी राज्य सरकार ह्या बाबतीत जे नियम करील त्या नियमांना अनुसरून केली पाहिजे. शक्य असेल तेथवर भूमि संपादन अधिनियम, १८९४, याच्या कलम २३ च्या उपबंधानुसार त्याने नुकसानभरपाई-ची रक्कम ठरविली पाहिजे.

(३) भू-मापन अधिकाऱ्याने तयार केलेल्या योजनेस अर्जदाराने व जमीन गेल्यामुळे नुकसान झालेल्या इसमांनी संमती दिली असेल तर, भू-मापन अधिकाऱ्याने, त्यांच्या कबुलायतीची नोंद केली पाहिजे आणि हद्दीची फेरतपासणी करून त्यानुसार त्या निश्चित केल्या पाहिजेत. अशी कबुलायत अर्जदार व अशा इसमांवर बंधनकारक राहील आणि तदन्वये कोणत्याही इसमाने द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, त्याच्याकडून वसूल करता येईल.

(४) (अ) आपसात कबुलायत न झाल्यास योजनेनुसार प्रत्येक संबंधित इसमाने द्यावयाच्या किंवा त्याच्याकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या रकमेसंबंधीचा प्रश्न भू-मापन अधिकाऱ्याने निर्णयार्थ—

(एक) नियमाद्वारे विहित'' करण्यात येईल अशी संख्या असलेल्या, व विहित करण्यात येईल अशा रीतीने अर्जदाराने व जमीन गेल्यामुळे नुकसान झालेल्या इसमांनी निवडलेल्या ग्राम समितीकडे ;

(दोन) अशी ग्राम समिती निवडता न आल्यास, अधीक्षक, भूमि-अभिलेख, याच्या मान्यतेने, जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या हुद्यापेक्षा कमी हुद्दा नसेल अशा भू-मापन अधिकाऱ्याने नाम-निर्दिष्ट केलेल्या तीन इसमांची मिळून होणाऱ्या एखाद्या समितीकडे ;

पाठविला पाहिजे.

(ब) ग्राम समितीच्या किंवा यथास्थिती जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, यांच्या दर्जाच्या भू-मापन अधिकाऱ्याने, नामनिर्दिष्ट केलेल्या समितीचा निर्णय अंतिम असेल व तो सर्व संबंधित पक्षकारांवर बंधनकारक राहील. तदन्वये अर्जदाराने द्यावयाची नुकसानभरपाईची रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याच्याकडून वसूल करता येईल. असा निर्णय दिल्यानंतर भू-मापन अधि-काऱ्याने तयार केलेली आयोजना जेथवर ती हद्दीच्या फेरतपासणीशी संबंधित असेल तेथवर अंतिम स्वरूपाची होईल व हद्दी तद्नुसार ठरविण्यात आल्या आहेत असे समजण्यात येईल.

(५) या कलमान्वये अशा रीतीने हद्द ठरविण्यात आली असेल तेव्हा, कलम १३८ च्या प्रयोजना-साठी हद्द ठरविण्यात आली आहे असे समजले पाहिजे.

टीप ६१.—कृपया कलम १४२ खालील टीप ६३ पहा (नियम १५ पहा).

हद्द ठरविल्याचा परिणाम.

१३८. (१) या प्रकरणाच्या उपरिनिर्दिष्ट उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधान्वये हद्द ठरविल्यामुळे पुढील गोष्टी निर्णायक असल्याचे समजण्यात आले पाहिजे—

(अ) हद्दीची रेषा किंवा हद्दीच्या निशाण्या याची खरी जागा, आणि

(ब) ठरविलेल्या हद्दीच्या दोहोंबाजूवरील जमीन धारण करणाऱ्यांनी धारण केलेल्या जमिनींशी संबंध आहे किंवा नाही असा, ज्या जमिनीबाबत निर्णय केला असेल त्या जमिनीबद्दलचे त्यांचे हक्क.

(२) जेव्हा उपरोक्त रीतीने हद्द ठरविण्यात आली असेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी जो कोणतीही जमीन धारण करणारा इसम जी जमीन हद्द ठरविण्याचे वेळी धारण करीत असेल त्या जमिनीशी किंवा ज्या कोणत्याही इसमांकडून किंवा त्याच्यामार्फत धारण करीत असल्याचा दावा करीत असेल त्या जमिनीशी संबंध नसेल असा जिच्या बाबतीत निर्णय दिला असेल अशी जमीन अवैध-रीत्या ज्याच्या कबजात असेल त्यास संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकता येईल.

(३) पोट-कलमे (४) आणि (५) यांच्या उपबंधांना अधीन राहून, पोट-कलम (२) अन्वये (जमिनीतून) काढून टाकण्याबाबत दिलेला आदेश हा, या अधिनियमाच्या उपबंधानुसार केलेल्या अपिलास किंवा फेरफारास अधीन असेल.

(४) जर कोणत्याही इसमास पोट-कलम (२) च्या उपबंधान्वये कोणत्याही जमिनीतून काढून टाकण्यात आले असेल तर काढून टाकण्यात आल्याच्या तारखेपासून किंवा हद्दी ठरविण्यात आल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या मुदतीत, त्या जमिनीवर आपला मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी त्यास दिवाणी दावा दाखल करता येईल :

परंतु, राज्य सरकार किंवा जिल्हाधिकारी किंवा कोणताही महसूल अथवा भू-मापन अधिकारी यास असा अधिकारी म्हणून त्या दाव्यातील पक्षकार करता कामा नये.

(५) जमिनीतून काढून टाकण्याच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध पोट-कलम (४) अन्वये दिवाणी दावा दाखल केला असेल तेव्हा, असा आदेश अपील किंवा फेरतपासणी यास अधीन असणार नाही.

(६) अपिलाच्या, फेरतपासणीच्या किंवा यथास्थिति दाव्याच्या निर्णयावरून जमीन महसुलाची फेरआकारणी करण्यात यावी असे जिल्हाधिकाऱ्यास वाटत असेल तर त्यास फेरआकारणी करण्याबाबत आदेश देता येईल व अशी फेरआकारणी त्या आदेशाच्या तारखेनंतर येणाऱ्या महसुली वर्षाच्या सुरुवाती-पासून अंमलात येईल.

**भू-मापन क्रमांकांच्या आणि गावांच्या हद्दींच्या निशाण्या लावणे व त्या दुरुस्त करणे.**

**१३९.** (१) ज्याला भूमि अभिलेख अधीक्षकाने किंवा जमाबंदी अधिकाऱ्याने प्राधिकृत केले असेल अशा कोणत्याही भू-मापन अधिकाऱ्याने गावांच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागांच्या—मग ते लागवडीखाली असोत किंवा लागवडीखाली नसोत—हद्दींच्या निशाण्या निर्दिष्ट करणे किंवा लावून घेणे किंवा त्याची मांडणी करणे, त्या ठेवणे किंवा त्यांची दुरुस्ती करणे आणि त्यामुळे झालेला सर्व खर्च जमीन धारण करणारांवर किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या इसमांवर आकारणे यासंबंधी व्यवस्था करणे हे विधिसंमत असेल.

(२) अशा अधिकाऱ्यास, लेखी नोटिशीद्वारे, जमीन धारण करणारांस त्यांच्या संबंधित भू-मापन क्रमांकाच्या किंवा पोट-विभागांच्या हद्दीच्या निशाण्या किंवा भू-मापन निशाण्या, निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत लावण्यास, त्यांची मांडणी करण्यास, त्या सुस्थितीत ठेवण्यास किंवा त्यांची दुरुस्ती करण्यास फर्मावण्याचा अधिकार आहे; आणि असे करण्यात त्यांनी कसूर केल्यास भू-मापन अधिकाऱ्याने त्या लावल्या पाहिजेत, त्यांची मांडणी केली पाहिजे किंवा त्या दुरुस्त केल्या पाहिजेत आणि त्यामुळे आलेल्या सर्व खर्चाची यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे आकारणी केली पाहिजे.

(३) राज्य सरकारने याबाबत केलेल्या नियमांस[६२] अधीन राहून जमीन, हवामान व सामानाचा टिकाऊपणा व किंमत यासंबंधीच्या आवश्यकतेनुसार, भूमि अभिलेख अधीक्षकाकडून ठरविण्यात येईल अशा वर्णनाच्या हद्दीच्या निशाण्या व भू-मापन निशाण्या असल्या पाहिजेत व त्याच्याकडून ठरविण्यात येईल अशा रीतीने त्या लावण्यात, त्यांची मांडणी करण्यात किंवा त्या सुस्थितीत ठेवण्यात किंवा दुरुस्त करण्यात आल्या पाहिजेत आणि त्याच्याकडून ठरविण्यात येईल अशा आकाराच्या व सामग्रीच्या असल्या पाहिजेत.

टीप ६२.—कृपया कलम १४२ खालील टीप ६३ पहा. (नियम ३, ४, ५, ६, ८, ११ व १२ पहा).

**हद्दींच्या निशाण्या व भू-मापन निशाण्या ठेवण्याची जबाबदारी.**

**१४०.** प्रत्येक जमीनधारक, हा त्याने धारण केलेल्या जमिनीच्या हद्दींच्या निशाण्या व भू-मापनाच्या निशाण्या सुस्थितीत ठेवण्यास, त्यांच्या चांगल्या रीतीने दुरुस्त्या करण्यास, आणि त्यांच्यात फेरफार केल्या-मुळे, त्या काढून टाकल्यामुळे किंवा त्या दुरुस्त अवस्थेत न ठेवल्यामुळे महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने त्याबाबत जो कोणताही वाजवी खर्च केला असेल तो देण्यास जबाबदार राहील. गावाच्या हद्दींच्या निशाण्यांचा नाश होऊ न देणे किंवा त्यात अनधिकृतपणे फेरफार करण्यास प्रतिबंध करणे हे ग्राम अधिकारी व सेवक यांचे कर्तव्य असेल.

भू-मापन चालू केल्यानंतर हद्दींच्या निशाण्या व भू-मापन निशाण्या जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन असणे.

**१४१.** जेव्हा एखाद्या जिल्ह्यामध्ये भू-मापन सुरू करण्यात येईल तेव्हा, हद्दीच्या निशाण्यांचे आणि भू-मापन निशाण्यांचे काम जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन असेल आणि त्या लावणे, त्यांची मांडणी करणे, त्या सुस्थितीत ठेवणे आणि त्यांची दुरुस्ती करणे याबाबत उपाययोजना करणे हे त्यांचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनासाठी कलम १३९ अन्वये भू-मापन अधिकाऱ्यांना जे अधिकार प्रदान करण्यात आले असतील ते अधिकार जिल्हाधिकाऱ्याकडे निहित असतील.

धारण केलेली जमीन व ग्रामरस्ता यांच्यामधील हद्दीच्या निशाण्यांची आखणी व त्या सुस्थितीत ठेवणे.

**१४२.** (१) या प्रकरणाच्या कोणत्याही पूर्ववर्ती उपबंधान्वये त्याच्या जमिनीच्या हद्दी आखण्यात किंवा ठरविण्यात आल्या नसतील तर, ग्रामरस्त्याला लागून असलेल्या जमिनीच्या प्रत्येक धारकाने त्याच्या स्वतःच्या खर्चाने विहित करण्यात आलेल्या रीतीने—

(अ) त्याची जमीन व तिला लागून असलेला ग्रामरस्ता यांमधील हद्द, हद्दीच्या निशाण्यांनी आखली पाहिजे ; आणि

(ब) वेळोवेळी अशा हद्दीच्या निशाण्यांची दुरुस्ती व त्यांचे नवीकरण केले पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे जमीनधारकाने हद्दीची आखणी किंवा हद्दीच्या निशाण्यांची दुरुस्ती वा त्यांचे नवीकरण करण्यात कसूर केल्यास, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी नोटीस दिल्यानंतर, जिल्हाधिकारी ती हद्द आखण्याचे काम करवून घेईल किंवा हद्दीच्या निशाण्यांची दुरुस्ती किंवा त्यांचे नवीकरण करवून घेईल आणि त्याकरिता करण्यात आलेला खर्च जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करील.

(३) हद्दीच्या आखणीच्या संबंधात किंवा हद्दीच्या निशाण्या योग्य प्रकारे दुरुस्त ठेवण्याबाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्या बाबीचा जिल्हाधिकाऱ्याने निर्णय केला पाहिजे व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी ग्रामरस्ता या संज्ञेचा अर्थ, नागपूर, चांदा, वर्धा आणि भंडारा या जिल्ह्यांत आणि अमरावती जिल्ह्याच्या मेळघाट तालुक्यात निर्देशक खसरा क्रमांक असलेला रस्ता असा समजावा ; आणि राज्याच्या उर्वरित भागात त्या संज्ञेचा अर्थ, हक्कनोंदणीपत्रकात किंवा गावांच्या नकाशात नोंद केलेला रस्ता असा समजावा.

**टीप ६३.**—सीमा व सीमा चिन्हे याबाबतचे नियम (नियम ७ पहा) (कृपया टीपा ६०, ६१ व ६२ पहा. [नियम (७) पहा.]

[शासकीय अधिसूचना, क्रमांक यूएनएफ-२१६७-आर, दिनांक २४ जुलै १९७१, शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-२१६७-आर (विशेष), दिनांक १६ डिसेंबर १९७१ व शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-२१६७-आर (विशेष), दिनांक ३० जून १९७२ याअन्वये दुरुस्त केलेली शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-२१६७-आर, दिनांक १३ ऑगस्ट १९६९.]

१. **संक्षिप्त नांव.**—या नियमांना महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सीमा चिन्हे) नियम, १९६९ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये—

(अ) 'अधिनियम' म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीसावा) ;

(ब) 'संचालक' म्हणजे संचालक, भूमि-अभिलेख ;

(क) 'जिल्हा निरीक्षक' म्हणजे जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख ;

(ड) 'नमुना' म्हणजे या नियमांना जोडलेला नमुना ;

(इ) 'कलम' म्हणजे अधिनियमाचे कलम ;

(फ) 'अधीक्षक' म्हणजे अधीक्षक, भूमि-अभिलेख.

**३. अधिकृत सीमा चिन्हे व भू-मापन चिन्हे.—**

पुढील सीमा चिन्हे व भूमापन चिन्हे अधिकृत आहेत—

(अ) सीमा चिन्हे :

सलग चिन्हे :

(१) सीमा पट्टा,

(२) धुरा, सरबांध किंवा कुंपण आणि भिंतीसारखी इतर कायम स्वरुपाची सलग बांधकामे.

खंडित चिन्हे :

(३) ओबडधोबड आकार दिलेले लांबुडके दगड.

(४) ताशीव दगडाचे खांब किंवा सिमेंटचे चिरेबंदी खांब किंवा निमुळता पाया घालून जमिनीत घट्ट बसविलेले सिमेंट किंवा चुना यांचे खांब किंवा माती, सिमेंट किंवा चुन्यामध्ये बसविलेल्या पक्क्या विटांचे बनविलेले खांब.

(५) लोलकाकृति, आयताकृती किंवा कोणाकृती उंचवटा किंवा सुटया दगडांचा बुरुज.

(६) भू-भागासाठी योग्य वाटतील अशी संचालकाने मान्यता दिलेली इतर चिन्हे, उदा. कोकणच्या किनारपट्टीवरील दलदलीच्या प्रदेशातील सागवानी खांबाची चिन्हे :

परंतु, संचालक, त्याबाबतच्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे सीमांकित करील अशा एकप्रकारच्या चिन्हांऐवजी इतर कोणतेही अधिकृत चिन्ह वापरण्याची परवानगी जिल्हाधिकारी जमीनधारकास देऊ शकेल.

(ब) भू-मापन चिन्हे ;

(१) संचालक वेळोवेळी , विहित करील अशा आकाराचे व शिरोभागी फुली कोरलेले, ओबडधोबड कापलेले भू-मापन दगड.

(२) संचालकाने याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रातील गरजेनुसार तो विहित करील असे कोणतेही इतर भू-मापन चिन्ह.

४. **सलग सीमा चिन्हे सुव्यवस्थित ठेवणे.—**सीमापट्टया, धुरा किंवा कडा यावर नांगर फिरविला जाता कामा नये किंवा अन्यथा मशागत करून त्यांचे नुकसान करता कामा नये ;

सीमा पटटया, धुरा किंवा सरबांध यांची किमात रुंदी व उंची पुढीलप्रमाणे असली पाहिजे :—

**सीमा पट्टी—**कोरडवाहू जमिनींवर ०.४६ मीटर रुंद व ०.६१ मीटर उंच, भाताच्या व बागायती जमिनींच्या बाबतीत ०.२३ मीटर रुंद व ०.६१ मीटर उंच.

**धुरा किंवा सरबांध—**१.२२ मीटर रुंद व ०.६१ मीटर उंच.

परंतु,—

(एक) अशा जमिनींच्या सीमा नदीतीर, कुंपण किंवा तत्सम गोष्टी यानी सीमांकित झाल्या असतील त्याबाबतीत या नियमाच्या प्रयोजनासाठी असा नदीतीर, कुंपण किंवा तत्सम गोष्ट यांनी व्यापलेल्या पट्टयाची प्रत्यक्ष रुंदी पुरेशी होईल ;

(दोन) कोणत्याही भू मापन क्रमांकाची सीमा ही लागून असलेल्या कोणत्याही राज्याची सीमा असेल त्याबाबतीत वर विहित केलेली किमान रुंदी, या राज्याच्या बाजूस सीमापट्टीच्या भागासाठी ठेवण्यात आली पाहिजे ; आणि

(तीन) भू-मापनाच्या वेळी गावाच्या सीमा, सीमा चिन्हांच्या दुहेरी ओळींनी आखण्यात आल्या असतील त्याबाबतीत त्यांच्या मधली सर्व पट्टी ही सीमापट्टी म्हणून ठेवण्यात येईल.

५ **खंडित चिन्हे सुव्यवस्थित ठेवणे.—**(१) एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या टोकामधील सीमेची लांबी २५२.४६ मीटरपेक्षा कमी असेल त्याबाबतीत मधल्या अंतरावर कोणतेही खंडित चिन्ह उभे करू नये परंतु त्या ठिकाणी वाकणे असतील तर प्रत्येक वाकणावर दगड बसविण्यात येईल.

(२) एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या टोकांमधील सीमेची रेषा लांबीला २५२·४६ मीटरपेक्षा अधिक असेल आणि ५०४.९२ मीटरपेक्षा कमी असेल त्याबाबतीत टोकांच्या मधोमध एक खंडित चिन्ह लावण्यात येईल व मधल्या अंतरावर काही वाकणे असल्यास अशा सर्व वाकणांवर दगड बसविण्यात येतील. तथापि ही मधली चिन्हे दोन्ही टोकांपासून नेमकी मध्यावरच बसविली पाहिजेत असे नाही.

(३) एखाद्या भू-मापन क्रमांकाच्या टोकामधील सीमेच्या रेषेची लांबी ५०४.९२ मीटर पेक्षा अधिक असेल त्याबाबतीत दर २०१·१७ मीटर अंतरावर एक मध्यंतरीय चिन्ह उभे करण्यात येईल.

६. **भू-मापन क्रमांकातून जाणाऱ्या रस्त्याचे सीमांकन.**—एखाद्या भू-मापन क्रमांकातून एखादा गाडी-रस्ता, पायवाट किंवा ओझेवाहू प्राण्यांसाठी असलेला रस्ता जात असेल त्याबाबतीत संचालक विहित करील अशा आकाराचे दगड, अशी पायवाट किंवा रस्ता भूमापन क्रमांकात सुरू होत असेल व संपत असेल त्या ठिकाणी समाईक सीमेवर बसविण्यात येतील ; असे दगड अशा रस्त्यांखाली आलेल्या भू-मापन क्रमांकाच्या समाईक सीमेवर दोन्ही बाजूस बसविण्यात येतील.

७. **गावातील रस्त्यांच्या सीमा.**—रस्त्याच्या बाबतीत, एखाद्या व्यक्तीने धारण केलेली जमीन व तिला लागून असलेला गावरस्ता यांच्यामधील सीमा, दगड बसवून किंवा झाडे लावून सीमांकित करण्यात येईल ; मग तो रस्ता कोणत्याही भूमापन क्रमांकामधून जात असो वा नसो. दगड बसविण्यात किंवा झाडे लावण्यात येतील ती अशा रस्त्यास लागून असलेल्या खासगी जमिनीच्या क्षेत्रात लावण्यात येतील. बसविण्यात येणारा प्रत्येक दगड ०·१५ चौरस मीटर (चौकोनी) आणि लांबीला ०·७६ मीटर असला पाहिजे व त्यातील किमान ०·६१ मीटर भाग जमिनीत गेलेला असला पाहिजे.

८. **एकेरी सीमा चिन्हांची पद्धत केव्हा सुरू करावी.**—ज्या गावांमधील निम्म्यापेक्षा कमी नसतील इतक्या जमीनधारकांची एकेरी सीमा चिन्हांची पद्धत सुरू करण्याची इच्छा असेल त्या गावांमध्ये नियम ३ ते ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सीमा चिन्हांऐवजी एकेरी सीमा चिन्हांची पद्धत सुरू करता येईल. अशी एकेरी सीमा चिन्हे पुढील प्रकारची असतील :—

(१) डांबर आणि चुन्यामध्ये घट्ट रोवलेले, लांबीला ०·९१ मीटरपेक्षा कमी नसतील असे ०·१८ मीटरचे चौरसाकृती दगड—यांचा ०·३२ मीटरपेक्षा अधिक भाग जमिनीच्या पातळीवर असता कामा नये ;

(२) सिमेंट, चुना किंवा सिमेंट चुन्यामध्ये बांधलेले व ०·३० मीटर चौरसाकृती आणि ०·९१ मीटर उंचीचे चिरेबंदी खांब—या खांबांचा ०·६१ मीटर भाग जमिनीत घट्ट रोवलेला असेल व पाया निमुळता होत गेलेला असेल ;

(३) राज्य शासन वेळोवेळी मान्यता देईल अशा इतर कोणत्याही प्रकारची.

भू-मापन क्रमांकाच्या प्रत्येक टोकावर व प्रत्येक वाकणावर आणि २५२·४६ मीटरपेक्षा अधिक लांब असेल अशा प्रत्येक सीमेच्या मध्यावर असे एक सीमा चिन्ह बसवण्यात येईल.

९. **कर्मचारी, सामानसुमान व मजुरी यांचा खर्च धारकाकडून वसूल करण्यात येईल.**—सामानसुमान व मजुरी यांच्या खर्चाशिवाय एकेरी सीमा चिन्हांची स्थिती निश्चित करण्यासाठी कामावर लावलेल्या कोणत्याही कर्मचारीवर्गाचा खर्च भागविण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्याने तसा निदेश दिल्यास, पुढील प्रमाणाहून अधिक नसेल अशा दराने, प्रत्येक भूमापन क्रमांकाच्या धारकाकडून फी वसूल करता येईल :—

ज्या भू-मापन क्रमांकावर आकारलेला जमीन महसूल १० रुपयांपेक्षा कमी असेल त्यांच्याबाबतीत—रुपये २;

ज्या भू-मापन क्रमांकावर आकारलेला जमीन महसूल रुपये १० किंवा त्याहून अधिक असेल त्यांच्या बाबतीत—रुपये ४ :

परंतु, ज्या भू-मापन क्रमांकाचे आधीच पोट-हिस्से पाडण्यात आले असतील त्यांच्या बाबतीत या नियमान्वये बसविण्यात आलेली फी व खर्च ही प्रत्येक पोट-हिश्श्यावर आकारण्यात येणाऱ्या जमीन महसूलाच्या प्रमाणात पोट-हिश्शांच्या धारकांमध्ये वाटली जाईल.

१०. **सीमा चिन्हे सुव्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी निश्चित करणे.**—(१) एखाद्या सामाईक सीमेभोवती अनेक जमीनधारक असतील तर त्या सामाईक सीमेवरील सीमा चिन्हे सुव्यवस्थीत ठेवण्याची जबाबदारी ज्याचा भू-मापन क्रमांक संख्याक्रमानुसार सर्वात कमी असेल त्या जमीनधारकावर राहील :

परंतु, सीमा चिन्हे सुव्यवस्थित ठेवण्यासाठी दोन किंवा त्याहून अधिक धारक जबाबदार राहतील असे जिल्हाधिकारी जाहीर करू शकेल किंवा त्या जबाबदारीची न्याय्य वाटेल अशी विभागणी करू शकेल किंवा या जबाबदारीसंबंधी प्रचलित परंपरा असल्यास ती चालू ठेवण्यास मान्यता देऊ शकेल. त्याचा निर्णय भू-मापन कागदपत्रांमध्ये नोंदला जाईल ;

आणखी असे की, एखादा भू-मापन क्रमांक कोणाच्याही भोगवटयात नसेल किंवा सार्वजनिक अथवा सरकारी प्रयोजनासाठी तो राखून ठेवला असेल तर त्याच्या सीमेवरील सीमा चिन्हांच्या दुरुस्तीची जबाबदारी त्या सीमेच्या पलिकडच्या बाजूस असलेल्या जमीनधारकावर राहील. मात्र शासनव्यतिरिक्त ज्यांचा इतर कोणीही धारक नसेल अशा भू-मापन क्रमांकांमधील सीमा चिन्हे नादुरुस्त असतील तेव्हा त्यांची दुरुस्ती शासकीय खर्चाने करण्यात येईल ; आणि अशा प्रत्येक बाबतीत गावाचा कोतवाल त्यांच्या देखभालीबद्दल जबाबदार राहील.

(२) एखाद्या भू-मापन क्रमांकातील पोट-हिश्शासाठी कोणतीही सीमा चिन्हे विहित करण्यात आलेली असतील तर, पोट-नियम (१) अन्वये भू-मापन क्रमांकाचा/चे धारक ज्याप्रमाणे (परस्परांमध्ये दुरुस्ती-संबंधी) जबाबदार राहतील त्याचप्रमाणे प्रत्येक पोट-हिश्शाचा/चे धारक त्या पोटहिश्शाच्या सीमेवरील चिन्हांच्या बाबतीत जबाबदार राहील/राहतील.

(३) दोन किंवा अधिक गावांच्या सामाईक सीमेवर असलेली चिन्हे जेव्हा नादुरुस्त आढळतील तेव्हा सीमा चिन्हांचे पुनःस्थापन करण्याच्या कार्यक्रमाखाली असलेल्या गावातील जमीनधारक त्यांची दुरुस्ती करतील.

११. **कोणती सीमा चिन्हे नादुरूस्त समजावी व त्यांची दुरुस्ती कशी केली जावी.**—पुढील सीमा चिन्हे नादुरुस्त समजली जातील आणि पुढे प्रत्येक प्रकारासाठी विहित केलेल्या रीतीने ती दुरुस्त करण्यात येतील :—

(१) सीमेच्या खऱ्या सरळ रेषेतून एखादे सलग चिन्ह (पट्टी, सरबांध, धुरा, कुंपण किंवा तत्सम कोणतेही चिन्ह) ०·९१ मीटरपेक्षा अधिक बाजूला गेली असेल तर ते चिन्ह नियम ४ मध्ये विहित केलेल्या रुंदीपेक्षा कमी रुंदीची सीमा पट्टी. **दुरुस्तीची रीत** :—झालेले वळण सुधारण्यात यावे किंवा सीमापट्टी नसेल अशा सलग चिन्हाऐवजी किंवा त्यास पूरक म्हणून खंडित चिन्हे वापरली जातील. सीमापट्टी सर्वत्र ०·४६ मीटर किंवा ०·२३ मीटर रुंद व ०·६१ मीटर उंच केली जाईल ;

(२) उंचीला ०·७६ मीटरपेक्षा कमी व पायाशी १·८३ मीटरपेक्षा कमी व्यासाचा कोणाकृती उंचवटा किंवा बुरुज. **दुरुस्तीची रीत** :—त्याची उंची ०·९१ मीटरपर्यंत वाढविण्यात येईल व पायाशी रुंद १·८३ मीटर करण्यात येईल ;

(३) उंचीला ०·६१ मीटरपेक्षा कमी व पायाशी लांबीला १·५२ मीटरपेक्षा कमी व रुंदीला १·२२ मीटरपेक्षा कमी असलेला कोणताही आयताकृति उंचवटा. **दुरुस्तीची रीत** :—उंचवटा त्याच्या पूर्ण परिमाणाचा होईल इतका वाढविण्यात येईल. म्हणजेच ०·७६ मीटर उंच व पायाशी १·८३ मीटर लांब आणि १·५२ मीटर रुंद करण्यात येईल ;

(४) ज्या कोणाकृती किंवा आयताकृती उंचवटयापासून १·२२ मीटर इतक्या अंतराच्या आत दुरुस्तीसाठी माती उकरण्यात आली असेल आणि अशा खननामुळे चिन्ह स्थिर राहत नसेल किंवा तेथे पाणी साचत असेल तर. **दुरुस्तीची रीत** :—खड्डा बुजविण्यात येईल ;

(५) जो कोणताही खांब (एक) ०·३० मीटर चौरसाकृती किंवा खोलीला ०·६० मीटरपेक्षा कमी भरत असेल, (दोन) मोडला असेल, किंवा (तीन) जवळपासच्या जमिनीच्या पातळीपासून पूर्ण ०·१० मीटरपेक्षा कमी इतक्या वर आलेला दिसत असेल किंवा ०·२३ मीटरपेक्षा जास्त वर आलेला दिसत असेल तो खांब. **दुरुस्तीची रीत** :—(एक) योग्य मोजमापाचा खांब त्या जागी बसविण्यात येईल, (दोन) पुन्हा बांधून काढण्यात येईल, (तीन) खांब वर उचलण्यात येईल किंवा माती दूर करण्यात येईल किंवा तिथली जमीन मातीने भरून काढण्यात येईल ;

(६) लांबीला ०·६१ मीटरपेक्षा कमी आणि जाडीला ०·१५ मीटरपेक्षा कमी असलेला कोणताही दगड. **दुरुस्तीची रीत :—**यथोचित आकाराचा दगड त्याऐवजी बसविण्यात येईल ;

(७) जमिनीबाहेर आलेला दगड किंवा लांबीच्या दोन-तृतीयांशाहून कमी पुरलेला किंवा डळमळीत बसविलेला दगड. **दुरुस्तीची रीत :** दगड पुन्हा नीट बसविण्यात येईल किंवा घट्ट रोवण्यात येईल ;

(८) यथोचित स्थितीपासून बरेच ढळलेले चिन्ह किंवा चुकीची सीमारेषा दर्शविली जाईल अशाप्रकारे दुरुस्त केलेले किंवा उभारलेले चिन्ह. **दुरुस्तीची रीत :—**चिन्ह अचूक जागी बसविले जाईल ;

(९) सहजासहजी दिसून येणार नाही अशाप्रकारे कोणत्याही प्रकारच्या झाडाझुडपांमध्ये झाकले गेलेले किंवा वेढलेले कोणतेही चिन्ह. **दुरुस्तीची रीत :—**ते चिन्ह सहज दिसू लागेल अशा रीतीने झाडेझुडपे काढून टाकण्यात येतील ;

(१०) ०·६१ मीटरपेक्षा कमी उंच व पायाशी १·२२ मीटरपेक्षा कमी रुंद असलेला कोणताही सरबांध, धुरा किंवा सलग बंधारा. **दुरुस्तीची रीत :—**भोगवटादार त्याऐवजी अधिकृत खंडित चिन्हे लावण्यास तयार नसेल तर सरबांध पूर्णपणे ०·६१ मीटर उंच करण्यात येईल व पायाशी सर्व ठिकाणी १·२२ मीटर इतका रुंद करण्यात येईल ;

(११) अखंडता नसल्यामुळे किंवा दुरुस्तीच्या अभावी मोडकळीस आल्यामुळे कोणतेही कुंपण किंवा इतर सलग चिन्ह सीमा निर्धारित करू शकत नसेल तर. **दुरुस्तीची रीत :—**त्यांचे आवश्यक ते नवीकरण करण्यात येईल. किंवा त्याऐवजी इतर अधिकृत चिन्हे दाखल केली जातील ;

(१२) नांगरली गेलेली किंवा अन्यप्रकारे दिसेनाशी झालेली किंवा नियम ४ मध्ये विहित केल्यापेक्षा कमी मोजमापे असलेली कोणतीही सीमापट्टी किंवा कडा. **दुरुस्तीची रीत :—**जमीनधारकास ती पट्टी किंवा कडा न नांगरता व तिला धक्का न लावता विहित मुदतीत पूर्ववत करण्याचा आदेश देण्यात येईल. आणि आदेशाचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केल्यास, जिल्हाधिकारी, अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावर, एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतका जो दंड बसविणे त्याला योग्य वाटेल तो दंड बसवील ;

(१३) गहाळ चिन्हे. **दुरुस्तीची रीत :—**नवीन चिन्हे उभारण्यात यावीत :

परंतु, नाला, नदी यांना पूर आल्यामुळे किंवा दरड कोसळल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे एखादे सीमाचिन्ह दुरुस्त स्थितीत ठेवता येत नसेल त्याबाबतीत दुसऱ्या प्रकारचे अधिकृत चिन्ह त्या जागी उभे करण्यात येईल. पण जिथे तसे करणेही व्यवहार्य होणार नाही तिथे सोडून दिलेल्या ठिकाणाच्या अलीकडे पुरेशा अंतरावर, एकतर दोन्ही चिन्हे एकाच बाजूस याप्रमाणे किंवा त्याच्या दोन्ही परस्परविरुद्ध बाजूस प्रत्येकी एक याप्रमाणे दोन खंडित चिन्हे उभारून सीमेची बाजू ठरविण्यात येईल.

१२. **कोणती भू-मापन चिन्हे नादुरुस्त समजण्यात येतील व ती कशी दुरुस्त करण्यात येतील.—**पुढील भू-मापन चिन्हे नादुरुस्त समजली जातील आणि ती पुढे प्रत्येक प्रकारासाठी विहित केलेल्या रीतीने दुरुस्त करण्यात येतील :—

(१) संचालक वेळोवेळी विहित करील अशा आकारापेक्षा कमी आकाराचा शिरोभागी फुली कोरलेला दगड. **दुरुस्तीची रीत :—**यथोचित आकाराचा दगड त्या जागी बसविण्यात येईल ;

(२) जमिनीबाहेर आलेला दगड किंवा आपल्या अचूक जागेपासून ढळलेला दगड किंवा लांबीच्या दोन-तृतीयांशाहून कमी पुरलेला किंवा डळमळीत दगड. **दुरुस्तीची रीत :—**दगड पुन्हा रोवण्यात येईल किंवा नेमक्या जागेवर पक्का रोवण्यात येईल.

१३. **अर्ज केल्यावर सीमा चिन्हांचे सीमांकन.—**(१) एखादा भू-मापन क्रमांक किंवा एखादा पोट-हिस्सा याचा धारक किंवा त्यात हितसंबंध असेल अशी कोणतीही व्यक्ती यांची त्या भू-मापन क्रमांकावर किंवा पोट-हिश्श्यावर सीमांकन केले जावे व त्यावर सीमाचिन्हे उभारली जावीत अशी इच्छा असेल तर त्याने जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करावा.

(२) संचालकाकडून त्यासंबंधी वेळोवेळी विहित करण्यात येईल त्या श्रेणीनुसार असलेली फी त्या अर्जासोबत भरली पाहिजे.

(३) असा अर्ज आल्यावर जिल्हाधिकारी जिल्हा निरीक्षकाकडून त्या भू-मापन क्रमांकाची किंवा पोट-हिश्श्याची मोजणी करून घेईल व या नियमांच्या उपबंधांच्या अनुसार भूमि-अभिलेखांमध्ये नोंदलेल्या मोजमापांच्या आधारे सीमाचिन्हे त्यावर बसवून घेईल.

(४) सीमाचिन्हे बसविण्यासाठी वापरलेली सामग्री व मजुरी यांचा खर्च त्या भू-मापन क्रमांकाचा किंवा पोट-हिश्श्याचा धारक देईल.

१४. **भू-मापन अधिकाऱ्यांनी सीमाचिन्हांचा तपशील जिल्हाधिकाऱ्यास पुरविणे.**—(जमीन महसूल) अधिनियम किंवा राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही विधी यांच्या उपबंधांन्वये एखादी जमाबंदी, अधिकाराभिलेखाकरिता पाहणी किंवा अंतिम नगररचना योजना किंवा सुधार योजना किंवा धारण जमिनींचे एकत्रीकरण करण्यासंबंधी योजना सुरू केल्यावर, अधीक्षक, संचालकांच्या आदेशाद्वारे किंवा तदन्वये उभारण्यात आलेल्या किंवा घालण्यात आलेल्या सीमाचिन्हांची जागा व त्यांचे वर्णन दर्शविणारा नकाशा, योजना आणि विवरणपत्रे जिल्हाधिकाऱ्यास पुरवील. एखाद्या पुनरीक्षण भू-मापनानुसार किंवा इतर कोणत्याही प्राधिकृत प्रसंगी सीमेमध्ये नंतर कधीही करण्यात आलेल्या कोणत्याही बदलानुसार या नकाशामध्ये सुधारणा करणे हे अधीक्षकाचे कर्तव्य असेल.

१५. **वेडयावाकडया सीमा सरळ करण्याची योजना.**—(१) कलम १३७ अन्वये सीमा सरळ करण्याच्या किंवा नियमानुसारी करण्याच्या प्रयोजनासाठी जिल्हा निरीक्षकाने तयार केलेल्या योजनेची प्रत, जिल्हा निरीक्षक, नावामध्ये, चावडीच्या ठिकाणी किंवा प्रत्येक गावातील इतर कोणत्याही ठळक जागी मराठीमध्ये प्रसिद्ध करील. तसेच ती जिल्हा निरीक्षकाच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच गावात दवंडी पिटवून असे घोषित करण्यात येईल की, सीमा (हद्दी) सरळ करण्यासाठी व नियमानुसारी करण्यासाठी एक योजना तयार करण्यात आली असून ती प्रसिद्ध करण्यात आली आहे आणि त्यासंबंधी कोणत्याही हरकती असल्यास त्या ती योजना प्रसिद्ध केल्याच्या आणि तिची उद्घोषणा केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जिल्हा निरीक्षकाकडे सादर करण्यात याव्यात. अधिकाराभिलेखावरून ज्या व्यक्ती हितसंबंधी असल्याचे आढळून येईल त्यांच्यावर प्रत्येकी एक नोटीस बजाविण्यात येईल.

(२) सीमामध्ये फेरफार करताना, जिल्हा निरीक्षक, सीमारेषेच्या दोन्ही बाजूस असलेली नैसर्गिक भूमी रेषा आणि अधिक चांगल्या मशागतीच्या दृष्टीने त्यामुळे उपार्जित होणारा प्रमाणशीर लाभ आणि योजल्याप्रमाणे सीमा सरळ करताना सीमा चिन्हांमध्ये करावी लागणारी कपात या गोष्टी विचारात घेईल.

(३) (अ) कलम १३७ च्या पोट-कलम (४) चा खंड (अ), उप-खंड (एक) याअन्वये प्रस्थापना करण्यात येणारी ग्राम समिती ही, कलम १३७, पोट-कलम (२) अन्वये सीमांमध्ये फेरफार केल्यामुळे जमिनीचा ज्यांना तोटा सोसावा लागला त्या व्यक्तींची, अर्जदारासह संख्या (ज्यांना यापुढे "हितसंबंधी व्यक्ती" असे म्हटले आहे) जर,—

(एक) दहाहून अधिक नसेल तर तीन सदस्यांची मिळून बनेल ;

(दोन) दहाहून अधिक असेल परंतु वीसापेक्षा अधिक नसेल तर पाच सदस्यांची मिळून बनेल ;

(तीन) इतर कोणत्याही बाबतीत सात सदस्यांची मिळून बनेल.

(ब) कोणतीही व्यक्ती, ती ज्या शेताचे किंवा धारणजमिनीच्या सीमेचे पुनरीक्षण चालू असेल ते/ती ज्या गावात असेल त्या गावी सामान्यपणे राहत असल्याशिवाय आणि एकवीस वर्षापेक्षा कमी वयाची असेल तर समितीवर निवडली जाण्यास पात्र असणार नाही.

(क) याबाबतीत हितसंबंधी असलेल्या व्यक्तींची जी सभा भरेल त्या सभेत, जिल्हा निरीक्षक, निवडणूक ज्या तारखेस होणार असेल त्या तारखेच्या सात दिवस आधी याहून उशीराची नसेल अशा वेळी नमुना 'अ' मध्ये हितसंबंधी व्यक्तींना एक नोटीस देईल.

(ड) ग्राम समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीसाठी भरणाऱ्या सभेसाठी ठरलेल्या वेळेच्या आधी दोन तासांहून कमी नसेल अशा वेळी, हितसंबंधी व्यक्तींना नमुना " ब " मध्ये यथोचितरीत्या पुरी केलेली नामनिर्देशन पत्रिका जिल्हा निरीक्षकास पोचती करून, ग्राम समितीवर सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीस नामनिर्देशित करता येईल. कोणत्याही हितसंबंधी व्यक्तीने, ग्राम समितीची प्रस्थापना करण्यासाठी निवडण्यात येणाऱ्या व्यक्तींच्या संख्येपेक्षा अधिक व्यक्तींचे नामनिर्देशन करता कामा नये.

(इ) सभा सुरू झाल्यानंतर जिल्हा निरीक्षक त्याच्याकडे पोट-नियम (ड) अन्वये पोचत्या करण्यात आलेल्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करील आणि त्याच्या मते ज्यांना यथोचितरीत्या नामनिर्देशन करण्यात आले असेल त्या व्यक्ती व त्यांचे सूचक यांची नावे सभेला वाचून दाखवील.

(फ) निवडावयाच्या व्यक्तींच्या संख्येइतकीच यथोचितरीत्या नामनिर्देशन केलेल्या उमेदवारांची संख्या भरेल. त्याबाबतीत जिल्हा निरीक्षक असे सर्व उमेदवार ग्राम समितीवर यथोचितरीत्या निवडून आले आहेत असे जाहीर करील.

(ग) निवडावयाच्या व्यक्तींच्या संख्येपेक्षा वैधरीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या अधिक होत असेल त्या बाबतीत, मिळविलेल्या वैध मतांच्या संख्येनुसार जे उमेदवार पहिल्या तीनांमध्ये, पाचांमध्ये किंवा यथास्थिती सातांमध्ये आले असतील ते यथोचितरीत्या निवडून आल्याचे जाहीर करील. कोणत्याही दोन किंवा अधिक उमेदवारांना मिळालेली वैध मते समसमान असल्याचे आढळून येईल आणि आणखी एक मत जादा दिल्यास त्यांच्यापैकी कोणासही निवडून येण्याचा हक्क प्राप्त होत असेल तर असे जादा मत ज्याला मिळाले असे समजण्यात यावे तो उमेदवार, जिल्हा निरीक्षक स्वतः ठरवील त्या रीतीने चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(ह) पूर्ववर्ती उप-खंडान्वये निवडणूक घेण्याकरिता जिल्हा निरीक्षक पुढील नमुन्यात मतपत्रिका तयार करण्याची व्यवस्था करील :—

मतपत्रिका

.................................................... ग्राम समिती.

तालुका ....................................................

जिल्हा ....................................................

अनुक्रमांक वैधरीत्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे

१ ....................................................

२ ....................................................

३ ....................................................

४ ....................................................

५ ....................................................

..........

जिल्हा निरीक्षकाची सही.

मतपत्रिकेवर जिल्हा निरीक्षक यथोचितरीत्या सही करील व ती हितसंबंधी व्यक्तींना देईल.

(आय) निवड... उमेदवारांची संख्या जितकी असेल तितकी मते देण्याचा हक्क प्रत्येक हितसंबंधी व्यक्तीला असेल. हितस... , ज्या उमेदवारास मत देण्याची तिची इच्छा असेल त्याच्या नावासमोर फुली ( × ) करून तिच्या मताचा ... करील. स्वतःचे मत गुप्त राखण्यासाठी मतपत्रिकेची घडी करून, मतपत्रिका टाकण्यासाठी सभेच्या जागी ठे... पेटीच्या फटीतून त्या पेटीत टाकील. मतदाराने मतपत्रिकेवर स्वतःची सही करता कामा नये किंवा त्या... ओळख पटेल अशा कोणत्याही प्रकारे त्यावर खूण करता कामा नये.

(जे) ज्या मतदाराच्या हातून मतपत्रिका अनवधानामुळे अशा ... ... गेली असेल की ती मतपत्रिका म्हणून सोईस्करपणे वापरता येणार नाही त्या मतदारास ती मतपत्रिका जिल्हा निरीक्षकाकडे परत करून आणि अनवधानाविषयी त्याची खात्री पटवून दुसरी मतपत्रिका मिळविता येईल व अशाप्रकारे परत करण्यात आलेल्या मतपत्रिकेवर जिल्हा निरीक्षक "खराब झालेली/रद्द केलेली" असे लिहील. रद्द केलेल्या अशा सर्व मतपत्रिका एका वेगळ्या पुडक्यात ठेवण्यात येतील.

(के) निवडणु... संबंधित असेल अशा कोणत्याही बाबीवरील जिल्हा निरीक्षकाचा निर्णय हा, तो निर्णय दिल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत भूमि अभिलेख अधीक्षकाकडे करता येण्याजोग्या अपिलाच्या अधीन, अंतिम असेल.

(४) ग्राम समितीवरील एका सदस्यास जिल्हा निरीक्षक त्या समितीचा अध्यक्ष म्हणून निवडील. जिल्हा निरीक्षक सांगेल त्या त्यावेळी ग्राम समितीची सभा भरेल व सभेस उपस्थित असलेल्या व मत देणाऱ्या सदस्यांच्या बहुसंख्येने, प्रत्येक व्यक्तीकडून देय असलेली व वसूल करण्याजोगी भरपाईची रक्कम ठरविण्यात येईल. मते समसमान पडतील तेव्हा अध्यक्षास निर्णायक मत असेल. सभेची गणपूर्ती होण्यासाठी किमान तीन सदस्य असले पाहिजेत.

(५) संबंधित व्यक्तींनी प्रतिनिधी निवडून दिले नाहीत तर, जिल्हा निरीक्षकास, कारणे लेखी नमूद करून, ग्राम समितीवर प्रतिनिधी नामनिर्दिष्ट करता येतील.

(६) देय असलेली भरपाईची रक्कम समितीने ठरविल्यानंतर समितीचे विघटन झाले असल्याचे समजण्यात येईल.

१६. **सीमाचिन्हे व भू-मापन चिन्हे यांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम.**—(१) सीमाचिन्हे व भू-मापन चिन्हे यांच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकारी एक पंचवार्षिक कार्यक्रम बऱ्याच अगोदर ठरवील व त्या कार्यक्रमाच्या प्रती तो संचालकास पाठवील. कार्यक्रमासाठी गावे निवडताना जिल्हाधिकारी एकेका मंडलातील गावे निवडील. हेतू हा की प्रत्येक मंडल निरीक्षकाकडे ८ ते १० गावे किंवा या कामासाठी त्याच्या ताब्यात देण्यासाठी जिल्हाधिकारी प्रतिवर्षी ठरवील इतकी गावे राहतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये ठरविलेल्या कार्यक्रमानुसार ज्या गावांमधील सीमाचिन्हांची दुरुस्ती व्हावयाची असेल त्या गावांमध्ये तहसीलदार १ नोव्हेंबरपेक्षा उशिराची नसेल अशा वेळी एक जाहीर नोटीस देईल. या नोटिशीत सीमाचिन्हे व भू-मापन चिन्हे यांची दुरुस्ती करावयाची आहे असे नमूद केलेले असेल. तसेच अधिकृत चिन्हे कोणती हे कळवून जमीनधारकांनी आपापल्या दुरुस्त्या नंतर येणाऱ्या ३० नोव्हेंबरपर्यंत पुऱ्या करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी असे त्यात सांगण्यात येईल. ही तारीख खरीप व रब्बी या दोन्ही गावांना लागू असेल. ही नोटीस चावडी मध्ये लावण्यात येईल व दवंडी पिटवून तिला प्रसिद्धी देण्यात येईल.

(३) १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान मंडल निरीक्षक, तलाठी आणि शक्य असतील तितके जमीनधारक यांच्या समवेत त्या गावामधील प्रत्येक भू-मापन क्रमांकातील प्रत्येक सीमाचिन्ह व भू-मापन चिन्ह यांची तपासणी करून सदोष किंवा गहाळ चिन्हांची एक यादी तयार करील, त्यानंतर तलाठी संबंधित धारकांना नमुना 'क' मध्ये एकेक नोटीस पाठवील व नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्याच्या मुदतीत दुरुस्त्या पार पाडण्यास सांगेल. असे न केल्यास दुरुस्त्या जमीनधारकाच्या खर्चाने शासन पार पाडील.

(४) पोट-कलम (३) खालील नोटिशीत सांगितल्याप्रमाणे जमीनधारकांनी प्रत्यक्षात कोणत्या चिन्हांच्या दुरुस्त्या पार पाडल्या आहेत याची तपासणी करण्यास तलाठी ३१ डिसेंबरनंतर सुरुवात करील आणि सदोष व गहाळ चिन्हांच्या यादीतून, ज्यांची दुरुस्ती किंवा बांधकाम योग्यरीत्या झाले असेल ती चिन्हे

काढून टाकील. १ फेब्रुवारीपेक्षा उशिराची नसेल अशा वेळी तलाठी मंडल निरीक्षकास जी चिन्हे अद्याप दुरुस्त किंवा बांधून व्हायची असतील त्या चिन्हांची सुधारित यादी सादर करील व त्याचवेळी सुधारित यादीमध्ये समाविष्ट असलेला भू-मापन क्रमांकांच्या व पोट-हिश्श्यांच्या धारकांना एक नोटीस देऊन त्या नोटिशीच्या तारखेपासून दहा दिवसांच्या आत दुरुस्ती किंवा पुन्हा बांधणी करण्यासाठी एक कंत्राटदार निवडण्यास सांगेल. कंत्राटदार निवडण्यात आला तर तलाठी ते काम नंतर येणाऱ्या ३१ मार्चपूर्वी पुरे करून घेईल.

(५) जमीनधारकांनी कोणताही कंत्राटदार निवडला नाही तर आवश्यक ते आदेश घेण्यासाठी तलाठी १५ फेब्रुवारी पूर्वी मंडल निरीक्षकाच्या मार्फत तहसीलदाराकडे एक अहवाल पाठवील. असा अहवाल आल्यानंतर तहसीलदार, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर ती चिन्हे मजूर लावून किंवा तहसीलदाराने नेमलेल्या कंत्राटदारामार्फत दुरुस्त करण्यासाठी किंवा बांधून घेण्यासाठी तलाठ्यास आदेश देईल. हेतू हा की, ते काम ३१ मार्च पूर्वी पुरे होऊन संबंधित जमीनधारकांकडून खर्च वसूल करता यावा.

## नमुना 'अ'

[नियम १५ (३) (क) पहा]

### नोटीस

ज्याअर्थी ........................ जिल्ह्यातील .................. तालुक्यातील .......... गावातील ........ भू-मापन क्रमांकांच्या सीमा सरळ करणे व त्या नियमानुसारी करणे या प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या आणि .................... रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या योजनेत हितसंबंधी असलेल्या व्यक्तींना, त्या योजनेनुसार प्रत्येक संबंधित व्यक्तीने द्यावयाची किंवा तिच्याकडून वसूल करावयाची भरपाईची मी निश्चित केलेली रक्कम मान्य नाही ;

आणि ज्याअर्थी, आता, भरपाईच्या रकमेसंबंधीचा प्रश्न महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम १३७, पोट-कलम (४), खंड (अ) चा उप-खंड (१) यात तरतूद केल्याप्रमाणे निवडण्यात आलेल्या ग्राम-समितीकडे सोपवणे आवश्यक झाले आहे ;

त्याअर्थी, मी, जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख, .............. .......... याद्वारे नोटीस देत आहे की, उपरोक्त ग्राम समितीची निवडणूक ............ रोजी .................. या दरम्यान (वेळ) ........ या गावी (येथे गावाचे नाव नमूद करावे) ........... या ठिकाणी घेण्यात येईल.

उक्त समिती ................ सदस्यांची मिळून बनेल आणि उक्त योजनेत हितसंबंधी असलेल्या व्यक्तींना ती निवडावी लागेल.

हितसंबंधी व्यक्तींना या समितीवर सदस्य म्हणून जो पात्र असेल व ज्याची निवडणूक लढविण्याची इच्छा असेल अशा .......... जिल्ह्यातील ........ तालुक्यातील ............. गावामधील कोणत्याही रहिवाशाचे, ग्राम समितीच्या निवडणुकीसाठी भरणाऱ्या सभेसाठी ठरलेल्या वेळेच्या दोन तास आधी नामनिर्देशित करता येईल.

नामनिर्देशनपत्रांची छाननी मी गावाच्या चावडीवर किंवा ................ (येथे इतर स्थळ नमूद करावे) येथे .............. वाजता करीन. गावामध्ये भरणाऱ्या सभेच्या वेळी इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहावे.

..................

जिल्हा निरीक्षकाची सही.

दिनांक

(मोहोर)

## नमुना 'ब'

[नियम १५ (३) (ड) पहा]

### नामनिर्देशनपत्र

उमेदवाराचे पूर्ण नाव .. ..............................

वास्तव्य जेथे असेल ते गाव, तालुका व जिल्हा ..............................

निवडणुकीच्या तारखेस वय किती .. ..............................

पुरुष अथवा स्त्री .. ..............................

उमेदवाराचा डाकेचा पूर्ण पत्ता .. ..............................

..............................

उमेदवाराचा मतदारांच्या यादीतील क्रमांक (माहीत असल्यास). ..............................

मी निवडून आलो तर ग्राम समितीचा सदस्य म्हणून काम करण्यास माझी तयारी आहे हे मी याद्वारे दर्शवीत आहे.

..............................

दिनांक.............................. उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

सूचकाचे पूर्ण नाव ..............................

वय .. .. .. ..............................

पुरुष अथवा स्त्री .. .. .. ..............................

डाकेचा पूर्ण पत्ता .. .. .. ..............................

..............................

..............................

दिनांक.............. सूचकाची सही अथवा अंगठ्याचा ठसा.

नामनिर्देशन पत्राचा अनुक्रमांक .. .. ..............................

हे नामनिर्देशनपत्र मला माझ्या कार्यालयात दिनांक..............रोजी............ वाजता उमेदवाराने/उमेदवाराच्या सूचकाने पोचते केले.

..............................

दिनांक................ जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांची सही.

नामनिर्देशन पत्र स्वीकारल्यासंबंधी किंवा नाकारल्यासंबंधी जिल्हा निरिक्षक याचा निर्णय

महाराष्ट्र जमीन महसूल (सीमा व सीमा चिन्हे) नियम, १९६९ यांच्या नियम १५ (३) या अनुसार मी या नामनिर्देशनपत्राची तपासणी केली आणि माझा निर्णय पुढीलप्रमाणे आहे :—

दिनांक.............. ..............................

जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांची सही.

## नमुना 'क'

(नियम १६ पहा)

### जमिनधारकांना त्यांची सीमा चिन्हे/भूमापन चिन्हे दुरुस्त करण्यास सांगण्यासंबंधी नोटीस

तलाठी, ..................... (गावाचे नाव)

..............................तहसील यांजकडून

......................

..........................

..................................यांस,

तुमच्या धारणजमिनीतील पुढे तपशील दिलेली सीमाचिन्हे/भूमापन चिन्हे सदोष असल्यामुळे या नोटिशी-च्या तारखेपासून एक महिन्याच्या मुदतीत ती दुरुस्त करून नीट ठेवण्याबद्दल याद्वारे निदेश दिला जात आहे. तुम्ही तसे न केल्यास या दुरुस्त्या, शासन तुमच्या खर्चाने पार पाडील :—

| भू-मापन क्रमांक | सदोष किंवा गहाळ सीमा/भू-मापन चिन्हांचा तपशील |
|---|---|
| (१) | (२) |
| | |

दिनांक............१९ .

..................

तलाठी.

**१४३.** (१) एखाद्या भू-मापन क्रमांकात जमीन धारण करणारे इसम इतर भूमापन क्रमांकाच्या हद्दीवरून रस्त्याबाबतचा हक्क सांगत असतील तर तहसिलदारास त्याची चौकशी करता येईल आणि त्याचा निर्णय करता येईल. हद्दीवरून रस्त्याचा हक्क.

(२) अशा हक्कांचा निर्णय करताना शेतकऱ्यांना आपल्या शेतांत जाण्यासाठी योग्य मार्गांची किती जरूरी आहे याकडे तहसिलदाराने लक्ष दिले पाहिजे.

(३) या कलमान्वये तहसिलदाराने दिलेला निर्णय हा, पोट-कलमे (४) आणि (५) यांच्या उपबंधास अधीन राहून, ह्या अधिनियमाच्या उपबंधानुसार अपिलास आणि फेरतपासणीस अधीन असेल.

(४) या कलमान्वये तहसिलदाराने दिलेल्या निर्णयामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास, तो निर्णय रद्द केला जाण्यासाठी किंवा त्यात सुधारणा केली जाण्यासाठी अशा निर्णयाच्या तारखेपासून एक वर्षाच्या मुदतीत दिवाणी दावा दाखल करता येईल.

(५) जेव्हा पोट-कलम (४) अन्वये तहसिलदाराच्या निर्णयाविरुद्ध दिवाणी दावा दाखल करण्यात आला असेल तेव्हा असा निर्णय अपिलास किंवा फेरतपासणीस अधीन असणार नाही.

**१४४.** राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये कोणत्याही क्षेत्रात एखादी अंतिम नगर-रचना योजना किंवा सुधारणा योजना किंवा धारण जमिनीच्या एकत्रीकरणाची योजना अंमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, या प्रकरणाच्या उपबंधान्वये ठरविण्यात आणि आखण्यात आलेल्या हद्दींमध्ये, अशा योजनेन्वये पुनर्रचना केलेल्या व मांडलेल्या किंवा एकत्रित केलेल्या तुकड्यांशी सुसंगत होईल अशाप्रकारे, फेरबदल करणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य असेल ; आणि त्या प्रयोजनासाठी अशा तुकड्यांच्या हद्दीच्या निशाण्या उभ्या करणे, बांधणे आणि मांडणे यांची तो व्यवस्था करील आणि त्यानंतर खर्चाच्या वसुली-संबंधीचे या प्रकरणाचे उपबंध ज्याप्रमाणे हद्दीच्या निशाण्या बांधण्याच्या, त्या सुस्थितीत ठेवण्याच्या आणि त्यांच्या दुरुस्तीच्या संबंधात लागू होतात त्याप्रमाणे ते प्रत्येक तुकड्याच्या संबंधात लागू होतील. नगररचना योजनेखालील किंवा सुधारणा योजनेखालील किंवा एकत्रीकरण योजनेखालील क्षेत्रात हद्दींची आखणी करणे.

**१४५.** जिल्हाधिकारी, भू-मापन अधिकारी, तहसिलदार किंवा नायब तहसीलदार यांच्या समोरील संक्षिप्त चौकशीत ज्या कोणत्याही इसमाने हद्दीची निशाणी किंवा भू-मापन निशाणी जाणूनबुजून नाहीशी केल्याचे, ती काढल्याचे किंवा तिला नुकसान पोचविल्याचे सिद्ध झाले असेल असा इसम अशा रीतीने नाहीशी केलेल्या, काढून टाकलेल्या किंवा नुकसान पोचविलेल्या प्रत्येक निशाणीदाखल शंभर रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल. हद्दीच्या निशाण्यांचे नुकसान केल्याबद्दल शास्ती.

**१४६.** या प्रकरणाचे सर्व किंवा कोणतेही उपबंध कोणत्याही गावास किंवा गावांच्या वर्गास लागू होणार नाहीत असे शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जाहीर करण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे. या प्रकरणाच्या अंमलबजावणीतून माफी देण्याचा अधिकार.

## प्रकरण १०

## भूमि-अभिलेख

### अ—हक्कनोंदणीपत्रके

या प्रकरणाच्या उपबंधातून माफी

१४७. राज्य सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कलम १४८ ते १५९ (दोन्ही धरून) यांचे किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचे उपबंध हे, निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात किंवा कोणत्याही जमिनींच्या किंवा गावांच्या किंवा जमिनींच्या कोणत्याही वर्गाच्या संबंधात, किंवा सर्वसामान्यपणे अंमलात असणार नाहीत असा निदेश देता येईल.

**टीप ६४.**—शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ २२६७-आर. दिनांक १० ऑगस्ट १९६७ अन्वये राज्य शासनाने असे निदेश दिले आहेत की, अधिनियमांचे कलमे १४९ ते १५९ (दोन्ही धरून) यांचे उपबंध खालील क्षेत्रात किंवा गांवात अंमलात असणार नाहीत:—

(१) कलम १२२ खाली ठरविलेली आणि उक्त अधिनियमाखाली सर्वेक्षण न केलेली गावठाणे किंवा गावाच्या जमिनी.

(२) सर्वेक्षण न केलेली गावे.

(३) राखीव जंगलातील गावे (परिशिष्ट २९ पहा).

हक्कनोंदणी-पत्रक.

१४८. प्रत्येक गावामध्ये हक्कनोंदणी पत्रक ठेवले पाहिजे व अशा पत्रकात पुढील तपशील असला पाहिजे :—

(अ) (कुळ खेरीजकरून) जे इसम जमीन धारण करणारे, भोगवटा करणारे, मालक किंवा जमीन गहाण घेणारे किंवा तिचे भाडे किंवा महसूल आपले नावे करून घेणारे असतील अशा सर्व इसमांची नावे ;

(ब) सरकारी पट्टेदार म्हणून किंवा संबंधित कुळकायद्याच्या अर्थकक्षेतील कुळे धरून, कुळे म्हणून जे इसम जमीन धारण करीत असतील अशा सर्व इसमांची नावे ;

(क) अशा इसमांच्या आपापल्या हितसंबंधाचे स्वरूप आणि त्याची मर्यादा आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या अटी किंवा जबाबदाऱ्या, कोणत्याही असल्यास ;

(ड) अशा इसमांपैकी कोणत्याही इसमांनी द्यावयाचा किंवा त्यांना देण्याजोगा खंड किंवा महसूल कोणताही असल्यास ;

(इ) राज्य सरकार, याबाबतीत केलेल्या नियमान्वये सर्वसामान्यपणे किंवा त्यांत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या प्रयोजनासाठी विहित करील असा इतर तपशील.

**टीप ६५.**—कृपया कलम १५६ खालील टीप ७१ पहा.

हक्क संपादन केल्याचे प्रतिवृत्त देणे.

१४९. जमीन धारण करणारा, भोगवटा करणारा, मालक, जमीन गहाण ठेवून घेणारा, जमीनमालक, सरकारी पट्टेदार किंवा राज्यातील कोणत्याही क्षेत्रामध्ये असलेल्या जमिनीचे कूळ म्हणून किंवा तिच्या खंडाचा किंवा महसुलाचा अभिहस्तांकिती म्हणून कोणताही हक्क उत्तराधिकाराने, अनुजीविताधिकाराने, वारसा हक्काने, विभागणीने, खरेदीने, गहाणाने, देणगीने, पट्टयाने किंवा अन्य रीतीने संपादन करणाऱ्या कोणत्याही इसमाने, असा हक्क त्याने संपादन केल्याबद्दल असा हक्क संपादन केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत तलाठ्यास तोंडी अथवा लेखी कळविले पाहिजे, आणि उक्त तलाठ्याने कळविणाऱ्या इसमास, असे प्रतिवृत्त मिळाल्याची लेखी पोच तात्काळ दिली पाहिजे :

परंतु, असा हक्क संपादन करणारा इसम अवयस्क असेल किंवा अन्यथा अपात्र असेल तेव्हा असे प्रतिवृत्त त्याच्या पालकाने किंवा त्याची मालमत्ता ज्याच्या ताब्यात असेल अशा इतर इसमाने तलाठ्यास दिले पाहिजे :

तसेच, जिल्हाधिकाऱ्याने परवानगीनुसार किंवा नोंदलेल्या दस्तऐवजांचे आधारे, हक्क संपादन करणाऱ्या कोणत्याही इसमास, तलाठ्यास प्रतिवृत्त देण्याबाबतच्या जबाबदारीतून सूट देण्यात आली पाहिजे :

आणखी असे की, जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीने हक्क संपादन केला असल्याचा एखाद्या इसमाचा दावा असेल त्याबाबतीत या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबधान्वये अशी परवानगी आवश्यक असेल त्याबाबतीत अशा इसमाने, तलाठ्याने त्यास तसे करण्यास फर्माविले तर या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमान्वये आवश्यक असेल त्याप्रमाणे, अशी परवानगी ज्या आदेशाद्वारे देण्यात आली असेल त्या आदेशाचा पुरावा सादर केला पाहिजे.

**टीप ६६.**—कृपया कलम १५६ खालील टीप ७१ पहा. (नियम १२ पहा).

**स्पष्टीकरण १.**—वर निर्दिष्ट केलेल्या हक्कांमध्ये कबजा नसलेल्या गहाणाचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये एखाद्या वहिवाटीच्या हक्काचा किंवा जो भाग, मालमत्तेच्या हस्तांतरणाबाबत अधिनियम, १८८२, याच्या कलम १०० मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारचे गहाण म्हणून ठरत नसेल अशा भाराचा समावेश होत नाही.

**स्पष्टीकरण २.**—ज्या इसमाचे वतीने गहाणाची फेड करण्यात येईल किंवा ते नष्ट करण्यात येईल, किंवा पट्टा ठरविण्यात आला असेल असा इसम ह्या कलमाच्या अर्थानुसार हक्क संपादन करीत आहे असे समजले पाहिजे.

**स्पष्टीकरण ३.**—या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी 'तलाठी' या संज्ञेमध्ये या प्रकरणान्वये तलाठ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही इसमाचा समावेश होतो.

**१५०.** (१) कलम १४९ अन्वये तलाठ्याकडे दिलेल्या प्रत्येक प्रतिवृत्ताची नोंद त्याने नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकात केली पाहिजे, कलम १५४ अन्वये किंवा कोणत्याही जिल्हाधिकाऱ्याकडून मिळालेली संपादनाची किंवा हस्तांतरणाची कोणतीही माहिती त्यामध्ये नमूद केली पाहिजे. नामांतरणाचे नोंदणीपुस्तक व वादातमक प्रकरणांचे नोंदणीपुस्तक.

(२) जेव्हा एखादा तलाठी नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकात एखादी नोंद करील तेव्हा त्याने अशा नोंदीची संपूर्ण प्रत चावडीतील ठळक जागी त्याच वेळी लावली पाहिजे आणि नामांतरणामध्ये ज्यांचा हितसंबंध आहे असे हक्कनोंदणीपत्रकावरून किंवा नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकावरून त्यास दिसून येईल अशा सर्व इसमांना, आणि त्यात ज्या इसमांचा हितसंबंध आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा इतर कोणत्याही इसमास लेखी कळविले पाहिजे.

(३) पोट-कलम (१) अन्वये नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकात केलेल्या कोणत्याही नोंदणीच्या संबंधात तोंडी अथवा लेखी स्वरूपात तलाठ्याकडे कोणतीही हरकत करण्यात येईल तर वादातमक प्रकरणांच्या नोंदणीपुस्तकात त्या हरकतीच्या तपशीलाची नोंद करणे हे तलाठ्याचे कर्तव्य असेल. विहित ६७ केलेल्या नमुन्यात हरकत करणाऱ्या इसमास तलाठ्याने, त्याबाबत तात्काळ लेखी पोच दिली पाहिजे.

(४) वादातमक प्रकरणांच्या नोंदणीपुस्तकात दाखल केलेली वादातमक प्रकरणे अव्वल कारकुनाच्या हुद्यापेक्षा कमी हुद्दा नसेल अशा महसुली किंवा भूमापन अधिकाऱ्याने एक वर्षाच्या आत शक्यतोवर निकालात काढली पाहिजेत आणि अशा नोंदणीपुस्तकात नोंद करण्यात आलेल्या हरकती ज्या आदेशान्वये निकालात काढण्यात आल्या असतील अशा आदेशांची अशा अधिकाऱ्याने याबाबतीत राज्य सरकारने केलेल्या नियमा-६७ द्वारे विहित करण्यात येईल अशारीतीने नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकात नोंद केली पाहिजे.

(५) नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकातील नोंदी हक्कनोंदणीपत्रकात दाखल करणे हे याबाबतीत राज्य सरकार जे नियम ६७ करील त्यास अधीन राहून केले पाहिजे :

परंतु, नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकातील नोंद, ती योग्य रीतीने प्रमाणित करण्यात आल्याखेरीज हक्कनोंदणीपत्रकात दाखल करता कामा नये.

(६) नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकातील नोंदी तपासण्यात आल्या पाहिजेत आणि अशा नोंदी बरोबर असल्याचे आढळून आले तर किंवा यथास्थिती त्यात दुरुस्ती केल्यानंतर विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या अव्वल कारकुनाच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसतील अशा महसूल अधिकाऱ्याने किंवा भू-मापन अधिकाऱ्याने प्रमाणित केल्या पाहिजेत :

[१] [परंतु ज्या नोंदीसंबंधी कोणताही वाद नसेल त्या नोंदी मंडल निरिक्षकास तपासता येतील व प्रमाणित करता येतील :]

[२] [आणखी असे की] संबंधित पक्षकारांवर त्याबाबतीत नोटीस बजाविण्यात आल्याशिवाय, अशा कोणत्याही नोंदी प्रमाणित करता कामा नये.

(७) याबाबतीत केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कार्यरीतीनुसार कुळवहिवाटीचे नोंदणीपुस्तक ठेवण्यात आले पाहिजे असा निदेश राज्य सरकार देऊ शकेल.

**टीप ६७** —कृपया कलम १५६ खालील टीप ७१ पहा (नियम १३, १४, १५, १६, १७, १८, १९ आणि ३३ पहा).

---

[१] हे परंतुक महाराष्ट्र जमीन महसूल (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६८-१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम ८ याच्या कलम ५ द्वारे समाविष्ट केले. (परिशिष्ट ३७ पहा)

[२] हा मजकूर 'परंतु' या शब्दाऐवजी वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

माहिती पुरविण्याचे बंधन, जमीन-धारकास किंवा कुळास हक्क नोंदणी पत्रकातील नोंदी इ. पुस्तिकेच्या रुपाने पुरविण्याचे बंधन आणि पुस्तिका वगैरे ठेवणे.

**१५१.** (१) या प्रकरणान्वये, ज्याचे हक्क, हितसंबंध किंवा दायित्व कोणत्याही अभिलेखात किंवा नोंदणीपुस्तकात दाखल करणे आवश्यक असेल किंवा दाखल केले असतील अशा कोणत्याही इसमाने, असा अभिलेख किंवा नोंदणीपुस्तक तयार करण्याचे किंवा त्यांची फेरतपासणी करण्याचे काम करीत असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने किंवा तलाठ्याने मागणी केल्यानंतर, अशी मागणी केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, त्याचे तपासणीसाठी असा अभिलेख किंवा नोंदणीपुस्तक अचूक तयार करण्यासाठी किंवा फेरतपासणी करण्यासाठी जरूर असेल अशी, व त्यास माहित असेल किंवा त्याच्या ताब्यात किंवा अधिकारात असेल अशी, सर्व माहिती किंवा दस्तएवज पुरविणे किंवा सादर करणे हे त्यावर बंधनकारक असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वयेच्या मागणीनुसार ज्याला माहिती पुरविण्यात आली असेल किंवा ज्याच्याकडे कोणताही दस्तऐवज सादर करण्यात आला असेल अशा महसूल अधिकाऱ्याने किंवा तलाठ्याने ती माहिती पुरविणाऱ्या किंवा दस्तऐवज सादर करणाऱ्या इसमास त्याबद्दल तात्काळ लेखी पोच दिली पाहिजे आणि अशा कोणत्याही दस्तऐवजावर, तो दाखल करण्यात आल्याची माहिती आणि तो दिल्याची तारीख नमूद करणारी एक टिप्पणी त्याच्या सहीनिशी त्याने लिहिली पाहिजे. आणि त्याची एक प्रत, आवश्यक असल्यास ठेवून घेऊन, उक्त दस्तऐवज तात्काळ परत केला पाहिजे.

(३) शेतजमिनीच्या प्रत्येक धारकास (जर कूळ त्याबद्दल जमीन महसूल देण्यास प्रथमतः जबाबदार असेल तर कूळ धरून) त्याबाबतीत लेखी अर्ज केल्यावर, अशा जमीनीसंबंधातील हक्कनोंदणीपत्रकाची एक प्रत असलेली पुस्तिका तलाठ्याकडून पुरविण्यात येईल.

(४); जमीनधारकाने किंवा यथास्थिती कुळाने जमिनीबाबतचा जमीन महसूल व इतर सरकारी देणी देण्यासंबंधातील माहिती तसेच त्याच्या जमिनीच्या लागवडीसंबंधातील माहिती आणि गाव हिशेबात दाखविल्याप्रमाणे उक्त जमिनीत पेरणी केलेल्या पिकांची क्षेत्रे आणि विहित ६८ करण्यात येईल असा तपशील अशा पुस्तिकेत देण्यात येईल.

(५) अशी प्रत्येक पुस्तिका राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमानुसार ६८ तयार करण्यात, देण्यात व ठेवण्यात येईल. अशा नियमात, पुस्तिका तयार करणे, देणे व ठेवणे यासाठी आकारावयाच्या फीची तरतूद करण्यात येईल.

(६) हा अधिनियम अमलात येण्याच्या लगतपूर्वी कोणतीही पुस्तिका तयार करण्यात, देण्यात किंवा ठेवण्यात येईल त्याबाबतीत, राज्य सरकारने याबाबतीत केलेल्या नियमान्वये कोणत्याही इतर नमुन्यात किंवा रितीने, पुस्तिका तयार करण्यासाठी, ती देण्यासाठी व ठेवण्यासाठी, तरतूद करण्यात येईतोपर्यंत अशी पुस्तिका, या अधिनियमाच्या व त्यान्वये केलेल्या नियमांच्या उपबंधानुसार तयार करण्यात, देण्यात व ठेवण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ २२६७-(सी)-आर-(स्पेशल)-दिनांक ७ ऑक्टोबर १९७२ अन्वये सुधारणा केलेली शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-२२६७-(सी) आर, दिनांक ९ मार्च १९७१ खाते पुस्तिका तयार करणे, ती देणे व ठेवणे यासंबंधीचे नियम]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस, महाराष्ट्र जमीन महसूल खातेपुस्तिका (तयार करणे, ती देणे व ठेवणे) नियम, १९७१ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमात,—

(अ) "अधिनियम," म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "दुसरी प्रत" म्हणजे, या नियमास अनुसरून यापूर्वी दिलेल्या खातेपुस्तिकेच्या ऐवजी तयार केलेल्या आणि पुरविलेल्या कोणत्याही मूळ खातेपुस्तिकेची दुसरी प्रत :

(क) "धारक" म्हणजे, जमीन ज्या गावामध्ये असेल त्या गावाच्या महसुली लेख्यामध्ये ज्याची स्वतंत्र लेखा खातेवही ठेवण्यात आली असेल अशा अधिनियमाच्या कलम १५१ मध्ये निर्दिष्ट केलेल्या शेतजमिनीचा धारक, आणि त्यामध्ये, धारक आणि असे सह-भागधारक यांनी संयुक्तपणे धारण केलेल्या धारण जमिनीच्या प्रत्येक सह-भागधारकाचा समावेश होईल ;

(ड) "नमुना" म्हणजे, या नियमांस जोडलेला नमुना ;

(इ) "खातेपुस्तिका" किंवा "पुस्तिका" म्हणजे, अधिनियमाच्या कलम १५१ मध्ये निर्दिष्ट

केलेली व (जमीन) धारकाला पुरविलेली किंवा पुरविण्यात येणारी पुस्तिका, तीमध्ये, त्याच्या जमिनी-संबंधीच्या अधिकार अभिलेखाची एक प्रत व अधिनियमाच्या कलम १५१ च्या पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेली इतर माहिती अंतर्भूत असेल आणि अशी माहिती अंतर्भूत करण्याकरिता पुरविण्यात आलेल्या किंवा पुरविण्यात येणाऱ्या पुरवणीचा त्यामध्ये अंतर्भाव होतो ;

(फ) "इतर बाबी" म्हणजे, हा अधिनियम आणि तदन्वये केलेले नियम याअन्वये, कोणत्याही जमिनीच्या संबंधात तलाठ्यास ज्याची वसुली करता येईल अशा बाबी ; परंतु त्यामध्ये, अशा जमिनीच्या संबंधातील जमीन महसुलाचा समावेश होणार नाही ;

(ग) "तगाई" म्हणजे, शासनाने मंजुर केलेले आणि त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये, तलाठ्यास वसुल करता येईल असे कोणतेही कर्ज.

३. **खातेपुस्तिकेसाठी करावयाचा अर्ज.**—(१) (जमीन) धारकास, त्याची जमीन ज्या गावात असेल त्या गावाच्या तलाठ्याकडे, नमुना १ मधील खातेपुस्तिकेसाठी अर्ज करता येईल. अर्ज तलाठ्याकडे त्याचे मुख्यालय, किंवा साझा यासारख्या कोणत्याही ठिकाणी, जातीने सादर करता येईल ;

(२) अर्जासोबत खातेपुस्तिकेची किंमत आणि नियम ११ मध्ये विहित केलेली फी देण्यात येईल.

(३) तलाठी पोट-नियम (१) अन्वये त्याला मिळालेल्या अर्जाबद्दल, नमुना २ मध्ये, पोच देईल आणि तसेच त्याला मिळालेल्या खातेपुस्तिकेच्या किंमतीबद्दल, नमुना ३ मध्ये आणि धारकाने दिलेल्या फीबद्दल नमुना ४ मध्ये पावती देईल.

४. **खातेपुस्तिका तयार करणे व ती देणे.**—(१) नियम ३ अन्वये अर्ज मिळाल्यावर, या नियमाच्या उपबंधास अधीन राहून, तलाठी, अर्जाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या महसुली वर्षापासून पुस्तिका तयार करण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीकरिता, अर्जदारांच्या धारण जमिनीच्या संबंधात खातेपुस्तिका तयार करील आणि नियम १० अन्वये उपबंधित केल्याप्रमाणे, पुस्तिकेत प्रमाणपत्राची नोंद करील.

(२) खातेपुस्तिकेमध्ये ग्राम अभिलेखात दिलेला पुढील तपशील इतर गोष्टीसमवेत देण्यात येईल :—

(अ) जमीन महसुलाची मागणी व वसुली ;

(ब) तगाई कर्जाची मागणी व वसुली ;

(क) इतर बाबींची मागणी व वसुली ;

(ड) धारण जमिनीत समाविष्ट असलेल्या जमिनीचा भू-मापन क्रमांक, तिचा पोट-विभाग आणि क्षेत्रफळ ; आणि

(इ) धारण जमिनीत समाविष्ट असलेल्या जमिनीच्या प्रत्येक तुकड्यासंबंधीचा अधिकार अभिलेखातील उतारा ; तसेच धारण जमिनीसंबंधातील कुळवहिवाट आणि पिकांची पेरणी यासंबंधीची माहिती देणारा गावाच्या महसुली लेख्याच्या नमुन्यामधील उतारा.

(३) तलाठी, पोट-नियम (१) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे पुस्तिका तयार करील आणि नियम ११ अन्वये विहित केलेली फी दिल्यावर अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत, अर्जदाराला किंवा त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्याला पुस्तिका देईल.

५. **खातेपुस्तिकेचा नमुना व किंमत.**—खातेपुस्तिकेचा नमुना व किंमत ही राज्य शासनाकडून, वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल अशी असेल.

६. **पुस्तिकेच्या पृष्ठांच्या सांधेजोडावर तलाठ्याने सही करणे आवश्यक असेल.**—कोणतीही खातेपुस्तिका भरण्यापूर्वी तलाठी, पुस्तिकेच्या लागोपाठच्या प्रत्येक दोन पृष्ठांच्या सांध्यावर सही करील किंवा गावाचा किंवा यथास्थिती साझ्याचा शिक्का उमटविल.

७. **पुस्तिकेतील नोंदी.**—पुस्तिकेतील प्रत्येक नोंद, तलाठी व्यक्तिश: गावाच्या अभिलेखामधून करील. पुस्तिकेतील प्रत्येक नोंदीच्या खरेपणाबद्दल तलाठ्यास जबाबदार धरण्यात येईल.

८. **अधिकार अभिलेखामधील नोंदी.**—अधिकार अभिलेखामधील फक्त प्रमाणित नोंदीच खातेपुस्तिकेमध्ये नमूद करण्यात येतील.

परंतु अधिकार अभिलेखात जर महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंद वह्या (तयार करणे व ठेवणे) नियम, १९७१ च्या (नियम) ३० अन्वये पेन्सिलीने नोंद केली असेल तर अशा नोंदीबरोबर अशा नोंदीसंबंधी नामांतरणासंबंधीचा तपशील खाते पुस्तिकेमध्ये लाल शाईत नोंदण्यात यावा.

९. **पुस्तिकेचा अनुक्रमांक.**—प्रत्येक खातेपुस्तिकेच्या मुखपृष्ठावर, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे, चार वेगवेगळया आकडयांचा मिळून बनलेला व प्रत्येक आकडा संधिरेषेने विलग केलेला एक स्वतंत्र क्रमांक असेल ; पहिला आकडा जिल्हा, दुसरा तालुका, तिसरा गाव आणि चौथा ...च्या जमीन महसुल लेख्यात धारकाच्या लेखा खातेवहीत नेमून दिलेला क्रमांक दर्शविल.

१०. **नोंदी ... प्रमाणपत्र.**—पुस्तिका भरल्यानंतर किंवा तीत नवीन नोंदी केल्यानंतर, तलाठी ... सेक्टी, ... प्रयोजनाकरिता ठेवलेल्या कोऱ्या पृष्ठांवर आपल्या सहीनिशी प्रमाणपत्र देईल ... प्रमाणपत्रावर गावाचा किंवा यथास्थिती, साझ्याचा मुद्रांक लावील. प्रमाणपत्र पुढील नमुन्यात ...

... मुखपृष्ठावरील नोंदी, अधिकार अभिलेखामधील व ग्रामलेख्यामधील उतारे व ... ...पासून सुरू होणाऱ्या आणि ........ रोजी संपणाऱ्या मुदतीबाबतच्या इतर सर्व गावाच्या मूळ अभिलेखामधून करण्यात आलेल्या आहेत ; आणि त्या उक्त अभिलेखामध्ये अंतर्भूत ...लेल्या माहितीनुसार आहेत हे मी व्यक्तीशः पाहून त्याची पडताळणी केली आहे.

मुद्रांक .................... सही ....................

ठिकाण .................... तलाठी ....................

दिनांक .................... संपूर्ण नांव ....................

११. **पुस्तिका तयार करण्यासाठी आणि ती ठेवण्यासाठी फी.**—(१) जमीन धारक, सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनार्थ, या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये नमूद केलेली फी देईल :—

अनुसूची

| अनुक्रमांक | प्रयोजन | फीची रक्कम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | पुस्तिका प्रथम तयार करणे— | |
| | (अ) जमीन धारकाची धारणजमीन, पोट-विभागणी धरून, दहा भू-मापन क्रमांक किंवा दहापेक्षा कमी भू-मापन क्रमांकांची मिळून बनलेली असेल त्याबाबतीत. | एक रुपया. |
| | (ब) जमीन धारकाची धारणजमीन, पोट-विभागणी धरून, दहापेक्षा अधिक भू-मापन क्रमांकांची मिळून बनलेली असेल त्या बाबतीत. | एक रुपया आणि दहापेक्षा अधिक असलेल्या प्रत्येक भू-मापन क्रमांकासाठी (पोट-विभागणी धरून) आणखी दहा पैसे. |
| २ | खातेपुस्तिका अद्ययावत बनविण्यासाठी जादा नोंदी किंवा फेरफार करण्यासाठी— | |
| | (अ) जमीन धारकाची धारणजमीन, पोट-विभागणी धरून, दहा भू-मापन क्रमांक किंवा दहापेक्षा कमी भू-मापन क्रमांकांची मिळून बनलेली असेल त्याबाबतीत. | काही नाही. |
| | (ब) जमीन धारकाची धारणजमीन, पोट-विभागणी धरून, दहा भू-मापन क्रमांकांपेक्षा जास्त भू-मापन क्रमांकांची मिळून बनलेली असेल त्याबाबतीत. | दहापेक्षा जास्त असलेल्या प्रत्येक भू-मापन क्रमांकासाठी (पोट-विभागणी धरून) पाच पैसे. |

१२. ***वगळण्यात आले.**

१३. **हिशेब ठेवणे.**—तलाठी, ग्राम अभिलेखात, नियम ३ अन्वये त्यास मिळाल्या असतील अशा, पुस्तिकेची किंमत आणि नियम ११ खालील फी म्हणून नियम ३ अन्वये त्यास मिळाल्या असतील अशा मिळालेल्या रकमांचा हिशेब ठेवील आणि त्याचे परिरक्षण करील.

१४. **खातेपुस्तिकेमध्ये नवीन माहिती भरणे.**—(१) पुस्तिकेमध्ये जादा माहिती नमूद करावयाची किंवा आवश्यक फेरफार करावयाचे असतील त्याबाबतीत, धारक, एकतर स्वत: किंवा आपल्या प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत, ती, उक्त प्रयोजनाकरिता, तलाठ्याकडे सादर करील.

(२) तलाठी, नमुना ५ मध्ये, पुस्तिका मिळाल्याबद्दल पोच देईल आणि त्यामध्ये, नियम ११ अन्वये फी भरल्यानंतर ज्या तारखेस पुस्तिका यथोचितरीत्या दुरुस्त करून परत करण्यात येईल ती तारीख (पुस्तिका मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांनंतरची नसेल अशी तारीख) विनिर्दिष्ट करील.

१५. **अनधिकृत नोंदी आणि बदल.**—(१) कोणत्याही धारकाने—

(अ) आपल्या धारण जमिनीसंबंधात पुस्तिकेमध्ये कोणतीही नोंद किंवा बदल करता कामा नये ; आणि

(ब) तलाठ्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस, अशी नोंद किंवा बदल करण्यास मुभा देता कामा नये.

(२) अनधिकृत नोंदी किंवा बदल अंतर्भूत असलेली खातेपुस्तिका परत घेण्यात येईल आणि तलाठ्याकडून किंवा याबाबतीत तहसिलदाराने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर महसूल अधिकाऱ्याकडून, त्याच्या सही-निशी व तारीख घालून रद्द करण्यात येईल. अशी खातेपुस्तिका रद्द केल्याबद्दलची नोंद त्याबद्दलची संक्षिप्त कारणे देऊन तहसिलदार निदेश देईल अशा रीतीने स्वतंत्रपणे ठेवण्यात येईल.

१६. **खातेपुस्तिकेची दुसरी प्रत देणे.**—(१) कोणतीही पुस्तिका फाटेल, विरुपित होईल किंवा कोणत्याही इतर कारणास्तव वापरासाठी अयोग्य होईल किंवा हरवली असेल किंवा रद्द करण्यात आली असेल त्याबाबतीत धारकास पुस्तिकेच्या दुसऱ्या प्रतीकरिता जुन्या पुस्तिकेसह, कोणतीही असल्यास, मंडल निरीक्षका-कडे किंवा मंडल अधिकाऱ्याकडे नमुना ६ मध्ये अर्ज करता येईल.

(२) मंडल निरीक्षक किंवा मंडल अधिकारी नमुना ७ मध्ये अशा अर्जाची पोच देईल.

(३) अर्जात देण्यात आलेल्या माहितीच्या अचूकतेसंबंधी आवश्यक ती चौकशी केल्यानंतर मंडल निरीक्षक किंवा मंडल अधिकारी अर्जदाराला पुस्तिकेची दुसरी प्रत देण्यासंबंधी आदेश देईल.

(४) अशा आदेशाची एक प्रत जुन्या पुस्तिकेसह, कोणतीही असल्यास, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी तलाठ्याकडे पाठविण्यात येईल.

(५) पोट-नियम (३) अन्वये काढलेला आदेश मिळाल्यावर तलाठी अर्जदाराने त्यासाठी असलेली किंमत आणि फी भरल्यानंतर नियम ४ च्या उपबंधानुसार पुस्तिकेची दुसरी प्रत (जिच्यावर "दुसरी प्रत" असे तांबड्या शाईने लिहिलेले असेल अशी) देईल.

१७ **धारकाच्या वारसांना पुस्तिका देणे.**—(१) उत्तराधिकाराने धारक होईल अशा व्यक्तीस, नवीन खातेपुस्तिका देण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) मयत-धारकाच्या उत्तराधिकाऱ्याने अर्ज केल्यावर, तलाठी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, मयत-धारकाच्या नावे असलेली पुस्तिका त्याच्या उत्तराधिकाऱ्याच्या नावे बदलून देईल.

(३) पोट-नियम (२) खालील अर्ज नमुना ८ मध्ये असेल व त्यासोबत मयत-धारकाला देण्यात आलेली पुस्तिका देण्यात येईल.

---

***पहा.**—महाराष्ट्र जमीन महसूल खाते पुस्तिका (तयार करणे, देणे आणि ठेवणे) (सुधारणा) नियम १९७२ यातील नियम ७ अन्वये *हा नियम वगळण्यात आला.

(४) तलाठी, अर्जाची आणि पुस्तिकेची, नमुना ५ मध्ये, पोच देईल.

(५) मयत-धारकाचे एकापेक्षा अधिक उत्तराधिकारी असतील आणि त्यांनी संयुक्तरीत्या जमीन धारण केली असेल त्याबाबतीत प्रत्येक उत्तराधिकाऱ्यास, संयुक्त धारक असल्यामुळे, या नियमांच्या उपबंधानुसार, संयुक्त धारण जमिनीसंबंधात पुस्तिका मिळविण्याचा हक्क असेल.

१८. **पुस्तिकेची तपासणी.**—(१) महसूल अधिकारी किंवा तलाठयापेक्षा वरच्या दर्जाचा भू-मापन अधिकारी धारकास पुस्तिका तपासणीसाठी सादर करण्यास जेव्हा फर्मावील त्यावेळी धारक तपासणीसाठी पुस्तिका सादर करील.

(२) कोणतेही कारण दिल्याशिवाय धारक, पुस्तिका सादर करण्यात कसूर करील त्या बाबतीत तपासणी अधिकारी, लेखी आदेशाद्वारे असा आदेश का काढण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दर्शविण्याची संधी धारकास दिल्यानंतर पुस्तिका रद्द केल्याचे जाहीर करील. अशा आदेशाची प्रत तलाठयाकडे पाठविण्यात येईल.

नमुना क्रमांक १

[नियम ३ (१) पहा]

**खातेपुस्तिका मिळविण्यासाठी अर्ज**

तलाठी,

गाव . . . . . . . . . . . . ., तालुका . . . . . . . . . . . . ., जिल्हा . . . . . . . . . . . . यास,

मी, . . . . . . . . . . . . . . . . गाव . . . . . . . . . . . . . तालुक्यामधील जमीन-धारक असून माझा धारण जमीन क्रमांक . . . . . . . . . . आहे. माझी धारण जमीन, पोट-विभागणी धरून, भू-मापन क्रमांक . . . . . . . . . . . . असलेल्या जमिनीची मिळून बनलेली आहे.

मी, अशी विनंती करतो की, मला कृपया माझ्या धारण जमिनीबाबत खाते-पुस्तिका देण्यात यावी.

मी, खाते-पुस्तिकेची किंमत म्हणून रु. . . . . . . . . . पैसे . . . . . . . . . (अक्षरी) रुपये . . . . . . पैसे . . . . . . . सोबत पाठवीत आहे.

माझा सध्याचा संपूर्ण पत्ता पुढीलप्रमाणे आहे:—

ठिकाण . . . . . . . . . . . . . .

अर्जदार धारक सही/अंगठयाचा ठसा.

दिनांक . . . . . . . . . . . . . . . संपूर्ण नाव . . . . . . . . .

(फक्त कार्यालयीन वापरासाठी)

---

तलाठयाची सही व तारीख.

---

खाते पुस्तिका अनुक्रमांक . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . रोजी खाते-पुस्तिका तयार केली.

. . . . . . . . . रोजी खाते-पुस्तिका दिली.

खाते-पुस्तिका धारकाच्या अभिकर्त्याला दिली असेल तर त्याचे नाव.

धारकाकडून फीच्या रुपाने मिळालेली रक्कम . . . . . . . . . . . . . . .

पावती क्रमांक आणि तारीख . . . . . . . . . . .

## नमुना क्रमांक २

[नियम ३ (३) पहा]

**अर्जाची पोच**

क्रमांक .................

गाव............, तालुका ............, जिल्हा ............ येथील जमीन-धारक, श्री. ................ यांचा, आपल्या जमिनीसंबंधी खाते-पुस्तिका मिळण्याबाबतचा ............ तारखेचा अर्ज मिळाला.

खाते-पुस्तिका यथोचितरीत्या भरून ............ रोजी तयार असेल आणि हे पोचपत्र सादर केल्यावर, उक्त तारखेस किंवा तदनंतर, ती देण्यात येईल.

ठिकाण............ सही .................
दिनांक ............... तलाठी ...............
नाव .................

तलाठी,

गाव ............, तालुका ............, जिल्हा ............... यांस

माझ्या जमिनीसंबंधात यथोचितरीत्या भरलेली खाते-पुस्तिका श्री. ............... यांच्या-मार्फत मला मिळाली.

ठिकाण............ धारकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा
दिनांक ........... नाव ..................

ज्या व्यक्तीला खाते-पुस्तिका प्रत्यक्ष दिली असेल त्या व्यक्तीचे नाव.

ज्या व्यक्तीला खाते-पुस्तिका प्रत्यक्ष दिली असेल त्या व्यक्तीची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

ठिकाण............ तलाठ्याची सही.
दिनांक ...........

---

## नमुना क्रमांक ३

[नियम ३ (३) पहा]

**पुस्तिकेच्या किंमतीबाबत पावती**

क्रमांक............

श्री. ............... यांच्याकडून, खाते-पुस्तिकेची किंमत म्हणून रुपये, .......... पैसे .........., (अक्षरी) ............ रुपये .......... पैसे ...... फक्त मिळाले.

ठिकाण............ सही ...............
दिनांक ............ तलाठी ..............
नाव ...............

## नमुना क्रमांक ४

[नमुना ३ (३) पहा]

### फीची पावती

पावती क्रमांक ..............

श्री. ..................... यांच्याकडून, खाते-पुस्तिका क्रमांक .............. च्या संबंधात खाली दर्शविल्याप्रमाणे, फी मिळाली.

खाते-पुस्तिका प्रथम तयार करणे— रु. पैसे

पोटविभागणी धरून .............. भू-मापन क्रमांक .....

असलेल्या धारण जमिनीकरिता नवीन माहिती भरणे—

.................... चे उतारे भरण्याकरिता

पोटविभागणी धरून, दहापेक्षा अधिक ..................

भू-मापन क्रमांक अंतर्भूत असलेल्या धारण जमिनीकरिता

एकूण ..

रुपये (अक्षरी) .......... पैसे ........... फक्त.

ठिकाण ............. सही ..............

दिनांक ............. तलाठी .............

नाव ...............

---

## नमुना क्रमांक ५

[नियम १४(२) आणि १७ (४) पहा]

### खातेपुस्तिका मिळाल्याबद्दलची पोच

क्रमांक.

श्री. ................. राहणार, ....., गाव ....., तालुका ....., जिल्हा .....,

धारकाच्या नावात बदल करण्यासाठी
यांच्याकडून——————————————खातेपुस्तिका क्रमांक ............ मिळाली.
नवीन माहिती भरण्यासाठी

खातेपुस्तिका, यथोचितरीत्या भरून ........ रोजी तयार असेल आणि हे पोचपत्र सादर केल्यावर उक्त तारखेस किंवा तदनंतर ती देण्यात येईल.

दिनांक .............. सही ..............

तलाठी ...........

ठिकाण .............. नाव ..............

तलाठी,

.......... गाव, .......... तालुका, .......... जिल्हा यांस,

माझ्या धारण जमिनीच्या संबंधातील, यथोचितरीत्या भरलेली, खातेपुस्तिका क्रमांक · · · · · · · · · · ·

ठिकाण · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · धारकाची सही किंवा अंगठयाचा ठसा · · · · · · · · · · · · · · · · · · ·

दिनांक · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · ·

जिला खातेपुस्तिका दिली त्या व्यक्तीचे नाव · · · · · · · · · · · · · · · · · · · ·

खाते पुस्तिका जिला प्रदान केली त्या व्यक्तीची किंवा अंगठयाचा ठसा.

ठिकाण · · · · · · · · · · · · · · ·

दिनांक · · · · · · · · तलाठयाची सही.

---

## नमुना क्रमांक ६

[नियम १६ (१) पहा]

### खातेपुस्तिकेची दुसरी प्रत मिळविण्यासाठी अर्ज

मंडल निरीक्षक/अधिकारी · · · · · · · · · मंडल, तालुका · · · · · · · · · , जिल्हा · · · · · · · · · · · ·

यांस,

महोदय,

मी, गाव · · · · · · , तालुका · · · · · · · · · · · , जिल्हा · · · · · · · · · · · , येथील जमीनधारक, श्री. · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · , माझ्या धारण जमिनीच्या संबंधातील खातेपुस्तिका क्रमांक · · · · · · · · · · · · · ची दुसरी प्रत मिळण्यासाठी, याद्वारे, अर्ज करीत आहे.

विवरणपत्रात आवश्यक असलेली माहिती मी खाली देत आहे :—

(१) अर्जदार धारकाचे संपूर्ण नाव · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · ·

(२) खातेपुस्तिका क्रमांक · · · · · · · · · · · · · ·

(३) खातेपुस्तिका हरवली आहे किंवा कसे · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · · ·

(४) खातेपुस्तिका वापरासाठी अयोग्य झाली असेल तर त्याबद्दलची कारणे · · · · · · · · · · · · · · · ·
जुनी खातेपुस्तिका सोबत जोडलेली आहे.

मी प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, वर दिलेली माहिती खरी आहे. म्हणून माझ्या खातेपुस्तिकेची दुसरी प्रत मिळण्यासाठी आवश्यक ते आदेश देण्याची मी आपल्याला विनंती करीत आहे.

ठिकाण · · · · · · · · · · · · · · ·

दिनांक · · · · · · · · · · · · **अर्जदार धारकाची सही.**

## नमुना क्रमांक ७

[नियम १६ (२) पहा]

**खातेपुस्तिकेची दुसरी प्रत मिळविण्यासाठी करण्यात आलेल्या अर्जाची पोच पावती**

श्री. ..........., राहाणार ..............., गाव ..............., तालुका ........ ..............., जिल्हा यांजकडून खातेपुस्तिका क्रमांक ........ ची दुसरी प्रत मिळण्याबद्दलचा दिनांक .......... रोजींचा अर्ज मिळाला.

ठिकाण ................

दिनांक ...............

मंडल निरीक्षक/अधिकारी यांची सही
........ मंडल, .... तालुका

---

## नमुना क्रमांक ८

[नियम १७ (३) पहा]

तलाठी,

गाव ..........................., तालुका ............, जिल्हा ...........

यांस,

गाव ..........., तालुका .........., जिल्हा .... यामधील जमीनधारक श्री. ........ .................. हे .............. रोजी मृत्यू पावले आहेत आणि त्यांची धारण जमीन, त्यांचा वारस म्हणून माझ्या नावे नोंदण्यात येणे आवश्यक आहे.

मी त्यांची खातेपुस्तिका क्रमांक ....... सोबत पाठवीत आहे. ती माझ्या नावे बदलून कृपया परत करण्यात यावी.

सही .....................

संपूर्ण नाव ................

पत्ता .....................

ठिकाण ..................

दिनांक ...................

१५२. जो कोणताही इसम, विहित केलेल्या मुदतीत, कलम १४९ अन्वये आवश्यक असलेले प्रतिवृत्त देण्यात किंवा कलम १५१ अन्वये आवश्यक असलेली माहिती पुरविण्यास किंवा दस्तऐवज सादर करण्यास हयगय करील असा इसम, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वविवेकानुसार, पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी दंडाची रक्कम आकारली जाण्यास पात्र असेल व अशी फी जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल. माहिती देण्यात हयगय केल्याबद्दल शास्ती.

१५३. या बाबतीत राज्य सरकारने केलेल्या नियमांस अधीन राहून—

(अ) कोणत्याही महसूल अधिकाऱ्यास किंवा तलाठ्यास या प्रकरणान्वये कोणताही अभिलेख किंवा नोंदणीपुस्तक यांच्यासाठी किंवा त्यांच्या संबंधात कोणताही नकाशा किंवा योजना तयार करण्याच्या किंवा त्यांची फेरतपासणी करण्याच्या कारणासाठी कलमे ८० व ८१ अन्वये भू-मापन अधिकाऱ्यास जे अधिकार असतील त्यांपैकी कोणतेही अधिकार वापरता येतील ; परंतु त्यांना भाडोत्री मजुरांचा खर्च आकारण्याच्या कलम ८१ अन्वयेच्या अधिकाराचा वापर करता येणार नाही. नकाशे तयार करण्याच्या कामी सहाय्याची मागणी.

(ब) सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी किंवा भू-मापन अधिकारी यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही महसूल अधिकाऱ्यास असा नकाशा किंवा अशी योजना तयार करण्याच्या किंवा त्यांची फेरतपासणी करण्याच्या खर्चाची आणि कारकुनांच्या कामाचा आणि पर्यवेक्षणाचा खर्च धरून सर्व आकस्मिक खर्चाची आकारणी, ज्या जमिनीच्या संबंधात असे नकाशे किंवा योजना असतील त्या जमिनीवर करता येईल, आणि असा खर्च महसुलाच्या मागणीप्रमाणे वसूल करता येईल.

१५४. शेतकीच्या प्रयोजनार्थ उपयोगात आणलेल्या किंवा जिच्या संबंधात हक्कनोंदणीपत्रक तयार करण्यात आले आहे अशा जमिनीवरील कोणताही मालकी हक्क किंवा भार निर्माण करणारा, त्याचे अभि-हस्तांकन करणारा किंवा तो नष्ट करणारा म्हणून अभिप्रेत असलेला कोणताही दस्तऐवज भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८, (१९०८ चा अधिनियम क्रमांक सोळा) अन्वये नोंदविण्यात आला असेल तेव्हा अशा दस्तऐवजाची नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याने, ज्या गावामध्ये ती जमीन असेल त्या गावाच्या तलाठ्यास किंवा त्या तालुक्याच्या तहसीलदारास या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे [70] विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि विहित करण्यात येईल अशा वेळी, त्याबाबत कळविले पाहिजे. नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी हस्तांतराबाबत माहिती कळविणे.

टीप ७०.—कृपया कलम १५६ खालील टीप ७१ पहा.

१५५. कोणतेही लेखनप्रमाद किंवा हक्कनोंदणीपत्रकात किंवा या प्रकरणान्वये ठेवण्यात आलेल्या नोंदणीपुस्तकात ज्या चुका झाल्या असल्याचे हितसंबंधित पक्षकारांनी कबूल केले असेल किंवा ज्या चुका एखाद्या महसूल अधिकाऱ्यास, तो निरीक्षण करीत असताना आढळतील अशा कोणत्याही चुका, जिल्हाधि-काऱ्यास कोणत्याही वेळी दुरुस्त करता येतील किंवा दुरुस्त करवून घेता येतील : हस्तलेखन प्रमादांची दुरुस्ती.

परंतु, जेव्हा एखाद्या महसूल अधिकाऱ्यास, तो निरीक्षण करीत असताना, कोणतीही चूक आढळून आली असेल, तेव्हा, पक्षकारांना नोटीस देण्यात आल्याशिवाय व वादात्मक नोंदींसंबंधीच्या कार्यरीतीनुसार हरकती, कोणत्याही असल्यास, अंतिमरीत्या निकालात काढल्याशिवाय अशी कोणतीही चूक दुरुस्त करता कामा नये.

१५६. नकाशे, नोंदणीपुस्तके आणि हक्क नोंदणीपत्रके यांशिवाय [71] विहित करण्यात येईल असे इतर भूमि अभिलेख प्रत्येक गावासाठी तयार करण्यात आले पाहिजेत. भूमि अभिलेख.

टीप ७१.—अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व ठेवणे) यासंबंधीचे नियम. (कृपया ६५, ६६, ६७, ६९ आणि ७० या टीपाही पहा). (नियम २९, ३०, ३१, ३२ पहा.).

[शासकीय अधिसूचना क्र. यू एन एफ-२२६७ (ए)-आर, दिनांक ६ ऑक्टोबर १९७१.]

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१, असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—(१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या नियमांत,—

(अ) "प्रमाणन अधिकारी" म्हणजे कलम १५०, पोट-कलम (६) अन्वये फेरफाराच्या नोंद-वहीतील नोंदी प्रमाणित करण्यास सक्षम असलेला महसूल किंवा भू-मापन अधिकारी,

(ब) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६,

(क) "नमुना" म्हणजे या नियमांस जोडलेला नमुना,

(ड) "कलम" म्हणजे महसूल अधिनियमाचे कलम.

(२) अधिनियमांत वापरलेले आणि या नियमांत व्याख्या न केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांचा अर्थ अधिनियमान्वये त्यांना अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच असेल.

## अ. कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आलेल्या क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रातील अधिकार अभिलेखाचे नमुने

३. **अधिकार अभिलेखाचा नमुना.**—कलम १२६ अन्वये भू मापन करण्यात आलेल्या क्षेत्रांखेरीज इतर क्षेत्रातील प्रत्येक भू-मापन क्रमांकासाठी किंवा यथास्थिती भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागासाठी नमुना १ मध्ये स्वतंत्र कार्डाच्या स्वरूपात अधिकार अभिलेख तयार करण्यात येतील व ठेवण्यात येतील.

## ब. कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आलेल्या क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रातील पहिला अधिकार अभिलेख तयार करण्यासाठी कार्यपद्धती

४. **नोटीस देणे.**—(१) कोणत्याही गावातील जमिनींच्या संबंधात कोणताही अधिकार अभिलेख अस्तित्वात नसेल आणि तो पहिल्या वेळी तयार करावयाचा असेल तर, त्या गावच्या तलाठ्याने नमुना २ मध्ये जाहीर नोटीस दिली पाहिजे आणि अशा गावातील जमिनींमध्ये कोणताही हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना, जाहीर नोटिशीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत पुढील सर्व किंवा कोणत्याही मुद्यांसंबंधी त्याला एकतर लेखी किंवा तोंडी माहिती देण्याबद्दल फर्मावले पाहिजे :—

(एक) धारक, भोगवटदार, मालक, कूळ, जमीनमालक, गहाणदार, सरकारी पट्टेदार, खंड किंवा महसूल यासंबंधातील अभिहस्तांकिती म्हणून, किंवा कोणत्याही इतर रीतीने ज्या जमिनीत त्याचा कोणताही हितसंबंध असेल त्या जमिनीचा भू-मापन क्रमांक व पोट-विभाग, कोणताही असल्यास,

(दोन) जमिनीतील हितसंबंधाचे स्वरूप, म्हणजेच, धारक, भोगवटदार, मालक, कूळ, जमीनमालक, गहाणकार, गहाणदार किंवा अभिहस्तांकनकर्ता म्हणून किंवा कोणत्याही इतर रीतीने, जमीन धारण केली आहे किंवा कसे,

(तीन) ज्या भू-धारण पद्धतीवर जमीन धारण करण्यात आलेली आहे ती भू-धारणापद्धती म्हणजेच दुमाला जमीन किंवा बिनदुमाला जमीन आहे किंवा कसे आणि बिनदुमाला जमिनीच्या बाबतीत खातेदार वर्ग १ किंवा खातेदार वर्ग २ किंवा सरकारी पट्टेदार म्हणून धारण केलेली आहे किंवा कसे,

(चार) जमिनीवरील भार किंवा बोजा, कोणताही असल्यास, आणि अशा भाराच्या किंवा बोजाच्या धारकाचे नाव.

(२) पोट-नियम (१) खालील नोटीस गावात दवंडी पिटवून आणि तिच्या प्रती गावाच्या पंचायतीच्या कार्यालयात आणि चावडीत चिकटवून प्रसिद्ध करण्यात येईल.

५. **पहिल्या अधिकार अभिलेखाची कच्ची प्रत तयार करणे.**—(१) तलाठी, नियम ४ अन्वये मिळाले-ल्या माहितीच्या आधारावर किंवा स्थानिक चौकशी करून तो गोळा करील अशा माहितीच्या आधारावर नमुना १ मध्ये अधिकार अभिलेखाची कच्ची प्रत तयार करील.

(२) नियम ४ अन्वये मिळालेल्या किंवा स्थानिक चौकशी करून गोळा केलेल्या माहितीवरून तलाठ्याला असे आढळून येईल की, कच्च्या प्रतीत करण्याचे योजिलेल्या कोणत्याही नोंदीसंबंधी परस्पर विरोधी दावा करण्यात येत आहे तर तलाठी अशा नोंदीची जागा कोरी ठेवील आणि परस्परविरोधी दाव्यांचा तपशील विवादग्रस्त प्रकरणाच्या नोंदवहीत नमूद करील. विवादग्रस्त प्रकरणांची नोंद नमुना ३ मध्ये ठेवण्यात येईल.

(३) पोट नियम (१) अन्वये तयार करण्यात आलेल्या अधिकार अभिलेखाची कच्ची प्रत, मंडल निरीक्षकाने किंवा मंडल निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या भू-मापन अधिकाऱ्याने तपासल्यानंतर, त्या कच्च्या प्रतीत दाखल केलेल्या तपशिलाविषयी हरकती, कोणत्याही असल्यास, मागविण्यासाठी नियम ४, पोट-नियम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने नमुना ४ मध्ये नोटीस देऊन प्रसिद्ध करण्यात येईल.

(४) अधिकार अभिलेखाच्या कच्च्या प्रतीत दाखल केलेल्या कोणत्याही तपशीलाविषयी कोणत्याही हरकती मिळाल्यास, तलाठी, विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत त्याची नोंद करील आणि हरकतीमुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या किंवा त्यात हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींवर नमुना ५ मध्ये वैयक्तिक नोटिसा बजावील आणि अशा नोटिशीद्वारे त्या हरकतींच्या स्वरूपाविषयी त्यांना कळवील आणि हरकतींच्या सुनावणीसाठी व त्यांच्या संबंधात निर्णय घेण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी, तारखेला आणि वेळेला हजर राहण्यास त्यांना फर्मावील. तसेच, तशाच नोटिसा, पोट-नियम (२) अन्वये विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत नोंद केलेल्या विवादात हितसंबंध असल्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींवर बजावण्यात येतील.

(५) हरकतींच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या तारखेस, ठिकाणी व वेळेस, अव्वल कारकुनाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही महसूल किंवा भू-मापन अधिकारी, गावच्या अधिकार अभिलेखाच्या कच्च्या प्रतीत नोंद करण्यात आलेला सर्व तपशील जमलेल्या सर्व व्यक्तींच्या समक्ष मोठ्याने वाचून दाखवील. त्यानंतर तो ज्या जमिनींच्या संबंधात हरकती किंवा विवाद उपस्थित करण्यात आलेले आहेत त्या जमिनींबाबत त्यांना माहिती देईल आणि बाकीच्या जमिनींच्या संबंधातील नोंदी त्यांना मान्य आहेत किंवा कसे याबद्दल त्यांना विचारील. त्यांना अशा नोंदी मान्य असतील तर, पूर्वोक्त महसूल किंवा भू-मापन अधिकारी, कच्च्या प्रतीत अशा नोंदींच्या समोर तशा अर्थाचा शेरा नमूद करील. कोणत्याही नोंदीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीने चूक दाखवून दिल्यास आणि ती चूक इतर कोणालाही अमान्य नसेल तर नोंद दुरुस्त करण्यात येईल आणि अधिकार अभिलेखाच्या कच्च्या प्रतीत तशा अर्थाचा शेरा नमूद करण्यात येईल.

(६) पोट-नियम (५) मध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण केल्यानंतर आणि पोट-नियम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे तलाठ्याने नोटिसा यथोचितरीत्या बजाविल्या होत्या किंवा कसे याबाबत पडताळणी केल्यानंतर, उक्त अधिकारी, विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीतील नोंदविलेल्या हरकतींचा निर्णय करण्यासाठी कार्यवाही करील आणि त्यात प्रत्येक हरकतीसंबंधातील आपला निर्णय नमूद करील व जमलेल्या व्यक्तींपुढे आपला निर्णय घोषित करील. पोट-नियम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे तलाठ्याने नोटिसा यथोचितरीत्या बजावल्या नव्हत्या असे अधिकाऱ्यास आढळून येईल त्या बाबतीत, तो पोट-नियम (४) आणि पोट-नियम (५) यांमध्ये घालून दिलेली कार्यपद्धती अनुसरण्यात येईपर्यंत तो आपला निर्णय पुढे ढकलील.

(७) पोट-नियम (६) अन्वये महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने निर्णय घेतल्यानंतर तलाठी अधिकार अभिलेखाच्या कच्च्या प्रतीतील नोंदी, उक्त निर्णयानुसार लाल शाईने दुरुस्त करील किंवा यथास्थिती तीमधील कोऱ्या जागांमध्ये लाल शाईने नोंदी करील आणि अशा रीतीने दुरुस्त केलेल्या अधिकार अभिलेखाची स्वच्छ प्रतसुद्धा तयार करील.

(८) पोट-नियम (७) अन्वये तयार केलेली अधिकार अभिलेखाची स्वच्छ प्रत, नियम ४, पोट-नियम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, स्वच्छ प्रतीत नोंद केलेल्या तपशिलाबाबत हरकती, कोणत्याही असल्यास, त्या मागविण्यासाठी नमुना सहा मध्ये नोटीस देऊन प्रसिद्ध करण्यात येईल.

(९) अधिकार अभिलेखाच्या स्वच्छ प्रतीत नोंद करण्यात आलेल्या कोणत्याही तपशिलाबाबत कोणत्याही व्यक्तीकडून कोणतीही हरकत आली असेल तर, तलाठी ती मिळाल्याची पोच देईल आणि हरकतीमुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या किंवा त्यात हितसंबंध असलेल्या इतर सर्व व्यक्तींवर नोटिसा बजावील व त्याद्वारे त्यांना हरकतीचे स्वरूप कळवील आणि हरकतीच्या सुनावणीसाठी आणि तिच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी, निश्चित करण्यात आलेल्या ठिकाणी, तारखेस व वेळेला हजर राहण्यास त्यांना फर्मावील.

(१०) हरकतींच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखेला, ठिकाणी व वेळेला, उपविभागीय जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा महसूल किंवा भू-मापन अधिकारी, तलाठ्याकडे मिळालेल्या हरकतींचा विचार करील आणि हरकतीमुळे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या किंवा त्यांत हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यावर निर्णय घेईल. निर्णय घेतल्यानंतर, उक्त अधिकारी, अधिकार अभिलेखाच्या स्वच्छ प्रतीतील नोंदी, त्याने घेतलेल्या निर्णयानुसार लाल शाईने दुरुस्त

करील आणि कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याच्या समक्ष अशा दुरुत्या आपल्या सहीने व तारखेनिशी अधिप्रमाणित करील. कोणतेही लेखनदोष उक्त अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिले असतील तेव्हा तो अशा चुका तशाच रीतीने दुरुस्त करील.

(११) पूर्वोक्तप्रमाणे अधिकार अभिलेखाची स्वच्छ प्रत दुरुस्त केल्यानंतर, महसूल किंवा भू-मापन अधिकारी उपस्थित असलेल्या व्यक्तींची इच्छा असेल असा त्याचा भाग त्यांच्या समक्ष वाचून दाखविण्याची व्यवस्था करील, आणि त्यास आवश्यक वाटेल अशी दुरुस्ती पोट-नियम (१०) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने पार पाडल्यानंतर कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याच्या समक्ष अधिकार अभिलेखाच्या स्वच्छ प्रतीवर त्याची सही करील व तारीख घालील आणि प्रतीच्या शेवटी, यथोचितरीत्या मान्य व प्रख्यापित करण्यात आलेले आहे असे प्रमाणपत्र जोडील.

### क. कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आलेल्या क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रातील विद्यमान अधिकार अभिलेखाऐवजी नवीन अधिकार अभिलेख तयार करणे

६. **नवीन अधिकार अभिलेख तयार करणे.**—(१) कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आलेल्या क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रातील कोणत्याही गावच्या जमिनींच्या संबंधात या नियमांच्या प्रारंभापूर्वी तयार केलेला अधिकार अभिलेख (ज्यांचा यापुढे "विद्यमान अधिकार अभिलेख" असा उल्लेख करण्यात आला आहे) नमुना '१' अनुसार नसेल त्याबाबतीत, तलाठी, प्रत्येक भू-मापन क्रमांकांच्या व भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या संबंधातील नोंदी विद्यमान अधिकार अभिलेखामधून नवीन अधिकार अभिलेखामध्ये बदली करून विद्यमान अभिलेखाऐवजी नमुना '१' मध्ये नवीन अधिकार अभिलेख करण्याची व्यवस्था करील. अशा रीतीने तयार केलेल्या नवीन अधिकार अभिलेखाची मंडल निरीक्षकाकडून तपासणी करण्यात येईल.

(२) त्यानंतर तलाठी, नियम ४, पोट-नियम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने नोटीस प्रसिद्ध करील आणि तीद्वारे विद्यमान अधिकार अभिलेख व नवीन अधिकार अभिलेख, नोटिशीत विनिर्दिष्ट करावयाच्या तारखांना व वेळांना व ठिकाणी (ते खेडुतांना सोयीचे ठिकाण असेल) पाहण्यासाठी खुले ठेवले आहे व नवीन अधिकार अभिलेख नोटिशीत विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेस व वेळेला तहसिलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याकडून प्रख्यापित करण्यात येतील असे त्या गावातील जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना कळवील व त्या प्रसंगी उपस्थित राहण्याबद्दल त्यांना फर्मावील.

(३) निश्चित केलेल्या तारखेस, वेळी व ठिकाणी, संबंधित अधिकारी नवीन अधिकार अभिलेखातील नोंदी, विद्यमान अधिकार अभिलेखातील तत्सम नोंदीशी पडताळील आणि आवश्यक असेल तेथे नोंदी दुरुस्त करील. नंतर तो, जमलेल्या लोकांपुढे नमुना '१' मधील नवीन अधिकार अभिलेख हे, उक्त तारखेपासून त्या गावाचे अधिकार अभिलेख असल्याचे घोषित करील.

(४) मुंबईच्या जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या कलम २४ अन्वये कोणत्याही धारण जमिनीच्या बाबतीत कोणत्याही एकत्रीकरण अधिकाऱ्यांने नमुना '१' मध्ये अधिकार अभिलेख तयार केले असतील तर, ते अधिकार अभिलेख, त्या धारण जमिनींसाठी ह्या नियमान्वये तयार करण्यात आलेले नवीन अधिकार अभिलेख असल्याचे मानण्यात येईल.

७. **अधिकार अभिलेख पुन्हा लिहिणे.**—(१) अधिकार अभिलेख दहा वर्षांच्या मुदतीनंतर सामान्यपणे पुन्हा लिहिण्यात येतील. उप-विभागीय अधिकाऱ्यास, गावातील बऱ्याच भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागांच्या संबंधातील अधिकार अभिलेखात करण्यात आलेल्या नोंदीची संख्या लक्षात घेता, तलाठ्याला त्यात आणखी कोणत्याही नोंदी करणे अवघड होईल असे वाटल्यास, त्यास, अधिकार अभिलेख (दहा वर्षांपेक्षा) कमी मुदतीच्या अखेरीस पुन्हा लिहिण्याबद्दल निदेश देता येईल.

(२) जेव्हा अधिकार अभिलेख पुन्हा लिहावयाचे असतील तेव्हा तलाठी, अधिकार अभिलेखातील नोंदी अद्यावत असतील तशा त्या नमुना '१' मधील अधिकार अभिलेखाच्या नवीन प्रतीमध्ये बदली करील. अशा रीतीने तयार करण्यात आलेला अधिकार अभिलेख मंडल निरीक्षकाकडून तपासण्यात येईल.

(३) अशा रीतीने अधिकार अभिलेख तयार करण्यात आल्यानंतर नियम ६, पोट-नियम (२) आणि पोट-नियम (३) याचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

### ड. कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आलेल्या क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रातील अधिकार अभिलेख आणि फेरतपासणी आणि फेरफाराची नोंदवही ठेवणे

८. **अधिकार अभिलेख आणि फेरफाराची नोंदवही ठेवण्याची जबाबदारी.**—कलम १२६ अन्वये भू-मापन करण्यात आलेल्या क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रात, तहसिलदार, त्याच्या अधिकारितेतील सर्व गावातील अधिकार अभिलेख व फेरफाराची नोंदवही अद्यावत ठेवण्यास आणि त्या प्रयोजनार्थ, यापुढे दिलेल्या उपबंधाचे वेळेवर व पद्धतशीर अनुपालन करण्यास जबाबदार राहील.

९. **कलम १४९ खालील प्रतिवृत्ताच्या अभिस्वीकृतीचा नमुना.**—कलम १४९ अन्वये कोणत्याही व्यक्तीने दिलेले प्रतिवृत्त मिळाल्याची पोच नमुना ७ मध्ये देण्यात येईल.

१०. **फेरफाराच्या नोंदवहीचा नमुना.**—फेरफाराची नोंदवही नमुना ८ मध्ये असेल.

११. **तलाठ्याने फेरफाराच्या नोंदवहीत नोंदी करणे.**—कलम १५४ मध्ये उल्लेखिलेल्या दस्त-ऐवजांच्या नोंदीसंबंधी तलाठ्याला सूचना मिळाल्यावर लवकरात लवकर तो उक्त दस्तऐवजांपैकी प्रत्येक दस्तऐवजाद्वारे केलेल्या फेरफाराच्या बाबतीत फेरफाराच्या नोंदवहीत वेगवेगळ्या नोंदी करील.

१२. **विवक्षित प्रकरणात फेरफाराची नोंद करणे.**—कोणत्याही जमिनीच्या हस्तांतरणाचा परिणाम म्हणून अशा जमिनीतील अधिकार संपादन करण्यात आले असतील आणि अशा हस्तांतरणास जिल्हाधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी आवश्यक असेल त्या बाबतीत, तलाठी कलम १४९ अन्वये त्याला प्रतिवृत्त देणाऱ्या व्यक्तीस अशी परवानगी किंवा अशी परवानगी ज्या आदेशाद्वारे देण्यात आली असेल असा आदेशाचा पुरावा आपल्यासमोर हजर करण्याबद्दल फर्मावील आणि असा पुरावा हजर केल्यानंतर तलाठी ही गोष्ट फेरफाराच्या नोंदवहीच्या स्तंभ २ मध्ये नोंदीच्या शेवटी नमूद करील. जर परवानगी मिळविली असेल, परंतु हजर करण्यात आली नसेल किंवा अशी परवानगी मुळीच मिळविली नसेल तर, तलाठी पूर्वोक्तप्रमाणे ही गोष्टसुद्धा नमूद करील.

१३. **अधिकार अभिलेखात पेन्सिलने निर्देश करणे.**—कोणत्याही जमिनीच्या संबंधात कलम १५०, पोट-कलम (१) अन्वये फेरफाराच्या नोंदवहीत नोंद करण्यात आली असेल तेव्हा, तलाठी, अधिकार अभिलेखात त्या जमिनीच्या संबंधात आढळणाऱ्या नोंदीसमोर, फेरफार नोंद यथोचितरीत्या प्रमाणित करण्यात आलेली नाही या शेऱ्यासह, त्या फेरफाराच्या नोंदीचा क्रमांक पेन्सिलने दर्शवील.

१४. **कलम १५० (२) अन्वये द्यावयाच्या माहितीचा नमुना.**—कलम १५०, पोट-कलम (२) अन्वये जी माहिती तलाठ्याने देणे आवश्यक आहे ती माहिती नमुना ९ मध्ये असेल.

१५. **हरकती मिळाल्याची पोच देण्याचा नमुना.**—कलम १५०, पोट-कलम (१) खाली करण्यात आलेल्या नोंदीच्या संबंधात मिळालेल्या हरकतींची पोच नमुना १० मध्ये देण्यात येईल.

१६. **विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीचा नमुना.**—कलम १५०, पोट-कलम (३) मध्ये उल्लेखलेल्या विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही नमुना ३ मध्ये ठेवण्यात येईल.

१७. **फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदी प्रमाणित करण्याकरिता आणि विवादांचा निर्णय करण्याकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती.**—(१) कलम १५०, पोट-कलम (४) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे विवादग्रस्त प्रकरणाच्या नोंदवहीत नोंदलेल्या विवादाचा निर्णय करण्यासाठी कार्यवाही करण्यापूर्वी आणि फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदी प्रमाणित करण्यापूर्वी, प्रमाणन अधिकारी, नमुना ११ मध्ये तलाठ्याला त्याप्रमाणे कळवील. अशी माहिती मिळाल्यावर, आणि विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत नोंदलेल्या विवादाचा निर्णय करण्यासाठी व फेरफाराच्या नोंदवहीत केलेल्या नोंदी प्रमाणित करण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी निदान पंधरा दिवस अगोदर, तलाठी अशा विवादात किंवा नोंदीत हितसंबंध असण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींना नमुना १२ मध्ये नोटिसा देईल आणि विवादांचा निर्णय करण्यासाठी व नोंदी प्रमाणित करण्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी, तारखेस आणि वेळेस उपस्थित राहण्यास त्यांना फर्मावील.

(२) विवादांचा निर्णय करण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेस आणि ठिकाणी व वेळेस प्रमाणन अधिकारी ज्या फेरफार नोंदीविषयी विवाद नसेल त्या नोंदी उपस्थित व्यक्तींच्या समक्ष वाचून दाखवील.

जर अशा नोंदींचा अचूकपणा सर्व उपस्थित व्यक्तींनी कबूल केला असेल तर प्रमाणन अधिकारी अशी कबुली फेरफाराच्या नोंदवहीत नमूद करील आणि असे पृष्ठांकन त्याच्या सहीनिशी दाखल करील की, नोंदी यथोचितरीत्या प्रमाणित केलेल्या आहेत.

जर फेरफाराच्या नोंदवहीत दाखल केलेल्या कोणत्याही नोंदीच्या संबंधातील कोणतीही चूक प्रमाणन अधिकाऱ्याच्या निदर्शनास येईल, आणि उपस्थित असतील अशा हितसंबंधित व्यक्तींकडून अशी चूक कबूल करण्यात येईल तर, प्रमाणन अधिकारी, ती नोंद दुरुस्त करील आणि दुरुस्त केलेली नोंद पूर्वोक्तप्रमाणे प्रमाणित करील.

प्रमाणन अधिकारी, त्यानंतर संक्षिप्त चौकशी करील आणि विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत नोंदलेल्या प्रत्येक विवादाचा निर्णय कब्जाच्या आधारे घेईल, म्हणजेच, हक्काच्या दाव्यानुसार जमीन एखाद्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष कब्जात असेल तर, भोगवटादार, वर्ग १, भोगवटादार, वर्ग २ किंवा यथास्थिती, सरकारी पट्टेदार म्हणून, विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत त्याची नोंद करण्यात येईल. प्रत्यक्ष कब्जा-संबंधात शंका असेल त्याबाबतीत सर्वात प्रबल हक्क असणाऱ्या व्यक्तीची तशी नोंद घेण्यात येईल. तो, विवादग्रस्त फेरफारांच्या नोंदीच्या संबंधात त्याने दिलेल्या आदेशाचीसुद्धा फेरफाराच्या नोंदवहीत नोंद घेईल, आणि आपल्या सहीनिशी अशा आशयाचे पृष्ठांकन करील की, त्याच्या आदेशाद्वारे दुरुस्त केलेल्या फेरफाराची नोंद त्याच्याकडून प्रमाणित करण्यात आली आहे. त्या आदेशात, संबंधित व्यक्तींची आणि साक्षीदारांची नावे आणि प्रत्येक बाजूने सादर केलेल्या पुराव्याचे संक्षिप्त सारांश आणि त्यावरील त्याचे निष्कर्ष अंतर्भूत असतील.

१८. **फेरफारांच्या नोंदवहीतील प्रमाणित नोंदी अधिकार अभिलेखामध्ये बदली करणे.**—नियम १७ अन्वये फेरफाराच्या नोंदवहीतील नोंद प्रमाणित करण्यात आल्यानंतर लगेच, तलाठी ती अधिकार अभिलेखामध्ये शाईने नमूद करील.

१९. **मंडल निरीक्षकाकडून पर्यवेक्षण.**—मंडल निरीक्षकाने त्याच्या मंडलातील प्रत्येक गावाला भेट देणे आणि तलाठ्याने फेरफाराची नोंदवही महसूल अधिनियम आणि हे नियम यांच्या उपबंधानुसार तयार करून ठेवली आहे किंवा कसे ते तपासणे हे त्याचे कर्तव्य असेल आणि जर ती तशी तयार केलेली नसेल किंवा ठेवलेली नसेल तर ती तशी करण्याची आणि ठेवण्याची तो व्यवस्था करील.

## (इ) कलम १२६ अन्वये भू-मापन केलेल्या क्षेत्रातील अधिकार अभिलेख फेरफाराची नोंदवही

२०. **अधिकार अभिलेखाचा आणि फेरफाराच्या नोंदवहीचा नमुना.**—कलम १२६ अन्वये भू-मापन केलेल्या क्षेत्रामध्ये, अधिकार अभिलेख आणि फेरफाराची नोंदवही, महाराष्ट्र जमीनमहसूल (ग्राम, नगर व शहर भू-मापन) नियम, १९६९, यांच्या नियम ७ द्वारे विहित केलेल्या "मालमत्ता कार्ड" च्या नमुन्यात तयार करण्यात येईल आणि नियम २१ ते २८ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे ठेवण्यात येईल.

२१. **अधिकार अभिलेख आणि फेरफारांची नोंदवही ठेवण्याची जबाबदारी.**—कलम १२६ अन्वये भू-मापन केलेल्या क्षेत्रांमध्ये, जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला भू-मापन अधिकारी त्यांच्या अधिकारितेतील सर्वेक्षण केलेली सर्व शहरे, नगरे आणि गावे यांमधील अधिकार अभिलेख आणि फेरफारांची नोंदवही अद्ययावत ठेवण्यास जबाबदार असेल.

~~२२. **कलम १४९ खालील प्रतिवेदनाच्या अभिस्वीकृतीचा नमुना.**—कलम १४९ अन्वये कोणत्याही~~ व्यक्तीने दिलेले प्रतिवेदन मिळाल्याची पोच नमुना ७ मध्ये देण्यात येईल.

२३. **फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदी.**—संपादनाची किंवा हस्तांतरणाची कलम १५०, पोट-कलम (१) अन्वये, तलाठयाला मिळालेली प्रतिवेदने आणि सूचना यांची नोंद तो मालमत्ता कार्ड नोंदवहीत करील.

२४. **फेरफाराची नोटीस.**—नियम २३ अन्वये मालमत्ता कार्डात फेरफारांची नोंद केल्यानंतर ताबडतोब तलाठी, नोंदीची एक संपूर्ण प्रत गावातील किंवा चावडीमध्ये ठळक ठिकाणी किंवा चावडी नसेल तर गावातील, शहरातील किंवा नगरातील ठळक जागी लावील. तो मालमत्ता कार्ड नोंदवहीवरून फेरफारामध्ये हितसंबंध असल्याचे दिसून येणाऱ्या सर्व व्यक्तींना आणि त्यामध्ये हितसंबंध असल्याचे मानण्यास सयुक्तिक कारण असणाऱ्या कोणत्याही इतर व्यक्तीलासुद्धा नमुना ९ मध्ये एकतमदावच्छेदे-करून नोटीस देईल व नोंदीविषयी त्यांच्या हरकती कोणत्याही असल्यास, त्या अशी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत तोंडी किंवा लेखी पाठविण्यास फर्मावील.

२५. **हरकतीच्या व विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीच्या अभिस्वीकृतीचा नमुना.**—नियम २४ अन्वये दिलेल्या नोटिशीला प्रतिसाद म्हणून आलेल्या हरकतींची अभिस्वीकृती नमुना १० मध्ये देण्यात येईल, आणि ज्यामध्ये अशा हरकती नोंदल्या पाहिजेत ती विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही, नमुना ३ मध्ये असेल.

२६. **विवाद निकालात काढणे आणि प्रमाणन.**—अव्वल कारकुनाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला महसूल किंवा सर्वेक्षण अधिकारी विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत दाखल केलेल्या विवादाचा निर्णय करील. नियम १७ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने मालमत्ता कार्डात फेरफार प्रमाणित करील.

२७. **विद्यमान अधिकार अभिलेख मालमत्ता कार्डामध्ये बदली करणे.**—जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जा-पेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा महसूल किंवा सर्वेक्षण अधिकाऱ्यांकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा नगरांचे आणि शहरांचे कलम १५९ मध्ये उल्लेखिलेले विद्यमान अधिकार अभिलेख, नियम १८ मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार मालमत्ता कार्ड नोंदवहीत बदली करण्यात येतील.

२८. **पर्यवेक्षण.**—तलाठयाने महसूल अधिनियमाच्या आणि ह्या नियमांच्या उपबंधाच्या अनुसार फेरफाराची नोंदवही तयार केली आहे आणि ठेवली आहे किंवा कसे हे तपासणे हे मंडल निरीक्षकाचे किंवा मंडल निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा सर्वेक्षण अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल, आणि जर ती नोंदवही तशी तयार करण्यात आली नसेल किंवा ठेवण्यात आली नसेल तर ती तशी तयार करण्याची आणि ठेवण्याची तो व्यवस्था करील.

## फ. पिकांची नोंदवही, अधिकार अभिलेखानुसार कब्जा असल्याचे समजण्यात येणाऱ्या व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तीची नोंदवही व कलम १२६ अन्वये भू-मापन केलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील कुळवहीवाटीची नोंदवही

२९. **पिकांची नोंदवही.**—ज्या जमिनीत आणि ज्या क्षेत्रात पिकांची लागवड करण्यात येत असेल ती जमीन आणि ते क्षेत्र दर्शविणारी पिकांची नोंदवही प्रत्येक गावात ठेवण्यात येईल. ती प्रत्येक भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या उप-विभागाच्या संबंधात नमुना १३ मध्ये वेगवेगळ्या कार्डाच्या स्वरुपात ठेवण्यात येईल आणि त्यातील बाबी नमुना '१' च्या शेवटी समाविष्ट करण्यात येतील. नियम ३० मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने प्रत्येक वर्षी नोंदवहीत नोंदी करण्यात येतील.

३०. **पिकांच्या नोंदवहीत नोंदी करण्याची कार्यपद्धती.**—(१) गावात लागवड केलेली पिके जेव्हा शेतात उभी असतील त्या कालावधीत आणि निरनिराळ्या पिकांकरिता जिल्हाधिकाऱ्याकडून निदेशित करण्यात येईल अशा इतर कालावधीत, दर वर्षी, कोणत्याही वेळी, तलाठी, जिल्हाधिकाऱ्याच्या याबाबतीतील आदेशांना अधीन राहून, पिकांचे निरीक्षण करण्याच्या आणि पिकांच्या नोंदवहीत नमुना १३ मध्ये नोंदी करण्याच्या प्रयोजनांकरिता, गावाला भेट देईल.

(२) पोट-नियम (१) च्या उपबंधास अधीन राहून, तलाठी, त्या पोट-नियमाच्या प्रयोजनाकरिता, गावाला भेट देण्याची आपली तारीख किमान सात दिवस अगोदर निश्चित करील आणि त्याच्या भेटीच्या तारखेबद्दल आणि तिच्या प्रयोजनाबद्दल दवंडी पिटवून किंवा कोणत्याही इतर समुचित पद्धतीने ग्रामस्थांना कळविण्याची आणि ग्रामस्थांनी पिकांच्या नोंदवहीत करण्यात येणाऱ्या नोंदी पाहण्यासाठी आपल्या शेतात उपस्थित राहण्याबद्दल त्यांना फर्मावण्याची व्यवस्था करील. तसेच तो ग्रामपंचायतीच्या सरपंचास, कोणताही असल्यास, आपल्या भेटी-बद्दल कळवील आणि ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी पिकांचे निरीक्षण करताना उपस्थित रहावे अशी त्याच्यामार्फत त्यांना विनंती करील.

(३) गावाला त्याने भेट देण्याकरिता नेमून दिलेल्या तारखेस, तेथे उपस्थित असेल असा कोणताही ग्रामस्थ, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि सरपंच यांच्या उपस्थितीत तलाठी, गावातील प्रत्येक शेतास भेट देईल आणि प्रत्येक भू-मापन क्रमांक, आणि भू-मापन क्रमांकाचा उप-विभाग यांच्या संबंधात, प्रत्यक्ष निरीक्षण केल्यावर पिकांच्या नोंदवहीत नोंदी करील. तो जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींना त्यांचा ज्या जमिनीत हितसंबंध असेल त्या जमिनीच्या संबंधात त्याने केलेल्या नोंदी पाहण्याची मुभा देईल.

(४) तलाठ्याने पिकांच्या नोंदवहीमध्ये नोंदी केल्यानंतर, जमेल तितक्या लवकर, मंडल निरीक्षका-पेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही महसूल किंवा भू-मापन अधिकारी, उक्त नोंदींच्या पडताळणीच्या प्रयोजनाकरिता गावाला भेट देईल व गावकऱ्यांना पूर्वोक्तप्रमाणे त्याची आगाऊ सूचना देईल आणि योग्य चौकशी केल्यानंतर, ज्या चुकीच्या असल्याचे आढळून देतील त्या अशा नोंदी दुरुस्त करील.

३१. **अधिकार अभिलेखानुसार जमीन कब्जात असल्याचे मानण्यात येणाऱ्या व्यक्ति व्यतिरिक्त जमीन कब्जात असलेल्या व्यक्तींची नोंदवही.**—(१) नियम ३० अन्वये पिकांच्या निरीक्षणाच्या काळात, तलाठी, भू-मापन क्रमांक किंवा भू-मापन क्रमांकाचा उप-विभाग कब्जात असलेली व्यक्ती आणि अधिकार अभि-लेखात नाव नोंदलेली व्यक्ती एकच आहे किंवा कसे याची पडताळणी करील. जर तलाठ्यास असे आढ-ळून येईल की (जमीन) प्रत्यक्ष कब्जात असलेली व्यक्ती, ही अधिकार अभिलेखातील नोंदीनुसार जमि-नीची लागवड करण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीकडून वेगळी व्यक्ती आहे तर तो, त्या व्यक्तीचे नाव, अधिकार अभिलेखानुसार जमीन कब्जात असलेल्या व्यक्तीं व्यतिरिक्त (जमीन) कब्जात असलेल्या इतर व्यक्तींच्या नोंदवहीत नोंदवील. नोंदवही नमुना १४ मध्ये असेल, नोंदवहीमध्ये कोणतीही नोंद केल्यानंतर जमेल तितक्या लवकर, तलाठी नोंदीचा प्रस्तुत उतारा, आवश्यक कार्यवाहीसाठी तहसिल-दाराकडे अग्रेषित करील.

(२) नमुना १४ मधील नोंदवहीतील उतारे मिळाल्यानंतर पोट-नियम (१) अन्वये तहसीलदार, उक्त नोंदवहीत उल्लेखिलेल्या व्यक्तींच्या जमिनीच्या कब्जासंबंधी आवश्यक चौकशी करण्यासाठी गावाला भेट देईल. तो गावाला भेट देण्याच्या तारखेची आणि वेळेची पूर्वसूचना, तलाठी किंवा ग्रामपंचायतीचा सरपंच, कोणताही असल्यास, त्यास, निदान सात दिवस आगाऊ देईल. तलाठी तहसिलदाराच्या भेटीशी संबंधित असणाऱ्या सर्व व्यक्तींना कळविण्याची व्यवस्था करील आणि नेमलेल्या तारखेस आणि वेळेस सर्वांना गावाच्या चावडीवर उपस्थित राहण्यास फर्माविल.

(३) नेमलेल्या दिवशी आणि वेळी, तहसिलदार संबंधित व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर निर्णय घेईल.

३२. **कुळवहीवाटीची नोंदवही.**—तलाठी, प्रत्येक कृषि वर्षासाठी वेगवेगळी कुळवहिवाटीची नोंद-वही नमुना १५ मध्ये ठेवील. मंडल निरीक्षक जेव्हा पिकांची तपासणी करील तेव्हा तो व उच्च दर्जाचे इतर अधिकारी यांच्याकडून त्यातील नोंदी तपासण्यात येतील. यापैकी कोणत्याही निरीक्षण अधिका-ऱ्यास, कोणतीही चूक आढळून येईल तेव्हा त्यांना ती दुरुस्त करता येईल आणि दुरुस्द नोंद आद्याक्षरित करता येईल :

परंतु अशा नोंदीपासून बाधा पोचणाऱ्या व्यक्तीला तिचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्याशिवाय, नोंद दुरुस्त करण्यात येणार नाही.

### ग. सर्व क्षेत्रांना लागू असणारे संकीर्ण उपबंध

३३. **नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्याने द्यावयाच्या सूचनेसंबंधी उपबंध.**—(१) भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये कोणत्याही दस्तऐवजाची नोंदणी करणाऱ्या नोंदणी अधिकाऱ्याने कलम १५४ अन्वये तलाठ्याला व तहसिलदाराला द्यावयाची सूचना गावात, समाविष्ट असलेल्या जमिनीच्या संबंधात पृथकपणे नमुना १६ मध्ये दोन प्रतीं देण्यात येईल, अशी सूचना मागील महिन्यात नोंदणी केलेल्या दस्तऐवजाच्या संबंधात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देण्यात येईल.

(२) अशी सूचना मिळाल्यानंतर तलाठी अशा सुचनेद्वारे परिणाम झालेल्या फेरफाराच्या नोंदी नमुना १६ च्या स्तंभ १३ मध्ये नमूद करील आणि अशा सूचनेची दुसरी प्रत तहसिलदाराकडे पाठविल.

३४. **कलम ८० आणि ८१ अन्वये शक्तीचा वापर करण्यास सक्षम असलेले महसूल अधिकारी.**—

(१) कोणत्याही महसूल अधिकाऱ्यास, कलम ८० अन्वये सर्वसाधारण नोटिसा देण्याच्या सर्वेक्षण अधिकाऱ्यांच्या शक्तीचा वापर करता येईल.

(२) कोणत्याही अव्वल कारकून तहसिलदाराने तसे फर्माविले असेल तर, कलम ८० अन्वये समन्स काढण्याच्या सर्वेक्षण अधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करण्यास सक्षम असेल.

(३) सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही महसूल अधिकारी, नकाशे किंवा आराखडे तयार करण्याच्या किंवा त्यांच्या पुनरीक्षणाचा खर्च आणि असे नकाशे किंवा आराखडे ज्या जमिनीशी संबंधित असतील त्या जमिनीवरील (लेखन काम आणि पर्यवेक्षण यांचा खर्च धरून) सर्व आकस्मिक खर्च कलम ८१ अन्वये निर्धारित करण्यास सक्षम असेल. असा खर्च अशा रीतीने निर्धारित करण्यात येईल की, त्यामध्ये जमिनीचे मोजमाप करण्याच्या, निर्धारण करण्याच्या आणि नकाशा तयार करण्याच्या संपूर्ण खर्चाचा समावेश होईल.

३५. **ज्या क्षेत्रामध्ये नगररचना योजना अमलात आली असेल त्या क्षेत्रातील अधिकार अभिलेख तयार करणे.**—महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ याच्या उपबंधान्वये कोणत्याही क्षेत्रात अंतिम नगररचना योजना अंमलात आल्यावर लगेच तलाठी, उक्त योजनेशी अनुरूप रहावेत म्हणून नवीन अधिकार अभिलेख तयार करील. अशा रीतीने तयार करण्यात आलेले नवीन अधिकार अभिलेख हे, नियम ५, पोट-नियम (७) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अधिकार अभिलेखांची स्वच्छ प्रत असल्याचे समजण्यात येईल आणि नियम ५, पोट-नियम (८), (९), (१०) आणि (११) चे सर्व उपबंध पहिला अधिकार अभिलेख तयार करण्यास जसे लागू होतात तसेच अशा अधिकार अभिलेखांनाही लागू होतील.

३६. **अपील आणि पुनरीक्षण प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुरूप अधिकार अभिलेख आणि फेरफारांची नोंदवही यातील दुरूस्त्या.**—महसूल अधिनियमान्वये अपील किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा परिणाम म्हणून जेव्हा जेव्हा अधिकार किंवा फेरफारांची नोंदवही यातील कोणतीही नोंद दुरूस्त करणे आवश्यक असेल तेव्हा तेव्हा तलाठी अपील किंवा यथास्थिती, पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा क्रमांक आणि तारीख अशा अभिलेखात किंवा यथास्थिती नोंदवहीत विनिर्देशपूर्वक दर्शवून तसे करील आणि अशा प्राधिकाऱ्याचे पदनाम दर्शवील. आदेशाद्वारे परिणाम होणाऱ्या व्यक्तींवर नोटिस न बजावता अशा दुरुस्त्या करण्यात येतील.

## नमुना १

(नियम ३, ५, ६ व ७ पहा)

### अधिकार अभिलेख

गाव . . . . . . . . . . . . . .          तालुका . . . . . . . . . . . . . .

| भू-मापन क्रमांक | भू-मापन क्रमांकाचा उपविभाग | भू-धारणाप्रकार | भोगवटादाराचे नाव | खाते क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

शेताचे स्थानिक नाव . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

लागवडीयोग्य क्षेत्र

हेक्टर आर

एकूण . .

कुळाचे नाव          खंड

पोट-खराब (लागवडीयोग्य नसलेले)—

वर्ग (अ) . .

वर्ग (ब) . .

एकूण . .

आकारणी—          रुपये पैसे          इतर अधिकार.

जुडी किंवा विशेष आकारणी

सीमा चिन्ह आणि भू-मापन चिन्ह.

नमुना २

[नियम ४ (१) पहा]

**जाहीर नोटीस**

ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या उपबंधान्वये, राज्य शासनाने, ...... जिल्ह्याच्या .................. तालुक्यातील ......................... गावामधील अधिकार अभिलेख प्रथमच तयार करण्याचे ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, त्या गावातील जमिनींमध्ये निरनिराळ्या व्यक्तींनी धारण केलेल्या अधिकारांबाबत सर्व माहिती गोळा करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, आता, मी, .................. (येथे नाव नमूद करावे.) उक्त गावाचा तलाठी, उक्त गावातील जमिनींमध्ये ज्यांचा कोणताही हितसंबंध असेल अशा सर्व व्यक्तींना, या नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही मुद्यांवर मला एक तर लेखी किंवा तोंडी माहिती पुरविण्यासाठी याद्वारे फर्मावीत आहे :—

(एक) ज्या जमिनीत, तिचा धारक, भोगवटादार, मालक, कूळ, जमीन मालक, गहाणकार, गहाणदार, सरकारी पट्टेदार, खंड वा महसूल यासंबंधातील अभिहस्तांकिती म्हणून अथवा इतर कोणत्याही रीतीने हितसंबंध असेल, त्या जमिनीचा भू-मापन क्रमांक व उप-विभाग क्रमांक, कोणताही असल्यास,

(दोन) जमिनीतील हितसंबंधाचे स्वरूप म्हणजेच ती जमीनधारक, भोगवटादार, मालक, कूळ, जमीनमालक, गहाणकार, गहाणदार किंवा अभिहस्तांकिती इत्यादी म्हणून धारण केली आहे किंवा काय,

(तीन) ज्या भू-धारणा पद्धतीवर ती जमीन धारण करण्यात आली आहे ती भू-धारणा पद्धती म्हणजेच जमीन दुमाला किंवा बिनदुमाला धारण केली आहे किंवा काय व बिनदुमाला जमीनीच्या बाबतीत खातेदार वर्ग १, खातेदार वर्ग २ म्हणून किंवा सरकारी पट्टेदार म्हणून जमीन धारण केली आहे केली आहे किंवा काय,

(चार) जमिनीवरील भार किंवा बोजा कोणताही असल्यास, आणि असा भार किंवा बोजा धारण करणाऱ्याचे नाव.

दिनांक :

तलाठी ..................

ठिकाण :

## नमुना ३

[नियम ५(२) व १६ व २५ पहा]

**विवादग्रस्त प्रकरणांची नोंदवही**

| अनुक्रमांक | फेरफारांच्या नोंदवहीतील अनुक्रमांक किंवा अधिकार अभिलेखांची कच्ची प्रत | भू-मापन क्रमांक व उप-विभाग क्रमांक | हरकत मिळाल्याची तारीख | विवाद करणाऱ्या पक्षकाराच्या नावासह विवादाचा तपशील | अधिकाऱ्याचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

## नमुना ४

[नियम ५(३) पहा]

**जाहीर नोटीस**

ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या उपबंधान्वये, राज्य शासनाने ........ जिल्ह्यातील ................, ........तालुक्यातील ........ गावामधील अधिकार अभिलेख प्रथमच तयार करण्याचे ठरविले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१, याच्या नियम ५, पोट-नियम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, मी अशा अधिकार अभिलेखाची कच्ची प्रत तयार केलेली आहे व ती, अशा कच्च्या प्रतीतील कोणत्याही नोंदीमुळे परिणाम झालेल्या किंवा उक्त गावातील जमिनीत हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना .........येथे दिनांक ..............१९.........पूर्वी कोणत्याही दिवशी ............या वेळात पाहण्यासाठी ठेवली आहे ;

त्याअर्थी, आता मी, ..................(येथे नाव नमूद करावे) उक्त गावचा तलाठी, उक्त गावातील जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना अधिकार अभिलेखाच्या उक्त कच्च्या प्रतीचे निरीक्षण करण्यासाठी व उक्त प्रतीतील नोंदीपैकी कोणत्याही नोंदीसंबंधी त्यांच्या हरकती, कोणत्याही असल्यास, त्या उपरोक्त दिवसापासून तीस दिवसांच्या आत मला लेखी सादर करण्यासाठी याद्वारे फर्मावीत आहे.

मी याद्वारे उक्त व्यक्तींना आणखी असे कळवीत आहे की, अधिकार अभिलेखाच्या उक्त प्रतीतील नोंदी जाहीरपणे मोठ्याने वाचण्यात येतील आणि उपरोक्त मुदतीत मला मिळालेल्या नोंदीसंबंधीच्या हरकतींचो ..................यांचेकडून* ..........तारखेस ................ येथे ............वेळी चौकशी करण्यात येईल व निर्णय करण्यात येईल व मी उक्त व्यक्तींना त्या तारखेस, त्या ठिकाणी व वेळी उपस्थित राहण्यास फर्मावीत आहे.

दिनांक :

तलाठी ..............

ठिकाण :

---

*नमूद करावयाची तारीख ही, हरकती सादर करण्यासाठी अनुज्ञात असलेली मुदत संपण्याच्या तारखेपासून तीस दिवसांपेक्षा अगोदरची नसेल.

नमुना ५

[नियम ५(४) पहा]

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

यांस

महोदय,

नोटीस देण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवहृया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१, याच्या नियम ५, पोट-नियम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे भू-मापन क्रमांक . . . . . . . . . . . याच्या संबंधात माझ्याकडून तयार करण्यात आलेल्या . . . . . . . . . . . गावाच्या अधिकार अभिलेखाच्या कच्च्या प्रतीत करण्यात आलेल्या नोंदीच्या संबंधात श्री. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . राहणार . . . . . . . . . . . . यांनी पुढील हरकत मला सादर केली आहे.

(येथे हरकत संक्षिप्तपणे नमूद करावी)

आणखी अशी नोटीस देण्यात येते की, उक्त हरकतीची . . . . . . . . . . . . रोजी . . . . . . . . . . . . . . येथे . . . . . . . . . . . . वाजता चौकशी करण्यात येईल व त्यावर निर्णय देण्यात येईल.

म्हणून, उपरोक्त हरकतीच्या संबंधात तुम्हांस जे काही सांगावयाचे आहे ते चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यापुढे सांगण्यासाठी, उक्त तारखेस आणि उक्त ठिकाणी व वेळी उपस्थित राहण्यास तुम्हांस, याद्वारे, फर्माविण्यात येत आहे. जर तुम्ही व्यक्तिशः किंवा अभिकर्त्यामार्फत उपस्थित राहिला नाही, तर हरकतीवर तुमच्या अनुपस्थितीत निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आपला,

दिनांक : तलाठी . . . . . . . . . . . . . . . .

ठिकाण :

---

नमुना ६

[नियम ५(८) पहा]

**जाहीर नोटीस**

ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवहृया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१, याच्या कलम ५, पोट-नियम (७) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, . . . . . . . . जिल्ह्याच्या . . . . . . . . . . . . . . . तालुक्यातील . . . . . . . . . . . . . . . . . गावासाठी अधिकार अभिलेखाची स्वच्छ प्रत माझ्याकडन तयार करण्यात आली आहे व ती* . . . . . . . . . . . . . . . . . . येथे (ठिकाण)† . . . . . . . . . . . . . . . . . . . . . रोजी . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . ‡ते . . . . . . . . . . . ‡मध्ये पाहण्यासाठी खुली ठेवण्यात आली आहे ;

---

*ती प्रत पाहण्यासाठी जेथे ठेवली असेल ते ठिकाण येथे नमूद करावे.

†ज्या तारखांना ती प्रत पाहता येईल त्या तारखा येथे नमूद कराव्यात.

‡ज्या वेळी ती प्रत पाहता येईल ती वेळ येथे नमूद करावी.

आणि ज्याअर्थी, त्या स्वच्छ प्रतीत दाखल केलेल्या कोणत्याही तपशीलाच्या संबंधातील हरकतींची; कोणतीही असल्यास, सुनावणी झाल्यावर ·················· (येथे अधिकाऱ्याचे पदनाम नमूद करावे) ·················· यांच्याकडून ·················· रोजी ·················· येथे ·················· वाजता ती प्रत पक्की करण्यात येईल ;

त्याअर्थी, आता मी, ·················· (येथे नाव नमूद करावे) उक्त गावाचा तलाठी याद्वारे, त्या स्वच्छ प्रतीतील कोणत्याही नोंदीमुळे नुकसान पोहचल्याचे किंवा उक्त गावातील जमिनीत हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना उक्त प्रत पाहण्यास फर्मावित आहे. विवादग्रस्त प्रकरणातील निर्णयामुळे ज्यांना हानी पोहचेल अशा सर्व व्यक्तींना, अशा निर्णयाबाबत त्यांच्या हरकती, उपरोक्त अधिकाऱ्याकडून सुनावणी करण्यासाठी व त्यांचा निर्णय करण्यासाठी माझ्याकडे ·················· पूर्वी देण्यास व हरकतींच्या वेळी त्यांच्यासमोर उपस्थित राहण्यास मी आणखी फर्मावित आहे. ते हजर न राहिल्यास, विवादग्रस्त प्रकरणावर त्यांच्या अनुपस्थितीत निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :

तलाठी ··············

ठिकाण :

---

## नमुना ७

[नियम ९ व २२ पहा]

**अधिकार संपादन करण्यासंबंधीच्या अहवालाच्या अभिस्विकृतीचा नमुना**

श्री. ··············, राहणार ·················· (गाव), तालुका ·············· यांच्याकडून ·············· तालुक्यातील ·················· गावाचा भू-मापन क्रमांक ·················· उप-विभाग क्रमांक ·············· यांच्या संबंधीचे अधिकार संपादन करण्यासाठी ·············· १९ रोजी तोंडी/लिखी प्रतिवृत्त त्यांच्या पुष्ठ्यर्थ असलेल्या पुढील कागदपत्रांसह मिळाले :—

दिनांक :

तलाठी ··············

ठिकाण :

---

## नमुना ८

[नियम १० पहा]

**फेरफारोची नोंदवही**

| नोंदीचा अनुक्रमांक (१) | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरूप (२) | परिणाम झालेले भू-मापन क्रमांक व उप-विभाग क्रमांक (३) | चाचणी अधिकाऱ्याची आद्याक्षरी किंवा शेरा (४) |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

## नमुना ९

[नियम १४ व २४ पहा]

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम १५० (२) अन्वये सूचना**

..............................

..............................

..............................

यांस,

ज्याअर्थी, ...................... तालुक्यातील .................. गावच्या फेरफाराच्या नोंदवहीत, खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जमिनीतील अधिकारांच्या संपादनासंबंधी नोंद करण्यात आली आहे :—

| फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक किंवा तारीख (१) | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरूप (२) | ज्यातील अधिकार संपादन करण्यात आले आहेत तो भू-मापन क्रमांक किंवा उप-विभाग क्रमांक (३) |
|---|---|---|
| | | |

*आणि ज्याअर्थी, तुमचा उक्त फेरफारात हितसंबंध आहे असे अधिकार अभिलेखावरून/फेरफाराच्या नोंदवहीवरून मला वाटते ;

*आणि ज्याअर्थी, उक्त फेरफारात तुमचा हितसंबंध आहे असे मानण्यास मला सयुक्तिक कारण आहे ;

त्याअर्थी, आता मी, ...................... (येथे नाव नमूद करावे), ज्या ठिकाणी उपरोक्त जमीन आहे त्या गावाचा तलाठी, याद्वारे, उक्त फेरफाराच्या नोंदीसंबंधी तुम्हांस सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, उक्त नोंदीसंबंधी तुमची हरकत, कोणतीही असल्यास, ती तोंडी किंवा लेखी माझ्याकडे पाठविण्यास तुम्हांस फर्मावीत आहे ;

उक्त पंधरा दिवसांच्या मुदतीत कोणतीही हरकत मला न मिळाल्यास, उक्त नोंदीस तुमची संमती आहे, असे गृहीत धरले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :

तलाठी ....................

दिनांक :

*लागू नसलेला मजकूर खोडून टाकावा.

## नमुना १०

[नियम १५ व २५ पहा]

### फेरफाराच्या नोंदीस घेतलेल्या हरकतीच्या अभिस्वीकृतीच्या नमुना

श्री. ............................................ राहणार ..................
(गाव), ............................................ यांच्याकडून ..................
तालुक्यातील ............................ गावच्या फेरफार नोंद क्र. ..............
संबंधी तोंडी/लेखी हरकत दिनांक ..................... १९ ........ रोजी मिळाली.

ठिकाण :

दिनांक : तलाठी ..............

---

## नमुना ११

[नियम १७(१) पहा]

तलाठी ............................ (गाव), तालुका .................... यास

महोदय,

मी तुम्हाला याद्वारे कळवीत आहे की, तुमच्या प्रभाराखाली असलेल्या .................... गावच्या फेरफार नोंदवहीत, प्रमाणन अधिकाऱ्याच्या यापूर्वीच्या भेटीपासून ज्या नोंदी करण्यात आल्या असतील त्या फेरफारांच्या नोंदी प्रमाणीत करण्याच्या प्रयोजनार्थ व अशा फेरफाराच्या नोंदीसंबंधीच्या विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत दाखल केलेल्या विवादांचा निर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ मी, .................... तालुक्यातील ........................ गावामध्ये ........................ येथे मुक्काम करणार आहे. प्रमाणित करावयाच्या फेरफाराच्या नोंदी व त्यांच्याविषयीचे विवाद यात ज्या व्यक्तींचा हितसंबंध असल्याचे ग्रामअभिलेखावरून दिसून येत असेल, अशा सर्व व्यक्तींना, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार, अभिलेख व नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ यास जोडलेल्या नमुना १२ मध्ये माझ्या मुक्कामाच्या तारखेपूर्वी निदान पंधरा दिवस अगोदर नोटीशी देण्याबद्दल, मी तुम्हाला फर्मावीत आहे.

ठिकाण : आपला,

दिनांक : प्रमाणन अधिकारी

## नमुना १२

[नियम १७(१) पहा]

### नोटीस

ज्याअर्थी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील अधिकारांच्या संपादनाबाबत ............ तालुक्यातील ................ गावाच्या फेरफाराच्या नोंदवहीत नोंद करण्यात आली आहे :—

| फेरफाराच्या नोंदीचा अनुक्रमांक | अधिकाराचे स्वरूप | परीणाम झालेला भू-मापन क्रमांक व उप-विभाग क्रमांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |

आणि ज्याअर्थी,

*(अ) उक्त नोंदी प्रमाणित करण्याच्या,

*(ब) विवादग्रस्त प्रकरणांच्या नोंदवहीत, उक्त नोंदीच्या संबंधात दाखल केलेल्या विवादाचा निर्णय करण्याच्या व उक्त नोंदी प्रमाणित करण्याच्या प्रयोजनार्थ, प्रमाणन अधिकारी ......... रोजी ...................... तालुक्यातील ................ ;गावात ........................... येथे मुक्काम करणार आहेत ;

आणि ज्याअर्थी, ग्राम अभिलेखावरून उक्त नोंदीत तुमचा हितसंबंध असल्याचे आढळून येते ;

त्याअर्थी, आता मी ...................... (येथे तलाठयाचे नाव समाविष्ट करावे) उपरोक्त जमीन जेथे आहे, त्या गावाचा प्रभारी तलाठी, उक्त नोंदीसंबंधीच्या तुमच्या हरकती प्रमाणन अधिकाऱ्यासमोर मांडण्याकरिता त्यांच्यासमोर ............ रोजी ............. येथे ........ ते ...................... मध्ये उपस्थित राहण्यासाठी तुम्हांस याद्वारे नोटीस देत आहे. तुम्ही उपस्थित न राहिल्यास, तुम्हाला त्या बाबतीत काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरण्यात येईल व नोंदीसंबंधीच्या विवादावर तुमच्या अनुपस्थितीत निर्णय दिला जाईल व नोंद प्रमाणित करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :

तलाठी ...........

दिनांक :

*लागू नसलेला मजकूर खोडून टाकावा.

## नमुना १३

(नियम २९ पहा)

### पिकांची नोंदवही

| वर्ष | हंगाम | पिकांखालील क्षेत्राचा तपशील | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मिश्र पिकांखालील क्षेत्र | | | | | |
| | | मिश्रणाचा संकेत क्रमांक | जलसिंचीत | जलसिंचीत नसलेली | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | |
| | | | | | पिकांचे नाव | पाटस्थळ | पाटस्थळ नसलेली |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | हे. आर | हे. आर | | हे. आर | हे. आर |

| निर्भेळ पिकांखालील क्षेत्र | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जलसिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पिकाचे नाव | जलसिंचीत | जलसिंचीत नसलेली | स्वरूप | क्षेत्र | | |
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| | हे. आर | हे. आर | | हे. आर. | | |

## नमुना १४

(नियम ३१ पहा)

### अधिकार अभिलेखानुसार जमीन कब्जात असल्याचे मानण्यात येणाऱ्या व्यक्तींव्यतिरिक्त जमीन कब्जात असलेल्या व्यक्तींची नोंदवही

गाव .......................... तालुका ..........................

| अनुक्रमांक | भू-मापन क्रमांक | भू-मापन क्रमांकाचा उप-विभाग | खाते क्रमांक | वर्ष | अधिकार अभिलखामध्ये नाव नोंदलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त जमीन कब्जात असलेल्या इतर व्यक्तींचे नाव | स्तंभ ६ मधील व्यक्तीकडे ज्या तारखेपासून जमीन कब्जात असेल ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |

# नमुना १५

(नियम ३२ पहा)

## कुळवहिवाटीची नोंदवही

गाव ......................................, तालुका ......................, जिल्हा ......................

वर्ष ......................

| अनुक्रमांक | मागील वर्षाच्या नोंदवहीचा अनुक्रमांक | कुळाचे नाव (मराठी वर्णानुक्रमाने) | जमीन मालकाचे नाव | भू-मापन क्रमांक व हिस्सा क्रमांक | क्षेत्र | आकारणी | खंड | फेरफाराच्या नोंदवहीतील नोंदीचा अनुक्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | | | | | | |

## नमुना १६

[नियम ३३ (१) पहा]

............. जिल्ह्याच्या, ............. तालुक्यातील, ........... गावातील जमिनीवर परिणाम होणाऱ्या नोंदणीकृत व्यवहाराचे नोंदणी अधिकाऱ्याचे ........ १९ या महिन्याचे मासिक विवरण.

| नोंदणीतील अनुक्रमांक | जेथे जमीन आहे त्या गावाचे नाव | कागदापत्राचे स्वरूप | व्यवहारामुळे परिणाम झालेला भू-मापन क्रमांक (किंवा भूखंड क्रमांक) आणि उप-विभाग क्रमांक | क्षेत्र | आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

| भुधारणा पद्धती | कागदपत्राच्या निष्पादकाचे नाव व निवासस्थान | ज्याच्या नावे कागदपत्र करून देण्यात आले त्याचे नाव व निवासस्थान | नोंदणीकृत व्यवहार न्यायालयाच्या आदेशाद्वारे करण्यात येत आहे किंवा अन्य प्रकारे | मोबदला | कागदपत्र करून दिल्याची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| | | | | | | |

ठिकाण : नोंदणी अधिकाऱ्याचे पदनाम.

दिनांक :

तहसिलदार ................; तालुका ..............., जिल्हा ...... .

तलाठी ..............., तालुका ............., जिल्हा ........., यांस.

हक्क नोंदणीपत्रकातील व नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकातील नोंदी बरोबर असल्याचे गृहीत धरणे.

१५७. हक्कनोंदणीपत्रकातील नोंद आणि नामांतरणाच्या नोंदणीपुस्तकातील प्रमाणित नोंद ही, तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत किंवा त्याबद्दल नवीन नोंद वैधरीत्या दाखल करण्यात येईपर्यंत, खरी असल्याचे गृहीत धरण्यात आले पाहिजे.

दाव्यास प्रतिबंध [1][ ].

१५८. या प्रकरणान्वये ठेवलेल्या कोणत्याही अभिलेखात किंवा नोंदणीपुस्तकात एखादी नोंद करविण्याबाबतच्या किंवा अशी कोणतीही नोंद काढून टाकण्याबाबतच्या किंवा तीत सुधारणा करविण्याबाबतच्या कोणत्याही हक्काच्या संबंधाने सरकारविरुद्ध किंवा सरकारच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरूद्ध कोणताही दावा करता येणार नाही.

अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळची हक्क नोंदणीपत्रके.

१५९. राज्यातील कोणत्याही क्षेत्रासाठी या प्रकरणाच्या उपबंधानुसार हक्कनोंदणीपत्रक तयार करण्यात येईपर्यंत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये त्या क्षेत्रात अंमलात असलेली विद्यमान हक्क नोंदणीपत्रके ही, (मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ १९५५ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक दोन याच्या कलम ११५ अन्वये तयार करण्यात आलेली हक्कनोंदणीपत्रके धरून) या प्रकरणांन्वये तयार करण्यात आलेली हक्कनोंदणीपत्रके आहेत असे समजण्यात आले पाहिजे.

**ब—भोगवटयात नसलेल्या जमिनीबाबतचे हक्क**

कलमे १६१ ते १६७ यांचे उपबंध लागू करणे.

१६०. हृया अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी राज्यातील ज्या क्षेत्रास कलमे १६१ ते १६७ यांच्या उपबंधाशी अनुरूप असलेले उपबंध लागू होते त्या क्षेत्रांना हृया कलमांचे उपबंध लागू होतील ; परंतु राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यात निर्दिष्ट करण्यात येतील अशा, राज्यातील इतर क्षेत्रांना उपरोक्त कलमे लागू करील.

निस्तार-पत्रक.

१६१. (१) या अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या[७२] उपबंधाशी सुसंगत असेल असे, एखाद्या गावातील भोगवटयात नसलेल्या सर्व जमिनीच्या आणि तिच्याशी अनुषंगिक असतील अशा सर्व बाबींच्या, आणि विशेषेकरून कलम १६२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या व्यवस्थेसंबंधीची योजना अंतर्भूत असलेले, एक निस्तारपत्रक जिल्हाधिकाऱ्याने तयार केले पाहिजे.

**टीप-७२ :** कलम १६६ खालील टीप-७३ पहा. (नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ पहा.)

(२) निस्तारपत्रकाचा मसुदा त्या गावामध्ये प्रसिद्ध केला पाहिजे आणि जिल्हाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या रीतीने गावातील रहिवाशांची मते अजमाविल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने त्यास अंतिम स्वरूप दिले पाहिजे.

(३) ग्रामपंचायतीने विनंती केल्यानंतर, किंवा एखाद्या गावात ग्रामपंचायत नसल्यास अशा गावातील प्रौढ रहिवाशांपैकी एक-चतुर्थांशाहून कमी नसेल इतक्या रहिवाशांनी अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही वेळी, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर निस्तारपत्रकातील कोणत्याही नोंदीत सुधारणा करता येईल.

निस्तार-पत्रकात तरतूद करावयाच्या बाबी.

१६२. निस्तारपत्रकात पुढील बाबींची तरतूद करण्यात येईल :—

(अ) गावातील गुरे चारण्यास ज्या अटींवर आणि शर्तींवर परवानगी देण्यात येईल त्या अटी व शर्ती ;

---

[1] "आणि प्रकरण १३ वगळणे" हा मजकूर महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम (१९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ३०) याच्या कलम ४ द्वारे वगळण्यात आला.

(ब) गावातील कोणाही रहिवाशास ज्या अटींवर आणि शर्तीवर आणि ज्या मर्यादेपर्यंत—

(एक) लाकूड, इमारती लाकूड, सरपण किंवा इतर कोणतेही जंगलातील उत्पन्न ;

(दोन) मुरुम, कंकर, वाळू, माती, चिकणमाती, दगड किंवा कोणतेही इतर दुय्यम खनिज, मिळेल त्या अटी, शर्ती व मर्यादा ;

(क) गुरे चारण्याबाबत आणि परिच्छेद (ब) मध्ये नमूद केलेल्या वस्तू हलविण्याबाबत सामान्यतः नियमन करणाऱ्या सूचना ;

(ड) या अधिनियमान्वये किंवा तदनुसार निस्तारपत्रकात नोंद करणे आवश्यक असेल अशी कोणतीही इतर बाब.

काही बाबींची निस्तारपत्रकात तरतूद करणे.

१६३. निस्तारपत्रक तयार करताना जिल्हाधिकाऱ्याने, शक्य असेल तेथवर, खालील गोष्टींची तरतूद केली पाहिजे :—

(अ) शेतीसाठी उपयोग केल्या जाणाऱ्या गुरांची मोफत चराई ;

(ब) गावातील रहिवाशांना आपल्या खरोखरच्या घरगुती उपयोगासाठी खालील वस्तू मोफत मिळणे :—

(एक) जंगलातील उत्पन्न ;

(दोन) दुय्यम खनिज ;

(क) खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वस्तू गावातील कारागिरांना त्यांच्या धंद्याकरिता घेऊन जाण्यासाठी द्यावयाच्या सवलती.

दुसऱ्या गावातील पडीत जमिनीवरील हक्क.

१६४. (१) कोणत्याही गावातील पडित जमीन अपुरी आहे आणि लोकहिताच्या दृष्टीने या कलमान्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्याचे मत असेल तेव्हा, त्यास योग्य वाटेल ती चौकशी केल्यानंतर असा आदेश देता येईल की, आदेशात निर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत त्या गावच्या रहिवाशांना शेजारच्या गावात यथास्थिति निस्ताराचा किंवा गुरे चारण्याचा हक्क राहील.

(२) पोट-कलम (१) अन्वये शेजारच्या गावात किंवा सरकारी जंगलात गुरे चारण्याचा हक्क असलेला एखाद्या गावातील रहिवाशांना असा हक्क बजावता यावा यासाठी जाण्यायेण्याच्या आपल्या हक्काची नोंद करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये केलेल्या अर्जाची चौकशी केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास असे आढळून आले की कोणत्याही दुसऱ्या गावात किंवा सरकारी जंगलात गुरे चारण्याचा आपला हक्क बजावणे शक्य व्हावे म्हणून अशा रहिवाशांना जाण्यायेण्याचा हक्क असणे वाजवीरीत्या आवश्यक आहे तेव्हा त्याने जाण्या-येण्याचा असा हक्क आहे असे जाहीर करणारा आदेश दिला पाहिजे आणि ज्या अटींवर तो हक्क बजावण्यात येईल त्या शर्ती नमूद केल्या पाहिजेत.

(४) त्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने भोगवट्यात नसलेल्या जमिनीमधून जाण्यायेण्याचा मार्ग ठरविला पाहिजे आणि तो मार्ग ज्या गावातून जातो त्या गावाच्या रहिवाशांना कमीत कमी गैरसोयीचा होईल अशा रीतीने तो मर्यादित केला पाहिज.

(५) जिल्हाधिकाऱ्यास, योग्य वाटल्यास, त्या मार्गाच्या हद्दींची आखणी करता येईल.

(६) या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेले आदेश हे निस्तारपत्रकात नोंदविण्यात आले पाहिजेत.

(७) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली गावे निरनिराळ्या जिल्ह्यात असतील तर पुढील उपबंध लागू होतील :—

(अ) निस्तारविषयक हक्क किंवा गुरे चारण्याचा हक्क दर्शविणारे आदेश हे ज्या गावासंबंधाने असा हक्क मागण्यात आला असेल ते गाव ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने दिले पाहिजेत.

(ब) जाण्यायेण्याच्या मार्गासंबंधीचे कोणतेही आदेश हे, ज्या क्षेत्रातून असा मार्ग जात असेल त्या क्षेत्रावर ज्याचा संबंधित क्षेत्राधिकार असेल अशा जिल्हाधिकाऱ्याने दिले पाहिजेत.

(क) खंड (अ) आणि (ब) अनुसार आदेश देणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याने संबंधित अशा इतर जिल्हाधिकाऱ्यांशी लेखी विचारविनिमय केला पाहिजे.

वाजिब-उल-अर्ज.

१६५. (१) हा अधिनियम अंमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकारने त्या संबंधात दिलेल्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशांनुसार, जी कोणतीही जमीन किंवा जे पाणी राज्य सरकारच्या किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकारी संस्थेच्या मालकीचे नसेल किंवा त्याच्याकडून ज्याचे नियंत्रण किंवा व्यवस्था केली जात नसेल अशा जमिनीतील किंवा पाण्यासंबंधातील—

(अ) पाटबंधाऱ्यांबाबतचा हक्क किंवा जाण्यायेण्याचा हक्क किंवा अन्य वहिवाटी.

(ब) मच्छीमारीबाबतचे हक्क.

यासंबंधीचे प्रत्येक गावातील रिवाज ठरविले पाहिजेत आणि त्यांची नोंद केली पाहिजे. आणि अशा प्रकारच्या अभिलेखास त्या गावचा वाजिब-उल-अर्ज म्हणून संबोधण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये तयार केलेला अभिलेख, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा रीतीने, त्याने प्रसिद्ध केला पाहिजे आणि असा अभिलेख हा, पोट-कलम (३) अन्वये दाखल केलेल्या दिवाणी दाव्यात दिवाणी न्यायालयाने दिलेल्या निर्णयास अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल.

(३) अशा अभिलेखात केलेल्या कोणत्याही नोंदीमुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही इसमास, पोट-कलम (२) अन्वये असा अभिलेख प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, ती नोंद रद्द करण्याकरिता किंवा ती सुधारण्याकरिता दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल.

(४) कोणत्याही हितसंबंधित इसमाच्या अर्जावरून किंवा जिल्हाधिकाऱ्यास आपण होऊन पुढीलपैकी कोणत्याही कारणांवरून वाजिब-उल-अर्जातील कोणतीही नोंद सुधारता येईल किंवा त्यात नवीन नोंद दाखल करता येईल :—

(अ) अशा नोंदीमध्ये हितसंबंध असलेल्या सर्व इसमांची ती नोंद सुधारण्यात यावी अशी इच्छा आहे ; किंवा

(ब) दिवाणी दाव्यातील हुकुमनाम्याद्वारे ती नोंद चुकीची आहे असे जाहीर करण्यात आले असेल ; किंवा

(क) ती नोंद दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्यावर किंवा आदेशावर किंवा एखाद्या महसूल अधिकाऱ्याच्या आदेशावर आधारलेली असली तरी ती, त्या हुकुमनाम्याप्रमाणे किंवा आदेशांप्रमाणे नाही ; किंवा

(ड) ती नोंद अशा हुकुमनाम्यावर किंवा आदेशावर आधारलेली असली तरी त्यानंतर अपील, फेरतपासणी किंवा पुनर्विलोकन करण्यात आल्यावर असा हुकुमनामा किंवा आदेश यात नंतर फेरबदल करण्यात आलेला आहे ; किंवा

(इ) अशा गावात चालू असलेला कोणताही रिवाज दिवाणी न्यायालयाने हुकुमनाम्याद्वारे निश्चित केलेला आहे.

मच्छिमारी, [1][ ] इत्यादींचे नियमन.

१६६. (१) राज्य सरकारला पुढील गोष्टींचे नियमन करण्यासाठी[73] नियम करता येतील :—

(अ) सरकारी तलावातील मच्छिमारी ;

(ब) राज्य सरकारच्या मालकीच्या जमिनीतून कोणतीही सामग्री हलविणे.

(२) परवाने देणे, अशा परवान्यांबाबत शर्ती ठरविणे आणि त्याकरिता फी लादणे व तदनुषंगिक अन्य गोष्टींची अशा नियमात तरतूद करता येईल.

**टीप-७३ :** निस्तारपत्रक व मच्छीमारीचे नियमन याबाबतचे नियम. (तसेच कलम १६१ च्या खालील टीप-७२ पहा) (नियम ९, १०, ११ पहा).

---

१. "शिकार" हा शब्द महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६८ (१९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ३०) याच्या कलम ५ अन्वये वगळण्यात आला.

## निस्तारपत्रक व मच्छीमारीचे नियमन याबाबतचे नियम

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमात, महाराष्ट्र जमीन महसूल (निस्तारपत्रक व मच्छीमारीचे नियमन) नियम, १९७३ असे म्हणता येईल. शासकीय अधिसूचना क्र. युएनएफ-२२६७-(बी) आर, दि. १९ जानेवारी १९७३.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये.—

(अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) "नमुना" म्हणजे या नियमास जोडलेला नमुना ;

(क) "कलम" म्हणजे त्या अधिनियमाचे कलम ;

(ड) "गाव" म्हणजे ज्याच्या संबंधात निस्तारपत्रक तयार करण्यात आले असेल किंवा तयार करण्यास येत असेल ते गाव.

३. **निस्तारपत्रकाचा नमुना.**—कलमे २२, १६१, १६२ आणि १६३ यांच्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकारी नमुना "अ" मध्ये निस्तारपत्रकाचा मसुदा तयार करील.

४. **निस्तारपत्रक तयार करणे.**—(१) निस्तारपत्रक तयार करताना, जिल्हाधिकारी शक्यतोवर पुढील गोष्टी ठरवील :—

(अ) गावातील गुरे ज्या अटींवर व शर्तींवर मोफत चरण्यास परवानगी देण्यास येईल त्या अटी व शर्ती ;

(ब) गावातील कोणत्याही रहिवांशास ज्या अटींवर व शर्तीवर आणि ज्या मर्यादेपर्यंत :—

(एक) लाकूड, इमारती लाकूड, सरपण किंवा जंगलातील इतर कोणतेही उत्पन्न ;

(दोन) मुरुम, कंकर, वाळू, माती, चिकणमाती, दगड किंवा इतर कोणतेही दुय्यम खनिज घेता येईल, त्या अटी व शर्ती आणि मर्यादा ;

(क) गावांतील कारागिरांना, त्यांच्या धंद्याच्या प्रयोजनासाठी, जंगलातील उत्पन्न व दुय्यम खनिज घेऊन जाण्यासाठी द्यावयाच्या सवलती.

(२) जिल्हाधिकाऱ्यास—

(एक) प्रकरणाच्या परिस्थितिनुसार किंवा संपूर्ण समाजाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असेल त्याप्रमाणे, कोणत्याही प्रयोजनासाठी, राखून ठेवलेल्या जमिनीच्या क्षेत्रात, योग्य रीतीने फेरफार करता येईल, त्याच्या प्रयोजनात बदल करता येईल, किंवा त्याचे अनुयोजन करता येईल.

(दोन) एकापेक्षा अधिक गावांच्या बाबतीत, चराई, इमारती लाकूड आणि सरपण यासाठी निस्तार परिमंडळे तयार करता येतील.

(तीन) शेजाराच्या गावचे एकमेकांच्या जमिनीवरील, परस्परांच्या अधिकारांची नोंद करता येईल ;

(चार) राज्य शासनाने आदेश दिलेल्या कोणत्याही सवलतीची तरतूद करता येईल.

५. **निस्तारपत्रक प्रसिद्ध करणे.**—निस्तारपत्रकाचा मसुदा तयार करण्यात आल्यानंतर तो गावातील रहिवांशांच्या हरकती किंवा सूचना मागविण्याच्या व ज्या तारखेला (ती प्रसिद्धिच्या तारखेपासून १५ दिवसापेक्षा कमी मुदतीची नसेल) व ज्या ठिकाणी (ते गावातील चावडी किंवा त्या वस्तीतील कोणतेही इतर योग्य प्रमुख स्थान असेल) अशा हरकतींचा किंवा सुचनांचा विचार करण्यात येईल ती तारीख व ते ठिकाण विनिर्दिष्ट करणाऱ्या नमुना 'ब' मधील नोटीशीसह प्रसिद्ध करण्यात येईल. ज्या गावासाठी निस्तार-पत्रक तयार करण्यात आले असेल अशा गावातच नव्हे तर, त्यामुळे परिणाम झालेल्या इतर गावातही ते प्रसिद्ध केले पाहिजे. या नियमाखालील प्रसिद्धी संबंधित तालुक्याच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि संबंधित गावाच्या चावडीत त्याच्या प्रती लावून, आणि अशा गावात दवंडी पिटवूनही करण्यात आली पाहिजे.

६ **हरकतीची चौकशी.**—नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या तारखेला आणि ठिकाणी, जिल्हाधिकारी हरकती किंवा सूचना कोणत्याही असल्यास, याची चौकशी करील व त्यावर आदेश देईल.

७. **हरकतीवरील निर्णय.**—हरकती किंवा सूचना, कोणत्याही असल्यास, विचारात घेऊन निकालात काढल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, हरकती व सूचना या वरील त्याच्या निर्णयाच्या दृष्टीने त्यास आवश्यक वाटतील असे फेरफार निस्तारपत्रकात करता येतील आणि त्यानुसार निस्तारपत्रकास अंतिम स्वरूप देता येईल.

८. **अंतिम निस्तारपत्रकाचे प्रख्यापन.**—गावात किंवा योग्य अशा ठिकाणी अंतिम निस्तारपत्रकाचे वाचन करण्यात येईल आणि त्याची एक प्रत, गावच्या चावडीत किंवा जिल्हाधिकारी ठरवील अशा गावातील इतर योग्य ठिकाणी ठेवण्यात येईल.

९. **मच्छीमारीला मनाई असेल असे सरकारी तलाव.**—पुढील ठिकाणी मच्छीमारीस परवानगी असणार नाही.—

(१) नायलॉन ग्रिलच्या जाळ्याच्या सहाय्याने लहान होडीतून मच्छीमारी करण्यात येते अशा जलाशयाव्यतिरिक्त, केवळ पिण्याच्या पाण्याकरिता वापरण्यात किंवा राखून ठेवण्यात आलेला कोणताही सरकारी तलाव किंवा घाट ;

(ब) पाण्याची खोली १२१·९२ सेंटिमीटर (किंवा ४ फूट) पेक्षा अधिक असेल आणि ज्या ठिकाणी नायलानग्रिलच्या जाळयाच्या सहाय्याने मच्छीमारी करण्यात येत असेल त्याव्यतिरिक्त, पाण्याच्या प्रत्यक्ष किंवा अपेक्षित दुर्भिक्षामुळे गुराढोरांना पाणी पाजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही सरकारी तलावातील मच्छीमारीस जिल्हाधिकारी मनाई करील तेव्हा, असा तलाव ;

(क) मत्स्यव्यवसाय संचालक लादील अशा अटींवर व शर्तींवर असेल त्या व्यतिरिक्त, मत्स्य-व्यवसाय विभागाकडून मत्स्यसंवर्धनाकरिता वापरण्यात येणारा कोणताही सरकारी तलाव ;

(ड) (अ), (ब) किंवा (क) यापैकी कोणत्याही प्रवर्गाखाली न येणाऱ्या कोणत्याही सरकारी तलावांतील केवळ स्नानासाठी वापरण्यात येणारा किंवा राखून ठेवण्यात आलेला कोणताही घाट किंवा जेथे धार्मिक कारणासाठी मासे पोसण्यात येतात असा संश्रय घाट ;

(इ) मत्स्यव्यवसाय संचालकाच्या परवानगीने असेल त्याव्यतिरिक्त, गोडया पाण्यातील माशांचा (कार्प) साठा करण्यात आलेला कोणताही तलाव ;

(फ) मत्स्यव्यवसाय संचालक लादील अशा अटींवर आणि शर्तींवर असेल त्या व्यतिरिक्त मत्स्य-व्यवसाय विभागाकडून किंवा एखाद्या सहकारी संस्थेकडून ज्यात मत्स्यसंवर्धनाचे काम करण्यात येत असेल असा कोणताही सरकारी तलाव.

१०. **सरकारी तलावामध्ये मच्छीमारीचे अधिकार देण्याची कार्यपद्धती.**—कलम १६६, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या परवान्याखाली कोणत्याही सरकारी तलावामधील मच्छीमारीचे व पकडलेले मासे नेण्याचे अधिकार देण्याचे ठरविण्यात येईल त्याबाबतीत, तहसीलदार, ग्रामपंचायत असेल तेव्हा, त्या ग्रामपंचायतीशी आणि अशी कोणतीही ग्रामपंचायत नसेल तेव्हा प्रौढ गावकऱ्यांशी व मत्स्यव्यवसाय विभागाच्या स्थानिक किंवा जिल्हा अधिकाऱ्यांशी विचारविनियम करील.

(२) एखाद्या तलावाच्या बाबतीत असे कोणतेही मच्छीमारीचे अधिकार द्यावेत किंवा कसे हे ठर-विताना पुढील गोष्टी लक्षात घेण्यात येतील :—

(अ) ग्रामपंचायतीचे किंवा यथास्थिति, गावकऱ्यांचे, मत्स्यव्यवसाय विभागाच्या स्थानिक किंवा जिल्हा अधिकाऱ्यांचे मत, आणि

(ब) जे पूर्वी असे अधिकार धारण करीत असतील अशा स्थानिक कोळयांचे हक्क.

परंतु, ज्या ठिकाणी तो तलाव असेल त्या गावातील किंवा क्षेत्रातील कोळयांच्या सहकारी संस्थांना आणि अशा कोणत्याही सहकारी संस्था नसतील किंवा गावातील कार्यशील सहकारी संस्थांपैकी कोणत्याही सहकारी संस्थांना मच्छीमारीचे अधिकार घेण्याची आस्था नसेल तर जिल्हाधिकाऱ्याच्या मते ज्यांनी, एकतर स्वतः गटागटांनी किंवा त्यांच्या सहकारी संस्थांमार्फत, तलावात योग्यरित्या मच्छीमारी करून किंवा अशा तलावात लहान माशांच्या उत्तम जातींचा संग्रह करून किंवा मत्स्यबीजांची वाढ करून आणि मोठे मासे पकडून, मत्स्यव्यवसायाच्या विकासाकडे पूर्वी लक्ष दिले असेल अशा कोळयांना प्राधान्य देण्यात येईल.

११. **मच्छीमारीच्या अधिकारास मंजुरी.**—कोणत्याही सरकारी तलावातील मच्छीमारीचा आणि पकडलेले मासे नेण्याचा अधिकार नमुना 'क' मधील परवान्याखाली देण्यात येईल आणि तो कोळयांच्या सहकारी संस्थांची किंवा नियम १० मध्ये निर्दिष्ट केलेल्या इतर व्यक्तींशी वाटाघाटी करून, पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीकरिता असेल आणि अशा संस्था किंवा व्यक्ति पुढे येत नसतील किंवा मंजुरीच्या अटी व शर्ती त्यांना मान्य नसतील तर, उपरोक्त अधिकाराची लिलाव करून विल्हेवाट लावण्यात येईल.

(२) मच्छीमारीचे अधिकार मंजूर करण्याबाबत द्यावयाची परवाना फी ही, तहसिलदाराच्या मते जे अस्वाभाविक असेल असे उत्पन्न वगळता, मागील तीन वर्षाच्या सरासरी उत्पन्नाच्या आधारावर निश्चित करण्यात येईल.

(३) गावकऱ्यांच्या विद्यमान निस्तार अधिकारांमध्ये ढवळाढवळ होणार नाही आणि कोणत्याही विवादाच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने दिलेला आदेश अंतिम असेल या शर्तीस अधीन राहून, (परवाना) मंजूर करण्यात येईल.

१२. **व्यावृत्ति.**—या नियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही जमिनीच्या संबंधात तयार केलेल्या आणि या नियमांच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी अमलात असलेल्या कोणत्याही निस्तार पत्रकास, किंवा सरकारी तलावातील मच्छीमारीसंबंधात आणि अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी देण्यास व अंमलात असलेली, कोणतीही अनुज्ञप्ती, परवाना किंवा पट्टा याच्या वैधतेवर परिणाम होत असल्याचे समजण्यात येणार नाही आणि असे कोणतेही निस्तारपत्रक या नियमांच्या उपबंधास अनुसरून नवीन निस्तारपत्रक तयार करण्यात येईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील व अशी कोणतीही अनुज्ञप्ती, परवाना किंवा पट्टा ज्या मुदतीसाठी तो देण्यात आला असेल ती मुदत समाप्त होईपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

नमुना 'अ'

(नियम ३ पहा)

**निस्तार-पत्रक**

**गावठाण**

| —— (१) | खसरा क्रमांक भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक (२) | क्षेत्र (हेक्टरमध्ये) (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. आधीच भोगवटयात असलेली जमीन .. | | | |
| २. निस्तारातील गावठाण म्हणून जाहीर केलेली जादा जमीन. | | | |
| ३. विशेष प्रयोजनांसाठी गावठाणात वेगळी राखून ठेवलेली जमीन. | | | |

टीप.—शीर्ष क्रमांक ३ समोरील शेरा या स्तंभात विशेष प्रयोजने लिहावीत.

नमुना 'अ'—चालू

दफनभूमी व दहन भूमी

| — (१) | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक (२) | क्षेत्र (हेक्टरमध्ये) (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. अस्तित्वात असलेली .. .. | | | |
| २. भावी गरजांसाठी राखून ठेवलेली .. | | | |
| ३. विशेष रूढी, कोणत्याही असल्यास, यासाठी असलेली. | | | |

गोठाण

| — (१) | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक (२) | क्षेत्र (हेक्टरमध्ये) (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. विद्यमान .. .. | | | |
| २. भावी गरजांसाठी राखून ठेवलेली .. | | | |

छावणीची जमीन

| — (१) | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक (२) | क्षेत्र (हेक्टरमध्ये) (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| १. विद्यमान .. .. .. | | | |
| २. भावी गरजांसाठी राखून ठेवलेली .. | | | |

नमुना 'अ'—चालू

मळणीची जमीन

| — | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. विद्यमान .. .. .. | | | |
| २. भावी गरजांसाठी राखून ठेवलेली .. | | | |

बाजार

| — | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. विद्यमान .. .. .. | | | |
| २. भावी गरजांसाठी राखून ठेवलेली .. | | | |

चामडी सोलण्यासाठी जमीन

| — | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. विद्यमान .. .. .. | | | |
| २. भावी गरजांसाठी राखून ठेवलेली .. | | | |

नमुना 'अ'—चालू

**सार्वजनिक प्रयोजनासाठी गावठाणाबाहेर राखून ठेवलेली जमीन**

| —— | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | |

**चराई**

| अनुक्रमांक | ज्या गावांची मिळून परिमंडले बनतील त्या गावांची नावे | साझा क्रमांक | महसूल निरीक्षक मंडळ | सर्वसाधारण चराईसाठी एकूण राखून ठेवलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक | क्षेत्र (हेक्टरमध्ये) | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

**अ. इमारती लाकूड आणि सरपण इत्यादीकरिता परिमंडळे**

कृषि प्रयोजनांकरिता ह्या परिमंडळातून निस्तार घेता येईल अशा परिमंडळातील गावांची यादी.

| अनुक्रमांक | परिमंडलातील गावे | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक | क्षेत्र हेक्टरमध्ये | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

नमुना 'अ'—चालू

**ब. जमिनीची धूप होऊ नये यासाठी गवत, झाडे इत्यादींच्या वाढीकरिता किंवा सरपण निर्वरण यांच्या राखीव साठ्याकरिता, राखून ठेवलेली जमीन**

| अनुक्रमांक (१) | परिमंडलातील गावे (२) | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक किंवा हिस्सा क्रमांक (३) | क्षेत्र हेक्टरमध्ये (४) | शेरा (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**व्यावसायिक निस्तार**

| अनुक्रमांक (१) | व्यावसायिक निस्ताराचा प्रकार (२) | ज्या गावामधून किंवा जंगलामधून निस्तार घेता येईल त्या गावाची किंवा जंगलांची नावे (३) | खासरा क्रमांक, भू-मापन क्रमांक, हिस्सा क्रमांक (४) | क्षेत्र हेक्टरमध्ये (५) | शेरा (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**सरकारी जमिनींवरील झाडांसंबंधीचे अधिकार**

नमुना 'अ'—चालू

**गावातील रस्ते, वाटा आणि त्यावरील अधिकार**

| अनु-क्रमांक | रस्ते व वाटा यांचा तपशील | रस्त्यांचा भू-मापन क्रमांक, हिस्सा क्रमांक खासरा क्रमांक किंवा ज्या खासऱ्यांमधून रस्ता जात असेल तो खासरा क्रमांक | रस्त्यांची रुंदी | रस्त्यांची व वाटांची दिशा | रस्त्यांच्या वापराशी कोणत्याही शर्ती संलग्न असल्यास, त्या शर्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | कायम (खडी घातलेले रस्ते) | | | | | |
| २ | कायम (कच्चे रस्ते) .. | | | | | |
| ३ | हंगामी रस्ते .. | | | | | |
| ४ | कायम पायवाटा .. | | | | | |
| ५. | हंगामी पायवाटा .. | | | | | |

टीप.—जर स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला खासरा क्रमांक भोगवटयात असेल तर तसे, शेरा या स्तंभात नमूद करावे.

**खत आणि केरकचरा**

...... खत ठेवण्यासाठी आणि खताचे खड्डे खणण्यासाठी राखून ठेवण्यात आलेली, गावठाणाबाहेरील जमीन दर्शविणारे विवरण.

| भू-मापन क्रमांक, खासरा क्रमांक व हिस्सा क्रमांक | क्षेत्र हेक्टरमध्ये | शेरा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |

नमुना 'अ'—चालू

जलसिंचन आणि पाण्याबाबतचे इतर अधिकार

| | | भू-मापन क्रमांक, हिस्सा क्रमांक, खासरा क्रमांक | क्षेत्र (हेक्टर मध्ये) | जलसिंचनाचा अधिकार अस्तित्वात असेल त्या बाबतीत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जलसिंचन खासरा क्रमांक | क्षेत्र (हेक्टर-मध्ये) | ज्या शर्तीअन्वये जलसिंचनास परवानगी देण्यात येईल त्या शर्ती | ज्या खासऱ्यातून जलमार्ग जात असतील ते, खासरा क्रमांक |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | (अ) तलाव<br>(ब) नद्या व नाले<br>(क) सार्वजनिक विहिरी.<br>(ड) (पाणीपुरवठ्याची) इतर साधने. | | | | | | |

| जलसिंचनाचा कोणताही अधिकार अस्तित्वात नसेल त्या बाबतीत | | निस्ताराचे कोणतेही असल्यास अधिकार | दुरुस्तीकरिता जबाबदार असलेल्या व्यक्तीचे नाव | तलाव इत्यादींच्या दुरुस्तीकरिता, कोणत्याही असल्यास, शर्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| जलसिंचनाकरिता पाणी कितपत येते किंवा कसे | आकारण्यात आलेली कोणतीही असल्यास, पाणीपट्टी | | | | |
| (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | रु. पैसे | | | | |

टीप.—(१) जलसिंचनासंबंधीच्या विद्यमान अधिकारांना किंवा इतर निस्तार अधिकारांना बाधा पोहोचेल अशाप्रकारे कोणत्याही तलावाच्या किंवा जलसिंचनाच्या इतर साधनांच्या पात्रातील कोणताही भाग लागवडीखाली आणता कामा नये.

(२) पाणीपुरवठ्याचा सान्निध असल्याने ज्या शेतांना पाणी मिळण्याचा हक्क त्या त्या क्रमानुसार जलसिंचनाचा अधिकार राहील.

(३) सर्व नद्या व नाले यामधील मच्छीमारीचा अधिकार राज्य शासनाकडे राहील. मच्छीमारीचा अधिकार मंजूर करण्याच्या कार्यपद्धतीचे, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे विनियमन होईल.

**(४) नद्यांची पात्रे पट्टयाने देण्याचा अधिकार, सामान्यपणे, राज्य शासनाकडे निहित असेल व त्याचे राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे विनियमन होईल.**

**या गावाच्या जमिनीवरील इतर गावांचे अधिकार**

**इतर गावांच्या जमिनीवरील या गावाचे अधिकार**

**इतर विशेषाधिकार**

## नमुना 'ब'

(नियम ५ पहा)

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, याचे कलम १६१ याच्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे........जिल्हयाच्या.........तालुक्याच्या .........साझ्याच्या,........गावाच्या संबंधात निस्तार-पत्रक तयार करण्याचे, खाली सही करणाऱ्यांनी योजिले आहे. त्याचा मसुदा सोबत जोडला आहे.

२. उक्त मसुद्यातील कोणत्याही नोंदीसंबंधी, कोणतीही हरकत दाखल करण्याची किंवा कोणतीही सूचना करण्याची ज्या व्यक्तींची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीने,...........पूर्वी (येथे या नोटीशीच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून पंधरा दिवसांहून अगोदरची नसेल अशी तारीख नमूद करावी), ती खाली सही करणाऱ्याकडे लेखी पाठवावी. हरकती किंवा सूचनांचा विचार......येथे......रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या दरम्यान करण्यात येईल.

माझ्या सही-शिक्क्यानिशी दिनांक..........१९ रोजी दिली.

जिल्हाधिकारी.

**ग्रामपंचायत/पंचायत समिती......यांच्या माहितीसाठी प्रत रवाना.**

जिल्हाधिकारी.

## नमुना 'क'

(नियम ११ पहा)

(येथे राजमुद्रा उमटवावी)

**परवान्याचा नमुना**

परवाना क्रमांक ..........

**सरकारी तलावात मच्छिमारी करण्याकरिता व पकडलेले मासे नेण्याकरिता परवाना**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) याच्या आणि तदन्वये करण्यात आलेल्या नियमांच्या उपबंधांस अधीन राहून आणि यात यापुढे विनिर्दिष्ट केलेल्या अटींस आणि शर्तींस अधीन राहून, .................... राहणार, .................. यास (ज्याचा यात यापुढे "परवानाधारक" असा निर्देश करण्यात आला आहे)/महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदलेली व .................... येथे नोंदणीकृत कार्यालय असलेली .................... संस्था हिस (जिचा यात यापुढे "परवानाधारक" असा निर्देश करण्यात आला आहे) .................... गाव .............. तालुका .............. जिल्हा येथील .......... भूमापन क्रमांक असलेला आणि ज्याचे यातील पहिल्या अनुसूचीत विशेषकरून वर्णन केले आहे अशा .................... नावाने ओळखला जाणारा (ज्याचा यात यापुढे "उक्त तलाव" असा निर्देश करण्यात आला आहे) सरकारी तलावात, मच्छिमारी करण्यासंबंधी आणि पकडलेले मासे घेऊन जाण्यासंबंधी दिनांक ........ १९ पासून सुरू होणाऱ्या पाच वर्षांच्या मुदतीकरिता (जिचा यात यापुढे "उक्त मुदत" असा निर्देश करण्यात आला आहे) याद्वारे, परवाना देण्यात येत आहे. वर निर्दिष्ट करण्यात आलेल्या अटी व शर्ती ह्या पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) परवानाधारक उक्त तलावातील उक्त अधिकाराबद्दल शासनाला .............. रुपये रक्कम .......... इतक्या (जिल्हाधिकाऱ्याने ठरवावयाच्या हप्त्यांची संख्या) समान हप्त्यांमध्ये देईल. त्याचा पहिला हप्ता आगाऊ भरण्यात येईल व नंतरचे हप्ते कोणत्याही वजातीशिवाय यापुढे उल्लेखिल्याप्रमाणे भरण्यात येतील :—

(एक) .............. महिन्याच्या .......... तारखेस किंवा तत्पूर्वी २ रा हप्ता.

(दोन) .............. महिन्याच्या .......... तारखेस किंवा तत्पूर्वी ३ रा हप्ता.

(तीन) .............. महिन्याच्या .......... तारखेस किंवा तत्पूर्वी ४ था हप्ता.

(चार) .............. महिन्याच्या .......... तारखेस किंवा तत्पूर्वी ५ वा हप्ता.

परवानाधारक, त्यावरील स्थानिक निधी उपकर म्हणून .......... रुपये रकमेचा आणि त्यावर वेळोवेळी आकारण्यात येईल अशा जिल्हा परिषद उपकराचाही यथोचितरीत्या भरणा करील :

परंतु, हप्ता देय होईल त्या तारखेस—उक्त रकमेची मागणी करण्यात आलेली असो वा नसो—फी देण्यात आली नसेल तर, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून जिल्हाधिकारी व्याजाची वसुली सोडून देईल, त्याखेरीज, परवानाधारक अशा थकबाकीवर, कसुरीच्या दिनांकापासून भरणा केल्याच्या तारखेपर्यंत, दरमहा/दरसाल दर शेकडा .......... दराने, व्याज देण्यास पात्र ठरेल. ही गोष्ट शासनाचे इतर अधिकार, उपाययोजना आणि शक्ती यांस बाध आणल्याशिवाय असेल.

(२) परवानाधारक, उक्त तलावात केवळ मच्छीमारी आणि मत्स्यसंवर्धनविषयकच कामे पार पाडील व त्यात इतर कोणतीही कामे करणार नाही.

(३) परवानाधारक खंड (१) मध्ये निर्दिष्ट केलेले उपकर, तसेच, उक्त तलावावर बसविण्यात येतील असे इतर कोणतेही उपकर, फी किंवा कर, जसजसे ते देय होतील त्याप्रमाणे, यथोचितरीत्या देईल.

(४) परवानाधारकास, उक्त तलावावर आणि तत्संबंधी इतर कोणताही अधिकार, हक्क किंवा हित-संबंध असणार नाही.

(५) परवानाधारक, जिल्हाधिकाऱ्याच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय, उक्त मुदतीत, याद्वारे, त्याला देण्यात आलेला अधिकार विकणार नाही, तो पोट-भाड्याने देणार नाही, अभिहस्तांकित करणार नाही, तो गहाण ठेवणार नाही किंवा अन्यथा तो हस्तांतरित करणार नाही किंवा उक्त तलावाचा कबजा संपूर्ण किंवा अंशतः सोडणार नाही.

(६) परवानाधारक, उक्त तलावातील माशांच्या यथोचित पोषणासाठी आणि आरोग्यासाठी आवश्यक असेल तेवढ्या प्रमाणाखेरीज 'उक्त मुदतीत' उक्त तलाव सर्व वेळी तृणमुक्त ठेवील.

(७) उक्त अधिकारांचा वापर करतांना, परवानाधारक ..................... ने किंवा जिल्हा परिषदेच्या / नगरपालिकेच्या ................ विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, वेळो-वेळी दिलेल्या सर्व निदेशांचे पालन करील.

(८) उक्त तलावातील पाण्याची पातळी खाली जाईल किंवा कोणत्याही कारणास्तव तो खाली करण्यात येईल तर, परवानाधारक ................ जिल्हापरिषदेस/नगरपालिकेस जबाबदार धरणार नाही आणि परिणामी झालेल्या कोणत्याही हानीच्या बाबतीत कोणत्याही भरपाईची मागणी करणार नाही.

(९) परवानाधारक गावकऱ्यांच्या निस्तार अधिकारांमध्ये, कोणत्याही रीतीने हस्तक्षेप करणार नाही किंवा त्यावर प्रतिकूल परिणाम होईल असे करणार नाही.

(१०) परवानाधारक .................... ग्रामपंचायतीची/............. जिल्हा परिषदेची/................ नगरपालिकेची/................ महानगरपालिकेची जंगले, तट, कुंपणे, झाडीझुडपे आणि इतर मालमत्ता यांस कोणतीही हानी पोचविणार नाही आणि उक्त तलावास कोणतीही हानी पोहोचल्यास, जिल्हाधिकारी ठरवील अशी भरपाई, ग्रामपंचायतीला/जिल्हा परिषदेला/नगरपालिकेला/महानगरपालिकेला देईल.

(११) परवान्याच्या मुदतीत, कोणत्याही वेळी, मच्छीमारी आणि मत्स्यसंवर्धनविषयक कामे यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी, उक्त तलाव वापरण्यात येईल, तर परवानाधारक, त्याचा परवाना त्वरित समाप्त होण्यास पात्र ठरेल आणि अशा बाबतीत त्यास कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

(१२) उपरोक्त अटी आणि शर्ती यांपकी कोणत्याही अटीचे आणि शर्तीचे किंवा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) याच्या किंवा त्याखालील कोणत्याही नियमांच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांचे पालन करण्यात कसूर झाल्यास, हा परवाना, जिल्हाधिकाऱ्याकडून रद्द केला जाण्यास पात्र ठरेल आणि त्यानंतर, परवानाधारक उक्त तलावात मच्छीमारी आणि मत्स्य-संवर्धनविषयक कामे करण्याचे बंद करील.

(१३) परवानाधारक, उक्त अवधी संपल्यावर किंवा समाप्त करण्यात आल्यावर लगेच आज तारखेस उक्त तलाव ज्या स्थितीत आहे त्याच स्थितीत, तलावाचा कबजा जिल्हाधिकाऱ्याला शांतपणे देईल.

(१४) यांद्वारे, राखून ठेवलेल्या खंडाच्या कोणत्याही भागाची थकबाकी राहिली तर आणि त्यावेळी किंवा ह्या अधिलेखान्वये शासनास कोणतीही रक्कम देय असेल तर, उक्त रक्कम त्यावेळी अंमलात असलेल्या विधी अन्वये, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, परवानाधारकाकडून वसूल करता येईल.

(१५) शासन आणि परवानाधारक या दोहोंमध्ये, ह्या परवान्याच्या किंवा यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही उपबंधासंबंधात किंवा पक्षकारांपकी कोणाचेही अधिकार आणि दायित्वे यांच्या बाबतीत किंवा त्यासंबंधात, कोणताही प्रश्न किंवा वाद उद्भवेल तर, जिल्हाधिकाऱ्याचा त्या संबंधातील निर्णय, अंतिम असेल आणि तो परवानाधारकास बंधनकारक असेल.

हा परवाना, महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्याकरिता आणि त्यांच्यावतीने आणि ................ जिल्ह्याचा जिल्हाधिकारी यांच्या सही-शिक्क्यानिशी दिनांक ............ एकोणिसशे रोजी करून देण्यात येत आहे.

अनुसूची

(येथे तलावाचे वर्णन नमूद करावे.)

..........चा जिल्हाधिकारी.

जिल्हाधिकाऱ्याचा
शिक्का

**उपबंधाच्या उल्लंघनाबद्दल शिक्षा.**

१६७. (१) या अधिनियमात अन्यता जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, जो कोणताही, इसम कलमे १६१ ते १६६ यांच्या किंवा कलम १६६ अन्वये केलेल्या नियमाच्या उपबंधाचे उल्लंघन करून कोणतेही कृत्य करील किंवा कोणत्याही नियमाचे किंवा वाजिब-उल-अर्जामध्ये दाखल केलेल्या रिवाजांचे उल्लंघन करील किंवा त्याचे पालन करण्यात कसूर करील किंवा निस्तारपत्रकामध्ये दाखल केलेल्या कोणत्याही नोंदीच्या भंग करील असा इसम, त्यास आपली बाजू मांडण्याची संधि दिल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाची शिक्षा होण्यास पात्र होईल ; आणि जे उत्पन्न त्या इसमाने उपयोगात आणले असेल असे कोणतेही उत्पन्न किंवा राज्य सरकारच्या मालकीच्या जमिनीतून त्याने नेले असेल असे कोणतेही इतर उत्पन्न सरकारजमा करण्यासाठी जिल्हाधिकारी आणखी आदेश देईल.

(२) जिल्हाधिकाऱ्याने या कलमान्वये शिक्षा लादणारा आदेश दिला असेल तेव्हा, त्यास असा निदेश देता येईल की, तो दंड किंवा त्याचा कोणताही भाग, अशा उल्लंघनामुळे, असा भंग केल्यामुळे किंवा पालन न केल्यामुळे लोकांना पोचणारी हानी किंवा इजा यांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजनांचा खर्च भागविण्यासाठी वापरण्यात यावा.

## प्रकरण ११

## जमीन महसुलाची आणि इतर महसुलविषयक मागण्यांची वसुली

जमीन-महसुलाची जबाबदारी.

१६८. (१) (अ) दुमाला नसणाऱ्या जमिनीच्या बाबतीत खातेदार किंवा राज्य सरकारचा पट्टेदार,

(ब) दुमाला जमिनीच्या बाबतीत, वरिष्ठ धारक, आणि

(क) कुळाच्या भोगवटघातील जमिनीच्या बाबतीत, जर संबंधित कुळवहिवाट विधीअन्वये त्याबाबत जमीन महसूल देण्यास असे कुळ जबाबदार असेल तर ते कुळ,

जमीन महसुलाची सर्व थकबाकी धरून, त्या जमिनीच्या बाबतीत देय असलेला जमीन महसूल देण्यासाठी राज्य सरकारास प्रथमत: जबाबदार असेल. या कलमान्वये प्रथमत: जबाबदार असणारे समाईक खातेदार आणि समाईक धारक हे संयुक्तपणे आणि पृथकपणे जबाबदार असतील.

(२) ह्या कलमान्वये प्रथमत: जबाबदार असलेल्या कोणत्याही इसमाने कसूर केल्याचे बाबतीत वर निर्दिष्ट केलेली थकबाकी धरून, जमीन महसूल हा, ती जमीन ताब्यात असणाऱ्या कोणत्याही इसमाकडून वसूल केला पाहिजे :

परंतु, असा इसम कुळ असेल तर त्याच्याकडून वसूल करावयाची रक्कम ही, ज्या वर्षात वसुली केली जात असेल त्या वर्षाच्या मागणीपेक्षा अधिक असता कामा नये.

तसेच जेव्हा या कलमान्वये जमीन महसूल देण्यास जो इसम प्रथमत: जबाबदार नसेल अशा कोणत्याही इसमाकडून जमीन महसूल वसूल करण्यात येईल तेव्हा जो इसम प्रथमत: जबाबदार असेल अशा इसमास त्याने योग्य रीतीने दिलेली कोणतीही रक्कम अशा इसमाच्या खाती जमेस धरली पाहिजे, आणि जो इसम प्रथमत: जबाबदार असेल अशा इसमाशी त्याचा जो हिशोब असेल त्यामध्ये त्याचेकडून वसुल करण्यात आलेली रक्कम ही जमेच्या बाजूस धरण्याचा त्यास हक्क असेल.

राज्य सरकारला येणे असलेल्या रकमांना इतर सर्व मागण्यावर प्राधान्य देणे.

१६९. (१) जमिनीच्या संबंधात देय झालेल्या जमीन महसुलाची थकबाकी ही, त्या जमिनीवरील आणि तिच्या प्रत्येक भागावरील प्रमुख भार राहील आणि कोणत्याही जमिनीच्या किंवा तिच्या धारकाच्या कोणत्याही इतर कर्जावर, मागणीवर किंवा कोणत्याही मागणी हक्कावर—मग ते गहाण, न्यायालयीन हुकुमनामा, अंमलबजावणी किंवा जप्ती यांच्या संबंधातील असो वा अन्यथा इतर कोणत्याही प्रकारचे असोत—त्यास प्राधान्य मिळेल.

(२) जमीन महसुलाची थकबाकी व्यतिरिक्त असलेल्या परंतु या प्रकरणाच्या उपबंधान्वये महसुली मागणी म्हणून वसूल करता येईल, अशा कोणत्याही पैशासंबंधीच्या राज्य सरकारच्या मागणीस, कोणत्याही जमिनीच्या किंवा तिच्या धारकाचा असंरक्षित मागण्यांवर अग्रता देण्यात येईल.

ज्या तारखास जमीन महसूल देणे होतो आणि द्यावयास पाहिजे त्या तारखा.

१७०. (१) महसुली वर्षासाठी देण्याजोगा असेल असा जमीन महसूल हा, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी देणे होईल ; परंतु कलम १७१ च्या उपबंधान्वये एखाद्या गावाची किंवा गावाच्या भागाची तात्पुरती जप्ती व व्यवस्था करणे आवश्यक वाटत असेल ते खेरीज करून, पोट-कलम (२) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे ज्या तारखा ठरविण्यात येतील अशा तारखानाच पैसे भरणे आवश्यक असेल.

(२) जमीन महसूल हप्त्यांनी आणि महसुली वर्षाच्या पहिल्या दिवसानंतरच्या तारखांना (ज्यांचा यापुढे विहित केलेल्या "तारखा" असा उल्लेख करण्यात आला आहे) देण्याबाबत तरतूद करणारे नियम राज्य सरकारला करता येतील, आणि अशा नियमांद्वारे, असे हप्ते ज्या इसमास आणि ज्या ठिकाणी दिले पाहिजेत तो इसम व ते ठिकाण विहित करता येईल.

(३) जमीन महसूल, पोट-कलम (२) अन्वये विहित केलेल्या इसमाकडे रोख पैशाच्या स्वरुपात किंवा पैसे पाठविण्याच्या इसमाच्या खर्चाने मनिऑर्डर द्वारे भरता येईल.

(४) महसुली वर्षाचा पहिला दिवस आणि जमीन महसूल देण्यासाठी अशा नियमान्वये ठरविण्यात आलेली कोणतीही तारीख यामधील कोणतीही मुदत ही, सवलतीची मुदत असल्याचे समजले पाहिजे आणि त्यामुळे पोट-कलम (१) च्या उपबंधास बाध येणार नाही.

**टीप ७४.**—कलम १९३ खालील टीप ८५ पहा. (नियम ३ व ४ पहा).

१७१. (१) संपूर्ण गावाच्या किंवा गावाच्या भागाचा समावेश होणाऱ्या कोणत्याही धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीतील जमीन महसूल ज्यावेळी देणे होईल त्यावेळी तो, हिस्सेदारात वाद असल्यामुळे किंवा इतर कारणामुळे देण्यात येणार नाही असे जिल्हाधिकाऱ्यास सकारण वाटत असेल तर त्यास असे गाव किंवा गावाचा भाग यावर जप्ती आणता येईल आणि तो आपल्या स्वतःच्या व्यवस्थेखाली किंवा उक्त कारणासाठी तो ज्याला नियुक्त करीत अशा कोणत्याही अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली घेता येईल.

तात्पुरती जप्ती आणि गाव किंवा गावाचा भाग यांची व्यवस्था.

(२) कलम १८६ चे उपबंध अशा रीतीने जप्त केलेल्या कोणत्याही गावास किंवा गावाच्या भागास लागू असतील, आणि जो जमीन महसूल देणे असेल तो व जर कलम १८७ च्या उपबंधान्वये महसूली मोजणीची सुरवात केली असेल तर महसूली मोजणी सुरु केल्यामुळे झालेला खर्च यांचा समावेश करून अशी जप्ती आणि व्यवस्थापन याबद्दलचा खर्च वजा जाता जप्त केलेल्या जमिनीचा सर्व शिल्लक राहिलेला फायदा, तो मिळण्याचा ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना हक्क असेल तिच्या किंवा त्यांच्या फायद्यासाठी अनामत ठेवला पाहिजे, किंवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे उक्त व्यक्तीस किंवा व्यक्तींना वेळोवेळी दिला पाहिजे.

१७२. एखाद्या गावाची किंवा गावाच्या भागाची कलम १७१ अन्वये केलेली तात्पुरती जप्ती व व्यवस्था, महसूल देण्यासाठी जी व्यक्ती प्रथमतः जबाबदार असेल अशी व्यक्ती किंवा प्रथमतः जबाबदार असणाऱ्या इसमाने कसूर केल्यास असा महसूल देण्यासाठी जी व्यक्ती जबाबदार राहील अशी कोणतीही व्यक्ती, अशी जप्ती व व्यवस्था सोडून देण्यात येईपर्यंत जिल्हाधिकाऱ्याने वैधरीत्या केलेला खर्च कोणताही असल्यास, देईल तर आणि यानंतर समाविष्ट केलेल्या उपबंधान्वये ज्यावेळी महसूल देणे होईल त्यावेळी किंवा तो ज्या हप्त्यानी द्यावयाचा असेल त्या हप्त्यांनी देण्याबद्दल जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल असे तारण देईल तर सोडून देण्यात आल्या पाहिजेत.

तारण देण्यात आल्यानंतर गावाची किंवा गावाच्या भागाची तात्पुरती जमिनी जप्ती किंवा व्यवस्था सोडून देणे (काढून घेणे).

१७३. देय झालेला आणि विहित केलेल्या तारखास किंवा त्यापूर्वी न दिलेला कोणताही जमीन महसूल, त्या तारखेपासून थकबाकी होईल आणि कलम १६८ च्या उपबंधान्वये किंवा अन्यथा तो देण्यास जबाबदार असलेल्या व्यक्ती कसूर करणाऱ्या व्यक्ती ठरतील.

'थकबाकी', 'कसूर करणारी व्यक्ती'.

१७४. विहित केलेल्या तारखेनंतर एक महिन्याच्या आत, जमीन महसुलाचा कोणता हप्ता किंवा त्याचा कोणताही भाग भरलेला नसेल तर, जिल्हाधिकाऱ्यास हेतूपुरस्सर कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत, अशा रीतीने न भरलेल्या रकमेच्या पचवीस टक्क्याहून अधिक नसेल इतका दंड आकारता येईल :

परंतु, ज्या मुदतीत भरणा तहकुब केला होता अशा मुदतीत (ज्याचा भरणा राज्य शासनाच्या आदेशाद्वारे तहकुब केला होता) असा कोणताही हप्ता न भरल्याबद्दल अशा प्रकारची कोणतीही शास्ति लादता कामा नये.

जमीन महसूल भरण्यात कसूर केल्याबद्दल शास्ति.

१७५. (१) जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसिलदाराने प्रमाणित केलेले हिशेबाचे विवरणपत्र हे, या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी येणे असलेल्या जमीन महसुलाच्या रकमेची थकबाकी असल्याबद्दलच्या आणि जिने कसूर केले असेल अशा व्यक्तीसंबंधीचा निर्णायक पुरावा असेल.

(२) असे प्रमाणित विवरणपत्र मिळाल्यानंतर, एखाद्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसिलदाराने इतर कोणत्याही जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याच्या मागण्या जणू त्या मागण्या त्याच्या स्वतःच्या जिल्हयामध्ये उत्पन्न झाल्या असल्याप्रमाणे, या प्रकरणाच्या उपबंधांन्वये वसूल करण्यासाठी कार्यवाही करणे हे विधिसंमत असेल.

(३) मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या अशाच हिशोबाच्या विवरणपत्रावरून, जणू ते एखाद्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने या अधिनियमान्वये प्रमाणित केले असल्याप्रमाणे, कार्यवाही करता येईल.

प्रमाणित केलेले हिशेब हे थकबाकी विषयाचा पुरावा असतील.

१७६. जमीन महसूलाची थकबाकी पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कार्यपद्धतीनुसार वसूल करता येईल :—

थकबाकीच्या वसुलीची कार्यपद्धती.

(अ) कलम १७८ अन्वये कसूर करणाऱ्या व्यक्तीवर मागणीची लेखी नोटीस बजावून ;

(ब) ज्या भोगवटयाच्या किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीच्या संबंधाने थकबाकी येणे असेल तो भोगवटा किंवा ती धारण केलेली दुमाला जमीन, याचे कलम १७९ अन्वये अधिहरण करून ;

(क) कसूर करणाऱ्या व्यक्तीची जंगम मालमत्ता कलम १८० अन्वये अटकावून आणि विक्री करून ;

(ड) कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या स्थावर मालमत्तेची, कलम १८१ अन्वये जप्ती आणि विक्री करून ;

(इ) कसूर करणाऱ्या इसमाच्या स्थावर मालमत्तेची, कलम १८२ अन्वये जप्ती करून ;

(फ) कसूर करणाऱ्या व्यक्तीस, कलमे १८३ आणि १८४ अन्वये अटक करून व त्यास कैदेत ठेवून ;

(ग) धारण केलेल्या दुमाला जमिनी, सगळी गावे किंवा गावांचे भाग मिळून झालेल्या असतील त्या बाबतीत, कलमे १८५ ते १९० (दोन्ही धरून) अन्वये उक्त गावे किंवा गावांचे भाग जप्त करून :

परंतु, खंड (क), (ड) आणि (इ) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीनुसार पुढील गोष्टींची जप्ती आणि विक्री[75] करता येणार नाही—

(एक) कसूर करणाऱ्या इसमाचे, त्याच्या पत्नीचे व मुलांचे जरूरीचे वापरण्याचे कपडे-लत्ते, स्वयंपाकाची भांडी आणि आंथरूण-पांघरूण आणि खाटा आणि धार्मिक रूढीप्रमाणे कोणत्याही स्त्रीने अंगावरून काढू नयेत असे तिचे वैयक्तिक दागिने ;

(दोन) कारागिरांची हत्यारे आणि कसूर करणारी व्यक्ती जर शेतकरी असेल तर यांत्रिक शक्तीने चालणाऱ्या अवजाराव्यतिरिक्त, शेती करण्याची त्याची अवजारे आणि जिल्हाधिकाऱ्याच्या मते त्याला शेतकरी म्हणून आपला चरितार्थ चालावा यासाठी त्यास आवश्यक असतील अशी गुरे व बी-बियाणे आणि पुढील हंगामापर्यंत जमिनीची यथोचित मशागत करण्यासाठी आणि धारकाच्या व त्याच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी तरतूद करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याच्या मते शेतीच्या उत्पन्नाचा जो भाग आवश्यक असेल असा भाग ;

(तीन) फक्त धार्मिक देणग्यांच्या उपयोगासाठी राखून ठेवलेल्या वस्तू ;

(चार) शेतकऱ्यांच्या मालकीची आणि त्यांच्या भोगवटयात असलेली घरे आणि इतर इमारती (त्यांचे सामान व त्यांची जागा आणि त्यांना लागून असलेली व त्यांच्या उपभोगासाठी आवश्यक असलेली जमीन, यासुद्धा).

**टीप ७५.**—कलम ९ खालील टीप ७-ए पहा.

मागील वर्षाच्या महसुली मागण्या कशा वसूल करावयाच्या.

१७७. मागील वर्षाच्या, तसेच चालू वर्षाच्या, थकबाकीच्या वसुलीसाठी उक्त कार्यपद्धती अंमलात आणता येईल.

मागणीची नोटीस केव्हा दिली जाईल.

१७८. (१) मागणीची नोटीस ही, ज्या तारखेस थकबाकी देणे होईल त्या तारखेच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतरच्या दिवशी देता येईल.

(२) आयुक्तास अशा नोटीसा देण्यासाठी वेळोवेळी आदेश देता येतील, आणि त्याने राज्य सरकारच्या मंजूरीने, कसूर करणाऱ्या इसमाकडून महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाचा खर्च[76] ठरविला पाहिजे, आणि अशा नोटीसा कोणत्या अधिकाऱ्यांनी दिल्या पाहिजेत ह्याबाबत निदेश दिला पाहिजे.

**टीप ७६.**—शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-२३६७/११२५१२-आर, दिनांक ४ जानेवारी १९६८ अन्वये शासनाने, कलम १७८, पोट-कलम (२) अनुसार जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोग्या मागण्यांच्या नोटीसा काढण्याबाबतच्या खर्चाचे दर मंजूर केले आहेत :—

| | रुपये |
|---|---|
| रुपये २५ पेक्षा अधिक नसलेली थकबाकी .. .. | ०·५० |
| रुपये २५ पेक्षा अधिक व रुपये १०० पेक्षा अधिक नसेल एवढी थकबाकी .. | १·०० |
| रुपये १०० पेक्षा अधिक असलेली थकबाकी .. .. | १·५० |

(परिशिष्ट ३० पहा).

टीप ७६-ए.—कलम ९ खालील टीप ७-ए पहा.

१७९. जिल्हाधिकाऱ्यास, ज्या भोगाधिकाराबाबत किंवा दुमाला जमिनीबाबत जमीन महसुलाची थकबाकी येणे असेल असे भोगाधिकार किंवा धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा केल्याबद्दल जाहीर करता येईल आणि या बाबतीत केलेल्या नियमांस[७७] अधीन राहून, त्या भोगाधिकारांची किंवा जमिनीची कलम ७२ किंवा ७३ यांच्या उपबंधांन्वये विक्री करता येईल किंवा अन्यथा त्यांची विल्हेवाट लावता येईल आणि आलेले उत्पन्न, कोणतेही असल्यास, कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या खातीजमा करता येईल : ज्या भोगाधिकाराबाबत किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीबाबत थकबाकी येणे असेल ते भोगाधिकार किंवा धारण केलेली दुमाला जमीन जप्त करता येईल.

परंतु, जिल्हाधिकाऱ्याने असे कोणतेही भोगाधिकार किंवा धारण केलेली दुमाला जमीन—

(अ) सरकारजमा करण्यापूर्वी, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसंबंधी कलमे १९२ व १९३ यांन्वये तरतूद केलेल्या रीतीने त्याने[७८] उद्घोषणा केल्याशिवाय आणि घोषणेच्या इराद्याच्या लेखी नोटीस काढल्याशिवाय, आणि

(ब) कलम १९३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे उक्त नोटीसांपैकी कोणतीही नोटीस उशिरात उशिरा ज्या तारखेला चिकटविण्यात आली असेल त्या तारखेपासून निदान पंधरा दिवसांची मुदत संपेपर्यंत,

ते भोगाधिकार व धारण केलेली दुमाला जमीन सरकारजमा केल्याचे जाहीर करता कामा नये.

टीप ७७.—कलम ५१ खालील टीप ३८ पहा. (नियम ४७ पहा).

टीप ७८.—कलम १९३ खालील टीप ८५ पहा. (नियम ६ पहा).

१८०. (१) जिल्हाधिकाऱ्यास, कसूर करणाऱ्या व्यक्तीची जंगम मालमत्ता अटकाविता येईल व तिची विक्री[७९] करविता येईल. कसूर करणाऱ्या व्यक्तींची जंगम मालमत्ता अटकावणे व तिची विक्री.

(२) मालमत्ता राज्य सरकारच्या आदेशान्वये, जिल्हाधिकारी वेळोवेळी निदेश देईल अशा अधिकाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यांच्या वर्गाने अटकाविली पाहिजे.

टीप ७९.—कलम ९ खालील टीप ७-ए पहा.

टीप ८०.—शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ-२३६८/११६६२-आर, दिनांक ३१ जुलै १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनाने असा निदेश दिला आहे की, जिल्हाधिकारी याबाबतीत ज्यास निदेश देईल असा कोणताही तहसिलदार, नायब तहसिलदार, अव्वल कारकून, मंडळ निरीक्षक, तलाठी किंवा कोणताही अधिकारी यास कसूर करणाऱ्याची जंगम मालमत्ता अटकावून ठेवता येईल. (परिशिष्ट ३१ पहा.)

१८१. जिल्हाधिकाऱ्यास, ज्या जमिनीबाबत थकबाकी येणे असेल अशा जमिनीखेरीज इतर कोणत्याही स्थावर मालमत्तेतील, कसूर करणाऱ्या व्यक्तींचा हक्क, मालकी हक्क व हितसंबंध यांची जप्ती व विक्रीसुद्धा करविता येईल. कसूर करणाऱ्या व्यक्तींच्या स्थावर मालमत्तेची विक्री.

कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता जप्त करण्याचा आणि ती व्यवस्थेखाली घेण्याचा अधिकार.

१८२. (१) थकबाकीच्या वसुलीसंबंधीच्या पूर्ववर्ती उपबंधांमध्ये निर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतींपैकी कोणत्याही कार्यपद्धती स्वीकारणे इष्ट आहे असे जिल्हाधिकाऱ्यास वाटत असेल तर, त्यास, कसूर करणाऱ्या व्यक्तीची स्थावर मालमत्ता जप्त करविण्याचा आणि ती त्याच्या स्वतःच्या किंवा त्याबाबत तो ज्या कोणत्याही अभिकर्त्यास नियुक्त करील अशा अभिकर्त्याच्या व्यवस्थेखाली आणविण्याचा अधिकार आहे.

(२) जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा रीतीने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यास, जप्त केलेल्या जमिनींची व्यवस्था पाहण्याचा, आणि जिल्हाधिकारी कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे त्या जमिनीची व्यवस्था परत देईपर्यंत त्या जमिनींपासून मिळणारे सर्व खंड किंवा नफे स्वीकारण्याचा हक्क असेल.

(३) जप्त केलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून चालू महसुलाची रक्कम धरून अशा जप्तीचा आणि व्यवस्थेचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या सर्व नफ्यांचा विनियोग अशा जमिनींच्या संबंधात येणे असलेल्या थकबाकीची रक्कम फेडण्याकडे केला पाहिजे.

(४) अशा रीतीने जप्त करण्यात आलेली जमीन जप्तीतून मुक्त करण्यासाठी व कसूर करणाऱ्या व्यक्तीकडे परत करण्यासाठी अशा जप्तीच्या तारखेपासून बारा वर्षांच्या आत कोणत्याही वेळी, कसूर करणाऱ्या व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यानंतर,—

(अ) ज्यावेळी असा अर्ज केला असेल त्या वेळी थकबाकीची फेड करण्यात आली आहे असे आढळून आले असेल ; किंवा

(ब) तिच्याकडून अद्याप येणे असलेली शिल्लक, कोणतीही असल्यास, कसूर करणारी व्यक्ती ती देण्यास तयार असेल आणि जिल्हाधिकारी त्या बाबतीत निर्दिष्ट करील अशा मुदतीत ती रक्कम ती देईल तर,

अशा रीतीने जप्त केलेली जमीन जप्तीतून मुक्त केली पाहिजे व ती कसूर करणाऱ्या व्यक्तीस परत देण्यात आली पाहिजे.

(५) अशी जमीन परत मिळण्यासाठी बारा वर्षांच्या आत अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आल्यानंतर, कसूर करणाऱ्या व्यक्तीने तिच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी, कोणतीही असल्यास, याबाबतीत जिल्हाधिकारी निर्दिष्ट करील अशा मुदतीत देण्यात कसूर केली असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास, अशी जमीन जप्त करण्यापूर्वी निर्माण केलेल्या भारांना बाध न होता, कसूर करणाऱ्या व्यक्तीचे त्या जमिनीतील अधिकार हक्क आणि हितसंबंध विकता येतील ; आणि विक्रीच्या उत्पन्नातून राज्य सरकारास येणे असलेली व विक्रीबाबतच्या खर्चाची रक्कम वजा करून ते कसूर करणाऱ्या व्यक्तीच्या हवाली करता येईल.

कसूर करणाऱ्या व्यक्तीस अटक करणे आणि स्थानबद्ध करणे.

१८३. (१) कोणतीही थकबाकी देय झाल्यानंतर कोणत्याही वेळी (ज्याच्याकडून त्याच्या भोगवटयाच्या संबंधात अशी थकबाकी येणे असेल असा शेतकरी नसेल अशा), कसूर करणाऱ्या इसमास अटक करता येईल किंवा त्यास जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा तहसिलदाराच्या कार्यालयातील अभिरक्षेत दहा दिवसांपर्यंत स्थानबद्ध ठेवता येईल ; परंतु त्याने शास्तीची रक्कम किंवा व्याजाची रक्कम धरून, देणे असलेला महसूल आणि त्यास अटक करण्याचा आणि मागणीची नोटीस बजावण्याचा खर्च आणि स्थानबद्धतेच्या मुदतीतील त्याच्या निर्वाहासाठी झालेला खर्च लवकरात लवकर दिला असेल तर त्यास अटक किंवा स्थानबद्ध करता कामा नये :

परंतु, कसूरी हेतुपुरस्सर करण्यात आली असल्याशिवाय आणि कसूरी करणाऱ्या इसमास त्याच्या अटकेविरुद्ध व स्थानबद्धतेविरुद्ध कारण दाखविण्याची संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही अटक करता कामा नये.

(२) दहा दिवसांची मुदत संपल्यानंतर कसूर करणाऱ्या इसमाने जी रक्कम देणे असेल ती रक्कम त्याने दिली नाही तर, किंवा दहा दिवसांच्या आत कोणत्याही दिवशी जर जिल्हाधिकाऱ्यास योग्य वाटेल तर, *अनुसूची अ मधील नमुन्यातील अधिपत्राद्वारे जिल्ह्याच्या दिवाणी कारागृहात त्यास कैदेत ठेवण्यासाठी, पाठविता येईल:

परंतु, कोणत्याही कसूर करणाऱ्या इसमास, त्याच्याकडून येणे असलेल्या महसुलाच्या थकबाकीच्या रकमेइतक्या कर्जाबाबत दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत विधिअन्वये जी मुदत मर्यादित करण्यात आली असेल त्या मुदतीपेक्षा अधिक मुदतीपर्यंत कैदेमध्ये अटकावून ठेवता कामा नये.

---

*अनुसूची अ ही कलम १७ खाली मुद्रित करण्यात आली आहे.

**१८४.** कलम १८३ अन्वये" प्रदान केलेल्या अटक करण्याच्या शक्तीला कोणत्या अधिकाऱ्यांनी किंवा कोणत्या वर्गाच्या अधिकाऱ्यांनी वापर करावयाचे हे राज्य सरकारास वेळोवेळी जाहीर करता येईल. आणि तसेच त्यास, अटकेबाबतचा खर्च आणि स्थानबद्ध केलेल्या किंवा कैद केलेल्या कोणत्याही कसूर करणाऱ्या इसमास राज्य सरकारने द्यावयाची निर्वाहाची रक्कम ठरविता येईल.

अटक करण्याच्या शक्तीचा वापर कोणी करावयाचा.

**टीप ८१.**—शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक यूएनएफ २३६७/११४७३४-आर, दिनांक १८ मार्च १९६८ अन्वये महाराष्ट्र शासन असा निदेश देत आहे की,—

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याचे कलम १८३ अन्वयेच्या अटक करण्याबाबतच्या शक्तींचा वापर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

(२) अटक करण्यासंबंधीचा खर्च पुढील प्रमाणात असेल :—

ज्या वसुलीसाठी अटक करण्यात आली असेल ती वसुलीची रक्कम पुढीलप्रमाणे असल्यास—

| | रुपये |
|---|---|
| रु. २५ पेक्षा अधिक नसणारी .. | १·०० |
| रु. २५ पेक्षा अधिक असणारी परंतु रु. १०० पेक्षा अधिक नसणारी. | ३·०० |
| रु. १०० पेक्षा अधिक परंतु रु. ५०० पेक्षा अधिक नसणारी. | ४·०० |
| रु. ५०० पेक्षा अधिक परंतु रु. १,००० पेक्षा अधिक नसणारी. | ८·०० |
| रु. १,००० पेक्षा अधिक परंतु रु. ५,००० पेक्षा अधिक नसणारी. | १६·०० |
| रु. ५,००० पेक्षा अधिक .. .. | ३२·०० |

(३) स्थानबद्ध केलेल्या किंवा कारावासात असलेल्या कसूरदारास शासनाने द्यावयाच्या निर्वाहाची रक्कम जिल्हाधिकारी निश्चित करील. अशी रक्कम रु. २ पेक्षा कमी आणि रु. ४ पेक्षा अधिक नसेल. (परिशिष्ट ३२ पहा).

**१८५.** धारण केलेल्या ज्या जमिनीच्या बाबतीत थकबाकी येणे असेल अशी जमीन संपूर्ण दुमाला गाव किंवा दुमाला गावाचा एखादा भाग असेल आणि पूर्वी निर्दिष्ट केलेल्या इतर कार्यपद्धतीपैकी कोणतीही कार्यपद्धती स्वीकारणे इष्ट वाटत असेल तर, जिल्हाधिकाऱ्यास, आयुक्ताचे पूर्वमंजुरीने असे गाव किंवा गावाचा भाग जप्त करविण्याचा आणि ते गाव किंवा त्याचा भाग त्याच्या स्वतःच्या किंवा त्या कारणासाठी त्याने नियुक्त केलेल्या कोणत्याही अभिकर्त्याच्या, व्यवस्थेखाली घेण्याचा अधिकार आहे.

कसूर करणाऱ्या व्यक्तीचे गाव जप्त करण्याची आणि व्यवस्थेखाली आणण्याची शक्ती.

**१८६.** अशा रीतीने जप्त केलेल्या कोणत्याही गावांच्या किंवा गावाच्या भागांच्या जमिनी, वरिष्ठ धारकाच्या किंवा हिस्सेदारांपैकी कोणत्याही हिस्सेदारांच्या कृत्यांचा किंवा अशा जमिनीवर किंवा तीत हितसंबंध असणाऱ्या वरिष्ठ धारकांवर किंवा हिस्सेदारांवर जे कोणतेही भार किंवा दायित्वे असतील अशा भारांचा किंवा दायित्वांचा, सरकारी महसुलाशी संबंध येत असेल तेथवर, परंतु इतर बाबतीत इसमांच्या हक्कांस बाध येऊ न देता, राज्य सरकारकडे परत घेतल्या पाहिजेत ; आणि जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा रीतीने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यास, उक्त वरिष्ठ धारकाकडे जप्त केलेल्या जमिनींची व्यवस्था जिल्हाधिकाऱ्याकडून परत देण्यात येईपर्यंत, जप्त केलेल्या जमिनीची व्यवस्था पहाण्याचा आणि वरिष्ठ धारक किंवा तिच्या हिस्सेदारांपैकी कोणत्याही हिस्सेदारास वगळून, त्या जमिनीपासून मिळणारे सर्व खंड व नफे, मिळण्याचा हक्क असेल.

अशा गावांच्या जमिनी भारांपासून मुक्त अवस्थेत येणे.

सरकारच्या मालकीची नसलेली परंतु राज्य सरकारच्या तात्पुरत्या व्यवस्थेखाली असलेली गावे किंवा भू-संपत्ती यांची महसूल व्यवस्था.

१८७. कोणतेही दुमाला गाव किंवा भू-संपत्ती राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांच्या तात्पुरत्या व्यवस्थापनाखाली आली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने भू-मापन व्यवस्थेवरून ठरविलेल्या दरांनी किंवा जे दर त्यास वाजवी वाटतील अशा इतर ठराविक दरांनी त्यातील जमिनी भाड्याने देणे, आणि त्यातील भोगवटयात नसलेल्या जमिनी पट्ट्याने देणे आणि दुमाला नसलेल्या जमिनीच्या व्यवस्थेसाठीच्या नियमांन्वये, ते जेथवर लागू असतील तेथवर, आणि उक्त गाव किंवा भू-संपत्ती जोपर्यंत सरकारी अधिकाऱ्यांच्या व्यवस्थेखाली असेल तोपर्यंत, त्यांच्या महसुलाची व्यवस्था अन्य रीतीने करणे हे विधिसंमत असेल ; परंतु, अशा गावच्या किंवा भू-संपत्तीच्या वरिष्ठ धारकाने जमिनीसंबंधी केलेल्या कोणत्याही लेखी कबुलायतीवर, अशा जमिनीवरील सरकारच्या वैध हक्कास ज्या मर्यादेपर्यंत नुकसान पोचणार नाही त्या मर्यादेपर्यंत ह्या कलमान्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीमुळे परिणाम होणार नाही.

शिल्लक राहिलेल्या नफ्याचा विनियोग.

१८८. अशा केलेल्या जमिनीच्या उत्पन्नातून चालू महसूल आणि जर कलम १८७ च्या उपबंधान्वये महसुली मोजणी सुरू करण्यात आली असेल तर ती सुरू करण्याचा खर्च धरून अशी जप्ती व व्यवस्था यांबद्दलचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या सर्व नफ्यांचा विनियोग उक्त थकबाकीची रक्कम फेडण्याकडे करण्यात येईल.

अशा रीतीने जप्त केलेले गाव परत देणे.

१८९. (१) अशा रीतीने जप्त केलेले गाव किंवा गावाचा भाग जप्तीमधून मुक्त करण्यासाठी आणि वरिष्ठ धारकाकडे त्यांची व्यवस्था परत करण्यासाठी, अशा जप्तीनंतर लगतच्या कृषि वर्षाच्या सुरुवातीपासून बारा वर्षांच्या आत कोणत्याही वेळी उक्त वरिष्ठ धारकाने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यास,—

(अ) ज्यावेळी असा अर्ज केला असेल त्यावेळी थकबाकी देण्यात आली आहे असे आढळून आले असेल ; किंवा

(ब) उक्त वरिष्ठ धारकाकडून अद्याप येणे असलेली शिल्लक, कोणतीही असल्यास, देण्यास तो तयार असेल आणि जिल्हाधिकारी त्याबाबतीत निर्दिष्ट करील अशा मुदतीत ती रक्कम तो देईल तर,

अशा रीतीने जप्त केलेले गाव किंवा गावाचा भाग जप्तीतून मुक्त केला पाहिजे व वरिष्ठ धारकाकडे त्याची व्यवस्था परत करण्यात आली पाहिजे.

(२) गाव किंवा गावाचा भाग परत मिळण्यासाठी ज्या वर्षामध्ये त्याने अर्ज केला असेल त्या वर्षात जमा झालेल्या रकमांतून सर्व थकबाकी व खर्च वजा करून जर कोणत्याही शिलकी जमा रकमा असतील [illegible] ; परंतु मागील वर्षातील अशा शिलकी जमा रकमा, कोणत्याही असल्यास, राज्य सरकारच्या स्वाधीन राहतील.

गाव वगैरे बारा वर्षांत विमोचित करण्यात आले नाही तर ते राज्य सरकारकडे निहित होणे.

१९०. अशा रीतीने जप्त केलेले गाव किंवा गावाचा भाग परत मिळण्यासाठीचा अर्ज उक्त बारा वर्षांच्या मुदतीत करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आल्यानंतर, वरिष्ठ धारकाने त्याच्याकडून अद्याप येणे असलेली बाकी, कोणतीही असल्यास, याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने विहित केलेल्या मुदतीत देण्यात कसूर केली असेल तर, उक्त गाव किंवा गावाचा भाग हा, त्यानंतर, वरिष्ठ धारक किंवा हिस्सेदारांपैकी कोणताही हिस्सेदार यांनी किंवा त्याच्या अथवा त्यांच्या पूर्वस्वत्वाधिकाऱ्यांपैकी कोणत्याही पूर्वस्वत्वाधिकाऱ्याने निर्माण केलेले सर्व भार, किंवा अशा वरिष्ठ धारकावर किंवा हिस्सेदारांपैकी कोणत्याही हिस्सेदारावर कोणत्याही रीतीने असलेले भार यापासून मुक्त होऊन राज्य सरकारमध्ये निहित होईल ; परंतु त्यामुळे जमीन ज्या इसमाच्या प्रत्यक्ष कबजात असेल अशा इसमाच्या हक्कास बाध येणार नाही.

परंतु तारण दिल्यानंतर सर्व कार्यवाह्या थोपविणे.

१९१. (१) अभिरक्षेत किंवा कैदेत ठेवलेल्या कोणत्याही कसूर करणाऱ्या इसमाने जिल्हाधिकाऱ्यापुढे किंवा उक्त कारणासाठी जिल्हाधिकाऱ्याने नियुक्त केलेल्या इतर इसमापुढे, किंवा कसूर करणारा इसम जर तुरुंगात असेल तर अशा तुरुंगाच्या प्रभारी अधिका[illegible] पुढे, जिल्हाधिकाऱ्याचे किंवा अशा इतर इसमांचे किंवा अधिकाऱ्यांचे समाधान होईल असे अनुसूची* [illegible] मधील नमुन्यातील तारण दिल्यास अशा कसूर करणाऱ्या इसमास ताबडतोब सोडून दिले पाहिजे आ[illegible] वसुलीच्या सर्व कार्यवाह्या, कोणत्याही वेळी, थोपविण्यात आल्या पाहिजेत.

* अनुसूची 'ब' ही कलम १९ खाली [illegible]पण्यात आली आहे.

(२) या प्रकरणान्वये ज्याच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात आली असेल अशा कोणत्याही इसमास मागणी केलेली रक्कम निषेध व्यक्त करून अशी कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्यास देता येईल, आणि अशा प्रकारे रक्कम दिल्यानंतर त्या कार्यवाह्या थोपविण्यात आल्या पाहिजेत.

१९२. (१) या प्रकरणाच्या उपबंधांन्वये जंगम किंवा स्थावर मालमत्तेच्या कोणत्याही विक्रीबाबत विक्री आदेश देण्यात आला असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने, विक्रीची वेळ व जागा निर्दिष्ट करणारी आणि जंगम मालमत्तेच्या बाबतीत, ती विक्री कायम करण्याच्या अधीन आहे किंवा नाही याविषयीची आणि राज्य सरकारास महसूल देणारी जमीन विकावयाची असेल तेव्हा तीवर आकारलेला महसूल व त्यास आवश्यक वाटेल असा इतर कोणताही तपशील देणारी, उद्घोषणा[८२] विहित केलेल्या नमुन्यात मराठी भाषांतरासह काढली पाहिजे. करण्याच्या वेळेची कार्य-पद्धती.[८३]

(२) जर विक्री स्थावर मालमत्तेची असेल तर अशी उद्घोषणा तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी आणि, अशी स्थावर मालमत्ता ज्या गावात असेल त्या गावात दवंडी पिटवून केली पाहिजे ; आणि जर विक्री जंगम मालमत्तेची असेल तर अशी मालमत्ता ज्या गावात जप्त करण्यात आली असेल त्या गावात, आणि जिल्हाधिकारी निदेश देईल अशा इतर गावांत उद्घोषणा केली पाहिजे.

(३) या कलमान्वये केलेली उद्घोषणा ही कोणत्याही धारण केलेल्या जमिनीच्या संबंधी असेल तेव्हा तिची एक प्रत धारण केलेली जमीन ज्या क्षेत्रात असेल त्या क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी बँकेला किंवा भू-विकास बँकेला किंवा त्या दोन्ही बँकांना पाठविली पाहिजे.

**टीप ८२.**—कलम ९ खालील टीप ७-ए पहा.

**टीप ८३.**—कलम १९३ खालील टीप ८५ पहा (नियम १२ पहा.)

१९३. (१) ज्या स्थावर मालमत्तेची विक्री करण्याचा इरादा असेल त्या मालमत्तेच्या विक्रीची, आणि विक्रीची वेळ व जागा याबद्दलची लेखी नोटीस पुढील प्रत्येक ठिकाणी लावण्यात आली पाहिजे :— विक्रीची अधिसूचना.

(अ) जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याचे कार्यालय,

(ब) स्थावर मालमत्ता ज्या तालुक्यात असेल त्या तालुक्याच्या तहसिलदाराचे कार्यालय,

(क) चावडी किंवा ती ज्या गावात असेल त्या गावातील इतर कोणतीही सार्वजनिक इमारत, आणि

(ड) कसूर करणाऱ्या इसमाचे राहण्याचे ठिकाण.

(२) जंगम मालमत्तेच्या बाबतीत अशी लेखी नोटीस तहसिलदाराच्या कार्यालयात आणि चावडीत किंवा अशी मालमत्ता ज्या गावात, जप्त करण्यात आली होती त्या गावातील कोणत्याही इतर सार्वजनिक इमारतीत लावण्यात आली पाहिजे.

(३) जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही विक्रीची नोटीस—मग ती जंगम अथवा स्थावर मालमत्तेची असो—त्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने,[८४] प्रसिद्ध करविता येईल.

(४) या कलमामध्ये उल्लेख करण्यात आलेली नोटीस विहित[८५] करण्यात येईल अशा नमुन्यात असेल.

**टीप ८४.**—कृपया कलम ९ खालील टीप ७-अ पहा.

**टीप ८५.**—जमीन महसूल वसूल करण्यासंबंधीचे नियम (कृपया टीपा ७४, ७८ व ८३ पहा.) (नियम १२ पहा).

शासकीय अधिसूचना, क्रमांक यूएनएफ-२३६७-आर, दिनांक ३१ मे १९६८ द्वारे सुधारणा करण्यात आलेली शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-२३६७-आर, दिनांक १ सप्टेंबर १९६७.

**१. संक्षिप्त नाव.**—या नियमास "महाराष्ट्र जमीन महसुलाच्या वसुलीबाबत नियम, १९६७" असे म्हणता येईल.

२. **जमीन महसूल कोठे व कोणाला द्यावा.**—(१) जिच्या बाबतीत महसूल देय असेल अशी जमीन, ज्या गावात असेल त्या गावाच्या तलाठ्याकडे जमीन महसुलाच्या सर्व रकमा प्रदान करण्यात येतील :

परंतु जिल्हाधिकाऱ्याच्या मंजुरीने, विशेष प्रकरणांत अशी प्रदानाची रक्कम ती ज्या जिल्ह्याशी संबंधित असेल त्या जिल्ह्यामधील शासकीय कोषागारात भरता येईल ;

आणखी असे की, जिल्हाधिकाऱ्याने त्या बाबतीत विनिर्दिष्ट केले असेल अशा गावांच्या बाबतीत जमीन महसुलाच्या प्रदानासाठी केंद्र म्हणून तालुक्यातील कोणतेही गाव घोषित केले असेल अशा बाबतीत, अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या गावांमध्ये, त्या गावांच्या तलाठ्यांना देय असलेल्या जमीन महसुलाच्या प्रदानाची रक्कम, अशा घोषित केलेल्या केंद्राच्या ठिकाणी भरण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने केलेली कोणतीही घोषणा तिची एक प्रत, चावडीमध्ये किंवा संबंधित गावांतील दुसऱ्या कोणत्याही सरकारी इमारतीत चिकटवून किंवा जिल्हाधिकाऱ्याला इष्ट वाटेल अशा इतर पद्धतीने कळवण्यात येईल.

३. **जमीन महसुलाच्या प्रदानासाठी गावांचे वर्गीकरण.**—प्रत्येक जिल्हाधिकारी, जमीन महसुलाच्या वसुलीसाठी, आपल्या जिल्ह्यातील गावांचे पुढील दोन वर्गांत वर्गीकरण करील :—

वर्ग एक : खरीप गावे.

वर्ग दोन : रब्बी गावे.

४. **जमीन महसूल ज्या तारखांना द्यावयाचा त्या तारखा.**—कलम १७० च्या उपबंधास अधीन राहून, जमिनींच्या बाबतीत देय असलेला जमीन महसूल, फक्त एका हप्त्यात देता येईल, आणि तो ज्या तारखांना देण्यात येईल त्या तारखा वर्ग एक (खरीप) गावांमध्ये, १५ जानेवारी व वर्ग दोन (रब्बी) गावांमध्ये, १५ एप्रिल अशा असतील :

परंतु ज्या ठिकाणी शेत जमिनीवर देय असलेल्या जमीन महसुलाच्या प्रदानासाठी या तारखा गैरसोयीच्या आढळून येतील अशा कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात, जिल्हाधिकाऱ्यास, आयुक्ताच्या मंजुरीने, हंगामाच्या व संबंधित गावांच्या परिस्थितीनुसार व त्यामध्ये सामान्यत: पेरण्यात येणाऱ्या पिकांच्या प्रकारानुसार, त्याला इष्ट वाटतील अशा इतर तारखा, निश्चित करता येतील व त्यानंतर अशा जिल्ह्यामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये अशा निश्चित केलेल्या तारखांना अकृषिक जमिनीवर देय असलेला जमीन महसूल सुद्धा देण्यात येईल.

५. **मागणीच्या नोटीशीचा नमुना.**—(१) कलम १७८ खाली काढावयाची नोटीस नमुना १ मध्ये असेल.

(२) मागणीच्या निरनिराळ्या नोटिसा वेगवेगळ्या कसूरदारांच्या नावे काढण्यात यतील.

६. **कलम १७९ खाली करावयाची उद्घोषणा व काढावयाची नोटीस यांचा नमुना.**—कलम १७९ खाली करावयाची उद्घोषणा व काढावयाची नोटीस ही नमुना २ मध्ये असेल.

७. **केवळ भोगवटयाची जमीन इत्यादींचा भाग जप्त करणे.**—कोणत्याही भोगवटयाच्या जमिनीचा किंवा दुमाला धारण जमिनीच्या बाबतीत, जमीन महसुलाची थकबाकी देय असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकारी, जमीन महसुलाच्या थकबाकीबद्दल करण्यात आलेली मागणी पूर्ण करण्यासाठी, त्याच्या मते, आवश्यक असेल तेवढाच भोगवटयातील जमिनीचा किंवा धारण जमिनीचा भाग जप्त करील.

८. **विवक्षित प्रकरणांमध्ये जमीन महसुलाची थकबाकी माफ करणे.**—जमीन महसुलाच्या प्रदानातील कसुरीबद्दल जप्त केलेल्या कोणत्याही जमिनीची, कलम ७२ च्या उपबंधानुसार विल्हेवाट लावण्यात आलेली नसेल अशा बाबतीत, कसूरदाराने देय असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीची रक्कम त्याच्या विरुद्ध पुढील अनिवार्य कार्यवाही न करता, सामान्यत: माफ करण्यात येईल.

**९. कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्याच्या अधिपत्राचा नमुना व अशा रीतीने (माल) अटकावून ठेवण्याची पद्धती.**—(१) कलम १८० खाली कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्यासाठी, जिल्हाधिकारी, त्या कलमाच्या पोट-कलम (२) मध्ये निर्देश केलेल्या अधिकाऱ्याच्या नावे (ज्याचा यापुढे या नियमात "अटकावून ठेवणारा अधिकारी" असा निर्देश करण्यात आला आहे) नमुना ३ मध्ये अटकावयाचे अधिपत्र काढील.

(२) अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला, प्रत्यक्ष अभिग्रहणाद्वारे, कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून ठेवता येईल व ती, आपल्या अभिरक्षेत किंवा कोणत्याही आपल्या दुय्यम व्यक्तीच्या अभिरक्षेत ठेवील व तो, त्याने अधिग्रहण केलेल्या मालमत्तेबद्दल जबाबदार असेल :

परंतु अभिग्रहण केलेली जंगम मालमत्ता, जलद व नैसर्गिकपणे नाश होण्याची शक्यता असेल किंवा ती अभिरक्षेत ठेवण्याचा खर्च, तिच्या मूल्याहून अधिक होण्याचा संभव असेल त्या बाबतीत, अटकावून ठेवणारा अधिकारी, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार ती तात्काळ विकण्याची व्यवस्था करील ;

तसेच, अभिग्रहण केलेल्या मालमत्तेमध्ये, गुरेढोरे, शेतीची अवजारे किंवा ज्या सोयीस्करपणे हलवणे शक्य नाही अशा इतर वस्तू यांचा अंतर्भाव असेल त्या बाबतीत, अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला, ती मालमत्ता पूर्ववर्ती परंतुकान्वये विकण्याची व्यवस्था करण्यात आली नसेल तर, कसूरदाराच्या किंवा त्या मालमत्तेच्या हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून, त्या गावात किंवा ज्या ठिकाणी ती अटकावून ठेवण्यात आली असेल त्या ठिकाणी,—

(एक) कसूरदाराच्या किंवा कोंडवाडा रक्षक, कोणताही असल्यास, त्याच्या ताब्यात ठेवता येईल, किंवा

(दोन) त्या मालमत्तेमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या किंवा अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मते आदरणीय असेल व आपल्या अभिरक्षेत ती मालमत्ता ठेवण्यास जी तयार असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात ठेवता येईल, परंतु त्यापूर्वी, अशा कसूरदाराने किंवा कोंडवाडा रक्षकाने किंवा यथास्थिती, अशा व्यक्तीने मालमत्तेच्या मूल्यापेक्षा कमी नसेल एवढ्या रकमेच्या, एक किंवा त्याहून अधिक जमिनीसह, बंधपत्र करून दिले पाहिजे व मागणी करण्यात येईल तेव्हा अटकावून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यापुढे ती मालमत्ता हजर करण्यात येईल याबाबत हमी दिली पाहिजे.

(३) अटकावून ठेवणारा अधिकारी, अटकावून ठेवलेल्या मालमत्तेची यादी तयार करील व ती मालमत्ता जिच्या अभिरक्षेत ठेवण्यात आली असेल अशा व्यक्तीची आणि शक्य असल्यास, कसूरदाराची आणि ती यादी अचूक असल्याबद्दल साक्षांकन करण्यासाठी त्याच्या मते आदरणीय असेल अशा किमान एका व्यक्तीची त्यावर सही घेईल. अटकावून ठेवलेल्या मालमत्तेमध्ये गुरेढोरे व इतर वस्तू या दोहोंचाही अंतर्भाव असेल तर गुराढोरांची एक वेगळी यादी तयार करण्यात येईल व उपरोक्त प्रमाणे ती साक्षांकित करण्यात येईल.

(४) गुरेढोरे किंवा इतर जंगम मालमत्ता कसूरदाराच्या ताब्यात नसेल त्या बाबतीत, गुराढोरांच्या चाऱ्यापाण्याचा खर्च, किंवा इतर जंगम मालमत्तेच्या सुरक्षित अभिरक्षेचा खर्च, जिल्हाधिकारी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निश्चित करील अशा दराने आकारण्यात येईल. असा झालेला खर्च हा, मालमत्तेच्या विक्री उत्पन्नावर प्रथम आकारण्यात येईल.

**१०. दिवाणी व्यवहार संहितेचे उपबंध लागू असणे.**—दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ च्या पहिल्या अनुसूचीचा नियम क्रम एकवीस मधील नियम ४७ ते ५३ यांचे त्या नियमात वर्णन केलेल्या जंगम मालमत्तेच्या जप्तीसंबंधीचे उपबंध, शक्यतोवर त्या अधिनियमान्वये अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेच्या बाबतीत लागू होतील.

**११. स्थावर मालमत्तेची जप्ती.**—(१) कलम १८१, १८२ व १८५ अन्वये करावयाची स्थावर मालमत्तेची जप्ती, कसूरदारास कोणत्याही प्रकारे मालमत्ता हस्तांतरित करण्यास किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारे भार निर्माण करण्यास व अशा हस्तांतरणापासून किंवा भारापासून कोणताही लाभ घेण्यास इतर सर्व व्यक्तींना प्रतिवेध करणारा नमुना ४ मधील आदेश जिल्हाधिकाऱ्याकडून काढण्यात येवून, कार्यान्वित करण्यात येईल.

(२) अशा मालमत्तेमधील किंवा अशा मालमत्तेलगतच्या कोणत्याही ठिकाणी दवंडी पिटवून किंवा इतर रूढ पद्धतीने तहसिलदाराकडून किंवा नायब तहसिलदाराकडून आदेशाची उद्घोषणा करण्यात येईल आणि आदेशाची एक प्रत, मालमत्तेतील ठळक जागी, तसेच तलाठ्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर, चिकटवण्यात येईल.

(३) आदेशाची प्रत मालमत्तेवर ज्या दिनांकाला चिकटली असेल त्या दिनांकापासून, सद्भावना मूल्याबद्दल खरीददाराच्या विरुद्ध व असा आदेश ज्या दिनांकाला काढला असेल त्या दिनांकापासून, कसूरदाराकडून हस्तांतरित केलेली मालमत्ता ज्यांनी घेतली आहे अशा सर्व इतर हस्तांतरितीविरुद्ध आदेश अंमलात येईल.

१२. **समपहरण केलेल्या, अटकावून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री.**—(१) समपहरण केलेल्या, अटकावून ठेवलेल्या किंवा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री ही सामान्यपणे, मालमत्ता ज्यामध्ये असेल त्या नगरात किंवा गावात करण्यात येईल.

(२) अशा विक्रीच्या उद्घोषणा व लेखी नोटीसा,—

(अ) समपहरण केलेल्या मालमत्तेच्या बाबतीत, नमुना ५ मध्ये,

(ब) अटकावून ठेवलेल्या मालमत्तेच्या बाबतीत, नमुना ६ मध्ये,

(क) जप्त मालमत्तेच्या बाबतीत, नमुना ७ मध्ये,

काढण्यात येतील.

१३.[१] **हातची किंमत निश्चित करण्यात यावी.**—कोणतीही जमीन किंवा इतर मालमत्ता जाहीर लिलावाने विकण्यात येईल त्याबाबतीत हातची किंमत, जिल्हाधिकाऱ्याला योग्य वाटल्यास त्यासाठी ठरविण्यात येईल.

१४. **विक्रीच्या प्रमाणपत्रांचे नमुने.**—स्थावर मालमत्तेची विक्री कायम झाल्यावर खरीददाराला विक्रीचे प्रमाणपत्र,—

(अ) विकण्यात आलेली मालमत्ता ही समपहरण केलेली मालमत्ता असेल त्याबाबतीत नमुना ८ मध्ये;

(ब) विकण्यात आलेली मालमत्ता ही, अटकावून ठेवलेली मालमत्ता असेल त्या बाबतीत नमुना ९ मध्ये देण्यात येईल.

१५. **जंगम मालमत्तेची विक्री पूर्ण झाल्यावर ती मालमत्ता देणे.**—कलम १९९ किंवा २०० या कलमांन्वये जंगम मालमत्तेची विक्री पूर्ण होईल त्या बाबतीत, विक्री करणारा अधिकारी,—

(अ) मालमत्ता प्रत्यक्ष जप्त करण्यात आली असल्यास ती खरीददाराला देईल, आणि

(ब) इतर कोणत्याही प्रकरणांमध्ये, अशी मालमत्ता खरीददाराकडे निहित करणारा आदेश करील.

१६. **कलम २१२ अन्वये खरीददारास ताबा देण्याची पद्धती.**—(१) विकलेली जमीन ही कसूरदाराच्या, किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीच्या किंवा जमीन जप्त केल्यावर किंवा नियम १४ अन्वये तिच्या संबंधात प्रमाणपत्र दिल्यावर, कसूरदाराने निर्माण केलेल्या हक्कान्वये दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या, ताब्यात असेल त्याबाबतीत, विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने, खरीददाराने अर्ज केल्यावर, अशा खरीददाराकडे किंवा खरीददार आपल्या वतीने मालमत्ता स्वीकारण्यास नियुक्त करील अशा कोणत्याही व्यक्तीकडे, जमिनीचा ताबा देण्याचा आदेश काढील आणि आवश्यक असल्यास (जमीन), सोडून देण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला बळजबरीने (जमिनीतून) काढून लावील.

(२) अशी जमीन कुळाच्या किंवा तिचा भोगवटा करण्यास पात्र असलेल्या इतर व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या बाबतीत, विक्री करणारा अधिकारी, खरीददाराने अर्ज केल्यावर, नियम १४ अन्वये दिलेल्या प्रमाणपत्राची एक प्रत, जमिनीवरील एखाद्या ठळक ठिकाणी चिकटवून व कसूरदाराचे हितसंबंध खरीददाराकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत ही गोष्ट दवंडी पिटवून किंवा रूढ पद्धतीने जमीन ताब्यात असणाऱ्या व्यक्ती समोर घोषित करून, जमीन देण्याबद्दल आदेश देईल.

१७. **जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल योग्य असलेल्या रकमा वसूल करण्याची कार्यपद्धती.—** (१) शासनाच्या कोणत्याही विभागाला किंवा स्थानिक प्राधिकरणाला किंवा सहकारी संस्थेला देय असलेली कोणतीही रक्कम, कसूरदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल त्या बाबतीत, असा विभाग, स्थानिक प्राधिकरण किंवा यथास्थिती सहकारी संस्था, यास, कसूरदार ज्या तालुक्यात राहात असेल किंवा ज्या तालुक्यात त्याची मालमत्ता, असेल त्या तालुक्याच्या तहसीलदाराकडे रकमेच्या वसुलीसाठी लेखी मागणी पाठविता येईल.

(२) अशा मागणीत पुढील तपशील अंतर्भूत असेल :—

(अ) कसूरदाराचे पूर्ण नाव व पत्ता,

(ब) वसूल करावयाची रक्कम,

(क) रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून विधीच्या ज्या उपबंधान्वये रक्कम वसुलीयोग्य असेल तो उपबंध,

(ड) रक्कम वसूल करता येईल ती पद्धती प्रक्रिया.

(इ) जिच्या बाबतीत त्या प्रक्रियेचा अवलंब करता येईल ती मालमत्ता.

(३) अशी मागणी मिळाल्यावर, तहसिलदार जिची अधिनियमाचे उपबंध व हे नियम यांच्या उपबंधानुसार तिची विल्हेवाट लावील.

---

## नमुना १

(नियम ५ पहा)

**कसूरदारास मागणीची नोटीस**

प्रति,

श्री.··················(वडिलाचे नाव·········), राहणार ············· तालुका··············, जिल्हा················आपणाला याद्वारे ही नोटीस देण्यात येत आहे की, अनुबद्ध विवरणपत्रात दिलेल्या तपशीलाप्रमाणे, जमीन महसुलाच्या थकबाकीबद्दल आपणाकडून रुपये··········येणे आहेत आणि ही नोटीस बजावल्याच्या तारखेपासून ········ दिवसांच्या आत, उक्त रक्कम व या नोटीसीदाखल आकारणीयोग्य असलेली फी म्हणून रुपये········एवढी रक्कम, न दिल्यास, देय रकमांच्या वसुलीकरिता विधीनुसार तुमच्या विरूद्ध अनिवार्य कारवाई करण्यात येईल व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम १७४ अन्वये उक्त थकबाकीच्या एक-चतुर्थांशापेक्षा अधिक असणार नाही एवढी रक्कम, अतिरिक्त दंड म्हणून घेण्यात येईल.

| गाव | भू-मापन क्रमांक, खासरा क्रमांक व पोट-विभाग क्रमांक | थकबाकीची रक्कम | नोटिशीचा खर्च | एकूण देय रक्कम | नोटीस बजावल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | रुपये | रुपये | रुपये | |

माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्यानिशी दिली.

दिनांक················

ठिकाण················

कार्यालयाचा शिक्का. महसूल अधिकाऱ्याचे पदनाम.

## नमुना २

(नियम ६ पहा)

### उद्घोषणेचा व समपहरणाच्या लेखी नोटीशीचा नमुना

ज्याअर्थी, श्री.................. (वडिलाचे नाव ..........), राहणार .........., तालुका ............,जिल्हा ............., यांनी गाव ..........., तालुका ......., यामधील भूमापन क्रमांक/खासरा क्रमांक/हिस्सा क्रमांक ............... क्षेत्र, .............., आकारणी ............., असणाऱ्या त्यांच्या जमिनीच्या भोगवटयाच्या / दुमाला धारण जमिनीच्या बाबतीतील जमीन महसुलाबद्दल रुपये ........ देण्यात कसुरी केली आहे. आणि ज्याअर्थी, उक्त धारण जमिनीचे समपहरण करून, उक्त रक्कम व सर्व कायदेशीर आकार व खर्च वसूल करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, या नोटिशीच्या तारखेपासून ............ (येथे पंधरा दिवसापेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची संख्या नमूद करावी) दिवस पूर्ण झाल्यावर, उक्त भोगवटयाचे/धारण जमिनीचे राज्य शासनाकडे समपहरण करण्यात येईल.

---

खाली विनिर्दिष्ट केलेल्या उक्त भोगवटयाच्या/धारण जमिनीच्या भागाचे राज्य शासनाकडे समपहरण करण्यात येईल.

(समपहरणाच्या घोषणेखाली येणाऱ्या भोगवटयाच्या/धारण जमिनीच्या भागाचे वर्णन येथे द्यावे.)

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिली.

ठिकाण ................

दिनांक ................

महसूल अधिकाऱ्याचे पदनाम.

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ३

(नियम ९ पहा)

**जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्याचे अधिपत्र**

प्रति,

(अधिपत्राच्या अंमलबजावणीचे काम ज्याच्याकडे सोपवलेले आहे त्या व्यक्तिचे व तिच्या कार्यालयाचे नाव)

ज्याअर्थी, श्री. ............. (वडिलाचे नाव ..........), राहणार ............., तालुका .........., जिल्हा ..........., यांनी गाव .........., तालुका ........... जिल्हा ............ यामधील
भूमापन क्रमांक/खासरा क्रमांक/हिस्सा क्रमांक ......... याच्या बाबतीतील जमीन महसुलाच्या बाबतीत

---

जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलयोग्य असलेल्या मागणीच्या रकमेच्या बाबतीत रुपये ......... देण्यात कसूर केली आहे ; त्याअर्थी, उक्त ........ ची जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्यास आणि येणे असलेली एकूण रक्कम देण्यात आली नाही तर, ती मालमत्ता, या कार्यालयाकडून पुढील आदेश मिळेपर्यंत ताब्यात ठेवण्याबाबत आदेश देण्यात येत आहे.

हे अधिपत्र, अंमलबजावणीचा दिनांक व त्याची कोणत्या पद्धतीने अंमलबजावणी केली ते प्रमाणित करणारे किंवा त्याची अमलबजावणी का करण्यात आली नाही ते नमूद करणारे पृष्ठांकन करून ....... १९ रोजी किंवा त्यापूर्वी, परत करण्याबाबत आपणास आणखी आदेश देण्यात येत आहेत.

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

ठिकाण ..................

दिनांक ..................

महसूल अधिकाऱ्याचे पदनाम.

कार्यालयाचा शिक्का.

## नमुना ४

(नियम ११ पहा)

### स्थावर मालमत्तेच्या जप्तीचा आदेश

ज्याअर्थी, श्री. ............. (वडिलाचे नाव ............), राहणार ............ तालुका .........., जिल्हा ..........., यांनी, खाली तपशीलवार दिल्याप्रमाणे ........ बद्दल त्यांच्याकडून येणे असलेले रु. .......... देण्यात कसूर केली आहे :—

(मागणीचा तपशील) .............................................

त्याअर्थी, असा आदेश देण्यात येत आहे की, उक्त ............ यास या कार्यालयाच्या पुढील आदेशापर्यंत, त्या मालमत्तेचे, विक्रीने, देणगी म्हणून किंवा अन्यथा हस्तांतरण करण्यास प्रतिषेध असेल व तसे करण्यास प्रतिषिद्ध व अवरुद्ध करण्यात येत आहे आणि सर्व व्यक्तींना याद्वारे तशाच रीतीने खरेदीने, देणगी म्हणून किंवा अन्यथा ती स्वीकारण्यास प्रतिषेध असेल व तसे करण्यास प्रतिषिद्ध करण्यात येत आहे :—

### अनुसूची

(मालमत्तेचे वर्णन)

दिनांक .......... १९ , रोजी माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी काढण्यात आला.

........................ यांचे कार्यालय.

जिल्हाधिकारी.

कार्यालयाचा शिक्का.

## नमुना ५

[नियम १२ (२) (अ) पहा]

### समपहरण केलेल्या मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी, श्री. ..................., वडिलांचे नाव ..................., राहणार ..............................................., तालुका ............., जिल्हा ............., यांच्याकडून येणे असलेल्या, खालील तक्त्याच्या कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, जमीन महसुलाच्या थकबाकीच्या वसुलीसाठी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे समपहरण करण्यात आले आहे.

त्याअर्थी याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, विक्रीसाठी यामध्ये निश्चित केलेल्या दिवसापूर्वी ............. च्या तलाठ्याला, देय रक्कम दिली नसेल तर, उक्त मालमत्ता, तिच्यावर बसविण्यात आलेल्या सर्व भारापासून व तिच्या संवंधात करण्यात आलेली सर्व अनुदाने व संविदा यांपासून मुक्त, अशी मालमत्ता ........... येथे ........... १९ रोजी ...... वाजता, किंवा ...... वाजण्याच्या सुमारास, जाहीर लिलावाद्वारे, विकण्यात येईल :—

| गाव | भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक | क्षेत्र | आकारणी | देय असलेल्या जमीन महसुलाची थकबाकी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | एकर | रुपये | रुपये |

**टीप.**—(१) प्रत्येक भू-मापन क्रमांकावर किंवा पोट-विभाग क्रमांकावर देय असलेल्या जमीन महसुलाच्या थकबाकीची रक्कम, स्तंभ (५) मध्ये स्वतंत्रपणे विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(२) धारण जमिनीमध्ये, एक भू-मापन क्रमांकापेक्षा किंवा खासरा क्रमांकापेक्षा किंवा पोट-विभाग क्रमांकापेक्षा अधिक क्रमांक असतील तर, विक्री करणाऱ्या कार्यालयास, थकबाकी वसूल करण्यास आवश्यक वाटतील अशा, एका किंवा त्याहून अधिक क्रमांकांची विक्री करण्याची मुभा असेल.

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

दिनांक ............. १९ .

जिल्हाधिकारी.

कार्यालयाचा शिक्का.

नमुना ६

[नियम १२ (२) (ब) पहा]

**अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस**

ज्याअर्थी, श्री. ....................., वडिलांचे नाव ...................., राहणार ..................................................., तालुका ............., जिल्हा ............., यांच्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीबद्दल/जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूलयोग्य असलेल्या रकमेच्या मागणीप्रीत्यर्थ येणे असलेल्या रु. ...... रकमेसाठी खाली विनिर्दिष्ट केलेली जंगम मालमत्ता अटकावून ठेवण्यात आली आहे.

त्याअर्थी, याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, विक्रीकरिता यामध्ये निश्चित केलेल्या दिवसापूर्वी देय रक्कम ............. च्या तलाठ्याला देण्यात आली नाही तर, उक्त मालमत्ता ............. येथे दिनांक ....... १९ रोजी ..... वाजता किंवा ..... वाजण्याच्या सुमारास जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल. अशा तऱ्हेने केलेली कोणतीही विक्री कायम होण्यास अधीन राहील/अधीन राहणार नाही.

| जंगम मालमत्तेचे वर्णन | वस्तूंची संख्या | कलम १७६ च्या परंतुकान्वये सूट देण्यात आलेली मालमत्ता |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |

माझ्या सही व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

दिनांक ............. १९ . जिल्हाधिकारी.

कार्यालयाचा शिक्का.

## नमुना ७

[नियम १२ (२) (क) पहा]

### जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा व लेखी नोटीस

ज्याअर्थी, श्री. ··········, वडिलांचे नाव ··········, राहणार ·········, तालुका ····, जिल्हा ·········, यांच्याकडून ·········· कारणासाठी येणे असलेल्या रु. ······· च्या वसुलीसाठी खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे.

त्याअर्थी, याद्वारे, नोटीस देण्यात येत आहे की, यामध्ये विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी, पूर्वोक्त रक्कम देण्यात आली नाही तर, उक्त मालमत्ता ·········· येथे दिनांक ······१९ रोजी ···· वाजता किंवा ····· वाजण्याच्या सुमारास जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल.

ही विक्री उक्त मालमत्तेमधील उक्त कसूरदाराचा अधिकार, हक्क व हितसंबंध यांनाच केवळ लागू होते.

#### मालमत्तेचा तपशील

| वर्णन | आकारणी असल्यास | कोणतेही भार इत्यादी माहिती असल्यास त्याची टीप |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |

माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

जिल्हाधिकारी.

दिनांक ············१९ .

कार्यालयाचा शिक्का.

## नमुना ८

[नियम १४ (अ) पहा]

**समपहरण केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे प्रमाणपत्र**

असे प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री. ........., वडिलांचे नाव ........., राहणार ...., तालुका ......., जिल्हा .........., यांना दिनांक ...........१९ रोजी, जाहीर लिलावाद्वारे करण्यात आलेल्या विक्रीच्या वेळी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे खरीददार म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि ही विक्री दिनांक ..........१९ रोजी .......... यांच्याकडून यथोचितरीत्या कायम करण्यात आली आहे.

ह्या विक्रीद्वारे, मालमत्ता तिच्यावर लादलेल्या सर्व भारांपासून व खरीददाराहून इतर कोणत्याही व्यक्तीने तिच्या संबंधात दिलेली सर्व अनुदाने व केलेल्या निविदा यांच्यापासून मुक्त, खरीददाराकडे हस्तांतरित झाली आहे :—

| गाव<br>(१) | भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक<br>(२) | क्षेत्र<br>(३) | आकारणी<br>(४) | अभिलिखित भोगवटदाराचे किंवा मालकाचे नाव<br>(५) | खरेदीची किंमत<br>(६) |
|---|---|---|---|---|---|
| | | एकर | रुपये | | रुपये |

माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

दिनांक.............१९ .

महसूल अधिकाऱ्याचे पदनाम.

कार्यालयाचा शिक्का.

## नमुना ९

[नियम १४ (ब) पहा]

### जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे की, श्री. ············, वडिलांचे नाव ············, राहणार ············, तालुका ············, जिल्हा ············, यांना दिनांक ············१९ रोजी, जाहीर लिलावाद्वारे करण्यात आलेल्या विक्रीच्या वेळी, खाली विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे खरीददार म्हणून घोषित करण्यात आले आहे आणि ही विक्री, दिनांक ··········१९ रोजी ················ यांच्याकडून कायम करण्यात आली आहे.

या विक्रीद्वारे, उक्त मालमत्तेतील अधिकार, हक्क व हितसंबंध श्री. ················ यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत.

**मालमत्तेचा तपशील**

| गाव | भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक | क्षेत्र | आकारणी | अभिलिखित केलेल्या भोगवट-दाराचे किंवा मालकाचे नांव | खरेदीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | एकर | रुपये | | रुपये |

माझ्या सही व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

महसूल अधिकाऱ्याचे पदनाम.

दिनांक············१९ .

कार्यालयाचा शिक्का.

विक्री कोणी करावयाची, विक्रीची वेळ, इत्यादी.

१९४. (१) जिल्हाधिकारी निदेश देईल अशा इसमांनी लिलावाने विक्री केली पाहिजे.

(२) अशी कोणतीही विक्री रविवारी किंवा राज्य सरकारने मान्यता दिलेल्या इतर सार्वत्रिक सुटीच्या दिवशी, किंवा कलम १९३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, उक्त नोटीसांपैकी कोणतीही नोटीस ज्या शेवटल्या दिवशी लावली असेल त्या दिवसापासून, स्थावर मालमत्तेच्या बाबतीत कमीत कमी तीस दिवसांची मुदत किंवा जंगम मालमत्तेच्या बाबतीत सात दिवसांची मुदत संपेतोपर्यंत, करता कामा नये.

विक्री तहकूब करणे.

१९५. कोणत्याही पुरेशा कारणास्तव विक्री वेळोवेळी तहकूब करता येईल :

परंतु, तीस दिवसांपेक्षा अधिक मुदतीसाठी विक्री तहकूब करण्यात आली असेल तेव्हा, नवीन उद्घोषणा करण्यास किंवा नवीन नोटीस देण्यास कसूर करणाऱ्या इसमाने संमती दिली नसेल तर, अशी नवीन उद्घोषणा आणि नोटीस देण्यात आली पाहिजे.

नाश होणाऱ्या वस्तूंची विक्री.

१९६. कलमे १९२, १९३, १९४ आणि १९५ यामधील कोणताही मजकूर नाश होणाऱ्या वस्तूंच्या विक्रीस लागू होणार नाही. अशा वस्तू या बाबतीत जिल्हाधिकारी सर्वसामान्यपणे किंवा विशेषरीत्या, वेळोवेळी आदेश देईल त्या आदेशानुसार, कोणताही विलंब न लावता लिलावाने विकण्यात आल्या पाहिजेत.

विक्री केव्हा थांबविता येईल.

१९७. कसूर करणारा इसम किंवा त्याच्या वतीने कोणताही इसम, ज्या थकबाकीच्या संबंधात मालमत्ता विकावयाची असेल ती थकबाकी आणि त्याने देणे असलेले सर्व वैध खर्च, विक्रीसाठी ठरविलेल्या वेळेपूर्वी कोणत्याही वेळी देणे असलेली जमीन महसूलाची रक्कम वसूल करण्यासाठी कलम १७० अन्वये विहित केलेल्या कोणत्याही इसमास, किंवा विक्रीचे काम चालविण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्यास देईल किंवा कलम १९१ अन्वये त्याने तारण दिले असेल तर, अशी विक्री थांबविण्यात आली पाहिजे.

जंगम मालमत्तेची विक्री कायम केली जाण्यास केव्हा पात्र असेल.

१९८. नाश होणाऱ्या वस्तूंची विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने अशी विक्री तात्काळ अंतिमरीत्या उरकली पाहिजे. जंगम मालमत्तेच्या इतर सर्व विक्र्या, असे विक्रीचे काम चालविणाऱ्या अधिकाऱ्याने याबाबतीत जिल्हाधिकाऱ्याने सर्वसामान्यपणे किंवा विशेषरीत्या दिलेल्या आदेशामध्ये निदेश दिल्याप्रमाणे अंतिमरीत्या उरकल्या पाहिजेत किंवा त्या कायम केल्या जाण्यास पात्र असतील. कायम केल्या जाण्यास पात्र असलेल्या विक्र्यांच्या बाबतीत, अशा विक्र्या कोणी कायम कराव्यात त्याबद्दल जिल्हाधिकाऱ्याने निदेश दिला पाहिजे.

विक्री अंतिमरीत्या उरकण्यात आली असेल तेव्हा जंगम मालमत्तेबद्दल रक्कम देण्याची रीत.

१९९. विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने अशी विक्री अंतिमरीत्या उरकण्यात आली असेल तेव्हा, प्रत्येक गटाची किंमत विक्रीच्या वेळी किंवा त्यानंतर उक्त अधिकारी निदेश देईल त्यावेळी दिली पाहिजे, आणि अशी रक्कम देण्यात कसूर केल्यास मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात आली पाहिजे व तिची विक्री करण्यात आली पाहिजे. खरेदीचा पैसा देण्यात आल्यानंतर विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याने त्याबद्दल पावती दिली पाहिजे [1] ["आणि कलम २०६ अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर किंवा करण्यात आला असून तो नामंजूर करण्यात आला असेल तर विक्रीच्या तारखेपासून सात दिवसांची मुदत संपल्यावर विक्री सर्व इसमांच्या बाबतीत कायम होईल"].

विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा रक्कम देण्याची रीत.

२००. (१) जेव्हा विक्री कायम केली जाण्यास पात्र असेल तेव्हा, खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या पक्षकारास, त्याने बोली केलेल्या रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम तावडतोब अनामत ठेवण्यास भाग पाडले पाहिजे, आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यात कसूर केल्यास ती मालमत्ता तावडतोब विक्रीसाठी पुन्हा काढण्यात आली पाहिजे व तिची विक्री करण्यात आली पाहिजे.

---

[1] "आणि कलम २०६ अन्वये विक्री रद्द करण्यात आली नसेल तर विक्रीच्या तारखेपासून सात दिवसानंतर सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल". या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम ८ याच्या कलम ६ द्वारे दाखल केला.

(२) खरेदीदाराने खरेदीची पूर्ण रक्कम, त्यास विक्री कायम करण्यात आल्याचे कळविण्यात आल्यानंतर तिसऱ्या दिवसाच्या सूर्यास्तापूर्वी, किंवा उक्त तिसरा दिवस रविवार किंवा इतर प्राधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर अशा दिवसानंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सूर्यास्तापूर्वी दिली पाहिजे. खरेदीच्या पैशाची अशी पूर्ण रक्कम देण्यात आल्यावर खरेदीदारास त्याबद्दल पावती दिली पाहिजे, [1][आणि कलम २०६ अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा करण्यात आल्यावर तो नाकारण्यात आला असेल तर ती विक्रीच्या तारखेपासून सात दिवसानंतर सर्व व्यक्तींच्या बाबतीत कायम होईल].

२०१. स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या सर्व बाबतीत, खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या पक्षकारास, त्याने बोली केलेल्या रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम तात्काळ अनामत ठेवण्यास भाग पाडले पाहिजे, आणि अशी रक्कम अनामत ठेवण्यास कसूर केल्यास, उक्त मालमत्ता ताबडतोब पुन्हा विक्रीसाठी काढण्यात आली पाहिजे व तिची विक्री करण्यात आली पाहिजे.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत खरेदीदाराने रक्कम अनामत ठेवणे.

२०२. खरेदीदाराने खरेदीची संपूर्ण रक्कम स्थावर मालमत्तेची विक्री ज्या तारखेस झाली असेल त्या तारखेपासून दोन महिन्यांची मुदत संपण्यापूर्वी किंवा विक्री कायम केल्याची सूचना खरेदीदारास ज्या तारखेस मिळाली असेल त्या तारखेपासून पंधरा दिवसांची मुदत संपण्यापूर्वी यापैकी जी मुदत अगोदरची असेल त्या मुदतीपूर्वी दिली पाहिजे :

खरेदीची रक्कम केव्हा द्यावयाची.

परंतु, खरेदीची रक्कम ज्या दिवशी घ्यावयाची असेल तो शेवटचा दिवस हा, रविवार किंवा इतर प्राधिकृत सुट्टीचा दिवस असेल तर, अशा दिवसाच्या नंतरच्या पहिल्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवसाच्या सूर्यास्तापूर्वी अशी रक्कम दिली पाहिजे.

२०३. खरेदीच्या पैशाची संपूर्ण रक्कम—मग ती जंगम मालमत्तेची असो वा स्थावर मालमत्तेची असो,—विहित केलेल्या मुदतीत देण्यात कसूर केल्यास अनामत ठेवलेल्या रकमेतून विक्रीचा खर्च भागविण्यात आल्यानंतर, शिल्लक अनामत रक्कम सरकारजमा करण्यात आली पाहिजे, आणि अशा मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात आली पाहिजे, आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेवरील सर्व हक्क किंवा ज्या रकमेस ती त्यानंतर विकली जाईल त्या रकमेच्या कोणत्याही हिश्श्याबाबतचे सर्व हक्क नाहीसे होतील.

कसूर केल्याचा परिणाम.

२०४. अशा कसूर करणाऱ्या खरेदीदाराने बोली केलेल्या किंमतीपेक्षा शेवटी जी विक्री करण्यात आली असेल त्या विक्रीचे उत्पन्न कमी असेल तर, त्यात जो फरक येईल तितकी रक्कम जिल्हाधिकाऱ्याने जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे त्याच्याकडून वसूल केली पाहिजे.

पुन्हा विक्री केल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल खरेदीदाराची जबाबदारी.

२०५. खरेदीचा पैसा देण्यात कसूर करण्यात आलेल्या मालमत्तेची प्रत्येक फेरविक्री ही, अशी फेरविक्री ताबडतोब करण्यात आली असेल त्याखेरीज, मूळ विक्रीसाठी विहित केलेल्या रीतीने नवीन नोटीस दिल्यानंतर केली पाहिजे.

पुन्हा विक्री करण्यापूर्वी अधिसूचना.

२०६. नाश होणाऱ्या वस्तूंखेरीज इतर जंगम मालमत्तेच्या विक्रीसंबंधी प्रसिद्धी करताना किंवा ती विक्री पार पाडताना काही महत्त्वाची नियमबाह्यता किंवा चूक झाल्यामुळे एखाद्या इसमास बरेच नुकसान पोहचले आहे असे त्या इसमाने (विक्रीच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत केलेल्या अर्जावरून) जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध केले असेल तर, त्या कारणास्तव अशी विक्री रद्द करता येईल.

जंगम मालमत्तेची विक्री रद्द करणे.

---

[1] हा मजकूर सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम ३० याच्या कलम ७ द्वारे जादा समाविष्ट करण्यात आला. (परिशिष्ट ३७ पहा.)

स्थावर मालमत्तेची विक्री रद्द करण्या-साठी अर्ज.

२०७. (१) स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, अशा विक्रीसंबंधी प्रसिद्धी करताना किंवा ती पार पाडताना काही महत्वाची नियमबाह्यता किंवा चूक, किंवा अफरातफर झाली आहे या कारणावरून ती विक्री रद्द करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येतील ; परंतु, कलमे २०८, २०९ आणि २१० यामध्ये अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून अशा कोणत्याही नियमबाह्यतेमुळे किंवा चुकीमुळे त्याला बरेच नुकसान पोहचले आहे असे अर्जदाराने जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने सिद्ध केले नसेल तर अशा कोणत्याही नियमबाह्यतेच्या किंवा चूक झाली असल्याच्या कारणास्तव कोणतीही विक्री रद्द करता कामा नये.

(२) असा अर्ज संमत झाला असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने विक्री रद्द केली पाहिजे, आणि नवीन विक्रीबाबत निदेश दिला पाहिजे.

विक्री कायम करणारा किंवा ती रद्द करणारा आदेश.

२०८. विक्रीच्या तारखेपासून तीस दिवसाची मुदत संपल्यानंतर, कलम २०७ मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे असा कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आला असेल परंतु फेटाळण्यात आला असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने विक्री कायम करणारा आदेश दिला पाहिजे :

परंतु, असा कोणताही अर्ज करण्यात आला नसला तरीही, किंवा जो अर्ज फेटाळण्यात आला असेल अशा कोणत्याही अर्जात दिलेल्या कारणाखेरीज इतर कारणावरुन अशी विक्री रद्द केलीच पाहिजे असे त्यास सकारण वाटत असेल तर त्याच्या कारणांची लेखी नोंद केल्यानंतर, त्यास विक्री रद्द करता येईल.

विशिष्ट परिस्थितीत खरेदीदारास विक्री रद्द करण्यासाठी अर्ज करता येईल.

''२०९. जी थकबाकी जमिनीवरील भार असेल अशा थकबाकीबद्दल जमीन विकण्यात आली असेल ती बाबखेरीजकरुन, खरेदीदारास, विकण्यात आलेल्या मालमत्तेत कसूर करणाऱ्या इसमाचे विक्रीयोग्य, हितसंबंध नव्हते या कारणावरून विक्री रद्द करण्यासाठी, विक्रीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या मुदतीत कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल ; आणि जिल्हाधिकाऱ्याने योग्य ती चौकशी केल्या-नंतर, अशा अर्जावर, त्यास योग्य वाटतील असे आदेश दिले पाहिजेत.

मालमत्तेची मालकी असणाऱ्या किंवा त्यात हितसंबंध धारण करणाऱ्या इसमाने विक्री रद्द करण्या-साठी करावयाचा अर्ज.

२१०. (१) या अधिनियमान्वये स्थावर मालमत्ता विकण्यात आली असेल तेव्हा, अशा विक्रीच्या पूर्वी संपादन केलेल्या मालकी हक्कामुळे अशा मालमत्तेची मालकी असलेल्या किंवा त्यात हितसंबंध धारण करणाऱ्या, कोणत्याही इसमास, अशा विक्रीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या मुदतीत कोणत्याही वेळी पुढीलप्रमाणे रक्कम अनामत ठेवल्यानंतर विक्री रद्द करण्यात यावी म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल—

(अ) खरेदीच्या किंमतीच्या शेकडा पाच टक्के इतकी रक्कम खरेदीदारास देण्यासाठी ;

(ब) ज्या रकमांच्या वसुलीसाठी विक्री करण्याचा आदेश देण्यात आला होता, अशा, उद्घोषणेत निर्दिष्ट केलेल्या रकमांतून विक्रीच्या तारखेपासून त्यासंबंधात देण्यात आली असेल अशी कोणतीही रक्कम वजाकरून, थकबाकीची रक्कम देण्यासाठी ; आणि

(क) विक्रीच्या खर्चाची रक्कम.

(२) विक्रीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या मुदतीत अशी अनामत रक्कम ठेवण्यात आली असेल तर, जिल्हाधिकाऱ्याने अशी विक्री रद्द करण्याचा आदेश दिला पाहिजे.

विक्री रद्द करण्यात आली असेल तेव्हा अनामत रक्कम किंवा खरेदीची रक्कम परत करणे.

२११. जेव्हा कोणत्याही मालमत्तेची विक्री कायम करण्यात आली नसेल, किंवा ती रद्द करण्यात आली असेल तेव्हा खरेदीदारास यथास्थिती, त्याची अनामत रक्कम किंवा त्याची खरेदीची रक्कम आणि कलम २१०, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये अनामत ठेवलेल्या खरेदीच्या रकमेच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम परत मिळण्याचा हक्क असेल.

२१२. कोणत्याही भोगाधिकाराची किंवा धारण केलेल्या दुमाला जमिनीची विक्री उपरोक्त रीतीने कायम केल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याने खरेदीदार म्हणून जाहीर केलेल्या इसमास अशा जमिनीचा ताबा[८६] दिला पाहिजे आणि कसूर करणाऱ्या इसमाच्या नावाऐवजी, त्याचे नाव भोगवटा करणारा किंवा जमीन धारण करणारा म्हणून, भूमि अभिलेखात दाखल केले जाण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि त्यास एक प्रमाणपत्र दिले पाहिजे व उक्त प्रमाणपत्र ज्या जमिनीच्या संबंधात असेल ती जमीन त्याने खरेदी केली आहे असे त्यामध्ये निर्दिष्ट केले पाहिजे. विक्री कायम करण्यात आल्यावर खरेदीदारास ताबा देणे ; खरेदीचे प्रमाणपत्र.

टीप ८६ :—कृपया कलम ९ खालील टीप ७-अ पहा.

२१३. विक्रीच्या वेळी प्रत्यक्ष खरेदीदार म्हणून ज्यास जाहीर करण्यात आले असेल त्या इसमाचे नाव प्रमाणपत्रात नमूद केले पाहिजे. कबुलायतीअन्वये प्रमाणित खरेदीदाराच्या नावाचा उपयोग केला असला तरी प्रमाणित खरेदीदाराऐवजी दुसऱ्या इसमाच्या वतीने खरेदी झाली आहे या कारणास्तव प्रमाणित खरेदीदाराविरुद्ध दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आलेला कोणताही दावा काढून टाकण्यात येईल. प्रमाणित खरेदीदारावरा दावा करण्यास मनाई.

२१४. (१) या प्रकरणान्वये जंगम मालमत्तेची कोणतीही विक्री अबाधित झाली असेल आणि स्थावर मालमत्तेची कोणतीही विक्री कायम करण्यात आली असेल तेव्हा, विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग विक्रीचा खर्च भागविण्यासाठी आणि अशी विक्री कायम केल्याच्या तारखेस कसूर करणाऱ्या इसमांकडून येणे असेल अशी व जमीनमहसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याजोगी असेल अशी कोणतीही बाकी आणि जमीनमहसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, कसूर करणाऱ्या इसमाकडून, वसूल करण्याजोगी आणि अशी विक्री कायम करण्यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यास कळविलेली इतर कोणतीही रक्कम भागविण्यासाठी करता येईल, आणि शिल्लक रक्कम, कोणतीही असल्यास, ज्याची मालमत्ता विकण्यात आली असेल अशा इसमास देण्यात आली पाहिजे. विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग.

(२) राज्य सरकारच्या आदेशान्वये आयुक्त वेळोवेळी जे दर व आदेश मंजूर करील अशा दरांनी व त्या आदेशानुसार विक्रीच्या खर्चाचा अंदाज करण्यात आला पाहिजे.

२१५. उक्त शिल्लक राहिलेली रक्कम ही दिवाणी न्यायालयाच्या आदेशाखेरीज, ज्या इसमाची मालमत्ता विकण्यात आली आहे अशा इसमाच्या कोणत्याही धनकोस देय होणार नाही. शिल्लक राहिलेली रक्कम न्यायालयाच्या आदेशाखेरीज-करून धनकोस देता कामा नये.

२१६. कलम १६८ मध्ये काहीही असले तरी, मालकी हक्काच्या प्रमाणपत्रात, खरेदीदार म्हणून, ज्या इसमाचे नाव नमूद करण्यात आले असेल तो इसम, विक्रीच्या तारखेपूर्वीच्या कोणत्याही मुदतीसाठी, उक्त जमिनीच्या संबंधात देणे असलेल्या जमीन महसुलीसाठी पात्र असणार नाही. प्रमाणित खरेदीदारच केवळ त्यानंतर देय असेल अशा जमीन महसुलास पात्र असणे.

२१७. या विभागाच्या उपबंधान्वये स्थावर मालमत्ता विकण्यात येईल आणि अशी विक्री कायम करण्यात येईल त्याबाबतीत विक्री कायम करण्यात येईल त्या तारखेस नव्हे तर उक्त मालमत्ता ज्या तारखेस विकण्यात आली असेल त्या तारखेस ती खरेदीदाराकडे निहित झाल्याचे समजण्यात येईल. खरेदीदाराचा हक्क.

जप्त केलेल्या मालमत्तेशी संबंध असलेल्या हक्कांची विल्हेवाट कशी लावावयाची ते.

२१८. (१) जप्त केलेल्या किंवा कारवाई केलेल्या मालमत्तेवर जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधांन्वये, जर एखाद्या तिसऱ्या इसमाने कोणताही हक्क सांगितला असेल, तर, जिल्हाधिकारी, वाजवी नोटीस [८७] दिल्यानंतर, रीतसर चौकशी करून, उक्त हक्क मान्य करील किंवा तो नाकारील.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्याचेविरुद्ध आदेश देण्यात आला असेल अशा इसमास, आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, जप्त करण्यात आलेल्या किंवा कारवाई करण्यात आलेल्या ज्या मालमत्तेवर तो हक्क सांगत असेल तो हक्क प्रस्थापित करण्याकरिता दावा करता येईल ; परंतु अशा दाव्याच्या निर्णयास अधीन राहून, असा आदेश अंतिम असेल.

**टीप ८७.**—कृपया कलम ९ खालील टीप ७-अ पहा.

विक्रीच्या वगैरे वेळी बोली बोलण्यास महसूल अधिकाऱ्यास प्रतिबंध.

२१९. कलम २२० मध्ये जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, कोणत्याही विक्रीच्या संबंधात ज्यास कोणतेही कर्तव्य करावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर इसमाने विकण्यात आलेल्या मालमत्तेसाठी, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, बोली बोलता कामा नये, तीमध्ये कोणताही हितसंबंध संपादन करता कामा नये किंवा संपादन करण्याचा प्रयत्न करता कामा नये.

नाममात्र बोलीवर खरेदी करणे.

२२०. या प्रकरणाच्या उपबंधांन्वये केलेल्या कोणत्याही विक्रीमध्ये कोणीही बोली बोलणारा इसम नसेल किंवा करण्यात आलेली बोली अपुरी किंवा नाममात्र असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकारच्या वतीने अशी मालमत्ता, त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यापैकी कोणत्याही अधिकाऱ्यास, असा दुय्यम अधिकारी बोली करील अशा बोलीवर, खरेदी करण्यासाठी अधिकृत करणे वैध असेल :

परंतु, अशा रीतीने खरेदी करण्यात आलेली मालमत्ता ही त्यानंतर, खरेदी केल्यापासून बारा वर्षांच्या आत, राज्य सरकारकडून विकण्यात येईल तर, विक्रीपासून मिळालेल्या उत्पन्नातून पुढील रकमा वसूल करण्यात येतील आणि त्यानंतर रक्कम शिल्लक राहिल्यास ती, ज्या इसमाची मालमत्ता विकण्यात आली असेल त्या इसमास देण्यात येईल :—

(अ) देणे असलेली रक्कम, म्हणजेच, व्याजासहित बाकी असलेली मुद्दलाची रक्कम ;

(ब) राज्य सरकारकडे जमीन असताना आणि कोणत्याही इसमाने ती पट्ट्याने किंवा अन्यथा घेतली नसेल त्या कालावधीमध्ये राज्य सरकारचे महसूलविषयक कोणतेही नुकसान झाले असेल तर, असे नुकसान ;

(क) लिलावातील विक्रीमध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च ;

(ड) मुद्दलाच्या एक-चतुर्थांश रकमेबरोबरची शास्ती :

तसेच, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे, जर तदनंतर मालमत्ता विकण्यात आली नसेल तर, उक्त मालमत्ता ही, मागील परंतुकामध्ये निर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणेच्या रकमा कसूर करणाऱ्या इसमाने दिल्यानंतर, राज्य सरकारच्या वतीने ती खरेदी करण्यात आल्याच्या तारखेपासून बारा वर्षे मदतीच्या आत कोणत्याही वेळी, उक्त कसूर करणाऱ्या इसमास परत करण्यास येईल किंवा यथास्थिती शासनाने ती खरेदी करण्याच्या लगतपूर्वी त्याने ज्या सत्ताप्रकारावर ती धारण केली होती त्या सत्ताप्रकारावर त्यास देण्यात येईल.

या प्रकरणाच्या उपबंधान्वये वसूल करता येईल अशी रक्कम.

२२१. (१) (अ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या जमीन महसुला-संबंधीच्या कोणत्याही अधिनियमान्वये देण्याजोगा किंवा बसविता येण्याजोगा असेल असा जमीन महसूल खंड, उक्त धारा (क्वीट रेंट), नझराणा, वारसा, शुल्क, हस्तांतरण शुल्क आणि जप्त्या, उपकर, जमिनी-पासूनचे नफे, उपलब्ध फी, आकार खंड, शास्ती, पाणीपट्टी, स्वामीत्वशुल्क, खर्च याबद्दल देणे असलेल्या सर्व रकमा ;

(ब) कोणताही कर, शुल्क, उपकर किंवा फी किंवा महसुलाची कोणतीही इतर बाब यांच्या मक्त्याबाबत कोणत्याही कंत्राटदाराकडून येणे असलेला सर्व पैसा आणि असा कोणताही कंत्राटदार, त्याच्या कबुलायतीच्या अटीअन्वये ज्या आर्थिक स्वरूपाच्या शास्तीस पात्र होईल त्या सर्व विशिष्ट आर्थिक स्वरूपाच्या शास्ती ;

(क) या अधिनियमान्वये, किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा सरकारबरोबर केलेल्या कोणत्याही कबुलायतीद्वारे किंवा संविदेद्वारे आकारणी म्हणून किंवा महसुली मागणी म्हणून किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून जाहीर केलेल्या सर्व रकमा ; या प्रकरणाच्या पूर्ववर्ती उपबंधान्वये आकारण्यात येतील आणि या प्रकारचे सर्व उपबंध हे शक्य तेथवर, त्यास लागू होतील.

(२) पोट-कलम (१), खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणताही मक्ता परत घेण्यात येईल त्या बाबतीत, कोणत्याही इसमाला, कंत्राटदाराला त्याने परत मिळण्याच्या अपेक्षेसह ज्या कोणत्याही रकमा दिल्या असतील त्या रकमाबद्दल कोणतीही रक्कम मिळण्याचा अधिकार असणार नाही.

२२२. ज्या कोणत्याही इसमाला कोणत्याही शेतीच्या प्रयोजनाकरिता राज्य सरकारकडून, अनुदानाच्या शर्तींपैकी, कोणत्याही शर्तीचे पालन करण्यात त्याने कसूर केल्यास तो ते अनुदान परत करील या शर्तीला आधीन राहून, मोफत अनुदान मिळाले असेल त्या इसमाने, अशा कोणत्याही शर्तीचे पालन करण्यास आणि उक्त रक्कम राज्य सरकारला परत करण्यात कसूर केल्यास, तो, या प्रकरणाच्या उपबंधान्वये महसूल देण्यात कसूर करणाऱ्या इसमाप्रमाणे त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल ; आणि या प्रकरणाचे सर्व उपरिनिर्दिष्ट उपबंध, शक्य असेल तेथवर, अशा इसमास लागू असतील. मोफत अनुदानांचा दुरुपयोग केल्यास, महसुलाच्या थकबाकीप्रमाणे ती वसूल करणे.

२२३. जो कोणताही इसम या अधिनियमाच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधान्वये, किंवा ज्या कोणत्याही अनुदानान्वये, पट्टयान्वये किंवा संविदेअन्वये जिच्याबद्दल जामीन दिला आहे अशी रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, मूळ देणेकऱ्याकडून वसूल करण्यासारखी असेल त्या अनुदानान्वये, पट्टयान्वये किंवा संविदेअन्वये, जामीन राहिला असेल असा, कलम २२१, पोटकलम (१), खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेला कंत्राटदार धरून, प्रत्येक इसम त्याच्या जमानतनाम्यातील शर्तीप्रमाणे जी रक्कम भरणा करण्यास पात्र झाला असेल ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग भरणा करण्यात कसूर करील तर, या अधिनियमाच्या उपबंधान्वये, तो महसूल देण्यात कसूर करणाऱ्या इसमाप्रमाणे, त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास पात्र ठरेल; आणि अशा इसमाला या विभागाचे सर्व उपरिनिर्दिष्ट उपबंध, शक्य असेल तेथवर, लागू असतील. जामिनाकडून पैशाची वसुली करणे.

# प्रकरण १२

## महसूल अधिकाऱ्यांची कार्यपद्धती

**महसूल अधिकारी कोणाचे अधीन असतील ते.** २२४. कार्यालयाची सर्व कामे करण्यात व कामकाज चालविण्यात महसूल अधिकारी हा, विधीमध्ये किंवा त्या अन्वयेच्या कोणत्याही नियमात एतद्‌विरुद्ध कोणतीही स्पष्ट तरतूद केली नसेल तर, ज्या अधिकाऱ्याच्या हाताखाली तो काम करीत असेल अशा अधिकाऱ्याने काम करण्याचे ठिकाण, वेळ व कामे पार पाडण्याची रीत याबाबत त्याने दिलेल्या निदेशांस व नियंत्रणास अधीन असेल.

**प्रकरण हस्तांतरित करण्याची शक्ती.** २२५. न्यायाच्या उद्देशाकरिता या कलमान्वये आदेश देणे इष्ट आहे असे जर राज्य सरकारला दिसून येईल तर, त्यास कोणतेही विशिष्ट प्रकरण, एका महसूल अधिकाऱ्याकडून काढून त्याच जिल्ह्यातील किंवा कोणत्याही अन्य जिल्ह्यातील त्याच दर्जाच्या किंवा वरिष्ठ दर्जाच्या महसूल अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्याबद्दल निदेश देता येईल.

**अधीन असणाऱ्या अधिकाऱ्यांकडून किंवा त्यांच्याकडे प्रकरणे हस्तांतरित करण्याची शक्ती.** २२६. (१) आयुक्त, जिल्हाधिकारी, उप-विभागीय अधिकारी किंवा तहसिलदार यांस, या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, आपल्या स्वतःच्या फाईलवरून काढून त्या प्रकरणाचा अथवा प्रकरणांच्या वर्गाचा निकाल करण्यास सक्षम असेल अशा आपल्या अधीन असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे निकालाकरिता पाठविण्याचा किंवा अशा कोणत्याही महसूल अधिकाऱ्यापासून कोणतेही प्रकरण अथवा प्रकरणांचा वर्ग काढून घेण्याचा आणि त्याचा स्वतः निकाल करण्याचा किंवा त्यांचा निकाल करण्याचा सक्षम असलेल्या अन्य कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे असे प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, निकालाकरिता पाठविता येईल.

(२) आयुक्त, जिल्हाधिकारी, उप-विभागीय अधिकारी किंवा तहसिलदार यास, या अधिनियमाच्या उपबंधान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये उद्‌भवणारे कोणतेही प्रकरण किंवा प्रकरणांचा वर्ग, आपल्या फाईलवरून काढून आपल्या अधीन असलेल्या कोणत्याही महसूल अधिकाऱ्यांकडे चौकशी व प्रतिवेदनाकरिता हस्तांतरित करता येईल.

**पुरावा देण्यासाठी व दस्तऐवज सादर करण्यासाठी आज्ञापत्र काढून इसमांना बोलावण्याची शक्ती.** २२७. (१) त्यांच्या त्यांच्या विभागामध्ये अव्वल कारकुनाच्या किंवा जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख यांच्याहून कमी दर्जाचा नाही अशा त्या त्या खात्यातील प्रत्येक महसूल अधिकाऱ्यास किंवा, भूमापन अधिकाऱ्यास, जी चौकशी करण्याचा त्यास वैध अधिकार आहे अशा कोणत्याही चौकशीत, पक्षकार म्हणून तपासणी करण्यासाठी किंवा साक्षीदार म्हणून पुरावा देण्यासाठी जो इसम हजर राहणे किंवा त्याने दस्तऐवज सादर करणे त्यास आवश्यक वाटेल अशा इसमास, आज्ञापत्र काढून बोलाविण्याचा अधिकार असेल; दस्तऐवज सादर करण्यासाठी दिलेले आज्ञापत्र हे, विवक्षित निर्दिष्ट केलेले लेख किंवा आज्ञापत्र काढून बोलाविण्यात आलेल्या इसमांच्या ताब्यातील विशिष्ट प्रकारचे सर्व दस्तऐवज सादर करण्यासाठी म्हणून देता येईल.

(२) दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (१९०८ चा अधिनियम ५ वा) ची कलमे १३२ आणि १३३ यांच्या उपबंधांना अधीन राहून, अशा रीतीने आज्ञापत्र काढून बोलाविण्यात आलेल्या सर्व इसमांनी असा अधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे, जातीने किंवा अधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर राहणे बंधनकारक असेल.

(३) अशा रीतीने ज्या इसमांना आज्ञापत्र काढून बोलविण्यात आले असेल अशा सर्व इसमांनी त्यांची ज्या गोष्टीसंबंधाने तपासणी करण्यात येईल किंवा ज्या गोष्टीसंबंधात ते निवेदने करतील अशा गोष्टींबाबत खरी माहिती व आवश्यक असतील असे लेख व इतर वस्तू सादर करणे बंधनकारक असेल.

**आज्ञापत्रे लेखी सही केलेली व शिक्का असलेली असणे; आज्ञापत्रांची बजावणी.** २२८. (१) प्रत्येक आज्ञापत्र" लेखी असले पाहिजे व त्याची दुसरी प्रत ठेवण्यात आली पाहिजे व ते ज्या कारणासाठी काढण्यात आले असेल ते कारण त्यात निर्दिष्ट केले पाहिजे आणि ते जारी करणाऱ्या अधिकाऱ्याने त्यावर सही केली पाहिजे आणि जर त्याचा शिक्का असेल तर तो शिक्का त्यावर असला पाहिजे.

(२) ज्या इसमास बोलाविण्यात आले असेल अशा इसमास आज्ञापत्र देऊन किंवा ते त्याच्या स्वाधीन करून किंवा जर तो सापडत नसेल तर, त्याच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणाच्या कोणत्याही ठळकस्थानी त्याची प्रत लावून, ते बजाविण्यात येईल.

(३) जर त्याचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण दुसऱ्या जिल्हयात असेल तर, उक्त जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याकडे आज्ञापत्र पोस्टाने पाठविण्याचा अधिकार आहे व त्याने, पोट-कलम (२) च्या उपबंधानुसार ते बजावले पाहिजे.

**टीप ८८.**—कलम २३० खालील टीप ८९ पहा (नियम २ पहा).

२२९. ज्यास साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्यास किंवा लेख हजर करण्यास बोलाविण्यात आले असेल असा इसम, त्या आज्ञापत्राचे पालन करण्यात कसूर करील तर, कलम २२७ अन्वये ज्याने आज्ञापत्र काढले असेल अशा अधिकाऱ्यास,— साक्षीदारास उपस्थित राहण्यास भाग पाडणे.

(अ) अटकेचे जामीनयोग्य अधिपत्र काढण्याचा ;

(ब) उपस्थित होण्याकरिता जामीन देण्याबद्दल त्यास आदेश देण्याचा ; किंवा

(क) पन्नास रुपयांहून अधिक नसेल इतका त्यास दंड करण्याचा ;

अधिकार असेल.

२३०. (१) या अधिनियमाच्या आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या[८९] उपबंधास अधीन राहून, या अधिनियमान्वयेची प्रत्येक नोटीस, ती ज्या इसमावर बजावावयाची असेल अशा इसमास किंवा त्याच्या अधिकृत अभिकर्त्यास तिची एक प्रत देऊन किंवा स्वाधीन करून किंवा अशी प्रत, डाकेने पाठवून, बजाविता येईल किंवा उपरिनिर्दिष्ट रीतीने ती बजाविता येत नसेल तर, त्याच्या माहिती असलेल्या शेवटच्या राहण्याच्या जागी किंवा नोटीस ज्या जमिनीसंबंधात असेल ती जमीन ज्या गावामध्ये असेल किंवा ज्या गावात उक्त जमिनीची लागवड करण्यात येत असेल त्या गावातील सार्वजनिक ठिकाणी, कोणत्याही जागी उक्त प्रत चिकटवून, ती बजाविता येईल. नोटिसा बजाविण्याची रीत.

(२) अशी कोणतीही नोटीस, त्यामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही इसमाच्या नावामध्ये किंवा पदनामामध्ये किंवा कोणत्याही जमिनीच्या वर्णनामध्ये, कोणतीही चूक झाल्यामुळे, अशा चुकीमुळे वास्तविक अन्याय झाला नसेल तर, निरर्थक झाली आहे असे समजता कामा नये.

**टीप ८९.**—महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीसंबंधीचे नियम (नियम ३ पहा).

## महसूल अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीसंबंधीचे नियम

[ शासकीय अधिसूचना क्रमांक युएनएफ-२४६७-आर, दिनांक २१-८-६७. ]

१. **संक्षिप्त नांव.**—या नियमास महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल अधिकाऱ्यांची कार्यपद्धति) नियम १९६७ असे म्हणावे.

२. **समन्स बजावण्याची पद्धती.**—जेथे समन्य बजावणारी व्यक्ती ते समन्स बजावावयाच्या व्यक्तीला त्याची प्रत देऊन किंवा स्वाधीन करुन समन्स बजावते तेव्हा त्याला मूळ समन्सवर बजावण्याची पोच म्हणून प्रत दिलेल्या किंवा स्वाधीन केलेल्या व्यक्तीची सही किंवा आंगठ्याचा साक्षांकित ठसा घ्यावा लागेल.

(२) समन्स हे समन्स काढलेल्या व्यक्तीच्या नेहमीच्या निवासस्थानाच्या एखाद्या ठळक भागी त्याची प्रत चिकटवून बजावले असेल तर समन्स बजावणारी व्यक्ती, समन्सची मूळ प्रत ज्याने ते काढले असेल त्या महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्याला त्यावर लिहिलेल्या किंवा त्याला जोडलेल्या अहवालासह परत करील व त्या अहवालात त्याने प्रत चिकटवली आहे हे ज्या परिस्थितीत त्याने तसे केले ती परिस्थिती व ज्या व्यक्तीच्या समक्ष त्याने ती प्रत चिकटवून समन्स बजावले त्या व्यक्तीचे नांव व पत्ता नमूद करील. ज्याच्या समक्ष हे केले असेल त्या व्यक्तीची त्या अहवालावर सही असेल.

३. **प्राधिकृत अभिकर्त्याला नोटीस देण्याची पद्धती.**—(१) अधिनियमान्वये ज्यावर नोटीस बजावण्याची तो प्राधिकृत अभिकर्ता विधी व्यवसायी असेल तर नोटिशीची एक प्रत त्याच्या कार्यालयांत किंवा त्याच्या निवासस्थानाच्या नेहमीच्या जागी ठेवून नोटीस बजावता येईल. आणि अशी नोटीस बजावणे प्राधिकृत अभिकर्त्याला व्यक्तिशः नोटीस देण्याइतकेच परिणामकारक मानण्यात येईल.

(२) ज्यावर नोटीस बजावावयाची असेल ती व्यक्ती मिळत नसेल व त्या व्यक्तीला कोणताही प्राधिकृत एजंट नसेल तर अशा व्यक्तीच्या त्याच्या बरोबर राहणाऱ्या कुटुंबातील कोणत्याही सज्ञान व्यक्तीवर नोटीस बजावता येईल.

स्पष्टीकरण.—या पोट नियमाच्या प्रयोजनार्थ नोकराला ज्याच्यावर नोटीस बजावयाची त्या इसमाच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून मानता येणार नाही.

(३) ज्याच्यावर नोटीस बजावयाची त्या व्यक्तीला किंवा त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्याला व्यक्तिशः [illegible], मूळ नोटिशीवर [illegible] पोच म्हणून [illegible] सही [illegible] किंवा आंगठ्याचा ठसा घ्यावा लागेल.

(४) नोटीस ही ज्या व्यक्तीवर ती बजावावयाची त्या व्यक्तीला राहण्याच्या शेवटी ज्ञात असलेल्या ठिकाणी तिची प्रत चिकटवून बजावली असेल तर नोटीस बजावणारी व्यक्ती नोटिशीची मूळ प्रत ज्याने ती काढली असेल त्या अधिकाऱ्याकडे [illegible] किंवा त्याला [illegible] अहवालासह परत करील व त्या अहवालात त्याने अशा प्रकारे प्रत [illegible] आहे, ज्या परिस्थितीत त्याने तसे केले ती परिस्थिती व ज्या व्यक्तीच्या समक्ष त्याने ती प्रत चिकटवली त्या व्यक्तीचे नाव व पत्ता आणि ज्या व्यक्तीवर नोटीस बजावावयाची आहे त्या व्यक्तीच्या अंतिम ज्ञात असलेल्या राहण्याच्या ठिकाणी प्रत चिकटवली असेल तर अहवालात [illegible] ओळखणे त्या व्यक्तीचे नाव व पत्ताही असेल आणि त्यावर ज्याच्या समक्ष नोटीस बजावण्यात आली त्या व्यक्तीची किंवा ज्याच्याकडून घर ओळखण्यात आले त्या व्यक्तीची सही असेल.

साक्षीदारांना हजर करण्या-विषयीची कार्यरीती.

२३१. रीतसर किंवा संक्षिप्तरीत्या तपास चालवून करण्यात आलेल्या कोणत्याही चौकशीत कोणत्याही पक्षकारास साक्षीदारांना हजर करण्याची इच्छा असेल तर, त्याने दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (१९०८ चा अधिनियम क्रमांक ५) अन्वये साक्षीदार हजर राहण्यासाठी पक्षकारांनी अर्ज करण्याबद्दल जी कार्यपद्धती विहित[९०] करण्यात आली असेल त्या कार्यरीतीचे अनुसरण केले पाहिजे.

टीप ९०.—शासकीय परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक यूएनएफ्-२४६०-आर, दिनांक २७ एप्रिल १९६८ अन्वये शासनाने निदेश दिला आहे की,

(परिशिष्ट २३ पहा)

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाच्या उपबंधान्वये चौकशी करणाऱ्या महसूल अधिकाऱ्याने आकारावयाची आदेशिका फी, मुंबईच्या उच्च न्यायालयाने काढलेली दिवाणी नियम पुस्तिका खंड एकच्या प्रकरण बावीसमध्ये विहित केलेल्या प्रमाणानुसार आकारण्यात येईल. (परिशिष्ट ३४ पहा).

आणि

(२) एखादी रितसर किंवा संक्षिप्त चौकशी चालू असतांना महसूल अधिकाऱ्यांसमोर उभे रहाणाऱ्या साक्षीदारांचा भत्ता, दिवाणी नियम पुस्तिका, खंड एकच्या प्रकरण सात मधील नियमांत विहीत केलेल्या प्रमाणात देण्यात येईल (परिशिष्ट ३५ पहा).

पक्षकाराच्या अनुपस्थितीत सुनावणी करणे.

२३२. (१) कोणत्याही प्रकरणाच्या किंवा कामकाजाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास, जर महसूल अधिकाऱ्यास किंवा भूमापन अधिकाऱ्यास असे दिसून येईल की, आज्ञापत्र किंवा नोटीस देण्यासाठी आवश्यकता असलेला आदेशिका फी देण्यात, विरुद्ध पक्षकाराने कसूर केल्यामुळे कोणत्याही पक्षकारावर आज्ञापत्र किंवा नोटीस बजविण्यात आलेली नाही, तर उक्त प्रकरण किंवा कामकाज हे, अशी आदेशिका-फी देण्यात कसूर केल्यामुळे काढून टाकता येईल.

(२) महसूल अधिकाऱ्यापुढील किंवा भूमापन अधिकाऱ्यापुढील कोणत्याही प्रकरणातील किंवा कामकाजातील कोणताही पक्षकार, सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास उपस्थित राहिला नसेल तर त्या प्रकरणाची सुनावणी त्याच्या अनुपस्थितीत करता येईल आणि त्याचा निकाल करता येईल किंवा कसूर झाल्यामुळे ते प्रकरण काढून टाकता येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये ज्याच्याविरुद्ध कोणताही आदेश देण्यात आला असेल अशा पक्षकारास, कोणत्याही विरुद्ध पक्षकारावर आज्ञापत्र किंवा नोटीस बजावविण्यासाठी आवश्यक असलेली आदेशिका-फी देण्यास किंवा सुनावणी च्या वेळी उपस्थित राहण्यास कोणत्याही पुरेशा कारणामुळे त्यास प्रतिबंध झाला या कारणावरून उक्त आदेश रद्द करण्यासाठी म्हणून सदरहू आदेशाच्या दिनांका-पासून तीस दिवसांच्या आत अर्ज करता येईल आणि महसूल अधिकाऱ्यास किंवा भूमापन अधिकाऱ्यास सदरहू आदेश ज्या तारखेस काढण्यात आला त्या तारखेस उपस्थित असलेल्या विरुद्ध पक्षकारास नोटीस दिल्यानंतर व त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, काढण्यात आलेला सदरहू आदेश रद्द करता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये दाखल करण्यात आलेला अर्ज नाकारण्यात येईल त्याबाबतीत आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या पक्षकारास, सदरहू अधिकाऱ्याने दिलेल्या मूळ आदेशाविरुद्ध ज्याच्या-कडे अपील करता येते त्या प्राधिकाऱ्याकडे अपील करण्याचा अधिकार असेल.

(५) पोट-कलम (४) मध्ये तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्यासमोरील कोणत्याही प्रकरणाचा किंवा कामकाजाचा निकाल गैरहजेरीवरून करण्यात आला असेल तर असे प्रकरण गैरहजेरीवरून, या नियमान्वये दिलेल्या आदेशावर कोणतेही अपील करता येणार नाही.

२३३. (१) महसूल अधिकाऱ्यास किंवा भूमापन अधिकाऱ्यास, आपल्या समोरील प्रकरणांची किंवा कामकाजाची सुनावणी, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून, स्थगित करण्याचा अधिकार आहे. सुनावणी लांबणीवर टाकणे.

(२) प्रकरण किंवा कामकाजाची सुनावणी स्थगित करतेवेळी वेळी उपस्थित असलेल्या पक्षकारांस व साक्षीदारास, स्थगित केलेल्या प्रकरणांची किंवा कामकाजाची सुनावणीची तारीख व जागा कळविण्यात येईल.

२३४. (१) तपासणी किंवा चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने रीतसर केलेल्या सर्व चौकशीमध्ये पुराव्याची नोंद, संपूर्णपणे लेखी, मराठीमध्ये घेतली पाहिजे किंवा त्याच्या समक्ष सुनावणी करून आणि त्याच्या स्वतःच्या देखरेखीखाली व निदर्शनाखाली करण्यात आली पाहिजे व त्यावर त्याने सही केली पाहिजे. अधिकाऱ्याने, अशारीतीने घेतलेला पुरावा साक्षीदारास वाचून दाखविला पाहिजे किंवा वाचून दाखविण्याची व्यवस्था केली पाहिजे व तो बिनचूक असल्याचे निदर्शक म्हणून त्यावर त्याची सही घेतली पाहिजे. रीतसर चौकशीत पुरावा घेण्याची रीत.

(२) चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याने संपूर्ण पुरावा स्वतः लिहून न घेतल्याच्या बाबतीत, त्याने प्रत्येक साक्षीदाराच्या तपासणीचे काम चालू असताना, असा साक्षीदार जे सांगेल त्या मजकुराचे ज्ञापन तयार केले पाहिजे ; आणि असे ज्ञापन अशा अधिकाऱ्याने त्याच्या स्वतःच्या हाताने लिहिले पाहिजे त्यावर सही केली पाहिजे आणि ते अभिलेखाचा भाग होईल.

(३) वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशा अधिकाऱ्यास ज्ञापन करण्यास प्रतिबंध करण्यात आला असेल तर त्याने तसे न करण्याबद्दलचे कारण नमूद केले पाहिजे.

(४) जेव्हा पुरावा इंग्रजी भाषेत दिला जाईल तेव्हा, अशा अधिकाऱ्यास, तो, स्वतःच्या हाताने त्या भाषेत लिहून घेता येईल आणि त्याचा अधिप्रमाणित अनुवाद मराठीमध्ये तयार करण्यात येईल आणि तो अभिलेखाचा भाग होईल.

२३५. रीतसर चौकशीनंतरचा प्रत्येक निर्णय लेखी असला पाहिजे व तो देणाऱ्या अधिकाऱ्याने, त्यावर सही केलेली असली पाहिजे आणि तो ज्या कारणावरून देण्यात आला त्या कारणाचे संपूर्ण निवेदन त्यात असले पाहिजे. निर्णय लिहिणे व त्यांचे स्पष्टीकरण.

२३६. संक्षिप्त चौकशीमध्ये, महसूल अधिकाऱ्याने किंवा भूमापन अधिकाऱ्याने, अशी कोणतीही चौकशी चालू असतानाच्या कामकाजाच्या कार्यवृत्ताची नोंद, स्वतःच्या हाताने, इंग्रजीमध्ये किंवा मराठी-मध्ये, घेतली पाहिजे व तीत, संबंध असणाऱ्या पक्षकारांनी ज्या मुद्याच्या गोष्टी सांगितल्या असतील त्या गोष्टी, पुराव्यातील मुख्य भाग, निर्णय व त्याबद्दलची कारणे, दिली पाहिजेत ; संक्षिप्त चौकशी कशी करावयाची ते.

परंतु, एखादी चौकशी संक्षिप्त चौकशी असावी असे या अधिनियमात फर्माविले असेल ती चौकशी, रीतसर चौकशीस लागू असणाऱ्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही नियमान्वये चालविणे योग्य आहे असे उक्त अधिकाऱ्यास वाटेल तर त्याप्रमाणे, त्याने, ती कोणत्याही वेळी चालविणे हे विधिसंमत, असेल.

रीतसर व संक्षिप्त चौकशी कामकाज न्यायिक समजणे.

२३७. (१) ह्या अधिनियमान्वयेची रीतसर केलेली, किंवा संक्षिप्तरीत्या केलेली चौकशी ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ (१९६० चा अधिनियम, क्रमांक पंचेचाळीस.) च्या अर्थानुसार न्यायिक कामकाज म्हणून समजण्यात येईल व रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करणाऱ्या कोणत्याही प्राधिकाऱ्याचे कार्यालय हे, अशा चौकशीच्या कारणासाठी, दिवाणी न्यायालय आहे असे समजण्यात येईल.

(२) रीतसर किंवा संक्षिप्त चौकशीतील प्रत्येक सुनावणी व निर्णय, जाहीरपणे करण्यात येईल आणि पक्षकार किंवा त्यांचे अधिकृत अभिकर्ते यांना हजर रहाण्याबद्दल योग्य ती नोटीस देण्यात येईल.

सामान्य चौकशा कशा करावयाच्या ते.

२३८. या अधिनियमान्वये जी चौकशी, रीतसर किंवा संक्षिप्त रीतीने करणे आवश्यक नाही, किंवा कोणत्याही महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यास त्याची वैध कर्तव्ये बजावण्यासाठी, कोणत्याही प्रसंगी, करणे आवश्यक वाटेल ती चौकशी, राज्य सरकारने किंवा अशी चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्याने उक्त चौकशीस लागू असणारे जे सामान्य किंवा विशेष नियम विहित केले असतील त्या नियमानुसार केली पाहिजे व अशा नियमान्वये ज्या मर्यादेपर्यंत नियंत्रण ठेवण्यात आले असेल त्या मर्यादेस अधीन राहून, सर्व महत्त्वाच्या गोष्टींची खात्री करून घेण्यासाठी व सार्वजनिक हित वृद्धिंगत करण्यासाठी जी रीत अधिकाऱ्याच्या मते योग्य असेल त्या रीतीने चालविले पाहिजे.

प्रती व भाषांतरे वगैरे कशी प्राप्त करावयाची ते.

२३९. ज्या प्रकरणांत रीतसर किंवा संक्षिप्त चौकशी करण्यात येते अशा सर्व प्रकरणांतील निर्णय, आदेश व त्याबाबतची कारणे यांच्या व सादर केलेल्या कागदपत्रांच्या अधिकृत प्रती व अनुवाद पक्षकारास देण्यात येतील आणि पुराव्यादाखल उपयोग केलेले मूळ लेख, ज्यांनी ते सादर केले असतील अशा इसमांस, किंवा त्यांच्या संबंधाने जे इसम हक्क सांगतील अशा इसमांस, त्यांनी त्याबद्दल अर्ज केल्यानंतर, परत देण्यात येतील ; परंतु राज्य सरकारकडून वेळोवेळी विहित[91] करण्यात येईल त्याप्रमाणे, आकार, प्रती काढणे, शोधणे, तपासणी करणे व इतर यासारखी कामे याबद्दल, आकारण्यात येतील.

टीप ९१.—कृपया कलम ३२७ खालील टीप १०२ पहा. (नियम ४, ७ व १२ व त्या खालील अनुसूच्या पहा).

अधिपत्र काढून कसूर करणारास अटक करणे.

२४०. जेव्हा ह्या अधिनियमान्वये कसूर करणारास किंवा इतर कोणत्याही इसमांस अटक करण्याबद्दल तरतूद करण्यात येईल तेव्हा, अशा इसमास अटक करण्याबद्दल निदेश देण्यास जो अधिकारी सक्षम असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेल्या अधिपत्रावरून अशी अटक करण्यात येईल.

जमिनीवर जाण्याची व भूमापन करण्याची शक्ती.

२४१. सर्व महसूल आणि भू-मापन अधिकारी, आणि तसा निदेश दिला असल्यास त्यांच्या देखरेखीखालील व नियंत्रणाखालील त्यांचे नोकर व कामगार यांना, ज़मिनीवर जाता येईल, भू-मापन करता येईल आणि सीमा आखता येतील व ह्या अधिनियमान्वये किंवा जमीन महसुलाच्या संबंधात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही, अधिनियमान्वये त्याच्या पदांशी संबंधीत असलेली इतर कामे करता येतील आणि असे करताना, त्यांनी आपली कर्तव्ये योग्य रीतीने बजावण्यासाठी जरूर असेल त्यापेक्षा अधिक नुकसान होऊ देता कामा नये :

परंतु, कोणत्याही इसमाने, कोणत्याही इमारतीमध्ये किंवा राहत्या घरास संलग्न अशा कुंपण घातलेल्या आवारात किंवा बागेत, तेथे राहणाऱ्यांची संमती घेतली असेल ते खेरीज करून, सदरहू राहणारास कमीत कमी चोवीस तासांची पूर्वसूचना दिल्याशिवाय, प्रवेश करता कामा नये. आणि अशा रीतीने प्रवेश करताना तेथे राहणाऱ्यांच्या, सामाजिक व धार्मिक भावनांना योग्य तो मान दिला पाहिजे.

२४२. जेव्हा जेव्हा ह्या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमान्वये, जिल्हाधिकाऱ्यास, अवैधरीत्या जमीन कबजात ठेवणाऱ्या कोणत्याही इसमास, काढून टाकण्याचा अधिकार आहे किंवा त्याने अशा इसमास काढून लावले पाहिजे अशी तरतूद करण्यात आली असेल तेव्हा काढून टाकण्याचे काम पुढील रीतीने करण्यात येईल :—

अवैधरीत्या जमीन कब्जात ठेवल्याबद्दल कोणत्याही इसमास काढून टाकण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याने कशी कार्यवाही करावी ते.

(अ) जमीन कबजात असणाऱ्या इसमास किंवा इसमांस (उक्त नोटीस मिळाल्यानंतर वाजवी वाटेल अशा मुदतीत) त्यांना जमीन सोडून देण्याबाबत फर्मावणारी नोटीस त्यांच्यावर बजावून ; आणि

(ब) जर अशा नोटीशीचे पालन करण्यात न आले तर, ती जमीन सोडण्यास नकार देईल अशा कोणत्याही इसमास, काढून टाकून किंवा त्यास काढून टाकण्यासाठी हाताखालील इसमास प्रतिनियुक्त करून, आणि

(क) जर अशा कोणत्याही इसमास काढून लावणाऱ्या अधिकाऱ्यास कोणत्याही इसमाने विरोध किंवा अडथळा केला तर, जिल्हाधिकाऱ्याने त्या प्रकरणाच्या गोष्टींची संक्षिप्त चौकशी केली पाहिजे आणि असा विरोध किंवा अडथळा कोणत्याही न्याय्य कारणाशिवाय करण्यात आल्याबद्दल आणि असा विरोध किंवा अडथळा चालू असेल, अशी खात्री झाल्यास, त्यास असा विरोध किंवा अडथळा केल्याबद्दल त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये असा इसम ज्या कार्यवाहीस पात्र होईल अशा कार्यवाहीस बाध न आणता, उक्त इसमास अटक करण्याबद्दल अधिपत्र काढण्याचा अधिकार आहे आणि तो हजर झाल्यावर, असा विरोध किंवा अडथळा चालू राहण्यास प्रतिबंध करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा कोणत्याही तहसीलदाराच्या कार्यालयामध्ये, बंदिस्त ठेवण्यासाठी किंवा अनुसूची 'ड' मध्ये असलेल्या नमुन्यात अधिपत्र देऊन, त्यास, जिल्ह्याच्या दिवाणी तुरुंगात कैदेत ठेवण्यासाठी पाठविण्याचा अधिकार आहे.

अनुसूची 'ड'

(कलम २४२ पहा)

कलम २४२ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने काढावयाच्या अधिपत्राचा नमुना

(मुद्रा)

प्रति,

येथील दिवाणी तुरुंगाचा प्रभारी अधिकारी,

ज्याअर्थी, अ.ब. रहाणार ............ याने .......... तालुक्यातल्या .......... गावातील जमिनींतून/येथील जमिनीतून किंवा किनाऱ्यालगतच्या जमिनीतून ई.फ. यास (किंवा स्वतःस म्हणजे उक्त अ.ब. यास) काढून टाकण्यात क.ड. यास हरकत केली (किंवा अडथळा केला) आहे, आणि ज्याअर्थी अशी हरकत किंवा अडथळा चालू रहाण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून उक्त अ.ब. यास बंदिस्त अटकेत ठेवणे जरूर आहे ; त्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम २४२ च्या उपबंधान्वये, तुम्हास, याद्वारे, असे फर्माविण्यात येते की, तुम्ही उक्त अ.ब. यास, तुमच्या ताब्यातील तुरुंगात घ्यावे, आणि त्यास .......... दिवसपर्यंत सुरक्षित ठिकाणी अटकेत ठेवण्यात यावे.

तारीख .............. माहे .......... सन १९ .

जिल्हाधिकाऱ्याची सही.

**खर्च मंजूर करण्याची आणि तो वाटून देण्याची शक्ती.**

**२४३.** महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यास या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये उद्‌भवलेल्या कोणत्याही प्रकरणात किंवा कामकाजात झालेला खर्च त्यास योग्य वाटेल तितका आणि त्यारीतीने, मंजूर करता येईल आणि तो वाटून देता येईल.

परंतु, अशा कोणत्याही प्रकरणात किंवा कामकाजात, विधीव्यवसायी शुल्क, प्रकरणाच्या किंवा कामकाजाच्या खर्चात धरावे असे सदरहू अधिकाऱ्याचे मत असल्याशिवाय आणि तसे मत होण्याचे कारण त्याने लेखी नमूद केल्याशिवाय, ते शुल्क खर्च म्हणून मंजूर करता कामा नये.

**महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यासमोर उपस्थित होणारे आणि त्यांजकडे अर्ज करणारे इसम.**

२४४. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यासमोर या अधिनियमान्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य अधिनियमान्वये उपस्थित होणे, त्यास अर्ज करणे व त्याच्यासमोर काम चालविणे, ह्या सर्व गोष्टी स्वतः पक्षकारास किंवा त्याने मान्यता दिलेल्या अभिकर्त्यास अथवा कोणत्याही विधीव्यवसायीस करता येतील ;

परंतु, महसूल किंवा भूमापन अधिकारी तसा निदेश देईल तर पक्षकाराने, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८, (१९०८ चा अधिनियम, क्रमांक पाच) कलमे १३२ व १३३ यांच्या उपबंधास अधीन राहून, जातीने उपस्थित राहिले पाहिजे.

**व्यावृत्ति.**

२४५. प्रकरण १५ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढे असलेल्या कोणत्याही कामकाजाला, ह्या प्रकरणातील कोणतेही उपबंध लागू होणार नाहीत.

# प्रकरण १३

## अपिले, फेरतपासणी व पुनर्विलोकन

२४६. प्रकरण १५ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढे असलेल्या कामकाजाला ह्या प्रकरणाचे उपबंध लागू असणार नाहीत. हे प्रकरण लागू असणे.

२४७. (१) ह्या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिमध्ये अपील न करण्याबाबत एतद्विरुद्ध कोणतीही स्पष्ट तरतूद नसेल तेव्हा, ह्या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिअन्वये, अनुसूची इ च्या स्तंभ (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध, त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडे अपील करता येईल—मग असा निर्णय किंवा आदेश त्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलात दिलेला असो किंवा नसो :

परंतु, कोणत्याही परिस्थितीत अपिलांची संख्या दोनपेक्षा जास्त होता कामा नये.

(२) जेव्हा पदोन्नतीमुळे किंवा पदनामात बदल झाल्यामुळे, या कलमान्वये कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध करावयाचे अपील, ज्याविरुद्ध अपील केले असेल, तो निर्णय किंवा आदेश ज्या अधिकाऱ्याने दिला असेल त्याच अधिकाऱ्याकडे होत असेल तेव्हा, असे अपील, या अधिनियमाच्या उपबंधान्वये ते ज्याच्याकडे हस्तांतरित करता येईल अशा, त्या अपिलाचा निर्णय करण्यास सक्षम असलेल्या इतर अधिकाऱ्याकडे करण्यात येईल.

### अनुसूची 'इ'

(कलम २४७ पहा)

| | महसूल अधिकारी | अपील प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | उप-विभागीय अधिकाऱ्याच्या हाताखालील, उपविभागीतील सर्व अधिकारी. | उप-विभागीय अधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबतीत निर्दिष्ट करील असा सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी. |
| २ | उप-विभागीय अधिकारी, सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी. | जिल्हाधिकारी किंवा राज्य शासन या बाबतीत जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती ज्याच्याकडे निहित करील असा सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी. |
| ३ | जिल्हाधिकारी* (तो मुंबईचा जिल्हाधिकारी नसेल) किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या अपिलीय शक्ती ज्याच्याकडे निहित करण्यात येतील असा सहायक/उप-जिल्हाधिकारी. | विभागीय आयुक्त. |
| ४ | कलम† १५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करणारा इसम. | राज्य शासन याबाबतीत निर्दिष्ट करील असा अधिकारी. |

*हे शब्द महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ याच्या कलम ८ द्वारे हे समाविष्ट करण्यात आले. (१९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक चार) (परिशिष्ट ३९ पहा).

†मुळ आकडयाऐवजी महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ च्या कलम ८ द्वारे हा आकडा समाविष्ट करण्यात आला. (१९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक तीस) (परिशिष्ट ३७ पहा).

अनुसूची 'इ'—चालू

| भू-मापन अधिकारी | | अपील प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | जिल्हा निरीक्षक भूमि-अभिलेख, भू-मापन तहसीलदार आणि जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख, याच्या दर्जाहून वरच्या दर्जाचे नसतील असे इतर अधिकारी. | अधीक्षक, भूमि-अभिलेख किंवा राज्य शासन याबाबतीत निर्दिष्ट करील असे त्याच दर्जाचे इतर अधिकारी. |
| २ | अधिक्षक, भूमि अभिलेख आणि त्याच दर्जाचे इतर अधिकारी. | संचालक, भूमि-अभिलेख किंवा राज्य शासन याबाबतीत ज्याचेकडे भूमि-अभिलेख संचालकाचे अधिकार निहित करील असा भूमि-अभिलेख उप-संचालक. |
| ३ | जमाबंदी अधिकारी .. .. | जमाबंदी आयुक्त. |

**टीप ९२ :**—कृपया कलम १३ (३) खालील टीप १२ (पाच) व (सहा) पहा.

राज्य सरकारकडे अपील केव्हा करावयाचे ते.

२४८. आयुक्ताने किंवा जमाबंदी आयुक्ताने किंवा भूमि अभिलेख संचालकाने किंवा भूमिअभिलेख संचालकाचे अधिकार निहित केलेल्या भूमिअभिलेख उप-संचालकाने* [" किंवा मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याच्या हाताखालील ज्या कोणत्याही सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे जिल्हाधिकाऱ्याची अपील शक्ती निहित केली असेल त्या सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने "] दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध, किंवा आदेशाविरुद्ध राज्य सरकारकडे अपील" करता येईल; मात्र अशा अधिकाऱ्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडे अपील होऊन त्या अपिलात झालेला जो निर्णय किंवा आदेश यावर अशा अधिकाऱ्याने कोणताही निर्णय किंवा आदेश दिला असेल त्यावर मात्र अपील करता येणार नाही.

**टीप ९३ :**—अपीले, पुनरीक्षण व पुनर्विलोकन यासंबंधीचे नियम.

[शासकीय अधिसूचना, क्र. यूएनएफ् २५६७ आर, दि. १४-५-६८ द्वारे सुधारलेली शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ् २५६७ आर, दि. २१-८-६७.]

१. **संक्षिप्त नांव :**—या नियमांस ' महाराष्ट्र जमीन महसूल (अपीले, पुनरीक्षण व पूर्नविलोकन) नियम १९६७ असे म्हणावे.

२. **राज्य शासनाकडे कोणती अपीले करता येतील.**—(अ) आयुक्त, जमाबंदी आयुक्त, संचालक भूमि अभिलेख व संचालक, भूमि अभिलेख यांच्या शक्ती निहित केलेल्या उप-संचालक भूमिअभिलेख यांच्या मूळ निर्णयावर किंवा आदेशावर.

(ब) आयुक्त, जमाबंदी आयुक्त, संचालक भूमि अभिलेख व संचालक, भूमि अभिलेख याच्या शक्ती निहित केलेला उप-संचालक, भूमि अभिलेख यांनी त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांच्या कोणत्याही निर्णयावर व आदेशावर करण्यात आलेल्या अपीलावर प्रथमतः दिलेल्या निर्णयावर किंवा आदेशावर कलम २४८ अन्वये राज्य शासनाकडे अपील करता येईल.

३. **अपीलाचा व अर्जाचा नमुना तपशील.**—(१) अधिनियमांच्या प्रकरण तेरा अन्वये पुनरीक्षणासाठी किंवा पुर्नविलोकनासाठी करण्यात येणारे प्रत्येक अपील किंवा अर्ज समुचित प्राधिकाऱ्यांस उद्देशून विनंती अर्जाच्या स्वरूपात केले पाहिजे. तसेच त्याची भाषा मुद्देसूद व सुबोध असली पाहिजे. त्यावर अपील करणाऱ्याची किंवा यथास्थिती, अर्जदाराची किंवा योग्यरित्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या अभिकर्त्याची सही किंवा आंगठयाची निशाणी असली पाहिजे आणि त्यावर मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ मध्ये त्यासाठी तरतूद केली असेल इतक्या रकमेचा न्यायालय शुल्क मुद्रांक असला पाहिजे.

(२) अपीलामध्ये किंवा अर्जामध्ये पुढील तपशील असला पाहिजे :—

(एक) अपील करणाऱ्याचे किंवा, यथास्थिती, अर्जदाराचे नांव,

(दोन) त्याच्या वडिलाचे नांव,

(तीन) त्याचा व्यवसाय व राहण्याचे ठिकाण आणि पत्ता व

(चार) अपील करणाऱ्याच्या किंवा अर्जदाराच्या, कोणताही असल्यास, लेखनिकाचे नांव व पत्ता.

---

*हे शब्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९६९ च्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक चार) (परिशिष्ट ३९ पहा.)

(३) अशा अपीलामध्ये किंवा अर्जामध्ये अपील करणारा किंवा अर्जदार अपीलाच्या किंवा अर्जाच्या पुष्ट्यर्थ ज्या वस्तुस्थितीवर विसंबून राहत असेल त्या वस्तुस्थितीचे संक्षिप्त निवेदन असले पाहिजे. तसेच ज्या आदेशावर किंवा निर्णयावर त्याने अपील किंवा अर्ज केला असेल त्या आदेशाच्या किंवा निर्णयाच्या संबंधातील त्याच्या हरकतींची कारणे त्यात नमूद करण्यात आली पाहिजेत.

४. **अपील व अर्ज सादर करणे.**—(१) पुनरीक्षणासाठी किंवा पुर्नविलोकनासाठी करण्यात येणारी अपिल किंवा अर्ज समुचित प्राधिकाऱ्याकडे एकतर जातीने सादर करता येतील किंवा ते डाकेने पाठविता येतील.

(२) अपील किंवा अर्ज डाकेने पाठविण्यात आला असेल त्याबाबतीत ते ज्या लिफाफ्यात असेल त्या लिफाफ्यावर पूर्ण किमतीचे डाक मुद्रांक आधि लावण्यात आलेले असले पाहिजे.

५. **अपील आणि अर्ज फेटाळणे.**—कोणत्याही महत्वाच्या बाबतीत पूर्वोक्त नियमांच्या तरतुदीचे अनुपालन करण्यात न आल्यास, अपीलातील किंवा अर्जातील गुणावगुणांचा विचार केला न जाता, ते फेटाळले जाईल.

६ **अपीलांचे किंवा अर्जाचे एकत्रीकरण.**—महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यांना कोणत्याही अपीलांचे किंवा अर्जाचे पुढील बाबतीत एकत्रीकरण करता येईल.

(अ) त्यास पक्षकार असलेल्या सर्वांचा असे एकत्रीकरण करण्यास संमती असेल तर, आणि

(ब) त्यात कायदेविषयक व वस्तुस्थिती विषयक समाईक प्रश्न असल्यास.

**पुर्नविलोकन किंवा फेरतपासणी याविरुद्ध अपील.**

२४९. (१) पुर्नविलोकनात बदलण्यात किंवा फिरविण्यात आलेला आदेश हा, मूळ निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध ज्या रीतीस अनुसरून अपील करता येईल त्याच रीतीने अपीलयोग्य असेल.

(२) पुनरीक्षण करताना बदलण्यात किंवा फिरविण्यात आलेला आदेश हा, जणू काही तो पुनरीक्षण प्राधिकाऱ्याने अपिलात दिलेला आदेश असल्याप्रमाणे अपीलयोग्य असेल.

**ज्या मुदतीत अपिले केली पाहिजेत ती मुदत.**

२५०. ज्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध तक्रार असेल तो निर्णय किंवा आदेश जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा अधीक्षक, भूमिअभिलेख याच्या दर्जाहून कमी दर्जाच्या त्या त्या विभागातील अधिकाऱ्याने दिला असेल तर, साठ दिवसाची मुदत संपल्यानंतर त्याविरुद्ध अपील करता येणार नाही ; किंवा इतर कोणत्याही बाबतीत नव्वद दिवसांची मुदत संपल्यानंतर अपील करता येणार नाही ; साठ दिवसांची व नव्वद दिवसांची मुदत ही, अपील करणाऱ्या इसमास असा निर्णय किंवा आदेश ज्या तारखेस मिळाला असेल त्या तारखेपासून मोजण्यात आली पाहिजे.

वरील मुदत मोजताना, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल अशा निर्णयाची किंवा आदेशाची प्रत मिळण्यासाठी जी मुदत आवश्यक असेल ती मुदत वगळण्यात आली पाहिजे.

**मुदतीनंतर अपील दाखल करून घेणे.**

२५१. जेव्हा, यथास्थिती, अपील करणारा किंवा अर्ज करणारा इसम, यथास्थिती अपील किंवा अर्ज करण्यासाठी जी मुदत विहित करण्यात आली असेल त्या मुदतीत अपील किंवा अर्ज न करण्यास त्याच्याजवळ पुरेसे कारण होते अशी तो, ज्या अधिकाऱ्याकडे किंवा राज्य सरकारकडे अपील किंवा अर्ज करील त्या अधिकाऱ्याची किंवा राज्य सरकारची खात्री पटवून देईल तर, ह्या प्रकरणान्वये पुर्नविलोकनासाठी केलेले कोणतेही अपील किंवा अर्ज, त्यासाठी विहित केलेल्या मुदतीनंतर, दाखल करून घेता येईल.

**विवक्षित आदेशांच्याविरुद्ध अपील करता येणार नाही.**

२५२. (अ) कलम २५१ अन्वये केलेले अपील किंवा पुर्नविलोकनासाठी केलेला अर्ज दाखल करून घेणाऱ्या, किंवा ;

(ब) फेरतपासणी किंवा पुर्नविलोकन करण्यासाठी केलेला अर्ज नाकारणाऱ्या, किंवा

(क) कार्यवाही स्थगित करण्यासाठी केलेला अर्ज मंजूर करणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या; आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही.

**अपील करण्याचा शेवटचा दिवस रविवार किंवा सुट्टीचा दिवस असेल तर त्याबाबत तरतूद.**

२५३. जेव्हा जेव्हा अपील किंवा पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यासाठी, ह्या प्रकरणात तरतूद केलेल्या कोणत्याही मुदतीचा शेवटचा दिवस रविवार किंवा राज्य सरकारने मान्य केलेल्या इतर सुट्टीचा दिवस असेल तेव्हा तेव्हा, ती सुट्टी संपल्यानंतर लगतपुढील दिवस हा, अपील करण्यासाठी शेवटचा दिवस आहे असे समजण्यात येईल.

**अपीलाच्या अर्जासोबत आदेशाची प्रत देणे.**

२५४. अपील, पुनर्विलोकन किंवा फेरतपासणी याकरिता केलेल्या प्रत्येक अर्जासोबत ज्या आदेशाविरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची प्रमाणित प्रत, अशी प्रत सादर करणे आवश्यक नाही असे ठरविण्यात आले असेल ते खेरीज करून देण्यात येईल.

**अपील प्राधिकाऱ्याच्या शक्ती.**

२५५. (१) अपील प्राधिकाऱ्यास, अपील दाखल करून घेता येईल किंवा अभिलेख मागविल्यानंतर आणि अपील करणाऱ्या इसमास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर संक्षिप्तरीत्या चौकशी करून ते फेटाळता येईल :

परंतु, ज्यावेळी, अपील मुदतीबाहेर गेलेले असेल किंवा ते दाखल करता येत नसेल त्याबाबतीत, अपील प्राधिकाऱ्यास अभिलेख मागविणे बंधनकारक असणार नाही.

(२) जर अपील दाखल करण्यात आले असेल तर त्याच्या सुनावणीची तारीख ठरविण्यात येईल व त्याबद्दलची नोटीस प्रतिवादीवर बजावण्यात येईल.

(३) पक्षकार हजर राहतील तर त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, अपील प्राधिकाऱ्यास, लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून, ज्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल तो आदेश रद्द करण्याचा, कायम करण्याचा, बदलविण्याचा किंवा फिरविण्याचा अधिकार असेल किंवा त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करण्यासाठी किंवा असा आणखी पुरावा घेण्यासाठी निदेश देण्याचा किंवा स्वतः असा आणखी पुरावा घेण्याचा; किंवा त्याला आवश्यक वाटेल असे निदेश देऊन ते प्रकरण निर्णयासाठी परत पाठविण्याचा अधिकार असेल.

**आदेशांची बजावणी स्थगित करणे.**

२५६. (१) ज्या महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्याने कोणताही आदेश दिला असेल त्या अधिकाऱ्यास किंवा त्या पदावर येणाऱ्या उत्तराधिकाऱ्यास, अपिलासाठी विहित करण्यात आलेल्या मुदतीच्या आत कोणत्याही वेळी त्यास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत, अशा आदेशाची बजावणी करण्याबद्दल निदेश देता येईल ; मात्र उक्त आदेशाविरुद्ध कोणतेही अपील केलेले असता कामा नये.

(२) अपील प्राधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल त्या मुदतीपर्यंत, ज्या विरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची बजावणी स्थगित करण्याबद्दल कोणत्याही वेळी निदेश देता येईल.

(३) फेरतपासणी किंवा पुनर्विलोकन करण्याच्या शक्तींचा वापर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास, यथास्थिती पुनरीक्षण किंवा पुनर्विलोकन या अन्वयेच्या आदेशाची बजावणी त्याला योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत स्थगित करण्याबद्दल निदेश देता येईल.

(४) अपील प्राधिकाऱ्यास किंवा फेरतपासणीच्या किंवा पुनर्विलोकनाच्या शक्तींचा वापर करणाऱ्या प्राधिकाऱ्यास पोट-कलम (१) अन्वये दिलेला कोणताही निदेश रद्द करता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल.

(५) कोणत्याही आदेशाची बजावणी स्थगित करण्याबद्दल निदेश देणाऱ्या महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्यास किंवा निदेश देणाऱ्या प्राधिकाऱ्यास योग्य वाटतील अशा शर्ती लादता येतील किंवा त्यास योग्य वाटतील असे तारण देण्याबाबत आदेश देता येईल.

(६) कोणत्याही आदेशाची बजावणी स्थगित करण्याबद्दल निदेश देणारा कोणताही आदेश या कलमाच्या उपबंधानुसार असेल ते खेरीज करून देता कामा नये.

२५७. (१) राज्य सरकारास आणि तसेच त्या विभागातील आयुक्तास किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यास राज्य सरकार किंवा अधीक्षक, भूमि अभिलेख यांना स्वतःच्या दर्जाहून कनिष्ठ दर्जाचा नाही असा कोणत्याही महसूल किंवा भूमापन व विवक्षित अधिकाऱ्यास, कोणत्याही दुय्यम महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या वैधतेबद्दल आणि किंवा आदेशाच्या वैधतेबद्दल किंवा औचित्याबद्दल आणि अशा अधिकाऱ्याने चालविलेल्या कामकाजाच्या नियमितपणाबद्दल, स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, कोणत्याही चौकशीचे किंवा कामकाजाचे कागदपत्र अभिलेख मागविण्याची व ते तपासण्याची मुभा असेल. यांना त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांचे अभिलेख व कामकाज मागविण्याची व त्याची तपासणी करण्याची शक्ती.

(२) तहसीलदार, नायब तहसीलदार आणि जिल्हा निरीक्षक, भूमि-अभिलेख यांना, त्यांच्याकडे ज्याबाबतीत रीतसर किंवा औपचारिक चौकशी करण्यात आली नाही अशा कोणत्याही बाबतीसंबंधीत, त्यांच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्यांचे, कामकाज मागविण्याची व ते तपासण्याची मुभा असेल.

(३) जर कोणत्याही बाबतीत, राज्य सरकारास किंवा पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असे आढळून येईल की, अशा रीतीने मागविलेला कोणताही निर्णय किंवा आदेश किंवा कामकाज यात सुधारणा करणे, तो रद्द करणे किंवा फिरविणे आवश्यक आहे तर राज्य सरकारास किंवा अशा अधिकाऱ्यास योग्य वाटेल असा त्यावर आदेश देता येईल :

परंतु, राज्य सरकारने किंवा अशा अधिकाऱ्याने, खाजगी इसमांच्या परस्परांमधील हक्काच्या कोणत्याही प्रश्नावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही आदेशात, हितसंबंध असलेल्या पक्षकारांस उपस्थित राहण्याबद्दल आणि अशा आदेशाच्या समर्थनार्थ आपले म्हणणे मांडण्याबद्दल नोटीस दिल्याशिवाय, फेरबदल करता किंवा तो फिरविता कामा नये :

तसेच, रीतसर चौकशी करण्यात आली असेल अशा कोणत्याही बाबतीत, सहायक किंवा उप-जिल्हाधिकारी याने, स्वतः होऊन, असा आदेश देता कामा नये, परंतु तो आपल्या अभिप्रायासह ते कागदपत्र जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करील व जिल्हाधिकारी, त्यास योग्य वाटेल असा त्यावर आदेश देईल.

२५८. (१) राज्य सरकारास आणि प्रत्येक महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यास, आपण होऊन किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून, आपण दिलेल्या किंवा आपल्या पूर्वाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पुर्नविलोकन करता येईल आणि त्यासंबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल : आदेशांचे पुर्नविलोकन.

परंतु :—

(एक) आपण स्वतः न दिलेल्या अशा कोणत्याही आदेशाचे, लेखनप्रमादाच्या कारणांव्यतिरिक्त इतर कारणावरून, पुर्नविलोकन करणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकारी किंवा जमाबंदी अधिकारी यास वाटेल तर तो प्रथम, यथास्थिती, आयुक्ताची किंवा जमाबंदी आयुक्ताची मंजुरी घेईल आणि जर जिल्हाधिकारी किंवा जमाबंदी अधिकारी यास अधीन असलेल्या अधिकाऱ्याने, लेखनप्रमादाच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणावरून कोणत्याही आदेशाचे, मग असा आदेश त्याने स्वतः दिलेला असो किंवा त्याच्या पूर्वाधिकाऱ्याने दिलेला असो, पुर्नविलोकन करण्याचे ठरविले असेल तर, त्याने, तो ज्यास अधीन असेल अशा अधिकाऱ्याची मंजुरी घेईल.

(दोन) कोणत्याही आदेशात संबंधित पक्षकारास उपस्थित राहण्याबद्दल आणि त्या आदेशाच्या समर्थनार्थ आपले म्हणणे मांडण्याबद्दल नोटीस देण्यात आल्याशिवाय, कोणत्याही अशा आदेशात बदल करता किंवा तो फिरविता कामा नये ;

(तीन) ज्यावर अपील करण्यात आले असेल किंवा जो फेरतपासणीच्या कामकाजाचा विषय असेल अशा कोणत्याही आदेशाचे पुर्नविलोकन असे अपील किंवा कामकाज अनिर्णित असेतोपर्यंत करण्यात येता कामा नये ;

(चार) खाजगी इसमांच्या परस्परांमधील कोणत्याही हक्काच्या प्रश्नावर परिणाम करणाऱ्या कोणत्याही आदेशाचे पुर्नविलोकन, सदरहू कामकाजातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्याशिवाय करता कामा नये व अशा आदेशाचे पुर्नविलोकन करण्याबद्दलचा कोणताही अर्ज, उक्त आदेश देण्यात आल्यापासून नव्वद दिवसांच्या आत असा अर्ज करण्यात आल्याशिवाय दाखल करून घेता कामा नये.

(२) पुढील कारणाखेरीज इतर कोणत्याही कारणावरून कोणत्याही आदेशाचे पुर्नविलोकन करण्यात येता कामा नये ; ती कारणे अशी :—

(एक) नवीन आणि महत्त्वाच्या बाबीचा किंवा पुराव्याचा शोध ;

(दोन) अभिलेख पाहताक्षणीच दिसून येणारी चूक किंवा दोष ; किंवा

(तीन) इतर कोणतेही पुरेसे कारण.

(३) ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता जिल्हाधिकारी हा, जो महसूल किंवा भूमापन अधिकारी जिल्हा सोडून गेला असेल किंवा ज्याचे महसूल किंवा भूमापन अधिकारी या नात्याने अधिकार चालविणे बंद झाले असून ज्याच्या जागेवर त्याच्यानंतर काम करणारा कोणी अधिकारी नसेल त्या महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्याचा उत्तराधिकारी असल्याचे समजण्यात येईल.

(४) अपिलात किंवा फेरतपासणीत ज्यावर निर्णय झाला असेल त्या आदेशाचे पुर्नविलोकन, अपील किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्याच्या अधीन असलेल्या कोणत्याही महसूल किंवा भूमापन अधिकाऱ्याने करता कामा नये.

(५) पुर्नविलोकन करताना दिलेल्या आदेशांचे कोणत्याही कारणावरून पुर्नविलोकन करता कामा नये.

जे निर्णय किंवा आदेश स्पष्टपणे अंतिम म्हणून जाहीर केले असतील त्याबाबत नियम.

२५९. ह्या अधिनियमात जेव्हा एखादा निर्णय किंवा आदेश हा अंतिम व निर्णायक असल्याबद्दल तरतूद करण्यात येईल तेव्हा अशा तरतुदीचा अर्थ, अशा निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही असा समजण्यात येईल ; परंतु केवळ राज्य सरकारनेच, कलम २५७ च्या उपबंधान्वये असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात सुधारणा करणे, तो रद्द करणे म्हणून जाहीर किंवा फिरविणे हे विधिसंमत असेल.

## प्रकरण १४

## मुंबई शहरामध्ये जमीन महसुलाकरिता विशेष उपबंध

२६०. हया प्रकरणाचे उपबंध, केवळ मुंबई शहरासच लागू असतील. हया प्रकरणाची व्याप्ती.

२६१. हया प्रकरणात, संदर्भाविरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर— विवरण अर्थ.

*(१अ) शहर भूधारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियम" म्हणजे मुंबई शहर (इनामी व विशेष सुधारणा पद्धती) नाहीशा करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल सुधारणा अधिनियम, १९६९. (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक चव्वेचाळीस).

(अ) कोणत्याही जमिनीच्या संबंधात "धारक" या संज्ञेचा अर्थ, अशा जमिनीचा भोगवटा करणारा, किंवा अशा जमिनीसाठी खंड देण्यात यत असेल त्याबाबतीत, जो इसम दुसऱ्या इसमास खंड देत नसेल असा, अशा जमिनीबद्दल खंड मिळणारा कोणताही इसम असा समजावा ;

स्पष्टीकरण.—हया खंडामधील "खंड" या संज्ञेमध्ये, जेव्हा कुळवहीवाटीवर अशी जमीन धारण करणाऱ्या इसमाने एक वर्षापेक्षा कमी मुदतीसाठी असे पैसे दिले असतील ते शिवाय, सरकारला किंवा बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेला किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांना किंवा फाजेनदार यांना जमिनीकरिता दिलेल्या पैशाचा समावेश होणार नाही ;

*(अ-अ) "महसुली विभाग" म्हणजे राज्य शासनाच्या आदेशाच्या अधीन जिल्हाधिकारी शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे एखाद्या महसुली विभागातील जमिनींच्या आकारणीचा प्रमाणभूत दर ठरविण्याच्या प्रयोजनाकरिता महसुली विभाग म्हणून बनविल असे मुंबई शहरातील स्थानिक क्षेत्र.

(ब) "वरिष्ठ धारक" या शद्वप्रयोगाचा अर्थ, मुंबई शहरातील कोणत्याही जमिनीवर राज्य सरकारच्या विद्यमाने सर्वोच्च मालकी हक्क असलेला इसम असा समजावा ;

(क) "भूमापन" या संज्ञेमध्ये, सीमेच्या निशाण्या व भूमापनाच्या पूर्वी घडलेल्या किंवा भूमापनाच्या संबंधातील इतर सर्व कामांचा समावेश होईल.

(ड) "भू-मापन हद्दीच्या निशाण्या" या शब्दप्रयोगाचा अर्थ, यात यापुढे वर्णन केल्याप्रमाणे मुंबई शहराच्या भूमापनाचे काम केलेल्या अधिकाऱ्याने मुख्यत्वे लावलेली कोणतीही लोखंडाची किंवा इतर निशाणी असा समजावा आणि तीत, हया प्रकरणाच्या उपबंधानुसार, जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्यांच्या आदेशान्वये त्यानंतर लावण्यात येईल अशा कोणत्याही नवीन निशाणीचा समावेश होईल.

*(इ) या प्रकरणात वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शद्वांचे व शद्वप्रयोगांचे अर्थ शहर भू-धारणा पद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमात त्यांचे अनुक्रमे जे अर्थ दिले आहेत तेच असतील.

*२६२. (१) पोट-कलम (२) आणि पोट-कलम (३) यांच्या उपबंधांस अधीन राहून, जमीन महसुलाची आकारणी निश्चित करणे व ती बसविणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. जमीन महसुलाची आकारणी निश्चित करण्याची व ती बसविण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.

(२) राज्य शासनाचा आकारणी करण्याचा अधिकार मर्यादित करणारा कोणताही अधिकार वरिष्ठ धारकाला नसेल तेव्हा त्याबाबतीत, शहर भू-धारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, या प्रकरणानुसार आकारणी निश्चित करण्यात येईल.

(३) कायम करण्यात व परिरक्षण करण्यात आलेल्या आणि शहर भू-धारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमान्वये नाहीशा न केलेल्या विनिर्दिष्ट मर्यादेचा परिणाम म्हणून राज्य शासनाचा आकारणी करण्याचा अधिकार मर्यादित करणारा, वरिष्ठ धारकाला अधिकार असेल त्याबाबतीत, आकारणी अशा विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही.

---

*शहर भू-धारणा पद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९६९ चे कलम २० (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक चव्वेचाळीस) ची दुसरी अनुसूची याद्वारे खंड (१-अ) (अ-अ) व (इ) समाविष्ट करण्यात आले व कलम २६२ ऐवजी नवीन कलम दाखल करण्यात आली. (परिशिष्ट ४२ पहा). हा अधिनियम १ ऑगस्ट १९७१ पासून अंमलात आला (परिशिष्ट ४३ पहा).

**टीप ९४.**—शहर भूधारणा पद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियम म्हणजेच मुंबई शहर (इनामी व विशेष भू-धारणा पद्धती) नाहीशा करणे व महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ (कृपया परिशिष्ट ४२ पहा).

आकारणीचा दर बाजार-मूल्याच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही.

*२६२-अ. इनामी किंवा विशेष भू-धारणापद्धतीवर धारण केलेल्या जमिनीच्या प्रारंभिक आकारणीकरिता, शहर भू-धारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमात उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, प्रत्येक महसुली विभागातील अकृषिक प्रयोजनांसाठी वापरण्यात आलेल्या, किंवा जेथे बांधकाम न केलेले भूखंड म्हणून वापरण्यात आलेल्या जमिनीचा दर, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या अधिनियम, १९३४ (१९३४ चा अधिनियम क्रमांक दोन) याच्या कलम ४९ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या, बँकेच्या व्याजाच्या दराच्या आधारे बाबतीत राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा, त्यांच्या बाजारमूल्यांच्या सरासरीच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही.

आकारणीचा प्रमाणभूत दर.

*२६२-ब. (१) कलम २६२-अ च्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकारी, राज्य शासनाच्या मान्यतेने प्रत्येक महसुली विभागाकरिता दर चौरस मिटरला अकृषिक आकारणीचा दर ("यास आकारणीचा प्रमाणभूत दर" म्हणून संबोधण्यात येईल) निश्चित करील आणि तो कलम २६२-अ अन्वये राज्य शासनाने निश्चित केला असेल अशा, प्रत्येक विभागातील बांधकाम न केलेल्या भूखंडाच्या बाजारमूल्याच्या सरासरीच्या टक्केवारीपेक्षा अधिक असेल.

(२) बाजारमूल्य, पुढील गोष्टींच्या आधारावर विहित रीतीने अंदाजित करण्यात येईल :—

(अ) आकारणीच्या प्रमाणभूत दर निश्चित करण्याकरिता ज्या वर्षी कार्यवाही सुरू करण्यात आली असेल, त्या वर्षीच्या लगतपूर्वीच्या पंधरा वर्षांच्या कालावधीतील महसुली विभागातील जमिनीची विक्री,

(ब) पूर्वोक्त पंधरा वर्षांच्या कालावधीमध्ये त्या महसुली विभागातील, भूमि-संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा अधिनियम क्रमांक एक.) अन्वये जमिनीच्या संपादनाशी संबंधित निवाडे,

(क) पूर्वोक्त कालावधीत महसुली विभागातील जमिनीचे भाडे मूल्य.

(३) प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येक भूखंडाची प्रत्यक्ष आकारणी, (यापुढे तिचा "पूर्ण आकारणी" असा उल्लेख करण्यात आला आहे) दर चौरस मिटरचा रुपयामधील आकारणीचा प्रमाण दर व चौरस मिटरमध्ये भूखंडाचे क्षेत्रफळ यांच्या विहित रीतीने पूर्णांक केलेल्या गुणाकाराइतक्या रकमेत जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल.

(४) कोणत्याही महसुली विभागातील आकारणीचा प्रमाण दर किंवा तिचे बाजारमूल्य यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे हानी पोहोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाकडे अपील करता येईल :

परंतु, राज्य शासनास अशा अपिलांचा निर्णय करण्यासाठी उपसचिवाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

(५) राज्य शासनास, (मर्यादाकाल आणि सुनावणी यांसाठी असलेली तरतूद धरून), अशी अपीले दाखल करण्यासाठी व निकालात काढण्यासाठी कलम ३०६ अन्वये नियम करता येतील.

प्रमाणभूत आकारणीचे दर प्रसिद्ध करणे.

**२६२-क. या प्रकरणान्वये निश्चित केलेल्या किंवा सुधारलेल्या आकारणीचे प्रमाणभूत दर, ते अंमलात आणण्यापूर्वी शासकीय राजपत्रात आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील.

आकारणीचे प्रमाणभूत दर फेरतपासणी केली जाईपर्यंत दहा वर्षाकरिता अंमलात असणे.

***२६२-ड.** प्रत्येक विभागाकरिता निश्चित केलेल्या आकारणीचा प्रमाणभूत दर, तो ज्यावर्षी निश्चित करण्यात आला त्याच्या लगतनंतरच्या महसुली वर्षाच्या पहिल्या दिवसापासून अंमलात येईल ; आणि तो कलम २६२-अ मध्ये उल्लेखिलेल्या बँकेच्या व्याजाच्या दरात अथवा जमिनीच्या सरासरी बाजार-मूल्यात कोणताही फेरफार झाला असला तरीही दहा वर्षाच्या मुदतीकरिता अंमलात राहिल आणि उक्त मुदत संपल्यानंतर, या प्रकरणाच्या तरतुदींनुसार फेरतपासणी करण्यास पात्र होईल. त्याची अशा रीतीने फेरतपासणी करण्यात येईपर्यंत पूर्वोक्तप्रमाणे निश्चित केलेला दर, अंमलात असल्याचे मानले जाईल.

---

*शहर सुधारणा पद्धती नाहिशा करण्याबाबत अधिनियम, १९६९ (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक चवेचाळीस) चे कलम २० व दुसरी अनुसूची याद्वारे कलमे २६२ अ, २६२ ब, २६२ क, व २६२ ड समाविष्ट करण्यात आलो आहेत. (परिशिष्ट ४२ पहा).

**हमीची मुदत.**

*२६२-इ. (१) कलम २६२-अ मध्ये उल्लेखिलेल्या बँकेच्या व्याजाच्या दरात कोणताही फेरफार झाला असला तरीही किंवा आकारणीच्या प्रमाणभूत दराची फेरतपासणी करण्यात आली असली तरीही, या प्रकरणान्वये कोणत्याही जमिनीसंबंधात निश्चित केलेली आकारणी, ती ज्या तारखेस निश्चित केली असेल त्या तारखेपासून पन्नास वर्षांच्या मुदतीकरिता (अशा मुदतीत " हमीची मुदत " म्हणता येईल) अंमलात राहील.

(२) हमीची मुदत संपल्यानंतर, आकारणी फेरतपासणी केली जाण्यास पात्र होईल ; आणि या प्रकरणाचे पूर्ववर्ती उपबंध, जेथवर शक्य असेल तेथवर अशा फेरतपासणीस लागू होतील.

(३) अशा रीतीने आकारणीची फेरतपासणी करण्यात येईपर्यंत केलेली आकारणी, हमीची मुदत संपली असली तरीही, अंमलात राहील.

**आकारणीविषयक तडजोड कोणाबरोबर करावी.**

२६३. (१) जमीन महसुलविषयक जमिनीच्या प्रत्येक भागाच्या आकारणीची तडजोड उक्त वरिष्ठ धारकाबरोबर करण्यात येईल.

(२) जर वरिष्ठ धारक गैरहजर असेल आणि मुंबईत त्याचा माहीत असलेला असा कोणताही अधिकृत अभिकर्ता नसेल किंवा जमिनीचा वरिष्ठ धारक म्हणून समजला जाण्यास कोणास अधिकार आहे याबद्दल वाद असेल तर, जमिनीचा प्रत्यक्ष ताबा ज्या इसमाकडे असेल त्या इसमाबरोबर तडजोड करता येईल आणि अशा रीतीने ठरविलेली कोणतीही आकारणी त्या जमिनीचा जो कायदेशीर वरिष्ठ धारक असेल त्याजवर बंधनकारक राहील.

(३) ताबा असणाऱ्या इसमाने या अधिनियमाच्या उपबंधानुसार दिलेली कोणतीही रक्कम ही वरिष्ठ धारकाच्या वतीने दिलेली रक्कम आहे असे मानण्यात येईल.

(४) जेव्हा वरिष्ठ धारक किंवा ज्या इसमाचा ताबा असेल तो इसम सहजगत्या निश्चित ठरविता येत नसेल अशा बाबतीत, जिल्हाधिकारी, उक्त जमिनीत किंवा जमिनीवर वरिष्ठ धारक म्हणून हक्क सांगणाऱ्या किंवा उक्त जमिनीवर कबजात हक्क सांगणाऱ्या सर्व इसमांना जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात असा हक्क त्यास कळविण्याविषयी नोटीस देईल.

(५) जर कोणत्याही इसमाने अशी नोटीस दिल्याच्या तारखेपासून एकवीस दिवसांच्या आंत जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यास कळवून असा हक्क प्रस्थापित केला नसेल तर, जिल्हाधिकाऱ्याला स्वविवेकानुसार अशा जमिनीची आकारणी करता येईल आणि वरिष्ठ धारक आणि त्यावेळी किंवा त्यानंतर जमिनीचा ताबा ज्या इसमाकडे असेल तो प्रत्येक इसम त्याप्रमाणे जबाबदार राहील.

**जमीन महसुलाची जबाबदारी.**

२६४. (१) जमिनीचा वरिष्ठ धारक किंवा तो गैरहजर असल्यास, जमिनीचा प्रत्यक्ष ताबा ज्या इसमाकडे असेल तो इसम, धारण केलेल्या जमिनीवर देणे असलेल्या जमीन महसुलाबद्दल जातीने व मालमत्तेच्या संबंधात जबाबदार असेल.

(२) जमिनीबद्दल देणे असलेल्या जमीन महसुलाची थकबाकी ही, तीस हितसंबंध असणाऱ्या इसमांनी उक्त रकमेची मागणी करणाऱ्या व जमिनीवर आणि जमिनीजवळ लावण्यात आलेल्या नोटीशीत याबाबत निर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखेच्या आत ती देण्यास कसूर केल्यास, त्या जमिनीवर व तिच्या प्रत्येक भागावर प्रमुख भार असेल.

**राज्य सरकारच्या मागण्यास प्राधान्य देणे.**

२६५. (१) ह्या प्रकरणान्वये कोणत्याही जमिनीवरील जमीन महसुलाच्या थकबाकीस, त्या जमिनीवरील आणि कोणत्याही अशा जमिनीच्या किंवा तिच्या वरिष्ठ धारकाच्या कोणत्याही इतर कर्जावर, मागणीवर, किंवा कोणत्याही मागणी हक्कावर—मग ते गहाण, निकालपत्र—हुकुमनामा, अंमलबजावणी, जप्ती यांच्या संबंधातील असो वा अन्यथा कोणत्याही प्रकारचे असोत—प्राधान्य देण्यात येईल.

(२) जमीन महसुलाच्या थकबाकीव्यतिरिक्त परंतु ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये महसुली मागणी म्हणून वसूल करता येण्याजोग्या कोणत्याही पैशासंबंधातील राज्य सरकारच्या मागणीला, कोणत्याही जमिनीवरील सर्व असंरक्षित मागण्यांवर प्राधान्य देण्यात येईल.

**महसूल देण्याच्या संबंधात निदेश देण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.**

२६६. राज्य सरकाराकडून देण्यात येतील अशा आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याने, कोणत्याही जमिनीच्या संबंधात देणे असलेला महसूल ज्या इसमास, ज्या जागी व ज्या मुदतीच्या आत दिला पाहिजे ते इसम, ती जागा व ती मुदत यांचे नियमन करणारे [illegible] दिले पाहिजेत व ते नोटीशीद्वारे माहीत करुन दिले पाहिजेत व अशी नोटीस, जमीन महसूल देण्याच्या जमिनीच्या सर्व वरिष्ठ धारकांवर व ते गैरहजर असतील तर ती जमीन ज्या इसमाच्या ताब्यात असेल त्या इसमावर बजावण्यात येईल.

---

*शहरी भूधारणा आकारणी नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९६९ (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक चवेचाळीस) व दुसरी अनुसूची याद्वारे कलमे २६२अ, २६२ब, २६२क, २६२ड समाविष्ट करण्यात आली आहेत. (परिशिष्ट ४२ पहा.)

परंतु, ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये कोणत्याही बाबतीत बसवावयाची आकारणी, वार्षिक एक रुपयापेक्षा अधिक होत नसेल तर, जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकारच्या आदेशास अधीन राहून, अशा आकारणीऐवजी, त्यास, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अधीन राहून, जी रक्कम आकारणीच्या रकमेच्या रास्त बरोबरीची असल्याचे वाटेल परंतु, जी कोणत्याही बाबतीत, आकारणीच्या तीस पटीहून अधिक असणार नाही अशी रक्कम, एका ठोक रकमेच्या स्वरुपात बसविणे हे विधिसंमत असेल.

रक्कम देणे झाल्यानंतर मागणीची नोटीस बजाविणे.

२६७. (१) जर कोणताही जमीन महसूल, तो जेव्हा देणे होईल त्यावेळी किंवा त्या मुदतीत देण्यात नाही आला तर, जिल्हाधिकाऱ्याला, ज्या दिवशी थकबाकीची रक्कम देणे होईल त्या दिवशी किंवा त्या दिवसानंतर, मागणीची नोटीस वरिष्ठ धारकावर किंवा ताबा असणाऱ्या इसमावर किंवा या दोघांवर बजाविता येईल.

(२) ज्या कोणत्याही इसमाला अशी नोटीस देण्यात आली असेल अशा प्रत्येक इसमावर, त्याबद्दल दोन रुपयांहून अधिक नसेल अशी @अनुसूची फ मधील कोष्टकात या बाबतीत निर्दिष्ट केलेल्या दरांनुसार ठरविलेली फी आकारण्यात येईल :

परंतु कोणत्याही बाबतीत, नोटीशीबद्दल आकारण्यात येणारी फी, उक्त नोटीस ज्या जमीन महसुलाच्या बाबतीत देण्यात आली असेल त्या जमीन महसुलापेक्षा अधिक असता कामा नये.

(३) जर यथास्थिती, वरिष्ठ धारक किंवा ताबा असणारा इसम, रक्कम देण्याविषयी मागणीची लेखी नोटीस बजाविण्यात आल्यानंतर वीस दिवसांच्या मुदतीत, देय महसुलाची फेड करण्यात कसूर करील तर, जिल्हाधिकाऱ्याने—

(अ) कसूर करणाऱ्याची जंगम मालमता जप्त करुन व विकून ; किंवा

(ब) ज्या जमिनीबाबत महसूल देणे असेल त्या जमिनीचा, मागणी पूर्ण करण्यासाठी आवश्यक असेल असा भाग जप्त करुन आणि विकून ; किंवा

(क) कसूर करणाऱ्याच्या इतर कोणत्याही स्थावर मालमतेवरील हक्क, मालकी हक्क आणि हितसंबंध जप्त करुन आणि विकून ;

उक्त महसूल वसूल करणे हे विधिसंमत असेल.

अशी विक्री, जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल आणि अशी विक्री, त्याबद्दलची नोटीस राजपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर, निदान पंधरा दिवसांची मुदत संपेपर्यंत, करता कामा नये.

## @अनुसूची 'फ'

(कलम २६७ पहा)

**महसुलाच्या थकबाकीच्या रकमेची मागणी करणाऱ्या नोटीशीसंबंधात कलम २६७ च्या उपबंधान्वये द्यावयाच्या फीच्या दराचे कोष्टक**

| देय महसूल | नोटीस फी रु. पै. |
|---|---|
| रुपये २५ पेक्षा अधिक नसेल तर .. .. | ०·५० |
| रुपये २५ पेक्षा अधिक परंतु रुपये १०० पेक्षा अधिक नसेल तर. | १·०० |
| रुपये १०० पेक्षा अधिक .. .. .. | २·०० |

विक्री कशी करावयाची ते.

२६८. ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये करावयाची विक्री, ही, ह्या अधिनियमाची कलमे १९७, १९८, १९९, २००, २०१, २०२, २०३, २०४, २०५, २०६, २०७, २०८, २०९, २१०, २११, २१२, २१३, २१४, २१५, २१६, २१८, २१९, आणि २२० ह्यांच्या उपबंधानुसार करण्यात येईल :

परंतु, त्याबाबतीत नमूद केलेल्या कोणत्याही पुरेशा कारणास्तव विक्री वेळोवेळी पुढे ढकलता येईल ; आणि ज्यावेळी विक्री तीस दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत लांबणीवर टाकण्यात येईल तेव्हा कसूर करणाऱ्याने नवीन नोटीस देण्याची जरुरी नाही या गोष्टीस संमती दिली नाही तर नवीन नोटीस देण्यात येईल.

कसूर करणारास पकडण्याचा व अटकेत ठेवण्याचा अधिकार.

२६९. जर कसूर करणाऱ्याच्या मालमत्तेच्या विक्रीमुळे जमीन महसुलाच्या थकबाकीसंबंधांतील मागणी पूर्ण होत नसेल तर, जिल्हाधिकाऱ्याने, त्यास पकडण्याची व्यवस्था करणे, व ऋणकोंना अटकेत ठेवण्यासाठी, मुंबई शहरामध्ये त्यावेळी अंमलात असलेल्या विधीअन्वये दिवाणी तुरुंगात अटकेत ठेवणे हे विधिसंमत असेल व त्या कारणासाठी, जिल्हाधिकाऱ्याच्या सहीचे कसूर करणाराबरोबर पाठविलेले मागणीबाबतचे प्रमाणपत्र हे, कर्जासाठी निकालपत्राच्या अंमलबजावणीत अटक करण्याच्या सर्वसामान्य प्रकरणांबाबत रीतसर वैध कार्यरीती अनुसरण्यात आल्याप्रमाणे शेरीफाने काढलेले आवश्यक ते अधिपत्र आहे, असे समजण्यात येईल :

परंतु अशी कसुरी ही हेतूपुरस्सर केलेली असल्याशिवाय आणि कसूर करणाऱ्या इसमास, त्यास अटक करण्याविरुद्ध किंवा अटकावून ठेवण्याविरुद्ध कारण दाखविण्याची संधी दिल्याशिवाय अशी कोणतीही अटक करता कामा नये ;

तसेच देणे असलेली रक्कम दिल्यानंतर अशी कैदेची शिक्षा कोणत्याही वेळी संपुष्टात येईल व ती कोणत्याही बाबतीत—

(एक) देणे असलेली रक्कम पन्नास रुपयाहून अधिक असेल तर सहा महीने मुदतीपेक्षा ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, सहा आठवड्यांपेक्षा ;

अधिक असता कामा नये.

२७०. (१) हुकुमनाम्याची अंमलबजावणी करताना ज्या मालमत्तेची जप्ती व विक्री करण्यास दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (१९०८ चा अधिनियम क्रमांक ५.) अन्वये माफी देण्यात आली असेल अशा सर्व मालमत्तेस, कलम २६७ अन्वये जप्ती व विक्री करण्यापासून माफी देण्यात येईल. जप्ती व विक्रीपासून माफी.

(२) अशा रीतीने माफी मिळण्यास कोणती मालमत्ता पात्र आहे याबाबतचा जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय निर्णायक असेल.

२७१. कलम २६२ ते २६९ च्या उपबंधामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रश्नावरील जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय *[कलम २६२-ब, पोट-कलम (४) व (५) आणि कलम २७४ याच्या उपबंधाच्या अधीन] त्याच्याशी ज्या इसमांचा संबंध असेल त्या सर्व इसमांवर बंधनकारक असेल आणि त्याप्रमाणे तो अंमलात आणला पाहिजे ; परंतु अशा कोणत्याही इसमाने, असा निर्णय त्यास कळविल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाच्या वैधतेबद्दल आक्षेप घेण्याच्या कारणासाठी †[यथास्थिती ‡[राज्य शासनाकडे किंवा] महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे तो अपील करील आणि त्याजविरुद्ध जो आदेश देण्यात येईल तो आदेश पाळील आणि अशा रीतीने फर्माविण्यात आलेला खर्च व व्याज देईल किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे अपील दाखल करण्यात त्याने कसूर केली तर त्यास फर्माविण्यात येईल तेव्हा मागणी केलेली रक्कम तो देईल याविषयी, जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने, तारण दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय स्थगित करण्यात येईल. प्रथमतः जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे परंतु तारण दिल्यानंतर अंमलबजावणी तहकूब करणे.

२७२. कसूर करणाराविरुद्ध चालू असलेल्या सक्तीच्या सर्व आदेशिका, त्याजकडून मागण्यात आलेली रक्कम, त्याने, अशा आदेशिकेची अमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याकडे निषेध व्यक्त करून दिल्यानंतर किंवा देऊ केल्यावर, किंवा मागणीच्या वैधतेबद्दल आक्षेप घेणारे अपील त्याने †[यथास्थिती राज्य शासनाकडे किंवा] महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे दाखल केल्यानंतर आणि उक्त अपिलांचा निर्णय करण्यात येईपर्यंत, अपिलात दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्याचे ‡[राज्य शासनाचे] किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे समाधान होईल अशा रीतीने तरतूद केल्याशिवाय तो अधिकार क्षेत्र सोडून जाणार नाही किंवा त्यात असलेली त्याची कोणतीही मालमत्ता काढून नेणार नाहीं किंवा ती हस्तांतरित करणार नाही, याबाबत जिल्हाधिकाऱ्याचे ‡[राज्य शासनाचे] किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचे समाधान होईल अशारीतीने, त्याने तारण दिल्यावर, थांबविल्या पाहिजेत. हरकत घेऊन रक्कम दिल्यानंतर आणि अपील सादर केल्यानंतर व तारण दिल्यानंतर सक्ती करणाऱ्या आदेशिकेची अंमलबजावणी थांबविणे.

*हे शब्द, कस, आकडे व अक्षर या ऐवजी १९६९ चा महाराष्ट्र क्रमांक चव्वेचाळीस कलम २०. दुसरी अनुसूची याद्वारे व कलम २७४ च्या उपबंधास अधीन राहून या शब्दाऐवजी समाविष्ट केले आहेत.

†वरील अधिनियमाद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

‡ शहर भूधारणा पद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९६९ (१९६९ चा महाराष्ट्र क्रमांक चौव्वेचाळीस) चे कलम २० व दुसरी अनुसूची या द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले. (परिशिष्ट ४२ पहा).

कसूर करणाराची मालमत्ता जप्त करण्यासाठी व तिची विक्री करण्यासाठी अधिपत्राच्या संबंधातील' फी, जादा फी.

२७३. कलम २६९ च्या उपबंधान्वये काढलेल्या सर्व अधिपत्रांवर किंवा ज्या इसमांच्या मालमत्तेच्या संबंधात अशी अधिपत्रे काढण्यात आली असतील अशा इसमांकडून कसूर करणाऱ्यांच्या मालमत्तेची जप्ती व विक्री यांवर, @अनुसूची ग मधील कोष्टकानुसार फी देण्यात येईल ; आणि जेव्हा जेव्हा जप्त केलेली मालमत्ता कोणत्याही चपराशाच्या किंवा चपराशांच्या स्वाधीन करण्यात येईल तेव्हा तेव्हा कामावर लावलेल्या प्रत्येक चपराशाच्या बाबतीत, तशाच रीतीने प्रत्येक दिवसास पंचवीस पैसे जादा फी देण्यात येईल.

## @अनुसूची ग

(कलम २७३ पहा)

### या अधिनियमाच्या कलम २७३ च्या उपबंधान्वये द्यावयाच्या फीचे कोष्टक

| ज्या रकमेबद्दल जप्ती करण्यात आली असेल ती रक्कम | फी |
|---|---|
| (१) | (२) |
| | रु. पै. |
| रुपये ५ पेक्षा अधिक नसेल तर | ०.५० |
| रुपये ५ पेक्षा अधिक परंतु रुपये १० पेक्षा अधिक नसेल तर | १.०० |
| रुपये १० पेक्षा अधिक परंतु रुपये १५ पेक्षा अधिक नसेल तर | १.५० |
| रुपये १५ पेक्षा अधिक परंतु रुपये २० पेक्षा अधिक नसेल तर | २.०० |
| रुपये २० पेक्षा अधिक परंतु रुपये २५ पेक्षा अधिक नसेल तर | २.५० |
| रुपये २५ पेक्षा अधिक परंतु रुपये ३० पेक्षा अधिक नसेल तर | ३.०० |
| रुपये ३० पेक्षा अधिक परंतु रुपये ३५ पेक्षा अधिक नसेल तर | ३.५० |
| रुपये ३५ पेक्षा अधिक परंतु रुपये ४० पेक्षा अधिक नसेल तर | ४.०० |
| रुपये ४० पेक्षा अधिक परंतु रुपये ४५ पेक्षा अधिक नसेल तर | ४.५० |
| रुपये ४५ पेक्षा अधिक परंतु रुपये ५० पेक्षा अधिक नसेल तर | ५.०० |
| रुपये ५० पेक्षा अधिक परंतु रुपये ६० पेक्षा अधिक नसेल तर | ६.०० |
| रुपये ६० पेक्षा अधिक परंतु रुपये ८० पेक्षा अधिक नसेल तर | ७.५० |
| रुपये ८० पेक्षा अधिक परंतु रुपये १०० पेक्षा अधिक नसेल तर | ९.०० |
| रुपये १०० हून अधिक असेल तर | १०.०० |

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील अपिले.

२७४. *[कलम २६२-ब, पोट-कलमे (४) आणि (५) यात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त] जिल्हाधिकाऱ्याने किंवा या प्रकरणान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकार शक्तींचा वापर करणाऱ्या त्याच्या सहाय्यकांपैकी कोणत्याही सहाय्यकाने किंवा हाताखालील इतर सेवकाने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील[९५] करता येईल.

टीप ९५.—कृपया कलम २८५ खालील टीप ९७ पहा. (नियम ५-ब पहा).

*हा मजकूर शहर भूधारणा पद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९६९ (१९६९ चा महाराष्ट्र क्रमांक चव्वेचाळीस) याचे कलम २० व दुसरी अनुसूची याद्वारे समाविष्ट करण्यात आला. (परिशिष्ट ४२ पहा).

**२७५.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९, आणि ह्या अधिनियमाच्या कलम ३२४ मध्ये काहीही असले तरी, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील प्रत्येक अपिलावर, या प्रकरणान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल.

न्यायालय शुल्क.

**टीप ९६.**—कृपया कलम २८५ खालील टीप ९७ पहा. (नियम २० पहा).

**२७६.** राज्य सरकारने, विनामूल्य आणि महसूल मुक्त जमिनी देणे हे विधिसंमत असेल—मग त्या वंशपरंपरागत किंवा वर्षांच्या मुदतीने देण्यात आलेल्या असोत, आणि अनुदानाशी संबंधित असतील अशा इतर अटी व शर्ती (काही असल्यास) यावर देण्यात येतील.

महसूल मुक्त जमिनी देण्याची राज्य सरकारची शक्ती.

## मुंबई शहर भू-मापन व हद्दीच्या निशाण्या

**२७७.** राज्य सरकारच्या प्राधिकारान्वये अगदी अलीकडेच केलेल्या भू-मापनास "मुंबई शहर भू-मापन" असे संबोधण्यात येईल आणि त्यावेळी ठरविलेल्या जमिनीच्या हद्दी आणि उक्त भू-मापनाचे सर्व कागदपत्र हे (हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी त्यामध्ये केलेला फेरबदल किंवा दुरुस्ती यांचा समावेश करून) ह्या प्रकरणान्वयेच्या सर्व कामकाजासाठी आणि ह्या प्रकरणाच्या सर्व प्रयोजनांसाठी, सकृतदर्शनी पुरावा म्हणून समजण्यात येईल :

परंतु, जिल्हाधिकाऱ्याला, अशा जमिनीत हितसंबंध असणाऱ्या पक्षकारांच्या अर्जावरून, अशा सीमांकन केलेल्या जमिनीच्या हद्दीत किंवा अशा कोणत्याही कागदपत्रातील कोणत्याही नोंदीत कोणताही फेरबदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची व्यवस्था करता येईल आणि जिल्हाधिकाऱ्याने सक्षम न्यायालयाच्या हुकुमनाम्यानुसार किंवा आदेशानुसार असा फेरबदल किंवा दुरुस्ती केली पाहिजे.

मुंबई शहर भू-मापनास मान्यता.

**२७८.** (१) राज्य सरकारला, त्यास योग्य वाटेल त्यावेळी, मुंबई शहरामध्ये असलेल्या जमिनीचे भू-मापन करण्याचा आदेश देता येईल ; आणि अशा प्रयोजनाकरिता, भू-मापन अधीक्षक आणि एक किंवा जास्त सहायक भू-मापन अधीक्षक यांची नेमणूक करता येईल.

(२) सहाय्यक अधीक्षक हे, अधीक्षक त्यांना जे अधिकार प्रदान करतील त्या अधिकारांचा वापर करतील.

राज्य सरकारने भू-मापन करण्याचा आदेश देणे आणि अधीक्षक नेमणे.

**२७९.** जिल्हाधिकाऱ्याने किंवा आपल्या लेखी आदेशाद्वारे याबाबतीत योग्य रीतीने अधिकृत करण्यात आलेल्या त्याच्या सहायकांपैकी किंवा हाताखालील इतर इसमांपैकी, कोणत्याही सहाय्यकाने किंवा इसमाने आणि भू-मापनाच्या कामावर ठेवलेल्या अधीक्षकाने किंवा कोणत्याही इतर अधिकाऱ्याने, २४ तासांपेक्षा कमी नसेल अशी नोटीस दिल्यानंतर, कोणत्याही जमिनीवर, उभारलेल्या भू-मापनाच्या हद्दीच्या निशाण्यांची पहाणी करण्याच्या किंवा त्यांत फेरफार करण्याच्या, नवीन निशाण्या उभारण्याच्या किंवा त्यांत दुरुस्ती करण्याच्या कामासाठी किंवा ह्या अधिनियमाच्या कलम २४१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने भू-मापन करण्याकरिता तीत प्रवेश करणे हे विधिसंमत असेल.

जिल्हाधिकारी किंवा त्याच्या हाताखालील इसम यांना जमिनीवर प्रवेश करता येईल.

**२८०.** भू-मापनाच्या कामासाठी कोणत्याही जमिनीवर प्रवेश करण्यापूर्वी, भू-मापन करावयाच्या जमिनीच्या आणि उक्त जमिनीच्या निकटवर्ती जमिनीच्या धारकांवर किंवा खातेदारांवर, आपल्या सहीने लेखी नोटीस बजाविण्याची अधीक्षकास व्यवस्था करता येईल ; उक्त नोटिशीद्वारे, त्याने, आपल्या समक्ष किंवा याबाबतीत तो अधिकृत करील अशा अधिकाऱ्यासमक्ष, निर्दिष्ट करण्यात येईल अशा (अशी नोटीस बजाविण्यात आल्यानंतर तीन दिवसांपेक्षा कमी नसेल अशा) वेळेच्या आत, हद्दी दाखविण्याच्या आणि या प्रकरणाच्या कारणांसाठी आवश्यक असेल अशी माहिती देण्याच्या कारणासाठी म्हणून जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत अशा जमिनीवर हजर राहण्याबद्दल त्यास फर्माविले पाहिजे आणि हजर राहण्यात त्यांनी कसूर केल्यास, तो किंवा असा अधिकारी, त्यांच्या अनुपस्थितीत, भू-मापनाच्या कामास प्रारंभ करतील असे सुद्धा उक्त नोटिशीद्वारे कळविण्यात येईल.

उपस्थित राहण्याकरिता जमीन धारकांवर बजावयाची नोटीस.

नोटिसा बजावल्यानंतर अधीक्षकाने भूमापनाचे काम सुरू करणे.

२८१. कलम २८० अन्वये नोटीस योग्यरीत्या बजावण्यात आल्यानंतर, अधीक्षकास किंवा तो अधिकृत करील अशा अधिकाऱ्यास, भू-मापनाच्या कामाचा प्रारंभ करता येईल—मग ज्या इसमांवर नोटिसा बजाविण्यात आल्या असतील असे इसम हजर असोत वा नसोत.

भू-मापन नकाशा आणि नोंदणी पुस्तक.

२८२. (१) अधीक्षक, हया प्रकरणान्वये ज्या जमिनींचे भू-मापन करण्यात आले असेल त्या सर्व जमिनींचा एक नकाशा आणि नोंदणी पुस्तक तयार करील.

(२) नकाशामध्ये स्वतंत्रपणे दाखविण्यात आलेल्या आणि नोंदणी पुस्तकामध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक जमिनीच्या तुकड्याला दर्शक क्रमांक देण्यात येईल, आणि भू-मापनाच्या वेळी उक्त जमिनीचा धारक असल्याचे दिसून येणाऱ्या इसमाचे नाव नोंदणी पुस्तकामध्ये नमूद करण्यात येईल.

(३) अशा नकाशात किंवा नोंदणी पुस्तकात असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही इसमाच्या अधिकारास बाध येणार नाही.

अधीक्षकास हद्दीच्या निशाण्या उभारता येतील.

२८३. अधीक्षकास, कोणत्याही वेळी, हया प्रकरणान्वये ज्या कोणत्याही जमिनीचे भूमापन करावयाचे असेल किंवा जिचे भूमापन करण्यात आले असेल अशा कोणत्याही जमिनीवर, भूमापन करण्याच्या प्रयोजनाकरिता तो वाजवी म्हणून ठरविल अशा वस्तूंच्या आणि इतक्या संख्येत आणि अशा रीतीने तात्पुरत्या किंवा कायम, हद्दीच्या निशाण्या, उभारण्याची व्यवस्था करता येईल :

परंतु, ज्यावेळी कायम इमारत, भिंत किंवा कुंपण याद्वारे हद्द ठरविण्यात आली असेल त्यावेळी कोणतीही कायम स्वरूपाची हद्दीची निशाणी उभारता कामा नये.

तात्पुरत्या हद्दीच्या निशाण्याची व्यवस्था.

२८४. (१) कलम २८३ अन्वये कोणतीही तात्पुरती हद्दीची निशाणी उभारण्यात आली असेल तेव्हा, अधीक्षकाने, ज्या जमिनीवर किंवा ज्या निकटवर्ती जमिनीवर अशी हद्दीची निशाणी उभारण्यात आली असेल त्या जमिनीच्या धारकादर, आपल्या सहीने एक लेखी नोटीस बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे ; उक्त नोटिशीद्वारे, त्याने, भूमापनाचे काम पूर्ण होईतोपर्यंत अशी हद्दीची निशाणी व्यवस्थित ठेवण्याबद्दल त्यास फर्माविले पाहिजे.

(२) जर अशा धारकाने, अशा नोटीशीचे पालन केले नाही तर, अधीक्षक, हद्दीची निशाणी दुरूस्त करील आणि त्याबद्दलचा खर्च, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, या प्रकरणाच्या उपबंधान्वये अशा धारकाकडून, वसूल करण्यात येईल.

भूमापन फीची आकारणी.

२८५. (१) हया प्रकरणान्वये भूमापन केलेल्या कोणत्याही जमिनीचा धारक, अशा क्षेत्रावर आकारणी करण्यात आलेली भूमापन फी व अशा जमिनीचे करयोग्य मूल्य देण्यास पात्र ठरेल.

(२) पोट-कलम[९७] (१) अन्वये द्यावयाच्या भूमापनाच्या फीच्या रकमेचे, याबाबतीत राज्य सरकारने केलेल्या नियमानुसार जिल्हाधिकाऱ्याकडून नियमन करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) आणि (२) अनुसार आकारण्यात आलेली कोणतीही भूमापन फी ही, मुंबई शहराचे भू-मापन पूर्ण झाल्यानंतर, उक्त फी देण्यास जबाबदार असणाऱ्या इसमावर जिल्हाधिकाऱ्याकडून नोटीस बजाविण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत देण्यात येईल ; आणि अशी भूमापन फी ही, हया प्रकरणाच्या उपबंधान्वये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे आकारण्यात येईल.

(४) हया कलमान्वये कोणत्याही जमिनीवर आकारण्यात आलेली भूमापन फी ज्या इसमाने दिली असेल अशा कोणत्याही इसमास, अशा जमिनीशी जेथवर संबंध येत असेल तेथवर, कलम २८२ अन्वये, तयार केलेल्या नकाशातील प्रमाणित उतारा आणि नोंदणीपुस्तकातील प्रमाणित उतारा विनामूल्य मिळण्याचा अधिकार असेल.

**टीप ९७.**—महाराष्ट्र जमीन महसूल (मुंबई शहर) नियम १९६८ या नांवाचे नियम (कृपया टीप ९५ व ९६ पहा) नियम ६ पहा.

## महाराष्ट्र जमीन महसूल (मुंबई शहर) १९६८ या संबंधीचे नियम

१. **संक्षिप्त नाव.**—ह्या नियमास महाराष्ट्र जमीन महसूल (मुंबई शहर) नियम, १९६८ असे म्हणता येईल ; शासकीय अधिसूचना क्रमांक युएन-एफ-२६६७-आर, दिनांक ११ मार्च १९६८.

२. **व्याख्या.**—संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर या नियमात (अ) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६.

(ब) 'कलम' म्हणजे अधिनियमाचे कलम.

३. **हातची किंमत निश्चित करणे.**—अधिनियमाचे प्रकरण चौदा यांच्या उपबंधान्वये कोणतीही जमीन किंवा इतर मालमत्ता सार्वजनिक लिलावाद्वारे विकावयाची असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटेल अशी हातची किंमत त्यावर ठरविता येईल ;

४. **न्यायालय शुल्क.**—कलम २७४ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणासमोर दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक अपीलावर २० रुपयांचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल.

५. **जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवावयाची अपीलांची प्रत.**—महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढे एखादे अपील दाखल करण्यात येईल त्याबाबतीत अपीलदार, असे अपील दाखल केल्यापासून तीन दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्याकडे त्या अपीलाची एक प्रत पाठवील.

६. **भूमापन शुल्क.**—(१) कलम २८५ अन्वये देय असलेले भूमापन शुल्क जिल्हाधिकारी सर्वसाधारणपणे अशा प्रकारे ठरवील की, भूमापनाखालील जागेच्या संबंधात देय असलेल्या एकूण रकमेमुळे भूमापन आणि नकाशे तयार करणे व कलम २८२ अन्वये जे नकाशे व नोंदवह्या तयार करणे आवश्यक असतील ते नकाशे व नोंदवह्या यांचा खर्च भागेल ;

(२) प्रत्येक इमारतीच्या जागेसाठी किंवा पृथकपणे धारण केलेल्या तिच्या कोणत्याही भागासाठी शुल्क निश्चित करताना जिल्हाधिकारी पोट-नियम (१) चे उपबंध आणि अशा इमारतीची जागा किंवा तिचा भाग यांचे स्थान, मूल्य आणि क्षेत्र विचारात घेईल.

**२८६.** (१) शहराच्या कोणत्याही भागाचे भूमापन पूर्ण झाल्यानंतर, अधीक्षकाने अशा भागाच्या भूमापनाच्या संबंधातील सर्व नकाशे, नोंदणीपुस्तके आणि इतर कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्याकडे ठेवली पाहिजेत. भूमापना-संबंधातील सर्व कागदपत्रे जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविणे.

(२) नकाशे इत्यादी अशा रीतीने ठेवण्यात आल्याबद्दल राजपत्रामध्ये अधिसूचित करण्यात येईल, आणि भूमापनामध्ये हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही इसमास, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत, कोणत्याही वेळी, असे नकाशे, नोंदणीपुस्तक आणि इतर कागदपत्रे यांची विनामूल्य पाहणी करता येईल.

(३) अशा मुदतीमध्ये, जिल्हाधिकारी, आवश्यक असेल तर, आणि संबंधित पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराच्या हक्कास बाध न आणता, कलम २८२ अन्वये तयार करण्यात आलेला नकाशा किंवा नोंदणीपुस्तक विनामूल्य दुरूस्त करण्याची व्यवस्था करील.

**२८७.** (१) कलम २८२ अन्वये तयार करण्यात आलेला नकाशा व नोंदणीपुस्तक, जिल्हाधिकाऱ्याकडून ठेवण्यात येईल ; व त्याने, आवश्यक असेल त्याप्रमाणे वेळोवेळी, कोणत्याही इसमाच्या हक्कास बाध न आणता, अशा नकाशात फेरबदल करण्याचो आणि नोंदणीपुस्तकातील नोंदी दुरुस्त करण्याची व्यवस्था केली पाहिजे : भूमापन आणि नकाशा आणि नोंदणीपुस्तक ठेवणे.

परंतु, कोणत्याही इसमास, ह्या कलमाच्या प्रयोजनाकरिता जमिनीमध्ये कोणताही हितसंबंध संपादन केल्याबद्दल नोटीस देणे आवश्यक असणार नाही.

(२) जिल्हाधिकाऱ्यास नकाशाच्या कोणत्याही भागाची फेरतपासणी करण्याचा खर्च आणि असा भाग ज्या जमिनीशी संबंधित असेल त्या जमिनीवरील सर्व आकस्मिक खर्च यांची आकारणी करता येईल आणि, असा खर्च, अशा जमीनधारकास द्यावा लागेल आणि ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे त्याची आकारणी करण्यात येईल.

नकाशात दुरुस्ती करणे.

२८८. ह्या प्रकरणान्वये राज्य सरकारकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमास अधीन राहून मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशान्वये काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास, ह्या प्रकरणान्वये तयार करण्यात आलेल्या कोणत्याही नकाशात दुरुस्ती करण्याच्या कारणाकरिता, ह्या प्रकरणान्वये अधीक्षकाच्या शक्तीपैकी कोणत्याही शक्तीचा वापर करता येईल.

हद्दीच्या निशाण्या सुस्थितीत ठेवण्याची व त्यांची दुरुस्ती करण्याची जबाबदारी.

२८९. जमिनीचा प्रत्येक वरिष्ठ धारक, त्याने धारण केलेल्या जमिनीवरील भूमापनाच्या हद्दीच्या निशाण्या सुस्थितीत व या चांगल्या दुरुस्त स्थितीत ठेवण्यास आणि त्यात फेरबदल करण्यात किंवा त्या काढून टाकण्यात जिल्हाधिकाऱ्याकडून जो वाजवी खर्च करण्यात आला असेल असा, प्रत्येक निशाणासाठी पाच रुपयांहून अधिक नसेल असा खर्च देण्यास जबाबदार असेल.

जिल्हाधिकाऱ्याला भूमापनाच्या नवीन निशाण्या उभारण्यास किंवा त्यांत दुरुस्ती करण्यास वरिष्ठ धारकास भाग पाडता येईल. मागणी कशी करावयाची, ते.

२९०. कोणत्याही भूमापनाच्या हद्दीची निशाणी नष्ट झाल्याच्या, खराब झाल्याच्या, तिला नुकसान पोहोचविण्यात किंवा ती काढून टाकण्यात आल्याच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने, ज्या जमिनीची निशाणी अशी हद्द निर्दिष्ट करीत असेल अशा कोणत्याही जमिनीच्या वरिष्ठ धारकावर किंवा त्याच्या गैरहजेरीत जमीन ताब्यात असणाऱ्या इसमावर, उक्त जिल्हाधिकाऱ्याने सही केलेला आदेश बजावणे हे विधिसंमत असेल ; अशा आदेशाद्वारे, उक्त आदेश बजावण्यात आल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अशा वरिष्ठ धारकास किंवा जमीन ताब्यात असणाऱ्या इसमास स्वखर्चाने उक्त निशाणी नवीन करण्यास किंवा ती दुरुस्त करण्यास सांगितले पाहिजे.

कसूर केल्यावर जिल्हाधिकारी किंवा सहाय्यक ह्यास प्रवेश करण्याचा व निशाणी नवीन करण्याचा किंवा ती दुरुस्त करण्याचा अधिकार असेल. नवीन निशाणी करण्याचा किंवा ती दुरुस्त करण्याचा आकार.

२९१. जर उक्त भूमापनाच्या हद्दीची निशाणी उक्त मुदतीत जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने नवीन किंवा दुरुस्त करण्यात न आली तर, जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याच्या सहाय्यकांपैकी किंवा हाताखालच्या इसमांपैकी कोणत्याही सहाय्यकाने किंवा हाताखालच्या इसमाने किंवा यात यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे योग्यरीतीने अधिकार दिलेल्या इतर इसमाने, उक्त निशाणी ज्या जमिनीसंबंधात असेल अशा कोणत्याही जमिनीवर प्रवेश करणे व ती नवीन करणे किंवा दुरुस्त करणे हे विधिसंमत असेल ; आणि अशा रीतीने नवीन केलेल्या किंवा दुरुस्त केलेल्या प्रत्येक निशाणीसाठी, जिल्हाधिकाऱ्याने ज्याच्या जमिनीची हद्द अशा कोणत्याही निशाणीने निर्दिष्ट करण्यात आली असेल अशा प्रत्येक वरिष्ठ धारकावर किंवा जमीन ताब्यात असणाऱ्या इसमावर एकूण दहा रुपयांहून अधिक नसेल अशी त्यास योग्य वाटेल अशी रक्कम आकारणे हे विधिसंमत असेल.

२९२. कोणत्याही इसमास, ह्या प्रकरणान्वये करण्यात आलेल्या भूमापनाच्या प्रयोजनाकरिता, किंवा तदनुसार हद्दीच्या निशाण्या उभारण्याकरिता कोणत्याही जमिनीसंबंधातील स्वामित्वपत्रे सादर करण्यात किंवा त्यामधील मजकूर उघड करण्यास भाग पाडता कामा नये.

स्वामित्वपत्र विशेषाधिकार.

२९३. कलमे २७८ ते २९२ (दोन्ही धरून) अन्वये केलेल्या कामकाजास, कोणत्याही रीतीबाह्यतेमुळे बाध येणार नाही ; मात्र या कलमातील उपबंधाचे तत्वार्थाने व परिणामदृष्ट्या पालन करण्यात येईल.

रीतीबाह्यतेमुळे कामकाजावर परिणाम न होणे.

## सरकारी जमिनी आणि किनाऱ्यालगतचा प्रदेश

२९४. मुंबई शहरातील भोगवटयांत सर्व जमीन आणि भरतीच्या पाण्याच्या खुणेखालील किनाऱ्यालगतच्या प्रदेशाचा भोगवटयात नसलेला प्रत्येक भाग ह्रा, वैधरीत्या अस्तित्वात असलेले लोकांचे जाण्यायेण्याचे अधिकार व इतर सर्व अधिकार यांस नेहमीच अधीन राहून, राज्य सरकारची मालमत्ता आहे, असे समजण्यात येईल व ती राज्य सरकारची मालमत्ता असल्याचे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

शंकेचे निरसन व्हावे म्हणून, याद्वारे असे स्पष्टपणे घोषित करण्यात येत आहे की, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, पूर्वीच्या कोणत्याही विधीद्वारे राज्य सरकारची मालमत्ता असल्याचे घोषित केलेल्या भोगवटयात नसलेल्या जमिनीवरील राज्य सरकारच्या अधिकाराला बाध येतो, असे समजले जाणार नाही.

जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश यावरील सरकारचा अधिकार.

२९५. जिल्हाधिकाऱ्याने, राज्य सरकारची मंजुरी घेऊन त्यास योग्य वाटेल अशा रीतीने व अशा शर्तीस अधीन राहून, राज्य सरकारमध्ये विहित असलेल्या कोणत्याही जमिनी किंवा किनाऱ्यालगतचा प्रदेश यांची विल्हेवाट लावणे हे विधिसंमत असेल ; आणि अशा कोणत्याही बाबतीत अशा रीतीने विल्हेवाट लावण्यात आलेली जमीन किंवा किनाऱ्यालगतचा प्रदेश, केवळ अशा विहित केलेल्या रीतीने व मुदतीसाठी व अशा शर्तीस अधीन राहून धारण करण्यात येईल.

अशा जमिनी व किनाऱ्यालगतचा प्रदेश यांची विल्हेवाट कशी लावावयाची ते.

## जमिनी वगैरेचे हस्तांतरण

२९६. (१) राज्य सरकारास जमीन महसूल देण्यास अधीन असलेल्या, कोणत्याही जमिनीचा, घराचा किंवा इतर स्थावर मालमत्तेचा मालकीहक्क, जेव्हा जेव्हा हस्तांतरित किंवा अभिहस्तांकित करण्यात येईल तेव्हा तेव्हा, असे हस्तांतरण करणारा किंवा अभिहस्तांकन करणारा इसम आणि ज्या इसमाकडे ते हस्तांतरित करण्यात आले किंवा ज्या इसमाच्या नावे करून देण्यात आले असेल तो इसम, यांनी, अनुक्रमे, अशा हस्तांतरणाबद्दल किंवा अभिहस्तांकनाबद्दल जिल्हाधिकाऱ्याला सूचना देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) अशी सूचना, हस्तांतरणाचा किंवा अभिहस्तांकनाचा लेख केल्यानंतर किंवा त्याची नोंदणी केली असेल तर नोंदणीनंतर किंवा लेख केला नसेल तर, ते हस्तांतरण किंवा अभिहस्तांकन अमलात आल्यानंतर, वीस दिवसांच्या आत देण्यात येईल.

(३) ज्या कोणत्याही इसमाचे नाव कोणत्याही मालमत्तेच्या मालकीहक्कासंबंधात जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात दाखल केलेले असेल तो इसम मरण पावल्याच्या बाबतीत, ज्या इसमाकडे असा मालकीहक्क वारस म्हणून किंवा इतर रीतीने, हस्तांतरित करण्यात येईल त्या इसमाने, त्याबाबतची सूचना, असा मृत्यू झाल्यापासून एक वर्षाच्या आत, जिल्हाधिकाऱ्यास देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

जमिनी वगैरेच्या मालकी हक्काच्या हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकाऱ्यास सूचना देणे.

२९७. (१) सूचना, यथास्थिती, अनुसूची 'ह' किंवा अनुसूची 'आय' च्या नमुन्यात नोटीस असेल आणि तीत, उक्त नमुन्यान्वये आवश्यक असलेला सर्व तपशील स्पष्टपणे लिहिलेला असेल.

नोटिशीचा नमुना.

(२) जिल्हाधिकाऱ्यास तसे फर्माविणे योग्य आहे असे वाटत असेल तेव्हा अशा नोटिशीबरोबर, अशा हस्तांतरणाचा लेख, कोणताही असल्यास, ज्या जमिनीचे हस्तांतरण किंवा अभिहस्तांकन करावयाचे असेल त्या जमिनीचा जो नकाशा जिल्हाधिकारी निदेश देईल अशा अधिकाऱ्याने काढला असेल आणि त्याच्या खरेपणाबद्दल सही केली असेल तो नकाशा आणि दवंडी पिटवून, अशा हस्तांतरणाबद्दल किंवा अभिहस्तांकनाबद्दल जाहीर सूचना दिली असल्याबद्दलचे प्रमाणपत्र, पाठविले पाहिजे.

## अनुसूची 'ह'

(कलम २९७ पहा)

**लेखान्वये असेल ते खेरीज करून, अन्य रीतीने हस्तांतरण करण्यात आले असेल तेव्हा या अधिनियमाच्या कलम २९७ अन्वये द्यावयाच्या हस्तांतरणाच्या नोटीशीचा नमुना**

जिल्हाधिकारी, मुंबई, यास,

मी, अ. ब., महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, याच्या कलम ३०२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, मालमत्तेच्या पुढील हस्तांतरणाबाबत याद्वारे नोटीस देत आहे :—

| नोटिशीची तारीख | जिल्हाधिकाऱ्याच्या ज्या अभिलेखात मालमत्ता आता ज्या नावाखाली नमूद करण्यात आली असेल ते नाव | ज्याच्या नावे हस्तांतरित करावयाची असेल त्याचे नाव | मालमत्तेचे वर्णन | | | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | त्यात कोणत्या गोष्टीचा समावेश आहे | स्थान | जिल्हाधिकाऱ्याचा क्रमांक | मुंबई शहर भू-मापन क्रमांक | जमिनीची लांबी-रुंदी | सीमा | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| | | | | | | | | | |

(सही) अ. ब.

अनसूची 'आय'

(कलम २९७ पहा)

**लेखाद्वारे हस्तांतरण करण्यात येईल तेव्हा या अधिनियमाच्या कलम २९७ अन्वये द्यावयाच्या हस्तांतरणाच्या नोटिशीचा नमुना**

**प्रति,**

जिल्हाधिकारी, मुंबई, यास,

मी, अ. ब., महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, याच्या कलम ३०२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, मालमत्तेच्या पुढील हस्तांतरणाबाबत, याद्वारे नोटीस देत आहे :—

| नोटिशीचा दिनांक | लेखाचा दिनांक | विक्रेता किंवा अभिहस्तांकिती यांचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकितीचे नाव | मोबदल्याची रक्कम | मालमत्तेचे वर्णन | | | | | | जर लेख नोंदण्यात आला असेल तर नोंदणीची तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्यात कोणत्या गोष्टींचा समावेश आहे ते | स्थान | जिल्हाधिकाऱ्याचा क्रमांक | मुंबई शहर भू-मापन क्रमांक | जमिनीची लांबी रुंदी | सीमा | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| | | | | | | | | | | | | |

(सही) अ. ब.

नोटीस देण्यात हयगय केल्या-बद्दल शास्ती.

२९८. निकटपूर्वीच्या दोन कलमान्वये आवश्यक असलेली नोटीस, तीत निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत देण्यात हयगय करणारा प्रत्येक इसम धारण केलेल्या जमिनीबद्दल जमीन महसूल म्हणून एक रुपयाहून कमी रक्कम देत असेल त्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वविवेकानुसार, दहा रुपयापेक्षा अधिक नसेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस आणि इतर कोणत्याही बाबतीत शभर रुपयापेक्षा अधिक नसेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

मालकीहक्क हस्तांतरित करणारा परंतु त्याबाबत सूचना देण्याचे टाळणारा इसम महसूल देण्यास पात्र असण्याचे चालू राहणे.

२९९. कलम २९६ व २९७ अन्वये आवश्यक असलेली नोटीस न देता, राज्य सरकारास जमीन महसूल देण्यास अधीन असेल अशी कोणतीही जमीन, घर किंवा इतर स्थावर मालमत्ता हस्तांतरित करणारा प्रत्येक इसम, अशी नोटीस देण्यात येईपर्यंत किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात करावयाची हस्तांतरणाची आवश्यक ती नोंद करण्यात येईपर्यंत, त्याबाबत जो जमीन महसूल देणे होईल तो सर्व जमीन महसूल देण्यास राज्य सरकारास जबाबदार असेल :

परंतु, ह्या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे, जमिनीची, घराची किंवा इतर स्थावर मालमत्तेची कलम २६७ च्या उपबंधान्वये जप्त होण्याची किंवा विक्री होण्याची पात्रता कमी होते असे समजता कामा नये.

नोंदीबद्दल किंवा हस्तांतरणाबद्दल वाद असल्याच्या बाबतीत कार्यवाही.

३००. (१) राज्य सरकारास जमीन महसूल देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही जमिनीच्या घराच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या बाबतीत किंवा त्या संबंधात, जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखात करावयाच्या किंवा केलेल्या कोणत्याही नोंदीबाबत किंवा हस्तांतरणाबाबत कोणताही वाद किंवा प्रश्न उपस्थित करण्यात येईल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याने, अशा नोंदीत किंवा हस्तांतरणात हितसंबंध असलेल्या सर्व पक्षकारांना, आज्ञापत्र काढून बोलाविले पाहिजे आणि त्यास आवश्यक वाटेल असा पुरावा मागविला पाहिजे आणि अशा साक्षीदाराची तपासणी केली पाहिजे आणि त्यानंतर, त्याने अशा जमिनीच्या, घराच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या संबंधात आपल्या अभिलेखात कोणत्या नोंदी केल्या पाहिजेत ते संक्षिप्त रीतीने चौकशी करून ठरविले पाहिजे.

(२) अशा कोणत्याही जमिनीचा, घराचा किंवा इतर स्थावर मालमत्तेचा मालकीहक्क ठरविण्याबाबत सक्षम न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत कोणत्याही वेळी जिल्हाधिकाऱ्यास सादर करण्यात येईल तर जिल्हाधिकाऱ्याने, अशा आदेशास अनुसरून, आपल्या अभिलेखात, सुधारणा केली पाहिजे.

नोंदणीमुळे किंवा हस्तांतरणामुळे सरकारच्या अधिकारास बाध न येणे.

३०१. जिल्हाधिकाऱ्याच्या अभिलेखातील कोणत्याही मालकी हक्काच्या नोंदणीमुळे किंवा मालकी-हक्काच्या हस्तांतरणामुळे, ज्या जमिनीच्या, घराच्या किंवा इतर स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असे कोणतेही हस्तांतरण करण्यात आले असेल किंवा अशी नोंदणी करण्यात आली असेल अशी जमीन, घर किंवा स्थावर मालमत्ता यांतील सरकारचा कोणताही अधिकार, मालकीहक्क किंवा हितसंबंध यांस कोणत्याही प्रकारे बाध येईल अशा रीतीने लागू आहे असे समजता कामा नये.

## कार्यपद्धती

आज्ञापत्र वगैरेंना विधी लागू करणे.

३०२. (१) आज्ञापत्र प्रतिनिधीने काढण्यासंबंधी आणि जिल्हा न्यायालयातील दाव्यात साक्षीदारास हजर रहाण्यास भाग पाडण्यासंबंधी व त्याना पारिश्रमिक देण्यासंबंधी, त्या त्यावेळी अंमलात असलेले दिवाणी व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८चा अधिनियम क्रमांक ५) चे उपबंध हे, ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये जिल्हाधिकाऱ्यापुढे हजर रहाण्यासाठी आज्ञापत्र काढून बोलाविलेल्या सर्व इसमाना लागू असतील.

(२) ह्या प्रकरणान्वये देणे आवश्यक असलेली जी कोणतीही नोटीस देण्याचा जिल्हाधिकाऱ्यास किंवा त्याच्या हाताखालील कोणत्याही अधिकाऱ्यास अधिकार असेल ती नोटीस—

(अ) कोणत्याही इसमाच्या नावे पाठविली असेल आणि—

(एक) अशा इसमाच्या स्वाधीन केली असेल तर ; किंवा

(दोन) त्याच्या रहाण्याच्या ठिकाणी आणि त्याच्या गैरहजेरीत, त्याच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ पुरुषाच्या किंवा नोकराच्या स्वाधीन केली असेल तर, किंवा

(तीन) पाकिटात घालून आणि भारतीय डाकघर अधिनियम, १८९८ याच्या प्रकरण ६ अन्वये डाकनोंदणी करून, त्याच्या शेवटच्या माहित असलेल्या राहण्याच्या ठिकाणाचा किंवा धंद्याच्या ठिकाणाचा पत्ता लिहून पाठविली असेल तर, किंवा

(ब) अशी नोटीस कोणत्या इसमास पाठवावी याबद्दल किंवा अशी नोटीस ज्या कोणत्याही इसमावर बजावावयाची इच्छा असेल त्याच्या राहण्याच्या ठिकाणाबद्दल, पत्त्याबद्दल किंवा धंद्याच्या ठिकाणाबद्दल जिल्हाधिकाऱ्याला शंका असेल, आणि

(एक) ती ज्या जमिनीसंबंधी असेल त्या जमिनीवरील किंवा तिच्याजवळील एखाद्या ठळक जागी लावण्याची व्यवस्था केली असेल तर, आणि

(दोन) ती, शासकीय राजपत्रात किंवा त्यास योग्य वाटेल अशा स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केली असेल किंवा अशा जागेवर किंवा जागेजवळ, दवंडी पिटवून, जाहीर करण्यात आली असेल तर, अशी नोटीस पुरेशा रीतीने बजावण्यात आली आहे असे मानले पाहिजे.

## घरभाडे, फी, दंड वगैरे बसविणे

३०३. (१) सरकारची मालमत्ता असलेल्या कोणत्याही घराच्या भोगवटयासंबंधीने कोणत्याही इसमास देणे असलेले सर्व भाडे आणि ह्या प्रकरणान्वये आकारता येईल अशी सर्व फी व दंडाच्या आणि शास्ती बद्दलच्या रकमा, आणि कोणत्याही जमिनीच्या किमतीबद्दल किंवा भू-मापनाच्या हद्दीच्या निशाण्यात फेरबदल केल्याबद्दल, त्या काढून टाकल्याबद्दल, त्या नवीन केल्याबद्दल किंवा त्यांची दुरुस्ती केल्याबद्दल किंवा अतिक्रमण बंद केल्याबद्दल किंवा ते काढून टाकल्याबद्दल ह्या प्रकरणाच्या उपबंधान्वये वसूल करावयाच्या सर्व रकमा, ह्या प्रकरणाची कलमे २६७ व २६९ च्या उपबंधान्वये महसुली मागण्या ज्या रीतीने वसूल करता येतात त्याच रीतीने वसूल करण्यात येतील.

*येणे असलेल्या रकमा महसुला-बाबतच्या मागण्या म्हणून वसूल करण्यात येतील.*

(२) कोणत्याही अधिनियमान्वये किंवा विनियमान्वये किंवा त्या अन्वयेच्या कोणत्याही नियमान्वये किंवा राज्य सरकारशी केलेल्या कोणत्याही कबुलायतीअन्वये किंवा करारान्वये, आकारणी म्हणून किंवा महसुलाची मागणी म्हणून किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येतील अशा जाहीर केलेल्या इतर सर्व रकमासुद्धा, ह्या प्रकरणाची कलमे २६७ व २६९ च्या उपबंधान्वये महसुलाच्या मागण्या ज्या रीतीने वसूल करण्यात येतात त्याच रीतीने, वसूल करण्यात येतील.

(३) ह्या प्रकरणाच्या उपबंधापैकी कोणत्याही उपबंधान्वये देण्याजोगी कोणतीही रक्कम देण्याबद्दल किंवा उपरिनिर्दिष्ट कोणत्याही कराराबद्दल जामीन राहिले असतील असे सर्व इसम, त्यांच्या जामीनपत्राच्या अटीन्वये जी रक्कम किंवा तिचा जो कोणताही भाग देण्यास ते पात्र असतील ती रक्कम किंवा असा कोणताही भाग देण्यास कसूर करतील तर, असे इसम महसूल देण्यात कसूर करणारे म्हणून, कलमे २६७ व २६९ च्या उपबंधान्वये, कार्यवाही केली जाण्यास पात्र असतील आणि कलमे २६७ व २६९ चे उपबंध शक्य असेल तेथवर, अशा इसमाना लागू होतील.

३०४. मुंबई शहरात राहणाऱ्या किंवा मालकीहक्काने मालमत्ता धारण करणाऱ्या कोणत्याही इसमाकडून येणे असलेली आणि जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल अशी जी कोणतीही रक्कम राज्यातील कोणत्याही जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा सहाय्यक किंवा उपजिल्हाधिकाऱ्याने किंवा तहसीलदाराने प्रमाणित केली असेल आणि ती त्याजकडून येणे असल्याचे अशाप्रकारे त्यानी प्रमाणित केले असेल अशी रक्कम, ह्या प्रकरणान्वये जमीन महसुलाची थकबाकी ज्या रीतीने वसूल करता येते त्याच रीतीने मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने वसूल करणे, हे विधिसंमत असेल.

*येणे असलेल्या रकमांच्या वसुलीसाठी इतर जिल्हाधिकाऱ्यांना सहाय्य करण्याची मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांची सक्ती.*

जिल्हाधिकाऱ्याने नोंदणीपुस्तके आणि खंडाबाबतचे पत्रक ठेवणे.

**३०५.** राज्य सरकार वेळोवेळी मंजुरी देईल अशा नमुन्यात, प्रत्येक वर्णनाच्या जमिनीचे, अशी जमीन ज्या सत्ताप्रकाराने आणि ज्या शर्तीवर धारण केली असेल त्या सत्ता प्रकारानुसार आणि त्या शर्तीनुसार, त्यांचे वेगळे नोंदणीपुस्तक आणि खंडाबाबतचे पत्रक तयार करून ठेवणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

नियम.

३०६. (१) राज्य सरकारास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, ह्या प्रकरणाचे उद्देश पार पाडण्याकरिता ह्या प्रकरणाच्या उपबंधाशी सुसंगत असे नियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि उपरिनिर्दिष्ट उपबंधांच्या सामान्यतेस बाध न आणता अशा नियमात जिल्हाधिकारी, आणि त्याचे सहाय्यक व इतर हाताखालील इसम यांना आपली कर्तव्ये पार पाडताना मार्गदर्शन करण्यासाठी किंवा ह्या प्रकरणात स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल अशा या प्रकरणाच्या वादविषयाशी संबंधित असलेल्या इतर कोणत्याही कारणासाठी तरतूद करता येईल.

व्यावृत्ती.

३०७. (१) मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८७६ (१८७६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २) याच्या उपबंधान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (विहित केलेले सर्व नियम धरून), करण्यात आलेल्या नेमणुका, प्रदान करण्यात आलेल्या शक्ती, उक्त अधिनियमान्वये काढण्यात आलेले आदेश व प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचना आणि आता अंमलात असलेले आणि या प्रकरणामध्ये हाताळण्यात आलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबीसंबंधातील (कोणतेही असल्यास) इतर सर्व नियम ; मुंबई शहर भूमापन अधिनियम, १९१५ (१९१५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.) अन्वये, करण्यात आलेले कोणतेही भूमापन किंवा उभारण्यात आलेल्या हद्दीच्या निशाण्या किंवा तयार करण्यात आलेले कोणतेही नकाशे व नोंदणीपुस्तके ही, या प्रकरणान्वये विहित करण्यात, प्रदान करण्यात, काढण्यात, प्रसिद्ध करण्यात, उभारण्यात आणि तयार करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(२) उपरिनिर्दिष्ट अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये सुरू करण्यात आलेले सर्व कामकाज हे, मुंबई शहरात हे प्रकरण अंमलात आल्यावर, ह्या अधिनियमान्वये सुरू करण्यात आलेले कामकाज म्हणून समजण्यात येईल आणि यानंतर ते ह्या अधिनियमाच्या उपबंधानुसार चालविण्यात येईल.

# प्रकरण १५

## महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण

३०८. ह्या प्रकरणामध्ये, संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, व्याख्या.

(अ) "अध्यक्ष" या संज्ञेचा अर्थ, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, असा समजावा ;

(ब) "न्यायाधिकरण" या संज्ञेचा अर्थ, कलम ३०९ अन्वये प्रस्थापित केलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, असा समजावा.

३०९. (१) महाराष्ट्र राज्यासाठी, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण या नावाने ओळखण्यात येणारे एक न्यायाधिकरण स्थापन करण्यात येईल. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण.

(२) न्यायाधिकरणात अध्यक्ष व राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियुक्त करील इतके इतर सदस्य यांचा समावेश असेल.

३१०. न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्यांच्या अर्हता (वय धरून), त्यांच्या पदाची मुदत व त्यांच्या सेवेच्या शर्ती ह्या, विहित[९८] करण्यात येतील अशा असतील. अध्यक्ष व सदस्य.

टीप ९८ : कृपया कलम ३२५ खालील टीप १०१ पहा (नियम ३ व ४ पहा).

३११. (१) अध्यक्ष किंवा इतर सदस्य मृत्यु पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, किंवा त्याच्या नेमणुकीची मुदत संपल्यामुळे किंवा त्याची नेमणुक संपुष्टात आणल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, कोणतीही जागा रिकामी होईल तर, ती जागा योग्य अर्हताप्राप्त इसमांची नेमणूक करून भरण्यात येईल. पद रिकामे होणे व तात्पुरती गैरहजेरी.

(२) न्यायाधिकरणाचा कोणताही सदस्य, आजारीपणामुळे किंवा इतर दौर्बल्यामुळे आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास तात्पुरता असमर्थ होईल तर, त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी, एकाच वेळी सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही अशा कोणत्याही मुदतीसाठी इतर कोणत्याही इसमाची राज्य सरकारला नेमणूक करता येईल, आणि अशा रीतीने नेमलेल्या इसमास, त्या मुदतीत ज्या इसमाच्या जागी त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या इसमास जे अधिकार असतील तेच अधिकार असतील.

(३) जर, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीमध्ये अध्यक्षाचे पद रिकामे होईल तर, जेष्ठतम सदस्य, राज्य शासनाकडून अध्यक्षाची नेमणूक करून त्याचे पद भरण्यात येईपर्यंत, अध्यक्ष म्हणून काम करील.

(४) उपरोक्त पोट-कलमात उल्लेख केलेल्या कोणत्याही रिकाम्या जागेमुळे किंवा तात्पुरत्या गैरहजेरीमुळेच, केवळ न्यायाधिकरणाची अवैधरीत्या प्रस्थापना केली आहे असे समजता कामा नये.

३१२. राज्य सरकारला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, विहित[९९] करण्यात येतील अशा अर्हता-प्राप्त इसमाची न्यायाधिकरणाचा प्रबंधक म्हणून नेमणूक करता येईल. आणि तसेच, त्याच रीतीने, अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येतील अशा क्षेत्रासाठी, विहित करण्यात येतील अशा अर्हताप्राप्त इसमांची विहित करण्यात येतील इतक्या संख्येत उप-प्रबंधक म्हणून नेमणूक करता येईल. प्रबंधक व उप-प्रबंधक.

टीप ९९ : कृपया कलम ३२५ खालील टीप १०१ पहा (नियम ५ पहा).

३१३. न्यायाधिकरणाचे मुख्यालय बृहन्मुंबईत असेल. मुख्यालय.

३१४. न्यायाधिकरणाच्या बैठकी सामान्यत: मुख्यालयात, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथे भरविण्यात येतील व तसेच अध्यक्ष, राज्य सरकारच्या अनुमतीने, सामान्य किंवा विशेष आदेशानुसार निदेश देईल त्याप्रमाणे कामकाज चालविण्यास सोयीस्कर असेल अशा महाराष्ट्र राज्यातील इतर कोणत्याही जागी बैठकी भरविता येतील. बैठकीची जागा.

न्यायाधिकरणाचा क्षेत्राधिकार.

३१५. (१) या अधिनियमाच्या प्रकरण तेरामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमध्ये काहीही असले, तरी परंतु, ह्या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, अनुसूची 'ज' मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिनिमांच्या उपबंधान्वये उद्‌भवणाऱ्या प्रकरणांमध्ये—

(अ) जिल्हाधिकाऱ्याने दिलेले किंवा काढलेले मूळ आदेश किंवा निर्णय याविरुद्ध न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल ; आणि

(ब) कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने दिलेल्या किंवा काढलेल्या आदेशाविरुद्ध किंवा निर्णयाविरुद्ध केलेल्या अपिलामध्ये, जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या किंवा काढलेल्या आदेशाविरुद्ध किंवा निर्णयाविरुद्ध न्यायाधिकरणाकडे फेरतपासणीसाठी अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये, केवळ पुढील कारणावरूनच, फेरतपासणीसाठी अर्ज करता येईल ; ती कारणे अशी :—

(एक) जिल्हाधिकाऱ्याचा आदेश किंवा निर्णय हा विधीविरुद्ध होता ;

(दोन) जिल्हाधिकाऱ्याने विधीसंबंधातील महत्वाचा मुद्या ठरविण्यात कसूर केली होती ; आणि

(तीन) विधीअन्वये घालून देण्यात आलेल्या कार्यरीतीचे पालन करताना महत्वाचा दोष राहिल्यामुळे न्यायदानाचा उद्देश विफल झाला.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात स्पष्टपणे जी तरतूद केलेली असेल ती खेरीज करून, राज्य सरकारास, शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, तिच्याद्वारे, राज्य सरकार ठरवील अशा इतर प्रकरणात असे इसम, अधिकारी व प्राधिकारी यांच्या निर्णयाविरुद्ध व आदेशाविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून त्यावर निकाल देण्याचा व त्यांच्या निर्णयाची व आदेशाची फेरतपासणी करण्याचाही न्यायाधिकरणास क्षेत्राधिकार असेल असा निदेश देता येईल ; आणि या प्रयोजनासाठी राज्य सरकारला, शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, तिच्याद्वारे, अनुसूची ज मधील नोंदीपैकी कोणत्याही नोंदीत जादा नोंदी दाखल करता येतील, तीत दुरुस्ती करता येईल किंवा तीतून नोंदी व ता येतील ; आणि त्यानंतर, न्यायाधिकरणास, अशा बाबीच्या संबंधात क्षेत्राधकार असेल आणि त बाबतीतील इतर कोणत्याही इसमाचा, अधिकाऱ्याचा किंवा प्राधिकाऱ्याचा क्षेत्राधिकार संपुष्टात येई

(४) राज्य सरकारला, तशाच रीतीने कोणत्याही वेळी, अशी अधिसूचना रद्द करता येईल किंवा अनुसूची ज मधून कोणतीही नोंद वगळता येईल आणि असा क्षेत्राधिकार पुन्हा स्वतःकडे घेता येईल :

परंतु, यातील कोणत्याही मजकुरामुळे, अशा रीतीने क्षेत्राधिकार परत घेतल्यावर राज्य सरकारास, असा कोणताही क्षेत्राधिकार, कोणताही इतर इसम, अधिकारी किंवा प्राधिकारी यांजकडे सोपविण्यात प्रतिबंध होणार नाही.

(५) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीत काहीही असले तरी, तेव्हा न्यायाधिकरणास, कोणत्याही उपरोक्त बाबीत कोणत्याही इसमाच्या, अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध आणि आदेशाविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून घेण्याचा व त्यावर निर्णय देण्याचा व त्यांच्या निर्णयांची व आदेशांची फेरतपासणी करण्याचा क्षेत्राधिकार असेल तेव्हा, इतर कोणत्याही इसमास, अधिकाऱ्यास किंवा प्राधिकाऱ्यास त्या बाबतीतील अशा इसमाच्या अधिकाऱ्याच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध व आदेशाविरुद्ध करण्यात आलेली अपिले दाखल करून घेण्याचा व त्यावर निर्णय देण्याचा व त्यांच्या निर्णयांची व आदेशांची फेरतपासणी करण्याचा क्षेत्राधिकार असणार नाही.

(६) ह्या कलमान्वये करावयाचे प्रत्येक अपील किंवा फेरतपासणीसाठी करावयाचा अर्ज हा, जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाच्या किंवा निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतीच्या आत दाखल करण्यात येईल. मुदतीबाबत अधिनियम, १९६३ (१९६३ चा अधिनियम क्रमांक ३६) याची कलमे ४, ५, १२ व १४ यांचे उपबंध हे असे अपील किंवा फेरतपासणीसाठी करावयाचा अर्ज दाखल करण्याच्या बाबतीत लागू होतील.

## अनुसूची जे

[कलम ३१५ पहा]

| अधिनियमाचे नाव (१) | पुढील उपबंधाअन्वये उद्भवणाऱ्या प्रकरणातील आदेशाविरुद्धचा किंवा निर्णयाविरुद्धचा अपिलीय किंवा फेरतपासणीविषयक क्षेत्राधिकार (२) |
|---|---|
| १. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१). | कलम २४. |
| | कलम २७. |
| | खंड (ब) व्यतिरिक्त कलम ५९. |
| | कलम ६५. |
| | कलम ६६. |
| २. हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० (सन १९५० चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक २१). | कलम १८, पोट-कलम (२). |
| | कलम ४४, पोट-कलम (१). |
| | कलम ४७. |
| | कलम ४८. |
| | कलम ४९. |
| | कलम ७१. |
| | कलम ७५. |
| ३. मध्यप्रदेश (दौलती, महाल, दुमाला जमिनी) स्वामित्वाधिकार रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५०. (१९५१ चा मध्यप्रदेश अधिनियम क्रमांक १). | कलम २४. |
| | कलम २५. |
| | कलम २६. |
| | कलम २७. |
| ४. भारतीय वन अधिनियम, १९२७ (सन १९२७ चा अधिनियम क्रमांक १६). | कलम ११. |
| | कलम १२. |
| | कलम १५. |
| | कलम १६. |

विवक्षित बाबतीत क्षेत्राधिकारास प्रतिबंध.

३१६. (१) न्यायालयात न्यायप्रविष्ट असलेल्या कोणत्याही बाबतीत न्यायाधिकरणास कोणताही क्षेत्राधिकार असणार नाही.

(२) कोणताही अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम याच्या किंवा अधिनियमातील, अध्यादेशातील किंवा विनियमातील कोणत्याही उपबंधाच्या वैधतेसंबंधी ज्या बाबतीत न्यायाधिकरणाच्या मते प्रश्न उपस्थित होत असून ती बाब निकालात काढण्यासाठी त्याच्या मते उपरोक्त अधिनियम, अध्यादेश वगैरेची अवैधता निश्चित करणे आवश्यक आहे त्या कोणत्याही बाबीच्या संबंधातही न्यायाधिकरणास कोणताही क्षेत्राधिकार असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमातील "विनियम" या संज्ञेचा अर्थ, मुंबई अधिनियम संग्रहातील कोणताही विनियम किंवा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १८९७ (१८९७ चा अधिनियम क्रमांक १०.) यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेला सर्वसाधारण परिभाषा अधिनियम यात [illegible] असलेला विनियम, असा समजावा.

[illegible] णास इतर विधिअन्वये मिळालेल्या शक्तीस बाध येणार नाही.

३१७. ह्या प्रकरणातील कोणत्याही मजकुरामुळे, [illegible] फेरतपासणीसाठी [illegible] किंवा इतर कामकाज दाखल करून घेण्यास आणि त्यांचा निर्णय करण्यास न्यायाधिकरणास त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिअन्वये किंवा तदनुसार दिलेल्या किंवा देण्यात येतील अशा कोणत्याही शक्ती किंवा त्यांची कामे यांना बाध येणार नाही.

न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाच्या शक्ती असणे.

३१८. (१) ह्या प्रकरणाद्वारे किंवा प्रदान केलेल्या क्षेत्राधिकाराचा वापर करताना, शपथेवर, प्रतिज्ञेवर किंवा प्रतिज्ञालेखाद्वारे पुरावा घेणे, साक्षीदारांना आज्ञापत्र काढून बोलावणे व हजर राहण्यास भाग पाडणे, दस्तऐवज व महत्त्वाच्या वस्तु शोधण्यास व सादर करण्यास भाग पाडणे, कोणत्याही न्यायालयातून किंवा कार्यालयातून कोणतेही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची कोणतीही प्रत मागवून घेणे, साक्षीदारांची जबानी घेण्यासाठी किंवा दस्तऐजांची तपासणी करण्यासाठी प्रतिविधाने काढणे या कारणासाठी आणि विहित करण्यात येतील अशा इतर कारणांसाठी, न्यायाधिकरणास दिवाणी न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील, आणि दंड प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा अधिनियम क्रमांक ४५.) ची कलमे १९५, ४८० व ४८२ ह्यांच्या सर्व कारणांसाठी, न्यायाधिकरण हे दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल आणि त्याची कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार, न्यायालयीन कार्यवाही म्हणून समजण्यात येईल.

(२) दाखल करावयाच्या कोणत्याही प्रतिज्ञालेखाच्या बाबतीत, या बाबतीत न्यायाधिकरणाने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, साक्ष देणाऱ्या इसमास शपथ घ्यावयास लावता येईल.

प्रथा व कार्यरीती.

३१९. (१) ह्या प्रकरणाच्या उपबंधांस आणि राज्य सरकारच्या पूर्व अनुमतीस अधीन राहून, अध्यक्षास, न्यायाधिकरणाच्या खर्चाची रक्कम मंजूर करणे, कोणतीही आदेशिका-फी आकारणे, (न्यायालय शुल्क मुद्रांकाच्या स्वरूपात तिची वसुली करण्याबाबतची तरतूद धरून) न्यायाधिकरणापुढे आपली बाजू मांडण्याचा हक्क, एकएकटचा सदस्यांचा किंवा अध्यक्षाने (किंवा न्यायाधिकरणाच्या सदस्यांमधून त्याने अधिकृत केलेल्या सदस्याने) रचना केलेल्या सदस्यांच्या न्यायमंडळाच्या बैठकी, न्यायाधिकरणाने किंवा त्यांच्या न्यायमंडळाने, त्याजपुढे असलेल्या कोणत्याही कामकाजाची, उक्त कामकाज चालू असतांना, न्यायाधिकरणाचे किंवा न्याय मंडळाचे सदस्य म्हणून काम करणाऱ्या इसमात बदल झालेला असला तरीही, विल्हेवाट लावणे, ही कामे धरून, न्यायाधिकारणाची प्रथा व कार्यरीती यांचे नियमन करण्यासाठी आणि सामान्यपणे, ह्या अधिनियमान्वयेचे आपले अधिकार आणि आपली कामे कार्यक्षम रीतीने चालविण्यासाठी व पार पाडण्यासाठी विनियम[१००] करता येतील. कोणताहि एकएकटा सदस्य बैठकीचे काम पहात असेल किंवा कोणत्याही न्यायमंडळाची रचना करण्यात आली असेल त्याबाबतीत अशा सदस्याने किंवा न्यायमंडळाने, न्यायाधिकरणाच्या सर्व शक्तींचा वापर केला पाहिजे आणि त्यांची कामे पार पाडली पाहिजेत.

(२) ह्या कलमान्वये केलेले विनियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

टीप १००.—मुंबई महसूल न्यायाधिकरण विनियम, १९५८ हे अध्यक्षांनी राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने तयार केले आहेत. रद्द केलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ (१९५८ चा मुंबई क्र. ३१) च्या कलम १४ अन्वये. हे विनियम महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमाचे कलम ३३६ चे तिसरे परंतुक आणि कलम ३३६(२) अन्वये अंमलात असण्याचे चालू राहिल (हे विनियम परिशिष्ट ३६ म्हणून मुद्रित केले आहेत).

विवक्षित बाबतीत राज्य सरकारची बाजू ऐकून घेणे.

३२०. (१) न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कामकाजात, उक्त कामकाजातून [illegible] उपबंधाचा अर्थ लावणे हे अशा स्वरूपाचे व लोकांच्या दृष्टीने इतके महत्त्वाचे आहे की, राज्य सरकारला नोटीस देणे इष्ट आहे, असे कोणत्याही अवस्थेत न्यायाधिकरणास दिसून येईल तर, न्यायाधिकरणाने, [illegible] पाहिजे आणि उपरोक्त सरकारला, त्यास [illegible] सहभा- [illegible] काढण्यापूर्वी राज्य सरकारची [illegible] पाहिजे.

(२) राज्य सरकारच्या मते न्यायाधिकरणापुढील कोणत्याही कामकाजात, कायद्यातील उपबंधाचा अर्थ लावणे हे अशा स्वरूपाचे व सार्वजनिकदृष्ट्या इतके महत्त्वाचे आहे की, त्या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वी राज्य सरकारची बाजू ऐकून घेणे इष्ट आहे असे राज्य सरकारला आढळून येईल तर, त्यास, अशा कामकाजात आपली बाजू मांडण्यासंबंधी न्यायाधिकरणाकडे अर्ज करता येईल; आणि न्यायाधिकरणाने, राज्य सरकारची बाजू ऐकून घेतल्यावाचून, तो प्रश्न निकालात काढता कामा नये.

**३२१.** (१) न्यायाधिकरणाने, कलम ३१५ अन्वये अपील किंवा फेरतपासणीविषयक शक्तींचा वापर करताना दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध राज्य सरकारकडे कोणतेही अपील दाखल करता येणार नाही.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधीत एतद्विरुद्ध काहीही असले तरी न्यायाधिकरणाने ह्या अधिनियमान्वये किंवा तदनुसार केलेल्या किंवा दिलेल्या, कोणत्याही आदेशावर किंवा निर्णयावर कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कामकाजात आक्षेप येणार नाही.

राज्य सरकारकडे अपील दाखल करता येणार नाही आणि न्यायालयांच्या क्षेत्राधिकारास प्रतिबंध.

**३२२.** (१) न्यायाधिकरणास, स्वतःहोऊन किंवा कोणत्याही हितसंबंधित पक्षकाराने अर्ज केल्यावर आणि राज्य सरकारने अर्ज केल्यावर कलम ३२० अन्वये राज्य सरकारची बाजू ऐकून घेण्यात येईल त्याबाबतीत, कोणत्याही प्रकरणातील आपल्या स्वतःच्या निकालाचे किंवा आदेशाचे पुर्नविलोकन करता येईल व त्यासंबंधी त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पुर्नविलोकन.

परंतु, न्यायाधिकरणाने ज्यावेळी निकाल दिला त्यावेळी, अशा पक्षकाराने योग्य खबरदारी घेतली असून देखील, त्यास कळली नव्हती किंवा तो हजर करू शकत नव्हता अशी नवी व महत्वाची बाब किंवा पुरावा असल्याचे आढळून आले आहे याबद्दल किंवा अभिलेख पहाताक्षणीच काही चूक किंवा दोष असल्याबद्दल न्यायाधिकरणाची खात्री झाली असेल किंवा इतर कोणतेही पुरेसे कारण असेल ते खेरीज करून कोणत्याही पक्षकाराने केलेला असा कोणताही अर्ज दाखल करून घेता कामा नये :

आणखी असे की, हितसंबंधित पक्षकारांना हजर राहण्यासंबंधी व अशा आदेशाच्या पुष्टयर्थ त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी नोटीस दिली असल्याखेरीज, अशा निर्णयात किंवा आदेशांत, बदल किंवा फेरफार करता कामा नये.

(२) कोणत्याही पक्षकारास किंवा यथास्थिति, राज्य सरकारास, पोट-कलम (१) अन्वयेचा पुर्नविलोकनासाठीचा अर्ज, न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत, करता येईल :

परंतु उपरोक्त मुदत मोजताना, दिवाणी न्यायालयाच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या फेरतपासणी साठीच्या अर्जास मुदतीबाबत अधिनियम, १९६३ याचे जे उपबंध लागू होतात ते उपबंध, शक्य तेथवर या कलमान्वये फेरतपासणीसाठी केलेल्या अर्जास लागू होतील.

**३२३** न्यायाधिकरणाने दिलेल्या सर्व आदेशांची, जर राज्य सरकार किंवा यथास्थिति इतर सक्षम प्राधिकाऱ्याने तसेच आदेश दिले असते तर त्यांची ज्या रीतीने अंमलबजावणी करण्यात आली असती त्याच रीतीने बजावणी करण्यात येईल.

न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांची बजावणी करण्याची रीत.

**३२४.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ मध्ये काहीही असले तरी, परंतु कलम २७५ च्या उपबंधास अधीन राहून, न्यायाधिकरणाकडे केलेल्या प्रत्येक अपिलावर किंवा अर्जावर, जर दाव्यातील [illegible] हजार रुपये किंवा त्याहून कमी असेल तर, [illegible] आणि जर असे मूल्य दहा [illegible] असेल तर, वीस रुपयांचा, न्यायालय [illegible] येईल :

न्यायालय शुल्कासाठी तरतूद.

परंतु न्यायाधिकरण, कोणत्याही संबंधित कुळवहिवाट विधी अन्वयेच्या किंवा इतर विशेष विधी अन्वयेच्या कोणत्याही शक्तींचा वापर करील किंवा कामे करील आणि उक्त विधीमध्ये, न्यायाधिकरणाकडे करावयाच्या कोणत्याही अपिलावर किंवा अर्जावर न्यायालय शुल्क बसविण्याची तरतूद करण्यात आली असेल त्याबाबतीत ह्या कलमातील कोणतीही गोष्ट अशी फी आकारण्यासंबंधीच्या उपबंधास बाध आणणार नाही.

नियम. ३२५. (१) राज्य सरकारास शासकीय राजपत्रातील अधिसूचने द्वारे, या प्रकरणाचे उद्देश पार पाडण्याकरिता, हृया प्रकरणाच्या उपबंधाशी सुसंगत असतील असे नियम [१०१] करता येतील.

टीप १०१.—कृपया टीपा ९८ आणि ९९ सुद्धा पहा.

(२) विशेषतः व उपरोक्त उपबंधाच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमात पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(अ) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांच्या (वयासह) अर्हता ;

(ब) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व इतर सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(क) प्रबंधकाच्या व उप-प्रबंधकाच्या अर्हता ;

(ड) न्यायाधिकरणाकडे निहित करता येतील अशा दिवाणी न्यायालयाच्या इतर कोणत्याही शक्ती.

(शासकीय अधिसूचना क्रमांक एमआरटी-१०६७-एम (विशेष) दिनांक ३० मार्च १९७१ अन्वये शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ-२०६७-आर, दिनांक ४ जानेवारी १९६८).

१. **संक्षिप्त नाव.**—या नियमांस, महाराष्ट्र जमीन महसूल (महसूल न्यायाधिकरण) नियम, १९६७ असे म्हणता येईल.

२. **व्याख्या.**—संदर्भावरून दुसरा अर्थ अपेक्षित नसेल, तर या नियमांत—

(अ) "अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(ब) कोणत्याही नियमात निर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यालयाच्या संबंधात, "तुल्य कार्यालय" म्हणजे, राज्य सरकारच्या मते जे कार्यालय अशा रीतीने निर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यालयाच्या दर्जाचे असेल असे इतर कार्यालय ;

(क) "सदस्य" म्हणजे, न्यायाधिकरणाचा सदस्य.

३. **न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या अर्हता.**—(१) जो इसम,—

(एक) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा न्यायाधीश होता, किंवा

(दोन) उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्याची अर्हता असलेला अधिवक्ता असेल, किंवा ज्याने,—

(तीन) (अ) सचिव, महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आणि विधिपरामर्शी,

(ब) प्रमुख न्यायाधीश, नगर दिवाणी न्यायालय, मुंबई,

(क) जिल्हा न्यायाधीश,

(ड) मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई,

(ई) मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६ अन्वये रचना करण्यात आलेल्या औद्योगिक न्यायालयाचा सदस्य,

(फ) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ अन्वये रचना करण्यात आलेल्या औद्योगिक न्यायाधिकरणाचा सदस्य, किंवा

(ग) मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९, किंवा मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५८ [illegible] महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये रचना करण्यात आलेल्या [illegible] न्यायाधिकरणाचा [illegible] पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत, पद [illegible] किंवा यथास्थिति त्यांच्या शक्तींचा वापर केला असेल ;

(ह) सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय आणि अभिवक्ता असून ज्याने कोणत्याही दिवाणी न्यायालयात सात वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीपर्यंत अधिवक्त्याचा व्यवसाय केला आहे, आणि राज्य शासनाच्या मते जो महसूल व कुळ वहिवाट कायद्यात निष्णात आहे ;

असा इसम अध्यक्ष होण्यास पात्र असेल.

(२) (अ) (एक) जिल्हाधिकारी,

(दोन) जिल्हा न्यायाधीश,

(तीन) मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम, १८६९ अन्वये नेमण्यात आलेला सहाय्यक न्यायाधीश किंवा दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीअन्वये तुल्य पद धारण करणारा दिवाणी न्यायाधीश,

यांच्या दर्जाहून खालच्या दर्जाचे नसेल असे पद धारण करीत असेल किंवा ज्याने पद धारण केले असेल, किंवा

(ब) जो उच्च न्यायालयाचा अधिवक्ता किंवा न्यायप्रतिनिधी असेल किंवा या राज्यात त्या त्या वेळी अमलात असलेल्या विधीव्यवसायीसंबंधीच्या कोणत्याही विधीअन्वये, उच्च न्यायालय खेरीजकरून, इतर न्यायालयात व्यवसाय करण्याचा ज्यास हक्क असेल व ज्याने कोणत्याही दिवाणी न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे पाच वर्षाहून कमी नसेल इतक्या व राज्य सरकारच्या मते ज्यास महसूल व कुळवहिवाट विधीचे उत्तम ज्ञान असेल असा विधीव्यवसायी असेल,

असा कोणताही इसम सदस्य होण्यास पात्र असेल.

४. **न्यायाधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या पदाची मुदत व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.**—(१) अध्यक्ष व बिनसरकारी सदस्य, राज्य सरकारकडून निर्दिष्ट करण्यात येईल अशा, तीन वर्षाहून अधिक नसणाऱ्या मुदतीपर्यंत, पद धारण करतील.

(२) पोट-नियम (१) मध्ये उल्लेखिलेल्या मुदतीसाठी, अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून, ज्या इसमाने पद धारण केले असेल असा इसम, पुर्ननियुक्तीसाठी पात्र असेल ;

(३) (अ) अध्यक्ष म्हणून नेमण्यात आलेला कोणताही इसम, ७० वर्षे वयाचा झाल्यानंतर, पद धारण करणार नाही ;

(ब) बिनसरकारी सदस्य म्हणून नेमण्यात आलेला कोणताही इसम, ६५ वर्षे वयाचा झाल्यानंतर, पद धारण करणार नाही :

परंतु, राज्य सरकारास, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून, योग्य अशा प्रकरणामध्ये, एक वर्षाहून अधिक नसेल अशा आणखी मुदतीपर्यंत, वयोमर्यादा वाढविता येईल.

(४) अध्यक्षास किंवा कोणत्याही बिनसरकारी सदस्यास, कोणत्याही वेळी, स्वतःच्या सहीनिशी, राज्य सरकारला लेखी कळवून, आपल्या पदाचा राजीनामा देता येईल व त्याचा राजीनामा, ज्या तारखेस स्वीकारण्यात येईल त्या तारखेपासून तो अमलात येईल.

(५) पोट-नियम (१) मध्ये काहीही असले तरी, राज्य सरकारच्या मते, अध्यक्ष किंवा सदस्य, त्याच्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ किंवा अपात्र झाला असेल तर, राज्य सरकारास, अशा अध्यक्षाची किंवा कोणत्याही बिनसरकारी सदस्याची नेमणूक, कोणत्याही वेळी, समाप्त करता येईल.

५. **प्रबंधक व उप-प्रबंधक [illegible]**—(१) प्रबंधक हा, [illegible] दर्जाहून किंवा तुल्य पद धारक[illegible] दर्जा नसेल अस[illegible]

परंतु, राज्य सरकारास, त्यास आवश्यक वाटेल अशा मुदतीसाठी, तहसिलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल किंवा तुल्य पद धारकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यास, प्रबंधक म्हणून काम करण्यासाठी नेमता येईल.

(२) उप-प्रबंधक हा, तहसिलेदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसेल असे पद धारण करणारा किंवा तुल्य पद धारकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा अधिकारी असेल:

६. बृहन्मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर याखेरीज इतरत्र भरणाऱ्या न्यायाधिकरणाच्या बैठकी-बद्दलची नोटीस.—न्यायाधिकरणाच्या सूचना-फलकावर नोटीस प्रसिद्ध करून आणि अधिनियमाच्या कलम ३१९ अन्वये अध्यक्षाने केलेल्या विनियमात घालून देण्यात येईल अशा इतर रीतीने, बृहन्मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर याखेरीज इतरत्र भरणाऱ्या न्यायाधिकरणाच्या बैठकीबद्दलची पुरेशी नोटीश देण्यात येईल.

७. सुनावणीच्या तारखांबद्दलची नोटीस.—प्रबंधक किंवा उपप्रबंधक, अपिले आणि (प्रकरणाच्या) फेर-तपासणीसाठीचे अर्ज यांच्या सुनावणीसाठी, न्यायाधिकरणाच्या बैठकीची व्यवस्था करील व तो, उक्त अपिलांच्या व अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तारखा, न्यायाधिकरणाच्या सूचना-फलकावर पुरेशा अगोदर प्रसिद्ध करील.

न्यावृत्ति. ३२६. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी काम करणारे, मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ (१९५८ च्या मुंबई अधिनियम क्रमांक एकतीस) अन्वये रचना करण्यात आलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण हे, या अधिनियमाच्या उपबंधान्वये रचना करण्यात आलेले न्यायाधिकरण म्हणून समजण्यात येईल आणि अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा न्यायाधिकरणापुढे अनिर्णित असलेले कोणतेही कामकाज, या प्रकरणाच्या उपबंधान्वये न्यायाधिकरणाकडून निकालात काढण्यात येईल.

(२) उक्त अधिनियमान्वये केलेली (केलेली कोणतीही नेमणूक किंवा केलेले नियम किंवा विनियम धरून) कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, या प्रकरणाच्या उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा कृती आहे असे समजण्यात येईल आणि नवीन नेमणूका, नियम किंवा विनियम करण्यात येईतोपर्यंत, ती अंमलात असण्याचे चालू राहील.

(३) मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ (१९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक बारा) अन्वये रचना करण्यात आलेले मुंबई महसूल न्यायाधिकरण किंवा मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ अन्वये रचना करण्यात आलेले, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, किंवा मुंबई महसूल न्यायाधिकरण, अधिनियम, १९५७ (१९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक एकतीस) अन्वये रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही विधीअन्वये रचना करण्यात आलेले महसूल मंडळ, किंवा इतर प्राधिकरण यांच्यासंबंधातील, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमधील किंवा कोणत्याही लेखातील किंवा इतर दस्तऐवजातील त्यांच्यासंबंधीच्या कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, या अधिनियमाच्या उपबंधान्वये रचना करण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या किंवा रचना करण्यात आल्याप्रमाणेच्या न्यायाधिकरणा-संबंधीचा उल्लेख असल्याचे समजण्यात येईल आणि न्यायाधिकरणास असा कोणताही विधी, लेख किंवा दस्तऐवज याअन्वयेच्या सर्व शक्ती असतील, व अशा सर्व शक्तींचा त्यांच्याकडून वापर करण्यात येईल.

# प्रकरण १६

## संकीर्ण

३२७. राज्य सरकार ह्या बाबतीत वेळीवेळी विहित[१०२] करील अशा नियमास अधीन राहून आणि अशी फी दिल्यावर, सर्व नकाशे आणि जमिनीसंबंधीचे अभिलेख हे, लादण्यात येतील अशा निर्बंधास अधीन राहून, वाजवी वेळात लोकांच्या तपासणीसाठी खुले असतील आणि त्यातील प्रमाणित उतारे किंवा त्याच्या प्रमाणित प्रती या, त्यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व इसमांस देण्यात येतील. नकाशे आणि जमिनी संबंधीचे अभिलेख तपासणी इत्यादीसाठी खुले असणे.

**टीप १०२.**—भूमी अभिलेखांच्या प्रतीचे निरीक्षण, शोध व पुरवठा यासंबंधी नियम. (कृपया कलम ७५ खाली ४३-अ व कलम २३९ खालील ९१ या टीपाही पहा).

**भूमि अभिलेखांच्या प्रतींचे निरीक्षण, शोध व पुरवठा यासंबंधीचे नियम :—**

[शासकीय अधिसूचना क्र यूएनएफ-२८६७ आर (विशेष) दिनांक २० मे १९७२ याद्वारे सुधारण्याप्रमाणे शासकीय अधिसूचना क्र. यूएनएफ २८६७ आर, दिनांक ६ जुलै १९७०.]

१. **नाव.**—या नियमांस महाराष्ट्र जमीन महसूल (भूमि अभिलेखांच्या प्रतीचे निरीक्षण, शोध व पुरवठा) नियम, १९७० असे म्हणता येईल.

२. **अभिलेखांचे निरिक्षण.**—ज्यांचे निरीक्षण करण्याच्या अधिकाराची तरतूद महसूल अधिनियमाची कलमे २३९ व ३२७ यांत करण्यात आली आहे, असे दस्तऐवज, योजना, नकाशे, नोंदवह्या, लेखे, भूमि-अभिलेख धरून अभिलेख (यापुढे ज्यांचा "अभिलेख" असा निर्देश करण्यात आला आहे), त्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या परवानगीने, त्याच्या कार्यालयात, रविवार व सार्वजनिक सुट्या सोडून प्रत्येक दिवशी नेहमीच्या कार्यालयीन वेळेत, यापुढे विहित केलेली फी दिल्यानंतर निरीक्षणासाठी खुले असतील.

३. **निरीक्षणासाठी करावयाचा अर्ज.**— (१) कोणत्याही अभिलेखाचे निरीक्षण करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, स्वतः किंवा तिने मान्यता दिलेल्या अभिकर्त्यामार्फत, अशा अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे अर्ज करील व अशा अर्जात अभिलेखाचा तपशील व ज्या कारणासाठी अभिलेखाच्या निरीक्षणाची मागणी करण्यात आली आहे, ते कारण नमूद करील.

(२) पोट-नियम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर, अभिलेखांचा प्रभारी अधिकारी, पोट-नियम (३) अन्वये अर्ज नाकारण्यात आला नसेल तर, परवानगी देईल.

(३) ज्यांचे निरीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे असे अभिलेख गोपनीय स्वरूपाचे आहेत किंवा ते निरीक्षण लोकहितास बाधक होईल असे अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्यास (तो तलाठी नसेल) वाटेल तर त्यास, निरीक्षणासाठीचा अर्ज नाकारणारा आदेश नोंदविता येईल. आणि तलाठी अशा अभिलेखांचा प्रभारी असेल त्या बाबतीत, तो असा अर्ज आदेशांकरिता तहसिलदाराकडे पाठविल.

४. **निरीक्षणासाठीची फी**—अभिलेखांच्या निरीक्षणासाठीची फी, यासोबतच्या अनुसूचीत तरतूद केलेल्या दरानुसार आगाऊ रोख देण्यात आली पाहिजे :

**अनुसूची**

| अनुक्रमांक (१) | अभिलेखांचा प्रवर्ग (२) | फी (३) |
|---|---|---|
| १ | मुंबई शहरांशी संबंधित अभिलेख .. .. .. | प्रत्येक दिवसाला किंवा त्याच्या भागाला १५ रुपये. |
| २ | मुंबई शहराव्यतिरिक्त इतर क्षेत्रांशी संबंधित अभिलेख— | |
| | (अ) नायब तहसिलदाराच्या दर्जाच्या आणि त्याच्या दर्जाहून वरचा दर्जा असलेल्या अधिकाऱ्याकडे प्रभार असलेले. | दर तासास किंवा त्याच्या भागास २ रुपये. |
| | (ब) नायब तहसिलदाराच्या दर्जाहून कमी दर्जा असलेल्या अधिकाऱ्याकडे प्रभार असलेले. | दर तासास किंवा त्याच्या भागास १ रुपया. |

परंतु, सरकारी अधिकाऱ्यांना किंवा शासकीय प्रयोजनांकरिता याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्तींना किंवा पाल्याधिकरणाच्या अधिकाऱ्यास त्या पाल्याधिकरणाच्या प्रयोजनांकरिता किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना अशा प्राधिकरणाच्या प्रयोजनांकरिता किंवा सहकारी संस्थांच्या अधिकाऱ्यांना संस्थेच्या कामाकरिता निरीक्षणासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही.

५. **अधिकाऱ्याच्या निदेशान्वये निरीक्षण करणे.**—अभिलेखांचा प्रभारी अधिकारी निदेश देईल अशा वेळी, अशा ठिकाणी व अशा कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत निरीक्षण करण्यात येईल.

६. **निरीक्षण कसे करावयाचे.**—(१) या नियमान्वये अभिलेखांचे निरीक्षण करण्यासाठी जिला परवानगी देण्यात आली आहे अशा कोणत्याही व्यक्तीने असे निरीक्षण करीत असताना लेखणी व शाई यांचा वापर करता कामा नये किंवा निरीक्षण केलेल्या अभिलेखांवर कोणत्याही खुणा किंवा फेरबदल करता कामा नये किंवा त्यातून कोणतेही कागद काढता कामा नये. निरीक्षण पूर्ण झाल्यावर असे निरीक्षण केलेले अभिलेख त्याने मूळ स्थितीत परत केले पाहिजेत. निरीक्षण करीत असताना त्याला स्वतःला किंवा त्याने मान्यता दिलेल्या प्रतिनिधीमार्फत ज्यांचे निरीक्षण करण्याची परवानगी देण्यात आली आहे अशा अभिलेखांची किंवा त्यांच्या कोणत्याही भागाची पेन्सिलने प्रत तयार करता येईल ; पण अशा रीतीने तयार केलेली प्रत कोणत्याही अधिकाऱ्यांकडून प्रमाणित केली जाणार नाही.

(२) या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा निरीक्षणाचा अधिकार, अभिलेखांचा प्रभारी अधिकारी निर्देश देईल अशा मुदतीकरिता हिरावून घेतला जाईल व त्याखेरीज अशी व्यक्ती तिला आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यास लादणे योग्य वाटेल अशा दोनशे रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

७. **शोध करण्यासाठीची फी केव्हा आकारावयाची.**—जेव्हा निरीक्षणासाठी किंवा कोणत्याही अभिलेखांच्या प्रतीसाठी अर्ज करण्यात आला असेल व अशा अर्जात जरूर असलेल्या अभिलेखाचा क्रमांक, तारीख व स्वरूप यांचे सुस्पष्टपणे वर्णन नसेल किंवा अशा अर्जात देण्यात आलेले वर्णन चुकीचे असेल आणि परिणामतः जरूर असलेले अभिलेख मिळण्यासाठी अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्यांस त्याचे अभिलेख शोधणे आवश्यक होईल तर, अर्जदाराने या सोबतच्या अनुसूचीत तरतूद केलेल्या दराने असा शोध घेण्याकरिता फी आगाऊ रोख भरली पाहिजे—मग त्याने ज्यासाठी अर्ज केला असेल, ते निरीक्षण किंवा प्रत, उक्त अधिकाऱ्याने उक्त अभिलेखांची तपासणी केल्यानंतर, दिली जाईल अगर दिली जाणार नाही.

## अनुसूची

| अनुक्रमांक | अभिलेखांचा प्रवर्ग | फी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | मुंबई शहराशी संबंधित अभिलेख .. .. .. | प्रत्येक दिवसाला किंवा त्याच्या भागास १५ रुपये. |
| २ | मुंबई शहराव्यतिरिक्त इतर क्षेत्रांशी संबंधित अभिलेख— | |
| | (अ) अन्य संक्रमित जमिनीचे महसूल अधिनियमाच्या कलम ७५ अन्वये ठेवलेले अभिलेख. | शोधलेल्या प्रत्येक गठ्ठयास (रुमालास) ५ रुपये. |
| | (ब) इतर कोणतेही अभिलेख .. .. .. | ज्या वर्षीचे अभिलेख शोधण्यात येतील त्या प्रत्येक वर्षास २ रुपये. |

८. **प्रमाणित प्रती पुरविणे.**—अभिलेखातील प्रमाणि ... किंवा अभिलेखांच्या प्रमाणित प्रती, अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या परवानगीने, यापुढे ... केलेली फी व मोहरबंद परिमितीय मापासाठी अतिरिक्त फी देऊन मिळविता येतील :

परंतु, जो कोणताही अभिलेख राज्य शासनाच्या प्राधिका ... मुद्रित किंवा शिलामुद्रित केलेला असेल व प्रसिद्ध करण्यात आला असेल आणि विक्रीसाठी ठेवला ... अभिलेखाची कोणतीही प्रत देण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या नियमाच्या प्रयोजनांसाठी, परंतुकाख ... ारा मुद्रित किंवा शिलामुद्रित मजकूर हा प्रतिलिपी केलेल्या मजकुराप्रमाणे समजण्यात येईल.

९. **प्रतीसाठी करावयाचा अर्ज.**—(१) कोणत्याही ... वी प्रत मिळवण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, स्वत: किंवा तिने मान्यता दिलेल्या अभि ... त, अभिलेखांच्या प्रभारी अधिकाऱ्या-कडे अर्ज करील व अशा अर्जात अभिलेखांचा तपशील व ... णासाठी त्याच्या प्रतीची आवश्यकता आहे ते कारण नमूद करील.

(२) पोट-नियम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर अभि ... प्रभारी अधिकाऱ्यास पोट-नियम (३) अन्वये अर्ज नाकारण्यात आला नसेल तर, विनंती मान्य क ...

(३) ज्या अभिलेखाच्या प्रतीसाठी अर्ज करण्यात आल ... गोपनीय स्वरूपाचा आहे, किंवा प्रत पुरविल्यास ते लोकहितास बाधक होईल असे अभिलेखांच ... अधिकाऱ्यास (तो तलाठी नसेल), वाटले तर, त्यास अर्ज नाकारणारा आदेश नोंदविता येईल. ... अशा अभिलेखांचा प्रभारी असेल त्याबाबतीत तो असा अर्ज तहसिलदाराच्या आदेशासाठी ...

१०. **प्रमाणित प्रतिच्या खऱ्या प्रती पुरविणे.**—नियम ... यांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही अभिलेखांच्या प्रमाणित प्रतींचा प्रभार अ ... येक अधिकारी त्याच्याकडे कोणत्याही व्यक्तीकडून अर्ज करण्यात आला असता, यापुढे विहित केले ... ल्यानंतर अभिलेखाच्या अशा प्रमाणित प्रतीची खरी प्रत आपल्या सहीनिशी तयार करील व त्या ... अशा प्रत्येक प्रतीवर, अभिलेखाच्या प्रमाणित प्रतीची ती खरी प्रत आहे, असे त्या अधिकाऱ्याने ... नमूद केले पाहिजे.

११. **प्रतीवर पावती पृष्ठांकित करणे.**—या नियमा ... त आलेली प्रत्येक प्रमाणित प्रत किंवा उतारा किंवा प्रमाणित प्रतीची किंवा उताऱ्यांची खरी प्रत या ... ठी जो फी घेईल अशा अधिकाऱ्याकडून खालील नमुन्यात पावती पृष्ठांकित करण्यात येईल :—

या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून..........रुप ... .....पैसे मिळाले.

दिनांक.................. ... (स्वाक्षरित)...............

१२. **प्रतीसाठी फी.**—कोणत्याही अभिलेखांच्या प्र ... तींसाठीची फी, यासोबत जोडलेल्या अनुसूची "अ" व "ब" मध्ये तरतूद केलेल्या दरानुसार रोख ... दिली पाहिजे.

अनुसूची "अ"

**मुंबई शहर व्यतिरिक्त इ ... साठी**

| अनुक्रमांक | अभिलेखांचा प्रवर्ग | फी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | रुपये |
| १ | अधिकार अभिलेखातील फेरफाराच्या नोंदवही ... क्रमांकाच्या किंवा नोंदीच्या आणि महसूल अधिनियमाच्या क ... पोट-कलम (४) अन्वये तलाठ्याकडून ठेवण्यात आलेल्य ... व्यतिरिक्त नोंदवहीतील, लेख्यांतील व अभिलेखांतील प्रत्ये ... प्रतीस. | ०.५० |

अनुसूची "अ"—चालू

| अनुक्रमांक (१) | अभिलेखांचा प्रवर्ग (२) | फी (३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| १-अ. | व्हीएफ-सात ते बारा या संपूर्ण एकत्रित नमुन्यांच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | १.०० |
| २ | कलम १२८ अन्वये भू-मापन अधिकाऱ्याने ठेवलेल्या मालमत्ता नोंद-वहीतील नोंदीच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | ०.५० |
| ३ | (एक) एखाद्या गावाच्या कोष्टकवार आणेवारी विवरणपत्राच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस, त्यात दिलेल्या आणेवारीच्या निर्णयासह. | १.०० |
| | (दोन) आणेवारीच्या विवरणपत्रात समाविष्ट न केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा तहसिलदाराच्या निर्णयाच्या किंवा आणेवारी आकारणीसंबंधातील ग्रामसमितीच्या अभिप्रायाच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | ०.५० |
| ४ | त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधांन्वये ठेवलेल्या किंवा मान्यता दिलेल्या दुमाला जमिनींच्या नोंदणी पुस्तकातील प्रत्येक प्रमाणित उताऱ्यास. | कमीत कमी रु. २ व जास्तीत जास्त रु. १५ या रकमेस अधीन राहून दुमाला महसुलाच्या प्रत्येक रुपयास १० पैसे. |
| ५ | महसूल अधिनियमाच्या कलम १५२, खंड (अ) अन्वये तयार केलेल्या कोणत्याही भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या नकाशाच्या किंवा आराखड्याच्या किंवा कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या कोणत्याही (न रंगविलेल्या) नकाशाच्या किंवा आराखड्याच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | कमीत कमी २ रुपयांच्या अधीन प्रत्येक भू-मापन क्रमांकास किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागास एक रुपया. |
| ६ | महसूल अधिनियमाच्या कलम ७९ अन्वये तयार केलेल्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या नकाशाच्या किंवा कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या कोणत्याही सामान्य (न रंगविलेल्या) नकाशाच्या किंवा आराखड्याच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | प्रत्येक भू-मापन क्रमांकास किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागास २ रुपये. |
| ७ | महसूल अधिनियमाच्या कलम १२८ अन्वये तयार (विहित) करण्यात आलेल्या अकृषिक भू-मापन क्रमांकाच्या किंवा अशा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या नकाशाच्या किंवा आराखड्याच्या किंवा शहर भू-मापन नकाशाच्या उताऱ्याच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस— | |
| | (एक) मुंबई उपनगर जिल्ह्यात .. .. .. | प्रत्येक भू-मापन क्रमांकास किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागास ५ रुपये. |
| | (दोन) मुंबई उपनगर जिल्ह्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रात .. .. | प्रत्येक भू-मापन क्रमांकास किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागास २ रुपये. |

अनुसूची "अ"—चालू

| अनुक्रमांक (१) | अभिलेखांचा प्रवर्ग (२) | फी (३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| ८ | बाब ५, ६, ७ अन्वये तयार केलेल्या भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या नकाशाच्या कोणत्याही प्रमाणित प्रतीवर परिमितीय मोजणीचे माप दर्शविण्याकरिता— | |
| | (एक) भू-मापन क्रमांकाच्या किंवा भू-मापन क्रमांकाच्या पोट-विभागाच्या मोजणीच्या वेळी अर्ज करण्यात आल्यास. | ०.५० |
| | (दोन) त्यानंतर कोणत्याही वेळी अर्ज करण्यात आल्यास .. | १.०० |
| ९ | बाब ५, ६ व ७ यांखाली न येणाऱ्या नकाशाच्या किंवा आराखड्याच्या किंवा नकाशाच्या किंवा आराखड्याच्या कोणत्याही भागाच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | प्रत प्रमाणित करणारा अधिकारी ठरवील त्याप्रमाणे ३० रु. हून अधिक नसेल व रु. २ हून कमी नसेल अशी फी : परंतु रु. १० हून अधिक असणारी कोणतीही फी जिल्हाधिकाऱ्यास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय किंवा अधीक्षक, भूमि अभिलेख यास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याने अशा अधीक्षकाच्या परवानगीखेरीज आकारता कामा नये. |
| १० | बाबी १ ते ९ खाली न येणाऱ्या अभिलेखांच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस— | |
| | (एक) हाती लिहिलेल्या किंवा दोन ओळींचे अंतर सोडून टंकलिखीत केलेल्या ३० × २१ सें. मि. आकाराच्या प्रत्येक कागदास. | प्रत्येक कागदास किंवा त्याच्या भागास २ रुपये. |
| | (दोन) असा अभिलेख कोष्टकाच्या स्वरुपात असल्यास .. | या बाबींच्या खंड (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराच्या दुप्पट. |
| ११ | प्रमाणित प्रतीच्या प्रत्येक [illegible] .. .. .. | प्रमाणित प्रतीसाठी जी फी असेल तेवढीच फी. |
| १२ | आदेशांच्या व त्यासाठीच्या कारणांच्या व महसूल अधिनियमाखालील रीतसर किंवा संक्षिप्त चौकशीच्या प्रत्येक अभिप्रमाणित भाषांतरास— | |
| | (एक) पहिल्या १०० शब्दांना किंवा १०० शब्दांच्या भागास .. | २.०० |
| | (दोन) नंतरच्या प्रत्येक १०० शब्दांना किंवा १०० शब्दांच्या भागास | १.०० |

## अनुसूची "ब"

### मुंबई शहराकरिता

| अनुक्रमांक | अभिलेखांचा प्रवर्ग | फी |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | रुपये |
| १ | पुढील क्षेत्रांच्या महसुली भूमापन योजनेव्यतिरिक्त इतर नकाशांच्या किंवा योजनेच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस— | |
| | (अ) १०० चौरस मीटर खालील .. .. .. .. | १०.०० |
| | (ब) १०० चौरस मीटर व ५०० चौरस मीटरमधील .. .. | १२.०० |
| | (क) ५०० चौरस मीटर व १,००० चौरस मीटरमधील .. .. | १४.०० |
| | (ड) १०,००० चौरस मीटर व ४,००० चौरस मीटरमधील .. | १७.०० |
| | (ई) ३,००० चौरस मीटर व १०,००० चौरस मीटरमधील .. | २५.०० |
| | (फ) १०,००० चौरस मीटर व त्यापेक्षा अधिक .. .. | ३५.०० |
| २ | पुढील क्षेत्रांच्या महसुली भूमापन नकाशाच्या किंवा योजनेच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस— | |
| | (अ) १०० चौरस मीटर खालील .. .. .. .. | ११.०० |
| | (ब) १०० चौरस मीटर व ५०० चौरस मीटरमधील .. .. | १३.०० |
| | (क) ५०० चौरस मीटर व १,००० चौरस मीटरमधील .. .. | १५.०० |
| | (ड) १,००० चौरस मीटर व ३,००० चौरस मीटरमधील .. | १८.०० |
| | (ई) ३,००० चौरस मीटर व १०,००० चौरस मीटरमधील .. | ३०.०० |
| | (फ) १०,००० चौरस मीटर व त्यापेक्षा अधिक .. .. | ४०.०० |
| ३ | भू-मापन नोंदवही सारा यादी, संदर्भ ग्रंथ व हस्तांतरण अनुसूचीतील उताऱ्याच्या प्रत्येक प्रमाणित प्रतीस. | प्रत्येक नोंदीस ५.०० |
| ४ | बाबी १, २ व ३ याखाली न येणाऱ्या अभिलेखांच्या प्रमाणित प्रतीस— हाती लिहिलेल्या किंवा दोन ओळीचे अंतर सोडून टंकलिखित केलेल्या ३० × २१ सें. मि. आकाराच्या प्रत्येक कागदास. | ४.०० |

**१३. कागदाचा आणि मुद्रित नमुन्याचा खर्च.**—नियम १० अन्वये आकारता येईल त्या प्रतिलिपी फी-शिवाय अर्जदाराने प्रतिलिपी करावयाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आलेला कागद, मुद्रित नमुना, चित्रकलेचा कागद, अनुरेखन कागद किंवा कपडा यांच्यासाठीचा खर्च राज्य शासन वेळोवेळी त्याबाबतीत ठरवील अशा दराने दिला पाहिजे.

**१४. मुद्रांक शुल्क किंवा न्यायालय फी व्यतिरिक्त देय असेल.**—या नियमातील कोणत्याही तरतुदीमुळे मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६०) किंवा मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम ३६) याच्या उपबंधास बाध येणार नाही व तदनुसार त्या नियमान्वये केलेला अर्ज किंवा पुरविण्यात आलेली प्रत किंवा उतारा यावर जे मुद्रांक शुल्क किंवा जी न्यायालय फी आकारता येईल ते मुद्रांक शुल्क किंवा ती न्यायालय फी ह्या नियमाद्वारे किंवा तद्न्वये विहित केलेल्या फीशिवाय आहे.

१२८. (१) राज्य सरकारास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या कारणासाठी नियम म्हणून, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील असे नियम करता येतील.

(२) विशेषत: आणि उपनिर्दिष्ट उपबंधांच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमांत पुढीलपैकी एक किंवा सर्व बाबींची तरतूद करता येईल :—

(एक) कलम १३, पोट-कलम (१) अन्वये, महसूल अधिकाऱ्यांस बजावणी करता येईल असे, अपील, अधीक्षण व नियंत्रण यांबाबतीतील इतर शक्ती व कर्तव्ये ;

(दोन) कलम १४, पोट-कलम (२) अन्वये, मंडल अधिकाऱ्यास आणि मंडल निरीक्षकास तलाठ्यावर ज्या शक्तींचा वापर करता येईल त्या शक्ती आणि त्यास जी कर्तव्ये व कामे पार पाडता येतील ती कर्तव्ये व कामे ;

(तीन) कलम १५ अन्वये ज्यांना शक्ती प्रदान करण्यात येतील अशा इसमांच्या अर्हता ;

(चार) कलम २०, पोट-कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची रीत, आणि पोट-कलम (५) अन्वये, नोटीस देण्याकरिता करावयाचे नियम ;

(पाच) कलम २३ अन्वये, कुरणांवर मोफत गुरे चारण्याच्या हक्कांचे नियमन करणारे नियम ;

(सहा) पोट-कलम (१) अनुसार विवक्षित झाडे कापण्यावर प्रतिबंध घालणारे किंवा अशा कटाईचे विनियमन करणारे नियम ; कलम २५, पोट-कलम (२) अन्वये, झाडांवरील हक्काचे मूल्य ठरविण्यासाठी खातेदारास ज्या रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल आणि अशा हक्काची खरेदी करता येईल ती रीत ;

(सात) कलम २६ अन्वये, शासनाकडे निहित असलेली झाडे, झुडपे, जंगल किंवा इतर नैसर्गिक उत्पन्न ज्या रीतीने राखून ठेवण्यात येईल किंवा त्याची विल्हेवाट लावण्यात येईल ती रीत ;

(आठ) कलम २८, पोट-कलम (१) अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून कोणताही कर न देता, सरपण नेता येईल ते नियम ; आणि पोट-कलम (२) अन्वये, विशेषाधिकारांच्या वापराचे नियमन करणारे नियम ;

(नऊ) कलम २९, पोट-कलम (२), खंड (क) अन्वये, ज्या नियमास अधीन राहून भूमिधारींना खातेदारांच्या वर्ग एकमध्ये समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येईल ते नियम ;

(दहा) कलम ३१ अन्वये, किंमत देणे, लिलाव आणि दुमाला न केलेली जमीन देण्यासंबंधातील शर्ती यांच्या तरतुदीसह दुमाला न केलेली जमीन देण्याबाबत नियम ;

(अकरा) कलम ३२, पोट-कलम (१) अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून मळईच्या जमिनीची विल्हेवाट लावण्यात येईल ते नियम ;

(बारा) कलम ३५, पोट-कलम (२) अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून जिल्हाधिकाऱ्याकडून पोट-विभागाची विल्हेवाट लावण्यात येईल ते नियम ;

(तेरा) कलम ३६, पोट-कलम (३) अन्वये, ज्या नियमांस अनुसरून जिल्हाधिकाऱ्यास जमीन महसुलाची थकबाकी किंवा इतर कोणत्याही येणे असलेल्या रकमा याबद्दलची जबाबदारी ठरविता येईल ते नियम आणि ज्या कार्यरीतीस अनुसरून त्यास भोगवटा मिळविण्याबद्दलचे अर्ज निकालात काढता [illegible] ती कार्यरीती ; आणि त्या कलमाच्या पोट-कलम (४) अन्वये, [illegible] :

[illegible] अन्वये ज्या नियमांस अधीन राहून, जिल्हा[illegible] बिनदुमाला [illegible] किंवा संविदअन्वये, [illegible] ते नियम ;

(पधरा) कलम ४३ अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास किंवा भू-मापन अधिकाऱ्यास, इतर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यास प्रतिबंध करता येईल आणि जो अशा रीतीने प्रतिबंध करण्यात आलेल्या कारणासाठी अशा जमिनीचा वापर करील त्या धारकास संक्षिप्त चौकशी करून काढून लावता येईल ते नियम ;

(सोळा) पोट-कलम (१) अन्वये, जमिनीचा इतर कारणासाठी वापर करण्यास परवानगी मिळण्याबद्दल करावयाच्या अर्जाचा नमुना ; पोट-कलम (२), खंड (क) अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून, जमिनीचा इतर कारणासाठी वापर करण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्याकडून देण्यात येईल ते नियम ; आणि कलम ४४, पोट-कलम (३) अन्वये, ज्या शर्तीस अधीन राहून, जमिनीचा इतर कारणासाठी वापर करण्याची परवानगी देण्यात आल्याचे समजण्यात येईल त्या शर्ती ; कलम ४४, पोट-कलम (५) अन्वये, कसूर करणारा इसम देण्यास जबाबदार असेल असा दंड विहित करणारे नियम ; आणि त्या कलम ४४ च्या पोट-कलम (६) अन्वये, धारकास अकृषिक वापरासाठी ज्या नमुन्यात सनद देण्यात येईल तो नमुना ;

(सतरा) कलम ४५, पोट-कलम (१) अन्वये, परवानगीशिवाय जमिनीचा वापर केल्याबद्दलची शास्ती म्हणून द्यावयाचा दंड विहित करणारे नियम ;

(अठरा) कलम ४७ अन्वये, जिल्हाधिकाऱ्यास ज्या नियमांस अधीन राहून कोणत्याही जमिनीच्या अकृषिक वापराचे नियमन करता येईल ते नियम ;

(एकोणीस) कलम ४८, पोट-कलम (९) अन्वये, गौण स्वरूपाचे खनिज पदार्थ काढणे व ते हलविणे या गोष्टींचे नियमन करण्यासाठी नियम ;

(वीस) कलम ४९, पोट-कलम (१) अन्वये ज्या नमुन्यात अर्ज करण्यात आला पाहिजे तो नमुना ;

(एकवीस) कलम ५१ अन्वये, अतिक्रमण करणाऱ्यास ज्या नियमांस अधीन राहून जमीन देण्यात येईल ते नियम;

(बावीस) कलम ६० अन्वये, ज्या स्थानिक क्षेत्रात कलम ५५ चा अंमल तहकूब करण्यात येईल ते स्थानिक क्षेत्र ;

(तेवीस) कलम ६६ अन्वये, पाण्याने धुपून गेलेली जमीन पूर्ववत् प्राप्त झाल्यानंतर जमीन महसूल देण्यास ज्या नियमांस अधीन राहून जमीनधारक पात्र होईल ते नियम धरून, ज्या नियमांस अधीन राहून भूमिधारकास आकारणी कमी करण्याचा हक्क प्राप्त होईल ते नियम ;

(चोवीस) कलम ६७, पोट-कलम (४) अन्वये, ज्या नियमांस अनुसरून, उक्त कलमाची पोट-कलमे (२) आणि (३) अन्वये आकारणी करता येईल ते नियम ;

(पंचवीस) कलम ६८, पोट-कलम (१) अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्याकडून, महसूल म्हणून द्यावयाच्या रकमेची आकारणी करण्यात येईल ते नियम ;

(सव्वीस) कलम ७२ अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून भोगवट्याच्या किंवा दुमाला जमिनींची विल्हेवाट लावण्यात येईल ते नियम ;

(सत्तावीस) कलम ७५ अन्वये, ठेवण्यात यावयाच्या दुमाला जमिनीच्या नोंदणी पुस्तकाचा नमुना, उक्त नोंदणी पुस्तकातील प्रमाणित उतारे ज्या नियमांस अधीन राहून देता येतील ते नियम आणि त्यासाठी आकारावयाची फी ;

(अठ्ठावीस) कलम ७८ अन्वये, ज्या नियमांस अनुसरून, कोणत्याही क्षेत्रात, जमीन महसूल कमी करण्यात, तहकूब करण्यात किंवा त्यात सूट देण्यात येईल ते नियम ;

(एकोणतीस) कलम ८४ अन्वये, ज्या नियमानुसार क्षेत्राचे आणि भू-मापन क्रमांकांच्या व त्याच्या पोट-विभागांच्या आकारणीचे अभिलेख ठेवण्यात येतील ते नियम ;

(तीस) कलम ८५ अन्वये, ज्या नियमानुसार जिल्हाधिकाऱ्यास धारण जमिनीची विभागणी करता येईल व [illegible] आकारणी विभागून देता येईल ते नियम.*

[illegible] ८७ च्या पोट-कलम (१) अन्वये, ज्या नियमानुसार भूमापन क्रमांकाची पोट-विभागणी [illegible] करण्यात येईल आणि पोट-विभागाची आकारणी निश्चित करण्यात व सुधारण्यात येईल ते नियम, आणि ज्या भूमि अभिलेखात, क्षेत्र व अशा पोट-विभागांची आकारणी, नमूद करण्यात येईल ते भूमि अभिलेख ;

---

*"आणि क्षेत्राच्या किंवा जमीन महसुलाच्या ज्या मर्यादांखाली विभागणी करण्याचे नाकारता येईल त्या मर्यादा" हा मजकूर महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ (१९७० चा महाराष्ट्र अधिनियम ४०) याच्या कलम ६ द्वारे वगळण्यात आला.

(बत्तीस) कलम ९०, खंड (फ) अन्वये, सोळा आणे वर्गीकरणानुरूप घटक साधन प्रमाणातील जमिनीच्या प्रकारांची संख्या ;

(तेहतीस) कलम ९४, पोट-कलम (१) अन्वये, गट वर्गविण्यासाठी म्हणून जमीन विभागण्यासाठी आणि प्रत्येक गटासाठी प्रमाण दर ठरविण्यासाठी नियम ; कलम ९४, पोट-कलम (३) अन्वये, प्रत्येक भू-मापन क्रमांक व पोट-विभाग यांच्या किंमतीच्या आधारे जमाबंदी अधिकारी त्यांची ज्या रीतीने जमीन महसुलाची आकारणी निश्चित करील ती रीत ;

(चौतीस) कलम ९६ अन्वये, जमाबंदीच्या कारणासाठी जमिनीच्या पिकांचे सरासरी उत्पन्न ठरविण्याची आणि त्या कारणासाठी चौकशी करण्याची रीत आणि जिल्हाधिकाऱ्यास प्रतिवृत्त सादर करण्याची रीत ;

(पस्तीस) कलम ९७ अन्वये, ज्या रीतीने जमाबंदीचे प्रतिवृत्त प्रसिद्ध करण्यात येईल ती रीत ;

(छत्तीस) कलम ९९ अन्वये, अनामत ठेवावयाची खर्चाची रक्कम, न्यायाधिकरणाकडून ज्या रीतीने चौकशी करण्यात येईल ती रीत ; आणि खर्च परत करण्यासाठी नियम ;

(सदतीस) कलम १०२ अन्वये, नोटीस देण्याची रीत ;

(अडतीस) कलम ११३ अन्वये, जमिनीच्या संपूर्ण बाजार मूल्याची शेकडेवारी आणि निश्चित केलेल्या किंवा फेरतपासणी केलेल्या अकृषिक आकारणीचे प्रमाण दर ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील ती रीत ; आणि ज्या रीतीने पूर्ण बाजार मूल्याचा अंदाज करण्यात येईल ती रीत ;

(एकोणचाळीस) कलम ११७ अन्वये, उक्त कलमाच्या खंड (१) अन्वयेचे इतर व्यवसाय, आणि ह्या कलमाचा खंड (५) अन्वयेची मुदत व शर्ती ;

(चाळीस) कलम १२७ च्या पोट-कलम (२) अन्वये, ज्या नियमांस अनुसरून जिल्हाधिकाऱ्याकडून भू-मापन फीच्या रकमेचे नियमन करण्यात येईल ते नियम ;

(एकेचाळीस) कलम १२६ अन्वये केलेल्या कामाची ज्या रीतीने आणि ज्या नकाशात व नोंदणी पुस्तकात कलम १२८ अन्वये, नोंद करण्यात येईल ती रीत व ते नकाशे व नोंदणी पुस्तके ; आणि असे नकाशे तयार करण्याच्या खर्चासाठी ग्रामपंचायतीने द्यावयाच्या अंशदानाचे प्रमाण ;

(बेचाळीस) कलम १३१ अन्वये, सनदेची प्रत देण्यासाठीचे आकार किंवा फी ;

(त्रेचाळीस) कलम १३६ च्या पोट-कलम (२) अन्वये, एखाद्या भूमापन क्रमांकाच्या किंवा पोट विभागाच्या हद्दींची आखणी करण्यासंबंधातील जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यरीतीचे नियमन करण्यासाठीचे नियम आणि वापरण्यात येणाऱ्या हद्दीच्या निशाण्यांचे स्वरूप आणि जमीन धारकावर फीची आकारणी करण्यास प्राधिकृत करणे ;

(चव्वेचाळीस) कलम १३७ अन्वये, योजना, आयोजना आणि ज्या नियमास अधीन राहून, पोट-कलम (२) अन्वये भू-मापन अधिकाऱ्याकडून हद्दीमध्ये सुधारणा करण्यात येईल ते नियम, प्रसिद्ध करण्याची रीत आणि ग्राम समितीसाठी आवश्यक असलेल्या सदस्यांची संख्या आणि उक्त कलमाच्या पोट-कलम (४) अन्वये ज्या रीतीने समितीची निवड करण्यात येईल ती रीत ;

(पंचेचाळीस) [illegible] अन्वये, ज्या [illegible] हद्दींच्या निशाण्यांचे व भू [illegible] येतील, त्यांची मांडणी करण्यात येईल, त्या सुस्थितीत [illegible] किंवा त्यांची दुरुस्ती करण्यात येईल ती रीत व उक्त कलमाच्या पोट-कलम (३) अन्वये अशा हद्दींच्या निशाण्यांचे व भू-मापन निशाण्यांचे आकार व त्यांची सामग्री ठरविणे ;

(शेहेचाळीस) कलम १४२ अन्वये, हद्द आखण्याची आणि उक्त कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये, हद्दींच्या निशाण्यांची दुरुस्ती करण्याची व त्यांचे नवीकरण करण्याची रीत ;

(सत्तेचाळीस) कलम १४८ अन्वये, जो इतर तपशील हक्कनोंदणीपत्रकात समाविष्ट असेल, असा उक्त कलमाच्या खंड (इ) अन्वयेचा इतर तपशील ;

(अठ्ठेचाळीस) कलम १४९ अन्वये, त्याच्या तिसऱ्या परंतुकान्वये तरतूद केल्याप्रमाणे ज्या आदेशाअन्वये परवानगी देण्यात आली असेल त्या आदेशाबाबतचा आवश्यक तो पुरावा सादर करण्यासाठीचे नियम ;

(एकोणपन्नास) कलम १५० अन्वये, पोट-कलम (३) अन्वये, तलाठ्याने द्यावयाचा पोचपावतीचा नमुना, पोट-कलम (४), अन्वये नामांतरणाच्या नोंदणी पुस्तकात, हरकती निकालात काढण्यासंबंधातील आदेशाची ज्या रीतीने नोंद करण्यात येईल ती रीत, पोट-कलम (५) अन्वये, ज्या नियमास अधीन राहून, नामांतरणाच्या नोंदणी पुस्तकातील नोंदी हक्क नोंदणीपत्रकात दाखल करण्यात येतील ते नियम, पोट-कलम (६) अन्वये, ज्या रीतीने नामांतरणाच्या नोंदणी पुस्तकातील नोंदी प्रमाणित करण्यात येतील ती रीत आणि उक्त कलमाच्या पोट-कलम (७) अन्वये, कुळवहिवाटीचे नोंदणी पुस्तक ठेवण्यासंबंधात अनुसरावयाची रीत आणि कार्यपद्धती ;

(पन्नास) कलम १५१, पोट-कलम (४) अन्वये, पुस्तिकेत असावयास पाहिजेत अशा इतर बाबी ; आणि पोट-कलम (५) अन्वये, ज्या नियमांस अनुसरून पुस्तिका तयार करण्यात येईल, देण्यात येईल, ठेवण्यात येईल ते नियम आणि त्यासाठी आकारावयाची फी ;

(एकावन्न) कलम १५३ च्या प्रयोजनासाठी असलेले नियम ;

(बावन्न) कलम १५४ अन्वये, ज्या नमुन्यात आणि ज्यावेळी, नोंदणी अधिकाऱ्यांनी हस्तांतरणासंबंधीची माहिती कळविली पाहिजे तो नमुना व ती वेळ ;

(त्रेपन्न) कलम १५६ अन्वये, तयार करावयाचे इतर भूमि अभिलेख ;

(चौपन्न) कलम १७० च्या पोट-कलम (२) अन्वये, जमीन महसूल हप्त्यांनी देण्याची तरतूद करणारे आणि ज्या तारखेस, ज्यांच्याकडे व ज्या ठिकाणी असे हप्ते देण्यात येतील अशा तारखा, असे इसम व अशी ठिकाणे, विहित करणारे नियम ;

(पंचावन्न) कलम १७९ अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून सरकारजमा झालेले भोगाधिकार किंवा दुमाला जमिनी विकण्यात येतील किंवा अन्यथा विल्हेवाट लावण्यात येईल ते नियम ;

(छप्पन्न) कलम १८७ अन्वये, बिनदुमाला जमिनींच्या व्यवस्थापनासाठी नियम ;

(सत्तावन्न) कलम १९२, पोट-कलम (१) अन्वये, जिल्हाधिकाऱ्याने काढावयाच्या घोषणेचा नमुना ;

(अठ्ठावन्न) कलम १९३, पोट-कलम (४) खालील नोटिशीचा नमुना ;

(एकोणसाठ) कलम २०५ अन्वये, ज्या रीतीने मालमत्तेच्या फेरविक्रीची नवीन नोटीस देण्यात आली पाहिजे ती रीत ;

(सा[illegible] [illegible] २३८ अन्वये, सामान्य [illegible]

[illegible] २३९ [illegible] इतर बाबी यासाठीचे आकार ;

(बासष्ट) कलम ३२७ अन्वये, ज्या नियमांस अधीन राहून आणि जी फी दिल्यावर, नकाशे आणि अभिलेख हे लोकांच्या तपासणीसाठी खुले असतील आणि त्यातील प्रमाणित उतारे किंवा त्यांच्या प्रमाणित प्रती देण्यात येतील ते नियम आणि ती फी ;

(त्रेसष्ट) या अधिनियमान्वये ज्या बाबीसाठी नियम करता येतील अशी इतर कोणतीही बाब.

(नियम) आगाऊ प्रसिद्ध करणे आणि नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती यासाठी तरतूद.

**३२९.** (१) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम हे आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस अधीन असतील.

(२) या अधिनियमाअन्वये कोणतेही नियम करताना, राज्य सरकारने, उक्त नियमांचे उल्लंघन करणारा कोणताही इसम हा अशा उल्लंघनातून निर्माण होणाऱ्या इतर कोणत्याही परिणामाशिवाय आणखी, अशा इसमास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्यास लादणे योग्य वाटेल अशा एक हजार रुपयांहून अधिक नसणाऱ्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल असे विहित करणे विधिसंमत असेल.

नियम विधानमंडळापुढे ठेवणे.

**३३०.** या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील, आणि शासकीय राजपत्रात असा निर्णय अधिसूचित केला असेल, तर तो नियम अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून, केवळ अशा सुधारलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा यथा:स्थिती तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे, उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

शक्तींचे व कर्तव्यांचे प्रत्यायोजन.

***३३०-अ.** या अधिनियमात विवक्षितरीत्या तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, राज्य शासनास, व राज्य शासनाच्या मान्यतेस अधीन राहून कोणत्याही आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती व त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा निर्बंधांच्या व शर्तींच्या, कोणत्याही असल्यास, त्यांना अधीन राहून, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यास सुद्धा वापरता येतील.

**टीप १०३.**—कृपया अनुक्रमे कलमे ४, १५, ७८ व १०६ खालील टीपा ५-अ, १५ (२), ४४-अ व ५४ पहा.]

दुमाला गावास विवक्षित उपबंध लागू असणे.

**३३१.** (१) कलम ६८ व प्रकरणे ५, ६, ७, ८ व ९ यांचे उपबंध पुढील फेरफारास अधीन राहून दुमाला गावांस आणि गावांच्या दुमाला हिस्स्यास लागू असतील :—

(एक) राज्य सरकारने अशा कोणत्याही गावाच्या किंवा हिस्स्याच्या धारकाशी किंवा धारकांशी केलेल्या कोणत्याही करारनाम्याच्या किंवा कबुलायतीच्या उपबंधास अधीन राहून, कलम ७९ अन्वये निदेश देण्यात आलेल्या कोणत्याही भूमापनाचा किंवा कलम ८३ अन्वयेच्या नवीन भूमापनाचा आणि अशा कोणत्याही गावात किंवा [illegible] उक्त प्रकरणांन्वये [illegible], खर्च हा, गावाच्या किंवा [illegible] तील किंवा मह[illegible], धारकाने किंवा धारकांनी [illegible]

(दोन) राज्य सरकारने तसा निदेश दिला असेल तर असा खर्च, [illegible] अशा गावातील कोणत्याही जमिनीत किंवा हिश्श्यांत कोणताही हितसंबंध असेल अशा इसमांच्या कोणत्याही वर्गाकडूनसुद्धा राज्य सरकार निदेश देईल अशा प्रमाणात खर्च देण्यात येतील.

---

*हे कलम, महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ (१९७० चा महाराष्ट्र क्रमांक चार) च्या कलम ७ अन्वये दाखल करण्यात आले. (परिशिष्ट ३९ पहा).

(तीन) अशा कोणत्याही गावात किंवा हिश्श्यांत, प्रकरण ५ किंवा ६ अन्वयेची जमाबंदी सुरू केल्या-नंतर अशा गावांचे किंवा हिश्श्यांचे धारक त्या गावांच्या किंवा हिश्श्यांच्या खंडातील किंवा महसुलातील त्याच्या/त्यांच्या हिश्श्यांच्या प्रमाणात, पुढील रकमा देण्यास पात्र ठरतील :—

(अ) गावासाठी किंवा हिश्श्यांसाठी नेमण्यात आलेल्या ग्रामाधिकाऱ्यांची वेतने ; यामध्ये गावातील अंशराशीकृत कुलकर्णी वेतनाच्या संबंधात द्यावयाच्या अंशराशीकृत भत्त्याचा समावेश होईल ;

(ब) महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांची कलमे १४४, १५१ आणि १५२ यांअन्वये उपकर बसविण्याचा खर्च ;

(चार) खंड (एक) आणि (तीन) अन्वयेचे दायित्व हे, अशा गावांच्या किंवा हिश्श्यांच्या खंडा-वरील किंवा महसुलावरील पहिला भार असेल.

(पाच) अशा गावात किंवा हिश्श्यात धारण केलेल्या जमिनीच्या संबंधात खंड (एक) आणि (तीन) अन्वये द्यावयाची एकूण रक्कम ही, हक्कनोंदणीपत्रकात नमूद केलेल्या अशा गावाच्या किंवा हिश्श्याच्या धारकाकडून वसूल करण्यात येईल.

(सहा) इसमांच्या कोणत्याही वर्गाकडून खंड (२) अन्वये देणे असलेली रक्कम ही राज्य सरकार निदेश देईल अशा रीतीने, हक्क नोंदणीपत्रकात नमूद केल्याप्रमाणे उक्त वर्गाच्या सदस्याकडून वसूल करण्यात येईल.

(२) दुमाला गावात यापूर्वी सुरू केलेल्या सर्व भूमि व्यवस्था या कलमाच्या उपबंधानुसार त्या सुरू करण्यात आल्या असल्याप्रमाणे वैध असतील.

दुमाला गावातील जमीनधारक. ३३२. कलम ३३१ च्या उपबंधांन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये दुमाला गावात, भूमि व्यवस्था सुरू करण्यात आली असेल तेव्हा, अशी भूमि व्यवस्था ज्या जमिनींना लागू असेल त्या सर्व जमिनींच्या धारकांना, बिन-दुमाला गावातील जमिनीच्या धारकांना ह्या अधिनियमा-च्या उपबंधांन्वये जे हक्क आहेत आणि ते ज्या जबाबदाऱ्यांना पात्र आहेत तेच हक्क त्यांच्या भोगवटयात असलेल्या जमिनीबाबत लागू असतील आणि त्याच जबाबदाऱ्यास ते पात्र असतील आणि बिन-दुमाला गावातील जमिनीच्या धारकांबाबत ह्या अधिनियमाचे सर्व उपबंध, त्यास शक्य तेथवर लागू होतील.

ह्या अधि-नियमांचा अर्थ लावणे. ३३३. बिन-दुमाला जमिनीलाच किंवा बिन-दुमाला जमिनीच्या धारकांनाच लागू असलेल्या ह्या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, दुमाला जमिनीस किंवा दुमाला जमिनीच्या धारकांच्या हक्कास किंवा कोणत्याही अशा जमिनीबाबतच्या राज्य सरकारच्या हक्कास बाध येतो असे समजता कामा नये आणि फक्त बिन-दुमाला जमिनीबाबतच्या या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधामुळे दुमाला जमिनीच्या कोणत्याही धारकाच्या हिताचे बाजूने किंवा त्याविरुद्ध कोणतेही अनुमान निष्पन्न होते असे समजता कामा नये.

अधिनियमांची सुधारणा. ३३४. अनुसूची 'के' मध्ये निर्दिष्ट केलेले अधिनियम हे, याद्वारे, उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात निर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात येत आहेत.

## अनुसूची के

### सुधारण्यात आलेले अधिनियम
[कलम ३३४ पहा]

| अनुक्रमांक | क्रमांक व वर्ष | संक्षिप्त नांव | सुधारणेची व्याप्ती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | सन १८७६ चा अधिनियम क्रमांक १०. | मुंबई महसूल क्षेत्राधिकार अधिनियम, १८७६. | कलम ११ मधील "कोणत्याही दिवाणी न्यायालयाने" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ * मध्ये अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल ते शिवाय, कोणत्याही दिवाणी न्यायालयाने" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| २ | सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६७. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८. | १. प्रकरण ५-अ वगळण्यात येईल.<br>२. कलम ७० मध्ये खंड (नअ) वगळण्यात येतील.<br>३. कलम ७४, पोट-कलम (१), खंड (ट) वगळण्यात येईल.<br>४. कलम ८१, पोट-कलम (१) च्या कोष्टकातील, कलम ६६-अ संबंधातील नोंदी वगळण्यात येतील.<br>५. कलम ८२, पोट-कलम (२) खंड (लअ) वगळण्यात येईल. |
| ३ | सन १९५० चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक २१. | सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ अन्वये पुन्हा अधिनियमित वैधकरण करण्यात व आणखी सुधारण्यात आल्याप्रमाणे हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०. | १. प्रकरण ५-अ वगळण्यात येईल.<br>२. कलम ९६, पोट-कलम (१) मधील कोष्टकातील कलमे ५०-ड व ५०-फ संबंधातील शेवटच्या दोन नोंदी वगळण्यात येतील.<br>३. कलम ९७, पोट-कलम (२) मधील खंड (लअ) वगळण्यात येतील. |
| ४ | सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९९. | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८. | १. प्रकरण ९ वगळण्यात येईल.<br>२. कलम १०७, पोट-कलम (१), खंड (झेड) वगळण्यात येईल.<br>३. कलम ११७, पोट-कलम (१) मधील कोष्टकातील कलम ९३ संबंधीच्या सर्व नोंदी वगळण्यात येतील. |

* १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एक्केचाळीस

अडचण दूर करण्याची शक्ती.

३३५. या अधिनियमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यात कोणतीही अडचण निर्माण होईल तर, राज्य सरकारास, प्रसंगानुरुप, अडचण दूर करण्याच्या कारणासाठी त्यास आवश्यक असल्याचे आढळून येईल व या अधिनियमाच्या हेतूंशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, ह्या अधिनियमाच्या प्रारंभापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर, या कलमान्वये कोणत ही आदेश देता कामा नये.

निरसन आणि व्यावृत्ति.

३३६. ह्या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, पुढील विधी हे या द्वारे रद्द करण्यात येत आहेत :

| | |
|---|---|
| (अ) मुंबई शहर जमीन महसूल अधिनियम, १८६७ ; | (१८७६ चा मुंबई दोन) |
| (ब) मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ ; | (१८७९ चा मुंबई क्रमांक पाच) |
| (क) मुंबई शहर भू-मापन अधिनियम, १९१५ ; | (१९१५ चा मुंबई क्रमांक चार) |
| (ड) मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ ; | (१९५८ चा मुंबई क्रमांक एकवीस) |
| (इ) मध्यप्रांत भूमी अन्यसंक्रामण अधिनियम, १९१६ ; | (१९१६ चा मध्यप्रांत क्रमांक दोन) |
| (फ) मध्यप्रदेश जमीन महसूल अधिनियम, १९५४ ; | (१९५५ चा मध्यप्रदेश क्रमांक दोन) |
| (ग) हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७—फसली ; | (१३१७ चा हैद्राबाद क्रमांक आठ) |
| (ह) हैद्राबाद जमीन हक्क नोंदणी पत्रक, विनियम, १३५८—फसली ; | (१३५८ फसली चा हैद्राबाद क्रमांक अठ्ठावन) |

परंतु अशा रीतीने अधिनियम रद्द करण्यामुळे :—

(अ) अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही विधीचा पूर्वीचा अंमल किंवा त्याअन्वये योग्य रीतीने केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट ; किंवा

(ब) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही विधीअन्वये संपादन केलेले, प्राप्त झालेले किंवा आलेले कोणतेही हक्क, विशेष हक्क, बोजे किंवा दायित्व, किंवा

(क) अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या, कोणत्याही विधीविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधासंबंधात झालेली कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा, किंवा

(ड) उपरिनिर्दिष्ट असा कोणताही हक्क, विशेष हक्क, बोजा, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा यासंबंधातील कोणतीही चौकशी, कामकाज, वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

यांस बाध येणार नाही.

आणि जणू काही हा अधिनियम संमत करण्यात आला नसल्याप्रमाणे, अशी कोणतीही चौकशी, काम; वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा करता येईल :

तसेच या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, आदिवासी जमातीतील इसमाने, मध्यप्रान्त भूमी अन्यसंक्रमण अधिनियम, १९१६, (१९१६ चा मध्यप्रांत अधिनियम दोन.) अन्वये (जमीन) गहाण देऊन, पट्ट्याने देऊन, किंवा अन्यरीतीने केलेल्या कोणत्याही तात्पुरत्या अन्यसंक्रमणाचे, जणू हा अधिनियम संमत करण्यात आला नसल्याप्रमाणे, उक्त अधिनियमाच्या उपबंधानुसार नियमन करण्यात येईल ;

आणखी असे की, पूर्वीच्या परंतुकास आणि या अधिनियमाच्या कोणत्याही प्रकरणात केलेल्या कोणत्याही बचाव-विषयक उपबंधास अधीन राहून, करण्यात आलेले कोणतेही नियम, आकारण्या, नेमणुका व बदल्या, काढण्यात आलेल्या अधिसूचना, आदेश, आज्ञापत्रे, नोटिसा, अधिपत्रे आणि उद्घोषणा, प्रदान करण्यात आलेले प्राधिकार व शक्ती मंजूर करण्यात आलेले नमुने आणि पट्टे, भूमापनाच्या आणि हद्दीच्या निश्चित करण्यात आलेल्या निशाण्या, तयार करण्यात किंवा कायम करण्यात आलेले हक्कनोंदणीपत्रक आणि इतर अभिलेख, संपादन केलेले अधिकार, पत्करलेली दायित्वे, आणि नेमून देण्यात आलेल्या वेळा आणि जागा, यांचा समावेश करून, अशा रीतीने रद्द करण्यात आलेल्या कोणत्याही विधीअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कृती ही, जेथवर ती या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कृती आहे असे समजण्यात येईल; आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कृतीद्वारे ती रद्द करण्यात आल्याशिवाय आणि रद्द करण्यात येईतोपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील.

३३७. (१) राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असलेल्या कोणत्याही विधीमधील,— संदर्भाचा अन्वय.

(अ) (एक) मालिक मकबुजा ;

(दोन) रय्यत मालिक ;

(तीन) पक्का मौरुसी कास्तकार ;

(चार) खातेदार ;

(पाच) दुमालापूर्व कूळ ;

(सहा) पुरातन कूळ ;

(सात) भूमिस्वामी ;

यांच्या संबंधातील उल्लेख हे खातेदार वर्ग-१ संबंधीचे उल्लेख म्हणून समजण्यात येतील ; आणि

(ब) (एक) मौरुषी कास्तकार ;

(दोन) रय्यत ;

(तीन) कूळ ;

(चार) कायम कूळ ;

(पाच) भूमिधारी ;

यांच्या संबंधातील उल्लेख हे भोगवटादार वर्ग-२ संबंधीचे उल्लेख म्हणून समजण्यात येतील.

(२) कोणताही विधी किंवा कोणताही लेख किंवा इतर कागदपत्र यातील " मामलतदार, महालकरी, पटवारी मंडल" या शब्दप्रयोगाबाबतचा कोणताही उल्लेख हा, निराळा हेतू असल्याचे दिसून येईल, ते खेरीज करुन, "तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी आणि साझा" या तत्सम शब्द प्रयोगासंबंधीचा उल्लेख असल्याप्रमाणे अर्थ लावण्यात येईल; आणि कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकारी याजपुढे, या अधिनियमाच्या सुरुवातीस, अनिर्णित असलेल्या ज्या कोणत्याही दाव्यात किंवा इतर वैध कामकाजात, प्रथम उल्लेखिलेल्या प्राधिकाऱ्यांपैकी कोणताही प्राधिकारी पक्षकार असेल त्या सर्व दाव्यात किंवा वैध कामकाजात, उपरोक्त प्राधिकाऱ्याबद्दल तत्सम प्राधिकारी दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

# परिशिष्टे

## परिशिष्ट १

[कलम १ (३) खालील टीप १ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, ११ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६**

क्रमांक यु.एन.एफ.-१०६७-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) याचे कलम (१), पोटकलम (३) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासन, याद्वारे संपूर्ण महाराष्ट्र राज्यात उक्त अधिनियम अंमलात येईल ती तारीख म्हणून १५ ऑगस्ट १९६७ ही तारीख निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी.**
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट २

[कलम २ (१) खालील टीप २ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, ११ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक यु. एन. एफ. १३६७ आर.-महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) याचे कलम २ खंड (१) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे कृषि वर्षाच्या प्रारंभीची तारीख म्हणून १ एप्रिल ही तारीख निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट ३

[कलम २ (३२) खालील टीप ३ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, ११ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६**

क्रमांक यु. एन. एफ. १३६७-(अ) आर.-महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) यांचे कलम २, खंड (३२) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महसूल वर्षाच्या प्रारंभाची तारीख म्हणून १ ऑगस्ट ही तारीख निश्चित करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी.**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट ४

[कलम ४ (१) ३ खालील टीप ४ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १४ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक यु. एन. एफ. १४६७ (सी.) आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) याचे कलम ४, पोट-कलम (१), खंड (३) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा व त्यास त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर शक्तींचा वापर करून व त्याचे कलम ४ पोट-कलम (४) याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे आधी प्रसिद्ध केल्यानंतर महाराष्ट्र शासन, याद्वारे १५ ऑगस्ट १९६७ पासून तालुका किंवा तालुके (मराठवाडा जिल्ह्याच्या कोणत्याही उपविभागातील किंवा विभागातील तालुका किंवा तालुके किंवा उक्त तारखेच्या निकटपूर्वी, प्रस्थापित केल्याप्रमाणे राज्याच्या मुंबई क्षेत्रातील प्रांत असलेले व अनुक्रमे जिल्ह्याच्या उपविभागाचे किंवा विभागाचे किंवा प्रांताचे नाव धारण करणारा/करणारे संबंधित उपविभाग राहील/राहतील व त्यानुसार कोणताही विधी, लेख किंवा इतर दस्तऐवज यामधील पूर्वोक्त उपविभाग किंवा विभाग किंवा प्रांत यासंबंधीच्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ उपविभाग म्हणून लावण्यात येईल असे विनिर्दिष्ट करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आर. सी. जोशी
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट ५

[कलम ४ (१) (चार) खालील टीप ५ (१) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, ९ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक यु. एन. एफ. १४६७ (अ) आर-महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस), याचे कलम ४, पोट-कलम (१), खंड (चार) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा व त्यास त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून आणि त्याचे कलम ४, पोट-कलम (४) याद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे आधी प्रसिद्ध केल्यानंतर, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या निकटपूर्वी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये प्रस्थापित केलेल्या प्रत्येक तहसिलीत समाविष्ट असणारी खेडी, अशा अंमलबजावणीच्या निकटपूर्वी अशा तहसिलीचे नाव धारण करणाऱ्या तालुक्यात समाविष्ट होतील व त्यानुसार, कोणत्याही विधीतील किंवा कोणताही लेख किंवा इतर दस्तऐवज यातील तहसिलीच्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ तालुका म्हणून लावण्यात येईल असा निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट ६

[कलम ४ (१) (चार) खालील टीप ५ (२) पहा]

### महसूल व वन विभाग

सचिवालय, मुंबई ३२, १० ऑगस्ट १९६७

**मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९.**

क्रमांक टी.एल.सी.-१०६७-११४८४-सी.—मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ (१८७९ चा मुंबई पांच) याचे कलम ७ द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा व त्यास त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्राच्या जिल्ह्यातील सर्व विद्यमान महाल, तालुके होतील व त्यानुसार कोणत्याही विधीतील, लेखातील किंवा इतर दस्तऐवजातील महालाच्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ तालुका असाच लावण्यात येईल असे घोषित करीत आहे, आणि पूर्वोक्त प्रयोजनाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ११ ऑगस्ट १९६७ रोजी व त्या तारखेपासून शासकीय आदेश, महसूल विभाग क्रमांक टी.एल.सी.-३८५४, दिनांक २३ डिसेंबर १९५४ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करीत आहे:—

उक्त आदेशामध्ये—

(१) अनुसूची एक, स्तंभ २ मध्ये पुढील बाबीसंबंधीच्या नोंदीतील:—

(अ) ठाणे जिल्हा,—

(एक) "(१३) मोखाडा (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१३) मोखाडा" हे कंस आकडे व शब्द दाखल करावे ;

(दोन) "(१४) तलासरी (महाल)" यामधील कंस आकडे व शब्द याऐवजी "(१४) तलासरी" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावे

(द) अहमदनगर जिल्हा, "(५) जामखेड (महाल)" यामधील कंस आकडे व शब्द याऐवजी "(५) जामखेड" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत.

(क) जळगांव जिल्हा—

(एक) "(५) एदलाबाद (महाल)" यामधील कंस आकडे व शब्द याऐवजी "(५) एदलाबाद" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(१३) भडगांव (महाल)" यामधील कंस आकडे व शब्द याऐवजी "(१३) भडगांव" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत.

(ड) धुळे जिल्हा "(१०) अकराणी (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१०) अकरणी" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत.

(इ) नाशिक जिल्हा —

(एक) "(५) सुरगाणा (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(५) सुरगाणा" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(९) पेठ (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(९) पेठ" हे कंस आकडा व शब्द दाखल करावेत.

(ह) पुणे जिल्हा, "—(६) वेल्हे (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(६) वेल्हे" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत.

(ग) सातारा जिल्हा,—

(एक) "(९) खंडाळा (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(९) खंडाळा" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(११) महाबळेश्वर (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(११ महाबळेश्वर" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत.

(ह) कुलाबा जिल्हा,—

(एक) "(६) उरण (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(६) उरण" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(७) सुधागड (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(७) सुधागड" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(तीन) "(१२) पोलादपूर (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१२) पोलादपूर" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(चार) "(१३) मुरुड (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१३) मुरुड" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(पाच) "(१४) श्रीवर्धन (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१४) श्रीवर्धन" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(सहा) "(१५) म्हसळा (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१५) म्हसळा" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत

(आय) रत्नागिरी जिल्हा,—

(एक) "(९) लांजा (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(९) लांजा" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(१३) वेंगुर्ला (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१३) वेंगुर्ला" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(तीन) "(१४) कणकवली (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१४) कणकवली" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(चार) "(१५) कुडाळ (महाल)" यामधील कंस, आकडे व शब्द याऐवजी "(१५) कुडाळ" हे कंस, आकडे व शब्द दाखल करावेत ;

(ज) सांगली जिल्हा,—

(एक) "(६) शिराळा (महाल)" यामधील कंस, आकडा व शब्द याऐवजी "(६) शिराळा" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(७) कवठे महाकाळ (महाल)" हे कंस, आकडा व शब्द याऐवजी "(७) कवठे महाकाळ" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(तीन) "(८) आटपाडी (महाल)" हे कंस, आकडा व शब्द याऐवजी "(८) आटपाडी" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत.

(फ) कोल्हापूर जिल्हा,—

(एक) "(३) पन्हाळा (महाल)" हे कंस, आकडा व शब्द याऐवजी "(३) पन्हाळा" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(दोन) "(६) बावडा (महाल)" हे कंस, आकडा व शब्द याऐवजी "(६) बावडा" हे कंस, आकडा व शब्द दाखल करावेत ;

(तीन) "(११) आजरा (महाल)" हे कंस, आकडे व शब्द याऐवजी "(११) आजरा कंस, आकडा व शब्द दाखल करावेत.

(२) अनुसूची एकशे तेवीस मध्ये "पेटा मोखाडा" या शब्दांऐवजी "तालुका मोखाडा" हे शब्द दाखल करावेत.

(३) अनुसूची एकशे तेवीस अ मध्ये "तळासरी महाल" या शब्दांऐवजी "तालुका तळासरी" हे शब्द दाखल करावेत.

(४) अनुसूची एकशे एकोणतीस मध्ये "महाल जामखेड" या शब्दांऐवजी "तालुका जामखेड" हे शब्द दाखल करावेत.

(५) अनुसूची एकशे बेचाळीस मध्ये "पेटा एदलाबाद" या शब्दांऐवजी "तालुका एदलाबाद" हे शब्द दाखल करावेत.

(६) अनुसूची एकशे साठमध्ये "महाल अकराणी" या शब्दांऐवजी "तालुका अकराणी" हे शब्द दाखल करावेत.

(७) अनुसूची एकशे पासष्ट मध्ये "महाल सुरगणा" या शब्दांऐवजी "तालुका सुरगणा" हे शब्द दाखल करावेत.

(८) अनुसूची एकशे एकोण सत्तर मध्ये "महाल पेट" या शब्दांऐवजी "तालुका पेट" हे शब्द दाखल करावे.

(९) अनुसूची एकशे एकूणऐंशी मध्ये "महाल वेल्हे" या शब्दांऐवजी "तालुका वेल्हे" हे शब्द दाखल करावेत.

(१०) अनुसूची एकशे शहाण्णव मध्ये "महाल खंडाळा" या शब्दांऐवजी "तालुका खंडाळा" हे शब्द दाखल करावेत.

(११) अनुसूची एकशे अठ्ठयाण्णव मध्ये "महाल महाबळेश्वर" या शब्दांऐवजी "तालुका महाबळेश्वर" हे शब्द दाखल करावेत.

(१२) अनुसूची दोनशे पंधरा मध्ये "महाल उरण" या शब्दांऐवजी "तालुका उरण" हे शब्द दाखल करावेत.

(१३) अनुसूची दोनशे सोळा मध्ये "महाल सुधागड" या शब्दांऐवजी "तालुका सुधागड" हे शब्द दाखल करावेत.

(१४) अनुसूची दोनशे एकवीस मध्ये "महाल पोलादपूर" या शब्दांऐवजी "तालुका पोलादपूर" हे शब्द दाखल करावेत.

(१५) अनुसूची दोनशे बावीस मध्ये "महाल मुरुड" या शब्दांऐवजी "तालुका मुरुड" हे शब्द दाखल करावेत.

(१६) अनुसूची दोनशे तेवीस मध्ये "महाल श्रीवर्धन" या शब्दांऐवजी "तालुका श्रीवर्धन" हे शब्द दाखल करावेत.

(१७) अनुसूची दोनशे चोवीस मध्ये "महाल म्हसळा" या शब्दांऐवजी "तालुका म्हसळा" हे शब्द दाखल करावेत.

(१८) अनुसूची दोनशे ब्याऐंशी मध्ये "महाल लांजा" या शब्दांऐवजी "तालुका लांजा" हे शब्द दाखल करावेत.

(१९) अनुसूची दोनशे श्याऐंशी मध्ये "महाल वेंगुर्ला" या शब्दांऐवजी "तालुका वेंगुर्ला" हे शब्द दाखल करावेत.

(२०) अनुसूची दोनशे सत्त्याऐंशी मध्ये "महाल कणकवली" या शब्दांऐवजी "तालुका कणकवली" हे शब्द दाखल करावेत.

(२१) अनुसूची दोनशे अठ्ठयाऐंशी मध्ये "महाल कुडाळ" या शब्दांऐवजी "तालुका कुडाळ" हे शब्द दाखल करावेत.

(२२) अनुसूची दोनशे चौऱ्याण्णव मध्ये "महाल शिराळा (पेटा)" या शब्दांऐवजी "तालुका शिराळा" हे शब्द दाखल करावेत.

(२३) अनुसूची दोनशे चवेचाळीस अ मध्ये, " महाल कवठे महाकाळ " या शब्दांऐवजी " "तालुका कवठे महांकाळ " हे शब्द दाखल करावेत.

(२४) अनुसूची दोनशे चौन्याण्णव व मध्ये " महाल पन्हाळा " या शब्दांऐवजी " तालुका पन्हाळा " हे शब्द दाखल करावेत.

(२५) अनुसूची दोनशे सत्त्याण्णव मध्ये, " महाल पन्हाळा " या शब्दांऐवजी " तालुका पन्हाळा " हे शब्द दाखल करावेत.

(२६) अनुसूची तीनशे मध्ये " महाल बावडा " या शब्दांऐवजी "तालुका बावडा" हे शब्द दाखल करावेत.

(२७) अनुसूची तीनशे पाच मध्ये, " महाल आजरा " या शब्दांऐवजी " तालुका आजरा " हे शब्द दाखल करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्ही. सुंदरम,**
शासनाचे उपसचिव.

---

## परिशिष्ट ६-अ

[कलम ४ (१) (६) खालील टीप ५-अ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक ९ नोव्हेंबर १९७०

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६.**

क्रमांक टी.एल.सी-१०६९/३२८१०-सी-(विशेष).—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) यांचे कलम ३३०-अ द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून आणि याबाबतीत काढलेल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, याद्वारे सोबतच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमाच्या उपबंधाअन्वये राज्य शासनाच्या शक्तींचा प्रत्येक विभागीय आयुक्तालाही त्याच्या अधिकारितेच्या सीमामध्ये वापर करता येईल असा निदेश देत आहे.—

**अनुसूची**

१. गावाच्या हद्दीमध्ये बदल करणे याच्याशी संबंध असेल तेथवर, कलम ४ च्या पोट-कलम (१) चे खंड (पाच) व (सहा) अन्वयेच्या शक्ती.

२. कोणत्याही वाडीला गाव म्हणून प्रस्थापित करणे व अशा प्रकारे प्रस्थापित केलेल्या गावाच्या हद्दी विनिर्दिष्ट करणे, याच्याशी संबंधित असेल तेथवर कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या उप-परंतुकाअन्वये-च्या शक्ती.

३. उपरोक्त शक्तींचा वापर करून प्रस्थापित केलेल्या कोणत्याही नवीन खेड्याचा तालुक्यात अंतर्भाव करण्याच्या प्रयोजनासाठीच, फक्त कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (४) अन्वयेच्या शक्ती.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्ही. सुब्रम्हण्यन,**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट ६-ब

[कलम ४ (१), (६) खालील टीप ५-अ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, २४ मे १९७१

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र. एफ. एल. डी. ४२६८/७३२५१-डब्ल्यू.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) याचे कलम ३३०-अ याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून व शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. टीएलसी-१०६९/३२१८०- ली (विशेप), दिनांक ९ नोव्हेंबर १९७० ची सुधारणा करून महाराष्ट्र शासन, याद्वारे राज्य शासनाच्या कलम ४, पोट-कलम (१) चा खंड (४) व (५) अन्वये, वन क्षेत्रांना गाव म्हणून प्रस्थापित करण्याशी संबंधीत असेल तेथवर, आणि अशा प्रकारे प्रस्थापित केलेल्या गावांच्या हद्दी विनिर्दिष्ट करण्याच्या शक्ती, प्रत्येक विभागीय आयुक्तांलाही त्याच्या अधिकारितेच्या सीमांमध्ये वापरण्यायोग्य असतील असा निदेश देत आहे आणि त्या प्रयोजनासाठी उक्त अधिसूचनेत पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

"उक्त अधिसूचनेतील, अनुसूचीमधील बाब १ मध्ये 'बदल करणे' या मजकुरानंतर, व "यांच्याशी संबंध" या मजकुराआधी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा" :—

"किंवा कोणत्याही वन प्रदेशाला गाव म्हणून वसवणे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. जी. सावंत,**
शासनाचे उपसचिव.

---

## परिशिष्ट ७

[कलम ७ खालील टीप ६ (१) व कलम ८ खालील टीप ७ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, ११ ऑगस्ट १९६७.

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र. यूएनएफ-१४६७ (ड) आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस) याची कलमे ७ व ८ याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा व याबाबतीत महाराष्ट्र शासनास सक्षम करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन दिनांक १५ ऑगस्ट १९६७ रोजी व तेव्हापासून याद्वारे, सर्व मामलेदारांना तहसीलदार, सर्व अप्पर मामलेदारांना अतिरिक्त तह-सिलदार व सर्व महालकऱ्यांना (महालांचे प्रभारी नसलेले) नायब तहसीलदार, सर्व (जिल्हा) अधीक्षक, भूमिअभिलेख यांना जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, सर्व सहाय्यक (जिल्हा) अधीक्षक, भूमि अभिलेख (विदर्भातील) यांना सहाय्यक जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख आणि सर्व भूमापन मामलेदारांना पूर्वोक्त दिनांकाच्या निकटपूर्वी त्यांच्या संबंधित अधिकारात येणाऱ्या क्षेत्राकरीता भू-मापन तहसीलदार म्हणून तात्काळ नियुक्त करीत आहे आणि त्यानुसार, "अप्पर मामलेदार", "जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख" "भूमापन मामलेदार" व "सहाय्यक (जिल्हा) अधिक्षक, भूमि अभिलेख" यांच्या बाबतीत कोणत्याही विधीत, किंवा कोणत्याही लेखात किंवा इतर दस्तऐवजात केलेल्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ अनुक्रमे, अप्पर तहसीलदार, जिल्हा निरीक्षक, भूमी अभिलेख, भूमापन तहसीलदार व सहाय्यक जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्या बाबतीत केलेला संदर्भ असा लावण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

# परिशिष्ट ८

[कलम ७ (२) खालील टीप ६ (२) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक २५ ऑक्टोबर १९६७.

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६**

क्र. यूएनएफ-१४६७/१११३८१-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याच्या कलम ७ च्या पोटकलम (२) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे अधीक्षक, माथेरान यांना कुलाबा जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील सहाय्यक तहसीलदार म्हणून नियुक्त करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

---

# परिशिष्ट ९

[कलम ९ खालील टीप ७-अ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, २६ जून १९७०

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र. पी. डब्ल्यूआर/४२६३/४१३२६-सी.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस) याच्या कलम ९ द्वारे दिलेल्या शक्तींचा आणि याबाबतीत महाराष्ट्र शासनास सक्षम करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद व परभणी जिल्ह्यांतील विक्री कराच्या थकबाकीच्या वसुलीकरिता असलेल्या तहसीलदारांना संबंधीत जिल्ह्याच्या क्षेत्रांतील विक्री कर थकबाकीची जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुली करण्याच्या प्रयोजनासाठी येथे जोडलेल्या तक्त्याच्या स्तंभ (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्ती व कर्तव्ये प्रदान करीत आहे.

**तक्ता**

| अधिनियमाचे कलम | शक्तीची मर्यादा |
|---|---|
| (१) | (२) |
| १७६ | अटकावून ठेवणे आणि विक्री यापासून कोणत्या मालमत्तेस सूट मिळाली आहे ते निश्चित करणे. |
| १७८ | नोटिसा देणे. |
| १८० | जंगम मालमत्ता अटकावून ठेवणे व विक्री. |

तक्ता—चालू

| अधिनियमाचे कलम (१) | | शक्तीची मर्यादा (२) |
|---|---|---|
| १९२ | .. | स्थावर मालमत्तेच्या विक्रीची उद्घोषणा करणे. |
| १९३ | .. | विक्रीच्या नोटिसांना प्रसिद्धी देण्याच्या इतर पद्धती निश्चित करणे. |
| २१२ | .. | खरेदीदाराला मालमत्तेचा ताबा देणे व खरेदीचे प्रमाणपत्र देणे. |
| २१८ | .. | सर्व मागण्यांचा निर्णय. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. जी. सावंत,**
शासनाचे उपसचिव.

## परिशिष्ट १०

[कलम ९-अ खालील टीप ८ (१) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, १२ फेब्रुवारी १९६९

**आदेश**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक पीडब्ल्यूआर-१०६८/८०२२०-डी.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याचे कलम ९-अ द्वारे दिलेल्या शक्तींचा व महाराष्ट्र शासनास यावाबतीत सक्षम करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून, आणि यावाबतीत आतापर्यंत केलेले सर्व आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, याद्वारे (अ) तहसीलदारापेक्षा कमी दर्जाच्या महसूल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या (बदल्यांसह) करणे, व तहसीलदारांच्या बदल्या करणे व अशा बदल्या अधिसूचित करणे यासंबंधीच्या शक्ती, आयुक्तांना त्यांच्या संबंधित विभागात वापरता येतील आणि—

(ब) महसूली अधिकाऱ्यांच्या आणि अव्वल कारकुनांच्या खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या (बदल्यांसह) करण्याच्या शक्ती जिल्हाधिकाऱ्यांनाही त्यांच्या संबंधित जिल्ह्यात वापरता येतील, असा निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ए. एस. नाईक,**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट ११

[कलम ९-अ खालील टीप ८ (२) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १९ जून १९७०

**आदेश**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६**

विभाग क्र. एपीटी-१९५९-११९९५५ (अ)--ब.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याच्या कलम ९-अ द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा व महाराष्ट्र शासनास याद्वारे सक्षम करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी केलेले सर्व आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, याद्वारे राज्य शासनाच्या,—

(अ) जिल्हानिरीक्षक भूमि अभिलेख यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या भूमापन अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या (बदल्यांसह) करणे व जिल्हानिरीक्षक भूमि अभिलेख, यांच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करणे व अशा बदल्या अधिसूचित करणे, यासंबंधीच्या शक्तींचा जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे, यांनाही वापर करता येईल, आणि

(ब) भूमापन अधिकारी व वरिष्ठ लिपिक, प्रमुख लिपिक, प्रमुख भूमापक आणि शिरस्तेदार यांच्या व यांच्यापेक्षा खालच्या दर्जाच्या पदावरील नियुक्त्या (बदल्यांसह) करणे यासंबंधीच्या शक्तींचा उपसंचालक, भूमि अभिलेख यांनाही त्यांच्या संबंधीत अधिकारितेत वापर करता येईल, असा निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ए. एस. नाईक,**
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट १२

[कलम ११ (२) खालील टीप ९ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १४ ऑगस्ट १९६७

**आदेश**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र.यूएनएफ-१४६७ (जी) आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस) याच्या कलम ११, पोट-कलम (२) च्या उपबंधांच्या द्वारे, महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई उपनगर, जिल्हा ठाणे व पुणे या जिल्ह्यातील अप्पर जिल्हाधिकारी, हे राज्य शासनाने [illegible] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये विनिर्दिष्ट केले असेल अशा बाबींव्यतिरिक्त [illegible] जिल्हाधिकाऱ्यांच्या हाताखाली असणार नाहीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एम. पी. पांडे,**
शासनाचे उपसचिव.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त इ. इ.

## परिशिष्ट १३

[कलम ११ (३) खालील टीप १० पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १४ ऑगस्ट १९६७

**आदेश**

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.

क्र. यूएनएफ-१४६७ (एफ) आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याच्या कलम ११, पोटकलम (३) च्या उपबंधांन्वये, महाराष्ट्र शासन, याद्वारे सोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिकारी, तिच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांना दुय्यम असतील, असा निदेश देत आहे—

**अनुसूची**

| अनुक्रमांक (१) | स्तंभ (३) मधील अधिकाऱ्यांना दुय्यम असलेले अधिकारी (२) | अधिकारी (३) |
|---|---|---|
| | **एक—महसूल अधिकारी** | |
| १ | मुंबई उपनगर, जिल्हा ठाण व पुणे या जिल्ह्यांतील सर्व महसूल अधिकारी. | संबंधीत जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी. |
| २ | उप-विभागातील सहाय्यक/उप जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व महसूल अधिकारी. | उपविभागाचे उपविभागीय अधिकारी. |
| ३ | तालुक्यातील तहसीलदारापेक्षा कमी दर्जाचे सर्व महसूल अधिकारी. | तालुक्याचे तहसीलदार व अप्पर तहसीलदार. |
| ४ | तालुक्यातील मंडल अधिकारी किंवा मंडल निरीक्षक यांच्या दर्जाचे व त्यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व महसूल अधिकारी. | नायब तहसीलदार. |
| ५ | तलाठी .. .. .. .. .. | मंडल निरीक्षक किंवा मंडल अधिकारी. |
| | **दोन—भू-मापन अधिकारी** | |
| ६ | सर्व भूमापन अधिकारी .. .. .. .. | जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख. |
| ७ | उपसंचालक, भूमि अभिलेख यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व भूमापन अधिकारी. | उपसंचालक, भूमि अभिलेख. |
| ८ | [illegible] यांच्यापेक्षा कमी दर्जाचे सर्व भूमापन [illegible] | अधीक्षक, भूमि [illegible] |
| ९ | [illegible] दर्जाचे सर्व भू-मापन [illegible] | जिल्हा [illegible] लेख व भूमापन [illegible] |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एम. पी. पांडे,**
शासनाचे उपसचिव.

# परिशिष्ट १४

[कलम १३ (१) खालील टीप ११ पहा]

## महसूल व वन विभाग

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १४ ऑगस्ट १९६७

### आदेश

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र. यूएनएफ-१४६७ (इ) —महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याचे कलम १३, पोटकलम (१) च्या परंतुकाच्या उपबंधाच्या अनुसार व याबाबतीत आतापर्यंत करण्यात आलेले सर्व आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, याद्वारे यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या शक्ती, अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत कोणत्याही जिल्हाधिकारी तहसीलदाराला प्रदान करू शकेल, असा निदेश देत आहे—

### अनुसूची

| अनुक्रमांक | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती | तहसिलदारांना प्रदान करावयाच्या शक्तींची मर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | कलम ७ चे पोट-कलम (४) .. .. .. | कोतवाल किंवा इतर ग्रामसेवक यांची नियुक्ती करणे. |
| २ | कलम १७ चे पोट-कलम (१) .. .. | सर्व शक्ती. |
| ३ | कलम १८ .. .. .. .. | अटक करण्याच्या शक्तीखेरीज सर्व शक्ती. |
| ४ | कलम २५ (२) .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| ५ | कलम ३५ (२) .. .. .. .. | एकाच भूमापन क्रमांकाच्या इतर उपविभागातील भोगवटादारांना दिलेल्या उपविभागाची विल्हेवाट लावण्याची शक्ती. |
| ६ | कलम ३५ (३) .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| ~~७~~ | ~~कलम ३५ (४)~~ .. .. .. .. | ~~जप्त झालेला उपविभाग पूर्वीच्या भोगवटादाराला परत देण्याची शक्ती नागरी व नगरेतर प्रदेशात तात्पुरती अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी देण्याची व नगरेतर प्रदेशात अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी देण्याची शक्ती.~~ |
| ८ | कलम ४८ (८) .. .. .. .. | सर्व शक्ती. |

| अनुक्रमांक (१) | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती (२) | तहसिलदारांना प्रदान करावयाच्या शक्तीचो मर्यादा (३) |
|---|---|---|
| *९ | कलम (५०) .. .. .. .. | सर्व शक्ती, परंतु उक्त अधिनियमाच्या कलम २० च्या पोटकलम (२) अन्वये, त्या पोटकलमाखालील कोणत्याही हक्काच्या निर्णयासाठी कोणतीही चौकशी करणे आवश्यक नाही. |
| *१० | कलम ५२ .. .. .. .. | " " |
| *१०-अ | कलम ५३ (†पोटकलम १ (अ) यांसह) .. | " " |
| *१०-ब | कलम ५४ .. .. .. .. | " " |
| ११ | कलम ५९ .. .. .. .. | फक्त शेतीच्या प्रयोजनाकरिता जमिनीच्या अनधिकृत भोगवटाच्या संबंधातील सर्व शक्ती, परंतु, कलम २० (२) अन्वये कोणतीही चौकशी आवश्यक असणार नाही. |
| १२ | कलम ६१!(ब) .. .. .. | सर्व शक्ती. |
| १३ | कलम ७४ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| १४ | कलम ७७ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| १५ | कलम ८५ | सर्व शक्ती. |
| १६ | कलम १३६ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| १७ | कलम १३९ व कलम १४१ .. .. | सर्व शक्ती. |
| ‡१७-अ | कलम १५० (१) .. .. .. | हक्कांचे संपादन किंवा हस्तांतरण यासंबंधीची माहिती कळविण्याची शक्ती. |
| १८ | कलम १५२ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| १९ | कलम १५५ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| २० | कलम १७४ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| २१ | कलम १७६ च्या परंतुकाचा खंड (२) .. | सर्व शक्ती. |
| §२२ | रद्द करण्यात आले .. .. .. | .. |
| २३. | कलम १७९ .. .. .. .. | कलम १७९ परंतुकाच्या खंड (अ) अन्वये उद्घोषणा आणि लेखी नोटीस काढणे. |
| २४ | कलम १८० .. .. .. .. | सर्व शक्ती. |

* शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र. यूएनएफ-१४६७ (इ) आर, दिनांक [illegible] नोंदी ९, १०, १०-अ व १०-ब दाखल केल्या आहेत.

† शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र. एलइएन-१०७२/३९/एससी, दिनांक [illegible] हे शब्द दाखल केले आहेत.

‡ शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र. आरटीएस-४३७२/७१४६५-म, दिनांक ८-९-१९७२ अन्वये नोंद १७-अ दाखल करण्यात आली आहे.

§ शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र. यूएनएफ-१४६७ (इ) आर, दिनांक १२-३-१९६८ द्वारे नोंद २२ रद्द करण्यात आली आहे.

| अनुक्रमांक | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये जिल्हाधिकाऱ्याच्या शक्ती | तहसिलदारांना प्रदान करावयाच्या शक्तींची मर्यादा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| २५ | कलम १८१ .. .. .. .. | जप्तीच्या अधिपत्रावर सही करणे व त्याची अंमलबजावणी करणे व विक्री करणे. |
| २६ | कलम १८२ .. .. .. .. | जप्तीच्या अधिपत्रावर सही करणे व त्याची अंमलबजावणी करणे. |
| २७ | कलम १९२ व १९३ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| *२७-अ | कलम २०४ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| २८ | कलम २१२ .. .. .. .. | सर्व शक्ती. |
| २९ | कलम २१८ (१) .. .. .. .. | फक्त जंगम मालमत्तेच्या संदर्भात. |
| ३० | कलम २४२ .. .. .. .. | फक्त कलम २४२ च्या खंड (अ) व (ब) अन्वयेची शक्ती. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एम. पी. पांडे,**
शासनाचे उपसचिव.

*शासकीय आदेश, महसूल व वन विभाग क्र. यूएनएफ-१४६७ (इ) आर, दिनांक ७-३-१९६९ याद्वारे नोंद २७-अ दाखल केली आहे.

## परिशिष्ट १५

[कलम १३ (३) खालील टीप १२ (१) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, १४ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक यूएनएफ-१४६७-(एच)-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र क्र. एकेचाळीस), याच्या कलम १३ च्या [illegible] (३) [illegible] प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे मुंबई उपनगर [illegible], जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिकारीतेत त्यावेळी अंमलात असणाऱ्या [illegible]नियमांच्या उपबंधान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कर्तव्ये पार पाडतील व [illegible].

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट १६

[कलम १३ (३) खालील टीप १२ (२) पहा]

### महसूल व वन विभाग

सचिवालय, मुंबई-३२, १४ ऑगस्ट १९६७

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.

क्रमांक यूएनएफ-१४६७-(आय)-आर.---महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याच्या कलम १३ च्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे ठाण्याचे अपर जिल्हाधिकारी पुढे विनिर्दिष्ट केलेल्या व त्यावेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही विधीअन्वये किंवा अधिनियमाच्या उपबंधान्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचा वापर करतील व त्यांची कर्तव्ये व कामे पार पाडतील असा निदेश देत आहे.

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एक्केचाळीस) प्रकरणे तीन, चार, दहा, अकरा, बारा, तेरा.

(२) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक सदुसष्ट).

(३) मुंबई परगणा व कुळकर्णी वतने (निरास) अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक साठ).

(४) साष्टी संपत्ती (जमीन महसूल सूट निरास) अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक सत्तेचाळीस).

(५) मुंबई सरंजाम, जहागिरी व इतर राजकीय स्वरूपाची इनामे पुनर्ग्रहण नियम, १९५२.

(६) मुंबई भूधारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५३ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक अठ्ठावीस).

(७) मुंबई वैयक्तिक इनामे निरास अधिनियम, १९५२ (१९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक बेचाळीस).

(८) मुंबई भूधारणा निरास (अभिलेखांची वसुली) अधिनियम, १९५३.

(९) मुंबई विलीन क्षेत्रे व प्रदेश (जहागीर निरास) अधिनियम, १९५३ (१९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक एकोणचाळीस).

(१०) मुंबई सेवा समाजोपयुक्त इनामे (गुजरात व कोंकण) पुनर्ग्रहण नियम, १९५४.

(११) मुंबई विलीन प्रदेश संकीर्ण अन्य संक्रामणे निरास अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक बावीस).

(१२) मुंबई भू-धारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक्कावन्न).

(१३) मुंबई भू-धारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक चाळीस).

(१४) मुंबई दुय्यम ग्राम-वतने निरास अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक).

(१५) मुंबई बंधीजमा, उदहड व उगाडीया भू-धारणा निरास अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक पस्तीस).

(१६) महाराष्ट्र महसूल पटेल (पद निरास) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पस्तीस).

(१७) मुंबई पाल्याधिकरण अधिनियम, १९०५ (१९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक).

(१८) पालक व पाल्य अधिनियम.

(१९) भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा अधिनियम क्रमांक सोळा).

(२०) दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ (१९०८ चा अधिनियम क्रमांक पांच).

(२१) भारतीय पाटबंधारे अधिनियम.

(२२) भूमि संपादन अधिनियम, १८९४.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट १७

[कलम १३ (३) खालील टीप १२ (३) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, १४ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक युएनएफ-१४६७-(जे)-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस) याच्या कलम १३ च्या पोट-कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाने असा निदेश दिला आहे की, पुण्याचे अपर जिल्हाधिकारी खाली विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीअन्वये किंवा अधिनियमाच्या उपबंधान्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचा वापर करतील व त्यांची कर्तव्ये व कामे पार पाडतील :—

(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एक्केचाळीस).

(अ) शहर भूमापन केलेल्या प्रदेशात व पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या जमिनी-खेरीज इतर जमिनींच्या संदर्भात प्रकरण तीन.

(ब) प्रकरणे चार, दहा, अकरा, बारा व तेरा.

(२) मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ (१९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक सदुसष्ट).

(३) मुंबई परगणा व कुळकर्णी वतने (निरास) अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक साठ).

(४) मुंबई सरंजाम जहागीरी व राजकीय स्वरूपाची इनामे पुनश्चालन नियम, १९५२.

(५) मुंबई [illegible] निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५३ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक [illegible]

(६ [illegible] इनामे निरास अधिनियम, १९५२ (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक बेचाळीस).

(७) मुंबई भू-धारणा निरास (अभिलेखांची वसुली) अधिनियम, १९५३.

(८) मुंबई सेवा इनामे (समाजोपयुक्त) निरास अधिनियम, १९५३, (१९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक सत्तर).

(९) मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रे (जागीर निरास) अधिनियम, १९५३ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक बावीस).

(११) मुंबई भू-धारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५५ (१९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक्कावन).

(१२) मुंबई भू-धारणा निरास (दुरुस्ती) अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक चाळीस).

(१३) मुंबई दुय्यम ग्राम वतने निरास अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक).

(१४) महाराष्ट्र महसूल पटेल (पद निरास) अधिनियम, १९६२ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पस्तीस).

(१५) महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक सत्तावीस).

(१६) भूमि संपादन अधिनियम, १८९४ (पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील जमिनी व उद्योगाकरिता संपादित करावयाच्या जमिनीखेरीज इतर जमिनींच्या संदर्भात).

(१७) भारतीय वन अधिनियम, १९२७, (१९२७ चा अधिनियम क्रमांक सोळा).

(१८) जमीन सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३ (१८८३ चा अधिनियम क्रमांक एकोणीस) व शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ (१८८४ चा अधिनियम क्रमांक बारा).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट १८

[कलम १३ (३) खालील टीप १२ (४) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, १४ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक यूएनएफ-१४६७-(एल)-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एकेचाळीस) याच्या कलम १३, पोट-कलम (३) द्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, यद्वारे उक्त अधिनियमाच्या उपबंधाअन्वये किंवा त्यावेळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही विधीअन्वये राज्यातील सर्व अव्वल तहसीलदार, त्यांच्या संबंधित अधिकारितेत तहसीलदारांची सर्व कामे व कर्तव्ये पार [illegible]क्तींचा वापर करतील, असा निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट १९

[कलम १३ (३) खालील टीप १२ (पाच) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक ५ डिसेंबर १९६७.

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक यूएनएफ-१४६७/११४९६१-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एकेचाळीस) याचे कलम १३ चे पोट-कलम (३) व कलम ७ चे पोट-कलम (२) याद्वारे प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून व यासंबंधात राज्याचा मुंबई व विदर्भ प्रदेशात, काढलेल्या किंवा काढल्या आहेत असे मानण्यात आलेल्या पूर्वीच्या सर्व अधिसूचना अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे (अ) मुंबई, मुंबई उपनगर ,ठाणे, कुलाबा, रत्नागिरी , नासिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर, वर्धा, भंडारा, चांदा, बुलढाणा, अकोला, अमरावती व यवतमाळ या जिल्हयांतील निवासी उप-जिल्हाधिकाऱ्यांना, या प्रत्येक जिल्हयाचे अप्पर जिल्हाधिकारी नियुक्त करीत आहे, व

(ब) अशा प्रकारे नियुक्त केलेले अप्पर जिल्हाधिकारी उक्त अधिनियमाच्या कलम २४७ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांच्या अपीलाच्या सुनावणीच्या व त्यासोबत आनुषंगिक असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या इतर सर्व शक्तींचा वापर करतील, असा निदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट २०

[कलम १३ (३) खालील टीप १२ (सहा) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक २६ एप्रिल १९६२

**हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली.**

क्रमांक पीडब्ल्युआर-१०६२/१४०८८-सी.—हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली (१३१७ फसली चा हैद्राबाद अधिनियम क्र. आठ)यांच्या कलम ६ आणि कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या शक्तींचा वापर करून आणि शासकीय अधिसूचना, महसूल विभाग, क्र. पीडब्ल्युआर-१०५७-सी, दिनांक २९ एप्रिल १९५८ अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन, याद्वारे (अ) उस्मानाबाद, परभणी, बीड आणि नांदेड या जिल्हयांतील निवासी उप-जिल्हाधिकाऱ्यांना, त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रात अप्पर जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे, आणि

(ब) असे निदेश देत आहे की, ते फक्त अधिनियमाचे कलम १५८ अन्वये असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचा आणि त्यास आनुषंगिक असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व शक्तींचा वापर करतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एन. बी. जंगले,**
**शासनाचे उपसचिव.**

## परिशिष्ट २१

[कलम १३ (३) खालील टीप १२ (सहा) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १६ नोव्हेंबर १९६३

**हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम.**

क्रमांक पीडब्ल्युआर-१०६३/७४४६१-सी.—हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली (१३१७ फसली चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक आठ) याच्या कलम ६ आणि कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या शक्तींचा वापर करून आणि भूतपूर्व हैद्राबाद सरकारच्या महसूल विभागाची अधिसूचना क्र. ३४/ए-४/९४/५२, दिनांक २५ ऑगस्ट १९५२ अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याद्वारे,

(अ) औरंगाबाद जिल्ह्यातील निवासी उप-जिल्हाधिकारी यांना त्याच्या अधिकार क्षेत्रात अप्पर जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे. आणि

(ब) असे निर्देश देत आहे की, तो ह्या अधिनियमाच्या कलम १५८ अन्वये असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचा आणि त्यास आनुषंगिक असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व शक्तींचा वापर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पी. एच. अभ्यंकर,**
शासनाचे उप सचिव.

---

## परिशिष्ट २२

[कलम १३ (३) खालील टीप १२ (सहा) पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १४ मे १९६४

**हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली.**

क्रमांक पीडब्ल्युआर-१०६३/७४४६१-सी.—हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली (१३१७ फसली चा हैद्राबाद अधिनियम क्र. आठ) याच्या कलम ६ आणि ६-अ अन्वये महाराष्ट्र शासन असे निदेश देत आहे की, शासकीय अधिसूचना महसूल विभाग, क्र. पीडब्ल्युआर-१०६३/१७४४६१-सी, दिनांक १६ नोव्हेंबर १९६३ अन्वये औरंगाबाद जिल्ह्यातील अप्पर जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त करण्यांत आलेल्या निवासी उप-जिल्हाधिकाऱ्यांना ह्या जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या सर्व शक्ती आणि कर्तव्ये असतील, आणि त्यानुसार त्या अधिसूचनेत पुढील सुधारणा करण्यांत येत आहे :—

त्या अधिसूचनेतील कंस आणि अक्षर "(ब)" आणि खंड (अ) च्या शेवटी असलेला 'आणि' हा शब्द आणि खंड (ब) वगळण्यांत येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पी. एच. अभ्यंकर,**
शासनाचे उप-सचिव.

## परिशिष्ट २३

[कलम १३ (५) खालील टीप १३ पहा]

**महसूल व वन विभाग**

[शासकीय ज्ञापन, क्र. युएनएफ-१४६७-(एम)-आर]

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १४ ऑगस्ट १९६७

**विषय.**—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १३ (५) च्या तरतुदीनुसार तहसीलदारांचे शक्तींचे नायब तहसीलदारांकडे प्रत्यायोजन करणे.

ज्ञापन ;

खालील सही करणाऱ्याकडून विभागीय आयुक्तांना कळविण्यात येत आहे की, ज्यांनी सेवेची दोन वर्षे पूर्ण केली आहेत व जे विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत अशा नायब तहसीलदारांकडे त्यांना प्रदान केलेल्या शक्तींसह, तहसीलदारांच्या सर्व शक्ती प्रत्यायोजित करण्यांत येतील. इतर नायब तहसीलदारांबाबत, जिल्हाधिकाऱ्यांना, त्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार, अधिकाऱ्यांचा अनुभव व तालुक्यातील कामाचे प्रमाण लक्षात घेऊन त्यांना योग्य वाटेल अशा शक्तींचे प्रत्यायोजन करण्यास प्राधिकृत केले आहे. पदोन्नतांच्या बाबतीत जर तो अधिकारी महसूल विधी व कार्यपद्धतीमधील विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाला असेल तर त्याला प्रत्यायोजित शक्तींसह तहसीलदाराच्या सर्व शक्ती त्यांना प्रत्यायोजित करता येतील.

कलम १३ चे पोट-कलम (५) अन्वये जिल्हाधिकाऱ्यांना नवीन जमीन महसूल अधिनियमाखालील तहसीलदारांची कर्तव्ये, कार्ये आणि शक्ती नायब तहसीलदारांना देण्याबद्दल योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**के. टी. चिटणीस,**
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

---

## परिशिष्ट २४

[कलम १५ खालील टीप १५ (दोन) आणि कलम ७८ खालील टीप ४४-अ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक २५ मे १९७०

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

**क्र. युएनएफ-१६६७(ए)-आर.**—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एक्केचाळीस, याच्या कलम ३३०-ए अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या शक्तींचा व त्यास त्याबाबतीत समर्थ करणाऱ्या इतर सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाच्या अनुसूचीतील स्तंभ (२) मध्ये राज्य शासनाला दिलेल्या शक्तींचा वापर, स्तंभ तीन

मधील अधिकाऱ्यांना देखील त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रात, स्तंभ (४) आणि स्तंभ (५) मधील शक्तींना अधीन राहून, करता येईल :—

## अनुसूची

| अनुक्रमांक | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये राज्य शासनाच्या शक्ती | अधिकाऱ्यांचे पदनाम | अधिकाऱ्यांनी स्तंभ (३) मधील शक्तींचा वापर करण्याची मर्यादा | शर्ती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | कलम १५ | विभागीय आयुक्त | सर्व .. | महाराष्ट्र जमीन महसूल (सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकारी किंवा तहसीलदार यांच्या शक्ती प्रदान करण्याकरिता अर्हता) नियम, १९६८ मधील तरतुदींना अधीन राहून. |
| २ | कलम ७८ | जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमिअभिलेख. | कलम ७८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जमीन महसुल कमी करणे. | महाराष्ट्र जमीन महसूल (कमी करणे, तहकूब करणे आणि सूट देणे) नियम, १९६९ मधील तरतुदींना अधीन राहून. |
| ३ | कलम ७८ | सर्व जिल्हाधिकारी | कलम ७८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जमीन महसूल तहकूब करणे किंवा सूट देणे. | महाराष्ट्र जमीन महसूल (कमी करणे, तहकूब करणे व सूट देणे) नियम, ७० मधील तरतुदींना अधीन राहून. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही. सुब्रम्हणीयम,
शासनाचे सचिव.

# परिशिष्ट २५

[कलम १६ खालील टीप १६ पहा]

## महसूल व वन विभाग

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक ५ ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र. युएनएफ-१४६७-बी-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. एक्केचाळीस) च्या कलम १६ अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेले जे अधिकारी त्यांच्यासमोर स्तंभ (३) आणि (४) मध्ये नमूद केलेल्या आकाराचे आणि वर्णनाचे शिक्के वापरतील ते अधिकारी विहित करीत आहे :—

| अनुक्रमांक | अधिकारी | शिक्याचा आकार | शिक्यांचे वर्णन |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | आयुक्त, अप्पर आयुक्त, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी आणि उपसंचालक, भूमि-अभिलेख. | १ ३/४ व्यास असलेले गोल आकारचे रबरी ४ शिक्के. | अधिकाऱ्याचे पदनाम आणि मुख्यालय आणि राष्ट्रीय चिन्ह. |
| २ | उपविभागीय अधिकारी, सहाय्यक/उप जिल्हाधिकारी, आणि अधीक्षक भूमि-अभिलेख. | १ १/२ इंच व्यास असलेले गोल आकाराचे रबरी शिक्के. | अधिकाऱ्याचे पदनाम आणि मुख्यालय आणि राष्ट्रीय चिन्ह. |
| ३ | तहसीलदार, अप्पर तहसीलदार, जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, सर्वेक्षण तहसीलदार, आणि नायब तहसिलदार. | १ इंच व्यासाचे गोल आकाराचे रबरी शिक्के | अधिकाऱ्याचे पदनाम आणि मुख्यालय आणि राष्ट्रीय चिन्ह. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
**शासनाचे सचिव.**

## परिशिष्ट २६

[कलम १६ खालील टीप १६ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक १० ऑगस्ट १९६७

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्र. युएनएफ-१४६७(बी) शुद्धीपत्र-शासकीय.—अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. युएनएफ-१४६७(बी) आर, दिनांक ५ ऑगस्ट १९६७ ला जोडलेल्या अनुसूचीतील अनुक्रमांक १ च्या समोर स्तंभ (३) मधील :—

" $1\frac{1}{2}$ इंच " याऐवजी " $1\frac{3}{4}$ इंच " असे वाचावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आर. सी. जोशी,**
शासनाचे सचिव.

---

## परिशिष्ट २७

[कलम ३६(२) खालील टीप २७ पहा]

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक ५ जून १९६८

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.**

क्रमांक युएनएफ-१५६७-आर.—महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक एक्केचाळीस) च्या कलम ३६ च्या पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात असलेल्या शक्तींचा वापर करून आणि अधिनियमाच्या कलम ३३६ च्या उपबंधान्वये अंमलात असण्याचे चालू ठेवलेल्या याबाबतीत पूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचना अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन याद्वारे कलम ३६ च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनार्थ यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जमाती (जमाती, जनजाती समूह किंवा जमातींचा भाग किंवा अशा जमाती, जनजाती समूह यांमधील गट म्हणून) अनुसूचिचे स्तंभ ३ व २ यामध्ये विनिर्दिष्ट केलेले तालुके व जिल्हे यांमधील स्तंभ (४) यामध्ये, त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांसाठी घोषित करीत आहे :—

## अनुसूची

| अनु-क्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | **एक--मुंबई विभाग** | | |
| १ | ठाणे | .. ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके. | ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुके .. | बर्डा, बावचा, भिल्ल, धोडिआ, दुबळा, गामिड, गोंड, काथोडी, कोकणा, कोळी ढोर, कोळी महादेव, कोळी मल्हार, नाईकडा, पारधी, पटेलिया, राठवा, वारली. |
| २ | ठाणे | .. डहाणू व तळासरी हे तालुके सोडून ठाणे जिल्ह्यातील इतर सर्व तालुके. | डहाणू व तळासरी हे तालुके सोडून ठाणे जिल्ह्यातील इतर सर्व तालुके. | ठाकूर. |
| ३ | कुलाबा | .. अलिबाग | .. आवेटी, कोलघर, तळाशेत, शिरगांव, उमटे व महान ही गावे. | कातकरी. |
| ४ | कुलाबा | .. रोहे | .. पळस, वासगाव, चिकणी, रेवोली, मांडवशेत, सुकेळी, वावेपोटगे, शेणवई, महालुंगे, खारगाव, उसर, कोकवण, बिरवाडी, खाम्हेरे, बोरघर, खदार, धाटाव, किल्ले, निधी, ताम्हणशेत, घोसाळे, मुकटे, मुचणे, खांब, तळवली, तर्फ अष्टमी, मढाळी बुद्रूक, पुगाव, आंबिवली, कोलाड, दुरटोळी, पाले खुर्द, चिचवली तर्फ दिवली, पाथरशेत, नंदप, पहूर आणि सुडकोली ही गावे. | कातकरी. |
| ५ | कुलाबा | .. [illegible] | .. मालडुंगे, वेहेगाव, अंभे तर्फ वाजे, देहरंग, गाडे, शिवणसई, तामसई, वाजापूर, चेरवली, कोंडप, करंबेळी तर्फ तळोजे, वांगणी तर्फ तळोजे, धामणी व करंबेळी तर्फ वाजे ही गावे. | ठाकूर. |
| ६ | कुलाबा | .. उरण | .. रानसई गाव .. | कातकरी. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **एक—मुंबई विभाग—चालू** | |
| ७ | कुलाबा | .. सुधागड | .. अडुळसे, आंबिवली, आवोले, आपटवणे, आतोणे, आवंढे, बलाप, भार्जे, भेलीव, चंदरगाव, चिखलगाव, चिवे, दहीगाव, दापोडे, धोकशेत, धोंडीवली, धोंडसे, घेरासरसगड, घेरासुधागड, गोटवडे, गोमाशी, कान्हीवली, कळंब, करंजघर, हेडवली, कारचुंडे, कवेले, खडसांबळे, खांडपोली, खांडसई, खवली, कुंभारघर, कुंभारशेत, मढाळी, महागाव, माणगाव बुद्रूक, माणगांव खुर्द, मुळशी, नडमूर, नागाव, नाकशेत, नांदगांव, नानोसे, नवघर, नेणवली, नेरे, पाच्छापूर, पडघवली, पडसरे, परळी, पोटलज बुद्रूक, पुई, रावगांव, रासळ, शिलोशी, सिद्धेश्वर बुद्रूक, सिद्धेश्वर खुर्द, ताडगाव, तिवरे, उद्धर, उन्हेरे बुद्रूक, उसर, वऱ्हाड, जांभूळपाडा, वाफेघर, वाघोशी, वांद्राशी, वावे तर्फ आसरे, वावळोली आणि झाप ही गावे. | कातकरी. |
| ८ | कुलाबा | .. खालापूर | .. सोंडेवाडी, तळेगाव, पनशील किरे, मजगाव, तळवली, धरणी, निगडोली, नवथे, डोलीवली, माडप, खरसोंडी, कुंभिवली, परखंदे, धामणी, वावोशी, होराळे, तांबटी, निफान, वडखळ, नारंगी, नंदनपाडा, गोहे, गोधवली, खानाव, खरवली, शेडवली, ताकई, काटरंग, मांदाड, सोंडावाडी, विचारेवाडी, होनाड, आडोशी, चावणी, तुकसई, व दारसेत ही गावे. | कातकरी, ठाकूर, डोंगरकोळी. |
| [illegible] | [redacted] | .. [redacted] | .. ओलमण, चाई, बलविरे, [redacted] साळोख तर्फ वरेडी, [redacted] खांडस, पाथरज, सुगाव, [redacted] किकवी, कशेळे पिंगळस, राजापे, आंबिवली तर्फ खलाटी, जांबरुग, मोगरज व धामणी ही गावे. | [redacted]करी, कोळी महादेव, ठाकूर. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **एक—मुंबई विभाग—चालू** | |
| १० | कुलाबा .. | पेण .. | आघर्णे आघई, बाकेघर, वेलवडे बुद्रुक, बेलवडे खुर्द, चिचघर, दवनगर, घोटे, जिर्णे, कोलाड, करोडी, कार्ली, कोंढवी, कोंढीवली, कुहिरे, कुर्नाड, लाडीवली, मोहिली इनाम, निधवली, निफाड, निगडे, पावळ, पाडळे, पानेड, पिंपळगांव, रामराज, रोडे, सालिदे, सापोली, शेणे, शिहू, तळवली, उगर, वडगांव, विराणी, वकूळ, वरप, वरवणे, व शेडशी ही गावे. | कातकरी, ठाकूर, का. ठाकूर, मा. ठाकूर सोनकायोडी, ढोर कातकरी. |
| ११ | रत्नागिरी .. | मंडणगड, दापोली, खेड व चिपळूण. | मंडणगड, दापोली, खेड व चिपळूण यांच्या नगरपालिका मर्यादा सोडून खेड व चिपळूण तालुके. | कायोडी. |
| १२ | जळगांव .. | रावेर, यावल व चोपडा. | रावेर तालुक्यातील अधारमाली, गारवर्डी, माहामंडळी, लालमाती, जुनी महामंडळी, निमडया, सहस्त्रलिंग, तिडचा व पिंपरकुंड ही गावे. यावल तालुक्यातील गंडऱ्या, हरिपुरा, जामन्या, उस्माली, मोहमंडळी (डी) व वाघेरा ही गावे.<br>सत्रसेन, मराठा, मोरचिडा, कृष्णपुरी, उनारती, वैजापूर, कारजणे, मुळयाउतार, खाऱ्यापाडाव, बोरंजाती. चोपडा तालुक्यातील, मेळापूर, नेलन, बुरमाळी, देवझिरी, देव्हारी, विष्णूपूर व कुंडयापाणी ही गावे. | पावरा तडवी. |
| १३ | धुळे .. | अक्कलकुवा, अक्राणी, साक्री, नंदूरबार, नवापूर, शहादा, शिरपूर व तळोदा. | संपूर्ण अक्कलकुवा तालुका, संपूर्ण अक्राणी तालुका, साक्री तालुक्यातील उमरपाटी गांव. नंदुरबार तालुक्यातील भोणे, धानोरा (कोसबे), धिरसगाव, जाळके, खेराळे, कोठली खुर्द, नागसर, नांदरखे, ओझरदे, पिंपळोद, रनाळे, ठाणेपाडा, उमर्दे बुद्रुक, वेलावड, विरचक्र, वाघाळे, वासदरे, शिरदाडे, अर्डीतारा, भांगडे, खैरवे खुर्द तर्फ धानोरे, कोठडे, मंगरूळ, पावरे, शेगवे, उमज, वडजाखण व वसलाई गावे. | भिल्ल, पावरा धनका, गामिड, कोकणा, कोकणी, नाइकडा, पारधी, बरडा, चोधरा, धोडिआ, दुबळा, गोंड, कायोडी, कोळी - ढोर, पटेलिया, पोमला, राठवा, वारली, विटोलिया, पडवी, तडवी व वसावा. |

अनुसूची—चालू.

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | **एक—मुंबई विभाग—चालू.** | |
| १३ | धुळे–चालू | | नवापूर तालुक्यातील आमलाण, बारी, बिलमांजरे, केळवण, वोकलझार, बोरझार, चौकी, दापूर, धायटे, धनराट, गडत, घोडजामने, कामोद, करंजी बुद्रूक, करंजी खुर्द, खेकडे, खोकरवाडे, खोकसे, कोरेघाट, कोटखांब, कुकराण, मोरकरंजवे, नागझिरी, नांद[illegible]ण, पाटी, वेडकी, पावरविहिर, रायपूर, सावरट, शेतगांव, गुर्ळा, वडकळंबी, झामणझार, भादवड बुद्रूक, बिजगांव, बोरचक, चितवी, चोरविहिर, देवळीपाडा, टोंग, कडवाण, केळी, खडकी, खांडबारे, खोलघर, खोलविहीर, महालकडू, मळ[illegible]न, मोग्राणी, नावली, निबोणी खुर्द तर्फ भादवड, निमदर्डे, पळशी, पिंपळे, साळवण, श्रावणी, सिरवडे व बघारपाडा ही गावे.<br>शहादा तालुक्यातील काटघर, आकसपूर, भुते, टवलाई, गणोर, तिळवी, चिरडे, बिस्पूर, दस, [illegible]खेड व बिलाडी ही गावे.<br>शिरपूर तालुक्यातील पळासनेर, सांगवी, फत्तेपूर, हाडाखेड, बोराडी, आंबे, खबाळे, रोहिणी, वडळे, भोइटी हातेड, कुडकी व खामखेडे गावे.<br>तळोदे तालुक्यातील [illegible]पाडा, बन, बंधारा, चौगाव बुद्रूक, [illegible]पूर [illegible], एकधड, गाढवली, [illegible], जुव्वानी, खर्डी खुर्द, [illegible] कुंडवे, ल[illegible]पूर, पाठडी, [illegible]पूर, [illegible]पूर, रतनपाडा, रेटपाडा, सादर, [illegible] रा[illegible]मेवल खुर्द, उमरकुवा, वाल्हेरी, खर्डी बुद्रूक, [illegible] व [illegible] | |
| १४ | नाशिक | पेठ | संपूर्ण पेठ [illegible] | [illegible]मल्ल, कोकणी, वारली, क.थोडी, कातकरी, कोळी-महादेव किंवा डोंगरकोळी. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **एक—मुंबई विभाग—चालू** | |
| १५ | नाशिक .. | सुरगणा .. | संपूर्ण सुरगणा तालुका .. | भिल्ल, कोकणी, वारली, काथोडी कातकरी, कोळी-महादेव किंवा डोंगरकोळी. |
| १६ | नाशिक .. | इगतपूरी .. | इगतपुरी तालुक्यातील तळेगांव, ट्रिंगलवाडी, अवलखेट, चिचोळे, खैरे, पारदेवी, खंबाळे, वाकी, पिंप्री सद्रोद्दीन, तलोघा, तळोशी, मानवेढे भावली, भावली खुर्द, काळुस्ते, निरपूर, कांचनगांव, शेनवड बुद्रुक, भरवज, आंबेवाडी, कुरुंगवाडी, खडकदे, इन्दोरे, मांजरगांव, गवांडे, जामुंडे, मालविहीर, अडवण, कुर्णोली, घार्नोली, पिंपळगांव, भटाटा, कारपगाव, बिटुर्ली, भावली बुद्रूक, टाके हर्षे, अस्वला हर्षे, धडोशे, मेटचंद्राची, मेटहुंगबाची, मेटयेल्याची, पहिणे, भिलमाल, खारोळी, कुशेगांव, सामुंडी, झारवड खुर्द, अव्होटे, देवेगाव, आलवंड, दापुरे, नागोशी, म्हासुर्ली, रावली, सातुर्ली, ओंडली, झारवड बुद्रूक, ववी-हर्षे, धारगांव व टाके देवगांव. | भिल्ल, कोकणी, वारली, ठाकूर काथोडी, कातकरी, कोळी किंवा डोंगरकोळी. |
| १७ | नाशिक .. | नाशिक .. | नाशिक तालुक्यातील अंबई, आंबोली, अंजनेरी, बाझे, ब्राह्मणवाडे, चाकोरे, दधदगांव, दरी, देवगांव, धुमोडी, धोंडेगाव, दुदगाव, दहेगांव, गंगाम्हाळुंगी, गणेशगाव, त्रिंबक, गोवर्धन, गणेशगांव-नाशिक, गिरनारे, हर्षेवाडी, हिराडी, जातेगाव, काजुर्ली, काळुस्ते, खरवळ, कोणे, लाडची, मानोली, माळेगाव, मेटधराकिल्ला, मेटकवरा, मुळेगांव, नागलवाडी, नाईकवाडी, नसलगांव, नांदगांव, ओझरखेडे, पिंपळद त्रिंबक, त्रिंबक, पिंपलद नाशिक, पिंप्री, त्रिंबक, पेगलवाडी (नाशिक), गणेशगाव, (वाघारा), पिंळगाव (जी), रोहिले, राजेवाडी, राजुरबहुला, सावरगाव, सडगांव, शिवणगांव, सादगांव, सपाटे, शिरसगांव, सारूळे, तळेगांव, तोरंगण, तळवाडे, वेळे, वाघेरा, वरसविहीर, वेळंबजे व बाढोली ही गावे. | भिल्ल, कोकणी, वारली, ठाकूर, काथोडी, कातकरी कोळीमहादेव किंवा डोंगरकोळी. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | **एक—मुंबई विभाग—चालू.** | |
| १८ | नाशिक | दिंडोरी | दिंडोरी तालुक्यातील अहिवंतवाडी, आंबाड, अंबानेर, अंबेगाव, भनवड, मातोंडे, चाचडगांव, चामदरी, चंडीकापूर, चारोसे, चौसाळे, दहिवी, डेहेरे, देहेरवाडी, देवघर, देवसाने, देवठाण, धागुर, धाऊर, एकलहर, गांडोळे, गोलदरी, गोळाशी, हासते, जलखेडे, जीरवाडे, जोरन, करंजाळी, करंजखेड, कडासर, कोचरगांव, कोकणगांव,बुद्रूक कोकणगांव खुर्द, कोशिंबे, कोल्हेर, मजाजे, मालेदुमाळा, माळेगाव, मांदाणे, मोखनल, मुळाणे, नाळेगांव, नळवाडी, ननाशी, निगडोळ, ओझे, पळसविहीर, पाणदरे, पोशी, पिंपळगांव, धुम, पिंप्रज, पिंपळखेड, पिंप्री अंचला, पिंगळवाडी, पोफळवाडी, पुणेगांव, रासेगांव, रावळगाव, दादराले, संगम्हेर, सारसाळे, तिल्लोली, टिटवे, उंबराळे बुद्रूक, उंबराळे खुर्द, वनोर, वाघाड, वागळूद, वाणी बुद्रूक, वांजूळे, वारे व निळवंडी ही गावे.] | भिल्ल, कोकणी, वारली, काथोडी, कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगरकोळी. |
| १९ | नाशिक | कळवण | कळवण तालुक्यातील अभोणे, कुंदणे, कनाशी, वंजारी, मोहदरी, नांदुरी, दरेगाववाणी, सप्तशृंगगड, पिंप्रीपाळे, प्रिंपी, मारकंडा, साकोरे, आठांबे, गोबापूर, साददविहीर, कातळगांव, ओझर, अंबुर्डी, अंबुर्डी खुर्द, अबुर्डी बुद्रूक, जामशेत, चिचोरे, मोहमुख, बोरदैवत, चणकापूर, भागुर्डी, तिऱ्हळ खुर्द, तिरखल बुद्रुक, सरळे दिगर, बिलवाडी, जांभळे वणी, देवळे वणी, कळमटे, असोली, दह्याणेपाळे, विठेवाडी पाळे, सावकी पाळे, देखगांव, पलसदर, खिरड, सुकापूर, देवळी कऱ्हाड, लिंगामे, अमदर, वाडळे, हातगड, कनाशीजयपूर, गोलरवाल, करमाळे, खडकवण, उंबरपाडा, करंभेळ, कनाशी, वरखेडे, दाळवट, सिंगाशी, वेरूळे, कोसुर्डे, भाकुर्डे, करंभेळ हातगड, जांभळे हातगड, विरशेत, कुमसाडी, | भिल्ल, कोकणी, वारली, कायोडी, कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगरकोळी. |

अनुसूची—चालू.

| अनुक्रमांक (१) | जिल्हा (२) | तालुका (३) | क्षेत्र (४) | अनुसूचित जमाती (५) |
|---|---|---|---|---|
| | | | **एक—मुंबई विभाग—चालू** | |
| १९ | नाशिक—चालू. | | जिरवाडे, हातगड, टटाणी, शृंगारवाडी, बावळेडे, दरेगांव हतगड, धानोली, भंडाने, हातगड, जयदर, खडकी, लाखाणी, सुळे, भुताणे दिगर, सुपळे दिगर, उंमरदे, कायरे दिगर, कोसवण, खरडे दिगर, मोकभंगी, ककाने, खेडगांव रावळजी, देसराणे, नाळीद, इंशी, धानेर, दोरभांगी, पिंपळे खुर्द, पिंपळे बुद्रूक, मालेगाव खुर्द, माळेगाव बुद्रूक, मोहोवारी, तकबारी, धरडे दिगर, भांडने, पिंपळे, दहयाणे दिगर, गणोरे, शेरी दिगर, नाख्ळ, मेहदर, मुळाणेवणी, कण्हेरवाडी, हिंगवे, गोसरणे, बर्डे, वेलवारे, जामळेपाळे, ढेकाळे, बाळापूर व वडाळे वणी ही गावे. | भिल्ल, कोकणी, वारली, कायोडी, कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगरकोळी |
| २० | नाशिक | बागलाण | बागलाण तालुक्यातील शेवरे, जाखोड, नवकोल, देवठाण, वाभुळणे, बोरदे वत भीमशेत, गोळवाड, जाडा, मानूर, अजंदे, साल्हेर, वांघबे, अलियाबाद, अंबापूर, हातनूर, जयतापूर, माळीवाडे, मोहोलांगी, बोराटे, विसापूर, खरड, वडे दिगर, जामोटी, रावेर, भिलवाड वडखाल, तुंगणदिगर, कातखेल, टटाणी, साळवण, साकोडे, केळझर, दहिडुले, भुंधाटे, कारंजखेड, खेड, वाडे, पिसोरे, पागरे, मोरकुटे, मळगाव खुर्द, काटगव्हाण, भिलदार, वाडीचौल्हेर, किकबारी बुद्रुक, किकवारी खुर्द, भावडे, तलवाडे दिगर, जोरण, विंचुरे, डांगसौंदाणे, केरसाणे, मुल्हेर, दसाणे व सरवार ही गावे. | भिल्ल, कोकणी, वारली, काथोडी, कातकरी, कोळी महादेव किंवा डोंगरकोळी. |
| | | | **दोन—पुणे विभाग** | |
| २१ | अहमदनगर | अकोला, राहुरी, संगमनेर. | संपूर्ण अकोला, राहुरी व संमगनेर तालुके | कोळी महादेव, डोंगरकोळी, ठाकूर किंवा ठाकर तसेच का-ठाकर, मा-ठाकूर, व मा-ठाकर. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **दोन—पुणे विभाग—चालू** | | |
| २२ | पुणे | आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ मुळशी व वेल्हे. | संपूर्ण आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ व मुळशी व वेल्हे तालुके. | कोळी महादेव, डोंगरकोळी. |
| २३ | पुणे | आंबेगांव, जुन्नर खेड व मावळ. | संपूर्ण आंबेगाव, जुन्नर, खेड व मावळ तालुके. | ठाकूर किंवा ठाकर तसेच का-ठाकूर, का-ठाकर मा-ठाकूर व मा-ठाकर. |
| | | **तीन—नागपूर विभाग** | | |
| २४ | चांदा | गडचिरोली आणि सिरोंचा. | चांदा जिल्ह्यातील गडचिरोली व सिरोंचा तालुक्याच्या खालील भूतपूर्व जमीनदारीचा अंतर्भाव असलेले क्षेत्र चांडाळा, धानोरा, दुधमाळा, गेवर्धा, गिलगाव, झाडापापडा, खुटगांव, कोटगुल, मुरूमगाव, मायमुरांडा, पलसगड, पोटेगांव, रांगी, सुरसुंडी, सोनसरी अहेरी. | गोंड, राजगोंड व माडीया. |
| २५ | चांदा | गडचिरोली | नगरपालिका क्षेत्र वगळून संपूर्ण गडचिरोली तालुका. | गोंड व राजगोंड. |
| २६ | अमरावती | मेळघाट | नगरपालिका क्षेत्र वगळून संपूर्ण मेळघाट तालुका. | कोरकू, गोंड, भिल्ल परधान, मोघीया, गोंड-गोवारी. |
| | | **चार—औरंगाबाद विभाग** | | |
| २७ | औरंगाबाद | गंगापूर | आसेगाव, जंभाळा, तुर्काबाद, वाहेगाव व गंगापूर ही गावे. | भिल्ल. |
| | | कन्नड | विठ्ठलपूर, फालशी बुजुर्ग, सावांगा, वाकोड, करंजखेडा, वढोद, निंभोरा, गणेशपूर औराळा, शेऊर, अंबा व साईगांव ही खेडी. | भिल्ल. |
| | | अंबड | मसाई, धनगर पिंपरी, पाथरवाला बुद्रुक, पांगरखेडा, ढाळसखेडा, आलमगांव, साहेसावंगी, बदनापूर, जामखेड, राहिलगड, राणी-उंचेगाव, अंबड, बोरी, शिराढोण, शिंदेवडगांव, गुरूपिंप्री, | भिल्ल. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

चार—औरंगाबाद विभाग—चालू

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७—औरंगाबाद—चालू. | | | शहापूर, साडेगांव, रमना, अंतेरवाली टेंभी, सरपगव्हाण, जालूरा, खडका, सोनकपिपळगांव, महारजावळा, रोजगाव, भद्रेगांव, शेवगा, मानेपुरी, परांडा, भालगांव, वालखेडा, रामगव्हाण खुर्द, अंतरवाली दाई, खालापुरी, दहेगांव खुर्द, भोयेगव्हाण, सावरगळ, येवला, चिचखेडा, बोंदलापुरी, लोणारभायगाव, देशगव्हाण, चिकनगांव, कीतीपुरी, भोगगाव, सारंगपूर, पानेवाडी, धोरंडी, गोंदी, अव्वलगांव बुद्रूक, बोडखा बोरी, राहेरा व मारडी ही गावे. | भिल्ल. |
| | | वैजापूर | वैजापूर, भागगाव, बेलगांव, खंबाळा दावला, खिरापूर, चांदगाव, नांदगांव, पानवी खुर्द, रोटेगांव, आगरसायगांव, धायगाव, खंडाळा, पानगव्हाण, भिडी, लोणी बुजूर्ग, जारूळ, पानवी खंडाळा, लाख खंडाळा, जांबरगांव, भायगांव, वैजापूर, विलोनी, नारेला, जानेफळ, हिलालपूर, कोरडगांव, वडजी, परेला, खारज, तितरखेडा, चिकटगांव, भादली, तळावाडा, वाकला, लोणी खुर्द, नायगव्हाण, बाभूलतेल, तेल, वळण, कांदील, बेरोला, खेडा, आंचेगांव, टुनकी, दासखुल, सावखेड खंडाळा, निमगांव गोंदगांव, पेंढेफळ, शिवर, कोन्ही, बोरसर, भिवगांव, मालेगाव, परसोडा, घोंदलगांव, गोलवाडी, निराखनगर, शिवराई, तिही, आघुर, सावंदगांव, पालखेड, शिरडी, जळगांव, शाहजतपूर, करजगांव, हाळ-पिपळगांव, राहेगव्हाण, लासूर, राहेगांव-शिवगाव, बाभुळगांव बुद्रूक, बाबुलगांव खुर्द, गराई, झोलेगांव, वाघला, पोखरी, भोकरगांव, मालेगाव-कन्नड, बायगांव, साकेगांव, मटाणा, मानोणी, जिरी, मानेगांव बाभुलखेडा, खिरडी कन्नड, हिंगणा कन्नड, महाकाळ | भिल्ल. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | जिल्हा | तालुका | क्षेत्र | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | चार—औरंगाबाद विभाग—चालू | | |
| २७ | औरंगाबाद—चालू | | वडगांव, सराळा, वंजरगाव, सावखेड-गंगा, कपूरवडगांव, लाडगाव, फकिराबादवाडी, भायगाव, गोवर्धनपूर, हणमंतगांव, म्हस्की, सिध्दपूर, पिपळगांव, पिपळगावनगिना, हिंगोणी, गोईगांव, पुरणगांव, कनगोनी, नारायणपूर, बाबतारा, होणगांव, लाखगंगा, नांदूर-धुक, बाभुळगांव, गंगा, चिंचडगांव, चोरवाघळगांव, सीरसगाव, वीरगाव, जातेगाव, टेंभी, डाकपिंपळगांव व नादी ही गावे. | |
| | बीड .. | | नागरी क्षेत्र वगळता बीड जिल्ह्यातील सर्व गावे. | भिल्ल. |
| | नांदेड .. | किनवट .. | किनवट तालुक्यातील सर्व गावे .. | अंध, भिल्ल, गोंड, कोलम, परधान. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आर. सी. जोशी,
शासनाचे सचिव.

२. राज्याच्या मुंबई प्रदेशात आदेशिका फीची आकारणी आणि साक्षीदारांना द्यावयाच्या भत्त्याची रक्कम, उच्च न्यायालय, मुंबई, यांनी काढलेल्या दिवाणी नियमपुस्तिका खंड एक मधील अनुक्रमे प्रकरण बावीस आणि सात मधील नियमांनुसार देण्यात येत असे. राज्याच्या विदर्भ प्रदेशात आदेशिका फीची आकारणी मध्य प्रदेश जमीन महसूल अधिनियमाचे कलम ३८ अन्वये तयार केलेल्या व भूतपूर्व मध्य प्रदेश सरकारची अधिसूचना क्रमांक ३११/बीपीडीआर-५५, दिनांक १८ जानेवारी १९५६ अनुसार प्रसिद्ध केलेल्या नियमानुसार आणि साक्षीदारांचे भत्ते उक्त कलमान्वये तयार केलेल्या आणि अधिसूचना क्रमांक ३११/बीएम-डीआर-५५, दिनांक ३० डिसेंबर १९५५ अन्वये प्रसिद्ध केलेल्या नियमांनुसार विहित केलेल्या प्रमाणात आकारले होते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यामध्ये साक्षीदारांचे भत्ते आणि आदेशिका फी यांचे प्रमाण नियमान्वये विहित करण्याबाबत कोणतीही विशिष्ट तरतूद नाही.

३. संपूर्ण राज्यात लागू असलेल्या मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ च्या कलम ३२ अन्वये उच्च न्यायालयाला दिवाणी आणि महसुली न्यायालयांनी आदेशिका बजावणे व तिचे कार्यान्वयन करण्याबद्दल आकारावयाच्या फीबाबतचे नियम तयार करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेली आहे. या शक्तींचा वापर करून, उच्च न्यायालयाने दिवाणी नियमपुस्तिका खंड एक च्या प्रकरण बावीसमध्ये आदेशिका फीचे नियम, तयार केले असून ते उच्च न्यायालयाची अधिसूचना क्रमांक पी-६३२६/५६, दिनांक ३१ मार्च १९५९ अन्वये संपूर्ण राज्याला लागू केले असून मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ च्या कलम ३२ अन्वये अंमलात असण्याचे चालू आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या उपबंधानुसार चौकशी करणाऱ्या महसूल अधिकाऱ्यांनी दिवाणी नियमपुस्तिकेच्या प्रकरण बावीस मध्ये विहित केलेल्या प्रमाणानुसार आदेशिका फी आकारावी.

४. जर कोणताही रीतसर किंवा संक्षिप्त चौकशीच्या वेळी पक्षकाराने साक्षीदारांच्या उपस्थितीची इच्छा व्यक्त केली तर दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरावी, अशी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २३१ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. दिवाणी न्यायालयात बोलावलेल्या साक्षीदारांना द्यावयाच्या भत्त्याबाबतचे नियम, उच्च न्यायालयाने दिवाणी नियमपुस्तिकेच्या खंड एक, प्रकरण सातमध्ये तयार केले आहेत. म्हणून महसूल अधिकाऱ्यांना निदेश देण्यात येत आहे की, रीतसर किंवा संक्षिप्त चौकशीसाठी त्यांच्यासमोर हजर होणाऱ्या साक्षीदारांना या नियमात विहित केलेल्या प्रमाणानुसार भत्ते देण्यात यावेत.

५. हे परिपत्रक वित्त विभागाशी विचारविनिमय करून काढण्यात आले आहे. पहा त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७१४/तीन, दिनांक २० मार्च १९६८.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जे. टी. चिटर्णीस,**
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

---

## परिशिष्ट ३४

[कलम २३१ खालील टीप ९० (एक) पहा]

**न्यायालय शुल्क व**

(दिवाणी नियमपुस्तिका खंड

४३९. मुंबई दिवाणी न्यायालय अधिनियम (सन १८६९ चा अधिनियम क्रमांक १४) याचे कलम ४२ व न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० (सन १८७० चा अधिनियम क्रमांक ७) याचे कलम २० अन्वये उच्च न्यायालयाने केलेल्या पुढील नियमांना मुंबई शासनाने संमती दिली आहे:—

(एक) उच्च न्यायालयाने त्याच्या अपीलीय क्षेत्राधिकारात काढलेल्या आदेशिका बजावण्याकरिता व त्यांचे कार्यान्वयन करण्याकरिता सध्या आकारलेली फी आकारण्याचे चालू राहील.

**(दोन)** इलाखा शहर लघुवाद न्यायालय मुंबई वगळून इतर सर्व दिवाणी न्यायालयाकडून आकारण्याजोगे शुल्क पुढील आदेश मिळेपर्यंत २५ टक्के अधिभारास अधीन राहून सोबतच्या जोडलेल्या तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे असेल. परंतु दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा आदेश १६ याचा नियम १-ब अन्वये न्यायालयाने कोणत्याही व्यक्तिस तिच्या पक्षकारामार्फत उपस्थित राहण्याकरिता तिच्यावर समन्स बजावण्याची परवानगी दिली असेल त्याबाबतीत व ज्या ठिकाणी बेलिफाची सेवा आवश्यक नसते त्याबाबतीत ती शुल्के निम्म्याने कमी करण्यात येतील :

आणखी असे की, आदेशिका बजावण्यासाठी किंवा तिचे कार्यान्वियन करण्यासाठी विशेष बेलिफाच्या (प्रकरण सात, परिच्छेद ७२ पहा) सेवेचा लाभ घेण्याची पक्षकाराची इच्छा असल्यास त्यास ज्या आदेशिकेसाठी अर्ज करण्यात आला असेल व तिचे तातडीने [सोबत जोडलेल्या तक्त्याखालील टीप (सात) पहा] कार्यान्वयन करण्याचा आदेश देण्यात आला असेल अशा आदेशिकासाठी आदेशिका बजावण्याकरिता किंवा तिचे कार्यान्वियन करण्याकरिता आवश्यक असलेल्या कालावधीतील (यात ज्या ठिकाणी आदेशिका बजावण्याची किंवा कार्यान्वित करावयाची असेल त्या ठिकाणी जाण्याची किंवा येण्याची पुढील उप-परिछेदात तरतूद केलेल्या रीतीने मोजण्यात येणाऱ्या कालावधीचा अंतर्भाव होतो). बेलिफाचे पारिश्रमिक व भत्ते याव्यतिरिक्त आदेशिका शुल्क घ्यावयास भाग पाडण्यात येईल.

(तीन) विशेष बेलिफाचे पारिश्रमिक व भत्ते अनुवर्ति उप-परिच्छेदाच्या अनुसार पक्षकाराने देणे आवश्यक असेल त्याबाबतीत पारिश्रमिक (त्यात महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता व घरभाडे भत्ता यांचा समावेश होतो). प्रत्येक बेलिफास प्रत्येक दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी रुपये ४.५० पैसे या दराने काढण्यात येईल व वसूल करावयाचा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता त्या त्या वेळी अंमलात असलेल्या नियमांन्वये बेलिफांना अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे असेल. परंतु पक्षकाराने त्याची स्वतःची वाहन व्यवस्था केली असेल त्याबाबतीत पक्षकाराकडून कोणताही प्रवास भत्ता वसूल करण्यांत येणार नाही.

(चार) (अ) विशेष बेलिफांचे पारिश्रमिक व भत्ते पक्षकारांकडून वसूल करण्यात येतात. त्याबाबतीत, पक्षकारांकडून ज्या बेलिफांना पारिश्रमिक व भत्ते देण्यात येतात अशा बेलिफांना संख्येपेक्षा अधिक नसतील एवढ्या अस्थायी बेलिफांची, नेमणूक पीठासीन न्यायाधिशास ज्या मुदतीकरिता पक्षकाराकडून रकमा वसूल करण्यात येतात त्या मुदतीपेक्षा अधिक नसेल एवढ्या मुदतीकरिता करता येईल.

(ब) पक्षकारांकडून ज्या आदेशिकेच्या बाबतींत रक्कम वसूल करण्यात येते अशी विशिष्ट आदेशिका बजावण्याचे किंवा तिच्या कार्यान्वयाचे प्रत्यक्ष काम तात्पुरते बेलिफ प्रत्यक्षतः करीत असतील तेव्हा अशा जादा तात्पुरत्या बेलिफांच्या बाबतीत, पक्षकारांकडून वसूल करण्यात आलेले पारिश्रमिक व भत्ते अशा तात्पुरत्या जादा बेलिफांना देण्यात येईल.

(क) अशा प्रकारचे कोणतेही तात्पुरते बेलिफ नेमण्यात आले नसतील त्याबाबतीत पक्षकारांकडून वसूल केलेली पारिश्रमिक व भत्ते यांची रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल.

# तक्ता

तक्ता

**आदेशिका, उद्घोषणा व विक्री यांच्या संबंधात विवाणी**

| आदेशिकेचे नाव इत्यादि | वाद विषयाची | | | |
|---|---|---|---|---|
| | रुपये २५ पेक्षा अधिक नसल्यास | रुपये २५ पेक्षा अधिक परंतु रुपये ५० पेक्षा कमी असेल तर | रुपये ५० पेक्षा अधिक परंतु रुपये २५० पेक्षा कमी असेल तर | रुपये २५० पेक्षा अधिक परंतु रुपये ५०० पेक्षा कमी असेल तर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| एक. प्रत्येक समन्स किंवा नोटीस याकरिता— | | | | |
| (अ) प्रत्येक प्रतिवादी, उत्तरवादी किंवा साक्षीदार यास. | ००·२५ | ००·४० | ००·७५ | १·०० |
| (ब) आदेशिकेकरिता त्याच वेळी अर्ज केला असेल तर, त्याच गावातील, नगरातील किंवा त्याच नगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक जादा प्रतिवादी, उत्तरवादी किंवा साक्षीदार यांस. | ००·१५ | ००·२० | ००·४० | ०·५० |
| दोन. (अ) अटकेच्या प्रत्येक अधिपत्राकरिता अटक करावयाच्या प्रत्येक व्यक्तींच्या बाबतीत.<br>(ब) जप्तीच्या प्रत्येक अधिपत्राकरिता अशा प्रत्येक अधिपत्राच्या बाबतीत ;<br>(क) विक्रिच्या प्रत्येक अधिपत्राकरिता अशा प्रत्येक अधिपत्राच्या बाबतीत. | ००·५० | ००·७५ | १·५० | २·०० |

न्यायालयात आकारण्यात येणारी फी

| रक्कम | | | अन्यथा उपबंधित केले नसलेले दावे, अपीले व कार्यवाहृया यामधील | मामलेदाराच्या न्यायालयातील | मुंबई भाडे, हॉटेल व पथिकाश्रम दर नियंत्रण अधिनियम, १९४७ (सन १९४७ चा अधिनियम क्र. ५७) अन्वये केलेल्या इतर संकीर्ण अर्जातील |
|---|---|---|---|---|---|
| रुपये ५०० पेक्षा अधिक परंतु रुपये १,००० पेक्षा कमी असेल तर | रुपये १,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. ५,००० पेक्षा कमी असेल तर | रुपये ५,००० पेक्षा अधिक असेल तर | | | |
| (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| रुपये | | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १·५० | पहिल्या १,००० रुपयास रु. १·५० व रु. १,००० पेक्षा अधिक असल्यास प्रत्येक १,००० रुपयास किंवा त्याच्या भागास ५० पैसे. | ५·०० | २·०० | ००·५० | १·०० |
| ००·७५ | पहिल्या १,००० रुपयास ७५ पैसे आणि रुपये १,००० पेक्षा अधिक असल्यास प्रत्येक १,००० रुपयास किंवा त्याच्या भागास २५ पैसे. | २·५० | १·०० | ०·४० | ००·५० |
| ३·०० | पहिल्या १,००० रुपयास रु. ३ व रु. १,००० पेक्षा अधिक असल्यास प्रत्येक १,००० रुपयास किंवा त्याच्या भागास रुपया १. | १०·०० | ४·०० | .. | .. |

तक्ता—

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| तीन. विक्रीच्या उद्घोषणेच्या व्यतिरिक्त दिवाणी व्यवहार संहितेचा आदेश २१, नियम ६६, या अन्वयेच्या प्रत्येक उद्घोषणेकरिता आणि अन्यथा उपबंधित न केलेला प्रत्येक आदेश व आदेशिकेकरिता. | ०० · ५० | ०० · ७५ | १ · ५० | २ · ०० |
| चार. व्यादेशाचा प्रत्येक आदेशाकरिता— | | | | |
| (अ) एका विरोधकाकरिता .. | ०० · ५० | ०० · ७५ | १ · ०० | २ · ०० |
| (ब) आदेशिका त्याच वेळी लागू करायची असेल तर, त्याच गावातील, नगरातील किंवा त्याच्या नगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक जादा विरोधकास. | ०० · २५ | ०० · ४० | ०० · ७५ | १ · ०० |
| पांच. दिवाणी व्यवहार संहितेचा आदेश २१, नियम ६६ अन्वयेची विक्रीच्या प्रत्येक उद्घोषणेकरिता. | २ · ०० | .. | .. | .. |
| सहा. स्थावर किंवा जंगम मालमत्तेच्या प्रत्येक विक्रीकरिता. | .. | .. | .. | .. |

रुपये १,००० पेक्षा अधिक असलेल्या सर्व जादा स्थूल २ टक्के या दराने टक्केवारी रक्कम/ पौडातील वटणावळ रकमेऐवढी किंवा त्याहून अधिक असेल तर पौडातील वटणा-रक्कम पौडातील रकमेतून वजा करण्यात येईल आणि उर्वरित पृष्ठ १०२२ पहा.)

तसेच, जेव्हा स्थावर मालमत्तेची विक्री दिवाणी व्यवहार पौडातील वटणावळ किंवा इतर फी यांची रक्कम परत करण्यात

चालू.

| (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
|---|---|---|---|---|---|
| ३·०० | पहिल्या प्रत्येक १,००० रुपयास रु. ३ आणि रु. १,००० पेक्षा अधिक असल्यास प्रत्येक १,००० रुपयास किंवा त्याच्या भागास रु. १. | १०·०० | ४·०० | .. | .. |
| ३·०० | पहिल्या प्रत्येक १,००० रुपयास रु. ३ आणि रु. १,००० पेक्षा अधिक असल्यास प्रत्येक १,००० रुपयास किंवा त्याच्या भागास रु. १. | १०·०० | ४·०० | .. | .. |
| १·५० | वरील प्रमाणच्या निम्मे | ५·०० | २·०० | .. | .. |
| ... | सर्व दावे, अपीले किंवा कार्यवाहया यामध्ये. | .. | .. | .. | .. |
| .. | .. | .. | .. | .. | .. |

उत्पन्नावरील १ टक्का या दराच्या आणखी फीसह विक्रीद्वारे मिळालेल्या रुपये १,००० पर्यंतच्या स्थूल रकमेवर परंतु विक्रीचा अधिपत्राच्या संबंधात अगोदरच दिलेली आदेशिका फीची रक्कम पोडातील वटणावळीच्या वळीची रक्कम संपूर्णपणे भरण्यात येईल, आणि पोडातील रक्कम फीच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर फीची रक्कम पोडातील वटणावळीची रक्कम म्हणून आकारण्यात येईल (मुंबई शासन राजपत्र, १९२४, भाग १,

संहिता आदेश २१, नियम ८९, ९१ किंवा ९२ अन्वये करण्यात आलो असेल, तर अर्ज केल्यावरून कोणतीही येईल.

**टीप** (एक).—विषयवस्तूचे मूल्य, विवाद्य मालमत्तेचे बाजार मूल्य असल्याचे समजण्यात येईल. विषयवस्तूचे मूल्य काढणे शक्य नसेल त्याबाबतीत स्तंभ (९) अनुसार फी आकारण्यात येईल.

**टीप** (दोन).—अंमलबजावणीच्या कार्यवाहीमध्ये, ज्या विषयवस्तूंच्या संबंधात अंमलबजावणी करण्यात येत असेल किंवा स्तंभ (९) अन्वये विषयवस्तूंचे मूल्यनिर्धारण करणे शक्य नसेल त्याबाबतीत आदेशिका फी आकारण्यात येईल. परंतु, न्यायनिर्णित ऋणकोच्या विनंतीवरून, दिवाणी व्यवहार संहिता, आदेश २१, नियम १ चा पोट-नियम (२) किंवा नियम २ चा पोट-नियम (२) अन्वये काढलेल्या नोटीशीची आदेशिका फी, उक्त आदेशाचा नियम १, पोट-नियम (१), खंड (अ) अन्वये न्यायालयात भरलेल्या रकमेच्या अनुसार किंवा न्यायालयाबाहेर भरलेल्या रकमेच्या किंवा यथास्थिती उक्त आदेशाच्या नियम २, पोट-नियम (१) अन्वये केलेल्या समायोजनाच्या मूल्याच्या अनुसार आकारण्यात येईल.

**टीप** (तीन).—दिवाणी व्यवहार संहितेखालील संकीर्ण कार्यवाह्यांमध्ये आणि इतर अधिनियमांखालील कार्यवाह्यांमध्ये आकारावयाची फी, बाजार मूल्य निश्चित करण्याजोगे असेल त्याबाबतीत विषयवस्तूच्या बाजार मूल्याच्या अनुसार आणि ते निश्चित करण्याजोगे नसेल त्याबाबतीत स्तंभ (९) अनुसार असेल.

**टीप** (चार).—(अ) तक्त्याच्या शीर्ष पाच अन्वये आकारावयाची टक्केवारी किंवा पौंडातील वटणावळ २५ रुपयांच्या पटीमध्ये काढण्यात येईल. (म्हणजेच १,००० रुपयापर्यंतच्या विक्रीद्वारे मिळालेल्या प्रत्येक २५ रुपयासाठी किंवा त्याच्या भागासाठी प्रत्येकी ५० पैसे एवढी पौंडातील वटणावळ आणि विक्रीचे उत्पन्न रु. १,००० पेक्षा अधिक असल्यास त्यापासून वसूल झालेल्या २५ रुपये एवढी रक्कम अथवा २५ रु. चा भाग याकरिता २५ पैसे एवढी जादा फी आकारण्यात येईल.)

(ब) एका हुकूमनाम्याच्या पूर्तीसाठी निरनिराळया मालमत्तांची विक्री करण्यात येत असेल त्याबाबतीत विक्रीच्या एकूण उत्पन्नावरून निर्धारित केलेली पौंडामध्ये आकारलेली केवळ एकच फी आकारण्यात येईल. त्यापैकी २ टक्के फी रु. १,००० पर्यंतच्या एकूण विक्रीवर आणि १ टक्का फी रु. १,००० पेक्षा अधिक अशा विक्रीच्या उत्पन्नावर आकारण्यात येईल. (क) (१) खरीददार हा हुकूमनामाधारकाखेरीज इतर व्यक्ती असल्यास त्याबाबतीत टक्केवारी किंवा पौंडातील वटणावळ, न्यायालयाने केलेल्या विक्रीच्या उत्पन्नाची रक्कम देण्याकरिता अर्ज करतेवेळी देण्यात आली पाहिजे आणि (२) हुकूमनामाधारकास खरेदीची परवानगी देण्यात येईल त्याबाबतीत न्यायालयाने किंवा यथास्थिती जिल्हाधिकाऱ्याने केलेली विक्री कायम करतेवेळी टक्केवारी किंवा पौंडातील वटणावळ देण्यात येईल.

पौंडातील वटणावळ प्रथम हुकूमनामाधारकाकडून वसूल करण्यात येईल. हुकूमनामाधारकाला ज्याच्याबाबतीत न्यायालयाने कोणताही विशेष आदेश काढलेला आहे असा खर्च नसलेल्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीच्या संबंधातील इतर सर्व आनुषंगिक खर्चाप्रमाणे न्यायनिर्णित ऋणकोकडून पौंडातील वटणावळ अंतिमरीत्या वसूल करण्याचा हक्क असेल (मुंबई शासन राजपत्र, भाग ४-ए, १९३, पृष्ठ २०८ पहा.)

**टीप** (पाच).—पोच मागवण्याच्या दृष्टीने प्रतिवादी किंवा उत्तरवादी यांच्यावर समन्स किंवा नोटीस डाक नोंदीद्वारे बजावयाची असेल त्याबाबतीत आकारावयाची आदेशिका फी कोणत्याही परिस्थितीत, डाक नोंद किंवा पोस्टाची तिकीटे याकरिता आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा कमी नसेल (पहा मुंबई शासन राजपत्र, १९२३, भाग एक, पृष्ठ ३४१-३४२).

**टीप** (सहा).—न्यायालयाच्या मंजुरीने कोणत्याही पक्षकारास उपलब्ध असेल त्या ठिकाणी रेल्वेने किंवा कोणत्याही सार्वजनिक वाहनाने जाण्याचा आदेशिकावाहाचा खर्च देता येईल आणि अशा प्रकरणात अशा आदेशिकावाहाने अशा रेल्वेने किंवा सार्वजनिक वाहनाने प्रवास करणे हे बंधनकारक असेल.

**टीप** (सात).—ज्यासाठी अर्ज करण्यात आला होता अशा तातडीच्या म्हणून बजावयाच्या आदेशिकांसाठी सर्वसाधारण फीच्या दीडपट फी आकारण्यात येईल.

**टीप** (आठ).—एकाच व्यक्तीवर एकापेक्षा अधिक नात्यांनी, जातीने व अज्ञान बालक किंवा बालके यांचे पालक म्हणून एकाच व्यक्तीवर आदेशिका बजावयाची असल्यास फक्त एकदाच फी आकारण्यात येईल.

**टीप (नऊ).**—मामलेदाराच्या न्यायालयाखेरीज इतर दिवाणी न्यायालयाकडून काढलेली आदेशिका न बजावता परत (न्यायालयाकडे) आल्यास व ती पुन: बजावणे आवश्यक असल्यास, ती अशा प्रकारे पुन्हा बजावण्याच्या प्रत्येक प्रसंगी केवळ अर्धी फी आकारण्यात येईल.

ज्यामुळे आदेशिका बजावण्यास प्रतिबंध झाला असेल अशा कारणांवरून असेल अशा गोष्टीस (उदा. मग अशा रितीने आदेशिका बजावण्यातील कसूर, ज्याच्या वतीने ती बजावण्यात आली त्याच पक्षकाराची असो किंवा नसो) आणि तदनुरूप कागदपत्र नवीन कागदावर पुन: देण्यात आले असतील तर त्यास हा नियम लागू आहे.

**टीप (दहा).**—दिवाणी व्यवहार संहिता आदेश १६, नियम १९ अन्वयेच्या एखाद्या चौकशीमध्ये आदेशिका बजावणे रद्द केले असेल त्याबाबतीत किंवा ज्या दिवशी (न्यायालयात उपस्थित राहण्याकरिता) साक्षीदार इत्यादींना प्रथम बोलावण्यात आले असेल त्या दिवशी न्यायालय न भरल्याचा किंवा प्रकरण हाती न घेतल्याचा किंवा (त्या दिवशी) सुनावणी पूर्ण न झाल्याचा परिणाम म्हणून साक्षीदारांना पुन: बोलावण्यात येईल त्याबाबतीत त्यांना पुन: बोलावण्याबद्दल आणखी कोणतीही फी आकारण्यात येणार नाही.

**टीप (अकरा).**—हुकूमनाम्याची रक्कम भरण्यात कसूर करणाऱ्या आणि ज्याला दिवाणी तुरुंगातर कैदेत ठेवावे असा आदेश देण्यात आला असेल अशा न्यायनिर्णित ऋणकोस अटक करण्याबद्दलचे अधिपत्र अगोदरच काढण्यात आले असेल आणि असे अधिपत्र अंमलात असेल तर त्यास तुरुंगाच्या ताब्यात देण्याच्या आदेशावर आणखी कोणतीही फी आकारणीयोग्य नसेल.

**टीप (बारा).**—न्यायालयाने स्वत: केलेल्या प्रस्तावाद्वारे काढलेल्या कोणत्याही आदेशिकेकरिता कोणतीही फी आकारण्यात येणार नाही.

**टीप (तेरा).**—ऋणकोकडून अर्ज करण्यात आल्याच्या बाबतीत, सन १८२७ चा विनियम क्रमांक ८ च्या कलम १० अन्वयेच्या उद्घोषणेवर आणि प्रांतिक नादारी अधिनियमानुसार काढलेल्या नोटीशींवर कोणतीही फी आकारण्यात येणार नाही.

**टीप (चौदा).**—(अ) विशेष बेलिफाखेरीज एखाद्या बेलिफाची सेवा आदेशिका (सर्वसाधारण किंवा निकडीची) बजावण्यासाठी किंवा तिचे कार्यान्वयन करण्यासाठी तीन दिवसांपेक्षा अधिक कालावधी-साठी आवश्यक असेल तर, ज्या पक्षकाराच्या अर्जावरून आदेशिका काढण्यात आली असेल त्या पक्षकारास आकारणीयोग्य असलेल्या आदेशिका फी खेरीज, तीन दिवसांपेक्षा जेवढा अधिक कालावधी होईल त्या कालावधीतील यामध्ये दिवसाचा भाग म्हणजे संपूर्ण दिवस समजण्यात येईल. अशा बेलिफाचे वेतन व भत्ते (त्यात महागाई भत्ता, स्थानिक पूरक भत्ता, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता व दैनिक भत्ता यांचा समावेश होतो) देण्यास भाग पाडण्यात येईल. अशा प्रकरणातील वेतन व भत्ते, संबंधित बेलिफास त्यावेळी अंमलात असलेल्या नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या दराने देय असलेले मासिक किंवा दैनिक प्रत्यक्ष वेतन व भत्ते यांच्या आधारावर तीन दिवसांपेक्षा अधिक असलेल्या कालावधीकरिता काढण्यात येतील :

परंतु पक्षकार स्वत:ची वाहनव्यवस्था करील त्याबाबतीत त्याच्याकडून कोणताही प्रवास भत्ता वसूल करण्यात येणार नाही.

(ब) ज्या ठिकाणी आदेशिका बजावयाची असेल किंवा कार्यान्वित करावयाची असेल त्या ठिकाणी जाण्याकरिता किंवा तेथून येण्याकरिता आवश्यक असलेली मुदत वरील खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीचा भाग असल्याचे समजण्यात येणार नाही.

(क) वरील खंड (अ) अन्वये पक्षकाराकडून वसूल केलेली रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल.

**टीप (पंधरा).**—या नियमामध्ये समाविष्ट असलेली कोणतीही गोष्ट मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम (सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८) अन्वये चालू असलेल्या कार्यवाह्यांमध्ये काढलेल्या आदेशिकांना लागू असणार नाही. अशा आदेशिकांच्या संबंधात आकारणीयोग्य फी, मुंबई शासन राजपत्र, १९४८ भाग ४-सी यांच्या पृष्ठ ९१४ वर प्रसिद्ध केलेले उच्च न्यायालयाचे परिपत्रक क्रमांक पी-०१२२/४७ दिनांक ९ नोव्हेंबर १९४८ यामध्ये विहित केले आहेत.

टीप.—या विषयाकरिता प्रकरण ७, परिच्छेद ७२ पहा.

उच्च न्यायालयाची अधिसूचना क्रमांक पी-६३२६/५६, दिनांक ३१ मार्च १९५९ अन्वये, पुनर्रचित मुंबई राज्याच्या प्रदेशामध्ये नव्याने जोडलेल्या प्रदेशांना लागू केलेले उपरोक्त नियम अंमलात असल्याचे चालू राहील आणि ते १ ऑगस्ट १९५९ पासून मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ (सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६) याचे कलम ३२ अन्वये तयार करण्यात आल्याचे समजण्यात येईल. परंतु, पुनर्रचित मुंबई राज्याच्या वरील प्रमाणे नव्याने जोडण्यात आलेल्या प्रदेशामध्ये, उच्च न्यायालयाची अधिसूचना क्रमांक पीआर-०७०३/४९ दिनांक १७ ऑक्टोबर १९५८ अन्वये दिलेल्या सवलतीशी सदृश असलेल्या आदेशिका फीच्या प्रदानाच्या बाबतीत अंमलात असलेल्या आणि उच्च न्यायालयाची अधिसूचना क्रमांक पी-६३२६/५६, दिनांक २१ मार्च १९५९ अन्वये चालू ठेवलेल्या सवलतीही अंमलात असण्याचे चालू राहील.

४४०. कोणत्याही न्यायालयामधून आदेशिका काढण्यात येण्यापूर्वी न्यायालयातील योग्य अधिकारी न्यायालय शुल्क म्हणून यावयाची रक्कम काढील आणि ज्या व्यक्तीकडून शुल्क देय आहे त्या व्यक्तीला अशी रक्कम कळवील. समन्स व्यतिरिक्त न्यायालयाची आदेशिका प्रतिवादीवर बजावण्याकरिता आकारावयाचे न्यायालय शुल्क, आदेशिकेकरिता अर्ज केल्यावर किंवा न्यायालयाकडून निश्चित करण्यात येईल अशा मुदतीमध्ये देण्यात येईल. न्यायालयास ही मुदत त्यास योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत वाढवता येईल. न्यायालय शुल्काकरिता मिळालेला मुद्रांक, आदेशिका काढण्यासाठी केलेल्या अर्जावर लावण्यात येईल.

आदेशिका शुल्क मिळाल्यानंतर, परंतु अगोदर नव्हे, आवश्यक ती समन्स, नोटिसा, अधिपत्रे किंवा इतर आदेशिका तयार करण्यात येतील.

न्यायालयाच्या अधिकारितेबाहेर आदेशिका काढावयाची असेल त्याबाबतीत, योग्य शुल्क आकारण्यात आले आहे यासंबंधीची टिप्पणी आदेशिकेवर लिहिण्यात येईल.

४४१. विभाजन हुकुमनाम्याच्या कार्यान्वयनातील विभाजनाच्या अधिपत्रांकरिता पुढीलप्रमाणे आदेशिका शुल्क आकारण्यात येईल :—

दिवाणी नियमपुस्तिकेच्या पृष्ठ १७८ वरील बाब ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या दराने आकारण्यात येईल. मालमत्ता एका गावात किंवा एकापेक्षा अनेक गावामध्ये आहे किंवा नाही ही गोष्ट लक्षात न घेता काढलेली अधिपत्रे किंवा राजादेश यांच्या संख्येच्या अनुसार शुल्क काढण्यात येतील. त्याशिवाय विशिष्ट अधिपत्र किंवा राजादेश यामध्ये निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेमधील हुकूमनामाधारकाच्या हिश्श्याच्या मुल्यावरून काढण्यात येईल, उदाहरणार्थ घरे आणि जमीन यांच्या विभाजनाकरिता दरखास्त दाखल केली असेल आणि जमिनीचे विभाजन करण्याबाबत न्यायालयाने जिल्हाधिकाऱ्यास अधिपत्र पाठवले असेल त्याबाबतीत राजादेशच्या प्रयोजनार्थ, हुकूमनामाधारकाचा सर्व घरामधील ती घरे निरनिराळ्या गावांमध्ये असली तरीही, जो हिस्सा असेल त्या हिश्श्याच्या मुल्यावरून शुल्क काढण्यात येईल. तथापि, निरनिराळ्या गावांमधील निरनिराळ्या घरांच्या संबंधात दोन किंवा अधिक राजादेश काढले असतील तर प्रत्येक राजादेशामध्ये उल्लेख केलेल्या घरांमधील हुकूमनामाधारकाच्या हिश्श्याच्या मुल्यावर प्रत्येक राजादेशाकरिता स्वतंत्रपणे आदेशिका शुल्क काढण्यात येईल. जमिनीच्या बाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास उद्देशून जमिनी निरनिराळ्या गावांमध्ये असल्या तरीही त्यांचे विभाजन करण्याकरिता एकच अधिपत्र पाठवण्यात आले तरीही, या सर्व जमिनीमधील हुकूमनामाधारकांच्या हिश्श्यांच्या मूल्यांवरून शुल्क आकारण्यात येईल.

४४२. स्थावर मालमत्तांच्या जप्तीकरिता, मालमत्ता कोठे आहे ती गोष्ट लक्षात घेऊन व ज्या गावात दवंडी पिटवावयाची त्या गावातील प्रचलित प्रथा विचारात घेऊन दवंडी पिटवण्याकरिता खर्च आकारण्याची परवानगी सर्व न्यायाधिशांना देण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक वेळी दवंडी पिटण्याच्या खर्चाचा दर २५ पैसे ते ५० पैसे यामधील असेल आणि ज्या मालमत्तेसाठी दवंडी पिटायची असेल त्या मालमत्तांची संख्या लक्षात न घेता दवंडी पिटण्याचा खर्च या दराने आकारण्यात येईल. तथापि, मालमत्ता एकाच गावात असूनही एक दुसरीपासून काही अंतरावर असेल त्याबाबतीत आणि म्हणून एकापेक्षा अधिक ठिकाणी दवंडी पिटायची असेल तर प्रत्येक ठिकाणी दवंडी पिटण्याकरिता वरील दराने स्वतंत्रपणे शुल्क आकारण्यात येईल.

४४३. स्थावर मालमत्ता निरनिराळ्या ठिकाणी किंवा गावांमध्ये असेल त्याबाबतीत, जेवढी ठिकाणे किंवा गावे असतील तेवढ्या प्रती काढून केवळ एकच अधिपत्र किंवा विक्रीची उद्घोषणा काढण्यात येईल. अधिपत्राकरिता केवळ एक आदेशिका फी आकारण्यात येईल आणि उद्घोषणेकरिता दुसरी आदेशिका फी आकारण्यात येईल.

४४४. सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जमातीतील लोकांना, आदेशिका फी देण्यामधून सूट देण्यात आली आहे. हा नियम, ७ सप्टेंबर १९६४ हा दिनांक धरून त्या दिवसापासून अंमलात असेल आणि पुढील आदेश मिळेपर्यंत तो अंमलात राहील—

## अनुसूची

१. बुलढाणा, अकोला अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चांदा, औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद, हलार, मध्य सौराष्ट्र, झालवाड, गोहिलवाड, सोरठ व कच्छ या जिल्ह्याखेरीज सबंध राज्यामध्ये,— ..

(१) बर्डा,

(२) बावचा किंवा बामचा,

(३) भील्ल गरासिया, ढोली भिल्ल, डुंगरी भिल्ल, डुंगरी, गरासिया, मेवासी भिल्ल, रावळ भिल्ल, तडवी भिल्ल, भागलिया, भिलाला, पावरा, वसावा व सावे,

(४) चोधरा,

(५) धनका, तडवी, तेतारिया, वळवी यासह,

(६) धोडिया,

(७) दुबळा, तलाविया किंवा हलपाटी यासह,

(८) गामित किंवा गामटा किंवा गाविट, मावची, पडवी, वसावा, वसावे व वळवी यासह,

(९) गोंड किंवा राजगोंड,

(१०) काथोडी किंवा कातकरी, ढोर काथोडी किंवा ढोर कातकरी व सोन काथोडी किंवा सोन कातकरी यासह,

(११) कोकना, कोकनी, कुकना,

(१२) कोळी, ढोर, तोकरे कोळी, कोलचा किंवा कोलधा,

(१३) चोळावाला नायका, कपाडिया नायका, मोटा नायका व नाना नायका यासह नाईकदा किंवा नायक,

(१४) आडवीचिंचर व फासे पारधी यासह पारधी,

(१५) पटेलिया,

(१६) पोमला,

(१७) राठवा,

(१८) वारली,

(१९) विठोलिया, कोटवालिया किंवा बारोडिया,

२. डांग जिल्ह्यात कुणबी, .. .. .. ..

३. सुरत जिल्ह्यामध्ये चौधरी, .. .. .. ..

४. ठाणे जिल्ह्यामध्ये कोळी मल्हार

| | | |
|---|---|---|
| ५. | (अ) अहमदनगर जिल्ह्यामध्ये—अकोला, राहूरी व संगमनेर तालुका.<br>(ब) कुलाबा जिल्ह्यामध्ये—कर्जत खालापूर, अलिबाग, महाड व सुधागड तालुका.<br>(क) नाशिक जिल्ह्यात—नाशिक, निफाड, सिन्नर, चांदोर, बागलाण, इगतपुरी, दिंडोरी, कळवण तालुके व सुरगणा व पेठ महाल.<br>(ड) पुणे जिल्ह्यामध्ये—आंबेगाव, जुन्नर, खेड, मावळ, मुळशी तालुके व वेल्हे महाल.<br>(इ) ठाणे जिल्ह्यात—ठाणे, मुरबाड, भिवंडी, वसई, वाडे, शहापूर, डहाणू, पालघर, उंबरगाव, जव्हार, मोखाडा तालुके. | कोळी, महादेव किंवा डोंगर-कोळी. |
| ६. | (अ) अहमदनगर जिल्ह्यामधील—अकोला, राहूरी व संगमनेर तालुके.<br>(ब) कुलाबा जिल्ह्यामधील—कर्जत, खालापूर, पेण, पनवेल व सुधागड तालुके व माथेरान.<br>(क) नाशिक जिल्ह्यामधील—इगतपुरी, नाशिक व सिन्नर तालुके.<br>(ड) पुणे जिल्ह्यामध्ये—आंबेगाव, जुन्नर, खेड व मावळ तालुके,<br>(इ) ठाणे जिल्ह्यामधील—ठाणे, कल्याण, मुरबाड, भिवंडी, वसई, वाडा, शहापूर, पालघर, जव्हार व मोखाडा तालुके. | ठाकूर किंवा ठाकर, का-ठाकूर, का-ठाकर, मा-ठाकुर व मा-ठाकर यासह. |

**४४५.** दिवाणी व्यवहार संहिता आदेश २१, नियम २ अन्वये हुकूमनामाधारकाच्या प्रमाणपत्रावर त्या प्रमाणपत्रात हुकुमनामाधारकास कमी रक्कम मिळाली आहे किंवा हुकूमनाम्याद्वारे मोठी रक्कम देऊन किंवा हुकूमनाम्याची संपूर्ण रक्कम चुकती करताना अल्पमुल्य असलेली वस्तु मिळाली असे घोषित केलेले असले तरीही, कोणतेही न्यायालय शुल्क आकारण्यात येणार नाही.

**४४६.** या विषयावरील उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय मिळेपर्यन्त दुय्यम न्यायालयांनी त्यांच्या प्रशासनिक क्षमतेमध्ये मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ याचे कलम २० (१३) हे ठेवीच्या रकमांची परतफेड किंवा परतावा यासाठीच्या अर्जांना न्यायालय शुल्कातून मुक्त करणारे कलम आहे असे समजले पाहिजे.

**४४७.** प्रथम सादर केलेल्या कोणत्याही प्रतीवर यथोचितरीत्या मुद्रांक लावण्यात आला असेल आणि ज्या प्रतीचा मुद्रांक रद्द करण्यात आला असेल अशी प्रत, अन्यथा अनुज्ञेय असल्यास, नवीन मुद्रांक न लावता त्या किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीमध्ये वापरता येईल.

**४४८.** न्यायालय शुल्क चिठ्ठ्या आणि ठसवलेले मुद्रांक रद्द करणे व त्यांचा वापर करणे या संबंधीचे विद्यमान विधी व नियम यांचा गोषवारा पुढे देण्यात आला आहे :—

(एक) मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ याचे कलम ४२ हे पुढीलप्रमाणे आहे :—

"या अधिनियमान्वये मुद्रांक आवश्यक असणारा कोणताही दस्तऐवज त्यावरील मुद्रांक रद्द करण्यात येईपर्यंत कोणत्याही न्यायालयात किंवा कार्यालयात दाखल करता कामा नये किंवा कोणत्याही कामकाजात त्यावर कृति करता कामा नये. न्यायालय किंवा कार्यालय प्रमुख वेळोवेळी नेमील अशा अधिकाऱ्याने असा कोणताही दस्तऐवज मिळाल्यावर मुद्रांकावर लिहिलेल्या रकमेस

" कोणताही धक्का न लागता तो राहील अशा रितीने आकृतिचा शिरोभाग, छिद्र पाडून असा (मुद्रांक) तात्काळ रद्द केला पाहिजे आणि छिद्र पाडल्यामुळे निघालेला भाग जाळून टाकण्यात किंवा नष्ट करण्यात आला पाहिजे."

(दोन) न्यायालय शुल्क दर्शविणारे मुद्रांक न्यायालय शुल्क अधिनियमाचे कलम ४२ अन्वय अन्यथा आवश्यक असेल त्याखेरीज नष्ट करण्याची किंवा त्यांना छिद्र पाडण्याची आवश्यकता नाही.

(तीन) प्रती प्रमाणपत्रे व शुल्क देण्यास पात्र असतील असे दस्तऐवज देणाऱ्या न्यायालयाने किंव कार्यालयाने त्या कागदपत्रांना लावलेल्या चिठ्ठया त्या चिठ्ठ्यांवरील संख्येचा शिरोभाग किंवा त्याचे मूल्य ज्यावर ठसवले असेल असा त्या चिठ्ठीचा भाग या दोहोंपैकी एकही गोष्ट काढली जाणार नाही अशा प्रकारे चिठ्ठ्यांना छिद्र पाडून रद्द करणे आवश्यक आहे. ज्यादा खबरदारी म्हणून दस्तऐवज साक्षांकित करणाऱ्या अधिकाऱ्याची दिनांकित स्वाक्षरी, चिठ्ठीवर आणि कागदावर एका बाजूला मुद्रांकित पावत्यांवर सही करणाऱ्या व्यक्ती ज्याप्रमाणे नेहेमी आडव्या लिहितात त्याप्रमाणे आडवी लिहिण्यात यावी.

(चार) प्रकरण २४ च्या परिच्छेद ४७६ अनुसार आवश्यक असल्याप्रमाण दुय्यम न्यायालयाकडून जिल्हा न्यायालयाकडे अभिलेख पाठवण्यापूर्वी त्यावरील कोणत्याही मुद्रांकास छिद्र पाडावयाचे राहिले नाही या संबंधी खात्री करून घेण्यासाठी अभिलेखांची तपासणी करण्यात येईल. प्रत्येक प्रकरणातील रोजनाम्याच्या अखेरीस सर्व न्यायालय शुल्क मुद्रांकाना छिद्रे पाडली आहेत अशा प्रकारची टिप्पणी दाव्याच्या किंवा दरखास्तीच्या शिरस्तेदाराकडून करण्यात येईल. त्याचप्रमाणे जिल्हा न्यायालया-मध्ये रोजनामा पूर्ण करणारा लिपिक मुद्रांकांना छिद्रे पाडली आहेत की नाहीत याची तपासणी करील व तशा प्रकारे टिप्पणी तयार करील. जिल्हा न्यायालयाचा अभिलेखपाल, त्याला मिळालेल्या प्रत्येक दहा प्रकरणांपैकी एका प्रकरणाची तपासणी करील आणि तपासणी केलेल्या प्रकरणांच्या रोजनाम्या-मध्ये व सर्वसाधारण अभिलेख नोंदवहीमध्ये विशिष्ट प्रकरणामधील मुद्रांकांना त्याने छिद्रे पाडली आहेत असे पृष्ठांकन करील.

प्रत्येक तीन महिन्यांच्या अखेरीस जिल्हा न्यायालयाच्या न्यायालय अधीक्षक, अभिलेखपालाकडे आलेल्या प्रकरणांचे चाचणी निरीक्षण करील.

(पाच) (अ) न्यायालय शुल्क अधिनियमान्वये आकारावयाचे शुल्क रु. २५ पेक्षा कमी असेल त्याबाबतीत, खालील खंड (ड) मध्ये अंतर्भूत असलेल्या निदेशास अधीन राहून केवळ चिकटणाऱ्या मुद्रांकावर दर्शविण्यात येईल. अशा प्रकारचे चिकट मुद्रांक, एकतर ज्यावर "न्यायालय शुल्क" असे शब्द असतील असे सध्या वापरात असलेले मुद्रांक असतील किंवा सध्या वापरात असलेल्या चिकट मुद्रांक निष्प्रभावित करून किंवा त्याशिवाय काढण्यात येतील असे इतर कोणत्याही आकाराचे किंवा पद्धतीचे "न्यायालय शुल्क" असे शब्द असलेले मुद्रांक असतील.

(ब) उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेले शुल्क रु. २५ एवढे किंवा त्याहून अधिक असेल त्याबाबतीत असे शुल्क रु. २५ पेक्षा कमी असलेल्या भागाएवढया रकमेकरिता वापरण्यात येत असलेल्या केवळ "न्यायालय शुल्क" असे शब्द असलेला मुद्रांक चिकटवून दर्शविण्यात येईल.

(क) तथापि, रु. १०, रु. १५ व रु. २० एवढया मुल्याचे न्यायालय शुल्क मुद्रांक लावलेले कागदपत्र उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेले शुल्क दर्शविण्याकरिता, अशा प्रकारच्या कागदपत्रांचा वापर, उक्त अधिनियमाचे कलम ३९ (ब) अन्वये याबाबत अधिसूचना काढून अशा, वापरास प्रतिबंध करण्यात येईल तोपर्यन्त करता येईल.

(सहा) (अ) रु. २५ पेक्षा कमी असलेले शुल्क, आवश्यक मुल्याएवढा चिकट मुद्रांक लावून देण्यात येईल. परंतु आवश्यक मल्यांचा एक चिकट मुद्रांक उपलब्ध नसल्यास शुल्काची अचूक रक्कम देता यावी म्हणून उपलब्ध असलेल्या त्यानंतरच्या कमी मुल्याच्या मुद्रांकाचा वापर करण्यात येईल आणि आवश्यक असेल त्यानुसार त्यानंतरच्या कमी मुल्याच्या एका किंवा अधिक चिकट मुद्रांकाचा वापर करून निश्चित मुल्यातील तूट भरून काढण्यात येईल.

(ब) रु. २५ किंवा त्याहून अधिक असलेले शुल्क आवश्यक मूल्य असलेला मुद्रांक चिकटवून देण्यात येईल. परंतु असा मुद्रांक उपलब्ध नसेल तर शुल्काची अचूक रक्कम देता यावी म्हणून उपलब्ध असलेल्या त्यानंतरच्या कमी मूल्याच्या उमटवलेल्या ज्यादा मुद्रांकाचा वापर करण्यात येईल आणि आवश्यक असेल त्या नुसार रु. २५ पेक्षा कमी असलेल्या रकमेचा भाग होईल अशा त्यानंतरच्या कमी मुल्याच्या एका किंवा अधिक चिकट-मुद्रांकाचा वापर करून मुल्याची तूट भरून काढण्यात येईल.

(क) नियम (सहा) (ब) अन्वये वापरलेला चिकट मुद्रांक, उच्चतम मुल्याच्या उमटवलेल्या मुद्रांकावर चिकटवण्यात येईल.

(ड) यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत केलेली असली तरीही रु. १०, रु. १५ व रु. २०ए वढ्या मुल्याचे न्यायालय शुल्क मुद्रांक लावलेले कागदपत्र, उक्त अधिनियमान्वये आकारणीयोग्य असलेले शुल्क दर्शविण्याकरिता अशा प्रकारच्या कागदपत्रांचा वापर, उक्त अधिनियमाचे कलम ३९ (ब) अन्वये याबाबत अधिसूचना काढून अशा वापरास प्रतिबंध करण्यात येईल तोपर्यंन्त करता येईल.

(सात) न्यायालय शुल्क अधिनियमान्वय आकारणीयोग्य न्यायालय शुल्काचा रकमेएवढया रकमेचे एक किंवा अधिक उमटवलेले मुद्रांक वारण्यात येतील त्याबाबतीत सर्वसाधारपणे प्रत्येक मुद्रांकित कागदावर विषयाचा एक भाग नमूद करण्यात येईल. हे व्यवहार्य नसल्यास किंवा गैरसोयीचे असल्यास उच्चतम मूल्य असलेल्या, उमटवलेले मुद्रांक असलेल्या एका किंवा अधिक कागदावर दस्तऐवज लिहिण्यात येतील आणि उरलेल्या मुद्रांकास न्यायालयाकडून छिद्रे पाडण्यात येतील व संपूर्ण न्यायालय शुल्क मुद्रांकांच्या स्वरुपात देण्यात आले आहे हे दर्शविण्याकरिता दस्तऐवजाच्या पहिल्या पानावर प्रमाणपत्र लावून अभिलेखामध्ये फाईल करण्यात येतील. मुद्रांकित केलेल्या प्रत्येक कागदावरील लिखाण दस्तऐवजाचे कार्यान्वयन करणाऱ्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून सही करून साक्षांकित करण्यात येईल.

(आठ) भविष्यकाळात मुद्रांक (कागदपत्र) ज्या दिवशी सादर करण्यात येतील त्या दिवशी किंवा ते सादर करण्यात आल्यानंतर योग्य त्या कालावधीत परंतु दस्तऐवज फाईल करण्यापूर्वी किंवा त्यांची नोंद करण्यापूर्वी किंवा अन्यथा त्यावर कार्यवाहीकरण्यापूर्वी त्याचवेळी रद्द करण्यात येतील.

४४९. (एक) मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम, १८६९ अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा न्यायालयाकडून किंवा दुय्यम न्यायालयाकडून किंवा यथास्थिती प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ अन्वये स्थापन केलेल्या लघुवाद न्यायालयाकडून निकालात काढलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये विर्निर्दिष्ट केलेल्या परिस्थितीत, दावा दाखल करण्यासंबंधीच्या फीसमोर विर्निर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मधील फीचा भाग, असे न्यायालय प्रमाणपत्र देऊन प्रतिवादीस परत करील.

**अनुसूची**

| स्तंभ १ | स्तंभ २ |
|---|---|
| १. ज्या दाव्यातील मागणीची रक्कम मान्य करण्यात आली आहे परंतु ज्यात केवळ मुदत किंवा रक्कम हप्त्यांनी भरण्याची मागणी करण्यात आली आहे असा दावा. | दोन-तृतीयांश |
| २. दाव्याची तडजोड होण्यापूर्वी किंवा कोणत्याही पुराव्याची नोंद करण्यापूर्वी खटला न चालवल्याने वादीकडून फेटाळण्यात आलेला दावा. | दोन-तृतीयांश |
| ३. न्यायालयाबाहेर तडजोड झालेला म्हणून वादीकडून (तडजोड होण्यापूर्वी किंवा कोणत्याही पुराव्याची नोंद करण्यापूर्वी) बिनशर्त काढून घेतलेला दावा. | दोन-तृतीयांश |

अनुसूची---चालू

| स्तंभ १ | स्तंभ |
|---|---|
| ४. दाव्यावरून कार्यवाही करण्याचे कोणतेही कारण स्पष्ट होत नसल्याने किंवा मुदतीबाबत विधीअन्वये त्यास मुदत मर्यादारोधित होत असल्याच्या कारणास्तव प्रतिवादीला समन्स न पाठवता ज्यातील वादविषय फेटाळण्यात आला असेल असा दावा. | तीन-चतुर्थांश. |
| ५. दाव्याची तडजोड होण्यापूर्वी किंवा कोणत्याही पुराव्याची नोंद करण्यापूर्वी ज्यावर दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ च्या पहिल्या अनुसूचीचा आदेश १२, नियम ६ अन्वये कबुलीच्या आधारावर न्यायनिर्णय दिला असा दावा. | स्वीकृत दावा दाखल करण्यासंबंधीच्या फीच्या रक्कमेच्या दोन-तृतीयांश रक्कम. |

(शासकीय आदेश, गृह विभाग क्रमांक सीएफए.-१०५६-तीन, दिनांक १ ऑगस्ट १९५९ पहा.)

(दोन) न्यायालयाने सोबत जोडलेल्या अनुसूचीचा स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परिस्थितीत निकालात काढलेले अपील किंवा विरुद्ध हरकत घेणारा अर्ज यामध्ये उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट केलेला दावा दाखल करण्यासंबंधीच्या फीचा भाग न्यायालयाकडून अपीलदारास परत करण्यात येईल. परंतु अपीलदाराने दिलेली फी रुपये ५ पेक्षा अधिक असली पाहिजे. किंवा ज्या तारखेस अपील किंवा विरुद्ध हरकत घेणारा अर्ज मागे घेण्यात आला असेल किंवा खटला भरला नसेल, त्या तारखेपासून एक वर्षाच्या आत रक्कम परत घेण्यासंबंधीची मागणी करण्यात आली पाहिजे.

अनुसूची

| स्तंभ १ | स्तंभ २ |
|---|---|
| १. नोंद करण्यापूर्वी किंवा नोंद नाकारण्यापूर्वी मागे घेतलेले किंवा खटला न चालवलेले अपील. | दावा दाखल करण्यासंबंधीची संपूर्ण फी |
| २. नोंद केल्यानंतर मृत पक्षकाराच्या वैध प्रतिनिधीला (दस्तऐवज) पाहण्याचा हक्क राहत नसल्यामुळे नोंदणी केल्यानंतर समाप्त होणारे अपील. | अपीलाच्या ज्ञापनावर दिलेल्या दाखल करण्यासंबंधीच्या फीच्या रक्कमेच्या दोन-तृतीयांश रक्कम. |
| ३. स्वीकृतीकरिता न्यायालयासमोर ठेवल्यानंतर मागे घेतलेले किंवा खटला न चालवलेले अपील. | अपीलाच्या ज्ञापनावर दिलेल्या दाखल करण्यासंबंधीच्या फीच्या रक्कमेच्या निम्मी रक्कम. |
| ४. निर्णयात्मक सुनावणी होण्यापूर्वी, अपीलाची नोंद केलेली असली तरीही, मागे घेण्यात आलेले किंवा खटला न चालवलेले अपील. | अपीलाच्या ज्ञापनावर दिलेल्या दाखल करण्यासंबंधीच्या फीच्या रक्कमेच्या निम्मी रक्कम. |
| ५. ज्या अपीलामध्ये विरुद्ध हरकतीचा अर्ज फाईल करण्यात आला अशा अपीलावरील निर्णयात्मक सुनावणी होण्यापूर्वी मागे घेतलेला किंवा खटला न चालवलेला विरुद्ध हरकतीचा अर्ज. | विरुद्ध हरकतीच्या ज्ञापनावर दिलेल्या दाखल करण्यासंबंधीच्या फीच्या निम्मी फी. |

(शासकीय आदेश, गृह विभाग क्रमांक सीएफए-१०५६-५८८३९-तीन, दिनांक २९ एप्रिल १९६० पहा.)

**४५०.** न्यायालय शुल्क परत देण्याकरिता असणाऱ्या प्रमाणपत्राचा नमुना पुढील पानावर देण्यात आला आहे.

## न्यायालय शुल्क परत करण्यासंबंधीचे प्रमाणपत्र

क्रमांक .............१९ .

मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९/ मुंबई शहर दिवाणी न्यायालये अधिनियम, १९४८ यांचे कलम ............अन्वये व

(अ) शासकीय आदेश गृहविभाग, क्रमांक सीएफए-१०५६-तीन, दिनांक १ ऑगस्ट १९५९.

(ब) शासकीय अधिसूचना गृहविभाग क्रमांक ५८२८/५, दिनांक १४ ऑगस्ट १९४८.

(क) शासकीय आदेश गृहविभाग क्रमांक सीएफए-१०५६/५८८३९-तीन, दिनांक २९ एप्रिल १९६०. .......................... यांस, जो रक्कम परत करण्यासंबंधी आदेश देण्यात आले ती रक्कम.

किंवा सन १९.....चा अपील /अर्ज क्रमांक ..........हा...... यांचा अर्ज/ अपीलाचे ज्ञापन/विरुद्ध हरकत यामधील वादपत्र/ प्रतिदावा याच्यासंबंधांत नियम .....किंवा सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५७ अन्वये केलेले नियम, याअन्वये

रुपये.............(अक्षरी)

रुपये ..............पैसे ....

दिनांक........... १९ ......

.................यांनी

दिनांक ......... रोजी तयार केले

................यांनी

दिनांक ........ रोजी तपासले.

न्यायाधीश/प्रबंधक

क्रमांक ...........१९.....

प्रमाणीत करण्यात येते की,/मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम १९५९/मुंबई शहर दिवाणी न्यायालये अधिनियम, १९४८ याचे कलम .....अन्वये व

(अ) शासकीय आदेश गृहविभाग क्रमांक सीएफए-१०५६-तीन, दिनांक १ ऑगस्ट १९५९.

(ब) शासकीय अधिसूचना गृहविभाग क्रमांक ५८२८/५, दिनांक १४ ऑगस्ट १९४८.

(क) शासकीय आदेश, गृहविभाग क्रमांक सीएफए-१०५६-५८८३९--तीन, दिनांक २९ एप्रिल १९६०/अनुसार पुढील रक्कमा मिळण्यास पात्र आहे/आहेत.

किंवा.............च्या जिल्हाधिकाऱ्यां-कडून रु.......पै. ..... (आकड्यात) रु. .......... (अक्षरी).... पैसे .... (नियम...... अन्वये किंवा/सन १९४७ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ५७ अन्वये केलेल्या नियमान्वये परत मिळावयाचे आहेत. मुंबई येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालयाचे/ जिल्हा न्यायाधीश/दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ/कनिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयातील सन १९....चा दावा /अपील/अर्ज क्रमांक........ मधील वादपत्र/प्रतिदावा/अर्ज/अपीलाचे/ ज्ञापन / विरुद्ध हरकत यावरील मुद्रांकाची रक्कम रु. ......पै.. (आकड्यात) रुपये...... पै.......... (अक्षरी) असून, न्यायालयाने दावा इत्यादि दाखल करण्याची फी म्हणून रु.......पै. ... परत करण्याबाबत आदेश दिला आहे.

दिनांक ........ १९.. ......

न्यायाधीश/प्रबंधक

४५१. एखाद्या पक्षकारास किंवा त्याच्या विधि व्यवसायीस, ६५ पैशांचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावलेला लेखी अर्ज न्यायालयास करून, निकालात काढलेल्या प्रकरणातील अभिलेख किंवा कार्यवाही यासंबंधी शोध घेता येईल अशा अर्जावरील शोधासंबंधीचे आदेश न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्या-कडून काढण्यात येईल.

## परीशिष्ट ३५

[कलम २३१ खालील टीप १० (दोन) पहा.]

### साक्षीदारांना भत्ते

(दिवाणी नियम पुस्तिका, खंड १, प्रकरण ७ मधील नियमांतील उतारा.)

६२. परिशिष्ट 'ह' चा नमुना क्रमांक ६ यामध्ये, न्यायालयाची अधिकारिता सोडून जाणाऱ्या साक्षीदारांची तपासणी करणे इष्ट वाटत असल्यास द्यावयाच्या नोटीशीचा नमुना आहे.

### साक्षीदारांनी द्यावयाच्या आहारभत्यासंबंधीचे नियम

६३. (१) आदेश ४८ चा नियम १ यामध्ये अशी तरतूद केली आहे की, न्यायालय अन्यथा निदेश देईल त्याखेरीज आदेशिका ज्यांच्या वतीने काढण्यात येतील त्या पक्षकारांच्या खर्चाने बजावण्यात येतील आणि आकारणीयोग्य न्यायालयशुल्क, न्यायालयाकडून निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत देण्यात येईल. आदेशिका फीच्या संबंधातील नियमांकरिता प्रकरण २२ पहा.

(२) आहार भत्ता देण्याच्या प्रयोजनार्थ साक्षीदारांची पुढील वर्गामध्ये विभागणी केली आहे :—

**वर्ग १.**—प्रतिष्ठित व्यक्ती, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, मोठे जमीनदार, मोठ्या उद्योगधंद्याचे मालक, व्यवसाय संघटनांमधील वरच्या दर्जाचे कर्मचारी, महानगरपालिकेतील, स्थानिक संस्थामधील व ज्यांना खाजगीरीत्या न्यायालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे असे वर्ग १ चे सरकारी अधिकारी.

**वर्ग २.**—स्थानिक संस्थाचे सदस्य, सर्वसाधारण व्यवसायी व व्यापारी, लहान शेतकऱ्यांखेरीज इतर जमीनदार, व्यवसाय संघटनामधील कनिष्ठ कर्मचारी, महानगरपालिकेमधील व स्थानिक संस्थांमधील त्याच दर्जाचे कर्मचारी आणि ज्यांना खाजगीरीत्या न्यायालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे असे वर्ग २ चे सरकारी अधिकारी.

**वर्ग ३.**—कारागीर, लिपिक, लहान जमीनमालक, ग्राम अधिकारी व महानगरपालिकांमधील, स्थानिक संस्थामधील व व्यवसाय संघटनांमधील निम्न श्रेणीतील अधिकारी आणि ज्यांनी खाजगीरीत्या कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे असे वर्ग ३ चे सरकारी अधिकारी.

**वर्ग ४.**—मजूर, लहान दुकानदार, फेरीवाले व वरील वर्गाव्यतिरिक्त इतर वर्गातील अधिकारी व ज्यांनी खाजगीरीत्या न्यायालयांत उपस्थित राहणे आवश्यक असेल असे वर्ग ४ चे सरकारी कर्मचारी.

(३) निरनिराळ्या वर्गाकरिता पुढीलप्रमाणे आहारभत्ता देण्यात येईल :—

| | रुपये |
|---|---|
| वर्ग १ .. .. .. .. | ५ |
| वर्ग २ .. .. .. .. | ३ |
| वर्ग ३ .. .. .. .. | २ |
| वर्ग ४ .. .. .. .. | १ |

(४) विशेष प्रकरणांमध्ये व एखाद्या व्यक्तींची तज्ञ म्हणून तपासणी करण्यात येत असेल त्याबाबतीत न्यायालयास, साक्षीदारास देणे रास्त वाटेल अशा रकमेची मागणी करता येईल. मोठ्या रकमा देण्यासंबंधीने आदेशांची कारणे न्यायालयाकडून नमूद करण्यात आली पाहिजेत.

(५) आहारभत्ता हा केवळ प्रत्यक्ष उपस्थितीच्या कालावधीकरिता नव्हे तर न्यायालयात येण्यासाठी व जाण्यासाठी व्यतीत केलेल्या कालावधीकरिताही देण्यात येईल. यावेळी उपलब्ध असलेली सर्वसाधारण वाहन व्यवस्था विचारात घेतली जाईल. जेव्हा प्रवास पायी करण्यात येईल तेव्हां दर दिवसाचा १५ मैलाचा प्रवास हा दिवसाचा प्रवास समजण्यात येईल आणि त्यानुसार निर्वाह भत्ता देण्यात येईल.

(६) न्यायालयाकडून प्रवासाचे अंतर आणि साक्षीदाराची परिस्थिती विचारात घेऊन, असा खर्च त्यास योग्य वाटेल अशा सर्व प्रकरणात खाली विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार प्रवासखर्च देण्यात येईल :—

(एक) प्रवास रस्त्याने करावयाचा असेल त्याबाबतीत प्रत्यक्ष खर्च तो वाजवी असेल तर देण्यात येतो

(दोन) प्रवास पूर्णतः किंवा अंशतः रेल्वेने किंवा आगबोटीने असेल त्याबाबतीत पुढीलप्रमाणे प्रवासभत्ता देण्यात येतो :—

(अ) वर्ग १ चे साक्षीदार : पहिल्या वर्गाचे भाडे.

(ब) वर्ग २ चे व ३ चे साक्षीदार : दुसऱ्या वर्गाचे भाडे.

(क) वर्ग ४ चे साक्षीदार : तिसऱ्या वर्गाचे भाडे.

(७) वरील नियमात तरतूद केलेल्या विशिष्ट प्रकरणामध्ये त्यातील गुणांच्या अनुसार, ज्या न्यायालयाकडे निर्वाह भत्त्याची किंवा प्रवासभत्याची मागणी केली असेल अशा न्यायालयाच्या स्वेच्छनिर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(८) अटक करण्याबाबतचे अधिनियम काढून उपस्थित केलेल्या साक्षीदारांना न्यायनिर्णित ऋणकोस ज्या दराने निर्वाह भत्ता अनुज्ञेय असेल त्याच दराने निर्वाहभत्ता मिळेल.

(९) शासन एखाद्या प्रकरणात पक्षकार म्हणून, त्याच्या कर्मचाऱ्यांपैकी एका कर्मचाऱ्यास न्यायालयात साक्षीदार म्हणून बोलाविल त्याबाबतीत साक्षीदाराचा आहारभत्ता व प्रवासभत्ता म्हणून न्यायालयामध्ये कोणतीही रक्कम ठेवण्याची आवश्यकता नाही. कोणत्याही बाबतीत एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यास साक्षीदार म्हणून बोलाविण्याकरिता पक्षकाराने ठेवलेली रक्कम अधिपत्राच्या बरोबर पाठवण्यात येणार नाही.

### सनदी लेखापालाची फी

६४. (१) न्यायालयामध्ये घालवलेल्या एका दिवसाकरिता किंवा साक्षीदार म्हणून न्यायालयात उपस्थित राहण्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या प्रवासात सनदी लेखापालास किंवा त्यांच्या अर्हताप्राप्त सहाय्यकास द्यावयाची फी त्याच्या व्यवसाय कालावधीनुसार सोबत जोडलेल्या अनुसूचीच्या कलम २ किंवा यथास्थिती कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वर्षाकरिता देण्यात येईल :—

### अनुसूची

| व्यवसाय कालावधी (१) | सनदी लेखापाल (२) | अर्हताप्राप्त सहाय्यक (३) |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| ५ वर्षे किंवा त्याहून कमी .. .. .. .. | ७५ | १० |
| ५ वर्षापेक्षा अधिक परंतु १० वर्षापेक्षा कमी .. .. .. | १०० | २० |
| १० वर्षापेक्षा अधिक परंतु १५ वर्षापेक्षा कमी .. .. | १२५ | २५ |
| १५ वर्षापेक्षा अधिक .. .. .. .. | १५० | ३० |

टीप.—"तज्ञाचा पुरावा" यामध्ये, लेखापरीक्षा किंवा अन्वेषण केल्याच्या कारणावरून लेखापालास बोलावल्यानंतर त्याने दिलेला पुरावा असा अर्थ समाविष्ट आहे.

(२) सनदी लेखापाल किंवा त्याचा अर्हताप्राप्त सहाय्यक यांना सर्वसाधारणपणे त्यांचा पुरावा अत्यंत आवश्यक असेल त्याखेरीज बोलावण्यात येणार नाही. साक्षीदार म्हणून न्यायालयात त्यांची आवश्यकता असेल तेव्हा, ज्या दिवशी त्यांच्या पुराव्याची नोंद घेण्याची शक्यता नसेल त्या दिवशी त्यांना शक्यतोवर बोलावण्यात येऊ नये.

## सरकारी अधिकाऱ्याचा खर्च

६५. ज्या सरकारी अधिकाऱ्याचा पगार दरमहा रुपये ३५ पेक्षा अधिक नसेल असा अधिकारी मुंबई नागरी सेवा नियम किंवा इतर तत्सम नियम या अन्वये प्रवासभत्ता मिळण्यास पात्र असो वा नसो, त्यास शासकीय पदाच्या नात्याने न्यायालयात पुरावा देण्यास किंवा एखादा दस्तऐवज सादर करण्यास बोलावण्यात आले असेल त्याबाबतीत त्यास, परिच्छेद ६३ मधील नियमाद्वारे विहित केलेल्या प्रमाणानुसार प्रवासखर्च देण्यात येईल.

ज्या सरकारी अधिकाऱ्याचा पगार रुपये ३५ पेक्षा अधिक असेल परंतु ज्या न्यायालयात साक्ष देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास त्यास बोलावण्यात आले असेल ते न्यायालय, त्याच्या मुख्यान्यायापासून पाच मैलापेक्षा अधिक दूर असलेल्या ठिकाणी असल्याच्या कारणास्तव तो मुंबई नागरी सेवा नियम किंवा इतर तत्सम नियमानुसार कोणताही प्रवासभत्ता मिळण्यास पात्र नसेल तर त्यास उक्त प्रवासभत्ता देण्यात येईल.

अशा अधिकाऱ्यास निर्वाहभत्ता म्हणून द्यावयाची कोणतीही रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल.

६६. आदेश १६, नियम २ अन्वये सरकारी अधिकाऱ्यास त्याच्या सरकारी पदाच्या नात्याने साक्षीदार म्हणून बोलावण्याकरिता खाजगी पक्षकाराने ठेवावयाची "खर्चाची रक्कम" म्हणजे, असा अधिकारी मुंबई नागरी सेवा नियम किंवा इतर तत्सम नियम याअन्वये प्रवासभत्यास पात्र असेल त्याबाबतीत योग्य नियमान्वये अनुज्ञेय असलेले प्रवासभत्ते व मुक्काम भत्ते, परंतु त्यात निर्वाह भत्याची रक्कम समाविष्ट नाही. पक्षकाराने अनामत ठेवलेली रक्कम शासनाकडे जमा करण्यात येईल.

६७. परिच्छेद ६५ अन्वये किंवा आदेश सोळा, नियम ३-ए अन्वये तरतूद केल्याप्रमाणे ज्यास प्रवासखर्च देण्यात आला नाही आणि मुंबई नागरी सेवा नियम किंवा इतर तत्सम नियम याअन्वये, प्रवासभत्ते मिळण्यास जो पात्र असेल असा सरकारी अधिकारी दिवाणी व्यवहार संहिता आदेश सोळा, नियम ३ च्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनार्थ सरकारी क्षमतेमध्ये तो न्यायालयात उपस्थित राहीला अशा अर्थाचे प्रमाणपत्र न्यायालयाकडून मिळविल. या प्रमाणपत्राचे तो न्यायालयात ज्या दिवशी उपस्थित होता त्या दिवसाची तारीख ज्या मुदतीकरिता त्यास थांबवून ठेवण्यात आले होते ती मुदत व न्यायालयाकडून त्यास कोणतीही रक्कम मिळाली नाही हे नमूद करण्यात येईल.

६८. ज्या मुदतीत साक्षीदाराला खर्च घ्यावयाचा असेल ती मुदत, आदेश सोळा नियम २ अन्वये निश्चित करावयाची आहे. अशी मुदत सामान्य आदेशाद्वारे निश्चित करता येईल. परंतु अशा सामान्य आदेशामध्ये न्यायालयास विशिष्ट प्रकरणी फेरफार करता येईल. सामान्य आदेश लेखी असेल व त्याची प्रत न्यायालयाच्या सूचना फलकावर किंवा न्यायालयातील ठळक जागी लावण्यात येईल.

६९. त्यांच्या ठेवीकरिता निश्चित केलेल्या मुदतीनंतर केलेला खर्च, न्यायाधीशाने चांगल्या कारणाकरिता, विलंब माफ केल्याखेरीज स्वीकारता नये.

७०. आदेश सोळा, नियम ४, पोट-नियम (२) च्या उपबंधान्वये साक्षीदारांना देय असलेला निर्वाह भत्ता शक्य तो दर दिवशी द्यावा.

७१. न्यायालयाकडून कोणतीही आदेशिका बजावण्यात आल्याखेरीजही पक्षकारानी त्यांच्या साक्षीदारांची हजेरी उपलब्ध केल्यास, न्यायालय त्यांना उत्तेजनच देईल. तथापि, अशा साक्षीदारांची नावे व पत्ते सर्व पक्षकारांना, ते साक्षीदार न्यायालयात तपासणीकरिता उपस्थित राहण्यापूर्वी उघड करण्यात येतील.

७२. पक्षकारांनी, न्यायालयाच्या नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार बजावणीकरीता रास्त संधी देण्याकरिता समन्से वेळेवर मिळावीत म्हणून वाजवीरीत्या कार्यसक्त रहाणे, आवश्यक आहे.

जरी आदेश सोळाच्या नियम १ व ९ अन्वये पक्षकाराने समन्साचे पैसे भरल्यावर त्यास दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही अवस्थेत समन्से मिळविण्याचा हक्क असला व त्यांची तपासणी करण्याकरिता न्यायालयाच्या बाजूने प्रत्येक वाजवी प्रयत्न करण्याचाही त्याला हक्क असला तरी न्यायालयाच्या योग्य व

पुराव्यासंबंधित कामकाजात व्यत्यय आणण्याचा त्यांना कोणताही हक्क नाही. जर अशा अवस्थेत किंवा नागरी ठिकाणात, जेथे समन्स बजावयाचे असेल त्या जागेच्या जवळपास कोणताही वैद्यक जाण्याची शक्यता नसेल तर पक्षकार विशेष वैद्यकीयांना रक्कम देईल किंवा त्याची जागा घेईल. जर त्याने नंतरची पद्धत स्वीकारली व जर समन्साची बजावणी वेळेवर झाली नाही तर ती बजावता यावी याकरिता तहकुबीच्या हक्कास तो पात्र ठरणार नाही.

७३. ज्याची कामावरील अनुपस्थिती लोकसेवेला बाधक ठरेल अशा कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला साक्ष देण्यासाठी सामान्यत: समन्स देऊ नये आणि जर समन्स दिले तर दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश अठरा, नियम १६ अन्वये त्याची तपासणी तात्काळ करण्यात यावी. सामान्यत: आदेश सव्वीस, नियम ४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे अशा अधिकाऱ्याची तपासणी करण्याकरिता आयोगपत्र काढावे. समन्स आवश्यक असेल तर ते तो अधिकारी ज्या कार्यालयात असेल त्या कार्यालयाच्या कार्यालय प्रमुखामार्फत ते पाठवावे.

७४. न्यायालयामध्ये साक्षीदार म्हणून साक्ष देण्याकरिता समन्स दिलेल्या डॉक्टरांना शक्यतो प्रतीक्षा करीत थांबवून ठेवू नये. त्यांची साक्ष अभिलीखीत करावी व त्यांना शक्यतो लवकर मुक्त करावे.

७५. जेव्हा प्रकरणाची सुनावणी नंतरच्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्यात येते आणि पक्षकाराला, साक्षीदाराला त्या दिवशी न्यायालयात पुन्हा उपस्थित ठेवण्याची आवश्यकता असते, तेव्हा असा साक्षीदार समन्स देवून बोलावलेला असो किंवा साक्ष देण्याकरिता पक्षकाराकडून बोलावलेला असो, न्यायालय सोडण्यापूर्वी त्याला पक्षकाराच्या प्रस्तावावरून खंड दोनच्या पृष्ठ ५१४, नमुना क्रमांक १ मधील, पुन्हा उपस्थित राहण्याचा आदेश द्यावा. परंतु पक्षकाराने पुन्हा उपस्थित राहण्याकरिता इतर खर्च व प्रवासभत्ता तात्काळ दिला पाहिजे.

७६. ज्याला बोलावले आहे व ज्याला पुन्हा उपस्थित राहण्याबाबत आदेश देण्यात आला आहे अशा साक्षीदाराला आदेश सोळाच्या नियम १६ (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जामीन देण्यास भाग पाडण्यात आले पाहिजे.

७७. जिल्हा न्यायाधीश व दिवाणी न्यायाधीश यांना साक्षीदारांना द्यावयाच्या निर्वाह भत्याचे प्रदान भारत सरकारच्या निर्णय क्रमांक ३०२५, दिनांक ३१ डिसेंबर १८७८ अन्वये प्राधिकृत केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी व मामलेदार यांच्याकडून त्या प्रयोजनासाठी अग्रीम मिळण्याऐवजी त्यांच्या स्वत:च्या स्थायी अग्रिमातून करण्यास, प्राधिकृत करण्यात आले आहे.

**शासकीय तज्ञ साक्षीदार**

**७८. शासकीय अधिपरीक्षक, प्रश्नांकित दस्तऐवज त्यांच्या सेवेकरिता करावयाचे अर्ज व त्यासाठी द्यावयाची रक्कम नियमितबाबत भारत सरकारने तयार केलेल्या सुधारित नियमातून घेतलेले पुढील उतारे संदर्भाच्या सोयीकरिता पुनरूद्धत करण्यात येत आहेत :—**

**(१) शासकीय परीक्षक, आक्षेपित दस्तऐवज, गुप्तवार्ता केंद्र, गृह मंत्र्यालय, "डॉर्मर्स", सिमला-१ यांच्याकडे थेट अर्ज पाठवावे.**

**(२) स्वीकृतीयोग्य अर्ज दोन वर्गात येतात—**

**(अ) उच्च न्यायालयाकडील अर्जासह कांही प्राधिकाऱ्याकडील अधिकृत अर्ज.**

**(ब) इतर अर्ज यामध्ये भारतीय संघ राज्य न्यायालयातील दिवाणी दाव्यातील, खाजगी पक्षकाराकडून आलेल्या प्रकरणांचा समावेश आहे. ज्यामध्ये प्रकरणांची सुनावणी चालू असेल अशा न्यायालया मधून मागणी आल्यानंतरच ते स्वीकारण्यात येतील. संबंधीत पक्षकाराने न्यायालयाकडे विचारणा केली पाहिजे. शासकीय अधिपरीक्षक, आक्षेपित दस्तऐवज यांच्या सेवा मिळविण्याबाबत आणखी कार्यवाही करणे न्यायालयावर अवलंबून असेल.**

**स्पष्टीकरण.—यामध्ये राज्य एक पक्षकार नसेल अशा दिवाणी प्रकरणात स्वाधीकारे न्यायालयाने केलेला संदर्भ या नियमांच्या प्रयोजनाकरिता खाजगी पक्षकाराकडून आलेली प्रकरणे असे मानण्यात येईल.**

(३) अ व ब वर्गामध्ये येणारे अर्ज सर्वसामान्यत: स्वीकारण्यात येतील, परंतु शासकीय अधिपरीक्षक आक्षेपित दस्तऐवज यांच्या स्वेच्छानिर्णयानुसार, जर ते त्यांच्या इतर कामाला बाध आणल्याखेरीज हाती घेता येत नसतील तर, नाकारण्यात येतील.

(४) ज्यामध्ये अभिप्राय दिला जात असेल अशा प्रत्येक प्रकरणात समावेशक फी आकारण्यात येईल व त्यात अभिप्रायाचा वर्ग ब प्रकरणात मर्यादित असलेल्या छायाचित्रांच्या व १ दिवसाची साक्ष देण्याच्या खर्चाचा समावेश असेल. वर्ग अ प्रकरणांची समावेशक फी रुपये २२० व वर्ग ब प्रकरणांची समावेशक फी रुपये २५० असेल. (तथापि या फीमध्ये खालील नियम १३ द्वारे नियमित होणाऱ्या प्रवास भत्त्याचा समावेश होत नाही.)

(५) जेव्हा वर्ग अ च्या एका प्रकरणाची विभागणी न्यायालयात अनेक प्रकरणांत करण्यात येते तेव्हा प्रत्येक विभाजन केलेल्या प्रकरणाकरिता रुपये १५० (एकशे पन्नास) इतकी फी आकारली जाईल. त्याचप्रमाणे, जेव्हा वर्ग ब च्या एका प्रकरणाची न्यायालयात अनेक प्रकरणात विभागणी करण्यात येते तेव्हा प्रत्येक विभाजन केलेल्या प्रकरणाकरिता रुपये २०० (दोनशे) इतकी फी असेल.

(६) या नियमाच्या अखेरीस नमूद केलेल्या अपवादास अधीन राहून, सर्व प्रकरणात फी अगाऊ देय असेल व प्रत्येक अर्जासोबत पुढील नमुन्यातील प्रमाणपत्र जोडलेले असले पाहिजे :—

प्रमाणित करण्यात येते की, $\frac{\text{रुपये दोनशेवीस (रु. २२०)}}{\text{रुपये दोनशेपन्नास (रु.२५०)}}$ इतकी रक्कम प्रकरण दावा क्रमांक ···· ·········मध्ये शासकीय अधिपरीक्षक, आक्षेपित दस्तऐवजसंबंधीच्या फीकरिता दिनांक····· ············रोजी·········कोषागारात ठेवली आहे. आणि ही रक्कम········· महिन्याकरिता केंद्रीय विषयांच्या रोख लेख्यात तेवीस (XXIII) पोलीस-केंद्रीय फी, दंड व समपहरण या शीर्षाखाली दाखवण्यात आली आहे. आणि ती संबंधीत जमा अनुसूचीत बाब क्रमांक·········· मध्ये दाखविली आहे.

कोषागार अधिकाऱ्याची सही.
प्रकरण सादर करणाऱ्या अधिकाऱ्याची सही

प्रतिस्वाक्षरित

विशेष परिस्थितीत जी अर्जात नमूद करण्यात आली पाहिजे—वर्ग अ ची प्रकरण प्रमाणपत्राखेरीज स्वीकारण्यात येतील. परंतु, प्रमाणपत्र शक्य तितक्या लवकर अग्रेषित केले पाहिजे.

(७) जेथे छायाचित्रांची फीची रक्कम खूपच मोठी असेल अशा प्रकरणात, वर्ग अ प्रकरणात फी रुपये १८० अधिक छायाचित्रांचा प्रत्यक्ष खर्च व वर्ग ब प्रकरणात रुपये २०० अधिक छायाचित्रांचा प्रत्यक्ष खर्च इतकी असेल.

वर्ग ब प्रकरणात प्रकल्प सादर करण्याऱ्या प्राधिकरणाला समाविष्ट असलेल्या जादा खर्चाची तो होण्यापूर्वी माहिती देण्यात येईल आणि तो, प्रकरणासह शासकीय अधिपरीक्षक, आक्षेपित दस्तऐवजविषयक उत्पन्न म्हणून भरण्यात येईल.

(८) (एक) जेथे कोणताही अभिप्राय देण्यात आला नसेल परंतु फक्त छायाचित्रे घेण्यात आली असतील अशा प्रकरणात किमान रु. ३५ इतक्या रकमेस अधीन राहून फक्त छायाचित्रांचा प्रत्यक्ष खर्च आकारण्यात येईल.

(दोन) जेथे परीक्षा पूर्ण झाली असेल परंतु कोणताही अभिप्राय व्यक्त केला नसेल तेथे रु. १०० इतकी एकत्रित फी आकारण्यात येईल.

(९) जर साक्षीची आवश्यकता नसेल किंवा किंमती राजादेशावर घेतली असेल तर फीमध्ये कोणती घट मान्य केली जाणार नाही.

(१०) (एक) वर्ग ब च्या प्रकरणात ज्या दिवशी न्यायालयात किंवा राजादेशावर साक्ष देण्यात आली असेल किंवा ज्या दिवशी अधिकाऱ्याला थांबवण्यात आले असेल त्या पहिल्या दिवसानंतर प्रत्येक दिवसाकरिता रु. २०० इतकी जादा फी आकारण्यात येईल. पीठासीन अधिकारी किंवा आयुक्त हयांना त्यांनी त्या दिवसाची व त्याचप्रमाणे थांबवून ठेवलेल्या कोणत्याही मध्यंतरीय दिवसाची किंवा दिवसांची फी देण्यात आली आहे असे दुसऱ्या किंवा नंतरच्या प्रत्येक दिवसाचे काम सुरू होण्यापूर्वी प्रमाणित केले पाहिजे. आणि त्यानंतर नियम (६) मधील प्रमाणपत्र सादर केले पाहिजे अशी विनंती करण्यात यावी.

(दोन) वर्ग ब प्रकरणात, जेव्हा दस्तऐवज फौजदारी प्रकरणात भाग बनत असतील अशा दस्तऐवजावर काम केलेल्या मतावर साक्ष घेण्यात आली असेल तर पहिल्या दिवसाच्या साक्षीसाठीही रु. २५० इतकी फी आकारण्यात येईल.

(११) वर्ग ब खाली येणाऱ्या प्रकरणात, शासकीय अधिपरीक्षक किंवा त्याचा सहायक यांना न्यायालयात उपस्थित रहाण्यास तयार ठेवण्यात येईल मात्र त्याने ते काम त्याचा इतर कामास बाध न आणता केले पाहिजे. जेव्हा साक्ष राजदेशावर देण्यात येईल तेव्हा राजादेश, वरिष्ठ उप-न्यायाधीश, सिमला यांना काढला पाहिजे व सामान्यत: शासकीय अधिपरीक्षक किंवा त्याचा सहायक साक्ष देऊ शकेल अशी त्याची शब्द रचना असली पाहिजे.

(१२) न्यायालयाचे पीठासीन अधिकारी यांना शासकीय अधिपरीक्षक, आक्षेपित दस्तऐवज किंवा त्याचा सहायक यांना प्रकरणाच्या आवश्यकतेप्रमाण लागेल तितक्या किमान शक्य कालावधीकरिता थांबवून घेण्याची विनंती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यांना या अधिकाऱ्यांना एका दौऱ्याच्या कालावधीत अनेक न्यायालयात वारंवार उपस्थित रहावे लागत असल्याने या अधिकाऱ्यांची उपस्थितीकरिता दिलेली वेळ व दिनांक शक्यतो स्वीकारण्याची विनंती करण्यात यावी.

(१३) ज्यामध्ये त्यांना नेहमीचे फी, प्रकरणावर घालवलेल्या वेळाशी व श्रमाशी अनुरूप नाही असे ज्या कोणत्याही प्रकरणात भारत सरकारच्या गृह मंत्रालयाला वाटेल त्या प्रकरणात जादा आकार वसवण्याचा हक्क ते राखून ठेवीत आहे.

(१४) जेव्हा शासकीय अधिपरीक्षक आक्षेपित दस्तऐवज किंवा त्याचा सहायक यांना, साक्ष देण्याकरिता किंवा कोणत्याही इतर कारणाकरिता प्रवास करणे आवश्यक असेल तेव्हा त्याची सेवा घेणारे प्राधिकरण किंवा पक्षकार यांना त्यांच्या दौऱ्यावरील प्रवासाकरिता भारत सरकारच्या पूरक नियमात घालून दिलेल्या दराने प्रवास भत्ता देणे आवश्यक असेल. त्याचप्रमाणे, भारत सरकारच्या वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांकरिता निश्चित केलेल्या दरांनी अधिकाऱ्यासोबतच्या वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांनाही प्रवास भत्ता देय असेल.

वर्ग ब प्रकरणात शासकीय अधिपरीक्षक, आक्षेपित दस्तऐवज किंवा त्याचा सहायक याने प्रवासास सुरुवात करण्यापूर्वी प्रवास भत्याचा खर्च जमा करण्यात आला आहे असे संबंधित न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याला प्रमाणित करावे लागेल.

७९. मुंबई राज्यातील आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सेवा, खाजगी कंपन्या व व्यक्ती यांच्या वतीने न्यायालयात तज्ञ म्हणून साक्ष देण्याकरिता ज्यायोगे उपलब्ध होतील त्या शर्ती पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) संचालक, आरोग्य यांच्या बाबतीत दर दिवशी फक्त रु. ११० इतकी फी आकारावी व इतर अधिकाऱ्यांच्या बाबतीत दर दिवशी फक्त रु. ५० इतकी फी आकारावी. अधिकाऱ्याने त्याच्या प्रवासास सुरुवात केल्यापासून तो परत आल्याच्या दिवसापर्यंतचे दिवस आकारणी योग्य आहेत. विहित फी-शिवाय अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असलेला प्रवास व मुक्काम भत्ता वसूल केला पाहिजे.

(२) या अधिकाऱ्यांना, वसूल केलेल्या फीच्या एकूण रकमेच्या १/६ रक्कम दिली पाहिजे व हे पारिश्रामिक मानधन म्हणून वर्गीकृत केले पाहिजे. पहा—मूलभूत नियम ९(९).

(३) पक्षकारांनी जमा केलेल्या रकमा प्रथमत: "दिवाणी न्यायालयाच्या ठेवी" म्हणून जमा केल्या पाहिजेत. पीठासीन न्यायाधीश, साक्षीदारांना प्रवास भत्ता व मानधन म्हणून देय असलेल्या रकमेकरिता अशा ठेवीसंबंधी परतावा बिल काढून साक्षीदारांना प्रदान करील. त्याच वेळी, "सतरा— न्याय दान संकीर्ण फी व दंड—प्रवास व निर्वाह भत्ता इ. करिता दिवाणी व फौजदारी न्यायालयांतील फी किंवा खर्च" या शीर्षाखाली, शासनाकडे उरलेली ठेव जमा करण्यासाठी दुसरे हस्तांतर बिल काढील.

८०. जेव्हा एखादा मुद्रांक अस्सल आहे की बनावट आहे या प्रश्नावर तज्ञाचे मत आवश्यक असेल तेव्हा, निर्देशक भारत प्रतिभूति मुद्रणालय, नाशिक रोड यांच्याकडे त्यांच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीच्या अहवालासाठी संदर्भ करता येईल.

निर्देशक प्रतिभूति मुद्रणालय, नाशिक रोड यांनी, मुद्रांकाच्या परीक्षणाकरिता व राज्यादेशावर साक्ष देण्याकरिता आकारावयाचे दर पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) तपासलेल्या प्रत्येक मुद्रांकाकरिता रु. २० परंतु जेव्हा तपासणी करावयाचे मुद्रांक त्याच पानातील गटात किंवा गटात समाविष्ठ असतील तेव्हा प्रत्येक गटाच्या तपासणीकरिता ही फी आकारण्यात येईल, कारण कोणताही एक मुद्रांक संपूर्ण गटाचा प्रातिनिधीक असतो.

(२) राजादेशावर तपासलेल्या मुद्रांकरिता प्रत्येक दस्तऐवजावरील तपासणीकरिता आवश्यक असलेल्या मुद्रांकांची संख्या कितीही असली तरी, दर दस्तऐवजामागे रु. ४० परंतु प्रत्येक प्रकरणाशी संबंधित एकापेक्षा अधिक दस्तऐवज त्याच दिवशी तपासावयाचे असल्यास, पहिल्या दस्तऐवजाकरिता रु. ४० व नंतरच्या प्रत्येक दस्तऐवजाकरिता रु. २० इतका आकार असेल.

" नऊ मुद्रांक-केंद्रीय-भारत प्रतिभूति मुद्रणालय " याखाली ही फी जमा करण्यात येईल.

८१. निर्देशक, भारत प्रतिभूति मुद्रणालय, नाशिक रोड यांच्याकडे चलनी नोटा व बँक नोटांच्या तपासणीकरिता राजादेशावर साक्ष देण्याकरिता आकारावयाचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे :—

(१) प्रत्येक नोट तपासणीकरिता .. .. .. दर नोटामागे रु. १०.

(२) बनावट नोटांच्या प्रकरणासंबंधात राजादेशावर तपासावयाच्या नोटाकरिता. दर प्रकरणामागे रु. २०.

ही फी " सत्तावीस-चलन-संकीर्ण " या खाली जमा करण्यात येईल.

८२. जेव्हा दिवाणी न्यायालयाच्या सांगण्यावरून खाजगी इमारतीचे मूल्यांकन करणे आवश्यक असते तेव्हा सरकारी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सेवा पुढील शर्तीवर उपलब्ध होतील, परंतु, असे काम अधिकाऱ्यांच्या वैध कर्तव्यास बाध न आणता हाती घेता येईल :—

(१) खालीलप्रमाणे फी आकारण्यात येईल व ती संबंधित अधिकाऱ्याने केलेल्या मूल्यांकनावर आधारलेली असेल :—

(अ) जेव्हा, इमारतीच्या तपशीलवार पहाणीच्या आधारावर खाजगी इमारतीचे मूल्यांकन आवश्यक असते—

| | |
|---|---|
| पहिल्या रु. ५,००० पर्यंत .. .. .. | ४ टक्के. |
| रु. ५,००० ते रु. २०,००० पर्यंत .. .. | ३ टक्के. |
| रु. २०,००० ते १,००,००० पर्यंत .. .. | २ टक्के. |
| एक लाख रुपयापासून .. .. .. | १½ टक्के. |

वरील दरांची या पद्धतीने गणना केली आहे तिचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे :—

जर इमारतीचे मूल्यांकन रु. ३०,००० इतके करण्यात आले तर फीची रक्कम पुढे दर्शविल्याप्रमाणे रु. ८५० होईल :—

| | रुपये |
|---|---|
| पहिल्या रु. ५,००० करिता ४ टक्केप्रमाणे .. .. | २०० |
| नंतरच्या रु. १५,००० करिता ३ टक्केप्रमाणे .. | ४५० |
| उरलेल्या रु. १०,००० करिता २ टक्क्याप्रमाणे .. | २०० |
| एकूण | ८५० |

(ब) जेव्हा निव्वळ वार्षिक मूल्यावर आधारलेली मूल्यांकन पुरेसे असेल अशा प्रकरणांत व त्याचप्रमाणे जेव्हा इमारतीच्या सामग्रीच्या दर घन फुटावर आधारलेल्या दरावर किंवा जोत्याच्या क्षेत्राच्या दराच्या आधारावर मूल्यांकन केलेले असेल अशा प्रकरणात :—

मूल्यांकनाच्या पहिल्या रु. १५,००० वर १ टक्का.

मूल्यांकनाच्या नंतरच्या रु. १,३५,००० वर अर्धा टक्का.

मूल्यांकनाच्या उरलेल्या रकमेवर पाव टक्का.

(२) अंमलात असलेल्या नियमाप्रमाणे संबंधित अधिकाऱ्याला अनुज्ञेय असलेला प्रवास भत्ता व मक्काम भत्ता द्यावा लागेल.

(३) मूल्यांकन करण्यास परवानगी दिलेल्या अधिकाऱ्याने व्यक्त केलेला अभिप्राय किंवा त्याने केलेले मूल्यांकन यास शासन कोणत्याही प्रकारे जबाबदार किंवा बांधील रहाणार नाही.

८३. दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने विनंती केल्याखेरीज अंगुलि मुद्रा केंद्र त्याला सादर केलेले लेखी अहवाल किंवा ठसे पुरवणार नाही. असे अहवाल फौजदारी न्यायालयात विनामूल्य पुरवावे लागतील. दिवाणी न्यायालयांनी अशा अभिप्रायाकरिता विनंती करताना अहवाल, संपूर्णपणे न्यायालयाच्या माहितीकरिता आणि न्यायाच्या हिताकरिता किंवा खटला किंवा इतर कार्यवाही यामध्ये पक्षकाराच्या उपयोगाकरिता आवश्यक आहे किंवा काय, हे नमद करावे, जर अहवाल पक्षकाराच्या हितसंबंधाकरिता मागवला असेल तर विनंतीबरोबर रु. २० इतकी फी पाठवण्यात यावी.

दिवाणी व अदखली फौजदारी प्रकरणात अंगुली मुद्रा केंद्राकडून तज्ञाची साक्ष घेण्याकरिता खाजगी व्यक्तीकडून दर दिवसास रु. ३० इतकी फी आकारण्यास मंजुरी दिली आहे. तथापि, ज्यामध्ये वादी व साक्षीदार यांचा खर्च फौजदारी नियमपुस्तिका, १९६० च्या प्रकरण दोनच्या परिच्छेद ६ अन्वये शासनाने घ्यावा असा आदेश देण्यात आला आहे अशा प्रकरणात अदखली फौजदारी प्रकरणातील अंगुलि मुद्रा केंद्राच्या तज्ञांच्या उपस्थितीकरिता कोणतीही फी आकारण्यात येणार नाही.

मुंबईच्या लघुवाद न्यायालयाच्या न्यायाधीशांना, जेव्हा संबंधित पक्षकार संपूर्ण रक्कम देण्यास असमर्थ असेल तेव्हा अपवादात्मकदृष्ट्या पात्र असलेल्या प्रकरणात रु. ३० च्या फीत कपात करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे.

### शासकीय दस्तऐवज दाखल करणे

८४. डाक कार्यालयाचा कोणताही अभिलेख किंवा प्रमाणपत्र किंवा अशा कोणत्याही अभिलेखाचा उतारा, नमुना किंवा प्रत दाखल करण्याबाबत दिवाणी किंवा फौजदारी अधिकारितेतील समन्सची अंमलबजावणी करण्यात आलीच पाहिजे. याबाबत, भारतीय पुरावा अधिनियम (१८७२ चा पहिला अधिनियम) याचे कलम १२३ किंवा कलम १२४ अन्वये न्यायालयात असा कोणताही अभिलेख सादर करण्यास कोणताही आक्षेप घेणे पोस्ट मास्तर जनरलला शक्य व्हावे याकरिता पोस्ट मास्तरांनी असे समन्स मिळाल्याबाबत व त्या प्रकरणासंबंधी त्यांना असलेल्या तपशीलाबाबत पोस्ट मास्तर जनरलकडे तात्काळ कळवले पाहिजे. जेव्हा डाक कार्यालयाचा इतर अभिलेख किंवा कोणतीही रोजकीर्द न्यायालयात सादर करण्यात येते व पुरावा म्हणून मान्य करण्यात येते तेव्हा ती सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांने न्यायालयाला, न्यायालयाला आवश्यक असेल तेवढाच अभिलेखाचा भाग प्रकट करण्यास निदेश देण्याबाबत सांगितले पाहिजे.

८५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. ८९९६/सी दिनांक २८ एप्रिल १९५४ अन्वये, शासकीय कर्मचाऱ्यांना जेव्हा शासकीय दस्तऐवज सादर करण्यासाठी न्यायालयाकडून बोलावले जाते तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनाकरिता कांही अनुदेश देण्यात आले आहेत. न्यायालयाच्या मार्गदर्शनाकरिता पुढील संबंधित अनुदेश पुनरूद्धृत केले आहेत :—

(१) न्यायालयातील पुरावा म्हणून अप्रकाशित शासकीय अभिलेख सादर करण्यासंबंधीचा विधि, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा अधिनियम क्र. एक) याची कलमे १२३, १२४ व १६२ मध्ये समाविष्ट आहे.

(१-अ) ज्याला शासकीय दस्तऐवज सादर करण्यासाठी बोलावले असेल अशा विभाग प्रमुखाखेरीज इतर शासकीय कर्मचाऱ्याने दस्तऐवज त्याच्या अभिरक्षेत आहे काय व तो दस्तऐवज सादर करण्याच्या स्थितीत आहे काय, याची खात्री करून घेतली पाहिजे. यासंबंधात असे म्हणता येईल की, सर्व शासकीय अभिलेख सर्वसाधारणत: विभाग प्रमुखांच्या अभिरक्षेत असतात. आणि फक्त विशेष परिस्थितीत शासकीय दस्तऐवज एखाद्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या अभिरक्षेत आहे, असे म्हणता येते. जर दस्तऐवज बोलावलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या अभिरक्षेत नसेल तर तसे त्याने न्यायालयाला कळवले पाहिजे. जर कोणत्याही विशेष परिस्थितीत दस्तऐवज हा राज्याच्या कामासंबंधीच्या अप्रकाशित शासकीय अभिलेख आहे किंवा काय हे ठरवले पाहिजे व त्याबाबतीतहि कलम १२३ अन्वये असलेल्या विशेषाधिकाराची मागणी त्याने केली पाहिजे. जर असा विशेषाधिकार सांगता येईल असे त्याचे मत असेल किंवा जर तो परिस्थितीबाबत साशंक असेल तर त्याने ते प्रकरण विभाग प्रमुखाकडे संदर्भित केले पाहिजे. तो त्याबाबतीत आवश्यक अनुदेश देईल व योग्य प्रकरणात नमुना क्र. एक मधील शपथपत्र सादर करील.

जर दस्तऐवज असा असेल की, कलम १२३ अन्वयेच्या विशेषाधिकाराची मागणी करता येत नसेल परंतु जर शासकीय कर्मचाऱ्याला दस्तऐवज हा त्याच्याकडे शासकीय गोपनीय स्वरूपात केलेला पत्रव्यवहार असेल आणि तो प्रकट केल्यामुळे सार्वजनिक हिताला बाध येतो असे वाटत असेल तर नमुना क्र. दोनमध्ये कलम १२४ अन्वये असलेल्या विशेषाधिकाराची तो मागणी करील. शंका असल्यास त्याने विभाग प्रमुखाचा सल्ला मागितला पाहिजे.

(२) शासकीय दस्तऐवजासह साक्षीदार म्हणून न्यायालयात उपस्थित रहणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याने कलम १२३ अन्वयेची परवानगी रोखून ठेवण्यात आली असेल तर, सोबतच्या नमुन्यात विभाग प्रमुखाने रीतसर सही केलेला नमुना क्र. एकमधील शपथपत्र दिले पाहिजे. जेव्हा त्याला साक्ष देण्यास बोलावले असेल तेव्हा तो ते सादर करील. तो दस्तऐवज किंवा त्यापासून उद्भवणारा कोणताही पुरावा न्यायालयासमोर सादर करण्यास स्वतंत्र नाही असे स्पष्टीकरण देईल. तथापि त्याने त्याच्याबरोबर त्याला सादर करण्यास सांगितलेले कागदपत्र घेतले पाहिजेत.

(३) ज्या दस्तऐवजांच्या बाबतीत कलम १२४ अन्वये विशेषाधिकारी मागणी करावयाची आहे असा शासकीय दस्तऐवज सादर करण्यासाठी बोलावलेला शासकीय कर्मचारी सोबतच्या नमुना क्र. दोनमध्ये शपथपत्र देईल. जेव्हा तो स्वत: पुरावा देण्यासाठी न्यायालयात उपस्थित राहणार नसेल तेव्हा त्याने ते, दस्तऐवजाबरोबर न्यायालयात पाठवावे. ज्या माणसाद्वारे न्यायालयात कागदपत्र पाठवण्यात येतात त्याने दस्तऐवज सादर करण्यास बोलावल्यावर शपथपत्र सादर करावे. त्याने त्याच्याबरोबर सादर करण्यास सांगितलेले दस्तऐवज नेले पाहिजे. परंतु न्यायालयाने ते देण्याचा निदेश देईपर्यंत ते देता कामा नयेत. ते विरूद्ध पक्षाला दाखवता कामा नयेत.

(४) विभाग प्रमुखाने ज्या मुद्यावर दस्तऐवज मागवला असेल त्याबाबतीत न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याबरोबर पत्रव्यवहार करू नये. त्याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे व व्यक्तिश: उपस्थित व्हावे किंवा संबंधित न्यायालयात दस्तऐवजासह दुसऱ्या अधिकाऱ्याला उपस्थित ठेवण्याची व्यवस्था करावी. व वरील परिच्छेद २ मध्ये निर्देशल्याप्रमाणे कृती करावी आणि जर त्याने विशेषाधिकाराची मागणी केली असेल तर आवश्यक शपथपत्र सादर करावे.

### शपथपत्रांचा नमुना एक

..................... यांच्या न्यायालयात

दावा क्रमांक ..................... १९ .

मी .....................

याद्वारे गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो व पुढीलप्रमाणे निवेदन करतो :—

............ ज्या अन्वये दिनांक ........ १९ . रोजी यांच्या न्यायालयात खाली नमूद केलेले दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे असे १९ . चा दावा क्रमांक ............ (....... विरुद्ध ............) मधील उक्त न्यायालयाने काढलेले समन्स क्रमांक ............ दिनांक

.................. दिनांक .................. रोजी मिळाले आहे. मी विभाग प्रमुख या नात्याने त्याच्या अभिलेखांचा नियंत्रक व प्रभारी आहे. मी संबंधित दस्तऐवजांचा काळजीपूर्वक विचार केला आहे व ते दस्तऐवज राज्याच्या कामाशी संबंधीत असलेले अप्रकाशित शासकीय अभिलेख आहेत व त्याचे प्रकटीकरण पुढे दिलेल्या कारणाकरिता सार्वजनिक हिताला बाधक होईल अशा निर्णयाप्रत मी आलो आहे. प्रस्तुत कारणे अशी आहेत —

### मागविलेल्या दस्तऐवजांची सूची

म्हणून मी भारतीय पुरावा अधिनियम, १८७२, याच्या कलम १२३ अन्वये, उक्त दस्तऐवज सादर करण्यास किंवा त्यामधून उद्‌भवलेला कोणताही पुरावा देण्यास परवानगी देत नाही.

दिनांक .......... माहे .......... सन १९ . रोजी .................. येथे गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा केली.

शपथपत्र देण्याऱ्या व्यक्तीचे नांव व पदनाम

### शपथ पत्राचा नमुना दोन

.......................... यांच्या न्यायालयात

दावा क्रमांक .................. १९ .

मी ........................ याद्वारे गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो व पुढीलप्रमाणे निवेदन करतो :—

ज्याअन्वये .................... यांच्या न्यायालयात खाली नमूद केलेले दस्तऐवज दिनांक .................. १९ . रोजी सादर करणे आवश्यक आहे असे १९ .......... चा दावा क्रमांक .................. (.......... विरुद्ध ..........) मधील उक्त न्यायालयाने काढलेले समन्स क्रमांक .................. दिनांक .................. हे दिनांक .................. रोजी माझ्यावर बजावण्यात आले आहे. मी त्यांचा काळजीपूर्वक विचार केला आहे व ते दस्तऐवज शासकीय गोपनीय स्वरुपात केलेला पत्रव्यवहार आहे अशा निर्णयाप्रत मी आलो आहे आणि पुढे दिलेल्या कारणाकरिता त्यांचे प्रकटीकरण सार्वजनिक हिताला बाधक होईल असे मला वाटते ती कारणे अशी आहेत :—

### मागविलेल्या दस्तऐवजाची सूची

मी, म्हणून, भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ च्या कलम १२४ अन्वये विशेषाधिराची मागणी करतो.

दिनांक .................. माहे .................. सन १९ . रोजी .................. येथे गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा केली आहे.

शपथ घेतली

गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा केली.

शपथपत्र देणाऱ्या व्यक्तीची सही व पदनाम.

८६. संसद किंवा राज्य विधान मंडळ यांच्या अधिरक्षेतील दस्तऐवज सादर करण्याकरिता घ्यावयाची समन्स सर्वसाधारण नमुण्यात देऊ नयेत. त्याऐवजी ते सादर करण्याची विनंती करणारे यथास्थिती लोकसभेने किंवा राज्य विधानसभेचे अध्यक्ष किंवा राज्य सभा किंवा राज्याची विधानपरिषद यांचे सभापती यांना उद्देशून असलेले पत्र देण्यात यावे.

**नमुना**

प्रति

अध्यक्ष, लोक सभा/विधानसभा,
सभापती, राज्य सभा/विधान परिषद,

संसद भवन, नवी दिल्ली.
विधान भवन, मुबई.

दिनांक .............

विषय :—(प्रकरणाचे वर्णन)

महोदय,

वरील कामकाजात वादी/प्रतिवादी/फिर्यादी/आरोपी हे, लोक सभा/राज्यसभा, विधानसभा/विधान-परिषद यांच्या अभिरक्षेत असलेल्या, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांवर अवलंबून राहण्याचे प्रस्तावित करीत असल्याने, मी आपल्याकडे माझ्या न्यायालयात दस्तऐवज सादर करण्यासाठी परवानगी मिळवण्याकरिता सभागृहाला विनंती करण्यासाठी व अशी परवानगी मिळाल्यास दस्तऐवज /दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती, नोंदणीकृत डाकेने पोच देय किंवा सभागृहाच्या सचिवालयाच्या अधिकाऱ्याद्वारे ........ यांच्याकडून दिनांक ............ रोजी किंवा त्यावेळी पोहोचतील अशा प्रकारे पाठवण्याची व्यवस्था करण्यासाठी विनंती करीत आहे.

वरील कार्यवाहीत, वादी/प्रतिवादी/फिर्यादी/आरोपी लोक सभा/राज्य सभा, विधानसभा/विधान-परिषद यांच्या सचिवालय यातील अधिकारी (किंवा सभागृहाच्या सचिवालयातील कोणतीही रीतसर माहिती दिलेला अधिकारी) जेव्हा सभागृहाच्या सचिवालयातील अधिकाऱ्याकडून मौखिक पुरावा आवश्यक असेल यांची जोडपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबतीत साक्षीदार म्हणून तपासणी करण्याचे प्रस्तावित करीत असल्याने, मी आपल्याला माझ्या न्यायालयात उक्त अधिकाऱ्याच्या तपासणीकरिता परवानगी देण्याकरिता सभागृहाला विनंती करण्याची व अशी परवानगी मिळाल्यास अधिकाऱ्याला दिनांक .......... रोजी सकाळी ११ वाजता माझ्या न्यायालयात हजर होण्याचा निर्देश देण्याची विनंती करीत आहे.

आपला,

**न्यायालयीन अभिलेख सादर करणे**

८७. आदेश तेराचा नियम १० न्यायालय अभिलेख सादर करण्याबाबतचा कायदा दर्शवितो. त्या नियमाच्या पोट-नियम (२) चे तत्व इतर शासकीय अभिलेखांनाही योग्यरीत्या लागू करता येईल.

८८. विधीच्या तदविरुद्ध असलेल्या कोणत्याही उपबंधास अधीन राहून, जेव्हा अभिलेखाच्या प्रमाणीय प्रती प्रकरणांची सुनावणी करण्याच्या वेळी कायदेशीररीत्या सादर करता येत असतील व ज्याकरिता अभिलेख आवश्यक असतील तो उद्देश पार पाडत असतील तेव्हा मूळ अभिलेख, न्यायालयांनी मागवता कामा नये. ज्यामध्ये न्यायालयांना मूळ अभिलेख सादर करणे इष्ट वाटेल अशा प्रकरणात त्यांनी सादर करण्यास निर्देश देण्याकरिता त्यासंबंधीची कारणे संक्षिप्तपणे नमूद केली पाहिजेत.

८९. मुंबईच्या उच्च न्यायालयाखेरीज इतर उच्च न्यायालयांच्या किंवा अशा इतर उच्च न्यायालयांना दुय्यम असलेल्या न्यायालयांच्या अभिरक्षेतील किंवा त्यासंबंधीच्या प्रकरणाचे अभिलेख सादर करण्याकरिता दुय्यम न्यायालयांनी आदेश तेरा नियम १० च्या उपबंधान्वये केलेल्या मागण्या मुंबईच्या उच्च न्यायालयाद्वारे पाठवल्या पाहिजेत व त्यासोबत वर उद्धृत केलेल्या नियमात संदर्भित केलेल्या शपथपत्राची एक प्रत व असे शपथपत्र प्रादेशिक भाषेत असल्यास त्याचा इंग्रजीतील रीतसर प्रमाणित केलेला अनुवाद असला पाहिजे. राज्याबाहेरील न्यायालयातून या उच्च न्यायालयाद्वारे आलेल्या मागण्याचे अनुपालन केले पाहिजे.

## विधान मंडळाच्या अभिरक्षेतील दस्तऐवज सादर करणे

९०. संसद किंवा राज्य विधान मंडळांच्या सभागृहाच्या अभिरक्षेतील मूळ दस्तऐवज जर त्यांच्या प्रमाणित प्रतींनी उद्देश साधला जात असेल तर मागवता कामा नये. जर पक्षकार काटेकोर पुराव्याचा आग्रह धरतील अशाच प्रकरणात केवळ न्यायालयांनी मूळ दस्तऐवजाची मागणी केली पाहिजे. या संबंधात न्यायाधीश व दर्जाधिकारी यांचे लक्ष विधान मंडळाची कार्यवाही शाबीत करता येईल अशा मार्ग विनिर्दिष्ट करणाऱ्या भारतीय पुरावा अधिनियमाच्या कलम ७८(२) कडेही वेधण्यात येत आहे.

९१. पोस्टामध्ये मूळ दस्तऐवज हरवू नयेत यासाठी खबरदारी घेण्याकरिता दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश तेराच्या नियम १० खालील सर्व अर्जामध्ये असे दस्तऐवज, उच्च न्यायालयापुढील कोणत्याही खटल्यात दाखल किंवा अभिलिखीत करण्याकरिता हे मूळ दस्तऐवज आवश्यक आहेत काय व पक्षकारांनी नहमीच्या पद्धतीने मिळवलेल्या प्रमाणीत प्रतींनी उद्देश का भागवता येणार नाही हे विशेषरीत्या नमूद केले पाहिजे.

## आदेशिका

९२. आदेशिका काढणारे न्यायालय ज्या प्रदेशात असेल त्या प्रदेशात अंमलात असलेल्या नियमानुसार योग्य फी आकारण्यात आली आहे, असे आदेशिकेत प्रमाणित करण्यात आले असेल तर भारतीय प्रदेशातील कोणत्याही न्यायालयाने काढलेली आदेशिका कोणत्याही न्यायालयाकडून (मुंबई येथील लघुवाद न्यायालय धरून) मुंबई राज्यात कोणताही आकार न घेता बजावण्यात आली पाहिजे.

९३. न्यायिक अधिकाऱ्याने काढलेल्या प्रत्येक आदेशिकेत किंवा आदेशात (अ) अधिकाऱ्याचे नाव व वर्णन (ब) काढण्याचे ठिकाण व जिल्हा (क) ज्यावेळी हजर राहणे आवश्यक असेल ती वेळ, (ड) नाव, वडिलाचे नाव, वय, जात (ओळखीकरिता आवश्यक असेल तरच) ज्याला समन्स घ्यावयाचे आहे त्या व्यक्तीचा व्यवसाय व निवासस्थान दर्शवावे. जेव्हा एखादी व्यक्ति खेड्यात रहात असेल तेव्हा ते खेडे ज्या तालुक्यात असेल तो तालुका व जिल्हा यांचाही निर्देश करावा. जेव्हा एखादी व्यक्ति मोठ्या खेड्यात किंवा नगरपालिका गावात रहात असेल तेव्हा तो येथे रहात असेल ते ठिकाण, नगरपालिका विभाग, रस्ता, गल्ली व घर क्रमांक यांचाही निर्देश करावा.

९४. (१) आदेशिका फी रोखीने न देता न्यायालय फी मुद्रांकाच्या स्वरूपात द्यावी. मुद्रांक अर्जास चिकटवण्यात यावेत व जेव्हा अर्ज नसेल तेव्हा कागदावर लिहिलेल्या व न्यायालयात दाखल केलेल्या संक्षेपलेखास चिकटवण्यात यावेत. या संक्षेपलेखास न्यायालयाचे नांव, प्रकरणाचा, अपीलाचा किंवा कार्यवाहीचा क्रमांक व वर्णन, मागणीचे मूल्य, चिकटवलेल्या न्यायालय फी मुद्रांकाचे मूल्य व काढावयाच्या आदेशीकांचा तपशील नमूद करावा. जर संक्षेपलेख म्हणजे आदेशिका काढण्याकरिता केलेला अर्ज असेल तर आदेशिका फीकरीता आवश्यक असलेल्या मुद्रांकाखेरीज त्याच्या स्वतःच्या विधग्राह्यताकरिता आवश्यक असतील असे मुद्रांक त्यावर असले पाहिजेत.

(२) जर एखाद्या पक्षकाराने आदेशिका काढण्याकरिता संक्षेपलेख दोन प्रतीत दिला व आदेशिका लेखकाने त्याची पोच द्यावी अशी त्याची इच्छा असेल तर आदेशिका लेखक दुसऱ्या प्रतीवर मूळ प्रतीची पोच म्हणून सही व दिनांक लिहील व ती अर्जदाराला परत करील.

९५. वादपत्रें व इतर दस्तऐवज यांच्या आदेशिकाबरोबर द्यावयाच्या सर्व प्रती फूलस्केप आकाराच्या टिकाऊ कागदावर सुवाच्य रीतीने लिहिल्या किंवा टंकलिखित केल्या जातील. जर कार्बन प्रती दाखल करावयाच्या असतील तर त्या ठळक व सुवाच्य असल्या पाहिजेत

९६ ज्याला न्यायालयापुढे किंवा साक्ष घेण्यासाठी नियुक्त केलेल्या आयुक्तापुढे कोणत्याही साक्षीदारांची हजेरी इष्ट वाटत असेल असा पक्षकार अशा साक्षीदारांची, प्रत्येक व्यक्तीचे संपूर्ण नांव, निवासस्थान व व्यवसाय किंवा वर्णन आणि त्याला तज्ञ म्हणून किंवा, अन्यथा साक्ष द्यावयाची आहे, किंवा कोणताही दस्तऐवज सादर करावयाचा आहे आणि दस्तऐवज सादर करावयाचा असल्यास, ओळख पटण्यासाठी दस्तऐवजाचे वर्णन व दिनांक या गोष्टींचा समावेश असलेली सूची दाखल करील. पक्षकार आवश्यक आदेशिका फीसह विहीत भोजन रक्कम, प्रवास भत्ता व इतर खर्च न्यायालयात भरणा करील.

९७. (१) आदेशिका देणाऱ्या न्यायालयापेक्षा जेथे भाषा भिन्न असेल अशा कोणत्याही ठिकाणी आदेशिका बजावणीकरिता पाठवावयाची असल्यास, तिच्यासमवेत अशा ठिकाणच्या भाषेतील अनुवाद असला पाहिजे किंवा ती इंग्रजीत असली पाहिजे

(२) मुंबईच्या इलाखा शहर लघुवाद न्यायालयाची भाषा इंग्रजी आहे.

(३) इतर उच्च न्यायालयांना दुय्यम असलेल्या न्यालयाकडून आदेशिका बजावणीच्या विवरणा समवेत इंग्रजी अनुवाद असला पाहिजे

९८. जेव्हा जिल्हा किंवा दुय्यम न्यायालयांतील दिवाणी कामकाजात उपभोगात आणलेल्या नोटिशीचे समन्सचे किंवा इतर कोणत्याही नमुन्याचे इंग्रजी रुपांतर नष्ट करण्यात आले असेल व ज्या व्यक्तिना नोटिस इ. उद्देशून असेल ती व्यक्ति ती भाषा वाचण्यास असमर्थ असेल तर योग्य तो नमुना इंग्रजीत अनुवादीत केला पाहिजे.

९९. जेव्हा एखादी आदेशिका मुंबईच्या इलाखा शहर लघुवाद न्यायालयाकडे किंवा जेथे न्यायालयाची भाषा भिन्न असेल अशा दुसऱ्या जिल्ह्यात किंवा ठिकाणी बजावणीसाठी पाठवली जाते :—

(१) तेव्हा आदेशिकेचा इंग्रजीतील नमुना उपलब्ध असेल किंवा दिवाणी व्यवहार संहिता किंवा दिवाणी व्यवहार नियमपुस्तिकेवरून त्याची नक्कल करता येत असेल तर आदेशिकेच्या इंग्रजी अनुवादाकरिता कोणतीही अनुवाद फी आकारता कामा नये.

(२) जी इंग्रजी नाही किंवा जिल्ह्याचीही भाषा नाही अशा भाषेचा अनुवाद आवश्यक असेल व कार्यालयाने सादर केला असेल, तर त्या अनुवादासाठी आकार घेता येईल.

**१००. भारत सरकारच्या रेल्वे प्रशासनाविरुद्धच्या मागण्या समाविष्ठ असणाऱ्या केंद्र शासनाविरुद्ध दाव्यांच्या नोटिसा आणि भारत सरकारच्या रेल्वे प्रशासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या केंद्र शासनावर बजावलेली न्यायालयाची समन्स यापुढे महाव्यवस्थापक, उप-महाव्यवस्थापक किंवा संबंधित रेल्वेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना उद्देशून द्यावीत.**

**१०१. संसद किंवा राज्य विधानमंडळाच्या सदस्याविरुद्ध काढलेले कोणतेही समन्स किंवा इतर आदेशिका बजावणीकरिता पीठासीन अधिकारी किंवा संसदेचे किंवा राज्य विधानमंडळाचे सचिवालय यांच्याकडे पाठवण्यात येणार नाही. सभापती किंवा अध्यक्ष यांची परवानगी घेतल्याखेरीज ज्या सभागृहाचा तो सदस्य असेल त्या सभागृहाच्या प्रसीमेमध्ये कोणत्याही सदस्यावर असे समन्स किंवा इतर आदेशिका बजावण्यात येणार नाही.**

**१०२. सर्व न्यायिक अधिकारी, जस्टिसेस ऑफ दि पीस, करारबद्ध व कार्यादिष्ट अधिकारी, उप-जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचे नसलेले अधिकारी व त्या किंवा वरिष्ठ दर्जाचे सद्गृहस्थ यांच्या बाबतीत समन्स करिता पत्रास मान्यता देणारे दिवाणी व्यवहार संहितेच्या नियम ३० आदेशाचेच उपबंध लागू करावयाचे आहेत.**

१०३. जेव्हा ग्राम अधिकाऱ्याला साक्ष देण्यासाठी समन्स देण्यात येते तेव्हा समन्स दिलेल्या अधिकाऱ्याचे कर्तव्य त्या गावात पार पाडण्यासाठी अधिकृत व्यवस्था करण्याकरिता शक्य असल्यास ज्याला वेळ देऊन तो ज्याच्या हाताखाली काम करीत असेल त्या मामलेदारद्वारे समन्स दिले पाहिजे.

१०४. ज्या दिवाणी न्यायालयाकडे समन्स किंवा इतर आदेशिका बजावणीकरिता पाठवण्यात येतात त्या न्यायालयाने वादाच्या सुनावणीकरिता निश्चित केलेल्या वेळात बजावणी केली आहे किंवा नाही व बजावणी केली नसल्यास, बजावणी न करण्याचे कारण नमूद करणारे विवरण तयार करावे.

१०५. ज्याच्याकडे बजावणीकरिता समन्स पाठवण्यात आली आहेत अशा न्यायालयाची फिर्यादी हेतुपुरस्सर बजावणी टाळीत आहे अशी खात्री झाली असेल तर अशा न्यायालयाने समन्स देणाऱ्या न्यायालयाकडे आणखी संदर्भ न करता दिवाणी व्यवहार संहितेच्या उपबंधान्वये त्याला योग्य वाटेल अशा पद्धतीने पर्यायी रीतीने बजावणी करण्याचा निर्देश द्यावा.

१०६. जो फिर्यादीला किंवा उत्तर वादीला समन्स किंवा नोटीस बजावतो अशा अधिकाऱ्याने तो समन्सबजावून परत आल्यानंतर समन्स किंवा नोटीस यांच्या बजावणीबाबत योग्य अधिकाऱ्याकडे शपथपत्र दिले पाहिजे.

१०७. बजावणी करावयाचा पक्षकार किंवा साक्षीदार यांना शोधून काढण्याकरिता कोणत्याही इसमांची मदत न घेता बेलिफाने आदेशिका बजावण्याकरिता जास्तीत जास्त प्रयत्न करावे (या मुद्याबाबत प्रकरण अठ्ठावीसचा परिच्छेद ५६२ पहा).

१०८. समन्स काढणे व बजावणे आणि ज्यांनी समन्सांना उत्तर देण्याचे नाकारले असेल अशा साक्षीदारावर कार्यवाही करणे यासंबंधात उपयोगात आणलेले नमुने संहितेच्या अनुसूची एकच्या परीशीष्ट ब मधील क्रमांक ७ ते १९ मध्ये दिले आहेत.

**आयोग पत्रे**

१०९. संहितेच्या आदेश सव्वीस व कलमे ७५ ते ७८ मध्ये आयोगपत्रासंबंधीचा सर्वसाधारण विधी समाविष्ट आहे.

११०. प्रत्येक प्रकरणास न्यायाधीश आयोगपत्र काढण्यासंबंधीची किंवा काढण्याचे नाकारण्या-संबंधीची त्याची कारणे नमूद करील. जेव्हा आयोगपत्र काढण्याचा आदेश देण्यात येईल तेव्हा तसे कारण्यासंबंधीची कारणे ही आयोगपत्र नोंदवहीत संक्षितपणे नमूद करावी.

१११. न्यायालय त्याच्या स्वतःच्या प्रस्तावानुसार किंवा दाव्यातील कोणताही पक्षकाराचा किंवा दाव्यामध्ये तपासणी करावयाच्या साक्षीदाराचा अर्ज आल्यास आयोगपत्र काढू शकेल.

आयोगपत्र काढण्याकरिता करावयाचे अर्ज शक्य तितक्या लवकर व सामान्यत: तारीख निश्चित करण्यापूर्वी करावे. अशा प्रकारच्या कोणत्याही अर्जाची नोटीस दुसऱ्या बाजूलाही दिली पाहिजे. प्रत्येक प्रकरणात न्यायाधीश आयोगपत्र काढण्यासंबंधीची कारणे अभिलिखित करील. ही कारणे त्यासाठी विहीत केलेल्या योग्य नोंद वहीत थोडक्यात नमूद करावीत.

११२. आयुक्तांची निवड न्यायाधीश स्वत: करतील व त्यांनी स्वत: नियुक्तीचा आदेश काढावा. कनिष्ट वकिलांना योग्य रीतीने वाटून देता येतील अशी आयोग पत्रे तशा प्रकारे वाटून द्यावीत. या प्रयोजनासाठी मंडळ नेमता येईल व उचित व समन्यायी वाटप करता येईल. जिल्हा न्यायाधीशांनी तपासणी करताना वाटप कशा रीतीने करण्यात आले ते पहावे.

११३. एखाद्या विशिष्ट प्रकरणात, आयोगपत्राचे कामकाज एखाद्या वकिलापेक्षा किंवा खाजगी व्यक्ति-पेक्षा एखाद्या कर्मचाऱ्याकडून अधिक कार्यक्षमतेने व काटकसरीने पार पाडले जाईल असे न्यायाधीशास वाटत असल्याखेरीज आयुक्त म्हणून न्यायालयीन कर्मचाऱ्यांची नियुक्ति केली जाऊ नये. स्थानिक तपास व नकाशे आणि आराखडे तयार करणे यासंबंधीच्या प्रयोजनार्थ न्यायालयीन कर्मचाऱ्याची नियुक्ति करणे सोयीस्कर व शीघ्रतेने कार्यवाही करण्यास योग्य असल्याचे आढळून आल्यास आवश्यक ती अर्हता धारण करणाऱ्या न्यायालयीन कर्मचाऱ्याची उक्त प्रयोजनार्थ नियुक्ति करण्यात यावी.

११४. (१) अर्जाला मंजुरी दिली गेल्यावर, न्यायालयाने पक्षकार किंवा त्यांचे वकील यांच्याशी विचारविनियम केल्यानंतर तसेच आयोगपत्र तयार करण्याकरिता जो काही कालावधी लागण्याचा संभव आहे तो लक्षात घेतल्यानंतर आयुक्ताच्या फीची रक्कम, प्रवास खर्चाची रक्कम इत्यादी ठरवून ती रक्कम न्यायालयामध्ये विनिर्दिष्ट कालावधीमध्ये थेट भरण्यासंबंधीचा निदेश द्यावेत. अशा रीतीने निश्चित केलेली पूर्ण रक्कम भरल्याशिवाय आयोगपत्र देऊ नये.

(२) आवश्यक वाटल्यास न्यायालयाला संबंधित पक्षकाराला न्यायालयामध्ये आणखी रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी निदेश देता येईल.

(३) न्यायालयाची खात्री पटेल अशा रीतीने आयोगपत्र तयार करण्यात येते तेव्हा नमूद केलेली पूर्ण रक्कम आयुक्ताला देण्यात यावी परंतु आयोगपत्र मुळीच तयार केले गेलेच नसेल किंवा ते पूर्णपणे किंवा समाधानकारक रीतीने केले गेले नसल्यास किंवा झालेले काम अपेक्षेपेक्षा कमी झाल्याचे आढळून आल्यास न्यायालयाला स्वेच्छानिर्णयाने देय रक्कम कमी करण्यासंबंधी किंवा त्याला त्या परिस्थितीत न्याय्य व योग्य वाटेल असा दुसरा एखादा आदेश तयार करण्याचा निदेश देता येईल. जेव्हा न्यायालयाच्या मते, आयोगपत्र तयार करण्यास किंवा ते परत करण्यास गैरवाजवी विलंब झाला असेल तेव्हा ही कमी केलेले पारिश्रमिक थेट भरण्यासंबंधी निदेश देण्याचे न्यायालयाला स्वेच्छानिर्णयाने ठरवता येईल.

(४) आयुक्त हा न्याय विभागातील सरकारी कर्मचारी असतो व आयोगपत्र तयार करण्याचे काम पूर्णतः कार्यालयीन वेळेबाहेर करण्यात आलेले नसते तेव्हा अशी फी शासनाकडे जमा करावयाची असते.

(५) प्रत्येक जिल्हयाच्या न्यायाधीशाने स्वेच्छानिर्णयानुसार त्याच्या दुय्यम कर्मचाऱ्यांची दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश सव्वीस अन्वये आयोगपत्र तयार करण्याबाबतच्या फीच्या रकमांची विवरणे मागवून प्रत्येक जिल्हयाची माहिती एकत्रित करून उच्च न्यायालयाकडे वार्षिक अहवाला पाठवावा.

(६) आयुक्ताची पत्रे व इतर खर्चाच्या रकमांचा भरणा करण्यासंबंधीच्या आदेशांचे काटेकोरपणे अनुपालन केले जाण्यास भर देण्यात यावा. या प्रयोजनार्थ एकदा निश्चित केलेल्या कालावधीमध्ये अतिशय सबळ कारणाशिवाय मुदतवाढ केली जाऊ नये.

(७) पक्षकाराकडून कोणत्याही प्रकारची रक्कम प्रत्यक्ष घेण्याची आयुक्तांना परवानगी नाही त्यांनी फी, प्रवास भत्ता इत्यादी न्यायालयाकडून घ्यावेत.

११५. आयोगपत्रे देण्याचा न्यायालयाच्या भाषेपेक्षा निराळी भाषा तेथे बोलली जाते अशा ठिकाणी आयोगपत्रे तयार करण्यासाठी पाठवण्यात येतात तेव्हा अशा ठिकाणी जी भाषा बोलली जाते त्या भाषेमध्ये अथवा इंग्रजीमध्ये आयोगपत्राचा अनुवाद करून तो आयोगपत्रासोबत जोडण्यात यावा.

असा अनुवाद करण्याची फी आयोगपत्रासाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराने द्यावी व ती अनुवादाचा खर्च म्हणून वसुलीयोग्य असावी.

११६. आयोगपत्र देण्यापूर्वी ज्याच्यासाठी आयोगपत्र देण्यात येत असेल अशा पक्षकाराकडून न्यायालयाने त्याला आवश्यक वाटतील असे वादप्रतिवादाचे कागदपत्र किंवा त्यांचे गोषवारे (वादप्रतिवादासंबंधीचे लिखाण प्रदीर्घ असल्यामुळे गोषवारे दाखल करण्यास न्यायालयाची परवानगी असल्यास) व वादप्रश्न आयुक्तांच्या उपयोगासाठी मागवून आयोगपत्र तयार करण्याकरिता आवश्यक असलेले सर्व परिप्रश्न, उलट परिप्रश्न, नकाशे, दस्तऐवज इत्यादी दाखल करण्यात आले असल्याची खात्री करून घ्यावी.

११७. आयोगपत्र देण्यासंबंधीच्या प्रत्येक आदेशाद्वारे आयोगपत्र तयार करून ते परत पाठवण्यास पुरेसा कालावधी मिळेल अशा रीतीने तारीख निश्चित करण्यात येईल. अशा रीतीने निश्चित करण्यात आलेला कालावधी काही कारणासाठी वाढवून घ्यावा लागण्याची शक्यता आहे असे आयुक्ताला आढळून आल्यास त्याने तो वाढवून घेण्याची कारणे विशद करून त्यासाठी अर्ज करावा व आयोगपत्र ज्या तारखेला तयार करुन परत पाठवले जाण्याची शक्यता आहे अशी तारीख न्यायालयास कळवावी.

११८. आयोगपत्र खंडशः किंवा थोडया थोडया कालांतराने तयार केले जाऊ नये. आयोगपत्र तयार करण्याचे काम एकदा सुरु झाले की अपवादात्मक प्रकरणांत तहकुबी आवश्यक असेल ते खेरीज करून इतर बाबतीत ते पूर्ण होईपर्यंत दररोज चालू राहिले पाहिजे. तहकुबी आवश्यक असेल तेव्हा आयुक्तान तात्काळ न्यायालयाला कळवून त्याचे निदेश मिळवावेत.

११९. मुंबईत राहणाऱ्या साक्षीदारांच्या तपासणी करिता मुफसल न्यायालयाकडून मुंबईतील लघुवाद न्यायालयाकडे आयोगपत्रे पाठवण्यात येतात तेव्हा ती त्या न्यायालयाकडे डाकेने थेट पाठवण्यात यावीत. सर्व आयोगपत्रांच्या बाबतीत ती तयार करून परत पाठवण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात यावा. असे आयोगपत्र मिळाल्यावर, लघुवाद न्यायालयाने, साक्ष घेण्याकरिता त्याने निश्चित केलेली तारीख नमूद करून आयोगामार्फत पोच ते पाठवणाऱ्या न्यायालयाला द्यावी. अशी तारीख संबंधित पक्षकारांना त्यांना मुंबईत हजर होण्याची व्यवस्था करता यावी यासाठी कळविण्यात यावी तसेच, आवश्यक ते समन्स बजावणे न्यायाधीशांना शक्य व्हावे यासाठी उक्त तारीख त्यातारखेपूर्वी थोडे दिवस अगोदर आयोगास कळविण्यात यावी. हा उपबंध योग्य त्या फेरफारांसह आयोगपत्रे पाठवण्यात आलेल्या सर्व न्यायालयांनाही लागू होतो.

१२०. कलम ७५ व ७६ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे सामान्यतः अनुसूची एक चे परिशिष्ट एच मधील नमुना ७ किंवा ८ मधील आयोगपत्रे पाठवण्यात यावीत. तथापी काही विशेष प्रकरणांमध्ये ज्यांची नावे दिलेली नाहीत किंवा अशा आयोगपत्रासाठी अर्ज करण्याचा पक्षकारांना ज्यांची नावे निश्चितपणे माहीत नाहीत अशा साक्षीदारांच्या तपासणीकरिता आयोगपत्र देण्याची परवानगी देता येईल.

१२१. साक्षीदाराला विचारण्यात आलेल्या प्रश्नास आयुक्त जेव्हा हरकत घेतो तेव्हा त्याने अशा प्रश्नाची नोंद घेऊन त्याला उत्तर द्यावे परंतु ज्याच्यापुढे साक्ष म्हणून जबानी दिली जाते अशा न्यायाधीशाने तसे निर्देशित केले असेल ते खेरीज करून इतर बाबतीत असे उत्तर साक्ष म्हणून मान्य केले जाणार नाही.

१२२. खालील सूचना मुख्यत्वेकरून हिशेब घेण्यासाठी आयोगपत्रे काढण्याचे विनिमयन करण्याकरिता आहेत. परंतु आवश्यक त्या अनुकूलनांसह इतर आयोगपत्रे देण्याच्या बाबतीतही त्यांचा अवलंब करण्यात यावा. या सूचना खालीलप्रमाणे आहेत :—

(१) आदेश सव्वीस, नियम ११ अन्वये काम पाहणाऱ्या आयुक्ताचा अहवाल येईपर्यंत न्यायालय एखाद्या निश्चित दिवसापर्यंत प्रकरण तहकूब करू शकते.

(२) आदेश सव्वीस, नियम १२ (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खाली दिलेल्या मुद्यांवरील सूचना आयुक्ताकडे पाठवाव्यात :—

(अ) घ्यावयाचे हिशेबाचे स्वरूप,

(ब) कोणत्या दिनांकापासून कोणत्या दिनांकापर्यंत हिशेब घ्यावयाचे आहेत,

(क) ज्याने त्याच्यापुढे लेखा विवरणपत्रे दाखल करावयाचे आहे अशा पक्षकाराचे नाव,

(ड) ज्याने आक्षेप व अधिभार यांचे विवरण पत्र दाखल करावयाचे आहे अशा पक्षकाराचे नाव,

(इ) किती कालावधीत लेखा विवरणपत्र, आक्षेप व अधिभार दाखल करावयाचे आहेत,

(फ) आयुक्ताने आपला अहवाल सादर करण्याची तारीख,

(ग) ज्या बाबतीत न्यायालयाला आपल्या सूचना देणे आवश्यक वाटेल किंवा आयुक्ताची त्या सूचना मिळवण्याची इच्छा असेल अशा इतर बाबी.

(३) लेखा विवरणपत्र ऋणको व धनको लेखाच्या नमुन्यामध्ये असावे आणि ते लेखांकन पक्षकाराने किंवा त्याच्या अधिकर्त्याने पडताळून पहावे. लेखातील दोन्ही बाजू कडील बाबींना लागोपाठचे क्रमांक देऊन शिल्लक दर्शविण्यात यावीत.

(४) आक्षेप विवरणपत्रामध्ये आक्षेप घेण्यात आलेल्या बाबी व लेखा विवरणपत्रातील त्यांचे क्रमांक यांचा निर्देश करण्यात यावा.

(५) जी रक्कम मिळाली असता लेखांकन पक्षकारांवर अधिभार आकारण्याचे ठरवण्यात आले असेल अशी रक्कम, ती मिळाल्याची तारीख व कोणत्या व्यक्तिंकडून ती मिळाली ते, तसेच ज्या विशिष्ट खात्यांवर त्याला ती रक्कम मिळाली असेल ते खाते यांचा विनिर्देश करावा. अधिभाराच्या बाबींना लागोपाठचे क्रमांक देण्यात यावेत.

(६) आक्षेप व अधिकार विषयक विवरणपत्रामध्ये पुढील गोष्टीही नमूद करण्यात याव्यात :-(अ) प्रत्येक आक्षेपांची व अधिभारांची कारणे आणि (ब) जी शिल्लक देय असल्याचे कबूल करण्यात आले आहे किंवा तसा दावा करण्यात आला आहे अशी शिल्लक रक्कम संबंधित पक्षकाराच्या किंवा त्याच्या अभिकर्त्यांच्या शपथपत्रावरून ही शिल्लक पडताळून पहाण्यात यावी.

(७) कोणत्याही व्यक्तिने तिचे लेख्यांचे किंवा आक्षेपांचे किंवा अधिभारांचे विवरणपत्र मुभा दिलेल्या कालावधीमध्ये फाईल करण्यात कसूर केल्यास, आयुक्ताने ती वस्तुस्थिती न्यायालयाला कळवावी व कसूर करणाऱ्या व्यक्तिने अर्ज केल्यावर न्यायालय मुदत वाढवून देऊ शकेल किंवा अशा व्यक्तींविषयी एकतर्फी कार्यवाही करण्याबाबत आयुक्ताला सूचना देऊ शकेल किंवा लेख्यांचे, आक्षेपाचे किंवा अधिभाराचे विवरणपत्र फाईल करणे आवश्यक असणाऱ्या पक्षकारांवर खर्च आकारू शकेल.

(८) जर आयुक्ताला त्याचा अहवाल न्यायालयाने निश्चित केलेल्या मुदतीत सादर करणे शक्य नसेल तर तो कालावधी वाढवून देण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करू शकेल व न्यायालय मुदत वाढवू शकेल किंवा आयोगपत्रे रद्द करू शकेल किंवा नवीन आयुक्ताची नियुक्ती करू शकेल.

(९) आयुक्तापुढील प्रकरण सुनावणीसाठी तयार असेल तेव्हा आयुक्त त्याच्यापुढे दाखल केलेली विवरणपत्रे वाचल्यानंतर तसेच पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आवश्यक असल्यास, ज्या मुद्यांवर पक्षकाराचे वादप्रश्न उद्‌भवले असतील त्या मुद्यांबाबत स्वतःची खात्री पटवून घेईल व अशा मुद्यांवरील त्यांचे कागदोपत्री व मौखिक पुरावे दावे दाखल करण्यास त्यानंतर भाग पाडील.

(१०) योग्य रीतीने साक्ष घेतल्यानंतर तसेच पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयुक्ताने त्यांच्यापुढे असलेल्या कार्यवाहींच्या दैनंदिनीच्या नमुन्यातील विवरणपत्रांसह त्यांचा अहवाल सादर करावा अहवालामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल : (अ) आयुक्तांने मुभा दिलेल्या किंवा मुभा न दिलेल्या हरकतींच्या बाबतीत, (ब) त्यांना मुभा देण्याची किंवा न देण्याची कारणे, (क) आढळून आलेली देणे असलेली रक्कम, (ड) ती रक्कम ज्याला देय आहे अशा पक्षकाराचे नाव, (इ) ती रक्कम ज्याच्याकडून येणे आहे अशा पक्षकारांचे नाव.

(११) कोणताही अहवाल असल्यास तो मिळाल्यावर न्यायालय, पक्षकारांना नोटीस देऊन त्याद्वारा त्यांचे अहवालाबाबत काही आक्षेप असल्यास ते निश्चित करील एवढ्या मुदतीत पाठवण्यासंबंधी कळवील काही आक्षेप असल्यास त्यावर विचार केल्यानंतर न्यायालयाला अहवालावर कार्यवाही करता येईल किंवा आदेश सव्वीस, नियम, १२ (२) अन्वये त्याला योग्य वाटेल असे आदेश देता येतील.

(१२) दिवाणी व्यवहार संहितेच्या नियम १५ ते १८ मधील आदेश सव्वीसचे उपबंध या नियमांखाली दिलेल्या आयोगपत्रांना लागू होतो.

**१२३. (१) साक्षीदारांची तपासणी करण्यासंबंधीचे आयोगपत्र काढण्यासंबंधी निर्देशित करणाऱ्या आदेशांमध्ये आयोगपत्र हे न्यायालय, वकिल किंवा अन्य व्यक्तीं यापैकी कोणाला उद्देशून पाठवलेले असावे यासंबंधी उल्लेख असावा.**

**(२) साक्षीदार जेव्हा न्यायालयाच्या अधिकारितेबाहेरील रहिवासी असतो तेव्हा साधारणतः आयोगपत्र हे ज्याच्या अधिकारितेत साक्षीदार राहतो अशा न्यायालयाला उद्देशून पाठविण्यात यावे.**

**(३) जेव्हा न्यायालयाकडे आयोगपत्र पाठवण्यात येते तेव्हा तत्संबंधीचा खर्च भागवण्याकरिता पक्षकाराने ठेवलेली रक्कम ही आयोगपत्रे ज्या न्यायालयाला पाठवले त्या न्यायालयाकडे पाठवण्यात यावी.**

**(४) साक्षीदारांचा तपासण्याकरिता आदेश सव्वीस, नियम ४ अन्वये पाठवलेले आयोगपत्र मिळाल्यावर आयुक्ताने स्वतःचे आयोगपत्र साक्षीदारांच्या निवासस्थानी जाऊन बजावावयाचे की, न्यायालयाच्या जवळपास असलेल्या एखाद्या सोयीस्कर ठिकाणी बजावावयाचे किंवा आयुक्त हा न्यायिक अधिकारी असल्यास साक्षीदाराने आवश्यक असल्यास योग्य प्रकारे गोपनीयता असलेली जागा मिळेल अशा रीतीने योग्य ती व्यवस्था केली गेल्यास न्यायालयात किंवा अशा अधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या जागेमध्ये हजर रहावयाचे हे ठरवावे, सामान्यतः ज्यांची तपासणी घ्यावयाची असते अशा व्यक्तिने किंवा पाठवण्यात आलेल्या नोटीसीमध्ये**

विनिर्दिष्ट केलेल्या विशिष्ट वेळी व विशिष्ट ठिकाणी आयुक्तासमोर हजर झाले पाहिजे परंतु स्त्रिया किंवा वार्धक्यामुळे, आजारीपणामुळे किंवा इतर काही अपंगत्वामुळे घरातून ज्यांना हलवता येणार नाही अशा व्यक्ति किंवा दिवाणी व्यवहार संहितेच्या कलम १३३ अन्वये ज्यांना न्यायालयामध्ये व्यक्तिश: हजर राहणापासून सूट देण्यात आली आहे अशा व्यक्तिंना न्यायालयात हजर होण्यापासून सूट दिली जात असल्याने त्यांनी त्याबाबतीत स्वेच्छानिर्णयास वापर करावा. अशा बाबतीत आयुक्ताने विशेष परिस्थिती व साक्षीदारांची अवस्था योग्य प्रकारे लक्षात घेऊन आपले कर्तव्य पार पाडण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करावा.

(५) साधारणत: आयुक्ताने विवाद्य कारणांसाठी साक्ष वगळू नये असे जरी असले तरीसुद्धा उलट तपासणीच्या अधिकाराचा गैरवापर टाळून ती वाजवी कालमर्यादेत घेतली जाण्यास तो जबाबदार आहे.

(६) तपासणीसाठी निश्चित केलेल्या दिवशी व त्यावेळी पक्षकाराने हजर राहण्यात कसूर केल्यास किंवा मुदत वाढवून घेण्याकरिता अर्ज केल्यास केवळ क्षुल्लक किंवा निरर्थक कारणांसाठीच तहकुबी मागितलेली आहे असे आयुक्ताचे मत असल्यास त्याने एकतर्फी कार्यवाही सुरू करावी.

१२४. उच्च न्यायालयापेक्षा कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयातील न्यायाधीशाचे पद धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तिस दिवाणी व्यवहार संहितेच्या उपबंधांन्वये त्याला पाठवण्यात आलेल्या साक्षीदारांच्या तपासणीकरिता एखाद्या आयोगपत्राच्या अंमलबजावणीसाठी फी स्वीकारता येणार नाही.

१२५. एखाद्या पक्षकाराच्या विनंतीवरून साक्षीदारांच्या तपासणीकरिता ज्या न्यायालयाकडे आयोग-पत्रे पाठविण्यात आले आहे असे न्यायालय दुसऱ्या पक्षकाराला त्याला आयोगपत्रांच्या अंमलबजावणीस हजर राहण्यास परवानगी देण्यात आली असल्यास आपल्या साक्षीदारांची तपासणी घेण्याची परवानगी देऊ शकेल. तसेच दोन्ही पक्षांना दुसऱ्या पक्षाने तपासणी घेतलेल्या कोणत्याही साक्षीदारांची उलटतपासणी घेण्याची परवानगी देऊ शकेल.

१२६. न्यायालयाने पाठवलेली व न्यायालयाला आलेली आयोगपत्रे त्या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र नोंदवह्यांमध्ये दर्शविण्यात यावीत. अशा नोंदवह्या नियम पूर्तिमध्ये विहित करण्यात आल्या आहेत. (खंड दोन मधील पृष्ठ ५१५ व ५१६ वरील नमुना क्रमांक २ व ३).

१२७. दुसऱ्या न्यायालयाने पाठविलेल्या आयोगपत्राबरोबर काहीच रक्कम पाठविलेली नसेल तेव्हा दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश सव्वीस, नियम १८ अन्वये आयोगपत्रावर कार्यवाही करण्यापूर्वी आयोग-पत्रे पाठवणाऱ्या न्यायालयाकडे चौकशी करण्यात यावी.

१२८. आदेशपत्रे पाठवण्यासाठी वापरावयाचे नमूने अधिनियमाच्या अनुसूची एक ला जोडण्यात आलेल्या परिशिष्ट एच मधील नमूना क्रमांक ७, ८, ९ व १० म्हणून देण्यात आले आहेत.

---

## परिशिष्ट ३६

[कलम ३१९ खालील टीप १०० पहा]

**मुंबई महसूल न्यायाधिकरण विनियम, १९५८**

क्रमांक बीआरटी-एडीए-१२७-५८, दिनांक ५ जून १९५८ (पहा मुंबई शासकीय राजपत्र भाग चार-क पृष्ठ क्रमांक १४३२).—मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ (१९५८ चा मुंबई अधिनियम एकतीस) च्या कलम १४ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून आणि मुंबई महसूल न्यायाधिकरण अभिलेख, निरीक्षण, शोध आणि प्रति विनियम, १९४० याचे व मुंबई महसूल न्यायाधिकरण विनियम, १९५४ याचे अधिक्रमण करून मुंबई शासनाच्या पूर्व संमतीने अध्यक्ष, याद्वारे पुढील विनियम करीत आहेत, ते म्हणजे :—

### प्रकरण एक

### सर्वसाधारण

१. संक्षिप्त शिर्षक.—या विनियमांना मुंबई महसूल न्यायाधिकरण विनियम, १९५८ असे म्हणण्यात यावे.

२. व्याख्या.—या विनियमांमध्ये संदर्भावरून अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर,—

(अ) "अधिनियम" याचा अर्थ मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ असा होतो ;

(ब) "उप-निबंधक" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेला न्यायाधिकरणाचा उप-निबंधक असा होतो आणि त्या वेळे पुरती उप-निबंधकाची कर्तव्ये पार पाडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा त्यामध्ये समावेश होतो ;

(क) "पदनिर्देशित सदस्य" याचा अर्थ या विनियमांच्या कोणत्याही तरतुदीखाली कार्यवाही करण्यासाठी अध्यक्षांनी वेळोवेळी पदनामित केलेला सदस्य असा होतो ;

(ड) "नमुना" याचा अर्थ, या विनियमांना जोडलेला नमुना असा होतो ;

(इ) "वकील" याचा अर्थ, बॅरिस्टर किंवा सॉलिसिटर किंवा मुंबई राज्यातील कोणत्याही न्यायालयात वाद प्रतिवाद करण्याचा हक्क असलेली कोणतीही इतर व्यक्ती असा होतो ;

(फ) "सदस्य" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा सदस्य असा होतो आणि त्यामध्ये अध्यक्षांचा समावेश आहे ;

(ग) "प्रबंधक" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेला, न्यायाधिकरणाचा प्रबंधक असा होतो आणि त्यामध्ये, त्यावेळी प्रबंधकाची कर्तव्ये पार पाडीत असलेल्या न्यायाधिकरणाच्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याचा समावेश होतो.

## प्रकरण दोन

### न्यायाधिकरणाचे कार्यालय, सदस्यांच्या बैठकी आणि कामाचे वाटप

**३. न्यायाधिकरणाचे मुख्य कार्यालय आणि दुय्यम कार्यालये.—**

(१) न्यायाधिकरणाचे मुख्य कार्यालय, बृहन्मुंबईत असेल.

(२) कलम ८ खाली अधिसूचित केलेल्या (बृहन्मुंबई बाहेरील) बैठकीच्या प्रत्येक ठिकाणी न्यायाधिकरणाचे दुय्यम कार्यालय असेल.

**४. सदस्यांची बैठक.**—अध्यक्ष एक किंवा अधिक सदस्यांना बृहन्मुंबई मध्ये किंवा बैठकीच्या अशा कोणत्याही इतर ठिकाणी बैठक भरवण्याचे निर्देश देईल.

**५. विशिष्ट कर्तव्य पार पाडण्यासाठी पदनिर्देशित सदस्य.**—(१) अध्यक्ष, उपविनियम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, बृहन्मुंबई बाहेरील ठिकाणी काम करण्यासाठी निर्देशित केलेल्या सदस्यांपैकी एकाला, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी कार्ये पार पाडण्यासाठी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पदनिर्देशित करील.

(२) अपिलांच्या किंवा अर्जांच्या नोंदणीच्या बाबतीत आणि अशी अपिले किंवा अर्ज दाखल करून घेतल्या नंतर नोटिसा पाठविण्याच्या बाबतीत, न्यायाधिकरणाचा कर्मचारीवर्ग करत असलेल्या, या विनियमांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे, हे सर्व साधारणपणे पदनिर्देशित सदस्यांचे कर्तव्य राहील आणि विशेषत: असा सर्व अपिलांचे आणि अर्जांचे विनियमानुसार गैरवाजवी विलंब न लावता परिनिरीक्षण आणि नोंदणी करवून घेणे यासाठी पदनिर्देशित सदस्य जबाबदार असेल. संबंधित व्यक्तींना न्यायाधिकरणाचे निर्णय किंवा आदेश तत्परतेने कळविण्यास देखील तो जबाबदार राहील.

**६. कामाचे वाटप.**—(१) उपविनियम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून अध्यक्ष, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, राज्याच्या कोणत्याही भागात उद्‌भवणाऱ्या प्रकरणांच्या संबंधातील अपिले किंवा अर्ज बृहन्मुंबई मध्ये किंवा अध्यक्षाला योग्य वाटेल अशा कोणत्याही इतर बैठकीच्या ठिकाणी दाखल करण्यात येतील व निकालात काढण्यात येतील असे, निदेश देईल.

(२) कोणत्याही अधिनियमाखाली उद्‌भवणाऱ्या अपिलांचा किंवा अर्जांचा कोणताही वर्ग, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी दाखल करण्यात येईल व अशा सदस्यांकडून किंवा न्यायाधिश मंडळाकडून तो निकालात काढण्यात येईल. असे निदेश अध्यक्ष सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे देईल.

७. **न्यायाधिश मंडळातील एक किंवा दोन सदस्यांच्या गैरहजेरीतील कार्यपद्धती.**—दोन सदस्य असलेल्या न्यायाधिश मंडळातील एका सदस्याला कामावर हजर राहणे शक्य नसल्यास, अध्यक्षाची पूर्व मंजुरी घेऊन दुसरा सदस्य अशा न्यायाधिश मंडळासमोर लावलेल्या प्रकरणांची सुनावणी करील.

परंतु अशी पूर्व मंजुरी घेणे व्यवहार्य नसेल तेथे प्रकरणे निकालात काढल्यानंतर सदस्याने त्याबाबतचा अहवाल ताबडतोब अध्यक्षाकडे पाठवावा.

आणखी असे की अशा प्रकरणांची सुनावणी करणारा दुसरा सदस्य त्यापैकी काही प्रकरणे नंतर प्रस्थापित करावयाच्या न्यायाधिश मंडळाच्या निर्णयासाठी राखून ठेवील.

८. **उप-प्रबंधकाने प्रबंधकाच्या शक्तींचा वापर करणे.**—न्यायाधिकरणाच्या दुय्यम कार्यालयातील उप-प्रबंधक ज्या करता त्यांची नियुक्ती झालेली असेल अशा क्षेत्रामध्ये उद्‌भवणाऱ्या अपिलांच्या व अर्जांच्या बाबतीत अध्यक्षांच्या संमतीने प्रबंधक त्यांच्याकडे वेळोवेळी प्रत्यायोजित करील, अशा प्रबंधकाच्या शक्तींचा वापर करतील.

## प्रकरण तीन

### अपिले व अर्ज सादर करणे, त्यांची नोंदणी व ते दाखल करून घेणे.

९. **अपिले व अर्ज सादर करणे.**—(१) विनियम ४८ च्या तरतुदींच्या अधीन राहून, न्यायाधिकरणाकडे पुनरीक्षणासाठी किंवा पुनर्विलोकनासाठी केलेली सर्व अपिले आणि अर्ज यथास्थिती अपिलदाराकडून किंवा अर्जदाराकडून व्यक्तिशः किंवा त्याच्या रीतसर नियुक्त केलेल्या अभिकर्त्या मार्फत किंवा वकीलामार्फत प्रबंधकाकडे सादर करण्यात येतील किंवा त्याच्याकडे टपालाने पाठविण्यात येतील. अपिले किंवा अर्ज टपालाने पाठविण्यात येतात तेव्हा योग्य तो टपाल खर्च अगोदरच भरलेला असल्याखेरीज ती स्वीकारण्यात येणार नाहीत.

(२) असे प्रत्येक अपिल किंवा अर्ज—

(अ) टंकलिखित किंवा सुवाच्च हस्ताक्षरांत शाईने लिहिलेले असेल ;

(ब) यामध्ये अपीलदाराचे किंवा अर्जदाराचे आणि यथास्थिती उत्तरवादीचे किंवा विरोधकाचे नाव व पत्ता विनिर्दिष्ट केलेला असेल ;

(क) यामध्ये ज्या खाली ते सादर केले त्या विधिच्या उपबंधाचा विनिर्देश केलेला असेल ;

(ड) यामध्ये अपिलांची किंवा अर्जाची कारणे स्पष्टपणे नमूद केलेली असतील ;

(इ) यामध्ये, अपिलदाराने किंवा अर्जदाराने मागणी केलेला अनुतोष नमूद केलेला असेल ;

(फ) मुदत संपल्यावर फाईल केलेला असल्यास, त्यामध्ये दाखल केलेले अपिल किंवा अर्ज कशा प्रकारे वेळेवर दाखल केला आहे ते नमूद करण्यात येईल, आणि

(ग) यामध्ये, याच बाबीच्या संबंधात कोणतेही अपील किंवा अर्ज त्यापूर्वी दाखल केलेला नसल्या बद्दलचे निवेदन असेल ;

(३) उप-विनियम (२) चे खंड (अ) ते (ग) यामध्ये घालून दिलेल्या आवश्यक त्या गोष्टींचे अनुपालन केलेले असल्याखेरीज प्रबंधक कोणतेही अपिल किंवा अर्ज स्वीकारणार नाही.

परंतु एखाद्या विशिष्ट प्रकरणामध्ये अशा आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्याची जरूर नसल्याचे अध्यक्षांचे मत असल्यास अध्यक्षाच्या मंजुरीने अपिल किंवा अर्ज स्वीकारण्यात येईल.

(४) उप-विनियम (१) खाली सादर केलेल्या प्रत्येक अपिलासोबत पुढील गोष्टी असतील:—

(अ) असे अपिल किंवा अर्ज ज्याच्या संबंधात केले असेल तो निर्णय किंवा आदेश (मळ प्रत किंवा तिची प्रमाणित प्रत) ;

(ब) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेला निर्णय किंवा आदेश हा एखादा निर्णय किंवा आदेश या विरुद्धच्या अपिलामध्ये झालेला असेल तर अशा नंतरच्या निर्णयाची किंवा आदेशाची देखील मूळ प्रत किंवा तिची प्रमाणित प्रत ; आणि

(क) जितके उत्तरवादी किंवा विरोधक असतील त्याच्या तितक्या प्रति.

१०. **(खटल्याचे) कागद पुस्तक.**—प्रत्येक अपीलदाराने किंवा अर्जदाराने अपीलाच्या संक्षेपलेखा किंवा अर्जाच्या सोबत यथास्थिती अपीलाच्या संक्षेप लेख किंवा अर्जाची प्रत आणि अपिलदाराने किंवा अर्जदाराने निर्देश केलेल्या किंवा तो ज्यावर अवलंबून आहे अशा प्रत्येक दस्त ऐवजाची प्रत असलेले (खट-ल्याचे) कागदपुस्तक तीन प्रतीत देईल.

११. **अपीले व अर्ज यांची नोंदणी.**—(१) अपीलाचा संक्षेप लेख, पुनरिक्षण, पुर्नविलोकन किंवा पुन:स्थापन करण्याकरिता आलेल्या अर्जावर प्रबंधकाने तो मिळाल्यावर मिळाल्याची तारीख त्यावर पृष्ठां-कन करून त्याची पावती द्यावी.

(२) प्रबंधकाला अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत त्याने तो अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज तपासून पुढील गोष्टीबाबत स्वतःची खात्री करून घ्यावी.

(अ) असा अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज सादर करणाऱ्या व्यक्तीस तसा प्राधिकार आहे, आणि

(ब) तो अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ च्या प्रकरण पंधरा मधील उपबंधाना तसेच या विनियमांना अनुसरून आहे.

(३) अपीलाच्या संक्षेपलेखा किंवा अर्जामध्ये उप विनियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीचे अनुपालन करण्यात आले असल्याची प्रबंधकाची खात्री पटल्यास, तो, विनियम १२ अन्वये ठेवण्यात आलेल्या योग्य त्या नोंदवहीमध्ये उक्त संक्षेपलेखाची नोंद करवून घेईल.

(४) अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज उप विनियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या शर्ती-नुसार नाही असे प्रबंधकाचे मत असल्यास, तो ज्या दोषांमुळे अपीलाच्या संक्षेपलेखाची किंवा अर्जाची नोंदणी करता आली नाही असे दोष काढून टाकण्यासंबंधी अपीलदारास किंवा अर्जदाराला किंवा त्याचा रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याला किंवा वकिलाला कळवील. आणि ही सूचना मिळाल्याच्या दिवसापासून वीस दिवसांच्या आत संबंधित पक्षकाराने किंवा रीतसर प्राधिकृत केलेल्या त्याच्या अभि कर्त्याने किंवा वकीलाने स्वत: येऊन किंवा टपालाद्वारे असे दोष दूर करण्यासंबंधी त्यांना कळवील-

(५) संबंधित व्यक्तीने किंवा रीतसर प्राधिकृत केलेल्या त्याच्या अभिकर्त्याने किंवा वकीलाने निद-र्शनास आणून दिलेल्या सर्व दोष विनियम (४) अन्वये विहीत केलेल्या कालावधी मध्ये काढून टाकल्यास, वर उल्लेखिलेल्याप्रमाणे अपीलांची किंवा अर्जाची नोंदणी करण्यात यावी.

(६) संबंधित व्यक्तीने किंवा त्याचा रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याने किंवा वकीलाने दोष काढून टाकण्यासाठी निश्चित केलेल्या अवधीमध्ये दोष दूर केले नाहीत किंवा त्याबाबत उपाय योजना करण्यात त्याने कसूर केली किंवा निदर्शनास आणलेल्या एखाद्या दोषाच्या संबंधात स्पष्टीकरण देण्यामध्ये त्याने कसूर केल्यास त्या अपीलाची किंवा अर्जाची जणू काही नोंदणी झाली आहे असे मानून प्रबंधकाने विनियम १३ च्या उपबंधान्वये पुढे कार्यवाही सुरू करावी.

(७) ज्या बाबतीत टपालाने उपाययोजना होण्यासारखी नाही असे हे दोष आहेत असे जेव्हा प्रबंधकाचे मत असेल तेव्हा त्याने अपीलाचा संक्षेप लेख किंवा अर्ज न्यायाधिकरणापुढे ठेवावा व असे दोष दूर केल्या-शिवाय अपीलाच्या संक्षेपलेखाची किंवा अर्जाची नोंदणी करता येणार नाही असे न्यायाधिकरणाचे मत असल्यास उक्त अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज संबंधित व्यक्तीला किंवा त्याच्या रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यास किंवा वकीलाला व्यक्तीश: किंवा टपालाने परत करून त्यामध्ये ज्यामुळे अशा अपी-लाच्या संक्षेपलेखाची किंवा अर्जाची नोंदणी करता येणार नाही असे दोष, तसेच दोष दूर केल्यानंतर उक्त अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज, २० दिवसा पेक्षा अधिक होणार नाही एवढया कालावधीत पुन्हा दाखल करता येईल हे विशेष निदर्शनास आणण्यासंबंधी न्यायाधिकरणाला प्रबंधकास निदेश देता येईल.

(८) संबंधित व्यक्तीने किंवा त्याच्या रीतसर प्राधिकृत अभिकर्त्याने किंवा वकीलाने उप विनियम (७) अन्वये निश्चित केलेल्या कालावधीमध्ये अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज पुन्हा दाखल केला व निदर्शनास आणलेले सर्व दोष दूर केले तर पूर्वी उल्लेखिलेल्याप्रमाणे उक्त अपीलांच्या संक्षेपलेखाची किंवा अर्जाची नोंदणी करावी.

परंतु उक्त अपीलांचा संक्षेपलेख किंवा अर्ज उप विनियम (७) अन्वये परत करण्यात येतो तेव्हा न्यायालयाच्या मुद्रकांच्या स्वरुपात रुपये १ इतकी आदेशिका फी भरल्या शिवाय अशा रीतीने पुन्हा दाखल केलेल्या एकाही अपीलाच्या संक्षेप लेखाची किंवा अर्जाची नोंदणी केली जाऊ नये.

(९) संबंधित व्यक्तीने किंवा तिच्या रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याने किंवा वकीलाने अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज पुन्हा दाखल करण्यासाठी निश्चित केलेल्या कालावधीत तो दाखल न केल्यास किंवा निदर्शनास आणून दिलेले कोणतेही दोष दूर करण्यास किंवा त्या संबंधी स्पष्टीकरण देण्यास कसूर केल्यास उक्त अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज दाखल करतांना उक्त अपीलाच्या संक्षेपलेखाची किंवा अर्जाची जणू कांही नोंदणी झालेली आहे असे समजून प्रबंधकाने विनियम १३ च्या उपबंधान्वये कार्यवाही सुरू करावी.

परंतु उक्त अपीलाचा संक्षेप लेख किंवा अर्ज उप-विनियम (७) अन्वये टपालाने न्यायालयाची मुद्रांकाच्या स्वरुपात रुपये एक इतकी आदेशीका फी भरल्याशिवाय अशारीतीने दाखविलेल्या एकाही अपीलाच्या संक्षेपलेखाची किंवा अर्जाची नोंदणी केली जाऊ नये.

(१०) अपीलाच्या संक्षेपलेखा किंवा अर्जामध्ये, उप-विनियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सव शर्तीचे अनुपालन करण्यात आले आहे. परंतु एख द्या कायद्यान्वये त्यातली विहीत केलेल्या कालावधीची मर्यादा संपल्यानंतर तो सादर करण्यात आला आहे असे प्रबंधकाला आढळून आल्यास त्याने प्रतिवादीला किंवा विरुद्ध पक्षाला नोटीस दिल्यानंतर तो अपीलाचा संक्षेपलेख किंवा अर्ज न्यायाधिकरणापुढे आदेशार्थ ठेवावा.

१२. **नोंदवह्या ठेवणे.**—प्रबंधकाने पुढील गोष्टींकरिता स्वतंत्र नोंदवह्या ठेवाव्यात—

(१) नमुना 'अ' मधील अपीले.

(२) नमुना 'ब' मधील पुनरीक्षणाचे अर्ज ;

(३) नमुना 'क' मधील पुनर्विलोकनाचे अर्ज ;

(४) नमुना 'ड' मधील पुनः मुल्यमापनाचे अर्ज.

१३. **अपिलांची किंवा अर्जांची नोंदणी करण्याची कार्यपद्धती.**—(१) अपिलाची किंवा अर्जाची नोंदणी करण्यात येते तेव्हा नोंदणी होताच प्रबंधकाने शक्य तितक्या लवकर ते अपील किंवा अर्ज न्यायाधिकरणापुढे प्राथमिक सुनावणीकरिता ठेवावा व अर्जदाराला किंवा अर्जदाराला किंवा त्याच्या रितसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यास किंवा वकीलाला त्या संबंधीची नोटीस द्यावी.

(२) पक्षकार स्वत: किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या किंवा वकीलाच्या मार्फत नोटीसामध्ये उल्लेखिलेल्या दिवशी न्यायाधिकरणापुढे हजर न झाल्यास अपीलाची किंवा अर्जाची एकतर्फी सुनावणी करण्यात येईल व एकतर्फी निर्णयही देण्यात येईल यासंबंधी उप-विनियम (१) खालील नोटिशीमध्ये, उल्लेख करावा.

(३) न्यायाधिकरणाला पुरेशा कारणासाठी अपील किंवा अर्ज स्वीकारता येईल किंवा फेटाळून लावता येईल. परंतु कोणतेही अपील किंवा अर्ज फेटाळण्या संबंधीचे लेखी कारण दिल्याशिवाय तो फेटाळू नये ;

(४) उपविनियम (३) अन्वये न्यायाधिकरणाला, जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा एखाद्या संबंधित प्राधिकाऱ्याकडून विचाराधीन असलेल्या अपीलांच्या किंवा अर्जाचा संबंधातील अभिलेख व कार्यवाहीचे कागदपत्र अथवा इतर कोणतेही कागदपत्र अथवा इतर कोणतेही कागदपत्र किंवा दस्तऐवज मागवण्या संबंधी प्रबंधकास निदेश देता येतील. परंतु विनियम ४७ खाली विहीत करण्यात आलेली आदेशीका फी प्रबंधकाला मिळाल्या खेरीज अभिलेख किंवा कार्यवाहीचे कागदपत्र मागवू नयेत किंवा आदेशीका पाठवू नयेत.

१४. **निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करणे.**—(१) विनियम १३ अन्वये स्वीकारण्यात आलेल्या अपीलावर किंवा पुनरीक्षणार्थ अर्जावर निकाल दिला जाईपर्यंत ज्याच्या विरुद्ध अपील किंवा अर्ज करण्यात आला आहे अशा कोणत्याही निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी योग्य वाटतील अशा शर्तीवर तहकूब करण्यासंबंधी न्यायाधिकरणाला निदेश देता येतील.

(२) न्यायाधिकरणाला उप-विनियम (१) अन्वये दिलेला आदेशाचे विलोपन करता येईल किंवा त्यात सुधारणा करता येतील मात्र ज्यांच्या संबंधात असा आदेश तयार केला गेला आहे त्या व्यक्तीस अशा आदेशाचे विलोपन अथवा त्यामध्ये सुधारणा का केल्या जाऊ नयेत या संबंधीची कारणे दाखवण्या-संबंधीची पुर्वसुचना देण्यात यावी.

१५. **मागावयाचा अभिलेख.**—(१) विनियम १३ च्या उपविनियम (४) अन्वये ज्या प्रकरणा-मध्ये अभिलेख व कार्यवाहीचे कागदपत्र मागवण्यात आलेली नाहीत अशा सर्व प्रकरणामध्ये प्रबंधकाला विहीत आदेशीका फी मिळाली असता तसेच अपील किंवा अर्ज स्वीकारला गेला असता, तावडतोब जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा इतर कोणत्याही संबंधित प्राधिकाऱ्याकडून अशा अपीला संबंधीचा व अर्जासंबंधीचा अभिलेख आणि कार्यवाहीचे कागदपत्र मागवता येतील.

(२) प्रबंधकाने या विनयमाच्या उप विनियम (१) अन्वये अथवा विनियम १३ च्या उपनियम (४) अन्वये एखादा अभिलेख व कार्यवाहीचे कागदपत्र मागविले असता, जिल्हाधिकाऱ्याने किंवा संबंधित प्राधिकाऱ्याने अशा अभिलेखाबरोबर कालक्रमणानुसार असलेली एक दैनंदिनी पाठवावी. या दैनंदिनी मध्ये अशी कार्यवाही सुरू झाल्याची तारीख व देण्यात आलेल्या महत्वाच्या आदेशांच्या तारखा व पृष्ठे तसेच अशा कार्यवाही मध्ये दाखल केलेली महत्वाची कागदपत्रे किंवा नकाशे किंवा आराखडे दर्शविलेले असावेत.

१६. **सर्व प्रकारच्या उपाययोजना पार पाडल्या जाईपर्यंत न्यायाधिकरणाने अपीले व अर्ज स्वीकारु नयेत.**—यथाविधी अपीलदाराने किंवा अर्जदाराने त्यावेळी अंमलात असलेल्या एखाद्या कायद्यान्वये त्याला उपलब्ध असलेल्या सर्व उपाययोजना पार पाडल्या असल्याची खात्री पटल्याखेरीज न्यायाधिकरणाने कोणतेही अपील अथवा पुनरीक्षणाकरता अर्ज स्वीकारु नयेत.

## प्रकरण चार

### सुनावणी, तहकुबी व निकाल किंवा आदेश

१७. **न्यायाधिकरणापुढे हजर होण्यास किंवा कार्य पार पाडण्यात सक्षम असणाऱ्या व्यक्ती.**—न्यायाधिकरणाला एखाद्या अपिलाचे किंवा अर्जाचे पुनरींक्षण किंवा पुर्नविलोकन करण्यासाठी वकीला-मार्फत हजर होण्याची किंवा कार्य करण्याची परवानगी एखाद्या व्यक्तीला देता येईल.

१८. **न्यायाधिकरणापुढे हजर होण्याची पक्षकारांना नोटीस.**—अपिल किंवा अर्ज स्विकारल्यानंतर विनियम ४६ च्या उपबंधानुसार संबंधित पक्षकारांवर नोटीस बजावण्यात येईल आणि त्याद्वारा नोटीशी मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेला न्यायाधिकरणासमोर उपस्थित होण्यासंबंधी त्यांना कळविण्यात येईल. नोटीशीमध्ये असेही नमूद करण्यात येईल की संबंधीत व्यक्ती स्वत: किंवा आपल्या अभिकर्त्या मार्फत अथवा वकिला मार्फत नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखेला किंवा ज्या तारखेपर्यंत सुनावणी तहकूब करता येईल अशा तारखेला न्यायाधिकरणा समोर हजर न झाल्यास, न्यायाधिकरण अपील किंवा अर्ज एकतर्फी ऐकून घेऊन एकतर्फीचे निकाल देईल.

१९. **पक्षकार हजर न झाल्यास अशा प्रकरणामध्ये करावयाची कार्यवाही.**—(१) अपील किंवा अर्ज सुनावणीकरिता काढला जातो तेव्हा सुनावणीसाठी निश्चित केलेल्या किंवा ज्या तारखेपर्यंत सुनावणी तहकूब करण्यात आली असेल अशा नंतरच्या तारखेला अपीलदार किंवा अर्जदार स्वत: किंवा त्याच्या अभिकर्त्यामार्फत अथवा वकिला मार्फत हजर न झाल्यास न्यायाधिकरणाला अपील खारीज करता येईल किंवा प्रतिवादी किंवा त्याचा अभिकर्ता किंवा वकील उपस्थित असल्यास त्याचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर अपीलांच्या किंवा अर्जाच्या गुणावगुणांनुसार निकाल देता येईल.

(२) अपील किंवा अर्ज सुनावणीकरिता काढला जातो तेव्हा सुनावणीसाठी निश्चित केलेल्या किंवा ज्या तारखेपर्यंत सुनावणी तहकूब करण्यात आली असेल अशा नंतरच्या तारखेला यथास्थित प्रतिवादी विरोधी पक्षांचा पक्षकार स्वत: किंवा त्याच्या अभिकर्त्या मार्फत अथवा वकीला मार्फत हजर न झाल्यास न्यायाधिकरणाला अपीलदाराची किंवा अर्जदाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची अथवा वकीलाची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्या अपिलाचा किंवा अर्जाचा गुणानुवगुणानुसार निकाल देता येईल.

(३) विनियम १८ अन्वये देण्यात आलेली नोटीस पक्षकारावर बजावण्यात आली आहे किंवा नाही याबद्दल शंका असल्यास, न्यायाधिकरणाला पुढील वेळी नवीन नोटीस न काढता यथास्थितील अपीलावर किंवा अर्जावर निकाल देता येईल :—

(अ) उक्त पक्षकार हा अपीलदार अथवा अर्जदार असेल किंवा अपीलदारांपैकी एक अपीलदार असेल व अपील किंवा अर्ज पूर्णत: मान्य करावे असे न्याधिकरणाचे मत असेल तर किंवा,

(ब) उक्त पक्षकार प्रतिवादी किंवा विरोधी पक्षकार किंवा प्रतिवादीपैकी किंवा विरोधी पक्षकारापैकी एक असेल व अपील किंवा अर्ज पूर्णत: खारीज केला जावा किंवा फेटाळला जावा असे न्यायाधिकरणाचे मत असेल तर.

**२०. अपीलाचे किंवा अर्जाचे पुन:स्थापन.**—प्राथमिक किंवा अंतिम सुनावणीच्या दिवशी कोणताही पक्षकार अनुपस्थित असल्यास, व अपीलाची किंवा अर्जाची एक तर्फी सुनावणी झाली तर संबंधीत पक्षकाराला यथास्थितीचे अपीलाच्या किंवा अर्जाच्या पुन:स्थापना करिता अर्ज करता येईल व पक्षकाराने त्याला सुनावणीच्या तारखेची कोणत्याही प्रकारे नोटीस देण्यात आली नव्हती किंवा अपील अथवा अर्ज सुनावणी करिता काढण्यात झाला असता त्याला अशा सुनावणीसाठी हजर होण्यापासून परावृत्त करण्यात आले, यासंबंधी पुरेशा कारणांनिशी न्यायाधिकरणाची खात्री पटवून दिल्यास न्यायाधिकरणाला ते अपील किंवा अर्ज आपल्या फाईलमध्ये पुन: दाखल करता येईल. मात्र अपीलातील किंवा अर्जातील दुसरा पक्षकार हजर राहिल्यास अशा पक्षकाराला अपीलाच्या किंवा अर्जाच्या पुन: स्थापनाचा आदेश काढला जाण्यापूर्वी नोटीस देऊन, आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली पाहिजे.

**२१. पुन:स्थापन अर्जाच्या मुदतीचा कालावधी.**—(१) विनियम २० खाली अपिलाच्या किंवा अर्जाच्या पुन:स्थापनासाठी केलेला अर्ज, अपील किंवा अर्ज फेटाळण्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल आणि त्यासोबत पुढील गोष्टी असतील,—

(अ) न्यायाधिकरणाच्या आदेशाची प्रमाणित प्रत ;

(ब) पुन:स्थापन करावयाचे, अपील किंवा अर्ज ज्याच्या संबंधात केला आहे तो निर्णय किंवा आदेश (मूळ प्रत किंवा तिची प्रमाणित प्रत) ;

(क) खंड (ब) मध्ये निर्देश केलेला निर्णय किंवा आदेश हा कोणत्याही निर्णयावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलामध्ये झाला असेल तर असा नंतरच्या निर्णयाची किंवा आदेशाची मूळ प्रत किंवा तिची प्रमाणित प्रत देईल ; आणि

(ड) जितके उत्तरवादी किंवा विरोधक असतील तितक्या, पुन:स्थापन अर्जाच्या प्रती.

(२) उप-विनियम (१) खाली विहित केलेली मुदत संपल्यानंतर असा अर्ज केलेला असला तरी न्यायाधिकरण पुरेशा कारणासाठी अपिलाच्या किंवा अर्जाच्या पुन:स्थापनासाठी आलेला अर्ज फाईलमध्ये अंतर्भूत करण्यासाठी दाखल करून घेईल.

**२२. नवीन पुरावा.**—(१) अपिलातील किंवा अर्जातील कोणत्याही पक्षकाराला न्यायधिकरणापुढे मौखिक किंवा लेखी असा कोणताही नवीन पुरावा दाखल करण्याचा हक्क असणार नाही. एखाद्या पक्षकाराने देऊ केलेले दस्तऐवज न्यायाधिकरणाच्या मते अपिलाचा किंवा अर्जाचा निर्णय देण्यासाठी आवश्यक असल्यास, न्यायधिकरण ते स्वीकारील किंवा मागवून घेईल. परंतु, अशा प्रकरणी दुसऱ्या पक्षकाराला त्यांचे खंडन करणारा पुरावा दाखल करण्याचा हक्क असेल.

(२) असे दस्तऐवज सादर करण्याची इच्छा असलेला पक्षकार अशा दस्तऐवजाच्या तीन प्रती फाईल करील व त्याची चौथी प्रत विरोधी पक्षकारावर बजावील.

(३) ज्याच्या आदेशाविरुद्ध अर्ज केलेला असेल अशा जिल्हाधिकाऱ्याला किंवा कोणत्याही संबंधीत प्राधिकाऱ्याला, न्यायधिकरण त्याला आवश्यक वाटेल असे अधिक अन्वेषण करण्याचे किंवा प्रत्यक्षपणे किंवा कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्यामार्फत जादा साक्ष घेण्याचे निदेश देईल.

(४) उप-विनियम (१) खाली नवीन पुरावा दाखल करण्यात आला असेल किंवा उप-विनियम (३) खाली अधिक अन्वेषण केले असेल किंवा जादा साक्ष घेतली असेल तेव्हा पक्षकारांची इच्छा असल्यास त्यांना नवीन किंवा जादा साक्षीतून किंवा अधिक अन्वेषणातून उद्भवणाऱ्या मुद्यांबाबत न्यायाधिकरणाला उद्देशून लिहिता येईल.

२३. स्थगन-विनियम ४७ च्या उपविनियम (४) ला अधीन राहून, स्थगनासाठी कारणे दर्शविणारा अर्ज आल्यानंतर न्यायाधिकरणास, पुरेशा कारणासाठी, त्याला योग्य वाटेल अशा अटीवर कोणत्याही अपिलाची किंवा अर्जाची सुनावणी कोणत्याही टप्प्यावर स्थगित करता येईल.

परंतु न्यायाधिकरणास, किंवा अध्यक्षास त्याला योग्य वाटेल अशा अटींवर सुनावणी देखील पुरेशा कारणासाठी स्वाधिकारे तहकूब करता येईल.

२४. **अपीलदारापैकी किंवा अर्जदारापैकी एकाचा किंवा एकमेव अपीलदाराचा किंवा अर्जदाराचा मृत्यू झाल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.**—अपील किंवा अर्ज प्रलंबित असताना अपीलदार किंवा अर्जदार मरण पावल्यास आणि त्याच्या वैध प्रतिनिधीला अपिलातील किंवा अर्जातील पक्षकार केल्याखेरीज ते चालू ठेवता येत नसल्यास, त्याच्या वैध प्रतिनिधीला उपस्थित राहता यावे व पक्षकार केले जाण्यासाठी अर्ज करता यावा यासाठी न्यायाधिकरण पुढील कार्यवाही स्थगित करील. अपीलदाराच्या किंवा अर्जदाराच्या मृत्यूच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत वैध प्रतिनिधीने तसे न केल्यास मृताच्या संबंधात अपिल किंवा अर्ज समाप्त होईल, आणि तो एकमेव अपीलदार किंवा अर्जदार असल्यास अपिल किंवा अर्ज फेटाळण्यात येईल. अन्यथा, उरलेल्या अपिलदाराच्या किंवा अर्जदाराच्या संबंधात त्याचे कामकाज चालू राहील.

२५. **अनेक उत्तरवादीपैकी किंवा विरोधकापैकी एकाचा किंवा एकमेव उत्तरवादीचा किंवा विरोधकांचा मृत्यू झाल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.**—अपील किंवा अर्ज प्रलंबित असताना उत्तरवादी किंवा विरोधक मरण पावल्यास आणि त्याच्या वैध प्रतिनिधीला अपिलातील किंवा अर्जातील पक्षकार केल्या खेरीज ते चालू ठेवता येत नसल्यास, अपिलदार किंवा अर्जदार, अशा उत्तरवादीच्या किंवा विरोधकाच्या वैध प्रतिनिधीला अशा अपिलातील किंवा अर्जातील पक्षकार करण्यासाठी, न्यायाधिकरणाकडे उत्तरवादीच्या किंवा विरोधकाच्या मृत्यूच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अर्ज वरील अपिलादाराने किंवा अर्जदाराने तसे न केल्यास मृताच्या संबंधात अपिल किंवा अर्ज समाप्त होईल. मृत हा एकमेव उत्तरवादी किंवा विरोधक असल्यास, अपिल किंवा अर्ज फेटाळण्यात येईल. अन्यथा, उरलेल्या उत्तरवादींच्या किंवा विरोधकांच्या संबंधात त्याचे कामकाज चालू राहील.

**२५-अ. अज्ञान किंवा वेडया उत्तरवादीकरिता किंवा विरोधकाकरिता पालकाची नियुक्ती आणि अशा पालकाला निरीक्षण फीची माफी.**—न्यायाधिकरणापुढे दाखल केलेल्या कोणत्याही अपिलातील किंवा अर्जातील उत्तरवादी किंवा विरोधक अज्ञान किंवा वेडा असेल आणि अशा अज्ञानाकरिता किंवा वेडयाकरिता पालक नसेल तर न्यायाधिकरणास, अशा अपिलाचे किंवा अर्जाचे कामकाज सुरू करण्यापूर्वी न्यायाधिकरणाच्या एखाद्या अधिकाऱ्याची किंवा इतर कोणत्याही व्यक्तीची, तो तयार असल्यास, अशा अपीलाच्या किंवा अर्जाच्या प्रयोजनार्थ अशा अज्ञानाचा किंवा वेडयाचा पालक म्हणून नेमणूक करता येईल. अशा रीतीने नेमणूक झालेल्या अधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला अशा अपीलाच्या किंवा अर्जाच्या अभिलेखातील कोणतेही दस्तऐवज, या विनियमाखाली त्यासाठी विहित केलेली फी न भरता तपासण्याचा, शोधण्याचा किंवा त्याच्या प्रती मिळवण्याचा हक्क राहील.

२६. **सुनावणीनंतर मृत्यू झाल्यास कारणासाठी समाप्ती होणार नाही.**—विनियम २४ आणि २५ यामध्ये काहीही असले तरी, सुनावणीची समाप्ती आणि न्यायाधिकरणाने आदेश देणे या दरम्यान कोणत्याही पक्षकाराच्या मृत्यू झाल्याच्या कारणासाठी समाप्ती होणार नाही. परंतु मृत्यू झालेला असला तरी अशा वादातील आदेश देता येईल आणि मृत्यू घडण्यापूर्वीच तो दिला असल्याप्रमाणे त्याचा अंमल व परिणाम राहील अशा बाबतीत कोणत्याही वैध प्रतिनिधीला पक्षकार करण्याची आवश्यक नाही.

२७. **वैध प्रतिनिधी ठरविणे.**—एखादी व्यक्ती मृत पक्षकाराचा वैध प्रतिनिधी आहे किंवा नाही याबद्दल कोणत्याही अपिलामध्ये किंवा अर्जामध्ये प्रश्न उपस्थित झाल्यास, आवश्यक असल्यास, साक्ष घेतल्यानंतर न्यायाधिकरण अशा प्रश्नांना तडकाफडकी निर्णय देईल.

२८. **विनियम २४ किंवा २५ खालील वादाची समाप्ती किंवा तो फेटाळणे रद्द करावयाचे प्रसंग.**—विनियम २४ किंवा २५ खाली अपील किंवा अर्ज समाप्त केला असेल किंवा फेटाळण्यात आला असेल तेव्हा अपीलदाराने किंवा अर्जदाराने किंवा यथास्थिती मृत अपीलदाराचा किंवा अर्जदाराचा वैध प्रतिनिधी असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीने, अपील किंवा अर्ज समाप्त केल्याच्या किंवा फेटाळण्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, ती समाप्ती किंवा फेटाळणे, रद्द होण्यासाठी अर्ज करावा आणि ज्या कारणामुळे त्याला वेळेवर अर्ज करण्यास प्रतिबंध झाला ते कारण पुरेसे असल्याबद्दल न्यायाधिकरणाचे समाधान झाल्यास न्यायाधिकरण समाप्ती किंवा फेटाळणे रद्द करील व अपीलाचे किंवा अर्जाचे काम पुढे चालू होईल.

परंतु अर्जदाराला अशा कालावधीच्या आत अर्ज न करण्यास पुरेसे कारण असल्याबद्दल त्याने न्यायाधिकरणाचे समाधान केले असेल तर समाप्तीच्या किंवा फेटाळण्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या पूर्वोक्त कालावधीनंतरही या विनियमाखालील अर्ज स्वीकारता येईल.

२९. **वादतथ्यांचा निर्णय करण्याची न्यायाधिकरणाची शक्ती.**—कोणत्याही अर्जाच्या बाबतीत, अभिलिखित पुरावा पुरेसा असल्यास, उक्त अर्ज ज्याच्या आदेशाविरुद्ध केलेला असेल त्या प्राधिकाऱ्याने निर्णय दिलेला नसेल अशा किंवा अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) यामध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे अशी कोणतीही अवैधता, आकृति किंवा दोष यामुळे अशा अधिकाऱ्याने ज्याचा दोषपूर्ण रीतीने निर्णय दिलेला असेल असा अर्ज निकालात काढण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही वादतथ्याचा निर्णय देईल.

३०. **सदस्यांचे किंवा न्यायाधिश मंडळाने अपीलांची किंवा अर्जाची सुनावणी करणे.**—(१) कोणत्याही एका सदस्याला कोणत्याही अपिलाची किंवा अर्जाची किंवा अपिलांच्या किंवा अर्जाच्या कोणत्याही वर्गाची सुनावणी करण्याचे निदेश देण्याची किंवा अशा अपिलाचे किंवा अर्जाचे किंवा अपिलांच्या किंवा अर्जाच्या अशा वर्गाची सुनावणी करण्यासाठी त्याच्यासह दोन किंवा अधिक सदस्यांची न्यायाधिशमंडळे प्रस्थापित करण्याची शक्ती अध्यक्षाला राहील.

(२) अशा प्रकारे ज्याला निदेश दिला आहे अशा सदस्याने किंवा अशा प्रकारे स्थापन केलेले न्यायाधीश मंडळ त्याच्याकडे सुनावणीसाठी आणि निकालात काढण्यासाठी नेमून दिलेल्या अपीलांची व अर्जाची सुनावणी करील व तो निकालात काढील.

(३) अशा सदस्याकडे किंवा न्यायाधीशमंडळाकडे नेमून दिलेले कोणतेही अपील किंवा अर्ज अध्यक्षास इतर कोणत्याही सदस्याकडे किंवा न्यायाधिश मंडळाकडे सुनावणीसाठी किंवा निकालात काढण्यासाठी हस्तांतरित करता येईल.

(४) उप-विनियम (१) किंवा (३) अन्वये एकट्या सदस्याकडे सुनावणीसाठी नेमून दिलेल्या किंवा हस्तांतरित केलेल्याखेरीज इतर कोणत्याही अपिलामध्ये किंवा अर्जामध्ये एका सदस्याला पुढील आदेशाखेरीज इतर आदेश पास करण्याचा कोणत्याही शक्ती नसतील,—

(अ) विनियम १३ (३) च्या उपबंधानुसार अपील किंवा अर्ज दाखल करून घेणे,

(ब) विनियम १३ (४) च्या उपबंधानुसार, अभिलेख व कार्यवाही मागवणे,

(क) विनियम १४ (१) च्या उपबंधानुसार निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करण्याच्या विनंतीला मंजुरी देणे किंवा ती नाकारणे,

(ड) विनियम १४ (२) च्या उपबंधानुसार निवाड्याचा किंवा आदेशाची अंमलबजावणी तहकूब करण्याच्या आदेशाचे विलोपन करणे किंवा दुरूस्त करणे,

(इ) विनियम २० चा उपबंधानुसार अपील किंवा अर्जाचे फायलीमध्ये पुनःस्थापन करण्याच्या विनंतीला मंजुरी देणे किंवा ती नाकारणे.

(फ) विनियम २४ व २५ च्या उपबंधानुसार अपील किंवा अर्ज समाप्त करणे किंवा फेटाळून लावणे,

(ग) विनियम ४७ च्या उपबंधानुसार वैध प्रतिनिधी निर्धारित करणे,

(ह) विनियम २८ च्या उपबंधानुसार समाप्ती किंवा खारीज करण्याचा आदेश रद्द करणे,

(आय) अपील किंवा अर्ज यांच्याशी संबंधित अशा इतर कोणत्याही वादकालीन अर्जावरील आदेश, किंवा

(जे) अपील किंवा अर्ज पुढील कारणास्तव नाकारणे किंवा खारीज करणे,——

(१) अपीलदाराने किंवा अर्जदाराने, त्याला किंवा त्याच्या अभिकर्त्याला किंवा यथास्थिती त्याच्या वकीलाला दाखवून दिलेले दोष विनियम ११ च्या उप-विनियम (४) अन्वये निश्चित केलेल्या कालावधीमध्ये नाहीसे करण्यास कसूर केल्यास, किंवा, त्या विनियमाचा उप-विनियम (७) अन्वये निश्चित केलेला कालावधी संपल्यानंतर अपील किंवा अर्जाचा संक्षेपलेख पुन्हा दाखल करण्यात आला असल्यास ;

(२) अपीलकाराने किंवा अर्जदाराने विनियम ४७ (३) च्या उपबंधानुसार विहित केलेली आदेशिका फी भरण्याला कसूर केल्यास ;

(३) अपीलकाराने किंवा अर्जदाराने अपील किंवा अर्ज काढून घेतला असेल किंवा त्याची अपील किंवा अर्ज चालू करण्याची किंवा त्यावर कार्यवाही करण्याची इच्छा नसेल तर.

३१. **पुर्नविलोकन अर्जाची सुनावणी.**——ज्या प्रकरणाच्या पुर्नविलोकनासाठी अर्ज केला असेल अशा प्रकरणावर ज्यान निर्णय दिला असेल किंवा आदेश दिले असतील असा एखादा सदस्य किंवा अशा न्यायाधिकरणाचे सदस्य यापैकी एक सदस्य अशा पुर्नविलोकनाच्या अर्जाच्या सुनावणीच्यावेळी न्यायाधिकरणाचा सदस्य किंवा सदस्य म्हणून पुढे राहिला असेल तर असा सदस्य किंवा यथास्थिती अशा सदस्यांच्या किंवा सदस्यांचा समावेश असलेले न्यायधिकरण यालाच फक्त अर्जाची सुनावणी करता येईल इतर कोणत्याही न्यायाधिकरणाला अशी सुनावणी करता येणार नाही.

३२. **निर्णय सांगणे.**——(१) अपील किंवा अर्ज यांची सुनावणी पूर्ण झाल्यावर न्यायाधिकरणाला त्याचा निकाल ताबडतोब सांगता येईल किंवा त्यासाठी दिनांक निश्चित करता येईल. तसेच न्यायाधिकरणाला त्याचा निकाल सांगितल्यावर त्याची कारणे देण्यासाठी दिनांक निश्चित करता येईल. असे दिनांक न्यायाधिकरणाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर अधिसूचित करावे. अशा प्रकारे निश्चित केलेल्या दिनांकाला अपील किंवा अर्जाची सुनावणी करणाऱ्या न्यायाधिशमंडळाच्या सदस्यांनी सही केलेला निर्णय उक्त न्यायाधिश मंडळाचा कोणताही सदस्य घोषित करू शकेल.

(२) न्यायाधिकरणाचा प्रत्येक निर्णय लेखी असावा व तो खुल्या न्यायालयात घोषित करावा.

३३. **न्यायाधीश मंडळाच्या सदस्यामध्ये मतभेद असतील अशा वेळी करावयाची कार्यवाही.**——(१) जेव्हा न्यायाधीशमंडळामध्ये दोन सदस्यांचा अंतर्भाव असेल व सदस्यांमध्ये मतभेद असतील, अशावेळी, अध्यक्ष हा अशा न्यायाधीश मंडळाचा एक सदस्य असल्यास, त्याच्या मताला प्राधान्य देण्यात यावे. (२) जेव्हा न्यायाधीश मंडळामध्ये दोन पेक्षा अधिक सदस्यांचा अंतर्भाव असेल तेव्हां, बहुमताला प्राधान्य देण्यात यावे आणि जेथे अशा न्यायाधीश मंडळाच्या सदस्यांची सारखी विभागणी झाली असेल, अशावेळी अध्यक्ष हा जर सदस्यांपैकी एक असेल तर, त्याच्या मताला प्राधान्य द्यावे.

(३) जेथे अध्यक्ष हा न्यायाधीश मंडळाच्या सदस्यांपैकी एक सदस्य नसेल व न्यायाधीश मंडळाच्या सदस्यांची विभागणी समप्रमाणात झाली असेल व ते निर्णयाप्रत पोहोचण्याची शक्यता नसेल अशावेळी, अपील किंवा अर्ज अध्यक्षांकडे निर्दिष्ट करण्यात यावा. त्याने स्वत: त्याचा निर्णय घ्यावा व जर त्याला असे वाटले की, अपील किंवा अर्जामध्ये भरपूर विधिविषयक मुद्यांचा अंतर्भाव आहे तर अशा बाबतीत तो स्वत: व एक किंवा अधिक सदस्यांचा अंतर्भाव असलेले एक न्यायाधीश मंडळ निर्णय देण्यासाठी त्याने स्थापन करावे.

परंतु, पदनामिक सदस्याने उप-विनियम (१), (२) व (३) खालील अध्यक्षांच्या शक्तींचा वापर करू नये.

३४. **निर्णयावर सह्या करणे.**—(१) जेथे निर्णय सर्वसंमत असेल तेथे सर्व सदस्यांनी त्यावर सह्या कराव्या.

(२) जेथे निर्णय सर्वसंमत नसेल तेथे विनियम ३३ अन्वये ज्यांच्या निर्णयाला प्राधान्य असेल त्यांनी त्यावर सह्या कराव्या. भिन्न मत असलेल्या सदस्याने किंवा सदस्यांनीही त्याचा निर्णय किंवा त्यांचे निर्णय लिहावे व त्याने किंवा त्यांचे ज्या मुद्यांवर किंवा मुद्यांवर मतभेद असतील तो मुद्दा किंवा ते मुद्दे ही अभिलीखित करावे. जर भिन्न मत असणाऱ्या सदस्याने किंवा सदस्यांनी त्याचा किंवा त्यांचा निर्णय स्वतंत्रपणे लिहिला नाही तर, त्याचे किंवा त्यांचे मतभेद असले तर निर्णयाच्या खाली त्याने किंवा त्यांनी तसे नमूद करावे व तशा अर्थाच्या पृष्ठांकनावर सही करावी. भिन्न मत असणाऱ्या किंवा सदस्यांनी पूर्वगामी उप-बंधांचे अनुपालन केले किंवा केले नाही तरी, विनियम ३३ खालील प्राधान्य दिलेला निर्णय न्यायाधिकरणाचा निर्णय म्हणूनच अमलात येईल.

३५. **निर्णयामध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या विशिष्ट बाबी.**—न्यायाधिकरणाने त्याच्या निर्णयाच्या शेवटी अपील खारीज केले आहे किंवा कसे किंवा पूर्णपणे किंवा अंशत: मान्य केले आहे ते नमूद करावे व अपीलकाराला किंवा अर्जदाराला कोणतेही सहाय्य मंजूर केले असल्यास ते नमूद करावे व तसेच कोणताही खर्च दिला असल्यास तेही नमूद करावे.

३५-अ. **निर्णयाची सूचना.**—न्यायाधिकरणाने निर्णय जहीर केल्यानंतर शक्य तितक्या लवकर त्याची सूचना पहिला अपीलकार किंवा अर्जदार व पहिला उत्तरवादी किंवा विरोधक यास देण्याची व्यवस्था करावी.

## प्रकरण पाच

### अभिलेख, तपासणी, शोध व प्रती

३६. **अभिलेख.**—न्यायाधिकरणाचे अभिलेख प्रबंधकाच्या ताब्यात ठेवण्यात येतील.

३७. **तपासणीसाठी अर्ज**—भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ च्या उप-बंधानुसार किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर विधीच्या उप-बंधानुसार अभिलेखाची तपासणी करण्याचा हक्क असलेली व्यक्ती, किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही अभिलेखांच्या किंवा त्यांच्या गोषवाराच्या प्रती मिळण्याचा हक्क असणाऱ्या व्यक्ती, विनंती ज्या प्रयोजनासाठी करण्यात आली असेल ते नमूद करणारा लेखी अर्ज प्रबंधकांकडे करील. अशा अर्जासोबत विनियम ४० ते ४३ मध्ये उपबंधित केली असेल त्या-प्रमाणे यथास्थिती नक्कल फी किंवा तपासणी फी भरली पाहिजे.

३८. **तपासणीसाठीच्या अर्जाला मंजुरी.**—अर्ज नियमानुसार आहे व आवश्यक ती फी सोबत भरलेली आहे याबद्दल प्रबंधकांचे समाधान झाल्यास ते अर्जाला मंजूरी देतील.

३९. **तपासणीसाठीच्या अर्जाला मंजुरी दिल्यानंतरच्या कार्यपद्धती.**—(१) जेव्हा विनियम (३७) खालील एखादा अर्ज घेतो तेव्हा, प्रबंधक त्यावर तो ज्या दिनांकाला पोहोचला त्याचे पृष्ठांकन करतो व त्यावर आदेश देतो. जर अर्जाला मंजूरी देण्यात आली असेल तर त्याने त्यावर पुढील गोष्टी पृष्ठांकित कराव्या,—

(अ) अभिलेखाची तपासणी करण्यास परवानगी दिल्याचा किंवा त्याच्या प्रती दिल्याचा दिनांक ;

(ब) अर्जदाराकडून मिळालेली फीची रक्कम ; व

(क) ज्या व्यक्तीच्या उपस्थितीत तपासणीला परवानगी दिली होती तिचे नांव.

(२) प्रबंधांनी त्याबाबतीत नियुक्त केलेल्या न्यायाधिकरणाच्या कर्मचाऱ्याच्या उपस्थितीशिवाय न्यायाधिकरणाच्या कोणत्याही अभिलेखाच्या तपासणीला परवानगी देण्यात येऊ नये.

**४०. तपासणी फी.**—अभिलेखांच्या तपासणीची फी प्रत्येक प्रकरणाला एक दिवसाला किंवा त्याच्या ज्या भागासाठी अशा तपासणीला परवानगी दिली असेल अशा भागाला १ रुपया असावी व ती न्यायालय फी मुद्रांकांच्या स्वरूपात वसूल करण्यात येईल.

**४१. नक्कल करण्याची व ताडून पाहण्याची फी.**—विनियम ४३ च्या तरतुदींच्या अधीन राहून, ज्याची प्रत मंजूर करण्यात आली आहे अशा दस्तऐवजाची नक्कल करण्याची व ताडून पाहण्याची फी पुढीलप्रमाणे असेल :—

(अ) **नक्कल फी.**—प्रत्येक २०० शब्द आणि त्याचा भाग यासाठी २५ नवे पैसे आणि मूळ प्रत कोष्टकवार नमुन्यात असल्यास या दराच्या दुप्पट.

(ब) **ताडून पाहण्याची फी.**—जास्तीत जास्त रुपये १ याच्या अधीन राहून खंड (अ) खाली आकारणीयोग्य असलेल्या नक्कल फीच्या निम्मे: परंतु, न्यायाधिकरणाच्या निर्णयाची चक्रमुद्रित प्रत पुरवण्यात आलेली असल्यास ताडून पाहण्याची फी आकारण्यात येणार नाही.

**४२. दस्तऐवजांचा शोध घेण्याची फी.**—निरीक्षणासाठी किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही अभिलेखाच्या किंवा त्यातील उताऱ्यांच्या प्रतींसाठी अर्ज करण्यात आलेला असेल आणि ज्याचे निरीक्षण किंवा प्रत आवश्यक असेल त्या दस्तऐवजाचा क्रमांक, दिनांक व स्वरूप याचे अशा अर्जामध्ये सुस्पष्ट वर्णन केलेले नसेल किंवा अर्जामध्ये दिलेले, अशा दस्तऐवजाचे वर्णन चुकीचे असेल आणि परिणामी तो शोधून काढण्यासाठी अभिलेखांचा तपास करणे आवश्यक ठरत असेल तेव्हा, दस्तऐवजाच्या तपासणीनंतर प्रबंधकाने, निरीक्षण किंवा प्रत यासाठी आलेला अर्ज मंजूर केला किंवा न केला तरी, ज्या दिवशी असा तपास केला असेल त्या प्रत्येक दिवसाला किंवा त्याच्या भागाला रुपये ५ इतकी तपासणी फी न्यायालय फी मुद्रांकांच्या स्वरूपात देय राहील.

**४३. आगाऊ द्यावयाची फी.**—दस्तऐवजाची प्रत पुरविण्यासाठी विहित केलेल्या फीचा आगाऊ अंदाज काढण्यात येईल आणि तो आगाऊ रोख भरण्यात येईल किंवा धनप्रेषाद्वारे आगाऊ पाठवण्यात येईल :

परंतु, फीचा आगाऊ अंदाज काढला येत नसेल तर अर्जदार, कोणत्याही दस्तऐवजाची प्रत त्याला पुरवली जाण्यापूर्वी रुपये १० पेक्षा कमी नसेल इतकी रक्कम अनामत ठेवील.

**४३-अ. विनियम ४० ते ४२ खालील फी भरण्याची सूट देण्यात आलेले विशेष सरकारी वकील.**—न्यायाधिकरणाशी संलग्न असलेल्या विशेष सरकारी वकिलांना, ते काम करून असलेल्या किंवा उपस्थित राहत असलेल्या दाव्यांशी संबंध असलेल्या अभिलेखांमधील दस्तऐवजांच्या प्रतींचे, विनियम ४० ते ४२ खाली विहित केलेल्या फी न भरता, निरीक्षण करण्याचा, तपास करण्याचा किंवा त्या मिळवण्याचा हक्क राहील.

**४४. निर्णयाच्या प्रती.**—कोणत्याही अपिलावर किंवा अर्जावर न्यायाधिकरणाने दिलेल्या अंतिम निर्णयाची प्रमाणित प्रत प्रबंधक पुढील व्यक्तींना व्यवहार्य असेल तितक्या लवकर विनामूल्य पुरवील :—

(अ) अर्ज केल्यावरून कोणताही अपीलदार किंवा अर्जदार किंवा उत्तरवादी किंवा विरोधक यांना ;

(ब) जिल्हाधिकारी किंवा इतर संबंधित प्राधिकारी, आणि अध्यक्ष तसे निर्देश देतील तेव्हा पुढील व्यक्तींना :—

(एक) न्यायाधिकरणाचा कोणताही एक किंवा सर्व सदस्य ;

(दोन) संबंधित विभागाचे आयुक्त, आणि

(तीन) सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल विभाग.—परंतु कार्यवाहीमधील पक्षकारांनी न्यायाधिकरणाच्या अंतिम निर्णयाच्या जादा प्रतींची मागणी केली तर विनियम ४१ खाली विहित केलेली फी भरण्याखेरीज त्या पुरवण्यात येणार नाहीत.

आणखी असे की, अपीलदाराने किंवा अर्जदाराने किंवा उत्तरवादीने किंवा विरोधकाने न्यायालय-फी मुद्रांकाच्या स्वरूपात एक रुपया इतकी फी भरल्याखेरीज कोणतीही प्रमाणित प्रत टपालाने पाठवण्यात येणार नाही.

४५. **पक्षकारांना दस्तऐवज परत करणे.**—अपिलाबरोबर किंवा अर्जाबरोबर दाखल केलेल्या, दस्तऐवजांच्या प्रमाणित किंवा मूळ प्रती सामान्यपणे संबंधित व्यक्तींना परत करण्यात येतील. पक्षकाराने न्यायालय-फी मुद्रांकाच्या स्वरूपात एक रुपया इतकी फी भरल्याखेरीज अशा प्रती टपालाने परत करण्यात येणार नाहीत.

प्रकरण सहा

**नोटीस बजावणी आणि आदेशिका फी**

४६. **नोटीस बजावणी.**—(१) या विनियमाखाली न्यायाधिकरणाने किंवा त्याच्या प्राधिकाराखाली द्यावयाच्या नोटिसा पुढीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने बजावण्यात येतील, त्या म्हणजे :—

(एक) प्रेषितीला, त्याच्या अभिकर्त्याला किंवा वकिलाला नोटिशीची प्रत समक्ष देऊन ;

(दोन) नोंदणीकृत डाकेने.

(२) उप-विनियम (१) मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने नोटिस बजावता येणार नाही असे मानण्यास कारण असल्याबद्दल न्यायाधिकरणाचे किंवा अध्यक्षाचे समाधान झाल्यास, न्यायाधिकरण किंवा अध्यक्ष पुढील प्रकारे नोटीस बजावण्यासंबंधी आदेश देईल,

(अ) अर्जदारामार्फत किंवा अपीलदारामार्फत हितसंबंधित व्यक्तीवर ;

(ब) मामलेदार किंवा महालकरी किंवा तहसीलदार याच्यामार्फत ;

(क) नोटिशीची एक प्रत न्यायाधिकरणाच्या कार्यालयाच्या किंवा यथास्थिती दुय्यम कार्यालयाच्या सूचना फलकावर लावून व प्रेषिती शेवटी जेथे राहात असल्याचे किंवा व्यवसाय करीत असल्याचे किंवा फायद्यासाठी व्यक्तिशः काम करीत असल्याचे माहीत असेल अशा गावाच्या चावडीमध्ये किंवा चोऱ्यामध्ये एक प्रत लावून आणि असा प्रेषिता शेवटी राहात असल्याचे किंवा व्यवसाय करीत असल्याचे किंवा फायद्यासाठी व्यक्तिशः काम करीत असल्याचे माहीत असेल असे घर असल्यास, त्यामध्ये ठळक ठिकाणी तिसरी प्रत लावून; किंवा

(ड) स्थानिक खप असलेल्या वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करुन.

(३) बजावणी पोस्टाने केली असेल तेव्हा योग्यरीतीने पत्ता घालून तयार करुन आणि नोंदणीकृत डाकेने पाठवून नोटीस बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि याविरुद्ध सिद्ध न झाल्यास, पोस्टाच्या कामाच्या सर्वसाधारण क्रमात जेव्हा नोटीस देण्यात आली असती त्यावेळी बजावणी झाली असल्याचे मानण्यात येईल.

(४) अपीलदाराने किंवा अर्जदाराने संबंधीत व्यक्तिवर नोटीस बजावण्यास न्यायाधिकरणाने परवानगी दिल्यास ज्या व्यक्तीवर नोटीस बजावली, ती व्यक्ती जेथे सर्वसाधारणपणे राहत असेल किंवा ती व्यक्ती सर्वसाधारणपणे जेथे उपलब्ध असेल त्या गावाच्या ग्राम अधिकाऱ्याने रीतसर साक्षांकित केलेला, अशा बजावणीसंबंधीचा समाधानकारक लेखी पुरावा अपीलदाराने किंवा अर्जदाराने हजर केल्यास नोटीस बजावली असल्याचे मानण्यात येईल.

(५) (अ) ज्याच्यावर नोटीस बजावयाची तो पक्षकार ज्याच्या अधिकारक्षेत्रात राहतो त्या तालुक्याचा वा महालाचा मामलेदार महालकरी किंवा तहसीलाचा तहसीलदार याच्याकडे नोटीस बजावणीसाठी पाठवण्याचे निदेश न्यायाधिकरण देते तेव्हा असा मामलेदार किंवा महालकरी किंवा यथास्थिती तहसीलदार अशी नोटीस किंवा त्याची प्रत ग्राम अधिकाऱ्यांमार्फत शक्य तितक्या लवकर बजावण्याची व्यवस्था करील.

(ब) अशी नोटीस बजावणारा अधिकारी, नोटीस किंवा तिची प्रत प्रेषितीला त्याचा अभिकर्ता वा वकील याच्या स्वाधीन करतो किंवा त्याला देतो तेव्हा तो उक्त नोटीस अशा प्रकारे ज्याच्या स्वाधीन केली आहे किंवा ज्याला दिली आहे त्या व्यक्तीकडून बजावणीची पोच म्हणून नोटीशीवर सही घेईल आणि अशी नोटीस किंवा प्रत बजावल्याची वेळ व पद्धत आणि बजावणी केलेल्या व्यक्तीला ओळखणारी व नोटीस स्वाधीन करताना किंवा देताना साक्षीदार असणारी व्यक्ती असल्यास तिचे नांव व पत्ता त्यावर पृष्ठांकित करुन अशी नोटीस किंवा प्रत मामलेदार, महालकरी किंवा यथास्थिती तहसीलदार याच्याकडे परत पाठवील. त्यानंतर मामलेदार, महालकारी किंवा यथास्थिती तहसीलदार उक्त नोटीस किंवा प्रत संबंधित अधिकाऱ्यांच्या उक्त पृष्ठांकनासह अवविलंबे प्रबंधकाकडे परत पाठवील.

(६) उप-विनियम (२) (क) अनुसार नोटीस तिच्या प्रती चिकटवून बजावण्यात येते तेव्हा ती बजावणारा अधिकारी मूळ प्रत मामलेदार, महालकरी किंवा यथास्थिती तहसीलदार याच्याकडे किंवा प्रबंधकाकडे परत पाठवील, त्याने प्रत लावली आहे, त्याने तसे ज्या परिस्थितीत केले ती परिस्थिती, आणि प्रेषितीचे निवासस्थान किंवा कामधंद्याची जागा ज्याने ओळखली व ज्याच्या उपस्थितीत प्रत लावली त्या व्यक्तीचे नांव व पत्ता नमूद करणारा अहवाल मूळ प्रतीवर पृष्ठांकित करण्यात येईल किंवा तिला जोडण्यात येईल, अशा अहवालासह नोटीस मामलेदाराला वा महालकऱ्याला वा तहसीलदाराला मिळाल्यास, असा अधिकारी अशी नोटीस आणि अहवाल विनाविलंब प्रबंधकाकडे परत पाठवील.

(७) या विनियमाखाली नोटीस बजावण्यात येते तेव्हा—

(अ) बजावणी केलेल्या व्यक्तीची म्हणून अभिप्रेत असलेली सही,

(ब) स्वीकारण्यास नकार किंवा संबंधित व्यक्ती सापडली नाही किंवा माहीत नाही असे, पोस्टाच्या अधिकाऱ्याने केले असल्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही पृष्ठांकन, किंवा

(क) बजावणी किंवा पर्यायी बजावणी यासंबंधी महसूल अधिकाऱ्याने केले असल्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही पृष्ठांकन त्याविरुद्ध सिद्ध होईपर्यंत, खरी सही, किंवा यथास्थिती अशा पृष्ठांकनामध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीचे बरोबर कथन असल्याचे मानण्यात येईल.

(८) या विनियमानुसार नोटीस बजावण्यात आली आहे असे प्रबंधकाला आढळून आल्यास तो त्या प्रमाणे पृष्ठांकन करील. अभिलेखावरुन किंवा आवश्यक वाटेल अशा पुराव्यावरुन नोटीस योग्यरीतीने बजावण्यात आली नसल्याची न्यायाधिकरणाची खात्री झाली असल्यास त्यास नवीन नोटीस काढण्यासंबंधी निदेश देता येईल.

(९) या विनियमाचे उपबंध, न्यायाधिकरणाच्या प्राधिकाराखाली किंवा प्राधिकारानुसार देण्यात आलेल्या इतर कोणतीही आदेशिका बजावण्याच्या संबंधात लागू होतील.

**४७. आदेशिका फी.**—(१) विनियम १३ चे उपविनियम (१) किंवा (२) अन्वये अपील किंवा अर्ज स्वीकारण्यात येतो किंवा अभिलेख व अपीलाचे किंवा अर्जाचे कागदपत्र मागवण्यासंबंधी आदेश दिले जातात त्यावेळी, काढावयाच्या प्रत्येक आदेशीकेबद्दल न्यायालय-फी मुद्रांकाच्या स्वरुपातील उपविनियम (१-अ) मध्ये उपबंधित केलेली आदेशिका फी दहा दिवसांच्या आत भरण्यासंबंधीची नोटीस यथास्थिती, अपीलदारावर किंवा अर्जदारावर बजावण्यात येईल.

(१-अ) उपविनियम (१) अन्वये देय असलेली आदेशिका फी खाली दिल्याप्रमाणे असेल म्हणजे असे की—

(अ) जेव्हा प्रतिवादी किंवा विरोधी पक्षकार एक असतो अथवा प्रतिवादी किंवा विरोधी पक्षकार एकापेक्षा अधिक असतात परंतु त्यांचे प्रतिनिधित्व एकाच अभिकर्त्याने किंवा वकिलाने केलेले असते तेव्हा १ रुपया.

(ब) जेव्हा प्रतिवादी किंवा विरोधी पक्षकार एकापेक्षा अधिक असतात व त्यापैकी प्रत्येकाचे प्रतिनिधित्व स्वतंत्र अभिकर्त्याने किंवा वकिलाने केलेले असते तेव्हा—

(१) पहिल्या प्रतिवादीकरिता किंवा विरोधी पक्षकाराकरिता—१ रुपया.
(२) दुसऱ्या प्रतिवादीकरता किंवा विरोधी पक्षकाराकरितां—प्रत्येकी ५० पैसे.
(३) बाकीच्या प्रतिवादीकरिता किंवा विरोधी पक्षकाराकरिता—प्रत्येकी २५ पैसे.

(२) अर्जदाराने किंवा अपीलदाराने चुकीचा पत्ता दिल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणाहून विनियम ४६ च्या उपविनियम (१) मध्य उल्लेखिलेल्या सर्वसाधारण पद्धतीने नोटीस बजावणी शक्य होणार नाही असे न्यायाधिकरणास आढळून आल्यास, ३ रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी जादा आदेशिका फी आकारण्यात येईल आणि यथास्थिती अपीलदारावर किंवा अर्जदारावर नोटीस बजावण्यात यावी व त्या नोटीशीद्वारा नोटीस मिळाल्याच्या दिवसापासून दहा दिवसांच्या आत अशी फी न्यायालय फी मुद्रांकाच्या स्वरुपात प्रबंधकाकडे भरण्यासंबंधी कळवण्यात येईल.

(३) अपीलदाराने किंवा अर्जदाराने विहित कालावधीत आदेशीका फी भरण्यास कसूर केल्यास यथास्थिती ते अपील किंवा अर्ज खारीज करण्यात योग्य ठरेल.

(४) न्यायालय फी मुद्रांकाच्या स्वरुपात खाली दिलेल्या आदेशिका फी सुद्धा बसवण्यात याव्यात त्या म्हणजे—

(अ) विनियम ११ च्या उप-विनियम (८) व (९) च्या परंतुकान्वये अपील किंवा अर्ज पुन्हा दाखल करण्याकरिता—१ रुपया.

(ब) विनियम २३ अन्वये तहकूब केलेल्या सुनावणीच्या नंतरच्या दिनांकाची नोटिस डाकेने पाठवण्याकरिता—१ रुपया

(क) एखादे प्रकरण सुनावणीकरिता निश्चित करण्यात आले नसतानाही पक्षकाराने अर्ज केला असता जेव्हा तहकुबी निश्चित करण्यात येते तेव्हा टपालाने नोटीसा पाठवण्याकरिता—१ रुपया.

**४७-अ. आदेशिका फी देण्यापासून शासनाला सूट.**—एखाद्या प्रकरणात शासन हे अर्जदार किंवा अपीलदार असते तेव्हा विनियम ४७ चे उपबंध लागू होणार नाहीत.

## प्रकरण सात

### संकीर्ण

**४८. अपीले इत्यादी सादर करण्याकरिता अभिकर्त्याला व वकीलाला प्राधिकार असणे.—** **कोणत्याही अभिकर्त्याला किंवा वकिलाला न्यायाधिकरणाकडे केलेल्या कोणत्याही अपीलामध्ये किंवा अर्जामध्ये त्या प्रयोजनार्थ पक्षकाराने किंवा त्याच्या अधिकृत अभिकर्त्याने किंवा अशा नियुक्ती करता मुखत्यारनाम्यान्वये रीतसर प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीने स्वाक्षरित केलेल्या लेखी कागदपत्राद्वारे त्याची नियुक्ती झालेली असल्याखेरीज त्याला पक्षकाराच्या वतीने अपीलाचासंक्षेपलेख किंवा अर्ज सादर करता येणार नाही किंवा हजर राहता येणार नाही किंवा कार्यकरता येणार नाही. अशा प्रत्येक कागदपत्रावर आवश्यक तो न्यायालय फी मुद्रांक असेल व त्यामध्ये अभिकर्त्यांचा किंवा वकिलाचा पूर्ण पत्ता असेल. तसेच तो न्यायाधिकरणापुढे दाखल करण्यात येईल.**

**४९. प्रबंधकाची कार्ये.—प्रबंधक या विनियमांनुसार अथवा अध्यक्ष नेमून देईल अशी कार्ये पार पाडील.**

**५०. उप-प्रबंधक व कार्यालयीन कर्मचारी यांची कामे.—उप-प्रबंधक किंवा कार्यालयीन कर्मचारी अध्यक्ष किंवा अध्यक्षाच्या परवानगीनुसार प्रबंधक नेमून देईल अशी कामे पार पाडतील.**

**५१. न्यायाधिकरणाची मोहोर.**—न्यायाधिकरणाचे स्वतःची अशी कार्यालयीन मुद्रा असेल व ती प्रबंधकाच्या ताब्यांत ठेवण्यात येईल.

**५२. स्वाक्षरीत व मोहोरबंद करावयाचे सर्व रीट (लेख).—प्रत्येक रिट (लेख), समन्स, नोटीस किंवा इतर आदेशिका तसेच प्रत्येक आदेश किंवा निकाल किंवा एखाद्या दस्तऐवजाची प्रमाणित प्रत यांवर प्रबंधकाने स्वाक्षरी करावी. व त्यावर स्वाक्षरी केल्याचा दिनांक आणि वर्ष लिहावे. तसेच त्यावर न्यायाधिकरणाची कार्यालयीन मुद्रा लावून ते मोहोरबंद करावे.**

५३. **अध्यक्ष मुख्यालयाच्या ठिकाणी अनुपस्थित असताना कर्तव्ये पार पाडणे.**—अध्यक्ष मुख्यालयाच्या ठिकाणी अनुपस्थित असताना या विनियमान्वये त्याला आपली कर्तव्ये पार पाडण्याकरिता कोणत्याही एखाद्या सदस्याला शक्ती प्रदान करता येईल.

५४. **पद निर्देशित व्यक्तीच्या अनुपस्थित कर्तव्ये पार पाडणे.**—एखाद्या पदनिर्देशित सदस्याला अध्यक्षाने बृहन्मुंबईच्या बाहेरील ठिकाणी अनुपस्थित असताना त्याच्याकडे सोपवलेले एखादे कर्तव्य अशा ठिकाणी पार पाडण्याकरिता अध्यक्षास इतर कोणत्याही सदस्यास शक्ती प्रदान करण्यात प्राधिकृत करता येईल.

५५. **या विनियमामध्ये ज्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही अशा विषयामध्ये दिवाणी व्यवहार संहितेच्या उपबंधाचा अवलंब करणे.**—या विनियमांमध्ये ज्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही अशा विषयांत न्यायाधिकरणाने दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ मध्ये घालून दिलेली कार्यपद्धतीचा ती लागू होत असेल तेथवर अवलंब करावा.

## नमुना 'अ'

(विनियम १२ पहा)

### मुंबई महसूल न्यायाधिकरण, मुंबई

### अपीलांची नोंदवही

| अनुक्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | प्रतिवादीचे नाव व पत्ता | अपीलखालील आदेशाचा क्रमांक व दिनांक व तो देणारा प्राधिकारी | अपील दाखल केल्याचा दिनांक | प्राथमिक सुनावणीचा दिनांक | प्राथमिक सुनावणीचा निष्कर्ष किंवा तो स्विकारल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

| अंतिम सुनावणीचा दिनांक | अंतिम सुनावणीचा निष्कर्ष | फाईल अभिलेख उप-विभागात पाठविण्याचा दिनांक | अभिलेख उप-विभागाने फायलीला दिलेला क्रमांक | पुर्नविलोकन अर्ज असल्यास त्याचा क्रमांक | पुन:स्थापन अर्ज असल्यास त्याचा क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | | | | | | |

नमुना 'ब'

(विनियम १२ पहा)

**मुंबई महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

**पुनरीक्षण अर्जाची नोंदवही**

| अनुक्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | विरोधी पक्षकाराचे नाव व पत्ता | पुनरीक्षण करावयाच्या आदेशाचा क्रमांक व दिनांक आणि तो देणारा प्राधिकारी | पुनरीक्षण अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्राथमिक सुनावणीचा दिनांक | प्राथमिक सुनावणीचा निष्कर्ष किंवा तो स्विकारण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

| अंतिम सुनावणीचा दिनांक | अंतिम सुनावणीचा निष्कर्ष | फाईल अभिलेख उप-विभागाकडे पाठवल्याचा दिनांक | अभिलेख उप-विभागाने फाईलला दिलेला क्रमांक | पुनर्विलोकन अर्ज असल्यास त्याचा क्रमांक | पुनःस्थापन अर्ज असल्यास त्याचा क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | | | | | | |

नमुना 'क'

(विनियम १२ पहा)

**मुंबई महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

**पुर्नविलोकन अर्जाची नोंदवही**

| अनुक्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | प्रतिवादीचे नाव व पत्ता | न्यायाधिकरणाचा पुर्नविलोकना खालील आदेश | पुर्नविलोकन अर्ज दाखल करण्याचा दिनांक | प्राथमिक सुनावणीचा दिनांक | प्राथमिक सुनावणीचा निष्कर्ष किंवा तो स्विकारल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

| अंतीम सुनावणीचा दिनांक | अंतिम सुनावणीचा निष्कर्ष | पुर्नविलोकन करण्याचा आदेश द्यावयाच्या प्रकरणावर दिलेला नवीन नोंदणी क्र. | फाईल अभिलेख उप-विभागाकडे पाठविल्याचा दिनांक | अभिलेख उप-विभागाने फाईलीला दिलेला क्रमांक | पुर्नविलोकन अर्ज असल्यास त्याचा क्रमांक | पुनःस्थापन अर्ज असल्यास त्याचा क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| | | | | | | | |

नमुना 'ड'

(विनियम १२ पहा)

**मुंबई महसूल न्यायाधिकरण, मुंबई**

**पुनःस्थापन अर्जाची नोंदवही**

| अनुक्रमांक | अर्जदाराचे नाव व पत्ता | रद्द करण्याचे योजिलेल्या न्यायाधिकरणाच्या एकतर्फी निकालाचा क्रमांक व दिनांक | पुनः स्थापन अर्ज फाईल करण्याचा दिनांक | पुनः स्थापन अर्जाच्या सुनावणीचा दिनांक | सुनावणीचा निष्कर्ष | पुनः स्थापन केलेल्या फाईलीला दिलेला नवीन नोंदणी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| | | | | | | | |

## परिशिष्ट ३७

(कलमे ९-अ, १२, १५८, १६६, १९९, २०० या खालील तळटीपा आणि कलम २४७ खालील अनुसूची 'इ' पहा).

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १२ सप्टेंबर १९६८ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग.

---

### सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १९ सप्टेंबर १९६८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

### महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, यात दुरुस्ती करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, यात या पुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, यात सुधारणा करणे इष्ट आहे, त्याअर्थी याद्वारे भारतीय गणराज्याच्या एकोणीसाव्या वर्षी, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

१. या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६८, असे म्हणता येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ यात नवीन कलम ९-अ समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा 'मुख्य अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या कलम ९ नंतर पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल :—

शक्तीचे प्रत्यायोजन.

'९-अ. राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य शासनास असा निदेश देता येईल, की उक्त निदेशात निर्दिष्ट करण्यात येतील अशा महसूली किंवा भू-मापन अधिकाऱ्याच्या संबंधात, निर्दिष्ट करण्यात आलेल्या असतील तर अशा कोणत्याही शर्तीस अधीन राहून, कलम ७ व कलम ८ किंवा कलम ९ अन्वये नेमणुका करण्याच्या राज्य शासनाच्या शक्तीचा वापर, निदेशात निर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, यथास्थिती, जिल्हाधिकारी किंवा भूमि अभिलेख अधीक्षक यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यास सुद्धा करता येईल.'

१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १२ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मधील, "यामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या" या शब्दांनी सुरु होणाऱ्या, आणि "योग्य रीत्या अधिसूचित केली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुरा ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"तहसिलदाराच्या किंवा यथास्थिती, जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, यांच्या दर्जाच्या किंवा त्याहून वरच्या दर्जाच्या सर्व अधिकाऱ्यांची कलमे ६, ७, ८ आणि ९ अन्वये करण्यात आलेली नेमणूक योग्यरीत्या अधिसूचित करण्यात येईल."

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १५८ मधील सामासिक टीपेतील 'आणि प्रकरण १३ वगळणे' हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १५८ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १६६ मधील सामासिक टीपेतील 'शिकार' हा शब्द वगळण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १९६६ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम १९९ मधील " आणि अशा विक्रीस कोणत्याही इसमास बाध आणता येणार नाही " या मजकुराऐवजी " आणि कलम २०६ अन्वये विक्री रद्द करण्यात आली नसेल तर ती, विक्रीच्या तारखेपासून सात दिवसानंतर, सर्व इसमांच्या बाबतीत कायम होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम १९९ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम २०० पोट-कलम (२) मधील "आणि अशा विक्रीस कोणत्याही इसमास बाध आणता येणार नाही " या मजकुराऐवजी " आणि कलम २०६ अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा करण्यात आल्यावर तो नाकारण्यात आला असेल तर तो, विक्रीच्या तारखेपासून सात दिवसानंतर, सर्व इसमांच्या बाबतीत कायम होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या कलम २०० ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची 'इ' मधील अनुक्रमांक ४ शी संबंधीत नोंदीतील '१६' या आकड्याऐवजी '१५' हा आकडा दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४१ याच्या अनुसूची 'इ' ची सुधारणा.

---

## परिशिष्ट ३८

[कलमे ४ (१), (२), ८५, ११३, १५० आणि १९० या खालील तळटीपा पहा]

**सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८**

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १८ जानेवारी १९६९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी दुरुस्ती करण्यासाठी अधिनियम**

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास महाराष्ट्र जमीन महसूल (द्वितीय सुधारणा) अधिनियम, १९६८ असे म्हणता संक्षिप्त नाव. येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ४ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (ज्याचा यात यापुढे "मुख्य अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) यातील कलम ४, पोट-कलम (१) मधील परंतुकातील "अशा वाडीची किंवा क्षेत्राची लोकसंख्या," या मजकुरानंतर "जी, तहसीलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा महसूल अधिकारी निश्चित करील" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ८५ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमातील कलम ८५ मध्ये.—

(अ) पोट-कलम (६) मधील "पोट-कलम (४) च्या उपबंधात अधीन राहून, जिल्हाधिकाऱ्यास" या मजकुराऐवजी "जिल्हाधिकाऱ्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(ब) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ११३ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमातील कलम ११३ मधील पोट-कलम (१) खालील स्पष्टीकरणामध्ये "१५ वर्षाच्या मुदतीमधील जमिनीच्या विक्रीच्या आधारावर" या मजकुराऐवजी "१५ वर्षाच्या मुदतीमधील भूमि संपादन अधिनियम, १८९४ याखालील, जमिनीच्या विक्री, पट्टे व निवाडे याच्या आधारावर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १५० ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमातील कलम १५० मधील पोट-कलम (६) मध्ये.—

(अ) "प्रमाणित केल्या पाहिजेत" या मजकुरानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, ज्या नोंदीसंबंधी कोणताही वाद नसेल त्या नोंदी मंडळ निरीक्षकास तपासता येतील व प्रमाणित करता येतील".

(ब) परंतुकातील "परंतु" या शब्दाऐवजी "आणखी असे की", हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १९९ याची सुधारणा.

६. मुख्य अधिकानियमातील कलम १९९ मधील "आणि कलम २०६ अन्वये विक्री रद्द करण्यात आली नसेल तर ती, विक्रीच्या तारखेपासून सात दिवसानंतर सर्व इसमाच्या बाबतीत कायम होईल." या मजकुराऐवजी "आणि कलम २०६ अन्वये कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर, किंवा करण्यात आला असून तो नामंजूर करण्यात आला असेल तर विक्रीच्या तारखेपासून सात दिवसाची मुदत संपल्यावर विक्री सर्व इसमांच्या बाबतीत कायम होईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

---

## परिशिष्ट ३९

कलमे ३, ४ (१) (एक), ४४ (३), ११५, २४८, ३३८ (२) (तीस), ३३० (९) खालील तळ टीपा आणि कलम २४७ खालील अनुसूची 'इ' पहा :—

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास महाराष्ट्राच्या राज्यपालांची कर्तव्य पार पाडणारे श्री. एस. पी. कोतवाल यांची संमती १३ जानेवारी १९७० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग

## सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४

[राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" १५ जानेवारी १९७० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

### महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत नेमील* अशा तारखेस तो अंमलात येईल.

२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (ज्याचा यापुढे 'मुख्य अधिनियम' असा उल्लेख करण्यात आला आहे) याचे कलम ३ व कलम ४, पोट-कलम (१) खंड (एक) यातील "(मुंबई शहर धरून)" या मजकुराऐवजी "(मुंबई शहर वगळून)" हा मजकुर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याचे कलमे ३ व ४ यांची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ मधील पोट-कलम (३) मध्ये " त्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आंत " या मजकुरानंतर " किंवा यथास्थिती पंधरा दिवसाच्या आत " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याचे कलम ४४ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ११५ मधील " ज्या तारखेपासून कोणत्याही जमिनीचा अकृषिक कारणासाठी " या मजकुराऐवजी, " सहकारी संस्था व या राज्यात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधी अन्वये स्थापन केलेली गृहनिर्माण मंडळे यांच्या बाबतीत राज्य शासनाकडून अन्यथा निदेश देण्यात येईल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही जमिनीच्या ज्या तारखेपासून अकृषिक करण्यासाठी " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याचे कलम ११५ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम २४८ मध्ये " भूमि अभिलेख संचालकाने " या मजकुरानंतर " किंवा मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्यांच्या हाताखालील ज्या कोणत्याही सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याकडे जिल्हाधिकाऱ्याची अपील शक्ती निहित केली असेल त्या सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याने " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याच्या कलम २४८ ची सुधारणा.

---

*हा अधिनियम २५ मे १९७० रोजी शासकीय अधिसूचना क्रमांक यूएनएफ १६६७-चार दिनांक २५ मे १९७० अन्वये अंमलात आला. (परिशिष्ट ४० पहा).

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याच्या कलम ३२८ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ३२८, पोट-कलम (२), खंड (तीस) मधील " आणि क्षेत्राच्या " किंवा जमीन महसूलाच्या ज्या मर्यादांखाली विभागणी करण्याचे नाकारता येईल त्या मर्यादा " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस यात नवीन कलम ३३०-अ समाविष्ट करणे.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ३३० नंतर पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात येईल.

शक्तीचे व कर्तव्याचे प्रत्यायोजन.

" ३३०-अ. या अधिनियमात विवक्षितरित्या तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, राज्य शासन व राज्य शासनाच्या मान्यतेस आधीन राहून, कोणत्याही आयुक्तास किंवा जिल्हाधिकाऱ्यास, शासकीय राजपत्रीत अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती व त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा निर्बंधाच्या व शर्तीच्या कोणत्याही असल्यास, त्यांना अधीन राहून, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यास सुद्धा वापरता येतील.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याच्या अनुसूची'इ' ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची "इ" मधील स्तंभ १ यात " महसूल अधिकारी " या शीर्षकाखालील नोंद ३ मध्ये "जिल्हाधिकारी" या शब्दानंतर "(तो मुंबईचा जिल्हाधिकारी नसेल) हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

---

## परिशिष्ट क्र. ४०

(परिशिष्ट ३९ खालील तळटीप पहा)

**महसूल व वन विभाग**

सचिवालय, मुंबई, दिनांक २५ मे १९७०.

**महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६.**

क्रमांक युएनएफ-१६६७-आर. महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६६ च्या कलम १ चे पोट-कलम (२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, २५ मे १९७० हा दिनांक, हा अधिनियम अंमलात येण्यासाठी नेमीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्हो. सुब्रमणियन,
शासनाचे सचिव.

## परिशिष्ट क्र. ४१

(कलम ५४-ए खालील तळटीप पहा)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक ११ एप्रिल १९७० रोजी मिळाली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बो. पो. दलाल,
सचिव महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ११ एप्रिल १९७० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** राज्य शासनास असे प्रतिवेदित करण्यात आले आहे की सरकारी जमिनीवर विशेषतः बृहन्मुंबईत अनधिवासींची मोठी संख्या असून त्यांनी अनधिकृत बांधकामे उभारली आहेत व ते त्यांचा भोगवटा करीत आहेत आणि त्यांची संख्या शीघ्रतेने वाढत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** शासनाकडे निहित असलेल्या जमिनी अनधिकृतपणे भोगवटयात ठेवणाऱ्या व्यक्तींना संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या कलम ५३ अन्वये कार्यवाही करण्यात आली असून उक्त अधिनियमाच्या कलम ५४ अन्वये त्यापाठोपाठ ती बांधकामे जप्त करणे सुरू आहे ;

**आणि ज्याअर्थी,** काही प्रकरणी, तात्पुरती उपाययोजना म्हणून, या झोपडपट्टीवासीयांना त्यांनी अनुज्ञप्ती फी दिल्यानंतर जप्त केलेल्या बांधकामामध्ये राहण्याची शासनाने मुभा दिली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** या अनधिकृत बांधकामामध्ये, सुरक्षिततेसाठी, व स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या किमान सुखसोयी नाहीत व त्यामध्ये असणे शक्य नाही व त्यापैकी काही, सार्वजनिक शांतता धोक्यात आणणाऱ्या समाजविघातक चळवळीचे अड्डेही आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** यापुढे अशी बांधकामे व त्यांचा भोगवटा अधिक काल चालू राहू न देणे किंवा त्यास परवानगी न देणे आणि शासनाने त्या, अनुज्ञप्ती, कोणत्याही असल्यास, समाप्त करून, वापरासाठी किंवा समुचित प्रयोजनासाठी त्यांच्या जमिनीचा रिकामा कब्जा परत घेणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** अनधिकृत बांधकामे पाडून टाकण्यात किंवा काढून टाकण्यास व सरकारी जमीन भोगवटयात ठेवणाऱ्या अनेक व्यक्तींना बेदखल करण्यास बराच प्रभावी विरोध व अडथळा करण्यात येतो, कारण जमीन महसूल अधिनियम व इतर विद्यमान कायदे याखाली अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती दीर्घसूत्री असून ती अशा मोठ्या समस्येस तोंड देण्याच्या दृष्टीने जरब बसविणारी नाही असे आढळून आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** या समस्येला निकडीची मानून, तिला प्रभावी रीतीने तोंड देण्यासाठी तीव्र उपाययोजना करणे शासनास शक्य व्हावे म्हणून, तात्पुरत्या विशेष शक्ती शासनाकडे घेणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी—याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल (तात्पुरती सुधारणा) अधिनियम, १९७० असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, प्रारंभ व मुदत.

(२) तो २७ फेब्रुवारी १९७० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल व तो तीन वर्षाच्या कालावधीकरिता अंमलात राहील व त्यानंतर समाप्त होईल, आणि हा अधिनियम समाप्त झाल्यानंतर, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम १९०४ याचे कलम ७ हा अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे त्यावेळी रद्द करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस यात नवीन कलम ५४-अ समाविष्ट करणे.

२. हा अधिनियम ज्या कालावधीत अंमलात असेल त्या कालावधीत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ हा कलम ५४ नंतर पुढील नवीन कलम समाविष्ट करण्यात आले असल्याप्रमाणे अंमलात येईल :—

अनुज्ञप्ती समाप्त करण्यासाठी आणि कोणत्याही जमिनीवरील किंवा किनाऱ्या-लगतच्या प्रदेशातील जी कोणतीही इमारत किंवा बांध-काम जप्त केले असेल ती इमारत किंवा बांधकाम पाडून टाकण्यासाठी आणि बेदखलीनंतर जमीनीवर किंवा किना-ऱ्या लगतच्या प्रदेशावर पुन्हा प्रवेश करणाऱ्या किंवा रहाणाऱ्या व्यक्तींना काढून टाकण्यासाठी तात्पुरत्या अतिरिक्त शक्ती.

"५४-अ. (अ) कलम ५३ अन्वये कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही जमिनीवरून किंवा किनाऱ्या-लगतच्या प्रदेशातून बेदखल करण्यात आले असेल,

(ब) कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशात उभारलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम कलम ५४ अन्वये जप्त करण्यात आले असेल,

(क) जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर अनधिकृतपणे प्रवेश केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जमिनीसाठी किंवा तिच्यावरील बांधकामासाठी किंवा दोन्हीसाठी अनुज्ञप्ती फी दिल्यावर त्यानंतर रहाण्यास परवानगी देण्यात आली असेल.

त्याबाबतीत अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध किंवा उपरोक्त प्रमाणे अनुज्ञप्ती दिलेल्या बांधकामाच्या संबंधात करता येईल अशा कोणत्याही इतर कार्यवाहीस बाध न आणता —

(१) जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्याकडून प्राधिकृत करण्यात येईल असा शासनाचा कोणताही अधिकारी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत किंवा कोणत्याही करारात किंवा करारनाम्यात काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही वेळी आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, कोणत्याही व्यक्तीस देण्यात आलेली अनुज्ञप्ती किंवा परवानगी (कोणतीही असल्यास) ताबडतोब समाप्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(२) जिल्हाधिकारी, २४ तासापेक्षा कमी कालावधीची नसेल अशा लेखी नोटीशीद्वारे, जप्त केलेल्या बांधकामाचा त्यावेळी ताबा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जप्त केलेली इमारत किंवा इतर बांधकाम का पाडण्यात येऊ नये किंवा काढून टाकण्यात येऊ नये याबद्दल, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी व वेळी किंवा तत्पुर्वी, पुरेसे कारण दाखविण्यास फर्मावू शकेल, आणि जर अशी व्यक्ती, विनिर्दिष्ट दिवशी व वेळी किंवा तत्पुर्वी, जिल्हाधिकाऱ्यांची खात्री होईल असे कारण दाखविण्यात कसूर करील तर, जिल्हाधिकाऱ्यास, यथास्थिती, अशी इमारत किंवा असे बांधकाम पाडून टाकता येईल किंवा काढून टाकता येईल, आणि

(३) कोणत्याही व्यक्तीने (बेदखल केलेली व्यक्ती धरून) जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय अशा कोणत्याही जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर, प्रदेश करता कामा नये, त्यावर किंवा त्यात असता कामा नये किंवा त्यावरून जाता कामा नये, आणि जर कोणतीही व्यक्ती या कलमाचे उल्लंघन करून जमिनीवर किंवा किनाऱ्यालगतच्या प्रदेशावर प्रदेश करील किंवा त्यावर किंवा त्यात राहील किंवा तिच्यावरून जाईल तर, त्या व्यक्तीस, जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकृत अधिकाऱ्या-कडून तेथून काढून टाकता येईल आणि जिल्हाधिकाऱ्यास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास त्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल असे सर्व सहाय्य घेता येईल."

३. (१) महाराष्ट्र जमीन महसूल (तात्पुरती सुधारणा) अध्यादेश, १९७० हा, याद्वारे रद्द करण्यात येत आहे. सन १९७० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ रद्द करणे व व्यावृत्ति.

(२) अध्यादेश अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारण्यात आलेला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही ही या अधिनियमान्वये सुधारणा केलेल्या, मुख्य अधिनियमान्वये केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

---

## परिशिष्ट ४२

(कलमे २६१, २६२, २६२-अ, २६२-ब, २६२-क, २६२-ड, २६२-इ, २७२ आणि २७४ या खालील तळ टीपा पहा.)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती, दिनांक २९ ऑगस्ट १९६९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ४ सप्टेंबर १९६९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

### मुंबई शहरातील इनामी भू-धारणापद्धती आणि काही विशेष भू-धारणापद्धती नाहीशी करण्यासाठी आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, ज्या इनामी व विवक्षित विशेष भू-धारणाधिकारांवर जमिनी धारण करण्यात आल्या आहेत ते भू-धारणाधिकार नाहीसे करण्याचे व त्या जमिनी सामान्य जमीन-महसुलाच्या अधीन करण्याचे शासनाचे धोरण आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त धोरणानुसार, राज्य विधान मंडळांनी राज्यातून अधिनियमित संमत केलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, तदनुसार भूतपूर्व शासनांनी मुंबई शहराला निर्माण केलेल्या इनामी भू-धारणापद्धती आणि काही विशेष भू-धारणपद्धती नाहीशी करण्याचे योजिले होते आणि त्या प्रयोजनासाठी विधेयके तयार करून ती प्रसिद्ध करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, निरनिराळ्या व्यक्ती, संस्था आणि संघटना यांच्याकडून अभिवेदने, भाष्यके आणि समीक्षा आल्या होत्या ;

आणि ज्याअर्थी, त्यानंतर असे ठरविण्यात आले होते की, उक्त विधेयकांतील प्रस्ताव आणि आलेली अभिवेदने, भाष्यके व समीक्षा यांचा सरकारी व बिन-सरकारी सदस्यांची मिळून बनलेल्या अशा तज्ज्ञ समितीने विचार करावा. या समितीकडे सोपवलेल्या विचारार्थ विषयानुसार शहराच्या औद्योगिक सामाजिक व आर्थिक जीवनावर या प्रस्तावाच्या होणाऱ्या परिणामांचा विचार होणेही अपेक्षित होते ;

आणि ज्याअर्थी, नियुक्त करण्यात आलेल्या तज्ज्ञ समितीने बहुमताने असे ठरविले, की, शहरातील इनामी व विशेष भू-धारणपद्धती चालू ठेवण्यात कोणतेही संयुक्तिक कारण नाही पण तिने अशी जोरदार शिफारस केली आहे की, अशा नाहीशा करण्याच्या परिणामाचा प्रभाव सुसह्य करण्यासाठी आणि जमिनींच्या

प्रचलित बाजारमुल्यानुसार या जमिनींवर तात्काळ जमीन महसूल लादल्याच्या परिणाम म्हणून उद्‌भवणारा त्रास कमी करण्यासाठी कमी दराने आकारणी बसविणे, क्रमश: वाढत जाणाऱ्या प्रमाणानुसार आकारणी बसविणे, आणि अशा आकारणीची तत्त्वे खुद्द अधिनियमातच विनिर्दिष्ट करणे आणि ती केवळ राज्य शासनाच्या आदेशांच्या अधीन, जिल्हाधिकाऱ्याच्या स्वेच्छा निर्णयावर न सोपविणे, आवश्यक आहे ;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक, आर्थिक व अन्य कारणासाठी, समितीच्या मुख्य शिफारशी स्वीकारणे, व पूर्वोक्त धारणपद्धती नाहीशी केल्याचे घोषित करणे, वाजवी व संयुक्तिक आहे ;

आणि ज्याअर्थी, तज्ञ समितीने शिफारस केल्याप्रमाणे उक्त जमिनीच्या बाबतीतील आकारणीची तत्त्वे प्रस्तावित विधिविधानात जर विनिर्दिष्ट करावयाची असतील तर शहरातील इतर जमिनीच्या संबंधातील आकारणीची तत्त्वे, खुद्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ याच्या प्रकरण चौदा मध्ये तशाच रीतीने विनिर्दिष्ट करणे आवश्यक आहे असे वाटते ;

त्याअर्थी, आता, लोकहिताच्या दृष्टीने, इनामी भू-धारणापद्धती व काही विशेष भू-धारणापद्धती नाहीशा करणे, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात सुधारणा करणे आणि पूर्वोक्त प्रयोजनांशी संबंधित बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ति व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबई शहर (इनामी व विशेष भू-धारणापद्धती) नाहीशा करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९६९ असे म्हणता येईल.

(२) तो मुंबई शहरास लागू असेल.

(३) राज्य शासन "शासकीय राजपत्रातील" अधिसूचनेद्वारे * नियुक्त करील अशा तारखेला तो अंमलात येईल.

व्याख्या आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या प्रश्नांचा निर्णय करण्याची शक्ती.

२. (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(एक) "नेमलेला दिवस" म्हणजे हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात येईल ती तारीख ;

(दोन) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ ;

(तीन) "जिल्हाधिकारी" या शब्दप्रयोगात अपर जिल्हाधिकाऱ्यांचा आणि राज्य शासनाने या अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्यांच्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी नियुक्त केला असेल अशा अधिकाऱ्यांचाही समावेश होतो.

(चार) "फाजिदार" म्हणजे नियत जमीन भाडे भरून जी व्यक्ती सेवानिवृत्ती व कर भू-धारणापद्धतीवर राज्य शासनाकडून जमीन अखंडतेने धारण करीत असेल आणि जिने इमारती व इतर बांधणी उभारण्याच्या प्रयोजनार्थ अशी जमीन किंवा तिचे भाग इतर व्यक्तींना रूढ किंवा संमत भाडे भरल्यावर पट्टयाने दिलेली असेल अशी व्यक्ती ; ज्या इतर व्यक्तींना अशी जमीन किंवा तिचे भाग पट्टयाने देण्यात आले असतील त्या व्यक्तींना "फाजिदारी कुळे" असे संबोधण्यात येईल ;

(पाच) "फाजिदारी जमीन" म्हणजे फाजिदाराने धारण केलेली आणि अधिनियमाच्या कलम ३०५ अन्वये ठेवलेल्या नोंदणीपुस्तकांमध्ये व सारा यादीमध्ये अशी (जमीन) म्हणून नोंद केलेली जमीन;

(सहा) "प्रथम इनाम अनुदान" म्हणजे २८ डिसेंबर १७८३ या तारखेच्या प्रमाणपत्रान्वये शासनाने माणेकजी लोवजी यांना दिलेले जमीन महसूल भरण्याची माफी असलेल्या जमिनीचे अनुदान ;

(सात) "इनामदार" म्हणजे इनामी जमिनींचा धारक आणि त्यात, त्याच्या अधीन किंवा त्याच्यामार्फत वैधरीत्या जमीन धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींचा अंतर्भाव होतो ;

---

* हा अधिनियम, १ ऑगस्ट १९७१ पासून अंमलात आला (शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक सी.आय.ए.-१०६९-एल, दिनांक २६ जुलै १९७१ पहा. (परिशिष्ट ४३ पहा).

(आठ) "इनामी जमीन" म्हणजे प्रथम इनाम अनुदान, द्वितीय इनाम अनुदान किंवा तृतीय इनाम अनुदान याखाली धारण केलेली आणि अधिनियमाच्या कलम ३०५ अन्वये ठेवलेल्या नोंदणीपुस्तकांमध्ये किंवा सारा याद्यांमध्ये अशी जमीन म्हणून नोंद केलेली जमीन ;

(नऊ) "इनामी भू-धारणापद्धती" म्हणजे ज्या भू-धारणापद्धतीवर इनामी जमीन धारण करण्यात आली असेल ती भू-धारणापद्धती ;

(दहा) "विहित" म्हणजे नियमाद्वारे विहित ;

(अकरा) "विमोचित जमीन" म्हणजे भू-धारणापद्धतीच्या अटीअन्वये वरिष्ठ धारकाने पंचवीस वर्षांच्या किंवा तीस वर्षांच्या खण्डाइतकी अंशराशीकृत रक्कम भरल्यानंतर ,नेमलेल्या दिवसापूर्वी कोणत्याही वेळी ज्या विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनीच्या संबंधात, उपकर, आकारणी किंवा खंड यांचा वार्षिक भरणा करण्यापासून विमोचित करण्यात आली असेल ती जमीन ;

(बारा) "अनुसूची" म्हणजे या अधिनियमाची अनुसूची ;

(तेरा) "द्वितीय इनाम अनुदान" म्हणजे दिनांक २९ मे १८२८ च्या करारनाम्यात विनिर्दिष्ट केलेल्या जमिनींच्या संबंधात, उक्त कराराम्याद्वारे (मुंबईचे) नवरोजी जमशेटजी, मंचेरजी जमशेटजी आणि दोसाभाई जमशेटजी आणि अनुक्रमे त्यांचे वारस, मृत्युपत्र-व्यवस्थापक व कारभारी यांना शासनाने दिलेले जमीन महसुलाचे अनुदान ;

(चौदा) "विशेष भू-धारणापद्धती" म्हणजे ज्या भू-धारणापद्धतीवर जमीन धारण करण्यात आली असेल व अधिनियमाचे कलम ३०५ अन्वये ठेवलेल्या नोंदणीपुस्तकांमध्ये व सारा याद्यांमध्ये अशी जमीन म्हणून नोंद करण्यात आली असेल अशी सेवानिवृती व कर भू-धारणापद्धती, उक्त खंड जमीन भाडे भू-धारणापद्धती, फोरास भू-धारणापद्धती व सनदी भू-धारणापद्धती म्हणून संबोधण्यात णाऱ्या मुंबई शहरातील भू-धारणापद्धती ;

(पंधरा) "विशेष भू-धारणापद्धतीची जमीन" म्हणजे विमोचित जमीन धरून जी जमीन विशेष भू-धारणापद्धतीवर धारण केली असेल अशी जमीन ;

(सोळा) "वरिष्ठ धारक" म्हणजे—

(अ) फाजिदारी जमिनींच्या बाबतीत, फाजिदार ;

(ब) द्वितीय इनाम अनुदानाखाली धारण केलेल्या जमिनींच्या बाबतीत, इनामदारांकडून जमीन धारण करणारी व्यक्ती आणि इतर बाबतीत, इनामदार ; आणि

(क) विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनीच्या बाबतीत राज्य शासनाखाली अशा जमिनीचा सर्वोच्च मालकी हक्क असलेली व्यक्ती ;

(सतरा) "तृतीय इनाम अनुदान" म्हणजे दिनांक १९ डिसेंबर १८८५ च्या कराराम्याद्वारे मुंबईचे खान बहादूर जमशेटजी धुनजीभाय वाडिया, त्यांचे वारस आणि अभिहस्तांकिती यांना शासनाने दिलेले जमीन महसूल भरण्याची माफी असलेल्या जमिनीचे अनुदान ;

(अठरा) या अधिनियमात वापरलेले पण व्याख्या न केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांचा अर्थ, अधिनियमाचे प्रकरण १४ मध्ये त्यांना जो अर्थ दिलेला असेल तोच असेल.

(२) कोणतीही जमीन ही इनामी जमीन, फाजिदारी जमीन किंवा विशेष भू-धारणापद्धतीची जमीन आहे किंवा नाही, किंवा कोणतीही व्यक्ती वरिष्ठ धारक आहे किंवा नाही, असा कोणताही प्रश्न उद्भवल्यास, राज्य शासन, अधिनियमान्वये ठेवलेल्या अभिलेखात केलेल्या संबंधित नोंदी विचारात घेऊन आणि त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर : त्या प्रश्नाचा निर्णय करील आणि असा निर्णय अंतिम असेल ;

परंतु, राज्य शासनाला अशा प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल, आणि राज्य शासनाकडे अपील करण्यास (जे अशा अधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या दिवसापासून नव्वद दिवसांपेक्षा उशीरा नसेल अशा मुदतीत करण्यात येईल) अधीन राहून, अशा अधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल.

(३) राज्य शासन, पोट-कलम (२) खालील अपिलाचा निर्णय करण्यासाठी उप-सचिवाच्या दर्जाहून कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

इनामी फाजिदारी आणि विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनींना हा अधिनियम लागू होणे व अधिनियमाचे प्रकरण १४ लागू होणे.

३. (१) या अधिनियमात स्पष्टपणे उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाचे उपबंध, अधिनियमाच्या कलम २०५ अन्वये ठेवलेल्या नोंदणीपुस्तकांमध्ये व सारा याद्यांमध्ये दाखल केल्याप्रमाणे फाजिदारी जमीन म्हणून इनामी भू-धारणापद्धतीवर किंवा विशेष भू-धारणापद्धतीवर धारण केलेल्या जमिनींना लागू होतील.

(२) अधिनियमाच्या प्रकरण चौदाचे उपबंध (द्वितीय अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या फेरफारासह) जेथवर या अधिनियमांच्या उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर ते उक्त जमिनींना लागू होतील.

इनामी भू-धारणापद्धती व विशेष भू-धारणापद्धती नाहीशी करणे, वरिष्ठ धारकांच्या जमीन अधिकारांचे निर्वापण; व जमीन महसूल देण्याचे दायित्व.

४. (१) कोणताही परिपाठ किंवा रूढि यात किंवा कोणतीही तडजोड, अनुदान, सनद, प्रमाणपत्र, विलेख किंवा इतर लेख यात किंवा न्यायालयाच्या कोणत्याही डिक्रीत किंवा आदेशात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही असले तरी, नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून—

(अ) इनामी भू-धारणापद्धती आणि विशेष भू-धारणापद्धती नाहीशा करण्यात येतील ;

(ब) द्वितीय इनाम अनुदानान्वये इनामी जमिनीच्या बाबतीत जमीन महसूल वसूल करण्याचा इनामदाराचा हक्क नष्ट करण्यात येईल ;

(क) इनामी जमिनीवर किंवा विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनीवर महसुलाची आकारणी करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारास मर्यादा घालणारा वरिष्ठ धारकाचा, मुळीच आकारणी न करण्याचा किंवा विनिर्दिष्ट मर्यादेपलीकडे आकारणी न करण्याचा अधिकार नष्ट करण्यात येईल ;

(ड) तीस वर्षांच्या आकारणीपेक्षा किंवा खंडापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम भरून, विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनीच्या आकारणीचे किंवा खंडाचे नेमलेल्या दिवसापूर्वी केलेले विमोचन रद्द करण्यात येईल ; आणि अशा जमिनी आकारणी-मुक्त धारण करण्याचे बंद होईल ; आणि

(इ) सर्व इनामी जमिनी आणि विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनी या अधिनियमाच्या उपबंधांनुसार राज्य शासनाला जमीन महसूल देण्यास पात्र ठरतील आणि—

(एक) द्वितीय इनाम अनुदानान्वये वरिष्ठ धारकाने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत, अशी जमीन कब्जात असलेली व नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी त्या अनुदानाच्या अटीनुसार वरिष्ठ धारकाला खंड किंवा आकारणी देण्यास जबाबदार असलेली व्यक्ती, आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, वरिष्ठ धारक अशा जमिनीच्या संबंधात, राज्य शासनाला देय असलेला जमीन महसूल भरण्यास मुख्यत: जबाबदार असेल.

(२) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी, कोणतीही इनामी जमीन किंवा विशेष भू-धारणापद्धतीची जमीन मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याच्या अर्थानुसार विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा भाग बनलेली असेल त्याबाबतीत, अशी इनामी जमीन किंवा यथास्थिती, विशेष भू-धारणापद्धतीची जमीन जोपर्यंत ती अशा विश्वस्त व्यवस्थेचा भाग असण्याचे व अशा विश्वस्त व्यवस्थेच्या उद्देशांसाठी वापरण्याचे चालू असेल तोपर्यंत—

(एक) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी तिच्या संबंधात, भू-धारणापद्धतीच्या अटीनुसार वरिष्ठ धारकास किंवा यथास्थिति राज्य शासनास देय असलेल्या उपकराच्या, खण्डाच्या किंवा आकारणीच्या रकमेइतका जमीन महसूल भरण्यास राज्य शासनाला जबाबदार असेल, किंवा

(दोन) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी तिच्या संबंधात असा कोणताही उपकर, खंड किंवा आकारणी देय नसेल तर, जमीन महसूल न भरता धारण करण्यात येईल.

५. आपल्या जमिनीची आकारणी करणे सुकर होण्याच्या प्रयोजनार्थ, प्रत्येक वरिष्ठधारक, नेमलेल्या वरिष्ठ धार-दिवसापासून *[एक वर्ष सहा महिन्याच्या] मुदतीत, अशी माहिती विहित करण्यात येईल अशा नमुन्यात काने विवरण देणारे त्याच्या इनामी किंवा विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनी संबंधातील एक विवरण जिल्हाधिकाऱ्यास पुरविणे. सादर करील :

परंतु, अज्ञान किंवा वेड्या व्यक्तीच्या बाबतीत त्याचा पालक, विश्वस्त व्यवस्थेच्या बाबतीत तिचे विश्वस्त, शारीरिक किंवा मानसिक नि:समर्थतेने पीडित व्यक्तीच्या बाबतीत व कायद्याने संस्थापित केलेल्या किंवा कायद्याने संस्थापित न केलेल्या संघाच्या बाबतीत, त्याचा किंवा तिचा प्राधिकृत अभिकर्ता असे विवरण सादर करू शकेल.

६. कलम ५ अन्वये विवरण पुरविण्यास फर्माविलेली व्यक्ती वाजवी कारणाशिवाय पूर्वोक्त काला-वधीत असे विवरण पुरविण्यात कसूर करील तेव्हा जिल्हाधिकारी विहित रीतीने चौकशी केल्यानंतर वरिष्ठ धारकावर पन्नास रुपयांची शास्ती लादील. विवरण पुरविण्यास कसूर केल्या-बद्दल शास्ती.

७. या अधिनियमाच्या प्रारंभानंतर (द्वितीय इनाम अनुदानान्वये ज्या जमिनी धारण केलेल्या नसतील अशा) इनामी भू-धारणापद्धतीवर व विशेष भू-धारणापद्धतीवर अशा प्रारंभाच्या निकटपूर्वी धारण केलेल्या जमिनींची जमीन महसूलासाठी करावयाची आकारणी कलम ८ च्या उपबंधांनुसार निश्चित करण्यात येईल; आणि अशारीतीने निश्चित केलेली आकारणी नेमलेल्या दिवसापासून बसविण्यात येईल; आणि हमीची मुदत संपल्यानंतर ती अधिनियमाच्या उपबंधानुसार निश्चित केली जाण्यास पात्र होईल. इनामी व विशेष भू-धारणापद्ध-तींवर धारण केलेल्या जमिनींची प्रारंभिक आकारणी कलम ८ अन्वये निश्चित करणे; आणि नंतर हमीची मुदत अधि-नियमाच्या उपबंधानुसार निश्चित करणे.

८. (१) (द्वितीय इनाम अनुदानान्वये ज्या जमिनी धारण केलेल्या नसतील अशा) इनामी भू-धारणापद्धतीवर किंवा विशेष भू-धारणापद्धतीवर, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, धारण केलेल्या जमिनींची आकारणी, प्रत्येक महसूली विभागात, या कलमात तरतूद केलेल्या रीतीने निश्चित करण्यात येईल. नेमलेल्या दिवसापूर्वी इनामी किंवा विशेष भू-धारणा-पद्धतीवर धारण केलेल्या जमिनींवरील आकारणी व तद-नुषंगिक बाबी.

(२) या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकारी, राज्य शासनाच्या मान्यतेने, प्रत्येक महसुली विभागात जमिनीच्या प्रत्येक चौरस मीटरवरील आकारणीचा दर ("आकारणीचा प्रमाण दर" असे संबोधण्यात येईल) निश्चित करील व ती अशा महसुली विभागातील बांधकाम न केलेल्या भूखंडाच्या बाजार मूल्याच्या सरासरीच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम असेल.

(३) असे बाजार मूल्य हे २ डिसेंबर १९५७ रोजी (या तारखेस राज्य शासनाने मुंबई शहरातील इनामी व विवक्षित विशेष भू-धारणापद्धती नाहीशा करण्याचा आपला इरादा त्याबाबतीत सन १९५७ चे विधान सभा विधेयक क्रमांक ६२ प्रसिद्ध करून जाहीर केला) अंदाजिलेले अशा जमिनीचे मूल्य असेल.

---

*हा मजकूर "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी, १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ चे कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

(४) बाजार मूल्य, पुढील गोष्टींच्या आधारावर, विहित रीतीने अंदाजित करण्यात येईल :—

(अ) २ डिसेंबर १९५७ च्या निकटपूर्ववर्ती पंधरा वर्षांच्या कालावधीत त्या महसूली विभागातील जमिनीची विक्री ;

(ब) पूर्वोक्त पंधरा वर्षांच्या कालावधीत त्या महसूली विभागात भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये भूमि संपादनाशी संबंधित निवाडे ;

(क) पूर्वोक्त कालावधीतील महसूली विभागातील जमिनींचे भाडेमूल्य.

(५) प्रत्येक महसूल विभागातील एकेकटया भूखंडाची प्रत्यक्ष आकारणी (यापुढे जिचा "पूर्ण आकारणी" असा उल्लेख करण्यात आला आहे), दर चौरस मीटरच्या रुपयातील आकारणीचा प्रमाण दर आणि चौरस मीटरमध्ये भूखंडाचे क्षेत्रफळ यांचा, विहित रीतीने पूर्णांक केलेल्या गुणाकाराइतक्या रकमेत जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल.

(६) पूर्वोक्तप्रमाणे निश्चित केलेल्या आकारणीचे प्रमाण दर अंमलात आणण्यापूर्वी शासकीय राजपत्रात आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील.

(७) इनामी किंवा विशेष भू-धारणापद्धती जमिनींच्या संबंधात, या कलमाच्या उपबंधानुसार निश्चित केलेली पूर्ण आकारणी नेमलेल्या दिवसापासून पन्नास वर्षांच्या कालावधीकरिता (अशा कालावधीस "हमीचा कालावधी" म्हणून संबोधण्यात आले आहे) अंमलात राहील.

(८) पूर्वोक्तप्रमाणे निश्चित केलेली पूर्ण आकारणी पुढील रीतीने क्रमशः बसविण्यात येईल, म्हणजेच——

(अ) नेमलेल्या दिवसापासून पहिल्या दहा वर्षांकरिता, पूर्ण आकारणीच्या १० टक्के दराने ;

(ब) नंतरच्या दहा वर्षांकरिता, पूर्ण आकारणीच्या २५ टक्के दराने ;

(क) नंतरच्या दहा वर्षांकरिता, पूर्ण आकारणीच्या ५० टक्के दराने ;

(ड) नंतरच्या दहा वर्षांकरिता, पूर्ण आकारणीच्या ७५ टक्के दराने.

नेमलेल्या दिवसापासून ४० वर्षे समाप्त झाल्यानंतर, प्रत्येक महसूली विभागातील जमिनी नंतरच्या दहा वर्षांच्या कालावधीकरिता पूर्ण आकारणी देण्यास पात्र असतील ; आणि त्यानंतर ह्या जमिनींची पूर्ण आकारणी महसूल अधिनियमाच्या कलम २६२-इ द्वारे उपबंधित केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास पात्र होईल , अशा रीतीने आकारणी सुधारण्यात येईपर्यंत, करण्यात आलेली आकारणी, हमीचा कालावधी संपला असला तरीही, अंमलात असण्याचे चालू राहील.

(९) आपल्या जमिनीची आकारणी किंवा तिचे बाजार मूल्य यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे हानि पोहचलेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाकडे अपील करता येईल :

परंतु, अशा अपिलांचा निर्णय करण्यासाठी, राज्य शासनास उप-सचिवाच्या दर्जाहून कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल.

(१०) अशी अपीले दाखल करण्याकरिता आणि निकालात काढण्याकरिता राज्य शासनास कलम १९ अन्वये नियम (मर्यादा, कालावधी व सुनावणी यासंबंधी तरतूद धरून) करता येतील.

(११) या कलमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, कोणत्याही महसूली विभागातील कोणत्याही एकटया भूखंडाची पूर्वोक्तप्रमाणे निश्चित केलेली प्रत्यक्ष आकारणी ही, त्या भूखंडाच्या संबंधात आधीच बसविण्यात आलेल्या करांची एकूण रक्कम, त्याच्या परिरक्षणाचा खर्च, अशा भूखंडापासून मिळणारे दरसाल एकूण उत्पन्न, ज्या प्रयोजनाकरिता भूखंडाचा वापर करण्यात आला असेल ते प्रयोजन, आकारणी देण्यामुळे जमिनीच्या अशा वापरावर ज्या मर्यादेपर्यंत परिणाम होईल ती मर्यादा आणि त्यापासून उद्भवणारे अनिष्ट परिणाम, कोणतेही असल्यास, आणि कोणतेही इतर संबंधित घटक लक्षात घेता, राज्य शासनाच्या मते अधिक असेल त्याबाबतीत, राज्य शासनास त्या भूखंडाच्या संबंधात देय असलेली आकारणी कमी करता येईल, परंतु ती अशाप्रकारे की, वरिष्ठ धारक भूखंडाच्या निव्वळ उत्पन्नामधून अशी कमी केलेली आकारणी भरण्यास समर्थ होईल.

**इनामदारांच्या खनिज-विषयक अधिकारांची व्यावृत्ति.**

९. इनामी जमीन ज्या भू-धारणापद्धतीवर धारण केलेली असेल ती भूधारणापद्धती या अधिनियमाद्वारे नष्ट करण्यात आली असली तरीही, अशा जमिनीतील खाणी किंवा खनिज पदार्थ यासंबंधी राज्य शासनाने करारान्वये किंवा अनुदानान्वये दिलेल्या किंवा एखाद्या सक्षम न्यायालयाच्यानिर्णयाद्वारे मान्य केलेल्या सर्व इनामदारांच्या, नेमलेल्या दिवशी अस्तित्वात असलेल्या अधिकारांना या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा पोहोचत असल्याचे मानण्यात येणार नाही.

**पूर्ण आकारणीच्या पन्नास टक्के रक्कम भाडेकऱ्यांकडून वसूल करण्याची घरमालकांची शक्ती, सन १९४७ चा मुंबई अधिनियम सत्तावन्नावा याची सुधारणा.**

१०. कोणत्याही इनामी किंवा विशेष धारणा पद्धतीच्या जमिनीवरील जागांच्या घर मालकास, अशा जमिनीच्या संबंधात देय असलेल्या आकारणीच्या रकमेच्या पन्नास टक्क्याइतकी रक्कम त्याच्या भाडेकऱ्याकडून किंवा एकापेक्षा अधिक भाडेकरी असतील तर अशा सर्व भाडेकऱ्यांकडून वसूल करण्याचा हक्क असेल; आणि त्या प्रयोजनाकरिता, मुंबई भाडे नियंत्रण आणि पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७, प्रथम अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या पद्धतीने आणि विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात येईल.

**द्वितीय इनाम अनुदानान्वये धारण केलेल्या इनामी जमिनींच्या इनामदाराला भरपाई.**

११. द्वितीय इनाम अनुदानान्वये धारण केलेल्या इनामी जमिनीच्या बाबतीत, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्ववर्ती वर्षाबद्दल, इनामदारास जमीन महसुलाची जी रक्कम मिळाल्याचे सिद्ध झाले असेल त्या रकमेच्या सात पटींइतकी रक्कम, कलम ४, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये, अशा जमिनीतील त्याचे अधिकार नष्ट केल्याबद्दल भरपाई म्हणून इनामदाराला देण्यात येईल.

**विमोचित जमिनीच्या संबंधात भरपाई.**

१२. विमोचित जमिनीच्या वरिष्ठधारकाला, कलम ४, पोट-कलम (१), खण्ड (ड) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे आकारणीचे किंवा खण्डाचे विमोचन रद्द केल्याबद्दल भरपाई म्हणून त्या जमिनीच्या संबंधातील जमीन महसुलाच्या वार्षिक भरण्यात, जो वार्षिक उपकर, खण्ड किंवा आकारणी देण्यापासून विमोचित करण्यात आलेले असेल त्या वार्षिक उपकराची खंडाच्या किंवा आकारणीच्या रकमे इतक्या रकमेची कपात करण्याची मागणी करण्याचा हक्क असेल.

**इनामदाराला भरपाई देण्याची पद्धती.**

१३. (१) कलम ११ अन्वये भरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या इनामदारास किंवा कलम १२ अन्वये भरपाई मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस कलम ११ किंवा कलम १२ अन्वये त्यास देय असलेली भरपाईची रक्कम ठरविण्यासाठी, विहित नमुन्यात आणि विहित कालावधीत जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यावर, जिल्हाधिकारी, विहित केलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर, भरपाईची रक्कम ठरविणारा निवाडा देईल. भरपाईचा दावा सांगणारे सहभागीदार असतील त्याबाबतीत, जिल्हाधिकारी आपल्या निवाड्याद्वारे सहभागीदारामध्ये भरपाईचे संविभाजन करील.

**मालमत्तेतील इतर व्यक्तींचे अधिकार नाहीसे करणे, इत्यादींबद्दल भरपाई देण्याची पद्धती.**

**१४.** (१) कोणत्याही व्यक्तीस, मालमत्तेतील तिच्या अधिकारांपैकी कोणतेही अधिकार किंवा हितसंबंध नाहीसे करणे, नष्ट करणे किंवा त्यात फेरबदल करणे यांसारख्या या अधिनियमाच्या उपबंधांमुळे हानि पोहोचली असेल तर, आणि असे नाहीसे करणे, निर्वापण किंवा फेरबदल याबद्दल भरपाई देण्याची या अधिनियमाच्या पूर्वगामी उपबंधात तरतूद केलेली नसेल तर, अशा व्यक्तीस, भरपाईसाठी विहित नमुन्यात व विहित कालावधीत जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) जिल्हाधिकारी विहित रीतीने चौकशी केल्यानंतर भूमि संपादन अधिनियम, १८९४ याचे कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने व पद्धतीनुसार भरपाई ठरविणारा निवाडा देईल.

(३) ज्या कोणत्याही जमिनीला जमीन महसूल भरण्यापासून पूर्णतः किंवा अंशतः सूट मिळाली होती किंवा जिच्यावर जमीन महसूलाची कोणतीही आकारणी न करण्याचा किंवा विनिर्दिष्ट मर्यादेपलीकडे आकारणी करण्याचा राज्य शासनाचा अधिकार मर्यादित करून जी धारण केली होती अशी जमीन या अधिनियमाच्या उपबन्धानुसार पूर्ण आकारणी भरण्यास या अधिनियमाच्या उपबन्धान्वये अधीन केलेली आहे या कारणावरून, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही व्यक्तीला भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही.

**भूमि संपादन अधिनियम, १८९४ चे उपबंध निवाड्यास लागू असणे.**

**१५.** कलम १४ अन्वये दिलेला प्रत्येक निवाडा, भूमि संपादन अधिनियम, १८९४ याचे कलम २६ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असेल आणि उक्त अधिनियमाचे उपबंध, शक्य होईल तितपत, असा निवाडा देण्यासंबंधात लागू होतील.

**जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्ध महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करणे.**

**१६.** महसूल अधिनियमाच्या प्रकरण पंधरामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, उक्त प्रकरणान्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्ध, अपील करता येईल आणि (मर्यादाकाल व न्यायालय फी संबंधीचे उपबंध धरून) उक्त प्रकरणाचे उपबंध असे अपील दाखल करण्यास आणि ते निकालात काढण्यास लागू होतील.

**भरपाईची रक्कम हस्तांतरणीय बंधपत्रांमध्ये देय असणे.**

**१७.** या अधिनियमाच्या उपबंधांन्वये देय असलेली भरपाईची रक्कम, हस्तांतरणीय बंधपत्रामध्ये देण्यात येईल व त्यावर अशी बंधपत्रे दिल्याच्या तारखेपासून दरसाल दर शेकडा चार दराने व्याज मिळेल आणि ती, अशी बंधपत्रे दिल्याच्या तारखेपासून वीस वर्षांच्या कालावधीत मुद्दल व व्याज यांच्या समीकृत वार्षिक हप्त्याने परत देण्यात येईल. ती बंधपत्रे विहित करण्यात येतील अशा अभिधानाची आणि अशा नमुन्यात असतील.

**वरिष्ठधारकाने प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे अभिलेख देणे.**

**१८.** (१) राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेला अधिकारी तसा निदेश देईल तेव्हा, वरिष्ठधारक त्याच्या जमिनीसंबंधात त्याने ठेवलेले [illegible]कडे किंवा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर अधिकाऱ्याकडे देईल.

(२) वाजवी कारणाशिवाय असे कोणतेही [illegible] धारक कसूर करील तर, दोषसिद्धीनंतर त्यास पराकाष्ठा दोनशे रुपयापर्यंतच्या दंडाची शिक्षा होईल. असे कोणतेही अभिलेख देण्यास कसूर करण्याचे चालू ठेवले असेल त्या बाबतीत, वरिष्ठ धारकास, प्रथम अशी कसूर केल्याबद्दल दोषी ठरविल्यानंतर ज्या मुदतीत अशा रीतीने कसूर करणे चालू राहील त्या मुदतीत दर दिवसामागे पराकाष्ठा पंचवीस रुपयापर्यंतच्या अतिरिक्त दंडाची शिक्षा होईल.

१९. (१) राज्य शासनास, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाचे उपबंध नियम पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी नियम करता येतील. असे नियम, अंतिमरित्या करण्यात येतील तेव्हा **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(२) ह्या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, तो नियम, अशा निर्णयाची अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा रद्द करणे यामुळे नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

२०. (१) या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, दुसऱ्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महसूल अधिनियमाचे उपबंध, हा अधिनियम ज्या जमिनींना लागू होतो त्या जमिनीं-व्यतिरिक्त इतर जमिनींस लागू करताना, त्यात, तिच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व मर्यादेपर्यंत, याद्वारे सुधारणा करण्यात येत आहे.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याची सुधारणा.

(२) शंका निरसनासाठी याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, दुसऱ्या अनुसूचीतील कोणत्याही गोष्टीमुळे खालील गोष्टींवर परिणाम होणार नाही :

(एक) नेमलेल्या दिवसापूर्वी जिल्हाधिकाऱ्याने महसूल अधिनियमाचे कलम २६२ अन्वये निश्चित केलेल्या किंवा शहरातील कोणत्याही जमिनीसंबंधात अशा जमिनी-संबंधात दिलेल्या हमीच्या किंवा केलेल्या तडजोडीच्या कालावधीत त्याचे कलम २०७ अन्वये व्यावृत्त केलेल्या जमीन महसुलाच्या आकारणीची वैधता ; किंवा

(दोन) महसूल अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याने निश्चित केलेला जमीन महसूल, दिलेल्या हमीच्या किंवा केलेल्या तडजोडीच्या कालावधीत भरण्याचे (आकारणी करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारास मर्यादा घालणारा कोणताही अधिकार नसलेल्या) कोणत्याही वरिष्ठ धारकाचे किंवा कब्जा असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे दायित्व किंवा महसूल अधिनियमाचे कलम २०५ अन्वये ठेवलेल्या नोंदणापुस्तकात व सारा यादीत दाखल केलेल्या व या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये नाहीसे न केलेल्या कोणत्याही भू-धारणापद्धतीअन्वये कायम व परिरक्षण करण्यात आलेल्या विनिर्दिष्ट मर्यादेचा परिणाम म्हणून, (आकारणी करण्याच्या राज्य शासनाच्या अधिकारास मर्यादा घालणारा अधिकार असलेल्या) कोणत्याही वरिष्ठ धारकाचे किंवा कब्जा असलेल्या व्यक्तीचे भू-धारणापद्धती अन्वये बसविता येण्याजोगी कोणतीही आकारणी, खंड किंवा उपकर देण्याचे दायित्व.

## पहिली अनुसूची

### (कलम १० पहा)

### सन १९४७ चा मुंबई अधिनियम सत्तावन्न याची सुधारणा

[illegible] पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ यात कलम १०-ई [illegible] विष्ट करण्यात येईल :—

"१०-स. (१) कोणत्याही इनामी जमिनीवरील किंवा विशेष भू-धारणापद्धतीच्या [illegible] वरील जागेच्या जमीन मालकास अशा जमिनीच्या संबंधात मुंबई शहर (इनामी आणि विशेष भू-धारणा बसविल्यामुळे पद्धती) नाहीशा करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, १९६९ याच्या भाडयात वाढ उपबंधास अनुसरून आकारणी देणे भाग पडत असेल त्या बाबतीत अशा जमीन मालकास, कोणत्याही होणे.

विधीत किंवा करारात किंवा संविदेत किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही डिक्रीत किंवा आदेशात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशा जमिनीसंबंधात देय असलेल्या आकारणीच्या रकमेच्या पन्नास टक्क्यांइतकी रक्कम भाडेकऱ्यांकडून किंवा एकापेक्षा अधिक भाडेकरी असतील त्या बाबतीत त्याच्या सर्व भाडेकऱ्यांकडून वसूल करण्याचा आणि पोट-कलम (२) अन्वये ठरविल्याप्रमाणे त्याच्या जागेच्या भाड्यात वाढ करण्याचा हक्क राहील.

(२) प्रत्येक भाडेकऱ्याने त्याच्या जागेच्या संबंधात द्यावयाच्या भाड्याचे, इनामी किंवा विशेष भू-धारणापद्धतीच्या जमिनीसंबंधात देय असलेल्या आकारणीच्या एकूण रकमेशी जे प्रमाण असेल तेच प्रमाण, त्याच्याकडून वसूल करावयाच्या भाड्यातील वाढीच्या रकमेचे असेल.

(३) या कलमान्वये केलेली कोणतीही वाढ ही कलम ७ च्या प्रयोजनांकरिता वाढ असण्याचे मानण्यात येणार नाही."

## द्वितीय अनुसूची

(कलम २० पहा)

### सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस याची सुधारणा

| अधिनियमाचे उपबंध<br>(१) | सुधारणेची व्याप्ति<br>(२) |
|---|---|
| महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम एकेचाळीस) याचे प्रकरण १७. | १. कलम २६१ मध्ये,—<br>(१) खंड (अ) पूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—<br>"(१-अ) "शहर भू-धारणापद्धती नाहीशा करण्याबाबत आणि अधिनियम" म्हणजे मुंबई शहर (इनामी व विशेष भूधारणा पद्धती) नाहीशा करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम १९६९ ;" (२) खंड (अ) नंतर, पुढील नवीन खंड समाविष्ट करण्यात येईल :—<br>"(अअ) 'महसुली विभाग' म्हणजे राज्य शासनाच्या आदेशास अधीन राहून, जिल्हाधिकारी शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे, एखाद्या महसुली विभागातील जमिनींच्या आकारणीचा प्रमाणभूत दर ठरविण्याच्या प्रयोजनाकरिता महसुली विभाग म्हणून बनवील असे मुंबई शहरातील स्थानिक क्षेत्र" ;<br>(३) खंड (ड) नंतर, पुढील खंडाची भर घालण्यात येईल :—<br>"या प्रकरणात वापरण्यात आलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या शब्दांचे व शब्दप्रयोगांचे अर्थ, शहर भूधारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमात, त्यांचे अनुक्रमे जे अर्थ दिले आहेत, तेच असतील." |

| अधिनियमाचे उपबंध | सुधारणेची व्याप्ति |
| --- | --- |
| (१) | (२) |

२. कलम २६२ ऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

जमीन महसुलाची आकारणी निश्चित करण्याची द ती बसविण्याची जिल्हाधिकाऱ्याची शक्ती.

"२६२. (१) पोट-कलम (२) आणि पोट-कलम (३) यांच्या उपबंधास अधीन राहून, जमीन महसुलाची आकारणी निश्चित करणे व ती बसविणे हे जिल्हाधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

(२) राज्य शासनाचा आकारणी करण्याचा अधिकार मर्यादित करणारा वरिष्ठ धारकाला कोणताही अधिकार नसेल तेव्हा त्याबाबतीत, शहर भूधारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, या प्रकरणानुसार आकारणी निश्चित करण्यात येईल.

(३) कायम करण्यात व परिरक्षण करण्यात आलेल्या आणि शहर भू-धारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमान्वये नाहीशा न केलेल्या विनिर्दिष्ट मर्यादेचा परिणाम म्हणून राज्य शासनाचा आकारणी करण्याचा अधिकार मर्यादित करणारा, वरिष्ठ धारकाला अधिकार असेल त्याबाबतीत, आकारणी अशा विनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही."

३. कलम २६२ नंतर, पुढील नवीन कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

आकारणीचा दर बाजारमूल्याच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही.

"२६२-अ. इनामी किंवा विशेष भू-धारणापद्धतीवर धारण केलेल्या जमिनींच्या प्रारंभिक आकारणीकरिता, शहर भू-धारणापद्धती नाहीशा करण्याबाबत अधिनियमात उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, प्रत्येक महसुली विभागातील अशा जमिनींच्या आकारणीचा दर, जेव्हा त्या बांधकाम न केलेले भूखंड म्हणून वापरण्यात आल्या असतील तेव्हा, भारताची रिझर्व्ह बँकेबाबत अधिनियम, १९३४ याच्या कलम ४९ अन्वये भारताच्या रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या, बँकेच्या व्याजाच्या दराच्या आधारे याबाबतीत राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा, त्यांच्या बाजारमूल्याच्या सरासरीच्या टक्केवारीपेक्षा अधिक असणार नाही.

आकारणीचा प्रमाणभूत दर.

२६२-ब. (१) कलम २६२-अ च्या उपबंधास अधीन राहून, जिल्हाधिकारी, राज्य शासनाच्या मान्यतेने प्रत्येक महसुली विभागातील दर चौरस मीटर जमिनीच्या आकारणीचा दर ("त्यास आकारणीचा प्रमाणभूत दर"

| अधिनियमाचे उपबंध | सुधारणेची व्याप्ति |
| --- | --- |
| (१) | (२) |
| | म्हणून संबोधण्यात येईल) निश्चित करील आणि तो कलम २६२-अ अन्वये राज्य शासनाने निश्चित केला असेल अशा, प्रत्येक विभागातील बांधकाम न केलेल्या भूखंडा च्या बाजारमूल्याच्या सरासरीच्या टक्केवारीच्या रकमेइतका असेल. |
| | (२) बाजारमूल्य, पुढील गोष्टींच्या आधारावर विहित रीतीने अंदाजित करण्यात येईल :— |
| | (अ) आकारणीचा प्रमाणभूत दर निश्चित करण्याकरिता ज्या वर्षी कार्यवाही सुरू करण्यात आली असेल, त्या वर्षीच्या लगतपूर्वीच्या पंधरा वर्षाच्या कालावधीतील महसुली विभागातील जमिनीची विक्री, |
| | (ब) पूर्वोक्त पंधरा वर्षाच्या कालावधीमध्ये त्या महसुली विभागातील, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये जमिनीच्या संपादनाशी संबंधित निवाडे, |
| | (क) पूर्वोक्त कालावधीत महसुली विभागातील जमिनीचे भाडेमूल्य. |
| | (३) प्रत्येक महसुली विभागातील एकेकटचा भूखंडाची प्रत्यक्ष आकारणी, (यापुढे तिचा "पूर्ण आकारणी" असा उल्लेख करण्यात आला आहे) दर चौरस मीटरचा रुपयामधील आकारणीचा प्रमाण दर व चौरस मीटरमध्ये भू-खंडाचे क्षेत्रफळ यांचा विहित रीतीने पूर्णांक केलेल्या गुणाकाराइतक्या रकमेत जिल्हाधिकाऱ्याकडून निश्चित करण्यात येईल. |
| | (४) कोणत्याही महसुली विभागातील आकारणीचा प्रमाण दर किंवा तिचे बाजारमूल्य यासंबंधीच्या जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयामुळे हानी पोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाकडे अपील करता येईल :<br>परंतु राज्य शासनास अशा अपिलांचा निर्णय करण्यासाठी उप सचिवाच्या दर्जाहून कमी नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. |
| | (५) राज्य शासनास (मर्यादाकाल आणि सुनावणी यांसाठी असलेली तरतूद धरून), अशी अपीले दाखल करण्यासाठी व निकालात काढण्यासाठी कलम ३०६ अन्वये नियम करता येतील. |

| अधिनियमाचे उपबंध (१) | सुधारणेची व्याप्ती (२) |
|---|---|
| | |

**प्रमाणभूत आकारणीचे दर प्रसिद्ध करणे.**

२६२-ऋ. या प्रकरणान्वये निश्चित केलेल्या किंवा सुधारलेल्या आकारणीचे प्रमाणभूत दर, ते अंमलात आणण्यापूर्वी **शासकीय राजपत्रात** आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने प्रसिद्ध करण्यात येतील.

**आकारणीचे प्रमाणभूत दर फेरतपासणी केली जाईपर्यंत दहा वर्षांकरिता अंमलात असणे.**

२६२-इ. प्रत्येक विभागाकरिता निश्चित केलेल्या आकारणीचा प्रमाणभूत दर, तो ज्यावर्षी निश्चित करण्यात आला त्याच्या लगतनंतरच्या महसुली वर्षाच्या पहिल्या दिवसापासून अंमलात येईल ; आणि तो कलम २६२-अ मध्ये उल्लेखिलेल्या बँकेच्या व्याजाच्या दरात अथवा जमिनीच्या सरासरी बाजारमूल्यात कोणताही फेरफार झाला असला तरीही दहा वर्षांच्या मुदतीकरिता अंमलात राहील आणि उक्त मुदत संपल्यानंतर, या प्रकरणाच्या तरतुदींनुसार फेरतपासणी करण्यास पात्र होईल. त्याची अशा रीतीने फेरतपासणी करण्यात येईपर्यंत पूर्वोक्तप्रमाणे निश्चित केलेला दर अंमलात असल्याचे मानले जाईल.

**हमीची मुदत.**

२६२-इ. (१) कलम २६२-अ मध्ये उल्लेखिलेल्या बँकेच्या व्याजाच्या दरात कोणताही फेरफार झाला असला तरीही किंवा आकारणीच्या प्रमाणभूत दराची फेरतपासणी करण्यात आली असली तरीही, या प्रकरणान्वये कोणत्याही जमिनीसंबंधात निश्चित केलेली आकारणी, ती ज्या तारखेस निश्चित केली असेल त्या तारखेपासून पन्नास वर्षांच्या मुदतीकरिता (अशा मुदतीस "हमीची मुदत" म्हणता येईल) अंमलात राहील.

(२) हमीची मुदत संपल्यानंतर, आकारणी फेरतपासणी केली जाण्यास पात्र होईल ; आणि या प्रकरणाचे पूर्ववर्ती उपबंध, जेथवर शक्य असेल तेथवर अशा फेरतपासणीस लागू होतील.

(३) अशा रीतीने आकारणीची फेरतपासणी करण्यात येईपर्यंत केलेली [illegible] हमीची मुदत संपली असली तरीही, [illegible]

४. कलम [illegible]

(१) "कलम २७४ च्या उपबंधास अधीन राहून" या मजकुराऐवजी "कलम २६२-न, पोट-कलमे (४) व (५) आणि कलम २७४ यांच्या उपबंधास अधीन राहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

| अधिनियमाचे उपबंध | सुधारणेची व्याप्ति |
|---|---|
| (१) | (२) |
| | (२) "आक्षेप घेण्याच्या कारणासाठी" या मजकुरानंतर "यथास्थिती राज्य शासनाकडे किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |
| | ५. कलम २७२ मध्ये,— |
| | (१) "आक्षेप घेणारे अपील त्याने" या मजकुरानंतर "यथास्थिती राज्य शासनाकडे किंवा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |
| | (२) "जिल्हाधिकाऱ्याचे" हा शब्द जेथे प्रथम येत असेल तेथे त्या शब्दानंतर "राज्य शासनाचे" हा मजकूर व "जिल्हाधिकाऱ्याचे" हा शब्द जेथे दुसऱ्या वेळेस येत असेल तेथे त्यानंतर "राज्य शासनाचे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल. |
| | ६. कलम २३४ मध्ये "जिल्हाधिकाऱ्याने" या मजकुरापूर्वी "कलम २६२-ब, पोट-कलमे (४) आणि (५) यात उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

## परिशिष्ट ४३

(कलम २६१ खालील तळटीप व परिशिष्ट ४२ पहा.)

### महसूल व वन विभाग

सचिवालय, मुंबई-३२, दिनांक २६ जून १९७१.

### अधिसूचना

क्रमांक सीआरए-१०६९-एल.—मुंबई शहर (इनामी आणि विशेष धारणाधिकार) निरास आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सुधारणा) अधिनियम, (१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम चव्वेचाळीसावा) च्या कलम १ चे पोट-कलम (३) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे १ ऑगस्ट १९७१ हा दिनांक उक्त अधिनियम अंमलात येण्याचा दिनांक म्हणून विनिर्दिष्ट करीत आहे.

## परिशिष्ट ४४

(कलमे ३६ व ३७ याखालील तळटीपा पहा.)

### सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६

(राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक २५ ऑक्टोबर १९७१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला).

### महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बावीसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम, करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९७१ असे संक्षिप्त नांव म्हणता येईल.

२. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (ज्याचा यात यापुढे "मुख्य अधिनियम" निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम ३६, पोट-कलम (४) मध्ये,—

(अ) "सहकारी संस्थेने त्यास दिलेल्या कर्जाबद्दल" या मजकुराऐवजी "सहकारी संस्थेने किंवा भारताच्या स्टेट बँकेबाबत अधिनियम, १९५५ याच्या कलम ३ अन्वये प्रस्थापित केलेल्या भारताच्या स्टेट बँकेने किंवा बँकांचा व्यवहार करणाऱ्या कंपन्यांबाबत (उपक्रम संपादन करणे आणि हस्तांतरण) अधिनियम, १९७०, याचे कलम २, खंड (ड) च्या अर्थानुसार, तत्सम नवीन बँकेने किंवा संबंधित विधि अन्वये प्रस्तापित केलेल्या, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने, त्यास दिलेल्या कर्जाबद्दल" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**(ब) "उक्त सहकारी संस्थेच्या नांवाने" या मजकुरानंतर "भारताची स्टेट बँक, तत्सम नवीन बँक किंवा यथास्थिती, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, याच्या नावाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.**

(क) "यथास्थिती सहकारी संस्थेस" आणि "यथास्थिती [illegible]" या मजकुराऐवजी "यथास्थिती सहकारी संस्थेस, भारताच्या स्टेट बँकेस, तत्सम नवीन बँकेस किंवा [illegible] राज्य वित्तीय महामंडळास" व "यथास्थिती, सहकारी संस्थेने, भारताच्या [illegible] नवीन बँकेने किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने" हा मजकूर अनुक्रमे दाखल करण्यात येईल.

(ड) "संस्थेच्या अर्जावरून" ह्या मजकुराऐवजी "सहकारी संस्था, भारताची स्टेट बँक तत्सम नवीन बँक किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांच्या अर्जावरून." हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, एकेचाळीस याच्या कलम ५३ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ५३ मध्ये,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये, "संक्षिप्तरित्या" आणि "पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने" हा मजकूर वगळण्यात येईल.

(ब) पोट-कलम (१) नंतर, पुढील नवीन पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१-अ) अशा व्यक्तीला काढून लावण्यापूर्वी, जिल्हाधिकारी, उक्त व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देईल आणि आवश्यक वाटल्यास, तो, संक्षिप्त चौकशी करील. पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, जिल्हाधिकारी, त्याने काढलेल्या निष्कर्षा-संबंधीची आपली कारणे संक्षिप्तरीत्या नमूद करील"

(क) पोट-कलम (२) मध्ये, "जिल्हाधिकाऱ्याने" ह्या शब्दाऐवजी "जिल्हाधिकाऱ्यांने, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे आपल्या निष्कर्षाच्या आधारे" हा मजकूर दाखल करण्यात येईल

शामुना—५६७—मवबमुं—९-७५—५,०७२—पीसी—४*